म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. ३२७६

सावरकरांचा बुद्धिवाद : एक चिकित्सक अभ्यास

प्रा. शेषराव मोरे

REFBK-0025667

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :–खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

11 SEP 1988
25 SEP 1988
9 OCT 1988
6 NOV 1988
13 NOV 1988
7 DEC 1988
18 DEC 1988
14 FEB 1990
12 FEB 1989
21 MAR 1990
21 APR 1991
2 MAY 1990
30 MAY 1990
13 MAR 1991
16 OCT 1996

(क्र. मा. पवा)
५०००–११–८६

12 OCT 1996
16 OCT 1996
3 SEP 1997
21 SEP 1996

स्तक कृपया जपून
वापरावे. धन्यवाद.

संदर्भ निबंध
३२७६
२५६६७
१२।७।८८

निबंध
३२७६
२५६६७
१२।७।८८





सावरकरांचा बुद्धिवाद :
एक चिकित्सक अभ्यास

प्रा. शेषराव मोरे

REFBK-0025667

निर्मल प्रकाशन, नांदेड-२

प्रकाशक :

निर्मलकुमार सूर्यवंशी
निर्मल प्रकाशन
कृष्णाई, नरहर कुरुंदकर मार्ग,
कैलासनगर, नांदेड–४३१६०२.

□

मुद्रक :

निर्मलकुमार सूर्यवंशी
निर्मल मुद्रणालय
कृष्णाई, नरहर कुरुंदकर मार्ग,
कैलासनगर, नांदेड–४३१६०२.

□

मुखपृष्ठ व रेखाटन :

चंद्रकांत पोतदार, नांदेड.

□

© लेखकाचे स्वाधीन

□

प्रकाशन क्रमांक : २१

□

प्रथमावृत्ती :
२८ मे १९८८

□

किमत : ८० रु.

ज्यांच्यापासून आम्ही बुद्धिवाद शिकलो

त्या गोदातटीच्या

कै. नरहर ऋषीला अर्पण —



सावरकरांचा बुद्धिवाद : एक चिकित्सक अभ्यास

– अनुक्रमणिका –

प्रस्तावना : ग. वा. बेहेरे — आठ

भूमिका : — १

विभाग पहिला : प्रखर बुद्धिवाद १७ ते ९६

प्रकरण –

१) धर्माविषयी भूमिका — १९

२) धर्मग्रंथांविषयी भूमिका — ३७

३) विज्ञान धर्माचा स्वीकार — ५५

४) बुद्धिवाद : काही निवडक बाबीसंबंधी — ७८

विभाग दुसरा : उपयुक्ततावाद ९७ ते २८०

प्रकरण –

१) मानवी जीवनाचे स्वरुप — ९९

२) उपयुक्ततावादी दृष्टिकोण : धर्मासंबंधी — १०८

३) उदात्तमूल्याविषयी भूमिका — १२९

४) नीतिमूल्याविषयी भूमिका — १९४

५) शस्त्रबळ : एक आक्षेप — २३०

विभाग तिसरा : बुद्धिवाद विरोधी बाबी २८१ ते ५२२

प्रकरण –

१) अंधश्रद्धेशी तडजोडी — २८३

२) अध्यात्म — ३३२

३) हिंदुत्व — ३६८

समारोप ५२३ ते ५३४

संदर्भ सूची – — ५३५

व्यक्ती नामसूची – — ५४५

शुद्धीपत्र – — ५४७

प्रकाशकाचे निवेदन

स्वातंत्र्यवीर सावरकरांसारख्या महापुरूषाबद्दल, आणि यातही त्यांच्या बुद्धिवादासारख्या गंभीर विचाराबद्दल माझ्या सारख्या छोट्या प्रकाशकाने नांदेड सारख्या आडवळणाच्या गावात आणि त्यातही दर्जेदार असा हा ५६० पृष्ठाचा ग्रंथ प्रकाशित करावा, ही अशोभनीय बाब आहे, याची मला जाणीव आहे. ही जाणीव अनेकांनी मला करून दिलेली होती. तरीही अशा प्रकारची कोणतीही शोभा न होवू देता हा ग्रंथ अगदी वेळेवर वाचकांच्या हाती देताना मला किती आनंद होत असेल, हे काय सांगायला हवे ?

प्रा. शेषराव मोरे हे माझे जिवलग मित्र. प्रा. मोरे यांनी सावरकरांचा किती सखोल अभ्यास केलेला आहे याची मला पूर्ण माहिती होती. सावरकरांचे किंवा त्यांच्यावरील साहित्यच नव्हे, तर सावरकर सदनातील वृत्तपत्रीय कात्रणे व पत्रे याचाही त्यांनी अभ्यास केलेला आहे, व सावरकरांवर गेल्या पाच वर्षापासून ते ग्रंथ लिहित आहेत ही मला माहीती होती. हा ग्रंथ बराच खळबळजनक ठरणार, हे त्याच्या नेहमीच्या विचारारून मला कळत होते. हा ग्रंथ पुण्या–मुंबईकडे जावू देवू नये अशी माझी अिच्छा होती. माझ्या अिच्छेला माझ्या या मित्रानी मान देवून हा ग्रंथ प्रकाशनाचा बहुमान मला मिळवून दिला, याबद्दल त्याचे आभार मानणे औपचारिक ठरेल. दररोज चार ते पाच पाने या गतीने हा ग्रंथ मी छापला व या चार–पाच महिन्याच्या काळात प्रा. मोरे याना प्रुफ तपासण्यापासून तो माझ्या अितर अडचणी सोडविण्याबद्दल जो त्रास झाला, याबद्दल मात्र त्याची क्षमा मागणे मी माझे कर्तव्य समजतो.

प्रा. शेषराव मोरे हे एक टोपण नाव आहे, व खरा लेखक कुणीतरी जोशी किंवा देशपांडे असला पाहिजे, असा बऱ्याच लोकांचा झालेला समज मला माहीत आहे. टोपण नाव व्यक्तीचे असावे कारण त्यात कुणाची फसवणूक; नसते मात्र जाती किंवा धर्माचे टोपण नाव घेवू नये असे मला वाटते. शेषराव मोरे हे व्यक्तीचे टोपण नाव आहे का नाही ही गोष्ट तूर्त बाजूला ठेवून, जे कोणते खरेखुरे शेषराव मोरे असतील, ते 'मोरे'च्याच वर्गातील आहेत, हे मात्र मी खात्रीने सांगू अिच्छितो. या ग्रंथात सावरकरांवर जो 'अन्याय' प्रा. मोरे यानी केलेला आहे, तो लक्षात घेता प्रा. मोरे हे 'मोरे'च आहेत याबद्दल सावरकरांच्या अनुयायांच्या मनात काही शंका राहील, असे मला वाटत नाही. याबद्दल प्रा. मोरे याना ते क्षमा करतील याची मात्र मला शंका आहे.

(सहा)

सावरकर भक्तीचा टिळा लावून सावरकरांची आरती करण्यात त्यांच्या अनुयायांनी मग्न राहावे व मोरेसारख्यानी मात्र सावरकरांचे भव्योदात्त रूप दाखवून देण्याचे आव्हान स्वीकारावे, ही मात्र सावरकरांच्या अनुयायांची खरी शोकांतिका आहे. निदान हा ग्रंथ वाचल्यावर प्रा. मोरे यांना शिव्या देवून या शोकांतिकेत भर घालण्याअैवजी आपल्या भूमिकेचा पुनर्विचार करण्याची अिच्छा सावरकरांच्या अनुयायात निर्माण होवो, अशी माझी अीश्वरचरणी प्रार्थना आहे.

५६० पृष्ठांचा हा ग्रंथ फक्त ४० रु. प्रकाशनपूर्व मूल्यात घरपोच देण्याचे आम्ही जाहीर केले, आणि सुमारे ५०० वाचकांनी या योजनेचा लाभ घेवून आमच्यावर विश्वास व्यक्त केला त्याबद्दल त्याचे आम्ही शतशः ऋणी आहोत. कोणत्या आर्थिक लाभाच्या धंदेवाईक दृष्टीने हा ग्रंथ आम्ही प्रकाशित केलाच नाही, हे मी येथे स्पष्टपणे नोंदवू अिच्छितो.

मुद्रणाच्या दृष्टीने हा ग्रंथ होअील तेवढा चांगला व शुद्ध करण्याचा प्रयत्न आम्ही केलेला आहे. तरीही शुद्धलेखनाच्या व मुद्रणाच्या बऱ्याच चुका या ग्रंथात झालेल्या आहेत. तज्ञ असा धंदेवाईक प्रुफरीडर आम्हाला अखेरपर्यंत मिळू शकला नाही. लेखकाच्या व पाहुण्या मित्रांच्या मदतीवर आम्ही हे काम भागवून घेतले आहे. तरी झालेल्या चुका फारच कमी आहेत हे आपल्या लक्षात येईल.

शुद्धीपत्र व व्यक्ती नामसूची आम्ही तयार केलेली आहे. पण काही अपरिहार्य कारणास्तव प्रकाशनाच्या अगोदर बांधणी झालेल्या प्रतीमध्ये या गोष्टी आम्हाला समाविष्ठ करता आलेल्या नाहीत, याबद्दल मी दिलगिरी व्यक्त करतो.

या ग्रंथासाठी 'सोबत'चे संपादक मा. ग. वा. बेहेरे याचे आम्हाला अमूल्य सहकार्य झाले. या ग्रंथाला त्यांनी प्रस्तावना लिहून देवून आमच्या ग्रंथाचे मोल त्यानी वाढविले आहे. तसेच सोबतच्या सहसंपादिका सौ. छाया गोडबोले यांनी आम्हाला जे सहकार्य केले तेही अनमोल असून त्याबद्दल त्यांचे आम्ही आभारी आहोत.

या ग्रंथाच्या मलपृष्ठावर गुरुवर्य नरहर कुरुंदकरांचे सावरकरांसंबंधीचे विचार उद्धृत करण्यासंबंधी श्रीमती प्रभावती कुरुंदकर यानी आम्हाला अनुमती दिली याबद्दल त्यांचा मी मनःपूर्वक आभारी आहे.

या अंकासाठी मुखपृष्ठ व आतील रेखाकृती काढून देवून या ग्रंथाचे मोल वाढविल्याबद्दल प्रा. चंद्रकांत पोतदार, यांच मी मनःपूर्वक आभारी आहे. तसेच चार–पार महिने रात्रंदिवस काम करून व कसलीही विश्रांती न घेता या ग्रंथाचे कंपोज करून देवून वेळेवर हा ग्रंथ तयार करण्याचे आव्हान स्वीकारल्याबद्दल आमचे सहकारी श्री व्यंकट रावण कोल्हे, श्री पांडुरंग हरी कोल्हे, व म. असपाक यांचाही मी आभारी आहे.

— निर्मलकुमार सूर्यवंशी

प्रस्तावना

गेल्या शतकातून या शतकात आपण पारतंत्र्यापासून स्वातंत्र्यापर्यंत प्रवास केला. पारतंत्र्याविरुद्ध अवघ्या तीस-चाळीस वर्षात एक लढणारी पिढीच्या पिढी निर्माण झाली. त्यात लोकहितवादी, फुले, आगरकर, या समाजपरिवर्तनाची भाषा बोलणाऱ्यापासून ते तात्या टोपे, नानासाहेब पेशवे, वासुदेव बळवंत फडके भगतसिंग आणि क्रांतिकारकांचे मुकुटमणी वि. दा. सावरकर, या प्रत्यक्ष शस्त्राचाराने इंग्रजाशी प्रतिकार करणाऱ्या क्रांतिकारकांचा समावेशही होता. सरकारशी सनदशीरपणे लढा देण्यासाठी कार्यमग्न असलेल्या काँग्रेस पक्षाच्या सर्व पुढाऱ्यांचाही त्यात वाटा आहे. यात काही चिंतक होते, काही सेनापती होते, तर काही माणसाच्या ऐहिक सुखाचा विचार करणारे आणि त्याला कृतीची जोड देणारे समाजसेवकही होते. गेल्या शतकाच्या पूर्वार्धात थोर नेत्यांचे पीकच या देशात आले होते. अशाच एका कालमुद्रा ठोकणाऱ्या विचारवंताची म्हणजेच वि दा. सावरकरांची जीवनजिज्ञासा शोधून पाहणे, हा एक कष्टाचा तरी एक अपरिहार्य असा अभ्यासाचा विषय आहे. सावरकर हे नुसतेच क्रांतिकारक नाहीत, नुसतेच साहित्यिक नाहीत, नुसतेच प्रचारक नाहीत तर संपूर्ण जीवनाचे ते भाष्यकार आहेत. दुर्दैवाने त्यांच्या आयुष्यातील मौलिक तारूण्य इंग्रजांच्या कैदखान्यात गेले आणि प्रभावी प्रौढपण गांधीवादाचा बिमोड करण्यात गेले. पौरुषयुक्त स्वातंत्र्य हा त्यांच्या जीवनाचा मुलाधार आहे. हे स्वातंत्र्य केवळ राजकीय स्वातंत्र्य नव्हे, तर आत्म्याचे स्वातंत्र्य आहे. त्याचप्रमाणे त्यांचे सारे तत्वज्ञान, प्राणीमात्रांच्या सुखदुःखांशी जखडलेले आहे. जे जे मानवसमूहाला उपयुक्त त्याचा अंगिकार करण्यासाठी सर्व जीवनाकडे पाहण्याची जीवनवादी दृष्टी असावी लागते व

सावरकरांच्या इतकी ती कुणाकडेही नाही. सत्य, अहिंसा, नीती या शब्दात सावरकर कधीही अडकून बसले नाहीत. कारण हे शब्द फार फसवे आहेत, हे त्यांना माहीत होते. सावरकर त्यांच्या भक्तांनी समजून घेतलेले नाहीत. यासाठी त्यांच्या अडाणीपणाला क्षमा करता येईल; परंतु थोर अभ्यासकांनीसुद्धा जाणीवपूर्वक सावरकरांच्यावर अन्याय केला आहे, हे या ग्रंथात पुराव्याने सिद्ध केले आहे. सावरकर ही रोजच्या रोज फुले देणारी वनस्पती नव्हे, तर अनेक वर्षांनी उगवणारे ब्रह्मकमळ आहे. सावरकरांना पाहण्यासाठी दोन डोळे सुद्धा पुरत नाहीत. आणि आमचे तथाकथित संशोधक तर त्यांना एका डोळ्यानेच पाहू इच्छितात. एखाद्या वस्तूचे संपूर्ण ज्ञान होण्यासाठी दोन डोळ्यांची गरज असते कारण त्यामुळे वस्तूची त्रिमिती लक्षात येते. हे एकाक्ष संशोधक सावरकरांना समजून घेणार कसे ? सावरकरांना अनंत विषयात गती आहे आणि त्या सर्वांचा एकत्र विचार केल्याशिवाय सावरकरांचे चित्र उभेच राहात नाही.

टीव्हीवर नुसते ठिपके ठिपके दिसावेत आणि चित्र उमटूच नये, तसे या सावरकरांचे या विचारवंतानी केले आहे. म्हणून सावरकर जर संपूर्ण समजून घ्यायचे असतील तर ते एक अखड विणीचे वस्त्र आहे आणि ते विधात्याने काळजीपूर्वक विणलेले आहे, की ज्याचे विधात्यालासुद्धा आश्चर्य वाटते. विलक्षण अशा दाहक यातनांना कवित्वाचे फूल लाभावे आणि हळहळीचा सुस्कारासुद्धा बाहेर पडू नये असे पेटलेले ते एक अखंड अग्निकुंड होते. सावरकरांच्या सर्व टीकाकारांनी सावरकरांचे जाणीवपूर्वक अवमूल्यन केले आहे, कारण त्यांना ज्यांना मोठे ठरवायचे होते तो माणसे फारच सामान्य कुवतीची होती. सावरकरांच्या प्रत्येक वाक्याचा, प्रत्येक मताचा, त्यांनी विपर्यास केला आहे. सावरकर कळवळून सांगतात की, माणसांमाणसात फरक करणारा धर्म असूच शकत नाही. तरीही सावरकरांना धर्मांध-धर्मवेडे ठरवण्याची या संशोधकांची खटपट चालू आहे. सावरकर शक्तीपूजक जरुर होते, परंतु शक्तीच्या मर्यादाही त्यांना माहीत होत्या आणि त्या वेळोवेळी त्यांनी प्रगट केल्या आहेत असे असूनही सावरकरांचा शस्त्रवेडे म्हणून करायला लोकांनी कमी केले नाही.

सावरकरांचा बुद्धिवाद हा या देशातील कोणत्याही बुद्धिवाद्यापेक्षा उच्च प्रतीचा आहे. कारण त्याच्यामागे कठोर तर्कशास्त्र लपलेले आहे. आणि शिवाय सावरकर जरी कठोर दिसत असले तरी ते एक हळवे कवी, कलावंत आहेत. माणुसकीचा त्यांना कधीही विसर पडलेला नाही. गांधीजींच्या दयावादापेक्षा सावरकरांची मानवी हक्क कल्पना ही अधिक कालोचित आहे. सावरकरांच्या एकूण तर्कशास्त्रात अगदी वरवर पाहिले तरी काही परस्पर विरोधी घटना आढळतात. सावरकर शस्त्रवेडे होते तर त्यांनी भागानगरचा निःशस्त्र प्रतिकार का पुरस्कारिला? सर्व मानव एका पातळीचे असे मानणारे सावरकर हिंदुत्वाची कड का घेतात ? हिंदुत्व म्हणजे काय याचा मूलगामी विचार ज्यांनी केला त्यांनी, हिंदुधर्माची मात्र

खूप टर उडविलेली आहे. या साऱ्या विसंगतीतही काही अर्थ आहे. प्रज्ञापुरुष स्वतःशीच प्रतिवाद करीत असतो - मूळ तत्वाच्या पूर्णतेसाठी सावरकर अन्य कोणीही असोत, पण मूलतः ते तत्वज्ञ आहेत. अंतःप्रेरणेवर, अध्यनावर, अनुभवावर आणि अनुभूतीवर त्यांचा गाढ विश्वास आहे. म्हणून सावरकरांचा अभ्यास कठीण आहे. सावरकरांचे कोणतेही लेखन करमणुकीसाठी लिहिले गेलेले नाही, हे सांगितलेच पाहिजे. माझ्या वाचून हे कुणी सांगणार नाही, असा एक दुर्दम्य आत्मविश्वास त्यांच्याजवळ आहे. त्यांच्या अल्पवयातील कविता वाचल्या तर युवक ज्ञानेश्वराची आठवण होते. अर्थासाठी शब्दांना कितीही वाकविण्याची त्यांची ताकद लक्षात येईल. सावरकरांनी तरुणपणात स्वातंत्र्याची ही जी स्वप्ने पडली, त्या स्वप्नात कुठे तरी शिवप्रभूंची आटवण येते. प्रचार करतांना शंकराचार्याचा आवेग त्यात असतो, आणि रामदासांचा परखडपणाही त्यात असतो. सावरकरांना देवत्वाच्या ठिकाणी नेवून बसविण्यात अर्थ नाही, कारण सावरकरांच्या हातूनही काही प्रमाद घडलेले आहेत. ही गोष्ट तर खरीच आहे की फार प्रौढपणी सावरकर मुक्त झाले. गांधीजींनी सारा हिंदुस्थान आपल्या गारूडाने भारून टाकला होता. या मुकाबल्यात सावरकर यशस्वी झाले नाहीत, हे सत्य स्वीकारायला काय हरकत आहे ? सावरकर गांधीजींचा प्रभाव कमी करू शकले नाहीत. सावरकर प्रभावी अनुयायांची फौज उभी करू शकले नाहीत. कर्तबगार माणसांना गोळा करण्याची विद्या ते हरवून बसले होते. त्यामानाने मार्ग कोणतेही असोत, या देशातील सर्वोच्च बुद्धिमता गांधीजींनी काँग्रेसच्या झेंड्याखाली आणली. ऐहिक यशापयशाच्या हिशोबात मी हे विधान करीत नाही. आज हिंदुत्वाचा नवा जयजयकार कानावर येतो आहे. तो तर सावरकरांचाच आवाज आहे. आणि गांधीजी उरले आहेत ते बोफोर्स प्रकरणात ! गांधीजींना हिंसा नको होती ना, तरी गांधीजींच्या एका चुकीच्या निर्णयाने हिंदूंचा नरसंहार झाला; आणि तो अजून होतो आहे. त्यांच्या प्रेतावर पाय ठेवून देशाची फाळणी झाली; तरीही कोणाही गांधीभक्ताच्या डोळ्यात अश्रू दिसले नाहीत.

सावरकरांचा प्रखर बुद्धिवाद हे त्यांचे इतिहासातील एक पान होण्याचे कारण आहे, पण भूगोलातील एक पान हरवले गेले त्यासाठी सावरकर काही करू शकले नाहीत. सावरकरांचे अनुयायी बुद्धिभोळे, भांबडे, कर्मकांडात गुंतलेले; आणि श्रद्धेने सावरकरांचे अनुकरण करणारे होते. श्रेष्ठ बुद्धिमंताचा आणि बुद्धिवाद्याचा हा एक प्रकारे पराभव होता. सावरकरांचे हिंदुत्व हिंदूनाच समजले नाही, कारण त्यांचा लेखी हिंदू ही उपासना पद्धती नव्हती, तर या देशात वावरणाऱ्या प्रजेला एकत्र आणणारा तो एक चिवट धागा होता. आणि म्हणून हिंदू समाजाला गांधींचे नेतृत्व पसंत पडले आणि या इहवादी, उपयुक्ततावादी, आणि कटोर तर्कशास्त्रज्ञाचे नेतृत्व अमान्य झाले. सावरकरांच्या गुणांनीच त्यांचा पराभव केला. प्रत्येक गोष्टीत ते आपल्या ताकदीनिशी टोकापर्यंत जातात, की जेथे धोका असतो. लोक तेथपर्यंत पोचू शकत नाहीत. लोक येऊ शकतील तेवढ्याच टप्प्यावर थांबले

पाहिजे, असे सावरकरांना कधी वाटलेच नाही. गांधी-नेहरू हे त्यांना कधी स्पर्धक वाटलेच नाहीत. त्यांचा सारा लढा व्यक्तीशी नाही– तत्त्वाशी आहे. माणसाचे श्रेष्ठत्व त्यांच्या मनावर ठसलेले आहे. न्याय कल्पनेवर त्याचा विश्वास आहे. मुसलमानांसकट सर्व धर्मांना ते सारखेच स्वातंत्र्य द्यायला तयार आहेत. फक्त राष्ट्राच्या उत्कर्षाच्या आड ते येत नाही तोपर्यंत! खरे तर धर्म या कल्पनेवर त्यांचा फारसा विश्वास नाही. किंवा 'राष्ट्र' ही कल्पनासुद्धा त्यांना अपुरी वाटते. जोपर्यंत जगात इतर राष्ट्रे शिल्लक आहेत आणि धर्माच्या कारणाने लोक असहिष्णू बनतात तोपर्यंत त्यांना हिंदुराष्ट्राचा व हिंदुधर्माचा विचार मांडावाच लागतो.

सावरकर हिंदुराष्ट्राचे पुरस्कर्ते आहेत त्या अर्थी त्यांची वैदिक हिंदुधर्मावर श्रद्धा आहे, असा ग्रह पुष्कळांनी करून घेतला. एकदा धर्माची संकल्पना मानली की आपोआपच धार्मिक श्रेष्ठत्वाचा दुराग्रह उत्पन्न होतो. सावरकरांच्या टीकाकारांनी, ज्याअर्थी सावरकर धर्माचे महत्व मानतात, त्याअर्थी धर्माशिवाय माणसाचे चालणार नाही असेच त्यांचे मत असले पाहिजे, असे गृहीत धरुन त्यांच्यावर अकारण आगपाखड केली आहे. हे टीकाकार विसरतात की, अभिनव भारताच्या चळवळीत किंवा सत्तावन्नचे स्वातंत्र्य समर या ग्रंथाचे लेखन करताना सावरकरांच्या मनात मुसलमानांच्या बद्दल यत्किंचितही अनादर नाही. हा हिंदुराष्ट्रवादाचा विचार त्यांच्या डोक्यात आला तो उघडउघड प्रतिक्रियावादात्मक आहे. अंदमानाच्या कालखंडात त्यांचा प्रत्यक्ष मुसलमान गुन्हेगारांशी संबंध आला. हिंदूंना आणि मुसलमानांना इंग्रज सरकार वेगवेगळी वागणूक देते हे त्यांच्या अनुभवाला आले. संख्येने कमी असूनही धार्मिक एकजुटीमुळे मुसलमान समाज आपल्या मागण्या हिंदूंच्यापेक्षा जास्त नेटाने पदरात पाडून घेऊ शकतो, हे त्यांच्या लक्षात आले त्याच सुमारास त्यांनी मुसलमानी धर्मग्रंथांचा अभ्यास केला असावा. आणि त्यांच्या एक गोष्ट लक्षात आली की मुसलमान कोठेही असोत ते अन्य धर्मीय समाजाशी एकरूप होऊ शकतच नाहीत, अशी त्या धर्माची रचना आहे. धर्मवेड जागे ठेवायचे असेल तर सारा समाज धर्मगुरूंच्या कायम ताब्यात राहील, अशी व्यवस्था करणे भाग आहे. धार्मिक मागासलेपणा हे एकजुटीचे कारण होऊ शकते. मुसलमानांच्या या धार्मिक एकरुपतेच्या मानाने वर्णव्यवस्था व जातिव्यवस्था यामुळे हिंदू समाज मात्र विस्कळीत राहील. इंग्रजांनी मुसलमानांचा अलगपणा जोपासला आणि मिशनऱ्यांच्या साहाय्याने सुशिक्षित हिंदूत सुधारणेच्या नावाखाली कलह लावून दिला. या साऱ्याचे दुष्परिणाम सावरकरांना दिसू लागले. आणि संभाव्य संकट ओळखून हिंदुत्व म्हणजे काय? हिंदूचे संघटन शक्य आहे का? हिंदूंच्या कालप्रवाहातून वाहून आलेल्या चुका दुरूस्त करता येतील का, या विचारांनी त्यांना संत्रस्त केले. मग त्यांनी हिंदुत्वाची व्याख्या केली, जातीपाती निरर्थक ठरविण्याचा उद्योग केला, उच्चनीचता हास्यास्पद ठरविली,

धर्मग्रंथ–धर्मगुरू यांचे वर्चस्व कमी करून टाकले. आणि हिंदूंची शक्ती एका झेंड्याखाली गोळा करायला आरंभ केला.

त्यांच्या हयातीत त्याना हवे होते ते आक्रमक हिंदुत्व प्रत्यक्षात आलेले त्यांना पाहता आले नाही. पण त्यांनी ओळखलेल्या हिरव्या संकटामुळे आपोआपच हिंदूचे संघटन करणे सुलभ होत गेले. हिंदूंचे संघटन करणारी सर्वोच्च संस्था म्हणजे डॉ. हेडगेवार यांनी स्थापन केलेला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ सावरकरांच्या प्रेरणेतून जन्म पावलेले हिंदू संघटनेचे दृश्य फळ. सावरकरांचे नाव आज प्रत्यक्ष संघाशी जोडले जात नाही, कारण कोणत्याही संघटनेला सावरकरांचा बुद्धिवाद परवडण्यासारखा नाही. अजूनही त्या काळातील जुने व जाणते संघ स्वयंसेवक हयात आहेत. संघाला जे आरंभी लष्करी संघटनेचे रुप होते आणि संचलने, बॅण्ड, लष्करी पेहराव, कडवी शिस्त, गुप्ततेचे वातावरण त्या साऱ्याच गोष्टींनी हिंदू संघटनेला एक निराळी दिशा मिळाली होती, ती का? कोणत्याही संस्थेत कालमानाने आणि नेतृत्वाच्या व्यक्तित्वाने थोडेफार फरक होत जातात तसे ते संघातही झाले. पण मनोमनी आजच्या संघप्रमुखांना हे ठाऊक आहे की या पुढच्या कालखंडात सावरकरांचा आधार सतत घ्यावा लागेल. आता प्रत्यक्ष सावरकर हयातच नाहीत. त्यांची ऐतिहासिक अनुमाने तेवढी शिल्लक आहेत. ती अनुमाने खरी होताना दिसतात. अशा वेळेला ज्यांनी सावधगिरीची सूचना दिली, त्या दृष्टया पुरुषाची आठवण होणारच.

सावरकर शक्तीचे उपासक होते यात मुळीच शंका नाही; पण ती शिवशक्ती होती. विवेकाने वापरायची शक्ती होती. अपरिहार्य हिंसा सावरकरांना मान्य आहे. पण प्रत्येक प्रश्न शक्तीनेच सुटतो यावर मुळीच विश्वास नाही. हिंदु-मुसलमान प्रश्न हा सलोख्याने सोडविण्याची त्यांची तयारी आहे, पण त्यासाठी मुसलमानांनी या राष्ट्रविषयीची आपली कर्तव्य पार पाडली पाहिजेत एवढेच त्यांचे म्हणणे आहे. शक्तीची उपासना करणाऱ्या सावरकरांचे लोकशाहीवरचे प्रेम पाहून पुष्कळांना आश्चर्य वाटते. शक्तीने एखादा प्रश्न सोडल्यानंतर दैनंदिन समाजव्यवस्था ही लोकशाहीनेच झाली पाहिजे, कारण त्याशिवाय अधिक चांगला मार्ग उपलब्ध नाही, अशीच त्यांची धारणा होती. सावरकरांना विसरायचे, टाळायचे असे जरी ठरविले तरी, रोज इतिहास असे वळण घेतो आहे की त्या वळणापाशी सावरकरांचे स्मरण करावेच लागेल. ईशान्य दिशेकडील लहानसहान टोळीवाल्यांची राज्ये कधीही भारतात एकरुप होणार नाहीत, कारण तेथे ख्रिश्चन धर्माचा प्रसार करु दिला, हे सावरकरांनी फार पूर्वी वर्तविलेले भविष्य आहे. धर्मांतर म्हणजे राष्ट्रांतर हे त्यांचे म्हणणे लोकांना अतिरेकी वाटले, पण आज खरोखरीच खरे ठरले आहे. ईशान्येकडील या टोळीवाल्याच्या प्रदेशात लष्करी सत्ता कायम ठेवल्याशिवाय शांतता नांदत नाही. या देशाशी बेइमान होणाऱ्या लालडेंगा, पिझो या नेत्याना हाताशी धरूनच आजचे भारतीय सरकार लोकशाही

असल्याचा देखावा करत आहे.

शिखांच्या प्रश्नाचेही भान सावरकरांना होते. शिखांचा इतिहास या त्यांचा ग्रंथ दुर्दैवाने काळाच्या उदरात गडप झाला. आज सावरकर हयात असते तर शिखांचा प्रश्न बिकट झाला नसता. साऱ्या भारतात खऱ्याखुऱ्या अर्थाने सावरकरांचा जयजयकार शिखांनीच केला. शिखांच्या लेखी सावरकर हे अकरावे गुरु होते. शीख समाजाने कित्येक वर्ष सावरकरांचा अंगरक्षक दिला होता. शिखांचा पक्षीय स्वार्थासाठी किंवा सत्तास्पर्धेसाठी सावरकरांनी कधीही उपयोग केला नाही. त्यामुळे शिखांचा विश्वास सावरकर कधीच गमावून बसले नाहीत. शिखांना त्यांच्या हिंदुत्वाची जाणीव करुन देण्याचे काम सावरकर सतत करत राहिले. हिंदुत्वाचे विस्मरण करुन देण्यांचे कार्य काँग्रसचे नेते करत राहिले. परिणामी आज शिखांना भारतापासून फुटून निघण्याची इच्छा झाली आहे. तसे करण्यात त्यांचा फायदा नाही, हे त्यांच्यापैकी काही शहाण्या लोकांना माहीत आहे. पण त्यांच्यातील विवेकी लोकांना अवमानित करुन भिंद्रनवाले सारख्या अतिरेक्यांना काँग्रेसनेच जवळ केले होते. आज भारतात जेथे जेथे अशांतता माजलेली आहे. त्या त्या विभागातील कारणांचा विचार सावरकरांनी पूर्वीच केलेला आहे. प्रांतीय पक्ष वाढले ते उघडउघड मध्यवर्ती सरकारच्या अतिकेन्द्रित कारभारामुळे आणि स्थानिक प्रश्नाकडे दुर्लक्ष केल्यामुळे सावरकरांनी आरंभापासून भारतीय एकतेच्या दृष्टीने भारताची पुनर्रचना करणे आवश्यक आहे, हे प्रतिपादन केले. भारतात जे जे वाद उदयाला आले, त्या बहुतेक वादांच्या मागे परकीय राष्ट्रांचा हात होता हे सिद्ध झालेले आहे. भारताला परवडेल आणि फायदेशीर ठरेल असेच परराष्ट्रीय धोरण भारताने आखले पाहिजे हे सावरकरांचे सांगणे होते. देशांत समर्पणाची वृत्ती जागती ठेवली पाहिजे आणि नव्या उद्योगप्रिय समाजाची निर्मिती केली पाहिजे, हा त्यांचा सदैव आग्रह होता.

सावरकरांच्या नावावर 'विज्ञाननिष्ठ' ही एक मुद्रा ठोकलेली आहे. पण विज्ञाननिष्ठा म्हणजे नव्या वैज्ञानिक उपकरणांच्या वापराविषयी आग्रह असा त्याचा अर्थ नव्हे. आधुनिक जगात टिकून राहायचे असेल तर सर्व दिशेने विज्ञानाचा अभ्यास अत्यावश्यक आहे. नवे तंत्रज्ञान आपले आपणच तयार करावे लागेल. जेव्हा आपण विज्ञाननिष्ठ व्हावे असे म्हणतो तेव्हा आपली भूमिका विज्ञानाची अपरिहार्यता पत्करण्याएवढीच असता कामा नये. पूर्वी ऋषीमुनींच्या साधनेप्रमाणे विज्ञान ही एक अखंड साधना आहे. तर्कशास्त्राच्या कठोर पायऱ्या चढण्या-उतरण्याचा दमवून टाकणारा तो एक उद्योग आहे. भाबड्या श्रद्धांना जाळून टाकल्याशिवाय विज्ञाननिष्ठा जन्मालाच येत नाही. माणसाच्या बदलत्या गरजा विचारात घेऊन जे अद्यायावत्, जे उपयुक्त ते सारे दिर्घकालीन प्रयत्नाने प्राप्त केले पाहिजे, अशी सावरकरांची धारणा आहे. तेही अद्यायावत् लष्करी शस्त्रास्त्रे बाळगण्याची आवश्यकता प्रतिपादतात. किंवा अणुबाँब निर्माण

करण्याचाही आग्रह धरतात. पण तो वापरण्याची सूचना मात्र करीत नाहीत. रक्तपाताला ते घाबरत नाहीत. पण कोणतीही किंमत देऊन तो टाळण्याचा प्रयत्नही ते करणार नाहीत. हे जग शांततेने, सौजन्याने, विवेकाने चालले पाहिजे, दरडोई एक मत या पद्धतीने समाजाने निर्णय घेतले पाहिजेत व समाजाचे निर्णय व्यक्तीने पाळले पाहिजेत यावर त्यांची श्रद्धा आहे. पण शत्रूंनी शस्त्रसंपन्न असावे आणि आपण त्यांच्या उदारतेवर अवलंबून राहावे हा उद्योग त्यांना मान्य नाही. त्यांनी मानवी इतिहासाचा अभ्यास केलेला आहे. किंबहुना त्यांच्या साऱ्या तत्त्वज्ञानाचा इतिहास हा पाया आहे. जगण्यासारखे आहे तेच जगते हा निसर्गाचा नियम ते कायमचा शिकले आहेत. इतिहासानेच त्यांना जीवननिष्ठा दिल्या. विज्ञानाची अपरिहार्यता शिकविली, शस्त्राची मर्यादाही दिली. आणि त्याचबरोबर माणसाचा हव्यास व माणसाचें हौतात्म्य या दोन्हीचेही दर्शन घडविले. सावरकरांचे मोठेपण अशासाठी की, ते जे शिकले ते मरेपर्यंत कधी विसरले नाहीत. त्यांना जे सत्य सापडले, त्यांच्याशी ते कधी बेइमान झाले नाहीत, एकदा केलेली चूक त्यांनी पुन्हा कधी केली नाही. समृद्धीचा, कीर्तीचा, मानसन्मानाचा त्यांना कधी हव्यास निर्माण झाला नाही. कारण ते अखेरपर्यंत यतिधर्माचे साधकच राहिले आणि त्यांची अखेरही यतिधर्माला शोभेशीच झाली.

या देशाचा सारा इतिहास ज्यांनी हिंदुत्वाच्या मंत्रात गुंफला आणि एका हिंदुत्वाच्या तत्वज्ञानात येथील उदार सहिष्णू राजकारण बसवले, असा हा भारतीय तत्त्वज्ञ भारताला कधी समजलाच नाही. जणू काही कोणाच्या सत्तेत तो स्पर्धक आहे, असे मानून अनेकांनी त्याच्यावर क्रूर हल्ले केले, पण विज्ञानाचे, समयसूचकतेचे आणि दूरदृष्टीचे कवच पांघरणाऱ्याला या वांझ टीकेने काय होणार? जसजसा काळ उलटत जाईल तसतसे सावरकरांचे चित्र अधिक स्पष्ट होत जाईल. जेव्हा या देशात हिंदूंचे राष्ट्र निर्माण होईल व ते निर्माण झाले तरीसुद्धा परधर्मियांना काहीही अवघडल्यासारखे वाटणार नाही, त्याक्षणी सावरकरांचा आत्मा तृप्त होऊन अनंतात विलीन होईल.

एक श्रेष्ठ दर्जाचा क्रांतिकारक, कोठल्याही देशाला अभिमान वाटावा असा प्रज्ञापुरुष, ज्याच्या हौतात्म्याच्या दंतकथा निर्माण व्हाव्यात, आणि कवींना ज्यांच्यावर कविता लिहाव्यात असे वाटावे असा श्रेष्ठ नायक हेच सावरकरांचे खरे रुप आहे. हे रूप समजून देण्यासाठी प्रा. शेषराव मोरे यांनी जो मार्ग स्वीकारला आहे तो भावडचा सावरकर भक्तांना आवडणार नाही. या ग्रंथातून व्यक्त होणारे सावरकरांचे भव्य आणि उदात्त रूप त्यांना सहनच होणार नाही. या ग्रंथातील प्रत्येक विधानाला पुराव्याची जोड आहे. सावरकरांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन भक्तीचा नसून चिकित्सेचा आहे. सावरकरांच्या मर्यादा सांगताना लेखकाला आपण काही अगोचरपणा करतो असे वाटत नाही, कारण तो खराखुरा सावरकरांचा बुद्धिवादी शिष्य आहे. सावरकर त्यांच्या लेखी भक्तीचा विषय

नाही तर अभ्यासाचा विषय आहे. हा लेखक कोणत्याही पक्षाचा चष्मा लावून सावरकरांच्याकडे बघत नाही. त्यामुळे सावरकरांच्या टिकाकारांवर त्याने केलेले कठोर प्रहार पूर्वग्रहदूषित आहेत असे म्हणता येत नाही. या ग्रंथाचा मूळ विषय सावरकरांचा बुद्धिवाद हा असल्यामुळे सावरकरांचे अन्य पैलू त्याने विचारात घेतलेले नाहींत. पण बुद्धी ही फ्लॉवरपॉटमध्ये बाहेरुन घातलेल्या पुष्पगुच्छासारखी नसते. बुद्धीचा विकास होत असताना, भावनांचे कितीतरी पदर आपोआप त्या बुद्धिवादाला चिकटले जातात, सावरकरांच्या बुद्धिवादाइतकाच सावरकरांचे भावविश्व हाही एक आनंददायक अभ्यासाचा विषय आहे. ज्या उन्हात मारी निबर फुलेसुद्धा कोमेजून जातात. त्या उन्हात वर्षानुवर्षे राहून सावरकराच्या जीवनाची कळी टवटवीत कशी राहिली याचे आश्चर्य वाटते.

प्रा. शेषराव मोरे यांनी सावरकरांचा वर्षानुवर्षे राबून हा जो अभ्यास केला, त्या अभ्यासाला त्यांनी अत्यंत कठोर असे निकष लावले, याबद्दल त्यांचे अभिनंदन केले पाहिजे. प्रा. मोरे हे प्रा. कुरुंदकरांचे शिष्य. कुरुंदकरांचे ते खूप देणे लागतात. किंबहुना अशा तऱ्हेच्या व्यासंगाची दिशा त्यांनी कुरुंदकरांकडूनच घेतली. पण कुरुंदकरांनी हिंदुत्वनिष्ठांच्यावर केलेल्या चुकीच्या टिकेवर प्रहार करताना प्रा. मोरे कचरत नाहीत. कै. कुरुंदकरांनासुद्धा आपल्या या शिष्याचा अभिमान वाटेल अशी मला खात्री आहे. उद्याचा भारत ज्यांना समजावून घ्यायचा असेल, त्यांनी हा ग्रंथ एकदा शांतपणे वाचला पाहिजे. कारण आजची संकटे समजून घेण्यासाठी १९२० ते १९५० या कालखंडात जावे लागेल, त्याचप्रमाणे भारतापुढील उद्याची संकटे निवारण करताना स्वातंत्र्यानंतरचा अधःपतित काल विचारात घ्यावा लागेल. तेव्हा सावरकरांचे विचारही आपल्याला वारंवार भेटतील. वाऱ्यावादळात गलबतांना दिशा दाखवणारा एक दीपस्तंभ उभा असतो, पण तिकडे दुर्लक्ष करायचे ठरविले तर त्या दिपस्तंभाचा काहीच दोष नसतो विचारवंताची कुचेष्टा करण्याचा, सेवाव्रत्तीची अप्रतिष्ठा करण्याचा, चारित्रवंताना तुच्छ लेखण्याचा काल आलेला असताना त्या दिपस्तंभाकडे कुणाचे लक्ष जाईल असे वाटत नाही. तरीपण दीपस्तंभ मजबूत पायावर आहे तेथेच उभा आहे. रक्ताच्या शेवटच्या थेंबाचे इंधन करुन तो दिवा पेटता ठेवणे, यापेक्षा त्याच्या हातात आणखी काय आहे?-

ग. वा. बेहेरे

दि. १९-५-८८ पुणे



भूमिका

विनायक दामोदर सावरकर हे असामान्य पुरुष होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आणि कर्तृत्वाला विविध पैलू होते. मानवी जीवनाच्या विविध क्षेत्रात त्यांनी संचार केलेला असून तिथे त्यांनी आपल्या विचारांचा व कर्तृत्वाचा प्रभावी ठसा उमटविला आहे. सावरकरांचा आपण जेंव्हा अभ्यास करु लागतो, तेंव्हा आपल्या समोर विविध प्रकारचे सावरकर उभे राहतात. हे सर्व विचार व कार्य एकाच सावरकर या व्यक्तीचे आहेत काय असा प्रश्न पडावा, इतकी ही विविधता लक्षात येण्याजोगी आहे. ही विविधता एवढेच सावरकरांच्या विचारांचे वैशिष्ट्य नाही. या विविधते मध्ये विसंगतीही आहे, असे आपल्याला जाणवू लागते.

विविध परिस्थितीतही सामना देत प्रत्यक्ष समाजकार्य करणाऱ्या कोणत्याही असामान्य पुरुषांच्या विचारात अशा प्रकारची विविधता व विसंगती येतच असते. तथापि, सावरकरांच्या संबंधातील ही विविधता व विसंगती या सामान्य नियमा-पुरती मर्यादित नाही, असे आपणाला जाणवत असते. परस्परविरोधी अशा निष्ठा सावरकरांच्या व्यक्तिमत्वात अंतर्भूत झालेल्या आहेत, असे आपणाला जाणवू लागते. असे जाणवणें हा केवळ भास नसतो, तर सावरकरांनीच स्पष्टपणें व्यक्त केलेल्या विचारावरील ती एक स्वाभाविक प्रतिक्रिया असते. सावरकरांचा अभ्यास करावयाचा म्हणजे या जाणवणाऱ्या विसंगतीचा अभ्यास केला पाहिजे, या विसंगतीचा शोध घेतला पाहिजे, अन्वयार्थ लावला पाहिजे, अशी आमची भूमिका आहे. सावरकरांवर आतापर्यंत अनेक ग्रंथ लिहीले गेले आहेत. सावर-

करांच्या या जाणवणाऱ्या विसंगतिची नोंद केली गेलेली आहे. या विसंगतीचे तेवढ्यापुरते स्पष्टीकरण किंवा निष्कर्ष नोंदविला गेला आहे. तथापि सविस्तरपणें व चिकित्सकपणें या गोष्टीचा शोध घेण्याचा, त्याचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न अद्याप केला गेला नाही. या संबंधातही आतापर्यंत जे जे निष्कर्ष नोंदविण्यात आले आहेत, त्यामध्येही विविध अभ्यासकात एकमत नाही. सावरकरांच्या विचारातील जाणवणाऱ्या विसंगतीचे अभ्यासकांचे अभिप्रायही परस्पर विसंगतच असल्याचे आपल्या लक्षात येईल. या विषयीच्या अधिक खोलवर जावून अभ्यास केला पाहिजे; सावरकरांच्या त्या. जाणवणाऱ्या विसंगतीचा शोध घेतला पाहिजे; अन्वयार्थ लावला पाहिजे, असे आम्हाला वाटते.

भक्त आणि अनुयायी असलेल्या अनेकांचे सावरकर हे एक श्रद्धास्थान आहे. ही अनुयायी मंडळी प्रायः हिंदुत्वनिष्ठ आहेत. ही मंडळी हिंदुमहासभा पुरतीच मर्यादित नाहीत. सावरकरांचा अनुयायी म्हणजेच हिंदुत्वनिष्ठ असे समीकरणच रुढ झालेले आहे. सावरकरांचा अनुयायी म्हणजे बुद्धिवादी किंवा समाजवादी असे कोणी समजणारच नाही. ते एक वदतोव्याघाताचे उदाहरण होईल. अनुयायी ह्या शब्दातच अंधश्रद्धा असते वा बुद्धिवाद विरोध गृहीत असतो, या अर्थी आम्ही हे म्हणत नाही. मार्क्सचा अनुयायी समाजवादी राहू शकतो, नेहरुंचा अनुयायी बुद्धिवादी राहू शकतो, पण सावरकरांचा अनुयायी तसा बुद्धिवादी वा समाजवादी राहू शकतो, यावर लोक विश्वास ठेवायला तयार नसतात. सावरकरांच्या विचारांचा वारसा आमच्याकडे आलेला आहे, असे या मंडळींना वाटते. सावरकर कसे होते हे सांगण्याचा हक्कही त्यांच्याकडेच व्यवहारतः चालत जातो. ते म्हणतील तसे सावरकर असले पाहिजेत, असे व्यवहारातः लोक समजून चालतात. अनुयायांच्या सांगण्यावरुन नेत्याला समजून घेण्याची आपल्याकडील ही पद्धत सावरकरांपुरती मर्यादित नाही. महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, डॉ. आंबेडकर इत्यादी नेत्यांच्या बाबतीतही हीच परिस्थिती आहे. नेत्याची एक विशिष्ट प्रतिमा अनुयायामुळे जनतेसमोर उभी राहते. अनुयायांच्या या मतांची चिकित्सा करुन खरी वस्तुस्थिती जाणून घेण्याच्या भानगडीत पडण्यास लोकांना वेळ नसतो. परिणामतः नेत्याची जनमानसातील प्रतिमा प्रायः त्याच्या अनुयायामुळे निर्माण झालेली असते.

याचा अर्थ नेत्याच्या व्यक्तिमत्वात वा विचारात अंतर्भूत नसणारी त्याची खोटी प्रतिमा लोकमानसात अनुयायी निर्माण करतात असा नाही. सावरकर हिंदुत्वनिष्ट आहेत, ही कांही त्यांच्या अनुयायांनी निर्माण केलेली प्रतिमा नाही. अनुयायी करतात काय तर सावरकर हिंदुत्वनिष्ठ आहेत, हीच गोष्ट आग्रहाने सांगत असतात. हिंदुत्वनिष्ठेच्या विरोधी असे काही सावरकरांच्या व्यक्तिमत्वात वा विचारात होते काय, हे सांगण्याचे ते टाळत असतात. आपल्याला सावरकरांची जी गोष्ट पटली, ज्यासाठी आपण त्यांचे अनुयायी झालो, तीच गोष्ट आग्रहाने

सांगत राहणें, अनुयायांना भाग असते. सावरकर हे प्रखर बुद्धिवादी व विज्ञान-निष्ठ होते हे कुणालाही न नाकारता येणारे सत्य आहे. हिंदुत्वनिष्ठ अनुयायी या बुद्धिवादाबद्दल बोलण्याचे टाळत असतात. प्रथम दर्शनीच बुद्धिवाद आणि हिंदुत्ववाद या परस्पर विरोधी गोष्टी आहेत, हे हिंदुत्वनिष्ठांच्याही लक्षात आल्याशिवाय राहत नाही. त्या तशा कशा नाहीत, हेही सांगण्याच्या प्रयत्नातही ते पडत नाहीत. सावरकरांच्या बुद्धिवादी विचाराबद्दल त्यांच्या अनुयायांना कधीही आकर्षण वाटले नाही. परिणामतः सावरकर लोकांना समजून सांगण्याची ज्यांच्यावर नैतिक जबाबदारी होती, त्यांनी बुद्धिवादाबद्दल मौन पाळले. त्यामुळे हिंदुत्वनिष्ठा व बुद्धिनिष्ठा यांच्यातील विसंगतीचा प्रश्नच उपस्थित झाला नाही. सावरकर म्हणजे हिंदुत्ववाद हे समीकरण त्यांच्या अनुयायांनी रूढ करुन टाकले आहे. सावरकरांच्या अनुयायांशी बोलत असताना, त्यांचे भाषण ऐकत असतांना किंवा त्यांनी लिहीलेले पुस्तक वाचत असताना, आपल्याला सर्वसामान्यपणें हाच अनुभव येईल. ही विधाने करतांना काही सन्माननीय अपवाद आम्ही गृहीत धरलेले आहेत. अनुयायांवर टीका करण्यासाठी आम्ही हे सांगत नाही, तर एका वस्तुस्थितीकडे लक्ष वेधण्यासाठी सांगत आहोत. ही वस्तुस्थिती इतकी स्पष्ट आहे की, कोणताही अनुयायी याबद्दल तक्रार करील असे आम्हास वाटत नाही.

सावरकर हे हिंदुत्वनिष्ठ आहेत, ही वस्तुस्थिती त्यांच्या राजकीय विरोधकांना पुरेशी होती. सावरकर बुद्धिवादीही आहेत काय? ही गोष्ट लक्षात घेणें व दोन्हींचा अन्वयार्थ लावणे ही गोष्ट विरोधकांच्या भूमिकेशीच विसंगत होती. त्यांनी सावरकरांच्या बुद्धिवादाकडे पूर्ण दुर्लक्ष करणें साहजिक होते. परिणामतः अनुयायी वा विरोधक दोघांनीही सावरकरांच्या बुद्धिवादाकडे हेतुतः दुर्लक्ष केलेले आहे. त्यांचा बुद्धिवाद समजून घेण्याचा नि देण्याचा त्या दोघांनीही प्रयत्न केला नाही. स्वतःला बुद्धिवादी व पुरोगामी समजणाऱ्या व लोकांकडून तसे म्हणवून घेणाऱ्या विद्वानांनी व विचारवंतानीही सावरकरांच्या बुद्धिवादाबद्दल कमालीचे अज्ञान बाळगलेले आहे, हे आम्ही अनेक ठिकाणी पाहिलेले आहे. त्यांचा प्रश्न अगदी सरळ असतो. सावरकर हिंदुराष्ट्रवादी होते ना? धर्मावर अधिष्ठित असणारे हिंदुराज्य मानणारे सावरकर बुद्धिवादी असतीलच कसे? जग आधुनिक व धर्मनिरपेक्ष बनत असताना सावरकर हे राष्ट्राला मध्ययुगाकडे नेऊ पाहात होते. ते सावरकर बुद्धिवादी कसे? प्रश्न व त्याचे उत्तर अगदी सरळ व स्पष्ट असल्यामुळे त्यांचा बुद्धिवाद मुळातून अभ्यास करण्याचा फंदात पडण्याचे विरोधकांना कारण नव्हते. हा ग्रह मनात ठेवूनच त्यापैकी काहींनी सावरकरांचे बुद्धिवादी विचार वाचलेले असतात.

सावरकरांच्या विज्ञाननिष्ठ निबंधात सुद्धा हिंदुराष्ट्र हा शब्द येतच असतो. ह्या शब्दाचा आमच्या ह्या बुद्धिवाद्यांनी इतका धसका घेतलेला असतो की, लख्ख प्रकाश पडल्यावरोबर जशी काही वेळ अंधारी येते व कांहीच दिसत नाही, त्या

प्रमाणें हा शब्द दिसता क्षणीच बाकीचे मागचे पुढचे सगळे विचार त्यांना दिसतच नाहीत, शून्यच वाटतात. जिनांना इस्लामवर अधिष्ठीत पाकीस्तान हवे होते तसेच सावरकरांना हिंदु धर्मावर अधिष्ठीत हिंदुराज्य हवे होते, अशीच ठोक भूमिका घेऊन हे सारे बुद्धिवादी सावरकरांच्या बुद्धिवादाला कधीही विचारात घेत असल्याचे आपणाला दिसणार नाहीत.

नांदेडला काही वर्षापूर्वी आम्ही सावरकरांच्या बुद्धिवादावर एक परिसंवाद आयोजित केला होता. अध्यक्षस्थानी येथील एक न्यायाधीश होते. विविध विचाराचे वक्ते असावेत, असा आमचा प्रयत्न होता. प्रा. कुरुंदकरांच्या निधनानंतरची ही गोष्ट आहे. निमंत्रण देण्यासाठी आम्ही एका सुप्रसिद्ध मार्क्सवादी बुद्धिवाद्याकडे गेलो. त्यांच्याविषयी आमच्या मनात प्रा. कुरुंदकराएवढाच नितांत आदर आहे. आमचे निमंत्रण त्या बुद्धिवादी विचारवंताने स्वीकारले नाही. सावरकरांच्या भक्तांचा हा मेळावा नाही, त्यांच्या अभ्यासकांचा हा कार्यक्रम आहे, तुम्ही कितीही टीका करा, आम्हाला आनंदच होईल, या विनंतीचाही उपयोग झाला नाही. त्यांचे म्हणणें असे की, असे भाषण करणे बरोबर दिसणार नाही. तासभर त्यांच्याशी सावरकरांविषयी चर्चा करीत होतो. त्यांचा असा आरोप आहे की, सावरकरांच्या विचाराने बुद्धिवादी चळवळीला दोनशे वर्ष मागे खेचलेले आहे. सावरकर हे प्रखर देशभक्त आहेत, याचा त्यांना अभिमान वाटतो. परंतु विचारांच्या दृष्टीने ते मध्ययुगात वावरत होते, असा त्यांचा आरोप होता. सावरकरांच्या अंगी बुद्धिवादाचा काहीही संबंध नसताना या विषयावर बोलायचेच काय, असा त्यांचा सवाल होता. सावरकरांच्या विज्ञाननिष्ठ निबंधातील विचारांचा आम्ही उल्लेख केला, तेंव्हा ते म्हणाले, वैज्ञानिक प्रगति होणे म्हणजे विज्ञाननिष्ठ होणे नव्हे. त्यांचा असा समज होता की, सावरकरांचे विज्ञाननिष्ठ निबंध म्हणजे विज्ञानाचे नवे शोध लागले पाहिजेत. त्याच्या आधारे आपले उद्योग कारखाने, व भौतिक सामर्थ्य वाढले पाहिजे, याचा पुरस्कार करणारे साहित्य आहे. सावरकरांच्या या विज्ञाननिष्ठ निबंधातील विचारांचा त्यांच्या मनावर काही परिणाम झालेला आहे, असे अजिबात जाणवत नव्हते. त्यांनी हे विचार वाचलेच नसतील असे म्हणण्याचे धाडस कोणीही करणार नाही. त्यांनी ते विचार इतक्या पूर्वग्रहांनी वाचलेले असतील की वाचन संपता क्षणीच त्यांनी ते आपल्या डोक्यातून काढून टाकलेले होते. श्री गोळवलकर आणि सावरकर यांच्यात बुद्धिवादाच्या भूमिकेतून काहीही फरक करावयाला ते तयार नव्हते. चातुर्वण्याधिष्ठीत हिंदुधर्मावर आधारलेले हिंदुराज्य सावरकरांना हवे होते, असा त्यांचा पक्का समज झालेला होता. सावरकरांविषयी त्यांच्या मनात एवढा पक्का ग्रह झालेला होता की, ते ना दुसऱ्याचे समजून घ्यावयास तयार होते की, ना आपले म्हणणे जाहीर भाषणात मांडण्यास तयार होते. मार्क्सप्रमाणें सावरकरांनी आर्थिक विचार मांडले नाहीत, या प्रश्नाचा त्यांनी फारसा विचार केला नाही, हा त्यांचा आरोप आम्हाला

समजत होता. पण सावरकरांनी जे केले नाही, त्याबद्दलचा हा आरोप होता. आमचे म्हणणें की, सावरकरांनी जे बुद्धिवादी विचार मांडले, त्याबद्दल सावरकरांना काही न्याय देणार की नाही? सावरकरांना न्याय देण्याचा विचार करणें म्हणजे संकुचित बनणे होय अशी मार्क्सवाद्यांनाही भीति वाटत असावी, असेच आमचे मत झालेले आहे.

स्वतःला समाजवादी बुद्धिवादी, किंवा पुरोगामी समजणाऱ्याबरोबर सावरकरांसंबंधी बोलत असताना, भाषण ऐकत असतांना किंवा सावरकरांसंबंधी त्यांनी लिहीलेले वाचीत असताना आपल्याला हाच अनुभव येईल. सावरकरांचा वस्तुनिष्ठ अभ्यास करण्यामागे त्यांची हिंदुत्वनिष्ठा या विरोधकांच्या आड आलेली आहे, हे स्पष्टपणें आपल्या लक्षात येईल. याच कारणास्तव सामाजिक सुधारणेंबद्दल लिहीताना महात्मा फुले पासून सुरु करुन गोखले, न्या. रानडे, आगरकर, महात्मा गांधीचा उल्लेख करीत डॉ. आंबेडकरापर्यंत येतील, मात्र आमचे हे बुद्धिवादी सावरकरांचा उल्लेख करणार नाहीत. बुद्धिवादी विचारवंतामध्ये सावरकरांचा समावेश करण्यात ते तयार नसतात. हिंदुत्वनिष्ठ असल्यामुळे सावरकरांना बुद्धिवाद्यांच्या पंक्तीतून बहिष्कृत करण्यात आलेले आहे. दुर्दैवाची व दुःखाची गोष्ट ही की, या बहिष्कृतीबद्दल सावरकरांच्या अनुयायांनाही दुःख वाटत नाही. बुद्धिवाद्यांची व हिंदुत्वनिष्ठांची अशा दोन वेगवेगळ्या दोन पंगती असतील तर सावरकरांनी हिंदुत्वनिष्ठांच्याच पंगतीत बसले पाहिजे, याबद्दल त्यांच्या अनुयायांचा आग्रह असती. यापैकी कुणीही त्यांच्या बुद्धिवादाला विचारात घ्यायला तयार नाही. बुद्धिवाद आणि हिंदुत्ववाद यातील विसंगतीचा शोध व अन्वयार्थ लावण्यास तयार नाही. ही गोष्ट आम्हाला सारखी जाणवत राहीली आहे. हा अभ्यास आपणकेला पाहिजे ही प्रेरणा या जाणीवेतून आम्हाला मिळाली आहे.

प्रत्यक्ष, प्रयोग, अनुभव व तर्क इत्यादीच्या आधारे सत्यशोधन करण्याची बुद्धिवाद हि एक पद्धत आहे, बुद्धिवाद हि विचार करण्याची व निष्कर्ष काढण्याची एक शास्त्रीय पद्धत आहे. जे निष्कर्ष येतात त्याची बुद्धिगम्य कारणें बुद्धिवाद देत असतो. येथे केवळ विश्वास ठेवण्याचा प्रश्न नसतो. प्रत्येक गोष्टीला कारण असते, हे बुद्धिवाद गृहित धरतो. हे कारण शोधता येते, असे तो मानतो. त्याचा शोध लागेपर्यंत ते कारण अज्ञात आहे, असे तो गृहित धरतो. विज्ञानामध्ये एखादी गोष्ट प्रयोग करुन, प्रत्यक्ष निष्ठतेचे प्रमाण लावून, अनुभव व अनुमानाचा आधार घेऊन निश्चित केली जाते. या पद्धतीला विज्ञाननिष्ठ पद्धत म्हणतात. या पद्धतीचा पाया बुद्धिवाद हाच आहे. याच पद्धतीला बुद्धिवादी पद्धत म्हणतात .विज्ञाननिष्ठेशी समानअर्थी असणारे बुद्धिवाद हे पर्यायी नांव आहे. प्रत्यक्ष, अनुभव, तर्क इत्यादीच्या आधारे निष्कर्ष काढण्याची वस्तुनिष्ठ व शास्त्रीय पद्धत या दोन्हीही निष्ठांच्या मूलभूत आधारस्तंभ होत.

विज्ञाननिष्ठा म्हणजे कांहीजण समजतात तसे विज्ञानाच्या प्रगतीचा पुरस्कार

करणार निष्ठा नव्हे. भरपूर शोध लागले पाहिजेत, असंख्य सुखसोई निर्माण झाल्या पाहिजेत, इत्यादी आकांक्षा म्हणजे विज्ञान निष्ठा नव्हे. दोन गोष्टीचा कार्यकारणभाव ठरविणारी विज्ञाननिष्ठा ही एक बुद्धिनिष्ठ शास्त्रीय पद्धत आहे. एखाद्या गोष्टीच्या निष्कर्षाला आपण ज्या पद्धतीच्या आधारे येतो, त्या पद्धतीचे हे एक नांव आहे. विश्वातील ज्या अनंत गोष्टी आहेत, त्याचा शोध घेणें, हे विज्ञानाचे एक काम आहे. ह्या विज्ञानाच्या कार्यक्षेत्रात बुद्धिनिष्ठा जेंव्हा कार्य करते तेंव्हा तिला विज्ञाननिष्ठा म्हणतात. ह्याशिवाय मानवी जीवनाचे एक स्वतंत्र असे कार्यक्षेत्र आहे. येथें जीवंत मानवी जीवनाचा विचार असतो. मानवी जीवनाशी संबंधित असणाऱ्या गोष्टींचा येथे विचार असतो. विज्ञान हे वैज्ञानिकांचे कार्यक्षेत्र असते. मानवी जीवन हे तत्वज्ञाचे, समाजशास्त्रज्ञांचे, नीतिशास्त्रज्ञांचे कार्यक्षेत्र असते. या मानवी जीवनाच्या कार्यक्षेत्रात विज्ञाननिष्ठा जेंव्हा कार्य करते तेंव्हा तिला बुद्धिनिष्ठा किंवा बुद्धिवाद म्हणतात. विज्ञाननिष्ठेचा नि बुद्धिवादाचा मुलाधार बुद्धि हा एकच आहे. कार्यक्षेत्राच्या संदर्भाप्रमाणें आपण त्या संज्ञेचा वापर करतो इतकाच फरक आहे.

मानवी जीवनाचे बुद्धि, श्रद्धा व मन हे तीन प्रभावी घटक आहेत. मनुष्य हा बुद्धिप्रधान प्राणी आहे, असे आपण मानतो. मानवी जीवनातील एखादी गोष्ट जाणून घेण्यासाठी मनुष्य आपल्या बुद्धिचा वापर करीत असतो. एखादी वस्तु-स्थिती अचूकपणें समजून घेण्याची बुद्धि हे एक साधन आहे. या साधनाचा वापर करुन वास्तव समजून घेणें हाच बुद्धिवाद आहे. या दृष्टीने प्रत्येक माणूस फार मोठ्या प्रमाणात बुद्धिवादीच असतो. बुद्धि ही एक अमूर्त संकल्पना आहे. एखाद्या-च्या ठिकाणी असलेली बुद्धि ही दुसऱ्याच्या ठिकाणी असणाऱ्या बुद्धीपेक्षा वेगळी नसतें. आपआपल्या बुद्धीप्रमाणें दोघेजण एकाच गोष्टीबद्दल परस्परविरोधी निष्कर्षाला येतात, हा याचा पुरावा नसतो. दोघांच्या बौद्धिक सामर्थ्यात फरक असू शकतो. याचा परिणाम एखाद्या गोष्टीचा शोध घेतांना एकजण अलीकडेच थांबत असतो व दुसरा आपल्या तीक्ष्ण बुद्धीच्या आधारे अधिक खोलवर जाण्यात होऊ शकतो. अलीकडेच थांबणाऱ्यांनी माझ्या बुद्धीला इतकेच समजले, या पलीकडचे समजत नाही, अशी भूमिका घेणें हा खरा बुद्धिवाद आहे. जे समजत नाही जे ज्ञात झाले नाही, ते तसे नाही, हे प्रामाणिकपणें मानणे व त्या ऐवजी एखाद्या कल्पिताची त्या ठिकाणी प्रतिष्ठापना न करणे हेच खऱ्या बुद्धीवादाचे वैशिष्ठ्य आहे. अधिक बुद्धिमान असण्याचा अधिक बुद्धवादी असण्याशी संबंध असतोच असे नाही. बुद्धिमत्ता वेगळी व बुद्धिप्रधानता वेगळी हे समजून घेतले पाहिजे. बुद्धिवाद हा बुद्धिमत्तेवर नसून बुद्धिप्रधानतेवर वा बुद्धिप्रामाण्यावर अधिष्ठीत असतो, हे लक्षात घेतले पाहिजे.

बुद्धि इतकीच श्रद्धा हीही मानवी जीवनातील एक प्रभावी शक्ति आहे. एखादी गोष्ट समजून घेण्यासाठी श्रद्धा हाही एक मार्ग असू शकतो. श्रद्धेमुळे जे

समजून येते ते खरोखरच सत्य असते काय, हा स्वतंत्र प्रश्न आहे. बुद्धीमुळे जे समजून येते तेही सत्य असते काय हाही प्रश्न असाच स्वतंत्र आहे. या दोन्ही साधनानी जे समजून येते ते सत्य असते काय, हा प्रश्न दुय्यम असून सत्य म्हणून जे काही समजून घेण्यासाठी माणूस निघतो, ते समजून घेण्याची पद्धत कोणती आहे, त्या पद्धतीचा पाया कोणता आहे, हीच गोष्ट मुख्यतः बुद्धिवादाच्या अभ्यासासाठी आपल्याला महत्वाची आहे. मानवी जीवनाची मुख्य प्रेरणा सत्य-शोधनाची नसते. सुख, आनंद आणि समाधान मिळणे ही मुख्य प्रेरणा असते. हे सत्याने मिळते का सत्याऐवजी कल्पिलेल्या गृहीताने मिळते, हा मुद्दा दुय्यम असतो. या गरजेतून श्रद्धा ही बाब स्वाभाविकपणेच जन्माला आलेली आहे. निसर्गतःच मानवी स्वभावाची रचनाच अशी आहे की, प्रत्येकाला काही प्रमाणात का होईना, श्रद्धेवर विश्वास ठेवावाच लागतो.

एखाद्या गोष्टीवर आपली श्रद्धा असते यांचे कारण श्रद्धा हेच असते. कोणतेही बुद्धीला पटणारे कारण देता येत नाही, यासाठीच तर श्रद्धा निर्माण होते. बुद्धिवाद हा वस्तुनिष्ठ असतो तर श्रद्धावाद हा व्यक्तिनिष्ठ असतो. एखाद्या गोष्टीबद्दल प्रत्येकाच्या वेगवेगळ्या श्रद्धा असू शकतात आणि त्या असण्याचे कारण त्यांना तसे वाटते,एवढेच असते. ही श्रद्धा निर्माण होण्याची अनेक कारणे असतात. विश्वात असलेल्या अनंत गोष्टीचे वास्तव स्वरुप समजून घेण्याची मानवी बुद्धीची मर्यादा, हे त्याचे एक कारण असते. बुद्धिवादाच्या पद्धतीने सत्यशोधन होईपर्यंत वाट पाहण्याची मानवी मनाची तयारी नसते. आनंद, सुख व समाधान यासाठी तो सोय म्हणून काहीतरी गृहीत सत्य मानत असतो, हे त्याचे दुसरे कारण असते. मनुष्याच्या मनात असणारी भीती हे त्याचे तिसरे कारण असते. या व आणखी विविध कारणांनी मानवी जीवनाबरोबरच श्रद्धाही मनुष्याची सोबत करत आली आहे. बुद्धीप्रमाणेच श्रद्धा सुद्धा मानवी जीवनाची एक अनिवार्य गरज झालेली आहे.

याचा अर्थ मनुष्याच्या जीवनात बुद्धि आणि श्रद्धा या दोन्हीचेही अपरिहार्य असे स्थान आहे, असा होतो. पूर्णतः श्रद्धेवर चालणारा जसा कुणी असण्याची शक्यता नसते, तसाच पूर्णतः बुद्धीवर चालणाराही कुणी असण्याची शक्यता नसते. मानवी जीवनाचा प्रश्न या दोन्ही निष्ठांच्या सहअस्तित्वाताचा असतो; त्यांच्या परस्पराशी असलेल्या योग्य प्रमाणाचा असतो, या निष्ठांचा सुवर्णमध्य काढून मानवी जीवन सुखी समृद्ध कसे करावे याचा असतो. आपण एखाद्याला प्रखर बुद्धिवादी म्हणतो याचा अर्थ त्याची कोणत्याही बुद्धिबाह्य गोष्टीवर श्रद्धा नसते, असा होत नसतो; किंवा एखाद्याला आपण सनातनी किंवा श्रद्धाळू म्हणतों, याचा अर्थ बुद्धीचा आधार तो घेतच नसतो असा नसतो. म्हणजे बुद्धिवादी असणे याचा अर्थ जीवनातील अधिकात अधिक गोष्टीसंबंधीचा निर्णय

वुद्धीला प्रमाण ठेवून घेणे असाच होतो. बुद्धिवाद ही संज्ञाच सापेक्ष आहे. याचा अर्थ एकाच्या तुलनेंत दुसरा अधिक बुद्धिवादी आहे, एवढेच तौलनिकदृष्टचा आपणाला बोलता येते; कारण निर्भेळ बुद्धिवादी ही निसर्गतःच अशक्य गोष्ट असते. ही श्रद्धेच्या नैसर्गिक अपरिहार्यतेची वास्तवता वस्तुस्थिती (Fact) म्हणून तत्वतः मान्य करणे, खऱ्या बुद्धिवाद्यालाही भाग असते, बुद्धिप्रामाण्य म्हटले म्हणजे सर्वच बुद्धिबाह्य श्रद्धाचे मानवी जीवनातून उच्चाटन करण्याची प्रवृत्ति होय, ही भूमिकाच विपर्यस्त आहे. खरा बुद्धिप्रामाण्यवादी अशी भूमिका कधीच घेत नसतो. अशी भूमिका घेणे हा बुद्धिवाद नसून बुद्धिवेड आहे, हे समजून घेतले पाहिजे. बुद्धि हवी का श्रद्धा हा प्रश्न म्हणूनच चुकीचा असून या दोन्हीही गोष्टी हव्यात हेच बुद्धिवादी उत्तर असू शकते. याच न्यायानें बुद्धि श्रेष्ठ का श्रद्धा हाही प्रश्न चुकीचा आहे. प्रश्न दोन्हीच्या योग्य तारतम्याचा असतो. हे योग्य तारतम्य म्हणजे काय हाच मानवी जीवनाचा खरा प्रश्न आहे. मानवी जीवनातील बुद्धीच्या व श्रद्धेच्या सीमारेषा कशा ठरवाव्यात हाच खरा प्रश्न आहे. बुद्धिवादी माणूस या गोष्टी ठरविण्यासाठी, त्याची चर्चा करण्यासाठी नेहमीच तयार असतो. आपले जुनें निर्णय नवीन परिस्थितीच्या संदर्भात बदलण्यास तो नेहमीच तयार असतो. अगोदर श्रद्धेची पूर्णतः हकालपट्टी करा मग चर्चा करु, असा दुराग्रह तो कधीही धरत नसतो. श्रद्धेची तो बौद्धिक चिकित्सा करतो. त्यातील त्या त्या परिस्थितीत काय स्वीकार्य व काय त्याज्य, हे तो ठरवत असतो. यासाठी तो काही कसोट्या ठरवतो. प्रमुख कसोटी मानवी जीवनाचे हित कशाने होईल हीच असते. मानवी जीवनाच्या हिताच्या संदर्भात तो श्रद्धेची चिकित्सा करतो. घातक श्रद्धा, निरुपद्रवी श्रद्धा व उपयुक्त श्रद्धा असे श्रद्धेचे वर्गीकरण तो करतो. केवळ बुद्धिबाह्य आहे, एवढ्याच कारणास्तव काही खरा बुद्धिवादी श्रद्धा निषेधीत नाही, त्यातील घातक श्रद्धेचा तो शत्रू असतो, उपयुक्त श्रद्धेला तो सांभाळून घेतो व निरुपद्रवी श्रद्धेकडे तो दुर्लक्ष करतो. बुद्धिवाद हा बुद्धिवाद म्हणून तुम्हाला आम्हाला प्रिय नसतो. आपल्या जीवनाला तो हितकारक आहे, यासाठी तो आपल्याला हवा असतो. जितक्या प्रमाणात श्रद्धा आपल्या जीवनाला हितकारक असते, तेवढी श्रद्धा मान्य करणे बुद्धिवादाला भाग असते. या गोष्टी आज एकदा ठरल्या म्हणजे त्या काही कायमच्या नसतात. नव्या बदललेल्या परिस्थितीत किंवा मागचा अनुभव जमेस धरुन आपल्या या निर्णयाचा बुद्धिवाद पुनर्विचार करण्यास नेहमीच तयार असतो.

मानवी जीवन सुखी कसे होईल, याचा विचार करुन त्यासाठी नियम व आचार ठरविणारे धर्म या जगात निर्माण झाले. या सर्वच धर्मांनी मनुष्याला तत्वज्ञान दिले, रोजच्या व्यवहारात वागण्यासाठी नियम करुन दिले, त्यासाठी आचार कसा असावा हेही सांगितले. ज्या काळी हे धर्म निर्माण झाले त्या काळी

त्या काळाच्या परिस्थितीच्या संदर्भात हे धर्म म्हणजे एक प्रकारचा बुद्धिवादच होता. मनुष्याला जीवनाला काय हितकारक, मुख्यतः हीच कसोटी घेवून त्या काळी धर्म निर्माण झाले. काळ बदलला, परिस्थिती बदलली, मात्र धर्मांनी सांगितलेले नियम नि आचार मात्र बदलले नाहीत. शतकानुशतके धर्म तोच राहीला. या धर्माने मनुष्याचे हित होते की नाही, हे नव्या परिस्थितीत आम्ही पाहायला तयार नसतो. जुन्या निर्णयाच्या नव्या परिस्थितीत पुनर्विचार करायला आम्ही तयार नसतो. ही जुन्या निर्णयाशीच हिताहित निरपेक्षपणें चिकटून राहण्याची जी प्रवृत्ती आहे, ती बुद्धिवादाच्या विरोधी प्रवृत्ती आहे. बुद्धिवादाचे भांडण या प्रवृत्तीशी असते. जगातील सर्वच धर्माच्या बाबतीत हे असेच घडलेले आहे. परिवर्तनशील धर्म ही कल्पनाच धर्माशी विसंगत असते. बुद्धिवाद्याला उच्छेद करावयाचा असतो तो कोणत्या धर्माचा अव्हे, तर या प्रवृत्तीचा होय. बुद्धिवाद्याला पटत नसली तरी धर्म ही या जगात एक शक्ति आहे, हे त्यालाही वस्तुस्थिती म्हणून मान्य करावेच लागते. कितीही इच्छा असली तरी जगातील कोणताही धर्म नष्ट होऊन त्या जागी पूर्ण बुद्धिवाद येईल अशी आशा बुद्धिवाद्याल्याही बाळगता येणार नाही, इतकी धर्माची पाळेमुळे मानवी मनात खोलवर रुजलेली आहेत. या धर्माचे मानवी जीवनावरील प्रभुत्व किती आहे, याची वास्तव जाणीव असणे बुद्धिवादालाही भाग आहे. धर्म ही अफूची गोळी आहे, असे म्हटल्यानें वा धर्माला शिव्याच्या लाखोल्या वाहिल्याने त्याला संपविता येणार नाही, हे समजून घेणे खऱ्या बुद्धिवादाचे लक्षण आहे. व्यक्तिशः एखाद्या बुद्धिवाद्यानी धर्म न मानणे, अधार्मिक राहणे ही गोष्ट होऊ शकते, परंतु नेता म्हणून सर्व समाजाला त्याला तसे बनविता येणार नाही, हे खऱ्या बुद्धिवाद्याला समजत असते. धर्मश्रद्धेत रुतून पडलेल्या या समाजाला बुद्धिवादाकडे कसे घेवून जावे याचा व्यावहारिक विचार बुद्धिवादाला करावा लागतो. धर्माच्या संबंधाने, धर्मात गाढ श्रद्धा असणाऱ्या लोकांच्या संबंधानें कोणते धोरण ठरवावे, त्यांच्याशी कसा व्यवहार ठेवावा, त्यासाठी कोण-कोणत्या तडजोडी कराव्यात, हे सारे बुद्धिवादी नेता ठरवीत असतो. व्यक्तिशः विचारवंत म्हणून तो प्रखर बुद्धिवादी असू शकतो, पण समाजाचा नेता म्हणून त्याला बुद्धिवादाच्या विविध पातळीवरुन व्यवहार करावा लागतो. बुद्धिवादी विचारवंत समजून घेणे सोपे असते, कारण एकाच विशिष्ट पातळीवरुन तो नुसते सुसूत्रपणे व सुसंगतपणे विचारच मांडतो. बुद्धिवादी सुधारकाची गोष्ट वेगळी असते. त्याचे विचार समाजसुधारणेच्या संदर्भातच समजून घ्यावे लागतात. परिस्थितीचा संदर्भ सोडून त्याला समजूनच घेता येत नाही.

बुद्धिवादाला विरोध करणाऱ्या ज्या निष्ठा, शक्ति वा प्रेरणा मानवी जीवनात आहेत, त्यापैकी धर्म ही सर्वात मोठी आहे. मानवी प्रगतीच्या सर्व वाटाच ही शक्ति अडवून धरते. जीवनातील सारे प्रश्न धर्माच्या आधारे सोडविणे सामान्य माणसाला सोईचे वाटते. निर्माण होताना धर्मही कितीही सुधारणा असली

सामान्य माणसाला सोईचे वाटते. निर्माण होतांना धर्म ही कितीही सुधारणा असली तरी, नंतर ती एक श्रद्धा झाली, सोय झाली. ही धर्मश्रद्धा इतकी चिवट असते की, सृष्टीबद्दलचे नवे ज्ञान प्रकाशात आले तरी, ही जुनी धर्मश्रद्धा त्या परस्पर-विरोधी असलेल्या ज्ञानावरोबरच समाजात नांदत असते. या चिवट श्रद्धेचा व प्रयोगशील बुद्धीचा संघर्ष मानवी जीवनात अव्याहत चालू आहे. जितक्या प्रमाणात बुद्धि या श्रद्धेपेक्षा वरचढ होते त्या प्रमाणात त्या समाजाची प्रगती होते. समाज या श्रद्धेतच रुतून पडले ते जगाच्या मागे पडले, मागासलेले राहिले. समाजाच्या प्रगतीचा इतिहास म्हणजे या बुद्धीच्या व श्रद्धेच्या संघर्षाचाच इतिहास होय.

सावरकरांच्या बुद्धिवादाचा अभ्यास करावयाचा म्हणजे या धर्मासंबंधी त्यांचे काय विचार होते, याचा अभ्यास करावा लागतो. ते हिंदुत्वनिष्ठ असल्यामुळे तर हा अभ्यास अधिक काळजीपूर्वक करावा लागतो. मानवी जीवनाच्या हिताचा विचार करतांना बुद्धिवाद्याचे आद्यकर्तव्य धर्माची चिकित्सा हे असते. खऱ्या बुद्धिवाद्याचा हेतू धर्मचिकित्सा हा असतो, धर्मविध्वंस हा नसतो. धर्माच्या दृष्टीने धर्मचिकित्सा हीच मुळात अधर्म असते. आमच्या धर्माला काहीच झाले नाही हीच प्रत्येक धार्मिकाची भूमिका असते. सावरकर ही धर्म चिकित्सा कशी करतात याचा अभ्यास करणें आपल्याला भाग आहे. यासाठीच सावरकरांची धर्मा विषयी कोणती भूमिका होती ही गोष्ट आम्ही प्रथमतः विचारात घेतली आहे.

धर्म ही बाब जीवनाच्या सर्वच क्षेत्रावर प्रभुत्व गाजवत असते. मोक्ष मिळविण्यापुरतीच ती केवळ वैयक्तिक बाब राहात नाही. समाजाची नीतिमूल्ये तीच ठरवून देते; राज्यसंस्थेचे स्वरुपही तीच ठरवून देते. धर्मचिकित्सा करायची म्हणजे या साऱ्या विचाराची चिकित्सा करावी लागते. समाजाच्या रचनेपासून, नीतिमूल्यांच्या कसोटीपर्यंत; व राजकारणापासून, उदात्त मानवी मूल्यांच्या प्रतिष्ठापनेपर्यंत– सर्वच गोष्टीचा पुनर्विचार बुद्धिवाद्याला करणे भाग असते. सावरकरांनी हा सारा विचार केलेला आहे. सावरकरांच्या दृष्टीने मनुष्याचे हित हे महत्वाचे होते. साऱ्या गोष्टी ठरविण्याची त्यांची कसोटी मनुष्य हित होती. सावरकर यालाच उपयुक्तवाद म्हणतात. त्यांच्या बुद्धिवादाचा अभ्यास करावयाचा म्हणजे त्यांच्या या उपयुक्तवादाचा अभ्यास केला पाहिजे.

सावरकरांच्या बुद्धिवादाचा अभ्यास त्यांच्या सर्व साहित्यातील विचारा-वरुन व जीवन कार्यावरुन आपणाला करावा लागतो. त्यांनी बुद्धिवादावर स्वतंत्रपणे शास्त्रीयपद्धतीनें कुठेही लिहीलेले नाही. तत्त्वज्ञ आपल्या विचाराशी सुसूत्र, सुसंगत व मुद्देसूद अशी जशी शास्त्रीय पद्धतीने मांडणी करतो तसे सावरकर कुठेही करत नाहीत. पाश्चात्य नीतिशास्त्रज्ञ जशी करतात तशी शास्त्रीय पद्धतीने बुद्धिवादाची मांडणी सावरकरांनी केली असती तर, त्यांचा बुद्धिवाद समजून घेणे सोपे झाले असते. आपल्याला जे तत्वज्ञान मांडावयाचे आहे, ते त्याच्याशी विसंगत असणाऱ्या तत्त्वाचे खंडन व अनुत्तरीत असा एकही विरोधी

तत्त्वभाग राहू नये याची काळजी घेत, तत्त्वज्ञ आपले विचार मांडतो. अशा पद्धतीनें सावरकरांनी आपले विचार मांडलेले नाहीत, ही आपल्या समोरील खरी अडचण आहे.

प्रथमतः हे लक्षात ठेवणे भाग आहे की, सावरकर हे काही केवळ तत्त्वज्ञान मांडणारे तत्त्वज्ञ किंवा विचार मांडणारे विचारवंत नव्हेत. ते एक नेतें व पुढारी आहेत. या गोष्टीची जाणीव आपण सातत्याने ठेवणे भाग आहे. आपल्याला काय वाटते हे केवळ ज्ञानाच्या संदर्भात सांगणे हे तत्त्वज्ञानाचे काम असतें. येथे केवळ निर्भेळ तत्त्वाचा, ज्ञानाचा किंवा विचाराचा प्रश्न असतो. नेत्याचे तसे नसतें. आपल्याला काय वाटतें, हे तो केवळ ज्ञानाच्या किंवा तत्त्वाच्या संदर्भात सांगत नसतो. ज्यांचें हित तो नेता म्हणून करु इच्छितो, त्या मानव समूहाच्या संदर्भात नेता आपले विचार मांडतो. तत्त्वज्ञाचा संदर्भ ज्ञान हा असतो, नेत्याचा संदर्भ माणूस हा असतो. तत्त्वज्ञाचा संदर्भ आपल्या सुसूत्रपणे व सुसंगतपणे मांडलेल्या तत्त्वाशी असतो, तर नेत्याचा सदर्भ त्याच्या अनुयायांच्या हिताशी असतो. तत्त्वज्ञ ज्ञानाच्या परिभाषेत बोलतो, तर नेत्याला त्याच्या अनुयायाच्या बोलभाषेत बोलावे लागते. तत्त्वज्ञानाच्या ज्ञानाची पातळी, ज्ञान ज्या भाषेत मांडले आहे त्या भाषेची पातळी आणि ज्ञान ज्या हेतूने मांडले आहे त्या हेतूची पातळी, व्यावहारिक मानवी जीवनाच्या पातळीपेक्षा कितीतरी उंच राहू शकतें. तें एक उच्च, उदात्त व गंभीर असे ज्ञानजगतातील मंथन असतें. नेत्याची गोष्ट तशी नसते. मानव-समूहाच्या हिताशी त्याचें प्रत्यक्ष नाते असते. मानवी जीवनाच्या प्रत्यक्ष पाळीवर राहूनच त्याला कार्य करावे लागते व ती पातळी उंचावण्याचा प्रयत्न त्याला करावा लागतो. तेंव्हा नेत्याची विचार मांडण्याची पातळी, भाषा व हेतू नेत्याचीच आहे, याची जाणीव ठेवूनच त्या नेत्याचा अभ्यास करावा लागतो. ज्ञानी किंवा तत्त्वज्ञानाच्या पातळीचे निकष नेत्याच्या पातळीला लावण्याने फसगत होण्याचा संभव असतो. सावरकरांच्या बाबतीत नेमकी हीच गोष्ट झालेली आहे. त्यांच्या बुद्धिवादाचा अभ्यास करतांना या गोष्टीची जाणीव ठेवणे आपल्याला भाग आहे.

याचा अर्थ असा नव्हे की, नेत्याला तत्त्वज्ञान नसते किंवा तात्विक विचाराची बाजू नसते. समाजाला मार्गदर्शन करणारा नेता म्हटला की त्याच्या विचाराला तात्विक व व्यावहारिक अशा दोन बाजू असतात, आज व्यावहारिक पातळीवर असलेला समाज उदात्त अशा तात्विक पातळीवर नेण्याचा प्रयत्न करणे, हेच नेत्याचे काम असतें. व्यावहारिकापासून तात्विकापर्यंत सर्वच पातळीवर त्यास वावरावे लागते. सध्याच्या सर्वात खालच्या पातळीपासून तत्त्वाच्या सर्वोच्च पातळीपर्यंत जाण्यासाठी मध्यंतरी अनेक पातळ्यातून समाजाला अवस्थांतर करावे लागते. नेत्याला नेता म्हणून या विविध पातळीवर विचार करणे व वावरणे भाग असते. कोठे जायचे हे तत्त्व म्हणून, ध्येय म्हणून त्यांनी अगोदरच मनाशी निश्चित

ठरविलेले असते व त्या दृष्टीने तो तत्त्वज्ञच असतो. सावरकर या अर्थी तत्त्वज्ञच आहेत. मात्र सावरकरांचे कोणतेही विचार पुढे टेवून हे तत्त्वज्ञाचे विचार आहेत असे म्हणता यायचे नाही. तत्त्वज्ञ सावरकरांचे विचार कोणते, व्यवहारज्ञ सावरकरांचे विचार कोणते, याची विभागणी काळजीपूर्वक केली पाहिजे. आपण ठरविलेल्या अंतिम ध्येयापर्यंत म्हणजे तत्त्वापर्यंत जायचे कसे, जाण्याचे टप्पे कोणते, धोरण कोणते, सध्याच्या परिस्थितीत ध्येय कोणते, ते साध्य्याचे मार्ग कोणते, इत्यादी बाबीवर नेत्याला आपले लक्ष व शक्ति केंद्रीत कराव्या लागतात. ही गोष्ट सतत लक्षात ठेवून या नेत्याच्या भूमिकेतून विचार मांडणाऱ्या सावरकरांचा आपण अभ्यास केला पाहिजे. तत्त्वज्ञान खूप झाले, विचारही खूप झाले– याची आपल्या समाजात व राष्ट्रात काहीच कमी नाही. कमी आहे ती प्रत्यक्ष कार्य करणाऱ्याची, ही सावरकरांची खरी चिंता होती. सातत्याने त्यांनी ही चिंता व्यक्त केलेली आहे. समाजाला प्रत्यक्ष कार्याला लावणारा हा एक क्रियाशील नेता होता. हे कार्य करतांना जेवढे आवश्यक वाटले, तेवढे विचार सावरकरांनी मांडलेले आहेत. प्रत्यक्ष कार्याच्या पूर्तीसाठी त्याच्या विचारांचा जन्म झालेला आहे. नुसती तत्त्व चिकित्सा त्यांना निष्फळ वाटत असे. त्याचे विचार आणि कार्य हे नेहमीच हातात हात घालून अवतरत असत. याचा अर्थ असा होतो की, सावरकरांचे बुद्धिवादी विचार अभ्यासताना ते एका तत्वज्ञाचे विचार नसून एका लोकनेत्याचे विचार आहेत, ही गोष्ट सातत्याने लक्षात ठेवली पाहिजे.

ही गोष्ट लक्षात न ठेवल्यामुळे सावरकरांविषयी अनेक गैरसमज निर्माण झालेले आहेत. त्यांच्या विरोधकांनी या गोष्टीचा पुरेपूर वापर केला व सावरकरांची चुकीची व विकृत प्रतिमा लोकासमोर मांडण्याचा सतत प्रयत्न केला. सध्याच्या प्राप्त परिस्थितीत आपण काय केले पाहिजे, या विषयी विविध विषयावर वेळोवेळी त्यक्त केलेले सावरकरांचे विचार तत्त्वज्ञ सावरकरांचे आहेत अशा पद्धतीने लोकासमोर मांडण्याचा विरोधकांनी प्रयत्न केलेला आहे. अगदी अलीकडचे आणि ठळक उदाहरण घ्यायचे झाले तर 'मराठी तत्त्वज्ञान– महाकोशमंडळ' यांच्या नर्फे प्रकाशित केलेल्या 'तत्त्वज्ञ सावरकर' या ग्रंथाचे घेता येईल. या ग्रंथात सावरकरांचे विविध विषयावरील काही निवडक विचार संपादित करण्यात आलेले आहेत. संपादन डॉ. य. दि. फडके यांनी केलेले आहे. या ग्रंथाला त्यांनी आपली प्रस्तावना जोडली आहे. या प्रस्तावनेत त्यांनी सावरकरांवर जे आक्षेप घेतलेले आहेत, त्याचा मुख्य आधार व्यावहारिक सावरकरांना हे तत्त्वज्ञ सावरकरांची कसोटी लावतात हा होय. व्यावहारिक विचारांना तात्विक विचाराची कसोटी लावली की, त्या व्यावहारिक विचार मांडणाऱ्या नेत्याला प्रायः फारच खालच्या पातळीवरील तत्त्वज्ञ ठरवता येऊ शकते. डॉ. फडके यांनी या पद्धतीचा पुरेपूर वापर करुन सावरकरांना शस्त्र व राष्ट्र यांच्यापलिकडे कांहीही कळत

नव्हते, हा आपला पूर्वनिश्चित लाडका निष्कर्ष काढण्यासाठी आपल्या प्रस्तावनेचा उपयोग केला आहे. "सावरकरांनीही निखळ तत्वचिंतनात्मक असे लेखन फारच थोडे केले असले तरी आपल्या चिंतनशील मनाला पडलेले प्रश्न त्यांनी प्रसंगपरत्वे मांडले, आणि त्यापैकी कांहीची आपल्याला पटलेली उत्तरे कधी कधी सांगितली, तीही अनेकदा आपल्या एखाद्या कृतीचा, धोरणाचा आशय स्पष्ट करतांना! ". ही वस्तुस्थिती डॉ. फडके एकीकडे मान्य करतानाच दुसरीकडे ती पूर्णतः दुर्लक्षून तत्त्वज्ञ सावरकरांचे मूल्यमापन करतात. सावरकर कसे संकुचित विचाराचे होते हे ते दाखवून देतात, आणि ते हे सारे हेतुतः करतात. असे केल्यामुळे सावरकरांची चुकीची प्रतिमा उभी करण्यात आपण कदाचित् यशस्वी होऊ, पण तो काही त्यांच्या अभ्यासाचा प्रामाणिक प्रयत्न होवू शकणार नाही. यामुळेच सावरकरांचे विचार हे एका तत्त्वज्ञाचे विचार नसून मुख्यतः लोकनेत्याचे आहेत, ही गोष्ट सतत लक्षात ठेवूनच त्यांचा अभ्यास केला पाहिजे असे आम्हास वाटते.

भारतीय विचारवंताच्या दोन परंपरा आपल्याला स्पष्टपणे लक्षात येतात. ज्यांनी बुद्धिवादाचा पुरस्कार केला व समाजाची रचना आमूलाग्रपणे बदलली पाहिजे अशी भूमिका घेतली, अशा बुद्धिवादी विचारवंतांची एक परंपरा भारतात आहे. म. फुले, आगरकर, मानवेंद्रराय, नेहरु, आंबेडकर आदि विचारवंत या परंपरेत येतात. समाजाला धर्मापासून मुक्त करण्याचा पुरस्कार या विचारवंतांनी केला. मात्र या मंडळींना भारतीय इतिहास, धर्म, परंपरा या विषयी प्रखर असा अभिमान नव्हता. प्रखर राष्ट्रवादी ज्यांना म्हणता येईल अशी ही मंडळी नव्हती. राष्ट्रवादाच्या पलीकडे जावून अधिक उदारमतवादाकडे ही मंडळी झुकलेली होती. दुसरी परंपरा प्रखर राष्ट्रवाद्यांची आहे. लो. टिळक, अरविंदबाबू, विवेकानंद इत्यादी या परंपरेत मोडतात. ही मंडळी विचाराने धार्मिक होती. भारतीय इतिहास, परंपरा यांचा त्यांना कडवा अभिमान होता. मात्र ही मंडळी विचाराने प्रखर बुद्धिवादी नव्हती. लो. टिळक व आगरकरातील राजकीय व सामाजिक सुधारणाबद्दलचा वाद हा या दोन परंपरेतील वाद होता. आधी सामाजिक सुधारणा की राजकीय सुधारणा हा खरा मतभेदाचा मुद्दा नव्हता. समाजाची रचना कशी असावी, या बद्दलचा तात्विकवाद हाच मतभेदाचा मूळ मुद्दा होता. सामान्यतः प्रखर बुद्धिवाद्यांनी राष्ट्रवादाचा गंभीरपणे विचार केलेला दिसणार नाही. राष्ट्रवाद, ज्याच्यावर तो उभा राहतो तो इतिहास, संस्कृती, परंपरा या गोष्टी बुद्धिवाद्याला संकुचित वाटल्या. राष्ट्र म्हणजे काय, राष्ट्राचा पाया कोणता, एकात्म राष्ट्राचे घटक कोणते, इत्यादी गोष्टींचा गंभीर विचार त्यांनी कधीही केला नाही. तसे करणे त्यांना संकुचितपणाचे वाटले. जगातील उदारमतवाद राष्ट्रवाद हा संकुचित मानू लागला होता. या उदारमतवादाचा प्रभाव ह्या मंडळीवर पडलेला होता. राष्ट्राचा, राष्ट्रवादाचा विचार त्यांनाही करावा लागला असला तरी तो त्यांचा नाइलाज होता. समता, बंधुता, न्याय इत्यादी तत्त्वावर

सर्व मानवाला एक करता येईल, यावर त्यांच्यापैकी काहीजणांचा विश्वास होता. आर्थिक समतेच्या किंवा समाजवादाच्या तत्वावर ज्या सर्वांना एकत्र आणता येते, यावर काहीजणांचा विश्वास होता. एका शासनाच्या अधिपत्याखाली जेवढी भूमि असेल, त्या भूमितील सर्व लोकांना या वरील तत्त्वावर एकत्र आणता येते, एकात्म राष्ट्र याच तत्त्वावर उभे करता येते असे या मंडळींना वाटत होते. बुद्धीवादाची ही भूमिका प्रादेशिक राष्ट्रवाद मानणारी आहे. धर्म, वंश, जात, संस्कृती, भाषा इत्यादीच्या आधारावर कोणताही भेदभाव आपल्या देशातील लोकांमध्ये करणे हे त्यांना बुद्धिवादाच्या विरोधी व संकुचित वाटले.

दुसऱ्या परंपरेतील प्रखर राष्ट्रवाद्यांची भूमिका नेमकी यांच्या उलटी होती. ह्या मंडळींना धर्म, संस्कृती, परंपरा, इतिहास ह्या मध्ये गाढ श्रद्धा होती, अभिमान होता. आपला धर्म, तत्त्वज्ञान व संस्कृती जगात सर्वश्रेष्ठ आहे, अशी त्यांची भूमिका होती. बुद्धिवादी म्हणतात तशी धर्मचिकित्सा या मंडळींना कधीच मान्य नव्हती. मूळ शुद्ध स्वरुपातील धर्म आणला पाहिजे, अशी यांची भूमिका होती. समाजाला नीतिमूल्ये धर्मच देवू शकतो, यावर त्यांचा विश्वास होता. अध्यात्माच्या परमोच्च पातळीवर मानवाला घेऊन जाण्याचे सामर्थ्य आमच्या तत्त्वज्ञानात आहे, असा यांचा अभिमान होता. प्रायः ही मंडळी बुद्धिवादी नव्हती. यांची प्रवृत्ति थोडीबहुत सुधारणा करुन जुनें टिकवून धरण्याची होती. मात्र या मंडळींनी प्रखर राष्ट्रवादाचा पुरस्कार केला. धर्म, इतिहास, संस्कृती इत्यादीचा आधार त्यांनी या राष्ट्रवादाला दिला. एका अर्थी सांस्कृतिक राष्ट्रवादाचा त्यांनी पुरस्कार केला. या देशावरील प्रेम म्हणजे या देशाचा इतिहास, धर्म, संस्कृती, परंपरा यांच्यावरील प्रेम होय, असा सिद्धांत त्यांनी मांडला. या दोन्ही परंपरा स्थूलमानानें परस्परविरोधी आहेत.

सावरकर ह्यापैकी कोणत्याही एका परंपरेत बसणारे नाहीत. सावरकर पहिल्या परंपरेतील प्रखर बुद्धिवाद स्वीकारतात तर दुसऱ्या परंपरेतील हिंदुत्व-निष्ठ राष्ट्रवाद स्वीकारतात. यातील दुसरी निष्ठा पहिल्या निष्ठेशी प्रथम-दर्शनी विसंगत आहे. यामुळेच सावरकरांच्या बुद्धिवादाबद्दल अनेक गैरसमज निर्माण झालेले आहेत. सावरकर दुसऱ्या राष्ट्रवादी परंपरेतील आहेत, असे आपण गृहीत धरुन चालतो. परिणामतः त्यांच्या बुद्धिवादाला दुर्लक्षित करण्याची चूक आपण करीत असतो. त्यांच्या विचारातील या जाणवणाऱ्या विसंगतीचा शोध घेण्याचा, त्याचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न करुन ही चूक दुरुस्त केली पाहिजे, असे आम्हास वाटते. सावरकरांच्या राष्ट्रवादाचा व हिंदुत्वाचा अभ्यास यासाठीच आम्ही चिकित्सकपणे पुढील प्रकरणात केला आहे. खरी चिंता सावरकरांवरील अन्यायाची नाही. सावरकरांवरील हा अन्याय बुद्धिवादावरील अन्याय आहे, ही खरी चिंता आहे. समाजाला बुद्धिवादाकडे घेऊन जाणे, ही आद्य गरज आहे, आणि हे काम सर्वात कठीण आहे. ज्या ज्या बुद्धिवाद्यांनी यासाठी आपले वैचारिक

व प्रत्यक्ष कार्याचे योगदान केलेले आहे, त्यांचे चिरंतन स्मरण आपणाला ठेवणें भाग आहे. बुद्धिवादाची पाऊलवाट ज्या ज्या थोर बुद्धिवाद्यांनी आपल्याला दाखवून दिली आहे, तोच रस्ता आपल्यासारख्या सामान्य माणसाकरिता सोईचा असतो. ज्या ज्या हिंदुत्वनिष्ठांना सावरकर आपले वाटतात, त्यांना तर या पाऊल वाटेबद्दल ममत्व वाटायला काहीच हरकत नाही. राष्ट्रवाद्यालाही किंवा हिंदुत्व-निष्ठांनाही बुद्धिवादी होण्यास हरकत नसतें, एवढे तरी त्यांना सावरकरांपासून शिकता येईल. बुद्धिवादाने झपाटून जावे इतकी ताकद सावरकरांच्या बुद्धिवादी विचारात आहे, असे आम्ही अनुभवले आहे. बुद्धिवादाचा प्रभावी प्रचार करणाऱ्या सावरकरांच्या बुद्धिवादाला दुर्लक्षिणें बुद्धिवाद्यांच्या दृष्टीने अहितकारक आहे, असे आम्हास वाटतें. याच कारणासाठी त्यांच्या बुद्धिवादाचा अभ्यास करणे अवश्य वाटले व होईल तितक्या चिकित्सकपणें, सम्यकपणे व निःपक्षपातीने हा अभ्यास करण्याचा आम्ही येथे एक नम्र प्रयत्न केला आहे.

सावरकरांचे आंधळे अनुयायी व कर्मठ विरोधक या दोघांनाही आमच्या या अभ्यासाचे निष्कर्ष पटणार नाहीत, याची आम्हाला पूर्ण जाणीव आहे. अशा काही थोर व आदरणीय व्यक्तिबरोबर चर्चा केल्यानंतर आम्हाला हाच अनुभव आलेला आहे. आमची मते व निष्कर्ष या मंडळीशी चर्चा करुन आम्ही परत परत घासून पुसून घेतलेली आहेत; व वाचकांच्या प्रतिक्रियेनतर परत ती तपासून घेण्याची आमची तयारी आहे. कारण हा अभ्यास आहे. एखादा निष्कर्ष काढण्या-च्या घाईपेक्षा त्या आधी भरपूर पुरावे देण्याची वस्तुनिष्ठ पद्धत आम्ही अवलंबिली आहे. ते पुरावे संदर्भरहित असतील, वा पूर्णतः खोटे असतील वा त्याच्या विरोधी पुरावे उपलब्ध असतील तर तें मांडून आमचा निष्कर्ष कसा चुकीचा आहे हे मांडण्यास वाचक स्वतंत्र आहेतच. ते पुरावे खरे असतील तर वेगळा निष्कर्ष काढण्यासही वाचक स्वतंत्र आहेत. अभ्यास करण्याच्या वा पुरेशे पुरावे सादर करण्याच्या प्रयत्नात आम्ही कमी पडलेले असू; पण आम्ही जो काही प्रयत्न केला आहे, तो प्रामाणिक हेतूने, अभ्यासूवृत्तीने व कोणताही सांप्रदायिकभाव वा पूर्णग्रह मनात न ठेवता केलेला आहे की नाही, हे वाचकांनी ठरवायचे आहे. आमच्या निष्कर्षाच्या औचित्यापेक्षा वाचकांच्या या अनुकूल अभिप्रायाबद्दल आम्हाला अधिक जिज्ञासा आहे.

एकच व्यक्ति जेव्हा परस्पर विसंगत विचार मांडू लागतें, तेंव्हा त्या विसंगतीचा अन्वयार्थ लावण्याची एक भूमिका आपण समजून घेतली पाहिजे. एखाद्या कायद्यातील दोन कलमांचा स्वतंत्र अर्थ परस्परविरोधी वाटत असेल तर, त्या कलमाचा अर्थ लावण्याच्या, कायदाशास्त्राप्रमाणे, काही विशिष्ट पद्धती आहेत. प्रत्येक कलमाचे एकापेक्षा अधिक अर्थ निघत असतील तर, जो अर्थ त्या दोन कलमात सुसंगती निर्माण करील, तोच अर्थ घेतला गेला पाहिजे, ही एक पद्धत आहे. कायदे करणाऱ्याचा हेतु विसंगत तरतुदी करण्याचा नसतो, हा

सिद्धांत या पद्धतीच्या पाठीमागे आहे. व्यक्तीच्या विचाराच्या विसंगतीचा अर्थ व अन्वयार्थ लावताना हीच पद्धत वापरणे तर्कशुद्धच नव्हे तर वस्तुनिष्ठही आहे, अशी आमची भूमिका आहे. या भूमिकेप्रमाणे सावरकरांचा हेतु विसंगत विचार मांडण्याचा नव्हता, हे आपल्याला गृहीत धरावे लागते; विचारात जी विसंगती दिसते, तिची कारणे त्या विचाराच्या उगमाच्या परिस्थितीच्या संदर्भात शोधावी लागतात. सावरकर हे सुसंगत विचार मांडणारे गृहस्थ आहेत; परस्परविरोधी विचार मांडणारे ते कोणतें विसंगत गृहस्थ नव्हेत; आत एक व बाहेर एक असा विचार मांडण्याचा दांभिकपणा त्यांच्या ठिकाणी नव्हता, हे आमचे या भूमिकेप्रमाणे मूळ गृहीतच आहे. हे गृहीत आहे निष्कर्ष नव्हे, हे लक्षात घेतले पाहिजे. हे गृहीत धरल्यामुळेच सावरकरांच्या विविध विचारांचा अन्वयार्थ लावण्याची शक्यता व आवश्यकता निर्माण होत असते. हीच भूमिका प्रत्येक व्यक्तीच्या बाबतीत अन्वयार्थ लावण्याच्या आरंभाला गृहीत धरणे तर्कशुद्ध व न्यायोचित असते. सावरकरांच्या विविध विचारांचा जो अर्थ आम्ही पुढे लावण्याचा प्रयत्न केला आहे, त्यामुळे त्यांच्या सर्व विचारात सुसंगती निर्माण होते, असे आमचे म्हणणे आहे. सावरकरांच्या एखाद्या भूमिकेचे, विचाराचे, लिहण्याचे वा बोलण्याचे दोन अर्थ घेता येत असतील तर, जी त्यांच्या इतर विचारांशी सुसंगती निर्माण करील तोच अर्थ घेतला पाहिजे, असे आम्हास वाटते. अशा पद्धतीतून सावरकरांची निर्माण होणारी प्रतिमा कोणत्या स्वरुपाची राहील, हा प्रश्न आमच्या मते दुय्यम आहे. ही आमची सारी भूमिका आपण समजून घेतली पाहिजे, असे आम्हास वाटते.

✦ ✦



विभाग पहिला

प्रखर बुद्धिवाद

प्रकरणे

१. धर्माविषयी भूमिका

२. धर्मग्रंथाविषयी भूमिका

३. विज्ञान धर्माचा स्वीकार

४. बुद्धिवाद : काही निवडकबाबी संबंधी

१. धर्माविषयी भूमिका

सर्व चिकित्सेचा आरंभ धर्म चिकित्सापासून होतो, असे मार्क्सचेच म्हणणे आहे. सावरकरांचे धर्माविषयी कोणते विचार होते येथपासून त्यांच्या बुद्धिवादाचा अभ्यास करण्यास आपण आरंभ करु. 'धर्म' ही अत्यंत संदिग्ध संज्ञा आहे. व्यक्तिपरत्वे व कालपरत्वे त्यांचा अर्थ बदलत जातो. विविध अर्थाने ही संज्ञा व्यवहारात आपण वापरत असतो. धर्म या शब्दाचा सर्वमान्य असा एकच एक अर्थ नसल्यामुळे त्याचा निश्चित अर्थ ठरवूनच व त्या अर्थानेच सावरकरांच्या धर्मविषयक भूमिकेचा आपल्याला अभ्यास करावा लागेल.

सुदैवाने सावरकरांनीच एका लेखात 'धर्म' या शब्दाचे विविध अर्थ सांगितले आहेत. त्यांनी सांगितलेल्या अर्थामध्ये धर्माच्या अर्थाच्या सर्वच शक्यता अंतर्भूत होतात. "खरा सनातन धर्म कोणता?" हा तो लेख होय.[१] "खरा सनातन धर्म म्हणजे जातिभेद नव्हे' या लेखातही तेच अर्थ सांगितले आहेत. त्यामुळे कोणत्याही धर्मशास्त्राच्या वा धर्मपंडिताच्या किंवा अन्य अधिकारी पुरुषाचा आधार घेऊन धर्म या शब्दाची व्याख्या पाहत बसण्याची आपल्यासा गरज नाही. धर्म या शब्दाच्या अर्थाचा मानसिक प्रक्रियेमुळे विकास आणि पर्याय होत होत, त्या अर्थाने भिन्नभिन्न भाव झाले, असे सावरकरांनीच म्हटले आहे. त्यांनी सांगितलेले धर्म या शब्दाचे विविध अर्थ खालीलप्रमाणे आहेत.

धर्माचे विविध अर्थ

१) 'धर्म' या शब्दाचा मूळचा व्यापक अर्थ नियम असा आहे. कोणत्याही वस्तूच्या अस्तित्वाचे नि व्यवहाराचे जो धारण, नियमन करतो तो त्या वस्तूचा धर्म असतो. सूर्याचा धर्म प्रकाशणे, अग्नीचा धर्म जाळणे, इ. प्रसंगी तो वापरला

जातो. या ठिकाणी धर्म या शब्दाचा अर्थ नैसर्गिक गुण, नियम वा गुणधर्म असा आहे. इंग्रजीमध्ये याला Characterestics असे म्हणता येईल. असा हा धर्म या शब्दाचा पहिला अर्थ आहे.

२) निसर्गाच्या तसेच निसर्गाच्या नियमाच्या मुळाशी असणारा जो निसर्गाचा नियम आहे आणि ती पाळणारी किंवा त्याला कायूत ठेवणारी जी कोणती शक्ती वा आदिशक्ती आहे, त्या आदिनियमाचा वा आदिशक्तीचा शोध, विचार, ज्ञान ज्यात केले जाते, ज्याने संपादिले जाते, तो धर्मच होय. हा सावरकरांनी दिलेला दुसरा अर्थ आहे. या ठिकाणी धर्म या शब्दाचा अर्थ तत्त्वज्ञान असा आहे. हे जग कसे तयार झाले, याचा निर्माता वा नियंत्रक कोण आहे, याविषयीचे ज्ञान या अर्थी येथे धर्म हा शब्द आलेला आहे. ईश्वर, जीव, जगत्, त्यांचे परस्परसंबंध याचा या धर्मात समावेश होतो. तसेच स्वर्ग, नरक, पुनर्जन्म, आत्मा, परमात्मा, त्यांचे परस्परांशी संबंध इ. गोष्टीचाही या धर्मात अंतर्भाव होतो. इंग्रजीमध्ये या अर्थीच्या धर्माला Philosophy असे म्हणतात.

३) आदिशक्तीच्या वा आदिनियमाच्या प्रकाशात मनुष्याने ध्येय ठरवून त्या ध्येयप्राप्तीस्तव आपली पारलौकिक यात्रा कशी करावी, याचे विवरण करणारा या अर्थी धर्म हा शब्द वापरला जातो. या ठिकाणी परलोक नावाची वस्तू अस्तित्वात आहे हे गृहीत धरलेले असते, व त्या आधारावर या अर्थीच्या धर्माची इमारत उभी असते. पारलौकिक किंवा पारमार्थिक सुखाची कल्पना येथे गृहीत धरलेली असते. या इहलोकीच्या नंतरच्या पारलौकिक जगातील सुखासाठी, या इहलोकात कोणती ऐहिक कर्तव्ये करायाची आहेत, याचे विवरण या तिसऱ्या अर्थीच्या धर्मात असते. या ठिकाणी लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट ही आहे की, जे अपेक्षित हित वा सुख आहे ते परलोकातील आहे, व त्या सुखसिद्धीसाठी जे काही आचार, व्यवहार वा कर्तव्य करणे भाग आहे, ती मात्र या इहलोकातील आहेत. या संबंधीचे जे नियय असतात त्यांना या तिसऱ्या अर्थी धर्म म्हणतात. व्यवहारात याला आपण कर्मकांड असे म्हणतो. इंग्रजीत या अर्थीच्या धर्माला Religion असे म्हटले जाते.

४) या इहलोकातील सुखासाठी इहलोकातच पाळावयाचे जे नियम वा आचार वा कर्तव्यें असतात, त्याला चौथ्या अर्थी धर्म असे म्हटले जाते. मनुष्यामनुष्यातील ऐहिक व्यवहार व ते नियमन करणारे नियम यांचा या धर्मात समावेश होतो. या ठिकाणी मिळणारे सुख किंवा हित या इहलोकातीलच असून त्यासाठी पाळावयाचे नियम व कर्तव्यें हीही इहलोकीचीच आहेत, ही गोष्ट तिसऱ्या अर्थाच्या धर्मापेक्षा हा धर्म वेगळा आहे, हे समजून घेण्यासाठी महत्त्वाची आहे. राजधर्म, कायदे, इत्यादींचा समावेश या धर्मात होतो. इंग्रजीमध्ये Law हा शब्द ज्या अर्थी [illegible] अर्थी येथे धर्म हा शब्द वापरला आहे. यालाच सावरकर मनुष्य-

धर्म म्हणतात.

हे वरील 'धर्म' या शब्दाचे शक्य असलेले विविध अर्थ सावरकरांनी केलेले असून, व्यवहारात धर्म हा शब्द जेंव्हा वापरला जातो तेव्हा तो वरीलपैकी कोणत्या तरी एका अर्थी असतोच, हे उघड आहे. फार तर एकापेक्षा अधिक अर्थांनीही तो वापरलेला असू शकतो. विवेचनाच्या सोयीसाठी केलेले हे अर्थ आहेत. 'खरा सनातन धर्म कोणता?' हे समजून देण्यासाठी सावरकरांनी धर्म या शब्दाचे हे विविध अर्थ सांगितलेले आहेत. वरीलपैकी एकापेक्षा अधिक अर्थांनी जरी कोणी धर्म हा शब्द वापरला तरी, विवेचनाच्या दृष्टीनें त्यात फरक पडण्याचे कारण नाही. खरा सनातन धर्म कोणता, हे समजून सांगण्यासाठी जसा यामुळे फरक पडत नाही, तसाच सावरकरांचे धर्मविषयक विचार समजून घेण्यासाठीही धर्माच्या या संयुक्त अर्थामुळे फरक पडत नाही.

सनातन म्हणजे शाश्वत

सावरकरांनीच धर्म शब्दाचे हे अर्थ दिल्यामुळे त्या त्या अर्थाने धर्माविषयी त्यांना काय वाटते, हे समजून घेणे आपल्याला फारच सोपे झालेले आहे. त्यांच्या मते 'सनातन' शब्दाचा अर्थ शाश्वत किंवा अपरिवर्तनीय असा आहे. सनातन धर्म याचा अर्थ शाश्वत नियम ! जे अपरिवर्तनीय आहे, जे बदलणे मनुष्याच्या शक्तीबाहेरचे आहे, असे अबाधित जे धर्म असतील, नियम असतील तेंच काय ते सनातन धर्म आहेत, असे सावरकरांना वाटते. कार्यकारणभावाच्या वैज्ञानिक कसोटीस जे केव्हाही उतरु शकतात, असे मनुष्यांच्या ज्ञानाच्या आटोक्यात जे जे सृष्टीनियम आणि जी जी वैज्ञानिक सत्यें आज ज्ञात झालेली आहेत त्यासच आम्ही आमचा सनातनधर्म म्हणतो, असे सावरकर म्हणतात. याचे उदाहरण देऊन विवरण करतांना सावरकर म्हणतात,[२] "प्रकाश, उष्णता, गति, गणित, गणितज्योतिष, ध्वनि, विद्युत्, चुंबक, रेडियम, भूगर्भ, शरीर वैधक, यंत्र··· जी प्रयोगक्षम शास्त्रे (सायन्सेस) आहेत, त्याचे जे प्रत्यक्षनिष्ठ आणि प्रयोगसिद्ध नियम आज मनुष्यजातीस ज्ञात झालेले आहेत, तोच आमचा खरा सनातन धर्म होय. ते नियम आर्यांसाठी वा अनार्यांसाठी, मुस्लिमांसाठी वा काफरांसाठी, इस्लाइलासाठी वा हीनदासाठी अवतीर्ण झालेले नसून ते सर्व मनुष्यमात्रास निःपक्षपाती समानतेने लागू आहेत. हा खरा सनातन धर्म आहे. इतकेच नव्हे तर हा खरोखर मानवधर्म आहे. हा केवळ 'कृतेतु मानवो धर्मः' नाही तर त्रिकालाबाधित मानवधर्म आहे." सावरकर सनातन धर्म कशाला म्हणतात, हे आपण नीट समजून घेतले पाहिजे. हा सनातन धर्म बदलविणे मनुष्याच्या शक्तीबाहेरचे असते. मनुष्याच्या अस्तित्वावाचून वा इच्छेवाचूनही हा धर्म अस्तित्वात असतो. या वैज्ञानिक सनातन धर्मास बदलविण्याचे सामर्थ्य मनुष्याला केव्हाही येणार नाही, असे सावरकरांना वाटते. हे सनातन धर्म मनुष्यास आज संपूर्णपणे ज्ञात नाहीत व बहुधा ते तसे कधीही पूर्णपणे

नष्ट होणार नाहीत, या मनुष्याच्या मर्यादेची सावरकरांनी स्पष्टपणे नोंद केलेली आहे. या सृष्टिनियमाचे मनुष्यांनी अधिकात अधिक ज्ञान करुन घेतले पाहिजे, या ज्ञानाचा उपयोग करुन मानवी जीवन सुखी केले पाहिजे, असे सावरकरांना वाटते. विज्ञानाच्या प्रकाशात या ज्ञानाचा विकास होत जाणारा आहे. आजचे सत्य वाटणारे ज्ञान उद्या अज्ञानात जमा होईल, आजचे अज्ञान उद्या ज्ञान होईल, व ते करुन घेणे एवढेच मनुष्याच्या हातात आहे, असे सावरकरांचे स्पष्ट मत आहे. पहिल्या अर्थीच्या धर्माविषयीची सावरकरांची ही भूमिका आहे.

'तत्त्वज्ञान' या दुसऱ्या अर्थी धर्म हा शब्द जेव्हा वापरला जातो, त्या अर्थाने धर्म हा सनातन आहे काय, असा सावरकरांसमोरचा एक प्रश्न आहे. तत्त्वज्ञानात्मक सिद्धांत शाश्वत, अपरिवर्तनीय किंवा त्रिकालाबाधित आहेत काय? ईश्वर, जीव, जगत् यांच्या स्वरुपाविषयी आणि परस्परसंबंधाविषयी विवरण करणारे शास्त्र आणि सिद्धांत याला आपण तत्त्वज्ञान म्हणतो. तेव्हा तत्त्वज्ञानाचे जे सिद्धांत आहेत, ते सनातन आहेत काय असा हा प्रश्न आहे. याचे उत्तर देताना सावरकर म्हणतात,[3] " आदिशक्तीचे स्वरुप, जगाचे आदिकारण आणि आदिनियम, हे मात्र खरोखरच सनातन, शाश्वत आणि त्रिकालाबाधित आहेत. भगवद्गीतेत किंवा उपनिषदात याविषयीचे जे सिद्धांत प्रकट झालेले आहेत, ते काय ते सनातन असू शकतील. कारण जगताचे आदिकारण आणि त्याची इच्छा वा शक्ती हे बदलणे मनुष्यशक्तीच्या बाहेरची गोष्ट आहे. ते जे आहेत ते आहेत आणि ते तसेच निरवधी राहणार. मनुष्य जातच्या जातच जरी नष्ट झाली तरी ते नष्ट होणार नाहीत. मनुष्य तर काय, पण उभी पृथ्वीच्या पृथ्वी जरी एखाद्या आडदांड धूमकेतूने आपल्या जळत्या दाढात एखाद्या सुपारीसारखी कडाकड दळून गिळून टाकली, तरीही त्या महान धर्माचे अस्तित्वास रेसभरही धक्का लागणारा नसून उलट ती घटना त्यांच्या त्या सनातन अस्तित्वाची एक साक्ष होईल."

सावधगिरी हवी :

तेव्हा तत्त्वज्ञान या अर्थी धर्म हा सनातनच आहे, असे सावरकरांनी वर जे म्हटले आहे व त्यासाठी गीता उपनिषदांचे उदाहरण घेतले आहे ते थोडे काळजीपूर्वक व सावधगिरीनें समजून घेतले पाहिजे. तत्त्वज्ञानाचे जे काही अमुक वा तमुक सिद्धांत वा निष्कर्ष असतील ते विशिष्ट सिद्धांत वा निष्कर्ष सनातन आहेत, असे सावरकर म्हणत नाहीत, हे लक्षात घेतले पाहिजे. तत्त्वज्ञानाचे स्वरुप, हेतू व कार्य म्हणजे या विश्वाचे कारण काय आहे हे शोधून काढणे हे असून या शोधाचे निष्कर्ष सनातन असू शकतील, इतकेच त्यांचे म्हणणे आहे. या शोधाचे निष्कर्ष काय आहेत, याबद्दल ते बोलत नाहीत. अमका एखादा निष्कर्ष सत्य वा सनातन म्हणून समोर मांडत नाहीत. मनुष्यांनी एकापेक्षा अनेक तत्त्वज्ञाने निर्माण केलेली आहेत. ती एकमेकांपासून वेगळी व बऱ्याच अंशी परस्परविरोधी आहेत. जे वैदिक

तत्त्वज्ञानाप्रमाणे आहे, ते इस्लाम तत्त्वज्ञानाप्रमाणे नाही. वैदिकापुरते घेतले तरी विविध व परस्परविरोधी निष्कर्ष काढणारे द्वैती, अद्वैती, विशिष्टाद्वैती इ. पंथ अस्तित्वात आहेतच. उपनिषदे म्हटली तरी हीही एक नाहीत, असंख्य आहेत. सर्वांचे निष्कर्ष सारखे नाहीत. यापैकी नेमका एखादा निष्कर्ष सत्य याबद्दल सावरकर बोलत नाहीत. या अनेकांपैकी एखादा किंवा अन्य कोणता निष्कर्ष बरोबर असू शकेल व तो बरोबर असल्यानंतर सनातन असू शकेल, असे सावरकरांना म्हणावयाचे आहे. ज्या अर्थी असा एखादा निष्कर्ष वा सिद्धांत शाश्वत वा सत्य आहे, त्या अर्थी त्याच्या विरोधी असणारे बाकी सारे निष्कर्ष वा सिद्धांत आपोआपच असनातनीय म्हणजे तात्पुरते व खोटे ठरतात. तेव्हा सावरकर तत्त्वज्ञानाच्या कोणत्याही एका विशिष्ट निष्कर्षाप्रत येऊन त्या निष्कर्षाला सनातन धर्म म्हणत नाहीत, हे काळजीपूर्वक समजून घेतले पाहिजे. नाहीतर भगवद्गीतेतील वा उपनिषदातील तत्त्वज्ञान सत्य वा सनातन आहे, असे सावरकर म्हणत आहेत, असा, काही जणांचा गैरसमज झाला तसा, आपलाही गैरसमज होण्याचा धोका आहे.

सृष्टिनियम या पहिल्या अर्थी काय किंवा तत्त्वज्ञान या दुसऱ्या अर्थी काय दोन्हीही धर्म सनातनच म्हणजे शाश्वत असल्यामुळे ते मनुष्याची इच्छा, शक्ति व प्रयत्न यांच्या पलिकडचे आहेत. या दोन्हीही अर्थीच्या धर्मात काडीचाही बदल करण्याची ताकद मनुष्यात नाही, व म्हणून या अर्थीच्या धर्माचा अभ्यास करण्या पलीकडे मनुष्याला दुसरे काहीही कर्तव्य करण्याची गरज नाही, असा सावरकरांचा स्पष्ट निष्कर्ष आहे.

जी गोष्ट तत्त्वज्ञान या अर्थीच्या धर्माची आहे तीच गोष्ट पारलौकिक धर्म या तिसऱ्या अर्थी असलेल्या धर्माची आहे. पारलौकिक धर्माचा मुख्य आधार हा आहे की, मनुष्याच्या बुद्धीला प्रत्यक्षात जे जग दिसते त्याच्याही पलिकडे एक जग आहे, ज्याला परलोक म्हणतात. प्रत्यक्षात मनुष्याच्या इंद्रियाला जे सुख दिसते व अनुभवण्यास येते, त्या सुखापलिकडेही एक सुख आहे, असे मनुष्याला वाटत असते. हे वाटणे सत्य आहे काय, शाश्वत आहे काय, सनातन आहे काय यावरतीच पारलौकिक धर्माचे सनातनत्व अवलंबून आहे. परलोक ही वस्तू अस्तित्वात आहे काय याच्यावर पारलौकिक धर्माचे सनातनत्व अवलंबून आहे. या ऐहिक जगाच्या पलिकडे दुसरे एक जग आहे ही गोष्टच जर खोटी असेल तर, त्या दुसऱ्या जगाच्या गृहीतावर उभारलेल्या पारलौकिक धर्माचा सारा डोलारा पार कोसळतो, तो एक भ्रम ठरतो. ते दुसरे जग जर खरोखरच सत्य असेल तर पारलौकिक धर्मही सत्य व सनातन असू शकतो, असा हा जर-तरचा अनुबंधीत प्रश्न आहे.

एक वैशिष्ठ्य

सावरकरांना या परलोकाबद्दल काय वाटते, हा म्हणूनच फार महत्त्वाचा

प्रश्न आहे. सावरकर बुद्धिवादी आहेत असे आपण म्हणतो. बुद्धिवादी ही सत्य-शोधनाची प्रयोगशील पद्धत आहे. प्रयोगाच्या पूर्वी त्याचे निष्कर्ष निश्चित न करण्याची वस्तुनिष्ठता या पद्धतीत असते. आज जे सिद्ध झालेले नाही, ते तसे नाही हे मानण्याचा धीटपणा या पद्धतीत आहे. आज जे सिद्ध झाले नाही ते उद्या अधिक ज्ञान झाल्यावर सिद्ध होऊ शकेल असे मानण्याचा शोधकपणा या पद्धतीत आहे. तसे हे सिद्ध होईपर्यंत कोणताही निश्चित निष्कर्ष न काढण्याचा संयमीपणा या पद्धतीत आहे, बुद्धिवादाचे हे वैशिष्ठ्य आहे. सावरकरांचा बुद्धिवाद समजून घेताना बुद्धिवादाचे हे वैशिष्ठ्य लक्षात ठेवणें जरुर आहे. या परलोकासंबंधी सावरकर म्हणतात,[४] "ईश्वर, जीव, जगत् यांच्या स्वरुपाचे नि परस्परसंबंधांचे आस्तिरुप वा नास्तिरुप असे त्रिकालाबाधित नियम असलेच पाहिजेत. त्याचप्रमाणे जन्म, मृत्यु, पूर्वजन्म, स्वर्ग, नरक याविषयीही जी कोणती वस्तुस्थिती असेल ती निश्चितपणे सांगणारे ज्ञानही त्रिकालाबाधित म्हणवून घेण्यास पात्र असणारच. यास्तव या पारलौकिक प्रकरणीचे सिद्धांतही सनातन धर्म म्हणजे शाश्वत, अपरिवर्तनीय धर्म होत यात शंका नाही. या ठिकाणी 'तत्त्वज्ञानाचे' सिद्धांत जसे सनातन आहेत, तसेच 'पारलौकिक' प्रकरणीचे सिद्धांतही सनातन आहेत, असे सावरकर म्हणत आहेत, हे लक्षात घेतले पाहिजे. एका अर्थी पारलौकिकाचे सिद्धांतही तत्त्वज्ञानाचेच भाग होतात. तत्त्वज्ञानाच्या कोणत्या एखाद्या सिद्धांता– वा निष्कर्षासंबंधात जसे सावरकर बोलत नसतात, तसेच या पारलौकिक प्रकरणीच्या कोणत्याही एखाद्या विशिष्ट सिद्धांतावद्दल सुद्धा बोलत नाहीत हे लक्षात ठेवले पाहिजे.

तत्त्वज्ञान वा पारलौकिक ज्ञान या दोन्हीही संबंधीचे संपूर्ण वस्तुनिष्ठ ज्ञान मनुष्याला अद्याप व्हावयाचे आहे, असे सावरकरांचे मत आहे. विज्ञानाने जेव्हा केव्हा किंवा जे काही या जगत्कारणासंबंधी वा परलोकासंबंधी सिद्ध होत जाईल, त्या आगामी सिद्धांताच्या सनातनत्वाविषयी सावरकर बोलत आहेत, हे लक्षात ठेवले पाहिजे. जे सिद्ध व्हायचे आहे ते आगाऊच गृहीत न धरण्याचे बुद्धिवादाचे वैशिष्ट्य सावरकरांमध्ये या ठिकाणी प्रकर्षाने आपल्या लक्षात येते.

पण अद्याप अज्ञातच

तत्त्वज्ञान वा परलोकासंबंधीचे मनुष्याचे सध्याचे जे ज्ञान आहे ते मात्र सनातन वा शाश्वत या पदवीस अजिबात पोचत नाही, असा सावरकरांचा या बाबतीतील ठाम निष्कर्ष आहे. हे तत्त्वज्ञान वा परलोकज्ञान त्या त्या मानवसमूहांनी तयार केलेल्या वा त्यांच्यात प्रचलित असलेल्या धर्मात सांगितलेले असते. ही माहिती त्या त्या धर्माचे म्हणून जे जे धर्मग्रंथ असतात, त्या ग्रंथात आढळते वा परंपरेने त्या मानवसमूहात चालत आलेली असते. यासंबंधी सावरकर म्हणतात,[५] " निश्चित झालेल्या वैज्ञानिक नियमाप्रमाणे धर्मग्रंथातील हे पारलौकिक वस्तु-

स्थितीचे वर्णन प्रत्यक्षनिष्ठ प्रयोगाच्या कसोटीस मुळीच उतरत नाहीत. सारी भिस्त बोलून चालून एका शब्दप्रामाण्यावर, आप्तवाक्यावर, विशिष्ट आंतरअनुभूतीवर अवलंबून असते." वास्तव जगातील कोणत्याही धर्मग्रंथातील यासंबंधीच्या ज्ञानास सनातन धर्म, अपरिवर्तनीय नियम वा शाश्वत सिद्धांत मानावयास सावरकर तयार नाहीत. सत्याच्या कसोटीस यापैकी कोणतेही ज्ञान उतरत नाही, असा त्यांचा स्पष्ट निष्कर्ष आहे. वैदिक तत्त्वज्ञान प्रत्यक्षपणे नजरेसमोर ठेवून जगातील सर्वच तत्त्वज्ञानासंबंधी सावरकरांनी हा निष्कर्ष काढलेला आहे, हे समजून घेतले पाहिजे.

धर्मात सांगितलेले या संबंधीचे ज्ञान कसे खोटे आहे, कसे विश्वासार्ह नाही, हे बुद्धिवादाच्या अनेक कसोट्या लावून सावरकर पटवून देतात. प्रत्यक्ष सिद्ध न होणाऱ्या गोष्टीच्या अस्तित्वाचा ठावठिकाणा अनेक मार्गांनी लावण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. शब्दप्रामाण्याला आणि आप्तवाक्याला मुद्दा, काही मर्यादा घालून, या कामी त्यांनी योजले आहे. सावरकरांच्या बुद्धिवादाचे आणखी एक वैशिष्ट्य आपण लक्षात घेतले पाहिजे. शब्दप्रामाण्य वा आप्तवाक्य या प्रथम दर्शनीच बुद्धिवादाच्या विरोधी गोष्टी आहेत. तथापि सावरकर यांही गोष्टींना मुळासकट सरसहा धिक्कारत नाहीत. त्यांच्या मते[१] "काही मर्यादेपर्यंत प्रत्यअनुमानिक प्रमाणास अविरुद्ध असणारे शब्दप्रमाण व आप्तवाक्य हेही एक प्रमाण आहेच आहे." सावरकरांचा बुद्धिवाद आंधळा नसून कसा डोळस आहे, हे यावरुन आपल्या लक्षात येईल. शब्दप्रामाण्य व आप्तवाक्य हेही काही मर्यादेपर्यंत बुद्धिवादास मान्य आहे, असा याचा अर्थ होतो. या शब्दप्रामाण्याची मर्यादा बुद्धिवादाचे जे इतर प्रत्यक्ष, प्रयोग, अनुमान, अनुभव इ. मुलभूत घटक आहेत, त्यांच्या आधारे ठरविली जाते. या इतर घटकांच्या निकषानुसार विरोधी न जाणारा निष्कर्ष जर शब्दप्रामाण्याचा असेल तर त्यांचा बुद्धिवाद त्या शब्दप्रामाण्यावर तेवढ्यापुरता विश्वास ठेवण्यास तयार आहे. ज्या क्षणी ते शब्दप्रामाण्य बुद्धिवादाच्या इतर कसोट्यांच्या किंवा घटकांच्या विरोधी जाईल, त्या क्षणी हा विश्वासही संपत असतो. ते शब्दप्रामाण्य, शब्दप्रामाण्य म्हणूनच शिल्लक राहते. याच कसोटीच्या आधारे आपला स्वतःचा जन्म केव्हा व कुणापासून झाला ही गोष्ट आप्तवाक्यावर विसंबून सांगितल्यावाचून व तिच्यावर विश्वास ठेवण्यावाचून गत्यंतर नाही, असे सावरकरांनी आपल्या आत्मचरित्राच्या सुरुवातीसच म्हटले आहे.

आप्तवाक्याची कसोटी

'अमक्या एखाद्या महान् ऋषीनी वा प्रेषितांनी सांगितला आहे व त्यांनी तो स्वतः अनुभवला आहे, एवढ्याखातर त्यांचे अमुक एखादे सांगणे बुद्धिवाद एक गृहीत (Premise) म्हणून मानावयास तयार असतो. मात्र, लगेच हे शब्दप्रामाण्य

वा गृहीत बुद्धिवादाच्या प्रयोगशीलतेचा भाग बनते. पृथ्वीला गुरुत्वाकर्षणशक्ती आहे, असे न्यूटन म्हणतो, म्हणून आपण त्याच्या शब्दावर विश्वास ठेवू शकतो. ही गोष्ट बुद्धिवादाच्या इतर कसोटीस उतरते व सिद्धही करता येते, यास्तव बुद्धिवादाला हे शब्दप्रामाण्य मान्य असते. मात्र एखाद्या संताला साक्षात्कार झाला किंवा त्याने एखाद्याला मेलेल्या अवस्थेतून जिवंत केले किंवा तो स्वतः स्वर्ग अनुभवून आला किंवा एखाद्या योग्याला ब्रह्मज्ञान झाले या गोष्टी बुद्धिवादाच्या इतर घटकांच्या विरोधी जातात म्हणून हे शब्दप्रामाण्य बुद्धिवादास मान्य नसते. कुणाचा शब्द प्रमाण मानावयाचा हाही प्रश्न पुन्हा शिल्लकच उरतो. तोही पुन्हा बुद्धिवादाच्या इतर घटकांच्या आधारे ठरविला जातो. दोन प्रेषितांचे सिद्धांत वा अनुभव परस्परविरोधी आल्यास त्या सिद्धांतांचा परस्परांशी छेद घालून कोणाचाच शब्द प्रमाण न मानता बुद्धिवादाच्या सामान्य कसोटीप्रमाणे अशा प्रकरणी निर्णय घेतला पाहिजे, असा सावरकरांचा आग्रह आहे. या पारलौकिकासंबंधाने आप्तवाक्याचा आधार घेण्याची तयारी दाखवून त्यासंबंधी ते दाखल्यासह खालीलप्रमाणे निष्कर्ष काढतात.

आप्त कोण, असा प्रश्न उपस्थित करुन सावरकर म्हणतात,[८] "आप्तवाक्य शब्दप्रमाण असेल तर त्याचा त्या त्या विशिष्ट वस्तुस्थितीचा अनुभव एकच असला पाहिजे. पण पारलौकिक आणि पारमार्थिक सत्याचे जे स्वरुप आणि जे नियम ते प्रत्येकी सांगतात, ते प्रत्येकी भिन्नच नव्हेत तर बहुधा परस्परविरुद्ध असतात! कपिलमुनी सांगणार– पुरुष नि प्रकृति ही दोनच सत्ये आहेत, ईश्वर बिश्वर हम कुछ नही जानते! समाधिसिद्ध पतंजली म्हणणार, 'तत्र पुरुषा विशेषो ईश्वरः!" शंकराचार्य सांगणार, पुरुष वा पुरुषोत्तम ईश्वर हे मायोपाधिक आणि मायाबाधिक असून 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव नापरः' अद्वैत हेच सत्य ! रामानुज सांगणार– साफ चूक आहे; हा प्रच्छन्न बौद्धवाद ! विशिष्टाद्वैत हे सत्य! माध्व-वल्लभ म्हणणार, जीव आणि शिव, भक्त आणि देव, जड आणि चेतन एक म्हणता येईल तरी कसे? द्वैत हेच सत्य ! अशा या महनीय साक्षीदाराच्या स्वानुभूत शब्दासरशी गोंधळून बुद्धि जर उद्गारली–

पाहियले प्रत्यक्षची ! कथितो पाहियले याला ।
वदति सारे! आप्तची सारे! मानू कवणाला? ॥

तर तिचा दोष काय?" वैदिक तत्त्वज्ञानाचीच अगदी त्रयस्थपणे कोणतीही श्रद्धा न ठेवता ही चिकित्सा सावरकर करीत आहेत, हे लक्षात घेतले पाहिजे. वर उल्लेखिलेल्या विविध सिद्धांतापैकी कोणत्याही एका सिद्धांताला सावरकर सत्य मानायला तयार नाहीत, हे नीट समजून घेतले पाहिजे. या सिद्धांतापैकी कोणताही प्रमाण मानण्याच्या योग्यतेचा नाही, असे सावरकरांचा बुद्धिवाद उद्गारुन सांगत आहे. समाधिस्थ ज्ञान, स्वानुभूति ही या पारलौकिक वस्तुस्थितीस अबाधित नि विश्वासार्ह प्रमाण होऊ शकत नाही, असा स्पष्ट निष्कर्ष सावरकरांनी काढला

आहे.[९] याचाच अर्थ पारलौकिकाच्या अस्तित्वाच्या बाजूने कोणतेही प्रमाण वा पुरावा सध्या तरी उपलब्ध नाही आणि म्हणून परलोक किंवा विश्वाच्या गूढा संबंधीचा कोणताही सिद्धांत सध्या तरी खोटा आहे, असा सावरकरांचा निष्कर्ष आहे.

शब्दप्रामाण्याची कसोटी

आप्तवाक्यावद्दल वरीलप्रमाणे सांगितल्यावर शब्दप्रामाण्यावद्दल सावरकर म्हणतात,[१०] "शब्दप्रामाण्याची स्थिती वरील आप्तवाक्यासारखीच आहे. अपौरुषेय वेद ज्या कारणासाठी अपौरुषेय ठरले, त्याच कारणासाठी तौलिद, इंजिल, बायबल, कुराण, अवेस्ता, स्वर्णग्रंथ– एक ना दोन– जगात जवळजवळ जे पन्नास एक ग्रंथ तरी आजही ईश्वरप्रदत्त म्हणून प्रख्यात आहेत, तेही सर्व अपौरुषेय मानणे भाग पडते. आणि त्या प्रत्येकात देवाने प्रत्येक तदितर अपौरुषेय धर्मग्रंथातील पारलौकिक वस्तुस्थितीच्या दिलेल्या माहितीशी विभिन्न, विसंगत नि विरुद्ध माहिती दिलेली आहे. वेद सांगतात, स्वर्गाचा इंद्र हाच राजा! पण बायबलाच्या स्वर्गात इंद्राचा पत्ता टपालवाल्याला देखील माहीत नाही. देवपुत्र येशूंच्या कंबरेसाच्या स्वर्गाची किल्ली! देव आणि देवपुत्र दोघे एकच. Trinty in unity, unity in trinty! कुराणातील स्वर्गात 'ला अल्ला अिल्लिल्ला आणि महंमद रसुलल्ला' तिसरी गोष्ट नाही. रेडइंडियनांच्या स्वर्गात डुकरेच डुकरे, घनदाट जंगले! पण मुस्लीम पुण्यवंतांच्या स्वर्गात असली 'नापाक चीज' औषधालाही सापडणार नाही! आणि प्रत्येकाचे म्हणणे असे की स्वर्ग मी सांगतो तसाच आहे. प्रत्यक्ष देवाने ते सांगितले आहे; नव्हे महंमदादि पैगंबर तर वर जावून, राहून स्वतः ते पाहून परत आले नि त्यांनीही तेच सांगितले! तीच स्थिती नरकाची! पुराणात मूर्तिपूजक नि याज्ञिकच काय पण यज्ञात मारलेले बोकड देखील स्वर्गातच जातात, असा त्याचा मेल्यानंतरचा पक्का पत्ता दिला आहे. पण कुराण तर शपथेवर सांगते की, नरकातल्या जागा कितीही दाटी झाली तरी जर कोणाकरिता राखून ठेवल्या असतील तर त्या ह्या मूर्तिपूजक आणि अग्निपूजक सज्जनांसाठीच होत! मेल्यानंतरचा पक्का पत्ता नरक! हे सारे धर्मग्रंथ अपौरुषेय यास्तव खरे धरावे तरीही त्यात सांगितलेली वस्तुस्थिती शब्दप्रामाण्याने देखील सिद्धांतभूत ठरत नाही– अन्योन्यव्याघातात! ते सारे मनुष्यकल्पित खोटे मानले तर ती सिद्धांतभूत ठरत नाहीच नाही– वदतोव्याघातात! आणि काही खोटे मानावे तर तरीही ते तसे नि हे असे कां, हे ठरविण्यास त्यांच्या स्वतःच्या शब्दावाचून दुसरे प्रमाण नसल्या मुळे ती सिद्धांत ठरत नाही ती नाहीच– स्वतंत्रप्रमाणाभावात्!!"

या सावरकरांच्याच शब्दातील त्यांच्या विचारावरुन आजचे प्रचलित पारलौकिक सिद्धांत वा तत्त्वज्ञानविषयक निष्कर्ष कसे शाश्वत नाहीत, याबरोबरच

त्यांचे बुद्धिवादी विचार कसे प्रखर होते, हेच सिद्ध होते. यातून सिद्ध होणारी तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे सर्वच धर्मांबद्दल सावरकर यासंबंधी कशी निःपक्षपाती भूमिका घेतात ही गोष्ट होय. सर्वच धर्मग्रंथातील यासंबंधीच्या माहितीला ते सारख्याच प्रमाणात खोटे ठरवितात. वैदिकांचे सिद्धांत सत्य नि अन्य धर्मांचे खोटे अशी भूमिका ते कधीच घेत नसतात. ही त्यांची भूमिका कोणतेही अधिक भाष्य न करता निर्विवादपणे लक्षात यावी, यासाठीच त्यांच्याच शब्दात थोड्याशा विस्ताराने आम्ही वर दिली आहे.

केवळ सत्याभास

धर्मातील पारलौकिक ज्ञानाबद्दल अशी बुद्धिवादी चिकित्सा केल्यानंतर पारलौकिकाच्या निष्कर्षाबद्दल सावरकर पुढे म्हणतात,[११] "यास्तव प्रत्यक्ष, अनुभव व शब्द यापैकी कोणत्याही प्रमाणाने पारलौकिक वस्तुस्थितीचे आज उपलब्ध असलेले वर्णन हे सिद्ध होत नसल्यामुळे त्यास सनातन धर्म, त्रिकालाबाधित नि अपरिवर्तनीय सत्य असे म्हणता येणार नाही. तशा कोणत्याही विधेयास तसे सिद्धांतरूप येताच तेही आजच्या सनातन धर्माच्या स्मृतीत गोवले जाईलच; पण आज तरी तो विषयच प्रयोगावस्थेत आहे आणि आप्तांची व अपौरुषेय ग्रंथांची ही तद्विषयक विधाने सिद्धांत नसून कल्पित (Hypothesis) आहेत, फार तर सत्याभास आहेत; पण सत्य नव्हेच! ती जाणण्याचा प्रयत्न यापुढेही व्हावयास हवा." परलोकासंबंधी सावरकरांचे हे विचार फार महत्त्वाचे असून त्यांच्या धर्मविषयक श्रद्धेचे व म्हणूनच त्यांच्या बुद्धिवादाचे स्वरूप त्यामुळे स्पष्ट होते. या त्यांच्या विचारावरून सूर्यप्रकाशाइतक्या स्पष्ट होत असलेल्या गोष्टी म्हणजे– एक, सावरकरांना परलोक हा असत्य वाटतो, भासमान वाटतो, भ्रम वाटतो; दोन, यासंबंधीचे जगातील कोणत्याही धर्मग्रंथातील कोणतेही वर्णन हे एक गृहीत आहे, केवळ काल्पनिक आहे; तीन, या परलोकाविषयी सत्यज्ञान करून घेण्याचा विज्ञाननिष्ठ प्रयत्न झाला पाहिजे, प्रयोग झाले पाहिजेत, मात्र तोवर काहीही सत्य मानू नये. सावरकरांनी ही आपली भूमिका सातत्याने सर्वस्थळी व सर्वकाली आयुष्यभर घेतलेली आहे, हे आपण समजून घेतले पाहिजे.

'परलोक' हा मनुष्याच्या मनोराज्याचा व कल्पनेचा आभास आहे, हा सावरकरांचा निष्कर्ष असल्यामुळे अशा असत्य असणाऱ्या परलोकातील सुखासाठी मनुष्यांनी या ऐहिक जीवनात काय केले पाहिजे, याबद्दल त्यांचे विचार कोणते असतील हे साध्या तर्कानेही जाणता येणे शक्य आहे. यासंबंधी सावरकर म्हणतात, [१२] "मनुष्याचे जे ऐहिक व्यवहार त्याच्या पारलौकिक जीवनास उपकारक आहेत असे समजले जाओ, त्यास आम्ही आचार हा शब्द योजतो. अर्थात् वर दर्शविल्याप्रमाणे पारलौकिक जीवनासंबंधी आस्तिपक्षी वा नास्तिपक्षी अजून कोणताही नक्की सिद्धांत मनुष्यास कळलेला नसल्यामुळे, त्याला कोणता ऐहिक आचार

उपकारक होईल हे ठरविणे अशक्य आहे. हिंदूंच्याच नव्हे तर मुस्लीम, ख्रिश्चन, पारशी यहुदी प्रभृति झाडून साऱ्या धर्म ग्रंथातील कर्मकांडाचा पाया अशा वाळूच्या ढिगावर उभारलेला आहे. 'क्ष' हे बेट की गांव, रान की वैराण, पूर्वेस की उत्तरेस, आहेच की नाहीच हेच जिथे निश्चित केले नाही; तिथे 'क्ष' भूमध्ये सुखाने नांदता यावे म्हणून कोणत्या दिशेनें जावे आणि कोणती शिधा-शिदोरी तिथे उपयोगी पडेल, याचे बारीकसारीक अपरिवर्तनीय नियम बनविणे किती अनमानधपक्याचे काम? तसेच हे वास्तव अमुक ऐहिक आचाराने परलोकी अमुक उपयोग होतो, असे सांगणाऱ्या कोणत्याही नियमास आज तरी सनातन धर्म म्हणजे शाश्वत व अपरिवर्तनीय नि अबाधित नियम असे मुळीच म्हणता येणार नाही. या पारलौकिक प्रकरणी नाना क्लृप्ति सांगणारे कोणतेही धर्मग्रंथ अपौरुषेय वा ईश्वरदत्त नसून मनुष्यकृत वा मनुष्यस्फूर्त आहेत. त्याच्या क्लृप्ति प्रमाणहीन असल्यानें त्यास सनातन धर्म, शाश्वत सत्य असे म्हणता येत नाही." तेव्हा परलोक नाही; पारलौकिक जीवन नाही; पारलौकिक असे कोणतेही सुख नाही; त्यासंबंधीची धर्मग्रंथातील सर्व माहिती खोटी आहे· असा पारलौकिक जीवनाबद्दलचा सावरकरांचा सुस्पष्ट दृष्टिकोण आहे. तो किती बुद्धिवादी नि वस्तुनिष्ठ आहे हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

सावरकरांनी दिलेल्या धर्माच्या पहिल्या तीन अर्थांच्या धर्माचे विवेचन आपण आतापर्यंत केलेल्या प्रत्येक अर्थाच्या धर्मप्रकरणी मनुष्याला या जगामध्ये कोणतेही कर्तव्य करण्याची गरज नाही, असे सावरकरांचे स्पष्ट मत आहे. या साऱ्याचा सारांशाने असा अर्थ होतो की, जगाचे जे सृष्टिनियम असतात ते शाश्वत असतात व मनुष्याच्या इच्छेशी वा शक्तीशी त्याचा संबंध नसतो. ते नियम वगैरे मनुष्याच्या शक्तीबाहेरचे असते. सावरकरांच्या भाषेत सांगावयाचे तर "देवानें का होईना पण जे सृष्टिनियम एकदा घालून दिले त्यात देव देखील पुन्हा बदल करु इच्छित नाही." तेव्हा मनुष्याची गोष्ट फारच दूर राहिली. आत्मा, परमात्मा, स्वर्ग, नरक, मोक्ष इ. परलोकासंबंधीच्या गोष्टी या केवळ काल्पनिक व असत्य असून त्यासाठी काहीएक कर्तव्य करण्याची मनुष्याला गरज नाही व तसे काही करणें हे संपूर्णपणे निरर्थक असते, अशी सावरकरांची भूमिका आहे.

मनुष्यकृत धर्म

सावरकरांचे धर्मासंबंधी हे जे विवेचन आहे, ते कोणते तत्त्वज्ञान मांडण्यासाठी केलेले नसून, खरा सनातन धर्म कोणता, हे ठरविण्यासाठी केलेले आहे. हे ठरविण्याचा पहिला हेतू, या सृष्टीमध्ये शाश्वत, अपरिवर्तनीय असे काय आहे, हे ठरविण्याचा आहे. या शाश्वत गोष्टी ठरविण्याचा हेतू, मनुष्याच्या सामर्थ्याचा व शक्तीच्या मर्यादा निश्चित करणे हा आहे. या मर्यादा निश्चित झाल्या म्हणजे

मनुष्याच्या कर्तृत्वाच्या व पर्यायाने कर्तव्याच्याही मर्यादा निश्चित करता येतात. कोणती गोष्ट करणे मनुष्याच्या हातात नाही, त्याच्या शक्तीच्या मर्यादेबाहेर आहे, हे स्पष्ट व निश्चित करणे हाच खरा सनातन धर्म कोणता हे ठरविण्याचा खरा हेतू आहे. दुसरा हेतू, कोणत्या गोष्टी करणे मनुष्याच्या हातात नाही, हे निश्चित झाल्यावर ज्या गोष्टी हातात आहेत अशापैकी कोणत्या गोष्टी करणे मनुष्याला कर्तव्य आहे, हे निश्चित करणे, हा आहे. तेव्हा मनुष्याचे या ऐहिक जीवनातील कर्तव्य कोणते, ते काय करण्यात आहे, ते कशा प्रकारे करता येते व ते कां केले पाहिजे हे स्पष्ट व निश्चित करणे हाच तो दुसरा हेतू आहे. हे सारे विचार तत्त्वज्ञ सावरकरांचे नसून समाजसुधारक सावरकरांचे आहेत, हे लक्षात ठेवले पाहिजे.

जो धर्म कधीही बदलत नाही तो सनातन धर्म व जो धर्म मनुष्याला बदलता येतो, जो त्याच्या इच्छेवर व शक्तीवर अवलंबून असतो तो मानवी धर्म किंवा मनुष्यकृत धर्म होय, असे धर्माचे सावरकरांनी दोन भाग केलेले आहेत. या दुसऱ्या भागातील धर्माबद्दलच सावरकर विचार करीत असतात. धर्म या शब्दाचा जो चौथा अर्थ सावरकरांनी दिलेला आहे तो हाच धर्म होय. या ऐहिक जीवनातील सुखासाठी मनुष्यांनी कोणते नियम पाळावेत, कोणते आचार पाळावेत, या मुख्य मनुष्यधर्माभोवतीच त्यांचे सर्व विचार केंद्रित झालेले आहेत.

सावरकरांचे साहित्यच काय पण संपूर्ण जीवनच या मनुष्यकृत धर्मासाठीच वाहिलेले आहे. त्यांच्या विज्ञाननिष्ठच काय, पण संपूर्ण साहित्याचा अनन्यविषय 'ऐहिक कर्तव्याचे नियम' या अर्थीचा धर्म हाच आहे. जे ऐहिक कर्तव्य मनुष्याला त्याच्या हितासाठी, सुखासाठी व आनंदासाठी करणे भाग आहे याबद्दल सावरकर सतत चिंतन करत असतात. त्यांच्या चिंतनाचा, विचारांचा व कार्याचा 'मनुष्याचे ऐहिक कर्तव्य' हाच अनन्य विषय आहे ! मग ते क्षेत्र धार्मिक असो, सामाजिक असो, वैचारिक असो की राजकीय असो ! साहित्यामध्ये मग ते साहित्य वैचारिक असो की, कथा-कादंबरी-काव्य-नाटकासारखे ललित असो. त्या साहित्यासाठी हाच अनन्य विषय असतो. 'मनुष्याचे हित' हाच त्यांच्या चिंतनाचा, विचारांचा, लेखनाचा, प्रचाराचा व इतर सर्व कार्याचा केंद्रबिंदू होता. आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे मनुष्याचे जे हित विचारार्थ आहे, ते केवळ ऐहिक जीवनातील हित असून, भासमान व सध्यातरी असत्य असणाऱ्या कोणत्याही पारलौकिक वा पारमार्थिक हिताचे अस्तित्व मानायला सावरकर तयार नाहीत, हे समजून घेतले पाहिजे. धर्माविषयीची सावरकरांची ही भूमिका आपण नीटपणे समजून घेतली नाही व सतत लक्षात ठेवली नाही, तर त्यांच्या बुद्धिवादाचा अभ्यास आपल्याला नीटपणे करताच येणार नाही.

सावरकर ऐहिकधर्माचा विचार करतांना ज्याप्रमाणे मनुष्याला केंद्रबिंदु मानतात त्याचप्रमाणे सनातन धर्म वा सृष्टिधर्माचा विचार करतांना सृष्टि वा

निसर्ग, हा त्या विचाराचा केंद्रबिंदु असतो. सृष्टिनियमाचा उपयोग आपल्या ऐहिकहितासाठी करुन घेणे हे मनुष्याचे कर्तव्य असेल तर, त्या सृष्टीचा आणि या मनुष्याचा, त्या सृष्टिनियमाचा नि या मनुष्यहिताचा, जो काही संबंध असेल, त्याची माहिती आपल्याला करुन घ्यावी लागेल. सृष्टीचे सनातन नियमच नाकारले तर मनुष्यहिताचा विचार करता येणार नाही. या सृष्टिनियमाशी मनुष्यहिताचा अन्योन्य संबंध आहे, व तो आपण मानत आलो. फार मोठ्या अंशी मनुष्यहित हे या सृष्टिनियमावर आधारित आहे.

मनुष्याचा नि सृष्टिनियमाचा जो नेमका संबंध आहे तो सावरकरांनी आपल्या बुद्धिवादी पद्धतीने अत्यंत स्पष्टपणे मांडून ठेवला आहे. हा संबंध निश्चित करण्याच्या सोयीसाठी सावरकरांनी विश्वाचा देव आणि मनुष्याचा देव, अशा दोन देवाची योजना केलेली आहे. बीजगणितामध्ये 'क्ष' आणि 'य' या द्विवर्गाची योजना करुन किंवा भूमितीमध्ये 'क्ष' आणि 'य' अशा दोन अक्षांची आखणी करुन, ज्याप्रमाणें हव्या असणाऱ्या गणिताचे नेमके व सहजपणें उत्तर सापडते किंवा हव्या त्या क्षेत्राचे मापन व सीमारेषा निश्चित करता येतात, त्याचप्रमाणें या दोन काल्पनिक देवाची योजना करुन सृष्टि व मनुष्यांत असलेला, किंबहुना मनुष्याच्या मनात असलेल्या अत्यंत गुंतागुंतीचा व गूढतत्त्वज्ञानाचा विषय झालेला परस्परसंबंध, अगदी कुशलतेने, पण अगदी स्पष्टपणे सावरकरांनी दाखवला आहे.

या विश्वाची दोन भागात मनुष्य कशी विभागणी करतो हे सांगताना सावरकर म्हणतात, [१३] " सुरुप आणि कुरुप, सुगंधी आणि दुर्गंधी, मंजुळ आणि कर्कश, मृदुल आणि कठोर, प्रिय आणि अप्रिय, चांगले आणि वाईट, दैवी आणि राक्षसी, ही सगळी द्वंदे, मनुष्य हा ह्या यच्चयावत् विश्वाचा, वस्तुजातांचा केंद्र कल्पिल्यामुळेच, मध्यबिंदु समजला जाताच, अकस्मात उत्पन्न होतात. मनुष्यास जो सुखद तो विश्वाचा एक भाग, मनुष्यास जो दुःखद तो दुसरा. पहिला चांगला, दुसरा वाईट " स्वतःच्या हिताच्या मापानी मनुष्य जेव्हा या विश्वाची उपयुक्तता, बरे-वाईटपणा मोजतो, तेव्हा विश्वाचे वरीलप्रमाणे दोन भाग पडतात, असा निष्कर्ष काढला जाणे अपरिहार्य आहे, असे सावरकरांना वाटते.

मनुष्याची अशी भावना असते की, हे जे विश्व आहे, ते देवाने मनुष्याच्या सोयीसाठी, हितासाठी व सुखासाठी निर्माण केले आहे. मनुष्याच्या हिताची व सुखाची संपूर्ण काळजी हा देव घेत असतो, व त्यानुसार सृष्टीचे नियम ठरवतो व तसे परिणाम घडवून आणतो. अशा देवाला सावरकर मनुष्याचा देव असे म्हणतात. तथापि, या विश्वाचे असे कितीतरी नियम आहेत की, जे मनुष्याला सोयीचे व हितकारक नाहीत. या विश्वात अशा अनेक घटना प्रत्यही घडत असतात की, ज्या मनुष्याला क्लेशदायक, हानिकारक व दुःखदायक असतात. हे जे मनुष्याला प्रतिकूल असणारे विश्व आहें, त्याचा निर्माता जो देव तो काही

मनुष्याचा देव असण्याची शक्यता नाही, कारण मनुष्याचा देव हा मनुष्याला दुःख देणारे काही करणारा नसतो. ते हा मनुष्याला सुख व दुःख दोन्हीही देणारे, हित व अहित करणारे, अनुकूल व प्रतिकूल असणारे जे नियम व त्यानुसार घडणाऱ्या घटना, ज्या विश्वात घडतात, ते विश्व ज्या देवानी तयार केले तो विश्वाचा देव आहे. मनुष्याचा देव मनुष्याच्या हिताचीच तेवढी काळजी करतो, विश्वाचा देव मात्र मनुष्याच्या हिताला समोर ठेवून काहीही करत नसतो. देवाच्या स्वरुपाबद्दल सावरकरांनी केलेले हे विवेचन नसून, त्या देवाच्या हेतूबद्दल आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. देवानी असा कोणताच हेतू समोर ठेवून हे विश्व तयार केलेले नाही. या विश्वाच्या निर्मितीमागे कोणता हेतू नाही, निदान तो आज ज्ञात नाही. मनुष्य हित करण्याचा हेतु तर निश्चितच नाही, असे सावरकरांचे सुस्पष्ट मत आहे.

या विश्वाचा हेतु काय, हा एक नेहमी उपस्थित होणारा प्रश्न असतो. या विश्वाचा हेतूचे मनुष्याला ज्ञान नाही, असे सावरकरांचे मत आहे. हे मत पारंपारिक अर्थाने एका नास्तिकाचे आहे, हे उघड आहे, "कोणत्या हेतूने वा हेतुवाचून हे जगड्व्याळ विश्व प्रेरित झाले आहे, हे मनुष्याला तर्किता देखील येणे शक्य नाही"[१४] असे त्यांना वाटते. तारकास पाहून या कवितेतही त्यांनी हाच विचार व्यक्त केला आहे. कोणत्या हेतूनी हे विश्व फिरत आहे, हे आम्हाला कळत नाही म्हणून तुम्हांला पुसतो, असे त्यांनी तारकास उद्देशून म्हटले आहे. विश्वविषयक सिद्धांत मांडणाऱ्या कोणत्याही तत्वज्ञानावर सत्य म्हणून विश्वास न ठेवणाऱ्या सावरकरांचे विश्वाच्या हेतूबद्दल वेगळे मत असण्याची शक्यता नसते. जो पर्यंत एखादी गोष्ट वैज्ञानिक पद्धतीने सिद्ध होत नाही, तोवर त्या गोष्टीवर विश्वास ठेवायचा नाही, या सावरकरांच्या बुद्धिवादाचा हा अपरिहार्य परिणाम आहे. "देवाने हे सारे विश्व मनुष्यास मध्यबिंदु कल्पून केवळ मनुष्यांच्या सुखासाठीच निर्मिले आहे, ही भावना अगदी भाबडी, खुळी आणि खोटी आहे"[१५] असे त्यांनी अगदी स्पष्टपणे म्हटले आहे. जगातील कोणत्याही तत्वज्ञानानुसार व धर्मानुसार ही भूमिका म्हणजे एक पाखंड ठरते हे स्पष्ट आहे.

या विश्वाच्या पुढे मनुष्य व त्यांचे हित ही किती तुच्छ गोष्ट आहे, याचे मर्मभेदी वर्णन करताना सावरकर म्हणतात,[१६] "जशी कीड, मुंगी, तशाच ह्या अनादि अनंत कालाच्या असंख्य उलाढालीत, हा मनुष्यही एक अत्यंत तुच्छ परिणाम होय. त्याला खायला मिळते म्हणून धान्य उगवत नाही, फळे पिकत नाहीत, कोथिंबीर खमंग झालेली नाही. धान्य पिकते म्हणून तो खावू शकतो, इतकेच काय ते. पृथ्वीवर जेव्हा नुसत्या प्रचंड सुसरीच सुसरी नांदत होत्या नि मनुष्याचा मागमूसही नव्हता, तेव्हाही नद्या वाहतच होत्या, झाडे फुलत होती, वेली फुलत होत्या. मनुष्यावाचूनच काय पण, पृथ्वी नव्हती तेव्हाही हा सूर्य असाच आकाशात भटकत फिरण्यास भीत नव्हता, आणि हा सूर्यही जरी त्याच्या साऱ्या ग्रहोपग्रहा सुद्धा हरवला तरी, एक काजवा मेला तर पृथ्वीला जितके चुकलेले वाटते तितके

देखील या सुविशाल विश्वाला चुकलेसे वाटणार नाही. विश्वाच्या देवाला एक पलाचेही सुतक, असे शंभर सूर्य एखाद्या सायीत एका दिवसात जरी मरु लागले तरी, धरावे लागणार नाही." सावरकरांचे हे विचार कोणत्याही धार्मिक मनुष्यास क्षणभरही सहन होणार नाहीत, इतके विदारक व भेदक आहेत. असले भयानक सत्यदर्शन सावरकरांचा तर्ककर्कश व भावनाशून्य बुद्धिवादच उभे करु शकते.

सारा योगायोग

विश्वाच्या देवाच्या दृष्टीने अत्यंत तात्पुरत्या व तुच्छ असणाऱ्या मनुष्याने या देवाबद्दल कोणती भावना ठेवावी, याबद्दल सावरकर म्हणतात[१७] "तरी देखील ज्या कोणत्या हेतूने वा हेतूवाचून ही विश्वाची प्रचंड जगद्व्याळ चालू आहे, तीत एक अत्यंत तात्पुरता नि अत्यंत तुच्छ परिणाम म्हणून का होईना, पण मनुष्याला, त्याच्या लांबीरुंदीच्या मापाने मोजता यावे, इतकें नि इतक्या सोयी उपभोगिता येतात, हा मात्र आणि एवढाच काय तो विश्वाचा देवाचा मनुष्यावर झालेला उपकार होय! मनुष्याला या जगात जे सुख मिळू शकते तेवढेही मिळू न देण्यासारखीच जर या विश्वाची रचना त्या विश्वाच्या देवानें केली असती तर, त्याचा हात कोण धरणार होता? हे सुगंध, हे सुस्वर, हे सुख स्पर्श, हे सौंदर्य, हे सुख, ह्या रुचि या सोयी आहेत, त्याही अमुप आहेत. ज्या योगायोगानें मनुष्यास या सर्व लाभत आहेत, त्या योगायोगाला शतशः धन्यवाद असोत! ज्या विश्व-शक्तीनी कळत न कळत असा योगायोग जुळवून आणला, त्यांना त्या अंशापुरते मनुष्याला देव म्हणून संबोधण्याचे समाधान आपल्याला उपभोगता येईल, उपकृत भक्तीचे फूल वाहून त्याला पुजिताही येईल." सावरकरांच्या प्रखर बुद्धिवादा-बरोबरच त्यांच्या कृतज्ञताबुद्धीचेही एक दर्शन आपल्याला इथे होऊन जाते. या विश्वाच्या हेतूसंबंधी आस्ति वा नास्तिपक्षी काहीही न सांगता, या विश्वात जे काही मनुष्याला सुखकारक आहे, त्या योगायोगाच्या गोष्टी आहेत, असे सावरकर म्हणतात. ते जे धन्यवाद देत आहेत ते कुणाच्याही हातात नसणाऱ्या या योगायोगाला होत. मनुष्याला सुखकारक गोष्टी या विश्वात असणे हा जसा योगायोगाचा भाग असतो, तसेच दुखःकारक गोष्टी असणे हाही योगायोगाचाच भाग असतो. ज्या गोष्टीचा कार्यकारणभाव जाणता येत नाही, त्या गोष्टी योगा-योगाच्या आहेत, हाच निष्कर्ष काढणे खऱ्या बुद्धिवाद्याला भाग असते. मनुष्याला सुख देणाऱ्या या योगायोगाला किंवा ज्या शक्तीनी हा योगायोग जुळून आला त्या अज्ञात शक्तीला जर कुणाला मनुष्याचा देव म्हणायचे असेल तर त्याला सावरकरांची हरकत नाही. याचा सरळ अर्थ असा आहे की, देव मानायचा तर तो सत्य म्हणून नव्हे तर, मनाच्या समाधानासाठी एक सोय म्हणून मानावा, असे सावरकरांचे मत आहे. अशा मनाच्या समाधानासाठी मनाने निर्मिलेल्या देवाला असेच उपकृत भक्तीचे समाधान लाभावे म्हणून मनुष्यानी पुजण्यास, फूल वाहण्यास

सावरकरांची हरकत नाही. मात्र या विश्वाच्या देवाशी यापेक्षा अधिक संबंध ठेवण्याची लचाळ हाव मनुष्यानें अजिबात सोडून द्यावी, असा गंभीर अिषारा ते लगेच देवून ठेवतात. चांगले करतो म्हणून, सुख देतो म्हणून त्याची पूजा मांडायची तर तोच देव आपले तितकेच वाईट करतो, दुःख देतो म्हणून त्याला शिक्षा करावयास नको काय, असा परखड सवाल सावरकर करतात. या दोन्हीही भावना देवाच्या ठिकाणी अनाठायी, असमंजस, व असत्य आहेत, असे बुद्धिवादी सावरकरांचे स्पष्ट मत आहे.

देवाची खरी पूजा

या विश्वाच्या देवाची पूजा करणें हे मनुष्याचे ऐहिक कर्तव्य आहे, हे सावरकरांना मान्य नाही. अशी पूजा जर कोणी करणार असेल तर मनुष्याच्या उपजत कृतज्ञता बुद्धीच्या भूमिकेतून काही मर्यादेपर्यंत त्या पूजेकडे सावरकर दुर्लक्ष करायला तयार आहेत, इतकेच खरे आहे. या विश्वाच्या देवाची मनुष्यानी करावयाची खरी पूजा, सावरकरांच्या मते वेगळीच आहे. या विश्वाचे, विश्वाच्या नियमाचे होईल तेवढे ज्ञान करुन घेणे; त्याचा मनुष्य जातीच्या हिताला नि सुखाला कसा उपयोग होईल याचा विचार करणे, व प्रत्यक्ष उपयोग करणे, एवढेच मनुष्याच्या हातात आहे व तेच मनुष्याचे कर्तव्य आहे, असे त्यांचे म्हणणे आहे. ते म्हणतात, "१८ " विश्वात आपण आहोत, पण विश्व आपले नाही; फार थोड्या अंशी ते आपणास अनुकूल आहे; फार मोठ्या अंशी ते आपणास प्रतिकूल आहे. असे जे आहे ते नीटपणे, धीटपणे समजून घेवून त्याला बेधडकपणे तोंड देणे हीच खरी माणुसकी आहे! आणि विश्वाच्या देवाची खरीखरी तीच पूजा!" सावरकरांच्या बुद्धिवादाचे मुख्य सारच या त्यांच्या विचारात आलेले आहे, असे म्हटल्यास चूक होणार नाही. सावरकरांची देवाविषयीची, देवाच्या पूजेविषयीची बुद्धिवादी भूमिका आपल्याला येथे दिसून येते. आपण व्यवहारात ज्याला देव म्हणतो त्या देवाशी सावरकरांच्या देवाचे कसलेही साम्य नाही. अज्ञात गोष्टीला योगायोगाला दिसलेले ते एक पर्यायी नांव आहे. सावरकरांची देवावर श्रद्धा होती याचा अर्थ या योगायोगावर श्रद्धा होती, असा होतो. आपण व्यवहारात ज्याला देवाची पूजा म्हणतो, त्याचे सावरकर म्हणतात त्या देवाच्या पूजेशी कसलेही साम्य नाही. पारंपारिक शब्दाचा वापर करत आपले बुद्धिवादी विचार सावरकर कसे मांडतात, हे यावरुन आपल्याला लक्षात येईल. विश्वातील अनुकूलतेचा उपयोग करीत, प्रतिकूलतेशी टक्कर देणे, प्रतिकूलतेचे अनुकूलतेत रुपांतर करणे, हीच सावरकरांना देवाची खरी पूजा वाटते. बाकीच्या पारंपारिक अर्थाच्या पूजा या देवाला समजतच नसतात व परिणामाच्या दृष्टीने निरर्थक असतात, अशी सावरकरांची सुस्पष्ट भूमिका आहे.

मनुष्याचे कर्तव्य किंवा त्या कर्तव्याचे नियम या चौथ्या अर्थी जो धर्म आहे,

तोच खराखुरा मनुष्यधर्म आहे व तो वस्तुनिष्ठ व प्रत्यक्षनिष्ठ असा धर्म आहे. विश्व निर्माण करणाऱ्या कोणत्याही देवापासून हा धर्म मुक्त आहे. देवाचा या धर्माशी कोणताही संबंध पोचत नाही. मनुष्याचे, मनुष्य जातीचे ऐहिकहित पाहूनच या अर्थीचा धर्म बदलला पाहिजे. जे जे मनुष्याला उपयुक्त, सुखदायी, हितकारक व आनंददायी असते, या चांगल्यासाठीच मनुष्याचा हा धर्म आहे. हा धर्म निष्ठेने आचरणे हेच मनुष्याचे जीवन कर्तव्य आहे, अशी सावरकरांची भूमिका आहे. इतर अर्थांच्या सर्व धर्माला बाजूला सारुन सावरकरांचा बुद्धिवाद या ऐहिक कर्तव्य या अर्थीच्या मनुष्यधर्माचाच विचार करतो.

सावरकरांना धर्मात श्रद्धा होती का नाही हा विषय अभ्यासकासमोरचा एक प्रश्न असतो. सावरकरांचे भक्त आणि विरोधक या दोघाच्याही समोर हा प्रश्न उपस्थित होत नसतो. सावरकर आणि धर्मश्रद्धा याचे अतूट नाते गृहीत धरुनच ही दोन्हीही मंडळी विचार करतात. त्यांचा हा निष्कर्ष अगोदरच पक्का असतो. कुणी प्रश्न उपस्थित केलाच तर या निष्कर्षाला ते पुरावे देवू लागतात. अगोदर निष्कर्ष नि नंतर पुरावे अशी ही पद्धत असते. या पुराव्यामध्ये धर्म या शब्दाच्या आपापल्या सोयीप्रमाणे केलेल्या मनःपूत व्याख्येचा समावेश असतो. एका व्याख्येप्रमाणे सावरकर धर्मनिष्ठ ठरत नसतील तर अन्य दुसऱ्या वा तिसऱ्या व्याख्येनुसार ते तसे कसे ठरतात हे सांगण्याचा त्यांच्या अनुयायांचा प्रयत्न असतो. तेव्हा आपल्या समोरचा प्रश्न नीट समजून घेण्यासाठी धर्माचे विविध अर्थ आपल्याला पाहावे लागतात. सावरकरांनीच आपल्या शब्दात हे देवून आपले काम सोपे करुन ठेवलेले आहे. मनुष्याचे ऐहिक कर्तव्य या अर्थीच्या ज्या धर्मात त्यांना श्रद्धा आहे, तो धर्म कोणत्याही धर्मग्रंथात सांगितलेला नसतो, हे समजून घेतले पाहिजे. हा कोणता धर्मग्रंथीय धर्म नव्हे. हा प्रत्यक्षनिष्ठ व्यवहाराचा धर्म आहे. कोणत्या धर्मग्रंथात हा धर्म अगोदरच सांगून ठेवलेला असतो, यावर सावरकरांचा विश्वास नाही. या सावरकरांच्या धर्माला धर्मग्रंथ नाही, हे नीट समजून घेतले पाहिजे. सावरकरांचा हा धर्म पूर्णपणे बुद्धिवादी आहे, यांचे वेगळे स्पष्टीकरण करण्यांची गरज पडू नये, इतकी ही गोष्ट निःसंदिग्ध आहे, असे आम्हास वाटते.

मनुष्याचे ऐहिक व पारलौकिक कल्याण साधतो तो धर्म, हो धर्माची व्याख्या सावरकरांना मान्यच आहे. यातील पारलौकिक सुख ही कल्पना सत्याभास असल्यामुळे या सुखाबद्दल सावरकर विचार करायला तयार नाहीत. पारलौकिक सुख म्हणजे ऐहिक सुखच होय, असे समीकरण ते मांडतात. समाजाचे धारण करतो तो धर्म ही व्याख्याही त्यांना मान्य आहे. हाही धर्म त्यांच्या मते ऐहिकच धर्म होय. धर्माची कोणतीही व्याख्या घेतली तरी सावरकर ऐहिकाहितावरच म्हणजे प्रत्यक्ष अनुभवास येणाऱ्या हितावरच येवून स्थिर होतात. आणि सर्वात पायाभूत नि महत्वाचा प्रश्न हा आहे की, हा धर्माचा आधार किंवा उगमस्थान कोणते? या धर्माचा तपशील कुणी ठरवायचा? धर्मग्रंथात तो अगोदरच सांगून ठेवलेला

आहे; आपल्यासारख्या सामान्य मनुष्यांना त्यातील आदेशाचे पालन करुन हित करुन घेणे एवढेच बाकी आहे, ही सर्वच धर्मग्रंथाची एकमुखी भूमिका असते. सावरकर ही भूमिका मानायला तयार नाहीत. मनुष्याचे आजचे ऐहिक हित हे आजच्या विद्यमान परिस्थितीच्या संदर्भात बुद्धीच्या आधारे आम्ही ठरविणार, ही सावरकरांची बुद्धिवादी भूमिका आहे. ही भूमिका स्वीकारली म्हणजे धर्माला धर्मग्रंथाचा असलेला आधारच संपतो.

या आधारमूल्य काढून घेतलेल्या जगातील सर्वच धर्मग्रंथाविषयी सावरकरांना काय वाटते, हे पुढील प्रकरणात आपल्याला पाहावयाचे आहे.



२. धर्मग्रंथाविषयी भूमिका

सावरकरांचा धर्माविषयीचा दृष्टीकोण आपण समजून घेतला. त्यांची धर्मग्रंथाविषयाची भूमिका आपण आता समजून घेवू. धर्माचे आपण कितीही शक्य असलेले अर्थ केले तरी, व्यवहारात कोणत्यातरी धर्मग्रंथात सांगितलेला असतो तो धर्म, असाच धर्माचा अर्थ घेतला जातो. धर्मग्रंथाला सोडून आपण व्यवहारात धर्माचा विचारच करु शकत नाही. जगातील प्रचलित प्रत्येक धर्माला आधारभूत असा एक किंवा एका पेक्षा अनेक धर्मग्रंथ असतात. अशा धर्मग्रंथावरुन विविध धर्म ठरविले जातात. या धर्मग्रंथांचा कर्ता कोण हा एक मुख्य प्रश्न असतो. प्रत्येक धर्माचे एका मुद्द्यावर एकमत असते की, त्याच्या धर्मग्रंथकर्ता प्रत्यक्ष ईश्वर आहे. आमचा धर्मग्रंथ ईश्वरीय आहे, अपौरुषयेच आहे, अशी प्रत्येक धर्मियाची ठाम श्रद्धा असते. हे 'ईश्वर' नावाचे काय प्रकरण आहे हे अगोदरच आपण समजून घेवू.

ईश्वराचे प्रकरण

'ईश्वर' नांवाचे वा शक्तीचे फार मोठे प्राबल्य मनुष्याच्या मनावर आहे; ही एक वस्तुस्थिती आहे. मनुष्याच्या मनोव्यापारावर, विचारचक्रावर व एकंदर जीवनक्रमावर 'ईश्वर' ही शक्ति फार मोठा प्रभाव सतत गाजवत आलेली आहे. या प्रभावाखाली मनुष्य वावरत असतो, ही एक वस्तुस्थिती आहे. ही वस्तुस्थिती विचारात घेऊन मनुष्याच्या कर्तव्याचे विवेचन केले पाहिजे.

'ईश्वरा' बद्दल तात्विक विवेचन सावरकर कुठेही करत नाहीत. मनुष्याच्या ऐहिक कर्तव्यासंबंधीचा एखादा प्रश्न उपस्थित झालाच तर तेवढ्यापुरते गरजेनुसार ईश्वर या गोष्टीसंबंधी सावरकर विचार मांडतात. 'विश्वाचा देव आणि

मनुष्याचा देव' हा त्यांचा लेख असाच आहे. या लेखाचा हेतु, मांडणी व रचना देव या गोष्टीची तात्विक चिकित्सा करण्यासाठी केलेली नाही. देवाचा मनुष्याच्या प्रत्यक्ष जीवनाशी कोणताही बादनारायण संबंध नाही, हे सांगण्यासाठी हा लेख लिहला आहे. मनुष्याच्या कर्तव्याची रुपरेषा निश्चित करावी व या कर्तव्यापासून ईश्वराची पूर्णपणे फारकत करावी, हा या लेखाचा हेतु आहे.

मुख्य प्रश्न ईश्वर नांवाची जी शक्ति आहे, ती मनुष्याच्या जीवनावर कसा प्रभाव गाजवते, त्या प्रभावाचे मानवी जीवनावर काय परिणाम होतात, हे पाहणे हा आहे ! सावरकरांनी आपल्या भेदक बुद्धिवादी दुष्टिकोणातून या प्रश्नाचे एक स्वरुप किती भयानक आहे, विदारक आहे, मनुष्याच्या अधःपतनाला कारणीभूत झालेले आहे, हे दाखवून दिले आहे. ईश्वर आहे कां नाही, त्यांचे स्वरुप काय, यांत सावरकरांना रस नाही. मानवी जीवनावर या ईश्वराचे काय परिणाम होतात याचा वेध घेणे व त्याच्या संदर्भात हित समोर ठेवून मनुष्याचे धोरण व कर्तव्य निश्चित करणे, हा सावरकरांच्या चिंतनाचा खरा विषय आहे.

सावरकरांच्या मते ईश्वराचा वैज्ञानिक दृष्टीने अद्याप शोध लागायचा आहे व सध्यातरी तो गृहितावस्थेत किंवा प्रयोगावस्थेत आहे. परिणामतः सध्यातरी ईश्वर आहे कां नाही याबद्दल काहीही निश्चित सांगता येत नाही, अशी त्यांची डोळस बुद्धिवादी भूमिका आहे. प्रत्यक्ष व्यवहारात या भूमिकेचा अर्थ ईश्वराचे अस्तित्व असत्य आहे, असा होतो. चिंतनाच्या व तत्वचिकित्सेच्या क्षेत्रात या भूमिकेचा अर्थ, चिंतन व चिकित्सा करण्यासारखा हा विषय आहे, असा होतो. ईश्वराचे संशोधन शास्त्रीय पद्धतीने करण्यास कोणत्याच खऱ्या विज्ञाननिष्ठ वा बुद्धिवादी माणसाचा विरोध असण्याचे कारण नसते. जिथे ईश्वराच्याच अस्तित्वाचाच पत्ता लागायचा आहे, तिथे अशा अस्तित्वाचा पत्ता नसलेल्याने सृष्टि निर्माण केली काय, असा प्रश्न विचारण्यातच अर्थ नसतो. ईश्वराप्रमाणेच हाही प्रश्न प्रयोगावस्थेत आहे, अशी सावरकरांची भूमिका आहे. सावरकर यासंबंधीचा आपला निष्कर्ष कुठेही सांगत नाहीत, हे लक्षात ठेवणे फार महत्वाचे आहे. सावरकर आपल्या लेखनात व बोलण्यात देव, ईश्वर इ. शब्दाचा नेहमी वापर करतात, व अशा वेळेस अशा शब्दामुळे आपली दिशाभूल होऊ नये यासाठी, ही गोष्ट लक्षात ठेवणे अधिक आवश्यक आहे. अशा विचाराच्या माणसाला नास्तिक म्हणायचे, अज्ञेयवादी म्हणायचे का अजून काही म्हणायचे, हा विशेषण वापरण्याचा प्रश्न आमच्या मते गौण आहे. ईश्वराने ही सृष्टि निर्माण केली आहे कां, या प्रश्नाचे उत्तर, कुणीतरी ही सृष्टि निर्माण केलेली असणारच या अर्थी, हे करणारा जो कुणी असेल तोच ईश्वर आहे, असे उत्तर कुणाला द्यायचे असेल तर, त्याला सावरकरांची हरकत नाही; कारण अशा उत्तरातला ईश्वर निव्वळ गृहीत (Hypothesis) अवस्थेतच आहे. गणित सोडविण्यास सुरु करतांना जसे 'क्ष' हे नांव सोईकरिता वापरावे लागते, तसेच हे गृहीत आहे. गणिताचे उत्तर येईपर्यंत हा 'क्ष' गृहिस्थावस्थेतच असतो. असा 'क्ष' म्हणून काहीतरी गृहीत धरायला

सावरकरांची हरकत नव्हती, असा याचा अर्थ आहे. अशा निव्वळ गणिताच्या वा प्रयोगाच्या सोईसाठी म्हणून योजिलेल्या कल्पित 'क्ष' ला अंतिम उत्तरापर्यंत कोणतेही विशिष्ट मूल्य देता कामा नये, हा बुद्धिवादी विवेक मात्र पाळला गेला पाहिजे, याबद्दल सावरकरांचा आग्रह आहे. हा विवेक व्यवहारात मनुष्य पाळत नसतो व ईश्वर विशिष्ट हेतू, इच्छा, भावना व रागलोभासहित मनुष्याच्या यच्चयावत् जीवनावर साम्राज्य गाजवत असतो.

मनुष्याचा देव हा केवळ सृष्टीचीच निर्मिती करुन थांबत नसतो. मनुष्यासाठी साऱ्या गोष्टी निर्माण करुन त्याच्या समोर वाढून ठेवतो. मनुष्यासाठीच सर्व नियम तयार करुन धर्मग्रंथाच्या नांवानी तो ते मनुष्याच्या हवाली करतो. वेगवेगळ्या मानवसमूहाला वेगवेगळे धर्मग्रंथ तो तयार करुन देतो. हे धर्मग्रंथ मनुष्यापर्यंत पोंहचविण्यासाठी धर्मप्रेषिताची तो व्यवस्था करतो. त्या धर्मप्रेषिताला उरलेल्या सर्व सूचना तो देवून ठेवतो. तो सर्वज्ञ असतो व त्याला त्रिकालाबाधित ज्ञान असते व म्हणून सदासर्वकाली मनुष्याला उपयोगी पडेल, असे नियम व आचार तो एकदाच तयार करुन ठेवतो. ते धर्मग्रंथ वा त्यातील नियम वा आचार कुण्याही मनुष्यास बदलता येवू नयेत, अशी तो व्यवस्था करुन ठेवतो. चांगले काय, वाईट काय, हे एकदाच काय ते त्रिकालज्ञानाने सदासर्वकालासाठी ठरवून देतो. या शिवाय हा ईश्वर मनुष्याच्या जीवनाच्या इतर भागावर जो प्रभाव गाजवतो तो वेगळाच आहे. या प्रभावाचे मानवी जीवनावर अनेक अनुकूल-प्रतिकूल असे परिणाम होतात. एखाद्याने ईश्वराचे अस्तित्व मानले काय किंवा न मानले काय, हा प्रभाव, हा परिणाम ही वस्तुस्थिती म्हणून कायमच असते. ईश्वराविषयीची स्वतःची वैयक्तिक भूमिका बाजूला ठेवून ही वस्तुस्थिती उघड्या डोळ्यानी पाहणे, मनुष्याच्या हिताचा विचार करणाऱ्या प्रत्येक बुद्धिवाद्याला भागच असते.

ज्या ईश्वरावरच सावरकरांचा विश्वास नाही, त्या सध्यातरी असत्य व भासमान असणाऱ्या ईश्वराने एखादा धर्मग्रंथ लिहला आहे, यावर त्यांचा विश्वास असण्याची शक्यता अर्थातच नसते. जगातील प्रत्येक धर्मग्रंथ हा निव्वळ मनुष्यकृत असून त्याचा ईश्वराशी संबंध नाही, हीच भूमिका सावरकर घेणार हे उघड आहे. सावरकरांच्या बुद्धिवादाचे वैशिष्ठ्य यात नाही. ते ही गोष्ट ज्या पद्धतीने व ज्या भाषेत मांडतात, त्यात त्यांच्या बुद्धिवादाचे वैशिष्ठ्य आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. मनुष्याच्या जीवनावर धर्मग्रंथाला अपौरुषेय मानण्याचे काय भयानक परिणाम झाले, याचे अत्यंत मर्मभेदक व भावनोच्छेदक चित्रण ते करतात. मनुष्याच्या या श्रद्धेवर ते जेव्हा आपल्या बुद्धिवादाचे शस्त्र चालवतात, तेव्हा केवळ ही श्रद्धाच घायाळ होत नसते, तर शेजारच्या अशा अनंत श्रद्धा घायाळ होत असतात, हेतुतः सावरकर त्या घायाळ करतात. त्यांच्या बुद्धिवादाच्या माऱ्यातून जुन्या श्रद्धातील काय सुटले वा वाचले, हाही संशोधनाचा व अभ्यासाचा विषय ठरावा, इतके हे प्रहार प्रखर आहेत.

धर्मग्रंथीय संस्कृती

धर्मग्रंथ हे ईश्वराने तयार केले आहेत, असे मानून त्या धर्मग्रंथाप्रमाणे वागण्यातून जी संस्कृती तयार होते, त्या संस्कृतीला सावरकर पुरातन संस्कृती म्हणतात. धर्मग्रंथ हे मनुष्यानी तयार केले असे मानून जी मानवी संस्कृती तयार होते, तिला ते आधुनिक किंवा अद्यतन संस्कृती असे म्हणतात. बुद्धिवादाचा प्रचार करण्याच्या सोईकरिता सावरकरांनी मानवी संस्कृतीचे असे दोन भाग केलेले आहेत. 'दोन शब्दात दोन संस्कृति' या आपल्या निबंधात त्यांनी या संबंधीचे विचार अतिशय स्पष्टपणे मांडले आहेत. सावरकरांच्या बुद्धिवादाची प्रखरता लक्षात येण्यासाठी त्यांच्याच शब्दात व भाषेत त्यांचे विचार मांडणे उचित ठरेल. ते म्हणतात,[१] "जे जे धर्मग्रंथ अपौरुषेय म्हणून समजले गेले, त्याच्यात सामावलेली संस्कृतीही सहजच अपरिवर्तनीय समजली जाते. आणि जे लोक त्या धर्मग्रंथाची सत्ता आपल्यावर चालू देतात, ते श्रुतिस्मृतिपुराणोक्ताचे, त्या पुरातनाचे बंदे गुलाम होऊन बसतात. त्या धर्मग्रंथाच्या चाकोरीबाहेर त्यांना पाऊलही टाकता येत नाही. हे धर्मग्रंथ जेव्हा प्रथम रचले जातात, तेव्हा बहुधा ते कोणतीतरी एक सुधारणा घडवून आणण्यासाठीच रचलेले असतात, तरी आपल्या स्वतःभोवती, ईश्वरी आज्ञेची प्रभावळ मिरवून आपल्या शब्दास अपरिवर्तनीय, कधीही न बदलणाऱ्या विधिनिषेधाचे स्वरुप ते देत असल्यामुळे लवकरच भावी सुधारणेचे कट्टेशत्रू बनतात. त्यांच्या दोन पुठ्ठ्याच्या आंत सारे विश्व, सारा काल डांबून ठेवण्याचा वेडगळ अट्टाहास जरी ते करतात, तरी सदाचंचल, सदानवीन, अदम्य आणि अमोघ निसर्गशक्ती आणि कालगति त्या धर्मग्रंथाच्या दोन पुठ्ठ्याच्या आंत नित्याची थोडीच डांबून राहते! ईश प्रेषिताची वा प्रत्यक्ष ईश्वराची मनगंठत सही ठोकून जरी हे धर्मग्रंथ प्रकाशलिले असले तरी, भूकंप, ज्वालामुखी, जलप्रलय नि वज्राघात यांना या पोथ्याच्या ताडपत्री परचुंडीत गुंडाळून ठेवण्याचा त्यांचा सारा यत्न फोल ठरतो. एखादा भूकंप त्यांच्यातील भूगोलास मडक्यातील उतरंडीसारखा सहज कोलमडून देतो. त्यांच्या अत्यंत पवित्र नद्यास ज्वालामुखी एका घोटासारखा गट्कन गिळून टाकतो. ठाऊक नसलेल्या खंडाचा पत्ता लागतो आणि त्यांना ठाऊक असलेली खंडेच्या खंडे बेपत्ता होतात. ईश्वराच्या नांवाने जरी हे ग्रंथ अवतीर्ण झालेले असले तरी त्याच्या शब्दाची पत राखण्याची ईश्वरास लवलेश आवश्यकता वा आवड असल्याचे वा ईश्वरी उत्पातावरुन दिसत नाही."

सावरकर धर्मग्रंथ हे अपौरुषेय मानत नाहीत, एवढ्या विधानाने सावरकरांच्या बुद्धिवादाची प्रखरता आपल्या लक्षात येत नाही, की जी हीच गोष्ट ते ज्या भाषेत मांडतात ती पाहिली असता आपल्या लक्षात येते. मनुष्यकृत धर्मग्रंथ हा विश्वाच्या दृष्टीने एक अत्यंत तुच्छ परिणाम आहे व तो विश्वाच्या खिजगणतीतही नाही, ही त्यांची स्पष्ट भूमिका आहे. कोणत्या एखाद्या धर्मग्रंथातील चांगला

तेवढा भाग हळूच बाजूला काढून उरलेल्यावर प्रहार करणाचा प्रकार सावरकर करत नाहीत, त्यांच्या बुद्धिवादाचे शस्त्र धर्मग्रंथाच्या मूळ प्रवृत्तीवरच चालत असते व यातून जगातील कोणत्याही धर्मग्रंथाला ते अपवाद करायला तयार नसतात, हे लक्षात घेतले पाहिजे. विश्वाच्या नि कालाच्या पुढे या तथाकथित धर्मग्रंथाचे काय हाल होतात हे याचे विदारक वर्णन करतांना सावरकर पुढे म्हणतात,[२] " प्रकृति आणि काल ही अशा स्वतःस अपरिवर्तनीय आणि त्रिकालाबाधीत समजणाऱ्या धर्मग्रंथाच्या ताडपत्राचा चुराडा उडवीत सारखा स्वच्छंद धिंगाणा घालीत असतो. " धर्मग्रंथांना, त्यांत वेदश्रुति स्मृतिआदि हिंदुधर्मग्रंथही आलेच, सावरकर बेदरकारपणे ताडपत्रेंच म्हणतात, हे मात्र काळजीपूर्वक लक्षात ठेवले पाहिजे. 'श्रुतिस्मृतिपुराणोक्त' हा स्वतः सावरकरांनीच या निबंधात वापरलेला शब्दप्रयोग आहे. धर्म ग्रंथात सावरकरांना कसलीही श्रद्धा नव्हती, कोणताच धर्मग्रंथ त्यांना प्रमाण वाटत नव्हता, ही गोष्ट त्यांच्या ह्या विचारावरुन स्पष्टपणे लक्षात येते. धर्मग्रंथात कसलीही श्रद्धा नसल्याविना, श्रद्धा व भावनाशी निगडित असणाऱ्या धर्मग्रंथाची चिकित्सा असल्या भेदक, व भावनोच्छेदक भाषेत मनुष्य करत नसतो. धर्मग्रंथाची चिकित्सा करण्याची सावरकरांची ही पद्धत त्यांच्या बुद्धिवादाच्या प्रखरतेचा एक स्पष्ट पुरावा आहे.

धर्मग्रंथाकडे पाहण्याचा सावरकरांचा दृष्टिकोण God sent books but how men should read them? या वरील त्यांच्या व्याख्यानांत अतिशय सुस्पष्टपणे व्यक्त झालेला आहे. 'धर्म ही अफूची गोळी आहे' असे वारंवार सांगणाऱ्या मार्क्सवाद्याला शोभावी अशी भूमिका सावरकरांनी या व्याख्यानात मांडलेली आहे. " डेव्हिड आणि डॉलर ह्यापेक्षा गॉड आणि गॉस्पेल यांच्या नावाखाली अधिक माणसे मानवी इतिहासात ठार मारण्यात आली आहेत, ही एक वस्तुस्थिती आहे" असे सावरकर म्हणतात.[3A] वेद, झेंदावेस्ता, त्रिपिटक, बायबल, कुराण आदी साऱ्या धर्मग्रंथाची ते कठोर चिकित्सा करतात. या बाबतीत यापैकी कोणत्याही धर्मग्रंथामध्ये भेद करायला ते तयार नाहीत. ही सारी पुस्तके ईश्वरोक्त आहेत ही गोष्ट खोटी आहे, हे लक्षात घेऊन ती मानवकृत आहेत असे समजून मानवी बुद्धीने या साऱ्या ग्रंथाकडे पाहण्याचा सावरकरांचा उपदेश आहे. धर्मग्रंथ-चिकित्सेची ही भूमिका पूर्णतः बुद्धिवादी आहे, हे उघड आहे.

सुधारलेली आवृत्ति–अशक्य

आपला असा एक समज असतो की, धर्मग्रंथातील काही विशिष्ट असा भाग सावरकरांना नको असावा. तो नको असणारा भाग वगळून धर्मग्रंथाची सुधारलेली आवृत्ति केली पाहिजे, असे त्यांना वाटत असावे. हा आपला समज कसा खोटा आहे हे त्यांच्या पुढील विचारांवरुन आपल्या लक्षांत येईल. ते म्हणतात[3] " अखंड विकसनशील निसर्ग आणि अनावर काळ ह्यांना तर आळा घालून घेणे

केव्हाही परवडत नाही, सहन होत नाही. साध्या कसरीपासून साध्या पुस्तकाला त्याची नवीन प्रत करुन किंवा सुधारलेली आवृत्ती काढून एक वेळ चिरकाल सुरक्षित ठेवता येईल; पण काळाच्या कसरीपासून अपरिवर्तनीय अशा धर्मग्रंथाचे सर्वकाळ रक्षण करणे प्रत्यक्ष देवदूतासही शक्य नाही. काळाची कसर त्या अपरिवर्तनीय धर्मग्रंथाची नुसती पानेच खात नाही तर त्यातील अर्थासच कुरतुडून नुसती चाळण करुन सोडते! त्यामुळे त्याची नवी प्रत केली तरी ती निरर्थकच होते; आणि अपरिवर्तनीय धर्मग्रंथाची सुधारुन वाढविलेली आवृत्ती काढणे, तर मुळातच असंभवनीय, निषिद्ध असते, तो वदतोव्याघातच असतो." या म्हणण्याचा सरळ अर्थ असा आहे की, काळ बदलला म्हणजे जुन्याकाळचे धर्मग्रंथ हे टाकाऊ होतात; अशा धर्मग्रंथाची नवीन प्रत अर्थहीन असते. धर्मग्रंथाची सुधारलेली आवृत्ति, ही धर्मग्रंथाच्या मूलभूत भूमिकेशीच विसंगत असल्यामुळे, अशक्य असते. धर्मग्रंथाची सुधारलेली आवृत्ति ही संकल्पना सावरकरांना वदतोव्याघात वाटते, हे आपण काळजीपूर्वक समजून घेतले पाहिजे. धर्मग्रंथाच्या सुधारलेल्या आवृत्तीचा अर्थ असा होतो की, त्यातील नव्या काळाच्या संदर्भात टाकाऊ असलेला भाग वगळायचा, उपयुक्त भाग तसाच ठेवायचा, व काळाला अनुरुप असेल असा नवा भाग त्यांत अंतर्भूत करुन, त्या धर्मग्रंथाची सुधारित रचना करायची. ही गोष्ट सावरकरांना अशक्य वाटते. त्यांच्या मते धर्मग्रंथातील सिद्धांताची वाईट व चांगली अशी विभागणी करता येत नसते; असे करणे धर्मग्रंथाच्या मुलभूत भूमिकेशीच विरोधी असते! धर्मग्रंथातील जे काही वाईट वा चांगले असते ते तसे एकत्रित मिळून त्याचा एक अविभाज्य भाग बनत असतो; परिणामतः त्याचे पृथःकरण अशक्य असते. एक तर सर्वच स्वीकारावे लागते किंवा नाकारावे लागते, याशिवाय अन्य पर्याय नसतो. सावरकर यापैकी काय करतात हे त्यांच्याच शब्दात आपण येथे पाहत आहोत. धर्मचिकित्सा सुरु झाली की धर्म नावाची वस्तूच शिल्लक राहात नाही, असे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी जे म्हणतात,[४] त्याचा अर्थ हाच आहे.

धर्मग्रंथातील एखादा भाग वाईट आहे वा अहितकारक आहे व म्हणून तो टाकाऊ आहे, हे एखाद्या सावरकरांसारख्या बुद्धिवाद्याला वाटून उपयोग नसतो; कारण धर्मात श्रद्धा नसणारे पाखंडी लोक असे म्हणतच असतात. ज्या ईश्वराने हे धर्मग्रंथ निर्माण केले त्या ईश्वराला असे वाटले पाहिजे.

स्वतःच निर्माण केलेल्या गोष्टीला वाईट म्हणून कधीच न चुकणाऱ्या ईश्वराने मान्य करणे, म्हणजे स्वतःला ईश्वर नाही हे कबूल करणे असते. ईश्वर हा ईश्वरच नाही, धर्मग्रंथ हे अपौरुषेय नाहीत हे मान्य केल्याविना असे घडत नसते. आणि एकदा धर्मग्रंथ हे ईश्वराने तयार केलेले नाहीत असे कबूल केले की, धर्मग्रंथाचे धर्मग्रंथ म्हणून अस्तित्वच संपते.

धर्मग्रंथाची सुधारलेली आवृत्ती असम्य असो, या सावरकरांच्या निष्कर्षाचा हा अर्थ आहे, हे समजून घेतले पाहिजे.

हिंदु संस्कृति विरुद्ध युरोपियन संस्कृति

सावरकर हे सारे विवेचन हिंदुधर्मग्रंथांना समोर ठेवून करीत आहेत. धर्मग्रंथ अपौरुषेय मानला की, त्या श्रद्धेचा सर्वांत वाईट परिणाम म्हणजे, त्या श्रद्धेतून जन्मास आलेले शब्दनिष्ठप्रवृत्तीचे अपत्य हे होय. हा पुरातन काळचा वारसा अद्यापपर्यंत जिवंत आहे. सावरकरांच्या बुद्धिवादाचा सारा रोख व प्रहार याच प्रवृत्तीवर आहे. याच प्रवृत्तीला सावरकर 'श्रुतिस्मृतिपुराणोक्त' प्रवृत्ति असे खास नांव देतात.

श्रुतिस्मृतिपुराणोक्त प्रवृत्ती ही बुद्धिवादाच्या नेमकी उलटी प्रवृत्ति आहे. सावरकरांचा हा पारिभाषिक शब्द असून हिंदूच्याच नव्हे, तर इतर कोणत्याही धर्माच्या संबंधीच्या शब्दनिष्ठप्रवृत्तीला तो लागू आहे. या प्रवृतीचे स्वरुप स्पष्ट करताना ते म्हणतात,[५] "पण आमच्या हिंदुराष्ट्रांत आजही आमच्या मनोवृत्तीत खोल खोल पाळेमुळे खुपसून जी आमच्या जीवनास व्यापीत फैलावलेली आहे, त्या संस्कृतीचे तसे मुख्य लक्षण जर कोणत्या एका शब्दात सांगावयाचे झाले तर, ते ज्या शब्दांत सांगता येईल, तो शब्द म्हणजे 'श्रुतिस्मृतिपुराणोक्त' हाच होय! अद्ययावत्, अप-टु-डेटच्या अगदी उलट! कोणतीही वस्तु, चाल, धारणी, टूम, ग्रंथ, ज्ञान सर्वोत्कृष्ट का आहे, म्हणून युरोपियनास विचारताच तो जो झटकन एका शब्दांत सांगेल की, ती अद्ययावत आहे म्हणून, तसेच कोणतेही ज्ञान, ग्रंथ, टूम, धारणी, चाल, सुधारणा ग्राह्य कां अग्राह्य, योग्य का अयोग्य, का आहे, हे ठरविताना ती आज उपयुक्त आहे, प्रगतिकारक आहे की नाही, मागच्या-हून सरस, सकस आहे का नाही, हे जवळजवळ मुळीच न पाहता पाहिल्या धडाक्यातच आम्ही बहुधा जे पाहू, जे विचारु, ते हे की, ती श्रुतिस्मृतिपुराणोक्त आहे की नाही! आमच्या संस्कृतीचे अत्यंत लाजिरवाणे भूषण म्हणून आम्ही जे बिरुद मिरवतो ते हे की, वेदांत जे सांगितले आहे, त्याच्यापुढे आम्ही गेल्या दहा पांच हजार वर्षात सामाजिक, राजकीय, वा धार्मिक विधिनिषेधात वा कौशल्यात रतिभरही पुढे सरकलो नाही! युरोप, 'कालच्या पुढे आज गेलो की नाही, प्रत्यही अधिक काही शिकून अधिक शहाणा होत आहे की नाही, बापाहून सवाई निघालोच की नाही!' म्हणून हुंकारीत आहे. आम्ही साध्या 'काल'च्याच तर राहोच, पण ऐहिक 'काल'च्याही पुढे गेलो नाहीच की नाही, गेल्या पांच हजार वर्षांत अधिक शहाणे झालो नाहीच की नाही, असे हुंकारीत आहो! बापाला कळत नव्हते, ठाऊक नव्हते, ते मला कळू लागले तर बापाचे बापपण ते काय राहिले ही आमची भीति! आमचे पूर्वज त्रिकालज्ञानी होते, ही आमची प्रतिज्ञा!.....वेदकाळी ज्या बैलगाडीत बसून

आमची संस्कृती चालली, त्याच बैलगाडीत बसून या आगगाडीच्या युगातही ती र र र करीत चालली आहे. ही आमची श्रुतिस्मृतिपुराणोक्त प्रवृत्ति आजचीच नाही, तर ती त्या श्रुतिस्मृतिपुराणोक्तांच्याही आधीपासून आहे, त्यानंतरची आहे, आजपर्यंत सारखी चालत आली आहे. जन्मापासून मरणापर्यंत, गर्भाधानापासून अंत्येष्टीपर्यंत, जो जो आचार, निर्बंध (कायदा), अभिप्राय, मनुस्मृती सारख्या अगदी प्राचीन आद्यस्मृतीत सांगितला आहे तो तो आचार वा निर्बंध कां हितकर आहे वा आचरणीय आहे याची चिकित्सा करुन नव्हे तर मुख्यतः आणि बहुधा 'ऐषधर्म सनातनः' ही ठाम राजमुद्रा ठोकूनच होय ! ते श्रुतिस्मृतिपुराणोक्त आहे, महाकारण पुढे करुन ! "

सावरकर दोन प्रवृत्तीतून निर्माण होणाऱ्या दोन संस्कृतीची तुलना करत आहेत व त्या संस्कृतीच्या प्रगतीची व अधोगतीची कारणे सांगत आहेत, 'श्रुतिस्मृतिपुराणोक्त' हा शब्द एका संस्कृतीचा आधार आहे, पाया आहे, या भूमिकेतून सावरकर हे विचार मांडत आहेत. या प्रवृत्तीचा उच्छेद झाला तर त्या शब्दनिष्ठ संस्कृतीचा पायाच नष्ट होतो व तो तसा झाला पाहिजे, असे सावरकरांना तीव्रतेने वाटत असते. हिंदुसंस्कृती संबंधीचा सावरकरांचा बुद्धिवादी दृष्टिकोण समजून घेण्यासाठी हे त्यांचे वरील विचार फार महत्वाचे आहेत. सावरकरांना अद्ययावत् संस्कृती हवी होती, की जिचा पाया बुद्धिवाद हा होता, हे समजून घेतले पाहिजे. धर्म, धर्मग्रंथ एवढेच नव्हे तर संस्कृतीचा सध्याचा श्रुतिस्मृतिपुराणोक्तांचा पाया उखडून टाकून त्या ऐवजी त्याचा नवा पाया म्हणून त्यांना बुद्धिवाद हवा होता. या भूमिकेतून सावरकरांच्या या विचाराकडे पाहिले पाहिजे व वरील विचारांचा हाच निष्कर्ष काढला पाहिजे, असे आम्हांस वाटते.

एखादी नवीन गोष्ट करायची की नाही, किंवा जुनी सोडायची की नाही, हे ठरविण्यासाठी " शास्त्राधाराची एरंडाची गुऱ्हाळामागून गुऱ्हाळे विद्वत्परिषदामधून " चालत असतात, असे सावरकरांनी म्हटले आहे.[६] दोन शब्दात दोन संस्कृति कशा व्यक्त होतात याचा निष्कर्ष सांगताना सावरकर म्हणतात,[७] मनुराजर्षीचा तो 'अेषः धर्म सनातनः' शाहू राजर्षीचा 'जुने मोडू नये, नवे करु नये,' आजच्या ब्रह्मर्षीचा हा 'शास्त्राधार आहे काय?' हे तिन्ही गृहस्थ ज्या एका मूळ पुरुषाचे औरसपुत्र आहेत, तो पुरुष म्हणजे 'श्रुतिस्मृतिपुराणोक्त' हाच होय ! खरोखर आमच्या हिंदुसंस्कृतीची पूर्वापार विशिष्टप्रवृत्ती, लक्षण कोणते, महासूत्र कोणते, ते एका शब्दांत, अपवादवजाजाता व्यक्तविणे असेल तर तो शब्द म्हणजे 'श्रुतिस्मृतिपुराणोक्त' हाच होय! आजच्या युरोपियन संस्कृतीचे जे मुख्य लक्षण 'अद्ययावत्' त्याच्या अगदी उलट ! ते पूजक 'आजचे' आम्ही 'कालचे' ! ते नव्याचे, आम्ही 'जुन्याचे' ते 'ताज्या'चे भोक्ते, आम्ही 'शिळ्या' चे ! एकंदरीत पाहता त्यांची संस्कृती अद्ययावती, आमची

पुरातनी "

धर्मग्रंथाकडेच नव्हे तर संस्कृतीकडे सुद्धा पाहण्याची त्यांची दृष्टि किती बुद्धिवादी होती, हे त्यांच्याच शब्दांतील वरील उताऱ्यावरुन स्वच्छपणें दिसून येते. हिंदु संस्कृति पुरातनी आहे, मागासलेली आहे; तर युरोपची संस्कृती अद्ययावती आहे, पुढारलेली आहे– याचा स्पष्ट अर्थ असा आहे की, पहिली वाईट आहे, दुसरी चांगली आहे! पहिली नको आहे, दुसरी हवी आहे; पहिलीला निरोप दिला पाहिजे; दुसरीचे स्वागत केले पाहिजे! कसलाही आडपडदा न ठेवता अगदी स्पष्टपणें सावरकरांनी हे सांगितले आहे, हे आपण समजून घेतले पाहिजे. एक संस्कृती आपली आहे, दुसरी परक्याची आहे, या भेदभावाचा कसलाही स्पर्श न होऊ देता सावरकर युरोपियन संस्कृतीचे, ती बुद्धिवादावर उभारलेली आहे या कारणास्तव, कौतुक व स्वागत करत आहेत, हे आपण मोकळ्या मनानी समजून घेतले पाहिजे 'हिंदु संस्कृति' 'युरोपियन संस्कृति' हे शब्दप्रयोग स्पष्टपणें योजून सावरकर हे सांगत आहेत, हेही लक्षात घेतले पाहिजे. अशा लिहण्याने आपल्याच लोकांचा आत्मविश्वास ढळेल, मनोबलाला धक्का बसेल, तेजोभंग होईल, याची सावरकरांच्या बुद्धिवादाला चिंता वाटलेली दिसत नाही. किंवहुना असे केल्याविना बुद्धिवादाची स्थापनाच करता यायची नाही, अशी त्यांची खात्री आहे.

लौकिक अर्थाने जो धर्म आहे, त्याचा मुख्य आधार धर्मग्रंथ हाच आहे! जगातील सर्व धर्मांची इमारत धर्मग्रंथावर उभारलेली आहे. अशा या अनन्य-साधारण महत्व पावलेल्या धर्मग्रंथाबद्दल सावरकरांचे मत आपण समजून घेत आहोत. धर्मग्रंथ प्रामाण्याला म्हणजे श्रुतिस्मृतिपुराणोक्ताला ते मनुष्याला फसविणारा 'पिंजरा' म्हणतात; ती प्रवृत्ती त्यांना 'बाबावाक्यं प्रमाणं' ची गुलामी वाटते! वेद हा पांच हजार वर्षांपूर्वीचा जुना समजला तर तो पांच हजार वर्ष मागासलेला आहे, असे सावरकरांचे स्पष्ट गणित आहे. या अपरिवर्तनीय शब्दनिष्ठ धर्मग्रंथांनी हजारो वर्षांच्या अडाणीपणास अमर करुन ठेवले आहे, असा त्यांचा निष्कर्ष आहे. या प्रवृत्तीमुळे आपले राष्ट्र मरणाच्या दारात उभे आहे, असा त्यांचा गंभीर आरोप आहे, व यातून वाचायचे असेल तर काय केले पाहिजे, हे सांगताना सावरकर म्हणतात, [८] " यास्तव हिंदुराष्ट्रास ह्या काळाच्या तडाक्यातून वाचायचे असेल तर ज्या श्रुतिस्मृति पुराणोक्ताच्या बेडीने कर्तृत्वाचे हातपाय जखडून टाकले आहेत, ती तोडली पाहिजे. आणि ती सुदैवाने अगदी सर्वस्वी आपल्या इच्छेवर अवलंबून आहे. कारण ही बेडी मानसिक आहे. युरोप चार शतकापूर्वीपर्यंत धर्माच्या अपरिवर्तनीय सत्तेचा असाच दास झालेला होता– आणि त्या पायी आपल्यासारख्या दुर्गतीस पोहचला होता. पण त्याने बायबलास दूर सारुन विज्ञानाची कांस धरताच, श्रुतिस्मृतिपुराणोक्ताची बेडी तोडून अद्ययावत् बनताच, अप-टु-डेट बनताच युरोप गेल्या चारशे वर्षात आपल्या पुढे चार हजार वर्षं निघून गेला! त्रिखंड विजयी झाला! तसे आपल्या भारतीय राष्ट्रास होणे असेल तर,

'पुरातनी' युगाचा ग्रंथ मिटून, ही प्राचीन श्रुतिस्मृति पुराणादि शास्त्रे गुंडाळून आणि केवळ ऐतिहासिक ग्रंथ म्हणून संग्रहालयात सन्मानपूर्वक ठेवून, विज्ञानयुगाचे पान उलटले पाहिजे! त्या ग्रंथाचा 'काल काय झाले?' इतकेच सांगण्यापुरता अधिकार, आज काय योग्य ते सांगण्याचा अधिकार प्रत्यक्षनिष्ठ प्रयोगक्षम विज्ञानाचा! अद्ययावत्पणात मागच्या सर्व अनुभवाचे उपयुक्त ते सारसर्वस्व सामावलेले असतेच; पण श्रुतिस्मृतिपुराणोक्तात अद्ययावत् ज्ञानाचा लवलेशही नसतो. यास्तव अद्ययावत्, अप–टु–डेट बनणेच इष्ट!" धर्मग्रंथाच्या प्रामाण्याविषयी वा आधाराविषयी सावरकराचे हे विचार इतके स्वच्छ व निःसंदिग्ध आहेत की, त्यावर वेगळे भाष्य करण्याची गरज नाही.

धर्मग्रंथाचे स्थान कपाटात

कोणताही धर्मग्रंथ प्रमाण मानू नये, असा त्याचा आग्रह आहे. धर्मग्रंथ प्रामाण्य म्हणजे त्यांना एक बेडीच वाटते. धर्मग्रंथ कपाटात बद करुन ठेवावे, असा त्यांनी निःसंदिग्ध भाषेत सल्ला दिला आहे. आज काय करायचे, हे सांगण्याचा अधिकार धर्मग्रंथाला नाही. अशा ग्रंथाचे मूल्य फक्त एका ऐतिहासिक पुस्तकाचे मूल्य आहे, असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे. यासंबंधी सावरकर म्हणतात, "आम्ही कोणताही ग्रंथ अपरिवर्तनीय आणि त्रिकालाबाधित मानीत नाही. श्रुतिस्मृतिप्रभृति सारे पुरातन ग्रंथ आम्ही अत्यंत आदराने आणि ममत्वानें सन्मानतो; पण ऐतिहासिक ग्रंथ म्हणून. अनुलंघ्य धर्मग्रंथ म्हणून नव्हे! त्यांतील सारे ज्ञान, अज्ञान आजच्या विज्ञानाच्या कसोटीस आम्ही लावणार आणि त्यानंतर आज राष्ट्रधारकास उद्धरणास जे अवश्य वाटेल ते बेधडक आचरणार. आम्ही अद्ययावत् बनणार, अप–टु–डेट बनणार" धर्मग्रंथाना सावरकर 'धर्मग्रंथ' मानायला तयार नाहीत; त्यांना ग्रंथ इतिहासग्रंथ वाटतात हे आपण काळजीपूर्वक समजून घेतले पाहिजे.

मनुस्मृति कालबाह्य व टाकाऊ आहे म्हणून डॉ. आंबेडकरांना ती जाळावी वाटते, तर त्याच कारणासाठी सावरकरांना ती जाळण्याऐवजी कपाटात बंद करुन ठेवावी व पूर्वी काय झाले ते समजण्यासाठी इतिहास म्हणून तो स्मृतिग्रंथ वाचावा असे वाटते – अेवढाच त्या दोघांत फरक आहे, हे आपण काळजीपूर्वक समजून घेतले पाहिजे. मनुष्यानी काय करावे व कसे वागावे, हे सांगण्याचा मनुस्मृतीचा अधिकार दोघांनाही सारख्याच कारणासाठी मंजूर नाही. मनुस्मृतीला प्रमाण मानल्यामुळे काय परिणाम झाले, याबद्दल दोघांचेही एकमत आहे. वादाचा मुद्दा तसा पाहिला तर फारच गौण आहे. मनुस्मृतीचे एकादे पुस्तक जाळता येवू शकते, त्या स्मृतीची सर्वच पुस्तके जाळणे शक्य नसते आणि सगळेच जाळले तरी मनुस्मृति जो विचार मांडते तो विचार कांही तेवढ्यामुळे जाळता येत नसतो. विरोध,

राग व भांडण मनुस्मृतीने निर्मिलेल्या प्रवृतीशी असते, निर्जीव पुस्तकाशी नसते. प्रा. कुरुंदकर म्हणतात [१०] त्याप्रमाणे खरे भांडण मनुस्मृति निर्मिणाऱ्या मनुशीही नसते, तर त्यातील विचार मान्य असणाऱ्या आजच्या काळातील लोकांशी असते. सापाचा विषारी दात काढून टाकला पाहिजे किंवा टाकलेला आहे, या मुख्य मुद्यावर जर एकमत झाले तर त्या उरलेल्या सापाला सोडून द्यावे, पेटाऱ्यात ठेवावे, काठीने मारावे का जाळून टाकावे या मुद्यावरील मतभेद व्यवहारतः परिणाम शून्य असतो. डॉ. आंबेडकर एकटीच मनुस्मृति जाळतात, सावरकर वेद, सर्वच स्मृति, गीतासकट सर्वच हिंदुधर्मग्रंथांना टाकाऊ समजून कपाटात बंद करुन ठेवण्यास सांगतात. मनुस्मृतीप्रवृत्तीचा निषेध म्हणून प्रतिकात्मपणे त्या ग्रंथाचे दहन करणे व त्या निमित्ताने पोथिनिष्ठांच्या मनाला जबरदस्त हादरा-धक्का देणे हा या दहनाचा खरा हेतू होता नि समाजसुधारणेच्या लढचाच्या कार्यक्रमातील एक कार्यक्रम म्हणून ही गोष्ट समजून घेता येण्यासारखी आहे. मात्र समाजसुधारणा करतांना त्यासंबंधीच्या कार्यक्रमाबद्दल मतभेद असणाऱ्यांना बुद्धिवादी असण्याचा हक्क कुणालाही नाकारता येणार नाही. अशा दहनाचे समर्थन करणारे बुद्धिवादी व विरोध करणारे मनुस्मृतीतील विचार मानणारे, अशा ठोकताळचानी कुणाचेही उचित मूल्यमापन आपल्याला करता येणार नाही.

मनुस्मृति दहन

मनुस्मृति जाळावी की नाही हा नेहमीच वादग्रस्त मुद्दा राहिलेला आहे. घातक विचार मांडणारे कोणतेही पुस्तक जाळावे कां नाही, याच सर्वसाधारण वादाचा हा एक भाग आहे. डॉ. आंबेडकरांना मनुस्मृति जाळली, हे कसे योग्य होते, हेच मुख्यतः सांगण्यासाठी प्रा. नरहर कुरुंदकरांनी 'मनुस्मृतिः काही विचार' हा ग्रंथ लिहला आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचेही 'अस्पृश्यता मानणारी मनुस्मृति जाळलीच पाहिजे, याबद्दल संशय नाही' असे मत आहे. [११] तर्कतीर्थांचे म्हणणे चूक आहे असे बुद्धिवादी असणाऱ्या दुर्गाबाई भागवतांना वाटते. प्रत्येक ग्रंथात आजच्याकरिता नको असणारे काहीतरी निषेधार्ह असे असतेच, तेव्हा असे सर्व ग्रंथ जाळत बसायचे काय, असा त्यांचा प्रश्न आहे. त्या म्हणतात, [१२] "माझा आक्षेप जळितावर आहे, कारण जळीत हा हिंसाचार आहे. जे आपल्याला नको ते जाळून टाकणें, हा संस्कृतीचा दंडक नव्हे. आज मनुस्मृती जाळण्यास प्रोत्साहान देणारे उद्याच्या अत्याचारी प्रवृत्तीस खतपाणी पुरवतात." दुर्गाबाई पुढे म्हणतात, "ज्या धर्म कोषाचे संपादक शास्त्रीबोवा आहेत, त्यांतून स्मृति वगळल्या आहेत कय? कुठला वैदिक परंपरेचा ग्रंथ स्मृतींना धरुन नाही? मग ज्या धर्मशास्त्रात या सर्वांचा समावेश होतो तोही कां जाळू नये?... प्लेटोच्या ग्रंथात गुलामगिरीचे समर्थन आहे. आज गुलामगिरी नको म्हणणाऱ्यांनी त्यांचे ग्रंथ जाळायचे कां?" दुर्गाबाई शेवटी इषारा देतात की, "ग्रंथ जाळण्याची भाषा विद्वानाकडून अपेक्षित

नसावी. म्हैसूर येथील नगरवाचनालयातली ग्रंथरत्ने जळिताची बळी झालेली आहेत. विश्वेश्वरयाची व डॉ. रामन यांची हस्तलिखितेही त्यातून सुटली नाहीत. म्हणून सुरुवात मनुस्मृतीपासून झाली तरी शेवट कुठवर जाईल हे कोण सांगणार?" डॉ. आंबेडकरांनी केलेले मनुस्मृति दहन कसे चूक होते, हे दाखवण्यासाठी आम्ही हे सांगत नाही तर, सावरकरांची या बद्दलची भूमिका दुर्गाबाईंच्या भूमिकेसारखीच होती हे समजून घ्यावे यासाठी सांगत आहोत. 'कोणत्याही धर्म पुस्तकाची एखादी प्रत जाळून टाकणे ही वस्तुतः बर्बरता आहे, ते अपकृत्य होय, शत कृत्य नव्हे' अशी सावरकरांचीही स्पष्ट भूमिका आहे. [१३] मनुस्मृतीची प्रत जाळून डॉ. आंबेडकरांनी कोणतेही शतकृत्य केले नसून एक अत्याचारच केला आहे, असे त्यांनी या भूमिकेतून म्हटले आहे. सावरकरांची ही भूमिका आपण नीट समजून घेतली पाहिजे.

सावरकरांच्या सर्व साहित्यामध्ये व उपलब्ध असलेल्या भाषणामध्ये त्यांनी फक्त एकाच लेखात या मनुस्मृति दहनाबद्दल आपला अभिप्राय वरीलप्रमाणे नोदविलेला दिसून येतो. हा त्याचा अभिप्राय १९५६ मध्ये आणि तेही धर्मांतराचा निर्णय डॉ. आंबेडकरांनी निश्चित केल्यावर व्यक्त केलेला आहे. मनुस्मृतिचे दहन १९२७ साली झालेले आहे, मात्र सावरकरांनी याबद्दलची आपली नापसंती प्रकटपणे १९५६ ला व्यक्त केलेली आहे, ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. धनंजयकीरांचा मनुस्मृति दहनाच्या बाबतीत अभिप्राय फार मार्मिक व मोलाचा आहे, असे आम्हास वाटते. आंबेडकरांच्या चरित्रात ते म्हणतात, [१४] " आंबेडकर ब्राम्हण असते नि सावरकर महार असते तर त्यांनी वेगळे वर्तन केले असते यात संदेह नाही " याचा अर्थ मनुस्मृति विरुद्धचा संताप किती टोकाला जावून व्यक्त करायचा याचा हा फरक होता, मुलभूत विरोधाचा नव्हता.

रत्नागिरीला असतांना ' मनुस्मृतीवर ' सावरकरांनी २३–५–१९३३ पासून एकत्रितपणे नऊ व्याख्याने दिलेली होती. दुर्दैवाने ती व्याख्याने आज उपलब्ध नाहीत. वृत्तपत्रीय कात्रणेंही नाहीत. नाहीतर मनुस्मृतीवर सावरकरांचे २००–३०० पृष्ठांचे एक सुंदर पुस्तक सिद्ध झाले असते, असे बाळाराव सावरकरांनी म्हटले आहे. [१५] त्या वेळेसच्या ' सत्यशोधक ' वृत्तपत्राचा अभिप्राय असा की, " या व्याख्यानमालेने जनतेत जितकी खळखळ उडवून दिली आहे, तितकी आजवर कोणत्याही मालेने उडवून दिली नसेल " [१६] सावरकरांचे धर्मग्रंथासंबंधीचे जे विचार आपण आतापर्यंत पाहिले, त्यावरुन या व्याख्यानमालेत ते काय बोलले असतील, याची दिशा आपण जाणू शकतो. ही व्याख्यानमाला व धर्मग्रंथासंबंधीचे त्याचे लेख जवळजवळ एकाच काळातील आहेत. मनुस्मृतीच्या प्रचारासाठी त्यांनी ही व्याख्याने दिलेली नव्हती तर मनुस्मृती आज व्यवहारात पाळणे कसे अशक्य आहे, हास्यास्पद आहे, हे सांगण्यासाठीच ती दिलेली होती, हे उघड आहे. हे पुस्तक जर सिद्ध झाले असते तर मनुस्मृतीतील विचाराचे वाभाडे काढणारा व

त्या विचारांना आजच्या परिस्थितीत हास्यास्पद बनविणारा एक प्रक्षोभक असा ग्रंथ आपल्याला उपलब्ध झाला असता. पण दुर्दैवाने असे घडले नाही.

एकीकडे मनुस्मृतीग्रंथदहनाचे कार्यक्रम होत होते नि त्याच काळात दुसरीकडे सावरकर मनुस्मृतीतील विचाराचे दहन करण्याचे कार्यक्रम घेत होते, हे नीटपणे आपण समजून घेतले पाहिजे. या मनुस्मृतीतील विचारांना बुद्धिवादाच्या अग्निकुंडात घालण्याच्या वैचारिक भाषणापुरतेच हे कार्य मर्यादित नव्हते. प्रत्येकाच्या घरी जावून लोकांच्या मनातून मनुस्मृती विचाराचा निःपात करण्याचे प्रत्यक्ष सामाजिक कार्यही सावरकरांनी रत्नागिरीत आपल्या सामर्थ्याच्या मर्यादित केलेले आहे, हेही मोकळ्या मनानी समजून घेतले पाहिजे.

मनुस्मृतीतील विचाराबद्दल सावरकर कसे बोलतात याचा एक नमुना आपल्याला पाहता येण्यासारखा आहे. ब्राह्मणांनी मांस खाणे कसे कर्तव्य आहे याचा मनुस्मृतीतील उल्लेख करुन सावरकर म्हणतात,[१७] " जो श्राद्धांत मांस खाणार नाही, त्यास एकवीस जन्म पशुयोनि प्राप्त होओल, असा कचकचीत शाप आहे. शास्त्राचा पाया – सर्व स्मृतीतील आद्यस्मृति जी मनुस्मृति – तीतच ! बरे मांस तरी कसले ? तर श्राद्धपक्षी ब्राह्मणांना प्रशस्त म्हणजे माशाचे मांस नि वराहमांस, रानडुकराचे ! त्यायोगे पितरांची तृप्ति अेकच नव्हे तर दहा महिने होते !" जन्मल्याबरोबर पहिले अन्न जे खाणे शास्त्रसंमत ते मांसच होय, असे मनुस्मृती म्हणते. हे सर्व सांगून झाल्यावर सावरकर म्हणतात, " शास्त्रवचने जर पाहू लागलो तर शंकराचार्यापासून शिक्ष्यापर्यंत आपणा सर्वांची भंबेरी अुडाल्याविचून राहणार नाही. शंकराचार्यांचा संन्यास हाच मुळी अधर्म्य; कलिवर्ज्य !" धर्मग्रंथातील वचनांना हास्यास्पद बनविण्याची सावरकरांची ही पद्धत होती. आपल्या नऊ व्याख्यानामध्ये विविध मुद्यावर मनुस्मृतीतील वचनांना त्यांनी किती हास्यास्पद बनविले असेल हे आपल्याला यावरुन जाणता येवू शकते. डॉ. आंबेडकर असोत की सावरकर असोत, त्यांच्या समोरचा मुख्य प्रश्न मनुस्मृतीतील विचारापासून लोकांना मुक्त कसे करावे हाच होता. सावरकर आपल्या बुद्धिवादी पद्धतीने हे काम अत्यंत परिणामकारकपणे करत होते की नाही, हीच गोष्ट आपल्याला समजून घ्यायची आहे. हे जर आपण समजून घेतले तर सावरकर मनुस्मृती कपाटात ठेवायला सांगतात, तिला केवळ हास्यास्पदच बनवितात; तिचे दहन करत नाहीत, हा आक्षेप असमजंस आहे ; हे आपल्याला सहजपणेच लक्षात येईल.

वैचारिक क्रांती

ग्रंथ जाळण्याची सुरुवात मनुस्मृतीपासून झाली तरी शेवट कुठपर्यंत जाईल व कोण कोणते ग्रंथ जळतील याचा नेम नाही, असे जे वर दुर्गाबाई भागवत म्हणतात, त्यांचे एक प्रत्यंतर नुकतेच आले आहे. डॉ. आंबेडकरांच्या महाराष्ट्र शासनाने प्रसिद्ध केलेल्या साहित्यातील चौथ्या खंडातील Riddles of Hinduism:Rama

& Krishna ह्या परिशिष्टात राम व कृष्णाबद्दल अपमानकारक मजकूर आहे, यास्तव कांही हिंदुसंघटनांनी या पुस्तकाची अशीच जाहीर होळी केली. तो भाग वगळून टाकण्याची मागणी केली. ग्रंथातील एखादा भाग पसंत नाही म्हणून त्या ग्रंथाची होळी करणे ही निषेधार्ह गोष्ट आहे. मनुस्मृती दहनाचा निषेध करणाऱ्यांनी या आंबेडकर ग्रंथ दहनाचा निषेध करण्याचे श्रम घेतलेले दिसणार नाहीत. सावरकरांच्या भूमिकेप्रमाणे आंबेडकरांच्या या ग्रंथाला जाळणे हा अत्याचार होता, बर्बरता होती; हे कृत्य निषेधार्ह होते, निंद्य होते. सावरकर हयात असते तर त्यांनी या कृत्याचा निषेध केलाच असता, यांत संशय नाही. पण सावरकरांच्या अनुयायांनी या कृत्याचा निषेध करण्याचे श्रम घेतलेले आपल्याला दिसणार नाहीत.

अकोला येथे १४ व १५ नोव्हें. ८७ रोजी अ. भा. सावरकर साहित्य संमेलन भरले होते. वृत्तपत्रामध्ये या दहनकृत्याचे पडसाद चालू होते. आम्ही या संमेलनास गेलो होतो. शासनाने आपला निर्णय घोषित केलेला नव्हता. अशा परिस्थितीमध्ये या दहन कृत्याच्या निषेधाचा ठराव या अधिवेशनात मंजूर करण्यात यावा अशी आमची अिच्छा होती. पण असा ठराव येथे येवू शकला नाही. असा कोणता ठराव आणण्याचा आततायीपणा आम्ही करु नये असा सल्ला तेथील वडिलधारी सावरकर भक्तांनी आम्हाला दिला. तो मानल्याशिवाय आम्हाला मार्ग नव्हता. दुसरीकडे मनुस्मृतिदहनाच्या अैतिहासिक कृत्याचे कौतुक करणारे या नव्या ग्रंथदहन करणाऱ्यांचा तीव्र निषेध व त्यांच्यावर फौजदारी खटला दाखल करण्याची मागणी करत होते. पहिले ग्रंथदहन योग्य व दुसरे अयोग्य असे त्यांचे म्हणणे होते. मनुस्मृतीदहना विरुद्ध कधीही ब्रही न काढता आपला पुरोगामीपणा अखंडित ठेवू पाहणाऱ्यांनी या दुसऱ्या ग्रंथदहनाचा निषेध करुन आपल्या पुरोगामीपणावर शिक्कामोर्तब करुन घेतले. सावरकरभक्त, आंबेडकरभक्त नि आमचे हे पुरोगामी विचारवंत या दोन घटनासंबंधात स्वतःशीच परस्पर विसंगत वागलेले व उघडे पडलेले दिसतात. या साऱ्या निमित्ताने अशा एखाद्या कारणासाठी ग्रंथ जाळणे चूक आहे, ही गोष्ट जर आपण पटवून घेवू शकलो तर मनुस्मृती न मानणाऱ्या सावरकरांनी मनुस्मृति दहनाविरोधी आपली प्रतिक्रिया का व्यक्तविली, हे आपल्याला नीटपणे समजून घेता येईल असे आम्हाला वाटते. कुणाचे काय काय जाळावे यांचा विचार करण्याऐवजी कुणाचेच जाळू नये हा सावरकरांचा विचारच आपल्याला पटवून घ्यावा लागेल, असे आम्हास वाटते.

सावरकरांच्या समोरचा प्रश्न एकाद दुसरी श्रद्धा नष्ट करण्याचा नव्हता, तर मुलभूत वैचारिक क्रांती करण्याचा होता. मनुष्याच्या अैहिक कर्तव्याचे जे नियम आहेत, की ज्याला सावरकर मनुष्यधर्म म्हणतात, व ज्या धर्माच्या शिवाय अितर कोणताही धर्म ते मानायला तयार नाहीत. त्याचा पाया कोणताही धर्मग्रंथ असू शकत नाही. ही त्याची रोखठोक भूमिका आहे. धर्माची धर्मग्रंथापासून मुक्तता करणे, ही कल्पनाच वैचारिक क्रांतीचा एक भाग आहे. अैहिक कर्तव्य व

त्याचे नियम धर्मशास्त्राच्या मगरमिठीतून व गुलामगिरीतून स्वतंत्र केल्यावर त्या कर्तव्यांचे नियमन करणाऱ्या पुढील व्यवस्थेचा विचार करणे भाग असते. श्रुति-स्मृतिपुराणोक्त वृत्तीचा उच्छेद म्हणजे तरी काय ? मनुष्याचे जीवन व व्यवहार, जी आजवर श्रद्धेवर चालू आहेत, त्या श्रद्धेचा तो उच्छेद आहे. या श्रद्धेच्या अैवजी बुद्धीची त्या ठिकाणी प्रतिष्ठापना करणे, ही विचारक्रांति सावरकरांना करायची होती. प्रश्न केवळ कुंग्या धर्मशास्त्राचा आधार न घेण्यापुरता मर्यादित नव्हता, तर श्रद्धेच्या देवीअैवजी बुद्धीच्या देवीची प्रतिष्ठापना करण्याचा होता ! आडवळणाने नव्हे तर रोखठोकपणे; भावना दुखणार नाहीत, अशा बेताने नव्हे तर, 'हानि-कारक धर्मभावना दुखविल्याच पाहिजेत, उच्छेदिल्याच पाहिजेत'[१८] या क्रांति-कारकाच्या आवेशानें; लोकांना आवडेल म्हणून नव्हे तर, 'रुढि म्हणजे बहुमत, सुधारणा म्हणजे अल्पमत'[१९] हे कठोर वास्तव समोर ठेवूनच ; लोकहितासाठी लोकप्रियतेचा बळी देण्याची संपूर्ण तयारी ठेवूनच ! सावरकरांनी ही वैचारिक क्रांती सतीचे वाण म्हणून हाती घेतली होती, हे आपण समजून घेतले पाहिजे.

बुद्धिवाद्याच्या धर्मकर्तव्यासंबंधी सावरकर म्हणतात,[२०] " ज्या अर्थी आम्हा बुद्धिनिष्ठ, विज्ञानवादी सुधारकांनी सर्व प्रकारचे धार्मिक भावडेपण नि लुच्चेगिरी मग ती वैदिक असो, बायबली असो, कुराणीय असो वा पुराणीय असो – तिच्या कचाट्यातून मानवी बुद्धीला मुक्त करणे हेच आमचे पवित्र धर्मकृत्य, ह्यातच मानव्याचे अथवा अखिल मनुष्यजातीचे कल्याण असे वाटत आहे ; त्या अर्थी ते सत्य प्रचारण्यास आणि या सुधारणा स्वतः आचरण्यास आम्ही हिंदुसंघटक सुधारक कोणाच्याही धर्मभावना दुखवत नाही, अधर्मभावना दुखावल्या गेल्या तर त्याला उपाय नाही ! आम्ही कोणाचाही बुद्धिभेद करत नाही, दुर्बुद्धिभेद हा केलाच पाहिजे !" 'मानवी बुद्धीला स्वतंत्र करणे,' म्हणजे धर्माच्या गुलामीतून ती मुक्त करणे हे खऱ्या बुद्धिवाद्याचे आद्यकर्तव्य आहे, असे सावरकरांना वाटते. धर्म या शब्दाशी त्यांचे कांहीही भांडण नसल्यामुळे, हे कर्तव्यच बुद्धिवाद्याचे 'धर्मकर्तव्य' आहे, असे त्यांनी म्हटले आहे. सावरकरांचा बुद्धिवाद किती मुलभूत स्वरुपाचा व मुलभूत वैचारिक क्रांतीचा आग्रह धरणारा होता, हे यावरुन आपल्या लक्षात येते.

ही वैचारिक क्रांती राजकीय सशस्त्र क्रांतीपेक्षा कठीण असते. हे युद्ध स्वकी-यांच्या विरुद्ध असते, त्यामुळे ते अधिक नाजुक असते. मनःप्रवर्तनाच्या मार्गानी हे साध्य करावे लागते, त्यामुळे त्याची गति अत्यंत मंद असते. धर्मश्रद्धा ही उच्छेदा-साठी अतिशय चिवट असणारी शक्ति आहे, त्यामुळेही हे युद्ध जिंकण्यासाठी अधिक कठीण होवून बसते. ज्या ज्या राष्ट्रांनी श्रद्धेविरुद्धचे हे युद्ध जिंकले, त्या त्या राष्ट्रांचा सावरकरांना फार अभिमान वाटतो. मग तो फ्रांस असो; की मुसलमानांचा तुर्कस्थान असो, की साम्यवाद्यांचा रशिया असो. त्यांचा हा अभिमान किती प्रकर्षाने व्यक्त होत असतो, हे त्यांच्याच भाषेत पाहणे उद्बोधक ठरेल.

मराठी अंक संग्रहालय
3202
दिनांक 25/6/99

फ्रेंचराज्यक्रांती संबंधी सावरकर म्हणातात,[२१] "दोनशे वर्षांत युरोप बायबलाच्या दोन पुठ्ठ्याच्या आत असेच अडकून कोंबून कुजूच राहीले होते. पण अकस्मात एक स्फोट झाला-तो फ्रेंच राज्यक्रांतीचा नव्हे तर, फ्रेंच बुद्धिक्रांतीचा! फ्रेंच राज्यक्रांती त्या बुद्धिवादाचा एक अध्याय, एक अपरिहार्य परिणाम! फ्रेंच क्रांतिकारकांनी अक्षरशः अनेक जुन्या देवता नाकारुन नवी देवता घडली नि पॅरिसच्या रस्त्यातून मिरविली–बुद्धीची! 'The Goddess of Reason ची! या स्फोटासरशी युरोप बायबलाच्या बंदीतून बाहेर फेकले गेले. त्याने साऱ्या 'अेष धर्म सनातनः' ना विज्ञानाचे, बुद्धीचे, सद्यःस्थितीचे कसोटीस लावले आणि युरोप वैभवाच्या झेपलिनमध्ये आकाशांत उंच उंच भरारु लागले." अगदी अशीच बुद्धिक्रांती भारतात सावरकरांना करायची होती. याच बुद्धिदेवतेची प्रतिष्ठापना धर्मश्रद्धेच्या ऐवजी त्यांना इथे करावयाची होती.

भारतासारखे धर्म मानणारे, देवपूजक असणारे राष्ट्र कसे धुळीस मिळाले, याचे वर्णन करुन सावरकर पुढे म्हणतात,[२६] "–परंतु शकुन, रमल, वेद, कुराण काय पण प्रत्यक्ष देवासही न मानणाऱ्या Anti God रशियाचे प्रचंड दुर्ग, ती विमाने नि वियाने अक्षरशः वाऱ्यावर देखील वळकटपणे तरंगत आहेत." पुढे जगात कोण टिकते व कोण धुळीस मिळते याची वर्गवारी सावरकर करतात. विज्ञाननिष्ठेच्या अढळ पायावर जे आपले राष्ट्र उभे करतात ते जिंकतात, ठिकतात, पुढे जातात व धर्मशास्त्रीय श्रद्धेवर जे ते उभारतात त्याचे राष्ट्र धुळीस मिळते, असा सावरकरांचा स्पष्ट निष्कर्ष आहे. हा त्यांचा निष्कर्ष वस्तुनिष्ठ व पूर्णतः बुद्धिवादी आहे, हे समजून घेतले पाहिजे.

याच कारणासाठी तुर्कस्थानचा केमालपाशा सावरकरांचे आदरस्थान होते. त्यांच्याविषयी सावरकरांना फार अभिमान वाटे. तुर्कांनी धर्म व राष्ट्र या दोन्हीच्याही प्रमुखस्थानी असलेल्या खलिपाचे उच्चाटन केल्यावर 'अरबी संस्कृतीचे उच्चाटन' कसे झाले, या संबंधी सावरकर म्हणतात,[२२] "खलिपाचे उच्चाटन करताक्षणीच धर्माची राजकारणातून साफ उचलबांगडी झाली. तोवर तुर्काचे सारे व्यवहार कुराणातील पुरातन अरबी साच्यात ढळलेल्या आणि अपरिवर्तनीय मानलेल्या धर्मनिर्बंधानुरुप होत आले होते; पण तरुण तुर्कांनी पहिल्या धडाक्यातच धर्मनिर्बंध हा समास सोडविण्याचे भरीस न पडता तो मुळी तोडूनच टाकला. धर्म निराळा; निर्बंध (कायदा) निराळा. एक शब्दनिष्ठ श्रद्धेचा प्रांत; एक प्रत्यक्षनिष्ठ प्रयोगाचा. त्याचा विषय परलोक, व याचा इहलोक. 'अंतःप्रत्यक्ष मार्गेण व्यवहारविधि नयेत' या तत्त्वाची घोषणा करुन तरुण तुर्कांनी लोकसभेच्या पहिल्या वहिल्या बैठकीतच व्यवहारविषयक ते ते सारे धर्मनिर्बंध रद्द करुन टाकले..... यास्तव धर्मग्रंथ उघडून सुधारणेचा प्रश्न सोडविण्याचे भानगडीत शतकानुशतके न खर्चता, तरुण तुर्कांनी धर्मग्रंथ मिटून तो सुटतो की काय ते पाहिले! तो काय? धर्मग्रंथ मिटला नि तत्काल तो प्रश्न सुटला. व्यवहारात धर्माची अशी नड

अुरलीच नाही." सावरकर कशाचे कौतुक व स्वागत करतात व त्यांना काय पाहिजे होते, हे या त्यांच्या विचारावरुन स्पष्टपणे दिसून येते. धर्माच्या गुलामगिरीतून मुक्त करुन बुद्धिस्वातंत्र्याच्या पायावर, तुर्कस्थानला केमालपाशानी कसे अुभे केले, याचे जे वस्तुनिष्ठ चित्र त्यांनी 'अरबी संस्कृतीचे उच्चाटन' या लेखात उभे केले आहे, त्याला एक विशिष्ट हेतू आहे. जोसेफ मॅझिनीचे आत्मचरित्र अनुवाद करण्याचा जो हेतू होता, तोच हेतू हा लेख लिहण्यामागे आहे. सावरकरांच्या कल्पनेतील भारताचे ते एक चित्र आहे. हा साधासुधा प्रश्न नसून सावरकरांच्याच म्हणण्याप्रमाणे एका संस्कृतीच्या उच्चाटनाचा हा प्रश्न आहे. 'अरबी संस्कृतीचे उच्चाटन' या नावातच ही भूमिका व्यक्त झालेली आहे. भारतात हा प्रयोग झाल्यावर इथे कोणत्या संस्कृतीचे उच्चाटन होणार होते, हे आपण समजून घेवू शकतो. राजकारण व शास्त्राची प्रमेये जशी कालदेशानी मर्यादित नसतात, तशीच वैचारिक क्रांतीची प्रमेयेही कालदेशानी मर्यादित नसतात. अिटली काय किंवा तुर्कस्थान काय किंवा देवधर्म न मानणारा रशिया काय, कांही विशिष्ट प्रमेयांचा वस्तुपाठ भारताला देत आहेत, हीच क्रांतिकारक सावरकरांची भूमिका आहे; मग ते सशस्त्र क्रांतिकारक असोत की बुद्धिवादी क्रांतिकारक सावरकर असोत!

सावरकरांच्या या प्रखर बुद्धिवादाला स्वतःला बुद्धिवादी म्हणविणाऱ्या विद्वानांनी 'तथाकथित विज्ञाननिष्ठा व बुद्धिनिष्ठा'[२३] म्हणून हिनवावे, या बद्दल त्या विद्वानांच्या प्रामाणिकपणाचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. सावरकरांच्या या बुद्धिवादाला व विज्ञाननिष्ठेला लोकांनी फसू नये असाही सल्ला ते देतात.[२४] त्यांचा हा सल्ला मानायचा का नाही हे वाचकांनीच ठरवायचे आहे. सावरकरांना डॉ. फडके कडवे राष्ट्रवादी म्हणतात. "जगाच्या इतर भागांतील लोकसमूहाकडून आपण कांही शिकलो हे कबूल करायला राष्ट्रवादी सहजासहजी तयार नसतात." असे डॉ. फडके म्हणतात.[२५] "वेदकालात सर्वकांही होते" असे या राष्ट्रवाद्यांना वाटते, असेही ते म्हणतात. सावरकर विज्ञाननिष्ठ भासत असले तरी व सनातन्यांवर कडाडून टीका करीत असले तरी त्यामुळे लोकांनी फसू नये असा डॉ. फडके याचा हा अभिप्राय किती विपर्यस्त व खोडसाळपणाचा आहे, यावर वेगळे भाष्य करण्याची आम्हाला गरज वाटत नाही.

सावरकरांचा बुद्धिवाद किती मुलगामी, प्रखर व व्यापक होता हे आपणास त्यांच्या त्या धर्मविषयक विचारावरुनही समजून घेता येते. धर्मातील वाअीट भाग, वाअीट रुढी, हानिकारक आचार, कालबाह्य कर्मकांडे, निरर्थक व्रते, अंधाणी समजुती, भ्रामक अंधश्रद्धा अित्यादी नष्ट करण्यापुरता सावरकरांचा धर्मविरोध आहे, का यापेक्षा कांहीतरी अधिक आहे, हे आपण स्पष्टपणे समजून घेतले पाहिजे. धर्मश्रद्धेअैवजी बुद्धीची प्रतिष्ठापना त्यांना करायची होती, ही गोष्ट जर आपण समजून घेणार नसू, तर सावरकरांचा बुद्धिवाद आपल्याला समजूनच घेता

येणार नाही. धर्मग्रंथांची कालबाह्य म्हणून ग्रंथालयात रवानगी केल्यावर, एक शक्ति म्हणून, एक आधार म्हणून त्या धर्मग्रंथाचे समाजातील अस्तित्व संपलेले असते. धर्म निराळा, समाज निराळा; धर्म निराळा, कायदा निराळा; धर्म निराळा, राजकारण निराळे – अशी धर्माची जीवनाच्या सर्वच क्षेत्रापासून फारकत झाल्यावर धर्म नावाची वस्तू व्यवहारतः शिल्लकच उरत नाही. अशावेळेस धर्माची जागा बुद्धीनें घेतलेली असते. बुद्धी जो धर्म सांगतें तो विज्ञानधर्म असतो. धर्मग्रंथीय धर्माचा समाजाला, राष्ट्राला असलेला आधार सावरकरांना उखडून टाकायचा होता, व त्या ऐवजी विज्ञानधर्माची प्रतिष्ठापना करायची होती. त्यांच्या विज्ञानधर्माचे स्वरुप पुढील प्रकरणांत समजून घेवू.

❖❖

३. विज्ञान धर्माचा स्वीकार

आपण मानतो तो देव, धर्मग्रंथ, त्यावर आधारित असलेला धर्म याची रवानगी स्वर्गात किंवा ग्रंथालयात केल्यानंतर त्या ऐवजी मनुष्याला हव्या असणाऱ्या नव्या देवाचा, धर्मग्रंथाचा व धर्माचा सावरकर पुरस्कार करतात. श्रद्धेच्या ऐवजी बुद्धीची प्रतिष्ठांपना करावयाची म्हणजे ते सारे करणें भाग असते. विश्वातील सत्य विज्ञानच शोधून काढू शकते, यावर सावरकरांचा एवढा विश्वास होता की बुद्धीच्या ऐवची विज्ञान या पर्यायी शब्दाचा ते सारखा वापर करतांना दिसतात. God of Reason या अर्थी ते विज्ञानदेव मानतात. विज्ञानाच्या संशोधक ग्रथानाच ते धर्मग्रंथ मानतात. बुद्धीची प्रतिष्ठापना केल्यानंतर जो धर्म समाजात नांदत राहणार आहे, त्याला ते विज्ञानधर्म मानतात. आता आपला देव बदला, धर्मग्रंथ बदला, धर्म बदला– असा ते सारखा टाहो फोडत असतात. एखादा धर्मप्रचारक ज्या पद्धतीने आपल्या धर्माचा प्रसार व प्रचार करतो, त्याच पद्धतीने सावरकर या विज्ञानधर्माचा प्रसार व प्रचार करताना आपल्यात दिसून येतात.

खरा धर्म

विज्ञानधर्म म्हणजे प्रयोगशाळेमध्ये विश्वातील अज्ञात् गोष्टीच्या संशोधनाचा पुरस्कार करणारा धर्म नव्हे. हा कोणत्या अशा वैज्ञानिकाचा धर्म नव्हे. विज्ञानाची प्रत्यक्ष, प्रयोग, तर्क, अनुभव यावरुनच सत्यशोधन करण्याची बुद्धिनिष्ठ पद्धत, मानवी जीवनातील प्रत्येक क्षेत्राला लावून निर्णय घेण्याच्या बुद्धिवादाला दिलेले हे एक पर्यायी नांव आहे. बुद्धिवादापेक्षा समजायला सुलभ व सोयीचा म्हणून सावरकरांनी याच शब्दाचा सातत्याने वापर केलेला आहे, ही गोष्ट आपण लक्षात ठेवली पाहिजे.

"आपल्या राष्ट्राला धार्मिक अज्ञानाच्या तमोयुगातून आजच्या सुधारलेल्या विज्ञान युगात आणून सोडणे, आपले अत्यंत पवित्र कर्तव्य आहे. हाच एक खरा धर्म आहे"[1] अशी सावरकरांची खऱ्या धर्माची कल्पना आहे. याच धर्माला ते विज्ञानधर्म म्हणतात. समाजाला बुद्धिवादी करुन सोडले पाहिजे, असाच याचा स्पष्ट अर्थ आहे. या विज्ञानधर्माचे स्पष्टीकरण करताना सावरकर म्हणतात,[2] "जो वैज्ञानिक सत्यावर उभारलेला आहे, जो इथे (म्हणजे इहलोकी) लोकहितकारक आणि म्हणूनच परत्री देखील निःश्रेयस्कर असलाच पाहिजे, असा आचारच आजचा खरा धर्माचार ठरणार आहे." अशा विज्ञाननिष्ठ आचाराचे सर्वांना करुन सोडले पाहिजे, असे त्यांना तीव्रतेने वाटते. येथे 'परत्री देखील निःश्रेयस्कर' ही जी पारलौकिक सुखाची कल्पना आलेली आहे, ती लोकांना बुद्धिवादाचा विचार पटवून देण्याच्या युक्तिवादासाठी आहे, हे समजून घेतले पाहिजे. ज्या गोष्टी या ऐहिक जगात हितकारक असतात, त्याच गोष्टी याच कारणास्तव दुसऱ्या कोणत्याही जगात तशाच हितकारक असल्याच पाहिजेत, असे दोन्ही जगातील हिताचे समीकरण मांडण्याचा, त्या एकच आहेत म्हणून त्याचे अद्वैत करण्याचा हा एक प्रयत्न आहे, पटविण्याचा युक्तिवाद आहे. ऐहिक हितातच पारलौकिक सुखही येते, अशी लोकभावना तयार करणे, व म्हणून ऐहिकाचाच तेवढा विचार करा, तेवढेच आपले कर्तव्य आहे, यावद्दल लोकांची मने तयार करणे, ही सावरकरांची लोकांना बुद्धिवाद शिकविण्याची एक पद्धत आहे. ऐहिक हिताचे पारलौकिक हिताशी अद्वैत आहे, ही भूमिका घेतल्यामुळे पारलौकिक हिताला निषेधार्ह वा खोटे न ठरवताही, त्या हितावर श्रद्धा असणाऱ्यांना इहवादी बनविणे सोयीचे जाते, हे उघड आहे. वर सावरकरांनी वापरलेला "म्हणूनच" हा शब्द आपण काळजीपूर्वक लक्षात घेतला पाहिजे. नाहीतर परलोक हा असत्य आहे, असे मानणारे सावरकर पारलौकिक विचार का करत आहेत, हे आपल्याला समजणारच नाही.

समाजाचा पाया विज्ञानच

समाजाची, राष्ट्राची इमारत धर्मग्रंथाच्या पायावर उभी न करता विज्ञान ग्रंथाच्या प्रबल पायावर उभी केली पाहिजे, यावद्दल सावरकरांचा आग्रह आहे. मनुष्याची प्रगति एक किंवा अनेक धर्मग्रंथ असल्यामुळे होत नाही, तर ते ग्रंथ मिटल्यामुळेच किंवा फाडून टाकल्यामुळेच होवू शकते, यावर सावरकरांचा ठाम विश्वास आहे. सावरकर म्हणतात,[3] "युरोपियनांना असे प्रबल करणारा एकच धर्मग्रंथ कोणता? बायबल नव्हे! अगदी उलट! त्यांनी बायबल मिटले नि त्यांचे डोळे उघडले! रशियाने तर बायबल फाडूनच टाकले! एकच धर्मग्रंथ असणाऱ्या लक्षावधि मुसलमानावर कोणताही धर्मग्रंथ नसलेला रशिया राज्य करीत आहे; ते मागासलेले, तो प्रगत; ते दुबळे, तो प्रबळ; हे का? कारण की, रशियाने आपल्या संस्थेचा पाया कोणत्याही धर्मग्रंथावर न रचता विज्ञानग्रंथावर रचला

म्हणून !" देव व धर्म न मानणाऱ्या व धर्मग्रंथ फाडून टाकणाऱ्या रशियाचा, आणि तोही याच कारणास्तव, सावरकरांना वाटत असलेला अभिमान नि आकर्षण कोणत्या एखाद्या औपचारिकतेसाठी किंवा शिष्टाचारापायी नसून, देवधर्मावर समाज व राष्ट्र उभे न करण्याचा रशियाचा प्रयोग सावरकरांच्या मुलभूत विचाराशी पूर्णतः जुळतो, यासाठीच होय. सावरकरांना रशिया या प्रयोगासाठी नेहमीच आदर्श वाटत आला आहे. आपल्या मनातील ही भावना त्यांनी कधीही लपवून ठेवली नाही; एवढेच नव्हे तर, याच कारणासाठी आदर्श राष्ट्र म्हणून रशियाचा त्यांनी नेहमी दाखला दिलेला आहे.

देव धर्म मानणाऱ्या कोणत्याही मनुष्याला या कारणासाठी रशियाचा अभिमान व आकर्षण वाटण्याचा संभव नसतो. किंबहुना प्रत्येक हिंदुत्वनिष्ठ हा याच कारणासाठी रशियाला आपला शत्रू मानतो. रशियाच्या देव-धर्म न मानणाऱ्या विचारसरणीचा पुरस्कार म्हणजे हिंदुत्वनिष्ठेचा बळी होय, अशी आमच्या हिंदुत्वनिष्ठाची भूमिका असते. सावरकर हिंदुत्वनिष्ठ असतांना ते धर्माला शत्रू मानणाऱ्या रशियाला याच कारणासाठी आदर्श का मानतात, हा आपल्या समोरचा एक प्रश्न आहे. या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी त्यांच्या बुद्धिवादाचाही अभ्यास केला पाहिजे नि हिंदुत्वनिष्ठेचाही अभ्यास केला पाहिजे. त्यांच्या हिंदुत्वनिष्ठेचा अभ्यास आपण पुढे स्वतंत्र प्रकरणात करणार आहोत. येथे त्यांच्या त्या हिंदुत्वनिष्ठेकडे तात्पुरते दुर्लक्ष करुन त्यांचे बुद्धिवादी विचार अगोदर समजून घेऊ.

धर्मनिष्ठा बाजूला सारल्याशिवाय विज्ञाननिष्ठा येवू शकत नाही, ही सावरकरांची निःसंदिग्ध भूमिका आहे. साहजिकच आपल्या मनांत असा प्रश्न उभा टाकू शकतो की, धर्म व विज्ञान या दोन संकल्पनाची, प्रवृत्तीची वा शक्तीची सांगड वा समन्वय सावरकरांच्या विचारात संभवते काय ?

या दोन निष्ठांचे परस्परपूरक म्हणून एकत्र राहाणे शक्य आहे काय ? जसे मार्क्स स्पष्टपणानी सांगतात की, 'धर्म ही अफूची गोळी आहे !' अशाच कांही स्पष्ट भाषेत सावरकरांनी सांगितले असते तर, या प्रश्नाचे उत्तर सहजपणे मिळून गेले असते. पण अशा भाषेत सावरकर धर्मविरोध व्यक्त करत नाहीत. त्यांच्या विचारांचा निष्कर्ष हाच असला तरी, तो व्यक्तविण्याची भाषा वेगळी आहे. त्यामुळे थोडेसे चिकित्सकपणे व सावधपणे या प्रश्नांचे उत्तर आपल्याला शोधावे लागते.

सावरकर धर्म ही कल्पना बुद्धीच्या विरोधात घेवूनच आपल्या विचारांची मांडणी करतात. धर्मग्रंथ मिटल्याशिवाय, बुद्धीचा प्रकाश मिळणार नाही, हा त्यांचा निःसंदिग्ध निष्कर्ष आहे. धर्मग्रंथावर समाज उभे करण्याचे दिवस संपलेले आहेत, असे त्यांनी अगदी टाहो फोडून सातत्याने सांगितले आहे. मागील प्रकरणातील त्यांचे धर्मग्रंथाविषयीचे विचार अगदी सुस्पष्ट आहेत. आता प्रश्न उठतो तो, धर्म म्हणजे नेमके काय, हाच होय. या प्रश्नासाठीच धर्म या प्रश्नाचे उत्तर त्यांच्याच शब्दात धर्माच्या विविध अर्थासह पहिल्या प्रकरणात आपण पाहिले आहेत. सनातनधर्म

आणि मनुष्याचे ऐहिक धर्म, असे धर्माचे दोन विभाग त्यानी पाडले आहेत. त्यापैकी दुसऱ्या विभागास सावरकर धर्म म्हणतात. व आपणही तोच अर्थ घेवून सर्व चर्चा करत आहोत. पहिल्या अर्थी, म्हणजे शाश्वत, अपरिवर्तनीय असा जो विश्वाचा सनातनधर्म आहे, त्या अर्थी, धर्म आणि विज्ञान एकच आहेत, असे विधान करायचे असेल, तर ते विधान अगदी सत्य आहे. या अर्थी या विधानाचा अर्थ असा होतो की, विश्वाचे जे कांही सृष्टिनियम असतील ते आणि विज्ञान एकच आहेत. या विधानाला कुणाचाच विरोध असण्याचे कारण नसते. तेव्हा असे विधान करणे म्हणजे ज्यातून कशाचाच नवा बोध वा ज्ञान होत नाही, असे एक अनावश्यक विधान करणे होय, हे उघड आहे.

धर्म विरुद्ध विज्ञान

धर्म व विज्ञान यांच्या एकत्वाचा वा समन्वयाचा वा अविरोधाचा विचार धर्म या शब्दाचा कोणता अर्थ घेतला जातो, यावर ते अवलंबून आहे; असला पाहिजे. हा विचार मांडणारा व त्याच्याशी प्रतिवाद करणारा दोघांनीही, धर्म हया शब्दाचा समान व एकच अर्थ घेतला पाहिजे, तरच त्यांच्यातील विवादाला अर्थ आहे. धर्म आणि विज्ञान या संबंधी एकत्रित बोलण्याचा वा लिहण्याचा प्रसंग आला की, सावरकरांची लेखणी या दोन कल्पनांतील विरोध वा संघर्ष स्पष्ट करु लागते. सावरकरांच्या साहित्यांत या दोन कल्पनाच्या सहकार्याची वा समन्वयाची कुठेही चर्चा केलेली दिसणार नाही. त्यांच्या विचारात या दोन संकल्पनांचा विरोध व संघर्षच गृहीत धरलेला आहे. विज्ञानाच्या विरोधी म्हणून सावरकर धर्म किंवा धर्मश्रद्धा असा जेव्हा शब्दप्रयोग करतात, तेव्हा धर्माचा अर्थ धर्मग्रंथावर आधारलेला धर्म, असा होतो, हे लक्षात ठेवले पाहिजे. हा धर्म मनुष्याच्या ऐहिक कर्तव्याचे नियम व विविध आचार सांगत असतो. धर्मग्रंथीय धर्माच्या मुलभूत तत्वाप्रमाणे ते सारे नियम वा आचार अपरिवर्तनीय असतात. अशा अर्थाचा धर्म हा विज्ञानाच्या पूर्णतः विरोधी असणार हे उघड आहे. थोडक्यात, शाश्वत वा सनातन या अर्थीचा धर्म विज्ञानाशी एकरुप असतो, हे विधान अनावश्यक असते ; आणि धर्मग्रंथावर आधारलेला ऐहिक कर्तव्याचा धर्म या अर्थी, धर्म आणि विज्ञान या परस्पराविरोधी व समन्वय होवू न शकणाऱ्या गोष्टी आहेत, असेच सावरकरांचे मत आहे.

वैदिक धर्माप्रमाणे धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे असे चार पुरुषार्थ सांगितले आहेत. यापैकी धर्म आणि मोक्ष या गोष्टी आपण विचारात घेऊ. मोक्ष हा स्पष्टपणेच परलोकातील हिताचा भाग असल्यामुळे त्याचा विज्ञानाशी विरोध असणार हे उघड आहे. तो मोक्ष ज्या धर्मानी ठरविला जातो, त्या धर्माच्या तेवढ्या पुरत्या भागाचा विज्ञानाशी विरोध असणार, हेही उघडच आहे. आता धर्माचा आधार, धर्मग्रंथ आहे का बुद्धी आहे, या वरते धर्म आणि विज्ञानातील विरोध

किंवा अविरोध ठरतो. जर त्याचा आधार धर्मग्रंथ असेल तर, तो धर्म विज्ञानाच्या स्पष्टपणे विरोधी जातो. जर त्याचा आधार बुद्धी असेल तर तो धर्म विज्ञानाशी अविरोधी असतो; नव्हे, यालाच सावरकर विज्ञान धर्म म्हणतात! लौकिक अर्थाने ज्याला धर्म म्हटले जाते, त्याचा आधार स्पष्टपणेच कोणतातरी धर्मग्रंथ असतो. असा कोणताही धर्म घेतला तरी तो बुद्धिवादाच्या कसोटीस उतरतच नसतो, असे सावरकरांनी स्पष्टपणे म्हटले आहे. "Ism या अर्थी, धर्म म्हटला की, त्यांत बुद्धिबाह्य अशी कांही विशिष्ट श्रद्धा असणारच."[४] असा सावरकरांचा सुस्पष्ट निष्कर्ष आहे. अशा धर्मात अंगभूत असणाऱ्या बुद्धिबाह्य श्रद्धेऐवजी बुद्धीची प्रतिष्ठापना सावरकरांना करायची आहे. सध्याच्या लौकिक अर्थाचा कोणताही धर्म बाजूला सारून, सावरकर म्हणतात त्या विज्ञानधर्माला समाजात आणणे, याचा अर्थ, पुरातनाला सारून चांगला आणणे, असा आहे. ही वैचारिक क्रांती सावरकरांना करावयाची होती, हे स्पष्ट आहे. कोणत्याही क्रांतीमध्ये ज्याचा उच्छेद करायचा आहे ते आणि त्या ऐवजी जे आणायचे आहे ते, यांच्यात अविरोध आहे कां विरोध, हा प्रश्नच चुकीचा असतो.

धर्माचे उच्चाटन केल्याशिवाय विज्ञानधर्माची स्थापना अशक्य असते; व विज्ञान धर्माशिवाय मनुष्याचा विकासच होऊ शकत नसतो, हा सावरकरांचा ठाम सिद्धांत आहे. हा सिद्धांत कसा खरा आहे, हे जगाच्या इतिहासातील कित्येक घटना समोर ठेवून पुराव्यानिशी सावरकर आणि तेही अत्यंत आवेशानी सिद्ध करत असतात. विज्ञाननिष्ठ युरोपने धर्मनिष्ठ मुसलमानांना कशी धूळ चारली याचे वर्णन करुन सावरकर म्हणतात?[५] "म्हणून आपण मुसलमानाच्या पोथीनिष्ठेचे अनुकरण न करता हिंदूनी त्या विज्ञाननिष्ठेचेच केले पाहिजे! ज्या समाजाने ज्या धर्मग्रंथास जखडून घेतले, तो धर्मग्रंथ जितक्या सहस्त्रावधि वर्षानी जुना तितका सहस्त्रावधि वर्षानी तो समाज मागासलेला राहिलाच पाहिजे! धर्मग्रंथावर समाजसंस्था उभारण्याचे दिवस गेले! ..... या विज्ञानयुगात समाजसंस्थेची जी संघटना करावयाची ती प्रत्यक्ष ऐहिक आणि वैज्ञानिक अशाच तत्वावर केली पाहिजे. ती वाट चोखाळता इग्लंड, रशिया, जपान ही राष्ट्रें बलवान झाली, तसेच हे आपले हिंदुराष्ट्रही बलवान झाल्यावाचून राहणार नाही." समाजसंस्थेचा पाया धर्मग्रंथ असू शकत नाही, ही त्यांची निःसंदिग्ध भूमिका आहे. त्यांच्या दृष्टीने धर्मग्रंथाचे कार्य आता संपले आहे; ते आता मागासलेले आहेत; मनुष्याच्या मागासलेपणाला व अधोगतीला ते धर्मग्रंथ कारणीभूत आहेत; ज्यांनी हे धर्मग्रंथ फेकून दिले, फाडून टाकले; ते विकास पावले, प्रगतीपथावर गेले! तेंव्हा आता या धर्मग्रंथांना कपाटात बंद करून ठेवा व विज्ञानग्रंथांचे पानं उघडा; विज्ञान हाच आजचा आमचा देव, धर्म, वेद, श्रुति, स्मृति सर्वं कांही आहे, अशी सावरकरांची सुस्पष्ट भूमिका आहे.

विज्ञाननिष्ठेने ध्येयवेडे होऊन सावरकर विज्ञानधर्माचा प्रचार करतांना

दिसतात. वेदामध्ये किंवा कोणत्याही धर्मग्रंथामध्ये ज्या प्रमाणे एखाद्या देवाचा सारखा नामोच्चार, श्रेष्ठत्व, गुणवर्णन व मदतीसाठी धावा चाललेला असतो, अगदी त्याच पद्धतीने सावरकरांच्या साहित्यात विज्ञानदेवाविषयी चाललेले असते. विज्ञाननिष्ठ म्हणून प्रसिद्ध असलेल्या वैचारिक साहित्यात तर हे असतेच असते; पण कथा, कादंबरी, नाटकें या ललित साहित्यातही हाच प्रकार चालू असतो. सावरकरांचे या संबंधीचे साहित्य म्हणजे एक प्रकारचे विज्ञानदेव विषयक स्तोस्त्रच होत. आणि अपरिहार्यपणे कोणत्याही धर्मग्रंथात विरोधी धर्ममताविषयी जो विरोध, तिरस्कार, राग व ते उच्छेदून टाकण्याची इच्छा व त्यासाठी भक्ताला सांगितलेले मार्ग असतात, ते सारेच धर्मश्रद्धेविषयी सावरकरांच्या विज्ञाननिष्ठ साहित्यात आढळतात ! फरक एवढाच असतो की, सावरकर जे कांही बाजूने वा विरोधी सांगतात, त्या प्रत्येकाला बुद्धीला पटणारे कारण देतात; धर्मग्रंथामध्ये जे सांगितलेले असते त्याचे कारण, प्रायः तो धर्म सांगणाऱ्याची इच्छा एवढेच असते.

धर्म म्हणजे शब्दनिष्ठा

धर्मनिष्ठेच्या विरोधी किती टोकाची भूमिका सावरकर घेतात, हे पाहण्यासाठी त्यांच्यात शब्दातील कांही विचार पाहणे उचित होईल. गाओविषयीच्या हानिकारक धर्मश्रद्धेवर प्रहार करुन, 'गाय : एक उपयुक्त पशु' या लेखात सावरकर म्हणतात,[६] "प्रश्न एका फुटकळ प्रकरणाचा नाही, तर एका सर्वस्पर्शी राष्ट्रीय प्रवृतीचा आहे, पोथीनिष्ठ की प्रत्यक्षनिष्ठ, पुरातन की अद्यतन, प्रश्नशून्य विश्वासशील धर्म की प्रश्नशील, प्रयोगक्षम विज्ञान ? या दोन प्रवृत्तीपैकी अद्यतन, प्रत्यक्षनिष्ठ नि प्रयोगसिद्ध विज्ञानच आजच्या परिस्थितीत नि आजच्या जगातील प्रतिस्पर्धेत आमच्या राष्ट्राचा वेद झाला पाहिजे." विज्ञानाला वेदाच्या सिंहासनावर स्थानापन्न करायचे म्हणजे वेदाची हकालपट्टी ग्रंथ संग्रहालयात करण्यावाचून गत्यंतरच नसते "'धर्म,' शब्दनिष्ठ पोथीजात 'धर्म', म्हटला की, बुद्धी कशी आंधळी होते; किंवहुना बुद्धीचे डोळे काढून घेण्यासाठीच कित्येक वेळा 'धर्माचे' सांडस तापवून हेतूतःच कसे घुसविले जातात."[७] हे सावरकरांनी कांही उदाहरणें देवून याच लेखात दाखवून दिले आहे. बुद्धि आणि धर्म याच्यांत विस्तवही जावू नये, इतका हा विरोध त्यांनी मांडला आहे. युरोपांत या धर्मश्रद्धेची त्यातल्या त्यात हकालपट्टी झाल्याचे सांगून 'पोथीनिष्ठेची बाधा' या लेखात सावरकर म्हणतात.[८] "प्रत्यक्ष ऐहिक असे जे जे व्यवहार ते ते ऐहिक विज्ञानाच्या प्रयोगसिद्ध सूत्राप्रमाणे, त्यात धार्मिक शब्दनिष्ठ गडबडगुंडा मुळीच होऊ न देता, युरोपांत बहुधा प्रचलू लागले आहेत. विज्ञान युगांत शब्दनिष्ठेला वावच नाही. अमक्या ग्रंथात आहे, म्हणून अमूक खरे हे बोलणेच बंद ! प्रयोगांत प्रत्यक्ष सिद्ध, ते तेच टिकणार, पटणार, पण 'धर्म' म्हणजे शब्दनिष्ठा ! त्या अर्थी जो धर्म त्याचे अर्थातच अशा विज्ञानाशी तपनाशी तमाचे तसे, साहचर्य केवळ अशक्य

असणारच !" तेव्हा सावरकरांच्या मते विज्ञान आणि धर्म याचा संबंध प्रकाश आणि अंधार असा असून त्यांचे साहचर्य केवळ अशक्य आहे. धर्मग्रंथीय धर्मात श्रद्धा ठेवणारा मनुष्य हा अेक 'दूरध्वनि यंत्र' आहे, असा सावरकरांचा आरोप आहे. ते म्हणतात,[९] "शब्दप्रामाण्य हेच जिथे धर्मनिर्णयाचे साधन, तिथे लहानपणी अेकाच्या काळात 'कुराण हाच धर्म' हे गुणगुणले की तो मुसलमान, 'बायबल हाच धर्म' हे पटविले की तो जन्माचा ख्रिस्ती ! कुराण खरे की बायबल, की वेद हे त्याला स्वतः तोलून पाहण्याची सोयच नाही." असे दूरध्वनियंत्र मनुष्यानी बनायचे नसेल तर, काय केले पाहिजे, हे सांगताना सावरकर म्हणतात,[१०] "म्हणून ज्या मनुष्याला धर्माचे नुसते अेक दूरध्वनियंत्र बनायचे नसेल, माणूस म्हणून स्वतःचे बुद्धिनिष्ठ मत हवे असेल, त्याने शब्दनिष्ठेला अुच्छेदून वेदअवेस्ता बायबल-कुराण हे सारे आदरणीय नि अभ्यसनीय पण निव्वळ मनुष्य कृत ग्रंथ आहेत, असे ठाम ठरवून, त्यास इतर कोणत्याही मनुष्यकृत ग्रंथाप्रमाणेच सादर अभ्यासावे. जे जिथे आजच्या विज्ञानाच्या कसोटीस उतरेल ते तेथून घ्यावे ; जे आज मनुष्यहितसाधक ते आचरावे; जे अनुभवांती आज टाकाऊ, अडाणी, बुद्धिशून्य ठरते ते साफ सोडावे." मनुष्यानी पवित्र व प्रमाण मानलेल्या धर्मग्रंथांना सावरकर विज्ञानाच्या कसोटीस लावतात, परीक्षेस बसवितात व त्यास उत्तीर्ण होण्याची अट घालतात, ही कल्पनाच पूर्णतः अश्रद्ध, अधार्मिक व पाखंडी स्वरुपाची आहे हे उघड आहे.

धर्मश्रद्धेमुळे केवळ प्रगति व विकासच थांबत नसतो तर बुद्धिहत्या होत असते, ही सावरकरांची खरी मुलभूत तक्रार आहे. "कार्यकारणभाव जाणण्याची बुद्धि धर्मभोळेपणाने पंगु होते."[११] हे त्यांनी अनेक उदाहरणांनी दाखवून दिले आहे. 'धर्मछाप एखाद्या भावनेवर पडला की, ती आंधळी होते आणि तिच्या प्रकरणी मनुष्य प्रज्ञाहत झालाच म्हणून समजावे ! मग तो हिंदु असो, मुस्लीम असो, वा ख्रिश्चन वा यहुदी ! तिथे बुद्धिविजय संपून भक्तिविजयाचा अध्याय लागलाच म्हणून समजावे,"[१२] असे त्यांनी स्पष्टपणे म्हटले आहे. धर्मग्रंथापेक्षा विज्ञान कसे श्रेष्ठ आहे, हे सांगताना 'यज्ञाची कुळकथा' या निबंधात ते म्हणतात,[१३] "वेदापेक्षा विज्ञानाने हे सूर्य, अग्नि, प्रकाश, बीज, मरुत, सोम कसे तत्काल, बिनचूक नि झटकून माणसाळले जातात." या विज्ञानाने सृष्टीला दासासारखे राबवून घेता येते हे ते सारखे पटवून देतात. यज्ञाचे निरर्थकत्व पटवून देवून 'यज्ञात् भवति पर्जन्यो:' या धर्मसूत्राऐवजी 'विज्ञान देवो पर्जन्यो:' हे विज्ञान सूत्र आता स्थापिले पाहिजे, असे त्यांनी म्हटले आहे.[१४] धर्मग्रंथाचे दुर्बलत्व पटवून सांगताना ते म्हणतात,[१५] "श्रुति नि श्रौतधर्म त्यांच्या काळात जगात त्या काळच्या अडाणी शत्रूशी लढताना दिग्विजय गाजवू शकले, म्हणून आजच्या विज्ञाननिष्ठ युगातही तसा टिकाव धरु शकतील, ही आशा व्यर्थ आहे. सोमा धाव, अग्ने आमचे शत्रू निर्दाळ अशा बौद्धिक प्रार्थनानी देव साह्यास धावत नसून वैज्ञानिक सूत्रांनीच त्यांना दासासारखे राबवून घेता येते, हे पुष्कळ अंशी अनुभवसिद्ध झाले आहे." धर्मग्रंथात, धर्मात कसलीही

श्रद्धा नसल्याविना कुणीही अशा प्रकारे विज्ञानाचे माहात्म्य व धर्मग्रंथाचे यःकश्चित् तत्व अितक्या निर्भयपणे मान्य करणार नाही. सावरकरांना धर्मात खरोखर श्रद्धा होती काय, याचा निष्कर्ष स्वतः वाचकांनीच काढावा, इतके सावरकरांचे हे विचार सुस्पष्ट आहेत.

बुद्धिवादी संघ : आदर्श गोष्ट

कोणताही नवा धर्म स्वीकारण्या ऐवजी बुद्धिवादच स्वीकारा, हे डॉ. आंबेडकरांना सांगताना सावरकर म्हणतात,[१६] "तर आजच्या परिस्थितीत लोकहितास प्रत्यक्षपणे साधणारे असे नियम हाच ज्याचा आधार, तर्कनिष्ट आणि प्रत्यक्षागत तत्वज्ञान ही ज्याची उपनिषदे आणि विज्ञान हीच ज्याची स्मृति, असा बुद्धिवादी संघ स्थापावा आणि त्यांच्या अनुयायास अंद्धश्रद्धेच्या आणि भाकडकथेच्या पिंजऱ्यातून सोडवून अेका झटक्यासरशी अद्ययावत् अशा वैज्ञानिक बुद्धि स्वातंत्र्याच्या उच्चतम आणि आरोग्यप्रद वातावरणात नेऊन सोडावे, हेच अिष्ट आहे." सावरकरांच्या ध्येयवादातील विज्ञानधर्माचे स्वरुप हे असे आहे ! हिंदुधर्मापेक्षा अधिक श्रेष्ठ म्हणून हा धर्म म्हणजेच बुद्धिवादी संघ डॉ. आंबेडकरांनी स्थापावा अशी त्यांची सूचना आहे. कोणताही धर्म म्हटला की त्यांत बुद्धिबाह्य अशी श्रद्धा असतेच, ही सावरकरांची मूळ भूमिका आहे. त्यांच्या समोरचा प्रश्न एखादी दुसरी किंवा पाच पन्नास अंधश्रद्धा नष्ट करण्याचा नव्हता, तर धर्माचा मूळ पायाच उखडून टाकण्याचा होता, हे समजून घेतले पाहिजे.

विज्ञाननिष्ठेचा किंवा विज्ञानधर्माचा हा प्रचार त्यांच्या कथा, कादंबऱ्या व नाटके या ललित साहित्यातही चालूच असतो. 'लेखाप्रति विषय तूचि अनन्य झाला' असे मातृभूमीला जे सावरकर म्हणतात, तेच विज्ञाननिष्ठेला लागू आहे. 'नारदाची पृथ्वीस भेट' या कथेत सावरकरांनी विज्ञाननिष्ठेचा प्रचार करण्यासाठी नारद मुनीचा उपयोग केलेला आहे. अिंद्र आणि नारदाचा संवाद चालू आहे. माणूस देवाला अलिकडे खंडणी का पाठवेनासा झाला आहे, असा विषय निघाला आहे व त्यासाठी प्लेग भूकंपासारखा एखादा दंड मनुष्याला लावावा काय, यावर त्यांचा विचार चालू आहे. सावरकरांचे बुद्धिवादी विचार मांडणारे नारदमुनि अिंद्रदेवाला म्हणतात,[१७] "आता खरे सांगायचे म्हणजे आपल्या ह्या खंडणीच्या आणि दंडणीच्या स्वभावास आम्ही देवांनी आता सोडण्याची वेळ आली आहे. त्यातही या रशियादिक लोकामध्ये विज्ञान नावाचा एक नवीन देव अवतरला आहे. तो आमच्या विद्युत, मरुत, वरुण, भैरव, मरीमाई, मसोबा प्रभृति दैवते करीत, त्या बहुतेक करामती लांचबीच काही एक न घेता, अगदी नियमितपणें नि निरपेक्षपणे घड्याळाप्रमाणे करुन दाखवतो. आपण देव म्हटले तरी सृष्टीच्या ज्या नियमांनी बद्ध आहोत, त्या नियमासच त्या विज्ञानाने माणसास हळूहळू शिकविण्यास आरंभिले आहे. आपली अनेक बिंगे त्यांनी फोडली आहेत.

हळूहळू साऱ्या मानवजातीच्या त्या विज्ञानाच्या प्रभूत्वाखाली सोपवून तुम्हा जुन्या देवास स्वर्गापुरते काय ते वसू द्यावे, असा श्रीविष्णुचा हेतु दिसतो. तेव्हा ग्रीकांच्या देवांनी जसा पृथ्वीचा निरोप घेतला तसा आता तुम्ही घ्यावा. पुन्हा परिचयाचा स्नेहसंबंध तेवढा मानवासी ठेवल्यास ठेवावा." येथे सध्याच्या देवाची उचलबांगडी करुन विज्ञान देवाची प्रतिष्ठापना करण्याचा त्यांचा हेतु स्पष्ट आहे. देव सुद्धा सृष्टीच्या नियमानीच बद्ध आहेत, हा सावरकरांचा जडवादी विचार लक्षात घेण्यासारखा आहे. पुरुष व प्रकृति, जीव व जगत इ. कोणत्याही गोष्टीचा ग तात्विक काथ्याकूट न करता प्रकृतीचे, जडाचे श्रेष्ठत्व सावरकर मान्य करतात. देवालाही मान्य करायला लावतात !

तो रशिया पहा !

वेद, अवेस्ता, पुराण, कुराण आदी यच्चयावत धर्मग्रंथासंबंधी त्या कथेतील नारद म्हणतात, १८ "हे सारे ग्रंथ ईश्वर ग्रंथित व ईश्वर कथित नसून मनुष्यकृत आहेत. आपला 'आतला आवाज', अंतःस्फूर्ति, हीच देवाची प्रत्यक्षवाणी, इच्छा, स्फूर्ति, आज्ञा होत्या, अशा प्रामाणिक भावनेने काही थोर पुरुषांची स्वतःच फसगत झाली, कांहीनी स्वतःचे स्तोम माजविण्यासाठी जाणूनबुजून दुसऱ्यास फसविले. या विशाल विश्वाचे सृष्टिनियम ठरलेले असून, त्याचा तुम्ही मानव तुमच्या अत्यंत तुच्छ आवडी-निवडी प्रमाणे तुमच्या त्या धर्मग्रंथात ज्यास पाप वा पुण्य समजता, त्याच्याशी लवलेश सबध नाही. सृष्टिव्यवहारापुरते तरी जे कोणी देवाची प्रार्थना न करता, सृष्टिनियमाच्या अबाधित क्रमासच तोंड देतात आणि त्यातील अनुकूल ते नियम पाळून प्रतिकूल नियमास तोंड देतात, ते प्रार्थना न करणारे देवास अधिक आवडतात. तो रशिया पहा ! तुम्ही देवालाच दैत्य बनविणाऱ्या ज्या भाकड कल्पना करुन खऱ्या देवाचे विडंबन करता, तसे करण्याचे रशियाने सोडून देवाचे अस्तित्वच नाकारले. मानवाच्या एकंदरीत त्या परिस्थितीत जे उपयुक्त ते चांगले, पुण्य; जे अनुपयुक्त, ते त्या परिस्थितीत वाईट, पाप ! हा मानवाचा मनुष्यधर्म ! और सब कुछ झूट !" नारदाच्या तोंडून देव धर्म न मानणाऱ्या रशियाचा आणि तेही तसे न मानण्याच्या कारणासाठीच रशियाची सावरकर स्तुति करत आहेत. कथा कादंबऱ्यात सुद्धा भाषाशुद्धी कटाक्षाने पाळणारे सावरकर 'और सब कुछ झूट !" असा अमराठी शब्दप्रयोग करत आहेत. या विज्ञानधर्माच्या म्हणजेच मनुष्यधर्माच्या शिवायचे सर्व काही खोटे आहे, हे अधिक निग्रहानें, निषेधाने व तिटकाऱ्याने सांगण्यासाठीच हा शब्दप्रयोग त्यांनी केलला आहे, हे उघड आहे. देव असो की नसो, त्या देवाची प्रार्थना न करणारेच देवाला आवडतात, असे त्यांचे मत आहे. अशा वेळी देवाच्या अस्तित्वाची, स्वरुपाची चर्चा हा केवळ तत्वज्ञानाचा प्रश्न राहतो, बाकी व्यवहारापुरते कोणत्याही अर्थीच्या देवाचे अस्तित्व संपलेलेच असते, हे उघड आहे. देवाच्या हातून देवा-धर्माची हकालपट्टी करण्याचा

सावरकरांचा हा प्रयत्न त्यांच्या बुद्धिवादावर खूपच प्रकाश टाकून जातो.

बायबलाला मिटून ज्या विज्ञानाचा स्वीकार केल्यामुळे युरोप एवढ्या प्रगतिपथावर गेला, तो विज्ञान कोण याविषयी नारद पुढे म्हणतात,[१९] "हा विष्णुचा नवा अवतार! सृष्टिव्यवहारापुरता तरी ह्या विज्ञानाचीच स्मृति अनुसरा!... अबाधित सृष्टिनियमान्वये त्याचा सारा कारभार चालतो..... .. ...या विज्ञानाने आणलेली ही स्मृति तुमच्या बायबल कुराणा प्रमाणे मनुष्याच्या कोत्या ज्ञानाच्या नि अज्ञानाच्या आतल्या आवाजाचे पडसाद नसून ती खरोखरच ईश्वरकृत आहे, सनातन आहे." नव्या युगातील श्रीविष्णू म्हणजे विज्ञान होय, धर्म म्हणजे विज्ञानधर्म होय, धर्मग्रंथ म्हणजे विज्ञानग्रंथ होत– या शिवायचे बाकीचे देव, धर्मग्रंथ, धर्म हे कालबाह्य आहेत, खोटे आहेत, या बुद्धिवादी विचाराचा प्रचार आपल्या सर्व साहित्यातून सावरकर सातत्याने करत असतात, हे आपण समजून घेतले पाहिजे.

एखादी बाब ग्राह्य का अग्राह्य, हे ठरविण्याची त्यांची कसोटी बुद्धिवाद हीच होती. आपल्या एक कथेतील वैद्यबुवाला ते म्हणतात,[४८] "प्रथम हे सांगा की, तुम्ही आम्हाशी पोथीवाद घालणार आहात की बुद्धिवाद? म्हणजे अमुक वचन शास्त्रात आहे म्हणून ते सत्य असे म्हणणार आहांत की, मानवी तर्काला नि उपयुक्तेला ते धरुन आहे, म्हणून ग्राह्य असे म्हणणार? ते ठरले म्हणजे आम्हास बोलता येईल." सावरकरांची ही भूमिका पूर्ण बुद्धिप्रामाण्याची आहे, हे स्पष्ट आहे. सावरकरांची ही भूमिका धर्मअश्रद्धाची आहे. त्यांना कुणी धर्मअश्रद्ध म्हटले की, सावरकर त्यांना उलट कोटीक्रमानें विचारणार की, तुमच्या 'त्रिकालदर्शी' पूर्वजांना पुढे १९३५ मध्ये अश्रद्ध लोक निघू शकतील, हे कसे कळाले नाही? कां त्या त्रिकालदर्शी शास्त्रात १९३५ सनाचे पान फाटलेले होते?[४१] पूर्ण बुद्धिप्रामाण्य आले की, धर्मवस्तू शिल्लकच राहत नाही, असे जे तर्कतार्थ लक्ष्मणशास्त्री म्हणतात,[२०] तेच सावरकरांच्या बाबतीतही खरे आहे.

जडवादी भूमिका

जीव हा जडातून निर्माण झाला, हा जडवाद्यांचा सिद्धांत आहे. जीव कसा निर्माण झाला, हा प्रश्न अद्याप प्रयोगावस्थेत आहे, अशी सावरकरांची भूमिका आहे. विज्ञान जोपर्यंत ही गोष्ट निश्चितपणे सिद्ध करीत नाही, तोपर्यंत सध्या काहीही खात्रीपूर्वक मानता येत नाही, असे त्यांना वाटते. त्यामुळे जडवाद असो, अद्वैत असो, द्वैत असो, की ब्रह्मवाद असो, या पैकी कशाचाही सत्य म्हणून स्वीकार ते करत नाहीत; या सिद्धांताचा प्रचारही करत नाहीत. असे असले तरी सुद्धा जडवादी सिद्धांताची शक्यता त्यानी अतिशय तोलामोलानी अनेक ठिकाणी मांडली आहे. खऱ्या बुद्धिवादी माणसाला अंतिमतः जडवादाकडेच झुकावे लागते, हे उघड आहे. सावरकर मात्र अत्यंत सावधपणे जडवादाची शक्यता मांडत

असतात. 'पाहिजे, काळचा माणसाला गोरा करणारा संशोधक पाहिजे' ही त्यांची कथा या जडवादी सिद्धांताची शक्यता मांडणारी आहे. या कथेत सावरकर गर्भशास्त्रासंबंधीच्या वैज्ञानिक संशोधनाची माहिती सांगतात. या शास्त्राकडे मनुष्याचे दुर्लक्ष झाले, अशी ते खंत व्यक्त करतात. आजपर्यंतच्या संशोधनांनी कोणकोणते सिद्धांत मानवी ज्ञानाच्या व प्रयत्नाच्या आटोक्यात आलेले आहेत, याची ते माहिती देतात. गर्भात मुलगा आहे का मुलगी, हे विज्ञानाला ठरविता येवू लागले आहे; जन्मानंतरही शस्त्रक्रियादिक अुपायानी लिंगपरिवर्तन करता येवू लागले आहे; हृदयरोगानी मेले त्यांना जिवंत करता येवू लागले आहे, इत्यादी माहिती सांगून, सावरकर पुढे म्हणतात,[२१] "पुरुष संभोगावाचून स्त्रियास गर्भसंभव नि प्रजोत्पादन नुसते टोचून घेतल्यानेही साध्य आहे, ही गोष्ट डॉ. कोअेर्नर यांच्या आश्चर्यकारक प्रयोगावरुन आता मान्य केलीच पाहिजे, असे दिसते. फार नको, आणखी दोनशे वर्षाच्या आत शास्त्रज्ञानी गर्भविज्ञानावर अगदी नेटाचा हल्ला चढविला आणि वैज्ञानिक प्रयोगाचा मारा सारखा चालू ठेवला तर, आज आपण कपडा जसा हवा तसा बेततो, तसा मनुष्य मागणी केल्याप्रमाणे घडविता आला ना– अितकी अुंची, पुरुष की स्त्री, असा रंग, अशी मुद्रा, असे केस, अितको बुद्धि, अशी मापे घेवून मनुष्य घडविता आला ना – तरी मला आश्चर्य वाटणार नाही! कारण निसर्ग हा मनुष्य गठन ज्याअर्थी नियमानीच करते, त्या अर्थी ते नियम समजताच त्यास हवी ती निवड करणे मनुष्यास शक्य झालेच पाहिजे. ती शक्ति त्या निसर्गानेच मनुष्यात ठेवली आहे, अशा अनेक प्रकरणी– अपवाद वजाजाता– आजपर्यंतचा अनुभव आहे." हे विचार स्पष्टपणे जडवादी विचार आहेत. मनुष्याला मनुष्य बनवता येतो, जीव तयार करता येतो, जीव तयार होण्याचे विशिष्ट निसर्गनियम आहेत– हा सारा विचारच मूलतः जडवादी आहे. जडातून जीव निर्माण होवू शकतो, यावर त्यांचा विश्वास होता; वैज्ञानिक प्रयोगानी ही गोष्ट आणखी दोनशे वर्षांच्या आत सिद्ध होवू शकेल, अशी त्यांना खात्री होती. मात्र या जडवादी भूमिकेचा त्यांनी प्रचार केलेला नाही. उठता–बसता जडवाद–जडवाद असा घोष त्यांनी लावला नाही. जीवोत्पतीचा तत्ववाद म्हणून कोणताही सिद्धांत त्यांनी कधी मांडला नाही, त्याची तत्वचिकित्सा केली नाही. एखाद्या गोष्टीचा तात्विक काथ्याकूट करण्यापेक्षा त्या गोष्टीचा व्यवहारात कसा उपयोग करुन घ्यावा, हा प्रश्न सातत्याने त्यांच्या समोर होता, व त्यातच त्यांना रस होता. असे असतानासुद्धा जडवादाचा सिद्धांत आपल्या कथेतून त्यांनी मांडला आहे, हे आपण लक्षांत घेतले पाहिजे.

खरा बुद्धिवादी कोण व खरा धर्म कोणता यासंबंधीची आपली भूमिका त्यांनी 'अपघात की आत्मघात' या कथेत मांडली आहे. खरा बुद्धिवादी कोण यासंबंधी या कथेत सावरकर म्हणतात,[२२] "मनुष्यहिताच्या आड येणाऱ्या अशा भाबड्या धर्मभावना कोणत्याही समाजात असल्यातरी, जो सुधारु अिच्छितो तोच खरा बुद्धिवादी, खरा धर्मभिरू. कारण धर्म म्हणजे मनुष्य समाजाच्या अुद्धाराचा,

धारणाचा मार्ग." 'तावुताची गोष्ट' या कथेच्या शेवटी सावरकर आपला सिद्धांत मांडतात की,[२३] "ऐहिक जगापुरता खरा धर्म म्हणजे ऐहिक विज्ञान (एक्सपेरिमेन्टल सायन्स) हेच आहे." आणि ही भूमिका सावरकरांनी कुठेही सोडलेली नाही, हे आपण समजून घेतले पाहिजे सावरकरांच्या या विज्ञाननिष्ठेला आमच्या विद्वान संशोधकानी "तथाकथित" [४३] म्हणून उपहास करावा हे खरोखरच खेदजनक आहे.

केवळ बुद्धिगम्य

सावरकर व गांधीजी यांची रत्नागिरीला भेट झाली होती. त्या भेटीत गांधीजी सावरकरांना म्हणाले की, "धर्म हा बुद्धिगम्य विषय नसून भावनामय आहे."[२४] त्यांना उत्तरताना सावरकर म्हणाले, [४४] "आपण बुद्धिगम्यतेविषयी जे म्हणता ते माझ्या धर्मविषयक विचारांशी जुळत आहे; परंतु धर्माच्या ज्या भागाविषयी मी बोलत आहे, तो केवळ भावनामय असणाऱ्या भागाविषयी नसून, त्यांचा जो बुद्धिगम्य भाग आहे, त्याविषयी होय. माझी धर्ममते मी केवळ बुद्धिगम्य सिद्धान्तावर अुभारलेली असून, ती अितकी भावना निरपेक्ष आहेत की, ती अैकून आपणही चमकूल अुठाल." सावरकरांचा हा स्वतःविषयीचा निष्कर्ष अक्षरशः खरा आहे. धर्माचे भावनामय व बुद्धीगम्य असे दोन भाग असतात, याचा अर्थ धर्माचा काही भाग श्रद्धेवर व कांही बुद्धीवर अवलंबून असतो. बुद्धीवर अवलंबून असणारा तेवढा भाग त्यांना मान्य आहे. ऐहिक जीवनाला लागू होणारा धर्माचा हा भाग आहे, हे उघड आहे. हा त्यांचा धर्मभाग पूर्णपणे बुद्धिवादी आहे. यालाच सावरकर विज्ञानधर्म म्हणतात, हे उघड आहे, विज्ञानधर्म हा भावनानिरपेक्ष व श्रद्धाशून्यच असणार हेही उघड आहे. गांधीजीनीही थक्क व्हावे अितका हा धर्म बुद्धीवादी आहे आहे असे सावरकर म्हणतात, ते पूर्णतः खरे आहे, हेच आतापर्यंत पाहिलेल्या त्यांच्या धर्मविषयक भूमिकेवरुन आपल्याला निश्चितपणे म्हणता येते.

एक गोष्ट आम्ही येथे स्पष्ट करु अिच्छितो की, सावरकर हे हिंदुत्वनिष्ठ होते, ही गोष्ट व त्या हिंदुत्वनिष्ठेचा विचार, पुढे स्वतंत्र प्रकरणात आम्ही करणार आहोत. त्यांच्या बुद्धिवादाचा चिकित्सक अभ्यास करण्यासाठी त्यांच्या त्या हिंदुत्वनिष्ठेचाही चिकित्सक अभ्यास करणे भाग आहे. तथापी त्यांची हिंदुत्वनिष्ठा विचारात न घेता, किंवा खरं सांगायचं म्हणजे, या गोष्टीचा मनावर परिणाम होऊ न देता व कोणत्याही पूर्वग्रहाच्या छायेत न जाता, त्यांचे धर्मविषयक किंवा बुद्धिवादी विचार प्रथमतः समजून घ्यावेत, अशी आमची भूमिका आहे. आमचे असे मत आहे की सावरकरांच्या हिंदुत्वाचा प्रभाव, अनुकूल असो की प्रतिकूल, मनावर ठेवून त्यांच्या धर्मविषयक व बुद्धिवादी विचार समजून घेण्याची, खर म्हणजे गैरसमजून घेण्याची, चूक आपल्याकडून होत आली आहे. ही चूक

सावरकरांच्या अनुयायांकडूनही झालेली आहे व विरोधकांकडूनही झालेली आहे. या पूर्वप्रभावामुळे सावरकरांची एक विशिष्ट प्रतिमा अगोदरच डोळ्यासमोर ठेवून त्यांच्या विचारांचा आपण अभ्यास करु लागतो. त्यामुळे त्यांच्या अभ्यासाला सुरु करण्यापूर्वीच आपण ते धर्मोद्धारक तरी आहेत किंवा जातियवादी तरी आहेत, हे गृहीत धरुनच चालतो. परिणामतः आपल्या अभ्यासाचे निष्कर्ष पूर्वग्रहदूषित व चुकीचे येण्याची आपण सोय करुन ठेवतो. वस्तुतः सावरकरांचे आपण जे बुद्धिवादी विचार अभ्यासात आहेत, ते विचार प्रकट होत असतानाच्या काळातच सावरकर हिंदुत्वनिष्ठ होते. अगोदर बुद्धिवादी नि नंतर हिंदुत्वनिष्ठ किंवा याच्या उलट, असला क्रम त्यांच्या बाबतीत घडलेला नाही. एकाच काळात व एका वेळेस ते बुद्धिवादीही होते नि हिंदुत्ववादीही होते. त्यामुळे त्याचे बुद्धिवादी विचार हिंदुत्वनिष्ठ सावरकरांचे आहेत व त्यांचे हिंदुत्वनिष्ठ विचार बुद्धिवादी सावरकरांचे आहेत, ही एक वस्तुस्थिती आहे. हे असे कसे घडू शकते व शकले, हाच आपल्याला अभ्यासाचा खरा विषय आहे. हे दोन्हीही विचार चिकित्सकपणे व स्वतंत्रपणे अगोदर समजून घ्यावेत व ते घेतांना विरोधी वाटणाऱ्या भूमिकेचा परिणाम होवू देवू नये, अशी आमची भूमिका आहे. या दोन्ही विचाराची सुसंगती कशी लावता येईल हे त्यानंतर आपल्याला पाहावे लागेल. त्यामुळे तूर्त सावरकरांच्या हिंदुत्वनिष्ठेचा आम्ही विचार करीत नाही, किंबहुना त्यांच्या या विचारानें पूर्वग्रहित न होता, त्यांच्या बुद्धिवादाचा अभ्यास प्रथमतः करु इच्छितो.

अधार्मिक माणूस

सावरकर रुढ अर्थाने नास्तिक व पाखंडी होते, हे त्यांच्या आतापर्यंतच्या विचारावरुन स्पष्टपणेंच दिसून येते. हा निष्कर्ष फारसा कुणाचाही मतभेदाचा मुद्दा नाही. पु. ल. देशपांडे यांनी सावरकर महोत्सवाच्या वेळेस पुण्यास भाषण करतांना सांगितले की, [२५] " सावरकर विज्ञान महर्षी होते. खरा विज्ञाननिष्ठ मानवतावाद त्यांनी सांगितला व आचरणात आणला. त्यांनी सर्वच धर्मातील अंधश्रद्धेवर टीका केली. त्यामुळे अखंड सावरकर पचविणें कठीण आहे. धर्मवेडाची नांगी ठेचणारे ते पहिलेच सुधारक होते. सावरकर नास्तिक होते. " पु. ल. देशपांडे यांच्या या मताशी कोणाचाही मतभेद होण्याचे कारण नाही. विद्याधर पुंडलिकांनी सावरकरांची भूमिका नास्तिकवाद्याची आहे, असे म्हटले आहे.[२६] त्यांच्या सामाजिक विचाराची जातकुळी चार्वाकाची आहे, असे भा. कृ. केळकरांना वाटते. [२७] सोबतकार ग. वा. बेहेरे सावरकरांचा नास्तिक व पाखंडी म्हणून उल्लेख करतात.[२८] डॉ पु. ग. सहस्रबुद्धेनी सावरकरांची परमेश्वरावर श्रद्धा नव्हती, असे म्हटले आहे.[२९] डॉ. प्र. ल. गावंडेनांही सावरकर नास्तिक वाटतात.[३०] धनंजयकारांनी सावरकरांना नास्तिकवादीच म्हटले आहे.[३१] परमेश्वरासंबंधीचे सावरकरांचे विचारच इतके निःसंदिग्ध आहेत की, ते नास्तिक व पाखंडी आहेत, हा

एक निर्विवाद निष्कर्ष म्हणून मानता येतो.

सावरकर नास्तिक वा पाखंडी आहेत ही गोष्ट त्यांच्या बुद्धिवादाच्या दृष्टीने फारशी महत्वाची नाही. नवी सुधारणा करु पाहणारा कोणताही सुधारक हा त्या काळच्या लोकांच्या दृष्टीने नास्तिक व पाखंडीच असतो. या संबंधीचे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्रीचे विचार फार मननीय आहेत. ते म्हणतात, [४२] " जुन्या श्रद्धामय विचारांची तपासणी सुरु झाली म्हणजे ती श्रद्धा हदरु लागते, म्हणून नव्या विचारांना पाखंड किंवा नास्तिक म्हणतात. धर्म समीक्षा हे खरोखरच पाखंड आहे. या पाखंडामुळेच नव्या युगाचा जन्म होतो. नवी ध्येये, नवी मूल्ये व नवी समाज रचना यांना ही पाखंड संज्ञक विचारक्रांतीच जन्मास घालते. कृष्ण, बुद्ध, ख्रिस्त, व महमंद हे धर्मसंस्थापक सुद्धा जुन्या धर्माच्या दृष्टीने महापाखंडीच होते, असे जर इतिहास सांगतो तर, सगळ्या धर्मांना विचाराग्नीत घालून परीक्षा करणारी नवधर्मसमीक्षा ही अतिपाखंड ठरली तर त्यात नवल नाही. " या दृष्टीने पाहू गेले तर, आगरकर तर काय पण, राजाराममोहनरॉय, न्या. रानडे, लो. टिळक ते म. गांधीपर्यंत प्रत्येक सुधारक हा पाखंडी ठरतो. धर्मातील घातक रुढी, अनिष्ट परंपरा, अंधश्रद्धा, कालबाह्य धर्मकांडे इत्यादी गोष्टीवर टीका करुन, धर्मातून त्या काढून टाकण्याचा प्रयत्न करणारे सुधारकही पाखंडीच ठरतात नि धर्माला च बुद्धीच्या अग्नीकुंडात घालणारे आगरकर, सावरकरांसारखे बुद्धिवादी विचारवंतही पाखंडीच ठरतात. महापाखंडी किंवा अतिपाखंडी अशा विशेषणांनेही त्यांच्या विचारांतील फरक लक्षात येत नाही. तेव्हा या विशेषणाच्या पलिकडे जावून तर्क-तीर्थ म्हणतात तशा अर्थाची नवधर्म समीक्षा सावरकर करतात का नाही, हे आपण समजून घेतले पाहिजे. बुद्धीच्या अग्निकुंडात जगातील सर्वच धर्माला ते घालतात की नाही, हे समजून घेतले पाहिजे.

सावरकरांना धर्मात श्रद्धा होती काय, हा मात्र नेहमीच विवाद्य विषय राहिलेला आहे. सावरकरांना फक्त विज्ञानधर्मामध्ये विश्वास होता व या धर्माला मान्य नसणाऱ्या कोणत्याही अर्थाच्या इतर धर्मामध्ये त्यांना विश्वास अगर श्रद्धा नव्हती, हे आतापर्यंत आपण पाहिलेले आहे. वस्तुतः विश्वास आणि श्रद्धा या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. बुद्धीच्या आधारे एखाद्या गोष्टीला आपण सत्य म्हणून मानतो तेव्हा त्या गोष्टीवर आपला विश्वास आहे, असे म्हटले पाहिजे. या ठिकाणी विश्वाच्या ऐवजी श्रद्धा हा शब्द वापरणे योग्य नाही. विश्वासाचा आधार बुद्धि असतो, तर श्रद्धेचा आधार भावना हा असतो. श्रद्धा ही एक बुद्धिबाह्य व तर्कातीत गोष्ट आहे. या अर्थानें सावरकरांना कोणत्याही धर्मात श्रद्धा नव्हती; मात्र विज्ञान धर्मावर त्यांचा विश्वास होता, असे थोडक्यात आपल्याला म्हणता येईल.

सावरकरांनी दिलेला सोडून, धर्माचा इतर कोणताही अर्थ घेतला तरी, त्यामुळे फार तर निष्कर्ष काढण्याची शब्दरचना बदलू शकते, मात्र निष्कर्षाच्या

मूळ आशयात फरक पडत नाही. समाजाचे ऐहिक व पारलौकिक हित धारण करतो तो धर्म, ही व्याख्या घ्या. वैशेषिक सूत्रात, " यतो भ्युदय निःश्रेयससिद्धीः स धर्मः " अशी ही मूळ व्याख्या आहे. हीही व्याख्या सावरकरांना मान्यच आहे. या व्याख्येतील ऐहिक हिताचा भाग बुद्धिगम्य असून, पारलौकिक हिताचा भाग भावनामय किंवा श्रद्धामय आहे, असे सावरकरांचे म्हणणे आहे. सावरकरांना धर्माचा फक्त बुद्धिगम्य भाग तेवढाच मान्य होता. पारलौकिक हित पाहणाऱ्या धर्मात त्यांना श्रद्धा नव्हती. याचा अर्थ, धर्माचा वरीलप्रमाणे अर्थ घेतला तर सावरकरांचा धर्मातील अर्ध्या भागावर विश्वास व अर्ध्या भागावर अविश्वास, होता, असा होतो. ऐहिकहिताच्या भागापुरते बोलायचे तर हे हित ठरविण्याचा अधिकार धर्मग्रंथाला द्यायला सावरकर तयार नाहीत. त्याच्या मते हा अधिकार प्रत्यक्षनिष्ठ विज्ञानाचा आहे. या सर्व दृष्टीने वरील व्याख्या घेतली तरी सावरकर धर्मअश्रद्ध किंवा अधर्मिक होते, असेच म्हणणे भाग आहे.

महाभारतातील 'धारणात् धर्म इत्याहुः ! धर्मो धारयते' प्रजाः !! ही व्याख्या घ्या. प्रजेचे धारण करतो तो धर्म, ही व्याख्याही सावरकरांना मान्यच आहे.[३२] सावरकरांच्या अर्थीचा मनुष्याचा ऐहिकधर्म हाच होय. मात्र या ऐहिक धर्माचा आधार कोणताही धर्मग्रंथ नसून विज्ञान आहे, ही सावरकरांची भूमिका आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. ही व्याख्या घेतली तरीही बुद्धिगम्य अशा ऐहिक कर्तव्याचा धर्म, या ठिकाणीच आपण येवून पोहचतो, की जिथे श्रद्धेचा वा भावनेचा प्रश्नच उपस्थित होत नाही.

'धर्म' हा शब्द अर्थ डॉ. आंबेडकरांनी सांगितलेल्या धम्म या शब्दाच्या समानार्थी घेतला तरी कांही फरक पडत नाही. किंबहुना सावरकरांचा मनुष्याच्या ऐहिक कर्तव्य धर्म आणि डॉ. आंबेडकरांचा धम्म हा एकरुपच आहे. 'धर्म' आणि 'धम्म' यातील फरक स्पष्ट करताना आंबेडकर म्हणतात,[३३] "धर्म (Religion) ही एक वैयक्तिक बाब समजली जाते व ती वैयक्तिकच राहिली पाहिजे. सार्वजनिक जीवनामध्ये कुणीही या धर्माचा हस्तक्षेप होवू देता कामा नये याच्या उलट धम्म हा मूलतः आणि अवश्यपणे सामाजिक आहे. धम्म म्हणजे मानवी जीवनाच्या सर्वच क्षेत्रातील मनुष्यामनुष्यातील संबंधाना व सदाचाराला दिलेले एक नाव आहे. धम्माविना समाज असू शकत नाही. धर्माचा हेतु जगत्कारणाचे स्पष्टीकरण देणें होय. धम्माचा हेतु या मानवी जगताची पुनर्बांधणी करणे होय." सावरकर ज्या प्रमाणे धर्माची सनातन धर्म आणि ऐहिक मनुष्यधर्म अशी विभागणी करतात, तशीच डॉ. आंबेडकर 'धर्म' आणि 'धम्म' अशी धर्म या व्यापक संकल्पनेची विभागणी करतात. समाजाला नियमन करणारा हा सावरकरांचा ऐहिकधर्म किंवा डॉ. आंबेडकरांचा धम्म, जोवर बुद्धीवर आधारित आहे, तोवरतो दोघांनाही सारखाच मान्य आहे. आणि हा मान्य असणारा धर्म जेंव्हा मिमांसकाच्या 'चोदना लक्षणो ऽर्थो धर्मः' (आज्ञा स्वरुपाच्या वेदवचनावरुन किंवा अधिकारी पुरुषाच्या

आज्ञेवरुन ज्याचा बोध होतो तो धर्म) या अर्थाचा धर्म बनतो, तेव्हा तो दोघांनाही मान्य नसतो. डॉ. आंबेडकरांचा धम्म हा बुद्धीवरच आधारलेला आहे, व सावरकरांचा विज्ञानधर्म हा या धम्मा सारखाच आहे. यामध्ये बुद्धिबाह्य अशी श्रद्धा ठेवण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही.

धर्म या शब्दाचा व्यापक अर्थ करुन सावरकरांना धार्मिक वा धर्मवीर ठरविता येणें, शक्य असते. त्या विशिष्ट अर्थाने सावरकरांना धार्मिक म्हणणें तर्कतःच बरोबर असू शकते. कारण धर्माचा अर्थ आपण कोणता घेणार यावर धार्मिकता वा अधार्मिकता अवलंबून असते. विज्ञान हाही एक धर्मच आहे, असे विज्ञानधर्म हा शब्द वापरुन स्वतः सावरकरच मान्य करतात. तेव्हा धर्म या शब्दाचा अर्थ यासाठी अगोदर लक्षात घेतला पाहिजे. भांडण शब्दाचे नसते, शब्दाला आपला स्वतःचा विशिष्ट अर्थ देण्याच्या स्वातंत्र्याबद्दलही नसते, तर शब्दाचा तो विशिष्ट अर्थ लक्षात न घेताच सावरकरांना धार्मिक वा अधार्मिक ठरविण्याविषयी असते.

धर्मवीर सावरकर ?

या दृष्टिकोणातून मिमांसातीर्थ पं. श्रीपादशास्त्री किंजवडेकर यांचा सावरकरांच्या धर्मविषयक विचाराबद्दलचा अभिप्राय अभ्यासनीय ठरु शकतो. 'धर्मवीर सावरकर' ३४ या आपल्या लेखात त्यांनी सावरकर हे नास्तिक, अधार्मिक वा वा निखळ भौतिकवादी कधीच नव्हते, असा निष्कर्ष काढला आहे. याची कारणमिमांसा करतांना त्यांनी म्हटले आहे, "रत्नागिरी येथे स्थानबद्ध असतांना सावरकरांनी धार्मिक समजल्या जाणाऱ्या चालीरीतीवर किर्लोस्कर मासिकातून जे कडाडून हल्ले आणि अंधश्रद्धेवर जे कोरडे ओढले त्यावरुन सावरकर हे नास्तिक आहेत, असे अनेकजण समजू लागले. 'धर्म न मानणारे सावरकर' म्हणून तथाकथित धार्मिकांनी त्यांची संभावना केली. याचा अर्थ धर्मप्रमाणेच खऱ्या अर्थाने सावरकर त्यांना कळलेच नाहीत. अस्पृश्यतेविरुद्ध त्यांनी उचललेले पहिले पाऊल हे अखेर त्रैलोक्याला व्यापून उरणारे त्रिविक्रमाचे पाऊल ठरले, हे आज आपण पाहतच आहोत. ज्वलंत आणि वस्तुनिष्ठ वैदिकधर्माची शिकवण देणाऱ्या सावरकरांना नास्तिक म्हणणे म्हणजे कुणीही भगवी वस्त्रे परिधान करताच त्याला आद्य शंकराचार्य म्हणण्यासारखे आहे."

सावरकरांना नास्तिक म्हणायचे कां आस्तिक हा विल्लर मुद्दा तूर्त बाजूला ठेवून, मिमांसातीर्थांनी वर एक महत्वाची माहिती वस्तुस्थिती म्हणून सांगितली आहे, तिचा प्रथम विचार करु. सावरकरांनी 'ज्वलंत आणि वस्तुनिष्ठ वैदिकधर्माची शिकवण दिली' अशी माहिती त्यांनी अधिकारवाणीने दिली आहे. सावरकरांचे अनुयायीही हीच गोष्ट वेगवेगळ्या भाषेत मांडत असतात. मिमांसातिर्थासारखा एका पंडिताने व अधिकारी व्यक्तीने ही माहिती दिली आहे, त्यामुळे

या गोष्टींची सत्यता समजून घेण्यासाठी सावरकरांचे सर्व साहित्य आम्ही पुन्हा एकदा चिकित्सकपणे वाचले. सावरकर सदनातील असलेल्या तत्कालीन वृत्तपत्रीय कात्रणांचे व सावरकरांच्या पत्रसंग्रहाचे होअील तितके यथाशक्ती बारकाव्याने वाचन केले, मात्र सावरकरांनी वैदिकधर्माची शिकवण केव्हा, कुठे व कशी दिली, हे मात्र आम्हाला सांपडू शकले नाही, हे आम्ही नम्रपणे कबूल करतो.

सावरकरांनी वैदिक धर्माची शिकवण देण्याचा आश्रम अथवा वर्ग कुठे उघडला होता व त्यांनी निश्चित काय शिकवण दिली, यांची माहिती आम्हाला उपलब्ध होऊ शकली नसली तरी, आपण येथे या पूर्वी त्यांचे जे धर्मविषयक विचार पाहिले आहेत, व जे लेखी स्वरुपात सर्वांनाच अभ्यासासाठी उपलब्ध आहेत, यावरुन त्यांची वैदिक धर्माविषयीची भूमिका सुस्पष्टपणे समजून येते. वैदिक धर्मातसुद्धा जगातील सर्वच धर्मांना सावरकर बुद्धिवादाच्या अग्निकुंडात घालतात व त्यांतून जे नष्ट न होता शिल्लक उरेल तेवढेच आणि तेही विज्ञानधर्म हे त्याला नाव देवून ते स्वीकारतात, याचा भरपूर लेखी पुरावा आपल्याजवळ उपलब्ध आहे. विज्ञान हाच वेद आहे; तोच आजचा धर्म आहे; वेदादी सर्व धर्म-ग्रंथाना आता कपाटात बंद करुन ठेवा; ते आता कालबाह्य झाले– असे अगदी निःसंदिग्ध शब्दात, आग्रहाने व पुनरावृत्ती करत सावरकरांनी सांगितले असताना मिमांसातीर्थ असे कसे म्हणतात, याचे आम्हाला आश्चर्य वाटते. 'ज्वलंत' आणि 'वस्तुनिष्ठ' शिकवण देणारे वेदादी धर्मग्रंथ कपाटात बंद करुन ठेवण्याचा उपदेश सावरकर कसे काय करतात हे आम्हाला अजूनही समजू शकत नाही.

वैदिक धर्मातील कालबाह्य व वाईट ठरलेल्या गोष्टीवर सावरकरांचा राग होता व अशा गोष्टी काढून टाकल्या म्हणजे उरलेला वैदिक धर्म सावरकरांना प्रिय होता, हवा होता, त्यांत त्यांना श्रद्धा होती व त्यांचीच त्यांनी शिकवण दिली, असे मिमांसातीर्थांना म्हणायचे असावे, असे आपण समजू या. या अर्थाची भूमिका फारच मोघम स्वरुपाची झाली. वैदिक धर्मातील चांगल्या गोष्टींची एक यादी व वाईट गोष्टीची दुसरी यादी, असे काही सावरकरांनी कुठे केले नाही. एखाद्या धर्मातील चांगल्या वाईटाची एक एक गोष्ट घेऊन धान्यातून खडे निवडल्याप्रमाणे ते निवड करत बसत नाहीत. वाईट भाग वगळून उरलेल्या धर्मग्रंथाची सुधारलेली आवृत्ती काढणे अशक्य असते, असे त्यांचे सुस्पष्ट मत आपण मागे पाहिले आहे.[३५] त्यांची भूमिका धर्माची किंवा धर्मग्रंथाची सुधारलेली आवृत्ती काढण्याचा वा धर्म संशोधनाचा नाही, तर संपूर्ण धर्मग्रंथच नाकारण्याचा, त्याच्या ऐवजी विज्ञान धर्माची स्थापना करण्याचा नव्हे ! सावरकरांचे हे विचार आपल्याला पटोत अगर न पटोत, योग्य असोत वा नसोत, तो स्वतंत्र प्रश्न आहे. सावरकरांचे विचार हे असे आहेत का नाहीत, ही वस्तुस्थिती समजून घेणे, हा मुख्य प्रश्न आहे. विज्ञानाला वेदाच्या सिंहासनावर स्थानापन्न करायचे व वेदाची हकालपट्टी ग्रंथालयात करायची, हा सावरकरांचा विचार आहे का नाही? हा त्यांचाच विचार

आहे असे मानणे भाग असेल तर, त्या ग्रंथालयात बंदिस्त केलेल्या वेदातील धर्माची सावरकर शिकवण देतात असे म्हणणे वदतोव्याघात होतो, हे आपण समजून घेतले पाहिजे. असे म्हटल्यामुळे सावरकर विसंगत ठरतात, हास्यास्पद ठरतात, हे मिमांसातीर्थांच्या लक्षातच आलेले दिसत नाही.

याचा अर्थ असा नव्हे की, वैदिक धर्मातील जे चांगले म्हणून शिल्लक राहते तेही सावरकरांना नको होते. मात्र जे चांगले उरते ते त्या वैदिक धर्मातील चांगले म्हणून स्वीकारणीय ठरत नाही तर, विज्ञानाच्या कसोटीनुसार चांगले ठरले म्हणून स्वीकारणीय ठरते. चांगली गोष्ट वेदांत असली तरी वेदोक्त म्हणू नये, यावर सावरकरांचा कटाक्ष आहे. वेदांतील जे चांगले असेल ते विज्ञानधर्माचा भाग म्हणून सावरकर स्वीकारायला तयार आहेत. तेव्हा वैदिक धर्मातील चांगल्या गोष्टी त्यांना हव्या होत्या, ही गोष्ट खरी असली तरी तशा म्हणण्याला अर्थ नसतो. या उरलेल्या धर्माची सावरकरांनी शिकवण दिली व उपदेश केला या म्हणण्यात तर कांहीच अर्थ नसतो.

धर्मातील जे चांगले म्हणून विज्ञानदृष्ट्या शिल्लक उरते ते स्वीकारायचे तर, जगातील सर्वच धर्मांना या बाबतीत सावरकर सारखा न्याय देतात. वैदिक धर्म मिमांसाकाराचा आणि अिस्लाम काझीचा असला भेदभाव सावरकरांना मान्य नाही. जगातील सर्वच धर्माची धर्ममते ही अखिल मानवजातीची समाअिक मत्ता आहे व ह्या सर्व धर्माची धर्मग्रंथे वैज्ञानिक भूमिकेतून वाचून त्यांतून निघालेले उपयुक्त आचार स्वीकारण्याचा मानव जातीचा समाअिक हक्क आहे, अशी सावरकरांची सुस्पष्ट भूमिका आहे. कोणत्याही धर्मातील उपयुक्त ते मानवी समाअिक संपत्ती म्हणून सर्वांनी स्वीकारावी, अशी विज्ञाननिष्ठ मानवतावादी भूमिका सावरकरांनी मुसलमानांच्या संदर्भात विचार करतांना मांडली आहे.[३६] विज्ञानाच्या भूमिकेतून एखाद्या धर्माची ग्राह्याग्राह्यता ठरविल्यावर, एखाद्या धर्माचा ग्राह्य ठरलेला भाग हा विज्ञानाचा भाग बनतो व त्या धर्मांच्या शिकवणीचा भागच राहत नसतो, ही गोष्ट आपण समजून घेतली पाहिजे. जगातील सर्वच धर्मातील चांगल्या गोष्टी सावरकरांना हव्या होत्या, एकट्या वैदिक धर्मातील नव्हे, हे समजून घेतले पाहिजे. वैदिक धर्मातील चांगल्या गोष्टींची त्यांनी शिकवण दिली, या म्हणण्याला म्हणूनच काहीही अर्थ उरत नाही.

अस्पृश्यतेविरुद्ध सावरकरांनी पाऊल उचलले व ते त्रिविक्रमाचे पाऊल ठरले, असे मिमांसाकारांनी म्हटले आहे. धर्मशास्त्रावर समाजसंस्था उभारण्याचे दिवस गेले, असा सावरकर सारखा कंठशोष करीत होते, तो मिमांसाकारांच्या कानी गेला नाही, असे कसे म्हणावे ? सावरकरांनी चातुर्वर्ण्य ह्या वैदिक धर्माच्या आत्म्यावरच घणाघाती प्रहार केला असून, त्याचे समूळ उच्चाटन हे त्यांनी आपल्या समाजक्रांतीचे ध्येय मानले. जातिसंस्थेचा व जातिभेदाचा उच्छेद हे त्यांनी आपले ध्येय मानले. वर्णसंकर हा नारकीय नसून स्वर्गीय आहे, असे त्यांनी जाहीर केले.

अस्पृश्यता हा चातुर्वर्ण्याचा व नंतरच्या जातिभेदाचा एक परिणाम आहे. चातुर्वर्ण्य नष्ट झाला तर वैदिक धर्माचे सामाजिक महत्व किती शिल्लक उरते, हा एक प्रश्न आहे. समाजाला असलेला वैदिक धर्माचा आधार व पायाच उच्छेदून टाकण्याचे क्रांतिकार्य सावरकरांना करायचे होते, हे त्यांच्या सामाजिक विचारावरुन स्पष्ट दिसते. असे असताना साध्या माणुसकीस काळीमा फासणाऱ्या अस्पृश्यतेविरुद्ध त्यानी 'पाऊल' उचलले, यात कसला विक्रम किंवा त्रिविक्रम आहे, हे आम्हाला समजत नाही. हे मूल्यमापन सावरकरावर अन्याय करणारे आहे. मुळासहित चातुर्वर्ण्याचे झाड सावरकरांना उपटून टाकावयाचे होते, याचा अजिबातही उल्लेख न करता, त्या विषारी झाडाला आलेली अस्पृश्यतेसारखी काही विषारी फळें, की जी त्या झाडाला गदगदा हलवताच गळून पडतील, त्याविरुद्ध सावरकरांनी पाऊल उचलले, हा त्यांचा त्रिविक्रम आहे, हे मूल्यमापन केवळ अन्यायकारकच नव्हे तर विपर्यस्त आहे. वैदिक धर्मात श्रद्धा असणारे सावरकरांचे बहुसंख्य अनुयायी अशाच पद्धतीने त्यांचे मूल्यमापन करतात व मिमांसातीर्थ त्यांचे प्रतिनिधीत्व करतात, असे आम्हास वाटते. ही भूमिका भक्तांना शोभण्यासारखी असली तरी सावरकरांबद्दल गैरसमज निर्माण करणारी आहे, असे आम्हास वाटते.

वैदिक धर्मातील कोणत्या तत्वाची वा आचाराची शिकवण सावरकरांनी दिली, हे मात्र मिमांसातीर्थ सांगत नाहीत. वैदिक तत्वज्ञानातील अद्वैताच्या कल्पनेविषयी सावरकरांना आकर्षण होते व या तत्वाची शक्यता मांडल्याबद्दल या तत्त्वज्ञानाचा त्यांना अभिमानही वाटत होता. याबद्दल 'अध्यात्म' या स्वतंत्र प्रकरणात आम्ही चर्चा केली आहे. या स्थलापुरते हे आकर्षण नि अभिमान गृहीत धरला तरी, त्या अद्वैताची शिकवण सावरकरांनी कुठेही दिलेली नाही. आपल्या भावाला अदंमानातून पाठविलेल्या पत्रांत त्यांनी राष्ट्र म्हणून वेदान्त तत्त्वज्ञानासारख्या उदात्त कल्पनांना अयोग्य आहेत, असे स्पष्टपणे म्हटले आहे.[३७] या गोष्टीचा विचार करण्याचे काम विधवाकडे, म्हाताऱ्याकोताऱ्याकडे सोपवले पाहिजे व तरुणानी इतिहास, राजकारण, विज्ञान, अर्थशास्त्र याचा अभ्यास केला पाहिजे, असा त्यांनी आपल्या पत्रांत स्पष्टपणे उपदेश केला, आहे. मिमांसातीर्थ म्हणतात तसा याच्या उलटा उपदेश सावरकरांनी कुठे केला हे आम्हाला अद्याप सापडू शकले नाही. तेव्हा तत्त्वज्ञानाच्या बाबतीतही वैदिक धर्माची त्यांनी शिकवण दिली हे खरे नाही. सध्याच्या जगातील कोणत्याही तत्त्वज्ञानाचे कोणतेही निष्कर्ष सत्य व वस्तुनिष्ठ नाहीत, ही सावरकरांची स्पष्ट भूमिका विचारात घ्यायला मिमांसातीर्थ तयार नाहीत, असा याचा अर्थ होतो.

धर्माची नवी व्याख्या

मिमांसातीर्थ सावरकरांना धार्मिक मानतात. त्यांना तसे मानण्यासाठी 'धर्म' या शब्दाची ते स्वतत्र व्याख्या करतात. धर्म म्हणजे काय ? असा प्रश्न उपस्थित

करुन मिमांसातीर्थ पुढे म्हणतात,[३८] "सावरकरांना धार्मिक वा अधार्मिक ठरविण्यापूर्वी धर्म म्हणजे काय, याचा वस्तुनिष्ठ दृष्टिकोणातून विचार अगोदर होणे आवश्यक आहे. आपण ज्यांला धार्मिक म्हणतो तो खऱ्या अर्थाने धार्मिक नसतोच. केवळ बाह्याचारावरुन एखादी व्यक्ति धार्मिक वा अधार्मिक ठरविणे हा निकषच चुकीचा आहे." धर्माचे स्वरुप सांगतांना ते पुढे म्हणतात, "धर्म हा आचारावर नसून तो मुख्यत: विचारावर अवलंबून असतो. धर्म म्हणजे धारणा. धारणा ही आचारापेक्षा विचारावर अवलंबून असते. जगातील बहुतेक संघर्ष त्या त्या राष्ट्राच्या विचार प्रणालीमुळे झालेले आहेत. आचार हा विचार व्यक्त करण्याचे एक बाह्य साधन होय. ज्यांच्या आचारात त्याचे विचार व्यक्त होत नाहीत, तो धर्म नसून, अधार्मिकापेक्षाही खालच्या स्तरावरील निंद्यतम आचार होय." विचार व आचारासंबंधीच्या आपल्या कल्पनांना धक्का देणारे हे मत आहे. विचाराचे अंतिम परिवर्तन आचारात करण्यासाठीच आपल्याला विचार हवा असतो. विचाराचे आचार हे फळ आहे, असे आपण मानतो. आचार कसा असावा हे सांगण्यासाठी विचार असतो व आचाराची ती पूर्व तयारी असते. कुठपर्यंत जायचे आहे हे विचाराने ठरते व तेथपर्यंत जाण्याच्या प्रवासाला आचार म्हणतात, असे आपण मानतो. आचाराविना असलेला विचार निष्फळ असतो, असे आपण मानतो. मिमांसातीर्थाचे यांच्या नेमके उलटे मत ऐकून आपल्याला धक्काच बसतो. विचारांचा आचारांशी संबंध येवू देणे, हे धारणेसाठी वाईट आहे असे त्यांचे मत आहे. याचे स्पष्टीकरण देताना ते पुढे म्हणतात, "म्हणूनच आपल्या ऋषींनी धर्माची व्याख्या करतांना आचाराशी त्याचा संबंध येवू न देता, केवळ विचाराधिष्ठित अशी व्याख्या केली आहे. ती अशी–

"यतो ऽभ्युदयनिश्रेय: प्राप्ति स धर्म :!"

ज्यामुळे अभ्युदय म्हणजे ऐहिक विकास आणि नि:श्रेयस म्हणजे आपल्यानंतही केवळ आपलाच नव्हे तर, आपल्या विचारामुळे अितराचा विकास ज्यामुळे होईल तोच धर्म होय. जगातील धर्मग्रंथात धार्माची अितकी नि:संदिग्ध आणि अल्पाक्षर व्याख्या सापडणार नाही. याच उद्देशाने जीवनात ऋतसत्य असावे, मनात असेल तेच वाणीने प्रकट व्हावे, असे सांगितले आहे. असे सांगणारा माणूस धार्मिकच म्हटला पाहिजे. धर्मानी विषमता जी नाहीशी केली ती त्यातील उदात्त विचारामुळे. उच्चनीच तत्वाला तिलांजलि दिली आणि 'आत्मवत् सर्वभूतानि' हा अमर संदेश दिला तो याचमुळे."

सावरकरांना धार्मिक ठरविण्यांचा अट्टाहास कसा असतो, यांचे हे एक उत्तम उदाहरण आहे. त्यांना धार्मिक ठरवायचे हे ठरवूनच अनुकूल अशी धर्माची व्याख्या धर्मग्रंथातून कशी शोधता येते; त्या व्याख्येचा अर्थ आपल्यासाठी अनुकूल असा कसा काढला जातो, याचे हे एक उत्तम उदाहरण आहे. दुसऱ्याचा विकास होईल असे विचार जो व्यक्त करतो, तो धार्मिकच असतो, असे मिमांसातीर्थांना वाटते.

याप्रमाणे धर्माची स्वतःची व्याख्या करुन त्यानुसार सावरकर धार्मिक आहेत, असे कुणाला वाटल्यास यात तत्वतः काहीच चूक नसते. यातील वाईट भाग एवढाच असतो की, मिमांसातीर्थ अत्यंत तात्विक व गूढ भाषेत धर्माची व्याख्या करुन सावरकरांना प्रकटपणे 'धर्मवीर' अशी पदवी बहाल करतात; सामान्य धार्मिक माणूस ही धर्माची विशिष्ट व्याख्या न समजून घेता, रुढार्थाने सावरकर धर्मवीरच आहेत, असे समजून चालतो. सावरकरांचे बहुतेक सर्व अनुयायी अशा कोणत्यातरी अर्थी सावरकर धार्मिकच आहेत, असे सांगत असतात. परिणामतः जनमानसाकरिता सावरकर कसेही असले तरी रुढार्थाने धार्मिक होतात. वैदिक धर्माची शिकवण देणारे धार्मिक सावरकर, अशी प्रतिमा जनमानसात तयार होते. सामान्य माणूस सावरकरांच्या साहित्याचा अभ्यास न करताच, असे समजून चालतो की, सावरकर हे वैदिक धर्माचा पुरस्कार करणारे धर्मवीर असलेच पाहिजेत. खरे भांडण धार्मिक या शब्दाशी नसते, या शब्दाच्या आत कोणता आशय गृहीत धरलेला आहे, यांच्याशी असते, हे आपण समजून घेतले पाहिजे.

मिमांसातीर्थांना सुद्धा रुढार्थाने सावरकर धार्मिक नाहीत, हे कबूल केल्या शिवाय गत्यंतर नसते. ते पुढे म्हणतात, " सावरकर रुढार्थाने नसतील कदाचित् धार्मिक. पण त्यांच्या विचारामुळे मात्र अगणितांना आपला धर्म कोणता हे समजून घेण्याची प्रेरणा निश्चितच मिळाली आहे. देशाकरिता सर्वोच्च त्यागाची अंतिम सीमा गाठणारे सावरकर ह्यांना आम्ही धार्मिकच मानतो. कारण मानवतेचे एकच एक असाधारण लक्षण म्हणजे इतराकरिता त्याग करणे, हे होय. " धर्मग्रंथातील श्लोकाचा आधार घेवून, रुढार्थानें सावरकर धार्मिक नाहीत हे कबूल करत, शेवटी देशासाठी त्यांनी त्याग केला म्हणून ते धार्मिक आहेत, या निष्कर्षाप्रत मिमांसातीर्थांना यावे लागले आहे. जो मानवता जाणतो, जो देशभक्ती जाणतो, वा जो इतराकरिता स्वार्थत्याग करतो, तो धार्मिक होय, अशी व्याख्या करुन सावरकरांना धार्मिक ठरविण्याला कुणाचाच विरोध असतो. एखादा कोणत्या का भूमिकेतून होईना, त्यांना धार्मिक उपाधी लावली म्हणजे, वैदिक धर्माच्या प्रचारासाठी त्यांचा उपयोग करुन घेणे सोयीचे होते. मिमांसातीर्थांनी हेच केले आहे. ते पुढे म्हणतात, " सावरकर पोथिनिष्ठ धर्माविरुद्ध जरी बोलत असले तरी ते वैदिक धर्माबद्दल मात्र नितांत श्रद्धावान होते. आपल्या प्रियभूमीचे स्वातंत्र्यसुद्धा आपल्या प्रियतम वैदिक धर्मासाठीच त्यांना आभिप्रेत होते. " या म्हणण्याला काय पुरावा आहे, हे मात्र ते सांगत नाहीत. वैदिक धर्मात निश्चित कोणत्या गोष्टीवर त्यांची श्रद्धा होती, हे ते सांगत नाहीत. कारण हे सांगितले म्हणजे वेद कपाटात ठेवून द्या, आता विज्ञान हाच आपला वेद आहे, या सावरकरांच्या शिकवणीशी यांची विसंगती येवून, या विसंगतीचा शोध घेण्याची, त्याचे बुद्धिनिष्ठ स्पष्टीकरण देण्याची जबाबदारी येवून पडते. हे टाळण्यासाठी नुसती मोघम विधाने करणे एवढेच सोईचे असते. समाजात सावरकरांविषयी जे अपसमज पसरले त्याचे एक

कारण असे निराधार लेखन हे आहे, असे आम्हास वाटते.

मिमांसातीर्थानी धर्माच्या व्याख्येसाठी जो श्लोक दिला, त्याचा अर्थही हेतुतःच ओढून ताणून आपल्या सोयीकरिता काढलेला आहे, हीही गोष्ट जाता जाता नमूद करणे आम्हाला उचित वाटते. 'धर्मशास्त्रकार' भारतरत्न पा. वा. काणे यांनी या श्लोकाचा अर्थ "ज्याच्यापासून ऐहिक आणि पारलौकिक सुखाची प्राप्ती होते तो धर्म" असा केला आहे.[३६] हिंदुध्वजावरील आपल्या लेखात सावरकरांनीही 'निःश्रेयस' याचा अर्थ पारलौकिक हित असाच दिला आहे.[३९] मिमांसातीर्थांनी निःश्रेयस शब्दाचा अर्थ 'त्याग वा परोपकार' असा वळेबळेच काढला आहे. व्याख्या धर्मग्रंथातली, त्याचा अर्थ मात्र मुलखा वेगळा, आणि त्याच्या आधारावर सावरकराना धार्मिक ठरविण्याचा हा अट्टाहास आपण समजून घेतला पाहिजे.

जगाचे कल्याण करु इच्छिणारा, समाजसेवा करणारा, परोपकार करणारा, मानवता जाणणारा, स्वार्थत्यागाची परिसिमा गाठणारा जो कोणी माणूस असतो तो धार्मिक होय, हा अट्टाहास निव्वळ सांप्रदायिक आग्रहाचा आहे. अधार्मिक माणूस हा नैतिकदृष्ट्या अधःपतित व निंद्य विचार व आचार असणारा असतो, ही या अट्टाहासा मागील भूमिका अमते. चांगल्या गुणाकरिता धार्मिक हा शब्द राखून ठेवलेला असतो, असे धार्मिकांचे म्हणणे असते. त्यांची ही भूमिका मान्य करायची तर अधार्मिक असणे ही एक दोष देण्याची वा शिवी देण्याची पद्धत आहे, हे असेच समजले पाहिजे. उदात्तपणाचा, स्वार्थत्यागाचा वा चांगुलपणाचा मक्ता एकट्या धार्मिकाकडेच असतो ही भूमिकाच विपर्यस्त आहे. या भूमिकेतून सावरकर हे अधार्मिक नाहीत असे म्हणणे म्हणजे ते स्वार्थी, अनैतिक विचाराचे, लबाड, संकुचित प्रवृत्तीचे इत्यादी नव्हते, असे म्हणण्यासारखेच आहे, हे या धार्मिकांच्या कसे लक्षात येत नाही याचे आश्चर्य वाटते.

विचाराचा आचाराशी संबंध येवू न देणारी ही धर्माची अद्वितीय व्याख्या आहे, असे ते का म्हणतात हेही समजून घेतले पाहिजे. समाजातील विषमता, उच्चनीचभाव हे धर्मानी नाहीसे केलेले आहेतच, हा त्यांचा एक मुद्दा आहे. तो त्यांनी या लेखातच स्पष्टपणे मांडला आहे. आता कुणी प्रश्न विचारील की, प्रत्यक्षात समाजात तर विषमता व उच्चनीच भाव अस्तित्वात आहेतच, मग ते नष्ट केले कसे म्हणावे? त्याला उत्तर देतांना मिमांसातीर्थ त्यांना म्हणणार की, धर्माने जी विषमता नष्ट केली, ती उदात्त विचाराने केली. त्याचा आचाराशी काहीही संबंध नाही. विचाराचा आचाराशी काहीही संबंध राहू नये हे धर्माचे तत्त्व व वैशिष्ट्य आहे, असे त्यांना का वाटते, हे आपल्या लक्षात यायला हरकत नाही. वैचारिक पातळीवर तरी विषमता व उच्चनीच भाव नष्ट झाला हे तरी कसे काय म्हणून विचाराल तर, ते उत्तर देतील की, 'आत्मवत् सर्वभूतानि' हा आमच्या धर्माचा संदेश आहे. सर्वाचा आत्मा एकच आहे, सारखाच आहे, म्हणून

विचाराच्या पातळीवर विषमतेचा व उच्चनीचतेचा प्रश्नच निर्माण होत नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. या गोष्टी आचरण्यात आणण्याची गरज नि त्रास पडू नये म्हणून आचाराचा संबंध न येवू देता केवळ विचाराधिष्ठित अशी धर्माची ही व्याख्या केलेली आहे व जगातील कोणत्याच धर्मात इतकी चांगली व्याख्या सापडणार नाही, असा त्यांचा दावा आहे.

धर्माच्या व्याख्येचा असा अर्थ काढला म्हणजे बुद्धिवादी सावरकरांना धार्मिक करुन घेता येते. वैदिक धर्माच्या प्रचाराला त्यांना जुंपता येते. 'आत्मवत् सर्वभूतानि' म्हणून समता व एकता आणण्याचे पुण्यही लाभते. आचारांशी याचा संबंध तोडल्यामुळे चातुर्वर्ण्य व उच्चनीचता हीही आचारात पाळण्याची सोय करुन ठेवता येते. असे याचे त्रिविध फायदे आहेत. वेदाचे प्रामाण्य, जन्मजात चातुर्वर्ण्य, जन्मजात उच्चनीचता, श्रुतिस्मृतिपुराणोक्तपणा, सर्व प्रकारच्या अंधश्रद्धा इत्यादी बाळगून परत सावरकरांचे अनुयायी म्हणून राहायचे म्हटल्यावर असाच काहीतरी प्रयत्न करणे भाग असते, याबद्दल मिमांसाकारांची व इतर अनेक सावरकर भक्तांची अडचण समजून घेतली पाहिजे.

मिमांसातीर्थांचे उदाहरण आम्ही येथे एक प्रातिनिधिक म्हणून घेतले. सावरकरांच्या बहुसंख्य अनुयायांचे ते प्रतिनिधित्व करतात. सावरकरांचे बुद्धिवादी विचार त्यांच्या अनुयायांना पचूच शकले नाहीत, असा याचा अर्थ आहे. सावरकरांचे बुद्धिवादी विचार पसंत नसणाऱ्यांनी त्यांना राजकारणात आपला नेता मानले. सावरकर हिंदुत्वनिष्ठ होते म्हणून त्यांना हवे होते. हिंदुत्वनिष्ठ सावरकर त्यांना धर्म संरक्षक वाटले, धर्मोद्धारक वाटले. सावरकरांचा बुद्धिवाद समजून घेतांना किती काळजीपूर्वक व सावधगिरीने त्यांच्याविषयीचे त्यांच्या अनुयायांचे विवेचन व अभिप्राय समजून घेतले पाहिजे, हे या एका उदाहरणावरुनही आपल्या लक्षात येईल.

सावरकरांच्या बुद्धिवादाची प्रखरता व भेदकता याचे थोडेसे दर्शन घडावे, या हेतूने काही निवडक गोष्टीसंबंधी, त्यांचा बुद्धिवादी दृष्टिकोण कोणता होता, हे पाहणे योग्य होईल असे आम्हास वाटते. सावरकर आपल्या बुद्धिवादाचे तीक्ष्ण शस्त्र किती तर्ककर्कशपणे, भावनाशून्यपणे व बेदरकारपणे चालवत असतात याची थोडीशी प्रचिती यावी, यासाठी पुढील प्रकरणात काही निवडक श्रद्धेविरुद्ध सावरकर आपला बुद्धिवादाचा कसा वापर करतात ते पाहू.

◆◆

४. बुद्धिवाद : कांही निवडक गोष्टीसंबंधी

सावरकर म्हणजे केवळ बुद्धिवादी विचार मांडणारे विचारवंत नव्हेत. ते बुद्धिवादाचे प्रचारक आहेत; प्रत्यक्ष आचारक आहेत. निवडक गोष्टी घेवून बुद्धिवादी पद्धतीने विचार कसा करावा, याची लोकांना ते शिकवण देतात. लोकांच्या मनातील एखाद्या नाजुक श्रद्धेला निवडून त्या श्रद्धेवर ते बुद्धिवादाचे घणाघाती प्रहार करतात. त्यांच्या बुद्धिवादाची प्रखरता समजून घ्यायची असेल तर त्यांचे हे प्रहार किती तीक्ष्ण, भेदक व भावनोच्छेदक होते, हे काही निवडक प्रसंगी पाहणे, उद्‌बोधक होईल, असे आम्हास वाटते.

यज्ञ

'यज्ञ' ह्या संस्थेचे वैदिक धर्मामध्ये किती महत्व आहे, हे सांगण्याची गरज नाही. " पुरुष सूत्रामध्ये यज्ञ व धर्म याचा संबंध सांगितला आहे. 'देवांनी सर्वस्व समर्पण करुन यज्ञ केला व त्यांनी जे काही केले तोच प्रथम धर्म झाला' असे पुरुष सूक्तात म्हटले आहे. याचा अर्थ वेद कालापासून यज्ञकर्म हाच धर्म मानण्यात येत होता. "[१] प्राचीन काळी यज्ञ म्हणजेच वैदिक धर्म असे समीकरणच झाले, यज्ञापासून पर्जन्य, पर्जन्यापासून अन्न व अन्नापासून प्राणिमात्र उत्पन्न झाले म्हणून यज्ञ या कर्माचे महत्व गीताही वर्णन करीत आहे.[२] यज्ञयागादी जो सोडील तो धर्मास मुकला, असे मिमांसकाचेच म्हणणे आहे. अशा या वैदिक धर्मात कर्माचा प्राण असलेल्या यज्ञाला सावरकर गंगेत विसर्जन करायला सांगतात. यज्ञ हा ऐहिक व पारलौकिक या दोन्ही अर्थी कसा निरर्थक व टाकावू आहे, ही गोष्ट एकेक

मुद्दा घेऊन ते पटवून देतात. ज्या अग्निपूजेवर हा यज्ञ आधारलेला आहे, ती अग्निपूजाच अधर्म आहे, हे सावरकर रोखठोकपणे सांगतात. सावरकरांनी वैदिक धर्माची शिकवण दिली, असे जे म्हणतात ते ही गोष्ट सोयीस्करपणे विसरुन जात असले तरी, अभ्यासकाला ही गोष्ट विचारात घेतलीच पाहिजे.

सावरकर म्हणतात,[३] " आता अग्नीचा मनु संपला असून विद्युत रेडियमचे मन्वंतर चालू आहे. अग्निपूजेपासून प्राचीन काळी होणारे व्यावहारिक लाभ आता मुळीच होणारे नसल्यामुळे आणि त्याची निर्जीव, भावनाशून्य नि नियमबद्ध जड द्रव्यात गणना झाल्यामुळे त्याचे देवत्वच नव्हे तर राक्षसत्वही नष्ट झाले आहे. तिथे त्या अग्नीची पूजा करावी, प्रार्थना करावी, नसती पर्वा कसली! " अग्नीची पूजा हा अधर्म आहे, अज्ञान आहे, असे सावरकरांनी टाहो फोडून सांगितले. ते म्हणाले, [४] " अग्नीचे जे ठराविक वैज्ञानिक सृष्टिनियम आहेत त्याच्या अनुरोधे, त्याचा मनुष्यजातीस जो उपयोग करुन घेता येतो, तो करुन घेत राहणे, हाच मार्ग या वैज्ञानिक युगातील खरी नि प्रत्यक्ष फलदायी अग्निविधा होय. या उपयोगास्तव त्या जड, मनुष्यभावनाहीन नि ज्ञप्तिहीन सृष्ट पदार्थाची कृतज्ञता वा उपकार मानण्याचेही काही एक कारण नाही. आगगाडीच्या अंजिनाचे आभार मानण्याचे कारण नाही, गिरणीच्या बंबाची पूजा जशी खुळी, तशीच यज्ञकुंडाची वा अग्यारीची ! " सावरकरांचा बुद्धिवाद एखादी धर्मश्रद्धा कशी मुळासकट उच्छेदून टाकू पाहतो, हे यावरुन आपल्या लक्षात येईल.

गंगेत विसर्जन

यज्ञाने पाऊस पडतो ही गीतेतही सांगितलेली श्रद्धा कशी भाबडी व असत्य आहे, हे पटवून देवून शेवटी सावरकर म्हणतात,[५] " या पुढे मात्र या आगीत तुपाचा एक थेंबही व्यर्थ न ओतता बुद्धाप्रमाणे ही सारी यज्ञसामुग्री नि यज्ञकुंड गंगेत विसर्जणेच उचित आहे ! 'यज्ञांत् भवति पर्जन्यः' हे सूत्र खोडून 'विज्ञानदेव पर्जन्यः' हे सूत्र आपल्या नव्या स्मृतीत घातले पाहिजे."

यज्ञाने पाऊस पडतो हे सृष्टिनियमाने कसे खोटे आहे, हे पटवून दिल्यावर सावरकर पुढे म्हणतात [५] " आणि यज्ञाचे वणवे सारखे पेटलेल्या भारतवर्षामध्ये दहावर्षात जितके दुष्काळ पडतात, तितके दमडीच्या आगपेटीत त्या अग्नीला कोंडून टाकणाऱ्या युरोपमध्ये शंभर वर्षांत पडत नाहीत. यज्ञमंत्र आणि पर्जन्यसूक्तें म्हणून म्हणून भारतवर्षाचा कंठ कोरडा झाला तरी या धार्मिक मतास पर्जन्य भीक घालीत नाही. पण तिकडे रशियात पहा ! पर्जन्याचे वैज्ञानिक सूक्त शोधून काढले जाताच आता कोणीही आणि पावसाळा नसला तरी केव्हाही 'पर्जन्या पड !' म्हटले की, पर्जन्य झकत पाया पडतो ! "

यज्ञामुळे वातावरण शुद्ध होते, ही श्रद्धा खुळचट आहे हे पटवून दिल्यानंतर सावरकर म्हणतात,[६] " बरे तूप जळल्याने वातावरण निरोगी होते हेच जरी

यज्ञाचे मुख्य समर्थन असले तरी तसल्या सोप्या गोष्टीसाठी हवा यज्ञीय कर्मकांडाचा हा अवाढव्य नि किचकट व्याप कशास हवा होता ? त्या यज्ञकुंडाचे बूड अितकेच रुंद, त्याचे कोन अमुकच, ते दर्भ अितकेच, त्या समिधा अितकी बोटेच लांब, केंव्हा बसून तूप ओतणं तर केंव्हा ऊठून, लक्षावधी रुपायापर्यन्तचा तो व्यय हया विधीत लेशमात्र चूक होताच घ्यावी लागणारी ती गाईचे शेणमूत पिणारी नित्याहूनही त्रासदायक प्रायश्चिते, हे अगडबंब प्रकरण काय नुसते आगीत तूप ओतल्याने वातावरण शुद्ध होते, अेवढचा साध्या आणि संदेहास्पद लाभासाठी? तेवढाच हेतु असेल तर चुली पेटतातच आहेत की ! त्यातच वटकुलीभर तुप ओतले की झाली गृहशुद्धी, नि म्युनिसिपल झाडूवाले जेव्हा डांबर प्रभृति चौकातून जाळतात तेव्हा त्यातच त्यांना तपेली तपेली तूपही जाळण्यास सांगितले की नगरशुद्धि सहजा सहजी होत राहती ! " आणि मग सावरकर सहस्त्रावधि यज्ञ व अग्निहोत्र चाललेल्या ह्या भारतात महामारी, प्लेग, व रोगाचे कसे साम्राज्य पसरले आहे, पण यज्ञ-द्वेष्टचा युरोपात मात्र आरोग्य व आयुर्मान कसे वाढत आहे, याचे विसंवादी चित्र उभे करतात.

यज्ञामुळे पारलौकिक लाभ होताच हे कसे खोटे आहे हे सांगताना, यज्ञा-विषयी म्हणावयाचे मंत्र, करावयाच्या क्रिया, याविषयी धर्मशास्त्रात ज्या परस्पर विसंगति आहेत, त्या दाखवून देवून, यापैकी कोणत्या पद्धतीने यज्ञ करावा, म्हणून सावरकर प्रश्न उभा करतात. आणि निष्कर्ष काढतात, ७ "यज्ञ केव्हाही निःसंदेह-पणे, यथातथ्य पार पडता येणे दुर्घटच असणार ! अर्थात त्याच्या यथासांगतेवर अवलंबणारी पारलौकिक फळेही सदा संशयास्पदच राहणार !" सावरकरांच्या बुद्धिवादाचे प्रहार किती चतुरस्त्र, भेदक व तीव्र होते, हे त्यांच्या या विचारांवरुन आपल्या स्पष्टपणे लक्षांत येते.

यज्ञ ही धर्मश्रद्धा आहे. अद्यापही ती टिकून आहे. वैदिकधर्माचा तो प्राणच आहे. अशा या धर्मश्रद्धेबद्दल सावरकर किती विदारकपणे लिहतात, हे आपण पाहात आहोत. अशामुळे लोकांना काय वाटेल यांची त्यांना अजिबात चिंता नाही. उलट ते म्हणतात. ८ "जे हे सांगितल्याने स्वतःच्या प्रौढीच्या पोकळ वल्गना करीत राह-णाऱ्या आपल्या शब्दनिष्ठ बाबा वाक्यं प्रमाणं प्रवृत्तीचे बोकाळलेले अवसान खचले; तिचा तेजोभंग झाला, तर त्यांत राष्ट्राचे हित आहे." बुद्धिवादाचा प्रसार करण्या-साठी व लोकांना तो शिकविण्यासाठी अशी एखादी धर्मश्रद्धा घेवून तोवर तीव्र प्रहार केले पाहिजेत, बुद्धिवादाच्या अग्निकुंडात त्या धर्मश्रद्धेला घातले पाहिजे, या भूमिकेतून यज्ञ, वैदिक धर्माचा प्राण असलेला एक विषय, त्यांनी निवडलेला आहे, हे लक्षांत ठेवले पाहिजे.

गायीची निवड

बुद्धिवादाचा प्रसार करण्यासाठी सावरकरांनी 'गाय' ही दुसरी गोष्ट

निवडली आहे. या निवडीसंबंधी ते म्हणतात, [८] " हा फुटकळ धर्मसमजुतीचा प्रश्न नाही. अशा धार्मिक छापाच्या ज्या शेकडो खुळचा समजुती आपल्या लोकांची बुद्धिहत्त्या करीत आहेत, त्या भाकडप्रवृत्तीचा आहे. तिचे एक उपलक्षण म्हणून आम्ही गायीची गोष्ट तेवढी निवडली." आणि ही निवड कशी योग्य ठरली या बद्दल ते दुसऱ्या एका लेखात म्हणतात, [९] " धर्मभोळचा भाबडेपणापायी आमची तारतम्यबुद्धि किती पंगू झाली आहे, हे चव्हाठ्यावर आणण्याचे कामी आम्ही निवडलेले हे गाय प्रकरण अपेक्षेपेक्षाही अधिक परिणामकारक ठरत असल्यामुळे आम्ही या विषयाची चर्चा आणखी एक वर्षभर तरी तशीच करीत राहणार आहोत." तेव्हा गायीचा प्रश्न गायीपुरता मर्यादित नाही; तर तो प्रश्न बुद्धिवादाची लोकांना शिकवण देण्याचे एक माध्यम वा साधन वा कार्यक्रम म्हणून सावरकरांनी योजिले आहे, हे लक्षात घेतले पाहिजे, व याच भूमिकेतून त्यांच्या गायीविषयक विचाराकडे पाहिले पाहिजे.

हिंदूच्या ठिकाणी आजही गायीविषयीची किती पवित्र श्रद्धा आहे व तिची पाळेमुळे किती खोलवर आहेत, हे लक्षात घेतले म्हणजे ५०-६० वर्षांपूर्वी या गायीबद्दल सावरकर किती बेदरकारपणे व तर्ककठोरपणे बोलत होते, याची तीव्रता आपल्या लक्षात येईल. गाय ही माता नव्हे, देवता नव्हे, ती एक उपयुक्त पशु आहे, एवढेच सौम्य व समजूतदार भाषेत बोलून सावरकर थांबत नाहीत. त्यांच्या बुद्धिवादाच्या माऱ्याने एखादी धर्मश्रद्धा भूकंपासारखी भंग पावते, हे गायीच्या प्रकरणीही आपल्याला आढळून येईल.

माणसाचा गाढवपणा

सावरकर म्हणतात, [१०] " मनुष्य मनुष्य आहे व गाय वा बैल पशु आहेत, तोवर मनुष्याने त्याच्याहून सर्व गुणांत हीनतर असलेल्या पशूस देव मानणे म्हणजे मनुष्यास पशुहूनही नीच मानण्यासारखे व माणुसकीस कमीपणा आणणारे आहे. मनुष्याहून सर्व गुणात अत्युच्च असलेल्या प्रतिकासच मनुष्याच्या देवाचे प्रतिक मानणे उचित. गाढवाने पाहिजे तर त्याहून श्रेष्ठ पशु असलेल्या गायीस देवी मानावे; पण मनुष्याने तसे मानण्याचा गाढवपणा करु नये." गायीला देवता मानणें हा गाढवपणा आहे, अशा भाषेत सावरकर गायीबद्दलच्या धर्मश्रद्धेची चिकित्सा करतात. गाय ही बैलाची माता आहे, मनुष्याची नव्हे, अशा भाषेत सावरकर या धर्मश्रद्धेवर तुटून पडतात. गायीला देवता मानतो तो गाढव, माता मानतो तो बैल– अशा भाषेत सावरकर आपल्या बुद्धिवादाचा प्रसार करतात, हे समजून घेतले पाहिजे. धर्मश्रद्धेला प्रचंड धक्के देणे, या हेतूने ही भाषा सावरकर वापरतात, हे लक्षात घेतले पाहिजे. बुद्धिवादाच्या नव्या धर्माची प्रस्थापना करायची म्हटल्यावर असे करणें त्यांना भागच होते.

मनुष्य व गाय यांच्यातील आत्मा एकच आहे व त्यांच्यातील भेद हा माया

सृष्टीतील आहे, या प्रतिपक्षाच्या मुद्याचे खंडन करताना सावरकर म्हणतात,[११] "गोरक्षण न करता गोभक्षण कां करु नये? ब्रह्मवादाने दोन्ही लटकी किंवा दोन्ही खरी आहेत, स्वीकार्य आहेत. भक्षण आणि रक्षण हा भेदच ब्रह्मसृष्टीत नाही. 'नासतो विद्यते भावः नाभावो विद्यते सतः' ही ब्रह्मसृष्टि! मग गोभक्षण कां करु नये?" नुसताच तात्विक अर्थी व युक्तिवादाकरिता गोभक्षण कां करु नये असा प्रश्न करुन सावरकरांचा बुद्धिवाद थांवत नाही तर, हिंदूनी गोभक्षण करणे केव्हा कसे कर्तव्य आहे, हेही तो सांगत असतो.

मग गोहत्त्याही पुण्य!

सावरकर म्हणतात,[१२] "हिंदुराष्ट्राच्या सैनिक शक्तीचे मर्मच असा एखादा दुर्ग वा प्रत्यक्ष राजधानी शत्रूने वेढली. अन्न संपले. तरीही टिकाव धरल्यास बाहेरुन दुसरे हिंदुसैन्य चढून त्याचा फडशा पाडण्याचा संभव, अशा प्रसंगी युद्धास निरुपयोगी ते पशु मारुन खाण्यावाचून उपाय नसला तर, तो दुर्ग वा राजधानी हितशत्रूचे हाती पडू देण्यापेक्षा आणि तशी राष्ट्रहत्त्या करण्यापेक्षा, वेढ्यातील अवश्य तेवढ्या गायी मारुन खाणे, ती गोहत्त्या करणे, हाच खरा हिंदुधर्म होय!" हिंदूनी गायी खाण्यास हरकत नाही, किंवहुना वेळप्रसंगी तसे करणे हाच खरा हिंदुधर्म होय, असा सावरकरांचा उपदेश कोणत्या हिंदूना आवडेल? सावरकर हिंदुधर्म हा शब्द वापरत असतात, पण त्याचा तो हिंदुधर्म सावरकरांचा असतो, तुमचा आमचा नसतो, हे समजून घेतले पाहिजे. सर्व हिंदूनी बुद्धिवादी होणे, हाच खरा हिंदुधर्म आहे, असे त्यांना वाटत असे. त्यांचा हा हिंदुधर्म विज्ञानधर्माच्या समानार्थी आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. सावरकरांनी हिंदुधर्म शब्द वापरला की, त्याकडे बोट दाखवून पहा सावरकरांना कसा हिंदुधर्माचा अभिमान व त्यात श्रद्धा आहे, असा युक्तिवाद फसवा व दिशाभूल करणारा असतो, हे समजून घेण्याची सावधगिरी आपण बाळगली पाहिजे.

गाय हा एकटाच उपयुक्त पशु नसून जगात इतरही अनेक उपयुक्त पशु आहेत, मग त्यांचीही पूजा कां नको, असा स्पष्ट सवाल सावरकर करतात. यात कुत्रा, घोडा, म्हैस, बैल इतकेच नव्हे तर गाढवाचाही समावेश आहे. गोहत्त्या पाप तर म्हैसहत्त्या, गाढवहत्त्या पाप का नाही म्हणून ते विचारतात! "गाढव इतके उपयुक्त नि इतके प्रामाणिक, इतके सोशिक असते, म्हणून त्यास पशु न मानता आजवर कोणी त्याची देवता बनविली किंवा एखादी गाढवगीता रचून गाढव संप्रदाय काढला आहे काय? कुंभार देखील गाढव पाळणे इतकेच कर्तव्य समजतो; गाढवपूजन नव्हे!" असे गोपूजा आणि गाढवपूजा अगदी एका पातळीवर ते आणून ठेवतात.[१३] किती श्रद्धाशून्यपणे व भावनाविदारकपणे सावरकर एखाद्या नाजुक अशा धर्मश्रद्धेवरसुद्धा तुटून पडतात, हे यावरुन आपल्याला लक्षात येते.

भारतात जी गोष्ट प्रकटपणे सांगायला कठीण असते, ती गोष्ट भारता-

बाहेरील एखाद्या देशाचे उदाहरण घेवून सावरकर अप्रत्यक्षपणे सांगत असतात. मॅझिनीचे आत्मचरित्र भाषांतरित करण्यामागील त्यांचा हेतू हाच होता. केमाल-पाशाच्या तुर्कस्थानचे चित्र आपल्या लेखात उभे करण्याचा त्यांचा हेतू हाच होता. देव धर्म न मानणाऱ्या रशियाचे उदाहरण तर ते नेहमी देतात. विज्ञाननिष्ठेकरिता युरोप हे ठरलेलेच उदाहरण असते. गायीच्या प्रकरणी अमेरिकेचा दाखला अशाच पद्धतीने सावरकर देतात.

अमेरिकेचा दाखला

अमेरिकेच्या बाजारात फेरफटका मारला तर काय चित्र दिसते याचे अतिशय सुंदर वर्णन सावरकर करतात. तेथे मांसाची दुकाने ओळीनें मांडलेली असतात, त्या मांसात गोमांसच असे मुख्य मांस असते. गायीच्या वा वासराच्या विविध मृतभागाचे अवशेष विक्रीकरिता सुव्यवस्थितपणे टांगलेले असतात. गिऱ्हाइकाच्या तोंडाला पाणी सुटावे म्हणून मांसावर रक्त शिंपडतात. अशा प्रकारचे सविस्तर मांसाळ वर्णन केल्यानंतर ते मांस घरी आणल्यावर तेथील लोक मुख्यान्न म्हणून ते कसे चवीने व आवडीने खातात, याचेही असेच वर्णन सावरकर करतात. त्यांच्याच भाषेत सांगायचे तर,[१४] "त्यांच्या प्रार्थना, टेबलावर गोमांसाच्या शिजविलेल्या तंगड्या, खांदे, जिभाच्या ढिगारा रचून, म्हटल्या जातात नि देवाला तो गोमांसाचा नैवद्य अर्पिण्यात येतो. पंगतीतून आग्रहाने गोमांस वाढण्यात येते. आईबाप, मुलेमुली, निःसंकोचपणे आपण भात खातो तसे प्रत्यही तेच एक मुख्यान्न म्हणून सारे युरोपियन, अमेरिकन गोमांस खातात. आपल्या इकडे गोमांस खाणारे हिंदू लोक जसे केवळ अपवाद, तसेच गोमांस न खाणारे युरोपियन, अमेरिकन केवळ अपवाद; हजारी दहा देखील आढळणार नाहीत." ५०-६० वर्षां पूर्वी सावरकर गोपूजक हिंदूच्या पुढे कोणते चित्र उभे करीत होते, हे पाहिले म्हणजे आपली बुद्धी आश्चर्याने चकित होऊन जाते.

आणि मग सावरकर सांगतात की, आपल्याकडील गोभक्त म्हणतात त्याप्रमाणे अमेरिका आपल्याप्रमाणे गयाळ व गोपूजक झालेले आहे, हे पूर्ण खोटे आहे. 'Cow is the foster mother of the human race' या अमेरिकनांच्या विधानाची साक्ष आपल्या बाजूनी आपल्याकडील कांही गोभक्तांनी काढली होती. या विधानाचा अर्थ काय होतो याचे स्पष्टीकरण करतांना सावरकर म्हणतात,[१४] "गाय ही मनुष्यजातीला लाभलेले एक महान वरदान होय! कारण की गायीचे नि वासराचे मांस हेच आमच्या राष्ट्रांचे मुख्य मांसान्न होय!!" अशी अमेरिकेची धारणा आहे. अमेरिकेत गायीचे माहात्म्य का आहे, याचे हे कारण आहे. "ती दूध देते तोवर दुधावर, आटते तेव्हा तिच्या गोमांसावर, यथेच्छ ताव मारता येतो म्हणून अमेरिका गायीचा प्रतिपाल करते."[१५] असे सावरकर स्पष्टपणे म्हणतात. सावरकरांचे हे विवेचनच अितके भावनाविघातक व प्रक्षोभक आहे की, असे काही

करण्याचा हिंदूना उपदेश करण्याची शक्यता नव्हती. तरीही या संबंधात सावरकर म्हणतात,[१५] "अमेरिका गोमांस खाते, म्हणून ते आम्ही खावे किंवा खावू नये, असा या दोन गोष्टींचा निर्णायक संबंध नाही." याचा स्पष्ट अर्थ दोन्हीही बाजूने हिताहित पाहून निर्णय घेण्यस आपण हिंदु स्वतत्र आहोत, असा होतो. सनातन्यांनी आपल्या बाजूने बोलावलेल्या साक्षीदाराची त्यांच्यावरच उलटलेली ही साक्ष आहे. सावरकर गाईला उपयुक्त पशू म्हणत, तेव्हा तिच्या दुधापुरतीच वा तिने दिलेल्या बैलापुरतीच ही उपयुक्तता मर्यादित आहे असे समजण्याचे कारण नाही, असा याचा अर्थ होतो, हे उघड आहे.

गोमांस खाण्याबद्दल सावरकर दुसऱ्या एका लेखात म्हणतात की,[१६] "मनु कांदा खाणे नरक गामी नि डुकराचे मांस सुद्धा खाणे महापुण्य समजतात. अितर स्मृति अगदी याच्या उलट! त्याच प्रमाणे गोमांसाची गोष्ट. ती वैद्यक, आर्थिक नि अंशत: ममताळूपणाचा प्रश्न... म्हणून राष्ट्रीय दृष्टचा अपरिहार्य असेल तर गोमांस खाण्यात काही पारलौकिक 'पाप' आहे, असे मनांत सुद्धा आणण्याचे कारण नाही. परराष्ट्राच्या गायीविषयी तर आर्थिक बाजूही विचारात घेण्याचे कारण नाही. अमेरिका जर स्वत:च गोमांस खाऊ आहे, तर तेथील गाईचे मांस त्यांनीच शिजवलेले त्यांच्यासह खाण्यास आम्हास कां मळमळून यावे?" सावरकरांच्या अनुयायांनाही कधीच पसंत पडला नाही, असा हा उपदेश सावरकर करत होते, हे लक्षात घेतले पाहिजे.

१९५२ मध्ये 'पूरक अन्न' या विषयावर भाषण देतांना सावरकर म्हणाले,[४१] "स्वातंत्र्य आले! ह्या पुढे तुम्हाला परदेशांतही जावे लागेल. तेथे कोणाचेही पंक्तीला बसून कांहीही खावे लागेल. त्यावेळी जे जे आरोग्यदृष्टचा योग्य असेल ते ते अन्न तुम्ही खाले पाहिजे." या पेक्षा सावरकरांनी अधिक स्पष्ट तो कोणता उपदेश करावा? गाईचे मांस आरोग्यदृष्टचा योग्य नसते, हे विज्ञानाने सिद्ध करणे एवढेच आता आपल्या हातात शिल्लक राहते. हे सिद्ध न झाल्यास सावरकरांची मते चुकीची आहेत व ती आम्हाला पसंत नाहीत, एवढेच म्हणणे बाकी उरते. मात्र ही मते प्रखर बुद्धिवादावर आधारलेली आहेत, या बद्दल शंका घेण्यास जागाच शिल्लक नाही. पण डॉ. य. दि. फडके यांना हा बुद्धिवाद आहे, हे मान्य नाही. त्यांच्या मते[४२] मांसाहाराचा प्रकट पुरस्कार करणाऱ्या व गाईला उपयुक्त पशु मानणाऱ्या सावरकरांच्या या मतामागे हिंदुराष्ट्र बळकट बनविण्याची त्यांची अिच्छा होती. मांसाहारामुळे राष्ट्र बळकट होते म्हणून गाईला सावरकर उपयुक्त पशु मानतात, हे संशोधन खरोखरच अजब आहे. गाईला पशु मानल्याने राष्ट्र बळकट कसे होते, हे फडके यांनी पटवून सांगितले पाहिजे. गाईचे कळप समोर करुन लढाया हरण्याची वेळ शत्रू यापुढे आपल्या स्वतंत्र राष्ट्रावर आणतील, असे सावरकरांना वाटत होते, असे फडके यांना म्हणावयाचे आहे की काय?

भागवतातील गोकुळ

तिसऱ्या एका लेखात सावरकर अभिमानाने सांगतात, [१७] "खरोखर आज कुठे भागवतातील गोकुळ पृथ्वीवर नांदत असेल तर तो गोमांसभक्षक असताही गाईस एक उपयुक्त पशु मानूनच काय ती तिची जोपासना करणाऱ्या गोपालक अमेरिकेत होय. आणि गाईस देवता म्हणून पोसणाऱ्या, तिचे शेणमूतही पिण्यास पुण्य मानणाऱ्या भारतात कोणत्या गोसंस्था नांदत आहेत? मुख्यतः पांजरपोळ आणि कसाईखाने!" सावरकरांचा बुद्धिवाद धर्म भावनेचा उच्छेद करीत कुणाचीही कसलीही भीडमुर्वत न ठेवता किती खोलवर जातो, हे यावरुन स्पष्ट होते. 'अमेरिकेत भागवतातील गोकुळ' आहे, असे म्हणणाऱ्या सावरकरांनी वैदिकधर्माची शिकवण दिली, असे मिमांसाचार्य धर्मपंडितानेही म्हणावे, हे खरोखर आश्चर्यजनक आहे!

भक्तांना नापसंत

गाअीबद्दलची सावरकरांची ही भूमिका व टीका त्यांच्या अनुयायांना मुळीच पटत नसे. वस्तुतः सावरकरांचे नि गाअीचे कांही भांडण नव्हते. बुद्धिवादाचा प्रसार करण्यासाठी गाअीचे प्रकरण त्यांनी एक साधन म्हणून निवडले होते. बुद्धिवादी पद्धतीने विचार कसा करावा हे शिकविण्यांसाठी गाय हे एक गणितातल्या सारखे त्यांनी एक उदाहरण म्हणून निवडले होते. यज्ञ हे दुसरे उदाहरण होते. या उदाहरणावरुन बाकीचे गणिते सोडविणे हे लोकांचे काम होते. त्यांच्या अनुयायांचे तर होतेच होते. अनुयायांनी हे काम पत्करले असते तर सावरकरांच्या बुद्धिवादी विचाराचा कांहीतरी प्रसार झाला असता; पण असे घडले नाही. त्यांच्या अनुयायांना सावरकरांचा हा बुद्धिवादच पसंत नव्हता. गाअीबद्दलची त्यांची ही भूमिका त्यांना पसंत नव्हती. त्यांचे हे विचार होअील तितके दुर्लक्षित करणे किंवा अतिसौम्य भाषेत व कांही प्रसंगी विकृत करुन सांगण्यासही ते कमी करत नसत. गाअीबद्दलचा हा सारा विचार त्यांनी हिंदुसाठी सांगितलेला आहे, हे उघड आहे, हिंदूना खिजविण्यासाठी मुसलमानांनी गाअी मारल्या तर ते मात्र सावरकराना आवडत नसे. पहिला 'खुळचटपणा' तर हा दुसरा 'दुष्टपणा' होय, असे त्यांना वाटे. त्यांचा बुद्धिवाद या दोन्हीही गोष्टीचा समाचार घेत असे. "ह्यास्तव त्या अहिंदूनीही तो धार्मिक 'गोद्वेष' सोडून देवून, आर्थिक दृष्टीने गोरक्षण हेच कर्तव्य समजावे" असे सावरकर अहिंदूना सांगतात. 'गायः एक उपयुक्त पशु' या सुप्रसिद्ध लेखाच्या शेवटी त्यांनी हे म्हटले आहे.[१८] वस्तुतः अहिंदूना केलेला हा उपदेश सावरकरांच्या आतापर्यंत पाहिलेल्या त्यांच्या गाईविषयीच्या विचाराशी कुठेही विरोधी नाही. हा अुतारा अुद्धृत करुन बाळाराव सावरकर आपल्या सावरकर चरित्राच्या रत्नागिरी पर्वात लिहतात, [१९] "हा अुतारा मी हेतुतः दिला आहे. कारण गाय मारलीच पाहिजे, असे सावरकर सांगतात असे जे

स्वतःला सुधारक समजणारे हिंदु समजतात, त्यांनी हा भागही अवश्य लक्षात ठेवावा. याच विचाराने वीर सावरकरांच्या अुपस्थितीत पतितपावनात गोपूजन होत असे."

'गाय मारलीच पाहिजे', असे सावरकरांचे म्हणणे आहे, असे कुणाचेच म्हणणे नाही. शुद्धीवर असलेला कोणताही माणूस असे म्हणणार नाही. हा आरोप मुळातच निराधार आहे. 'आर्थिक दृष्टीने' गायीकडे पाहावे, यातच सावरकरांनी सर्व काही सांगून टाकले आहे. हिंदूनी व मुसलमानांनी दोघांनीही गायीकडे भक्तीने किंवा दुष्टपणाने न पाहता आर्थिक दृष्टीने पाहावे, या सावरकरांच्या उपदेशात कुठेही विसंगती नाही. अहिंदूना केलेल्या या उपदेशाची ढाल हातात घेऊन सावरकर अनुयायांना गोपूजेची तयारी करता यायची नाही. "याच विचाराने वीर सावरकरांच्या उपस्थितीत पतितपावनत गोपूजन होत असे" असे अत्यंत खळबळजनक विधान कोणताही पुरावा न देता त्यांनी केले आहे. ही गोपूजनाची घटना केव्हा घडली, तेव्हा कोण कोण उपस्थित होते, तत्कालीन वृत्तपत्रात याची वार्ता आली होती काय इ. कोणत्याही गोष्टींचा उल्लेख बाळाराव करीत नाहीत. बाकी घटना दिनांकवार लिहणाऱ्या बाळारावांनी या घटनेचा पुरावा देवू नये, हे आश्चर्यजनक आहे. गोपूजेवर घणाघाती प्रहार करणारे लेख किर्लोस्करादी मासिकांत एकीकडे प्रसिद्ध होत असतानाच, दुसरीकडे त्याच कालावधीत पतितपावनात सावरकर गोपूजनाचे कार्यक्रम घेत होते, असा बाळारावांच्या म्हणण्याचा अर्थ आहे. सावरकर हे एक दुटप्पी वर्तणुकीचे दांभिक गृहस्थ होते, असेच त्यांना सुचवायचे आहे. रत्नागिरी हिंदुसभेचे १९२४ ते ३७ या कालखंडातील रत्नागिरीतील कार्यक्रमांचे दोन प्रतिवृत्त प्रसिद्ध झालेले आहेत. त्यांत पतितपावनात घडलेल्या कितीतरी कार्यक्रमाचा बारीकसारीक तपशील आहे, पण या घटनेचा उल्लेख नाही. ही घटना घडली असती तर, गोभक्तांनी आपल्या वृत्तपत्रात या घटनेचा मनसोक्त प्रचार केला असता. मात्र अशा कोणत्या वृत्तपत्राचा बाळाराव उल्लेख करत नाहीत. मग या घटनेचा पुरावा काय? गोपूजेवर श्रद्धा असणाऱ्या एखाद्या अनुयायाची आठवण, हा याचा पुरावा असावा. पण तोही त्यांनी सांगितला नाही.

ही घटना घडली असे गृहीत धरले तर, बाळाराव सावरकरांवर फार मोठी जबाबदारी येवून पडते, असे आम्हास वाटते. गायीची पूजा हवी तर गाढवाने करावी, पण तसे करण्याचा गाढवपणा मनुष्याने करु नये, असे निःसंदिग्धपणे सांगणारे सावरकर, त्याच कालावधीत, गोपूजेचे कार्यक्रम घडवून आणीत होते, ही गोष्ट सावरकरांच्या दांभिकपणाचा पुरावा असते व या गोष्टीची सुसंगति लावण्याची, स्पष्टीकरण देण्याची जबाबदारी या गोष्टी मान्य करणाऱ्या त्यांच्या अनुयायावर येवून पडते, असे आम्हास वाटते. अशी जबाबदारी पार न पाडता गैरसमज निर्माण करणारी निराधार विधाने वस्तुस्थिति म्हणून साधार चरित्रात मांडणे, हे सावरकरांवर अन्याय करणारे आहे. अशी विधाने केल्यामुळे

सावरकरांचा सारा बुद्धिवाद आपण पाण्यात घालतो आहोत, हे बाळारावांच्या लक्षात आले नाही, असे कुणीही म्हणू शकणार नाही.

जाता जाता एक गोष्ट इथे आम्ही नमूद करू इच्छितो. यज्ञ, सत्यनारायण इ. गोष्टी सावरकरांना मान्य नव्हत्या. या गोष्टींवर त्यांनी प्रखर टीका केलेली आहे. तथापि यज्ञ वा सत्यनारायणाला सावरकर उपस्थित राहत. याची कारण-मिमांसा आम्ही पुढील " अंधश्रद्धेशी तडजोड' या प्रकरणात करणार आहोत. यज्ञ किंवा सत्यनारायण हे कशाचेतरी प्रतिक मानून त्या कार्यक्रमाला सावरकर जात असत. सामाजिक सुधारणेसाठी अशा कार्यक्रमाचा ते उपयोग करवून घेत. थोडीशी हानि च अधिक लाभ असे त्यांचे याप्रसंगी धोरण असे. यज्ञाला वा सत्यनारायणाला ते आपला नवा अर्थ देत. शब्द जुने, मात्र त्यातील आशय नवा, बुद्धिवादाकडे झुकलेला; अशी त्यांची पद्धत असे. असा यज्ञ वा सत्यनारायण आणि गोपूजा या एक नव्हेत. गोपूजा ही असत्याची पूजा आहे. गोपूजा हा बुद्धिहत्येचा प्रकार आहे. जुनी प्रतीके नवा अर्थ देवून समाजसुधारणेच्या कार्यक्रमासाठी वापरण्याचा हा प्रकार नव्हे. या विषयी सावरकरांची भूमिका सविस्तरपणे आम्ही पुढील प्रकरणात मांडली आहे.[४३] त्यामुळे त्यांची इथे आम्ही पुनरावृत्ती करत नाही. तेव्हा जसे सत्यनारायणाला सावरकर उपस्थित राहत तसेच गोपूजेलाही राहत, असे समर्थन देता येणार नाही.

गोरक्षण मंडळाच्या चौंडे महाराजांनी गोरक्षणाची म्हणजे गोहत्याविरोधी चळवळ सुरु केली होती. त्यावेळेस सावरकर हिंदुमहासभेचे अध्यक्ष होते. त्या काळात हिंदूच्या धर्मभावना दुखविण्याच्या कार्यास त्यांनी आवर घातलेला होता. चौंडे महाराजांनी या चळवळीच्या समर्थनासाठी काढलेल्या पत्रकावर सावर-करांच्या पत्नी माई सावरकरांची सही मागितली होती. सावरकरांची संमति घेवून माईनी अशी सही केल्याचे, व त्या सहीला " लाख मोलाची सही " म्हणून चौंडे महाराजानी गौरविल्याची घटना खरी आहे. ही घटना आपण समजू शकतो. गोरक्षणाच्या कार्यासाठी पत्नीला अशा पत्रकावर सही करु देणे वेगळी गोष्ट आहे, व गोपूजनाला आशिर्वाद देणे ही गोष्ट वेगळी आहे, हे समजून घेतले पाहिजे. माझी पत्नी देवळात जावून पूजा करीत असेल तर मी तिच्यावर माझ्या मताची सक्ती करु शकत नाही, असे स्वतः बुद्धिवादी आगरकरांनीच म्हटले आहे.[२८] पण स्वतः सावरकरांनीच सही केली हे बाळारावाचे विधान[४४] मात्र निराधार आहे.

श्री. पु. गोखले यांनी " अशी गर्जली वीरवाणी " या संवादग्रंथात गायीबद्दल सांगितलेली एक घटना अत्यंत बोलकी आहे.[२१] गोहत्याविरोधीची चळवळ चालू होती. शिवाजी पार्कवर भरणाऱ्या सभेत भाषण करण्याचे निमंत्रण देण्यासाठी आंदोलक मंडळी गेली होती. सावरकरांनी हे निमंत्रण स्वीकारण्यास नकार दिला. ते म्हणाले, " मी गाईला पवित्र मानीत नाही. माझ्या मातेचा मान मी तिला

देवू शकत नाही. मी गाईला एक उपयुक्त पशु मानतो. माझी मतें पक्की आहेत. ती सभेत मांडली तर तुमचा कार्यनाश होओील....." अेवढे बोलल्यावरही एक कार्यकर्ता म्हणाला की, " तरीही आपले मत गोहत्त्या बंद व्हावी असेच असेल म्हणून आम्ही आपणाला विनंती करावयास आलो." त्यावर सावरकर म्हणाले की, " गोहत्त्या तुम्ही म्हणता, त्या अर्थी बंद व्हावी, असा माझा आग्रह नाही. अन्न-धान्याची, दाण्यागोटाची, नि चारापाण्याची टंचाई असतांना निरुपयोगी, म्हाताऱ्या व भाकड गाओीचे खिल्लार आपण पोसावे हे मला कधीच मान्य होणार नाही." स्वतंत्र भारतातील सावरकरांचे हे विचार आहेत. गाओीविषयीची त्यांची भूमिका रत्नागिरीला असतांना जशी होती तशीच स्वातंत्र्योत्तर काळातही आढळते. गोहत्त्या विरोधी साधे भाषण करायला सावरकर जिथे तयार नाहीत, ते सावरकर गोपूजनाला आशिर्वाद देण्याची सुतराम् शक्यता नाही.

एका गोष्टीचा येथे खुलासा करणें अवश्य आहे. १९३७ ते ४३ हे सात वर्ष सावरकर राजकारणात होते व हिंदूमहासभेचे अध्यक्ष होते. ते सर्व प्रकारच्या हिंदूंचे नेते होते व सर्वांना त्यांच्या बरोबर घेवून जायचे होते. या काळात त्यांना सर्व हिंदूंची संघटना करायची होती, निवडणुका लढावयाच्या होत्या, त्या जिंकायच्या होत्या ! गाओीला माता मानणारे बैल व देवता मानणारे गाढव अशी भाषा राजकारणात कुणालाही वापरता येत नसते. या काळात सावरकरांनी बुद्धिवादाच्या प्रसाराला आवर घातलेला आहे. त्याची भाषा थोडी बदललेली आहे. या काळांत त्यांनी तडजोड केली– पण ती अंधश्रद्धा पाळणाऱ्या माणसाशी केली; अंधश्रद्धेशी नाही. तडजोड प्रखर भाषेशी केली; वृत्तीशी नाही. लोकांची मने दुखावणार नाहीत, याची काळजी त्यांनी या काळात घेतली ही गोष्ट खरी आहे. गोपूजा मानणाऱ्या हिंदूंना सावरकरांनी बहिष्कृत केलेले नव्हते, अस्पृश्य लेखलेले नव्हते. त्यांच्याशी ते संबंध ठेवीत. त्यांच्या मदतीनेच राजकारण करीत. गोपूजा करणाऱ्याला सावरकरांचे अनुयायी होण्याला वा हिंदुसभेचे सभासद होण्याला प्रतिबंध केलेला नव्हता. तसे करणे राजकीयदृष्टयाच नव्हे तर सामाजिकदृष्टयाही अव्यवहार्य होते. हे धोरण ठेवणे भाग असेल तर, अनुयायांच्या गोपूजेकडे थोडेसे दुर्लक्ष केले याचा अर्थ त्यांना गोपूजन मान्य होते असा घेणे पूर्णतः चुकीचा आहे. बुद्धिवादी सावरकर वेगळे व राजकीय पुढारी सावरकर वेगळे असे लोकांना या मुळे वाटू लागले. पण या काळातही त्यांनी कधी विचारांशी तडजोड केलेली नाही, हे समजून घेतले पाहिजे. राजकारण करतांना सावरकरांनी असाच बुद्धिवादाचा प्रचार का केला नाही हा प्रश्न विचारणे चुकीचे आहे. एक माणसे जोडण्याचे क्षेत्र आहे, तर दुसरे माणसे तोडण्याचे आहे, हे समजून घेतले पाहिजे. त्यामुळे या काळातील त्यांचे विचार, बुद्धिवादाच्या अभ्यासासाठी अत्यंत सावधगिरीने वापरले पाहिजेत. राजकारण करण्याचा त्यांचा हक्क जर आपल्याला मान्य करायचा असेल तर बुद्धीवादाचा प्रचार त्या काळापुरता थांबविण्याचे त्यांचे धोरणही आपल्याला

मान्य करणे भाग आहे. बुद्धिवादाचा प्रचार सोडून त्यांनी राजकारण कां करावे, हा स्वतंत्र प्रश्न आहे व त्याचा विचार हिंदुत्वाच्या स्वतंत्र प्रकरणांत आम्ही केलेला आहे.

बुद्धिवादी पद्धतीने विचार कसा करावा हे सांगण्यासाठी गायीचे प्रकरण सावरकरांनी निवडले होते, ही गोष्ट त्यांचे अनुयायी पूर्णपणे विसरून गेले. गाअीबद्दलची सावरकरांची भूमिका अतिशय सौम्य भाषेमध्ये ते मांडत असतात. सावरकरांची पूर्वीची गाअीबद्दलची भूमिका नंतरच्या काळात बदलली असे त्यांचे म्हणणे असते. सावरकरांनी गाअीबद्दल असे कांही लिहिले नसते तर फार बरे झाले असते, असे त्यांना मनोमन वाटत असते. एका लोकसभा निवडणुकीत हिंदुमहासभेच्या उमेदवारांच्या विरुद्धबाजूने सावरकरांचे गाअीविषयीचे लेख छापून मतदारात वाटण्यात आले. वि. घ. देशपांडे दोन ठिकाणाहून निवडून आल्यामुळे रिकाम्या कराव्या लागलेल्या जागेची ही निवडणूक होती. त्यामुळे हिंदुमहासभेला यशाची फार आशा होती. या प्रचाराला उत्तर म्हणून गाअीबद्दल लेख लिहिणारे सावरकर हे वेगळे आहेत, असा प्रचार हिंदुमहासभेतर्फे करण्यात आला. निवडणुकीमध्ये गाअीबद्दलचे सावरकरांचे वरील विचार जनतेसमोर ठेवून निवडून येणे किती कठीण असते हे अशा प्रसंगी लक्षात येते. बुद्धिवादाचा आणि निवडणुकीचा दोन्हीही प्रचार करणाऱ्या सावरकरांसमोरील ही समस्या आपण समजून घेतली पाहिजे, त्याचप्रमाणे गोपूजकांचा अनुनय आणि सावरकरांचे अनुयायी या दोन्हीही गोष्टी एकदाच साध्य करू अिच्छिणाऱ्या अनुयायांसमोरील अडचणही आपण समजून घेतली पाहिजे. अशा प्रसंगी सावरकरांना गोपूजनासाठी बसविण्याचा किंवा वेगवेगळ्या दोन सावरकरांचा सिद्धांत मांडण्याचा त्यांनी केलेला प्रयत्न हाही आपण उदार मनाने समजून घेतला पाहिजे.

सावरकरांनी अितके बुद्धिवादी विचार व्यक्त करावेत हे त्यांच्या कांही बुद्धिवादी म्हणविणाऱ्या विरोधकांना अजिबात पसंत नसते. जिथे शंकेला कसलाही वाव नाही, त्या ठिकाणीही सावरकरांचे विचार विकृत पद्धतीने मांडण्याची त्यांची पद्धत असते. गाअीबद्दलचे सावरकरांचे विचार कुणाला पसंत असतील वा नसतील, पण ते विचार स्पष्ट आणि निःसंदिग्ध आहेत, याबद्दल कुणाचाही मतभेद असू नये, अशी आमची समजूत आहे. सावरकरांनी व्यक्त केलेल्या गाअीबद्दलच्या विचाराचे कित्येक बुद्धिवाद्यांनी मनसोक्त स्वागत केले, या स्वागताला डॉ. य. दि. फडके 'बेहद खूष' झाले असे उपहासाने म्हणतात.[२२] गोपूजा सावरकरांना मान्य नव्हती, याचे कारण सावरकर बुद्धिवादी होते, हे नव्हे, असे डॉ. फडके यांचे मत आहे. त्यांच्या मते 'त्याचे कारण लिंगपूजा, पशुपूजा, वृक्षपूजा, प्रभृती धर्म ही धर्माची तामस नि अपकृष्ट स्वरुपे आहेत'[२१] असे सावरकरांचे मत होते, हे होय. सावरकरांविषयी गैरसमज पसरविण्याचा विडा काही लोकांनी कसा उचलला आहे, हे याबरुन आपल्याला लक्षात येईल. असे हे विरोधक व ते अनुयायी

दोघांनी मिळून सावरकरांवर कसा व किती अन्याय केलेला आहे, हे आपण समजून घेतले पाहिजे.

अंत्ययात्रा

एखाद्या धर्मश्रद्धेवर सावरकरांच्या बुद्धिवादानी प्रहार केला, की ती धर्मश्रद्धा अक्षरशः छिन्नविछिन्न होऊन जाते. हिंदूच्या अंत्ययात्रेच्या तिरडीच्या पद्धतीवर त्यांनी असाच तीव्र हल्ला केला आहे. अत्यंत गैरसोयीची ही पद्धत असून ती तावडतोब बंद केली पाहिजे, असा त्यांचा आग्रह आहे. तिरडीवरील प्रेतयात्रेचे ते असे अत्यंत उपहासगर्भ व विडंबनात्मक वर्णन करतात की, वाचणाऱ्याला त्या अंत्ययात्रेविषयी किळसच वाटू लागावी. प्रेत कसे न्यावे या विषयी ते पुढे म्हणतात, "पक्या बंद, स्वच्छ पेटीत प्रेत झाकून नेणे सोईस्कर असते." [२३] व हीच पद्धत वापरावी असे ते सुचवितात. ही पद्धत मुसलमान-ख्रिश्चनाची आहे, हे आपण लक्षात घेतले म्हणजे, सावरकरांचा बुद्धिवाद पचवणे हिंदूना किती अवघड आहे, याची प्रचिती येते. चांगली व उपयुक्त गोष्ट मग ती जगातील कोणत्याही धर्मात असो, समाईक मानवी संपत्ति म्हणून आम्ही स्वीकारणार, स्वीकारली पाहिजे, ही त्यांची धर्मभेदाला छेदून जाणारी बुद्धिवादी भूमिका येथे आपल्याला पाहण्यास मिळते.

जोडयाने पूजा

देवभोळेपणावर ते जेव्हा तुटून पडतात तेव्हा उपहास, विडंबन या साऱ्या अस्त्रांचा वापर ते देवावर करतात. वटपिंपळावर देव असतो व म्हणून तो वृक्ष तोडू नये, याबद्दल ते म्हणतात, [२४] "वटपिंपळातले हे हिंदुदैवत इतके भ्याड आहे की, ते मुसलमान इंग्रजांपुढे शेपूट घालते. भित्यापोटी ब्रह्मराक्षस! त्याला भजणाऱ्याच्या मानगुटीस बसणारा आणि भंगणाऱ्याचे पाय पाटणारा भ्याड! बायकोचा बाजीराव व चावडीचा मारखावू, असा आमचा हा वटपिंपळदेव आहे असे मानणे, म्हणजे आपल्या देवाची निव्वळ टवाळी करणे नव्हे काय?" ज्या भाषेत सावरकर ह्या देवभोळेपणावर टीका करतात ती भाषा त्यांच्या देवाविषयीच्या अश्रद्धेचा पुरावा आहे.

संकटात वाचवतो म्हणून सत्यनारायणाची पूजा करायची असेल तर, त्यांनीच संकटात ढकलेले म्हणून त्याची यथेच्छ शोभा करायला नको काय? असा सावरकरांचा स्पष्ट सवाल आहे. [२५] सूर्य, पृथ्वी, गृहगोल इ. जडवस्तु असून त्यांची पूजा असत्य आहे, असे त्यांना वाटते. गायत्री मंत्र म्हटले काय की सूर्यपूजा केली काय, त्यामुळे सूर्यापासूनचा उन्हाचा त्रास काही चुकत नसतो. गायत्री मंत्राचे अक्षरही न घेणारा सूर्यास शिव्या देत, मात्र पायात जोडा घालून व डोक्यावर छत्री घेऊन उन्हात चालला तर त्या माणसाला सूर्य काहीच करु शकत

नाही. हे सांगून सावरकर म्हणतात, [२६] "म्हणजे सूर्यास प्रसादविण्याचे धार्मिक साधन जे जप ते नसून वैज्ञानिक साधन जो जोडा ते होय! जपापेक्षा जोड्यानेच शनिसूर्यांची पीडा पुष्कळ कमी होते!" सावरकरांच्या या भाषेतून त्यांच्या बुद्धिवादाची प्रखरता, श्रद्धाशून्यता व निर्भयपणा आपल्याला स्पष्टपणे समजून येतो.

गणितशास्त्रामध्ये एखाद्या सूत्राचा अगोदर अभ्यास केला जातो. त्या सूत्राचा वापर करुन नमुन्यादाखल काही गणिते सोडविली जातात. त्यामुळे त्या सूत्राचा वापर कसा करावा व त्या सूत्राचे बारकावे कोणते याचे ज्ञान मिळते. गणितशास्त्रातील या पद्धतीप्रमाणे सावरकरांच्या बुद्धिवादाचे मुख्य सूत्र आपण अगोदर समजून घेतले. या प्रकरणात त्या सूत्राचा सावरकर प्रत्यक्षात कसा वापर करतात याची काही निवडक उदाहरणे घेवून आपण पाहिले. या उदाहरणामुळे त्यांच्या बुद्धिवादाची खोली, व्यापकता, दिशा व स्वरुप अधिक स्पष्टपणे आपल्या लक्षात येतात.

जनमानसाची प्रतिक्रिया

सावरकरांच्या या विज्ञाननिष्ठेचा, भावनाविदारक भाषेत केलेल्या प्रचाराचा, परिणाम लोकमानसावर त्या काळात काय झाला, याची थोडक्यात पाहणी करणे उचित ठरेल. या विचारामुळे त्यांना लोकांनी नास्तिक, पाखंडी व धर्मबुडवे ठरविले. अशाच प्रकारचा बुद्धिवाद आगरकरांच्या तोंडून समाजाने ऐकला होता. प्रा. विद्याधर पुंडलिक म्हणतात त्या प्रमाणे, सावरकरांच्या बुद्धिवादाचे प्रहार आगरकरांपेक्षाही अधिक आक्रमक, अधिक झोंबरे व भेदक होते.[२७] त्यांच्या ह्या विचाराची त्या साठ वर्षापूर्वीच्या अंधश्रद्धेत बुडालेल्या समाजावर काय प्रतिक्रिया झाली असेल हे पाहणे उद्‌बोधक ठरेल.

गायीबद्दलच्या सावरकरांच्या प्रचाराची तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करताना 'गोरक्षण' पत्र म्हणते, [२८] "गोपूजा भावना जर भाबडेपणा असेल तर निर्जीव मातीस पितृभू व पुण्यभू म्हणून कवटाळणे हा शतपट भाबडेपणा मानावा लागेल. 'धेन्युर्मय महामाता' ही व्याख्या जर बैलाला शोभण्यासारखी असेल तर सावरकरांची लाडकी व्याख्या मातीत आदराने व प्रेमाने लोळणाऱ्या गाढवासच शोभेल." सावरकरांच्या 'हिंदू'च्या व्याख्येबद्दलचा हा उल्लेख आला आहे. देशाला माता मानणे हे बुद्धिवादी कसे, असा हा या श्रद्धाळू माणसाचा तार्किक प्रश्न आहे.

सावरकरांची विज्ञाननिष्ठा कशी अपूर्ण आहे हे सांगताना गो. म. जोशी गोरक्षपत्रात लिहतात, "अर्जुन लढण्याच्या ऐवजी भिक्षा मागत हिंडत असता तर हिंदुराष्ट्राचे कोणते नुकसान झाले असते, हे काही दे. भ. नी विज्ञानशास्त्राचे आधारे कोठेही दाखविलेले नाही"[२९] विज्ञाननिष्ठेच्या प्रचाराचा परिणाम

लोकांना विचारप्रवृत्त करण्यात कसा हातभार होता याचा हा पुरावा आहे.

दा. न. शिखरे यांनी गोरक्षण पत्रांत लिहिले की,[३०] " सर्व हिंदूच्या भावनांचे अेकुलते एक स्थान आज मितीलातरी गाय हेच आहे..... बुद्धिवादासाठी मोहरूया क्षम्य मानण्याची मुर्दाड शिकवण देता कामा नये..... स्वातंत्र्यवीरांचे हे म्हणणे केवढे माईचे पाप व हिंदुसमाजाचे नष्टचर्य !..... त्याचा चाहता म्हणेल, 'What a fall.' सावरकरांच्या या विचारांने किती खळबळ उडवून दिली होती हे यावरुन कळून येते.

प्रमोदकार लिहतात,[३१] " निव्वळ बुद्धिवादी (Rationalist) लोकांचे हातून धाडसाची, शौर्याची अगर स्वार्थत्यागाची कृत्ये झाल्याचा अितिहासाचा दाखला नाही व त्याचे हातून तसे कार्य होणे अशक्य आहे. आपण राष्ट्राकरिता कष्ट भोगले ते काय आपण बुद्धिजीवी होता म्हणून भोगले ?..... आपल्याला हा दगडधोंड्यांनी बनलेला प्रदेश माता, राष्ट्रमाता वाटली, तर धार्मिक लोकांना गाय ही गोमाता वाटली तर, त्या लोकांना वैलोबा म्हणावे, हे सभ्यतेला सोडून आहे..... तरीही ' हिंदुधर्मप्रेमी म्हणून आपणास माझी विनंती आहे की, लोकांचे मनांतील धर्मप्रेम कमी होअील, असे कृत्य अगर लिखाण करु नये. निदान त्यांचे मनातील देव्हाऱ्यात राष्ट्राची देव म्हणून स्थापना होण्याचे अगोदर तरी करु नये. नाहीतर बहुजन समाजाचे मन जागृत देवस्थानाअैवजी रिकामी खोली बनून जातील." सावरकरांच्या बुद्धिवादाचा कसा परिणाम होत होता याचा त्याकाळचाच हा प्रत्यक्ष पुरावा आहे.

आगरकरांशी तुलना करतांना ' विद्याविलास ' ने म्हटले आहे.[३२] " निर्भिड आणि बौद्धिक साहित्य निर्मितीच्या बाबतीत कदाचित कै. गो. ग. आगरकर यांनाही ते मागे सारतील. म्हणून ' सावरकर साहित्य ' म्हणजे ' बौद्धिक साहित्य " असे समीकरण मी नक्कीच करुन टाकले आहे !..... बुद्धि हा मानवी मनाचा भाग सावरकरांनी आक्रमित केला आहे. परंतु ' भावना ' हा जो मानवी मनाचा दुसरा भाग आहे, याकडे लक्ष दिलेले नाही, ही खेदाची गोष्ट होय " एका सनातनी सुधारकाची ही प्रतिक्रिया अत्यंत बोलकी आहे. ' बौद्धिक साहित्य ' हा वरील शब्दप्रयोग ' बुद्धिवादी साहित्य ' या अर्थी आलेला आहे, हे लक्षात घेतले पाहिजे.

सावरकर व आंबेडकर यांच्यात धर्माबाबत कांहीच फरक नाही, हे सांगतांना ' प्रमोद ' मध्ये म्हटले आहे,[३३] " बॅ. सावरकर व डॉ. आंबेडकर यांच्यात जर कोणता फरक असेल तर तो खरोखर तत्वाचा नसून तपशीलाचा आहे. मग सावरकरांना अेवढे रागाने फणफणण्याचे काय कारण ?..... यात सावरकरांनी आपल्या बुद्धिवादाची अजिबात रजा घेतलेली आहे, असे स्पष्ट म्हणावे लागते... केवळ विज्ञानाच्या पायावर एखाद्या धर्माची अिमारत अुभारता येईल हे खरे, पण त्याला कांही हिंदुधर्म असे म्हणता येणार नाही." आंबेडकर धर्मांतर करणार

आहेत या संबंधातील ही टीका आहे. दोघेही हिंदुधर्म बदलायला तयार आहेत, असा या लेखकाचा आरोप आहे. सावरकरांचा विज्ञानधर्म हा हिंदुधर्म नव्हे, ही वरील टीका फार महत्त्वाची आहे. ही गोष्ट सावरकरांना कळू नये, या अर्थी सावरकरांनी बुद्धिवादाची रजा घेतलेली आहे, असे वर म्हटले आहे.

सावरकर विरुद्ध शंकराचार्य

बुद्धिवादी विचार मांडताना सावरकर कुणाचीही भीडमुर्वत ठेवत नसत, याचे एक उदाहरण अत्यंत बोलके आहे. डॉ. कुर्तकोटी शंकराचार्य हे पुरोगामी विचाराचे शंकराचार्य होते. सावरकरांच्या सामाजिक सुधारणांना त्यांचा हातभार लागलेला होता. अस्पृश्यता, वेदोक्तबंदी, शुद्धी, सहभोजन इ. बाबतीत त्यांचे सावरकरांशी मतैक्य होते, परंतु त्यांचे म्हणणे असे की, [३४] "सावरकर म्हणतात की, आवश्यक तर आम्ही नवी प्रथा पाडू. माझे म्हणणे आपल्या पूर्वजांनी इतक्या गोष्टी सांगितल्या आहेत की, आपण त्याचाच आधार घ्यावा. नवीन सांगण्याची कांहीच आवश्यकता नाही." शंकराचार्यांनी सावरकरांच्या बुद्धिवादाचे केलेले हे वर्णन अत्यंत मार्मिक आहे. चांगल्या गोष्टीचा आधार काय राहावा, हाच खरा वादाचा प्रश्न आहे. सनातनी सुधारक हे आपल्या धर्मशास्त्रातच चांगल्या गोष्टीचा आधार शोधत असतात. सावरकर यासाठी आपल्या धर्मशास्त्राकडे पाहायलाच तयार नाहीत. सावरकर हे नुसते प्रखर बुद्धिवादी नव्हते, तर प्रत्यक्ष सुधारक होते. शंकराचार्यांना सुद्धा प्रत्यक्ष सुधारणेच्या कार्याला त्यांनी लावून दिले होते. दोघांच्या धर्मविषयक मतामध्ये जमीन अस्मानाचे अंतर असतांनाही, तारतम्याने व विवेकाने शंकराचार्यांना सांभाळून घेऊन, त्यांच्यावर लोकांच्या असलेल्या श्रद्धेचा उपयोग करून, त्यांच्या हातूनही होईल तितकी सुधारणा करवून घेणे, हे सावरकरांचे धोरण होते.

तथापि सावरकरांचा बुद्धिवाद इतका प्रखर की, श्रद्धा दुखवू नये हे तारतम्य त्यांना अनेक वेळा राहत नसे. एवढेच नव्हे तर ते हेतुतः तसे करीत. शंकराचार्यांच्या तोंडावर व तेही जाहीर भाषणात ते शंकराचार्यांचीच बुद्धिवादी चिकित्सा करीत. असा एक प्रसंग शंकराचार्यांच्याच भाषेत पाहणे उद्‌बोधक ठरेल. एका समारंभाच्या प्रसंगाविषयी शंकराचार्य म्हणाले, [३५] "सावरकरांच्या या भाषणामुळे गोंधळ माजला. सावरकर ऐकेनात, लोक ऐकेनात. तेव्हा मी सभा बंद झाल्याचे सांगून सभेतून बाहेर गेलो... सावरकरांच्या ज्या शब्दामुळे लोक चिडले या शब्दाचा भावार्थ असा : आचार्यांच्या पीठावरील व्यक्ति म्हणजे सर्वांसारखीच स्खलनशील असते. इतकेच नव्हे तर मरणाला देखील पात्र अशी असते. पण मनाचा समतोल न राहिल्यामुळे ते घसरले, ही गोष्ट खरी. पण या संबंधी लोकांनी भागोजी शेठजीकडे तक्रार केली, तेव्हा शेठजी म्हणाले, तुम्ही सावरकरांच्या गुणाकडे पहा, एक दोन शब्दाकडे नको." पुढे शंकराचार्यांनी

सांगितले की, सावरकरांच्या या स्वभावामुळे संत पाचलेगांवकर महाराज, मसूरकर महाराज, चौंडे महाराज आदीही रागावले.

प्रत्यक्ष शंकराचार्यदिखत जाहीर सभेत शंकराचार्य हे माणूस आहेत, माणसासारख्याच त्यांना विस्मृती होतात, सामान्य माणसासारखेच त्यांनाही मरण येते, हा बुद्धिवाद सावरकर सांगतात. अस्पृश्यास देवळाच्या गाभाऱ्यात जाऊन पूजा देण्याच्या नियमास शंकराचार्यांनी पूर्वसंमती दिली होती, मात्र आता ते तशी दिली नव्हती म्हणतात, याचा अर्थ शंकराचार्यांनाही विस्मृती झाली असावी– कारण ते एक मनुष्य आहेत, असा सावरकरांच्या भाषणातील टिकेचा रोख होता. लोकांचे श्रद्धास्थान असलेल्या शंकराचार्यांबद्दल असे बोललेले लोकांना पसंत न पडल्याने सभेत गोंधळ झाला. संत पाचलेगावकरांसारख्या अत्यंत पुरोगामी विचार असलेल्या महाराजांनाही सावरकरांचा हा भीडमुर्वत न ठेवणारा बुद्धिवाद पसंत पडत नसे. 'मनाचा समतोल न राहिल्याने' या शंकराचार्यांनी दिलेल्या कारणाचा अर्थ, 'बुद्धि व श्रद्धा' याचा समतोल न राहिल्याने, असाच होतो, हे समजून घेतले पाहिजे. सावरकरांनी आपल्या बुद्धिवादाने बेदरकारपणे व निर्भयपणे मूर्तिभंजनाचे काम केलेले आहे. धर्मात श्रद्धा असणारा माणूस धर्मातील वाईट भागावर टीका करतो, पण मूर्तिभंजन करत नसतो. म्हणून धनंजयकीर म्हणतात,[३६] "सावरकरांचे सर्वाधिक ठळक वैशिष्ट्य असे की, आशियाने आजवर निर्माण केलेल्या मूर्ति-भंजकामध्ये ते एक सर्वश्रेष्ठ ठरणारे कीरांचा हा अभिप्राय फार महत्त्वाचा आहे.

सावरकरांच्या या बुद्धिवादाच्या प्रचाराचा परिणाम असा झाला की, या माणसापासून आपला वैदिकधर्म वाचवला पाहिजे, असे लोकांना वाटू लागले. त्यासाठी रत्नागिरीला १९३३ मध्ये 'सनातन वैदिक धर्मसभा' ही संस्था स्थापन करण्यात आली. सनातनी धर्मपरिषदा भरु लागल्या. लोणी येथे भरलेल्या 'सनातनी धर्मपरिषदेने' सावरकरांच्या निषेधाचा ठराव केला व त्यांना 'स्वेच्छाचारप्रवर्तक, धर्म भावनाविघातक' अशा पदव्या बहाल करण्यात आल्या.

दुःखाची गोष्ट ही की, सावरकरांच्या बुद्धिवादाचा हेतू, मांडणी, व प्रखरता इतकी सुस्पष्ट असतानाही आमच्या बुद्धिवादी विचारवंतांनी त्यांच्या या बुद्धिवा-दाची दखल घेतली नाही, क्रांतिकारक सावरकर म्हणजे समुद्रात उडी मारुन पोहून जाणारे अशी जशी जनसामान्यांची प्रथमदर्शनी समजूत असते, तशीच बुद्धिवादी सावरकर म्हणजे गायीला उपयुक्त पशु मानणारे सावरकर अशी आमच्या या बुद्धिवाद्यांची समजूत असते. डॉ. फडके सारख्यांना तर हीही गोष्ट कबूल नाही. सावरकरांच्या बुद्धिवादाची सर्वंकषता समजून घेण्याचा त्यांनी कधी प्रयत्नच केला नाही. सावरकरांच्या हिंदुत्वनिष्ठेला परवडेल तेवढीच बुद्धिनिष्ठा सावरकरांना हवी होती, हा विरोधकाचा आक्षेप याच गैरसमजातून निर्माण झालेला आहे. ना आमच्या या बुद्धिवाद्यांनी त्यांची बुद्धिनिष्ठा समजून घेतली ना हिंदुत्वनिष्ठा!

सावरकरांच्या हिंदुत्वनिष्ठेमुळे त्यांचे मन प्रथमदर्शनीच एवढे कलुषित व पूर्वग्रह-दूषित झाले की, या पैकी काहीही निकोप व निःपक्षपाती दृष्टीने समजून घेण्यासाठी त्यांच्याकडे अभ्यासू दृष्टीच उरली नाही. हिंदुत्वनिष्ठेसाठीच त्यांना बुद्धिवाद हवा होता, येथपासून तो शस्त्र आणि राष्ट्र यांच्या पलिकडे सावरकरांना काहीही कळत नव्हते, येथपर्यंत चाटेल ते आरोप करायला आमचे हे बुद्धिवादी विरोधक मोकळे झाले. सावरकरांना समजून घेण्यासाठी निकोप मन त्यांच्याकडे राहिलेच नाही. कोणताही धर्मग्रंथ न मानणाऱ्या; सर्वच धर्मग्रंथांना आता कपाटात बंद करुन ठेवण्याचा निःसंदिग्ध उपदेश करणाऱ्या; धर्मसंस्थेवर समाज उभे करण्याचे दिवस संपले म्हणून आक्रोश करणाऱ्या; आता विज्ञान हा एकच देव, धर्म, धर्मग्रंथ म्हणून या नव्या विज्ञान धर्माचा पोटतिडीकीने पुरस्कार करणाऱ्या; जगातील सर्वच धर्माचा, धर्मग्रंथांचा समत्वाने व ममत्वाने आदर करण्याचा पण अनुकरण न करण्याचा उपदेश करणाऱ्या; समाजाची बुद्धिहत्या होवू नये यांचीच सतत चिंता वाहणाऱ्या व हे करत असताना लोकांच्या शिव्याशाप खाणाऱ्या सावर-करांना प्रखर बुद्धिवाद्याच्या पहिल्या रांगेत बसविण्यास आमचे बुद्धिवादी तयार नसतात, ही बुद्धिवादाच्या दृष्टीने अत्यंत दुःखाची गोष्ट आहे! आणि या गोष्टीचे त्यांच्या अनुयायांना दुःख होत नसते, हे मात्र खरोखर सावरकरांचे दुर्दैव आहे!!

× × × ×

समारोप

या पहिल्या विभागात सावरकर धर्मचिकित्सा कशी करतात, हेच आपण प्रामुख्याने पाहिले आहे. धर्मग्रंथाचे प्रामाण्य झुगारुन देणे हा या धर्मचिकित्सेचा मूळ पाया आहे. एकदा हे प्रामाण्य संपले की, बुद्धीच्या आधारे धर्मातील चांगल्या-वाईटाची निवड करण्यास मनुष्य स्वतंत्र बनतो. धर्मापासून मानवी बुद्धीला मुक्त करणे याचा अर्थ हाच असतो. या प्रक्रियेलाच धर्मचिकित्सा म्हणतात.

सावरकरांना धर्म मान्य होता, पण 'बाबा वाक्यं प्रमाणं'ची प्रवृत्ती त्यांना पसंत नव्हती, असेही म्हटले जाते. ही भूमिका फारच मोघम होते, असे आम्हास वाटते. सर्व धर्माचा मूळ पाया 'बाबा वाक्यं प्रमाणं'च आहे, असा धर्मचिकित्सेचा निष्कर्ष आहे. यातील 'बाबा' कोण हाच वादाचा मुद्दा आहे. मूळ धर्म आणि त्या धर्माला नंतर आलेले विद्यमान रुप यात फरक करुन, या नंतरच्या रुपांतरित धर्माच्या कर्त्याला बाबा म्हणण्याची एक पद्धत आहे. मूळ धर्माच्या संरक्षणासाठी या अर्थीच्या बाबा वाक्यंची ढाल धर्मनिष्ठ मंडळी वापरत असतात. त्यांच्यामते धर्माचा भाष्यकार चुकू शकतो, मूळ धर्मसंस्थापक चुकू शकत नाही. नव्या परंपरा व रुढी चुकू शकतात, मूळ धर्म चुकत नसतो. शेवटी व्यवहारात धर्माची कितीही व्यापक व्याख्या केली तरी ऋषीमुनींनी सांगितलेला तोच धर्म, हाच मूळधर्माचा

अर्थ असतो, हे प्रा. कुरुंदकरांचे मत अगदी खरे आहे?' वावा वाक्यं ' मधील वावा कोण, हाच वादाचा खरा मुद्दा असतो. जेथे वेदाचेच प्रामाण्य सावरकर नाकारतात तेथे वाकीच्या वावांचा प्रश्नच नसतो. वेदाचे प्रामाण्य नाकारले की, वैदिकधर्माचा डोलारा साफ कोसळून पडतो. सध्याच्या वाईट रुढी, घातक अंधश्रद्धा, कालवाह्य कर्मकांडे, अनिष्ट परंपरा आपण नाकारतो नि वेदाना–श्रुतीना शरण जातो. धार्मिकाची धर्मचिकित्सा याच स्वरुपाची असते.

सावरकर वावा वाक्यं हे वेदप्रामाण्याला मानतात, कुराणाला मानतात, वायवलला मानतात, हे लक्षात घेतले पाहिजे. वाबाच काय पण आजोवा, पंजोवा, पडपंजोवा कुणाचेही प्रामाण्य मानायचे नाही, ही त्यांची बुद्धिवादी भूमिका आहे. अशा वेळेस प्रामाण्य फक्त बुद्धीचेच शिल्लक उरते. लो. टिळक, स्वामी दयानंद, स्वामी विवेकानंद आदी पुरुष अंतिमतः वेदालाच शरण जातात, हे लक्षात घेतले पाहिजे. सावरकर या वेदांनाच विज्ञानाला शरण जायला लावतात. नव्या जगाला विज्ञानधर्म शिकविण्याचे आचार्यत्व स्वतःकडे घेतात. ' वावा वाक्यम् प्रमाणम्चा ' जे विरोध करतात, ते सुधारक असतातच; पण कोणत्यातरी मोठ्यातल्या मोठ्या वाबाला ते प्रमाण मानतात. येथे दोन वावाच्या तुलनेचा प्रश्न असतो, वावाच नाकारण्याचा नसतो. तेव्हा सावरकरांना ' वावा वाक्यं प्रमाणं ' मान्य नव्हते, याचा अर्थ निश्चित काय होतो, हे समजून घेतले पाहिजे.

हिंदुधर्माचे तत्वज्ञान म्हणून मानले गेलेले वेदांत व अध्यात्म यावद्दलची सावरकरांची भूमिका आम्ही स्वतंत्रपणे ' अध्यात्म ' या प्रकरणात मांडली आहे. हिंदुत्वावद्दल त्यांना जे कांही वाटत होते, ते आम्ही स्वतंत्रपणे 'हिंदुत्व' या प्रकरणात मांडले आहे. हिंदुधर्माचा वा वेदांत– अध्यात्माचा त्यांना अभिमान वाटत असे, ही गोष्ट खरी आहे. या अभिमानाचे स्वरुप व चर्चा आम्ही या दोन प्रकरणात केलेली आहे. ही दोन्ही प्रकरणे वाचल्यानंतरच वाचकांनी यावद्दलची आपली भूमिका वनवावी, अशी आमची विनंती आहे.



विभाग दुसरा

उपयुक्ततावाद

प्रकरणे :

१) मानवी जीवनाचे स्वरूप

२) उपयुक्ततावादी दृष्टिकोण : धर्मसंबंधी

३) उदात्तमूल्याविषयी भूमिका

४) नीतिमूल्याविषयी भूमिका

५) शस्त्रबळ : एक आक्षेप

१. मानवी जीवनाचे स्वरुप

सावरकर तत्वे विशेदितात, सिद्धांत मांडतात, विचार सांगतात, आचरणात आणून दाखवतात– पण शास्त्रज्ञ करतो तशी त्याची शास्त्रशुद्ध मांडणी करत नाहीत, ही एक वस्तुस्थिती आहे. सावरकरांच्या जीवनाचा ध्येयवाद समाजाला घडविणाऱ्या समाजक्रांतिकारकाचा आहे. समाजाला घडविण्यातच त्यांचे संपूर्ण जीवन गेले. ज्ञानापेक्षा या कार्यालाच त्यांनी प्राधान्य दिलेले होते. कर्मयोगाच्या यशासाठी व यशापुरताच आवश्यक तेवढा ज्ञानयोगाचा त्यांनी आधार घेतला. त्यांचे जे ज्ञान भांडार वा विचार आपल्यासमोर आहेत, ते केवळ ज्ञानासाठी दिलेले ज्ञान नव्हे ; कर्माच्या यशासाठी परिस्थितीप्रमाणे सांगितलेले विचार आहेत, ही जाणीव ठेवूनच त्यांच्या विचारांचा अन्वयार्थ आपल्याला लावला पाहिजे.

सावरकर बुद्धिवाद मांडतात, विज्ञानधर्म सांगतात, मनुष्यधर्माचा प्रचार करतात– पण त्यांच्या विचारातील बुद्धिवाद वा विज्ञानधर्म प्रत्येक मनुष्याच्या संदर्भात प्रत्यक्षात कधीच अवतरण्याची शक्यता नसते. बुद्धिवाद स्वीकारण्याची सामान्य मनुष्याची एक मर्यादा आहे. सावरकर हचा व्यक्तीकरता तो प्रत्यक्ष धर्म होता, पण समाजाकरिता ते एक अंतिम ध्येय होते. आतापर्यंत सावरकरांचे हे समाजाकरिता असलेले अंतिम ध्येय आपण समजून घेतले, की जे संपूर्ण बुद्धिवादी, भौतिक व ऐहिक होते. तत्वज्ञान मांडले की, तत्वज्ञाचे काम संपते. समाजसुधारकाचे काम त्यानंतर सुरु होते. हे बुद्धिवादी विचार समाजात कसे रुजवायचे हा समाजसुधारकासमोरचा प्रश्न असतो. सावरकरांसमोरचा प्रश्न हा असाच होता. 'बुद्धिवाद– बुद्धिवाद' या शब्दाचा सारखा कंठरवाने टाहो फोडल्याने समाज बुद्धिवादी होत नसतो. चिवट अंधश्रद्धेपासून सुरवात करुन विशुद्ध बुद्धिवादापर्यंत

जाण्याचा दीर्घ नि दुर्घट प्रवास समाजसुधारकाला करावा लागतो. अंतिम अवस्थेतील बुद्धिवादापर्यंत समाज कधीही जाणार नाही याची पूर्ण जाणीव त्या सुधारकालाही असते. समाजाला या अंतिम ध्येयापर्यंत टप्याटप्याने कसे न्यायचे याचा विचार सुधारकाला करावा लागतो. उद्याच्या अंतिम ध्येयाबरोबर आजचे सांप्रतचे असे वेगळे ध्येय त्याला ठरवावे लागते. सावरकर हा प्रवास कसा करतात हे आपल्याला पाहिले पाहिजे.

वस्तूचा वा घटनाचा कार्यकारण ठरविण्यास बुद्धिवाद वा विज्ञान उपयोगी पडते; परंतु मानवी जीवनाचा हेतू काय, हे विज्ञान सांगत नसते. स्वतःचे हित कशात आहे, हे मनुष्यालाच ठरवावे लागते. स्वतःचे हित करुन घ्यायचे की नाही, हेही मनुष्यालाच ठरवावे लागते. ही ठरविण्याची मनुष्याची प्रेरणा बुद्धी ही नसते, तर अिच्छा ही असते. हे ठरविण्यासाठी जगात विविध तत्वज्ञाने मनुष्यांनी निर्माण केली. पाश्चात्य नीतिशास्त्रज्ञांची तर एक परंपराच यासाठी निर्माण झाली. विज्ञानापेक्षा किंवा बुद्धीपेक्षा मानवी अिच्छा किंवा भावना ही एक स्वतंत्र गोष्ट आहे. बुद्धीप्रमाणेच स्वभावतःच श्रद्धा वा भावना हीही एक मानवी जीवनांतील प्रभावी प्रेरणा आहे, हे समजून घेतले पाहिजे. संपूर्ण समाजाला विज्ञाननिष्ठ बनविणे किती कठीण आहे, हे यावरुन लक्षात येईल. मानवी जीवन म्हणजे या बुद्धी व श्रद्धा यांच्या संघर्षाचा एक प्रवास असतो. मानवी जीवनाच्या प्रगतीचा, विकासाचा वा सुधारणेचा खरा प्रश्न ही श्रद्धा व भावना आमूलात् कशी नष्ट करता येईल याचा नसतो, तर या दोन प्रेरणांचा योग्य सुसंवाद व समन्वय कसा घालता येईल याचा असतो. सावरकर तो कसा घालतात, हे आपल्याला पाहायचे आहे.

समाजाला बुद्धिवादाकडे घेवून जाण्याचा मार्ग मनःप्रवर्तन हाच असतो. बुद्धिवाद ही पटविण्याची गोष्ट आहे, लादण्याची नव्हे. लादलेल्या गोष्टी विरुद्धचे बुद्धिवाद हे तर एक बंड असते, व त्यासाठीच तो आपल्याला हवा असतो. समाजाचे मनःपरिवर्तन सामाजिक मानसशास्त्राच्या मार्गानेच करावे लागते. समाजात श्रद्धेचे प्राबल्य आहे, ही वस्तुस्थिती यासाठी मान्य करावी लागते. या प्रेरणेचे प्राबल्य कमी करता येईल, पण पूर्णतः ती नष्ट करता येत नसते. काही मर्यादेपर्यंत निसर्गतःच या प्रेरणेची समाजाला, मनुष्याला गरज असते. श्रद्धेवर, आधारलेल्या, बुद्धिबाह्य असलेल्या कोणत्यातरी धर्मावर मनुष्य श्रद्धा ठेवतच असतो, असा प्रत्यक्षातला अनुभव असून, ही वस्तुस्थिती बुद्धिवाद्यालाही मान्य करणे भाग असते. या जगात धर्म ही एक प्रबल शक्ती म्हणून भूतकाळात होती, वर्तमानकाळात आहे, भविष्यकाळात तिचे प्राबल्य कमी होईल, पण ती पूर्णपणे नष्ट होण्याचा संभव नाही, हे जगातील अनेक बुद्धिवादी विचारवंतानीही मान्य केलेले आहे.

धर्मशक्तीचे प्राबल्य

हर्बर्ट स्पेन्सर हे फार मोठे बुद्धिवादी विचारवंत व समाजशास्त्रज्ञ होवून गेले

त्यांचा फार मोठा प्रभाव आगरकरांवर व सावरकरांवर होता. मानवी जीवनाचे दीर्घ व सूक्ष्म अवलोकन करुन त्यांनी जे निष्कर्ष काढले, त्याला समाजशास्त्रात फार मोलाचे स्थान मिळालेले आहे. मानवी जीवनांत श्रद्धेला एक विशिष्ट स्थान आहे, ही गोष्ट त्यांनी स्पष्टपणे मान्य केली आहे. शब्दनिष्ठ किंवा पोथिनिष्ठ प्रवृत्तीचा उच्छेद करुन पूर्ण बुद्धिवाद आणणे किती कठीण आहे, हे सांगताना ते म्हणतात, " Were it possible forthwith to replace the system of rules, supposed to be supernaturally warranted by the system of rules, rationally elaborated system of rules, no such rationally elaborated system of rules would be adequately operative. To think that it would, implies the belief that men's actions are mainly determined by intellect, whereas they are in larger degrees datermined by feelings" मनुष्याचा स्वभाव कसा असतो याबद्दल ते पुढे म्हणतात. " Often the most conclusive argument fails to produce a conviction that sways conduct; and mere assertion with great emphasis and signs of confidence on the part of utterer, produces a fixed conviction where there is no evidence and even in spite of adverse evidence."[१] स्पेन्सरनी व्यक्त केलेला हा अभिप्राय अक्षरश: खरा आहे व त्याचे प्रत्यंतर रोजच्या व्यवहारात आपल्याला मिळत असते. केवळ बुद्धिवादी विचारावर मनुष्याला जगता येणार नाही, ही गोष्ट एका बुद्धिवाद्यानेच येथे मान्य केलेली आहे. बुद्धीपेक्षा भावनाच मनुष्याच्या कृतीना अधिक प्रेरणा देते, हेही त्यांनी स्पष्टपणे मान्य केले आहे.

मानवी मनातून धर्मश्रद्धा नष्ट होणे कसे कठीण आहे हे सांगताना स्पेन्सर म्हणतात, " No one need expect then that the religious consciousness will die away or will change the lines of evolution"[२] धर्माच्या जाणीवेला जतन करणाऱ्या मानवी मनाची धारणा लक्षात न घेतल्यामुळे धर्मसंस्थेबद्दल अधार्मिक लोक कसे चुकीचे मूल्यमापन करतात हे सांगताना स्पेन्सर म्हणतात,[३] " The mind affected by it (anti theological bias) ignoring the truth for which religions stand, undervalus religious institutions in past, think they are needless in present and expects they will leave no representatives in future. Hence mistakes in sociological reasonings" सावरकरांच्या बुद्धिवादाचा अभ्यास करतांना या वस्तुस्थितीची आपल्याला जाणीव ठेवली पाहिजे. ते स्वत: अितके बुद्धिवादी असतानाही, धर्म, धर्मसंस्था, मानवाचे श्रद्धाळू मन या गोष्टीची दखल वस्तुस्थिती म्हणून सावरकरांनी घेतलेली आहे. धर्म ही एक प्रबल

शक्ती म्हणून मनुष्याच्या मनात व व्यवहारात वावरत आहे, ही गोष्ट सावरकरांनी लक्षात घेतलेली आहे. वस्तुस्थिती (Fact) म्हणून ही गोष्ट मान्य असणे, नि अशा धर्मात श्रद्धा असणे, या दोन स्वतंत्र गोष्टी आहेत, हे समजून घेतले पाहिजे.

निर्हेतुक विज्ञान

पं. नेहरुनांही आपण बुद्धिवादी व रुढ अर्थाने अधार्मिकच म्हणतो. धर्मांनी भूतकाळात मानवाला नैतिक मूल्याची कशी बैठक दिली होती याबद्दल पं. नेहरु म्हणतात,[४] " मानवतेचा विकास होण्याच्या कार्यात धर्मसंप्रदायांचे मोठे साहाय्य झालेले आहे. धर्मसंप्रदायांनी मानवी जीवनांत मूल्ये काय असावी व आदर्श कोणते असावे ते निश्चितपणे ठरवून दिलेले आहे. " विज्ञान हे मानवी जीवनाचा हेतू जाणण्यास कसे असमर्थ आहे, या बाबत पं. नेहरु म्हणतात,[५] " विज्ञानशास्त्राचे लक्ष प्रत्यक्षात वस्तुस्थिती म्हणून ज्या गोष्टी सिद्ध करता येतील त्यांच्याकडेच काय ते लागले होते; अंतिम उद्देशाचा विषय त्या शास्त्राने दृष्टिआड केला." विज्ञानाला मानवी जीवनाचा अंतिम हेतूही माहीत नव्हता किंवा सध्याचा हेतूही माहीत नव्हता, असे पं. नेहरुंनी म्हटले आहे. मानवी बुद्धीची व तर्कशक्तीची मर्यादा स्पष्ट करताना पं. नेहरु म्हणतात, [६] " मानवी मनोरचना, मानवाच्या बुद्धीचा स्वभाव-धर्म आतापर्यंत जो आहे तो लक्षात घेतला तर एका विशिष्ट मर्यादेपर्यंतच मानवाच्या बुद्धीची, त्यांच्या तर्कशक्तीची धाव जाऊ शकते, त्या मर्यादेपलिकडे तिला जाताच येत नाही, असे निःसंशय दिसते." मनुष्यालाही कुठेतरी श्रद्धा ठेवावीच लागते. नाही ठेवली तरी मानवी जीवनाला प्रेरणा राहणार नाही, हेतू राहणार नाही, आश्रयस्थान राहणार नाही, असे त्यांनाही वाटते.[७] मानवी जीवनाचा प्रश्न हा नेहमीच बुद्धी व श्रद्धा याच्या योग्य तारतम्याचा आहे, अशीच ही वास्तव भूमिका आहे.

बुद्धिवादी आगरकरांचेही असेच मत होते. ' धर्मकल्पना आली कोठून ?' या लेखात ते म्हणतात, " मनुष्याच्या ज्या अनेक मनोवृत्ति आहेत त्यापैकी त्याची धर्मकल्पना एक आहे. ज्याप्रमाणे अितर वृत्ति किंवा त्यांची बीजे त्यांच्या प्रकृतीशी खिळलेली आहेत, त्याप्रमाणेच धर्मकल्पनाही त्यांचे मनात फार प्राचीन काळापासून वास करीत आहे. किंबहुना ज्या वेळेस मनुष्याची उत्पत्ति झाली, त्याच वेळेस तिचे बी त्याच्या मेंदूत लावले गेले, असे म्हणावयास हरकत नाही. दोन हजार वर्षापूर्वी आमच्या ज्या ज्या धर्मकल्पना होत्या, त्यांत आणि आजच्या सांप्रतच्या धर्मकल्पनात जमीनअस्मानचे अंतर पडले आहे, व कालांतराने आणखीही पडणार आहे. तात्पर्य हा सारा प्रकार मनुष्याच्या अितर मनोवृत्तीप्रमाणेच घडून आला आहे." [८] ही स्वाभाविक धर्मप्रवृत्ती अितर प्रवृत्तीपेक्षाही कशी प्रबल असते, हे सांगताना आगरकर पुढे म्हणतात, " तथापि एवढ्यावरुन त्यांच्या अितरवृत्ति आणि त्याची ही वृत्ति एकाच सपाटीवर ठेवता येत नाही. वृत्तीवृत्तीत पुष्कळ भेद आहे. कांही वृत्ति अत्यंत क्षीण आहेत; व काही अतोनात प्रबल आहेत. कांहीचा परिणाम

फक्त क्षणिक असतो; व कांहीचा आयुष्यभर टिकतो. मनुष्याच्या धर्मकल्पनेचा या दुसऱ्या प्रकारच्या मनोवृत्तीत समावेश होतो. एका दृष्टीने तिच्या अितकी प्रबल दुसरी मनोवृत्ति नाही म्हटले तरी चालेल." बुद्धिवादी आगरकर धर्माचे हे सामर्थ्य मान्य करतात, हे लक्षात घेतले पाहिजे.

बुद्धिवाद्याचा विवेक

धर्म हा विषय वा श्रद्धा कितीही प्रयत्न केला तरी मनुष्याच्या डोक्यातून निघणार नाही, हे लक्षात घेवून, या धर्मश्रद्धेविषयी लिहताना 'पराकाष्ठेच्या शांततेचे आणि समीक्षेचे अवलंबन केले पाहिजे '[९] असा सावधगिरीचा अिषारा आगरकरांनी दिलेला आहे. 'आमचे काय होणार ?' या लेखात आगरकर म्हणतात,[१०] " धर्मासंबंधाने लिहताना समता (स्थिरपणा) ठेवण्याचे आणखी एक मोठे कारण असे की, दुसऱ्या कोणत्याही वृत्तीपेक्षा या वृत्तीपासून मनुष्याच्या आचारावर व विचारावर विशेष महत्वाचे परिणाम झालेले आहेत. अंतःकरणावर ज्या वृत्तीचा पक्का अमंल असता, सिंहासनस्थ राजांना अधिकार व अैश्वर्य याचा त्याग करुन व आप्तमित्रास सोडून देवून, अरण्यात संचार करणे व फलमूलावर आहार करणे यात कांहीच कठीण वाटेनासे झाले.... जी वृति प्रबल झाली असतांना नानातऱ्हेच्या यातना सोसण्यास, जाळून घेण्यास, बुडवून घेण्यास किंवा पुरुन घेण्यास मनुष्य तयार होतो; ज्या वृत्तीचे एखाद्या राष्ट्रावर वर्चस्व झाले असता, ते दुसऱ्या राष्ट्रास जाळण्यास, कापण्यास, लुटण्यास किंवा पाहिजे ते करण्यास बिलकूल भीत नाही; सारांश, ज्या वृत्तीमुळे कधीकधी लोकांच्या नीतिमत्तेस, विद्येस, भुतदयेस व सदाचरणास पराकाष्ठेचे साहाय्य झालेले आहे, व कधीकधी जिच्यामुळे लोकांत साहस, कार्य, विचार, व अमानुषता याची परमावधि झालेली आहे, अशा वृत्तीविषयी लिहतांना किंवा बोलतांना पराकाष्ठेची सरलता राखली पाहिजे, हे उघड आहे." एका प्रखर बुद्धिवाद्याची धर्माविषयीची ही भूमिका आपण सतत लक्षात ठेवली पाहिजे.

धर्माविषयी बोलतांना व लिहतांना पराकाष्ठेची शांतता, सरलता व विवेक याची आवश्यकता सांगितल्यानंतर बुद्धिवादी आगरकर 'गुलामांचे राष्ट्र' या आपल्या निबंधात म्हणतात, " ज्या देशात आपले शेकडो पूर्वज जन्मास आले, वाढले व मरण पावले; ज्या देशातील हजारो पिढ्यानी अनेक गोष्टीत मोठ्या कष्टाने केलेल्या अनेक सुधारणाचे फळ आपणास प्राप्त झाले– अशा देशातील धर्माचा, रितीरिवाजाचा व लोकांचा सर्वथैव त्याग करणाऱ्या मनुष्यास सुधारकाची पदवी कधीही शोभणार नाही. स्वभूमीत, स्वलोकात, स्वधर्मात आणि स्वाचारात राहून अविचारी व अज्ञान देशबांधवाच्या निंदेस किंवा छळास न भिता, त्यांच्याशी कधी भांडून, कधी युक्तिवाद करुन, कधी लाडीगोडी लावून, अथवा सामर्थ्य असल्यास कधी त्यांना दटावून त्यांची सुधारणा करणे यालाच खरी देश-

भक्ती, खरी बंधुता, खरा देशाभिमान, खरे शहाणपण व खरा पुरुषार्थ आहे." आगरकरांची ही भूमिका म्हणजे बुद्धिवाद्यानी समाजाला बुद्धिवाद कसा शिकवावा, समाजसुधारणा कशी करावी, त्यांनी कोणते धोरण ठेवावे, लोकांशी कसे वागावे व बुद्धिवाद्यांचे शहाणपण कशात आहे, हे सांगणारा एक आदर्श वस्तुपाठ आहे, असे आम्हास वाटते. आगरकरांच्या या विचाराला आदर्श धरुनच सावरकरांनी समाजसुधारणा केलेली आहे, असे आपल्याला दिसून येईल.

'धर्म' ही एक वस्तुस्थिती आहे, ही गोष्ट वरील सर्व विचारवंत स्पष्टपणे मान्य करतात. ज्यांना आपण बुद्धिवादी व अधार्मिक म्हणतो असे हे विचारवंत आहेत. धार्मिक विद्वानांची मते आपण पाहतच नाही. धर्माच्या घातक प्रवृत्तीनी ज्यांना होरपळून टाकले, त्या डॉ. आंबेडकरांसारख्या बुद्धिवाद्यालाही धर्म ही न चुकणारी गोष्ट आहे, हे मान्य करुन धर्मांतर करावे लागते, तेथे इतरांची काय कथा ?

धर्मसमीक्षेचा मध्यबिंदु

'धर्म ही अफूची गोळी आहे' हे मार्क्सचे वचन चुकीचे आहे, हे मार्क्सवादीही आता मान्य करु लागले आहेत. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे मूलतः मार्क्सवादाने प्रभावित झालेले व शेवटी रॉयप्रणित नवमानवतावादी झालेले बुद्धिवादी विचारवंत आहेत. 'जडवाद अथवा अनीश्वरवाद' हा त्यांचा ग्रंथ जडवादाचे सिद्धांत मांडण्यासाठी व त्याचे महत्व पटवून देण्यासाठी लिहलेला आहे. स्वतः तर्कतीर्थ जडवादी आहेत. 'हिंदुधर्माची समीक्षा' या आपल्या ग्रंथात त्यांनी ऐतिहासिक व अनैतिहासिक धर्मचिकित्सा यांतील फरक स्पष्ट करुन सांगितले आहे की, धर्मसमीक्षा प्राचीन काळी चार्वाकाने ज्या पद्धतीने केली किंवा युरोपमध्ये, अमेरिकेमध्ये १८ व्या शतकात व्हॉल्टेर, थॉमसपेन, ईलिहु, पामर, रॉबर्ट इत्यादींनी ज्या तऱ्हेने धर्मचिकित्सा केली, ती एकांगी होती. या विचारवंतानी धर्मसंस्थेचे अतिहासातील स्थान ओळखले नाही, असे तर्कतीर्थांचे मत आहे. बुद्धिवादाचे जोरावर धार्मिक सिद्धांत खोडून काढण्याची वरील विचारवंताची प्रवृत्ती विध्वंसक आहे, असे त्यांनी म्हटले आहे. धर्मसंस्था ही एक सामाजिक शक्ती आहे, ही वस्तुस्थिती या विचारवंतांनी विचारात घेतली नाही म्हणून त्यांची समीक्षा, विवेचन व निष्कर्ष अपुरे आहे, असे तर्कतीर्थांना वाटते. धर्म ही सामाजिक शक्ती आहे, हा विचार सामाजिक व धार्मिक विचाराचा व समीक्षेचा मध्यबिंदु होय, असे तर्कतीर्थांना वाटते.[१२] वर्गविग्रह व अतःकलह जोपर्यंत समाजात राहील तोपर्यंत समाजात धर्म राहणारच, असे तर्कतीर्थांनी म्हटले आहे.[१३]

आणखी काही शतके

सुप्रसिद्ध विचारवंत प्रा. नरहर कुरुंदकर धर्म या शक्तीच्या अस्तित्वाबद्दल

म्हणतात,[१४] "माझ्या सारख्या अधार्मिक माणसाने कीर्तनाविषयी बोलावे हे थोडेसे चमत्कारिक असणारे आहे... खरे तर त्यांत चमत्कारिक काय आहे? माझा धर्मावर विश्वास असो अगर नसो, ह्या देशातील कोट्यावधी जनतेचा धर्मावर विश्वास आहे, आणि जग कितीही सुधारले, आधुनिक झाले, तरी अजून काही शतके समाजात धर्म हो शक्ती प्रबल राहणार आहे. कोट्यावधींच्या जीवनावर धर्मपरंपरेचा बरा-वाईट परिणाम होणार आहे. जे देश आधुनिक व सुधारलेले मानले जातात, तेथे तर धर्माचा दृढ प्रभाव अजून आहेच. पण जे देश नास्तिक मानले जातात, ज्यांनी धर्म नामशेष करण्याचा पद्धतशीर प्रयत्न केला, तेथेही अर्धशतकाच्या नंतर धर्म ह्या प्रेरणेला दुर्बल करण्यास म्हणावे तितके यश आलेले दिसत नाही. ...मग आपण तर भारतात आहो! ही भूमिका धर्माचे गुणगाण करण्यासाठी नाही. चार्वाकाच्या काळातही व्यक्तीच व काही अपवादात्मक व्यक्तीच नास्तिक असू शकत. आजही नास्तिक्य हे काही व्यक्तिपुरतेच मर्यादित आहे, हे सत्य मान्य करणे, इतकाच याचा अर्थ आहे."

"मानवी मन गुलाम करणारी धर्म ही एक प्रभावी संस्था आहे."[१५] असे मानणारे व स्वतःला अभिमानाने 'जडवादी' म्हणवून घेणारे प्रा. कुरुंदकर म्हणतात,[१६] "विज्ञानाच्या वाढीबरोबर अंधश्रद्धा संपत जाते, ही गोष्ट पूर्णपणे खरी नाही. धर्माने सांगितलेल्या कांही अंधश्रद्धा भंग पावतात, हे खरे असले तरी सगळ्याच श्रद्धा विज्ञानाच्यायोगाने भंग पावत नाहोत. आणि धर्मश्रद्धा तर विज्ञानाच्या कक्षेतच येत नाही. सुधारलेल्या जगात सुद्धा चालीरीतीत फार मोठा बदल झालेला असूनही मानवी मनाची धार्मिकता कमी झालेली नाही, कारण माणूस हा पूर्णपणे विचारप्रधान प्राणी नाही. विचारप्रधानतेवर जीवनाचा सर्व व्यवहार कधी अवलंबून नसतो. मानवी जीवनांतील सर्व रहस्ये उलगडलेली नाहीत. सर्व रहस्ये उलगडतील अशी नजिकच्या भविष्यकाळात शक्यता नाही. अशा अवस्थेत मानवी मनात एक मुलभूत सहजप्रेरणा भीतीची आहे. ईश्वराची कल्पना खरी असो वा खोटी असो, ती शतकानुशतके भीतीग्रस्त मनाला दिलासा देत आलेली आहे. याहीपुढे ती दिलासा देत राहील. या दिलाशाची गरज संपावी इतका माणूस भीतीशून्य होणे कठीण आहे. कारण प्रत्येकाला किमान स्वतःच्या मरणाची भीती आहेच."

स्वतः बुद्धिवादी असणे, स्वतःला धर्मश्रद्धा नसणे ही गोष्ट वेगळी आहे; समाजात धर्म ही एक गरजेची गोष्ट आहे, ती प्रबल शक्ती आहे, ती पूर्णतः नष्ट करता येणार नाही, वस्तुस्थिती मान्य करणे ही वेगळी गोष्ट आहे. हा फरक नीट समजावा म्हणून आम्ही कांही सुप्रसिद्ध बुद्धिवाद्यांचे विचार वर दिलेले आहेत. जे दिसते ते मान्य करणें बुद्धिवाद्यांचे कर्तव्यच असते. सावरकर प्रखर बुद्धिवादी असूनही, धर्मअश्रद्ध असूनही, याच अर्थाने धर्म ही एक वस्तुस्थिती आहे, असे मानत असत. ज्यांना धर्मात अविचल श्रद्धा आहे, अंधश्रद्धाही आहे, त्यांना बुद्धिवाद

समजून सांगण्याचे काम सावरकरांना करावयाचे होते. सावरकरांना स्वतःचा वेगळा बुद्धिवादी पंथ स्थापायचा नव्हता; बुद्धिवाद्यांची एक वेगळी जात बनवायची नव्हती; तर आगरकर म्हणतात त्या प्रमाणे अशा लोकांशी कधी भांडून, कधी युक्तिवाद करुन, कधी गोडीगुलाबीने वागून त्यांना बुद्धिवाद शिकवायचा होता. अंधश्रद्धा पाळणाऱ्या या लोकावरोबर सावरकर कसे वागत होते, वागताना सावरकरांनी कोणते धोरण आखले होते हे आपल्याला समजून घ्यायचे आहे.

व्यावहारिक तडजोड

ज्यांना समाज सुधारणा करायची आहे, त्या बुद्धिवाद्यांनी समाजातील लोकांशी कसे वागले पाहिजे यावद्दल प्रा. कुरुंदकरांचे विचार आम्हाला अतिशय मार्गदर्शक वाटतात. या संबंधी प्रा. कुरुंदकर म्हणतात,[१७] "माझा देवावर विश्वास नाही. माझा धर्मावर विश्वास नाही. पण देव आणि धर्म यावर विश्वास असणारे लाखो लोक माझ्या भोवती आहेत, त्यांच्यावर तुटून पडण्यावरही माझा विश्वास नाही. त्यांना माझ्याबरोबर खेचून नेण्यासाठी आवश्यक असणारी व्यावहारिक तडजोड करण्यास मी तयार आहे. विचारात मात्र करणार नाही. कारण असं आहे की, विचार हे तुम्हाला कुणीकडे जायचे आहे याची दिशा दाखविणारे असतात, आणि व्यवहार तिथपर्यंत तुम्हाला टप्याटप्यानं खेचून नेण्यासाठी असतो."

सावरकरांचे बुद्धिवादी विचार आपण आतापर्यंत समजून घेतले. या विचारापर्यंत समाजाला टप्याटप्यानं खेचून नेण्याचे समाजकार्य सावरकरांना करायचे होते. यासाठी ते कोणते धोरण आखतात, कोणत्या व्यावहारिक तडजोडी करतात, त्या व्यवहाराच्या असतात की विचाराच्या असतात, याचा आता आपल्याला अभ्यास करावयाचा आहे. बुद्धिवादी विचारांच्या उदात्त पातळीवरुन एक एक पायरी खाली येवून सावरकर समाज सुधारणा करतात; काही व्यावहारिक तडजोडी करतात; व त्या करणे कोणत्याही खऱ्या बुद्धिवादी सुधारकाला कसे भाग असते हे लक्षात यावे यासाठी आपण आतापर्यंत काही सुप्रसिद्ध बुद्धिवादी विचारवंताच्या विचारांचा मागोवा घेतला. या पुढे सावरकरांना समजून घेताना ही भूमिका आपण सतत लक्षात ठेवली पाहिजे.

या साऱ्या विवेचनाचा अर्थ असा आहे की, स्वतः सावरकर धार्मिक नसले तरी ज्या समाजात ते कार्य करु पाहत होते, त्या समाजात धर्मश्रद्धा ही एक प्रबल शक्ती होती. ती धर्मश्रद्धा नष्ट करणे अिष्ट होते की नव्हते हा मुद्दा सोडून दिला तरी, किंवा अिष्ट होते हे मान्य केले तरी, ते शक्य नव्हते ही एक वस्तुस्थिती होती. ही वस्तुस्थिती सावरकरांना मान्य होती. अशा परिस्थितीत धर्मश्रद्धा वा अितर बुद्धिबाह्य श्रद्धा समूळ नष्ट करण्याचा प्रश्न खऱ्या बुद्धिवाद्यासमोर नसतो. या श्रद्धा मानवी जीवनाला अहितकारक कशा होणार नाहीत याची

काळजी घेणे हे त्याचे आद्यकर्तव्य ठरते. श्रद्धा केवळ बुद्धिविरोधी आहे या मुद्दयाच्या पेक्षा ती श्रद्धा हानिकारक आहे का हा मुद्दा त्यांच्या दृष्टीने महत्वाचा ठरतो. मानवी जीवनाच्या हिताच्या भूमिकेतून तो या श्रद्धेकडे पाहू लागतो. मानवी जीवनाचे हित कशात आहे, हे त्याला अगोदर ठरवावे लागते. मानवी जीवनाचे हित म्हणजे कुणाचे हित हेही त्याला ठरवावे लागते. हे हित व्यक्तीचे, समाजाचे, राष्ट्राचे की अखिल मानवजातीचे हे त्याला ठरवावे लागते. त्यांच्या बुद्धिवादाला मग एक विशिष्ट हेतू प्राप्त होतो. तो बुद्धिवादासाठी बुद्धिवाद राहत नसून मनुष्याच्या हितासाठी बुद्धिवाद असे त्याचे स्वरुप बनते. यालाच सावरकर उपयुक्ततावाद म्हणतात. सावरकर आपला हा प्रखर बुद्धिवाद समाजाच्या हितासाठी कसा वापरतात, ह्या गोष्टीचा अभ्यास आता आपल्याला करायचा आहे.

◆◆



२. उपयुक्ततावादी दृष्टिकोण : धर्मासंबंधी

तत्वज्ञ बुद्धिवादी आणि सुधारक बुद्धिवादी यात एक महत्वाचा फरक असतो. सुधारकाला बुद्धिवाद हा समाजाच्या सुधारणेसाठी उपयुक्त म्हणून हवा असतो. विचारांच्या क्षेत्रात बुद्धिवाद हा बुद्धिवाद असतो, व्यावहारिक पातळीवर तो उपयुक्ततावादाचे रुप धारण करतो. सावरकर स्वतःला जसे बुद्धिवादी, विज्ञाननिष्ठ म्हणवून घेतात, तसेच उपयुक्ततावादीही म्हणवून घेतात. त्यांचा बुद्धिवाद उपयुक्ततावादाचे रुप घेऊन व्यवहारात अवतरला आहे. मनुष्याला जे जे लाभदायक, सुखकारक व आनंददायी वाटते, ते ते उपयुक्त होय, असे त्यांना वाटते. मनुष्याचे ऐहिक हित झाले पाहिजे, हा त्यांच्या बुद्धिवादाचा हेतू होता. एका दृष्टीने हा उपयुक्ततावाद म्हणजे मनुष्याच्या हितासाठी बुद्धिबादाने केलेली एक व्यावहारिक तडजोड होती. व्यवहारात प्रत्यक्ष कार्य करताना, लोकांना बुद्धिवाद समजून सांगताना उपयुक्ततावादाचाच आधार सावरकरांना घ्यावा लागला आहे.

राष्ट्रहित सद्याचे ध्येय

उपयुक्ततावादाचे कोणतेही शास्त्रीय तत्वज्ञान वा सर्वांगीण सूत्र वा कसोटया सावरकर मांडत नाहीत. या नीतिशास्त्राचे प्रणेते बेंथम व मिल्ल यांच्या विचाराचा त्यांच्या मनावर प्रभाव होता, हे स्पष्टपणे लक्षात येते. पण या विचाराचा प्रचार करताना या पाश्चात्य नीतिवेत्त्यांच्या नांवाचा उल्लेख करताना सावरकर आढळत नाहीत. मनुष्याच्या हिताला सावरकरांनी सर्वोच्च स्थान दिले. मनुष्याच्या हितासाठी ध्येयवादाचा एक टप्पा म्हणून 'राष्ट्रहित' हे त्यांनी सांप्रतचे ध्येय म्हणून निश्चित केले. राष्ट्रहितासाठी अंतिमतः जे जे उपकारक व अवश्य ते ते स्वीकार्य

अशी त्यांची भूमिका होती. 'पुष्कळांचे पुष्कळ सुख' या उपयुक्ततावादी सूत्रातील 'सुख' म्हणजे काय, ती ठरविण्याची कसोटी कोणती, ते ठरवायचे कुणी इत्यादी प्रकारच्या अमूर्त गोष्टी समोर ठेऊन त्यांनी कुठेही तत्वचिकित्सा केली नाही. हा उपयुक्ततावाद मानवी जीवनाचे जे अनंत प्रश्न आहेत, ते सोडविण्यासाठी नीतिसूत्र म्हणून कसा योग्य आहे, हे सांगण्यापेक्षा माझ्या देशाचे प्रश्न सोडविण्यासाठी या सूत्राचा कसा उपयोग करायचा, यातच सावरकरांना रस होता. या नीतिसूत्रातील अभिप्रेत असणारे 'सुख' वा हित हे मूलतः ऐच्छिक व भावनिक असते, व या सुखाची गुणवत्ता ठरविण्याची वा दोन सुखातील एकाची निवड करण्याची कसोटी या नीतिसूत्रात नाही, हा उपयुक्ततावरील आक्षेप सावरकरांच्या बाबतीत केवळ सैद्धांतिक होता; कारण 'राष्ट्राचे हित' ही त्यांनी आपल्या सुखाची निवड केलेली होती. राष्ट्रप्रेम, राष्ट्रीयत्व, राष्ट्रवाद, राष्ट्रहित या साऱ्या फार मोठ्या प्रमाणावर भावनेवर आधारलेल्या गोष्टी आहेत. सावरकरांचा उपयुक्ततावाद हा राष्ट्रहितासाठी बुद्धिवादाबरोबर त्यांनी केलेली तडजोड होती. ही तडजोड व्यवहारांत सावरकर किती मर्यादेपर्यंत करतात हे आपल्याला पाहायचे आहे.

विशुद्ध व प्रखर बुद्धिवादाची परिणती राष्ट्राच्या संकुचित भिंती ओलांडून सर्वदूर जाणाऱ्या मानवतावादात होणे अपरिहार्य असते. मात्र सावरकरांच्या बाबतीत असे घडले नाही. राष्ट्रवादाच्या व राष्ट्रहिताच्या वर्तुळापाशी ते थांबले. असे हे थांबणे, म्हणजे सावरकरांनी राष्ट्रवाद मानणे कसे योग्य होते, हे सांगत बसण्याची आम्हाला आवश्यकता वाटत नाही. आजही जगातील प्रत्येक राष्ट्र प्रखर व कडव्या राष्ट्रवादाचीच कांस धरत आहे, व भारतात आज या प्रखर राष्ट्रवादाचीच गरज आहे, असे प्रत्येक सुबुद्ध भारतीयाला वाटत आहे. असे असतांना राष्ट्रवादाची गरज पटवून देण्याची आवश्यकता नाही. आंतरराष्ट्रीय प्रतिमा असलेल्या नेहरूंनाही जेथे प्रखर राष्ट्रवादाचीच कांस धरावी लागली; व राष्ट्रवादाला साम्राज्यवाद म्हणून निषेधार्ह ठरविणाऱ्या रशियालाही जेथे आता याच राष्ट्रवादावर यावे लागले आहे व नजिकच्या भविष्य काळात जगातील हा राष्ट्रवाद वा राष्ट्राभिमान जेथे कमी होण्याची सुतराम शक्यता दिसत नाही, तेथे या गोष्टीचे समर्थन करीत बसण्याची आम्हाला गरज वाटत नाही.

धर्म ही अफूची गोळी आहे, या मताबरोबरच राष्ट्रवाद हीही अफूची गोळी आहे असे समजून या दोन्हीही गोष्टींचे वस्तुस्थितीतील सामर्थ्य पूर्णतः नाकारुन व्यवहार केला पाहिजे, असे आमच्या काही मानवतावादी बुद्धिवाद्यांना वाटते. "राष्ट्रवादाचा स्वीकार 'रोमँटिक' प्रवृत्तीची माणसे विनासायास करु शकतात" असे सावरकरांचे ध्येयवादी टीकाकार डॉ. य. दि. फडके यांचे म्हणणे आहे. राष्ट्रवाद भावनेवर आधारित असला तरी ही भावना हीही एक वस्तुस्थिती आहे. या दृष्टीने राष्ट्रवाद हा सद्याचा वास्तववाद आहे, हे मान्य करायचे कां नाही, हा खरा प्रश्न आहे." खरे म्हणजे राष्ट्रवाद ही आजच्या घटकेस जनतेची अफूची

गोळी बनली आहे"[२] अशी भूमिका घेऊन सावरकरांच्या बुद्धिवादाचे मूल्यमापन करता येणार नाही. "राष्ट्ररक्षणाच्या नावाखाली समाजातल्या असंख्य गोरगरिबांची दिशाभूल करणे मूठभर प्रस्थापितांना सोपे जाते."[३] हा आरोप करुन राष्ट्ररक्षणाचा मुद्दा सोडून देणार काय हा खरा प्रश्न आहे. "राष्ट्रवादामुळे विसाव्या शतकात जागतिक शांतता वारंवार धोक्यात आली आहे."[३] या समस्येला उत्तर आपल्या राष्ट्रानी राष्ट्रवाद सोडून द्यावा हे असू शकते काय, हा खरा प्रश्न आहे. प्रश्न केवळ मानवतावादी विचारच मांडणाऱ्या तत्वज्ञ व विचारवंतासमोरील नाही, तर एका राष्ट्राचे हित करु इच्छिणाऱ्या व प्रत्यक्ष कार्य करणाऱ्या पुढाऱ्यासमोरील आहे. अशा 'तत्वज्ञा' च्या कसोटचा लावून व सावरकरांना 'तत्वज्ञ' संबोधून आपण विचार करु लागलो की, आपले मूल्यमापन चुकीच्या दिशेने जाते हे समजून घेतले पाहीजे.

या उपयुक्ततेच्या भूमिकेतून सावरकर जीवनातील प्रत्येक गोष्टीकडे पाहतात. ज्या धर्मात वा धर्मग्रंथांत सावरकरांना श्रद्धा नव्हती, त्याकडेही सावरकर याच भूमिकेतून पाहतात. या गोष्टीकडे पाहण्याच्या बुद्धिवादी दृष्टीकोणापेक्षा हा उपयुक्ततावादी दृष्टिकोण काहीतरी वेगळा होता काय हे आपण पाहू. बुद्धिवादास मान्य न होणाऱ्या कोणकोणत्या गोष्टी व श्रद्धा त्यानी यासाठी मान्य केल्या हे आता समजून घेवू.

धर्मातीत भूमिका

धर्मात वा धर्मग्रंथात राष्ट्राकरिता जे उपयुक्त असेल ते स्वीकारावे, अशी सावरकरांची भूमिका आहे. ही त्यांची भूमिका मानवानी निर्माण केलेल्या कोणत्याही दोन धर्मात वा धर्मग्रंथात भेद करत नाही. हा माझा आणि तो दुसऱ्याचा असा भेद सावरकर करत नाहीत. ही उपयुक्ततेची कसोटी लावूनच, जगात जी जी विविध धर्ममते आहेत, ती तपासावीत, त्यातील चागले असेल ते सर्वांनी सन्मानावीत, स्वीकारावीत, अशी सावरकरांची भूमिका आहे. ही त्याची धर्मभेदांना छेदून जाणारी, धर्मातीत भूमिका आपण समजून घेतली पाहिजे.

जगात असलेल्या सर्व धर्माविषयी कोणती दृष्टी ठेवावी हे सांगताना सावरकर म्हणतात[४] "मनुष्यजातीत आणि अज्ञान युगातील हाटेहांट अंदमानी बेटाच्या धर्ममतापासून तो अत्युच्च वेदान्त विचारापर्यंत जी जी धर्ममते प्रचलविली गेली किंवा जात आहेत, ती ती सारीच्या सारी अखिल मानवजातीची सामाजिक मत्ता आहे; त्या त्या परिस्थितीत मनुष्याच्या हितार्थ सुचलेली अशी ऐहिक व पारलौकिक कल्याणार्थ केलेली ती एकेक योजना असल्यामुळे ते ते यत्न अखिल मानवजातीच्या कृतज्ञ आदरास पात्र आहेत. अशा ममत्वाच्या नि समत्वाच्या सादर भावनेने ह्या सर्व धर्ममतांना अभ्यासावे, त्या सर्व धर्मग्रंथाना सन्मानावे." हे विचार "मुसलमानातील पंथोपपंथाचा परिचय" या इस्लामधर्म विषयक

लेखात सावरकरांनी सांगितले आहेत. प्रत्यक्षपणे इस्लामधर्म समोर ठेऊनच त्यांनी हे विचार मांडलेले आहेत, हे लक्षात घेतले म्हणजे सावरकरांची धर्मातीत वृत्ती आपल्याला अधिक स्पष्टपणे कळून येते. जगातील सर्वच धर्मांना, धर्मग्रंथांना ममत्वानी व समत्वानी सन्मानावे व अभ्यासावे, अशी हिंदुत्वनिष्ठ सावरकरांची शिकवण आहे, हे आपण समजून घेतले पाहिजे.

आपल्या हिताला जे उपयुक्त असेल ते जगातील कोणत्याही धर्मात सापडो ते स्वीकारले पाहिजे, असा धर्मभेदाला छेदून जाणारा उपयुक्ततावाद त्यांनी मांडला आहे. ते म्हणतात,[५] "त्या प्रत्येक धर्मात जे जे चिरंतन सत्य असेल ते ते स्वीकारण्यातच आपणा सर्वांचे हित आहे; जे जे त्या परिस्थितीत सत्य भासले किंवा त्या त्या मानवी संघास त्या काळापुरते हितावह झाले– परंतु विज्ञानाच्या शोधज्योतीच्या झगझगीत प्रकाशात सत्याभास ठरत आहे, आजच्या परिस्थितीत मनुष्यास बाधक होत आहे, ते ते त्यागिण्यातच आपणा सर्वांचे हित आहे, ते ते त्यागिणे हेच 'सत्याच्या' शोधकाचे आणि मनुष्याच्या उद्धारार्थ झटू इच्छिणाऱ्या प्रामाणिक साधकाचे कर्तव्य आहे ! धर्मकर्तव्य आहे ! " यासाठी हिंदुधर्म निराळा व इस्लामधर्म निराळा, अशी भूमिका सावरकरांना मान्य नाही, हे लक्षात घेतले पाहिजे. धर्माधर्मात सावरकर भेद करीत होते असा एक आरोप केला जातो, यासाठी ही गोष्ट लक्षात ठेवणे जरुर आहे.

समाअिक संपत्ती

जगातील सर्वच धर्मग्रंथ बुद्धिवादाच्या कसोटीस लावूनच वाचावे व या बाबतीत समत्वबुद्धी ठेवावी हे सांगताना सावरकर म्हणतात,[६] "अॅरिस्टॉटल, प्लेटो, चाणक्य, ह्यूम, हस्कले, हेकेल, मार्क्स यांच्या धर्मवेडाच्या कक्षेत न गवसलेल्या ग्रंथांना, त्यातील भिन्नमतवादानी किंवा आज कच्चा ठरलेल्या भौतिक विधेयानी विषण्ण न होता, जसे ममत्वबुद्धीने, समतोलपणे नि बुद्धिवादाच्या कसोटीस निर्भयपणे लावीत आपण सारे मानव ती मानवजातीची समाअिक संपत्ती समजून त्याना सन्मानितो, तशाच वैज्ञानिक दृष्टीने जर आपण सारेजण वेद, अवेस्ता, बायबल, कुराण प्रभृति यच्चयावत् धर्मग्रंथासही वैज्ञानिक नि ऐतिहासिक दृष्टीनेच काय ते वाचू. त्यांच्या तशा तुलनात्मक अभ्यासामुळे त्या त्या ग्रंथातील तात्विक सत्यें नि उपयुक्त आचार स्वीकारण्यास आपण अधिक मोकळेपणाने तयार होवू." आणि मग सावरकर निष्कर्ष मांडतात की[७] "या सर्व धर्मग्रंथांना ममत्वाने नि समत्वाने सादर वाचून, आपण इतर कोणत्याही विषयावरील ग्रंथसंघास जसे तर्कशुद्ध बुद्धिवादाने पारखून घेतो, तसेच त्यातील ज्ञान नि अज्ञान विज्ञानाच्या कसोटीस लावावे आणि उत्तम ते मानवी समाअिक संपत्ती म्हणून सर्वांनी स्वीकारावे." उपयुक्ततावादी भूमिकेतून धर्मग्रंथाकडे व धर्म-मताकडे पाहत असताना सावरकर बुद्धिवादाला कुठेही सोडत नाहीत, हे लक्षात

घेतले पाहिजे. धर्मग्रंथांना ते विज्ञानग्रंथाच्या नि इतिहासग्रंथाच्या जोडीला नेवून बसवितात. याचा सरळ अर्थ धर्मात वा धर्मग्रंथात जितके विज्ञान आहे तेवढे स्वीकार्य, व जेवढा इतिहास असेल तेवढा स्वीकार्य– कारण ते उपयुक्त आहे. धर्मग्रंथ हा 'धर्मग्रंथ' म्हणून वाचू नका; धर्ममत हे 'धर्ममत' म्हणून स्वीकारू नका, ही भूमिका निःसंदिग्धपणे निःपक्षपाती धर्मअश्रद्धाची भूमिका आहे, हे उघड आहे.

ऐतिहासिक दृष्टी म्हणजे काय ?

मग सावरकरांचा उपयुक्ततावादी दृष्टीकोण त्यांच्या बुद्धीवादापेक्षा वेगळा कुठे आहे ? धर्ममतांना व धर्मग्रंथांना सावरकर बुद्धिवादाची कसोटी लावतातच, पण त्याशिवाय ऐतिहासिक दृष्टिकोणातून त्याकडे पाहायला सांगतात, येथे सावरकर वेगळे पडतात. हा ऐतिहासिक दृष्टिकोण म्हणजे काय, हे समजून घेतल्याशिवाय सावरकरांचे हे वेगळेपण आपल्याला लक्षात येणार नाही.

ऐतिहासिक दृष्टिकोण म्हणजे काय ? एका दृष्टीने इतिहासाचा अभ्यास करण्याविषयीचा हा दृष्टिकोण आहे. इतिहास कसा लिहावा नि वाचावा ? या संबंधी सावरकरांचा एक विशेष लेख आहे. इतिहास म्हणजे ज्या गोष्टी जशा घडल्या त्या तशा सांगणे. " इतिहास लिहायचा म्हणजे ते अगदी 'इति-अि-हास' असाच लिहावा. त्याचे वर्तमानकाळावर काय परिणाम होतील याची तो इतिहास लिहिते वेळी मुळीच चिंता बाळगू नये. " असे सावरकरांचे मत आहे. " " राष्ट्याराष्ट्रातील संधिविग्रह केवळ इतिहासाच्या आवृत्तीची हौस असते म्हणून होत नसतात. आजच्या परिस्थितीत अनुकूल काय, प्रतिकूल काय, हे पाहूनच आजचे व्यवहार चालतात" " म्हणून सत्य इतिहास सांगण्याची भीती वा चिंता बाळगण्याचे कारण सावरकरांना वाटत नाही. " इतिहास शिकवितांनाच त्यांना तो वाचावा कसा, उपयोजावा कसा आणि त्याचे आपल्या उन्नतीसाठी कोणते तात्पर्य काढावे, हेही शिकविले जाते " " हा त्यांचा इतिहास शिकविण्याचा उपयुक्ततावादी दृष्टिकोण आहे. त्यांची ही भूमिका अनेक बुद्धिवाद्यांना मान्य नसते. इतिहास ही भूतकालातील गोष्ट असून त्याचा विचार करणे प्रतिगामीपणाचे आहे असे वाटणारे बुद्धिवादी कांही कमी नाहीत. इतिहासाचा अभिमान म्हणजे जुन्या कालबाह्य परंपरेचा, जुन्या चालीरितीचा, घोडचुका करत आलेल्या पूर्वजांचा अभिमान आहे, असे त्या बुद्धिवाद्यांना वाटते. मार्क्सवादी विचारांचा प्रभाव असणारे बुद्धिवादी प्रायः या विचाराचे असतात. इतिहास म्हणजे बुद्धिबाह्य श्रद्धा अशी त्यांची पक्की समजूत असते. सावरकरांना या बुद्धिवाद्यांची ही भूमिका मान्य नाही. इतिहास ही उपयुक्त गोष्ट आहे, व मनुष्यानी आपल्या उन्नतीसाठी त्याचा उपयोग करुन घेतला पाहिजे, ही त्यांची भूमिका आहे. यासाठी इतिहास लिहावा कसा, शिकवावा कसा व वाचावा कसा, याविषयीचा दृष्टिकोण ते लोकांना सम-

जून सांगतात.

इतिहास कसा वाचावा या विषयी सावरकर म्हणतात, "आपण जे वाचीत आहो तो इतिहास आहे, ही जाणीव एकसारखी सतत जागृत ठेवली पाहिजे. जे मागे घडले ते त्यात यथावत् नि यथाप्रमाण लिहिलेले आहे. आज काय घडावयास पाहिजे, हे भूतकाळ सांगणार नसून तो प्रश्न आपण वर्तमानकालाने सोडविला पाहिजे. भूतकाळात त्या त्या वेळच्या भिन्न भिन्न परिस्थितीप्रमाणे आपल्या तत्कालीन पूर्वजांना जे जे योग्य वाटले, ते ते त्यांनी केले. आज जर परिस्थिती भिन्न असेल तर धार्मिक, सामाजिक वा राजकीय प्रकरणी आपल्या हिंदुराष्ट्राच्या हिताला जे अनुकूल असेल तेच आचरिले पाहिजे. त्याकाळी काही परिस्थितीत, आज अन्याय व अवास्तव ठरणाऱ्या रुढी आणि जातिधर्म हे त्या त्या मागच्या कालखंडात क्वचित अत्यंत आवश्यक किंवा अपरिहार्य किंवा उपकारकही ठरले असतील, पण तेवढ्यासाठीच काय त्या त्या रुढी किंवा ते ते जातिधर्म आजही आपण पाळावयाचे काय? भूतकालांतील कोणत्याही घटनेची चिकित्सा वर्तमानकालाचे उपनेत्र लावून करु नये, तर ज्या कालखंडात ती घटना घडली किंवा तशा विभिन्न समाजरचना होत्या, त्या कालाच्या परिस्थितीच्या प्रकाशात त्या निरीक्षाव्यात. मूल्यमापन करण्याचा, त्या चांगल्या होत्या का वाईट की अपरिहार्य, हे ठरविण्याचा खरा निकष म्हणजे त्या काळची परिस्थिती; आजची नव्हे!"

हाच सावरकरांचा ऐतिहासिक दृष्टिकोण आहे. इतिहासाकडे पाहण्याचा हा एक वस्तुनिष्ठ दृष्टिकोण आहे, असेच आपणाला म्हणावे लागेल. धर्मग्रंथ हे सावरकरांच्या दृष्टीने निव्वळ इतिहास ग्रंथ ठरतात. या ग्रंथाकडे या ऐतिहासिक दृष्टिकोणातून पाहिले पाहिजे, अशी त्यांची शिकवण आहे. ते वैदिक वा अन्य कोणत्या धर्माची शिकवण देत नाहीत, तर या वेदांना वा अन्य सर्व धर्मग्रंथांना इतिहासग्रंथ समजून त्यांचा अभ्यास करावा, अशी ते शिकवण देतात, हे समजून घेतले पाहिजे.

चार स्पष्ट भूमिका

या ऐतिहासिक दृष्टिकोणातून धर्मग्रंथाकडे पाहिले की खालील गोष्टी स्पष्ट होतात. एक, धर्म ग्रंथ ज्या काळी निर्माण झाले ते त्या काळची गरज म्हणून निर्माण झालेले असतील. त्या काळची ती एक उपयुक्त सुधारणा असू शकेल. त्या काळच्या परिस्थितीनुसार ती एक क्रांतीही असू शकेल. दुसरे, हे धर्मग्रंथ ज्यांनी निर्मिले, ते आपले पूर्वज होते. ऐतिहासिक पुरुषाबद्दल आपल्याला जसा आदर, अभिमान व कृतज्ञता वाटते किंवा वाटली पाहिजे, तशीच या धर्मग्रंथकर्त्यांबद्दल वाटायला हवी. तिसरे, त्या काळी ते धर्मग्रंथ उपयुक्त ठरले म्हणून आजही ते उपयुक्त आहेत, असे मानता कामा नये. आजच्या परिस्थितीत उपयुक्ततेची प्रत्यक्ष कसोटी लावूनच हे ठरवले पाहिजे. इतिहासाची पुनरावृत्ती जशी अनुकरण

करण्याच्या इच्छेने होत नसते, तशीच धर्मग्रंथातील आचारही शब्दनिष्ठ प्रवृत्तीने या नव्या परिस्थितीतही आचरणे योग्य नव्हे. चौथे, इतिहासाच्या अनुभवातून जसा बोध घेता येतो, तसाच धर्माच्या ऐतिहासिक काळातील परिणामावरुन बोध घेतला पाहिजे. सावरकरांच्या धर्मग्रंथाकडे पाहण्याच्या ऐतिहासिक दृष्टिकोणाची ही चार सूत्रे आपण समजून घेतली पाहिजेत.

या चार सूत्रांपैकी शेवटच्या दोन हचा सावरकरांच्या विज्ञाननिष्ठ भूमिकेचाच भाग आहेत व मागील प्रकरणात याचा विचार केलेला आहे. येथे पहिल्या दोन सूत्रांचा थोडासा विचार करायचा आहे. इतर सुधारकापेक्षा किंवा बुद्धिवाद्यापेक्षा सावरकर जर कुठे वेगळे वाटत असतील तर ते या पहिल्या दोन सूत्राच्या संबंधातच होत. सावरकर बुद्धिवादी आहेत, पण बुद्धिवादाशी विरोधी असणाऱ्या किंवा त्यांनाच मान्य नसणाऱ्या गोष्टीचे सत्य अस्तित्व नाकारण्याची बौद्धिक तडजोड त्यांनी कधीही केलेली नाही. अशा मानण्याचे समज-गैरसमज काय होतील याची त्यांनी कधीही पर्वा केली नाही. धर्मग्रंथातील एखादी गोष्ट असत्य व घातक आहे, असे आज जरी आपणाला वाटते तरी, धर्मग्रंथनिर्मितीच्या वेळेस तो सत्य व हितकारक आहे, असे त्या ग्रंथकर्त्याला वाटले असणे साहजिक आहे, हे आज मान्य करायला फार मोठे बौद्धिक धाडस लागते. सनातनी लोकांना यातील पहिला अर्धा भाग मान्य नसतो, तर बुद्धिवादी म्हणविणाऱ्यांना दुसरा अर्धा भाग मान्य नसतो, ही वस्तुस्थिती आहे. सावरकर या दोन्हीही गोष्टी एकदाच मान्य करतात. धर्मग्रंथ हे समाज सुधारणेच्या प्रामाणिक हेतूने तयार केलेले आहेत, ही त्यांची सर्वसामान्य भूमिका आहे. हा नियम सर्वच धर्माच्या धर्मग्रंथांना ते लागू करतात.

हेतू प्रामाणिक

धर्मग्रंथातील आज असत्य व टाकाबू ठरलेल्या प्रत्येक गोष्टीचा उगम व मूळ कारणे याचे ऐतिहासिक संशोधन करुन काढलेला हा सावरकरांचा निष्कर्ष नाही, तर ती एक मनाने स्वीकारलेली भूमिका आहे. वस्तुनिष्ठतेपेक्षा उपयुक्ततेवर तो अधिक आधरित आहे. त्यांच्या समाजसुधारणेसाठी स्वीकारलेला व्यावहारिक धोरणाचा एक भाग आहे. धर्मग्रंथातील आज असत्य व घातक ठरलेल्या प्रत्येक गोष्टीचे मूलस्वरुप शोधून काढणे मूलतःच कठीण असते. अनुमानाचेच बहुशः आपल्याला ते ठरवावे लागते. यज्ञसंस्था आज घातक व टाकाबू आहे असे सावरकरांचे मत होते. ही यज्ञसंस्था प्राचीन काळी जन्मास कशी आली, हे त्यांनी सांगितले आहे. प्राचीन काळी जेव्हा कृत्रिमपणे हवा तेव्हा नि तितकाच अग्नी निर्माण करण्याचा शोध लावला, तो एक निसर्गावरील मनुष्याचा फार मोठा विजय होता. आताच्या विद्युतशोधाइतकाच तो त्याकाळी महत्वाचा होता. अशा या अलौकिक अग्नीला देवता म्हणून पूजणे, त्यासाठी यज्ञसंस्था निर्माण करणे, हे साहजिक होते, असे सावरकरांनी यज्ञांच्या कुळकथेबद्दल म्हटले आहे.

गोपूजेवर घणाघाती प्रहार करणारे सावरकर प्राचीन काळी कृषी प्रधान भारतात आर्याला गाय ही वरदान वाटली व कृतज्ञतेने त्यांनी गायीला माता म्हटले, देवता मानले, आणि हे साहजिकच होते, असे म्हणतात. जडवस्तूची पूजा असल्याची व अज्ञानाची पूजा होय असे आज म्हणणारे सावरकर, प्राचीन काळी सृष्टिनियमाचे फारसे ज्ञान नसल्यामुळे त्या वेळेसच्या पूर्वजांनी तशी पूजा करणे साहजिकच होते, असे म्हणतात. चातुर्वर्ण्याचा समूळ उच्छेद झाला पाहिजे, असा प्रचार करणारे सावरकर, जन्मास आला त्या वेळेसच्या ज्ञानाच्या व व्यवस्थेच्या मानाने ती एक सुधारणा होती, असे म्हणतात. अशा प्रत्येक गोष्टीची कुळकथा सांगणे व खात्रीपूर्वक तिच्या सत्यतेवर शिक्कामोर्तब करणे मूलतःच कठीण असते. अशा परिस्थितीमध्ये सर्वसाधारण अवलोकनाने सर्व सामान्यपणे सांगता येईल, अशी ही भूमिका सावरकरांनी स्वीकारलेली होती.

आदर व कृतज्ञता

अशा या कालबाह्य धर्मग्रंथाच्या कर्त्यांबद्दल आपण आदर, अभिमान व कृतज्ञता बाळगली पाहिजे, अशी सावरकरांची दुसरी भूमिका प्रत्यक्षपणेच भावनेवर आधारलेली आहे. आपल्याच नव्हे जर जगातील कोणत्याही धर्मासंबंधी प्रत्येकाला असे वाटले पाहिजे, अशी धर्मातीत भूमिका सावरकर मांडतात. आपल्या पूर्वजांनी पूर्वी अडाणीपणा किंवा चूकही केलेली असली तरी, त्यांच्या विषयी आपण आदरच बाळगला पाहिजे, कृतज्ञता बाळगली पाहिजे, अशी सावरकरांची भूमिका आहे. 'वंदनीय पण अनुकरणीय नव्हे' हे सावरकरांच्या लेखनांचे एक सूत्र आहे. या सूत्राविषयी आम्ही नंतर स्वतंत्रपणे लिहिलेले आहे. सावरकरांची ही भूमिका पटो वा न पटो, पण जी आहे ती अशी आहे. हा आदर व्यक्तीबद्दलचा आहे, धर्मकर्त्याबद्दलचा आहे, हे समजून घेतले पाहिजे. वडिलांचे विचार आपल्याला पसंत नसतांना सुद्धा, त्यांच्या जुन्या वा कालबाह्य विचारांशी मतभेत व्यक्त करुन, प्रसंगी त्याबर टीका करुन, परत आपल्या वडिलाविषयी आदर व कृतज्ञता आपण जशी व्यक्त करतो, तशीच सावरकरांची ही भूमिका आहे. भूतकालीन गोष्टीकडे ऐतिहासिक भूमिकेतून पाहण्याच्या दृष्टिकोणाचा हा अपरिहार्य परिणाम आहे. भूतकालीन गोष्टींची परिस्थिती निरपेक्षपणें वर्तमानात पुनराबृती करण्याची शब्दनिष्ठ प्रवृत्ती त्यांच्यात नव्हती, म्हणून धर्मग्रंथाचे प्रामाण्य त्यांनी झुगारुन दिले; परंतु आपल्या पूर्वजांचा हा वारसा राष्ट्रीय वारसा आहे, राष्ट्राचा तो अमोल असा ऐतिहासिक ठेवा आहे, राष्ट्रउभारणीसाठी इतिहास म्हणून या गोष्टीचा आपल्याला अभिमान वाटला पाहिजे, असे सावरकरांना वाटत असे. राष्ट्रवादामध्ये त्या राष्ट्राच्या इतिहासाचा अभिमान गृहीत असतो. सर्वांना श्रद्धा ठेवण्यासारखे इतिहास, ऐतिहासिक पुरुष हे एक श्रद्धास्थान असते. आधुनिक जगाने जी जी नवी मूल्यें आज मान्य केली आहेत, त्या मूल्यांची कसोटी लावून

आपला सर्व जुना इतिहास कसा अडाणी लोकांचा, अडाणी मूल्यांचा व अडाणी घटनांचा होता, हे सिद्ध करण्याचा, व त्यापायी या सर्व इतिहासाला, ऐतिहासिक पुरुषांना मोडीत काढण्याचा, बहिष्कृत करण्याचा खटाटोप सावरकरांच्या बुद्धिवादात बसणारा नव्हता. आदर, पूज्यभाव, कृतज्ञता, अभिमान इत्यादी श्रद्धामय गोष्टी सावरकरांचा बुद्धिवाद मान्य करत होता, असा याचा अर्थ आहे.

धर्मग्रंथातील आज असत्य व घातक ठरलेल्या गोष्टी पूर्वीच्या काळी पूर्वजांना तशा वाटत नसल्या पाहिजेत, ही सावरकरांची एक भूमिका आहे, ऐतिहासिक निष्कर्ष नव्हे. ज्या प्रकरणी याच्या विरोधी पुरावा उपलब्ध असेल, त्या प्रकरणी ही भूमिका लागू होणार नाही. या विरोधी पुराव्याचा अर्थ असा होतो की, एखादी गोष्ट असत्य आहे, घातक आहे हे माहीत असूनही हेतूपूर्वक व तेही दुष्ट हेतूनी धर्मग्रंथात ती गोष्ट घालण्यात आलेली आहे, या विषयी निश्चित असा ऐतिहासिक पुरावा आहे. महात्मा फुले यांचे किंवा डॉ. आंबेडकरांचे हिंदुधर्मग्रंथावरील आक्षेप प्रायः याच प्रकारचे आहेत. 'मनुस्मृति : काही विचार' या ग्रंथात प्रा. कुरुंदकरांनी मनुस्मृतीवर हाच आक्षेप घेतलेला आहे. धर्मग्रंथकर्त्यांच्या हेतूविषयीचे हे आरोप आहेत. चातुर्वर्ण्य, जातिभेद वा अस्पृश्यता या बाबतीत सावरकरांचे आणि डॉ. आंबेडकर याचे विचार आपण जेव्हा वाचतो, तेव्हा काही महत्वाच्या गोष्टी आपल्या लक्षात येतात. पहिली गोष्ट चातुर्वर्ण्य, जातिभेद वा अस्पृश्यता नष्ट करण्यासंबंधीची दोघांचीही तात्विक भूमिका सारखीच आहे. या सर्व गोष्टीचा उच्छेद झाला पाहिजे, याबद्दल दोघांचे एकमत होते. दुसरी गोष्ट, या गोष्टीचा उच्छेद कसा करायचा या बाबतच्या कार्यक्रमात दोघांत फरक आहे. पण तो सद्याचा आपला विषय नाही. तिसरी गोष्ट, या गोष्टींचा जन्म कसा झाला याचे ऐतिहासिक संशोधन करण्याचा आंबेडकरांनी प्रयत्न केलेला आहे. शुद्र कोण होते, अस्पृश्य कोण होते, इत्यादी शोध घेण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला आहे. जातिभेदाची, अस्पृश्यतेची कारणमिमांसा देण्याचा प्रयत्न केला आहे. सावरकरांनी असे ऐतिहासिक संशोधन करण्याचा कुठेही प्रयत्न केलेला नाही. हिन्दुधर्मकर्त्यावर डॉ. आंबेडकर विशिष्ट हेतूचे आरोप करतात. धर्मग्रंथ कर्त्याच्या अशा हेतूची सावरकर कुठेही वस्तुनिष्ठ चिकित्सा करत नाहीत. धर्मग्रंथातील शब्दनिष्ठ प्रवृत्तीमुळे व त्यातील घातक गोष्टीमुळे इतिहासकालात किती अनिष्ट परिणाम झाले व पुढेही होतील याचे विदारक चित्रण सावरकर करतात. त्यातच त्यांना रस आहे. या गोष्टीच्या उगमाच्या चिकित्सेत ते पडलेले दिसत नाहीत. आंबेडकरांचे लक्ष या दोन्हीही गोष्टीकडे आहे.

हेतूचा पुरावा अशक्य

धर्मकर्त्याच्या सद्हेतूबद्दल सावरकर जे बोलतात ते वस्तुस्थिती निदर्शक निष्कर्ष म्हणून नसते; तर पूर्वजाबद्दल कृतज्ञता व्यक्तविणाऱ्या अंतःकरणाची ती

एक भावपूजा असते. वस्तुतः हेतूबद्दलचा निर्विवाद पुरावा हा नेहमीच कठीण असतो. दूर भूतकाळातील एखाद्या गोष्टीचा जन्म केव्हा, कुठे व कसा झाला, हेच मुळात निर्विवाद ऐतिहासिक पुराव्यानी सिद्ध करणे कठीण असते. उदाहरण द्यायचे तर, चातुर्वर्ण्याचा जन्म कसा झाला वा अस्पृश्यता कशी जन्मास आली, याचा निर्विवाद ऐतिहासिक पुरावा उपलब्ध नाही. अस्पृश्य मूळचे कोण, हे ठरविण्याचा डॉ. आंबेडकरांचा प्रयत्न व निष्कर्षही अशा निर्विवाद पुराव्यावर आधारलेला नाही, ही गोष्ट स्वतः डॉ. आंबेडकरानीच मान्य केलेली आहे. 'भूतकाळाच्या पोटात जिची पाळेमुळे गडप झालेली आहेत अशा एका संस्थेचा आपण उहापोह करीत आहोत.' असे त्यांनी अस्पृश्यतेविषयी म्हटले आहे.[१०] 'अस्पृश्य मूळचे कोण?' हा ग्रंथ 'इतिहासापेक्षा कलात्मकच अधिक आहे.[११]' असे त्यांनीच कबूल केलेले आहे. हे ठरविण्याच्या कामामध्ये कल्पना व गृहीतपक्षाचा फार मोठा वाटा असल्याशिवाय राहू शकत नाही,[११] असे त्यांनी स्वच्छपणे सांगितले आहे. मूळ गोष्टीच्या उगमाबद्दलच जर अशी परिस्थिती असेल, तर त्या गोष्टीच्या कर्त्याच्या हेतूसंबंधी निष्कर्ष काढणे फारच कठीण काम आहे. स्वतःच्याच स्वार्थाची जपवणूक करणे हचा मनुष्याच्या स्वभावाच्या आधारावर केलेले अनुमान हाच असा कोणता हेतू ठरविण्याचा आधार असतो. याच आधारावर धर्मकर्त्याबद्दल जाणीवपूर्वक दुष्टपणा केल्याचे आरोप केले जातात. परिणामावरुन हेतू निश्चित करण्याचा प्रयत्न केला जातो. असे करणे किती बेभरवशाचे व चुकीचे असते हे वेगळे सांगायला नको.

हेतूबद्दलचा निश्चित असा पुरावा मिळणे धर्मग्रंथकर्त्याबाबतीत असे कठीण असल्यामुळे, अशा वेळी सद्हेतूच गृहीत धरणे हाच अंतःकरणाचा व माणुसकीचा धर्म आहे, अशी सावरकरांची भूमिका आहे. सावरकर या धर्माची येथे जाणीव देतात एवढाच याचा अर्थ आहे. सावरकरांची ही भूमिका व भावना वैदिक धर्मग्रंथकर्त्यापुरतीच मर्यादित नसते; महंमद पैगंबरांविषयीही त्यांची भावना अशीच असते. वैदिक ऋषी वा पैगंबर यांचे अंतःस्फूर्त संदेश त्यांना देवाने प्रत्यक्ष सांगितले आहेत, अशी जी त्या थोर विभूतीची उत्कट निश्चिती होती, याबद्दल सावरकर म्हणतात,[१२] "त्या थोर विभूतीची तशी निष्ठा अगदी प्रामाणिक होती. त्यांना ते स्वतःच देवाचे अवतार वा देवाचे प्रेषित 'पैगाम' आणणारे असे जे वाटते, ते त्यांच्यापुरते तरी नितांत सत्यच होते, वरपांगी ढोंग नव्हते." सर्व धर्मग्रंथकर्त्याकडे पाहण्याचा बुद्धिवादी सावरकरांचा दृष्टिकोण हा असा होता. तो कोणत्याही धर्मश्रद्धेतून वा धर्माभिमानातून मुळीच निघाला नसून सद्भावनेतून व अंतःकरणाच्या स्वभावधर्मातून निघाला आहे, हे समजून घेतले पाहिजे. ही भूमिकाही पूर्णतः धर्मनिरपेक्ष आहे, हे लक्षात घेतले पाहिजे.

सामाजिक कारण

सर्वच धर्मकर्त्याविषयी आदरबुद्धी बाळगण्याचे या सद्भावनेशिवाय आणखी

एक कारण आहे. सावरकर एक कर्ते सुधारक आहेत. सनातनी शब्दनिष्ठ प्रवृत्तीचा उच्छेद मानसिक स्वरूपाचा असल्यामुळे, सनातन्यांना 'ममत्वबुद्धीने' 'पटवून सांगणे' या विना अन्य मार्ग यासाठी त्यांना उपलब्ध नव्हता.[13] ज्या धर्मकर्त्यांविषयी धार्मिक सनातन्यांच्या मनात पूज्यश्रद्धा असते; त्या धर्मकर्त्यांवर दुष्टपणाचा, स्वार्थीपणाचा व अप्रामाणिकपणाचा आरोप करणें सामाजिक सुधारणेच्या दृष्टीने हानिकारक असतें. प्रत्यक्ष सामाजिक सुधारणेच्या दृष्टीने हा धर्मकर्त्यांच्या दुष्टपणाचा मुद्दा अत्यंत गौण असून, त्यामुळे हितापेक्षा अहितच अधिक होण्याची शक्यता असते. असा आरोप वस्तुस्थितीपेक्षा संतापाचाच अधिक निदर्शक असतो. थोडेसे सत्य सांगण्यासाठी सामाजिक सुधारणेचे अधिक तर नुकसान करुन घेणे, सावरकरांच्या उपयुक्ततावादाला पटत नाही. ही बुद्धिवादाशी कोणत्याही प्रकारे केलेली तडजोड नव्हती, तर कर्त्या सुधारकांनी अवलंबलेले हे एक व्यावहारिक धोरण होते. बुद्धिवाद्याला जेव्हा लोकांत मिसळून सुधारणा करायची असते, तेव्हा व्यक्तीच्या मूर्तिभंजनापेक्षा घातक विचाराच्या भंजनावर त्याला लक्ष केंद्रीत करणे भाग असते. सावरकरांच्या त्या सद्भावनेच्या पाठीमागे असलेले हे सामाजिक कारणही आपण समजून घेतले पाहिजे.

धर्मग्रंथाकडे ऐतिहासिक दृष्टिकोणातून पाहण्याची सावरकरांची भूमिका ही अशी आहे. धर्मग्रंथ हा एक इतिहासग्रंथ आहे, ही भूमिकाच धर्मग्रंथाचे प्रामाण्यच नव्हे, तर पावित्र्यही संपून टाकते. धर्मग्रंथकार हे एक थोर ग्रंथकार म्हणून शिल्लक उरतात. त्या ग्रंथाचा आपापल्या बुद्धीप्रमाणे अर्थ काढण्याचा प्रत्येकाला हक्क प्राप्त होतो. धर्मग्रंथाला इतिहासाचा एक ग्रंथ मानले की व्यवहारात त्याचा अधिकारच समजतो. या प्रामाण्य नि पावित्र्य संपलेल्या धर्मग्रंथाचा आधार, इतिहास सोडून, इतर कोणत्याही गोष्टीसाठी घेतला जावू नये, अशी सावरकरांची स्पष्ट शिकवण आहे. त्यांच्या दृष्टीने धर्मशास्त्राधार आता इतिहास जमा झालेला आहे. त्याची जागा आता उपयुक्ततेशास्त्राने घेतली आहे. सावरकरांची ही भूमिका आता आपण समजून घेऊ.

उपयुक्तता एकमेव कसोटी

सावरकरांनी धर्मग्रंथावर जे प्रखर हल्ले चढविले, त्याचा अर्थ सनातन्यांनी असा घेतला की, सावरकरांना धर्मग्रंथातील जे आजच्या परिस्थितीतही उपयुक्त आहे तेही नको आहे. सावरकरांवर या बाबतीत प्रखर अशी प्रतिटीका सुरु झाली. सावरकर हे धर्मविध्वंसक आहेत, असेच लोकांना वाटले. पंडित सातवळेकरांनी या मुद्दयावर सावरकरांवर प्रखर टीका करणारा लेख लिहिला. जुन्या धर्मग्रंथांतील उत्तम असेल ते स्वीकारु नये, असे सावरकरांचे मत असल्याचा पंडित सातवळेकरांचा मुख्य आक्षेप होता. या लेखाला सावरकरांनी 'पुरातन की अद्यतन?' हा लेख लिहून उत्तर दिले. सावरकर म्हणाले,[14] "मतभेद जो आहे तो जुन्यातील

चा नव्यातील उत्तम ते ध्यावे, या विधेयांत नाही. उलट आमचे तेच मत आहे. मतभेद जो आहे, तो उत्तम, राष्ट्रास आज उपयुक्त काय आहे आणि ते कोणत्या कसोटीने ठरवायचे– शब्दनिष्ठ 'शास्त्राधारे' की विज्ञाननिष्ठ प्रयोगाद्वारे, या प्रकरणात आहे." आपल्या या म्हणण्याच्या समर्थनार्थ त्यांनी पूर्वी लिहिलेल्या "दोन शब्दात दोन संस्कृती' या लेखातील काही भाग उद्धृत केला आहे. त्या लेखात ते म्हणतात,[१९] "ही प्राचीन श्रुतिस्मृतिपुराणादि शास्त्रे ऐतिहासिक ग्रंथ म्हणून संग्रहालयात सन्मानपूर्वक ठेवून आता विज्ञानयुगाचे पान उलटले पाहिजे. त्या ग्रंथाचा काल काय झाले, हे सांगण्याचा अधिकार. आज काय योग्य हे सांगण्याचा अधिकार प्रत्यक्षनिष्ठ विज्ञानाचा. अद्ययावत्पणात मागच्या सर्व अनुभवाचे सारसर्वस्व सामावलेले असतेच; पण श्रुतिस्मृतिपुराणोक्त अद्ययावत् ज्ञानाचा लवलेशही नसतो. यास्तव अद्ययावत् अप-टु-डेट बनणेच इष्ट. यापुढे कोणतीही गोष्ट चांगली की वाईट, सुधारणा इष्ट की अनिष्ट या प्रश्नाचे उत्तर ती आज उपयुक्त की अनुपयुक्त या एकाच कसोटीवर पारखून दिले पाहिजे. तिला शास्त्राधार आहे का, हा प्रश्न केव्हाही विचाराला जावू नये."

वरील उतारा देऊन निष्कर्षादाखल सावरकर म्हणतात, "वरील उताऱ्यावरुन हे स्पष्ट होईल की आजपर्यंतच्या जुन्यातील जे प्रयोगांती आजही उपयुक्त ठरते, विज्ञानाच्या कसोटीस टिकते, ते ज्ञान तर आम्ही टाका म्हणत नाहीच. त्या पुरातन सर्व वन्यावाईट अनुभवास जमा धरुन आजच्या विज्ञानाच्या कसोटीने जे राष्ट्रधारकास आज उपयुक्त ठरते, ते बेधडक आचारावे." जुन्या धर्मग्रंथातील उत्तम ते स्वीकारण्यास सावरकरांची हरकत नव्हती; त्यांची हरकत जुन्या धर्मग्रंथातील ती गोष्ट आहे, म्हणून स्वीकारा, या भूमिकेला होती. एखादी गोष्ट स्वीकारण्याची कसोटी कोणती असावी, हा खरा वादाचा प्रश्न होता. 'आज ती गोष्ट उपयुक्त आहे का?' हीच साऱ्या गोष्टीच्या स्वीकार्याची एकमेव कसोटी होय, असे सावरकर स्पष्टपणे सांगत आहेत. हाच त्यांचा नवा शास्त्राधार आहे. जुन्या धर्मग्रंथातील उत्तम, उपयुक्त व आजच्या वैज्ञानिक कसोटीस टिकणारे, ते केवळ जुन्या धर्मग्रंथात आहे, एवढ्याखातर आम्ही स्वीकारणार नाही, ही भूमिकाच खऱ्या बुद्धिवाद्याची होवू शकत नाही. ही भूमिका एखाद्या पोथिनिष्ठाची होवू शकते. अमकी गोष्ट उपयुक्त म्हणून उत्तम आहे असा जर अनुभवाचा व विज्ञानाचा निष्कर्ष असेल तर, ती केवळ धर्मग्रंथात आहे म्हणून अस्वीकार्य ही एक प्रकारची पोथीनिष्ठाच झाली. अप–टु–डेट बनू इच्छिणारे सावरकर अशी भूमिका स्वीकारणेच शक्य नव्हते.

जुन्या धर्मग्रंथातील आज जे उपयुक्त आहे ते ते स्वीकार्य, याचा खरा अर्थ ते जे उपयुक्त आहे ते आम्ही टाकावू मानत नाही, असा आहे. ते कुठे आहे याची आम्ही अजिबात दखल घेणार नाही; असा याचा अर्थ आहे. स्वीकारण्यासाठी जसे धर्मग्रंथ हे कारण नसते, तसेच नाकारण्यासाठीही नसते, एवढाच याचा अर्थ

आहे. त्यामुळे जुन्यातील चांगले घ्यायचे नाही, हा आरोप म्हणजे सावरकर म्हणतात तसे केवळ कुभांड आहे.

शास्त्राधाराचे नावही नको

खरा प्रश्न धर्मग्रंथातील जे उपयुक्त असेल ते आपण जेव्हा स्वीकारतो, तेव्हा त्या उपयुक्त गोष्टीचा त्या धर्मग्रंथाशी काय संबंध असावा, हा आहे ! अशी एक गोष्ट की, जी धर्मग्रंथातही आहे आणि विज्ञानाच्या कसोटीनेही उपयुक्त ठरते, ती गोष्ट श्रुति–स्मृतिपुराणोक्त म्हणून स्वीकारायची का उपयुक्त म्हणून स्वीकारायची, हा एक लहानसा प्रश्न आहे. या गोष्टीच्या स्वीकृतीवर शास्त्राधाराचा टिळा लावायचा, का विज्ञानाच्या परीक्षेत उत्तीर्ण झाल्याचा शिक्का मारायचा, असा हा चिमुकला प्रश्न असला तरी त्याचे उत्तर मोलाचे आहे! कोणत्याही बाजूने उत्तर दिले तरी, निर्णयात फरक पडत नाही, म्हणून उत्तर टाळण्याइतका हा प्रश्न गौण नाही. ती गोष्ट स्वीकारण्याच्या प्रवृत्तीचे स्वच्छ प्रतिबिंब या उत्तरात पडणार आहे. अज्ञानाने किंवा चुकीने किंवा योगायोगाने एखादी गोष्ट, जी बुद्धिनिष्ठ असू शकते, मनुष्य करू शकतो वा स्वीकारू शकतो; पण तेवढ्याने कांही तो बुद्धिवादी ठरत नसतो. निष्कर्ष बरोबर येणे ही कांही बुद्धिवादाची कसोटी नव्हे ! निष्कर्ष काढण्याची पद्धती कोणती होती, ही बुद्धिवादाची कसोटी आहे. आलेल्या निष्कर्षाची बुद्धिनिष्ठ कारणे कोणती आहेत, हे सांगणे बुद्धिवादी पद्धतीचा पाया आहे. म्हणून शास्त्राधार आहे म्हणून स्वीकारायची का विज्ञानसिद्ध व उपयुक्त आहे म्हणून स्वीकारायची, याचे उत्तर महत्वाचे आहे. शब्दनिष्ठेचे किंवा बुद्धीवादाचे कट्टर पुरस्कर्तेच काय ते, यापैकी हे किंवा ते असे एकच एक उत्तर देतील. दोन कारणापैकी तुम्ही कोणतेही समजू शकता असे मुख्य प्रश्नाला बगल देणारे उत्तर देणारा, शब्दनिष्ठ आहे असे समजायला हरकत नाही. कारण बुद्धिवादी माणूस निष्कर्षाची कारणे देण्यास कुचरत वा चुकत नसतो. असे उत्तर देणाऱ्याला शब्दनिष्ठा पाळतच बुद्धिनिष्ठ होण्याचेही पुण्य चतुर उत्तराने अनायसेच मिळत असते अशा चकेल व चतुर उत्तर देणाऱ्याला सावरकर अर्धसनातनी म्हणतात.

सावरकरांचा मुख्य आक्षेप श्रुतिस्मृतिपुराणोक्त प्रवृत्तीला आहे. या प्रवृत्तीला ते उपहासाचा व विडंबनाचा विषय बनवितात. या शास्त्राधाराला सावरकर 'एरंडाचे गुऱ्हाळ' म्हणतात. शास्त्राधार हा कारण देण्याचा नसून कारण टाळण्याचा प्रकार आहे; अंधश्रद्धेचेच ते दुसरे नांव आहे! उपयुक्त गोष्ट ही उपयुक्त म्हणूनच स्वीकारावी, ती शास्त्रसंमत असली तरीही तसे म्हणूच नये, असे सावरकरांचे यावरील चिमुकल्या प्रश्नाचे बुद्धिवादी उत्तर आहे. सावरकर म्हणतात,[१६] "म्हणूनच आम्ही या शास्त्राधाराच्या चर्चेस एरंडाचे गुऱ्हाळ म्हणतो आणि तिरडी ही श्रुतिस्मृतिपुराणोक्त असली वा नसली तरी तिचे काही एक सोयरसुतक न पाळता ही आजची प्रेतयात्रेची पद्धत गैरसोयीची आहे, म्हणून सुधारली पाहिजे असेच

म्हणतो." तिरडी ही शास्त्रसंमत आहे का नाही, हा प्रश्नच सावरकर विचारु देत नाहीत. या शास्त्रसंमतीचे कोणतेही सोयरसुतक त्यांना वाटत नाही. या प्रश्नाचा विचारच करु नये असे त्यांना वाटते. सावरकर पुढे म्हणतात,[१७] "ते उपयुक्त आहे का हा प्रश्न नाही, ते श्रुतिस्मृतिपुराणोक्त आहे का, हा मुख्य प्रश्न ! ही जी आमची पूर्वापारची अडाणी प्रवृत्ती आहे, ती सोडून उपयुक्त ते उपयुक्त म्हणूनच आचरण्याची अद्ययावती प्रवृत्ती आम्ही स्वीकारली पाहिजे."

जी उपयुक्त म्हणून स्वीकारले पाहिजे, ती गोष्ट धर्मशास्त्रात आहे असे म्हणू सुद्धा नये, कारण अशा म्हणण्यातून शब्दनिष्ठ प्रवृत्ती सिद्ध होते, त्या प्रवृत्तीला खतपाणी मिळून ती फोफावते. उपयुक्ततेच्या पाठीमागे 'श्रुतिस्मृतिपुराणोक्त' हात धुवून पाठीस लागले आहे, असे त्यांनी स्पष्टपणेच म्हटले आहे.[१८] प्रेते जाळण्याची उपयुक्त पद्धत आहे, तिचे उदाहरण घेवून सावरकर म्हणतात,[१९] "सुदैवाने प्रेते जी जाळण्याची आमची पद्ध चांगली आहे, पण ती चांगली आहे म्हणून नव्हे, तर सनातन म्हणून चालू आहे. ज्या हिंदूजातीत प्रेते पुरणे हेच श्रुतिस्मृतिपुराणोक्त आहे, ते ती पुरितच आहेत ! जाळतात ते देखील नवीन विद्युतगृहात प्रेत जाळण्यास मान्यता देणार नाहीत." तेव्हा उपयुक्त ती उपयुक्त, चांगली ती चांगली, असे समजूनच प्रत्येक गोष्ट स्वीकारली पाहिजे; सनातनत्वाचा शिक्का तिच्यावर बसताच कामा नये, अशी सावरकरांची रोखठोक भूमिका आहे. असा कोणता शिक्का किंवा त्यांच्या भाषेत 'राजमुद्रा' ठोकून एखादी गोष्ट स्वीकारली की, त्या राजमुद्रेची बेडी तिला पडलीच म्हणून समजावी. असा शिक्का त्या गोष्टीच्या उपयुक्ततेच्या गुणावर नसतो तर शास्त्राधाराच्या घातक प्रवृत्तीवर असतो. सावरकर म्हणूनच आक्रंदून सांगतात,[२०] "खरोखर या अपरिवर्तनीय शब्दनिष्ठ धर्मग्रंथांनी हजारो वर्षाच्या अडाणीपणास अमर करुन ठेवले आहे." स्वीकारलेली उपयुक्त गोष्ट 'सनातन'ही आहे किंवा 'शास्त्रसंमत'ही आहे, असे म्हणणे म्हणजे या अडाणीपणास आणखी अमर करुन ठेवण्याचाच प्रकार होय, ही सावरकरांची भूमिका आहे.

एरंडाचे गुऱ्हाळ

शास्त्राधाराचे नावही घेऊ नये याबद्दल सावरकरांचा जो कटाक्ष आहे,याला वर सांगितलेल्या कारणाशिवाय आणखी दोन तेवढीच बलवत्तर कारणे आहेत. एखादी गोष्ट सनातन वा शास्त्रसंमत आहे का नाही, हे ठरविणे, ती गोष्ट उपयुक्त आहे का नाही, हे ठरविण्यापेक्षा अतिशय कठीण काम असते. उपयुक्त आहे का नाही यांची कसोटी प्रत्यक्षतेची असल्यामुळे बुद्धी ती तारतम्याने निश्चित करु शकते. पण ती सनातन वा शास्त्रसंमत आहे की नाही, हे कुणालाही निर्विवादपणे ठरविता येत नाही. धर्मग्रंथ जरी अपरिवर्तनीय अपौरुषेय असले तरी, त्या ग्रंथाचा अर्थ मनुष्यबुद्धीच काढत असते. अमक्या वाक्याचा वा श्लोकांचा अर्थ अमकाच

झाला पाहिजे, असे काही त्या शास्त्रातच लिहून ठेवलेले नसते. आणि असले तरी त्या अर्थाचिच अनेक अर्थ काढण्यास पुरुष बुद्धी तयारच असते. तेव्हा प्रत्येक काढणारा आपल्या बुद्धीप्रमाणे अर्थ काढतो. बुद्धीने प्रामाणिकपणे अर्थ काढला तरी, आधार घेतलेल्या एकाच शब्दाचे वा वाक्याचे एकापेक्षा अनेक व परस्पर-विरोधी अर्थ निघू शकतात, असे सावरकरांचे म्हणणे आहे.

सावरकर म्हणतात,[२१] "जितके पुरुष, तितकेच वेद, तितके पंथ तितकी भिन्न प्रमाणे" होऊन बसतात. 'वेदग्रंथ अक्षर रुपाने एकच राहिला तरी अर्थ-रुपाने जितके भाष्यकार तितके शतावधि वेद होऊन बसतात!"[२२] त्या गोष्टीचा आधार घेण्यासाठी त्या धर्मग्रंथात तशा अर्थाचा जवळपासचा श्लोक असला तरी त्याचा ओढून अनुकूल अर्थ काढला जातो. हा अर्थ काढणारी जी पुरुषबुद्धी असते, त्यातील बुद्धी दुय्यम असते, 'पुरुषच' महत्वाचा असतो, असे सावरकर म्हणतात. शब्दनिष्ठेच्या कुंपणात श्लोकाचा अर्थ काढणारी बुद्धीच पंगु बनते. त्यामुळे उचित अर्थ निघण्याचा मुळातच असंभव असतो. अमका आपल्याला हवा तो अर्थ या श्लोकातून काढलाच पाहिजे, या शब्दनिष्ठ प्रवृत्तीतून शास्त्राधाराच्या एरंडाचे गुऱ्हाळ चालू असते. पुरुष बुद्धी शब्दनिष्ठेचे दास म्हणून काम करत असते.

ही शब्दनिष्ठ प्रवृत्ती इतकी चिवट असते की, पाहिजे तो अर्थ काढायचा म्हणून शास्त्राधार शोधू लागली की, तो अर्थ शोधून काढल्याविना ती राहतच नाही. उपलब्ध कोणत्यातरी शास्त्रात, त्या शास्त्रांतील उपलब्ध श्लोकात, हा आधार सापडत नाही हे स्पष्टपणे कबूल करूनसुद्धा उपलब्ध नसलेल्या शास्त्रात वा श्लोकात तो असलाच पाहिजे, हा चिवट आशावाद ती काही सोडत नाही. या लोकांच्या या चिवटपणाबद्दल सावरकर म्हणतात, [२३] " जर श्रुतीत नाही म्हणून तुम्ही म्हणू लागाल तर ते चक्क सांगतात की, ज्याअर्थी स्मृतीत वा पुराणात वा शिष्टाचारात ती आहे, धर्म म्हणून बहुत काळ आचरली जात आहे, त्याअर्थी ती श्रुतीत असलीच पाहिजे. प्रस्तुतच्या उपलब्ध श्रुतीत सापडत नसेल तर आज लुप्त असलेल्या श्रुतिविभागात असलीच पाहिजे." याचा अर्थ, एखादी गोष्ट शास्त्रसंमत आहे का नाही याचा निर्णयच घेता येत नाही; किंवा पूर्वनिश्चित करूनच घेतला जातो. इतक्या अनिश्चित अर्थ असणाऱ्या शास्त्राधाराचा शिक्का, उपयुक्त म्हणून स्वीकालेरल्या गोष्टीवर मारणे हे निव्वळ निरर्थक असते! या एरंडाच्या गुऱ्हाळाच्या चरकातून उपयुक्त गोष्टीला सावरकरांना मुक्त करायचे होते.

धर्मवेडेपणाचा जन्म

शास्त्राधाराचा शिक्का मारण्याच्या प्रवृत्तीतून धर्मवेडेपणाचा जन्म होतो, असा सावरकराचा आरोप आहे. जे स्वीकारले ते उपयुक्त नाही, त्याच्याशी मत-भेद झाला तरी डोके फोडण्यापर्यंत पाळी येत नसते, असे त्यांचे म्हणणे आहे.

एखादी गोष्ट मानण्याचे कारण जसे एखादा शास्त्राधार असते, तसेच तीच गोष्ट न मानण्याचे कारण विरुद्ध असा दुसरा शास्त्राधारच असते. अशी अनेक शास्त्राधारे जगात व आपल्या देशातही आज प्रचलित आहेत. यातूनच धर्मवेडेपणाचा जन्म होतो, याची सावरकरांना चिंता आहे.

धर्मवेड तरी काय असते? दोन विरुद्ध गोष्टी मानणाऱ्या शब्दनिष्ठ आग्रहाची परिणती म्हणजे धर्मवेड ! या धर्मवेडाची नांगी विज्ञानाच्या बळानेच ठेचता येते, असे सावरकर रोखठोकपणे सांगतात, 'श्रुतिस्मृतिपुराणोक्ता' ला डोकेच वर काढू द्यायचे नाही, हा त्याचा एक मार्ग आहे. म्हणून या गोष्टीचा शिक्का उपयुक्त गोष्टीवर असणे त्यांना धोक्याचे वाटते. 'गोपूजा का?' याचे कारण शास्त्राधार हे असते; 'गोहत्त्या का?' यालाही कारण अन्य शास्त्रातला विरुद्ध अर्थाचा शास्त्राधार हेच असते. याचा परिणाम धर्मवेडात होतो. ही गोष्ट शास्त्रसंमत आहे, ही कल्पनाच धर्मवेडेपणाला जन्म व खतपाणी घालते. गोपूजा व गोहत्त्या हा उपयुक्ततेचा प्रश्न म्हणून स्वीकारला, की भांडणाचे कारणच संपते. शास्त्राधाराच्या अधिक्षेत्राखाली येणाऱ्या प्रत्येक गोष्टीच्या बाबतीत असेच घडत असते, म्हणून सावरकर म्हणतात,[२४] " पुरुष बुद्धीने तर्क प्रतिष्ठ वाटते ते घेऊ म्हणून चक्क सांगून इतर धर्मग्रंथाप्रमाणेच वेदकुराणबायबलादिक ग्रंथही वाचले नि पाळले तर, मतभेद झाला तरी तो शिव्याशाप, लाठीकाठी चालविण्याइतका, विकोपास जाण्याचा फारसा संभव नसतो. " धर्माधर्मातील, वा पंथापंथातील वाद वा संघर्ष मिटविण्याचा सावरकरांनी सांगितलेल्या या मार्गाचा आपण गंभीरपणे विचार केला पाहिजे. सावरकर धर्माधर्मात भांडणे लावतात, असा काहीजणांचा समज असतो. त्यांनी तरी सावरकरांची ही बुद्धिवादी भूमिका काळजीपूर्वक समजून घेतली पाहिजे.

शास्त्राधार घेण्याच्या प्रवृत्तीत एकीकडे शब्दनिष्ठ प्रवृत्ती वाढून त्यामुळे बुद्धिहत्त्या होते, व दुसरीकडे धर्मवेडेपणा वाढून त्यामुळे मनुष्यहत्त्या होते, असा सावरकरांचा गंभीर आरोप आहे. उपयुक्त गोष्टीवर शास्त्रमुद्रा ठोकायला सुरुवात केल्यावर त्या उपयुक्त गोष्टीचे धर्मानुसार वर्गीकरण सुरु होते. एखाद्या उपयुक्त गोष्टीवर एका शास्त्राचा पहिल्यादा शिक्का बसला की, तीच गोष्ट दुसऱ्या शास्त्राला उपयुक्त वाटत नाही. आपल्या शास्त्राचे वैशिष्ठ्य टिकविण्याकडेच प्रत्येकाचा आग्रह असतो. विरुद्धशास्त्राने उपयुक्त मानली की आपण ती टाकावू मानली पाहिजे, असे होवू लागते. परिणामतः स्वशास्त्रसंमत असेल तितके उपयुक्त याच्या पलिकडे मनुष्य जावू शकत नाही.

एखादी गोष्ट शास्त्रसंमत असली तरी त्या बाबीचा उल्लेखही करु नये, ही सावरकरांची भूमिका आपण पूर्वग्रह सोडून समजून घेतली पाहिजे. ही भूमिका पूर्णपणे बुद्धिवादी आहे, केवळ उपयुक्ततावादी नाही. बुद्धिवादाला असंमत असणारी कारणे बुद्धिवाद्याला देता येत नाहीत. एखादा न्यायमूर्ती एखाद्या

आरोपीला निर्दोष सोडून देताना, कायद्याप्रमाणे सर्व कारणे दिल्यानंतर, जर शेवटी सदर आरोपी माझा मेहुणाही आहे, असेही त्याला निर्दोष सोडून देण्याचे एक आगावू कारण नोंदवील, तर न्याय नावाची काही वस्तूच शिल्लक राहणार नाही. हे नातलग असण्याचे कारण न दिले तरी तो निर्दोषच सुटला असता या वस्तुस्थितीमुळे या न्यायदानाच्या गुणवत्तेत फरक पडत नसतो. बुद्धिवाद एक न्याय देण्याची पद्धत आहे. न्यायदानाशी असंमत असणारी कारणे जशी न्यायमूर्तीला देता येत नाहीत, तशीच बुद्धिवादाशी असंमत असणारी कारणे बुद्धिवाद्याला देता येत नाहीत. सावरकरांचा बुद्धिवाद किती प्रखर होता, हे यावरुन आपल्या लक्षात येईल. हिंदुधर्म हा, अमक्या अमक्या वाईट गोष्टी सोडून दिल्यावर, कसा बुद्धिवादीच आहे, उपयुक्त आहे, विज्ञानाच्या कसोटीवर टिकणारा आहे,– अशी भलावण म्हणून सावरकरांनी कधीही केली नाही. तो जो उरलेला चांगला हिंदुधर्म आहे, तो विज्ञानाच्या कसोटीस उतरला म्हणून त्याचा विज्ञानधर्मात सावरकर समावेश करणार; विज्ञानधर्म या नावानी त्याला स्वीकारणार, ओळखणार; आणि परत हाच आमचा 'खरा हिंदुधर्म' आहे, असे जगाला ओरडून सांगणार ! सावरकरांचा बुद्धिवाद हा असा आहे ! !

धर्मातील अज्ञानासंबंधी

धर्मग्रंथाकडे व धर्मांकडे पाहण्याचा सावरकरांचा उपयुक्ततावादी दृष्टिकोण आपण समजून घेत आहोत. धर्मकर्त्यांच्या हेतूसंबधाने ते जसे उपयुक्ततावादी बनतात, तसेच धर्मग्रंथातील तत्वज्ञानाविषयक व पारलौकिक बाबी संबंधातही उपयुक्ततावादी बनतात. सावरकरांच्या दृष्टीने या संबंधीची धर्मग्रंथातील माहिती ही एक कल्पना आहे, तो एक सत्याभास आहे. तात्विक अर्थी ते असे सांगत असले तरी व्यावहारिक दृष्टचा सावरकर या गोष्टीकडे, म्हणजेच या गोष्टीवर सनातन्याच्या असलेल्या श्रद्धेकडे, उपयुक्ततेच्या दृष्टिकोणातून पाहतात. याचा अर्थ या श्रद्धा उपयुक्त आहेत, असे त्यांना वाटते असा नाही. काही विशिष्ट भूमिकेतून वा विशिष्ट परिस्थितीमध्ये या श्रद्धांकडे बुद्धिवाद्यांनी कानाडोळा करायला हरकत नाही, असा याचा अर्थ आहे. ती विशिष्ट भूमिका व परिस्थिती कोणती हे आपण समजून घेऊ.

सावरकर बुद्धिभेद करतात असा त्यांच्यावर सनातन्यांचा आरोप होता. याला सावरकरांनी आम्ही बुद्धिभेद करीत नसून दुर्बुद्धिभेद करीत आहोत, असे उत्तर दिले. जो करु नये तो बुद्धिभेद म्हणजे काय हे सांगताना सावरकर म्हणतात, [२५] "बुद्धिभेद करु नये याचा अर्थ इतकाच की, ज्या समजुतीने वा कृतीने एकंदरीत लाभापेक्षा हानी अगदीच अल्प होत आहे, अशी समजूत वा कृती, या थोड्याशा हानीकडे वा असंमजस भागाकडे काय ते लक्ष देऊन एकसहा उच्छेदू नये ! " तत्वज्ञान व परलोकविषयक बाबींकडे सावरकर या भूमिकेतून पाहतात.

धर्मातील तत्वज्ञान व परलोकविषयक माहिती एक अज्ञान आहे, अशी सावरकरांची स्पष्ट भूमिका आहे व आपण ती पाहिली आहे.[२६] या अज्ञानाबद्दल उपयुक्ततावाद्यांनी कोणती भूमिका ठेवावी, याबद्दल ते म्हणतात,[२७] "कालपर्यंतच्या जुन्यातील जे प्रयोगांती आजही उत्तम ठरते, विज्ञानाच्या कसोटीस उतरते, ते ज्ञान तर आम्ही टाका म्हणत नाहीच, पण त्या जुन्यातील जे जे आजच्या विज्ञान कसोटीस अज्ञान ठरते, तेही समाजशास्त्र नि मानसिवदृष्टया आम्हास टाकावू वाटत नाही." सावरकरांच्या उपयुक्ततावादाचे हे प्रमुख सूत्रच होय, हे आपण समजून घेतले पाहिजे. या वरील विधानातील पहिल्या अर्ध्या भागाचा विचार आपण यापूर्वी केलेला आहे; आता शेवटच्या अर्ध्या भागाचा करायचा आहे. विज्ञानाच्या कसोटीने ज्या गोष्टी आज अज्ञान ठरलेल्या आहेत, त्या गोष्टी काही भूमिकेतून सावरकर टाकावू मानत नाहीत, हाच तो विचार करावयाचा भाग आहे. ज्या ठिकाणी बुद्धिवाद हात टेकतो, विज्ञान असमर्थ ठरते, तर्क 'नेतिनेति' म्हणतो, अशा गोष्टीविषयी हा विचार चालू आहे. या विश्वाचे गूढ विज्ञानाला उकललेले नाही, बुद्धीला सापडले नाही, या अर्थी ते एक अज्ञान आहे. देव, आत्मा, स्वर्ग, नरक, मोक्ष, पुनर्जन्म इत्यादी संबंधी आज विज्ञानाला अज्ञान आहे. हे असत्यापेक्षा वेगळे आहे, हे लक्षांत ठेवून सावरकरांची ही भूमिका आपण समजून घेतली पाहिजे. सावरकर येथे जर काही तडजोड करुन असतील तर ती अज्ञानाशी होय, असत्याशी नव्हे, हे लक्षांत ठेवले पाहिजे. अशा अज्ञान ठरलेल्या गोष्टी आम्हाला टाकावू नाहीत, अशी भूमिका प्रखर बुद्धिवादी माणूस कसा घेऊ शकतो, हा आपल्या समोरचा प्रश्न आहे.

दोन कसोट्या

सावरकरांची ही भूमिका दोन गोष्टींनी मर्यादित आहे. पहिली गोष्ट ही की, त्या गोष्टी मनुष्याला अहितकारक नसल्या पाहिजेत, व दुसरी गोष्ट म्हणजे त्या गोष्टी सामाजिक व मानसिक दृष्टिकोणातूनच काय ते टाकाऊ नाहीत. विज्ञानाने सिद्ध न होणाऱ्या गोष्टींना टाकावूपणातूनच वाचण्यासाठी, या दोन जादा परीक्षेला उतरावे लागेल. सश्रद्ध मनुष्य या गोष्टी मानतो याचे कारण त्यामुळे त्याचे कोणते तरी मानसिक व आत्मिक समाधान होत असते. परमेश्वराकडे जाण्याचा एक मार्ग म्हणून लोक अशा गोष्टी मानतात. मुख्यतः अशा गोष्टी या वैयक्तिकच बाबी असतात. परमेश्वर मानणे, त्याची पूजा करणे, स्वर्ग मानणे, पुनर्जन्म मानणे प्रार्थना करणे इत्यादी गोष्टी यातच मोडतात. आपण याला उपासना पद्धती म्हणू. या गोष्टी वैयक्तिकच आहेत. त्या वैयक्तिक दोन अर्थानी आहेत. पहिला हा की, या गोष्टी मानण्यात वैयक्तिक इच्छेचा प्रश्न गुंतलेला आहे. दुसरा हा की, या गोष्टीचे स्वरुप वैयक्तिक आहे. उपासनापद्धतीमध्ये उपासना करणारी व फळ मिळविणारी एकच व्यक्ती असते. तेव्हा हा प्रश्न व्यक्तिगत स्वातंत्र्याचा म्हणून

प्रत्येकाच्या इच्छेवर सोपविला जात असतो. सावरकरांनाही हे मान्य आहे. ते म्हणतात, २८ "ईश्वर, जीव, जगत् हे पारमार्थिक धर्माचे तत्वज्ञान; प्रत्यक्ष परिस्थितीशी संबंध नाही. ते तत्वज्ञान मानणें किंवा न मानणें हा व्यक्तीचा स्वतंत्र प्रश्न आहे." म्हणजेच प्रत्यक्ष परिस्थितीशी संबंध नसणारा व वैयक्तिक बाब असणारा हा प्रश्न आहे. या बाबी हानिकारक होणार नसतील, तर टाकावू न मानायला सावरकर काही अटीवर तयार आहेत.

वैयक्तिक बाबी

ही वैयक्तिक श्रद्धा समाजाकरिता किंवा स्वतः त्या व्यक्तिकरिता हानिकारक होऊ शकते. आपल्या या वैयक्तिक श्रद्धेमुळे दुसऱ्याच्या न्याय स्वातंत्र्यावर व हक्कावर जर गदा येत असेल, तर ती श्रद्धा समाजाकरिता हानिकारक ठरु शकते. दुसऱ्याचे न्याय हक्क हिरावले जाणार नाहीत, अशा बेताने सांभाळली, तर अशी वैयक्तिक श्रद्धा लोकांकरिता अहितकारक होणार नाही. मोक्ष मिळतो म्हणून यज्ञ करताना त्या यज्ञात समाजाचे धान्य, शक्ती व वेळ वाया जातो, म्हणून यज्ञ ही वैयक्तिक श्रद्धा राहत नाही. तेव्हा कर्ता, इच्छा, फळ व बाह्य परिणाम सर्वच दृष्टीने उपासना पद्धती वैयक्तिक राहत असेल, तर ती पाळण्याचा हक्क प्रत्येकाला उपभोगता येवू शकतो व अशा परिस्थितीतच त्या गोष्टी सावरकरांना टाकावू वाटत नाहीत.

उपासना पद्धती स्वतःकरिताही हानिकारक होवू शकते. स्वतःच्या प्रगतीला तिच्यामुळे खीळ बसू शकतो. पारलौकिकाला अक्षरशः खरे मानून, देव हा अक्षरशः खरा मानून जर सर्व प्रार्थना होवू लागल्या तर ऐहिक कर्तव्याऐवजी प्रार्थना करण्याचा उद्योग सुरु होतो. देवावर श्रद्धा ठेवून, पण स्वकर्तृत्वाचा नाश करुन घेण्यास कारणीभूत होणार नाही, अशा पद्धतीने ही उपासना पद्धती पाळली पाहिजे. विज्ञानाने ज्या गोष्टी सिद्ध झालेल्या आहेत, त्या जमेस धरुन, पारलौकिकाबद्दल श्रद्धा ठेवली पाहिजे. यासाठी काही पथ्य पाळणें भाग आहे. प्रत्यक्ष परिस्थितीशी या आचाराचा संबंध नसला पाहिजे. या आचाराने कोणतेही ऐहिक लाभ होत नाहीत, याची निश्चिती असली पाहिजे. मनुष्याला प्रत्यक्ष लाभ होतील अशा आशेने हे आचार करायचे नाहीत. माझे आचारच तेवढे ईश्वरास मान्य आहेत, माझाच ईश्वर काय तो खरा आहे, या गोष्टी असत्य असून बाकीच्यांच्याही अशाच श्रद्धेबद्दल समत्वबुद्धीने पाहिले पाहिजे. ही सगळी पथ्ये पाळल्यानंतर एखाद्याने वैयक्तिक बाब म्हणून पारलौकिक आचार केला काय नि न केला काय, पूजा केली काय नि न केली काय, स्वर्ग मानला काय नि न मानला काय, कुणाचीही हानी होण्याचा संभव नसतो, म्हणून अशा आचारांकडे सावरकर दुर्लक्ष करायला तयार आहेत.

"जी त्यांची फळें प्रत्यक्ष अनुभवाने केव्हाही मिळालेली नाहीत, ती त्याची

फळेच नाहीत. " असे पारलौकिक लाभाविषयी सावरकर म्हणतात.[२७] जी फळेच नव्हेत, ती आहेत म्हणून समाधान व आत्मिक आनंद काही पथ्ये पाळून उपभोगण्याचा प्रत्येक व्यक्तीचा हक्क सावरकर मान्य करत आहेत, एवढाच याचा अर्थ आहे. सावरकर म्हणतात, [२५] " ज्या समाधानाविषयी किंवा त्याच्या आध्यात्मिक वा पारलौकिक परिणामाविषयी ज्यास जसा आदर नि निष्ठा असेल तसे त्यांनी त्यास सुखनैव आचरावे. त्यापासून मिळणारा आत्मप्रसाद हा भौतिक अशा कोणत्याही आनंदाहून निरुपम आंतरिक सुखाची जोड ज्यास देवू शकतो, त्यांनी त्यास सुखनैव आस्वादावे." असे व्यक्तिस्वातंत्र्य सावरकर मान्यच करतात. पण या आचाराची, आस्वादाची मर्यादा सांगतांना ते बजावतात, [२८] " भक्तीचा आनंद आध्यात्मिक आहे. त्यायोगे व्यावहारिक अशी कोणतीही विशेष योग्यता वा सृष्टिनियमाचे ज्ञान किंवा राष्ट्राच्या ऐहिक उत्कर्षाला उपयोगी पडेल अशी कोणतीही गोष्ट, विशेष शक्ति वा युक्ति संताच्या, योग्याच्या वा भक्ताच्या अंगी येत नाही..... ' नामाचा महिमा ' एक प्रकारचा आध्यात्मिक आनंद त्या व्यक्तीला देवू शकला तरी त्या व्यक्तीच्या वा राष्ट्राच्या व्यवहारात त्या नामाच्या महिम्याची कवडीची पत नाही, हे आम्ही स्पष्टपणे ध्यानी ठेवावे." हे आपण ध्यानांत ठेवू तरच ती वैयक्तिक श्रद्धा स्वतःला हानिकारक होणार नाही, असे सावरकरांचे म्हणणे आहे. तेव्हा पारलौकिक बाब ही अहितकारक नसली पाहिजे, या त्यांच्या पहिल्या कसोटीचा हा अर्थ आपण समजून घेतला पाहिजे.

ज्या सामाजिक व मानसिक दृष्टीने सावरकर या पारलौकिक बाबीकडे किंवा धर्मग्रंथातील अज्ञानाकडे दुर्लक्ष करायला तयार आहेत, त्या दृष्टीचा अर्थ आपण आता समजून घेवू. धर्मग्रंथात सांगितलेल्या या ज्या गोष्टी आहेत त्याला सामाजिक व मानसिकदृष्ट्या एक मूल्य आहे, असे सावरकरांना वाटते. समाज जो घडतो तो व्यक्तीच्या सुख, दुःख, आकांक्षा, श्रद्धा इत्यादीच्या समान भावनेच्या बंधनाचीच म्हणजेच एकतेच्या भावनेनी बनतो. ' पैगंबर ' हा देव आहे, या आध्यात्मिक कल्पनेचा परिणाम ' मुसलमान ' समाज या वस्तुस्थितीच्या जन्मात होतो. समाजाच्या रचनेत, स्थिरतेत, ऐक्यात वा विकासात या आध्यात्मिक कल्पनेचा थोडाका होईना वाटा असतोच. ज्या अनेक घटकावर समाज वा राष्ट्र उभे राहाते, त्यांत या आध्यात्मिक वा पारलौकिक बाबी हा एक घटक आहे, हे बुद्धिवाद्यांनीही मान्य केल्याचे आपण मागे पाहिलेच आहे. [३१] व्यक्तीत, समाजात काहीतरी पण धर्मश्रद्धा राहतेच व ती कांही कुणालाही समूळ नष्ट करता येत नसते, ही वस्तुस्थिती बुद्धिवाद्यांनीही मान्य केलेली आहे. एकदा अशा स्वरुपाची धर्मश्रद्धा राहणार हे ठरल्यावर तिचा उपयोग व नियमन हानिकारक होणार नाही, याचा विचार करणे सावरकरांना भागच होते. अज्ञात असलेल्या गोष्टीवरही व्यक्तीची श्रद्धा असते, ही एक वस्तुस्थिती आहे. ती कांही बुद्धिवाद्याच्या इच्छेवर अवलंबून नसते. जो पर्यंत सर्वांना प्रखर बुद्धिवादी बनविता येत नाही, तोपर्यंत

तरी बुद्धिवाद्याला ही वस्तुस्थिती कशी नाकारता येईल ?

सामाजिक व मानसिक दृष्टीने

" मानवी जीवनातील विचार प्रधानतेलाही मर्यादा आहेत. जीवनाची एक कक्षा तर्काच्या पलिकडे असणे हेही आवश्यक आहे, नाहीतर मनुष्य हा केवळ यंत्र ठरण्याचा धोका आहे." [३२] असे जडवादी विचाराचे प्रा. कुरुंदकरच म्हणत आहेत. ही तर्कापलिकडील, विज्ञानाला सिद्ध न करता येणारी श्रद्धा संपूर्णपणे नष्ट करणेही योग्य नाही, असे जडवाद्यांनाही वाटत आहे. श्रद्धेचे अस्तित्व, काही मर्यादेपर्यंत, सृष्टिनियमाचाच भाग आहे, ही वस्तुस्थिती आहे. मनुष्याच्या वा सुधारकाच्या हातातील प्रश्न इतकाच आहे की, ही श्रद्धा मनुष्याच्या हिताला घातक कशी होणार नाही, याची काळजी घेणे, प्रयत्न करणे. ही सर्व काळजी घेऊन, निरुपद्रवी अशी जी आध्यात्मिक वा पारलौकिक श्रद्धा शिल्लक उरते, तिच्याशी बुद्धिवादाने उभा दावा मांडणे एक प्रकारे अनैसर्गिकच आहे. सावरकरांची भूमिका हीच आहे. या श्रद्धेकडे सावरकर सामाजिक दृष्टीने पाहतात. याचा अर्थ हा असा आहे.

या श्रद्धेची उपयुक्तता जशी सामाजिक दृष्टीने आहे, तशीच मानसिक दृष्टीनेही आहे. सुख ही व्यक्तिसापेक्ष गोष्ट आहे. पारलौकिक सुख ही सिद्ध न करता येणारी, पुराव्याच्या पलिकडची गोष्ट आहे. ते सुख मनुष्याच्या मनाला होत असेल व त्यामुळे त्याला मनःशांती मिळत असेल, तर बुद्धिवाद्याला त्यात आक्षेप घेण्याचे कारण नाही. तेव्हा मनःशांतिसाठी, आत्मिक सुखासाठी, एखाद्याने देवाची कल्पना केली, अद्वैत खरा मानला, निभाज पडला किंवा प्रार्थना केली तर त्यात बुद्धिवाद्याला आकाशपाताळ एक करण्यासारखे काहीही नाही. विज्ञानाला सिद्ध न करता येणारे, पण मनुष्याच्या अनुभवाला येणारे असे काही सुख, असा कांही आनंद असतोच, हे यंत्र न झालेल्या कुणाही बुद्धिवाद्याला मान्य करणे भाग आहे. सावरकरांची भूमिका हीच आहे. तेव्हा पारलौकिक बाबीकडे सावरकर सामाजिक व मानसिक भूमिकेतून पाहतात. त्या जर अहितकारक नसतील तर या भूमिकेतून त्यांना त्या बाबी टाकावू वाटत नाहीत. त्याच्या बुद्धिवादाची उपयुक्ततावादाशी या प्रकरणी कांही तडजोड झाली असेल तर ती एवढीच आहे, हे समजून घेतले पाहिजे.

◆◆

३. उदात्तमूल्यांविषयी भूमिका

ज्या धर्मग्रंथीय शब्दनिष्ठ प्रवृत्तीचा, म्हणजेच श्रुतिस्मृतिपुराणोक्ताचा, उच्छेद सावरकरांना करायचा होता, त्याचे मुख्य कारण प्रत्यक्ष परिस्थितीचा ती प्रवृत्ती विचारच करत नाही हा होता. आज काय हितकारक आहे, हे आजची परिस्थिती पाहूनच ठरविले पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. यालाच ते अद्यतन प्रवृत्ती म्हणतात.

सावरकर स्वीकारतात ती अद्यतन प्रवृत्ती ही केवळ धर्मग्रंथ प्रामाण्यच नाकारीत नसते. देशकालपरिस्थितीचा विचार न करता अत्यंत उदात्त अशी कोणती मानवी मूल्ये आपण ती उदात्त आहेत यास्तव, आचरत असू, तर सावरकर त्याही उदात्त प्रवृत्तीवर अशीच टीका करतात. त्याच्या दृष्टीने देशकालपरिस्थितीचा काहीही विचार न करता स्वीकारलेली अत्युच्च मानवी मूल्यांबद्दलची प्रवृत्ती अहितकारक आहे. देशकालपरिस्थितीला सावरकर सातत्याने इतके घट्ट पकडून ठेवतात की, हाच त्यांच्या सर्व विचाराचा, उपदेशाचा व कार्याचा कसोटी व पाया होऊन बसतो. जीवनातील कोणतीही मूल्य हे देशकालपरिस्थिती सापेक्ष असते, हा सावरकरांचा मुख्य सिद्धांत आहे.

अंतिम ध्येय विश्वराष्ट्र

हे जग, या जगातील मानव, या जगातील विविध देश, या सर्वांचे परस्परांशी असलेले संबंध व व्यवहार याची अद्याप पुरेशी ओळख झालेली नव्हती, त्यावेळेस सावरकरांना वाटत असे की,[१] "आमची खरी जाती-मनुष्य, खरा धर्म-माणुसकी, मानवधर्म; खरा देश पृथ्वी, खरा राजा ईश्वर अशी लहानपणी

सावरकरांची अत्युदार भावना असे. आपल्या आत्मवृत्तात सावरकरांनी हे सांगितले आहे. बाळला अंदमानातून पाठवलेल्या पत्रातही त्यांनी असेच विचार व्यक्त केले आहेत. ते म्हणतात,[२] "ज्यात सर्व मनुष्यजातीचा समावेश होईल आणि एकूण एक स्त्रियांना आणि पुरुषांना ही पृथ्वी, हा सूर्य, ही भूमि आणि हा प्रकाश हीच मनुष्याची खरी पितृभूमि आणि मातृभूमि आहेत, त्यापासून मिळणाऱ्या लाभासाठी प्रयत्न करण्याचा आणि त्याचा उपयोग घेण्याचा समान अधिकार राहील, असे संपूर्ण जगाचे एक राष्ट्र हे आमचे ध्येय आहे; व त्यावर आमचा विश्वास आहे. इतर सारे विभाग आणि भेद अवश्य असले तरी कृत्रिम आहेत. ज्या प्रमाणे पेशीचे रुपांतर व्यक्तिपिंडात होते, व्यक्ति कुटुंबात विलीन होतात, आणि संघाची राष्ट्रे बनतात, त्याप्रमाणे सर्व राष्ट्रे ज्यांच्यात एकरूप होवून जातील असे विश्वराष्ट्र प्रस्थापित करणे, हेच सर्व राजकीय शास्त्र आणि कला ह्याचे ध्येय आहे; किंवा असावयास पाहिजे, हे तत्व आम्हास मान्य आहे." ध्येयवाद व सर्व विचार पक्के झाल्यावर लिहिलेले हे पत्र आहे. सावरकरांच्या उदात्त विचारांची झेप कुठपर्यंत होती हे या वरुन आपल्याला लक्षात येते. अशा प्रकारचे मानवतावादी व राष्ट्रभेदांना छेदून जाणारे विचार सावरकरांनी आपल्या आयुष्यात वेळोवेळी व्यक्त केलेले आहेत.[*] हिंदु महासभेच्या त्यांच्या अध्यक्षीय भाषणात देखील असे विचार आपल्याला आढळून येतील.[**] हे सारे त्याचे मानवतावादी विचार येथे उद्धृत करण्याची गरज पडू नये असे आम्हास वाटते.

आजचे ध्येय : राष्ट्रवाद

सावरकर कसे मानवतावादी होते हे दाखवून घेण्यासाठी आम्ही हे सांगत नाही. सावरकरांचे अंतिम ध्येय काय होते, हे समजून देण्यासाठी सांगत आहोत. सावरकरांची जनमानसातील प्रतिमा मानवतावादी म्हणून नाही, हे उघड आहे. अधून मधून असे मानवतावादी विचार व्यक्त करणाऱ्यांना लोक मानवतावादी म्हणत नसतात. मानवतावादी, ही आदर्श विचार सतत व्यक्त करणाऱ्या, त्याच विचाराचा सातत्याने प्रचार करणाऱ्या विभूतीची व नेत्याची प्रतिमा आहे. सावरकरांचे कार्यक्षेत्रच वेगळे आहे. अशा आदर्शापेक्षा वास्तवाकडेच त्यांचे मन अधिक आकर्षिले जाते. असा आदर्शवादी बनण्यापेक्षा वास्तववादी बनणेच आपले मुख्य कर्तव्य आहे, अशी त्यांची ध्येयनिश्चिती होती. आपल्याला कुठपर्यंत जायचे आहे, हे सावरकरांनी निश्चित केले होते. यालाच ते अंतिम ध्येय म्हणतात. मानवधर्म, मानवतावाद, विश्वराष्ट्र हे त्यांनी मानलेले अंतिम ध्येय होते. पण हा पल्ला फार लांबचा होता. या ध्येयापर्यंत आपण, आपल्या बरोबरच्या लोकांनी जायचे कसे, हा प्रश्न तितकाच महत्वाचा होता. अंतिम ध्येयाच्या प्रचारापेक्षा तिथपर्यंत जायचा प्रवास कसा करायचा याचीच सावरकरांना अधिक चिंता होती. त्यांनी आपले जीवन या चिंतेसाठीच वाहिले. व्यवहार हाच त्या अंतिम ध्येयाकडे जायचा

मार्ग होता. व्यवहाराचा संबंध प्रत्यक्ष परिस्थितीशी असतो. आजच्या या जगात मानव अनेक लहान लहान विभागात कसा वाटला गेला आहे, हे त्यासाठी जाणून घेणे भाग आहे. आज आपण कुठे आहोत, हे वस्तुस्थिती म्हणून जाणून घेणे, यासाठी भाग आहे. आजचा मानव राष्ट्रारराष्ट्रात विभागला गेला आहे. प्रखर राष्ट्राभिमान ही आजची वस्तुस्थिती आहे. राष्ट्रवाद वाईट असतो हे म्हणणे वेगळे आहे. असे सर्वच जण म्हणत आले. धर्माधर्मात मानव समाज विभागला गेला आहे. धर्माभिमान हीही अशीच बाब आहे. या गोष्टी वाईट आहेत असे म्हटल्याने त्या नष्ट होणाऱ्या नाहीत. या गोष्टी अस्तित्वात नाहीतच, असे मानण्याने काही मानवतावाद येणारा नाही. ही वस्तुस्थिती जमेस धरुनच, त्याला तोंड देतच अंतिम ध्येयाकडे जाणे भाग असते. सावरकरांची भूमिका हीच आहे.

मानवतावाद हे उदात्त, अत्यंत आकर्षक असे मानवी मूल्य आहे, असे असताही सावरकर त्याबरोबर वाहत न जाता, परिस्थितीच्या भूतलावर पक्के पाय रोवून व्यवहार करतात. मानवतावादाऐवजी सध्याचे ध्येय म्हणून राष्ट्रवाद स्वीकारतात. आपल्या ध्येयाचे अंतिम ध्येय आणि सांप्रत ध्येय असे दोन टप्पे पाडतात. मनुष्याचे हित हे त्यांना सर्वात महत्त्वाचे वाटते. कोणतेही मूल्य ठरविण्याची त्यांची कसोटी मनुष्याचे प्रत्यक्षहित हीच होती. प्रत्यक्ष परिस्थिती हा हे हित ठरविण्याचा आधार होता. बुद्धी हे ते ठरविण्याचे साधन होते. मानवी जीवनातील प्रत्येक गोष्टीला हे लावून पाहायचे– हा त्यांचा व्यावहारिक दृष्टिकोण होता. उदात्त अशा मानवीमूल्यांनाही सावरकर हीच कसोटी लावतात. आजच्या परिस्थितीत जेवढा मानवतावाद मनुष्याचा हिताला अनुकूल, तेवढाच त्यांना स्वीकार्य वाटतो. आदर्श मानवतावादाऐवजी, उदात्त मानवीमूल्याऐवजी, सावरकर कठोर व्यवहारवादाचीच शिकवण देतात. हेच आपल्यापुरते आजचे जीवन ध्येय म्हणून त्यांनी निश्चित केले.

कठोर वास्तवाची जाणीव

समाजाला शिकवण देणारा कोणताही थोर पुरुष थोर अशा उदात्ततत्वांची व मूल्यांची शिकवण देत असतो. तशी त्यांनी द्यावी अशीच अशा थोर पुरुषाकडून आपली अपेक्षा असते. सावरकरांची व्यवहारवादाची शिकवण पाहिल्यानंतर आपल्या या अपेक्षेला धक्का बसत जातो. समाज जमिनीवरुन चालत असला तर तर थोर पुरुष जमिनीपेक्षा थोडचा बरच्या पातळीवरील शिकवण समाजाला देत असतो. सावरकर मात्र, परिस्थितीवर घट्ट पाय ठेवून जमिनीवरुनच चालतात. तसे चालणे हेच आजचे कर्तव्य मानतात. अंतिम ध्येयाच्या स्वप्नवत् पातळीवर वा व्यावहारिक जगात चालता येणे कसे अशक्य आहे, हेच सावरकर सातत्याने सांगत असतात. भगवान बुद्धाच्या तत्वज्ञानाबद्दल त्यांना अत्यंत आदर व आकर्षण आहे. असे असतानाही ते तत्वज्ञान थोर, उदात्त असूनही आज कसे आचरता येत

नाही, हे सांगताना सावरकर म्हणतात,[३] " छे! छे! खुद्द बौद्ध धर्माची दीक्षा घेणाऱ्या भक्तांच्या मनात, अखिल जगात जो पवित्र संघ आहे, त्या बौद्ध संघाबद्दल जो आदर आणि जे प्रेम असेल, तोच आदर बाळगणारा बौद्ध धर्माचा मी एक नम्र चाहता आहे. बौद्धधर्माची दीक्षा मी घेतली नाही, याचे कारण हा संघ माझ्या योग्यतेचा नाही, असे नव्हे, तर मी त्या संघाच्या मंदिरात पदार्पण करण्यास पात्र नाही, हे होय." असे अत्यंत नम्रपणे कबुल करतात. आपण या संघमंदिरात पदार्पण करण्यास पात्र का नाही, हे सांगताना भगवान बुद्धांना उद्देशून ते म्हणतात,[३] " हे तथागत ! सर्व मनुष्य जातीतला मी हीन दीन, केवळ माझी रिक्तता व माझे नितांत अज्ञान याचाच अहेर घेऊन मी तुझ्याकडे येतो. जरी आपल्या बोधाचा सारांश मला आकलन करता येत नाही, असे मला वाटते, तरी मला ही पूर्ण खात्री आहे की ते तसे होणेंच स्वाभाविक आहे. कारण, आपला उपदेश हा देवकोटीच्या वाणीतून निसृत झाला आहे. परंतु माझी श्रवणेंद्रियें आणि आकलन शक्ति ही या ऐहिक प्रत्यक्ष प्रमाणमय जगाचा शब्दघोष ऐकण्यास शिकली आहे. भगवान, कदाचित् असे असेल की पदार्पण या जगामध्ये फार लवकर झाले आणि ज्या वेळी, हे सर्व जग अगदी बाल्यावस्थेत होते व प्रकाश नुकताच कुठे फाकू लागला होता, तोच आपण आपले निशाण फडकविले ! म्हणून या जगाला आपल्या भरारीबरोबर चालता येत नाही व आपल्या दैदिप्यमान निशाणाकडे दृष्टि लावताच ती अंधुक होवून दिपून जाते!"

वंदनीय; पण आचरणीय नव्हे !

उदात्त मूल्याकडे सध्याच्या परिस्थितीच्या संदर्भात पाहण्याच्या सावरकरांच्या उपयुक्ततावादी भूमिकेचे स्वच्छ प्रतिबिंब या वरील उताऱ्यात पडलेले आहे. उदात्त विचार हे वंदनीय आहेत; पण आजच्या परिस्थितीत ते हितकारक आहेत काय, हे पाहूनच ती आचरणीय ठरविली पाहिजेत, हे सावरकरांच्या विचारांचे मुख्य सूत्र आहे. धर्मातील आचारांनाच सावरकर उपयुक्ततेची कसोटी लावत नाहीत, तर मानवांनी आजपर्यंत मान्य केलेल्या उदात्तमूल्यांनाही ते हीच उपयुक्ततेची कसोटी लावतात. धर्मग्रंथ हे वंदनीय, आचरणीय पण- उपयुक्ततेच्या परीक्षेला त्यांना बसलेच पाहिजे, याच न्यायाने, उदात्तमूल्यांनाही उपयुक्ततेची परीक्षा सावरकर अनिवार्य करुन टाकतात ! मानवता, विश्वबंधुत्व, दया, अहिंसा, सत्य, क्षमा, परोपकार आदी उदात्त मूल्ये त्यांना अंतिम ध्येय म्हणून मान्य असली तरी व्यवहारात या मूल्यांना सावरकर परिस्थितीची मर्यादा घालतात. त्यांनी जीवनभर परिस्थितीचा संदर्भ कधीही सोडला नाही; मूल्यासाठी मूल्य म्हणून त्यांनी कधी स्वीकारले नाही. एखाद्या तत्वचिंतनाचा निष्कर्ष म्हणून सावरकर हा सिद्धांत सांगत नसतात, तर तो एक जीवनमूल्य म्हणून स्वीकारतात ! जीवनभर प्रत्यक्षपणे आचरतात. उघड्या डोळ्यांनी देशकालपरिस्थितीकडे सावरकर पाहतात व

जीवनाच्या संघर्षामध्ये जगायचे असेल, तर हा सिद्धांत स्वीकारणे, आचरणे भाग आहे, असे स्पष्टपणे सांगतात.

मूल्य हे स्वयंभू असते, कोणत्याही परिस्थीतीत ते मूल्य तसेच अबाधित राहते, असे समजून त्या प्रमाणे आचरण करणे मूल्याबद्दलची पोथिनिष्ठा आहे, असे त्यांना वाटते. सावरकर याही पोथिनिष्ठेविरुद्ध उभे राहिले. जीवनभर याही पोथिनिष्ठेविरुद्ध ते बोलत राहिले. मूल्ये केवळ उदात्त वा आदर्श वा वंदनीय असून चालत नाहीत तर ती आचरणीय पाहिजेत; अशी भूमिका घेतली. यासाठीच, मानवतावाद न स्वीकारता व्यवहाराची कास धरली. राष्ट्रवाद अफूची गोळी असली तरी ती पचविण्याचे आव्हान परिस्थितीने आपल्यावर टाकलेले आहे, ही त्यांची भूमिका होती. राष्ट्रवादातील धोक्याची दखल सावरकरांनी घेतली नाही, हे म्हणणे सोपे असते. दखल घ्यायची म्हणजे व्यवहारात नेमके कसे वागायचे हे सांगणे अवघड असते. सावरकरांना राष्ट्राच्या पलिकडे काहीही दिसले नाही, हा आरोप करणाऱ्यानी सावरकरांची ही वरील भूमिका नीट समजून घेतली पाहिजे.

धर्मग्रंथीय पोथिनिष्ठेबद्दलच्या सावरकरांच्या भूमिकेचे इतर बुद्धिवाद्यांनी कौतुक केले; परंतु या उदात्तमूल्यांच्या पोथीनिष्ठेविरुद्धची त्यांची भूमिका त्यांना आवडली नाही. सावरकर हे फारच संकुचित विचाराचे आहेत, अशी त्यांच्यावर टीका झाली. सावरकर हे उदात्तमूल्यांच्याच विरोधी बोलत आहेत, असे लोकांना वाटले. मूल्य हे परिस्थितीसापेक्ष असते, हा बुद्धिवादाचा सिद्धांत तत्वत: मान्य असणे वेगळे असते, सोपे असते; प्रत्यक्षात त्या सिद्धांताचा वापर करुन विविध गोष्टींची आजची मूल्ये ठरविणे कठीण असते ! जे वाईट आहे ते आज कसे वाईट आहे, हे समजून सांगणे सोपे असते; पण जे चांगले आहे असे मानवी मनाला वाटत असते आणि समजून सांगणाऱ्यालाही पटत असते, ते आज कसे चांगले नाही, हे समजून देणे तेवढे सोपे नसते, यातला फरक नीट समजून घेतला नाही तर सावरकरांना समजूनच घेता येणार नाही. सावरकरांचे संपूर्ण जीवन म्हणजे उपयुक्ततावादाची ही कसोटी लावून केलेला बुद्धिवादाचा प्रयोग आहे.

मूल्यांची कसोटी – मनुष्यहित

भगवान बुद्धाच्या कसोटी बरोबर जगाला चालता येत नाही. आजच्या जगाला त्यांचे तत्वज्ञान आकलन होणे शक्य नाही– कारण जग फार सामान्य आहे, मूल्यांच्या बाल्यावस्थेत आहे; या कारणास्तव भगवान बुद्धांची उदात्त तत्वे, जीवनमूल्ये आताच आचरता येत नाहीत, आचरणे उपयुक्त नाही, असे सावरकरांचे म्हणणे आहे, प्रश्न ही तत्वे वा मूल्ये पटणे ना पटणे हा नाही; सद्याच्या परिस्थितीत ती आचरावीत काय, ती उपयुक्त आहेत काय, हा आहे ! या दृष्टीने मूल्यांचे दोन भाग पाडावे लागतील. पहिला, मनुष्याला अत्युच्च या अर्थी मान्य

असलेली जीवनमूल्ये; अंतिम ध्येय ! दुसरा सद्याच्या परिस्थितीत प्रत्यक्ष पाळावयाची जीवनमूल्ये, सांप्रतध्येय ! पहिला, अंतिमतः चांगले असणाऱ्या मूल्यांचा वर्ग; दुसरा, सद्या काय चांगले या मूल्यांचा वर्ग ! सावरकर उत्क्रांतिवाद मानणारे होते. जीवनमूल्यांचीही उत्क्रांती होत असते, असे ते मानत. मनुष्य आज दिसेल तेवढे दूरवर विचार करुन आपले कोणतेतरी अंतिमध्येय ठरवितो व सद्याच्या सापेक्षतः कमी दर्जाच्या मूल्याकडून त्या अंतिम मूल्याकडे उत्क्रांती करत असतो. आज आजच्यासाठी ठरलेली मूल्ये उद्या टाकाऊ होतात; कालच्या मूल्यात जमा होतात. आजची अंतिम ठरवलेली मूल्ये उद्याची अंतिम मूल्ये राहत नाहीत; सद्याच्या मूल्या प्रमाणेच त्याचीही उत्क्रांती होत जाते; अशी त्यांची भूमिका आहे.

काल – आज – उद्या

युरोपच्या संदर्भात सावरकर म्हणतात, [४] " असा त्यांचा ' आज ' त्यांच्या 'काल'च्या पुढे सारखा धावत आहे; ' काल ' मागे पडत टाकावू बनत आहे. त्यांचा प्रत्येक 'आज' 'काल'च्याहून इतका अधिक समंजस, सकस व सरस ठरत आहे की, त्यांचा 'काला'वरचा विश्वास ढळून 'आज'वरच अढळपणे बसला आहे. " या बाबतीत युरोप हा सावरकरांचा आदर्श होता. युरोप सारखी गतिशील संस्कृती आपण निर्माण केली पाहिजे, असे त्यांना वाटे ' काळाच्या हातात हात घालून धावणाऱ्या गतिशील संस्कृती'ची त्यांना विलक्षण ओढ होती.[५] सावरकरांचा 'आज' वर विश्वास आहे व या 'आज'चीच त्यांना सारी चिंता आहे. श्रुति-स्मृति-पुराणोक्तची श्रद्धा 'काल'वर असते. भगवान बुद्धांच्या दिव्यचक्षूना 'उद्या'च दिसत असतो. त्यांची उत्तुंग भरारी, झेप 'आज'च्या सामान्य माणसाला पेलत नसते, समजत नसते. म्हणून उद्याच्या करिता असलेल्या तत्वांना, मूल्यांना आदरुन, वंदून, नमस्कारुन 'उद्या'करताच राखून ठेवणे, सावरकरांना भाग वाटते. सावरकरांची ही भूमिका आपण नीट समजून घेतली पाहिजे.

आजचाच विचार आपल्याला आज कर्तव्य आहे, हा कोणत्या तत्वज्ञानाच्या चिकित्सेतून निघालेला त्यांचा सिद्धांत नाही, तर हे एक व्यावहारिक धोरण आहे. एखाद्या प्रकरणी व विशिष्ट परिस्थितीत कोणता निर्णय घ्यावा हे सांगत असताना त्यांनी व्यक्त केलेल्या विचारातून वरील भूमिकेचे आपल्याला दर्शन होते. त्या विशिष्ट परिस्थितीचा जो ताण त्यांच्या मनावर होता, त्याचा स्पष्ट परिणाम त्यांच्या या विचारावर व भूमिकेवर झालेला आहे. मनुष्याच्या हिताशी संबंधित नाही, अशा ज्ञानचिकित्सेचा काथ्याकूट करण्यात सावरकरांना रस नाही. " चांदण्या रात्री मांडीवर मांडी ठोकून तात्विक व बौद्धिक काथ्याकूटीत रुतून बसल्या मुळेच " [६] आपले राष्ट्र क्रियाशून्य व दुर्बल झाले, हीच तर त्यांची खंत होती. केवळ सत्य आहे एवढ्याचसाठी काही त्यांना सत्याचे आकर्षण नाही; ते सत्य

मनुष्याच्या हिताचे आहे की नाही, हा त्यांचा मुख्य प्रश्न असतो. मूल्ये ही मूल्यांसाठी नसतात, तर ती मनुष्यासाठी असतात, असे त्यांना वाटे. म्हणून केवळ ज्ञानासाठी ज्ञान, सत्यासाठी सत्य, अहिंसेसाठी अहिंसा, प्रेमासाठी प्रेम, सद्गुणासाठी सद्गुण इ. त्यांना मान्य नव्हते. एवढेच नव्हे तर त्यांना राष्ट्रासाठी राष्ट्र हेही मान्य नव्हते. म्हणूनच त्यांना बुद्धिवादासाठी बुद्धिवाद नको होता. या साऱ्या गोष्टी मनुष्याला हिताला उपयुक्त आहेत म्हणूनच व त्या उपयुक्ततेच्या मर्यादेतच त्याना हव्या होत्या.

त्यांच्या विचारातील हिताची व्याप्ती व्यक्ती, समाज, जाती, राष्ट्र, मनुष्यजात अशी वाढत जाते. त्या त्या परिस्थितीप्रमाणे ते त्या त्या हिताचा विचार करतात. व्यक्तीचे हित श्रेष्ठ का समाजाचे की राष्ट्राचे की अखिल मानवाचे, असा वाद ते उपस्थित करत नाहीत. राष्ट्रहित हे सांप्रतचे ध्येय ठरवून व्यक्ती, समाज व राष्ट्र यांच्या परस्परहिताची, तारतम्याने ते व्यावहारिक सोडवणूक करतात. ते म्हणतात, [७] " व्यक्तिस्वातंत्र्याचा शक्य तो विकास झाला पाहिजे. परंतु व्यक्तीचा योगक्षेम सुरळीत आणि सुखद व्हावा यासाठी व्यक्तिस्वातंत्र्यास, मानवी कल्याणास प्रतिकूल नसणाऱ्या राष्ट्रहिताची मर्यादा घातली पाहिजे." व्यक्तिस्वातंत्र्य, राष्ट्रहित व मानवी कल्याण याचा सावरकरांनी जोडून दिलेला हा परस्पर संबंध समजून घेतला पाहिजे. व्यक्तिस्वातंत्र्याविरुद्ध समाजहित याचा खरा वाद वा संघर्ष तत्वत:च असतो. अमूर्त परिस्थिती समोर गृहीत धरुन सर्व प्रकारच्या परिस्थितीमध्ये लागू होणाऱ्या या वादाचे उत्तर शोधणे जितके अवघड असते, तितके प्रत्यक्ष व्यवहारात हा वाद सोडविणे अवघड नसते. सावरकरांनी हा प्रश्न व्यावहारिक दृष्टीने सोडविला होता. तत्ववाद करीत बसण्यापेक्षा प्रत्यक्ष कार्य करण्यावरच त्यांचा सारा भर होता.

आजचा धर्म

'आजची परिस्थिती' हाच सर्व गोष्टी ठरविण्याचा सावरकरांचा नवा शास्त्राधार होता. सावरकर म्हणतात, [८] " आजच्या विषयी विचाराल तर आपल्या हिंदुराष्ट्राच्या अभ्युदयार्थ आजच्या परिस्थितीत जो जो विधिनिषेध उपकारक तो तो आमचे आजचे शास्त्र ! त्याची उपयोजिता हा आमचा शास्त्राधार! आजच्या परिस्थीतीत लोकधारणास सहाय्यक तोच आमचा आजचा धर्म ! आणि त्याच रक्षितसो धर्माते आम्ही, धर्म ठाऊक नान्य ! " सावरकर सुस्पष्ट भाषेत आपला नवा शास्त्राधार सांगताहेत. याशिवाय आम्हाला अन्य धर्मच ठाऊक नाही, असे निसंदिग्धपणे म्हणत आहेत. ज्या परिस्थितीत जो आचार वा निर्बंध मनुष्याच्या धारणास आणि अुद्धरणास हितप्रद असेल तो त्याचा त्या परिस्थितीत धर्म आचार, निर्बंध; अशी त्यांची परिवर्तनीय धर्माची व्याख्या आहे.[९] हा धर्म कुठे सापडेल याबद्दल ते म्हणतात.[१०] " राष्ट्राच्या आजच्या परिस्थितीत राष्ट्रधारणास

जो श्लोक उपयुक्त वाटेल तो मनूचा असो, प्रक्षिप्त असो, आम्ही आचरू; जेथें तो परवडणार नाही, तेथे राष्ट्रहितसाधक असे अद्ययावत् ज्ञानाच्या कसोटीस उतरणारे नवीन निर्बंध करू." हेच विचार त्यांनी आग्रहाने व सातत्याने मांडलेले आहेत. खरा हिंदुधर्म कोणता या बद्दल ते म्हणतात,[११] "ज्या परिस्थितीत हिंदुराष्ट्राच्या धारणास आणि उद्धरणास जे कृत्य प्रत्यक्षपणें लाभदायक नि अवश्य असेल ते संपादिणे हाच त्या परिस्थितीतील यज्ञ, हिंदुधर्म! मनुष्यजातीस हितप्रद तो मनुष्यधर्म!"

विज्ञानधर्म, हिंदुधर्म, मनुष्यधर्म, आजचा खरा धर्म इ. शब्दप्रयोग समान अर्थाने वेगवेगळ्या ठिकाणी सावरकर सारखे वापरत असतात. हा त्यांचा धर्म विज्ञाननिष्ठ उपयुक्ततावादावर आधारलेला आहे. या शिवायचा कोणताही धर्म आम्ही जाणत नाही, अशी त्यांची रोखठोक भूमिका आहे, हे आपण पूर्वग्रह सोडून नीट समजून घेतले पाहिजे. या साऱ्या धर्माचे अधिष्ठान बुद्धिवाद हेच आहे, हे लक्षात घेतले पाहिजे.

ध्येय – उपध्येय

कारागृहात असतानाच सावरकरांनी आपल्या जीवन कार्याचे विविध टप्पे निश्चित केले होते. रत्नागिरीच्या तुरुंगातून त्यांची अद्याप सुटका व्हायची होती. त्यावेळेस त्यांनी आपल्या मनाशी सुनिश्चित केलेल्या ध्येय व कर्तव्याची रुपरेषा 'माझी जन्मठेप' मध्ये दिली आहे. ते म्हणतात,[१२] "रात्री पुन्हा एकदा आयुष्याच्या इतिकर्तव्याची रुपरेषा सुस्पष्टपणे आखण्यासाठी एकाग्र होऊन बसलो. नेहमीप्रमाणे चित्तवृत्तिनिरोध मनसुप्त निश्चल होईतो करीत बसून मन शनैः! शनैः! आयुष्याचे त्रिकालाबाधित ध्येय– त्या पासून अनुप्राप्त होणारे कालदेशपात्राने मर्यादित उपध्येय– त्याचे अनुषंगाने ठरणारे मुख्य कर्तव्य आणि – तदनुकूल म्हणून अपरिहार्य झालेला तात्कालिक जीवनक्रम! हे सर्व विवेचून पाहिले!" सावरकरांना समजून घेताना त्यानी ठरविलेल्या ध्येयाच्या या पायऱ्या नीट लक्षांत घेतल्या पाहिजेत.

अखिल मनुष्यजातीचे कल्याण आणि आत्यंतिक उदात्त मूल्यांची प्रतिष्ठापना हे त्यांचे अंतिम व त्रिकालाबाधित ध्येय होते. हे ध्येय त्यांनी नजरेआड केलेले नव्हते. या ध्येयाचा सद्याच्या कालदेशानी मर्यादित झालेल्या अपरिहार्य ध्येयाशी त्यांच्या मनात सारखा संघर्ष चाललेला असे. हे करावे का ते करावे अशी त्यांची मनःस्थिती होत असे. चित्तवृत्तिनिरोधाचा व त्यासाठी योगशास्त्राचा त्यांना आधार घ्यावा लागे व मनाची समजूत घालावी लागे. त्रिकालाबाधित ध्येयाकडेच झेपावणाऱ्या मनाला आवर घालावा लागे. विवेकाने व परिस्थितीचा विचार करुन देशकालानी मर्यादित असलेले उपध्येय त्यांना ठरवावे लागले. अंतिम ध्येयाकडे जाण्यासाठी या उपध्येयाला स्वीकारणे त्यांना अनिवार्य वाटले. या उपध्येयाच्या

संदर्भात मग मुख्य कर्तव्य आले, ते करण्यासाठी ठरवून दिलेला जीवनक्रम आला आणि मग आधी काय करावयाचे– नंतर काय करायचे याचा त्यांनी क्रम लावला. कर्तव्य आधी, अंतिम ध्येय नंतर असा ते विचारपूर्वक क्रम लावतात. उदात्त व अंतिम ध्येयाला बंदून कठोर व्यवहारवादाचीच ते कास धरतात. ही सावरकरांची ध्येयाविषयीची भूमिका लक्षात घेतल्याशिवाय त्यांच्या विचारातील विसंगतीचा अन्वयार्थच लावता येणार नाही.

ध्येयाची व्याख्या

ध्येय निश्चितीचे हे सूत्र वापरुन त्यांनी जीवनातील विविध गोष्टींचा स्वीकार वा अस्वीकार केला, हे आपल्या लक्षात येईल. काही निवडक प्रकरणी त्यांची ही भूमिका अधिक स्पष्टपणे समजून घेणे उचित ठरेल. कला ही कलेसाठी वा साहित्य हे साहित्यासाठी नाही, ही सावरकरांची याच वरील सूत्राने ठरविलेली भूमिका होती. साहित्याचा हेतू सांगतांना साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरुन सावरकर म्हणाले, [१३] "ध्येयाचा प्रश्न आला की त्यात लहरीच्या, हौशीच्या, वैयक्तिक आवडीच्या अंतर्भावापेक्षा कर्तव्याचाच अंतर्भाव मुख्यतः अनुस्यूत झालेला असणार. अर्थात् जीवनाच्या सामूहिक कर्तव्याची जी व्याख्या, तीच त्या जीवनाची उपांग सारस्वत त्याचीही व्याख्या, त्याचेही ध्येय असेच असले पाहिजे. मानवी जीवनाच्या भौतिक ध्येयाची मला पटलेली व्याख्या अशी आहे की, मनुष्याचे अधिकात अधिक हित ज्या योगे साधता येते, तेच मनुष्याचे ऐहिक कर्तव्य होय. तात्कालिक कर्तव्यही याच न्यायाने असे की, प्राप्त परिस्थितीत त्या त्या काळी मनुष्यजातीचे जे अधिकात अधिक हित साधता येते ते ते साधावे. त्यादृष्टीने साहित्याच्या परम व तात्कालिक ध्येयाची व्याख्या अशीच असणार की, मनुष्यजातीचे जे अधिकात अधिक हितास साधण्यासाठी झटेल तेच साहित्य श्रेष्ठ, तेच सुप्रासंगिक." साहित्यालाही मनुष्याला हितालाच कसे जुंपून देतात, हे यावरुन लक्षात येते. सर्व साहित्यिकांना साहित्याबद्दलचा हा नवा दृष्टिकोण सावरकर शिकवत आहेत.

साहित्य - कर्तव्यासाठी

साहित्यात करमणूक किती असावी या बद्दल सावरकर म्हणतात, [१३] "आनंद नि करमणूक ही मानव हितास काही प्रमाणात हितकारक असल्यामुळे त्याचाही अंतर्भाव योग्य त्या प्रमाणात वरील ध्येयात होतोच. पण केवळ करमणूक हे काही कर्तव्य नव्हे ! घरात आई मरणान्तिक वेदनांनी अंथरुणास खिळलेली असता, जर एखादा बहकलेला कलावंत बंगल्यात नायकिणीच्या नाचात रंगू लागला, तर त्यास कलावंत म्हणता आले तरी कुलदीपक काही म्हणता यायचे नाही ! कारण खऱ्या कलावंताला तशा वेळी ती कलाच विकल केल्यावाचून

राहणार नाही." राष्ट्राला सावरकर माता मानत. राष्ट्रमातेची अवस्था वरील क्रमाणे झालेली होती, म्हणून तिच्यासाठी 'आजचे कर्तव्य' सावरकरांना मुख्य वाटले. प्रतिभा, ज्ञान, मन, सर्व जीवनच तिच्या सेवेसाठी, तिच्या हितासाठी अर्पण करणे त्यांना अपरिहार्य कर्तव्य वाटले. साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणातही याच कर्तव्याचा त्यांनी पाठपुरावा केला.

त्यांनी साहित्यिकांना शेवटी सरळच प्रश्न विचारला की,[१४] "सांगोपांग साहित्य हेही आजच्या राष्ट्राच्या परिस्थितीत मला तरी दुय्यम व तिय्यम कर्तव्य वाटत आहे. साहित्य सज्जनहो, विज्ञहो, सूज्ञहो! राष्ट्रातील तुम्ही विज्ञ आहात, म्हणून मी तुम्हाला विचारतो की साहित्यासाठी जीवन आहे का जीवनासाठी साहित्य?" आणि भाषणाच्या शेवटी आज साहित्यिक नकोत, सैनिक हवेत; लेखण्या तोडा बंदुका घ्या, असा असाहित्यिक उपदेश त्यांनी साहित्यिकांना केला. साहित्यिक न झाले तरी चालतील, साहित्य संमेलने न झाले तरी चालतील, असा साहित्यविरोधी उपदेश त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात केला. साहित्याविषयी पूर्णपणे आदर असूनही, एवढेच नव्हे तर स्वतः साहित्य निर्माण करत असूनही सावरकर असा उपदेश का करतात हे समजून घेतले पाहिजे.

या भाषणामुळे साहित्यिकात त्यावेळेस किती प्रक्षोभ माजला असेल, याची आजही आपणास कल्पना करता येते. औचित्यांच्या व परंपरेच्या सर्व मर्यादा ओलांडून बहुसंख्य साहित्यिकांना न पटणारे, हे विचार सावरकर सांगत होते. 'सांप्रतची परिस्थिती हाच आमचा शास्त्राधार' या सिद्धांतावर त्यांची केवढी निष्ठा होती, हे यावरुन आपल्या लक्षात येईल. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात सावरकरांनी असेच लोकमानसाला विलक्षण धक्के बसणारे विचार व्यक्त केले आहेत. साहित्य-विषयीचे त्यांचे विचार इतर विषयासंबंधीच्या त्यांच्या विचारांचे प्रतिनिधित्व करतात. चांगले मूल्य आहे; सुप्रस्थापित झाले आहे; लोकमानसात त्याची पाळे-मुळे खोलवर गेलेली आहेत– एवढ्याखातर त्या मूल्यांमागे ते कधीही वाहवत जात नाहीत; त्यांचा उदो उदो करत नाहीत. 'सांप्रतची परिस्थिती व मनुष्याचे हित' या अभंग व भक्कम आधाराला केंद्रस्थानी धरुन कोणत्याही गोष्टीसंबंधीची मूल्ये व कर्तव्य सावरकर ठरवितात, याचे हे एक उत्तम उदाहरण आहे,

जगणे कर्तव्यासाठी

सावरकरांच्या कसोटीतून मनुष्याचे 'जगणे' हा जो मनुष्याच्या उपयुक्ततेचा मुख्य आधार आहे, त्याचीही सुटका होत नाही. येथे हित राष्ट्राचे नि जगणे मात्र व्यक्तीचे, हे लक्षात घेतले की, प्रथमदर्शनी दिसतो तो तर्कदोष संपून जातो. मनुष्याच्या जगण्यासाठी व मरण्यासाठीही सावरकर उपयुक्ततेची कसोटी लावतात. 'तुजसाठी मरण ते जनन! तुजवीण जनन ते मरण' हे केवळ कला आनंदासाठी केलेले काव्य नव्हते. सावरकरांनी स्वीकारलेल्या जीवनक्रमाचे ते एक सूत्र होते.

राष्ट्रातील कोटचावधी लोकांच्या हितासाठी काही जणांना हुतात्मे होणे भागच असते. पुढील पिढीला स्वातंत्र्य मिळायचे असेल तर या पिढीतील काहीनी तरी आत्मयज्ञ करावयास तयार राहिले पाहिजे. आत्मयज्ञ हेही एक कर्तव्यच आहे, असे त्यांना वाटते. हुतात्म्याच्या आत्मयज्ञातून स्वातंत्र्याचे कमल जन्म पावते. हौतात्म्याचे सावरकरांना विलक्षण आकर्षण आहे. पण ते काही हौतात्म्यासाठी हौतात्म्य नाही! जगण्यापासून मरणापर्यंत व साहित्यापासून धर्मापर्यंत प्रत्येक गोष्टीला उपयुक्ततेची कसोटी सावरकर लावतात व मगच ती गोष्ट स्वीकारत असतात, हे समजून घेतले पाहिजे.

जितेंद्रनाथ दास हा देशभक्त अंदमानात आपल्याला चांगली वागणूक देण्यात यावी, या मागणीसाठी अन्नत्याग करुन शेवटी मरण पावला. या बातमीने सारा देश हळहळला, रडला!! देशासाठीचे ते बलिदान देशवासियांना किती कौतुकाचे नि अभिमानाचे वाटले असेल, हे काय आज सांगायला हवे? ही गोष्ट १९२९ ची. हौतात्म्याचे विलक्षण आकर्षण असणाऱ्या व हुतात्म्याविषयी विलक्षण अभिमान व प्रेम असणाऱ्या सावरकरांना या गोष्टीबद्दल किती अभिमान वाटायला हवा? जितेंद्रनाथ दासाच्या प्रेमांची व कौतुकाची भारतात लाट उसळली व त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी सभा होऊ लागल्या. सावरकरांनी मात्र या बलिदानाची आपल्या बुद्धीवादाने भावनाविदारक अशी चिरफाड केली. जितेंद्राचे हे बलिदान प्रशंसनीय आहे, वंदनीय आहे, आदरणीय आहे, असे सुरुवातीला गौरवून, अशा अगदी क्षुल्लक मागणीसाठी बहुमोल प्राणदान करणे कसे वेडेपणाचे आहे, आत्मघातकी आहे, हे दाखवून देणारा एक लेखच त्यांनी त्या वेळेस लिहिला.

त्या लेखात सावरकर म्हणतात, "१९ "बलिदान आणि कत्तल, हवि आणि हत्या यांत एक चांगले आणि दुसरे वाईट असे आपण ठरवतो, ते का याचे विवेचन केले असतांना त्यातील भिन्नतेची हीच कसोटी दिसून येईल की, त्यापैकी पहिले परोपकारास्तव आणि आत्मोन्नतिस्तव अत्यंत अवश्य असा त्याग असतो, महत्तर अर्थ साधण्यासाठी अपरिहार्य अशा अर्थांचा त्याग असतो आणि दुसरा म्हणजे स्वतःचा आणि दुसऱ्याचा तामशी नाश असतो, लोककल्याणाला पोषक न होता क्वचित् उलट विघातक होणारा परिहार्य प्राणत्याग असतो. मुक्तीला अवश्य तितकेच हवि घेतो तो खरा यज्ञ–हवी देतो तो खरा यजमान. न्याय समर जिंकण्यास अवश्य तितकेच सैनिक अन्यायबलाचे शासनार्थ जो मरणावर चाल करावयास धाडतो, तो खरा सेनापती. नुसते आत्मार्पण करणे म्हणजे मुक्ति मिळणे नव्हे; नुसते मरत राहणे म्हणजे समर जिंकणे नव्हे; तसेच नुसते मरणी मरणे, हुतात्मा होत राहणे म्हणजे राष्ट्रीय व धार्मिक स्वातंत्र्य संपादन करणे नव्हे!"

सावरकर हे सशस्त्र क्रांतिकारक असल्यामुळे व स्वतःची लेखणी ते तलवारी सारखी चालवत असल्यामुळे, त्यांना मरण– मारण्यात, हिंसा–कत्तल करण्यात, हुतात्मा बनण्यात हौस वाटत असावी वा शौर्य वाढत असावे, असा आपला समज

असतो. आम्ही सात बंधु असतो तरी मातृभूमीकरिताच बळी दिले असते, ही सावरकरांची त्यागाची परिसीमा आपल्या डोळ्यासमोर असल्यामुळे आपल्याला असे वाटणे साहजिक असते. ज्याचा एक पाय मृत्यूच्या दारात आणि दुसरा अहिलोकात आहे; ज्याच्या मनात आणि कल्पनेत धारातीर्थ, स्थंडिल, फास, स्वर्ग आत्मयज्ञ याच गोष्टी असतात आणि ज्याचे वास्तव्यच थडग्यात आहे असे तेच म्हणतात, असा माणूस व्यवहारातील हिशोब ऐहिक उपयुक्ततेच्या तराजूने करुन प्रत्येक गोष्टीचे मूल्य ठरवित असतो, यावर आपला प्रथमदर्शनी विश्वासच बसत नाही. मरावे केव्हा याचीही चिकित्सा ते उपयुक्ततेच्या गणिती पद्धतीने व्यावहारिक हिशेब करुन ठरवितात, हे प्रथमतः आपल्या लक्षातच येत नसते. आत्मयज्ञाची तयारी करतच व्यावहारिक हिशोब मांडणारे सावरकर असे एक लोक विलक्षण पुरुष होते. सामान्य माणसाच्या मोजपट्टीने आपण त्यांना मोजू लागलो की आपले उत्तर चुकण्याचाच संभव असतो. संतमाहात्म्याच्या मोजपट्टीने मोजूनही चूक दुरुस्त होत नसते. आपल्या मोजपट्ट्या एकतर भलत्याच आखूड किंवा कमालीच्या मोठ्या असतात. सावरकरांचे मूल्यमापन करायला व्यवहार-कठोरतेची वस्तुनिष्ठ मोजपट्टीच वापरली पाहिजे.

मुख्य ध्येयप्राप्तीसाठी जे आवश्यक असते तेवढेच प्राणदान उपयुक्त असते, असे सांगून सावरकर म्हणतात की, मुख्यध्येयार्थ आवश्यक असणारे प्राणदान वंदनीय, आदरणीय असले तरी अनुकरणीय नाही; कारण असे प्राणदान अहितकारक आहे. " केवळ प्राणहानीसाठी प्राणहानी अहितकारक होय." असे सूत्र ते सांगतात [२४] या भूमिकेतून जितेंद्रनाथाचे हे बलिदान कसे अनावश्यक व अहितकारक आहे, याची तर्ककठोर चिकित्सा करुन अशा प्राणहानीमुळे राष्ट्राचे यापुढे अहित होवू नये म्हणून ते पुढे बजावतात, [२८] " जी माणसे अशा उच्च देशभक्तीने प्रेरित होवून अशी कठोर तपस्या करुन मरणी मरतात, त्यांचे वैयक्तिक मोल कमी न करता त्यांच्या त्या दैवी वैयक्तिक बलिदानाचा यथोचित आदर करीत असताही हे स्पष्टपणे सांगणे आवश्यक आहे की, भावना दुखावली तरी दुखवून राष्ट्रीय हिताकरिता हा बुद्धिवाद प्रकटपणे बोलून दाखविणे कर्तव्य आहे की, ही अनशनाची लाट अशीच फैलावू पाहील, तर तिच्यामुळे राष्ट्राच्या मुख्य ध्येयाला, स्वातंत्र्याला, ज्या माणसाच्या सक्रिय जीवनाची किंवा लढत्या मरणाची अपेक्षा आहे, त्यांना जवळ जवळ व्यर्थ गमाऊन नुसते मरणी मारुन, आपण दुर्धर हानि पोचवू"

अत्यंत सामोपचाराने असे पटवून सांगितल्यावर, क्षुल्लक मागणीसाठी प्राणाचे मोल देणे किती मूर्खपणाचे आहे, हे अत्यंत भावना विदारक व हृदयभेदक भाषेत सांगताना सावरकर म्हणतात, " राजबंदीच्या मानाप्रमाणे त्याला वागवावे हा प्रश्न मानाचा आहे ही गोष्ट खरी आहे. त्या मागणीलाही मोल आहे; पण ह्या असल्या प्राणाचे नव्हे ! ... एखादा अवसान घातकी मनुष्य एखाद्या लिलावात

एकदोन कवडीच्या वस्तूचे मोल हट्टास पेटून जसा दोन हजारापर्यंत चढवतो, तसेच राजबंदीच्या सुधारलेल्या पद्धतीने वागण्याच्या दुय्यम मागणीसाठी अशा वीरांच्या अमोल प्राणाची अशा मातीमोलाने नासाडी ही हटवादी चूकही अपायकारकच होणारी आहे..... भलती प्रतिज्ञा घेणे एक भूल, तरी ती प्रतिज्ञा राष्ट्रहितास अपायकारक असली तरी तशीच चालविणे ही सवाई भूल.....! अशा क्षुल्लक मागणीसाठी इतके शूर देशवीर हाल हाल करुन मातीच्या मोलाने अन्न अन्न करीत बळेच मारविणे हा अगदी आत्मघातकी वेडेपणा आहे." अशा भाषेत सावरकरांनी या बलिदानाची चिकित्सा केली आहे. जितेंद्राचे हे बलिदान अपवाद आहे, व तो अपवाद ठरावा, असे त्यानी आवाहन केले आहे. हे बलिदान वंदनीय आहे, पण अनुकरणीय नाही, असा त्याचा एकूण अभिप्राय आहे.

भावनेला उद्येपित व प्रक्षोभक करणाऱ्या भावनात्मक गोष्टीकडेही सावरकर यत्किंचितही भावविवश न होता, श्रद्धाशून्य अशा बुद्धिवादी भूमिकेतून कसे पाहतात, याचे हे एक प्रातिनिधिक उदाहरण आहे. सावरकर भावनेच्या आहारी जाणारे व त्या भावनेच्या भरात निर्णय घेणारे पुरुष होते, असा आपला समज असतो. हा समज शंभर टक्के खोटा आहे, हे आपल्याला पूर्वग्रह सोडून समजून घेतले पाहिजे. भावनेच्या छायेत अजिबात न जाता कर्तव्य कठोरपणे निर्णय घेण्यातच त्यांचे वैशिष्ट्य आहे, हे समजून घेतले पाहिजे. सावरकरांच्या या भूमिकेमुळे लोकांना न पटणाऱ्या गोष्टीच त्यांना जन्मभर सांगाव्या लागल्या. उदात्त, वंदनीय, पूज्यनीय इ. साऱ्या गोष्टींना ते भावनाशून्यपणे बुद्धिवादाची कसोटी जन्मभर लावीत राहिले.

आत्महत्त्येचा प्रश्न

कोणतीही गोष्ट समोर आली की, ती सत्य आहे का ? विज्ञाननिष्ठ आहे, उपयुक्त आहे का ? हे प्रश्न त्यांच्या समोर दत्त म्हणून उभे टाकतात. मग ते त्या गोष्टीची चिकित्सा करु लागतात. अंदमानमध्ये प्राणांतिक यातना होत असताना त्यातून सुटण्यासाठी त्यांना आपला जीव संपवून टाकावा वाटे. त्यांच्या मनाची नि बुद्धीची या बाबतीत झुंज चाले. मन आत्महत्त्येच्या बाजूने ओढत नेअी, तर बुद्धी आत्महत्त्या करणे उपयुक्त आहे का, याचा विचार करी. स्वतःच्या दृष्टीने सोडले तरी समाजाच्या दृष्टीने ते हिताचे आहे का ? असा प्रश्न त्यांची बुद्धी उपस्थित करी. कारागृहातील बंदिवास हे राष्ट्रीय कर्तव्यच आहे व तेच आपल्या वाट्याला आले आहे; याच कर्तृत्वाची येथे परीक्षा आहे, तेव्हा आत्महत्त्या करुन चालणार नाही, असे त्यांना वाटे. आणि मरायचे तर कसे मरणे उपयुक्त आहे, हे सांगताना त्यांची बुद्धी म्हणते, [१८] "निदान...मग असा कां मरतोस? तू सोसलेल्या यातनांचा सूक्ष्म परिणाम देशावर होईलच होईल. परंतु ते जर तुला खरे वाटत नसेल आणि ही बातमी देखील देशास कळणार नाही, याचा नैतिक परिणाम

कोठला होणार ? मग व्यर्थ कष्ट का म्हणून ? मरणारच असशील तर कुत्र्याच्या मोलाने आपल्या हाताने का मरतोस ? त्यांना तुला फाशी देवू नये म्हणून दया आली होती की काय ? मग जे त्यांना करता आले नाही, ते तू त्यांच्या करिता स्वतःच्या हाताने करुन आपल्या पक्षाचे हानीत आणि अपजयात आणखी भर का घालतोस ? जर मरणे तर ज्या सेनेतील तू सैनिक आहेस, त्या सेनेचे तसेच एखादे कार्य करुन मग तरी मर. फाशी घेऊन नव्हे तर..... आपल्या एका जीवास्तव..... असा मर!" हे बुद्धीचे हे शेवटचे कारण मात्र मनाच्या त्या उदार झालेल्या अवस्थेत पटले. मन स्थिर झाले." अशा कोटीक्रमाचा उपदेश करुन अनेकांना अंदमानात आत्महत्त्येच्या काठावरुन हात धरुन त्यांनी परत फिरविले आहे. आत्महत्या न करता सुटण्याची वाट पाहत छळ सोसण्याचे कर्तव्य करणे, हे सर्वोत्तम; मात्र मरणेच भाग असेल तर मारिता–मारिता मरणेच क्रांतिकारकास श्रेयस्कर, अशी त्यांची उपयुक्ततावादी भूमिका होती. भावनेच्या आहारी न जाता सावरकर कसा निर्णय घेतात, हे यावरुन लक्षात येईल.

मात्र आपल्या जीवनाचे कर्तव्य संपले, शरीर विकलांग झाले, आता यापुढे आपला समाजाला उपयोग नाही, असे त्यांना जेव्हा वाटले, तेव्हा आत्मार्पणाच्या उदात्त नावाखाली आपला जीव बळाने संपवून टाकला. हाही त्यांच्या याच उपयुक्ततावादी दृष्टिकोणाचा परिणाम होता. सावरकर हे नुसते विचार मांडणारे विचारवंत नव्हते, तर प्रत्यक्ष आचार करणारे वर्तावी पुरुष होते !

आदरपूर्वक निषेध

जसे कोणत्याही उदात्तमूल्याचे प्रामाण्य सावरकरांना मान्य नाही, तसेच कोणत्याही थोर पुरुषाची थोर शिकवण त्यांना प्रमाण वाटत नाही. थोर ऐतिहासिक पुरुषांविषयी त्यांना विलक्षण अभिमान व आदर वाटत असे. अशा पुरुषांचे दाखले ते आपल्या भाषणात व लेखणात देत. इतिहासाकडे सावरकर सारखे बोट का दाखवतात, ऐतिहासिक पुरुषांचे दाखले ते का देतात, हे या आक्षेपकांनी लक्षातच घेतलेले नसते. इतिहासातील व्यक्ती, घटना व मूल्य यांची सावरकर अत्यंत न्यायनिष्ठुरपणे चिकित्सा करतात, हे या आक्षेपकांनी लक्षातच घेतलेले नसते. आजच्या परिस्थीतीत काय योग्य हे पाहूनच आजचे व्यवहार चालतात, इतिहासाच्या अनुकरणाच्या हौसेमुळे नव्हे, हे सावरकरांचे सूत्र हे आक्षेपक लक्षातच घेत नाहीत. सावरकरांचे ऐतिहासिक पुरुष आदरणीय, वंदनीय, पूज्यनीय व प्रेरणादायी असतात; अनुकरणीय नसतात, आचरणीय नसतात ! आद्य शंकराचार्यांबद्दल सावरकरांना नितांत आदर, पण त्यांचा मायावाद ते मानणार नाहीत! पंडीत मालवीयजीविषयी त्याना असाच पूज्यभाव. पण पंडितजी गायीला 'मानविदू' म्हणत, ते त्यांना पसंत नव्हते. त्या बद्दल सावरकर म्हणतात,[१९] " देवाच्या नैवद्याचे दूध वंदून प्यावे तसेच पंडित मालवीयांसारख्या ऋषितुल्य वृद्धांचा शब्द

सादर अैकावा; पण नैवद्याचे दूध जिभेला लावताच जर नासलेले लागले तर जसे वंदूनच पण टाकूनच द्यावे, हाच धर्म. तसेच अशा पुरातन पुरुषाचे शब्दही अद्ययावत् सत्याच्या कसोटीला लावताच जर अतथ्य ठरले, तर सादर पण निषेधावे, हेच कर्तव्य !"

थोर पुरुषाकडे पाहण्याची सावरकरांची दृष्टी ही अशी होती ! 'सादर पण निषेधावे' ही त्यांची प्रथमदर्शनी विसंगत वाटणारी भूमिका नीट समजून घेतली पाहिजे. आजच्या नव्या परिस्थितीत ज्या पूर्वीच्या थोर पुरुषांचे विचार कालबाह्य ठरले; त्या विचारांना सावरकर निषेधार्ह ठरवितात, पण त्या थोर पुरुषाचा ते आदर करतात. हे सावरकरांच्या बुद्धिवादाचे वैशिष्ट्य आहे. धर्मग्रंथकर्त्यांबद्दलची त्यांची हीच भूमिका यापूर्वीच आपण पाहिली आहे.[२०] सावरकरांचा बुद्धिवाद आदर, नम्रता व कृतज्ञता जाणतो, त्यामुळे त्यांचा बुद्धिवाद समजून घेतांना आपला थोडासा घोटाळा होत असतो. हे पुरुष कसे चुकले हे सांगून त्याना तिरस्कारण्याची व त्यांचा निषेध करण्याची सावरकरांची पद्धत नाही अैतिहासिक पुरुषाबद्दलची अशी पूज्यबुद्धी एकत्वाची भावना निर्माण करते व सामाजिक व राष्ट्रीय दृष्टया उपयुक्त आहे, ही त्यांची भूमिका आहे.

शिवाजी विषयी त्यांना किती अभिमान व आदर ! शिवाजी स्वतःला 'गोब्राह्मण प्रतिपालक' म्हणून घेत, ही गोष्ट गोभक्तांकडून सावरकरांपुढे पुरावा म्हणून नेहमी मांडण्यात येई. या ब्रीदाचा अर्थ आपल्यालाच कसा अनुकूल आहे, हा युक्तिवाद पटवून देणे झाल्यावर सावरकर म्हणतात,[२१] "पण याही पुढे जावून असे स्पष्ट सांगणे भाग आहे की, महाराजाच्या किंवा कोणत्याही थोर विभूतीच्या काय, ज्या भावना व शास्त्रे वा साधने असतील ती त्यांच्या काळापुरती त्यांना लागू होती. त्यांना ती योग्य वाटली म्हणून काय ती आजच्या काळातही योग्य वाटलीच पाहिजेत, असे म्हणजे मरणानंतर पृथ्वीने फिरायचे नि काळाच्या घडयाळाने चालायचे सोडून दिले, असे म्हणण्यासारखे मूर्खपणाचे आहे. महाराजाच्या परिस्थितीत ज्या ब्रीदाचा नि शास्त्राचा उपयोग, ती त्यांनी वापरली. राष्ट्र राखले; बस्स. त्यांचे कर्तव्य त्यांनी केले. आमचे कर्तव्य आमच्या परिथितीत राष्ट्र राखावयास ते जुने नि नवे साधन हाती घेणे हेच होय. ग्रहणे, चंद्र सूर्याना राहूकेतू खातात म्हणून घडतात असे शिवाजी मानीत, म्हणून प्रत्यक्ष ज्ञानाला नाकारुन आजही शाळातून ग्रहणाची ती कारणे शिकवायची की काय ? महाराज बैलगाडीत बसत म्हणून आज आगगाडीत बसायचे नाही की काय ?" इतिहासाच्याभोवती सावरकरांचे मन सारखे पिंगा घालते, याचा खरा अर्थ काय, हे यावरुन आपल्या लक्षात येईल. आदर राखून थोर पुरुषाच्या विचाराचे प्रामाण्य सावरकर नाकारत असतात. येथे तडजोड व्यक्तीशी आहे, विचाराशी नाही, हे समजून घेतले पाहिजे.

साहेबोक्तही त्याज्यच!

पाश्चात्य देशांची त्याच्या अद्यायावत्पणासाठी सावरकर सारखी आठवण करुन देत असतात. राष्ट्राभिमानाच्या विषयात जसे त्यांचे मन इतिहासात फिरते तसे विज्ञाननिष्ठेच्या विषयात त्यांचे मन पाश्चात्य राष्ट्रात फिरते. सनातन्यांच्या विरोधात आधुनिक युरोप, अमेरिका, रशिया हे सावरकरांच्या बाजूचे साक्षीदार असतात. अमेरिकेतील लोक गायीला गोमाता म्हणतात, म्हणून एकदा सनातन्यांनी गायीच्या बाजूने अमेरिकेची साक्ष काढली. प्रतिवादीने आपल्या बाजूने वादीच्या साक्षीदाराचीच साक्ष काढावी, असा हा प्रकार आहे. भारतीय पुराव्याच्या कायद्यात असा साक्षीदार उलटलेला आहे, म्हणून वादीच्या बाजूने अविश्वासार्ह ठरविण्याची सोय आहे. सावरकरांच्या बुद्धिवादात, हा साक्षीदार माझ्या बाजूचा आणि तो तुझ्या बाजूचा, असे पूर्वसमाजाचे टिळे लावून आलेला नसतो. त्या साक्षीदाराच्या तपासण्याच्या पद्धतीही वेगवेगळचा नसतात. अमेरिका गोभक्ताच्या बाजूची कशी नाही, तेथे गोरक्षण चालते, गोभक्षण चालते, गोपूजन चालत नाही, हे पटवून दिल्यावर सावरकर पुढे म्हणतात,[२२] "जरी गायीला अगदी आमच्या धेनुदासी संप्रदायाप्रमाणेच अक्षरशः देवता, मनुष्याहून श्रेष्ठ, परलोक, गोलोक, स्वर्ग मानणारी देवता म्हणूनही कोणा अमेरिकनाने मानण्यास आरंभिले तरीही अशी गोभक्ती बरोबर ठरत नाही, भावडीच ठरणार. कारण अमेरिकेत जे जे मानले जाते ते ते तेवढचाचसाठी बरोबर ठरलेच पाहिजे, असे 'साहेबोक्तचे' प्रमाण आम्ही स्वतः सिद्ध मानत नाही. अमेरिकेतही भ्रमिष्टालये (Lunatic Asylims) ही थोडीफार असतातच!"

तेव्हा सावरकर धर्मग्रंथापासून उदात्तमूल्यापर्यंत व थोर पुरुषापासून तो अमेरिका-युरोपपर्यंत कुणाचेही प्रामाण्य मानत नाहीत. या प्रत्येक गोष्टीला ते उपयुक्ततेची कसोटी लावतात, हे समजून घेतले पाहिजे. सावरकर म्हणतात,[२३] "आम्ही तर, जे सत्य केवळ अ, ब, क च्या मानण्यावर जगू शकते, त्यास तुच्छ समजतो" सावरकरांचा बुद्धिवाद किती प्रखर होता हे यावरुन दिसून येते. कितीही मोठी विभूती वा जग प्रसिद्ध तत्वज्ञ असला किंवा कितीही उदात्त मूल्य असले वा जग प्रसिद्ध तत्वज्ञान असले तरी, सावरकर केवळ तेवढचाखातर त्या मूल्याचे वा विभूतीचे प्रामाण्य मानायला तयार नसतात, हे आपण समजून घेतले पाहिजे. उपयुक्ततेची व राष्ट्रहिताची कसोटी या साऱ्यांना सावरकर लावीत असतात. ही कसोटी मार्क्सवाद व स्त्रीस्वातंत्र्य या मूल्याबाबतीत सावरकर कशी वापरतात याची पाहणी करणे उद्बोधक होअील असे आम्हास वाटतें.

× × × ×

साम्यवादी ऋषी

सावरकरांना कुणीतरी विचारले की, त्यांनी मार्क्स वाचला आहे काय ? त्याला सावरकरांनी उत्तर दिले की, मार्क्सने सावरकर वाचला आहे काय ? सावरकरांच्या या प्रतिप्रश्नाचा अर्थ त्यांच्या वरील अ, ब, क च्या विधानाशिवाय लक्षात येत नसतो मार्क्सला मी प्रमाण का मानू ? असे म्हणण्याचा सावरकरांचा हेतू आहे. कुणालाच प्रमाण न मानणारे सावरकर मार्क्सला प्रमाण मानण्याची शक्यता नव्हती. असे उलट उत्तर का दिले हे स्वत: सावरकर दुसऱ्या एका ठिकाणी सांगतात, [२३] "जसा प्रश्न असेल तसेच माझे उत्तर येणार ! अर्थात् मार्क्सने सावरकर वाचलेला आहे का या माझ्या उद्‌गारात खोल अर्थही आहे, हे तुझ्या ध्यानात आले असेल. सर्व काही वेदात आहे, पोथीत आहे असे मानणारे पुस्तकी मार्क्सवादी असतात, त्यांना दुसरे काय सांगायचे ? मार्क्सने सांगितलेले सर्वच बरोबर, मार्क्स वाक्यं प्रमाणम् ! हे कसे मानणार ? मार्क्सने सावरकर वाचला नसेल हे बरोबरच ! कारण माझ्याविषयी जगाला कांही माहिती होण्यापूर्वीच तो मेला ! पण मी मार्क्स वाचला. काळजीपूर्वक वाचला आहे, अभ्यासलासुद्धा ! साम्यवादी ऋषीचे जे जे वाचणे आवश्यक होते ते ते सर्व मी वाचलेले आहे" आणि पुढे सावरकर मार्क्सचे अनेक सिद्धांत व आखाडे काळाच्या प्रवाहात कसे चुकले हे श्री. पु. गोखलेना समजून सांगतात. मार्क्सवादी हे मार्क्सचे आज अंधानुमय करत आहेत असे ते म्हणतात व म्हणून 'मी कोणत्याही वादाला महत्व देत नाही' [२४] असा निष्कर्ष सांगतात. कोणताच वाद वा तत्वज्ञान सदासर्वकाळ उपयोगी नसते, त्यामुळे अशा वादाला बांधून घेणे सावरकरांच्या बुद्धिवादाला पसंत नाही.

मार्क्सनी या आधुनिक जगाला एक नवे मूल्य दिले. आपल्या नव्या विचारांनी जगाला विचारप्रवृत्त केले. जगाला एक नवी दृष्टी दिली. आधुनिक जगातील कित्येक विचारवंताना व बुद्धिवाद्यांना या विचारांनी अक्षरश: भारुन टाकले. आधुनिक जगाविषयी, मनुष्याविषयी विचार करणाऱ्या कोणत्याही विचारवंतांना व नेत्यांना मार्क्सच्या विचारांचा मागोवा घेणे भाग पडले. मार्क्सवादाचा प्रभाव एवढा होता की, समाजाला नवा विचार देवू इच्छिणारा कुणीही विचारवंत या विचारापासून तटस्थ व अलिप्त राहू शकत नव्हता. देशाच्या मर्यादा ओलांडून मार्क्सवाद हा जागतिक तत्वज्ञानाचा विषय झाला होता. मार्क्सवाद म्हणजे नवे विचार, बुद्धिवाद, पुरोगामीपणा असे समीकरण रुढ झाले होते. पं. नेहरु, मानवेंद्र-रॉय, आचार्य नरेंद्र देव इ. भारतीय देशभक्त या विचाराने तर भारुनच गेलेले होते. असा हा अनन्य महत्वास पोचलेला व आधुनिक जगावर विलक्षण प्रभाव टाकणारा क्रांतिकारक विचारांचा मार्क्सवाद ! मार्क्सवादाचे वारे जगात जोरात वाहत असलेल्या काळातच सावरकरांचा उदय झालेला आहे. तथापि या मार्क्सवादाबद्दल सावरकरांनी कुठेही सुसूत्रपणे व तपशीलाने लिहले नाही; अनु-

कुलही नाही, प्रतिकूलही नाही. या मार्क्सवादापासून सावरकर जणू तटस्थ व अलिप्त राहीले. सावरकरांनी मार्क्स वाचला आहे की नाही, असा प्रश्न उपस्थित व्हावा इतकी अलिप्तता व मौन सावरकरांनी मार्क्सबद्दल पाळलेले आहे. असा त्यांच्यावर एक महत्त्वाचा आक्षेप घेतला जातो. सावरकरांनी मार्क्सवादावर विरोधी का होईना पण लिहायला हवे होते, असे मार्क्सवादाचा प्रभाव असलेल्या काही टिकाकारांना वाटत असते. [२४] जगातील सर्वच तत्वज्ञानाकडे उपयुक्ततेच्या दृष्टी-कोणातून पाहून त्यातील जे जे उपयुक्त ते ते स्वीकारले पाहिजे, अशी भूमिका घेणाऱ्या सावरकरांनी मार्क्सवादाकडे का दुर्लक्ष केले, हा आपल्या समोरचा प्रश्न आहे. अखिल मानवजातीला लागू होणाऱ्या व जगाला एक नवे उदात्त मूल्य देणाऱ्या मार्क्सवादाबद्दल सावरकरांची भूमिका आपण समजून घेऊ.

मार्क्सवाद विरुद्ध राष्ट्रवाद

सावरकरांनी राष्ट्रवाद सांप्रतध्येय म्हणून स्वीकारला होता. मार्क्सवाद हा मूलतःच राष्ट्रवादाच्या विरोधी आहे. राष्ट्रवाद ही एक कठोर वस्तुस्थिती आहे, अशी सावरकरांची भूमिका होती. राष्ट्रवाद हा एक साम्राज्यवाद आहे, भांडवलशाहीला जतन करणारी ती एक प्रतिगामी शक्ती आहे, असा मार्क्सचा आरोप होता. जगातील सर्व कामगारांचा विचार करावयाचा म्हणजे राष्ट्राच्या सीमा जाणतच येत नाहीत, राष्ट्रवाद मानायचा म्हणजे राष्ट्राचा इतिहास, जुन्या काही परंपरा, संस्कृती इ चा विचार करणे भाग असते. मार्क्सला यापैकी कोणत्याही गोष्टी मान्य नव्हत्या. मार्क्सवाद विरुद्ध राष्ट्रवाद असा पर्याय सावर-करांसमोर होता. जगातील सर्व कामगारांची एकी होण्याची शक्यता दृष्टीपथात नाही, कारण ते शक्य व्हावे इतका राष्ट्रवाद जगात दुर्बल झालेला नाही, असे सावरकरांचे मत होते. रशियातील कामगारही स्वतःला रशियनच म्हणवतात व रशियाचे दुसऱ्या देशाशी युद्ध जुंपले तर ते रशियाच्या बाजूनेच होणार, असे सावरकरांचे म्हणणे होते. रशियन क्रांती होवून आज साठ वर्षं झाली, पण रशियातही राष्ट्रवादाची प्रखरता कमी होण्याऐवजी उत्तरोत्तर वाढतच आहे, हा अनुभव आहे. १९२६ साली स्टॅलिनने 'राष्ट्रमर्यादित समाजवाद' Socialism in a singe country) अशी प्रत्यक्ष घोषणाच केली. मार्क्सवाद्यांच्या प्रभावाखाली गेलेल्या पं. नेहरुनांही राष्ट्रवादाचाच पुरस्कार करणे भाग पडले. सावरकरांनी राष्ट्रवाद का मानला यावर एखाद्या मार्क्सवाद्याला वा मानवतावाद्याला जरुर टीका करता येईल; पण एकदा सावरकरांनी राष्ट्रवाद मान्य केला होता हे आपण समजून घेतले की, तेवढ्यापुरता त्यांचा मार्क्सवादाला असलेला विरोध आपल्याला समजून घ्यावा लागेल. आणि दुसऱ्या दृष्टीने राष्ट्रवाद मानणे, हे काही सावरकरां-च्या वैयक्तिक इच्छेशी गोष्ट राहिलेली नव्हती. त्यांच्या वेळेसच्या जागतिक परिस्थितीचा तो एक अपरिहार्य परिणाम होता, कठोर वस्तुस्थिती होती. खऱ्या

सुधारक बुद्धिवाद्याला या वस्तुस्थितीची दखल घेणे भागच होते, हे समजून घेतले पाहिजे.

मार्क्सवाद हा राष्ट्रवादाच्या विरोधी असल्यामुळे लोकांना तो समजून सांगणे सावरकरांना सोयीचे नव्हते. जगाला एखादा नवा विचार देणाऱ्या विचारवंताची वा तत्वज्ञाची भूमिका सावरकर कधीही घेत नाहीत. सांप्रत स्वीकारलेले ध्येय म्हणजेच राष्ट्रहित कसे साधता येईल, त्या ध्येयार्थच सर्व विचार, सर्व शक्ती, सर्व कर्तृत्व एकवटणारे ते एक कृतिशील पुरुष होते. या ध्येयासाठी त्यांना मार्क्सचा आधार घेणे, तो लोकांना समजून सांगणे त्यांना सोयीचे नव्हते, हे उघड आहे. सावरकरांनी मार्क्सचा काही विचारच केला नाही. हे आरोपसूचक विधान जेव्हा आपण करतो तेव्हा त्याचा अर्थ, त्यांनी स्वतःला राष्ट्रवादाच्या मर्यादाच का घालून घेतल्या, हा आरोप त्यातून सूचित करावयाचा असेल तर तो खरोखरच प्रामाणिक आरोप आहे. सावरकरांनी मानवतावाद न स्वीकारता राष्ट्रवाद स्वीकारला, या अर्थी ते संकुचित विचारांचे आहेत, हा आरोप सावरकर आनंदाने स्वीकारायला तयार आहेत. जोपर्यंत जगात राष्ट्रवाद ही प्रबल शक्ती आहे, तोपर्यंत आपल्यालाही त्या शक्तीची उपासना केल्याशिवाय तरणोपाय नाही, ही त्यांची रोखठोक भूमिका आहे. पण राष्ट्रविरोधाच्या शिवाय मार्क्सवादात जे बुद्धिवादी व अर्थशास्त्रीय विचार आहेत, ते सावरकरांना मंजूर नव्हते, असा कोणताही अर्थ त्यांनी मार्क्सविषयी पाळलेल्या मौनामधून काढणे बरोबर ठरणार नाही, हे समजून घेतले पाहिजे.

प्राय : सर्वांबद्दलच मौन

मार्क्सबद्दल किंवा मार्क्सवादाबद्दल सावरकरांनी कुठेही सविस्तरपणे वा चिकित्सकपणे लिहले नाही, या वस्तुस्थितीला वरीलशिवाय आणखी एक कारण आहे. सावरकरांच्या सर्व साहित्याकडे जर आपण दृष्टिक्षेप केला तर आपल्याला दिसून येईल की, मार्क्सच काय पण इतर कोणत्याही तत्वज्ञाबद्दल, मग तो भारतीय असो की पाश्चात्य, सावरकरांनी कुठेही चिकित्सकपणे लिहलेले नाही. स्पेन्सर, मिल इ. पाश्चात्य नीतिवेत्त्यांचा त्यांच्या विचारावरील परिणाम अगदी खोलवर असूनही, व या अर्थी त्यांच्या नावाचा आत्मचरित्रात उल्लेख असूनही, त्यांच्यावर किंवा त्यांच्या विचारावर लिहलेला त्यांचा एकही लेख उपलब्ध नाही. भारतीयामध्ये भगवान बुद्धापासून तो विवेकानंदापर्यंत असे कितीतरी थोर पुरुष होऊन गेले, पण त्यांच्यापैकी कुणावरही सावरकरांनी लिहले नाही. त्यांचे बद्दल प्रसंगानुसार आलेले उल्लेख असतील, पण चर्चा नाही, चिकित्सा नाही, अनुरोध नाही वा प्रतिरोध नाही. आपल्या बाजूने आधार म्हणून कोणत्याच विचारवंताचा उल्लेख ते करत नाहीत. त्यांना जे महापुरुष विभूती वा विचारवंत वंदनीय वाटले, आदरणीय वाटले, ते केवळ अभिमानाच्या व कृतज्ञतेच्या भावपूजेपुरतेच पूज्यनीय

होते. प्रत्यक्षात अशा कोणत्याही महत्पदास पोहचलेल्या पूज्यनीय व्यक्तीला त्यांनी अनुकरणीय मानले नाही, आचरणीय मानले नाही.

आद्य शंकराचार्यांबद्दल त्यांनी काहीतरी लिहायला हवे होते, कारण त्यामुळे अद्वैताबद्दल त्यांना निश्चितपणे काय वाटते हे अधिक सुसंगतपणे आपल्याला समजले असते, असे आम्हाला नेहमी वाटते. त्यांच्या काव्यातून याबद्दलची त्यांची मते शोधण्याऐवजी प्रत्यक्ष सुसंगत असे विचार आपल्याला मिळाले असते. पण तसेही घडलेले नाही. त्या काळाच्या मानाने, चार्वाक किती बुद्धिवादी, पण त्यांच्याबद्दलही सावरकरांनी कुठेही लिहिलेले नाही. रानडे – आगरकरांना सावरकर समाजकारणातील गुरु मानीत. त्यांच्याबद्दलचा एकही लेख नाही. स्वामी दयानंदावर तर नाहीच, पण स्वामी विवेकानंदावरही त्यानी कुठेही लिहिले नाही. सावरकरांनी विवेकानंद वाचले होते काय, अरविंदबाबू वाचले होते काय, असा प्रश्न एखाद्या आध्यात्मिक पुरुषांने उपस्थित करावा, इतके त्यांच्या बाबतीत सावरकरांचे मौन आहे. हे दोन पुरुष जवळ जवळ सावरकरांच्याच काळातले. सर्व जगावर हिंदुधर्माचा प्रभाव पाडणारे, शक्तीची उपासना करणारे, सावरकरांप्रमाणेच दैदिप्यमान व्यक्तिमत्त्वाचे विवेकानंद, जवळचे असूनही, त्यांच्या प्रमाणेच शक्तीची उपासना करणारे व प्रखर राष्ट्रवादी असूनही त्यांच्यावर सावरकरांनी काहीही लिहिले नाही. काव्यात एक दोन ठिकाणी त्यांचा नामोल्लेख आला असेल एवढेच. अरविंदबाबू हे सशस्त्र क्रांतिकारक म्हणजे सावरकरांच्या मूळ पिंडाचे, भारतीय संस्कृतीचे उपासक. राष्ट्राद्धाराची सतत चिंता करणारे. पण त्यांच्यावरही सावरकरांचा एकही लेख नाही. विवेकानंदाचे नि सावरकरांचे अनुयायी प्रायः समान होते, तरी यांत फरक पडला नाही. हे असे का झाले? एकेक पुरुष घेऊन त्यांचेबद्दल सावरकरांनी का लिहिले नाही, असा प्रश्न उपस्थित करुन त्याचे उत्तर देता येत नसते. सावरकरांच्या एकंदर दृष्टिकोणाचाच तो परिणाम आहे, हे मुळातून समजून घेतल्याशिवाय अशा प्रश्नाची उत्तरे सापडतच नाहीत. कुणाचेच प्रामाण्य मानायचे नाही; जे जे उपयुक्त आहे ते ते उपयुक्त म्हणून घ्यायचे; जे उपयुक्त आहे ते कोणा थोर महापुरुषांनी मांडलेल्या तत्त्वज्ञानाचा भाग असला तरी त्या महापुरुषांच्या नावाचा उल्लेख करायचा नाही– हा त्यांचा दृष्टिकोण आपण समजून घेतला पाहिजे, सतत लक्षात ठेवला पाहिजे. हा त्यांचा दृष्टिकोण सर्वगामी, सर्वव्यापी व सर्वकष होता. हा दृष्टिकोण आपण समजून नाही घेतला तर मार्क्सवादाबद्दल सावरकर मौन का पाळतात या प्रश्नाचे उत्तरच सापडणार नाही. राष्ट्रवादावर निष्ठा ठेवणाऱ्या, भारतीय संस्कृतीबद्दल प्रगाढ श्रद्धा व अभिमान असणाऱ्या हिंदु विचारवंतावद्दल जेथे सावरकर लिहित नाहीत, तेथे भारतीय नसलेल्या व राष्ट्रवाद नाकारणाऱ्या मार्क्सबद्दल, मार्क्सवादाबद्दल लिहून ते आपल्या कार्यात समस्या व गैरसोयी निर्माण करुन ठेण्याची शक्यता कमी असते, हे आपण समजून घेतले पाहिजे.

धर्मविरोध-तत्त्वतः मान्य

मार्क्सचे नाव न घेता मार्क्सचे कोणते विचार सावरकर स्वीकारतात, याची पाहणी उद्‌बोधक ठरणारी आहे. मार्क्सची धर्माविषयीची भूमिका आपण प्रथम विचारात घेऊ. धर्म ही अफूची गोळी आहे असे मार्क्स म्हणतात. मार्क्सवाद हे धर्मविरोधी तत्त्वज्ञान आहे. सावरकरांची भूमिका ही तत्त्वतः धर्मविरोधीच आहे. परंतु धर्म ही एक शक्ती आहे, ही वस्तुस्थिती सावरकर मान्य करतात. धर्म ही सहजपणे नष्ट होणारी बाब नाही, हे ते मान्य करतात. निधर्मी स्टॅलिनलाही धर्म मानावाच लागला, याची ते जाणीव करुन देतात. धर्माला शिव्या देण्यावर व शिव्या दिल्याने तो नष्ट होईल यावर त्यांचा विश्वास नाही. धर्मवेडेपणा कमी करता येईल, अंधश्रद्धा कमी करता येतील, धर्मभोळेपणा कमी करता येईल, पण धर्मश्रद्धा समूळ नष्ट होण्याची शक्यता नाही, ही वस्तुस्थिती ते कठोरपणे मान्य करतात. मार्क्सपेक्षा सावरकर याबाबतीत अधिक वास्तववादी भूमिका घेतात असेच म्हटले पाहिजे. धर्म या शक्तीला मार्क्सने अजिबात महत्व दिले नाही. रशियन क्रांती होऊन साठ वर्षे झाले तरी अद्यापही आपल्या देशात धर्म नष्ट करण्यात रशियाला यश आलेले नाही. तेव्हा मार्क्स व सावरकर यांच्यात धर्मा-विषयी मूलभूत फरक धर्माचे, धर्म या शक्तीचे अस्तित्व वस्तुस्थिती म्हणून मान्य करण्यापुरताच होता, हे समजून घेतले पाहिजे. आपल्याला पटो वा न पटो, पण धर्म हा राहणारच, हे समजून घेऊन सावरकरांनी आपले ध्येय व धोरण ठरविले. मार्क्सनी-मार्क्सवाद्यांनी धर्माचा विचारच केला नाही.

मार्क्सवादामध्ये जो धर्मविरोध गृहीत आहे, त्याचा सावरकरांनी कधीही निषेध केलेला नाही. एवढेच नव्हे तर धर्म न मानणाऱ्या मार्क्सवादी रशियाच्या या भूमिकेचा सावरकरांनी मुक्त कंठाने वेळोवेळी गौरव केलेला आहे. धर्मावर समाजसंस्था उभे करण्याचे दिवस गेले, असे तर ते म्हणतातच, पण यासाठी ते रशियाचा दाखला देतात, हे महत्वाचे आहे. निर्देव व निधर्मी रशिया व तो तसा असल्यामुळे कसा आधुनिक बनला, प्रबल बनला हे सावरकर वारंवार सांगतात. देव न मानणाऱ्यांनी देव मानणाऱ्याचा कसा धुव्वा उडविला हे रशियाकडे बोट दाखवून अभिमानाने पटवून देतात. कोणत्याही हिंदुत्वनिष्ठ माणसाचा मार्क्सवाद, किंवा साम्यवाद व तो मानणारा रशिया हे क्रमांक एकचे शत्रू असतात, कारण ते धर्माचे शत्रू आहेत. मात्र हिंदुत्वनिष्ठ सावरकर रशियाच्या या धर्मविरोधाचे स्वागत करतात, कौतुक करतात, ही गोष्ट आपण नीट समजून घेतली पाहिजे.

१९३७ ला सावरकर रत्नागिरीहून पूर्णतः बंधमुक्त झाले. सावरकरांच्या क्रांतिकारक पिंडामुळे व बुद्धिवादी विचारामुळे त्यांचेकडे अनेक मार्क्सवादी व समाजवादी तरुणमंडळी आकर्षिली गेली होती. या मंडळींना सावरकर हे आशा-स्थान वाटत होते. मानवेंद्र रॉय, एस. एम. जोशी, आचार्य नरेन्द्रदेव, लालजी पेंडसे आदी समाजवादी मंडळी सावरकरांच्या सत्काराचे कार्यक्रम घेत होती.

सत्कार समारंभात भाषणे करीत होती. अशाच एक समारंभात मानवेंद्र रॉयचे भाषण झाले. त्यांच्या भाषणाला उत्तर देताना सावरकर म्हणाले, [२६] "समाजसत्तावादात केवळ आर्थिक बाजूच आहे, असे माझे मित्र रॉय हेही म्हणणार नाहीत. समाजसत्तावादी म्हणत असतील, तर कोणताही धर्म ठेवू नका. त्यास माझी ना नाही. परंतु एका धर्मावर, हिंदुधर्मावर अन्य धर्मियांकडून सतत हल्ला होत असता तेथे दुर्लक्ष करावे हे मला मान्य नाही." तेव्हा सावरकरांचा व मार्क्सवादाचा धर्मासंबंधी मतभेद नक्की कुठे होता, हे यावरुन लक्षात येईल. मार्क्सवादी हे धर्मच नाकारत असल्यामुळे, एका धर्मावर अन्य धर्मियांनी हल्ले करण्याचा प्रश्न विचारात घ्यायला ते तयारच नव्हते. कोणताही धर्म ठेवू नका, या गोष्टीला सावरकर एका पायावर तयार आहेत, हे नीट समजून घेतले नाही, तर आपल्याला सावरकरांचा बुद्धिवादही समजणार नाही नि त्यांची हिंदुत्वनिष्ठाही समजणार नाही. याच प्रकारचे विचार अनेक वेळा सावरकरांनी व्यक्त केलेले आहेत व कोणत्याही मार्क्सवाद्यापेक्षा या अर्थीही ते स्वतः अधिक निधर्मी आहेत, हे लक्षात घेतले पाहिजे.

स्वातंत्र्यानंतरच्या काळात त्यांच्याशी सुखसंवाद करताना त्यांचे निकटवर्तीय असलेले श्री. पु. गोखले यांना एकदा सावरकर म्हणाले की, त्यांची, भारतात कम्युनिस्टांचे राज्य आले तरी हरकत असणार नाही. कम्युनिष्टांचे राज्य आल्यावर हिंदुत्वाचे काय होणार, या प्रश्नाला उत्तर देताना सावरकर म्हणाले, [२७] "ते आल्याने धर्माचे प्राबल्य कमी होईल हे खरे, पण साम्यवादी आले तर मंदिरावरोवरच मशिदी आणि चर्चे नाश करतील ना? ही क्रांतीसुद्धा आपल्या देशाला पोषक होईल आणि पुन्हा हिंदुत्व तरुन जाईल." सावरकरांची धर्मश्रद्धा ही अशी आहे! सगळेच धर्म नष्ट करणारी साम्यवादी क्रांती या देशाला पोषकच होईल असे सावरकर म्हणतात, याचा अर्थ काय? मुसलमान मुसलमानत्व, ख्रिश्चन ख्रिश्चनत्व सोडायला तयार असतील, तर मी माझे हिंदुत्व सोडायला एका पायावर तयार आहे, असे जे सावरकर म्हणतात, त्याचा अर्थ हाच आहे. [२८]

१९५३ मध्ये फर्ग्युसन कॉलेजमध्ये भाषणात रशियाशी स्वतंत्र भारताने मैत्री करावी असे सांगून सावरकर म्हणतात, [२९] "कम्युनिस्ट आणि रशिया यास मी अगदी १९०८ पासून ओळखीत आहे. मी लंडनमध्ये भारतीय स्वातंत्र्यासाठी सतत प्रयत्न करीत असताना लेनिन, स्टॅलिन आदी नेते तेथेच होते. अनुभवाने त्यांचाही कम्युनिझम आता बराचसा व्यवहार्य झाला आहे." एक लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे सावरकर कम्युनिझमला सांभाळून घेतच त्यांच्यातल्या चुका काढताना आपल्याला दिसतील. त्याच भाषणात सावरकर पुढे म्हणाले, [३०] "काँग्रेसवाले असाल तर निधर्मी रीतीने, समाजवादी असाल तर औद्योगिक रीतीने, तुम्ही कम्युनिस्ट असाल तरी चालेल. देशरक्षणाचे उत्तरदायित्व तुमच्यावरच आहे."कम्युनिस्टांवरही देशरक्षणाची जबाबदारी टाकायला सावरकर तयार आहेत,

हे आपण समजून घेतले पाहिजे.

सावरकर पुढे म्हणाले, " अर्थशोषण झाले आहे, आणि शासनव्यवस्था विस्कळित झालेली आहे. अशा वातावरणात झालेल्या सर्व गोष्टी परत मिळवून स्थिर-स्थावर करणे, हेच तुमच्या शिरावरील दायित्व आहे." ही जबाबदारी साम्यवाद्यांवर टाकायला सावरकर तयार आहेत. सावरकरांनी कम्युनिझमधील जे जे उपयोगी ते ते स्वीकारण्याची भूमिका नेहमीच ठेवलेली दिसेल. कोणताही Ism त्यांना मान्य नव्हता. आज राष्ट्राकरिता जे उपयुक्त तोच त्यांचा तेवढ्यापुरता Ism होता. ते म्हणत, [३१] " तात्त्विकदृष्टचा कोणता 'इझम' आज चांगला व कोणता वाईट याचा काथ्याकूट आज व्यर्थ आहे." या भूमिकेतून Ism या अर्थी ते कम्युनिझम मानत नाहीत, मात्र त्यातील उपयुक्त ते स्वीकारण्यास नेहमीच तयार असतात.

आर्थिक वस्तुपाठ

मार्क्सवादातील धर्मविरोधाला सावरकरांचा जसा तत्त्वतः विरोध नव्हता तसाच, मार्क्सवादी आर्थिक विचारालाही सावरकरांचा तत्त्वतः विरोध नव्हता. सावरकर यंत्राचे, यंत्रचलित कारखान्याचे स्वागत करणारे, पुरस्कार करणारे. यंत्रामुळे संपत्ती वाढते, संपत्ती वाढण्याचा वेग वाढतो, ही संपत्ती कारखानदार वर्गाच्या हातात केंद्रित होत असल्यामुळे भांडवलशाही वाढते, हा यंत्रावरील एक आक्षेप असतो. यंत्रामुळे कामगार कमी लागतात, त्यामुळे बेकारी वाढते. हा यंत्रावरील दुसरा आरोप असतो. यंत्रामुळे समाजात विषमता येते, हा यंत्रावरील आरोप फार जुना आहे. सावरकरांना हा आरोप मान्य नाही. त्यांचे म्हणणे असे की, यंत्राचे काम कमी श्रमात अधिक उत्पादन करणे एवढेच असते. या अधिक उत्पादनाची वा संपत्तीची समाजाच्या विविध वर्गात वा व्यक्तीत वाटणी कशी करावी, हे यंत्राच्या हातात नसते. हा संपत्तीच्या विषम वाटणीचा दोष सदोष समाजरचनेचा आहे, यंत्राचा नव्हे, असे सावरकरांचे स्पष्ट मत आहे. या विषयी ते म्हणतात, [३२] " दसपटीने अधिक अन्न उत्पादिले असता ही काही माणसे इतराकडून नागविली गेली किंवा दसपट सुखी न होता भिकारी झाली, तर तो दोष समाजरचनेचा म्हटला पाहिजे. ती यंत्रे समाईक ठेवा. ते यथेच्छ उत्पादिलेले अन्न–वस्त्र समान प्रमाणात प्रत्येक व्यक्तीला वाटून द्या. ते कमी लागणारे कावाड-कष्ट विशिष्ट वर्गाच्याच डोक्यावर न लादता सर्वांकडून करुन घेऊन सर्वांचाच भार हलका करा." ही समाजवादी समाजरचनाच आहे, हे उघड आहे. ही आदर्श समाजरचना कशी आणता येईल, यावद्दल सावरकर म्हणतात, " यंत्राचा दुरुपयोग टाळून सामुदायिक सदुपयोग कसा करावा, याचा आर्थिक वस्तुपाठ रशिया आज स्वतःला नि जगाला देतच आहे. यंत्रशक्तीमुळेच रशिया हे आज जगातील प्रबलातील प्रबल, संपन्नातील संपन्न, प्रत्येक जणास काम, अन्न, वस्त्र नि आनंद समानतेने

उपभोगू देणारे राष्ट्र झालेले आहे." मार्क्सवादातील अर्थवाद येथे पूर्णतः स्वीकारलेला आहे, हे उघड आहे. भारताने रशियाकडून आर्थिक वस्तुपाठ घेतला पाहिजे, ही सावरकरांची सुस्पष्ट भूमिका आहे. मार्क्सचे कुठेही नाव न घेता मार्क्सवाद स्वीकारण्याचा हा प्रकार आहे, हे समजून घेतले पाहिजे.

मार्क्सच्या परिभाषेत सावरकर श्रममूल्याचा सिद्धांत मांडत नाहीत, अतिरिक्त मूल्याचाही मांडत नाहीत. पण हे सिद्धांत त्यांना पूर्णतः मान्य आहेत. या आर्थिक विचारावद्दल त्यांनी फारसे विचार व्यक्त केले नाहीत, त्याचा प्रचारही केला नाही.राष्ट्रस्वातंत्र्याचा प्रश्न हा मुख्य आहे. स्वतंत्र भारतातील शासनाने अवलंबवयाचे हे एक आर्थिक धोरण आहे, असे वाटून या विचारांच्या प्रचाराकडे त्यांनी आपली शक्ती लावली नाही. Ism म्हणून या आर्थिक विचाराचा स्वीकार करण्यापेक्षा एक हितकारक व उपयुक्त धोरण म्हणून स्वीकार करावा असे त्यांना वाटे. 'नंदीबैल आणि माणूसबैल' या रूपकात्मक कथेतील सावरकरांचे मुखपात्र असलेला गंप्या नंदीबैलवाल्याला म्हणतो, [११] "हा माणूसबैल नि तो नंदिबैल, दोघेही ऐतखाऊ ! ते तुमच्या (मोळीवाल्याच्या) निढळाचे घामाचे पैसे हा ऐतखाऊ आता आयते उपटणार !" "समाज जो अजून जीव धरुन आहे तो हयांच्याच (शेतकरणी कामकरिणी) काबाडकष्टावरच होय." सावरकरांना श्रममूल्याचा सिद्धांत मान्यच आहे. या गोष्टीचा सावरकरांनी पोटतिडकीने प्रचार केला नाही, एवढ्याखातर त्यांची वैचारिक मनोभूमिका समजून घेताना या गोष्टीकडे दुर्लक्ष करता येणार नाही. पटणे नि प्रचार करणे यातला हा फरक आपण समजून घेतला पाहिजे.

पं. नेहरुंचे कौतुक

साम्यवादासंबंधीच्या पां. वा. गाडगीळांच्या एका प्रश्नाला उत्तर देताना १९३७ मध्ये सावरकर म्हणाले,[३] "काँग्रेसमधील साम्यवादाच्या सामर्थ्यामुळे तिच्या काही कार्यक्रमांना अधिक स्पष्टपणा आला आहे. आणि ही पं. जवाहरलालची कामगिरी मला कौतुकाची वाटते. गुळगुळीतपणा सोडून निश्चित योजनावर कार्य आखणे हितावह होते. त्या दृष्टीने साम्यवाद्यांची भूमिका मला आवडते." सावरकर साम्यवादी धोरणाचे कसे मुक्तकंठाने वेळोवेळी कौतुक करतात, हे आपण समजून घेतले पाहिजे. पं. नेहरुंच्या नियोजनाच्या धोरणाचे सावरकर कौतुक करतात. सावरकरांची भूमिका अशी होती की, देशाला विविध प्रकारच्या विचाराचे पक्ष पाहिजेत. त्यातील सर्व प्रकारच्या उपयुक्त विचारांचा देशाला उपयोग होऊ शकतो सर्व पक्षातील चांगले विचार माझ्या पक्षात सामावलेले आहेत, अशी एकांतिक पक्षीय भूमिका सावरकरांनी कधीही घेतलेली नाही. विचार व आर्थिक कार्यक्रम हे काँग्रेसकडेच अधिक चांगले आहेत व ते योग्य आहेत, ही भूमिका म्हणूनच सावरकर घेतात. आपल्या पक्षाची जी काही थोडी बहुत शक्ती आहे ती, जो

विचार नि कार्यक्रम काँग्रेसला मान्य नाही, मात्र देशहिताचा म्हणून आपल्याला वाटतो, त्यासाठीच पूर्णपणे लावायची, हे सावरकरांचे धोरण होते. काँग्रेसने स्वीकारलेले आर्थिक विचार व धोरण हेच राष्ट्रहिताचे आहे, असे वाटल्यामुळे या विचाराचा प्रचार आणि पाठपुरावा त्यांनी फारसा केलेला नाही, हे समजून घेतले पाहिजे.

१९३७ मध्येच निपाणी येथील समारंभात आपल्या सत्काराला उत्तर देताना सावरकर म्हणतात,[३५] "शेतकरी नि श्रमिक यांच्या पुढाकाराने आता हा राष्ट्रपुरुष कार्यक्षम होणार आहे. समतावाद आणि भांडवलशाही या शब्दाचे योग्य अर्थ आपण समजून घेतले पाहिजे. उगाच शब्दच्छल नि नसते अर्थ लावून परकीय तत्त्वाचा अट्टाहास धरणे योग्य नाही." मार्क्सवादाचा आपल्या देशाच्या परिस्थितीत आज कोणता अर्थ लावायचा व कसा उपयोग करुन घ्यायचा हे आपण पाहिले पाहिजे, हीच भूमिका आजही भारतातील समाजवादी मंडळी घेत आहेत. सावरकरांनी ती घेतली म्हणून ते भांडवलवादी होत नाहीत, असे आम्हास वाटते. आचार्य नरेंद्र देव मार्क्सवादाचा प्रभाव असलेले थोर समाजवादी विचारवंत होते. त्यांनी १९३८ मध्ये सावरकरांना व्यक्तिशः विचारले की, 'आज हिंदुसभेत तालुकदार, धनिक आदी प्रामुख्याने असताना महासभेस प्रगतिकारक संस्था बनविण्याचा तुमचा हेतू कसा साधणार?' या आचार्यांच्या प्रश्नाला उत्तर देताना सावरकर म्हणाले,[३६] "मी आताच तर कोठे हिंदुमहासभेत प्रविष्ट झालो आहे. येताक्षणीच महासभेचे ध्येय बदलून पूर्ण स्वातंत्र्याचे ध्येय मी ठरविले आहे. पुढे मी काय करतो हे आपण धीर धरा नि पहा. महासभा पूर्णपणे पालटून ती प्रगत नि जिवंत करण्याचा माझा संकल्प आहे." समाजवादाविषयी सावरकर हे बोलत आहेत, हे लक्षात घेतले पाहिजे. या 'प्रगत आणि जिवंत' स्थितीची रुपरेषा सावरकरांनी कुठेही तपशीलाने मांडली नाही किंवा हिंदुमहासभेला अशी प्रगत नि जिवंत संस्थाही त्यांना करता आले नाही. या गोष्टी जमेस धरुन सावरकरांची वैचारिक भूमिका आपण समजून घेत आहोत. निदान आचार्यांचे समाधान व्हावे अशा प्रकारचे समाजवादी रुप हिंदुमहासभेला देण्याचा सावरकरांचा संकल्प होता, असाच निष्कर्ष यावरुन काढणें न्याय होईल, असे आम्हास वाटते. धनिकांचीही राष्ट्राला गरज आहे, तुमची समाजवादाची कल्पनाच चुकीची आहे, असे उत्तर सावरकरांनी दिलेले नाही, या गोष्टीची नोंद घेतली पाहिजे, असे आम्हास वाटते.

साम्यवादी विचाराचा प्रचार व्हावा, लोकांनी ते विचार समजून घ्यावेत असे त्यांना वाटत असे. साम्यवादाविषयीची त्यांची भूमिका सुरुवातीपासूनच अनुकूल होती. रत्नागिरीला असताना त्यांनी लेनिनच्या चरित्रावर भाषणे दिल्याचे बरेच उल्लेख आहेत. तेथे त्यांच्या संग्रही 'रशियन क्रांति आणि क्रांतिकारक' यांच्या संबंधात त्यावेळी उपलब्ध असलेली थोडी इंग्रजी व मराठी पुस्तके असत. सावरकर

या पुस्तकांचा प्रसार करीत असत, [३८] असे त्यांचे त्या वेळेचे निकटवर्ती असलेले व नंतर विचाराने कम्युनिस्ट झालेले नारायण सदाशिव बापट यांनी आपल्या आठवणीत सांगितले आहे. लेनिनच्या पत्नी क्रुप्स्काया हिने लिहिलेले लेनिनच्या आठवणीचे पुस्तक त्यांच्या संग्रही होते. [३९] अशी पुस्तके ते प्रचार व्हावा म्हणून वाचनालयास भेट देत किंवा पारितोषिक म्हणून स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना व तरुणांना देत. स्वतः बापटांना वक्तृत्व स्पर्धेतील उत्तेजन म्हणून सावरकरांनी लेनिनचे चरित्र हे पुस्तक दिले होते. बापट म्हणतात, [४०] "साम्यवादी वा कम्युनिस्ट कार्यकर्त्यांविषयी तात्यांना जी आत्मियता, त्यांच्या साम्राज्यशाही विरोधी-क्रांतिकारक कार्याविषयी वाटे, ती कम्युनिस्टांपैकी कित्येकांना ठाऊक नसेल. १९३१–३२ सालापूर्वीपासून लेनिनचे चरित्र व वाङ्मय तरुणांनी वाचावे, अशी त्यांची इच्छा असे.' सावरकरांची हिंदुत्वनिष्ठा न पटणाऱ्या व विचाराने कम्युनिस्ट असलेल्या या त्यांच्या निकटतियाची ही आठवण सावरकरांच्या आतापर्यंत आपण पाहिलेल्या भूमिकेशी सुसंगत अशीच आहे, असे आपल्याला म्हणावे लागेल.

साम्यवादी भूमिकेतून लिहिलेले साहित्य यामुळे सावरकरांना कधीही निषेधार्ह वाटलेले नाही. 'आज आपल्या साहित्यात नव्यानेच उगवलेल्या साम्यवादी वा काम्यवादी मतांचेही तसेच स्वागत नि तशीच छाननी झाली पाहिजे." अशी भूमिका त्यांनी मराठी साहित्य संमलेनच्या १९३७ च्या अध्यक्षीय भाषणात मांडलेली आहे. केवळ आर्थिक विचारातूनच साहित्याचा जन्म होतो हे मत एकांगी आहे, हे ते पटवून देतात. ज्ञानेश्वरी, बुद्धाचा राज्यत्याग, योगसूत्रे किंवा शंकराचार्यांचे महाभाष्य यांची उदाहरणे ते यासाठी देतात. असे असतानाही एकांगी प्रचार करणाऱ्या अशा साम्यवादी साहित्याचे स्वागतच केले पाहिजे, हे सांगताना ते पुढे म्हणतात,[४१] "तरीसुद्धा विरोधविकासवादाच्या दृष्टिकोणातून काही जुनी सत्ये नव्या मांडणीत थाटण्याच्या वा नवी सत्ये जुन्यांच्या दृष्टिपथात आणण्याच्या कामी अशा एकांगी प्रचाराचाही उपयोग होत आहे, आणि म्हणूनच वास्तव साहित्यात त्यांची पडणारी भर आपण प्रथम स्वागतिली पाहिजे, आणि लगोलग त्यांची नीरक्षीर-विवेकाने छाननी करणारे वाङ्मयही प्रसिद्धीत राहीले पाहिजे. नुसते पावित्र्यविडंबन म्हणून त्यास शापित राहण्यात अर्थ नाही." या त्यांच्या म्हणण्यात केवळ लेखन स्वातंत्र्याचाच पुरस्कार नाही, तर साम्यवादी विचाराचे स्वागत करण्याचीही भूमिका आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. कोणत्याही नव्या विचाराचे स्वागत व लगेच चिकित्सा करणारे सावरकरांसारखे बुद्धिवादी फारच कमी सापडतील, असे आम्हास वाटते.

लाल बावटा

काँग्रेसने आपल्या पक्षाच्या ध्वजाचे स्वरूप बदलले. जुन्या ध्वजात केशरी रंगाची भर टाकून व तांबडा रंग पुसून टाकून नवा ध्वज स्वीकारला. सावरकरांनी

या नव्या ध्वजावर एक लिहला आहे.[११९] तांबडा रंग बदलण्याचा प्रकार त्यांना आवडला नाही. ते म्हणतात, "रक्त रंग बदलण्यात क्रांतिकारकांचा आणि कामकरी आंदोलनाचा त्या ध्वजाशी असणारा गर्भित संबंध देखील सूचित होऊ नये, हाच गांधीजी आणि मंडळींचा अंतस्थ हेतू आहे, हे स्पष्ट आहे. पण तोही फार दिवस साधणार नाही. कारण ही दोन्ही आंदोलने अितकी प्रबल आहेत की, त्या क्रांतिकारक कामकऱ्यांचा लाल बावटा आज ना उद्या आजच्या शक्तिशून्य फिकट रंगास सशक्ततेची लाली चढविल्याबाचून राहणार नाही." सशस्त्रक्रांतिवाले कम्युनिस्ट येत आहेत, हिंदूनो सावध व्हा, असा अिशारा सावरकर येथे देत असून, ते येणे भागच आहे, ते येणारच, ती काळाची गरज आहे– असा आशावाद व्यक्त करीत आहेत, हे समजून घेतले पाहिजे. या क्रांतिकारक कामकऱ्यांच्या लाल बावटयाचे सावरकर येथे स्वागत करत आहेत. याच साठी राष्ट्रध्वजावर चरखा नको, त्या ऐवजी हातोडा-कोयता चालेल, असे ते वारंवार म्हणत असत. 'शेतकरी व कामकरी या राष्ट्राच्या मेरुदंडाचे ते किती उत्कृष्ट प्रतीक आहे.' असे या हातोडा-कोयत्याचे सावरकर कौतुक करतात.[११०] सावरकरांचे साम्यवादांबद्दलचे असलेले हे प्रेम आपण समजून घेणार नाही काय?

वर्ग समन्वयाची भूमिका

मार्क्सचा वर्गविग्रहाचा सिद्धांत सावरकर मानत नाहीत. वर्ग समन्वयाची ते व्यावहारिक भूमिका घेतात. भारतातील कोणत्याही मार्क्सवाद्याला व समाजवाद्यालाही याच्या पलिकडे जाता आले नाही. पं. नेहरूंही व्यवहारतः या वर्ग समन्वयाच्या भूमिके पलिकडे जावू शकले नाहीत. कलकत्त्याच्या हिंदुमहासभेच्या अध्यक्षीय भाषणात सावरकरांनी आपले आर्थिक धोरण मांडले आहे. त्या धोरणाला 'वर्गहिताचा राष्ट्रीय समन्वय' असे त्यांनी नाव दिले. यंत्राचे त्यांनी मुक्तपणे स्वागत केले. शेतकरी व कामकरी वर्ग हाच राष्ट्रीय संपन्नतेचा, शक्तीचा आणि आरोग्याचा मुख्य पाया आहे, हे दोन वर्ग देशाला आरोग्य व संपत्ती पुरविणारे आधार आहेत, या वर्गाच्या शक्तीचे आणि त्यांची निवासस्थाने म्हणून खेडेगावांचे पुनरुज्जीवन केले पाहिजे, अशी भूमिका सावरकरांनी त्या भाषणात मांडली आहे. एखादा उद्योग जर भरभराटीत असेल तर त्याच्या लाभातून मोठा विभाग श्रमिकांना मिळेल व आर्थिकदृष्ट्या हानिकारक होईल, तर काही अंशी कामकऱ्यांनाही अल्प लाभावरच संतुष्ट राहावे लागेल, अशी भूमिका त्यांनी मांडली. भांडवलदार आणि कामकरी यांच्या स्वार्थी वर्गहिताच्या अवास्तव धोरणाने राष्ट्रीय उद्योगाची वाताहात घेणार नाही, यांची काळजी सावरकर घेतात. कामगार संघटनांच्या अवास्तव मागण्यांनी व दुराग्रहानी उद्योगांना कसे टाळे लागतात व त्याची वाताहात होते, याचा वर्तमान कालातील अनुभव पाहिल्यानंतर या सावरकरांच्या काळजीचे गांभीर्य आपल्या लक्षात येईल. या बाबतीत

ठाणे

आजच्या कामगार पुढाऱ्याची भूमिका सावरकर घेत नाहीत; असेच आपण फार तर म्हणू शकू.

अधिक कार्यक्षमतेने चालवता येईल अशा मुख्य उद्योगधंद्याचे राष्ट्रीयकरण करण्यात येईल, असे त्यांनी जाहीर केले. शेती ही मोठ्या यंत्राच्या साहाय्याने करण्याची भूमिका सावरकरांनी मांडली. त्यासाठी शेतीचे राष्ट्रीयकरण करण्याची त्यांची तयारी होती. सामुदायिक शेतीला ते महत्व देतात. जमीनदारी पद्धत संपूर्णतः नष्ट करुन टाकण्याचा त्याचा विचार होता. म्हणून त्यांनी धनंजय कीरांना सावरकर चरित्रात या गोष्टीचा आग्रहाने उल्लेख करायला सांगितले आहे.[४३] योग्य मूल्य दिल्यावाचून व्यक्तिगत मिळकतीचा अपहार राज्यसत्ता करणार नाही, असे त्यांनी जाहीर केले व्यक्तिगत मालमत्ता ताब्यात घेताना त्या मालकाला योग्य ते मूल्य देण्याची ही सावरकरांची भूमिका काही पुरोगामी मंडळीना प्रतिगामीपणाची वाटते.[४६] सावरकरांचे हे विचार १९३९ मधील आहेत. नेहरु इतके पुरोगामी, पण तेही या भूमिकेच्या पलिकडे गेलेले नाहीत, हे लक्षात घेतले पाहिजे. या मोबदल्याबाबत नेहरुंचे चरित्रकार म्हणतात,[४४] "स्वातंत्र्यपूर्व काळात नेहरु काही मोबदला द्यावा या मताचे होते. ही भूमिका बदलून स्वातंत्र्योत्तर काळी ते न्याय व उचित मोबदला द्यावा या भूमिकेपर्यंत आले आहेत." केवळ शब्दरचना पाहिली तरी हा बदल खूप मोठा आहे. काही मोबदल्याकडून उचित मोबदल्याकडे नेहरुंचा प्रवास होता. नेहरु लोकशाही व व्यक्तिस्वातंत्र्य मानणारे होते; असे या प्रवासाचे कारण सांगितले जाते. हीच गोष्ट सावरकर सांगतात, तेव्हा ती प्रतिगामीपणाची कशी होते, हे आमच्या लक्षातच येत नाही. जाता-जाता म्हणून त्यांनी ही कांही सूत्रे सांगितली आहेत. या विचारात क्रांतिकारक कांहीही नसले तरी, पं. नेहरुंच्या नेतृत्वाखालील राजसत्तेलाही या पलिकडे जाता आले नाही, हे समजून घेतले पाहिजे. स्वातंत्र्य मिळून चाळीस वर्षे होवूनही आपण अजूनही या धोरणाच्या पलिकडे गेलेलो नाही, हेही लक्षात घेतले पाहिजे. भाषा कितीही क्रांतिकारक असली तरी भारतातील समाजवाद्यांनाही या वर्ग समन्वयाच्या धोरणानेच वाटचाल करावी लागलेली आहे.

सावरकर हे भांडवलदारांच्या, जमिनदारांच्या व धनिकांच्या बाजूचे होते, हा आरोप कुणालाही करता यायचा नाही. आरोप करायचा तर या मंडळीविरुद्ध ते दंड थोपटून का उभे राहिले नाहीत, असा करता येतो; शेतकरी, कामकरी, यांच्याबाजूने त्यांची चळवळ का उभी केली नाही, असाही करता येतो; त्यांना आर्थिक विचाराचे किंवा कामगार शक्तीचे महत्वच समजले नाही, असा सुद्धा करता येतो. राजकीय, धार्मिक, वांशिक व सामाजिक अशा राष्ट्रीय समस्या त्यांना आर्थिक समस्येपेक्षा अधिक महत्वाच्या वाटल्या, हे उघड आहे. आर्थिक विचाराच्या दृष्टिकोणातून या समस्या सुटणाऱ्या नाहीत, असे त्यांना वाटले, हे खरेच आहे. तेव्हा आर्थिक विचाराला अग्रक्रम देण्याबाबतीत आक्षेप घेता आला तरी, ते

उजव्या विचारसरणीचे आहेत, असा आक्षेप कुणालाही घेता येणार नाही. त्यांच्या मनात उजव्या विचारसरणीला मुळीच स्थान नव्हते, हे समजून घेण्यासाठी आपण तयार असले पाहिजे.

साम्यवाद घातक आहे, अशी भाषा म्हणूनच सावरकरांनी कधीही वापरली नाही. अितर हिंदुत्वनिष्ठ साम्यवादाबद्दल काय काय बोलतात हे पाहिले म्हणजे सावरकरांच्या साम्यवाद अनुकूल भाषेचे महत्व आपल्या लक्षात येईल. तो धर्माच्या विरोधी आहे, या मुद्यावर साम्यवादाला सावरकरांचा विरोध कधीही नव्हता. संपत्तीची समान वाटणी याही तत्वाला त्यांचा विरोध नव्हता. संपत्तीचे समान वाटप करा व समाजरचना बदला हे तर त्यांनी स्पष्टपणे सांगितलेले आपण मागे पाहिलेच आहे. [४५] हे काहीही न पाहता 'या उत्पन्नाच्या समानवाटपाच्या प्रश्नाबाबत सावरकर अवाक्षर काढीत नाहीत' [४६] असा डॉ. य. दि. फडके यांनी केलेला आरोप निव्वळ खोडसाळ स्वरुपाचा आहे. 'संपत्तीचे समान वाटप झालेच पाहिजे,' हे ध्येय ठरवून त्यासाठी लढ्याचे कोणतेही रणशिंग सावरकरांनी फुंकलेले नाही, एवढाच आरोप वस्तुस्थितीस धरुन आहे व एवढाच आरोप प्रामाणिक आहे. या बाबतीत सावरकरांनी आपली भूमिका पुरेशी स्पष्ट केलेली आहे, व त्यांनी या बाबतीत अवाक्षरही काढलेले नाही, हा आक्षेप म्हणजे संशोधन नसून केवळ कुभांड आहे, हे समजून घेतले पाहिजे. या बाबतीत रशिया हाच स्वतःला नि जगाला आर्थिक वस्तुपाठ देत आहे, अशा निःसंदिग्ध भाषेत सावरकर बोलत असताना व त्यांच्यावर खरे पाहता 'रशियावादी' असा आरोप ठेवण्यासारखे पुरावे उपलब्ध असताना, त्यांचे हे आर्थिक धोरण म्हणजे मुसोलिनी व हिटलर राजवटीच्या आर्थिक धोरणाची आपल्या राष्ट्रासाठी सावरकरांनी काढलेली एक स्वस्त आवृत्ती आहे, असे फडके यांनी म्हणावे, [४७] हे त्यांच्या स्वभावाला व संशोधनपद्धतीला धरुनच आहे.

ही तर जीवनक्रांती

१९१७ ला रशियन क्रांती झाली नि जगातील अनेक बुद्धिमान तरुण या क्रांतीने भारावून गेले. ह्या क्रांतीने व ह्या क्रांतीला जन्म देणाऱ्या विचाराने हे तरुण वेडे झाले. सर्वच उदात्त मानवीमूल्यांचा एक आदर्श म्हणून रशियाकडे ते पाहू लागले. सावरकरही या क्रांतीने जरुर प्रभावी झाले. मुक्तकंठानी त्या क्रांतीचे त्यांनीही कौतुक केले. ते म्हणतात, [४८] "रशियात बोल्शेव्हिक क्रांती झाल्यावर जी अुलाढाल झाली, ती काही इतर अनेक क्रांत्याप्रमाणे केवळ राजकीय स्वरुपाचीच काय ती नव्हती किंवा इतर अनेक सामाजिक वा धार्मिक क्रांत्याप्रमाणे निव्वळ धार्मिक वा सामाजिक कक्षेतच काय ती सामावलेली नव्हती. तिचे आनुषंगिक परिणामच नव्हेत, तर तिचा हेतूच, तिचे सुस्पष्ट ध्येयच मुळापासून मनुष्य समाजाची रचनाची रचनाच नव्या पायावर करावयाची होती. राष्ट्रीय, सामाजिक,

आर्थिक-समाजाचे सर्व पैलू नव्यानेच पाडायचे काम त्या क्रांतीने हाती घेतले होते. तिला मानवी समाजाच्या जीवनाचीच दिशा बदलायची होती. ती एक नुसती राज्यक्रांति, एक नुसती धर्मक्रांति, एक नुसती अर्थक्रांति किंवा एक नुसती समाज-क्रांतीच काय ती नव्हती, तर ती रशियन क्रांति होती होती एक जीवनक्रांति!"

हिंदुत्वनिष्ठ सावरकरांनी या क्रांतीचे गुणगान करताना काहीही हातचे राखून ठेवलेले नाही, या बाबतीत कुणाचेही दुमत होवू नये. असे असतानाही या क्रांतीबरोबर इतर मार्क्सवाद्याप्रमाणे सावरकर वाहवत गेलेले नाहीत. राष्ट्रवादा-च्या संकुचित भिंती फोडून सर्व जगाच्या कामगारांचा विचार करणारी ही क्रांती आहे, अशी पं. नेहरु आदींची समजूत झाली. या बाबतीत अनुभवाने पं नेहरुंचा भ्रमनिरास झाला. रशिया हाही राष्ट्रवादावर गेला आहे, हे त्यांना कळून चुकले. मार्क्सवादाचा पुनर्विचार करणे त्यांना भाग पडले. अनेक मार्क्सवाद्यांचे असेच झाले आहे. क्रांतीनंतर चीन, इराण, तुर्कस्थान या ठिकाणचे आपले हक्क व सवलती रशियाने सोडून दिल्या व त्यामुळे साम्राज्यवादविरोधी अशी त्याची प्रतिमा तयार झाली. ह्या प्रतिमेने अनेकांना भुरळ पाडले. पं. नेहरु सारख्या मार्क्सवादाचा प्रभाव असलेल्यांना वाटले की, रशिया हे एक शांततावादी राष्ट्र आहे. दुसऱ्या महायुद्धातील घटनांनी नेहरुंच्या या वाटण्याचा भ्रमनिरास झाला. जपानचा साम्राज्यवादी म्हणून मार्क्सवाद्यांनी सतत निषेध केला होता. याच जपानशी रशियाने दुसऱ्या महायुद्धात तह केला नि खऱ्याखुऱ्या मार्क्सवाद्यांचे डोळे उघडले. रशियाने इंग्लंडवर आक्रमण केले नि जपानपेक्षा वेगळे नाही हे सिद्ध केले. नाझी जर्मनी नि मार्क्सवादी रशिया यांनी आपसात मैत्री करुन पोलंड-ची वाटणी करुन घेतली. तसेच झेकोस्लोव्हाकियावर रशियाने केलेल्या आक्रमणाला मार्क्सवादात कोणतेही स्पष्टीकरण नव्हते. यांचा अर्थ या जीवनक्रांतीने भाळले गेलेले तरुण क्रमाक्रमाने, अनुभवाने आधिक वास्तववादी होवू लागले. मार्क्स-चा पुनर्विचार करु लागले. सावरकरांचे वैशिष्ट्य हे की, प्रथम पासून ते मार्क्स-वादाकडे चिकित्सकपणे पाहत होते. रशियन क्रांती हा एक अपूर्व असा मानव-जातीने केलेला, मानवाचे जीवनच बदलू पाहणारा, पण अत्यंत धाडसाचा तितकाच धोक्याचा एक प्रयोग होता, असे सावरकरांना वाटले. या प्रयोगाचा अनुभव पाहणे, त्यांना महत्त्वाचे वाटले. राष्ट्रवाद रशियालाही चुकणार नाही, हे ते पूर्वीपासूनच सांगत होते. ही समाजक्रांती सावरकरांच्या भूमिकेतूनही कितीही अपूर्व, सर्वंकष व आदर्श असली तरी केवळ तेवढ्यामुळे सावरकर मार्क्सवादावर भाळले गेले नाहीत. पुनर्विचार करुन मार्क्सवादी आज ज्या ठिकाणी येवून स्थिर झाले आहेत, तेथेच सावरकर सुरुवातीपासूनच आहेत, हे समजून घेतले पाहिजे.

मार्क्स आज कालबाह्य

पूर्वायुष्यात मार्क्सवादांनी व रशियन क्रांतीनी झपाटले गेलेले कित्येक

विचारवंत नंतरच्या काळात मार्क्सवाद हा अपूर्ण आहे, या कारणास्तव मार्क्सवाद नाकारते झाले, हा इतिहास आहे. पं. नेहरु व मानवेंद्रराॅय हे याचे दोन ज्वलंत उदाहरणे आहेत. पं. नेहरुबद्दल प्रा. नरहर कुरुंदकर म्हणतात,[४८] "त्यांचे म्हणणे असे की, १९ व्या शतकातील मार्क्स विसाव्या शतकात संपूर्णपणे कालबाह्य झालेला आहे. ज्या परिस्थितीत, ज्या वातावरणात आणि जे प्रत्यक्ष डोळ्यासमोर ठेवून ही माणसे विचार करत होती, ती परिस्थिती, ते वातावरण आणि ते प्रश्न आता पूर्णपणे बदललेले आहेत. विशेष म्हणजे मार्क्सवाद्यांसमोर युरोप आणि अमेरिकेचे प्रश्न होते. त्यांनी आशिया आफ्रिकेच्या संदर्भात विचार केलेला नाही. म्हणून भारतासारख्या अविकसित देशाचा विचार करतांना ते सारेच प्रश्न संपूर्णपणे गैरलागू होतात." मार्क्सवादाचा मनावर प्रभाव असलेल्या लेखकांचे मार्क्सवादाकडे आकर्षित झालेल्या नेत्याबद्दलचे हे मत आहे. "ज्या कारणामुळे नेहरु मार्क्सवादाकडे आकृष्ट झाले, याच कारणामुळे नेहरु मार्क्सवादी होऊ शकले नाहीत"[४९] असा कुरुंदकरांचा मार्मिक अभिप्राय आहे.

मार्क्सच्या मनात त्या परिस्थितीच्या संदर्भात राष्ट्रवादाची जी संकल्पना होती त्या अर्थाने त्यांनी राष्ट्रवाद ही एक निषेधार्ह अशी प्रतिगामी संकल्पना ठरविली. मात्र आजच्या विसाव्या शतकातील राष्ट्रवाद हा अधिक व्यापक व मार्क्सवाद सोडवू पाहतो तेच प्रश्न सोडविण्यासाठी पुढे आलेला आहे. नव्या जगातील आजचा राष्ट्रवाद हा सर्वांना स्वातंत्र्य, समता याची हमी देतोच, पण सर्वांना काम, अन्न, वस्त्र, निवारा व समाजवादात जे कामगाराला दिले जावू शकते, ते सर्व देण्यासाठी उभा आहे. राष्ट्रवाद आणि समाजवाद या दोन परस्परविरोधी अशा संकल्पना राहिलेल्या नाहीत. त्यामुळे नव्या परिस्थितीत मार्क्सची राष्ट्रवादाबद्दलची भूमिका कालबाह्य ठरली आहे. मार्क्सच्या काळात निवडणुका नसल्यामुळे कामगारांचे राज्य येण्यासाठी सशस्त्र क्रांतिशिवाय त्यांच्यापुढे दुसरा पर्याय नव्हता. आज लोकशाही आलेली आहे, निवडणुका आलेल्या आहेत. त्यामुळे त्या हेतूसाठी सशस्त्र क्रांतीची कल्पनाही कालबाह्य ठरली आहे, हीवस्तुथिती आहे. प्रा. कुरुंदकरांची मार्क्सवाद व राष्ट्रवाद याबद्दलची ही भूमिका आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. प्रा. कुरुदकर म्हणतात, [१०५] "मानवजातीच्या इतिहासात स्वातंत्र्य या कल्पनेचा जो अनेक पदरी व अनेक पातळीवर आविष्कार चालू आहे, त्यातील एक कक्षा राष्ट्रवाद या नावाने ओळखली जाते असे मी मानतो. स्वातंत्र्य या भव्य कल्पनेचा राष्ट्रवाद हा एक घटक आहे." 'राष्ट्रवाद ही एक अफूची गोळी आहे'[१०६] म्हणणारे, ही भूमिका लक्षातच घेत नाहीत.

पोथिनिष्ठ मार्क्सवादी राष्ट्रवादाचे हे नवे स्वरुप समजून न घेता, राष्ट्रवाद ही अफूची गोळी आहे असेच म्हणत असतात. ही मंडळी मार्क्सवादाचा पुनर्विचार करायला तयार नाहीत; राष्ट्रवादाचे नवे स्वरुप लक्षात घ्यायला तयार नाहीत व आपल्या जुन्या कालबाह्य झालेल्या मोजपट्टीने सावरकरांचे मूल्यमापन करु

पाहतात. मार्क्सवादाचा प्रभाव असलेले डॉ. य. दि. फडकेही ज्यांच्यावर प्रतिगामी म्हणून टीका करु धजणार नाहीत, त्या प्रा. कुरुंदकरांनी 'पं. नेहरु एक मागोवा' या ग्रंथात राष्ट्रवादाविषयी ही जी भूमिका मांडलेली आहे, ती खऱ्या बुद्धिवाद्याला शोभणारी आहे, असे आम्हास वाटते. तेव्हा सावरकरांनी राष्ट्रवाद मानला व मार्क्सवादावर भाळून त्या बरोबर ते वाहत गेले नाहीत, तर ते समजून घेतले पाहिजे. या साम्यवादी ऋषीचे आपल्या देशाला आजच्या परिस्थितीत जे जे उपयुक्त ते ते स्वीकारण्याची सावरकरांची भूमिका वास्तववादीच होती, असे म्हटले पाहिजे.

मानवेंद्र रॉयांनी मार्क्सवादाच्या प्रभावापासून दूर निघून नवमानवतावाद मांडण्याचे कारणही असेच आहे. "सामाजिक न्यायावर आधारलेली नवी समाजरचना स्थापण्याच्या कामी आपण अग्रेसर बनले पाहिजे; असे अग्रेसरत्व पत्करणाऱ्यांनी मार्क्सच्या भविष्यवादी विचारसरणीच्या नियतीविरुद्ध बंड करुन समाजरचनाशास्त्रामध्ये स्थापत्य विशारदाप्रमाणे शास्त्रशुद्ध व आस्थापूर्वक लक्ष घातले पाहिजे." असे त्यांनी मार्क्सवादाविरुद्ध बंड करतांना म्हटले आहे. [५०] "मार्क्स हा चुकीचा दृष्टा असल्याचे सिद्ध झ." असा अभिप्राय रॉयनी नोंदविला आहे. मार्क्सच्या "वर्गकलहाच्या सिद्धांताविषयी संशय उत्पन्न झाला आहे." [५१] असा आक्षेप घेवून "समाजाची आर्थिक पुनर्वटना केल्याने स्वातंत्र्याचे नवे जग आपोआप निर्माण होवू शकेल ही कल्पना चुकीची आहे." असे स्पष्टपणे म्हटले आहे. मार्क्सची इतिहासाची भौतिक मिमांसा रॉयना एकांगी वाटते. "इतिहासाच्या आर्थिक उपपत्तीने मार्क्सवादाला गोत्यात आणले आहे." असा स्पष्ट आरोप करुन "आग्रही मार्क्सवादाने आर्थिक विचारांना अग्रस्थान दिले. आणि सांस्कृतिक आणि नैतिक मूल्यांविषयी अंधश्रद्धा व संशय वृत्ती बळावली" [५२] असा निष्कर्ष त्यांनी काढला आहे. मार्क्सवादी म्हणून जे विचारवंत काही काळ राहिले, त्यांची ही भूमिका असेल तर माणूस हा फक्त आर्थिक प्राणी नाही व आर्थिक प्रश्न सुटले म्हणजे बाकी प्रश्न सुटतात असे नाही, असे मानून त्या प्रश्नाला आपल्या कार्यामध्ये अग्रक्रम दिला नाही, ही सावरकरांची भूमिका आपण समजून घेतली पाहिजे. मार्क्सऋषीला, त्यांच्या भव्योदात्त विचारांना सावरकर वंदन करतात; आपल्या राष्ट्राला त्यातील जेवढे हितकारक तेवढे स्वीकारतात; ते जेवढे स्वीकारतात, त्यापेक्षा पं. नेहरुंसारखा समाजवादीही अधिक स्वीकारत नसतो. हा सावरकरांचा बुद्धिवाद आपण समजून घेतला पाहिजे.

कुरुंदकरांचा अभिप्राय

सावरकरांच्या या आर्थिक विचाराबद्दल प्रा. कुरुंदकरांनी व्यक्त केलेला अभिप्राय आम्हाला अतिशय मोलाचा वाटतो. प्रा. कुरुंदकर म्हणतात, [१०४] "सावरकर म्हणत, सर्व परंपराचा उच्छेद करणारी सर्वकष हुकूमशाही कम्युनिझच्या

कृपाने जग ग्रासू पाहत आहे. त्याला उत्तर वेद–वेदांगे, यज्ञ–उपासना. भक्ति–ज्ञानत्रे यातून मिळणार नाही. या आव्हानाचे उत्तर लोकशाहीतच समाजाचे आधुनिकीकरण करुन प्रत्येकाला पोटभर अन्न व अंगभर वस्त्रे मिळतील याची हमी देणारा समाजवाद हेच आहे. ज्या समाजव्यवस्थेत अखिल जनतेच्या सर्व भौतिक गरजा न्यायपूर्वक पुरविल्या जातील आणि संस्कृतीचा अनुबंध कायम ठेवून सर्वांनाच विकासाची संधि मिळेल, ती योजना म्हणजेच हुकूमशाहीला उत्तर. विचारांनी सावरकर कसे चौरस होते, याचे हे एक उदाहरण आहे." प्रा. कुरुंदकरांचा हा अभिप्राय पूर्वग्रह सोडून आपण समजून घेतला पाहिजे.

× × × ×

स्त्री स्वातंत्र्य

सावरकरांचे सर्वच क्षेत्रातील विचार अत्यंत पुरोगामी व क्रांतिकारक आहेत, मात्र त्यांनी आपल्या या विचाराला व्यवहाराची मर्यादा घालून घेतल्यामुळे आपल्याला तो पुरोगामीपणा लवकर लक्षात येत नाही. या बद्दलचे दुसरे एक उत्तम उदाहरण म्हणजे त्यांची स्त्रियांविषयीची भूमिका ही होय. सावरकर इतके प्रखर बुद्धिवादी व त्यांचे सामाजिक विचार इतके क्रांतिकारक असतानाही त्यांनी स्त्री स्वातंत्र्याबद्दल मुलभूत चिंतन कुठेही केले नाही, असा त्यांच्यावर एक आरोप घेतला जातो. प्रा. विद्याधर पुंडलिकांचा या बाबतीतील आक्षेप असाच आहे. ते म्हणतात,[५३] "गेल्या पिढीतील सर्व सामाजिक प्रज्ञावंतांनी आणि सुधारकांनी भारतीय स्त्रीच्या अवनत स्थानाबद्दल आवेशाने, हिरिरीने, सहानुभूतीने किंवा करुणपणे कांही ना कांही लिहलेले आहे. स्त्री स्वातंत्र्य ही आपल्या गेल्या शंभर–दिडशे वर्षातील समाज परिवर्तनाची एक महत्वाची आघाडी आहे. मात्र मनुस्मृतीतील महिला या प्रधानतः माहितीवर लेखमालेचा अपवाद वगळता सावरकरांनी याबद्दल विशेषपणे आणि प्रत्ययकारी असे फारसे लिहले नाही. रशियन क्रांतीनंतर घटस्फोट स्वातंत्र्याचा जो अपूर्व प्रयोग करण्यात आला, त्याबद्दल मात्र सावरकरांनी आवर्जून आणि प्रशंशापर लिहले आहे, ते अतिशय अर्थपूर्ण आहे. तथापि व्यक्तित्व या मूल्याचा कळवळा किंवा स्त्री स्वातंत्र्य या मूल्याचे मुलभूत सामाजिक वा सांस्कृतिक महत्व म्हणून सावरकर या प्रश्नाकडे बघायला तयार नाहीत."

खरा आक्षेप

या आक्षेपाचा मुख्य रोख सावरकरांनी स्त्री स्वातंत्र्याबद्दल चिंतनपर असे कुठेही लिहले नाही वा त्या बद्दल कोणती चळवळही केली नाही, ही वस्तुस्थिती दाखवून देण्याचा आहे. स्त्री स्वातंत्र्य हा सावरकरांना त्या परिस्थितीत ज्वलंत प्रश्न वाटला नाही, ही वस्तुस्थिती आहे. ज्या काळात सावरकरांनी या प्रश्नाबद्दल

प्रकट चिंतन करावे, असा काळ ते रत्नागिरीला होते तेव्हाचा होता. म्हणजे १९२५ नंतरचा हा काळ आहे. राष्ट्र स्वातंत्र्य हे त्यांच्या पुढील मुख्य ध्येय होते. राष्ट्रस्वातंत्र्य हे त्या राष्ट्रातील व्यक्तीच्या स्वातंत्र्यासाठीच त्यांना हवे होते, तरी या व्यक्तिस्वातंत्र्यापेक्षा राष्ट्रस्वातंत्र्याचीच त्यांनी सतत चिंता केलेली आहे. "मनुष्याची आत्मिक उन्नतीच नव्हे तर, मानसिक उन्नति, नैतिक उन्नति आणि आत्मिक उन्नतीही पारतंत्र्याने खुंटते, म्हणून आम्हास भारताची स्वतंत्रता हवी होती."[५४] अशी त्यांची भूमिका होती. या भूमिकेमुळे व्यक्तिस्वातंत्र्याचे स्वतंत्रपणे ते चिंतन करतांना आपल्याला दिसणार नाहीत. सर्व शक्ती ही मुख्य-ध्येयार्थच लावली पाहिजे, असे त्यांना वाटे. त्यामुळे त्यांच्या साऱ्या चिंतनात, विचारात व कार्यात राष्ट्र व राष्ट्रहितच असते. सतत त्यांचे लक्ष राष्ट्र या गोष्टी-कडेच केंद्रीत झाले होते. सावरकरांनी राष्ट्र हेच आपले सांप्रतचे मूल्य मानले असल्यामुळे व्यक्तित्व, व्यक्तिस्वातंत्र्य, स्त्री स्वातंत्र्य, समता, सामाजिक न्याय इ. मूल्यांची स्वतंत्रपणे वा चिकित्सकपणे त्यांनी कधीही मांडणी केलेली नाही. याच कारणामुळे केवळ स्त्री स्वातंत्र्याबद्दलच नव्हे, अशा अनेक मानवी मूल्याबद्दल सावरकर गप्प बसलेले आहेत, असे आपल्याला भासत राहते. अशा मानवी मूल्या-बद्दल, त्यांच्या महत्वाबद्दल थोर पुरुषांनी सतत बोलत राहिले पाहिजे, अशी आपली अपेक्षा असल्यामुळे सावरकरांना या मानवी मूल्यांची जणू कदरच नव्हती, असेही आपल्याला वाटण्याचा संभव असतो. त्यांनी ज्या ज्या सुधारणांचा पुरस्कार केला, त्यांचा पाया ही मानवी मूल्ये नसून, केवळ राष्ट्रहितासाठी त्यांना या सुधारणा हव्या होत्या; असा जो आक्षेप घेतला जातो त्याचे कारण हेच होय. सावरकरांना किती काळजीपूर्वक समजून घेतले पाहिजे, हे यावरुन आपल्या लक्षात येईल. स्वीकारलेल्या प्रत्येक गोष्टीला उदात्त मूल्याचे अधिष्ठान कसे आहे, हे सांगत बसण्याची सावरकरांची पद्धत नाही. त्यांच्याबद्दलच्या प्रचलित गैरसमजाचे हे एक प्रमुख कारण आहे.

स्त्री शिक्षण

खरा आक्षेप सावरकरांनी स्त्री स्वातंत्र्याबद्दल प्रभावीपणे आपले विचार का मांडले नाहीत, एवढाच असतो. त्यांना स्त्री स्वातंत्र्य मान्य नव्हते; ते स्त्रियांपेक्षा पुरुषांना श्रेष्ठ समजत होते; स्त्री समानता त्यांना मान्य नव्हती; स्त्रियांची बुद्धी ही पुरुषांपेक्षा कमी असते, असे त्यांचे मत होते; स्त्रीने पुरुषाच्याच गुलामीत राहिले पाहिजे असे त्यांना वाटे– अशा प्रकारचा कोणताही आक्षेप, त्यांच्यावर कुणालाही घेता येण्यासारखा नाही, कुणीही घेत नाही. अर्थात याला अपवाद फक्त डॉ. य. दि. फडके यांचा आहे. १९४३ मध्ये दादरच्या एका कन्या शाळेत भाषण करताना सावरकर म्हणाले,[५५] "पुढील संतती आमच्या पिढीपेक्षा अधिक बलवान, सुंदर नि देशाभिमानी होईल असे शिक्षण स्त्रियांना मिळावे. स्त्री

शिक्षणाचे ध्येय हेच असले पाहिजे." स्त्री स्वातंत्र्य, स्त्री पुरुष समानता इत्यादी मूल्ये तूर्त बाजूला ठेवून सावरकर स्त्री शिक्षणाकडे राष्ट्रहिताच्या दृष्टीने पाहतात. त्यांच्या या ध्येयात या मूल्याविरोधी काहीही नाही. स्त्रियांच्या दुःखावद्दल आवेशाने लिहिणारे आगरकर सुद्धा स्त्री शिक्षणाच्या या हेतूला मान्यता देतात. प्राथमिक शिक्षणासंबंधाने आगरकर म्हणतात,[१६] "हे शिक्षण वास्तविक पाहता मुलांपेक्षा मुलीस विशेष जरुरीचे आहे, असे विचारांती प्रत्येकास दिसून येणार आहे. अपत्यसंगोपनाची खरी जबाबदारी आईवर असते. आईच्या प्रकृतीचे... परिणाम मुलीच्या प्रकृतीवर थेट गर्भदानापासून होवू शकतात...तेव्हा ज्या स्त्रीवर अपत्य संगोपनाचे एवढे जबाबदारीचे काम आपण सोपविले, तिला अक्षर शत्रू असू देणे अत्यंत अहितकारक आहे असे आम्हास वाटते." तेव्हा राष्ट्रहिताच्या दृष्टिकोणातून स्त्री शिक्षणाकडे पाहण्यात काहीही गैर नाही. आणि असेल तर आगरकरांवरही असाच आरोप लावण्यास आपण तयार असले पाहिजे.

सावरकरांच्या काळात स्त्रियांच्या प्रश्नाची खूपच प्रगती झाली होती. सतीचा प्रश्न पूर्णतः मिटला होताच, पण मुलींच्या प्राथमिक शिक्षणासही समाज अनुकूल झाला होता. सावरकरांच्या भाषेत सांगायचे तर[१७] "मुलींच्या शाळांची पहिली स्थिती नि आताची स्थिती यात महदंतर आहे. प्रारंभी शाळेकरिता मुली मिळत नसत, पण आता मुलींना शाळा अपुऱ्या पडू लागल्या आहेत. आपल्या मुलीने शाळेत जावे, असे प्रत्येक पित्याला वाटू लागले आहे. मुलीतही शिक्षणाची आवड निर्माण झाली आहे." तेव्हा स्त्री शिक्षणाचा प्रश्न जेवढा आगरकरांच्या काळी ज्वलंत होता, तेवढा सावरकरांच्या काळात राहिलेला नव्हता. मुलींच्या लग्नाचे किमान वय किती असावे, हाही वाद मिटलेला होता. बारा वर्ष ही या लग्नाच्या वयाची किमान मर्यादा ठरविण्याचा कायदा जेव्हा अंमलात यायचा होता, तेव्हा या कायद्याच्या बाजूने सनातन्याच्या विरुद्ध जसे आगरकरांना दोन हात करावे लागले, तशी आवश्यकता सावरकरांना पडलीच नाही. विधवाविवाह ह समाजात मान्यता पावत होता, ब सावरकरांनी या विधवा विवाहाच्या बाजूनी लिहिलेले आहे.

वयाच्या १९ व्या वर्षी लिहिलेली त्यांची या विषयावरील 'बालविधवा दुःस्थिती कथन' ही दोनशेपेक्षा अधिक ओळीची दीर्घ कविता आहे. स्त्रियांविषयीची त्यांची भूमिका अगदी स्पष्टपणे या कवितेत व्यक्त झालेली आहे. विधवा स्त्रीचे व्यक्तित्व, सामाजिक न्याय, समता इ. साऱ्या मूल्यांवर बालविधवांच्या दुःस्थितीचे त्यांनी चित्रण केलेले आहे. साठीच्या पुरुषांनी नवे लग्न करायला हरकत नाही, तर तोच न्याय स्त्रियांना का लावू नये, असा प्रश्न सावरकरांनी या कवितेत उपस्थित केलेला आहे. विधवा आणि विदुरामध्ये असा भेदभाव हा कोणता न्याय आहे, असा सवाल ते करतात. पुरुषाला केव्हाही दुसरे लग्न करता येते; निपुत्रिक असला तर दुसरे मूल दत्तक घेता येते- सर्व काही करता येते;

मात्र सर्वांना असे उपाय असले, तरी विधवाला मात्र काही उपाय नाही, हा विरोधाभास त्यांनी स्पष्टपणे दाखवून दिला आहे. स्त्रियांविषयीचे आपले विचार वाचून[५८] "अैसे पुसाल हासुनि की स्त्री पुरुषासही हा समान वधी." असे ते स्वत:विषयी म्हणतात. स्त्री पुरुष समानतेची कल्पना सावरकर कशी मानतात, हे यावरुन लक्षात येईल. "विद्यादाना द्यावे शाला स्थापोनि विद्यवाते"[५९] असे विधवा शिक्षणा विषयी सावरकर सांगतात. स्त्री शिक्षण, प्रौढ विवाह, हुंडा पद्धती विधवाविवाह या विषया भोवतीच स्त्रियाविषयीचा विचार सावरकरांच्या पूर्वीच्या काळात केंद्रीत झालेला होता. त्यांच्या काळात हे विचार समाजाने तत्वत: स्वीकारले होते. सावरकर पूर्णत: याच विचाराच्या बाजूचे होते. या विचारांचा त्यांनी प्रचार केला नाही, एवढीच रास्त तक्रार आपण करु शकतो. ही तक्रार सावरकर पूर्व काळाच्या संदर्भात केली जाऊ शकते. १९ व्या वर्षी म्हणजे पुरेशो विचार प्रौढता आलेल्या वयात असलेली वरील स्त्री–पुरुष समानतेची त्यांची भूमिका नंतर बदलल्याचा पुरावा कुणालाही दाखविता येणार नाही.

नैसर्गिक हक्क

'कुसुम' ही त्यांची पूर्णत: प्रौढवयात लिहिलेली कथा बालविवाह व विधवा विवाह या विषयालाच वाहिलेली आहे. मुळातूनच वाचावी इतकी ती प्रत्ययकारी व मनाला चटका लावणारी आहे. "बारावारा वर्षाच्या घोड नवऱ्या शाळेत नाचविणाऱ्या अुल्लुतला मी नाही, समजलीस ? शास्त्रांनी कांही उगीच 'अष्टवर्षा भवेत कन्या' ही मर्यादा घातली नाही." [६०] असे विचार व्यक्त करणाऱ्या पिता गोपाळ भटजीचा–सावरकरांनी किती समाचार घेतलेला आहे, हे कथा वाचूनच चांगले समजू शकते. १२ वर्षाची कुसुम बालविधवा झाली. शास्त्राप्रमाणे दुसरे लग्न नाही. अशा या वयात आलेल्या विधवा कुसुमचे मनोगत सावरकरांनी अत्यंत हृदयविदारकपणे या कथेत मांडले आहे. गोठ्यातील गाईम्हशीप्रमाणे मीही एक गोठ्यातले गुरच नाही का, अशा विचाराने कुसुम झुरत आहे. तिच्या आजारपणात तिला तपासायला आलेल्या डॉक्टरवरच तिचे मन बसते. त्यांच्याबरोबर पळून जायची तयारी दाखवते. ती त्यांच्या गळ्याला पडते. ही घटना तिच्या आईने पाहिली. कुसुमने स्वत:ला वाचवण्यासाठी डॉक्टरनीच मला मिठी मारली म्हणून सांगितले. या बद्दल डॉक्टरच्या तोंडून सावरकर म्हणतात,[६१] "अरेरे, या भ्याड मिथ्याचारापायी स्त्रियांची जगात जी होत आहे ती पायमल्ली झाली! स्त्रियांच्या पायातील बेडचा तोडण्यास येणाऱ्या या पुरुषाला पहिली शिवीजर कुणी हासडीत असेल ती बहुधा स्त्रीच होय ! स्त्री स्वातंत्र्याचा खरा शत्रू आज तरी स्वत: स्त्रीच आहे !" सावरकरांच्या या म्हणण्याचा अर्थ अगदी स्पष्ट आहे. आपल्या स्वातंत्र्यासाठी स्त्रियांनी भिवू नये, उघडपणे बंड करावे, तो त्याचा नैसर्गिक हक्क आहे ! असे सांगून स्त्रियांचा हा भ्याड मिथ्याचार पुरुषी धाकदपट-

शाहीच पडछाया आहे हीही गोष्ट लगेच पुढे सावरकर स्पष्टपणे नोंदवितात. व्यक्तिस्वातंत्र्य आणि सामाजिक न्यायाची जाणीव या कथेत व्यक्त झालेली नाही, असे खरोखरच म्हणता येईल काय ? हे स्त्री दुःख प्रत्ययकारी नाही काय ? या साठी स्त्री–पुरुष समानतेवर तात्विक ग्रंथ त्यांनी लिहायला हवा होता की काय ?

सत्ययुगातील पाखंड

१९३३ मध्ये 'मनुस्मृतीतील महिला' ही लेखमाला सावरकरांनी स्त्री विषयक प्रश्नांना वाहिलेल्या 'स्त्री' मासिकात प्रसिद्ध केली. ही लेखमाला प्रधानतः माहितीपर असली तरी सावरकरांच्या स्त्रीविषयक भूमिकेचे दर्शन या लेखमालेत आपल्याला घडते. प्रजापतीने स्त्रियांचा स्वभावच असा घडविला आहे की कोणताही पुरुष म्हटला की त्यांना हवासा वाटतो. यास्तव त्यांना परक्या पुरुषापासून दूर ठेवण्याची पराकाष्ठा करावी. स्त्रियांचे संस्कार मंत्रहीन असतात. स्त्री स्वभावतःच अनृत आहे. अशा अर्थाच्या मनुस्मृतीतील श्लोकांचा अर्थ दिल्यावर लगेच सावरकर भाष्य करतात, [६३] "याहूनही कडक भाषेत लिहलेले स्त्री दोषविषयक श्लोक वहुत आहेत. त्या प्रकरणी अितकेच ध्यानी ठेवावे की, शास्त्रकार पुरुष होते. जर शास्त्रकार स्त्रियांही असत्या तर पुरुषदोष वर्णितांना हेच श्लोक पुरुषांनाही अितक्याच यथातथ्य पणे लावण्यास सोडले नसते." धर्मशास्त्रातील स्त्री दोषविषयक वर्णन सावरकरांना मुळीच मान्य नव्हते व ते पुरुषीवृत्तीचे द्योतक आहे, असे त्यांना वाटे. मनुस्मृती या आद्यधर्मस्मृतीतील महिलेचे दर्शन घडविण्याचा हेतूच, धर्मशास्त्र हे कसे स्त्रियांच्या बाबतीत चुकीचे आहे, हे दाखविण्याचा आहे.

स्मृतीतील दहा पुत्र

मनुस्मृती ही परस्परविरोधी व विसंगत वचनांनी कशी भरलेली आहे, हे सावरकर ते ते श्लोक देऊन दाखवून देतात. सनातनी ज्याला अधर्म, पाखंडी वा अनैतिक म्हणतात ते या आद्यस्मृतीत कसे समाविष्ट झालेले आहे, ते दाखवून देवून सनातन्यांची झोप उडवितात. नियोग विधीने नियुक्त अशा परक्या पुरुषापासून आपल्या स्त्रीस झालेला पुत्रही धर्म्य म्हणून समजावा, अशी मनुस्मृतील आज्ञा ते दाखवून देतात. लगेच याच्या उलट्या आज्ञाही दाखवून देतात. औरस, क्षेत्रज, दत्तक, कृत्रिम, गूढोत्पन्न, कानीन, सहोढ, क्रीत, पौनर्भव व अपविद्ध इत्यादी धर्मशास्त्रातील दहा पुत्रांचे प्रकार त्यांनी दाखवून दिले आहेत. क्षेत्रज हा नियोगपद्धतीने झालेला पुत्र आहे. गूढोत्पन्न म्हणजे लग्नानंतर अज्ञात पुरुषापासून पतीला न सांगता झालेला पुत्र होय. असाही पुत्र धर्म्य मानलेला आहे. लग्नापूर्वी गुप्तपणे झालेल्या संबंधातून जो पुत्र होतो तोही नंतर पतीचाच समजला जातो. हा पुत्र कानीन होय. विवाहाच्या वेळेस स्त्री गरोदर असल्यास व ते पतीला माहीत असो

वा नसो, त्यापासून होणारा पुत्र हा सढोह होय. विधवेने विवाह केला असता होणारा पुत्र पौनर्भव होय. हे सारे पुत्र पूर्वीच्या सत्ययुगात धर्म्यच होत. मात्र आजच्या कलियुगातील सनातनी लोक औरस आणि दत्तक या शिवायच्या पुत्रांना धर्म्य मानायला तयार नाहीत, यावर सावरकरांनी केलेले भाष्य वाचण्यासारखे आहे. ते म्हणतात, "विवाह संबंध जितके संयत नि एकान्तिक असतील तितकी त्या समाजाची वैवाहिक नीति प्रशस्तपर होय असे जर म्हणायचे तर ह्या कलि-युगातील वैवाहिक नीति त्या सत्यत्रेताद्वापर युगातील नीतीपेक्षा अधिक श्रेष्ठ होय, असेही मानले पाहिजे. कारण आजचे शास्त्र औरस आणि दत्तक या दोन प्रकारच्या पुत्रानाच पुत्र समजते. कानीन, सढोह, गूढोत्पन्न, क्षेत्रज प्रभृति पुत्रांना पूर्वीप्रमाणे मातापितरांना पुनाम नरकातून तारणारे 'पुत्र' न समजता, आज उलट तसे संबंध तशा मातापितरास नरकात ढकलणारेच समजले जातात. क्षेत्रज आणि गूढोत्पन्न हे तर 'दायादांच्या' प्रशस्त वर्गात मोडत नि त्यास श्राद्धांचाही प्रकट अधिकार मिळे! या प्रकरणी तरी कलियुग हेच सत्ययुगाहून अधिक संयत नि धर्मशील मानणे भाग आहे!" सुधारणाना विरोध करणाऱ्या व उठसूठ शास्त्राधार घेणाऱ्या सनातन्यांच्या वैवाहिक नीतिकल्पनांना प्रचंड धक्के देण्याची सावरकरांची पद्धत ही अशी होती!

मूळ मुद्यालाच हात

स्त्रीपुरुष समान असले पाहिजेत असे आपण म्हणतो. स्त्रीला जर एखादी गोष्ट शक्य असली तर केवळ ती स्त्री आहे, या कारणास्तव ती गोष्ट तिला नाकारता कामा नये, हाच या समतेचा व्यावहारिक अर्थ असतो, असला पाहिजे. शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक, राजकीय, आर्थिक इ. साऱ्या क्षेत्रात या अर्थाने स्त्रियांना समानता देण्यास पुरुष तयार होईल, पण एका बाबतीत स्त्रीपुरुष समानता पुरुषांना मंजूर नसते. पुरुषाप्रमाणेच शरीर संबंध ठेवण्याचे समान स्वातंत्र्य स्त्रीला देण्यास पुरुष तयार नसतो. स्त्रीला हे स्वातंत्र्य देवू नये यासाठी स्वतःचे या बाबतीतील स्वातंत्र्य तो सोडून देईल, पण या स्वातंत्र्याच्या बाबतीतील समानता तो कधीच मान्य करणार नाही, स्त्री शिक्षण, पौढविवाह, हुंडापद्धत, विधवा विवाह, इ. प्रश्न या स्वातंत्र्याच्या प्रश्नापुढे अगदी लहान होऊन जातात. हे स्वातंत्र्य मान्य करण्यापेक्षा वरील सारे प्रश्न स्त्रियांच्या बाजूने सोडविण्यास लोक एका पायावर तयार असतात. वस्तुतः हे स्वातंत्र्य मर्यादित व नियमबद्ध करण्याच्या हेतुतून व प्रयत्नातून विवाहसंस्थेचा जन्म झाला. पशुअवस्थेतून निघून मनुष्याच्या उच्चतर अवस्थेकडे जाणारा मनुष्याच्या सांस्कृतिक ठेवा म्हणून विवाह संस्थेचा गौरव केला गेला. स्त्री, पुरुष आणि त्यांनी बनलेला समाज या सर्वांचे हित साधणे हा या विवाह संस्थेचा हेतू विसरुन जावून स्त्रियांकरिता अन्यायकारक व्हावे असे नियम या विवाह संस्थेत घुसविले गेले, व म्हणून स्त्रियांच्या बाजूने

सर्व सुधारक उभे राहिले. स्त्रियांच्या पातिव्रत्याच्या नव्या कल्पना शोधून काढल्या गेल्या व हे पातिव्रत्य टिकविण्यासाठी सर्वच क्षेत्रातील स्त्रियांचे स्वातंत्र्य संपविण्यात आले. स्त्री शिक्षण नको, ऋतुप्राप्तीच्या पूर्वीच लग्न करा, विधवेला पुनर्विवाहाला बंदी करा, समाजात स्त्रियांना मुक्तपणे संचार करु देवू नका, त्यांना बुरखा घालून घरात बसवा, त्या अधिक शहाण्या होवू नयेत म्हणून त्यांना अज्ञानी ठेवा– अशा आज्ञा धर्माखाली निघाल्या व लोकांनी त्या स्वीकारल्या. स्त्रियांच्या दुःखाच्या साऱ्या विषयांचा केंद्रबिंदु स्त्रीपुरुष शरीरसंबंधातील तथाकथित पवित्रता ही आहे. ही पवित्रता धर्मशास्त्रांनाच कशी मान्य नाही, हे 'मनुस्मृतीतील महिले'-च्या निमित्ताने सावरकर सांगत आहेत, हे समजून घेतले पाहिजे. विद्याधर पुंडलिक म्हणतात त्या प्रमाणे ही लेखमाला प्रधानतः माहितीपरच आहे, हे बरोबर असले तरी, ही माहिती देण्याच्या निमित्ताने सावरकरांनी स्त्रीस्वातंत्र्याच्या मूळ मुद्द्यालाच हात घातलेला आहे, हीही गोष्ट तितकीच खरी आहे, हेही समजून घेतले पाहिजे.

मनुस्मृतीतील स्त्री

मनुस्मृतीतील ही वैवाहिक नीती ही रशियातील आजच्या स्त्रीपुरुषसंबंध-विषयक नीतीसारखीच आहे, असा सावरकरांचा अभिप्राय आहे. सावरकर म्हणतात,[६४] "ह्या दहा पुत्रांच्या वर्गीकरणात आणि गांधर्वादि विवाहात व्यक्त होणाऱ्या त्या सत्ययुगातील स्त्रीपुरुषसंबंधीय वैवाहिक नीतीवरुन असे स्पष्ट म्हणावे लागते की, रशियातील आजची स्त्री पुरुष संबंधीय नीति, 'नवी नीति' म्हणून म्हटली जाते, ती फारशी नवी नसून स्वैरतेत तरी जवळजवळ 'जुनी नीति'च आहे, 'सनातन'च आहे, आणि मनुस्मृतीला सनातन धर्माचा अपरिवर्तनीय आधार-ग्रंथ म्हणून म्हणविणाऱ्या कोणाही 'सनातनीय' गृहस्थाला तरी या नव्या नीति-पंथाला पाखंड म्हणून नाके मुरडण्यास तोंड नाही! पाखंड असेलच तर ते नवे पाखंड नाही, अगदी मनुप्रणित, सत्ययुगीन, सनातन पाखंड आहे!" 'मनुस्मृतीच्या काळी आपल्या महिला वर्गाची स्थिती कशी होती' हे यथावत् सांगण्यासाठी ही लेखमाला त्यांनी लिहिली नि आजच्या रशियातील स्त्री जशी आहे, तशीच आपल्या पंजीच्या पंजीची दोनशेवी पंजी होती, असा निष्कर्ष त्यांनी काढला आहे, ही गोष्ट अत्यंत महत्वपूर्ण आहे, असे आम्हास वाटते. कोणतीही गोष्ट निर्हेतूकपणे करणे व नुसतीच माहिती देणारा अितिहास सांगत बसण्याचा उद्योग करणे, सावरकरांना कधीही जमले नाही. ही लेखमाला प्रधानतः माहितीपर आहे, असा अभिप्राय देवून, त्यांच्या स्त्रीस्वातंत्र्यविषयक भूमिकेबद्दल मत प्रदर्शन करणे चुकीचे आहे असे आम्हास वाटते.

प्रचंड धक्के

स्त्रियांबद्दलचे सावरकरांचे आणखी तीन लेख असेच प्रधानतः माहितीपर

आहेत. 'मनुस्मृतीतील महिला'चा अुतरार्ध म्हणून १९३६ मध्ये त्यांची 'प्राचीन यहुदी योषिता' ही लेखमाला स्त्री मासिकात प्रसिद्ध झाली. यहुदी लोकांच्या पवित्र 'जुना करार' या धर्मग्रंथातील त्या लोकांच्या महिला वर्गाची ४००० वर्षांपूर्वीची स्थिती कशी होती, याची माहिती या लेखात सावरकरांनी दिली आहे. समारोपात सावरकरांनी म्हटले आहे,[६५] "आपल्या पुराणांतून प्राचीन स्त्रीपुरुषांच्या आणि मोठमोठ्या ऋषिपत्न्या, राजकन्या, महर्षि, राजर्षि यांच्याच चरित्रातून नव्हे, तर देवदेवतांच्या चरित्रातूनही काही काही प्रसंगी आजच्या बोल्शेव्हिक रशियातील स्त्रीपुरुष संबंधानाही मागे सारणारी वर्णने जशी आढळतात, तशी या यहुदी देशातही आढळतात... ज्या ख्रिस्ती सोवळ्या चर्चामधून आजचे रशियन बोल्शेव्हिक वाङमय अनैतिक म्हणून निषधिले जाते, त्यांत ह्या कथा धर्म कथा!" प्राचीन धर्म-ग्रंथातील अशी माहिती लोकांसमोर ठेवून त्यांच्या स्त्रीपुरुष संबंधविषयक नीतिक-ल्पनांना प्रचंड धक्के देण्याच्या हेतूने सावरकरांनी या लेखमाला लिहिल्या आहेत, हे उघड आहे.

स्त्री स्वातंत्र्याचा रशियातील प्रयोग

रशियांतील आजच्या स्त्रीपुरुष संबंधीय नीतीचा केवळ उल्लेख करुन सावरकर थांबत नाहीत तर, या देशातील नीतीवद्दल माहिती देणारा एक स्वतंत्र लेख लिहतात. 'रशियातील घटस्फोट स्वातंत्र्याचा प्रयोग' हाच तो १९३६ मध्ये लिहिलेला लेख होय. हा लेख 'अतिशय अर्थपूर्ण आहे' एवढेच म्हणून हा लेख दुर्लक्षित करता येण्यासारखा नाही, अितका तो महत्वपूर्ण आहे. १९१७च्या रशियन क्रांतीनंतर कायदा करुन विवाह, स्त्रीपुरुष संबंध, घटस्फोट, या बाबत नागरिकांना मुक्त स्वातंत्र्य देण्यात आले. सावरकरांच्या भाषेत सांगायचे तर, विवाहबंधनाच्या पायावरील समाजरचना घटस्फोट स्वातंत्र्याच्या पायावर नेऊन स्थापण्याचा अद्-भुत क्रांतीचा हा प्रयोग पंधरा वर्ष रशियात चालू होता. या प्रयोगाचे काय परिणाम झाले, याची रशियन सरकारने पाहणी केली व एक अहवाल तयार केला. ता अहवाल संक्षेपानी सावरकरांनी आपल्या या लेखात दिलेला आहे. या प्रयोगा-संबंधाने सावरकरांसमोर असा प्रश्न उभा टाकतो की, या प्रयोगामुळे "आज रशियन माणसाचा अतिमाणूष झाला कां अपमाणूष? कां माणसाचा माणूसच राहिला?"[६६]

या प्रश्नाचे उत्तर सावरकरांनी त्या लेखात स्पष्टपणे कुठेही दिले नाही. तो अहवाल जसा आहे तसा त्यांनी भारतीयांसमोर ठेवलेला आहे. अहवाल वाचून वाचकांनी ही गोष्ट ठरवायची आहे. या अहवालातील "घटना आणि गणना (Fact and Figures) आपला जो काय मतितार्थ व्यक्तवायचा तो स्वयंभेव व्यक्तवित आहेतच." असे शेवटचे वाक्य लिहून त्यांनी हा अहवाल आपल्यासमोर विचारार्थ ठेवलेला आहे. 'लेखाप्रति तूचि अनन्य विषय' झाला असे राष्ट्राला उद्देशून

म्हणणाऱ्या सावरकरांनी, हा अहवाल वृत्तपत्राचे वार्ताहर माहिती देतात, त्या हेतूने व कर्तव्याने दिलेला असेल, असे समजायचे काय ?

रशियातील नव्या कायद्यामुळे क्रांती होवून काय घडले हे सांगतांना सावरकर म्हणतात, [६२] "स्त्री पुरुषाची ही करकच्च विवाहबंधने अकस्मात गळून पडल्यासारखी झाली ! ..... समता दुथडी भरुभरुन वाहत चालली ! नाते–गोते, जात–पात, वय–वशीला, मुहूर्त–मध्यस्थी, टिपण–टीका–घरबंध तेवढा सुटून वाटेल त्या स्त्रीने वाटेल त्या पुरुषाशी वाटेल तेव्हा 'संबंध' ठेवावा; सरकारी नोंदवहीत तो संबंध नोंदविण्याची लहर जर कोणास आली तर त्याच संबंधाला लग्न म्हणावयाचे ! संपले हाच विवाह. आणि ज्या वेळी ज्यास वाटेल त्या स्त्रीने वा पुरुषाने तो संबंध अथवा विवाह संपला असे सरकारी नोंदवहीत लिहावे की झाला घटस्फोट. त्या घटस्फोटास अेकच काय ते कारण पुरे. अिच्छा ! क्रांतीनंतर रशियामध्ये विवाह स्वातंत्र्य आणि घटस्फोट स्वातंत्र्य प्रत्येक स्त्रीपुरुष नागरिकाला अेक जन्मसिद्ध अधिकार म्हणून मिळाले." अशा या विवाह-स्वातंत्र्याच्या प्रयोगाची प्रशस्ती करणारा अहवाल सावरकरांनी भारतीय लोकांसमोर मांडलेला आहे, तो निर्हेतूक असावा काय ?

घटना आणि गणना

या अहवालातील ज्या 'घटना आणि गणना' स्वयंमेव आपला मतितार्थ व्यक्तवीतच आहेत, असे सावरकर म्हणतात, त्या घटना आणि गणना तरी कोणत्या आहेत ? क्रांतीपूर्वी आणि क्रांतीनंतर मुलीच्या लग्नाच्या वयात किती टक्के फरक पडला याची आकडेवारी या अहवालात देण्यात आली आहे. क्रांतीपूर्वी मुलीच्या लग्नाचे सरासरी वय सतरा होते, चोवीस वर्षानंतर मुलींना लग्नाचे ठिकाण मिळत नसे. क्रांतीनंतर सरासरी शेकडा ४८ मुली विशीच्या नंतर लग्ने करतात; शेकडा ३६ चोवीसच्या आत, वयाच्या २८–२९ पर्यंत लग्ने होत असत, अशी माहिती या अहवालात दिलेली आहे. क्रांतीपूर्वी आई–बापाच्या अिच्छेवर लग्ने होत, क्रांतिनंतर ती मुलीच्या अिच्छेनुसार होवू लागली; अशी माहिती अहवालात देण्यात आलेली आहे. विवाहपूर्व परिचयाची क्रांतिनंतरच्या काळात कशी वाढ झालेली आहे, याचीही आकडेवारी देण्यात आली आहे. " आई–बापाच्या संतोषासाठी किंवा श्रीमंतीच्या हौसेने व्यापारी सौदा म्हणूनच लागलेली लग्ने क्रांतीपूर्वी शेकडा ५३ या प्रमाणात आढळत." अशी माहिती या अहवालात असून क्रांतीनंतर लग्नें एक वर्षाच्या पूर्वपरिचयाने व मुलीच्या अिच्छेनुरुप होत आहेत, या बद्दल समाधान व्यक्त करण्यांत आले आहे.

घटस्फोट स्वातंत्र्याच्या प्रयोगाविषयी अहवालात म्हटले आहे,[६७] "घटस्फोट स्वातंत्र्याने विवाह संस्था उच्छेदिली गेली नाही, तर ती पूर्वीच्या अनुमानधपक्याच्या पायापेक्षाही बळकट अशा सुबुद्ध, सुसंस्कृत नि सुस्थिर पायावर

पुनरुद्धारिली गेली आहे, हे आमच्या चौकशीत उघड झाले." लग्नापूर्वी मुलीने अखंड कौमार्य राहिले पाहिजे, या पुरुषी इच्छेबद्दल हा अहवाल म्हणतो,[६८] "स्त्रीने तेवढे लग्न होअीतो अखंडित कौमार्य असले पाहिजे, पुरुषाने कसेही असले तरी हरकत नाही, ही जुनाट नीति पक्षपाती आणि टाकावू आहे." या घटस्फोट स्वातंत्र्याबद्दल समाधान व्यक्त करताना हा अहवाल म्हणतो, "घटस्फोट स्वातंत्र्यामुळे सोव्हिएतमधल्या स्त्रिया दिवसे दिवस धीट, स्वावलंबी आणि प्रेमादरावाचून घंदेवाअिकपणे कोणाही परपुरुषाशी संबंध न ठेवणाऱ्या होत चालल्या अोहेत, ही समाधानकारक गोष्टच प्रत्ययास येते." चौकशी मंडळाने आपला अभिप्राय नोंदविताना म्हटले आहे[६९] "या चौकशीत वस्तुस्थितीची नि गणिताची रुक्ष भाषा सुद्धा आम्हांस हेच स्पष्टपणे सांगती झाली की, कामकरी वर्गातील बहुसंख्य लोक विवाह नि घटस्फोट याच्या प्रकरणी गंभीरपणे नि विचारपूर्वकच वागतात." विशेष शिफारशी व सूचना करतांना हा अहवाल म्हणतो की, घटस्फोट मागावयास एकच जण जेव्हा येतो तेव्हा दुसऱ्या पक्षासही समक्ष बोलावून सर्व चौकशी जनिक अधिकाऱ्यानी केली पाहिजे. या चौकशीत स्त्री गरोदर आहे काय, असल्यास तिच्या जोपासनेची नि अपत्य संगोपणाची काय व्यवस्था केली, या गोष्टीचा शोध घेतला पाहिजे. ही अपत्य संगोपनाची जबाबदारी समानतेने दोघावरही टाकून मगच घटस्फोटाला परवानगी दिली पाहिजे. प्रत्येक स्त्रीपुरुषाला विवाह कायद्याची नि अपत्य संगोपनाच्या दायित्वाची पूर्ण माहिती असणे आणि स्त्रियांना नि मुलांना कोणत्याही प्रकारे वाईट रितीने वागण्याची सक्त बंदी असणे अगदी अवश्य आहे. चौकशी मंडळाने अहवालात केलेल्या ह्या सूचना आहेत. अहवालातील काही घटना नि गणना या अशा आहेत व सावरकर म्हणतात त्या प्रमाणे त्या स्वयंमेव व्यक्तविणाऱ्याच आहेत. रशियात या प्रयोगामुळे माणसाचा अतिमानुष झाला, अमानुष झाला का माणसाचा माणूस राहीला याचे स्पष्ट उत्तर त्यांनी दिलेले नसले तरी, या प्रयोगाने रशियातील माणसाचा 'अपमानुष' झाला नाही, ही गोष्ट तो अहवाल स्वयंमेव व्यक्तवीत असल्यामुळे, सावरकरांचेही तेच मत असले पाहिजे हे उघड आहे.

धाडसाची सुधारणा

या लेखाच्या प्रास्ताविकामध्ये रशियन क्रांतीला जीवनक्रांती म्हणून त्यांनी गौरविले आहे. विवाह स्वातंत्र्याचा हा प्रयोग या जीवनक्रांतीचाच एक भाग आहे. सावरकर म्हणतात, [७०] "विवाहासंबंधातील सुधारणामध्ये सगळ्यात धाडसाची आणि कोणत्याही राष्ट्राने आजवर अशा प्रमाणात प्रयोजून न पाहिलेली सुधारणा म्हणजे 'घटस्फोट स्वातंत्र्य' हीच होती" सुधारणेचा एक प्रयोग म्हणून सावरकर विवाह क्रांतीकडे पाहतात, हे लक्षात घेतले पाहिजे. याही गोष्टीचा प्रयोग, प्रत्यक्ष व अनुभव घेतला पाहिजे व जे निष्कर्ष येतील ते हितकारक असतील तर तेही

स्वीकारायला मनुष्यानी तयार असले पाहिजे, अशी ही प्रखर बुद्धिवादी भूमिका आहे. रशियातील या प्रयोगाकडे पाहण्याची त्यांची दृष्टी हीच आहे. परदेशातील निवडक गोष्टी भारतीयासमोर विचारार्थ ठेवण्याची सावरकरांची एक विशिष्ट पद्धत आहे. मॅझिनीच्या आत्मचरित्राचे त्यांनी केलेले भाषांतर ही एक घटना आहे. केमालपाशाच्या तुर्कस्थानचे यथातथ्य चित्रण करणारा त्यांचा लेख ही दुसरी घटना आहे. रशियाचा आर्थिक वस्तुपाठ, अमेरिकेतील भागवताचे गोकुळ याही घटना अशाच आहेत. हा घटस्फोट स्वातंत्र्य विषयक अहवाल अत्यंत प्रक्षोभक व हिंदुमनाला असह्य होणारा असल्यामुळे याबद्दल कोणताही स्पष्ट उपदेश न करण्याची सावधगिरी त्यांनी बाळगलेली आहे. या विषयात जग कुणीकडे चाललेले आहे, हे भारतीयांना दाखविण्याचा त्यांचा उद्देश स्पष्ट आहे. 'मनुस्मृतीतील महिला' या लेखमालेमध्ये व त्याचा उत्तरार्ध असलेल्या 'प्राचीन यहुदी योषिता' या लेखांमध्ये या रशियन विवाह नीतीचा स्पष्ट उल्लेख आलेला आहे, हे आपण पाहिलेच आहे. ही रशियन नीती नवी नसून आपल्या प्राचीन सत्ययुगातील होय, असे विधान सावरकरांनी केलेले आहे. रशियातील घटस्फोट स्वातंत्र्याचा हा लेख वरील लेखमालेच्या पूर्वार्धाच्या नंतर व उत्तरार्धाच्या अगोदर, त्याच स्त्री मासिकांत आलेला आहे, हा लेख १९३६ च्या फेब्रुवारीच्या अंकात प्रसिद्ध झाला, तर वरील लेखमालेचा उत्तरार्ध लगेच मार्च, एप्रिल व मे च्या अंकात प्रसिद्ध झालेला आहे, ही गोष्टही विचारात घेणे जरुर आहे, असे आम्हास वाटते.

र. धों. कर्वे यांचे कौतुक

रानडे व आगरकरांना समाजकारणातील गुरु मानणाऱ्या सावरकरांना मुलींचे लग्नाचे वय वाढले पाहिजे, अनुरुप वर निवडण्याचे तिला स्वातंत्र्य असले पाहिजे, अिच्छेनुरुप तिला सुलभपणे घटस्फोट मिळाला पाहिजे, असेच वाटत असणार, हे उघड आहे. सावरकर आपल्या नव्या काळाप्रमाणे आपल्या गुरुच्याही पुढे जात होते, हे समजून घेतले पाहिजे. ज्या काळांत सावरकरांनी हे लेख लिहिले, त्याच काळात रघुनाथ धोंडोपंत कर्वे यांचे समाजस्वास्थ हे मासिक रशियातील याच वैवाहिक नीतीचा धुमधडाक्याने प्रचार करत होते. कर्वे यांच्या विचारांचा येथे परिचय करुन देण्याची आम्हाला आवश्यकता वाटत नाही. तथापि त्यांच्या अत्यंत खळबळजनक व क्रांतिकारक ठरलेल्या काही विधानांची येथे ओळख करुन घेणे उचित ठरेल. 'समागम ही सामाजिक बाब नसून संतति नियमनामुळे ती आता वैयक्तिक बाब झाली आहे' असे त्यांचे मत होते. परस्पर संमतीने समागम करण्याचा प्रत्येक स्त्रीपुरुषाला हक्क आहे, असे त्यांचे मत होते. 'स्त्रीचे चारित्र्य तिच्या जननेंद्रियात साठवलेले असते ही कल्पना खोट्या आध्यात्मिक कल्पनावर आधारलेली आहे, असा त्यांचा आरोप होता. विवाह संस्थेला ते 'विवाहाचा पिंजरा' म्हणून संबोधित. त्यांच्या समाजस्वास्थ मासिकावर अर्धनग्न

स्त्रीचे चित्र असे. अश्लिल लिखाणावद्दल त्यांना न्यायालयात शिक्षाही झालेली होती. त्यांचे क्रांतिकारक लेख किर्लोस्कर सारखे पुरोगामी विचारांचे मासिकही छापत नसे. स्त्री पुरुष समानता व स्वातंत्र्य या तत्वावर त्यांचे हे मत आधारलेले आहे, असा त्यांचा दावा होता. आगरकरांचा बुद्धिवादच आम्ही पुढे नेत आहोत, असा त्याचा दावा होता. स्त्री पुरुष संबंधातील जुनी नैतिक मूल्ये उखडून टाकण्याचा प्रचार करणारा हा माणूस होता. रशियानी या प्रकरणी जी क्रांती केली तशीच क्रांती भारतात व्हावी, असे त्यांना वाटे. रशियातील या विवाहक्रांतीची माहिती ते आपल्या मासिकातून वाचकांना देत. जणू हा माणूस रशियातील वैवाहिक नीतिक्रांतीचा भारतीय प्रचारक होता !

अप्रत्यक्ष मदत

सावरकरांनी आपल्या साहित्यात र. धों. कर्वे यांचे नाव कुठेही घेतलेले नाही. मात्र त्यांचे हे विचार रशियन अहवालाच्या निमित्ताने सावरकरांनी लोकासमोर ठेवलेले आहेत. नारायण सदाशिव बापट हे सावरकरांना गुरुवर्य मानतात व रत्नागिरीला ते सावरकरांच्या सहवासात होते. त्यांनी 'स्मृतिपुष्पे' या सावरकरांच्या अत्यंत संक्षेपाने आठवणी लिहल्या आहेत. 'तात्याकडे र. धों. कर्व्याचे 'समाजस्वास्थ' मासिक रत्नागिरीस नियमित येत असे.' अशी माहिती त्यांनी सांगितली आहे. 'समाजस्वास्थ' मधील विचारांच्या संदर्भातच र. धों. कर्वे यांना अप्रत्यक्ष थोडीशी मदत करण्यासाठीच त्यांनी हा लेख लिहिला असावा, असा तर्क करता येतो, व या तर्काला पुरेसा आधार आहे.

नारायण बापटांनी या विचारासंबंधी आणखी काही माहिती दिली आहे. रघुनाथरावांचे वडील महर्षी धोंडो केशव कर्वे हे रत्नागिरीला सावरकरांना भेटण्यासाठी गेले होते. या भेटी संबंधांत बापट लिहितात,[७१] ' त्यानंतर जणू काय भेटीचा समारोप करताना तात्या अण्णाला म्हणाले, 'तुमचे थोरले चिरंजीव अतिशय महत्वाचे कार्य करीत आहेत.' तेव्हा अण्णा म्हणाले, 'पण तो करतो ते कार्य लोकांना पटेल तेव्हा ना ? ' त्यावेळेस तात्यानी जे उद्गार काढले ते खरोखरच एक प्रकारे त्यांच्या द्रष्टेपणाचा पुरावाच होता. ते अशा आशयाचे म्हणाले, " तुमचे कार्य लोकांना आरंभी पटत नव्हते. तुम्हाला फार त्रास झाला. पंचेवीस वर्षांनी ते लोकांना पटले. तसेच तुमच्या चिरंजीवाचे कार्यही पंचवीस वर्षांनी लोकांना पटेल. " ही आठवण सांगून बापट पुढे म्हणतात,[७१] " आज उभ्या राष्ट्रासमोर कुटुंबनियोजन म्हणजेच संततिनियमन हे सद्ध्येय म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. स्त्रीपुरुष संबंधाविषयीही तात्यांची काही मते अतिशय पुरोगामी किंवा धाडसी होती आणि ती कै. र. धों. कर्व्यांच्या मताशी जुळणारी होती. परंतु ती मांडण्याला अनुकूल काळ त्या वेळी नव्हता. आणि जी कार्य स्वीकारली होती ती सांभाळून अितर क्षेत्रांतील सर्वच मते पसरविण्यास त्यांना फुरसत नव्हती.

'मांसाहार रुचेल व पचेल तर करावा' असे नुसते आहारासंबंधी पुरोगामी मत मांडल्यावर, सावरकरांना मानणाऱ्या कै. श्री. म. माटे वगैरे सारख्या व्यक्तींनी जो गहजब त्यांच्याविरुद्ध माजविला तो लक्षात घेता वरील सारख्या नाजुक विषयासारख्या विषयात आपली मते मांडत बसणे त्याना अशक्यप्रायच होते." या मताचा सावरकर प्रचार का करत नसत, याचे हे कारण सांगून त्यांचे प्रत्यक्ष मत काय होते हे सांगताना बापट पुढे म्हणतात,[७२] "संतति नियमनाच्या कार्याला तात्या उघडपणे पाठिंबा देत. आमच्यासारख्या अगदी निकटवर्तियाशी बोलतांना तात्या म्हणत, 'दोन निरोगी स्त्री पुरुषानी संभोग करायला हरकत नाही.' बापटांनी अत्यंत भीतभीत व अगदीच त्रोटकपणे ही माहिती दिली आहे. स्मृतिपुष्पाच्या पहिल्या आवृत्तीत (१९७९) ही माहिती त्यांनी या भीतीमुळेच दिली नव्हती असे तेच म्हणतात. दररोजच्या सहवासातील निकटवर्तियाची ही माहिती फारच महत्वाची आहे, असे आम्हास वाटते. रशियातील घटस्फोट स्वातंत्र्यावर लेख लिहिण्याच्या हेतूचा उलगडा नि सुसगती, ही वरील आठवण एक वस्तुस्थिती म्हणून मान्य केल्यानंतर आपणाला सहजपणे लावता येते.

अन्वयार्थ

स्त्री पुरुष संबंधातील सावरकरांची भूमिका आम्ही येथे मांडली आहे, ती विवेकाने व सावधगिरीने समजून घेतली पाहिजे. रशियन विवाहक्रांतीनंतरचे असो की, र. धों. कर्वे यांचे असो, कोणतेही या संबंधातील विचार आपल्या समाजाने तात्काळ स्वीकारले पाहिजेत, असे सावरकरांनी कुठेही म्हटलेले नाही. विवाहसंस्था व कुटुंबसंस्था हा हिंदुसमाजाचा पाया व मूलाधारच आहे. प्राप्तपरिस्थितीत आपल्या राष्ट्रापुरतेच आपण संकुचित झालो पाहिजे, असे सांगणारा हा व्यावहारिक हिंदुनेता स्त्रीपुरुषाच्या असल्या समता व स्वातंत्र्याचा पुरस्कार व प्रचार करण्याची शक्यता नव्हती. नारायण बापटांनी आपल्या आठवणीत यासाठी दिलेले कारण अगदी बरोबर आहे. सावरकरांनी जे ध्येय स्वीकारले होते व ज्यासाठीच सर्व शक्ती लावण्याचा निर्णय घेतलेला होता, त्या ध्येयासाठी हे विचार मांडणे गैरसोयीचे होते, हानिकारक होते. सावरकरांच्या उपयुक्ततावादात ही गोष्ट बसणारी नव्हती. असे असताना र. धों. कर्वे यांचे कौतुक करण्याचा, रशियन अहवाल हिंदुपुढे विचारार्थ ठेवण्याचा व यासंबंधातील बापटांनी सांगितलेल्या सावरकरांच्या त्या मतांचा, अन्वयार्थ कसा लावायचा ?

सावरकरांचा नीतिविचार हा बुद्धीवर आधारलेला होता. स्त्रीपुरुषसंबंधातील सध्याचे नीतिविचार हे धर्मशास्त्रावर, परंपरेवर व रुढीवर आधारलेले आहेत. या नीतिविचारांचा पुनर्विचार बुद्धीच्या, उपयुक्ततेच्या व अेकंदर मनुष्यहिताच्या कसोटीवर करायला सावरकर तयार असतात. जीवनातील सर्वच मूल्यांचा पुनर्विचार करायला मनुष्य तयार होवू शकतो, पण स्त्रीपुरुषसंबंधाच्या सध्याच्या नीति-

मूल्याचा पुनर्विचार करायला आपल्या मनाची तयारी नसते, अितका हा नाजुक विषय आहे. हा मुद्दा चर्चेचा सुद्धा होवू द्यायला आपल्या मनाची तयारी नसते. सावरकर हे प्रखर बुद्धिवादी आहेत. याही नीतिमूल्यांचा पुनर्विचार करायला ते तयार आहेत, असा याचा अर्थ आहे. त्यांच्या मनाला या नव्या विवाहविषयक नीतिमूल्यांनी कसलाही धक्का बसत नाही. या नव्या नीतिमूल्यात जर काही हितकारक असेल तर का घेऊ नये, असा प्रश्न त्यांच्या मनात उभा टाकलेला आहे. सध्याच्या करकच्च विवाहसंबंधाच्या पायावरुन उचलून, समाजाची ही भव्य इमारत, मुक्त विवाह नि घटस्फोट स्वातंत्र्याच्या पायावर उभी करण्याची संकल्पना एक प्रयोग म्हणून त्यांना अगदी प्रथमदर्शनीच टाकावू वाटत नाही. असे प्रयोग करणारे लोक मूर्ख आहेत; आमच्या हिंदुचीच वैवाहिक नीतिकल्पना सर्वश्रेष्ठ आहे, 'सनातन' आहे; हे लोक मनुष्याला पशू बनवू पाहत आहेत– अशी टीका सावरकरांनी कधीच केली नाही. कोणताही नवा विचार विचारार्थ घेण्याची सावरकरांची नेहमीच तयारी असते. या नव्या विचाराने मनुष्याचे एकंदरित हित होत असेल व ते प्रत्यक्ष अनुभवाला आले असेल तर, तो विचार स्वीकारायला ते तयार असतात. र. धों कर्व्यांचे कौतुक, रशियन प्रयोगाचे कौतुक हा सावरकरांच्या या भूमिकेचा परिणाम होय.

सावरकरांच्या बुद्धिवादाचा पल्ला कुठपर्यंत गेला होता, हे यावरुन आपल्याला दिसून येते. सगळेच जुने मोडून नवे आणावे, यात बुद्धिवाद नसतो. जुने ते सर्व बुद्धिवादाच्या, उपयुक्ततेच्या कसोटीस लावण्यासाठी लागणाऱ्या मनाच्या तयारीत खरा बुद्धिवाद असतो. स्त्रियांच्या प्रश्नाविषयी सावरकरांनी फारसे लिहिले नाही; त्यांना या प्रश्नाबद्दल चिंताच वाटली नाही, असा आरोप करण्यापूर्वी स्त्रियांच्या संबंधात सावरकरांच्या विचाराची झेप कुठपर्यंत गेली होती, हे पाहून घेणे जरुर आहे. उदात्त विचारांचा जितक्या अधिक वेळा नि जितक्या मोठ्या आवाजात पुनरुच्चार केला जातो, त्यावरुन एखाद्याला उदात्त मूल्ये मान्य होती, हे ठरविणे धोक्याचे असते. तत्वतः उदात्त मूल्ये मान्य असणे ही वेगळी गोष्ट आहे व प्रत्यक्ष व्यवहारात त्या उदात्त मूल्यांना उपयुक्ततेची कसोटी लावून वास्तववादी राहणे, ही गोष्ट वेगळी आहे. सावरकर उठसूठ स्त्री स्वातंत्र्य, स्त्रीपुरुष समानता– असे उदात्त शब्दप्रयोग करत नाहीत म्हणून, त्यांना ती मूल्ये मान्य नव्हती असा निष्कर्ष काढणेप्रमाणेच चूक ठरते. रशियन विवाह विषयक नीती तत्वतः मान्य करायला निघालेले सावरकर स्त्रीविषयी प्रतिगामी होते असे म्हणणे निव्वळ हास्यास्पद आहे. "स्त्रीपुरुष समानताही त्यांना रुचत नव्हती." असे सावरकरांसंबंधी डॉ. य. दि. फडके म्हणतात.[७३] हे त्यांचे म्हणणे कसे खोडसाळ आहे, हे समजून घेण्यासाठी सावरकरांचे हे सारे विचार आम्ही येथे दिले आहेत. स्त्रीपुरुष समान आहेत, या सामाजिक तत्वावर ज्यांचा विश्वास नाही तो रशियाच्या घटस्फोट स्वातंत्र्याचे किंवा र. धों. कर्व्यांचे कौतुक कधीतरी करील

काय, हा साधा विचारही ही संशोधक मंडळी का करत नसावीत असा आमच्या समोरचा प्रश्न आहे.

चूल आणि मूलचा अर्थ

सावरकरांनी एका भाषणामध्ये महिलांना असा उपदेश केला की त्यानी वीरमाता बनावे. त्यांनी आपल्या मुलामुलींना राष्ट्राभिमानी, सुसंस्कृत व चारित्र्यसंपन्न बनवावे. त्यांच्या या भाषणाचे विकृतीकरण करण्यात आले. हे विचार स्त्रियासंबंधी तत्वज्ञान मांडणाऱ्या तत्वज्ञ सावरकरांचे सिद्धांत आहेत असे, मानून सावरकरांना प्रतिगामी ठरविण्यात पुरोगाम्यानी धन्यता मानली. 'तत्वज्ञ सावरकर' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत डॉ. य. दि फडके म्हणतात, [७४] "समाजातील सर्व क्षेत्रात स्त्रियांनी कर्तृत्व गाजवावे, यापेक्षा राष्ट्रहितासाठी स्त्रीने उत्तम संततीचे पालन पोषण करुन वीरमाता बनण्यात धन्यता मानावी, यावर ते अधिक भर देत असत" स्त्री पुरुष सावरकरांना समान वाटत नाहीत याच्या स्पष्टीकरणासाठी हे मत देण्यात आले आहे. सावरकरांना समजून घेतांना आपण किती चुका करतो, याचे हे एक उत्तम उदाहरण आहे.

मुख्य चूक ही आहे की, एखाद्या विषयाचे तात्विक असे मूलगामी विवेचन सावरकर करत आहेत, असे समजून आपण त्यांच्या प्रत्येक विचाराकडे पाहतो. स्त्रियांना त्यांनी वीरमाता बनण्याचा जो सूत्रमय उपदेश केला. याकडे आपण याच भूमिकेतून पाहण्याची चूक करतो. आज राष्ट्राकरिता स्त्रियांना काय करता येईल, याचे उत्तर सावरकर देत आहेत. माता बनणाऱ्या प्रत्येक स्त्रीला हे कर्तव्य करता येण्यासारखे आहे. हे कर्तव्य केल्यानंतर अितर कांहीही करु नका, असे ते सांगत नाहीत. या शिवाय बाकी कर्तव्य करायचे तर ते त्या स्त्रीच्या वैयक्तिक गुणवत्तेवर अवलंबून राहील. अशी गुणवत्ता स्त्रियांत नसते, असे सावरकरांनी कुठेही म्हटले नाही. सर्वसामान्य स्त्रियांना लागू होणारा हा सर्वसामान्य उपदेश आहे, हे आपण समजूनच घेत नाही. १९५३ मध्ये पुण्याच्या महिला सभेत भाषण करतांना सावरकर म्हणाले, [७५] "निसर्गतःच स्त्रीकडे आलेले चूल आणि मूल पाहण्याचे काम करण्यात तिचे निम्मे राष्ट्रीय कर्तव्य येते. अुरलेल्या निम्म्या कर्तव्यात समाजाच्या नि देशाच्या सेवेचा अंतर्भाव होतो." ज्या वेळेस सावरकर असा उपदेश करतात त्यावेळेस स्त्रियांची समाजात जी शैक्षणिक व सामाजिक अवस्था आहे, ती ते गृहीत धरतात. आजच्या या वास्तव स्थितीतील स्त्रियांना राष्ट्राकरिता काय करता येईल, या भूमिकेतून केलेला हा उपदेश आहे, हे आपण नीट समजून घेतले पाहिजे. भारतीय स्त्रियात अशिक्षितपणाचे प्रमाण प्रचंड; स्त्रियांविषयीच्या भूमिकेत कितीही फरक पडलेला असला तरी तिची समाजातील अवस्था मागासलेलीच; अशा स्थितीत स्त्रियांना राष्ट्र कर्तव्याचा कोणता उपदेश करायचा? सावरकरांनी केलेला हा उपदेश तात्विक पातळीवरचा नसून प्रत्यक्ष

कार्य करण्यासंबंधीचा आहे; या उपदेशाचा संबंध तत्वाशी नसून वास्तवाशी आहे, हे आपण समजून घेणार नाही काय ? नुसताच हवेतील तात्विक उपदेश सावरकर करत नाहीत, हे त्यांचे वैशिष्टच आपण समजून घेतले पाहिजे.

हे निम्मे राष्ट्रीय कर्तव्य

जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात स्त्रियांनी पुरुषासारखेच कर्तृत्व गाजवावे, या गोष्टीला सावरकरांचा कधीही तात्विक विरोध नव्हता. प्रत्येक स्त्रीला व्यवहारतः हे शक्य होणार नाही, ही वस्तुस्थिती त्यांच्या नजरेसमोर होती. समाजाची नि देशाची सेवा ही या 'चूल आणि मूल' कर्तव्यापेक्षाही वेगळी आहे, हे त्यांनीच स्पष्टपणे सांगितले आहे. हे फक्त निम्मेच राष्ट्रीय कर्तव्य झाले. सावरकरांच्या 'वीरमाता' च्या किंवा 'चूल आणि मूल' च्या उपदेशाचा खरा अर्थच आपण समजूनच घेत नाही. हा उपदेश बहुशः सर्वच स्त्रियांकरिता दृढभाजकासारखा समानतेने लागू आहे. चूल आणि मूलचा संबंध येत नाही अशा अपवादात्मक स्त्रिया आपण सोडून देवू. ज्या देशातील ९० टक्के स्त्रियांनी शाळेचे तोंडच पाहिले नाही; उरलेल्या स्त्रियांपैकी १ टक्कापेक्षा अधिक उच्च विद्या विभूषित नाहीत, त्या देशातील या अशिक्षित व अल्पशिक्षित स्त्रियांना राष्ट्रीय कर्तव्याचा कोणता उपदेश करावयाचा, याचा आपणही एकदा विचार केला पाहिजे. सावरकरांचा उपदेश हा या नव्वद टक्केकरिता आहे. नव्वद टक्केकरिता उपदेश केला म्हणून नव्वद टक्यानी नव्वद टक्केच राहावे, असा विपरित अर्थ काढणे बुद्धिवाद्याचे लक्षण नाही. समाजाच्या नि देशाच्या सेवेचा निम्मा राष्ट्रीय कर्तव्याचा वाटा प्रत्येक स्त्रीने आपापल्या शक्तीनुसार व कुवतीनुसार उचलायचा आहे, असे सावरकरांचे म्हणणे आहे, हे आपण समजून घेणार नाही काय ?

स्त्री जीवनाचे ध्येय

दादरला भगिनी समाजात १९५० मध्ये सावरकरांनी 'स्त्री जीवनाचे ध्येय' या विषयावर व्याख्यान दिले. भारतीय घटनेने स्त्री पुरुषांना समानता दिली, स्त्रियांनी घरातच बसावे का बाहेर पडावे हा वादही आता जुना झाला आहे, अशी त्यांनी आपल्या व्याख्यानाची सुरुवात केली. स्त्री आणि पुरुष समान असतील तर मग त्यांचे जीवनाचे ध्येयही एकच आहे काय, असा मूलभूत प्रश्न त्यांनी उपस्थित केला. 'स्वतःचे हित डावलून समाजाच्या किंवा राष्ट्राच्या हिताची इच्छा करणे, हे मनुष्याचे ध्येय.' अशी त्यांनी ध्येयाची व्याख्या केली. स्त्री ही पुरुषापेक्षा जितक्या बाबतीत निसर्गतः भिन्न आहे, तितक्या बाबतीत व प्रमाणात त्यांच्या ध्येयात भिन्नता येणारच, असे ते म्हणाले. स्त्रियांच्या ध्येयाची मर्यादा निसर्गानेच ठरवून दिली आहे, स्त्रियाकडे निसर्गाने प्रजोत्पादनाचे काम दिलेले आहे, असे सावरकर म्हणतात.

आपल्या या म्हणण्याचे स्पष्टीकरण करताना सावरकर पुढे म्हणाले,[७६] "मी असे बोलताच तुम्हाला असे वाटले असेल की, आलं त्यांचे चूल-मूल; पण स्वहिताशी ते आवश्यक असल्याने येणारच. त्यावाचून तुम्ही जगून दाखवा असे माझे तुम्हाला आव्हान आहे. ज्या वेळी मी चूल आणि मूल असा उल्लेख करतो, त्यावेळी मी चूलच आणि मूलच असे म्हणत नाही. तसे म्हणणे सर्वस्वी चुकीचे आहे. निसर्गाने... प्रजोत्पादनाचे कार्य पुरुषाकडे न देता केवळ स्त्रियांकडे सोपविले आहे. त्या दृष्टीने स्त्रियांच्या मनाची, भावनेची व शरीराची रचना होत असते. राष्ट्रहितासाठी दुःख सोसून झटणे हे ध्येय मी सांगितले. त्याप्रमाणे राष्ट्रसेवा हे ध्येय ठरले." आणि पुढे राष्ट्र म्हणजे काय याचा ते खुलासा करतात. राष्ट्र म्हणजे राष्ट्रातील लोक, असा अर्थ ते घेतात. आपल्या मुलाबाळाची काळजी करणे, सेवा करणे, ही राष्ट्रसेवाच आहे, असे ते समजून सांगतात. हे कार्य फक्त स्त्रीच करु शकते म्हणून ते दायित्व तिने पार पाडले पाहिजे. हेच तिचे पहिले राष्ट्र कार्य आहे. राष्ट्राच्या दृष्टीने हेच तिचे पहिले ध्येय आहे. संतती हेच राष्ट्र असल्यामुळे पहिली राष्ट्राची सेवा आपल्या घरीच होते, असे सावरकर म्हणतात. राष्ट्रसेवेसाठी संतती नको ही भूमिका चूक आहे, असे ते म्हणतात.

शिक्षण पद्धती

हे स्त्रियांचे दुःख कमी व्हावे म्हणून नलिका-बालाचा म्हणजे यांत्रिक मुले बनविण्याचा प्रयोग केला जावू शकतो. एरवी विज्ञानाचे स्वागत करणाऱ्या सावरकरांना हा प्रयोग मोठ्या प्रमाणावर अंमलात आला तर माया, वात्सल्य व ममताच शिल्लक उरणार नाही, राष्ट्रही शिल्लक राहणार नाही, नि जगाचा चुराडा उडाल्याशिवाय राहणार नाही अशी भीति वाटते. स्त्रियांचे हे दुःख कमी व्हावे म्हणून रशियात स्टॅलिनचे मुलांच्या संगोपनाची सोय राष्ट्रीय संगोपन गृहात केली होती, मात्र पाच वर्षाच्या काळात ही सर्व राष्ट्रीय संगोपनगृहे बंद करुन टाकली. एवढेच करुन तो थांबला नाही. विशिष्ट वयात मुलामुलींची वाढ विशिष्ट पद्धतीने होत असते, हे लक्षात घेऊन त्यानी प्राथमिक शिक्षणानंतर सह-शिक्षणाला रशियात बंदी करुन टाकली. ही सारी माहिती देवून सावरकर म्हणतात,[७७] "मी या विषयात स्टॅलिनपेक्षा जरा प्रागतिक आहे. महाविद्यालया-पर्यंत सहशिक्षण घेतले तरी चालेल असे मला वाटते." सावरकरांची ही भूमिका काळजीपूर्वक समजून घेतली पाहिजे. मुलींना शिक्षणच नको व दिल्यास ते सह-शिक्षण नको असे म्हणणाऱ्या सनातन्यांच्या आणि सावरकरांच्या भूमिकेत मुलभूत फरक आहे. सावरकर या गोष्टीचा शास्त्रीय भूमिकेतून विचार करतात. असे शिक्षण घेण्याची पात्रता मुलीत नाही वा अशा सहशिक्षणाने मुली बिघडतात, ही सनातन्याची भूमिका सावरकर घेत नाहीत. शरीरविज्ञान व मानसशास्त्र या भूमिकेतून स्त्रियांच्या विकास स्वतंत्र पद्धतीच्या शिक्षणाने होईल, असे सावरकरांना

वाटत होते. दोघांचे शिक्षण काही मर्यादेनंतर वेगवेगळ्या प्रकारची असावीत, अशी त्यांची भूमिका होती.

या सर्वसामान्य धोरणाला सावरकरांनी अपवाद सांगून ठेवले आहेत. ज्या स्त्रियांची उपजत बुद्धीच, गती व आवडच आहे, त्यांचा या धोरणातून सावरकर अपवाद करतात. ते म्हणतात, [७८] " ज्यांना अेवढी उपजत बुद्धी लाभलेली असते त्यांना मूल झाले किंवा नाही यापेक्षा त्यांनी गणित शास्त्रात काय प्रगति केली व मानवावर उपकार केले, हे अधिक महत्वाचे आहे." सर्वसाधारण स्त्रियांना पुरुषासारखेच सर्व शिक्षण द्यावे काय, हा प्रश्न नेहमीच वादाचा राहिलेला आहे. आपल्या भारतात आज जी दोघांनांही सारखेच शिक्षण देणारी शिक्षणपद्धती आहे, ती स्त्रियांच्या व्यक्तिगत व राष्ट्रीय विकासाकरिता उपयुक्त आहे का, असा प्रश्न उपस्थित करण्याअगोदर, ही शिक्षणपद्धती पुरुषाच्या विकासाकरिता तरी उपयुक्त आहे का, हा प्रश्न उपस्थित केला पाहिजे. सध्याची सावरकरांच्या काळापासून चालत आलेली ही शिक्षणपद्धती आजच्या परिस्थितीत कालबाह्य झालेली आहे, अशी नुसतीच टीका केली जाते व मेकॉलेचा उद्धार केला जातो. पण या शिक्षणात राष्ट्रीय दृष्टीने बदल करण्याचे आपल्याला अजूनही जमलेले नाही. या संदर्भात ही चालू शिक्षणपद्धती स्त्रियांच्या हिताची नाही, हा सावरकरांचा आक्षेप विचार करण्यासारखा आहे.

आगरकरांनी स्त्रीपुरुषांना एकाच प्रकारचे नि तेही एकत्रच शिक्षण देण्याचा आग्रह धरलेला होता. या आग्रहाच्या पाठीमागे स्त्री ही पुरुषाच्या समान आहे का नाही, हा मुख्य वाद होता. त्या वेळेसचा तो ज्वलंत प्रश्न होता. सावरकरांवरील विचाराला या वादाचा संदर्भ नाही. सावरकरांची ही स्वतंत्र शिक्षण देण्याची भूमिका चुकीची असो की बरोबर, पण ही भूमिका स्त्रीला पुरुषापेक्षा कमी लेखण्याच्या कल्पनेवर अजिबात आधारित नाही, हे समजून घेतले पाहिजे. या भूमिकेवरुन त्यांना स्त्रीपुरुष समानता रुचत नव्हती, असा अर्थ काढला जावू शकत नाही, हे समजून घेतले पाहिजे.

म. कर्वे यांची भूमिका

स्त्री शिक्षणाचे महर्षी म्हणून आपण ज्यांना गौरवितो त्या धोंडो केशव कर्वे यांचे स्त्रीशिक्षणविषयक धोरण सावरकरांसारखेच होते, हे जाता जाता आम्हाला नमूद करावे वाटते. १९०७ च्या महिला महाविद्यालयाच्या उद्देशपत्रात पुढील उद्देश दिलेला आहे. [७९] "गृहिणीपदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या शिक्षणाच्या योगाने मनावर पूर्णपणे ठसतील, व ज्याच्या योगाने समाजविषयक कर्तव्याविषयी चांगली ओळख होऊ शकेल, असे शिक्षण देवून आपल्या समाजात कांही सुशिक्षित स्त्रिया तयार करण्याचा यत्न करणे."आपल्या आत्मवृत्तात त्यांनी जपानच्या महिला विद्यापिठाचाही उद्देश आपल्याला साहाय्यभूत म्हणून दिलेला आहे. तो उद्देश असा:

" महिला विद्यापीठ स्थापन करण्याचा आमचा हेतू अमेरिका वा युरोपमधील स्त्रियांच्या उच्चशिक्षण संस्थेची नक्कल करण्याचा नाही वा याच देशातील पुरुषाच्या विद्यापीठाशी स्पर्धाही करण्याचा नाही. आमचा हेतू सध्याच्या महिलाच्या मानसिक व शारिरीक स्थितीला सुसंगत ठरेल अशा पद्धतीने अभ्यासक्रम तयार करणे व महिलाची पातळी उंचावण्याचा प्रयत्न करणे हा आहे." या उद्देशपत्रात पुढे म्हटले आहे, [८०] " आमचा हेतू हा की, स्त्रियांना जे शिक्षण द्यावयाचे त्यामुळे त्यांना आपण जपानी साम्राजाच्या घटक असून कोणतेही कार्य करण्याऱ्या स्वतंत्र अशा व्यक्ति आहोत, ही जाणीव व्हावी व स्वतःच्या कर्तव्याची ओळख त्यांना पटून पत्नी व माता म्हणून त्यांनी केलेल्या सेवेला अधिक व्यापक अर्थ येवून ती पूर्वापेक्षा अधिक परिणामकारक व्हावी." हा उद्देश महर्षींना मंजूर आहे.

स्त्री आणि पुरुषामध्ये निसर्गतः कसा भेद आहे व म्हणून त्यांच्या विकासाकरिता स्वतंत्र शिक्षणक्रम कसा आवश्यक आहे, हे त्यांनी अनेक शास्त्रज्ञांची मते उधृत करुन सांगितले आहे. ते म्हणतात, [८१] " डॉ. जे. डब्ल्यू. हॉर्म्स यांनी यौवनावस्था व शरीरातील अंतर्रस या विषयाचा (विशेषतः वाहिनीरहित ग्रंथीचा) विषय अभ्यास करुन जो निष्कर्ष काढला आहे आणि जो त्याच विषयाचा अभ्यास करणाऱ्या इतर शास्त्रज्ञांनाही मान्य आहे, तो असा की, मुलगे व मुली यांच्या वाढीचे नियम अगदी भिन्न असल्यामुळे आपण आपल्या शिक्षणपद्धतीची पुनर्घटना करुन ती मानसशास्त्रातील सिद्धांतांशी सुसंगत केली पाहिजे. पुरुषासाठी म्हणून सुरु केलेल्या परीक्षासाठी मुलींना तयारी करावयास लावणे हे अगदी अयोग्य आहे. कारण अशा शिक्षणाने भलत्याच वयात मुलीच्या मज्यातंतूवर ताण पडणे अपरिहार्य होते. पुरुषी शिक्षणपद्धतीत मुलींना लोटून देणे हे क्रूरपणाचे आहे, कारण उभयतांचे मुलभूत असे मानसिक भेद आहेत...'ते पुढे म्हणतात की, "उच्च शिक्षणाची प्रचलित पद्धती व तीत असलेल्या परीक्षा वगैरेची योजना पुरुषाच्या गरजा व त्यांच्या वाढीचे विशिष्ट काल यांना अनुरुप होअील, अशा रितीने केलेली नसून, ती मुलींच्या दृष्टीने सर्वस्वी अयोग्य आहे, आणि म्हणून राष्ट्रीय आरोग्य आणि लोकसंख्येचा अर्धा भाग जो स्त्रिया यांचे सुखकल्याण लक्षात घेता मुलींकरिता स्वतंत्र व त्यांच्या विशिष्ट मनोरचनेला अनुरुप अशा शिक्षणपद्धतीची योजना तयार करणे हे त्यांच्या मते (शास्त्रज्ञांच्या) आवश्यक आहे." या विषयावरील काही वैज्ञानिक ग्रंथाचा उल्लेख महर्षींनी केलेला आहे. ' जपानमधील स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीचे १२ वर्षाचे अिंग्रजी भाषेतील अितिवृत्त वाचून आपल्या देशात अशी संस्था असावी असे मनात आले. ' असे त्यांनीच म्हटले आहे.[८२]

१९१५ च्या राष्ट्रीय सामाजिक परिषदेच्या अध्यक्षीय भाषणात ते म्हणाले, [८३] " सामान्य बुद्धीच्या स्त्रियांनी पुरुषांच्या युनिव्हर्सिटीकडे वळणे हे मात्र आत्मघातकीपणाचे आहे, असे म्हटल्यावाचून राहवत नाही." महर्षी कर्वे यांची जी

भूमिका होती तीच सावरकरांची होती, हे समजून घेतले पाहिजे. महर्षींचे व त्यांच्या महिलाविद्यापीठाचे त्यांनी मुक्तकंठाने कौतुक केलेले आहे. सावरकरांचे हे विचार कसे योग्य आहेत यासाठी आम्ही हे आधार देत नसून, स्त्रीपुरुष समानता मानणारे सुद्धा त्यांचा शिक्षणक्रम वेगळा असावा अशी भूमिका घेवू शकतात, हे लक्षात यावे या हेतूने होय. आगरकरांनी सुद्धा आपली भूमिका प्राथमिक शिक्षणापुरतीच मर्यादित ठेवलेली आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. स्त्रियास वरिष्ठ प्रतीचे शिक्षण द्यावे किंवा नाही? याबद्दल ते म्हणतात, "या निबंधाच्या आरंभी म्हटल्याप्रमाणे हिंदु स्त्रियास वरिष्ठ शिक्षणाची द्वारे खुली असावी की नाही या प्रश्नाच्या चर्चेत आज विशेष वेळ दडवणे म्हणजे थोडासा दुरुपयोग करण्यासारखे आहे." [८४] सावरकरांना अशी द्वारे खुली असावीत, मात्र शिक्षणक्रम स्वतंत्र असावा असे वाटते. सावरकर असे का म्हणतात हे आपण नीट समजून घेतले पाहिजे. अशी भूमिका घेणे बुद्धिवादाच्या विरोधी नाही, असे आम्हास वाटते.

महात्मा गांधीही

महात्मा गांधीजींची भूमिकाही यापेक्षा वेगळी नव्हती. मुंबईच्या भगिनी समाजात १९१८ मध्ये 'स्त्रियांची उन्नती' या विषयावर भाषण करतांना महात्माजी म्हणाले, [८५] "पुरुषाप्रमाणेच स्त्रियांनाही शिक्षण देणे आवश्यक आहे. याचा अर्थ दोघाच्या शिक्षणपद्धती सारख्याच राहाव्यात असा नाही... दर्जामध्ये स्त्री पुरुष समान (Equal) असले तरी ते सारखे (Identical) नाहीत... स्त्रियांच्या शिक्षणाची योजना तयार करतांना हे मुख्य तत्व सतत लक्षात ठेवले पाहिजे..... उलटपक्षी गृहजीवन हेच स्त्रीचे जीवनक्षेत्र आहे, म्हणून गृहजीवनाबद्दल, मुलांच्या शिक्षणाविषयी व उत्तम संस्काराविषयी स्त्रियांना अधिक ज्ञान असले पाहिजे. याचा अर्थ ज्ञानाच्या स्त्रीपुरुषाकरिता चिरेबंद वाटण्या कराव्यात असा नाही..... परंतु स्त्री पुरुषातील ही भिन्नता लक्षात घेऊन त्या मूळतत्वावर शिक्षणक्रम आखल्याविना स्त्री वा पुरुषाच्या जीवनाचा संपूर्ण विकास होऊच शकणार नाही." गांधीजींची ही भूमिका जशी आपण समजून घेतो, तशी सावरकरांचीही घेतली पाहिजे, असे आम्हास वाटते.

प्रत्यक्ष आचरण

सावरकरांच्या या उपदेशाच्या अर्थाचा प्रश्न बाजूला ठेवून स्त्रियांच्या संबंधात ते जीवनात प्रत्यक्ष कसे वागले, हे पाहिले तर काय दिसते? सावरकरांनी कित्येक स्त्रियांना प्रत्यक्ष सामाजिक आणि राजकीय कार्याला लावून दिलेले होते. अस्पृश्यता निवारण्याच्या कार्यासाठी हळदी कुंकुवाचे कार्यक्रम घेत महिलाच फिरत होत्या. सावरकरांच्या पत्नी माई या कामी अग्रभागी होत्या. हिंदु संघटनाच्या कामाला सावरकरांनी हिंदू स्त्रियांना जुंपले नव्हते काय? हिंदु सभेची

एक महिला शाखा होती. हिंदू स्त्रियांना सावरकरांनी राजकीय कार्यालाही जुंपून दिले होते. या साऱ्या कार्यांचा सविस्तर तपशील देण्याची आम्हाला गरज वाटत नाही. सावरकर जीवनात स्त्रियांशी कसे वागले, हे आपण विचारात घेणार नाही काय ? याही गोष्टी तपशीलाने येथे मांडल्याच पाहिजेत काय ?

तीन थोर स्त्रिया

सावरकरांनी एक लेख लिहून तीन प्रकारच्या स्त्रियांचे आदर्श भारतीयासमोर ठेवले आहेत. 'जगातील आजच्या थोर स्त्रियांपैकी तीन' म्हणून चीनच्या सौ. चंग, इटालीच्या सौ. मुसोलिनी व ॲबिसीनीयाच्या सम्राज्ञी, या तीन स्त्रियांची ओळख त्यांनी भारतीयांना हेतूतःच करुन दिली आहे. या लेखाचे जे प्रास्ताविक त्यांनी लिहिले आहे, ते अत्यंत बोलके आहे. थोर स्त्री म्हणजे कोणती, असा प्रश्न ते उभा करतात. जी 'स्वतःच एखाद्या महत्वाने वा गुणाने थोरपणा पावलेली आहे' ती स्त्री थोर होय, हा एक अर्थ ते देतात. तसेच थोर पुरुषाची पत्नी म्हणजे थोर स्त्री असाही याचा दुसरा अर्थ ते देतात. शिष्टाचाराप्रमाणे असे अर्थ घेतले जातात. सर्व धर्मामध्ये पुरुषाचे स्त्रीवर स्वामित्व या ना त्या प्रकारे वा प्रमाणात स्थापून स्त्रीवर जो पक्षपाती अन्याय केलेला आहे, याचे स्मरण देवून सावरकर म्हणतात की, " अशा प्रकारचा पक्षपात जरी इतर प्रकरणी होत असला, तरीही या प्रकरणी तरी स्त्रीलाच पुरुषापेक्षा अधिक सवलत शिष्टाचाराने दिलेली आहे. "[८६] त्यांचे म्हणणे असे की, थोर स्त्री म्हणजे थोर पुरुषाची पत्नी या अर्थाने थोरपणाचा जो आयताच सवलतीचा मोठेपणा स्त्रीला मिळतो, तो पुरुषांना मिळत नाही. थोरपुरुष म्हणजे थोर स्त्रीचा पती या अर्थी आयताच मोठेपणाचा लाभ पुरुषांना मात्र शिष्टाचाराप्रमाणे मिळत नाही, अशी सावरकरांची तक्रार आहे. या तक्रारीचा मुख्य आधार, पुरुषापेक्षा स्त्री, पतिपेक्षा पत्नी थोर राहू शकते, यावरचा विश्वास, हा होय, हेही दाखवून दिलेच पाहिजे काय ?

पुरुषविमोचक मंडळ

थोर स्त्रीच्या पतीला तो पती असल्यामुळे थोर होण्याचा स्त्रीसारखाच समान हक्क असला पाहिजे, असे सावरकरांना वाटते. पुरुषाप्रमाणे ज्या सवलती स्त्रियांना मिळत नाहीत, त्या मिळविण्यासाठी ज्याप्रमाणे स्त्री विमोचक मंडळे निघाली आहेत व झटत आहेत, त्याच प्रमाणे थोरपणा संपादन करण्याच्या या सवलतीच्या प्रकरणी पुरुषांना ज्या अन्याय विषमतेने वागविण्यात येते, त्या अन्यायास नाहीसे करण्यासाठी एखादे पुरुषविमोचक मंडळ स्थापावे, अशी सूचना सावरकरांनी केलेली आहे. एवढेच नाही, तर स्त्रीपुरुषांना समान अधिकार मिळावा यासाठी राममोहनसारखे अनेक पुरुष आजवर झटत आले आहेत. त्याच न्यायाने आता या प्रकरणी एखादी स्त्री-मोहन पुढे येईल काय, असा प्रश्न सावरकरांनी विचारला

आहे. स्त्री ही पुरुषापेक्षाही श्रेष्ठ व थोर असू शकते, यावरील अढळ विश्वासाशिवाय असे विचार कुणीही व्यक्त करणार नाही. 'स्त्रीपुरुष समानताही त्यांना रुचत नव्हती' हे डॉ. फडके यांचे मत किती निराधार आहे, हे यावरुनही आपल्या लक्षात येईल.

राजधुरंधर स्त्री

सावरकरांनी वरील ज्या तीन थोर स्त्रियांची ओळख करुन दिली आहे, त्यातील पहिली राजकारण धुरंधर आहे, दुसरी उत्तम अशी गृहिणी आहे व तिसरी निव्वळ धर्मभोळी आहे. या तिन्हीही स्त्रिया तीन देशाच्या राजप्रमुखांच्या पत्नी होत. या स्त्रिया थोरपुरुषांच्या पत्नी या अर्थी थोर आहेतच, पण स्वगुणांनी व कर्तृत्वानी त्या थोर आहेत का नाही, हे वाचकांनीच ठरवावे असे सावरकर म्हणतात. चीनचे सर्वाधिकारी चंग–कै–शेक यांच्या पत्नी सौ. चंग एक अत्यंत बुद्धिमान व राजधुरंधर स्त्री आहेत. आपल्या पतीच्या बरोबरीनेच ते चीनचा राजकारभार करतात. आपल्या पत्नीचे चंग–कै–शेक यांना राजकारणात किती सहकार्य होते, हे सावरकरांनी थोडक्यात दाखवून दिले आहे. सौ. चंगच्या बरोबर त्यांची बहीण सौ. कुंग यांचाही उल्लेख लेखात आला आहे. चंग व कुंग पति-पत्नीचे चीनच्या सरकारात फार वजन होते. " चीनचे राष्ट्रीय सरकार आज ह्या चौकडीत सामावलेले आहे. ह्या अेका कुटुंबात जे संध्याकाळच्या चहाच्या वेळी ठरते, तेच बहुधा उद्या चीनच्या राष्ट्रसभेत ठरते." अशा भाषेत त्यांनी या स्त्रियांचे महत्व वर्णिले आहे. ८७ पतीच्या ' कठीण राजकर्तव्याचा भार वाहताना ती त्यांच्याशी गंभीर राजकारणीय प्रश्न चर्चिताना बहुधा दिवसभर गुंतलेली असते.' असे सौ. चंग विषयी सावरकर म्हणतात. सौ. चंग आपल्या पतीला राजकारभारात कशी मदत करत, याबद्दल सावरकरांनी दिलेली माहिती मुळातून वाचण्यासारखी आहे. ' राज्यातील निरनिराळ्या विभागाकडून आलेली प्रतिवृत्तें, परराष्ट्रीय दूतांच्या भेटी–प्रतिभेटी, शत्रूच्या हालचालीची चर्चा या सर्व कामी सरसेनापतीबरोबर त्यांच्या पत्नी सौ. चंग त्याही गुंतलेल्या असतात... सेनापती चंगचा सारा परराष्ट्रीय पत्र व्यवहार सौभाग्यवती चंग ह्याच वाचतात नि त्याच बहुधा उत्तरे देतात... युरोप नि अमेरिका ह्याच्यातील विचारांशी नि उलाढालीशी चंग यांची ओळख ताजी ठेवण्याचे कामही त्यांच्या पत्नीकडेच असते." एका राजधुरंधर अशा थोर स्त्रीची ओळख भारतीयांना सावरकर करुन देत आहेत, हे समजून घेतले पाहिजे.

सावरकर पुढे लिहितात " सरसेनापतीसह बहुतेक प्रवासात त्यांच्या सचीव विभागाच्या मुख्य समालोचक म्हणून सौभाग्यवती चंग ह्याहि जात असतात, सूचना मिळताच थोड्या मिनिटांच्या आत अेक प्रचंड विमानात सचीव विभागातील फिरत्या कार्यालयासुद्धा ती दोघे झपाझप उडू लागतात. आणि तासा दोन

तासात आज कुठल्या दूरदूरच्या सीमा प्रांतातील सैन्याची पहाणी करताना दिसतात, तर उद्या दुसऱ्या कुठल्या प्रांतातील विद्यालयीन तरुणांना नि सैनिकांना चीन च्या 'नवराष्ट्रसूत्राची' संथा देतांना आढळतात. ही नवराष्ट्रसूत्री सौभाग्यवती चंग हचानी चीनच्या बहुसंख्य जनतेत राष्ट्रीय कर्तव्याची चेतना उत्पन्न करण्यासाठी स्वतः ग्रंथिलेली आहेत." श्री चंग पेक्षाही सौ. चंग हचा राष्ट्रीय कर्तव्यात अधिक थोर आहेत असे हे वर्णन आहे. श्री चंगला परभाषा येत नाही, मात्र सौ. चंग " हचा अमेरिकेत शिकलेल्या, युरोपात वावरलेल्या त्यामुळे सरसेनापती चंग हचाच्या सर्व परराष्ट्रीय कारभारात चंग हे त्यांच्या पत्नीच्याच मुखे बोलत असतात; किंवहुना सेनापती चंग याची सौ. चंग ही अेक वक्तृत्वशील अशी राखीव जिव्हाच आहे." ८८ असे मुक्तकंठानें सावरकर सौ. चंगचे कौतुक करतात. राजकारणासारखा विषयही स्त्रियांना वर्ज्य नाही व याही क्षेत्रात त्या पुरुषापेक्षाही अधिक तेजाने तळपू शकतात, असेच यावरुन सावरकरांना दाखवायचे आहे, हे उघड आहे. चूल नि मूल हेच स्त्रीचे कार्यक्षेत्र आहे, असे मानणाऱ्या व स्त्री–पुरुष समानता न रुचणाऱ्या सावरकरांना राजकारणाच्या विषयातही सर्वाधिकारी चंग कै–शक यांच्यापेक्षा त्यांच्या पत्नी या अधिक श्रेष्ठ व थोर आहेत, हे दाखवून देण्याची काय गरज होती ?

उचलेल तेवढेच कर्तव्य

त्यांनी ओळख करुन दिलेली दुसरी स्त्री म्हणजे अिटलीचे सर्वाधिकारी मुसोलिनी यांची पत्नी होय. राजकारणापासून पूर्णतः पराङमुख असलेली ही स्त्री होय. राजकारणात या स्त्रीला अजिबात रस नाही, एवडेच नाही तर पूर्णतः तिटकारा आहे. या बाबतीत ही स्त्री सौ. चंगचे उलटे टोक आहे. कुटुंबाच्या बाहेर पाअूलही न टाकणारी ही अक्षरशः एक गृहिणी आहे. उभ्या जन्मात तिने कधी प्रधान मंडळात पाय टाकलेला नाही. राजकारणाची कधी चौकशी केली नाही· सार्वजनिक कामात जाण्याची जशी आवड सौ. ना नाही, तशीच मुसोलिनीनेही सौ. ना अशा कामात कधीही गोवलेले नाही. त्यामुळे सौ. मुसोसिनी कधीही राजदूताच्या भोजन समारंभात वा महासभात जात नाहीत. त्या अत्यंत साध्या व संकोची स्वभावाच्या आहेत. यामुळे लोकांना असे वाटे की, मुसोलिनी दांपत्याचे पटत नसावे वा त्यांच्यात काहीतरी वैमनस्य असावे. मुसोलिनी आपल्या पत्नीची हेटाळणी करीत असावेत किंवा कोंडून ठेवत असावेत, किंवा छळ करीत असावेत. या बद्दल सावरकर म्हणतात, " अेखाद्या थोर पुरुषाची स्त्री तिच्यात एखादी सार्वजनिक योग्यता किंवा कर्तृत्व नसल्यामुळे साहजिकच फारशी पुढे येत नाही." ही वस्तुस्थिती लोक लक्षात न घेता उगीचच तर्क करतात असे सावरकरांना वाटते. खरी गोष्ट अशी की, मुसोलिनी दांपत्याना सौ. मुसोलिनीने 'गृहिणीच' राहावे असे वाटत होते. दोघांचीही हीच आवड होती. ही आवड अंगी असलेल्या गुणामुळे

निर्माण झालेली आहे. जे गुण वा कर्तृत्व सौ. मुसोलिनीच्या, की जी पूर्वी एका सामान्य लोहाराची मुलगी होती, अंगीच नाहीत, ते आहेत असे समजून तिच्याकडून मोठमोठचा अपेक्षा करणे अवास्तव होते.

सावरकरांचा अभिप्राय असा :[८९] "राजकारणात प्रभाव पाडण्यासारखे लोक कोणतेही व्यक्तिमत्व अंगी नसतानाही केवळ आपली पत्नी जगापुढे यावी म्हणूनच तिला राजकारणात उठाठेवी करु देणाऱ्या आनंदीबाईसारख्या बाअीलवेडापेक्षा मुसोलिनी व त्यांच्या ह्या सूज्ञ पत्नीचे उचलेल तेच कर्तव्य करीत राहून फुकट किर्तीची हाव न धरणारे, हे निरपेक्षत्व खऱ्या थोरवीचे लक्षण आहे. मुसोलिनीची पत्नी गृहिणी या नात्यानेच खरे खरे थोरपण संपादीत आहे." सामान्य कर्तृत्वाची ही स्त्री एक उत्तम गृहिणी म्हणून सावरकरांनी आपल्या समोर आणली आहे. सर्व स्त्रियांनी सौ. मुसोलिनीसारखेच बनावे, सौ. चंगसारखे बनू नये, असे सावरकर काही म्हणत नाहीत वा सुचवत नाहीत. किंबहुना, सौ. चंग सारख्या राष्ट्राचा कारभार करण्याची गुणवत्ता असणाऱ्या स्त्रियाच त्यांना राष्ट्राकरिता हव्याहव्याशा वाटणार, हे उघड आहे. सौ. चंगसारख्या अलौकिक कर्तृत्वाच्या स्त्रिया त्या त्या राष्ट्राचा अमोल ठेवा असतात. प्रश्न कोणत्या प्रकारच्या स्त्रिया पाहिजेत हा नाही. ज्या स्त्रिया आज भारतात आहेत, त्यांच्याकडून कोणते राष्ट्रकार्य होऊ शकते व ते कसे करुन घ्यावे हा आहे ! सौ. मुसोलिनीसारख्या स्त्रियांचीच संख्या दुर्दैवाने भारतात अधिक आहे. वीरमाता बनावे, मुलांना देशभक्त व चारित्र्यसंपन्न बनवावे, आणि गृहिणी बनावे– हा सावरकरांचा उपदेश स्त्रियांची बौद्धिक कुवत, आवड व अितर गुणवत्ता लक्षात घेवून केलेला आहे, हे समजून घेतले पाहिजे. सौ. चंगसारखीं गुणवत्ता असणाऱ्यांनी सौ. मुसोलिनी बनावे असा सावरकरांच्या या उपदेशाचा अर्थ काढणे म्हणजे निव्वळ अनर्थ आहे.

आत्मनिवेदनच

स्वत: सावरकरांच्या पत्नी समाजसुधारणेचे कार्य करीत असत. महिला हिंदुसभेत भाग घेत असत. तथापि सौ. चंगसारखी सावरकरांना त्यांच्या पत्नीची मदत झालेली नाही. सावरकर पति-पत्नी एकत्र बसून राष्ट्राकरिता कोणते धोरण आखावे, कार्यक्रम आखावेत, नवराष्ट्रसूत्रे कोणती असावीत, हे ठरविलेले आपल्याला दिसणार नाहीत. सौ. मुसोलिनीच्याच वर्गात प्राय: सौ. सावरकर मोडतात, असेच आपल्याला म्हणावे लागेल. स्वत:च्या बरोबर सावरकर आपल्या पत्नीला घेऊन कोणत्याही समारंभाला वा दौऱ्याला जात नसत. सावरकरांच्या या वागण्याला त्यांच्या चूल नि मूलच्या उपदेशाचा एक पुरावा म्हणून समजण्यात आले. आपल्या या वागण्याचे सावरकरांनी सौ. मुसोलिनीच्या निमित्ताने एक स्पष्टीकरण दिलेले आहे, असे आम्हास वाटते. सौ. मुसोलिनी राजकारणात पुढे का आल्या नाहीत किंवा त्यांच्या पतीने त्यांना तसे का आणले नाही, याचे

सावरकरांनी दिलेले कारण एक प्रकारचे आत्मनिवेदन आहे, असे आम्हास वाटते. 'सूज्ञ पत्नीने उचलेल तेच कर्तव्य करीत राहावे' हा सावरकरांचा खरा उपदेश आहे. थोर 'व्यक्तिमत्व अंगी नसतानाही केवळ आपली पत्नी जगापुढे यावी' यासाठी उठाठेव करणे त्यांना पसंत पडले नाही. या त्यांच्या उपदेशाचा अर्थ व्यक्तिमत्व, गुणवत्ता व कर्तृत्व अंगी असताही स्त्रियांनी वीर माता बनण्यात धन्यता मानावी, असेच सावरकरांचे स्त्रीविषयक तत्वज्ञान होते, असेच कुणाला म्हणायचे असेल, तर त्यांचा हात कोण धरु शकणार ?

त्यांनी ओळख करुन दिलेली तिसरी स्त्री ही ॲबिसीनीयाचे सम्राट रास-तफारी यांची सम्राज्ञी, ही अत्यंत धर्मभोळी स्त्री होय. या सम्राज्ञीचा पती वारलेला आहे. तिचे ॲबिसीनिया हे अिटलीचे गुलाम राष्ट्र झाले. ही विगत सम्राज्ञी हे स्वातंत्र्य मिळावे म्हणून देवाची प्रार्थना करण्यात दंगून गेलेली आहे. पॅलेस्टाअिनचे दौरे करत आहे. देवापुढे गाऱ्हाणे मांडत आहे. बस्स. या स्त्रीचे कर्तृत्व अेवढेच आहे. सावरकर म्हणतात, [८९] "उपलब्ध आहे त्या माहितीवरुन ह्या राणीचा जर काही विशेष असेल तर तो तिचा हा बायकी धर्मभोळेपणाच काय तो होय !" या राणीचा कोणताही थोर गुण सावरकरांनी सांगितलेला नाही. धर्मभोळ्या व अंधश्रद्ध असलेल्या असंख्य हिंदु महिलेचे ही स्त्री प्रतिनिधित्व करते. राष्ट्रीयदृष्ट्या स्त्री जशी असू नये तशी ही आहे.

या तीन प्रकारच्या स्त्रिया एकत्रितरित्या लोकांसमोर आणण्याचा सावर-करांचा हेतू कोणता असावा ? प्रत्येक स्त्रीच्या वैयक्तिक गुणवत्तेवरुन तिचे थारपण व कार्यक्षेत्र सावरकर ठरवितात. जुन्या करारात म्हटल्याप्रमाणे संपूर्ण स्त्री जातची जात शापीत व कनिष्ट आहे असे सावरकर मानत नाहीत. किंवा स्त्री जातीचे चूल आणि मूल एवढे नि एवढेच मर्यादित कार्यक्षेत्र आहे, असेही बंधन घालून देत नाहीत. स्त्री ठिकाणी गुणवत्ता व कर्तृत्व असेल तर तिने सौ. चंग सारखे बनावे. तशी गुणवत्ता व कर्तृत्व नसेल तर उत्तमगृहिणी म्हणून जरी तिनें आपली जबाबदारी उचलली तरी सावरकर अशा गृहिणीला तिने आपल्या मर्यादेत राष्ट्रीय कर्तव्य केल्याचे प्रमाण पत्र देण्याला तयार आहेत. मात्र ॲबिसिनीयाच्या सम्राज्ञी प्रमाणे बायकी धर्मभोळे व देवभोळे राहता कामा नये, अशी सावरकरांची अिच्छा आहे. तात्पर्य, पहिली स्त्री व्यक्तिशः व राष्ट्राकरिताही निर्विवादपणे थोर आहे; दुसरी, व्यक्तिशः थोर नसली तरी राष्ट्रीय दृष्टया ती निम्मे कर्तव्य पार पाडीत असल्यामुळे तिचाही थोरपणावर हक्क आहे; तिसरी स्त्री, व्यक्तिशःही थोर नाही नि गुणवत्ता व कुवत नसताना चुकीच्या धर्मभोळचा व देवभोळचा धोरणाचा अवलंब करुन राष्ट्रोद्धार करु पाहणारी निव्वळ भोळसट आहे. त्यामुळे थोर पतीच्या सवलतीच्या लाभापेक्षा अधिक थोरपणावर तिचा हक्क नाही. सावकरांची भूमिका ही अशी आहे.

साहित्यातील स्त्री पात्रे

सावरकरांच्या ललित साहित्यातील स्त्रीपात्रांची त्यांनी केलेली निवड या भूमिकेतून पाहण्यासारखी आहे. त्यांची अनेक स्त्रीपात्रे स्त्रीस्वातंत्र्याविषयी बोलत असतात. संगीत अुःशाप मधील मालिनी एक नुसता पुराणिक आणण्याच्यासंबंधी आपल्या पतीला म्हणते, [९०] "पण पुराणिक नुसता विद्वान असून काही एक भागायचं नाही... संस्कृत श्लोकांचे कर्कश आलाप चवळीत, स्त्रिया पापयोनि आहेत, रत्नें दगड आहेत, सोनं माती आहे आणि भोग रोग आहेत, असं रडगाणं गाणारा पुराणिक कितीही विद्वान असला तरी, तो मला नको आहे... मी त्याच तोंड देखील पाहणार नाही." पतीच्या तोंडावर स्त्रीला हीन लेखणाऱ्या पुराणिकाबद्दल मालिनी असे बोलत आहे. म्हणजे सावरकरच मालिनीच्या तोंडून हे बोलत आहेत. मालिनीला होणारा पुत्र कसा होईल हे सांगताना नारंभट ज्योतिषी सांगतो की,तो फार थोर म्हणजे आपल्या वडिलाहून सवाई निघेल! यावर पतीच्या देखत मालिनी, म्हणते, [९१] " म्हणजे कांहीच नाही! शून्याची सव्वापट म्हणजे शून्यच." सावरकरांची स्त्रीपात्रे अशी निर्भय नि पुरुषाशी बरोबरी करणारी आहेत. याच नाटकातील कमलिनी सावरकरांचे हिंदुत्वाचे नुसतेच विचार मांडत नाही, तर हातात शस्त्र घेवून आपले पावित्र्य हरण करु पाहणाऱ्या बंगषचे ती तुकडे करते. सावरकरांची स्त्रीपात्रे अबला नाहीत, भिणारी नाहीत, स्वतःला पुरुषापेक्षा कमी लेखणारीही नाहीत. पुरुषाप्रमाणेच त्याही शस्त्र परजताना दिसतात. बंगषचा बळी घेवून ही कमलिनी म्हणते, [९२] " पावित्र्य रक्षण आणि धर्मसंगोपन, आमच्या पुरुषांना आणि देवालाही जेव्हा करिता येत नाही, तेव्हा ते एकतर चितोडची चिता करु शकते, नाहीतर ही सूडाची सुरी!" स्त्रियांना सावरकर फक्त चुली–मुलीचे काम देत नसून धर्मरक्षणाचे, समाजसुधारणेचे, राष्ट्ररक्षणाचे, रणांगण गाजविण्याचेही काम देत असतात, हे समजून घेतले पाहिजे.

अुपजत न्यायाधीश

'सन्यस्त खड्ग'मधील वल्लभ–सुलोचनाचा संवाद असाच उद्‌बोधक आहे. स्त्रिया या पुरुषाच्या पायातील बेड्या आहेत, या अर्थाचा एक श्लोक वल्लभ उच्चारतो. या बेड्या नसत्या तर पुरुष लोकोत्तर होतो, असे तो म्हणतो. त्यावर सुलोचना आपल्या या पतीला म्हणते की, जर बुद्धाच्या वडिलांनी ही बेडी तोडून टाकली असती तर लोकोत्तर बुद्धदेवाचा लोकास पत्ता लागला असता का? दुष्ट, दुर्जन, गुन्हेगार, चोर, लुटारु इ. लोकास बेड्या ठोकतात, याचा उल्लेख करुन सुलोचना पुढे म्हणते की, स्त्रिया या बेड्या पुरुषांच्या पायात देवाने ठोकल्या, याअर्थी पुरुष पूर्व जन्मीचे कोणीतरी असेच अट्टल पापीच असले पाहिजेत. असे युक्तिवाद झाल्यानंतर आम्ही बेड्या आहोत, पण कोणत्या अर्थी हे सांगताना सुलोचना म्हणते, [९३] " बेड्या तर बेड्या. आम्ही स्त्रिया ह्या पुरुषाच्या अगणित

रानटी स्वभावाच्या रानटी हत्तीच्या पायातील त्यात माणसाळविणाऱ्या शृंखला आहोत. आम्ही आहोत म्हणून त्यांचे पाय धर्ममार्गावर नीट पडत आहेत. हचा बेडच्या नसत्या ना, तर एखाद्या पिसाळलेल्या सारखे उन्मार्गावर हे पुरुष बेलूट उधळत जाते! — का जिंकलं की नाही? अरे, अरे! शाक्यांच्या सुविख्यात पौरुषशालिन सेनापतीला शेवटी एका स्त्रीनं जिंकलं"[९४] पुढे हीच सुलोचना आपला सिद्धांत मांडताना म्हणते, "प्रत्येक निमित्ताने येता जाता आपल्या वर्तनाची परीक्षा देत बसायला स्त्रिया काही कोणी उपजत अपराधी नाहीत व पुरुष काही उपजत न्यायाधीश नाहीत" सावरकर हे येथे सुलोचनाच्या तोंडून बोलत आहेत, हे उघड आहे. असे विचार असणाऱ्या सावरकरांना स्त्री-पुरुष समानता रुचत नसे, असे आमचे विद्वान संशोधक म्हणतात, हे आश्चर्य नव्हे काय? ही सुलोचना रणांगणात शत्रूबरोबर लढते. शत्रूपक्षाचा युद्धोत्तर अभिप्राय असा :[९५] "या रात्रीच्या घातलेल्या छाप्यात सर्वच शाक्यांनी लढाईची पराकाष्ठा केली खरी; पण त्या सर्वात जर खरे पौरुष कुणी गाजविले असते ते त्या स्त्रीने!" स्त्रियांही पुरुषापेक्षाही अधिक पुरुषार्थ आणि तेही रणांगणावर गाजवू शकतात, यावर सावरकरांचा कसा विश्वास आहे, हे आपल्याला दिसून येते.

बलत्कारितेची पूजा

उत्तरक्रिया नाटकातील सुशिला ही नायिका वीरांगणा आहे. सैन्यात स्त्रियांना शिरता येत नाही, याबद्दल सुशिला नंदिनीला म्हणते, [९६] "स्त्रीस मज्जाव नाही! स्त्री वेषास मज्जाव आहे. मी पुरुष वेष करुन जाईन." संगीत खड्गमधील सुलोचनाही असाच पुरुष वेष करुन लढत असते. पानिपतच्या युद्धात सुनीताला रोहिल्यानी पकडलेले आहे. दहा वर्ष तिला त्यांनी आपल्या अंतःपुरात ठेवलेले आहे. या बलत्कारित स्त्रीचा स्वीकार करण्यास तिचे पती यशवंतराव तयार होतात. अशा स्त्रिया या पापी आहेत असे कुणीही मानत नाही. यासंबंधीची आपली भूमिका सावरकर आपल्या पात्राच्या तोंडून मांडतात. रावणाच्या ताब्यात असलेल्या सीतेचा स्वीकार जसा श्रीरामानी केला तसाच याही स्त्रियांचा स्वीकार केला गेला पाहिजे, अशी सावरकरांची भूमिका आहे. रोहिल्याच्या ताब्यात असलेल्या दुर्गावतीचा स्वीकार करण्यांसाठी सरदाराचे मत साशंक झालेले आहे. सीतेची गोष्ट वेगळी होती, कारण ती निष्कलंक होती, मात्र दुर्गावती तशी राहिलेली नाही, अशी त्याची अडचण आहे. मनाचे व देहाचे दोन्हीचेही पावित्र्य अखंडित राहिले पाहिजे, असे त्यांचे मत आहे. हे मत कसे चुकीचे आहे, हे सांगताना ऋषिकुमाराच्या तोंडून सावरकर म्हणतात,[९७] "दुर्गादेवीच्याही मनाचे पावित्र्य सीतादेवीअितकेच अभ्रष्ट आहे; आणि देहाविषयी विचाराल तर दुर्गा-देवीच्या विटंबनेने ती कमी पवित्र ठरत नसून सीतादेवीची तशी विटंबना न करणारा रावण काय तो अधिक पापभीरु ठरतो." सीतादेवीची अशी विटंबना

झाली असती तरीही ती निष्पाप, पवित्र, आणि पावनच झाली असती, असे सावरकर म्हणतात. पंचवटीपासून लंकेपर्यंत सर्पाच्या विळख्यासारख्या रावणाच्या बाहुपाशात जखडून सीतेला जावे लागते, तेव्हा स्पर्शदेहाने तिचा देह विटाळायचा तो विटाळलेलाच होता. तेव्हा मनाने निष्पाप व पवित्र असणे, हीच अशा प्रकरणी खरी कसोटी मानली पाहिजे, अशी ही उदात्त भूमिका आहे. म्हणून यशवंतराव म्हणतात की, जर त्यांची सुनीता त्यांना मिळाली तर 'देवालयात देवता पूजितात तशी मी तिला आपल्या हृदयाच्या गाभाऱ्यात स्थापून प्रेमाची पूजा बांधिली असती!" [९८] आपण पतित आहोत, भ्रष्ट आहोत असे स्वत: सुनीताही मानत नाही. सावरकरांच्या कल्पनेतील स्त्रियांचे स्थान हे असे आहे.

अशा शास्त्राचा धिक्कार

'काळे पाणी' कादंबरीतील मालतीही अशीच विटंबनेची बळी झालेली आहे. मात्र तिचा प्रियकर किशन तिच्यासाठी शेवटपर्यंत संघर्ष करत असतो. पातिव्रत्याच्या जुन्या नीतिकल्पनांना सावरकरांची ही सारी पात्रे धक्के देत असतात व नव्या बुद्धिवादी भूमिकेतून तिकडे पाहतात. विवाहाच्या संबंधात किशन सावरकरांचीच भूमिका मांडतो. बहीण–भावाच्या लग्नावरून प्रश्न निघाला असता किशन म्हणतो, [९९] "जावऱ्यात नसतील पण माणुसकीच्या कक्षेत बहीण-भावाची लग्नं अगदी कधी झालीच नाहीत, असं मात्र समजू नकोस. मनुष्य समाजाने सर्व प्रकारच्या विवाह प्रकारानाच नव्हे, तर स्वच्छंद संभोगानाही ज्या ज्या परिस्थितीत ते अिष्ट वा अपरिहार्य वाटतील, त्या त्या परिस्थितीत धर्म्य मानलेले आहेत." 'गोमंतक' काव्यातही स्त्रियांच्या भ्रष्टतेसंबंधी असाच विचार आलेला आहे. बलत्कारित स्त्रिया वंशाच्या हिताच्या दृष्टीने भ्रष्ट व टाकावू असतात, या मताचे खंडन करतांना आपल्या स्त्री पात्राच्या तोंडून सावरकर म्हणतात, [१००] "ज्या ज्या स्त्रीला आक्रमक शत्रू पळवून नेवून तिच्यावर बलत्कार करतात ती ती स्त्री भ्रष्ट न मानता तिचे रक्षण करू न शकणारा तिचा पतीच भ्रष्ट समजला पाहिजे ... काय म्हणे कुल अपवित्र होते. हत्याच्यासमोर हत्यांची पत्नी पळविली गेल्यावर ते पुरुष जिवंत घरी परत आले तरी त्यांचे घर अपवित्र होत नाही. समाज त्यांना हेटाळत नाही. परंतु... परक्यानी बलत्काराने नेलेली साध्वी पत्नी परत आली असता तिला घरात घेणे हे पाप आणि ती तशीच शत्रूची शय्यासोबत करत राहिली तर तो मात्र कलंक नाही. धिक्कार असो अशा असल्या शास्त्राचा! थुंका त्यांच्या जीवनावर!" सावरकरांच्या स्त्रिया पुरुषाची अशी निर्भत्सना करणाऱ्या आहेत.

संतती नियमन

सावरकरांना कुटुंब नियोजनाचे महत्व कळाले नाही व कुटुंबनियोजनाच्या

विरोधी होते असा त्यांच्या बद्दलचा एक आक्षेप घेतला जातो. डॉ. य. दि. फडके यांचा आरोप असा, : [१०१] "संततिनियमनाच्या साधनांच्या वाढत्या उपयोगामुळे हिंदूसकट सर्वच स्त्रियांच्या दास्यविमोचनास मदत होते, याकडे त्यांनी लक्ष दिले नाही; कारण हिंदूंचे संख्याबळ कसे वाढेल, याची त्यांना अधिक चिंता वाटत असे." या आरोपाच्या संदर्भात सावरकरांची संततीनियमनाची भूमिका आपण समजून घेवू.

आपण संततिनियमनाचा लोकसंख्या वाढीच्या भूमिकेतून विचार करत असतो. लोकसंख्या वाढीचा विचार आपण आर्थिक भूमिकेतून करतो. सावरकरांचे विचार पाहताना ते संततिनियमनाला विरोध करतात, असे आपल्याला वाटत राहते, ही गोष्ट खरी आहे. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, सावरकरांचा संततिनियमनाला असलेला विरोध या वरील लोकसंख्यावाढीच्या आर्थिक भूमिकेतून नाही. या आर्थिक भूमिकेतून त्यांनी संततिनियमनाकडे पाहिलेच नाही. सावरकरांच्या समोर त्यावेळेस जे स्वातंत्र्याचे ज्वलंत ध्येय होते, त्यामुळे या लोकसंख्यावाढीच्या प्रश्नाचा त्यांनी विचार केलेला नाही, ही वस्तुस्थिती आहे. जेवढ्या गंभीरपणे आपण आज या लोकसंख्यावाढीचा विचार करतो, तेवढा स्वातंत्र्यपूर्वकाळामध्ये केला जात नव्हता. हा प्रश्न लोकशिक्षणामुळे सुटणारा आहे. परकीय सत्तेला असे राष्ट्रहिताचे लोकशिक्षण देण्याची गरज नसते. तेव्हा हा प्रश्न स्वतंत्र भारताचा आहे, अशीच भूमिका घेवून, आपली शक्ती भारत स्वतंत्र कसा करावा, त्यासाठीच सर्व भारतीय नेते लावीत होते. सावरकर या संबंधी जेव्हा विचार मांडत होते, तेव्हा भारताची लोकसंख्या २८ कोटी होती, आताच्यासारखी ७०-८० कोटीच्या घरात गेलेली नव्हती. तेव्हा लोकसंख्यावाढीच्या समस्येवरील उत्तर म्हणून संततिनियमनाकडे सावरकरांनी पाहिलेच नाही व ते का पाहिले नाही, हे समजून घेतले पाहिजे.

हेतूच वेगळा

लोकसंख्येला आळा घालावा म्हणून संततिनियमनाचा त्यांनी जसा विचार केला नाही, तसाच लोकसंख्या वाढावी म्हणूनही त्यांनी संततिनियोजनाला विरोध केलेला नाही, हे लक्षात घेतले पाहिजे. सावरकर संततिनियमनाचा जेव्हा विरोध करतात, तेव्हा ते संततिनियमन म्हणजे सौंदर्याचे संवर्धन व संरक्षण करण्यासाठी मातृत्वाचा त्याग असतो, हे समजून घेतले पाहिजे. 'ललनाच्या लावण्याचे हानिलाभ' या त्यांच्या लेखात त्यांनी संततिनियमनाचा हाच अर्थ घेतलेला आहे.[१०२] स्त्री आपल्या लावण्याच्या संरक्षणासाठी आई होण्याचे नाकारते, याला सावरकर या लेखात संततिनियमन म्हणतात. युरोप ललनाच्या लावण्याचा कसा दास झाला, याचे मर्मभेदक वर्णन सावरकरांची या लेखात केले आहे. 'कित्येक सुंदर स्त्रियांच्या दातांचे, केसांचे, वर्णाचे विभे कित्येक मुख्य प्रधानाच्या विम्याहून

अधिक रकमेचे काढले जात आहेत ! कित्येक लावण्यवती नटीचा पगार कित्येक मुख्य विशपाच्या पगाराहून अधिक असतो. युरोप अमेरिकेत मोठ मोठ्या राजधान्यातून सौंदर्याची स्पर्धा होते... " अशा प्रकारे युरोप लावण्याचा कसा दास झाला आहे, याचे सावरकर वर्णन करतात. हे अमूल्य असे लावण्य जपण्यासाठी वांझपणा पत्करण्यासही लावण्यवती तयार होत आहेत, असे चित्र सावरकरांसमोर आहे. लावण्याच्या मोहासाठी वांझपणा पत्करु नये, हे सांगताना, वांझपणा या अर्थीच्या संततिनियमनाला सावरकर विरोध करतात, हे लक्षात घेतले पाहिजे.

वांझ राहणे पापच !

या लेखात सावरकर म्हणतात, " जी स्त्री स्वतःचे लावण्य झिजू नये म्हणून नुसती नट्टापट्टाच करीत मिरवीत राहते आणि सुरेख संतान प्रसवण्याचे नि जोपासण्याचे आपले जीवन-कर्तव्य तशा राक्षसी हावेने टाळते; ती स्वतः तर वात्सल्याच्या एका अत्यंत मधुर आनंदास आंचवतेच; पण राष्ट्रावरील एक आपत्ती होवून बसते ! आणि म्हणून सावरकर सूत्रमय सिद्धात मांडतात, " संततिनियमन म्हणजे संतत्युच्छेदन नव्हे ! तो आत्मघात तर आहेच आहे; पण राष्ट्रघातही आहे ! अप्पलपोटेपणाची ती परिसीमा होय ! " सावरकरांचा विरोध कोणत्या संततिनियमाला आहे, तो लक्षात घ्या. लावण्य हे 'सोळापासून सव्वीस पर्यंत फुलणारे पावसाळी फूल आहे' असे सांगून सावरकर म्हणतात, " अशा या लोभनीय पण अत्यंत क्षणिक नि नश्वर अशा सौंदर्याच्या नादी लागून साऱ्या जीवनाच्या कल्याणास नि कर्तव्यास मुकण्याची नि हुकण्याची चुकी कोणती विवेकी वनिता करील ? " सावरकरांच्या समोरच्या संततिनियमनाचा संदर्भ लोकसंख्यावाढीचा नसून लावण्याच्या मोहासाठी वांझ राहण्याच्या प्रवृत्तीबद्दलचा आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. लावण्याची जोपासना कराच, पण त्या लावण्याचा उपयोग मनुष्यजातीच्या कल्याणार्थ करावा, असा त्यांचा महिलांना उपदेश आहे. लावण्य हे उत्तम संतती निर्माण होण्यासाठी निसर्गाने दिलेली देणगी होय, असे सावरकरांना वाटते. राष्ट्राचे लावण्य व तारुण्य अमर राहण्यासाठी असले अप्पलपोटे व स्वार्थी संततिनियमन करु नये, असे सावरकरांना वाटते.

या मातृत्वाची बाजू घेताना सावरकर पुढे म्हणतात, " ज्या एका सुंदर मातेच्या सभोवती तिच्या चार सुंदर शोभिवंत सुतसुतांचा मेळावा विलसत, विहरत रमलेला आहे, तिचे लावण्य सफल झाले; जीवन पुन्हा ताजे झाले." सावरकरांचे हे विधान वरील संदर्भात समजून घेतले पाहिजे. हिंदुत्वनिष्ठ सावरकर संततिनियमनाला विरोध करतात, हे दाखवून देण्यासाठी हे विधान पुढे ठेवून एका स्त्रीला चार मुले व्हावीत असे सावरकरांचे मत होते, असा युक्तिवाद केला जाऊ शकतो. या विधानामागील पार्श्वभूमी निःसंतान का संतान, अशा वादाची आहे. येथे प्रश्न 'कुटुंब'नियोजनाचा नसून 'संतति'नियमनाचा आहे. या विधानातील

'चार' शब्द सहज लिहिताना आलेला आहे. 'चार शब्द बोला' किंवा 'चार घास खा' असे बोलताना 'चार' हा शब्द आपण जितक्या सहजपणे वापरतो, तसाच येथे वापरण्यात आलेला आहे, हे समजून घेतले पाहिजे. १९५०मध्ये दादरच्या भगिनी समजतात 'स्त्री जीवनाचे ध्येय' [१०३] या विषयावर सावरकरांनी व्याख्यान दिले. या व्याख्यानातही संततिनियमनाचा जो उल्लेख आला तो वरील अर्थीच होय. सावरकर म्हणाले, "स्त्रियांना गर्भधारणेनंतर ओकाऱ्या वगैरे त्रास होतो, त्यावेळी त्या नको ते मूल असे वैतागाने म्हणतात. पण म्हणून मूल नकोच असे म्हणणे योग्य नव्हे. हे ध्येयाचे शब्द नसून अप्पलपोटेपणाचे आहेत." सावरकर या भाषणात म्हणाले, "उत्कृष्ट संतती निर्माण करण्यासाठी संततिनियमन करण्यास प्रत्यवाय नाही. मी काही संततिनियमनाचा विरुद्ध नाही." तेव्हा येथेही संततिनियमनाचा विचार करताना लोकसंख्या वाढीचा प्रश्न सावरकरांसमोर नाही.

लोकसंख्या वाढीच्या संदर्भातील संततिनियमनाबद्दल या भाषणात सावरकर म्हणाले, "प्राचीन काळी 'कृण्वतोविश्वमार्यम्' ही ध्वजा हाती घेऊन आर्य प्रचाराला निघाले, त्यावेळी त्यांना संततीची आवश्यकता होती. त्यावेळी स्त्रियांना 'अष्टपुत्रा सौभाग्यवती भव' असा आशिर्वाद देण्याची प्रथा पडली. प्रत्येकी स्त्री आठ पुत्रांची माता व्हावी असे म्हणणे योग्य नाही. तरी पण आपण प्रत्येक शिरगणतीचे वेळी राष्ट्राला किती संततीची आवश्यकता आहे हे ठरवावे, व त्या दृष्टीने योजना आखाव्यात." या ठिकाणी सावरकरांनी आपण आज समजतो त्या अर्थाचे कुटुंब नियोजन मान्य केलेलेच आहे, हे स्पष्ट आहे. शासन जसे दरवर्षी राष्ट्रीय खर्चाचे अंदाजपत्रक तयार करते, त्याच प्रमाणे आपल्याला पुढे किती नागरिक हवेत, याचेही अंदाजपत्रक शिरगणतीच्या वेळेश शासनाने तयार करावे व त्या दृष्टीने नियोजन करावे, असे सावरकरांचे म्हणणे आहे. स्वतंत्र भारतातील शासनाने योजना आखून करायच्या या गोष्टी आहेत, अशी सावरकरांची भूमिका होती. व्यक्तिगत स्त्रीच्या बाबतीत केवळ त्रास नको किंवा लावण्य जपायचे आहे, या कारणास्तव संतानच नको, या अर्थीचे संततिनियमन त्यांना मान्य नव्हते. एकंदर राष्ट्राचा बाबतीत लोकसंख्येचे गरजेनुसार नियोजन करावे, या अर्थीचे कुटुंबनियोजन त्यांना मान्य होते, हे समजून घेतले पाहिजे.

"निदान एक मूल होऔपर्यंत तरी स्त्रियांनी संततिनियमन करु नये," अशी सावरकरांची अपेक्षा होती. राष्ट्रीय लोकसंख्या नियोजनाची अडचण येत नसेल तर सुदृढ व सुंदर स्त्रियांनी संततिनियमन करु नये असे त्यांना वाटे. '२७–२८ वर्षाची प्रौढ स्त्री कडेवर एक मूल व ५ वर्षाचे एक गुटगुटीस मूल हाताला धरुन चालवीत असलेली पाहिली की, मला अधिक समाधान होते. त्या स्त्रीला मी अधिक धन्य मानेन." [१०४] याचा अर्थ दोन मुले असलेली स्त्री सावरकरांना आदर्श वाटते. यातील पहिले मूल स्त्री २४–२५ वर्षाची असताना

झालेले आहे, लक्षात घेतले पाहिजे. या दोन मुलातील अंतर ४–५ वर्षाचे आहे, हेही लक्षात घेतले पाहिजे. तेव्हा सावरकरांच्या संततिनियमन विरोधाचा संदर्भच निराळा आहे व आपण म्हणतो, त्या अर्थीचे कुटुंबनियोजन त्यांना मान्यच होते, हे समजून घेतले पाहिजे.

आक्षेप चुकीचा

डॉ. फडके यांचा आक्षेप केवळ संततिनियमनापुरता मर्यादित नाही. त्यांचे म्हणणे असे की, सावरकर संततिनियमनाला विरोध करतात; कारण ते हिंदुत्वनिष्ठ आहेत. हिंदुराष्ट्रासाठी संख्येची गरज असल्यामुळे सावरकरांना संततिनियमनाला विरोध होता, असे त्यांचे म्हणणे आहे. डॉ. फडके यांचे हे म्हणणे निराधार आहे. हिंदूचे जे मुसलमान झाले, त्यांची शुद्धी करुन घेण्याच्या प्रश्नाबाबतीत सावरकर हिंदूराष्ट्राच्या संख्याबळाचा विचार करीत असले, तरी संततिनियमनाच्या बाबतीत असा विचार करत नाहीत, हे समजून घेतले पाहिजे. मुसलमान हे संततिनियमन करत नाहीत, म्हणून हिंदूनीही ते करु नये, अशी भूमिका सावरकरांनी कधीही घेतलेली नाही, 'संख्याबळ हेही बळच आहे' हा त्यांचा लेख घ्या की अन्य कोणताही लेख वा भाषण घ्या, मुसलमानांच्या विरोधात हिंदूंची संख्या घटू नये म्हणून संततिनियमन नको, ही भूमिका त्यांनी कुठेही घेतलेली नाही. त्यांच्या संततिनियमनाच्या विरोधाचा संदर्भ लोकसंख्याबाढीशी नाही, हे नीट समजून घेतले पाहिजे. आजचे हिंदुत्वनिष्ठ जी भूमिका घेतात तीच भूमिका सावरकर घेत असले पाहिजेत, या तर्कावर डॉ. फडके यांचा आक्षेप आधारित आहे, एवढेच आम्ही येथे नोंदवू इच्छितो.

उदार क्रांतिवीर

सावरकरांचे स्त्रीबद्दलचे समग्र विचार सांगण्यासाठी आम्ही ही चर्चा करीत नसून, प्रखर बुद्धिवादी असणारे सावरकर स्त्री स्वातंत्र्य न मानणारे वा स्त्रीपुरुषसमानता नाकारणारे होते, या आरोपात तथ्य आहे काय, हे पाहण्याचा आमचा हेतू आहे. स्त्री स्वातंत्र्याचा व स्त्री पुरुष समानतेचा ध्वज हाती घेतला नसला तरी, त्यांनी जे काही लिहिले आहे, व ते ज्या प्रकारे वागले आहेत, त्यावरुन त्यांची स्त्रियांबिषयीची भूमिका सुस्पष्ट होते. ती तशी व्हावी एवढ्या पुरतेच त्यांचे स्त्रीविषयक विचार आम्ही येथे दिले आहेत. सावरकरांचा मूळ पिंड क्रांतिकारकाचा आहे. ही क्रांतिकारकता मानवी जीवनातल्या सर्वच क्षेत्राकरिता लागू आहे. त्यांचा कोणताही विचार घेतला तरी त्याला या क्रांतिशिलतेचा स्पर्श झालेला दिसेल. देशभक्तानी वा क्रांतिकारकानी लग्न करावे का याचे उत्तर त्यांनीच स्वतःकरिता दिलेले आहे. क्रांतिकारक देशाकरिता हुतात्मा झाला तर त्यांच्या पत्नीचे काय होईल, या प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणतात, [१०८]

"त्यांच्या पत्नी-पुत्रांनी आपला नाथ असा महान हुतात्मा झाला या विचारासरशी आपल्या त्या अनाथपणास वास्तविक स्पृहणीय सनाथत्व मानले पाहिजे. पण, तेही होत नसेल तर, अशा अनाथ स्त्रियांनी सुखनैव तशाच कोणा थोर पुरुषाशी पुनर्विवाह करुन, आपला संसार पुन्हा थाटावा, अशी अनुज्ञा मनःपूर्वक देण्याइतका तो क्रांतीवीर बहुधा उदार असेलच." बहुधा हा शब्द अितर क्रांतिवीराकरिता असला तरी स्वतः सावरकर तसे उदार होतेच यात शंकाच नाही. स्त्रीस्वातंत्र्याची यापेक्षा अधिक उदात्त भूमिका कोणती असू शकते ?

आपण पन्नास वर्ष अंदमानमधून आता सुटत नाही, हे निश्चित झाल्यावर सावरकरांनी आपल्या पत्नीला असा उपदेश केल्याचे सांगण्यात येते की, आपल्या पत्नीने दुसरे लग्न करावे व सुखाने संसार करावा. पत्नीने असे करण्यातच स्वतः सावरकरांनाही आनंद आहे. स्वतः सावरकरांनी मात्र आपल्या आत्मचरित्रात याचा उल्लेख केलेला नाही. ही घटना खरी असो वा नसो, पण सावरकरांच्या स्त्रिया-बद्दलच्या आतापर्यंत आपण पाहिलेल्या क्रांतिकारक विचारात ती गोष्ट पूर्णपणे बसणारी आहे, हे समजून घेतले पाहिजे. २७ मे ८७ च्या भारतीय दूरदर्शनवरील कार्यक्रमातही असाच उपदेश सावरकरांनी माईंना केल्याचे दाखविले आहे. दुर्दैवाने म्हणा वा सुदैवाने म्हणा माईंना ही गोष्ट पटणेच शक्य नव्हते व म्हणून हा कल्पित वा खरा उपदेश प्रत्यक्षात आलाच नाही. सुदैवाने यासाठी की, सावरकर प्रत्यक्षात बारा वर्षानंतर सुटून भारतात आले व त्याच संसारसुखाचा त्यांनी लाभ घेतला, त्यांना मुले-बाळे झाली. हा उपदेश नाकारल्याची फारशी शिक्षा माईंनांही झाली नाही नि तेवढ्यापुरते सावरकरही या सामाजिक पापातून मुक्त झाले. दुर्दैवाने यासाठी की, जर हा उपदेश प्रत्यक्षात आला असला तर, सावरकरांना स्त्री स्वातंत्र्य मान्य नव्हते, स्त्री पुरुष समानता रुचत नव्हती, व्यक्तित्व आणि सामाजिक मूल्य म्हणून त्यांनी स्त्रीकडे पाहिले नाही– असे मनःपूत निष्कर्ष काढणाऱ्या टीकाकारांनी तोंडच उघडले नसते. एवढेच नव्हे, तर स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारा म्हणून समाजसुधारकांमध्ये सावरकरांना अग्रपूजेचा मान मिळाला असता. या प्रश्नाबद्दल एकही शब्द येथे लिहिण्याची आम्हाला गरज पडली नसती.

उदात्त मूल्यांचा सातत्याने उद्घोष न करताही सावरकर ती मूल्ये कशी मानतात, त्या मूल्यांच्या पाठीमागे धावत न जाता वास्तवावर कसे कठोरपणे उभे टाकतात, त्या मूल्यांना उपयुक्ततेची कशी कसोटी लावतात, हे नीट समजून घेता यावे यासाठी त्यांची आर्थिक समतेबद्दलची व स्त्री स्वातंत्र्याबद्दलची भूमिका आम्ही येथे उदाहरणादाखल थोडी तपशीलाने मांडली आहे. उदात्त मूल्याकडे पाहण्याच्या सावरकरांचा भूमिकेचे बुद्धिवादी सूत्र समजून घ्यावे, हाच मुख्य हेतू आहे.

■■■

४. नीतिमूल्याविषयी भूमिका

आजचे जे सांप्रत ध्येय आहे त्या राष्ट्रहितासाठी आज उपयुक्त काय, हीच सावरकरांनी नीतिशास्त्राची कसोटी मानली. उपयुक्ततावाद हे नीतिशास्त्र म्हणून युरोपमध्ये जन्माला आलेले होते. सावरकर स्वतःला जसे बुद्धिवादी, विज्ञाननिष्ठ म्हणून घेत, त्याचप्रमाणे उपयुक्ततावादी म्हणून घेत. या संबंधीची रोखठोक भूमिका घेऊनच ते उभे ठाकतात. जीवनातील सारी ध्येये, कर्तव्ये, त्या कर्तव्याचे मूल्यमापन याच एकमेव कसोटीवर ते ठरवित असत. ही त्यांची कसोटी कशी सर्वंकष व सर्वगामी होती हे आपल्याला समजून घ्यायचे आहे.

आपल्या आत्मचरित्रात सावरकर म्हणतात,[१] "ज्या नीतिशास्त्राच्या पायावर आणि सूत्राधारे आपल्या क्रांतिकारक आंदोलनास आपण उभारले पाहिजे, आपण समर्थिले पाहिजे, ते हे Utility (उपयुक्तता) हेच नीतिशास्त्र, हीच क्रांतीची मनुस्मृति, असे मी म्हणे, असे मी मानी!" हा बेंथम-मिल्लचा उपयुक्ततावाद आपल्या महाभारतातही आहे असे त्यांना वाटे. ते म्हणतात,[१] "महाभारतातील कृष्णाच्या अनेक प्रसंगीच्या भाषणावरुन आणि व्यवहारावरुन मी सिद्ध करी की, उपयुक्ततावादाचा श्रीकृष्णच पहिला प्रणेता आहे, नव्हे आचार्य; कारण त्यांनी तो आचरुन दाखविला." सशस्त्र क्रांतीसाठी श्रीकृष्णाची शिकवण, त्यांनी केलेला कंसवध, सावरकरांना प्रेरणादायक व उपयुक्त वाटला. कृष्णाची खरी भक्ती म्हणजे कंसवध असे ते त्यासाठी मानत. जेवढे श्रीकृष्ण सावरकरांना आजच्या परिस्थितीत उपयुक्त वाटतात तेवढेच ते स्वीकारतात. कंसवधाकरिता श्रीकृष्ण त्यांना आदर्श वाटले, म्हणून काही श्रीकृष्णानी सांगितलेली सारी नीतिमूल्ये सावरकर मान्य करायला तयार नाहीत.

नीतिशास्त्राचा पाया : बुद्धी

सावरकरांच्या नीतिशास्त्राचा पाया बुद्धी हा होता. हे नीतिशास्त्र मानवी ऐहिक जीवनावर आधारलेले होते. सावरकर म्हणतात,[२] "नैतिक कृत्य कशास म्हणावे, या संबंधीच्या उहापोहात स्थल नि काल याच्या अभावास्तव मी खोल शिरु इच्छित नाही. नीतीचे शास्त्र आत्मस्फूर्तीने, साक्षात्काराने किंवा व्यवहाराच्या सोयीने कोणत्याही तत्वावर अधिष्ठित झालेले असो, तथापि त्याची जी व्यावहारिक बाजू, जी सर्व नीतिशास्त्रवेत्ते एक मुखाने मान्य करतात नि जिच्या योगानें नीति कोणती आणि अनीति कोणती, सद्‌गुण दुर्गुणाहून वेगळा कसा, किंवा चांगले वाईट कोणते, हे ठरविले जाते, ती कसोटी केवळ व्यावहारिक गोष्टीवर अधिष्ठित केलेली आहे. ती म्हणजे ही की, मानवी जीवनात जे जे विचार किंवा आचार उपकारक ठरतील, त्या त्या सर्वांना नीति किंवा सद्‌गुण म्हणावे आणि त्यांच्या विरोधी जे जे असेल त्याला अनीति किंवा दुर्गुण समजावे. हाच न्याय सर्व नीतिशास्त्रवेत्यांनी मान्य केलेला आहे. याचाच अर्थ नीतीची कल्पना मानवी जीवनावर मुख्यतः अधिष्ठित आहे."

हेच विचार सावरकर विविध ठिकाणी मांडत आले आहेत. कथा, कादंबऱ्या च नाटकातूनही ते नीतिशास्त्राची हीच भूमिका मांडतात. ते स्वतःच म्हणतात त्या प्रमाणे या नीतिशास्त्राची शास्त्रीय व सूत्रबद्ध मांडणी त्यांनी कुठेही केलेली नाही. ही नीती वापरुन मानवी जीवनातील प्रश्न सोडविणे हे त्यांचे प्रमुख काम होते. आपली सर्व शक्ती त्यांनी या कार्यातच खर्च केलेली आहे. नीतिशास्त्राविषयी त्यांनी प्रसंगोपात जे विचार मांडले व आचरुन दाखविले, त्यावरुन स्थूलमानाने त्याची सूत्रे पुढीलप्रमाणे मांडता येतील : नैतिकतेचा मुख्य पाया व आधार बुद्धी हा आहे, हे पहिले सूत्र. नैतिकता ही मानवी ऐहिक जीवनातील गोष्टीवरच आधारित आहे, हे दुसरे सूत्र. चांगले-वाईट, सद्‌गुण-दुर्गुण, नैतिक-अनैतिक, पुण्य-पाप, इ. दोन विभागात नैतिक कल्पनांची विभागणी करता येते, हे तिसरे सूत्र. मनुष्याला जे उपयुक्त, लाभदायक, आनंदायक, सुखकारक ते सारे पहिल्या विभागात मोडते व म्हणून त्यांना चांगले, नैतिक किंवा सद्‌गुण म्हणते; जे अहितकारक, दुःखदायक इ. आहे, ते दुसऱ्या विभागात मोडते व म्हणून त्यांना वाईट, अनैतिक किंवा दुर्गुण म्हणतात– हे चौथे सूत्र होय. मनुष्याला काय हितकारक वा अहितकारक हे त्या त्या परिस्थितीवर अवलंबून असते. याचाच अर्थ नैतिक काय आहे, हे ठरविण्यासाठी देशकालपात्राचा विचार केला पाहिजे, हे पाचवे सूत्र. या सर्व नैतिक कल्पना मनुष्यानी मनुष्यासाठी तयार केलेल्या आहेत, त्यामुळे त्या त्रिकालाबाधित नसून परिवर्तनीय आहेत, हे सहावे सूत्र होय. सावरकरांचे नैतिकविचार या सहासूत्रांवर अधिष्ठित आहेत.

जुनी नीतिकल्पना

नीतिशास्त्र हा आतापर्यंत धर्माच्या क्षेत्रातीस विषय होता. सावरकरांना हे अर्थात्‌च मान्य नाही. त्यांनी हा नीतीशास्त्राला धर्माचा असलेला पायाच अशा प्रकारे उध्वस्त करुन टाकलेला आहे. चांगले काय, वाईट काय, पाप-पुण्य काय सद्‌गुण-दुर्गुण कोणते या साऱ्या गोष्टी आतापर्यंत ईश्वर किंवा त्याच्या नावाने निर्माण झालेला धर्मच ठरवित आला आहे. पाप-पुण्याच्या या पूर्वापार चालत आलेल्या कोणत्याही कल्पना सावरकरांना मान्य नाहीत. या नीतिकल्पनांचा प्रभाव समाजमनावर अजूनही बलवत्तर आहे. त्या त्या धर्मपंथाप्रमाणे या नीति-कल्पना वेगवेगळ्या असतात. परस्पराच्या विरोधीही असतात. वैदिकापुरते बोलायचे तर सर्व नीतिकल्पनांची विभागणी पाप-पुण्यात केलेली असते. वाईट ते पाप, चांगले ते पुण्य असते. गुणांचीही विभागणी अशीच दुर्गुण आणि सद्‌गुण यात केलेली असते. न्याय आणि अन्यायाची विभागणीही अशीच केलेली असते. देवाला काय आवडते व आवडत नाही, या वरुन ही विभागणी झालेली असते. देवाला चांगल्या गोष्टी आवडतात, म्हणून त्या गोष्टी मानणे वा करणे नैतिक वा पुण्यप्रद; व ज्या आवडत नाहीत त्या अनैतिक वा पापमय, अशी ही वाटणी असते. देवाला असेच का आवडते वा आवडत नाही, याचे कारण त्या देवाची इच्छा एवढेच असते. चांगल्या गोष्टी केल्यास पुण्य लाभते, तर वाईट गोष्टी केल्यास पाप लागते. पापाला शिक्षा व पुण्याला पारितोषक अशी न्यायव्यवस्था ईश्वरानेच तयार करुन ठेवलेली असते. पापाची शिक्षा तो विविध प्रकारे करतो. अमकी शिक्षा अमक्या पापासाठी आहे, असे तो नेमके नेहमीच सांगत नसतो. मनुष्यानी ती जाणायची असते. हे जाणताना ईश्वर चुकत नसतो, हे लक्षात ठेवायचे असते. पाप आणि पुण्य याच्या संचयाची समतोलता मोजून ज्या गोष्टीचा तराजू जड आहे, त्या बाजूने निकाल लागतो. ही शिक्षा ज्यांनी ते पाप केले त्याला वैयक्तिकरित्याच दिली पाहिजे, असेही नसते. त्याच्या ऐवजी त्यांच्या नातलगालाही ती होऊ शकते. या जन्मीच ही शिक्षा मिळेल याचीही खात्री नसते. ते दयाळू देवाच्या मनावर अवलंबून असते. पुढील जन्मीही शिक्षा करता यावी म्हणून पुनर्जन्माची सोय केलेली असते. नरक व स्वर्गाची व्यवस्था लावून दिलेली असते. हा जन्म मागच्या जन्माच्या शिक्षेसाठी सुद्धा असण्याची शक्यता असते. शिक्षा झाली ती भोगल्या-शिवाय इलाज नसतो. काही ठिकाणी प्रायश्चिताची सोय केलेली असते. पापातून मुक्त होण्यासाठी बऱ्याच तरतुदी केलेल्या असतात. त्या तरतुदी प्रत्येक माणसा-प्रमाणे व प्रसंगाप्रमाणे वेगवेगळ्या असतात. पुण्य केले की नेमके याच्या उलट होते. जन्मोजन्मीच्या रहाटगाडग्यातून जो मुक्त झाला त्याला मोक्ष मिळाला असे म्हणतात. तो मिळविण्यासाठी परमेश्वराने निर्माण केलेली ही नीतिमूल्ये, त्यासंबंधीची कर्तव्ये प्रत्येकाने पाळलीच पाहिजेत. या साऱ्या नीतिकल्पना त्रिकालाबाधित असतात. त्या बदलण्याचा अधिकार मनुष्यप्राण्यांना नसतो. प्रत्येक

धर्मात अशाच स्वरुपाच्या नीतिकल्पना असतात, की ज्याचा निर्माता, नियमन करणारा व न्याय देणारा हा ईश्वरच असतो.

नीतिशास्त्राचा हेतू मानवहित

सावरकरांसारख्या बुद्धिवादी माणसाला हे काहीच मान्य नसणार, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. या साऱ्या गोष्टीना सावरकर पोथिनिष्ठा म्हणतात. या धर्मशास्त्रीय नीतिकल्पनेत एखादी गोष्ट पाप का वा पुण्य का याची बुद्धिनिष्ठ कोणतीच कसोटी नसते. पाप–पुण्यामुळे होणाऱ्या तथाकथित शिक्षा व बक्षीसे याचा प्रत्यक्ष पडताळा पाहण्याची कुठेच सोय नसते. या संबंधी टीका करताना सावरकर म्हणतात,[3] " हे पाप, हे पुण्य ! बस्स, अितकीच अरेरावी आज्ञा पोथी सोडते ! ते पाप का, पुण्य का त्याचा हेतू काय, कोणत्या परिस्थितीत, किती कालावधि, तो प्रश्न देखील ती विचारू देत नाही, विशेदित नाही. " याच्या नेमके उलटे विज्ञान असते. नीतिमूल्यांसाठी विज्ञानाचा पुरस्कार करताना सावरकर म्हणतात,[3] " पण विज्ञान नुसते हे 'पाप' हे 'पुण्य' अशी अरेरावी आज्ञा न देता ते का, त्याचा हेतू काय, तरतमभाव कोणता, कसोटी कोणती, ते प्रत्येक प्रकरणी स्पष्टपणे अैहिकाचे प्रत्यक्ष पुरावे देवून विशेदिते." यावरुन सावरकर निष्कर्ष काढतात, [3] " त्यामुळे कोणत्याही प्रसंगी विज्ञाननिष्ठ मनुष्यास आपले कर्तव्य पोथिनिष्ठ मनुष्यापेक्षा त्यातल्या त्यात अधिक अचूकपणे ठरविता येते." सावरकरांची पाप–पुण्य ठरविण्याची ही कसोटी बुद्धिवादाची आहे, उपयुक्ततावादाची आहे ! गोहत्त्या विरुद्ध राष्ट्रहत्त्या असा विकल्प समोर आला तर, सावरकरांनी बुद्धिवादाच्या या कसोटीने गोहत्त्या पुण्य ठरविली व राष्ट्रहत्त्या पाप ठरविली ! धर्म कसोटीने जे पाप असते ते बुद्धिवादाने पुण्य ठरु शकले ! धर्म–अधर्माच्या, पाप–पुण्याच्या, चांगल्या–वाअीटाच्या साऱ्या कल्पनाच हा नीतीशास्त्राचा मूळ पाया वरलला की बदलू लागतात. नीतिशास्त्राची पारंपारिक अिमारतच भग्न पावू लागते. नीतिमूल्याच्या ह्या पोथिनिष्ठेचाही सावरकर उच्छेद कसा करतात, हे समजून घेतले पाहिजे.

धर्म विरूद्ध नीती

'आजच्या तिबेट मधील काही गमती' हा त्यांचा लेख त्यांचा नीतिविषयक दृष्टिकोण समजून घेण्यासाठी मार्गदर्शक ठरतो. एका स्त्रीला एकापेक्षा अधिक पती असणे तिटेबमधील लोकांना नैतिक वाटते. भाऊ वारल्यास त्यांची विधवा पत्नी अितर सर्व भावाची धर्म पत्नीच मानणे, त्यांना पूर्णतः नैतिक वाटते. हे सुख अविवाहित भावांनीही समानतेने वाटून घेतले पाहिजे, अशा समतेवरही त्या लोकांची निष्ठा आहे. तिबेट मध्ये पत्नी वारल्यास, सून असेल तर, ती सूनच त्या विदूर पुरुषाची पत्नी मानली जाते. विधवेने लग्न केल्यास तिच्या पूर्वीच्या सर्व मुली नव्या पतीच्याही धर्मपत्नी होतात. अशा अनेक गोष्टी सावरकरांनी

या लेखात सांगितल्या आहेत, की ज्या तिबेट मधील लोक धर्म्य व नैतिक मानतात. या गोष्टीचा निर्देश करुन नैतिकतेबद्दलचे सूत्र मांडताना सावरकर म्हणतात, [४] "आपणास जी गोष्ट अत्यंत किळसवाणी, अनैतिक नि अधर्म्य वाटते, ती रुढी चाल, वा आचार जगाच्या आरंभीच देवाने 'धर्म' म्हणून सर्व मनुष्यजातीसाठी सांगून टाकलेला आहे, अशी तिबेट मधील सनातन्याची निष्ठा! नीति, अनीति ह्या वस्तू चौकोन वा त्रिकोणाप्रमाणें ठराविक साच्याच्या, एकठशी, एकछापी, त्रिकालाबाधित असतात, किंवा आपल्या कुराणात वा पुराणात जे चांगले म्हणून वा वाईट म्हणून सांगितले आहे, तेच सर्व परिस्थितीत, सर्व मनुष्य समाजात चांगले वा वाईट ठरलेच पाहिजे, हा हट्ट किती चुकीचा आहे, हे भिन्न भिन्न समाजामध्ये प्रचलित असलेल्या धर्माचा, रुढीचा नि शिष्टाचाराचा असा तौलनिक अभ्यास केला असता, सहज समजून येते. आपणास जो आचार शुद्ध नि हितकर वाटतो, तो आपण आचरावा, पण तो काय तो सनातन, त्रिकालाबाधित, ओश्वरोक्त 'धर्म' होय, आणि अितर साऱ्या परिस्थितीतही तोच मानला पाहिजे, असा धर्मवेडा दुराग्रह मात्र धरु नये." सावरकरांची ही भूमिका पूर्णपणे बुद्धिवादावर आधारलेली आहे. धर्म हा जसा परिवर्तनीय असतो, तशाच नैतिककल्पनाही परिवर्तनीय असतात, हा त्यांचा सिद्धांत आहे. त्रिकोण वा चौकोनासारख्या ठराविक साचाच्या अशा नीतिकल्पना असत नाहीत, हा त्यांचा विचार निर्भेळ बुद्धिवादी आहे. नीतिकल्पनांना धर्माचा असलेला आधार सावरकर काढून घेवून, धर्म व नीतिविचार याची फारकत करत आहेत, हे समजून घेतले पाहिजे.

मानव हा केंद्रबिंदू

नीतिशास्त्राबद्दलचे आपले विचार सावरकर कोणत्यातरी निमित्ताने मांडत असतात. हिंसा–अहिंसेची कसोटी ठरविणे हे असेच एक निमित्त असते. या निमित्ताने सावरकर नीतिकल्पनेसंबंधी एक सिद्धांत मांडतात, [५] "हिंसा–अहिंसा, चांगले–वाईट, धर्म–अधर्म, न्याय–अन्याय, नीति–अनीति, हे सर्व ठरविण्याचा सिद्धांत म्हणजे ज्यायोगे मानवजातीचे हित होओील तो धर्म. ही कसोटी तात्विक दृष्टया खरी व व्यावहारिक दृष्टया सुसंगत अशी आहे." आतापर्यंतच्या थोर थोर पुरुषांनीही हाच सिद्धांत कसा मान्य केला आहे, हे सांगताना ते पुढे म्हणतात, "मनुस्मृती, मार्क्स, लेनिन या सर्वांनी हीच कसोटी धरली आहे. धर्माचे विवेचन या एकाच सूत्रावर केलेले आहे. मनुष्यजातीच्या हिताला अिष्ट ठरेल तो धर्म..." नीतिशास्त्राचे केंद्र व हेतू मानव हाच आहे हे सांगताना ते पुढे म्हणतात, "धर्म–अधर्म, नीति–अनीति या सर्व गोष्टी मानवाच्या दृष्टीने ठरविलेल्या असतात. गाय पाळणे हा धर्म तर साप पाळणे हा देखील धर्म का होवू नये? गाय दूध देवून मानवाचे पोषण करते म्हणून आपण गाय पाळतो. अशा प्रकारे नीतिशास्त्राचे केंद्र मानव हा आहे. या सर्व गोष्टीची निकष, पाषण, मानवजातीचे

हित हाच आहे. या कसोटीवर कुठलेही तत्व घासून वा पारखून घेतल्याखेरीज मानवाचे अंतिम कल्याण होणार नाही.'' अशाच अर्थाचे विचार सावरकर सात-त्याने मांडत आले आहेत. वैचारिक साहित्यापासून तो ललित साहित्यापर्यंत त्यांनी हाच विचार आग्रहाने मांडलेला आहे. त्यांच्या काव्यातूनही हाच नीतिविचार येतो नि त्यांच्या कथा, नाटक, कादंबऱ्यातील पात्रेही हाच नीतिविचार मांडत असतात. नीतिविचाराचा केंद्रबिंदू मनुष्याचे हित हा आहे, ही त्यांची भूमिका त्यांनी कुठेही सोडलेली नाही. नैतिककल्पनेला ते धर्माचा वा परंपरेचा आधार देत असल्याचे आपल्याला कुठेही दिसणार नाहीत.

सर्वभूतहितेरतः चूक

मनुष्यजातीचे हित याचा अर्थ 'पुष्कळाचे पुष्कळ हित' असाच ते व्यावहारिक दृष्टीने घेतात. सर्व मनुष्य मात्राचे सुख ही गोष्ट व्यवहारतः अशक्य आहे, असे ते म्हणतात. 'सर्वभूतहितेरतः ही विश्वातील सर्व भूताच्या म्हणजेच ज्यांना जीव आहे, असा सर्व सजीवाच्या हिताची अतिव्यापक कल्पना आपल्या गीतेत आलेली आहे.[६] या श्लोकाचे आध्यात्मिक आणि वास्तविक अशा भूमिकेतून दोन वेगवेगळे अर्थ होतात. या श्लोकाचा वास्तविक अर्थ देताना सावरकर म्हणतात,[७] "आत्मौपम्य बुद्धीने का होईना, पण एकदा साम्याच्या आकाशातून आपण वैषम्याच्या स्थिर पण जड भूमिवर उतरलो म्हणजे सर्वभूतहितरततत्व याचा अर्थ अक्षरशः सर्वभूतांचे हित असा घेणे अशक्य असते.... 'सर्वभूतहितेरतः' ही पदे अर्थवादात्मक असून त्याचा मुख्यार्थ 'बहुमनुष्यहितेरतः' असाच होतो." श्रीकृष्णाला उपयुक्ततावादाचा पहिला आचार्य म्हणून सावरकर कितीही गौरवत असले, तरी गीतेतील ही सर्वभूतहिताची कल्पना ते मानायला कसे तयार नाहीत किंवा आपल्याला अनुकूल असा 'वास्तविक' अर्थ ते कसा काढतात, हे समजून घेतले पाहिते.

गीतेतील या पदाचा व हे पद असलेल्या श्लोकाचा अर्थ पूर्णतः आध्यात्मिक आहे. सर्व इंद्रिये आवरुन सर्वत्र समबुद्धी झालेले पुरुष सर्व लोकांच्या हितात गढलेले असतात व तेच परमेश्वराला जावून मिळतात, या अर्थी हा श्लोक गीतेत आलेला आहे. मुख्य गोष्ट ही की, गीतेतील हा आध्यात्मिक अर्थ व भाव सावरकर विचारात घ्यायला तयार नाहीत. सर्व ठिकाणी एकच आत्मा आहे, या आत्मौपम्य भूमिकेतून साम्यदृष्टी येते. या श्लोकाला जड भूमिवर आणून ते त्याचा अर्थ काढतात. 'सर्व'च्या ऐवजीं 'बहु' असा अर्थ घेतात. असाच अर्थ घेतला पाहिजे, असे म्हणतात. पाश्चात्य नीतिवेत्ते बेंथम व मिल्ल याच्या उपयुक्ततावादाशी गीतेचा हा अर्थ जुळवून घेतात.

गीतेचा अर्थ काढणाऱ्या अधिकारी पुरुषांना सावरकरांचा हा अर्थ मान्य नाही. लोकमान्य टिळकांनाही हा अर्थ मान्य नाही. 'पुष्कळाचे पुष्कळ सुख' ही

पाश्चात्य नीतिवेत्यांची उपयुक्ततावादी भूमिका ही मर्यादित व संकुचित असून, भारतीय आध्यात्मिक विचार हा सर्वभूतहितरत असल्यामुळे तो अधिक विशाल, व्यापक असून पाश्चात्याच्या ह्या आधिभौतिकापेक्षा श्रेष्ठ आहे, असे टिळकांचे म्हणणे आहे. सावरकरांच्या बुद्धिवादाचे वैशिष्ट्य हे की, पाश्चात्य राष्ट्रात विकास पावलेल्या कोणत्याही एखाद्या विचारापेक्षा भारतातील विचार कसा श्रेष्ठ आहे, हे राष्ट्राभिमानाच्या भूमिकेतून सुद्धा ते कधीही पटवून देताना दिसणार नाहीत. पाश्चात्य आधिभौतिक विचारापेक्षा भारतीय आध्यात्मिक विचार कसा श्रेष्ठ आहे, आमच्या नीतिकल्पना पाश्चात्यांच्या नीतिकल्पनापेक्षा कशा श्रेष्ठ आहेत, हे पटवून देत असलेले ते आपल्याला कधीही दिसणार नाहीत. उलट या अध्यात्मामुळेच आपण जगाच्या कसे मागे पडलो, हेच सांगताना ते दिसतील. बँथम, मिल्ल यांनी मांडलेल्या उपयुक्ततावादी विचारापेक्षा आमचे अध्यात्म नीतिशास्त्र म्हणून कसे श्रेष्ठ आहे, हे पटविण्यासाठी टिळकांनी गीता रहस्याची पानेच्या पाने खर्ची घातलेली आहेत. तसे तर सोडून द्या पण निश्कर्षाशिखल तसे विधान सुद्धा सावरकरांनी केलेले आपल्याला सापडणार नाही. आणि यांचे कारण अगदी उघड होते; कारण बँथम–मिल्लवर टीका करणे याचा अर्थ सावरकरांनी स्वतःच्याच विचारावर टीका करण्यासारखे होते.

आध्यात्मिक विरुद्ध भौतिक

लोकमान्य टिळक हे अध्यात्म मानणारे असले तरी प्रवृत्ती प्रधान होते. त्यांनी मनुष्याच्या हिताचा जो आध्यात्मिक अर्थ गीतेतून काढला आहे, तो सावरकरांना मान्य नाही. मनुष्याच्या हिताकडे सावरकर मुख्यतः भौतिक दृष्टिकोणातूनच पाहतात, त्यामुळे टिळकांचे गीतारहस्यातील आधिभौतिकावरील सर्व आरोप सावरकरांच्या विचारावरही येतात. या संबंधात टिळकांनी घेतलेला मुख्य आक्षेप हा की, पुष्कळ लोकाचे पुष्कळ हित करण्याचा हेतू काय, हे भौतिकवादी सांगत नाहीत. स्वार्थापेक्षा परार्थ श्रेष्ठ आहे, हे हर्बर्ट स्पेन्सरचे मत ग्राह्य मानले, तरी परार्थ का श्रेष्ठ व तो का करावा, त्याचा हेतू काय, असा प्रश्न टिळक उपस्थित करतात. बाह्यपरिणामावरुन हेतू ठरविणे त्यांना मान्य नाही. बाह्य परिणामात फरक पडत नसला, तर ते कृत्य करणाऱ्याच्या हेतूतही फरक पडत नाही, हे मिल्लचे मत चुकीचे व सांप्रदायिक आग्रहाचे आहे, असा टिळकांचा आक्षेप आहे. याशिवाय दुसऱ्याचे हित का करावे, ते हित कशात आहे, ते हित कुणी ठरवावे, ते कशाने होते हे कसे ठरवावे– असे मूलभूत प्रश्न टिळकांनी या संबंधात उपस्थित केलेले आहेत. प्रत्येकाच्या बुद्धीला आपले अगर दुसऱ्याचे हित अज्ञानाने कळण्याची शक्यता नाही, म्हणून जर प्रत्येकाच्या मनावर व बुद्धीवर या प्रश्नाची उत्तरे ठेवली तर ते ' भुताच्या हाती कोलीत ' दिल्यासारखे होईल, असा टिळकांचा आरोप आहे. टिळकांचे उत्तर कसे की, या प्रश्नांचा विचार आध्यात्मिक दृष्टीतून केला

पाहिजे. सर्वांच्या ठिकाणी एकच आत्मा आहे, या आत्मौपम्याच्या भावनेतूनच या प्रश्नाचे उत्तर मिळू शकते, असे टिळकांना वाटते.

टिळक म्हणतात,[८] "बाह्य सृष्टीतील सुखदुःख अवलोकनाने कोणताही सामान्य सिद्धांत केला तरी सर्व सुखदुःखे स्वभावतःच अनित्य असल्यामुळे त्याच्या ढिसूळ पायावर रचिलेले नीतिसिद्धांतहि तितकेच कच्चे म्हणजे अनित्य बनतात." टिळकांच्या मते सुखदुःख हे अनित्य, पण नीतिधर्म हा नित्य आहे. म्हणून सुखदुःखाचा विचार करीत न बसता, नित्य जीवाची या नीतिधर्माशी जोड घालून दिली पाहिजे, असे त्यांनी धर्मशास्त्रावर आधारलेले मत दिले आहे. भौतिक सुख हे खरे सुख नसून, आध्यात्मिक सुख हे खरे व परमसुख आहे व त्याचाच विचार केला पाहिजे, असे टिळकांना आग्रहाने वाटते. ते म्हणतात, [९] "नुसते आधिभौतिक सुख हेच काय ते 'परम' साध्य मानून कर्माच्या केवळ सुखदुःखात्मक बाह्यपरिणामाच्या तारतम्याने नीतिमत्तेचा निर्णय करणे योग्य नव्हे, हे निराळे सांगावयास नको. कारण जी वस्तू केव्हाही स्वतः परिपूर्णावस्थेस येवूच शकत नाही, ती परम साध्य मानणे म्हणजे 'परम' शब्दाचा दुरुपयोग करुन मृगजलाचे ठिकाणी जलाची भावना धरण्याअितकेच असमंजस आहे." असे सांगून टिळकांनी भौतिकसुखाचा मार्ग हा गौण व आत्मिक सुखच परम आहे, हीच कसोटी लावून सर्व नीतिधर्मच ठरविले पाहिजेत, असे स्पष्टपणे म्हटले आहे.

टिळक म्हणतात, [१०] "म्हणून सर्वभूतहित, पुष्कळाचे पुष्कळ सुख, माणुसकीचा परम उत्कर्ष वगैरे नीतिनियमाची सर्व बाह्य साधने किंवा आधिभौतिक मार्ग गौण ठरवून, आत्मप्रसादरुपी अत्यंत सुखी आणि त्यालाच जोडून असणारी कर्त्याची शुद्धबुद्धि या आध्यात्मिक कसोटीनेच कर्माकर्माची परीक्षा केली पाहिजे." टिळकांचे हे नैतिक विचार गीतेवर आधारित आहेत. नीती–अनीतीची, चांगल्याचाअीटाची कसोटी अध्यात्म आहे, हा त्यांच्या विचाराचा मूळ पाया आहे. आणि हे जे अध्यात्म आहे, ती संवेदनाशील, अिंद्रिगम्य, प्रत्यक्षसिद्ध अशी कोणती वस्तू नसून ती अनुभवसिद्ध अशी बाब आहे, हे लो. टिळकच मान्य करतात. ते म्हणतात," "अध्यात्मशास्त्राचा विषय अिंद्रियातीत म्हणजे केवळ स्वसंवेद्य अथवा ज्याचा त्याला कळणारा आहे." हा विषय बुद्धीने कळत नाही, हे मान्य केल्यावर तो कळण्यासाठी काय करावे लागते, हे सांगताना टिळक म्हणतात, [११] "म्हणून कोणताही अध्यात्मतत्वाचा निर्णय करताना अखेर श्रुतिग्रंथातील अनुभवास शरण जाण्याखेरीज आपल्याजवळ दुसरा मार्ग राहत नाही." या उलट सावरकर कोणत्याही गोष्टीचा आधार म्हणून श्रुतिस्मृतीचे नावही काढू देत नाहीत. सावरकर या प्रवृत्तीला पोथीनिष्ठा म्हणतात. तात्पर्य, टिळकांच्या मते नीतिशास्त्राचा पाया बुद्धी नसून श्रद्धा आहे, अैहिकता नसून अध्यात्म आहे, तो प्रत्यक्षगामी नसून अिंद्रियातीत आहे, वस्तुनिष्ठ नसून अनुभवसिद्ध आहे! धर्माचा अधिकात अधिक उदात्त भूमिकेतून विचार करणाऱ्या पुरुषाचे हे विचार आहेत. धर्म–अध्यात्म मानणाऱ्या

मराठी ग्रंथ संग्रहालय पुणे
ग्र. क. .....

माणसांचे हे प्रातिनिधिक विचार म्हणून समजायला हरकत नाही.

विवेकानंदाची भूमिका

स्वामी विवेकानंदाची भूमिका लो. टिळकांसारखीच आहे. त्यांच्या मते नीतिशास्त्र हे स्वतःचा सोडून इतराचा विचार करते. 'मी नव्हे, तर माझ्याखेरीज इतर' हा निःस्वार्थीपणा व आत्मत्याग नीतीचा पाया आहे, असे विवेकानंदाचे म्हणणे आहे.[४९] त्यांच्या मते नीतीचे सारे नियम त्यागावर आधारलेले आहेत. 'संपूर्ण आत्मविलय हेच नीतिशास्त्राचे ध्येय आहे' असे विवेकानंद म्हणतात.[५०] स्वतःच्या व्यक्तिमत्वाचा विनाश करुन दुसऱ्याच्या सुखात स्वतःला विलीन करुन घेणे, हे नीतिशास्त्राचे आदर्श ध्येय आहे, असे त्यांना वाटते. म्हणून ते म्हणतात, "समस्त नीतिनियमांचे एकमेव कार्य, एकमेव लक्ष, एकमेव ध्येय आहे व्यक्तिमत्वाचा विनाश. त्याची उभारणी नव्हे." [५१] राष्ट्राच्या हितासाठी स्वतःच्या वैयक्तिक हिताचा होम करणाऱ्या व इतरांनीही असाच त्याग केला पाहिजे, अशी राष्ट्रीय शिकवण देणाऱ्या सावरकरांना विवेकानंदाची ही भूमिका अमान्य असण्याचे कारण नाही. निष्कर्ष एकच असला तरी दोघांच्या भाषेतील फरक लक्षात घेण्याजोगा आहे. सावरकरांची परिभाषा उपयुक्ततावादाची आहे, विवेकानंदाची अध्यात्माची आहे.

लो. टिळक घेतात तोच आक्षेप उपयुक्ततावादावर विवेकानंद घेतात. 'उपयुक्ततावादाच्या' सिद्धांताने माणसामाणसातील नैतिक संबधाचा उलगडा होऊ शकत नाही; कारण प्रथमतः म्हणजे केवळ उपयुक्तताच लक्षात घेऊन आपण कोणतेही नीतिनियम निर्माण करु शकणार नाही. साधारणतः म्हटले जाते त्या प्रमाणे अमानवी आधाराखेरीज किंवा मी म्हणत असतो त्या प्रमाणे अतींद्रिय प्रत्ययाखेरीज नीती असूच शकत नाही." अशी विवेकानंदाची मुलभूत भूमिका आहे.[५१] विवेकानंदाची ही भूमिका वरील टिळकांच्या भूमिकेसारखीच आहे. कोणत्याही आध्यात्मिक पुरुषाची भूमिका हीच असते. 'समबुद्धी' 'अिंद्रियातीत अवस्था' 'अतींद्रिय अनुभव' 'श्रुतिप्रमाण' इत्यादीच्या आधारावरच नीतिमूल्यांची इमारत हे पुरुष उभी करतात. विवेकानंदाचे म्हणणे असे[५१] : "आम्ही समाजाचे हित करायचे ते काय म्हणून ?... मी लोकांचे भलेच का करावयाचे, त्यांचे वाईट का करावयाचे नाही ? या प्रश्नाला उपयुक्ततावाद्याचे काय उत्तर आहे ?" त्यांच्या मते 'उपयुक्ततावाद ही फारच संकुचित कल्पना आहे'[५१] म्हणून "धार्मिक आणि आध्यात्मिक सत्यावर आधारलेले सदाचार आणि नीतीनियम मानवाच्या संपूर्ण आणि अनंत स्वरुपाला लागू पडतात." असे त्यांचे आग्रहाचे प्रतिपादन आहे.[५१] सावरकर या परिभाषेत आपली नीतिविषयक भूमिका कधीही मांडणार नाहीत. टिळक, विवेकानंद-सावरकर यांचे नैतिक आदर्शाचे ध्येय एकच असले तरी नीतिनियमाच्या कसोटयाच भिन्न आहेत, हे समजून घेतले पाहिजे. धार्मिक व

आध्यात्मिक परिभाषेतून नीतिनियम समजून घेत आलेल्या भारतीय समाजाला सावरकर बुद्धिवादाच्या व्यावहारिक भाषेत नीतिविचार सांगत होते. सावरकरांची ही भूमिका, विवेकानंद म्हणतात त्याप्रमाणे, संकुचित स्वरूपाची आहे, असेच भारतीय समाजाला वाटत असले, तरी सावरकरांनी तोही धोका सतीचे वाण म्हणून बुध्याची पत्करलेला होता.

नैतिक घोटाळे

लो. टिळकांविषयी सावरकरांना नितांत आदर होता. या आदराला धक्का बसणार नाही, अशा पद्धतीने त्यांनी टिळकांची ही भूमिका कशी चुकीची आहे, हे दाखविणारा 'रहस्यकार आणि उपयुक्ततावाद' हा लेख लिहिला आहे. 'पौर्वात्य ज्ञानाच्या गंगेचा पाश्चिमात्य ज्ञानाच्या यमुना व शोणाशी संगम घडवून आणणारा ग्रंथतीर्थ' असे गीतारहस्य हा ग्रंथाला सावरकर गौरवितात. टिळकांच्या आध्यात्मिक दृष्टीने कर्माकर्माकडे पाहून चांगल्या वाईटाचा निर्णय घेत गेल्यास व्यवहारात कसे नैतिक घोटाळे होतात, हे सावरकरांनी या लेखात पटवून सांगितले आहे.

श्रीकृष्णाने गीतेत उपयुक्ततावादच सांगितलेला आहे, अशी भूमिका घेऊन गीतेतील नैतिकविचाराचा आणि उपयुक्ततावादी नीतिविचाराचा विरोध नाही, अशा पद्धतीने मांडणी करत नैतिकविचाराचा अध्यात्म हा पाया कसा होऊ शकत नाही, हे सावरकरांनी या लेखात सांगितले आहे. प्रथमतः सर्वभूत या पदातील सर्व याचा खरा अर्थ बहुसंख्य असाच होतो, असे त्यांनी म्हटले आहे. त्यांच्या मते ब्रह्मसृष्टीतील प्रश्न सोडविण्यासाठी नैतिक विचाराची गरज नसते, कारण तेथे कोणताच भेदाभेद नसतो. ब्रह्मसृष्टीत माझा आत्मा तोच दुसऱ्याचा, असे असल्यामुळे तेथे नीति–अनीतीचा प्रश्नच नसतो. औत्मौपम्य भावाने सर्वभूतहिततत्पर असणाऱ्या शुद्धबुद्धी स्थितप्रज्ञाच्या वर्तनास नीतीचा पाया, नीतीचे मापन वा आधार म्हणून गीता मानते, असे टिळक म्हणतात. या स्थितप्रज्ञाच्या साम्यावस्थेमध्ये सर्वच सारखे असल्यामुळे नीति–अनीतीचा प्रश्न निर्माण होत नाही, असे सावरकरांचे म्हणणे आहे. या ब्रम्हसृष्टीतून–साम्यावस्थेतून निघून आपल्याला मायासृष्टीचा, या अिहलोकाचा विचार केला पाहिजे, असे सावरकरांचे म्हणणें आहे. ज्याला टिळक अनित्य म्हणतात ते हे जगच, या जगातील भेदभाव, सुखदुःखे हीच नीति-शास्त्राचा विचार करताना लक्षात घेतली पाहिजेत, अशी सावरकरांची भूमिका आहे. आपल्याला या वास्तव मानवी जीवनाचा विचार करणे कर्तव्य आहे, व त्या साम्यावस्थेच्या ब्रह्मसृष्टीशी आपला संबंध नाही– ही मुख्य गोष्ट टिळकांनी लक्षात न घेतल्यामुळे सर्वभूताचा खरा अर्थ त्यांना काढता आला नाही, असेच जणू सावरकरांनी या लेखात म्हटले आहे.

नीतीशास्त्राची आत्मौपम्यबुद्धीची, म्हणजेच प्रत्येकाचा आत्मा सारखाच आहे या भावनेने अितराशी वागण्याची, कसोटी कशी अव्यवहार्य आहे, हे सावरकरांनी दाखवून दिले आहे. या कसोटीची बुद्धिवादी चिकित्सा करताना ते म्हणतात, [१३] " माझ्या आत्म्यास अनुकूल तेच मी दुसऱ्याला आत्म्यास अनुकूल आहे असे समजून चालू लागलो तर चालणे हे जितके अशक्य तितकेच न चालणेही अशक्य होवून जाते. जगणे हे जितके अनीतीचे तितकेच मरणे हेही अनीतीचे होते. याची व्यवहारातील अनेक उदाहरणें सावरकर देतात. आत्मौपम्य दृष्टीने गाय मरु न देणे नीतियुक्त आहे, पण वाघाच्या तावडीतून तिला सोडवून वाघाच्या आत्म्याला दुःखी करणे, हेही अनीतीचे आहे. नुसते पाहत बसले तर गाय मरते, हेही तिच्या आत्म्याला दुःख होते म्हणून अनीतीचेच होणार. तेव्हा आत्मौपम्याची कसोटी लावून नीतिकल्पना ठरविणे पूर्णतः अव्यवहार्य व नको ते नैतिक घोटाळे निर्माण करणारे आहे, असे सावरकरांचे टिळकांच्या प्रतिपादनाला उत्तर आहे.

शुद्धबुद्धीची कसोटी ?

कोणते कर्म पुष्कळाचे पुष्कळ हित करु शकतें हे ठरविण्याची उपयुक्ततावाद्याची कसोटी कोणती,असा टिळकांनी प्रश्न उपस्थित केलेला आहे.टिळकांचे म्हणणे असे की, ही गोष्ट प्रत्येकाच्या बुद्धीवर ठेवली तर ती 'भुताच्या हाती कोलीत' दिल्यासारखे होईल. त्यासाठी शुद्धबुद्धीचे जे थोर साक्षात्कारी पुरुष होउन गेले, त्यांनी जे कर्म करणे हितकारक सांगितले, ते मनुष्यानी केले पाहिजे. त्या शुद्धबुद्धी असणाऱ्या महापुरुषाच्या आज्ञा हे कर्म ठरविण्याची कसोटी होय, असे टिळकांचे म्हणणे आहे. यासाठी आपणाला श्रुतिवचनालाच शरण गेल्याशिवाय अिलाज नाही, असे ते म्हणतात, त्याचा अर्थ हाच होय. टिळकांच्या या भूमिकेचे खंडन करताना सावरकर म्हणतात, [१४] " कोणते कर्म पुष्कळाचे पुष्कळ हित साधील हे ठरविणे जरी समयविशेषी कठीण जाते आणि ते हित मोजण्यास जरी तपमापकाप्रमाणे एखादे यंत्र निघाले नसले, तथापि कोणाची शुद्धबुद्धी आहे हे ठरविण्यासही तसे यंत्र निघालेले नाही. श्रीकृष्णाला स्वार्थी व अशुद्धबुद्धी म्हणणारे शिशुपाल व बुद्धाला दांभिक सुखलोलुप म्हणणारे देवदत्त जर निघू शकतात, तर तेथे इतरांचा काय पाड ! इतकेच नव्हे तर कोणाची शुद्धबुद्धि आहे हे मापन करण्यास कमी अधिक प्रमाणात समर्थ असे कोणचे साधन असेल तर ते त्यांचे बाह्यवर्तन, त्याचा व्यवहार जगहितार्थ, भूतहितार्थ म्हणजेच शक्य तेवढ्या मनुष्यांच्या वा मनुष्यजातीच्या शक्य तितक्या हितास अनुकूल आहे का नाही, ही उपयुक्ततावादाची कसोटी लावूनच पाहणे हेच होय." आणि मग स्थितप्रज्ञता व शुद्धबुद्धी प्राप्त झालेल्या महापुरुषासही विशेष प्रसंगी केवळ आत्मैक्याच्या किंवा साम्यबुद्धीच्या कसोटीचा आश्रय पुरेसा न पडून त्यांनाही हीच लोकहितसंग्रह, दुष्टबुद्धिविनाश

म्हणजेच पुष्कळाचे पुष्कळ सुख या तत्वाचीच कसोटी लावावी लागते, असे सावरकर सांगतात. ही कसोटी कुणालाच चुकलेली नाही हे पटवून देतात. कृष्णाने कंस मारण्याची कसोटी हीच होती, असे ते म्हणतात. साम्यबुद्धीच्या आध्यात्मिक भाषेपेक्षा उपयुक्ततावादाच्या परिभाषेनेच नैतिक कर्तव्य चांगल्यापैकी ठरविता येते, असे त्यांना वाटते. शुद्धबुद्धीचा पुरुष म्हणून ते कुणालाही प्रमाण मानायला तयार नाहीत. तो शुद्धबुद्धीचा कशावरुन असा बुद्धिवादी प्रश्न सावरकर विचारतात. पाश्चात्य नीतिवेत्त्यावरील टिळकांचे सर्व प्रमुख आरोप सावरकरांनी अशा प्रकारे आपल्या या लेखात खोडून काढले आहेत. तेव्हा विवेकानंद–टिळक आदी भारतीय अध्यात्मवाद्यांचा नीतिविचार सावरकरांचा बुद्धिवाद मान्य करायला तयार नाही, हे समजून घेतले पाहिजे.

साधनाची नैतिकता

नीतिविचाराला जसे धर्मशास्त्राचे अधिष्ठान सावरकरांना मान्य नाही, तसेच आध्यात्मिक अधिष्ठानही मान्य नाही. टिळकांची वरील भूमिका अध्यात्मवाद्यांची प्रतिनिधिक भूमिका म्हणून आम्ही विचारात घेतली आहे. सावरकरांना नीतिशास्त्र हे श्रद्धेच्या ऐवजी बुद्धीवर, अध्यात्म्याच्या ऐवजी भौतिकतेवर, विश्वासाच्या ऐवजी वास्तवतेच्या भक्कम पायावर उभे करावयाचे होते. ही एक फार मोठी विचारक्रांती होती. मनुष्यहित हे त्यांचे अंतिम ध्येय होते. या ध्येयाची पहिली पायरी म्हणून राष्ट्रहित हे त्यांचे सांप्रत ध्येय होते. या राष्ट्रहितासाठी जे जे साधन वा मार्ग उपलब्ध होते, ते ते साधन व मार्ग काही मर्यादेपर्यंत त्यांना पवित्र व नैतिकच वाटतात. ते म्हणतात,[२५] "जे जे साधन पवित्रमय साध्याचे सिद्धीस्तव अपरिहार्य नि अंति मनुष्य हितास लाभकारक ठरते, ते त्याचे अवलंबन पवित्रच होय." नीतिशास्त्राचे शास्त्रीय सिद्धांत मांडताना सावरकर हे सांगत नाहीत, तर शिवाजी आग्र्याहून पळून आले, या त्यांच्या मार्गाच्या संदर्भात हे सूत्र त्यांनी सांगितले आहे. राष्ट्रासाठी सावरकर कोणताही मार्ग वा साधन वापरण्यासाठी तयार होतात, असा कुणाचा समज असला तर तो पूर्णपणे चुकीचा आहे.

कोणत्याही साधनाला दोन कसोट्यांना उतरावे लागेल. पहिली म्हणजे, ते साधन त्या साध्यासाठी अपरिहार्य पाहिजे. आणि दुसरी म्हणजे, ते साधन अंतिमतः त्या मनुष्यहितास लाभकारक असले पाहिजे. या दोन कसोट्याना उतरलेल्या साधनाला साध्याच्या शिवाय वेगळे स्वतंत्र महत्व द्यायला सावरकर तयार नाहीत. याचा अर्थ कोणतेही साधन योग्यच असा नसून विशिष्ट परिस्थितीच्या संदर्भात योग्य तारतम्याने या वरील कसोट्या लावून ते ठरविले पाहिजे, असा आहे. महात्मा गांधी आणि सावरकर यांच्यामध्ये याबाबतीत असलेली मतभिन्नता नीट समजून घेतली पाहिजे. साधन शुचिताही त्या त्या परिस्थितीच्या संदर्भात तारतम्याने विचार करुन ठरवायची गोष्ट असते, ही सावरकरांची भूमिका आहे. साधन

शुचिता हा गांधीजींचा अपरिवर्तनीय व परिस्थिती निरपेक्ष असा धर्म आहे. मानवाचे अंतिम हित साध्रण्याचा एक मार्ग अेवढेच सावरकरांच्या लेखी त्याचे मूल्य आहे, तर गांधीजींच्या मते ते एक स्वयंभू असे मूल्य आहे. साधन जर योग्य नसेल, तर त्यायोगे येणारे साध्यही नाकारायला गांधीजी तयार आहेत. सशस्त्र-क्रांतीने व हिंसेने येणारे स्वातंत्र्य त्यांना नको होते, याचे कारण ही साधनशुचिता होय. कोणत्याही साधनाला सावरकर धार्मिक, अध्यात्मिक वा अितर कोणतेही परिस्थिती निरपेक्ष मूल्य द्यायला तयार नाहीत. त्यांच्या बुद्धिवादाचा हा अपरिहार्य असा परिणाम आहे. साधनाच्या नैतिकतेचा त्यांचा आधार व कसोटी, त्या साधनाने किती मनुष्यहित होते हाच आहे.

नीति-अनीतीच्या साऱ्या कल्पना ही मानवाची निर्मिती आहे; मानवहित हा त्याचा केंद्रबिंदू आहे; हे हित अैहिक हित आहे; हे हित पाहून त्या कल्पना बदला त्याचा मनुष्याला अधिकार आहे-या गोष्टी अेकदा मान्य केल्या की, त्या नीतिकल्पनेचा धर्माशी, अध्यात्माशी व ईश्वराशी असलेला संबंध पूर्णपणे तुटला जातो. एखाद्या गोष्टीच्या यशापयशात पाप-पुण्याचा, नीति-अनीतीचा, चांगल्या-वाईटाचा संबंध असतो, या बद्दलच्या आपल्या पारंपारिक कल्पना पार उध्वस्त होतात. या संबंधीची सावरकरांची मते-नि निष्कर्ष अतिशय धक्का देणारी आहेत.

भगवंताचे अधिष्ठान

'अीश्वराचे अधिष्ठान म्हणजे काय?' हा लेख त्यांनी नैतिक कल्पना आणि अैहिक यशापयश यांच्या संबंधाची चर्चा करण्यासाठीच लिहिला आहे. 'सामर्थ्य आहे चळवळीचे ! जो जो करील तयाचे! परंतु तेथे भगवंताचे! अधिष्ठान पाहिजे!' या रामदास स्वामीच्या ओवीवर सावरकरांनी केलेले ते एक बुद्धिवादी भाष्य आहे. बुद्धिवादाच्या तीक्ष्ण व भेदक दृष्टीने दाखले देत काढलेले कठोर निष्कर्ष या लेखात आहेत.

'परंतु तेथे भगवंताचे अधिष्ठान पाहिजे !' या ओवीचा व्यवहारात कोणता अर्थ घेतला जातो, त्या विषयी सावरकर म्हणतात, [१६] "सामान्यतः तिचा अर्थ असाच घेण्यात येतो की, मनुष्य ज्याला त्याच्यापरी नीति वा अनीति म्हणतो, न्याय वा अन्याय म्हणतो, दैवी संपत वा आसुरी संपत म्हणतो, धर्म वा अधर्म म्हणतो, त्यापैकी पहिले सत्य नि दुसरे असत्य असून, जी चळवळ त्या मानवी सत्याच्या पायावर उभारलेली असते, त्या मानवी न्यायाला पोषक असते, त्या मानवी धर्माचे ब्रीद मिरविते, तीच काय ती यशस्वी होते ! अीश्वर तिच्यावर कृपा करतो, अशा अर्थी अीश्वराचे अधिष्ठान तिला लाभत नाही, ती चळवळ कितीही प्रबल असली तरी ती यशस्वी होत नाही. यास्तव चळवळ करणाऱ्यांनी प्रथम ते भगवंताचे अधिष्ठान संपादिले पाहिजे." सावरकरांची ही भूमिका आपण काळजीपूर्वक समजून घेतली पाहिजे. सावरकरांची टीका देवभोळेपणावर वा धर्म-

भोळेपणावर नाही. ओश्वर नावाची कोणती एखादी शक्ती यश मिळवून देते, ही आदिदैविक भूमिका बाजूला सोडून, मानवी मूल्यावर म्हणजे सत्य, न्याय इ. मूल्यांवर आधारलेल्या चळवळीलाच यश मिळते, या आध्यात्मिक भूमिकेतून सावरकरांच्या वरील निष्कर्षाचा विचार केला पाहिजे. माणूस धार्मिक वा आध्यात्मिक असो वा नसो, ज्याचा पक्ष सत्याचा व न्यायाचा आहे, त्याचा विजयच होत असतो, या सिद्धांतावर त्या प्रत्येक माणसाचा आजही किती अढळ विश्वास आहे, हे आपण रोजच अनुभवतो आहोत. या सिद्धांतावर आपला जो विश्वास आहे, त्या विश्वासाचे कारण, तो सिद्धांत सत्य आहे का, वास्तव आहे का, निरपवाद आहे का, तो अतिहासाने सिद्ध झाला आहे का–या प्रश्नाच्या अनुकूल उत्तरात नसते. या उदात्त मूल्याच्या प्रस्थापनेसाठी, वृद्धीसाठी असा विश्वास असावाच लागतो, हे आपल्या ह्या विश्वासाचे कारण असते. असा विश्वास ठेवला नाही, तर मानवी जीवनाला काही अर्थच उरणार नाही, असे आपल्याला वाटत असते. सावरकर केवळ धर्मग्रंथीय पोथिनिष्ठा वा ओश्वरांचे अधिष्ठानालाच उध्वस्त लावण्याचा प्रयत्न करत नाहीत, तर या आपल्या विश्वासालाही सुरुंग लावण्याचा व तेही उध्वस्त करण्याचा प्रयत्न करतात. हा विश्वास वास्तव नाही, सत्य नाही, अतिहासाचे पुरावे याच्या विरोधी आहेत, असे सावरकरांचे म्हणणे आहे. जे वास्तव नाही, सत्य नाही, त्यावर ते तसे आहे म्हणून विश्वास ठेवणे म्हणजे एक प्रकारची अंधश्रद्धाच आहे, पोथिनिष्ठाच आहे ! सावरकरांचा बुद्धिवाद हीही पोथिनिष्ठा मानायला तयार नाही !

आपल्याला जी मानवी मूल्ये उदात्त वाटतात, आजवर तशी ती समजली गेली व ती तशीच राहिली पाहिजेत, असे आपल्या सद्सद्विवेक बुद्धीलाही वाटत असते, ती तशी आपल्याला का वाटतात, हा सावरकरांचा मुलभूत प्रश्न आहे. कोणत्याही नीतिशास्त्राचा हाच मुलभूत प्रश्न असतो. टिळक – विवेकानंदासारखे आध्यात्मिक पुरुष आध्यात्मिक निष्ठा हे या मानवी मूल्याच्या स्वीकाराचे कारण आहे, असे सांगतात. आपल्या आत्म्याला, आपल्या अंतःकरणाला ही मानवी मूल्ये उदात्त वाटतात, हीच ती आध्यात्मिक निष्ठा आहे. आपल्या बुद्धीला एखादी गोष्ट पटते तशा पद्धतीचे हे पटणे नसते, हे समजून घेतले पाहिजे. आत्म्याला पटणे याचा आध्यात्मिक अर्थ असा आहे की, शुद्धबुद्धी प्राप्त झालेल्या, साम्यावस्थेत पोहचलेल्या वा ब्रम्हपद प्राप्त झालेल्या थोर महापुरुषानी जे उदात्त म्हणून सांगितले त्यावर श्रद्धा ठेवणे होय. सावरकरांना हे मान्य नाही. शुद्धबुद्धीचा वा ब्रम्हपदास गेलेला म्हणून कुणालाही प्रमाण मानायला सावरकर तयार नाहीत. नैतिकमूल्यांच्या, टिळक म्हणतात त्या, आध्यात्मिक अधिष्ठानाचे उच्चाटन करणे हा सावरकरांचा हेतू आहे. ही गोष्ट चांगली का वाईट हा स्वतंत्र प्रश्न आहे. सावरकरांच्या भूमिकेचे वास्तव आकलन हा आपला प्रधान हेतू आहे. एखादी गोष्ट चांगली का, उदात्त का, याचे कारण जो पर्यंत त्या गोष्टीच्या चांगलेपणावर वा उदात्तपणावर आपली

श्रद्धा आहे एवढेच असते, तो पर्यंत सावरकरांच्या दृष्टीने ती एक पोथिनिष्ठाच ठरते. प्रत्येक गोष्टीला बुद्धिनिष्ठ कारण दिलेच पाहिजे, हा सावरकरांचा बुद्धिवादी सिद्धांत आहे. मानवानी मानलेली उदात्त मूल्येही या सिद्धांताच्या कसोटीतून सुटत नाहीत. त्यांच्या नीतीविचाराचा पाया बुद्धी हा आहे, याचा अर्थ हा असा आहे.

मानवी हिताला जे जे विचार वा आचार अंतिमतः हितकारक असतात तीच मानवाची मानवीमूल्ये आहेत; ती ज्या प्रमाणात अधिकतर हितकारक असतात, त्या प्रमाणात अधिक उदात्त असतात, अशी सावरकरांची भूमिका आहे. मानवी मूल्ये मान्य असण्या-नसण्याचा हा प्रश्न नाही. ती मूल्ये कोणत्या कसोटीने ठरवावीत, हा प्रश्न मुख्य आहे. सावरकरांचे नारदमुनी म्हणतात,[१७] "मानवाला एकंदरित ज्या परिस्थितीत जे उपयुक्त ते चांगले, ते पुण्य; जे अनुपयुक्त ते त्या परिस्थितीत वाईट, पाप! हा मानवाचा मानवधर्म! और सब कुछ झूट!"

संताचा काळ

एखाद्या कार्याला तथाकथित परंपरागत मानवी मूल्याचे अधिष्ठान असले तरीही यश कसे मिळत नाही, हे दाखविण्यासाठी ऐतिहासिक पुरावा देताना सावरकर म्हणतात,[१८] "रामदेवराव गोब्राह्मणप्रतिपालक होता, न्यायी होता, त्याच्या पक्षास सत्य होते, भगवंताचे अधिष्ठान त्याच्या राज्याचे अधिष्ठान होते! पण त्याच्या राज्याचा चक्काचूर उडविला! कोणी? जो अन्यायी होता, ज्याच्या पक्ष आत्यंतिक असत्याचा, पक्षपाती, जो केवळ गोब्राह्मणविध्वंसक, यज्ञनिंदक, मूर्तिभंजक..." या असल्या महापातकी अल्लाउद्दिनानी देवाच्या, न्यायाच्या, सत्याच्या राज्याच्या ठिकऱ्या का उडविल्या, असा सावरकरांचा प्रश्न आहे. जगाच्या इतिहासातील न्यायपक्षाचा पराभव झालेल्या व अन्यायी पक्षाचा विजय झालेल्या अनेक घटनांचा उल्लेख करुन ते म्हणतात,[१९] "ख्रिस्ती भौतिक सामर्थ्यानी दुर्बल होते, तेव्हा मुस्लिमांनी ख्रिस्तांना जिंकले; मुस्लीम आपसातील फाटाफूट, अज्ञान, भिरुता यानी दुबळे होताच ख्रिस्त्यांनी मुस्लिमांस जिंकले; कुराणाच्या शास्त्रास ख्रिस्त्यांनी लटके पाडले नि ख्रिस्त्यांच्या बायबलाला कुराणानी लटके पाडले." अशी कितीतरी उदाहरणे सावरकरांनी दिलेली आहेत. हिंदूनी मुसलमानावर विजय मिळवून हिंदुपदपादशाही कशी स्थापिली, हे सांगताना सावरकर म्हणतात,[२०] "आणि आश्चर्य हे की, जो जो स्नानसंध्याशील देवाचे अधिष्ठान सुटत चालले, महाराष्ट्रात संतमहंताचे पीक हटत चालले, धार्मिक उपायापेक्षा भौतिक साधनावर अधिक भर पडत चालला, देवाचे अधिष्ठान कमी कमी होत चालले, तो तो यशाचे माप पदरी भरभरुन पडत चालले." धार्मिकतेचा, अध्यात्माचा व न्यायीपणाचा यशाशी असलेला संबंध तोडून तो भौतिकतेशीच ते कसा जोडतात, हे यावरुन स्पष्टपणे दिसून येते. 'संतमहंताच्या पिकाचा' राष्ट्राच्या

यशाशी सावरकरांनी जो संबंध लावला आहे, तो कोणत्याही धार्मिक माणसाला मान्य होणारा नाही, सहन होणारा नाही, इतका धक्कादायक आहे. समाजकारणात गुरुस्थानी मानलेल्या न्या. रानडे यांच्या विचाराच्या नेमके विरुद्ध टोकाचे हे विचार आहेत, हे समजून घेतले पाहिजे.

अध्यात्म्याचा उपयोग

'मराठी सत्तेचा उत्कर्ष' हचा न्या. रानडे यांच्या अितिहासग्रंथात संताच्या कामगिरीचे जे महत्व त्यांनी वर्णन केलेले आहे, ते लक्षात घेतले म्हणजे, हे दोन पुरुष अध्यात्माकडे किती विभिन्न भूमिकेतून पाहतात, हे लक्षात येईल. 'महाराष्ट्रातील साधुसंत' हे स्वतंत्र प्रकरणच या ग्रंथात आहे. संताच्या राष्ट्रीय कामगिरीचे अंतिम मूल्यमापन करताना न्या. रानडे म्हणतात, [२१] "या सर्व तऱ्हेनी राष्ट्रास आचारशक्ती व विचारशक्ती यामध्ये श्रेष्ठत्व आणून देण्यास या चळवळीचा उपयोग झाला, व परधर्मी सत्तेच्या ठिकाणी एकजुटीची एतद्देशीयसत्ता पुन्हा प्रस्थापित करण्याच्या महत्कृत्यात पुढारीपणा घेण्यास महाराष्ट्र देशाची तयारी करुन दिली." संताच्या पारमार्थिक व आध्यात्मिक शिकवणुकीमुळे हे शक्य झाले असा न्या. रानडे यांचा निष्कर्ष आहे. रानडे हे भक्तिमार्गी पुरुष आहेत. संताच्या भक्तीचा मार्ग, नामाचा महिमा त्यांना पूर्णतः पसंत होता व त्या मार्गाचे ते प्रत्यक्ष प्रसारक होते. त्यांच्या धर्मपर व्याख्यानातील प्रत्येक शब्द या भक्तिभावाने ओथंबलेला आहे. त्यांच्या प्रार्थनासमाजाच्या ध्येयाला तो भक्तिमार्ग अनुकूल होता. सावरकर नेमके याच्या उलट भूमिका घेतात. 'भक्तीचा आनंद आध्यात्मिक आहे, त्या योगे व्यावहारिक अशी कोणतीही विशेष योग्यता वा सृष्टिनियमाचे ज्ञान किंवा राष्ट्राला अैहिक उत्कर्षाला उपयोगी पडेल अशी कोणतीही विशेष गोष्ट, विशेष शक्ति, वा युक्ति संताच्या, योग्याच्या वा भक्ताच्या अंगी येत नाही..... नामाचा महिमा एक प्रकारचा आध्यात्मिक आनंद त्या व्यक्तीला देवू शकला तरी त्या व्यक्तीच्या वा राष्ट्राच्या व्यवहारात त्या नामाच्या महिम्याची कवडीची पत नाही." असे सावरकरांनी अगदी निःसंदिग्धपणे म्हटले आहे. [२२] हचा अध्यात्माचे महत्व 'अिहलोकातील खडतर जीवनामुळे त्रस्त झालेल्या मनाला आजूबाजूच्या परिस्थितीचा विसर पाडण्यास नि ब्रह्मानंदासारखा आनंद देण्यास' उपयोगी पडण्यापुरता मर्यादित आहे, असा त्यांचा निष्कर्ष आहे. [२३] याचा सरळ अर्थ असा होतो की, ज्या सभोवतालच्या परिस्थितीशी अैहिक कर्तव्य म्हणून मनुष्याला टक्कर व तोंड द्यायचे आहे, त्या कर्तव्यापासून विन्मुख होण्यासाठी, त्या कर्तव्यविन्मुखतेचेही विस्मरण होण्यासाठी अध्यात्माचा उपयोग होत असतो. कर्तव्य न करण्याची व तरीही सुखात राहण्याची ती एक उत्तम सोय आहे. बुद्धिवादावर आणि मनुष्याच्या अैहिक कर्तव्यावर त्यांचा अेवढा प्रगाढ विश्वास आहे की, जनमानसाच्या अंतःकरणात खोलवर स्थान असलेल्या संतमहं-

ताच्या कर्तृत्वाचे सर्व मोल राष्ट्रीय दृष्टीने प्रायः शून्यावर आणून ठेवण्यात त्यांना कुणाच्याही भावनेची वा श्रद्धेची कदर वा चिंता करावी वाटत नाही.

भगवंताच्या अधिष्ठानाबद्दलचा सिद्धांत मांडताना सावरकर म्हणतात, [२४] "मनुष्यानी आपल्या लहरीप्रमाणे ज्या धर्माधर्माच्या, न्यायान्यायाच्या, पापपुण्याच्या बऱ्यावाईट कल्पना केल्या, त्याचा देवास काही पक्षपाती अभिमान दिसत नाही. तेव्हा ज्यांना ज्यांना आपल्या चळवळीस यश हवे, त्याने त्याने आपल्या पक्षास न्याय आहे, आपल्या पक्षास देव आहे, सत्य आहे, यास्तव तो आमचा पक्ष विजयी होणारच, अशा वलगना करण्याचे आणि आंधळ्या निष्ठेत निश्चित राहण्याचे सोडून धार्मिक अर्थी भगवंताच्या अधिष्ठानाच्या नादी न लागता 'सामर्थ्य आहे चळवळीचे, जो जो करील तयाचे' इतकेच काय ते खरे मानावे."

तत्व आणि तलवार

जगाच्या व्यवहारात ज्याला आपण न्याय वा पुण्य म्हणतो, त्यांच्या संपादनासाठी व संरक्षणासाठीच सुद्धा भौतिक सामर्थ्याचीच उपासना केली पाहिजे, असा सावरकरांचा आग्रह आहे. केवळ न्यायाने न्याय, पुण्याने पुण्य टिकत नाही, तर या चांगल्या गोष्टीसाठीही भौतिक सामर्थ्याचीच गरज आहे, हे सांगताना सावरकर म्हणतात, [२४] "अन्यायी, परोपद्रवी व्हावे असे नव्हे; तर न्याय झाला तरी तो 'समर्थ' नसेल तर व्यर्थ होय. दुर्बल पुण्याअीही पंगू आहे, हे विसरु नये." अशा प्रकारे सावरकर व्यवहारातील एक कठोर व कटु सत्य मांडत असतात. न्याय, सत्य, उदात्तमूल्ये इ.चा सातत्याने उद्घोष सावरकरांनी केला नाही. उदात्ततत्वाच्या शाब्दिक घोषबाजीमध्ये त्यांना रस नव्हता. ती उदात्तमूल्ये कशी प्रस्थापित करता येतील व ती तशी केल्यानंतर कशी टिकविता येतील, याचीच त्यांना चिंता होती. सावरकर म्हणतात ती वस्तुस्थिती नसती, तर राज्यसंस्था उभी करण्याची आपल्याला गरजच पडली नसती. सैन्य ठेवण्याचीही पडली नसती नि न्यायसंस्था उभी करण्याचीही पडली नसती. न्याय देण्यासाठीही भौतिक सामर्थ्य लागते. मानवी मूल्ये ही केवळ चांगली असतात, एवढ्याच गुणवत्तेखातर टिकत नसतात, यशस्वी होत नसतात, वा निर्माणही होत असतात. या मूल्यांच्या पाठीमागे भौतिक सामर्थ्य उभे करावे लागते, हा व्यावहारिक सिद्धांत त्यांनी मांडला आहे; आपल्या आयुष्यभर प्रचारला आहे, आचरला आहे. जोसेफ मॅझिनी म्हणतात, "मोठ्याल्या क्रांत्या ह्या तलवारीपेक्षा तत्वानीच घडवून आणलेल्या असतात." यात कुणाला वाद असण्याचे कारण नाही. सावरकरांनाही हे तत्व मंजूरच आहे. पण ते हे तत्व कोणताही प्रतिवाद न करता एकदम स्वीकारत नाहीत. तत्वाच्या घोषणाबाजीपेक्षा त्याच्या रक्षणाचीच त्यांना चिंता अधिक असते. सावरकरांचे या बाबत म्हणणे असे की, "पण तलवारीशिवाय तत्वाचा जय होत नाही, ही दुःखाची गोष्ट आहे." सावरकर नेहमीच या दुःखाच्या बाजूने आहेत. तत्व आणि तलवार या गोष्टी या जगात

परस्परपूरक आहेत, अशी त्यांची भूमिका आहे. ते पुढे म्हणतात, "परंतु या तलवारीचे अग्रभागी जर सत्याचे अधिष्ठान नसते तर त्या तलवारीला तिने (अहिंसेने) स्पर्शही केला नसता"[२५] मानवीमूल्ये आणि भौतिक सामर्थ्य याचा सावरकरांनी लावलेला संबंध हा असा आहे. सावरकर उदात्तमूल्यांच्या विरोधी नाहीत. किंबहुना ते म्हणतात त्या प्रमाणे ह्याच मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी त्यांनी आपले सर्व जीवन वाहिले आहे. त्यांच्या जीवनाचा, चिंतनाचा खरा विषय ही उदात्त-मूल्ये प्रत्यक्षात कशी आणावीत हा होता!

ही मानवी मूल्ये स्वयंभू नसतात, ती स्वयंशक्तिमान नसतात, एवढेच त्यांचे म्हणणे होते. सावरकरांची ही भूमिका समजून न घेता, त्यांच्या भूमिकेचे विकृती-करण केले जाऊ शकते. डॉ. य. दि. फडके सारखे विद्वान अशी संधी सोडत नसतात. ते म्हणतात,[५३] "राजकारणाला किंवा चळवळीला भगवंताचे अधिष्ठान आहे की नाही, याची फारशी फिकीर करण्याचे कारण नाही; शस्त्रबळाचे अधिष्ठान असले म्हणजे झाले, असा सावरकरांचा सूर होता." सावरकरांच्या भूमिकेचे हे विकृतीकरण आहे, हे समजून घेतले पाहिजे. चळवळ ही भगवंताच्या अधिष्ठानासाठी, म्हणजेच भगवंताला मान्य असलेल्या मूल्यासाठी असावी हेच सावरकरांना मान्य नव्हते; चळवळ कशासाठीही असली तरी चालेल, असे त्यांचे म्हणणे होते; शस्त्राचे प्रयोग करण्यासाठी प्रयोगशाळा म्हणून त्यांना चळवळ हवी होती, असा डॉ. फडके यांच्या प्रतिपादनाचा सूर आहे. सावरकरांना काळजीपूर्वक समजून घेण्याची किती गरज आहे, हे यावरुन आपल्या लक्षात येईल.

सद्‌गुणविकृती

'कोणताही सद्‌गुण का मूलतः सदगुण नसतो' हा सावरकरांचा व्यावहारिक सिद्धांत आहे. मनुष्याच्या उपयुक्ततेच्या दृष्टिकोणातून सावरकर सद्‌गुणासहित सर्व नीतीशास्त्राकडे पाहतात. सद्‌गुणाच्या साऱ्या व्याख्या देशकालपात्रानुसार ते ठरवितात. मनुष्याला हितकारक तो सद्‌गुण, अहितकारक तो दुर्गुण, अशी त्यांची भूमिका आहे. आजचा सद्‌गुण नव्या परिस्थितीत उद्या दुर्गुण होऊ शकतो. जो पर्यंत मनुष्याचे हित करतो तोपर्यंतच तो सद्‌गुण असतो. हितकारक नसतानाही सद्‌गुण आचरल्यास तो आत्मघातक ठरतो. अशा आचरणाला सावरकर 'सद्‌गुण-विकृती' म्हणतात. सद्‌गुण हा मनुष्याला हितकारक आहे का नाही हे न पाहता, तो केवळ सद्‌गुण आहे या कारणास्तव आचरणे म्हणजेच ही सद्‌गुणविकृती होय, अशी त्यांची भूमिका आहे.

'सहा सोनेरी पाने' या इतिहासविषयक ग्रंथात इतिहासाची समीक्षा करतांना 'सद्‌गुणविकृति' असे स्वतंत्र प्रकरणच त्यांनी लिहिले आहे. त्यात त्यांनी दाखवून दिले आहे की, देशकालपात्राचा विचार न करता कोणताही सद्‌गुण जरी आचरला तरी तो दुर्गुण होतो, अधःपतनास कारणीभूत होतो.

सावरकर म्हणतात,[२६] "मनुष्याची माणुसकी म्हणून उपदेशिले गेलेले सर्वच सद्‌गुण हे वस्तुतः केवळ सारे गुणच असतात. कोणताही एक गुण सर्व परिस्थितीत सद्‌गुण असतो असे नाही. येथे एवढेच सांगणे प्रर्याप्त आहे की, व्यवहारात आणि नीतीशास्त्रात तरी गुण हा जेव्हा मनुष्यजातीच्या हितास उपकारक ठरतो, तेव्हा तितक्या मर्यादेपर्यंतच तो सद्‌गुण समजला गेला पाहिजे. आणि जेथून तोच गुण मनुष्यजातीच्या घातास किंवा अधःपातास कारणीभूत होतो, तेथून त्याचे दुर्गुणात रुपांतर होते, तो त्याज्य ठरतो."

त्रैधातुक जग

——मनुष्याच्या स्वभावतच सात्विक, राजस व तामस असे नैसर्गिक भाव असतात, याचा उल्लेख करुन सावरकर पुढे म्हणतात,[२७] "हिंदूच्या संस्कृतीत मनुष्याला देवत्वाप्रत पोहचण्यासाठी आकांक्षा बाळगून मनुष्याच्या अंगात सात्विक भाव उत्पन्न करण्याची पराकाष्ठा केली. परंतु जग हे केवळ सत्वाच्या एकाच धाग्याने विणलेले नाही, ते त्रैधातुक आहे; सत्व, रज आणि तम या तीन धाग्यानी ते विणलेले आहे." आणि म्हणून व्यवहारात यशस्वीपणे जगायचे असेल तर हे त्रिशूली साधनच वापरले पाहिजे, असा सावरकरांचा आग्रह आहे. सत्य, अहिंसा, परोपकार, औदार्य, परधर्मसहिष्णुता, दया, निःपक्षपातीपणा, क्षमा वीरस्य भूषणम्, शत्रू स्त्रीदाक्षिण्य इत्यादी जे मानलेले सद्‌गुण आहेत, त्याचा देशकाल-पात्रापात्र विवेक न करता आचार केल्यामुळे हिंदूची कशी हानी झाली याचे विदारक असे वर्णन अितिहासाचे दाखले देवून सावरकरांनी केलेले आहे. ते म्हणतात[२८] "म्हणून ज्या विवेकशून्य नि बुद्धिभ्रष्ट मनुष्याच्या हातून तसा गुण सद्‌गुण म्हणून पोथिनिष्ठपणे आचरला जातो, धर्म म्हणून हटाटाने आचरला जातो, त्याचा व्यक्तिशः आणि राष्ट्रतः आमूलात् विध्वंस झाल्यावाचून राहणार नाही. असे सद्‌गुण नसून ते सद्‌गुणाची विकृति होय. देशकालपात्राचा विवेक न करता जो जो सद्‌गुण वरील सारख्या बुद्धिभ्रंशापायी आचरला जातो तो सडलेला सद्‌गुण असतो, आणि सडलेल्या अन्नाप्रमाणे त्याचेच प्राणघातक विष बनते." केवळ सद्‌गुणापायी सद्‌गुण आचरणे हा बुद्धिभ्रंश आहे, विवेकशून्यता आहे, आत्मघातकीपणा आहे, असे रोखठोकपणे सावरकर बजावतात. बुद्धिवादाच्या कुशीतून जन्मलेल्या व देशकालपात्राच्या घर्षणीवर धार लावलेल्या उपयुक्ततावादाच्या खड्गाने सावरकर सद्‌गुणाचे एका झाकात दोन तुकडे करतात. पहिला विवेकी सद्‌गुणाचा, दुसरा अविवेकी सद्‌गुणाचा. पहिला हितकारक, दुसरा आत्मघातक. पहिले अमृत्, दुसरे विष. पहिला खऱ्या अर्थी सद्‌गुण, दुसरा केवळ सद्‌गुणविकृती. पहिला आचरणीय, दुसरा त्याज्य !

हिंदुमनाची प्रतिक्रिया

देशकालपात्राच्या उपनेत्रातून उपयुक्ततेची कसोटी लावून सावरकर सद्-

गुणाकडे पाहतात, ही कल्पनाच क्रांतिकारक आहे. एखाद्या मानवानी मान्य केलेल्या उदात्तमूल्याची (उदा. मानवता) किंवा एखाद्या सद्गुणाची (उदा. सत्य) सावरकर उपयुक्ततेच्या दृष्टीतून चिकित्सा करतात, तेव्हा लौकिक अर्थाने ते एक तत्वभंजन असते, मूल्यभंजन असते, तत्वाचे– मूल्याचे अवमूल्यन असते ! आणि सावरकर हे आग्रहाने, प्रभावीपणे व पोटतिडकीने करतात. मनुष्य परमेश्वरावर जशी श्रद्धा ठेवतो, तशीच उदात्तमूल्यांवरही श्रद्धा ठेवत असतो. मनुष्याचे मनुष्यपण, त्याची थोरवी अशा उदात्त–मूल्यांवर श्रद्धा ठेवण्यातच असते, याची त्याला तीव्र-जाणीव असते. जे जे तत्वज्ञ वा थोर महापुरुष या जगात होवून गेले, त्या त्या सर्वांनी उदात्तमूल्याचीच मानवाला शिकवण दिली. जे जे धर्मपंथ या जगात उदयास आले, त्या सर्वांची एकमुखी श्रद्धा हीच होती. उदात्तमूल्यांचीच शिकवण देत सारे धर्म अवतरले आहेत. उदात्तमूल्यांवरील निष्ठा हा माणुसकीचा अमोल ठेवा आहे, असे समजूनच प्रत्येकजण त्यावर श्रद्धा ठेवीत असतो. प्रत्यक्ष व्यवहारात ही उदात्तमूल्ये आचरण्याशी, त्या उदात्तमूल्याचा संबंध नसतो. ती उदात्त आहेत, त्यावर निष्ठा ठेवलीच पाहिजे, ती आचरलीच पाहिजेत, यावर प्रत्येकाची निष्ठा असते. प्रत्यक्षात ती आचरणात आणण्याची बाब वेगळीच असते. तत्वतः आणि वैचारिक अर्थी मनुष्याची असलेली ही निष्ठा आहे. आणि सावरकर याच निष्ठेवर प्रहार करतात. तत्वतः आणि वैचारिक अर्थी उदात्तमूल्यांवर वा सद्गुणांवर अशी निष्ठा असणे ही गोष्ट वेगळी आहे. सावरकरांचीही या मूल्यावर अशीच प्रगाढ श्रद्धा होतीच. प्रश्न हा नाही. प्रत्यक्षात देशकालपरिस्थितीचा काहीही विचार न करता त्या मूल्यांचा, सद्गुणांचा आचार करणे अविवेकीपणाचे आहे, असे त्यांचे म्हणणे होते. ही सारी मूल्ये परिस्थितीनिरपेक्ष आहेत काय, हा खरा प्रश्न आहे.

व्यवहारात सावरकरांच्या या आग्रही मताचा अर्थ लोक असाच घेतात की, त्यांची या उदात्तमूल्यांवर, सद्गुणांवर निष्ठाच नाही; त्यांना या मूल्यांची चाड नाही; ते मानवी मूल्ये मोडीत काढीत आहेत; मनुष्याला मनुष्यपण–माणुसकी सोडून द्यायला सांगत आहेत; मनुष्याला अधःपतनाकडेच नेत आहेत. ' हिंदुमन ' जे आहे, त्याला तर निश्चितपणे असे वाटत असते. सावरकरांचे विचार पुढे ठेवून ते कसे सामान्य पुरुष आहेत, हे पटवून सांगणे सोपे असते. त्यासाठी फारसा पुरावा शोधावा लागत नाही. सावरकरांचा फारसा अभ्यासही करावा लागत नाही. त्यांच्या साहित्यातील वा भाषणातील कोणत्याही पानात सहजपणे सापडणारे असे एखादे विधान पुरावा म्हणून समोर ठेवले की, काम यशस्वी होते. उदात्तमूल्यांचे गुणगाण भजन करत एखाद्या संकटाकडे जाणे मनुष्य पसंत करतो, पण त्या उदात्त-मूल्यांच्या मुसक्या बांधून त्याला मनुष्याच्या व्यावहारिक हिताला जुंपणे, त्याच्या मनाला सहन होत नसते. विशेषतः हिंदूचे हे एक अनन्य साधारण असे वैशिष्ट्य आहे. धर्मग्रंथातील पोथिनिष्ठा कशी वाईट आहे, हे समजून सांगणे सोपे असते,

पण उदात्तमूल्यावरील ही पोथिनिष्ठा कशी वाईट आहे, हे पटवून सांगणे फार कठीण असते– याचाच हा अर्थ आहे. मात्र कुणाचीही, अगदी स्वतःच्या लोकप्रियतेचीही कसलीही पर्वा न करता सावरकर हीच गोष्ट एखादे सतीचे वाण घेतल्याप्रमाणे लोकांकडून संकुचितपणाचे शिव्याशाप खात जन्मभर जाणीवपूर्वक सांगत, मांडत राहिले आहेत ! त्यांच्याबद्दल गैरसमज होण्याला त्यांची हीच भूमिका मुख्यतः कारणीभूत झालेली आहे ! ते लोकप्रिय न होण्याचे कारणही हीच भूमिका आहे !

मर्यादित अहिंसा

सावरकरांची ही भूमिका काही निवडक सद्गुणासंबंधात आपण समजून घेवू. अहिंसा हा एक सद्गुण आहे. अहिंसेचे तत्वज्ञान मांडणाऱ्या गांधीजीच्या अहिंसेवर सावरकरांनी जन्मभर घणाघाती प्रहार केले. अहिंसेचे विरोधक म्हणून आपल्यासमोर सावरकर उभे टाकतात. मर्यादित अहिंसा गुण आहे, आत्यंतिक अहिंसा हे पाप आहे, दुर्गुण आहे, असा सिद्धांत सावरकरांनी मांडला. 'आत्यंतिक अहिंसेचे तत्व हे केवळ अव्यवहार्य, मानवी जीवनाला घातक आणि म्हणून पूर्णपणे अनीतिकारक आहे' [२९] असा त्यांनी टाहो फोडला. सावरकरांचा आक्षेप अहिंसेच्या कोणत्या भागाला होता, हे नीट समजून घेतले पाहिजे. गांधीजी अहिंसेचे नि सावरकर हिंसेचे पुरस्कर्ते, होते असे मतप्रदर्शन करणे केवळ अज्ञानमूलकच नव्हे तर मूर्खपणाचे ठरते. गांधीजी केवळ सशस्त्र प्रतिकाराचा निषेध करीत, असे नसून ते अहिंसा हे परिस्थिती निरपेक्ष असे अंतिम मूल्य समजत असत. ते शस्त्राचाही धिक्कार करत व या मार्गाने मिळणारे स्वातंत्र्यही नको असे म्हणत. त्यांच्या हया अहिंसेच्या विरोधात सावरकर उभे राहिले. मर्यादित अहिंसा 'एकंदर मानवी जीवनाला अत्यंत उपकारक असल्यामुळे तो अेक मोठा गुण असून आपले वैयक्तिक किंवा सामाजिक जीवन, किंवा आपल्या सर्व सामाजिक सुखसोयी त्यावरच आधारलेल्या आहेत' असे त्यांचे स्पष्ट मत होते. [३०] हिंसाच करावी असे त्यांनी कुठेही सांगितले नाही, सांगण्याची शक्यता नव्हती. काही प्रमाणात हिंसा ही मनुष्यास न टळणारी अपरिहार्य अनिष्टासारखी बाब आहे, अशी त्यांची वास्तव भूमिका होती. गांधीजीची अहिंसा जैनापेक्षा वेगळी होती, बौद्धापेक्षा वेगळी होती, असे त्यांचे म्हणणे होते. प्राचीन इतिहास काळात अहिंसेचा प्रादुर्भाव अतिशय वाढल्यामुळे आपल्या राष्ट्राला शत्रूच्या भक्ष्यस्थानी पडावे लागले होते, अशी त्यांची अितिहास मिमांसा आहे. गांधीजीची आत्यंतिक अहिंसा राष्ट्रासाठी असेच संकट निर्माण करुन ठेवील, अशी त्यांना भिती वाटत होती. ते म्हणतात, [३१] "आमच्या लोकांना क्षमायाचनेच्या भाषेत नव्हे, तर अगदी ठणठणीत शब्दांनी असे सुनावले पाहिजे की, हे आत्यंतिक अहिंसेचे खूळ हे केवळ अव्यवहार्य आणि अनैतिक तर आहेच, पण शिवाय त्यांत साधुत्वाची छटा कोठेच नसून सारा मूर्खपणा मात्र

भरलेला आहे. जेव्हा जगातील सर्व माणसे आत्यंतिक अहिंसेचे पालन करतील तेव्हा जगात युद्धच होणार नाही आणि सशस्त्र सैनिकांचीही त्यावेळेस गरज उरणार नाही, असे हे (म. गांधी) सांगतात, पण हे तत्वज्ञान सांगण्यास फारशी बुद्धि लागत नाही." सावरकरांचा अशा आदर्शवादावर विश्वास नव्हता, व ती आदर्श स्थिती आज आलीच आहे असे मानून तसे वागणे, त्यांना आत्मघाताचे व मूर्खपणाचे वाटते. 'मर्यादित अहिंसा हेच आमचे ध्येय आहे' असे त्यांनी म्हणूनच जाहीर केले. [३२]

अत्याचाराची व्याख्या

हिंसा हा एक प्रकारचा अत्याचार असतो. त्यासाठी बळ व शस्त्र वापरले जाते. अन्यायाच्या विरोधात, परपीडकाच्या बळाचा प्रतिरोध करण्यासाठी जे बळ उपयोजिले जाते तो अत्याचार नव्हे, तर तो सदाचार होय, असे सावरकरांना वाटते. "कारण सर्व सदाचाराची कसोटी जी लोकहितवर्धकता ती त्या कर्मास तंतोतंत आणि आत्यंतिकपणे लागू पडते. आघातक शक्ति ती अत्याचार; पण प्रतिघातक शक्ति ही सदाचार होय." असा सिद्धांत मांडून कंसाचे खड्ग हे अत्याचारी, तर श्रीकृष्णाचे खड्ग हे सदाचारी होय, असा ते निष्कर्ष काढतात. या दोन खड्गातील फरक दाखविताना ते पुढे म्हणतात, [३३] "दोन्हीही खड्गेंच, दोन्हीही शस्त्रेच, दोघांची कर्मेही बळ प्रयोगात्मकच, पण अेका खड्गाने लोकपिडेची परमावधि केली म्हणून ते पापी अत्याचारी आणि दंडच ठरले. दुसऱ्याने त्या लोकपीडक नराधमत्वाचे कैचीतून निष्पाप नि निरपराध जनतेची मुक्ति केली म्हणून ते दुसरे खड्गच लोकमंगलकारक व म्हणूनच सदाचारी आणि म्हणूनच पूज्यनीय ठरले." गांधीजीच्या आत्यंतिक अहिंसेच्या व्याख्येप्रमाणे प्रत्येक शस्त्राचार, बलप्रयोग हा अत्याचार वा हिंसा ठरतो. त्या पैकी कोणता पूज्यनीय, स्वीकारणीय व कोणता निषेधार्ह, दंडणीय हा विचार गांधीजीच्या मताप्रमाणे निरर्थक ठरतो. मात्र सावरकर या शब्दाच्या व्याख्या करुन या गोष्टी ठरवितात. सावरकर म्हणतात, [३४] "अन्याय आक्रमण करणारी शक्ति हीच तेवढी अत्याचारी असून न्याय प्रतिरोध करणारी शक्ति ही सदाचारी असते, ही या शब्दाची व्याख्या स्पष्टपणे ध्यानात धरली तर विचार विभ्रम नाहीसा होतो." न्यायालयात न्यायाधीश जो प्राणदंड देतो तो याच व्याख्याने अत्याचार वा हिंसा ठरत नाही. भारतीय दंडविधानात 'स्वसरक्षणाच्या' कलमाचा आधारही हीच व्याख्या आहे, असे सावरकर म्हणतात. ते आत्यंतिक अहिंसेचे विरोधक व मर्यादित अहिंसेचे पुरस्कर्ते होते, याचा अर्थ हा असा आहे !

हेतू महत्वाचा

त्यांच्या मते कोणत्या हेतूने वा कोणत्या ध्येयासाठी आपण शस्त्र वापरतो

त्यावर त्या शस्त्राची वा हिंसेची नैतिकता अवलंबून असते. 'शस्त्रे ना पाप स्वयेचि, शस्त्र ना पुण्य स्वये ! अिष्टता अनिष्टताही त्यास हेतुने ये !' हे त्यांचे शस्त्रविषयक सूत्र होते. सावरकरांची ही भूमिका माहीत असूनही डॉ. य. दि. फडके त्यांच्यावर मनाला येईल ते आरोप करतात. जनावरांच्या जगातले हे नियम लावून सावरकर मानवी जीवनाकडे पाहत होते, असे ते म्हणतात. माणसांना नेहमीच मारणे योग्य असते, असे सावरकरांचे मत आहे, असे समजून ते गंभीर प्रश्न करतात की, 'माणसांना मारणे नेहमीच योग्य ठरते का ?' 'मानवी जीवनातही ती (हिंसा) शक्यतो टाळण्याचा प्रयत्न करणे हा वेडेपणा कसा ठरतो ?'[अ] प्रत्येकाला धरले की मारलेच पाहिजे व शक्यतो सुद्धा हिंसा टाळण्याचा प्रयत्न मनुष्याने करु नये, असे सावरकरांनी कुठे सांगितले आहे, हे फडक्यांनाच माहीत !

शस्त्र कोणत्या हेतूने आपण वापरतो हे महत्वाचे आहे, असे सावरकर कंठशोष करुन सांगत असताना, डॉ. फडके म्हणतात,[आ] " एखादे हिंसक कृत्य अनिवार्य तसेच अिष्ट ठरविताना सावरकर त्या कृत्याच्या परिणामाचा मुख्यत: विचार करीत असत असे दिसते." किती खोडसाळ आरोप आहे हा ! आणि हे सारे विचार 'तत्वज्ञ' सावरकरांचे आहेत म्हणून ते वाचकांसमोर मांडत आहेत ! असे आरोप करण्यात त्यांना कोणता आनंद मिळत असेल कुणास ठाअूक ! !

गांधीजीची भूमिका

सावरकरांची ही भूमिका नीट समजून घेतली तर त्याबद्दल कुणाचाही वाद होण्याहा संभव नाही. गांधीजींची अहिंसा आत्यंतिक स्वरुपाची होती काय, हाच काय तो वादाचा विषय शिल्लक राहील. सावरकर बरोबर कां गांधीजी हा आपल्यासमोरचा दुय्यम प्रश्न आहे. सावरकरांची भूमिका कोणती हा मुख्य प्रश्न आहे. गांधीजी आत्यंतिक अहिंसेचे प्रचारक व पुरस्कर्ते आहेत, असे समजूनच सावरकर त्यांच्या त्या विचारावर तुटून पडतात. गांधीजींची अहिंसा ही शूराची अहिंसा होती, असे मानणारा एक विचारप्रवाह आहे. भित्रेपणापेक्षा मी हिंसाच पसंत करीन हे त्यांचे विधान सुप्रसिद्ध आहे. अपरिहार्य असेल तर हिंसाही केली, पाहिजे, असे गांधीजीचेही मत होते व म्हणून त्यांनी आत्यंतिक अहिंसेचा पुरस्कार केलेला नाही, असे मांडणारा हा विचारप्रवाह आहे. गांधीजीनाही मर्यादित अहिंसाच हवी होती, ही गांधीजींची भूमिका आपण वस्तुस्थिती म्हणून मान्य केली तर ही त्याची भूमिका सावरकरांना तत्व म्हणून मान्यच आहे, असेच आपल्याला म्हणावे लागेल. असे झाले तर दोघातील अहिंसाविषयक मतभेदच संपून जातात. सावरकरांनी गांधीजींच्या अहिंसेवरील टीका ही गैरसमजावर आधारलेली होती, असेच मत मग आपल्याला द्यावे लागेल.

वस्तुस्थिती अशी आहे की, गांधीजींची अहिंसेबद्दलची भूमिका सतत बदलत गेलेली आहे. कट्टर गांधीवाद्यांनाही ही गोष्ट मान्य करणे भाग आहे. सावरकर

गांधीजीच्या अहिंसेवर जेव्हा जेव्हा टीका करतात, तेव्हा त्या विशिष्ट परिस्थितीत गांधीजी अहिंसेबद्दल जी मते व्यक्त करीत, त्या मताच्या संदर्भातच ती टीका असे. सावरकरांचा 'स्वातंत्र्याचा मार्ग' हा लेख गांधीजींनी त्यावेळेस सत्याग्रहासंबंधी लिहिलेल्या एका लेखावरील टीकालेख आहे. गांधीजींचे म्हणणे असे: "जो सत्याग्रही असेल तो शस्त्र घेऊनच कशाला? तो सत्यासाठी काही एक प्रतिकार न करता स्वतःचे बलिदान देऊन. अशाच सत्याग्रहाला अहिंसात्मक सत्याग्रह म्हणता येऊन." अहिंसा, सत्याग्रह आणि सत्यासाठी बलिदान करावयास लागणारी निर्भयता याचा असाच संबंध गांधीजींनी लावला असल्याचे प्रत्येक ठिकाणी आपल्याला दिसून येईल. अशी कितीतरी विधाने त्यांच्या लेखनातून वा भाषणातून उद्धृत करता येतील. अत्याचारी बलाचा, अन्यायाचा, वा हिंसेचा प्रतिकार, विशिष्ट परिस्थितीमध्ये अपरिहार्य असेल, तर तशा बलाने, वा शस्त्राने प्रतिकार करावा, हे गांधीजींना मान्य नाही. या बलासमोर व अन्यायासमोर निर्भयपणे उभे राहून आत्मबलिदान करणे हाच मार्ग त्यांना मान्य आहे. सावरकरांना ही भूमिका आत्यंतिक अहिंसेचीच वाटणार हे उघड आहे. महात्मा गांधींच्या चरित्रात सुप्रसिद्ध चरित्रकार धनंजय कीर यांनी म्हटले आहे.[३४] "Gandhi meant that business of sytagrahi was to get killed by an agressor and not to kill him. Their aim was to pacify the killers and tyrants and agressor!" भरपूर पुराव्यावर आधारलेला हा धनंजय कीरांचा निष्कर्ष आहे. गांधीजींच्या चरित्रकाराचेच असे मत असल्यानंतर सावरकरांचे तसे असणारच, हे समजून घेतले पाहिजे.

१९३५ मध्ये 'हरिजन'मध्ये गांधीजींनी लिहिले,[३५] "True Ahima lay in running into the mouth of Himsa If cows could be credited with intelligence, it is conceviable that given a sufficient number of such cows who would run into the tiger's mouth, the latter would lose the relish for cowflesh and change his nature." (हिंसेची तृप्ती करण्यातच खरी अहिंसा असते. जर गाईना बुद्धी असती तर त्यांना हे कळाले असते की, वाघाच्या पोटात जर पुरेशा संख्येने गायी गेल्या तर गोमांसाबद्दल त्या वाघाला घृणा निर्माण होईल व परिणामतः त्यामुळे वाघाचा स्वभाव बदलेल.) गांधीजींची अहिंसा ही अशी आहे! गांधीजींच्या अशा विचाराचा अन्वयार्थ शूराच्या अहिंसेशी कसा लावणार? निर्भयपणे मरत राहण्यातही शौर्य असते असा लावणार काय? अशा बलिदानातून प्रपीडकाचा स्वभाव बदलतो, तो हिंसा सोडून अहिंसक बनतो यावर सावरकरांचा विश्वास नाही. गांधीजींची ही विचारसरणी राष्ट्राकरिता आत्मघातक आहे, असे वाटून सावरकर ह्या भूमिकेवर टीकेचा भडीमार करत असत. दिनांक २३-५-३५ रोजी गांधीजी बोरसद या गावी गेले होते. तेथे त्यांनी भाषणात प्लेग थांबविण्या-

साठी उंदीर मारण्याला अहिंसेच्या तत्वावरुन विरोध केला. माणसासारखाच उंदरानाही जगण्याचा हक्क आहे व आपल्यासाठी उंदरांना मारणेही त्याज हिंसा आहे, असे त्यांनी सांगितले. ही अहिंसा आत्यंतिक आहे का मर्यादित याचा कुणी-तरी खुलासा केला पाहिजे. गांधीजी आपले असले विचार प्रकट करत असत आणि सावरकर त्या विचारावर तुटून पडत. त्यांचे गांधीजीवर या बाबतीत टीका करणारे लेख उपहास नि विडंबनानी ओतप्रोत भरलेले असत.

राजेंद्रबाबूवर जर गुंडानी हल्ला केला तर उपस्थित असणाऱ्या दुसऱ्या अहिंसक भक्तानी त्या गुंडाचा सशस्त्र प्रतिकार न करता, ते वार स्वतःवर घ्यावेत व आत्मार्पण करावे, असा उपदेश गांधीजीनी केलेला आहे.[५३] एखाद्या स्त्रीवर गुंडानी वैषयिक भावनेने हल्ला केला, तर तिचे पावित्र्य हेच तिच्या पातिव्रत्याचे शस्त्र आहे असे गांधीजीना वाटते. पण तसे जर घडू शकले नाही तर, स्वतःजवळ असलेल्या कटाऱ्यानी त्या स्त्रीने स्वतःच आत्मार्पण करुन घ्यावे, असा गांधीजींचा उपदेश आहे.[५४] अशा प्रतिकारशून्य पण निर्भय आत्मार्पणाने त्या गुंडाच्या स्वभावात बदल होईल, त्याचे हृदयपरिवर्तन होईल, असे गांधीजींना वाटे. गांधीजीचे अशाच पद्धतीचे कितीतरी विचार दाखवून देता येतील.

बदलती भूमिका

खरी गोष्ट अशी की, गांधीजीची ही अहिंसेबद्दलची भूमिका वारंवार बदलत गेलेली आहे. आपली ही भूमिका व्यावहारिक नाही, व तिला यश येत नाही, याची जाणीव त्यांना होवू लागलेली होती. त्यामुळे परस्परविरोधी विचार त्यांनी व्यक्त केलेले आढळून येतात. अहिंसा, हिंसा, सशस्त्र प्रतिकार याच्या कोणत्याही सुनिश्चित व्याख्या गांधीजीनी केलेल्या आपल्याला दिसणार नाहीत. किती मर्यादेपर्यंत अहिंसा पाळावी, याबद्दल कोणत्या कसोट्या त्यानी सांगितलेल्या नाहीत. कोणती एखादी कसोटी प्रत्येक प्रकरणी वापरली आहे, असेही दिसणार नाही. अंग्रजावर बाँब चालविणाऱ्या भगतसिंगाला ते हिंसाचारी म्हणून संबोधितात, पण श्रद्धानंद स्वामीला गोळ्या झाडून त्यांचा खून करणाऱ्या अब्दुल रशिदला ते 'भाई अब्दुल' म्हणून संबोधितात. एका प्रकरणीची हिंसा त्याज, दुसऱ्या प्रकरणीची दुर्लक्षणीय, अशी भूमिका गांधीजींनी अनेकदा घेतलेली आहे. आपल्याला येथे गांधीजीच्या या भूमिकेचा अभ्यास करायचा नसून, अहिंसेवर सावरकरांनी जी टीका केली, त्या टिकेमागील भूमिका समजून घ्यायची आहे. सावरकरांची टीका आत्यंतिक अहिंसेवर आहे, हे प्रथमतः समजून घेतले पाहिजे. गांधीजीनी आत्यंतिक अहिंसेचा पुरस्कार केलेला आहे, हेही समजून घेतले पाहिजे. गांधीजीची ही भूमिका नंतर बदलली व ते अधिक व्यवहारी झाले, असे जर कुणाला म्हणायचे असेल तर, त्या बदललेल्या गांधीजीवर सावरकर टीका करत नाहीत, हेही समजून घेतले पाहिजे. गांधीजी असे बदलले होते असे जेव्हा आपण

मान्य करु, तेव्हा सावरकरांची भूमिका शेवटी गांधीजीना मान्य करावी लागली, असेच आपल्याला म्हणावे लागेल. गांधीजी आदर्शाकडून वास्तवाकडे आले, पण सावरकर आरंभापासून वास्तववादी होते, असेच आपल्याला म्हणावे लागेल.

स्पेन्सरचा आधार

अितिहासाचे व व्यवहाराचे कठोर वस्तुनिष्ठ निरीक्षण करुन सावरकरांनी सद्गुणाकडे पाहण्याचे आपले धोरण ठरविलेले होते, हे उघड आहे. या धोरणावर पाश्चात्य बुद्धिवादी तत्वज्ञ हर्बर्ट स्पेन्सर यांच्या विचारांचा व निरीक्षणाचा खोलवर ठसा उमटलेला आहे, हेही दिसून येते. स्पेन्सरचा ग्रंथ नि ग्रंथ त्यांनी वाचलेला होता असे त्यांनीच आत्मचरित्रांत सांगितले आहे. 'अत्याचार' शब्दाचा अर्थ सांगणाऱ्या लेखाच्या अग्रभागावर सावरकरांनी स्पेन्सरचे नीतिविषयक एक सूत्र दिलेले आहे. 'Resistance to agression is not only justifiable but imperative Non–resistance hurts both altruism and egoism' (Ethics) मानवी जीवनातील अितिहास व वर्तमानकालीन अनेक घटनांचा सखोल अभ्यास व सूक्ष्म निरीक्षण करुन समाजशास्त्रासंबंधीचे अत्यंत मोलाचे सर्वसामान्य सिद्धांत स्पेन्सरनी मांडले आहेत. अत्यंत वस्तुनिष्ठपणे चिकित्सा करणारा हा समाजशास्त्रज्ञ आहे, नीतिशास्त्रज्ञ आहे.

Absolute ethics

स्पेन्सरनी नीतिमूल्याची दोन वर्गात विभागणी केलेली आहे. Absolute ethics व Relative ethics' अशी ही वर्गवारी आहे. ही मुलभूत नीतिमूल्ये आणि सापेक्ष नीतिमूल्ये आचरणात आणायची परिस्थिती वेगवेगळी आहे. जगातील सर्वच्या सर्व मनुष्यमात्र एखादा सद्गुण निरपवादपणे आचरत आहेत, अशी एक आदर्श अवस्था स्पेन्सरने गृहित धरलेली आहे. या अवस्थेतील आदर्श जगातील आदर्श लोक पूर्णतः नीतिमान असतात. सत्य हा सद्गुण घेतला तर सर्वच जण सत्य बोलतात. असत्य बोलणारा कुणी सापडतच नाही. अहिंसा हा सद्गुण घेतला तर सर्वच जण अहिंसक असतात. हिंसा करणारा कुणी सापडतच नाही. अत्याचार, आक्रमण, अन्याय करणारा कुणीही नसल्यामुळे त्याला विरोध करण्यासाठी काय करावे, हा प्रश्नच या आदर्श जगात उपस्थित होत नाही. असे हे जग Absolute ethics चा भाग आहे, असे स्पेन्सर म्हणतात. या जगात सत्य बोलल्याने, अहिंसा पाळल्याने, सहिष्णुता बाळगल्याने कोणाचे काहीही नुकसान वा अहित होणार नसते. कारण या वागण्याचा गैरफायदा घेणारा कुणीही माणूस या जगात शिल्लक नसतो. परोपकार करण्याचा खुद्दा प्रश्न या अवस्थेत निर्माण होत नाही. कारण सर्वच जण परोपकारी असल्यामुळे तो उपकार स्वीकारायला माणूसच सापडत नसतो. गांधीजीना अशा प्रकारचे आदर्श या जग हवे होते. खरं

म्हणजे सावरकरांना का ते नको होते? सर्वांनाच असे जग हवे असते. मनुष्याचे अंतिम ध्येय हेच आहे. प्रश्न हा नाही. ध्येयाकडे वाटचाल करत असतानाच, आज मात्र असे जग अस्तित्वात नाही, हे मान्य करायचे की नाही, हा मुख्य प्रश्न आहे. गांधीजी अशी अवस्था आज आहेच, असेच समजून किंवा आपण असे वागलो तर अशी अवस्था येतेच, असे समजून वागत होते, हे समजून घेतले पाहिजे. गांधीजीच्या कल्पनेतील जगात सर्वच सत्यवान, अहिंसक, प्रामाणिक, सहिष्णू, दयाशील, परोपकारी, क्षमाशील असतात. स्पेन्सरनी वर्णन केलेले गांधीजीच्या कल्पनेतील हे Absolute ethics चे जग आहे. या आदर्श जगाची कल्पना करायला सावरकरांजवळ कल्पनाशक्तीची कमी नव्हती; पण त्रैधातूनी बनलेल्या वास्तव जगाचाच विचार करणे त्यांना भाग वाटले.

Relative ethics

स्पेन्सरची Relative ethics ची मांडणी या वास्तव जगासाठी केलेली आहे. मनुष्यालाही आपल्यासारख्या आदर्श नसणाऱ्या मनुष्यावरोबर जगात वागताना आदर्श सद्गुण आचरणे अशक्य असते, असे स्पेन्सरला वाटते. जेव्हा जगातील एकूणएक माणसे आदर्श असत नाहीत, म्हणजे काही तसे असतात, काही नसतात, तेव्हा त्या जगासाठी नीतिविचाराच्या Relative ethics चा प्रश्न निर्माण होतो, असे स्पेन्सरना वाटते. स्पेन्सर म्हणतात, [३५] "An absoutely just or perfectly sympathetic person could not live and act according to his nature, in a tribe of cannibals. Among people who are treacherous and utterly without scrupt, entire truthfulness and openness must bring ruin" वास्तव जगाचे हे वर्णन आहे की, जेथे Relative ethics चा प्रश्न निर्माण होतो. आत्मौपम्याच्या आकाशातून वास्तवाच्या जडभूमिवर आपण आलो म्हणजेच नीतिमूल्ये निर्माण होतात, असे जे सावरकर म्हणतात, त्याचा अर्थ हाच आहे. स्पेन्सरचे हेच विचार ते आपल्या भाषेत मांडत असलेले आपल्याला दिसून येतील. सत्याविषयी सावरकर म्हणतात, [३६] "सत्याधिक सद्गुणाची आत्यंतिक रूपेही बहुधा दुर्गुणच ठरतात, ही जाणीव सुद्धा त्या काळच्या धर्म समजुतीस लोपून गेली आणि तसा राष्ट्राचा आत्मघात करणारा सद्गुणाचा आत्यंतिक, अप्रासंगिक आणि आत्मघातक अवलंबच मोठा उच्चतम सद्गुण समजण्यात येवू लागला. साधारणत: सत्य तेच वदावे हा सद्गुण ठीक; पण या सद्गुणाची वढाई करता करता आणि करण्यासाठीच हरिचंद्राने विश्वामित्र ऋषीला स्वप्नामध्ये 'माझे राज्य मी तुला देतो' म्हणून दिलेले वचन निदान जागे झाल्यानंतरहि खरे करण्यासाठी विश्वामित्र ऋषीला आपल्या राष्ट्राचे राज्य त्याने देवून टाकले; आणि म्हणून ते कृत्य सत्याच्या सद्गुणाचे उत्कृष्ट उदाहरण होय, अशा आत्यंतिक 'सद्गुणाच्या'

एक कथा पुराणातून वर्णन करुन राष्ट्रीय युद्धनीतीला भावळट, भेंगळ नि आत्मघातक वळण देण्यात आले, याची निंदा करावी तेवती थोडीच" हरिश्चंद्राला आत्यंतिक सत्याच्या आचरणापायी राज्याचा नाश करुन घ्यावा लागला व ही गोष्ट आदर्श म्हणून घेण्यासारखी नसून आत्मघातक व निंदनीय आहे, असे स्पष्टपणे सावरकरांनी जे म्हटले आहे, तेच वर स्पेन्सरनी म्हटले आहे. या हरिश्चंद्राच्या सत्याप्रमाणे जर राष्ट्र वागू लागले तर ते जिवंतच राहू शकणार नाही, हेच सावरकरांना येथे सुचवायचे आहे.

सत्याची व्याख्या

हिंदूना सत्याचरणासाठी आदर्श व श्रद्धेय वाटणाऱ्या हरिश्चंद्राच्या सत्याचरणाला केवळ त्याच कारणासाठी बाष्फळ म्हणून हिंदूच्या श्रद्धा व भावना सावरकर कशा दुखवितात हे यावरुन समजून येईल. जी गोष्ट लोकांना अभिनंदनीय वाटते, आदर्श वाटते, ती सावरकरांना निंदनीय वाटते, आत्मघातक वाटते. सावरकरांची सत्याची व्याख्याच अशी आहे : [३७] "ज्या सत्याने मनुष्याचे एकंदर हित साधते ते सत्य, सद्गुण, धर्म; पण ज्या सत्याने चोराला सोडून संन्याशाला फाशी होते, ते सत्यही दुर्गुण, ते असत्य होय." सत्याच्या या तत्वाचा सावरकरांनी जन्मभर प्रचार केला. गांधीजीना असले सत्य मान्य नव्हते, म्हणून सावरकरांनी गांधीजीच्या हरिश्चंद्रीय सत्याचा जन्मभर विरोध केला. मानवहिताच्या पलिकडे सत्याला स्वतंत्र मूल्यच नाही, हेच तत्व वर स्पेन्सरनी मांडले आहे व तेच सावरकरांनी स्वीकारले आहे. ज्या क्षणी सत्य मनुष्याच्या हिताच्या मर्यादा ओलांडते, तेव्हा सत्य हे असत्य होते, दुर्गुण होते, निंदनीय होते–असा सावरकरांचा सिद्धांत आहे. हीच गोष्ट पटवून देण्यासाठी ते आपल्या उःशाप नाटकात सत्यवानाचे पात्र तयार करतात. त्यांच्याकडे आत्यंतिक सत्याचा उपहास व विडंबन करण्याचे काम दिलेले असते. गोमंतक काव्यातील महात्मा निनामीबाबा सुद्धा आत्यंतिक सत्याचे आचरण करुन संकटात सापडलेल्या व आश्रमात आश्रयाला आलेल्या रमाला तिला पकडण्यासाठी आलेल्या अंतोनियाच्या ताब्यात देवून मानवघात करतो– केवळ सत्य बोलण्यासाठी! आपण Relative ethics च्या वास्तव जगात आहोत, याचे पूर्ण भान ठेवूनच सावरकर वागत असल्याचे आपल्याला दिसतात.

नीतिमूल्ये कशी ठरवावीत याची कसोटी सांगताना स्पेन्सर म्हणतात,[३८] "On the evolution hypothesis the two (Absolule and Relative ethics) presuppose one another; and only when they co-exist can there exist that ideal conduct which absolute ethics has to formulate, and which the relative ethics has to take as standard, by which we estimate diver-

gencies from right or degree from wrong" सावरकरांची भूमिका हीच आहे. देशकालपरिस्थितीचा विचार करुन आदर्श सद्‌गुणांचा किती मर्यादेपर्यंत वापर करायचा हे मनुष्याने ठरविले पाहिजे, ही सावरकरांची आतापर्यंत आपण पाहिलेली भूमिकाच स्पेन्सरच्या वरील उताऱ्यात आपल्याला दिसून येते. दोघांची-ही नीतिमूल्यांची कसोटी एकच होती, हे समजून घेतले पाहिजे.

स्वार्थ-परार्थ

सावरकर ज्याप्रमाणे नीतिमूल्यांचे चांगले आणि वाईट, धर्म्य आणि अधर्म्य, पुण्य आणि पाप असे दोन वर्गांत वर्गीकरण करतात, अगदी त्याप्रमाणेच स्पेन्सर-सुद्धा मनुष्याच्या स्वभावधर्माचे दोन वर्गात वर्गीकरण करतात. पहिला Religion of amity व दुसरा Religion of enimity. संस्कृतीचा जसा जसा विकास होत जातो तसा Religion of enimity चा प्रभाव कमी होत जावून Religion of amity चा प्रभाव वाढत जातो. परंतु हे दोन्हीही धर्म मनुष्याच्या स्वभावात अंतर्भूत आहेत व ते आवश्यकही आहेत, असे स्पेन्सरनी म्हटले आहे. परार्थ (Atruism) हा जसा मनुष्याला आवश्यक आहे, तसाच स्वार्थ (Egoism) हाही मनुष्याला आवश्यक आहे. या दोन गोष्टीचा योग्य समन्वय घडवून आणण्या-तच मानवी जीवनाचे सार्थकत्व आहे, असे त्यांनी दाखवून दिले आहे. एवढेच नाही तर, मानवी जीवनाचे सूक्ष्म निरीक्षण करुन त्यांनी निष्कर्ष काढला आहे की [३९] "After observing this, I must infer that a certain predominance of egoism over altruism is beneficial and that in fact, no other arrangement would answer." अत्यंतिक स्वार्थ आणि आत्यंतिक परोपकार या दोन्हीही अव्यवहार्य, अहितकारक, व मानवी जीवनाला अस्थिरतेकडे नेणाऱ्या गोष्टी आहेत, असा त्यांनी अनेक निरीक्षणांनी निष्कर्ष काढला आहे. ते म्हणतात,[३९] "...You will see that pure altruism would bring things to a dead lock just as much as pure egoism." एका विशिष्ट मर्यादेपर्यंतच परोपकार हा हितकारक असतो, हे सांगताना स्पेन्सर म्हणतात,[४०] "So that though up to a certain point altruistic action blesses giver and receiver, beyond that point it curses giver and receiver." अगदी याच भाषेत सावरकर नीतिमूल्यांची मिमांसा करताना आपल्याला दिसतात, हे समजून घेतले पाहिजे.

दोन मानवी प्रवृत्ती

सावरकर वरील स्पेन्सरच्या तत्वाचा, पण स्पेन्सरचे नाव न घेता, आधार घेवून 'तो' मर्यादेचा बिंदू ओलांडणाऱ्या सद्‌गुणावर कठोर टीका करतात.

" ' सर्वधर्म समान आहेत,' 'राम रहीम एक है,' ' ज्याचा धर्म त्याला पाळू द्यावा ' ' परधर्म सहिष्णुता हीच आमची धर्माज्ञा ' हा आमच्या हिंदुजातीचा अनन्य साधारण गौरव, अशी प्रौढी मारण्याची खोड अगदी प्राचीन काळापासून स्वतः हिंदूना जडलेली होती. " असे सांगून या सद्गुणाचे देशकालपरिस्थितीचा विचार न करता हिंदूंनी आचार केल्यामुळे कसा घात झाला, याचे अत्यंत मर्मभेदक वर्णन सावरकर करतात. ते म्हणतात, [५१] " परधर्म सहिष्णुता ! आणि हा सद्गुण ! जेथे जो परधर्म आपल्या स्वधर्माशी सहिष्णुतेने वागत असेल तेथे त्या परिस्थितीत परधर्माशी सहिष्णुतेने वागणे हा सद्गुण असू शकेल, परंतु... अशी अत्याचारी धार्मिक आक्रमणे हिंदूवर अनेक सहस्त्रवर्ष करीत आले, अशा राक्षसी धर्मियाशी परधर्मसहिष्णुतेने वागणे म्हणजे स्वधर्माच्या गळ्यावर स्वहस्ते सुरी चालविणे होते ! ही परधर्म सहिष्णुता नसून अधर्म सहिष्णुता होती ! ही सहिष्णुता नसून पंढपणा होता ! " नैतिकतत्वज्ञान मांडताना सावरकरांनी केलेली ही शास्त्रीय मिमांसा नव्हे, तर अतिहासाची समीक्षा करताना समोर आलेल्या प्रत्यक्ष घटनांचा अभ्यास करुन त्या वेळेस वापरायच्या व्यावहारिक नीतीबद्दल संतापाने आजचे सावरकर हे बोलत आहेत, हे समजून घेतले पाहिजे. या अतिहास कालातील ती परधर्म सहिष्णुता म्हणजे स्पेन्सरच्या भाषेतील Pure altruism चा शुद्ध परोपकाराचा प्रकार होता, Religion of amity होता.

या धर्मसहिष्णुतेने हिंदू लोकाचे अपरिमित नुकसान झाले असा सावरकरांचा निष्कर्ष आहे. अतिहासात जेव्हा मुस्लीम सत्तेवर होते तेव्हा धर्माचे आक्रमण करुन आपला धर्म वाढविण्यासाठी या सत्तेचा त्यांनी बिनदिक्कतपणे वापर केला; किंवहुना त्यांचा हेतूच तो होता. राज्यसत्तेचा आधार घेवून धर्मांतरे घडवून आपली संख्या वाढविली, दुसऱ्यांची मंदिरे पाडून मशिदीची संख्या वाढविली, दुसऱ्याचा धर्मविध्वंस करण्याचा हरएकप्रकारे प्रयत्न केला. जेव्हा मुस्लिमांकडून हिंदूकडे राज्यसत्ता आली, तेव्हा हिंदूराजानी मात्र धर्मनिरपेक्ष भूमिकेतून राज्य केले. ते राज्यावर येईपर्यंत धार्मिक स्थिती जी होती, ती जैसे थै ठेवली; झालेल्या गोष्टींना राजकीय संरक्षण दिले. हिंदूचे हे राज्य पुन्हा जेव्हा मुस्लिमांनी जिंकून घेतले, तेव्हा त्यांनी पुन्हा तोच पूर्वीचा प्रयोग केला. राजकीय आक्रमणाबरोबर धार्मिक आक्रमणही केले. धर्म वाढविण्यासाठी त्यांना राज्यसत्ता हवी होती, राज्यसत्ता आली की ती टिकविण्यासाठी त्यांना धर्मप्रसार हवा होता. राज्यप्रसार नि धर्मप्रसार अशा प्रकारे हातात हात घालून आणि संयुक्तवळाने कार्य करीत असत. महमदबिन कासीम पासून अिंग्रज सत्तेवर येईतो भारतात हिंदू व मुस्लिम राज्यसत्तेची अनेकदा आलटापालट झाली, पण धर्म प्रसाराच्या बाबतीत मात्र वरील प्रकार एकतर्फीच कायम चाले. गेलेले राज्य हिंदूनी अनेकदा परत मिळविले, पण धर्माचे जे नुकसान झाले ते कधीही भरुन काढण्याचाही विचार त्यांनी केला नाही. जेवढ्या प्रमाणात धर्माचे नुकसान झाले तेवढ्या प्रमाणात त्यांच्या राज्याचेही

नुकसान होत गेले. परत त्यांचे राज्य येण्याला तेवढचा प्रमाणात हानी पोचत गेली. पण हिंदूच्या औदार्याच्या भूमिकेमुळे याचा त्यांनी कधीही विचार केला नाही. विचार केला नाही यांचेच त्यांना मोठे भूषण व मोठेपणा वाटला. हा सारा अितिहास सावरकरांनी हृद्यविदारकपणे मांडलेला आहे. याचा एकंदर परिणाम असा झाला की, मुस्लिमाचे राज्य व धर्मसत्ता या दोन्हीच्या संयुक्त बळातून निर्माण झालेले साम्यर्थ्य वाढत गेले, व हिंदूचे क्रमशः कमी होत गेले. सावरकरांना या गोष्टीचा तीव्र संताप येतो. म्हणून ती धर्म सहिष्णुता नव्हती, अधर्मसहिष्णुता होती, असा परखड भाषेत ते बोलतात ! ही हिंदूची औदार्यवृत्ती विघातक होती, आत्मघातक होती व म्हणून ती सद्गुण नसून सद्गुण विकृती होती, असा त्यांचा कठोर निष्कर्ष आहे.

'शरणागताला अभयदान देणे' हा सद्गुण कितीही उदात्त असला तरी नजीबखानासारख्या दुष्टांना सोडून दिल्याबद्दल त्यांना तीव्र हळहळ वाटते. 'भुकेलेल्या किंवा तान्हेलेल्याना पेय पाजणे हा सद्गुण आहे, एवढेच काय ते पाठ करुन ठेवल्यामुळे नागांनाही आणि दुष्ट सापांनाही दूध पाजीत राहिले' या हिंदूच्या मूर्खपणाबद्दल त्यांना संताप येतो. 'परधर्म सहिष्णुता' हा सद्गुण आहे' हे बोधामृत प्रत्येक हिंदूना अगदी आईच्या दुधासह पाजलेले असते. परंतु त्या वाण्याचे मर्म मात्र त्यांना कुणी विशद केलेले नसते." या बद्दल ते चिडून उठतात. असहिष्णू लोकाशी पात्रापात्र विवेक न करता सहिष्णुतेने वागल्याने आत्मघात होऊ शकतो, व अशा वेळी 'सहिष्णुतेने वागणे हा सद्गुण नसून सद्गुणविकृति होय' 'तशी सहिष्णुता पाळणे हे एक नारकीय पाप करण्यासारखे आहे' असे अगदी कसलाही आडपडदा न ठेवता निःसंदिग्धपणे ते म्हणतात.[४१] अशी सहिष्णुता मनुष्याच्या नाशाला कारणीभूत होऊ शकते, म्हणून त्याज्यच आहे. सहिष्णुता मनुष्यासाठी आहे, मनुष्य सहिष्णुतेसाठी नाही, हा विवेक हिंदूनी पाळला नाही व तो एक परिस्थितीनिरपेक्ष धर्म करुन टाकला, हा त्यांच्या चिंतेचा व चिंतनाचा विषय राहिलेला आहे. सावरकर ही चर्चा राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीतून करतात, व्यक्तिगत हितासाठी नाही, हे समजून घेतले पाहिजे.

स्त्री दाक्षिण्य

स्त्रियांच्या संबंधातील हिंदूच्या औदर्याच्या व सौजन्याच्या सद्गुणाबद्दलही सावरकरांनी अशीच भूमिका घेतलेली आहे. कल्याणच्या सुभेदाराची सून, शिवाजी महाराजांनी खणानारळानी ओटी भरुन, आईची उपमा देवून सन्मानाने परत पाठविली, ही तर महाराजांची चूक होती, असे सावरकर स्पष्टपणे म्हणतात. अशी चूक महाराज करणेच शक्य नाही, असेही त्यांना वाटते. या गोष्टीचा अन्य पुरावा नाही म्हणून ही गोष्ट घडलीच नाही, असेही त्यांना वाटते. या संबंधात ते म्हणतात,[४२] "महाराजांनीही तरीही तिला इतके सन्मानाने वागविण्याचे कारण

नव्हते. त्या तरुण्याबांब पोरीला परत पाठवायची म्हणजे शत्रूची वीण वाढविण्यास साहाय्य करण्यासारखेच होते... एखाद्या मोठ्या सरदाराला ती देऊन टाकायची... शत्रूची वीण वाढविण्यापेक्षा तिनें महाराजाच्या एखाद्यातरी एकनिष्ठ प्रजाजनाला जन्म दिला असता !" सावरकरांचे हे विचार आजही हिंदुमनाला पटणार नाहीत, अितके दाहक आहेत. ही घटना त्यांना सत्य वाटत नाही, प्रचारणीय वाटत नाही, नि आचरणीयही वाटत नाही. ही घटना घडलीच नसता प्रचारात का आली असावी, हे सांगताना सावरकर म्हणतात, [४३] " या घटनेचा उगम हिंदूच्या परंपरागत भोळेपणातून आला आहे. शिवाजी महाराज मोठे होते ना ! मग ते उदार वागणुकीचे, उदात्त विचाराचे असलेच पाहिजेत. येथेच ही विचारसरणी थांबत नाही. पराकोटीचे भोळे आणि परमसहिष्णु हिंदुमत लगेच शिवाजी महाराजांना अवतारी पुरुष मानू लागले. अवतार म्हटला की, देवत्वाचे सर्वगुण त्यांना चिटकवलेच म्हणून समज. मग तुमची ती मानवता आलीच ! एका ऐतिहासिक पुरुषाकडे तुम्ही मानवता, उदारता आणि सहिष्णुता या दृष्टिकोणातून पाहू लागता." स्त्री दाक्षिण्यासारख्या अत्यंत नाजुक असलेल्या विषयावरही ते कसे भावनाशून्यपणे बोलतात, हे येथे पाहण्यासारखे आहे. देवत्वाचे गुण ऐतिहासिक वा व्यावहारिक पुरुषाला चिटकविणे चुकीचे आहे, अशीच त्यांची भूमिका आहे. स्वत:ला ते चिटकवून घेण्याचा त्यांनी कधीही प्रयत्न केला नाही, एवढेच नाही तर हे गुण आपल्याला कसे चिटकणार नाहीत याचीच काळजी त्यांनी अधिक घेतलेली दिसते. देवत्वाच्या गुणाच्या पाठीमागे लागून राष्ट्रघात करुन घेणे त्यांना आत्मघातक वाटते. देवत्वाचे गुण संरक्षण करण्यासाठीच त्यांना राष्ट्र हवे होते, पण त्या गुणाच्या पाठीमागे लागून राष्ट्रघात करुन घेणे नि एकदा राष्ट्रघात झाला की त्या गुणाचाही घात करुन घेणे, त्यांना अव्यावहारिक वाटते. सद्गुणापेक्षा सद्गुणरक्षणाच्या व्यवस्थेकडेच म्हणजेच राष्ट्राकडे त्यांचे लक्ष अधिक आहे, असा त्याचा अर्थ आहे.

या सद्गुणविकृतीमुळे हिंदूचे संख्याबळ कमी झाले, याची त्यांना खंत आहे. राष्ट्रहितासाठी हिंदूचे संख्याबळ हा फार मोठा घटक आहे, यावर त्यांचा विश्वास होता. संख्याबळ हे एक बळच आहे; सध्याच्या राष्ट्रीय परिस्थितीत ते राखणे अपरिहार्य आहे, स्त्रीची संख्या हा एकूण संख्याबळाचा मुख्य घटक व आधार आहे, म्हणून शस्त्रूकडे जाणाऱ्या नि येणाऱ्या स्त्रियांचा विचार करणे राष्ट्रहिताच्या दृष्टीने भाग आहे– ही सावरकरांची स्पष्ट भूमिका आहे. जोपर्यंत हीच संख्याबळनीती शत्रूपक्ष पाळीत आहे, तोपर्यंत तरी ही नीती आपणही पाळणे अपरिहार्य आहे, असे सावरकरांना वाटते. हाच खरा शहाणपणा आहे असे त्यांना वाटते. हा शहाणपणा त्यांना अितिहासातून आलेला आहे. व्यवहारातील अनुभवानी पक्का झाला आहे. ' सहा सोनेरी पाने ' या ग्रंथात सावरकर म्हणतात, [४४] " हिंदूच्या त्या बाटविलेल्या स्त्रियांच्या पोटीच सुलतान घियासुद्दीन तुघलक, सुलतान फिरोज-

शहा तुघलक, सुलतान सिकंदर लोदी अशा अनेक हिंदुद्वेषी नि राक्षशी राज्यकर्त्यांचा जन्म झाला !" महाराजांनी परत केलेल्या त्या सुभेदाराच्या सुनेला असाच एखादा क्रूरकर्मा जन्मून तो आपल्याच राष्ट्राला म्हणजेच महाराजांच्या स्वराज्याला घातक ठरणार नाही काय, असा त्यांचा भेदक दृष्टिकोण आहे. स्त्रियांना शिक्षा करण्याच्या संबंधातही त्यांचा दृष्टीकोण असाच कर्तव्य कठोर आहे. ते म्हणतात, [४५] " जो चावायला आला तो साप ठेचलाच पाहिजे, मग तो नाग असो की नागीण." या संबंधात त्राटिकेला मारल्याची सावरकर आठवण करुन देतात व पुढे म्हणतात, " शूर्पणखा राक्षसीण सीतेला कोवळ्या काकडीसारखी खाऊन टाकण्यास जेव्हा धावली तेव्हा लक्ष्मणाने तिचे नाक कान कापून तिला परत धाडून दिली. परस्त्री दाक्षिण्यासाठी तिची खणानारळानी ओटी भरुन नव्हे." नरकासुराने नेलेल्या आर्यांच्या सहस्त्रावधी स्त्रियांना श्रीकृष्णाने आपल्या राज्यात आणल्याची आठवण येथे सावरकर करुन देतात. सावरकरांची ही भूमिका कोणत्याही हिंदू मनाला आजतरी पटण्याची शक्यता नाही– इतकी भावनाशून्य आहे. गोपूजेसारखा अंधश्रद्धेपासून तो स्त्रीदाक्षिण्यासारख्या सद्गुणापर्यंत सावरकर राष्ट्रहिताचीच कसोटी कशी लावतात, हे आपण समजून घेतले पाहिजे. याचा अर्थ सावरकरांना उदात्तमूल्ये, अत्युच्च सद्गुण नको होते असा नाही. तर 'पात्रापात्र विवेकशून्य, आचरिला जरी सद्गुण ! तो तोचि ठरे दुर्गुण, सद्धर्म घातक !!" हे व्यवहारातील कटुसत्य सावरकर जाणत होते, [४६] असा याचा अर्थ आहे.

कठोर वास्तववाद

सावरकरांची नीतिमूल्याबद्दलची ही भूमिका समजून घ्यायची असेल, तर ते जे हे सांगत आहेत ती कठोर वस्तुस्थिती आहे की नाही, हे प्रथमतः समजून घेतले पाहिजे. सावरकर म्हणतात त्या प्रमाणे हे जग उदात्तमूल्यानी व सद्गुणानी भरलेले नाही; केवळ सत्याचा, न्यायाचा त्याच्या गुणाखातरच विजय होतो, असेच हे जग आहे; सावरकरांनी जगाचे रंगविलेले हे चित्र चुकीचे वा एकांगी आहे, असे जर आपले मत असेल तर मग सावरकरांच्या या नीतिमूल्यविषयक भूमिकेवर टीका करणे न्याय ठरते. तेव्हा आपण जगातील न्यायान्यायाच्या, सद्गुणाच्या निरपवाद आचरण्याच्या वस्तुस्थितीबद्दल कोणत्या निष्कर्षाला येतो, यावर सावरकरांना समजून घेणे अवलंबून आहे.

जगात अशी वस्तुस्थिती असली तरी ती मांडू नये; थोर पुरुषानी जगातील वाईट गोष्टीकडे दुर्लक्ष करावे; उदात्त गोष्टीचीच जगाला शिकवण द्यावी– असेच जर आपले मत असेल, तर मग गोष्ट वेगळी आहे. जे आहे त्याकडे दुर्लक्ष करुन जगात चालतच येत नाही, असे सावरकरांचे ठाम मत आहे. जग काय म्हणेल, आपल्याला संकुचित म्हणेल काय याची कसलीही पर्वा न करता कठोर वास्तवतेचे दर्शन घडवून देणे व त्याच्या प्रकाशात आपले धोरण आखणे हेच सावरकरांचे

खास वैशिष्ठ्य आहे. तो एक कर्तव्य कठोर वास्तववाद आहे, व्यवहारवाद आहे. आदर्शवादाच्या, उदात्ततेच्या आकर्षक मोहजालात स्वतःला अडकवून न घेता कर्तव्य कठोरपणे ते व्यवहारावादाचीच कास धरतात. जगाला नवा विचार देणारा एका विचारवंत बनावे, तत्वज्ञ बनावे वा महात्मा बनावे, अशी सावरकरांची मुळीच इच्छा नव्हती. असे महात्मे, तत्वज्ञ व विचारवंत आजपर्यंत फार झाले, अशांची या जगाला काहीही कमी नाही, अशी सावरकरांची भूमिका होती. राष्ट्राच्या व्यवहारात मार्गदर्शन करणारा नेता हीच भूमिका त्यांनी पार पाडलेली आहे. आज तुमचे हित कशात आहे, हे कशाचीही अभिलाषा न धरता लोकांना सांगण्यासाठीच आपला जन्म झाला आहे, या कर्तव्य भावनेने ते प्रेरित झालेले होते. 'वरं जन हितं ध्येयं केवला न जन स्तुति' हे त्यांचे सर्वच क्षेत्रातील सूत्र होते. या सूत्रापायी त्यांनी जशा अनेक धार्मिकांच्या धर्मभावना बेगुमानपणे दुखविल्या, व त्यापायी ते अधार्मिक ठरले, पाखंडी ठरले; त्याप्रमाणे उदात्त मूल्यांच्या पोथिनिष्ठ आचरणाविरुद्धही शस्त्र धरले, व त्यापायी लोकप्रियतेचा बळी दिला, संकुचितपणाचा शिक्का मारुन घेतला. मात्र आपल्या ह्या वरील सूत्राशी त्यांनी कधी तडजोड केली नाही, आपला बुद्धिवाद सोडला नाही.

ही मनोवृत्ती बदला

जनमानसाचा एक गुणधर्म असतो. निर्भेळ वस्तुनिष्ठता सांगणारा, रोखठोक व्यवहार सांगणारा, हा सामान्य माणूस ठरतो. वस्तुनिष्ठतेच्या, व्यावहारिकतेच्या थोड्या वरच्या आदर्शाच्या पातळीवरील विचार सांगणारा, हा असामान्य पुरुष ठरतो. निव्वळ उदात्त मूल्याच्या भोवतीच, आदर्शाच्या पातळीवरच जो सतत चिंतन करतो, व जगांनी असेच वागले पाहिजे असा उपदेश करतो, व जग आतापासून तसे बनलेच आहे, असे गृहीत धरुन वर्तन करु लागतो– तो महापुरुष ठरतो, महात्मा ठरतो ! हे जग, हा देह, व हे भौतिक सुख हे मिथ्या असून आत्मा हाच सत्य आहे, हा सिद्धांत मांडणाराच आत्मा–परमात्म्याचे सत्य स्वरुप जाणणारा तो योगी बनतो, ब्रह्मयोगी बनतो ! अशा जनमानसाच्या दृष्टीने सावरकर सामान्य विचारच देणारे ठरत होते, ही गोष्ट ते पूर्णतः जाणून होते. ते म्हणतात,[४६] "जो अव्यवहार्य, जगापेक्षा काही विपरित सांगेल तो संत ही आपल्यातील कल्पना टाकून द्या. हे असले सांगणारे लोक महात्मे तर नाहीतच नाहीत; पण ते दुरात्मे तरी असले पाहिजेत, नाहीतर भ्रांतात्मे तरी असले पाहिजेत !" सावरकर नुसतेच व्यावहारिक व वस्तुनिष्ठ विचार मांडून थांबत नसतात, तर या वस्तुनिष्ठतेच्या विरोधी, अव्यवहार्य असणारे, अहितकारक ठरणारे विचार जो कुणी संत, महात्मा मांडील त्यांच्या त्या विचारावर ते घणाघाती प्रहार करतात. जनमानस अशा संत महात्म्याला पुजीत असते नि सावरकर त्यावर प्रहार करीत असतात. महात्मा गांधीजींवर सावरकरांनी केलेली सारी

टीका याच कारणास्तव केलेली आहे, हे समजून घेतले पाहिजे. लोकांनी गांधीजींना महात्मा मानले नि त्यांना भ्रांतात्मा म्हणून टीका करणाऱ्या सावरकरांना नेमके काय म्हणायचे आहे, हे मात्र समजून घेण्याची काळजी कुणीही घेतली नाही. संकुचित विचाराचा राष्ट्रवादी असे विशेषण त्यांना लावून आपण मोकळे झालो !

तत्वज्ञान अव्यवहारी आहे, हे मान्य करुनही तेच नीतीचे मोठे लक्षण आहे, कारण ते उदात्त आहे व म्हणून ते आचरावे, असे जे लोक म्हणतात, त्याचा उल्लेख करुन सावरकर म्हणतात, [४७] "जो कोणी अशा तत्वाचा अंगिकार करील तो महात्मा धन्य होय ! त्यामध्ये मानवश्रेष्ठाचे सद्गुण ओतप्रोत भरलेले आहेत, ही जी मनोवृत्ती आहे, ती ताबडतोब बदलली पाहिजे. अशा प्रकारचे तऱ्हेवाईक मत प्रतिपादन करणाऱ्या या प्रेषितांना सामान्य लोक देवदूत समजू लागतात. आणि मानवी जीवनाची उंची वाढविण्यासाठी त्यांनी नवे नीतिनियम शोधून काढले आहेत असे मानू लागतात. ज्यांना त्यांचे हे धोरण आचरता येत नाही, ते लोक त्यांच्या या तऱ्हेवाईकपणाला साधुत्वाचे लक्षण म्हणून समजतात. आणि तसे झाले म्हणजे या लोकांनाही आपणही कोणीतरी मोठे महात्मे आहोत, असे वाटू लागते." सावरकरांना महात्मा होण्यापेक्षा वस्तुनिष्ठ व्यावहारिक माणूसच होणे पसत होते. ध्येय आणि वास्तवता यात त्यांनी धोरण म्हणून फरक केला व ध्येय हे कुठपर्यंत जायचे हे ठरविण्यासाठी राखून ठेवले व तेथपर्यंत जाण्यासाठी वास्तवतावादाच कर्तव्य करुन त्यांनी जाणीवपूर्वक स्वीकार केला. सत्य, अहिंसा, परोपकार इ.च्या साधुत्वाच्या गुणात आम्ही कमी पडतो म्हणून हा व्यवहारवाद आम्ही मांडत नसून, आम्ही अधिक शहाणे आहोत म्हणून होय, ही त्याची रोखठोक भूमिका होती. [४८] साधू व महात्मा होण्यापेक्षा शहाणे होण्यातच त्यांना मोठेपणा वाटत असे. सद्गुणाची नि राष्ट्रहिताची सांगड घालण्यात, स्वहित आणि परहित हे नीतीचे जे दोन टोक आहेत, त्यांचा योग्य सुवर्णमध्य साधण्यात, अधिक शहाणपणा आहे, अशी अशी त्यांची भूमिका आहे.

सुवर्णमध्य

स्वहित आणि परहित यांचा सुवर्णमध्य साधूनच समाजाचा व्यवहार झाला पाहिजे. या दोन्हीपैकी कोणत्याही धर्माचा अतिरेक समाजाच्या नाशाला कारणीभूत होतो. ज्याचे परहित साधायचे आहे त्याच्यातच, त्यामुळेच स्वहित प्रवृत्ती वाढत जाते, अशा प्रकारचे स्वार्थ-परार्थाचे विवेचन स्पेन्सरनी अनेक पुरावे देवून केलेले आहे. सुसंस्कृत मानव स्वार्थ आणि परार्थ या पैकी कोणती एक प्रवृत्ती बहुमानाची समजत नाही, असे सांगून स्पेन्सर म्हणतात, [५६] "A diminishing egoism and increasing altruism must make each of these diverse kinds of honour unattainable" आणि सावरकर हे सत्य

अितिहासाचे व व्यवहाराचे अनेक आधार देवून विशद करत असतात. सावरकर हे नेहमीच या सुवर्णमध्याच्या बाजूला राहिलेले आहेत. हा सुवर्णमध्य मध्यबिंदू सोडून एका टोकाला फारच गेल्यामुळे व तो तशाच अवस्थेत राहावा यासाठी महात्माजीसारखे पुरुष प्रयत्नशील असल्यामुळे, सावरकरांना याच्या विरोधात कटुकर्तव्य म्हणून उभे राहावे लागले, हे आपण समजून घेतले पाहिजे. उदात्तमूल्याचे व सद्‌गुणाचे पूजक असलेल्या आपल्या मनाला कितीही धक्के बसत असले, तरी अतिशय थंडपणाने व पूर्वग्रह सोडून सावरकरांचे हे नीतिमूल्याविषयक विचार आपल्याला समजून घ्यावे लागतील.

सावरकरांच्या समोर या वास्तव सृष्टीचे जे चित्र होते ते त्यानी अनेकदा रुपकात्मपणे मांडले आहे. गोमांतक काव्यातही हे चित्र आलेले आहे. वाघीण आपल्या पिलांना दूध पाजीत आहे, असे हे चित्र आहे. या चित्रासंबंधी सावरकर म्हणतात, [५७] "आपल्या पिलांना दूध पाजण्यासाठी ती वाघीण हरिणाची शिकार करते. करुणेच्या साहणेवर ही कौर्याची धार अशी पाजळली जाते. या वाघिणीची नखे नि दाढा भयंकर हिंसक आहेत, आणि तिचे स्तन म्हणजे वात्सल्य नि दया याच्या दुधाचा साठा आहेत ! हीच प्रकृतीची एक प्रतिमा आहे ! ही प्रकृति केवळ हिंसक नाही, तशीच केवळ अहिंसकही नाही, ती केवळ दयामय नाही आणि क्रौर्यमय नाही. ही प्रवृती दोन्ही प्रकारानी भरलेली आहे, आणि त्या उभय वृत्तीच्या विकासाचे फल म्हणजेच हे जग आहे ! व्यक्ति असो, समाज असो, राष्ट्र असो या दोन्ही प्रवृत्तीच्या योग्य मिश्रणानेच कोणीही या जगात जगू शकेल."

स्पेन्सरनी वर्णन केलेल्या Relative ethics चे हे जग आहे. अशा जगात egoism आणि altruism चा सुवर्ण मध्य काढून जगले पाहिजे, अशीच सावरकरांची भूमिका आहे. जगाचे हे चित्र सावरकर वास्तव म्हणून मानतात व अशा जगात केवळ सद्‌गुणावर जगता येत नाही, अशा निष्कर्षाला ते येतात. हा वास्तववाद मानणे हा बुद्धिवादाचा भाग आहे की नाही, हे प्रत्येकाने आपल्या मनाशी ठरवायचे आहे. या जगात जगण्यासाठी भौतिक सामर्थ्य असावे लागते, असा त्यांचा आग्रह आहे. क्रूरता, निर्दयता व अन्यायीपणा या जगाचा अविभाज्य भाग असल्याने शस्त्रसंन्यास मनुष्याला करता येणार नाही, हा त्यांचा सिद्धांतच आहे. शस्त्राच्या त्यांच्या या आग्रहामुळे त्यांच्याविषयी अनेक गैरसमज निर्माण झाले, याचा विचार पुढील प्रकरणात करु.

■■■

५. शस्त्रबळ - एक आक्षेप

भौतिक सामर्थ्याबद्दल सावरकर फार आग्रही होते. त्या सामर्थ्याचा शस्त्र हे एक भाग आहे. जगात जगायचे असेल तर शस्त्राचा त्याग करुन चालायचे नाही, असे त्यांचे म्हणणे होते. ज्यावेळेस सावरकर या सामर्थ्याबद्दल बोलत होते, त्यावेळेस भारत अिंग्रजाचा गुलाम होता. या गुलामीचे कारण मुख्यत: भारताची भौतिक दुर्बलता हीच होती. त्यामुळे सावरकर या भौतिक सामर्थ्याच्या बाजूने खंबीरपणे उभे टाकलेले दिसतात. वेळोवेळी त्यांनी शस्त्रविषयक जे विचार व्यक्त केले ते एकच करुन वाचले तर ते शस्त्रवादी आहेत, असे म्हणता येते. मात्र डॉ. य. दि. फडके सारखे विद्वान सावरकरांना 'शस्त्रवेडे' असे म्हणतात.[१] शस्त्र वापरण्याचे त्यांना एक प्रकारचे वेड होते, असे त्यांना म्हणायचे आहे. डॉ. फडके म्हणतात,[२] "राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय कोणत्याही प्रश्नावर शस्त्रबळाचा वापर हाच तोडगा सावरकरांजवळ होता, कारण सारे प्रश्न अखेर शस्त्रे सोडवतात; राज्याच्या सीमा देखील खड्ग निश्चित करते, अशी सावरकरांची श्रद्धा होती." वस्तुत: सावरकरांनी कोणत्याही राष्ट्रीय वा आंतरराष्ट्रीय प्रश्नावर शस्त्रबळाचा वापर हाच तोडगा आहे, असे कुठेही म्हटलेले नाही. सावरकरांच्या शस्त्रविषयक विचारावर डॉ. फडके यांनी स्वत:च्या निष्कर्ष काढण्याच्या विशिष्ट पद्धतीने काढलेला हा एक निष्कर्ष आहे. त्यासाठी त्यांनी त्यांचे शस्त्रविषयक वेळोवेळी व्यक्त केलेली विविध विधाने एकापाठीमागून एक पुरावा म्हणून दिलेली आहेत. शस्त्राची अपरिहार्यता पटविणारी ती विधाने आहेत. ज्यांना सावरकरांच्या अितर विचारांची माहिती नाही, किंवा ते शस्त्रविषयक विचार कोणत्या विशेष प्रसंगी व कोणत्या हेतूने मांडलेले आहेत, याची माहिती नाही, अशा वाचकांना फडके यांचे म्हणणे

खरे वाटण्याचा संभव असतो. डॉ. फडके यांची निष्कर्ष काढण्याची पद्धत ज्यांना माहिती नाही, त्यांच्या बाबतीत तर हा धोका अधिक संभवतो.

हीही पोथिनिष्ठाच

सर्वच प्रश्न शस्त्राने सोडविता येतात यावर सावरकरांचा विश्वास असता तर अंधश्रद्धेवर कठोर प्रहार करीत बसण्याची त्यांना काय गरज होती ? बुद्धिवादाचा प्रसार करण्यासाठी लोकांच्या धर्मभावना दुखवीत बसण्याचे त्यांना काय कारण होते ? शस्त्र चालविण्यासाठी, म्हणजेच कोणत्यातरी भावनेच्या भरात मरण–मारण्यासाठी, बुद्धीवादी माणसापेक्षा धर्मनिष्ठ माणूसच अधिक उपयोगी पडतो. कारण तो अधिक आज्ञाधारक असतो. मरण्याची, त्यागाची प्रेरणा धर्मनिष्ठ व अंधश्रद्ध मनुष्यातच अधिक निर्माण होते, असा जगभरचा इतिहास आहे सावरकरांनी ज्या सामाजिक सुधारणा केल्या त्या शस्त्रे वापरण्याची एक सोय म्हणून केल्या की काय ? सहभोजनाच्या त्यांच्या कार्यक्रमात शस्त्रप्रशिक्षण चालत असे की काय ? चातुर्वर्ण्यावर त्यांनी जे शस्त्र धरले होते, ते शस्त्र आणि डॉ. फडके म्हणतात ते शस्त्रच एकच आहे की काय? चातुर्वर्ण्य मानणारा दिसला की त्याच्यावर चालव शस्त्र, आणि करा चातुर्वर्ण्याचा उच्छेद असे सावरकर करत होते की काय ? या कोणत्याही प्रश्नाचा विचार फडके यांना करावा वाटला नाही. राष्ट्रहितासाठी लागणाऱ्या गोष्टीचे अनुक्रम ठरविणे, आणि अग्रक्रमावरील गोष्टीनेच सर्व प्रश्न सुटतात, असे मानणे, यातील फरक डॉ. फडके यांनी दुर्लक्षित केलेला आहे. 'राष्ट्राचे स्वातंत्र्य संपादन' आणि नंतर 'स्वातंत्र्यरक्षण' हे आद्य कर्तव्य मानूनच त्यानुसार सावरकरांनी आपला जीवनक्रम ठरविला होता. या गोष्टीच्या संबंधात भौतिक सामर्थ्याचा व या सामर्थ्यात मुख्यतः शस्त्रबळाचाच विचार क्रमप्राप्त असतो, हे लक्षात घेवून सावरकरांच्या शस्त्रविषयक विचाराकडे आपण पाहणार नाही काय ? ज्या पोथिनिष्ठेच्या विरुद्ध सावरकर जन्मभर झगडत राहीले तो शास्त्राधार आणि शस्त्रानेच सर्वच राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय प्रश्न सुटतात यावर निष्ठा असणारा शस्त्राधार, एकाच अंधश्रद्धेची दोन रुपे आहेत, असे आम्हास वाटते. या गोष्टीचा अन्वयार्थ न लावता, लेखणीच्या एका फटकाऱ्याने सावरकरांना डॉ. फडके यांनी अंधश्रद्ध व पोथिनिष्ठ बनवून टाकले आहे.

तारतम्य

शस्त्रबळाची या विद्यमान जगातील आवश्यकता, हा मुद्दा आपण सोडून देवून, शस्त्राच्या वापराच्या मर्यादा सावरकरांनी कोणत्या सांगितल्या, या मुद्द्याचाच आपण विचार करु. शस्त्रबळाच्या संबंधात सावरकर राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय प्रश्न यात फरक करतात. स्वातंत्र्यपूर्वकाळ आणि स्वातंत्र्योत्तर काळ यात

फरक करतात. सरसकट सारेच प्रश्न एकाच मापानी मोजून ते शस्त्राच्या तावडीत देत नाहीत. स्वातंत्र्यसंपादन आणि स्वातंत्र्यरक्षण ही आद्य गरज, बाकीच्या त्यानंतर, असा अनुक्रम ते लावतात. या तीन बाबी जरी आपण लक्षात घेतल्या तरी शस्त्र वापराबाबतीत सावरकर परिस्थितीचा तारतम्याने कसा विचार करतात, हेच दिसून येईल. शस्त्रविषयक त्यांची सर्व विधाने संदर्भ व हेतू सोडून एकत्रित मांडून ते शस्त्रवेडे होते, हे दाखवून देण्यासाठी फारसे कौशल्य लागत नाही. याच पद्धतीने सावरकर स्वातंत्र्यवेडे होते, धर्मवेडे होते, राष्ट्रवेडे होते, विज्ञान वेडे, लिपिवेडे होते, मानव्यवेडे होते असेही दाखवून देता येते. असे दाखविण्याला गैरसमज पसरविणे म्हणता आले, तरी अभ्यासपूर्ण निष्कर्ष काही म्हणता यायचे नाही. शस्त्राच्या बाबतीत सावरकर कोणते तारतम्य बाळगतात याकडे पूर्णतः आणि तेही हेतूतः दुर्लक्ष करुन केलेला हा डॉ. फडके याचा आरोप आहे, हे समजून घेण्यासाठी भरपूर पुरावे उपलब्ध आहेत. सावरकरांचा आपण पूर्वग्रह सोडून अभ्यास करायला तयार आहोत काय, हीच खरी अडचण आहे.

सशस्त्र क्रांतीच्या संबंधात सावरकरांची भूमिका समाजाने समजून घेतलेली आहे व त्याबद्दल फारसा गैरसमज होण्यानी शक्यता नाही. सर्वच कायदेशीर मार्ग निष्फळ असल्यामुळे निरुपायास्तव त्यांनी सशस्त्रक्रांतीचा मार्ग स्वीकारला होता, असे त्यांनीच म्हटले आहे. जेव्हा ब्रिटीशाच्या राजनीतीत बदल झाला तेव्हा त्यानुसार आपल्या धोरणात त्यांनी बदल केलेला आहे. १९३७ नंतरचे त्यांचे राजकारण हे सनदशीर कायदेशीर राजकारण होते. निःशस्त्र प्रतिकाराच्या चळवळी व आंदोलने या काळात त्यांनी केलेले आहेत. भागानगरचा निःशस्त्र प्रतिकार हे त्याचे एक उत्तम उदाहरण आहे, सावरकरांची सैनिकिकरणाची भूमिकाही लोकांनी समजून घेतली आहे व याबाबतीत सावरकरांना न्याय मिळालेला आहे. ज्या काळात त्यांनी सैनिकिकरणाचा प्रचार केला त्या काळात त्यांची 'रिक्रूटवीर' म्हणून ज्यांनी संभावना केली, त्यांनी नंतरच्या काळात आपली चूक कबूल केली व सावरकरांच्या दूरदर्शीपणाचे कौतुक केले. फडके आता जसे त्यांना 'शस्त्रवेडे' म्हणतात, तसेच त्यांना पूर्वी 'रिक्रूटवीर' म्हटले जात असे. १९३७ चे सावरकर नको म्हणणाऱ्या समाजवादी मंडळींना सशस्त्रक्रांतिकारक असलेले १९०८ चे सावरकर हवे होते, हे समजून घेतले पाहिजे. तेव्हा इंग्रजाच्या विरुद्ध सावरकरांनी शस्त्रबळाचा पुरस्कार केला, ही गोष्ट लोकांना कौतुकाची व अभिमानाचीच वाटत आली आहे. तेव्हा स्वातंत्र्यपूर्व काळातील शस्त्रविचार, हा आता खऱ्या अर्थाने वादाचा मुद्दाच राहिलेला नाही.

राष्ट्रांतर्गत प्रश्न

सर्व प्रकारचे राष्ट्रीय प्रश्न, म्हणजे राष्ट्रांतर्गत प्रश्न, हे घटनात्मक व कायदेशीर मार्गानीच व शांततेनीच सोडविले पाहिजेत, असा सावरकरांचा ठाम आग्रह

होता. सावरकर हे हुकूमशाही वृत्तीचे आहेत व त्यांना त्याच प्रकारची राज्यसत्ता हवी होती, असा एक काहीजणाचा गैरसमज आहे. मी जर राष्ट्रपती असतो तर रशियापेक्षाही माझा भारत मी दोन वर्षाच्या आत बलवत्तर करुन दाखवीन; क्रुत्सोने जसा आपल्या पायातल्या जोडा काढून जगाला दाखविला तसा मी माझ्या पायातला बूट काढून दाखवीन; या गोष्टी शक्तीच्या असतात, सैन्याच्या असतात, ही सावरकरांनी त्यांच्या मृत्युंजयदिनी वयाच्या ७८ व्यावर्षी केलेल्या भाषणातील काही विधाने ऐकून आपल्यालाही असेच वाटण्याचा एक संभव असतो. सावरकरांच्या या बोलण्यामागील हेतू आपल्या लक्षात न आल्यामुळे असे वाटू शकते. सावरकर वृत्तीने पूर्णतः लोकशाहीवादी आहेत, हे समजून घेण्याची आपण कधीही काळजी करत नाही. सावरकर हे लोकशाहीचे नेहरूंसारखे प्रचारक नाहीत, ते लोकशाहीसाठी लोकशाही असेही मानणार नाहीत– पण जितके नेहरु–आगरकर वृत्तीने लोकशाहीवादी आहेत, तितकेच सावरकरही आहेत, हे आपल्या लवकर लक्षातच येत नाही. हे लक्षात न येण्याचे कारण म्हणजे सावरकर हे शब्दाने नि भाषेने अजिबात लोकशाहीवादी नाहीत, हे आहे. आपल्या भाषेचा लोक काय अर्थ घेतील, त्याचा कोणता उपयोग करतील, लोकांना त्यामुळे काय वाटेल, याची त्यांनो कधीही पर्वा केलेली नाही. सारे रोखठोक, तेही अतिरेकी भाषेत – असा त्याचा बोलण्याचा स्वभाव होता. प्रत्येक क्षेत्रात सावरकर अशाच प्रकारे आवेशयुक्त बोलत असतात. समोरचा माणूस पेटून उठलाच पाहिजे, कार्य प्रवृत्त झालाच पाहिजे, अशी त्यांची भाषा असते. साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरुन भाषण करताना 'लेखण्या तोडा - बंदुका घ्या' अशा भाषेत ते बोलतील, वेळ पडली तर हिंदूनीही गाई खावून शत्रूशी झुंजत राहिले पाहिजे, असे म्हणतील, आक्रमकापुढे शरणगती पत्करणाऱ्या नेभळट लोकशाहीपेक्षा मी शक्तिशाली हिटलरची एकशाही पसत करीन, असेही ते म्हणतील. असे म्हणणे अक्षरशः खरे करण्यासाठी नसते तर समोरच्याला झोपीतून जागे करण्यासाठी असते, हे समजून घेतले पाहिजे. सावरकरांविषयी जे अनेक गैरसमज पसरले गेले, त्याचे एक कारण त्यांची ही भाषा आहे. सावरकरांचा शस्त्रवाद एवढ्या प्रखरतेने आपल्याला जाणवतो याचे कारण सावरकर हे नेहमी शस्त्र चालवितात हे नसून, शब्द आणि भाषा ते शस्त्रसारखी चालवितात हे आहे! त्यांच्या भाषेत लोकशाही नसल्यामुळे त्यांची वृत्ती लोकशाहीची अहे, हे आपल्या लवकर लक्षांतच येत नाही.

पंचमहापातके

'अभिनव भारत' हया आपल्या क्रांतिसंस्थेचा सांगता समारोप त्यांनी १९५२ साली केला. सशस्त्रक्रांती हेतू असलेल्या अशा संस्थेचे कार्य पारतंत्र्यातच असते, व अशा संस्था स्वतंत्र भारतात अस्तित्वात असू नयेत, असे स्पष्टपणे सांगून, 'अभिनव भारत' ही सशस्त्र क्रांतिकारकांची गुप्तसंस्था १९५२ मध्ये

त्यांनी जाहीरपणे विसर्जित करुन टाकली. त्या निमित्ताने त्यांनी स्वतंत्र भारतातील नागरिकांना हिंसा व शस्त्रविषयक मार्गदर्शन करणारी चार व्याख्याने दिली. स्वतंत्र भारतात आपण कसे वागलो पाहिजे, याचे सुस्पष्ट विवेचन त्यांनी आपल्या व्याख्यानात केले. स्वातंत्र्य मिळाल्याबरोबर पहिले कर्तव्य हे असते की, क्रांतिकालातील फैलावलेल्या राज्यविध्वंसक वृत्तींना नि साधनांना तत्काल विसर्जून राष्ट्रात विधायक व निर्बंधशील वृत्तीचे वर्चस्व स्थापिले पाहिजे, असे त्यांनी आग्रहानी सांगितले. ते म्हणाले, [२] " परराज्य उलथून पाडण्याठी गुप्तकट सशस्त्र बंडाळी, भयंकरबळ, परराज्यद्रोह ही सर्व साधने पुण्यच असतात, अपरिहार्य असतात. पण जर ही साधनें नि हचा सर्व वृत्ति स्वराज्य स्थापन होताच पंचमहापातकांसारखी अधर्म्य समजून तत्काल टाकून दिली नाहीत तर बाहेरच्या शत्रूहूनहि स्वराज्यास ती प्राणघातक ठरल्यावाचून राहत नाहीत." ही त्यांची भूमिका क्रांतिकार्यास सुरवात करण्यापूर्वीपासूनची आहे. परराज्य उलथून पडताच स्वराज्याची स्थापना कोणत्या पायावर नि तत्वावर केली पाहिजे, याचा आराखडा क्रांतिकारकांनी आधीच निश्चित केलेला होता. या साऱ्या गोष्टी त्यांनी पटवून सांगितल्या आहेत. अभिनव भारताच्या प्रत्येक सभासदाला प्रत्येक रात्री निजावयास जाताना अेकत्र व अेक स्वराने जो राष्ट्रीय संकल्प पुनरावृत्त करावा लागे, तो त्यांनी ' माझी जन्मठेप ' मध्ये सांगितला आहे. तो संकल्प असा: [३] " हिंदुस्थानास स्वतंत्र करावयाचे, हिंदुस्थानास एकराष्ट्र करावयाचे, हिंदुस्थानास लोकसत्ताक करावयाचे." हा संकल्प सावरकरांनी जन्मभर कधीही सोडला नाही, हे समजून घेतले पाहिजे. सावरकरांचे शस्त्रविषयक सूत्र असे होते [४] "Constitution within– revolution outside! Law within–sword outside ! Peace within-war outside ! " सावरकरांचा हा शस्त्रविषयक असलेला विवेक आपण समजून घेणार नाही काय ?

आपद्धर्म

केसरीतील एका लेखात सावरकर हाच विषय घेवून क्रांतिकालातील शस्त्राचार हा आपद्धर्म होता असे सांगून ते पुढे म्हणतात, [५] " परसत्तेच्या आपत्तीतून आपल्या राष्ट्राचे स्वातंत्र्य संपादन करण्यास्तव असंतोष, अुत्क्षोभ निर्बंधभंग, शस्त्राचार, गुप्तकट अित्यादि साधने योजणारी विध्वंसक क्रांतिप्रवृत्ति त्या कालापुरतीच काय ती धर्म्य असते; परंतु ही क्रांतिप्रवृत्ति जर अशीच मूळ धरुन राहू दिली, तर केव्हा केव्हा आपद्धर्मालाच नित्यधर्म समजण्याची भयंकर भूल जनतेच्या हातून घडते. आणि त्यामुळे राज्यक्रांति यशस्वी झाल्यानंतरही राष्ट्रात ही विध्वंसक बेबंदशाही तशीच चालू राहते. त्यामुळे राज्यक्रांतीनंतर घटनात्मक स्वराज्य स्थापन करणे अशक्य होवून अपक्रांति नि अराजक माजते. अर्थात् मिळालेले स्वातंत्र्यही धोक्यात येते. पहिल्या फ्रेंचक्रांतीचा अितिहास हा अशा

भयंकर परिणामाचे एक ज्वलंत उदाहरण आहे." सावरकरांना शस्त्राचाराचे कसलेच तारतम्य नसावे, ते शस्त्रवेडे असावेत, नको तेथे–गरज असताना शस्त्र वापरण्याचे त्यांना वेड असावे, हा निष्कर्ष किती निराधार आहे, हे यावरुन लक्षात येईल.

खरा राष्ट्रधर्म

सावरकर आपल्या खास सूत्रमय भाषेत सांगतात, "कारण आता आपले साध्य स्वातंत्र्य संरक्षण हे आहे, राष्ट्रसंवर्धन हे आहे. आता निर्बंध तुच्छता नव्हे, तर निर्बंधशीलता; विध्वंसक नव्हे तर विधायक प्रवृत्ति, हा राष्ट्रधर्म आहे" स्वातंत्र्य मिळाल्यावरोवर हीच विधायकप्रवृत्ति आपल्यात निर्माण झाली पाहिजे, आपद्धर्माचा त्याग करुन नित्यधर्माचीच कास धरली पाहिजे, शस्त्र टाकून कायद्याचे साधन वापरले पाहिजे, यावर सावरकरांचा असलेला विश्वास व आग्रह आपण समजून घेणार नाही काय? ते पुढे म्हणतात,[५] "परकीय राजवटीविरुद्ध जी अराज्यनिष्ठेची, असहकाराची, नि विध्वंसाची क्रांतिप्रवृत्ति आपणच निर्मिलेली आहे, तिचे आता स्वराज्यनिष्ठ, सहकारी नि विधायक अशा शांति प्रवृत्तीत तत्काळ रुपांतर केले पाहिजे." शस्त्रवळाच्या नि सामर्थ्याच्या भाषेच्या आत अशी ही सावरकरांची संपूर्ण लोकशाहीची, शांततेची, अहिंसेची, सहकाराची, शस्त्राचाराचा धिक्कार करणारी वृत्ती अंतर्भूत आहे, हे समजून घेणे आपले कर्तव्य आहे. शस्त्र केव्हा वापरावे याचा जो विवेक त्यांनी जन्मभर आपल्या भाषणातून, लेखनातून, व आचरणातून सांगितला आहे, याचा कसलाही विचार न करता त्यांच्या विशिष्ट परिस्थितीतील शस्त्रविषयक भाषेचा विपर्यास करुन त्यांना 'शस्त्रवेडे' म्हणणे काय होईल काय?

स्वातंत्र्यपूर्व कालात सात वर्ष सावरकर हिंदूमहासभेचे अध्यक्ष होते. या काळात त्यांनी केलेले राजकारण लोकशाहीवादीच होते. लोकशाहीचा वस्तुपाठ, मात्र लोकशाहीची आकंठस्तुतीची परिभाषा न वापरत, त्यांनी स्वातंत्र्यपूर्व काळातच गिरवून दिला होता. जितका गांधी–नेहरुंनी काँग्रेसच्या माध्यमातून दिला होता, तितकाच सावरकरांनीही हिंदूमहासभेच्या माध्यमातून दिला होता. राष्ट्रांतर्गत प्रश्न, की ज्याचा स्वातंत्र्याशी संबंध नाही, शस्त्रास्त्राच्या मार्गाने सोडावेत असे त्यांनी कुठेही म्हटलेले नाही. 'One man one vote' हा सिद्धांत त्याच्या विचाराचा नि प्रचाराचा केंद्रबिंदू होता. ते निवडणुकीत भाग घेत, दौरे काढीत, लोकांना समजून सागत, निःशस्त्र आंदोलने करत, लोकाकडून मते मागत. शस्त्राचा आधार न घेता हे सारे करत असत. ते झोळी पसरुन मताचा जोगवा मागत होते, हातात शस्त्र घेवून ते निवडणुका लढवीत नव्हते. कोणतीही गोष्ट लोकांच्या बुद्धीला व मनाला पटविण्यात त्यांना विश्वास व रस होता, मनःप्रवर्तनात त्यांची निष्ठा होती, तोच त्याचा प्रयत्न असे. शस्त्रबळ हाच सर्व प्रश्नावरील

तोडगा म्हणून विश्वास असणाऱ्याला हे काहीही करण्याची गरज नसते, हे लक्षात येतले पाहिजे.

आता सहनशिलता हवी

भारत स्वतंत्र झाला. सावरकरांना अत्यानंद झाला. त्या स्वातंत्र्याचे त्यांनी स्वागत केले. "आम्ही आमची मातृभूमि स्वतंत्र झालेली 'ह्याचि देही ह्याचि डोळा' पाहिली, ह्यातच आम्ही कल्पनेहून कृतार्थ झालो असे समजतो," असे त्यांनी कृतज्ञतेने म्हटले.[६] या स्वतंत्र भारतातील नागरिकांचे मुख्य कर्तव्य कोणते, हे त्यांनी सांगता महोत्सवाच्या समारोपात विशद करुन सांगितले. पारतंत्र्यात आपली जी दैना व दुर्दशा झालेली आहे, ती कोणतेही शासन आले तरी एका दिवसात जादूच्या कांडीसारखी नाहीशी करता येत नसते, हे सांगून सावरकर म्हणतात,[७] "अशा वेळी सर्व नागरिकांचे मुख्य कर्तव्य हेच असले पाहिजे की, काही काळ तरी कळ सोसून आपल्या स्वकीय शासनास ती दुर्दशा निवारण्यासाठी शक्य ते ते साहाय्य प्रत्येकी आपल्या परिश्रमाने व सहनशिलतेने देत राहिले पाहिजे." सावरकरांचा हा उपदेश कोणत्याही लोकशाहीवादी नेत्याइतकाच लोकशाहीवृत्तीचा आहे, हे उघड आहे.

शासनसंस्थेकडे राजकारणातीत दृष्टीने पाहण्याचा जनतेला सावरकर उपदेश करतात. हे सरकार आपलेच आहे, ह्या सरकारच्या चुका आपल्याच आहेत असे समजण्याचा उपदेश ते करतात. सरकारच्या हातून अनेक कारणांनी अनेक चुका घडत असतात, याचा उल्लेख करुन त्या चुकाचा अर्धा दोष जनतेवरच येतो, कारण त्यांनीच त्या पक्षाला निवडून दिलेले असते, असे संयमाने वागायला लोकांना ते शिकवितात. सरकारच्या चुकाकडे अत्यंत विवेकाने पाहिले पाहिजे असे ते बजावतात. ते पुढे म्हणतात, "न्यायाच्या दृष्टीने हेही स्पष्ट केले पाहिजे की, क्रांतिकाल संपतासंपताच नवनिर्मित स्वराज्याची घडी नीट बसविण्याचे कठीण कार्य, बहुमताचे काँग्रेस पक्षाच्या हाती सोपविले न जाता दुसऱ्या साम्यवादी समाजवादी, हिंदुत्वनिष्ठ प्रभृति इतर कोणत्याही पक्षाचे हाती जाते तरी काँग्रेस-प्रमाणेच काही अनुनभवामुळे, तर काही सत्तालोभामुळे त्या इतर पक्षाचे हातूनही अशा काही चुका घडल्याच नसत्या असे नाही. कारण एकाच सरोवराच्या पाण्यात काढलेल्या निरनिराळ्या पोहऱ्याप्रमाणे आमचे सारे पक्ष एकाच समाजातून वर आलेले असल्यामुळे त्यांच्यात ह्या वा त्या प्रमाणात तेच गुणदोष असण्याचाच संभव अधिक ! अशा स्थितीत तत्कालीन शासन संस्थेकडून काही राजकीय चुका घडल्या, काही व्यक्तिव्यक्तीच्या पक्षीय द्वेषभावनेने छळ झाला तरी आपण एकदम डोक्यात राख घालता कामा नये." लोकशाही शासन पद्धतीचा, या पद्धतीतील अंगभूत दोषाचा, ही पद्धत रुजण्यासाठी लागणाऱ्या संयमी विवेकाचा ते किती थंड डोक्याने व शांत मनाने विचार करतात हे

समजून घेतले पाहिजे. क्रांतिकारक विचाराचे सावरकर काहीतरी हिंसकप्रवृत्तीचे, भडक माथ्याचे, भावनेच्या आहारी जाणारे, सतत संघर्ष करण्यात धन्यता मानणारे असे असावेत अशी काही जणाची भावडट समजूत असते. सावरकरांना शस्त्रवेडे म्हणणाऱ्याचा हेतू या भावटपणावर शिक्कामोर्तब करण्याचा व सावरकरांची विकृत अशी प्रतिमा तयार करण्याचा आहे. डॉ. फडके यांनी सावरकरांचे हे सारे विचार वाचलेले आहेत, कारण याच भाषणातील कांही उतारे त्यांनी आपल्या लेखात अितरत्र दिलेले आहेत. सरकारच्या चुकांबद्दलही लोकांनी एकदम डोक्यात राख घालून न घेता विवेकाने, शांततेने व सहकार्याने वागावे, असा उपदेश देणाऱ्या सावरकरांना शस्त्रबळ हाच राष्ट्रातील सर्व प्रश्नावर तोडगा आहे असे वाटत होते, असे जर कुणाला म्हणायचे असेल, तर आपण त्याला काय करणार ?

सावरकर नुसता दुसऱ्याला असा उपदेश करुन थांबत नसतात तर स्वत: आचरुन दाखवतात. काँग्रेस सरकारने सावरकरांचा अनेक प्रकारे छळ केला. गांधी-हत्त्ये प्रकरणापुरताच हा छळ मर्यादित नाही. राजकारणातून मुक्त होण्यास लोकशाहीवादी नेहरुंनी सावरकरांना भाग पाडले, हा ताजा अितिहास आहे. पण सावरकरांनी या विरुद्ध कधीही तक्रार केली नाही. ते म्हणतात, [९] " तथापि मी त्या विषयी स्वकीय शासनाविरुद्ध चकार शब्दही काढला नाही, हेही वरील कारणासाठीच होय," असे त्यांनी स्वत:च सांगितले आहे. चुकांच्या बाबतीत स्वत:चा पक्ष धरुन सर्वच पक्ष एकाच सरोवरातील पाण्यासारखे चुका करणारे आहेत, हा सावरकरांचा न्यायनिष्ठुरपणा व निःपक्षपातीपणा लक्षात घेण्यासारखा आहे.

मतभेद मतपेटीत

'अराजकासारखा आपल्या प्रस्थापित स्वराज्याला दुसरा भयंकर शत्रू नाही,' असा त्यांनी अिषारा दिला आहे.[१०] आता स्वराज्य प्रस्थापनेनंतर कितीही तीव्र मतभेद असले तरी ते आपले सारे मतभेद मतपेटीतच सामावले पाहिजेत, असा राष्ट्रातील मतभेदाची समस्या सोडविण्याचा लोकशाही मार्ग त्यांनी सांगितला आहे. गांधीजीच्या अहिंसेवर जन्मभर टीका करणारे सावरकर राष्ट्रातील सर्व समस्या मतपेटीच्या–अहिंसेच्या मार्गानेच सोडवायला सांगतात. अहिंसेचे नाव घेत नाहीत, मात्र अहिंसेचाच मार्ग सांगतात, हे समजून घेतले पाहिजे. आता ह्या मतपेटीचे पळवायचा व लोकशाहीच्या नरडीलाच नख लावण्याचा कोणी प्रयत्न केला, देशात अशाप्रकारे अराजक माजविले, तर कायद्याच्या मर्यादेत सावरकर शासनाला शस्त्र घ्यायला सांगणार, हे उघड आहे.

या देशाला सर्व प्रकारचे राष्ट्रीय पक्ष आवश्यक आहेत, असे सावरकरांचे म्हणणे होते. कुणी अंगावर शस्त्र घेवून आक्रमण करुन येत असला तर हा पुरुष-सिंह चवताळून उठतो, डरकाळ्या ठोकतो, आपले दात व पंजे दाखवतो; मात्र

शांततेच्या सहजीवनासाठी ते गांधीजी अितकेच अहिंसक व नेहरु अितकेच लोकशाहीवादी आहेत, हे आपल्या लक्षातच येत नाही. १९३७ मध्ये पंढरपूरला सत्काराला उत्तर देताना ते म्हणाले. [११] "युद्धामध्ये जसा अनेक शस्त्रास्त्राचा मारा करावा लागतो, तसा राष्ट्रमातेच्या सेवेमध्ये सर्व पक्षाचा उपयोग असतो, हे ध्यानात घेतले पाहिजे. कोणताही एखादा पक्ष सर्वस्वी वरोवर नि पूर्ण असणार नाही. ज्यांना विधिमंडळे पसंत असतील त्यांनी आत जावून काम करावे, पण आपण परस्परांना पूरक व्हावे, मारक होवू नये, हे ध्यानी बाळगावे." ही सावरकरांची शिकवण होती. "पक्ष अधिक असले तरी चालतील, पण प्रत्येकाने राष्ट्रहिताचे कार्य अधिक कोण करतो, याची स्पर्धा लागली पाहिजे," [६४] असे सावरकरांचे म्हणणे होते. "मी आपल्याला सांगेन की आपण कोणत्याही पक्षाचे असा, पण अशी आकांक्षा बाळगा की, अितर पक्ष देशासाठी जे जे कार्य करतील त्यापेक्षा मी काहीतरी अधिक चांगले करुन दाखवीन." असे ते म्हणत. [६५]

राष्ट्राला जे विविध प्रकारचे पक्ष लागतात त्यांच्यात सहकार्य व एकोपा असावा लागतो. यासाठी सावरकरांनी हिंदुमहासभेचे अध्यक्ष असताना एक आचार संहिता तयार केली होती. ती 'मराठा' या अिंग्रजी साप्ताहिकात सविस्तपणे प्रसिद्ध झालेली आहे. बाळाराव सावरकरांच्या सावरकर चरित्र कथनात या आचार संहितेची माहिती देण्यात आलेली नाही. ही आचार संहिता आजसुद्धा मार्गदर्शक ठरावी, अितकी आदर्श आहे. त्यातील निवडक भाग आम्ही पुढे देत आहोत. पुण्यातील त्यावेळेसच्या एका घटनेच्या निमित्ताने ही आचार संहिता त्यांनी तयार केलेली होती. जे झाले ते आता विसरुन जा व अेकमेकांना क्षमा करा, असे सांगून सावरकर पुढे म्हणतात, [१२] "मागे जे झाले ते विसरुन जात असतानाच, आपण सर्वांनी मी खाली निवेदन केल्याप्रमाणे आचारसंहिता (Line of action) पाळली, तर आपल्या राष्ट्रात आपण ज्या लोकशाहीची प्रस्थापना करण्याचे ठरविले आहे, त्या लोकशाहीला आवश्यक असलेल्या नागरिकत्वाची मूल्ये रुजविण्याचे कर्तव्य पाडल्यासारखे होणार आहे. या बाबतीत ब्रिटीश लोकशाहीचे उदाहरण मार्गदर्शक ठरेल."

आचार संहिता

या आचारसंहितेची सावरकरांनी प्रमुख पाच सूत्रे सांगितली. ती थोडक्यात अशी :

"(१) सर्व पक्षांनी लालध्वज, तिरंगाध्वज, भगवाध्वज किंवा अितर कोणते एखाद्या पक्षाचे चिन्ह, याचा मानभंग होअील, असे वर्तन टाळण्याचा शक्य तितका प्रयत्न केला पाहिजे."

"(२) एखाद्या पक्षाने एखादी सभा, मिरवणूक वा आंदोलन आयोजित केलेले असेल, तर अितर पक्षांनी एकतर त्यात उपस्थित राहण्याचे अजिबात टाळावे

किंवा जर उपस्थित राहिलेच तर त्या पक्षाचे विचार व युक्तिवाद शांतपणे ऐकून घेतले पाहिजेत. त्यामध्ये बळाने कोणताही व्यत्यय आणता कामा नये किंवा तो कार्यक्रम उधळलाही जाता कामा नये. जर त्या पक्षाची मते वा कार्यक्रम टीकायोग्य वा निषेधार्ह वाटत असतील, तर स्वतंत्र सभा वा कार्यक्रम घेवून तशी टीका वा निषेध केला गेला पाहिजे."

"(३) जेव्हा दोन, तीन किंवा सर्वच पक्षांनी एक समान कार्यक्रम एकत्रित आयोजित करण्याचे ठरविले असेल, तर त्यांनी सर्वसंमत अशा ठरावाच्या योजना, घोषणा, ध्वज किंवा अितर कार्यक्रम अगोदर निश्चित केले पाहिजेत. ही योजना सर्वांना समजून सांगितली पाहिजे. कुणीही या सर्वसंमत मर्यादेचा भंग करता कामा नये किंवा फूट पडेल असे वक्तव्यही करता कामा नये."

"(४) "ही सर्व काळजी घेवून व पथ्ये पाळूनही, जर काही जणांकडून या आचार संहितेचे उल्लंघन झालेच तर, ते ज्या पक्षाचे असतील त्या पक्षानी त्याच्या अशा उपद्रवी कृत्याचा निषेध केला पाहिजे आणि अितर पक्षांनी अशी कृत्ये ही संबंधित पक्षाची न मानता वैयक्तिकच मानली पाहिजेत. अशा वैयक्तिक चुकाकरिता संबंध पक्षाला दोषी धरता कामा नये."

"(५) "जसा प्रत्येकाला आपली मते मांडण्याचा व त्याचा प्रचार करण्याचा हक्क आहे, तसाच दुसऱ्या पक्षालाही त्या मताचा कायदेशीर मार्गाने विरोध वा निषेध करण्याचा हक्क आहे. जोपर्यंत हा विरोध वा निषेध अशा कायदेशीर व सृजनशीलतेच्या मर्यादेत आहे, तोवर तो कितीही अप्रिय वा कठोर असला तरी सहन केला पाहिजे. हा सहनशिलतेचा सद्गुण प्रत्येक पक्षानी जोपासला व रुजविला पाहिजे."

सावरकरांची ही आचारसंहिता लोकशाहीचा पुरस्कार करण्याऱ्या नेत्याची आहे. दंडशक्तीवर नि शस्त्रबळावर सर्व प्रश्न सोडवू पाहणारा नेता अशी आचारसंहिता मांडीत नसतो, व स्वतः आचरितही नसतो. भारताला लोकशाहीच हवी आहे, ती भारतात रुजविण्याचे कठीण कार्य आपल्याला करायचे आहे, त्यासाठीच सावरकर हे सारे सांगत आहेत. प्रत्यक्ष राजकारण करत असताना सांगितलेल्या या गोष्टी आहेत. सावरकरांनी लोकशाहीवर एखादा प्रबंध काय, पण निबंधही लिहिला नाही, पण प्रत्यक्ष व्यवहारामध्ये या लोकशाहीची मुलभूत तत्वेच ते लोकांना शिकवित होते, हे अपण काळजीपूर्वक समजून घेतले पाहिजे.

घटनात्मक–शांततामय

संपूर्ण अहिंसक व लोकशाहीचा आत्माच असलेली ही वरील पाच सूत्रे सांगून सावरकर पुढे म्हणतात, "आपली राजकीय वाटचाल प्राथमिक अवस्थेत आहे. परंतु यानंतर आपल्या राष्ट्राला जीवन मरणाच्या प्रश्नाला तोंड द्यावे लगणार आहे. अशा कठीण परिस्थितीतही आपणाला आपआपसात संघर्ष होणार नाही,

याची काळजी घेतली पाहिजे. आणि जरी असा संघर्ष अपरिहार्य झाला तरी अपाय कारक होणार नाही (innocuous), हे पाहिले पाहिजे. त्यासाठी आपण सर्वांनी आजपासूनच लोकशाहीची आणि व्यक्तिस्वातंत्र्याची मुलभूत तत्वे शिकली पाहिजेत. आम्हाला जे सामर्थ्य पाहिजे, ते आपआपसात भांडण करण्यासाठी नव्हे. आपल्याला शिस्त हवी आहे. शस्त्रे आपल्याला राष्ट्राबाहेर वापरायची आहेत. देशात घटनात्मक राज्य पाहिजे आणि संघर्षवृत्ती ही देशाबाहेरच्या करिता वापरली पाहिजे. राष्ट्रांतर्गत क्रांती ही शांततामय मनःप्रवर्तनाच्या मार्गानेच झाली पाहिजे. बाहेरुन येणाऱ्या राष्ट्रावरील आक्रमणाचा मुकाबला करण्यासाठी अटळ म्हणून काय तो शस्त्रबळाचा मार्ग आपल्याला चोखळला पाहिजे. सनातन्यापासून साम्यवाद्यापर्यंतचे सर्वच पक्ष आपल्या या राष्ट्राचे व एकंदर मानवजातीचे कल्याण व्हावे याच ध्येयभावनेने प्रेरित झालेले आहेत. तेव्हा आपले हे ध्येय लक्षात घेता आपण सर्वजण मिळून एकच पक्ष आहोत. आपण मनुष्य आहोत व म्हणूनच आपल्या हातून काही चुका होणारच आणि प्रत्येक पक्ष हा काही चुकीच्या भूमिका बाळगीत असतो. यासाठी सर्व पक्षांचे म्हणणे ऐकून घेणे, त्यांच्यावरोवर विचारविनिमय करणे, त्यांच्या भूमिकेचे मूल्यमापन करणे, हे धोरण फार उपयुक्त आहे. असे केल्यानंतरच आपण आपले धोरण व भूमिका ठरविली पाहिजे. असे केल्यामुळे अेकांगीपणामुळे आपल्या होणाऱ्या चुका आपल्याला टाळता येतील. जो पर्यंत आपली मते बलाच्या जोरावर दुसऱ्यावर कुणी सक्तीने लादत नाही नि कायदेशीरपणाच्या व नीतिमत्तेच्या मर्यादा उल्लंघन नाही, तो पर्यंत प्रत्येक नागरिकाचा विचार व भाषण स्वातंत्र्याच्या अनिर्बंध हक्क अितरानी मान्य केला पाहिजे." सावरकरांचा लोकशाही विचार हा असा आहे! लोकशाहीच्या नावाने त्यानी टाहो फोडला नसला तरी ते नेहरुअितकेच लोकशाहीवादी होते, हे समजून घेतले पाहिजे.

लोकशाहीवादीच

शेवटी सावरकरांनी लिहिले आहे की, भारतातील सर्वच पक्षात मतैक्याचा भाग अधिक असून मतभेदाचा कमी आहे. मतभेदाच्या प्रश्नाला अवास्तव महत्व न देता सर्वांनी एकत्र येवून काम केल्यास भारतात सामाजिक आणि राजकीय क्रांती ही आंतरयुद्धाशिवाय (Internal civil war) करता येणे शक्य आहे. लोकशाहीसंबंधीचे हे त्यांचे विचार आम्ही वर थोडे तपशीलाने दिले आहेत, कारण सावरकरांची आपल्या समोरील तयार केली गेलेली प्रतिमा लोकशाहीवादी नेत्याची नाही. लोकशाहीवर त्यांनी कोणता ग्रंथ लिहिला असता तर लोकशाहीचे प्रणेते म्हणून आपण त्यांना डोक्यावर घेवून नाचलो असतो. पण सावरकर पडले कर्ते सुधारक! लोकशाही या संकल्पनेचे मुलभूत चिंतन करत व मांडत बसण्यापेक्षा, ती लोकात कशी रुजवावी यांचीच त्याना अधिक चिंता होती. तत्वाचे, शब्दाचे कसलेही अवडंबर न माजवता खरीखुरी लोकशाही मानणारा, ती रुजविण्याचा प्रयत्न

करणारा हा माणूस आहे, हे आपल्या लवकर लक्षातच येत नाही. यामुळेच प्रा. विद्याधर पुंडलिक म्हणतात की, सावरकरांनी लोकशाही व व्यक्तिस्वातंत्र्य या तत्वाचा जोरदार पुरस्कार केलेला दिसत नाही, मात्र त्यांना ही तत्वे मान्य असावीत असे वाटते.[१३] सावरकर हे लोकशाही तत्वाचे प्रचारक नसून ते प्रत्यक्ष आचारक आहेत, या वस्तुस्थितीमुळे प्रा. पुंडलिकांना असा तर्कप्रणित अभिप्राय द्यावा लागला आहे, हे समजून घेतले पाहिजे.

लोकशाहीत व्यक्तीला विचार स्वातंत्र्य किती राहावे याबद्दल सावरकर म्हणतात, "देशातील ३५ कोटी लोकसंख्येपैकी ३४ कोटी ९९ लक्ष ९९ हजार ९ शे ९९ लोक एका बाजूला असले आणि माझे मत त्यांच्याशी जमत नसले, तरी मी एकटा बाजूला निघून माझे देशहिताविषयीचे मत बोलून दाखवीन. मी त्या बाबत होणारी शिक्षाही भोगीन." लोकशाहीचा सिद्धांत न मांडणाऱ्या सावरकरांची व्यक्तिस्वातंत्र्याबद्दलची भूमिका ही अशी आहे !

आपल्या पक्षाचे कर्तव्य

सावरकरांच्या एका वैशिष्ट्याची येथे नोंद करणे अवश्य आहे. मनुष्याच्या म्हणजेच त्यांच्या स्वतःच्या, समाजाच्या, राष्ट्राच्या जीवनासाठी अनेक गोष्टी लागतात. या जीवनाची अनेक कार्यक्षेत्र आहेत. या सर्वच क्षेत्रातील सर्वच विचार मांडण्याची भूमिका सावरकर कधीही घेत नाहीत. हे काम कोणत्या एका व्यक्तीचे वा पक्षाचे नाही, अशी त्यांची भूमिका आहे. यासाठी विविध विचारांच्या व्यक्ती लागतात, पक्ष लागतात व हे सर्वच राष्ट्रासाठी आवश्यक आहेत, अशी सावरकरांची व्यापक भूमिका आहे. याच भूमिकेतून माझाच पक्ष खरा, तोच काय तो देशकल्याण करील, बाकीचे पक्ष बिनकामाचे, देशअहित करणारे, अशी सर्वसामान्य भूमिका ते कधीही घेत नाहीत, सनातन्यापासून साम्यवाद्यापर्यंत सर्वच पक्ष राष्ट्रकल्याणाचीच चिंता वाहतात व तेही पक्ष आवश्यकच आहेत, असे ते म्हणतात, याचे कारण हेच होय. त्यांचे म्हणणे प्रत्येक पक्ष राष्ट्रहिताचा कोणता ना कोणता विचार वा योजना घेवूनच उभा राहतो. प्रत्येक पक्षातील असे चांगले विचार व योजना एकत्र करुनच सर्व पक्षाच्या सहकार्याने राष्ट्राचा विकास केला जावा, असा त्यांचा आग्रह आहे. त्या त्या परिस्थितीत जो विचार वा योजना आवश्यक वाटते ती त्या त्या पक्षानी मांडावी अशी त्यांची भूमिका आहे. या भूमिकेचे दोन परिणाम झाले. एक परिणाम असा झाला की, राष्ट्राकरिता आवश्यक असणारा एखादा विचार वा योजना अन्य कोणत्याही पक्ष मांडत नसेल, तर तो मांडणे आपल्या पक्षाचे कर्तव्य आहे, असे त्या पक्षाला वाटले पाहिजे. सावरकरांचे असेच झाले. राष्ट्ररक्षणाचा, स्वातंत्र्यरक्षणाचा विचार भारतातील कोणताही पक्ष अग्रक्रमाने व गंभीरपणे घेत नव्हता, यासाठी सावरकरांनी तो अग्रक्रमाने घेतला. तोच त्यांनी आग्रहाने व टाहो फोडून मांडला, प्रचारला. परिणामतः सावरकर शस्त्रसामर्थ्याचे

पुरस्कर्ते म्हणून लोकांसमोर आले.

वरील भूमिकेचा दुसरा परिणाम असा झाला की, दुसरा पक्ष राष्ट्राकरिता आवश्यक असणारा एखादा विचार व योजना अग्रक्रमाने व आग्रहाने मांडत असेल, तर त्या विचाराला व योजनेला आपल्या पक्षाने पाठिंबा द्यावा व स्वतःची शक्ती दुसऱ्या एखाद्या आवश्यक अशा गोष्टीमध्ये लावावी, की जिकडे कोणताही पक्ष लक्ष देत नाही. काँग्रेसने लोकशाहीचा पुरस्कार केलेला होता, ही गोष्ट सावरकरांनी लक्षात घेतलेली होती. या बाबतीत काँग्रेसला पाठिंबा देणे व आपल्या पक्षाने अन्य राष्ट्रहिताचा विचार करणे सावरकरांना आवश्यक वाटलेले आहे, हे समजून घेतले पाहिजे. आपल्या जवळ असलेल्या शक्तिसामर्थ्याचा विचार करता अशी श्रमविभागणी करणे त्यांना आवश्यक वाटलेले आहे. काँग्रेस हा भारतातील सर्वात मोठा पक्ष. या पक्षानी लोकशाहीचा पुरस्कार केला. सावरकरांनी याबाबतीत काँग्रेसला पाठिंबा दिला व अशाच अन्य गोष्टीकडे आपली शक्ती वळवली, ही गोष्ट नीट समजून घेतली पाहिजे. लोकशाहीबद्दल त्यांनी काय काय लिहिले आहे, याचा शोध घेत गेल्याने त्यांची लोकशाहीबद्दलची भूमिका आपल्याला समजणार नाही. काँग्रेसच्या लोकशाही तत्वाला त्यांनी पाठिंबा दिला, या वस्तुस्थितीत त्यांचा लोकशाहीचा पुरस्कार समजून घ्यावा लागतो. लोकशाही तत्वाची चिंता काँग्रेस करत होती व त्याबाबतीत सावरकर निश्चिंत होते. सावरकरांना खरी चिंता जी काही लोकशाही येणार आहे, तिच्या रक्षणाची होती. या रक्षणाचा विचार काँग्रेसला दुय्यम वाटत होता. सावरकरांनी तो अग्रक्रमानी घेतला. राष्ट्राचे भौतिक व शस्त्रसामर्थ्य वाढले पाहिजे, असा आग्रह धरला. सावरकरांच्या या एकंदर भूमिकेचा सम्यकपणे विचार न करता, शस्त्रबळावर त्यांना सारे प्रश्न सोडवायचे होते, असा निष्कर्ष काढणे केवळ अज्ञानदर्शक नाही, तर खोडसाळपणाचे आहे, असे आम्हास वाटते.

राज्य सर्वांचे असे म्हणा

लोकशाहीतील पक्षांच्या संबंधाचा सावरकर अत्यंत बारकाईने विचार करतात. देशात काँग्रेसचे राज्य आहे, असे म्हणणे चुकीचे आहे असे ते म्हणतात. 'हे राज्य सर्वांचे आहे' अशी भाषा वापरली पाहिजे, असा त्यांचा आग्रह आहे. राष्ट्रीय व लोकशाही विचार आपल्यात अद्याप रुजलेले नाहीत, म्हणून एका पक्षाचे राज्य आहे, असे नेहमी म्हटल्याने चुकीचे व विषारी विचार राष्ट्रीय मनोवृत्तीतून रुजत जातात, असा त्यांचा आक्षेप आहे. राज्यशासन हातात नसणाऱ्या पक्षाला विरोधी पक्ष म्हणून संबोधणे सावरकरांना चुकीचे वाटते. राज्यकारभार शेवटी दोन्ही पक्षाच्या सहकार्याने व विचार विनिमयाने चालतो. आपल्याकडे लोकशाही नवीन असल्यामुळे विरोधीपक्ष या शब्द प्रयोगामुळे विरोधासाठी विरोध करण्याची प्रवृत्ती बळावण्याचा धोका असतो. त्यामुळे असा विपर्यास कर-

णारा विरोधीपक्ष हा शब्दप्रयोग करु नये, असे सावरकर म्हणतात. राज्यधारक पक्ष आणि अितर पक्ष यातील भेद सांगताना सावरकर म्हणतात. [१४] "ह्यांच्यात खरा विभेद अितकाच असतो, की पहिला पक्ष बहुमताचा असल्यामुळे त्यांच्या हाती घटनेप्रमाणे राज्यकारभार जातो आणि भिन्नपंथीयपक्ष, ही opposite party अल्पमतीय असल्यामुळे त्यांच्या हाती राज्यकारभार आलेला नसतो. यासाठी ह्या दोन पक्षांना सरकारी पक्ष आणि विनसरकारी पक्ष असे जरी म्हणता येईल, तरी बहुमतीय पक्ष आणि अल्पमतीय पक्ष असे शब्द योजनेच उचित आहे. या अल्पमतीय पक्षाचे मुख्य कर्तव्य, जर देशाला अपायकारक कृत्य राज्यधारक पक्षाचे हातून होते असे वाटले तर ते हाणून पाडण्यापुरता त्या शासकीय पक्षाला (Government) विरोध करणे वैध,परंतु ज्या गोष्टी देशहितकारक आहेत, त्यात राज्यधारक पक्षाशी मनःपुर्वक सहकार्य करणे, असे दुहेरी कार्य राहील." त्यांची ही भूमिका आजही राजकीय पक्षांना मार्गदर्शक ठरावी अितकी लोकशाहीवादी आहे. 'Constitution within,' 'Law within,' Peace within' असे जे सावरकर म्हणतात याचा हा अर्थ नीट समजून घेतला पाहिजे. 'War outside,' Sword outside' असे ते जे म्हणतात, त्याचाही अर्थ समजून घेतला पाहिजे.

कायदा व सुव्यवस्था

याचा अर्थ गांधीजीच्या कल्पनेतील स्वराज्यात जसे सैन्य नसते, पोलिस-यंत्रणा नसते, शस्त्र नसते– तशी स्थिती सावरकरांना मान्य होती, असा नाही. आपली अिच्छा नसली तरी देशात काही प्रमाणात अशांतता माजतेच, हिंसाचार घडतोच, अराजक माजतेच! शब्दाच्या व उदात्त तत्वाच्या उपदेशानी जिथे हिंसाचार थांबत नाही, तेथे त्या दुष्ट प्रवृत्तीला थांबविण्यासाठी शस्त्र घेणे सावरकरांना पाप वाटत नाही. मतभेद मतपेटीतून न मिटविता त्यासाठी शस्त्राचा, हिंसेचा आधार घेणाऱ्या स्वराज्यातील प्रवृत्तीच्या विरुद्ध शासनाला शस्त्रबळ वापरावेच लागते. लोकशाहीच्या रक्षणासाठी सुद्धा शस्त्रबळ आवश्यकच असते. जगातील कोणतेही राष्ट्र तत्वतः नि व्यवहारतः असे करतच असते. त्यासाठी राज्यघटनेमध्ये तरतुदी केलेल्या असतात. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी शस्त्राचा आधार न घेणारे लोकशाही राष्ट्र या जगात अस्तित्वात नाही. आपल्या भारतामध्ये सध्या जो अंतर्गत सुरक्षा कायदा आहे, त्याचे स्वरुप पाहता गांधी–नेहरुंनी प्रस्थापित केलेल्या या लोकशाहीलाही राष्ट्रांतर्गत समस्येसाठीही शस्त्रबळाचीच वाट चोखाळावी लागली आहे, हे दिसून येते. राष्ट्राच्या हितापुढे एखाद दुसऱ्या व्यक्तीचे हित हे दुय्यम आहे, असे जे सावरकर म्हणतात, [१५] त्यापेक्षा भारताची लोकशाही व राज्यघटना व्यक्तीला अधिक स्वातंत्र्य देत नाही, हे समजून घेतले पाहिजे. लोकशाहीच्या नरडीलाच नख लावणाऱ्या प्रवृत्तीला नष्ट कसे करायचे, हा प्रश्न सर्वच लोकशाहीवाद्यापुढे उभा असतो. अशा परिस्थितीत शस्त्राचा वापर सर्वांनाच अपरि-

हार्य असतो. प्रा. फडके सावरकरांचे एक एकांतिक उदाहरण देतात. नागा बंडखोरांचा बंदोबस्त विमाने पाठवून नेहरुंनी करायला हवा होता, या सावरकरांच्या एका भाषणातील विधानाचा त्यांनी उल्लेख केला आहे. "भारत सरकारने सामोपचाराचे उपाय न योजता नागा लोकांसारख्या भारतवासियांवर बाँबवर्षाव करुन तो प्रश्न सोडून पाहणे," कठीण आहे, असे त्यांनी या संबंधी म्हटले आहे.[१६] फडके यांच्या या विधानावर आपल्याला विचार करणे भाग आहे. 'Peace within– Sword outside' म्हणणारे सावरकर नागांच्या बाबतीत असे का म्हणतात, हे समजून घेतले पाहिजे.

नागलोकांचा प्रश्न

नागा बंडखोराचा किंवा सध्याच्या पंजाबमधील दहशतवाद्याचा किंवा श्रीलंकेतील तामिळी दहशतवाद्याचा प्रश्न कसा सोडवावा हा लोकशाही राष्ट्रासमोरील नेहमीच वादाचा विषय होऊन राहिलेला आहे. श्रीलंकेत त्या सरकारच्या आमंत्रणावरुन भारतानी आपली फौज पाठविली. भारतीय वंशाच्या श्रीलंकेत तामिळीवर बाँब वर्षाव केला. हे सारे करतांना त्या फौजेचे नाव 'शांतिसेना' असे ठेवले, एवढाच फरक आहे. सुवर्णमंदिरात सैन्य पाठविण्यात इंदिराजीनी चूक केली काय, हा अजूनही आपल्या चर्चेचा विषय आहे. ज्यासाठी हे बंड वा हिंसाचार केला जातो, तो मूळ प्रश्न सोडविणे हा एक भाग झाला. या हिंसाचाराला तो मूळ प्रश्न सोडवीपर्यंत पायबंद कसा घालावा, हा या प्रश्नाचा दुसरा भाग झाला. पहिला भाग सामोपचाराने, चर्चेने मिटतो. या मार्गानें प्रश्न मिटवयाचा तर उभय पक्षी तयारी लागते. या मार्गाने प्रश्न न मिटविता बॉम्ब वर्षाव करुन सोडवावा, असे सावरकर सांगत नाहीत. सामोपचाराने प्रश्न मिटत नाही, त्याचे यश दृष्टिपथात नाही, तो पर्यंत हा हिंसाचार चालू द्यायचा काय, ह्या मुख्य प्रश्नावर सावरकर बोलत आहेत. नाग लोकांची समस्या कशी सोडवावी, या विषयावर ते भाषण देत नाहीत. 'महाराष्ट्र हा हिंदुस्थानचा खड्गहस्त झाला पाहिजे' या विषयावर बोलत असताना ओघात आलेले ते एक उदाहरण आहे. देशाच्या संरक्षणासाठी शस्त्राची गरज आहे, हा मुद्दा पटवून सांगताना नाग लोकांचा प्रश्न उदाहणादाखल आलेला आहे. तात्विक पातळीवरुन हा प्रश्न कसा सोडवावा याची चर्चा हा बोलण्याचा विषय नसून, हिंसाचाराला पायबंद कसा घालावा, तितकाच मर्यादित मुद्दा त्यांनी त्या भाषणात विचारार्थ घेतलेला आहे. त्यासाठी शस्त्रबळाचा वापर केला पाहिजे, असे त्यांचे मत आहे.

तीव्र प्रतिक्रिया

शस्त्रबळासंबंधी सावरकरांची भूमिका समजून घेताना आणखी एक मुद्दा विचारात घेतला पाहिजे. आत्यंतिक अहिंसेच्या धोरणाच्या तीव्र प्रतिक्रियेतून

शस्त्राच्या अपरिहार्यतेचा, म्हणजेच शस्त्रसंन्यासाच्या अव्यवहार्यतेचा विचार त्यांनी सातत्याने नि आग्रहाने माडलेला आहे. गांधी–नेहरुंची अहिंसा व शस्त्राबद्दलची भूमिका आत्यंतिक टोकाची व अव्यवहार्य आहे, असा त्यांचा आरोप आहे. ही आत्यंतिक अहिंसक व शस्त्रसंन्यासी घातक मनोवृत्ती जनमानसात रुजता कामा नये, याबद्दल त्यांचा कटाक्ष आहे. या मनोवृत्तीपासून सावध राहण्याचा जनतेला सारखा अिषारा देण्याचे काम सावरकर करत असतात. ही वृत्तीच अनैसर्गिक आहे, असे ते सांगतात. जग हे शस्त्राचारीच आहे व काही काळ ते तसेच राहणार आहे, व म्हणून तोपर्यंत आपल्यालाही शस्त्रसंन्यास करता येत नाही, हे ते सारखे पटवून देतात. सावरकर शस्त्राबद्दल, सामर्थ्याबद्दल सारखे का बोलत असतात किंवा ह्याच गोष्टीचे सारखे तुणतुणे का लावतात, याचे हे कारण समजून घेतले पाहिजे सावरकरांची शस्त्राबद्दलची आक्रमक वाटत असलेली भूमिका तत्वापेक्षा व्यवहारावर, आणि त्या व्यवहारतही गांधी–नेहरुंच्या शस्त्रविषयक भूमिकेच्या तीव्र प्रतिक्रियेवर आधारलेली आहे, हा मुद्दा आपण समजून घेतला पाहिजे.

नागांचे बॉम्बहल्ले

नाग लोकांचा हिंसाचार कोणत्या थराला गेला होता हे त्यांनीच आपल्या त्या भाषणात सांगितले आहे. ते म्हणाले, [१७] " हे जे नागा लोक आहेत, त्यांना आठ दिवसात चेपता आलं नाही. ते उलटचा गोळचा झाडू लागले. आणि रोज वर्तमानपत्र वाचून मान खाली जावू लागली... आपले आठ लोक मारले गेले–– आपले दहा लोक मारले गेले. दोन गाव घेतली ! आता विमानानी वृष्टि करु लागले बॉबची... पण कुणी नागा मेला म्हणून बातमी यायची नाही !" परिस्थिती ही अशी होती ! महाराष्ट्रात सुरक्षितस्थळी राहून नागांना काय माणसे मारायची ती मारु द्या, विमानाचा वापरही करु द्या, त्यांच्यावर शस्त्र मात्र चालवू नका– असा उपदेश करणे सोपे असते. संसदेमध्ये नेहरुंनी असे सांगितले की, नाग लोकांवर शस्त्र चालबायचे नाही, असा सरकारने आदेश दिलेला आहे. अेकीकडे नागलोकांचा हा हिंसाचार नि दुसरीकडे नेहरुंची ती शस्त्रसंन्यासीवृत्ती समोर ठेवून, लोकांसमोर मांडून, सावरकरांनी नागांविरुद्ध शस्त्रबळ का वापरत नाही, असा सवाल करण्यामागे बंडाचा बिमोड करण्याच्या हेतूपेक्षा शस्त्राची अनिवार्यता पटवून देण्याचा हेतू अधिक आहे; आणि या दुसऱ्या हेतूपेक्षांही नेहरुंचे शस्त्रसंन्यासी धोरण कसे आत्मघातकी आहे हे पटवून देणे, हा हेतू अधिक आहे, हे समजून घेतले पाहिजे.

प्रश्न सैन्याच्या मनोधैर्याचा

सावरकरांचे सर्व भाषण आपण जर काळजीपूर्वक वाचले तर आपल्या लक्षात येते की, वरील कोणत्याही हेतूपेक्षा हे सांगण्याचा त्याचा मुख्य हेतू दुसराच

आहे. महाराष्ट्रीय तरुणानी सैन्यात गेले पाहिजे, हा सावरकरांचा प्रमुख प्रतिपाद्य विषय आहे. भारताचे सैन्य खरोखरच फार चांगले आहे, त्यांच्याच अपूर्व त्यागावर आपण येथे शांतपणे जगू शकतो– असे सैन्याचे कौतुक चालू आहे. पण आपल्या सरकारला सैन्याची किंमतच कळाली नाही, ही त्यांची तक्रार आहे. आपले सरकार आपल्या सैन्याला कसे वागवीत आहे, असा प्रश्न करुन त्याच्या खुलाशात त्यांनी नागालँडमध्ये दररोज आठ–दहा सैनिक मारले जात आहेत, मात्र गोळचा खाण्याशिवाय या सैनिकांना आमचे सरकार काहीही करु देत नाही, ही त्यांची तक्रार आहे. कारण नागा बंडखोर गोळीबार करुन दुर्गम्य जंगलात पळून जातात व सापडतच नाहीत, अशी ते माहिती सांगतात. नागलोकच विमानाचा वापर करुन बाँबवर्षाव करत होते, अशी ती परिस्थिती होती. सेनाधिकाऱ्यानी शेवटी विमान वापरण्याची नेहरुंना अनुज्ञा मागितली. शांतिप्रिय नेहरुंनी ती दिली नाही. सैन्याच्या अपूर्व त्यागाच्या संदर्भात बोलत असताना, नेहरुंसारखे अहिंसक राज्यकर्ते आपल्या धोरणाने सैन्यावरच कसे संकट आणतात, आपले हात बांधून घेवून सैन्यालाच गोळचा खायला कसे भाग पाडतात– हे सर्व सांगून यातून सैन्याची सुटका करण्यासाठी सेनाधिकाऱ्याला विमान वापरण्याची परवानगी का देत नाही, असा सावरकरांनी सवाल केला आहे. ज्या संदर्भात त्यांनी हे विधान केले आहे, तो संदर्भ व हेतू पूर्णपणे सोडून नागांचा प्रश्न बाँबवर्षाव करुन सावरकरांनी सोडवायला सांगितला होता, असा निष्कर्ष प्रा. फडके यांनी काढला आहे. आणि याच निष्कर्षाला सर्वव्यापक रुप देवून राष्ट्रांतील सर्व प्रश्नावर शस्त्रबळ हाच एक तोडगा आहे, यावर सावरकरांची निष्ठा होती, असा अंतिम निष्कर्ष काढण्यापर्यंत त्यांची मजल गेलेली आहे. आणि तेही अशा पद्धतीने की, सामोपचाराचा तोडगा उपलब्ध असतानाही तो सावरकरांना पसंत नव्हता, त्या ऐवजी बाँबवर्षाव त्यांना हवा होता व माणसे मारण्यातच त्यांना आनंद वाटत होता, असे वाचकांचे मत व्हावे.

नेहरूंचा बाँबवर्षाव

आटोक्यावाहेरील हिंसाचार थांबविण्यासाठी एखाद्या जंगलावर बाँब टाकण्याची सूचना सावरकर करतात, तेव्हा ते शस्त्रवेडे ठरतात; मात्र हिंदु–मुस्लीम दंगली शमविण्यासाठी बंगालवर बाँब टाकण्याचा अधिकार पंतप्रधान या नात्याने १९४६ मध्ये सरसेनापती लॉर्ड वेव्हेलच्या उपस्थितीत पं. नेहरुनी हिंदूना गंभीरपणे दिलेला होता–ते नेहरु मात्र अहिंसक गांधीजीचे अनुयायी व शांतिदूत ठरतात! काय न्याय आहे ? दोघांना आपण एकाच मापानी मोजत नाही, कारण आपल्या मापाच्या मोजपट्टचा पूर्वग्रहाच्या असतात. नेहरु अहिंसक, मानवतावादी आहेतच, असे पक्के ठरवूनच आपण त्यांच्याकडे पाहत असतो. अशा पुरुषानी नागरिकावर बाँबवर्षाव करण्याचा अधिकार दिला की, तो सात्विक संतापात आपण जमा करतो. सावरकर शस्त्रवेडे, हिंसाचारी आहेतच असे ठरवूनच आपण त्याच्याकडे पाहत

असल्यामुळे त्यांच्याविषयी मात्र वेगळा निष्कर्ष काढतो. वस्तुतः या दोघांपैकी कुणीही या प्रकरणी बाँब वापरला नाही. दोन्हीही प्रकरणी प्रत्यक्षात बाँबची प्रत्यक्ष कृती नेहरूंनाच करायची होती. बाँब टाकण्याची पहिली कल्पना नेहरूंची आहे. खरं म्हणजे सावरकरांनी आपल्या भाषणात या जुन्या बाँब वर्षावाचा संदर्भ द्यायला हवा होता. तसे झाले असते तर डॉ. फडके यांनी या गोष्टीचा उल्लेख न करता, दुसरे एखादे उदाहरण आपल्या निष्कर्षासाठी पुरावा म्हणून शोधले असते. नेहरूंनी बाँब वर्षाव केलेला नसला तरी गोळ्या घातल्याच होत्या, पण सावरकरांनी फेकलेले नुसते शब्दांचेच बाँब होते, हे समजून घेतले पाहिजे.

महायुद्धाने अहिंसा साधली

युद्ध ही काही चांगली गोष्ट नसते. महायुद्ध तर भयंकर गोष्ट असते. सावरकरांचेही असेच म्हणणे होते. युद्ध नि महायुद्ध खेळत बसण्याची त्यांना काही हौस नव्हती. आपल्या अिच्छेशिवायही आपल्यावर हे युद्ध लादले जात असते, ही वास्तवता समजून घेण्याचा मुख्य प्रश्न आहे. अमेरिकेने दुसऱ्या महायुद्धांत नागासकी व हिरोशिमावर बाँब वर्षाव केला व ती शहरे बेचिराख केली. माणसातील माणुसकीहिनतेचे, राक्षसत्वाचे उदाहरण देण्यासाठी आपण या घटनेचा उल्लेख करतो. सावरकर या घटनेबद्दल म्हणतात, १८ "मानवता, सहिष्णुता, उदात्तता, अहिंसा ही काही संपूर्ण सत्ये नव्हेत की, जी सदासर्वकाळ, त्रिकालाबाधित आचरता येतात. ते सर्व विचार चांगले आहेत, पण ते साक्षेप आहेत. अमेरिकेने जपानच्या त्या नागासाकी व हिरोशिमा शहरावर अणुध्वम टाकून ती बेचिराख केली. जगाने क्षणात एवढी अमानुष हिंसा पूर्वी कधी पाहिली नव्हती, की अनुभवली नव्हती. अमेरिकेच्या या अणुध्वमाचाच फक्त विचार केला तर ते कृत्य मानवाला न शोभेसेच म्हणावे लागेल." हे विचार सर्वसामान्य माणसाचेच विचार झाले. पण एवढे बोलून थांबतील तर ते सावरकर कसले? याही मानवसंहाराची श्रद्धाशून्यपणे ते चिकित्सा करतात. निषेध करण्यासाठी नव्हे, तर तिची अपरिहार्यता सांगण्यासाठी! ते पुढे म्हणतात, १९ "पण राजकीय दृष्टिकोणातून त्या कृत्याकडे पाहिले तर काय दिसते? या अमानुष कृत्यामुळेच असंख्य मानवाचे बळी, ते युद्धाचे भयंकर ताण तुटले. जग पुन्हा मोकळेपणाने जगायला आणि क्वचित पुढच्या अतिभयंकर, अति मानुष युद्धे खेळावयाच्या तयारीला मोकळे झाले. पुढे काही होणार असले तरी एका कृत्यानेच लढाअी थांबली, अहिंसा साधली." सावरकर येथे काय म्हणतात, हे नीट समजून घेतले नाही, तर ते महायुद्धाचे, त्या नरसंहाराचे नागवे समर्थन करणारे युद्धपिपासू व विध्वंसक प्रवृत्तीने पुरुष आहेत, असेच आपले मत होईल. महायुद्धाने अहिंसा साधते, यावर सावरकरांची निष्ठा होती, असा निष्कर्ष डॉ. फडके सहज काढू शकतील.

विविध भूमिकेतून

एकाच गोष्टीकडे सावरकर विविध भूमिकेतून पाहतात व त्या त्या भूमिके-

वेगवेगळा निष्कर्ष देत असतात. मानवतेच्या भूमिकेतून वरील गोष्ट निषेधार्ह, पण राजकीय दृष्टिकोणातून ती मात्र अपरिहार्य होती, ते असे दोन वेगवेगळे निष्कर्ष काढतात. ज्यांनी हा बाँब टाकण्याचा निर्णय घेतला त्यांच्या भूमिकेतूनही सावरकर विचार करतात. सावरकरांचे हे वैशिष्टय आहे. अिंग्रजानी त्यांना दोन जन्मठेपीच्या शिक्षा दिल्या. भारतीयांच्या दृष्टिकोणातून ती गोष्ट अन्यायकारक होती, असे त्यांचे म्हणणे होते. परंतु अिंग्रजाच्या दृष्टिकोणातून, जी शिक्षा दिली ती योग्यच होती, असे सावरकर म्हणतात. माझी चौकशीही अधिक चांगली व न्याय्यच झाली असे प्रमाणपत्र ते अिंग्रजाना देतात. अंदमानात त्यांना जी वागणूक मिळे, त्या बद्दलही त्यांनी स्वतःच्या भूमिकेतून संताप व्यक्त केला असला तरी, कारागृहाच्या नियमाच्या दृष्टीतून मला फारच चांगली वागणूक मिळत होती, असे त्यांनी म्हटले आहे. याच दुसऱ्याच्या भूमिकेतून विचार करुन नागासाकीच्या अणुध्वमाची अपरिहार्यता सावरकरांनी नोंदविलेली आहे. वाईटातूनही जे काही चांगले निघाले आहे, त्याची नोंद करण्याचा हा त्यांचा प्रयत्न आहे. त्या अणुध्वमाने दुसरे महायुद्धपूर्ण अनेक वर्ष, म्हणजे अगदी पहिल्या महायुद्धापासून युद्धपूर्व तणाव त्या युद्धमान राष्ट्रामध्ये जिवंत होते व त्याचा परिणाम त्या सर्व राष्ट्राच्या प्रगतीवर झालेला होता. हे भयकर ताण त्या अणुध्वमाने तुटले असे सावरकर म्हणतात. महायुद्ध वाईट असते, अणुध्वम वाईट असतो, हे अनुभवानी मनुष्याला शिकायला मिळाले. परिणामतः पुढेचे महायुद्ध, पुढचा अणुध्वम प्रत्यक्षात आणण्यापूर्वी जगाला गंभीरपणे विचार भाग पडले. सर्व जगाचा हाच ज्वलंत चर्चा विषय झालेला आहे. अमेरिका आणि रशिया ही शत्रू राष्ट्रेही असे तिसरे महायुद्ध होवू नये, म्हणून गंभीरपणे एकत्र येण्याचा प्रयत्न करीत आहेत. नवीन महायुद्धानंतर जगच अस्तित्वात राहणार नाही, हे शिकविण्याचे काम या वरील अणुध्वमाने केलेले आहे. तेवढापुरते तिसरे महायुद्ध लांबणीवर टाकण्याचे श्रेय या अणुध्वमाकडे जाते. एका हिंसक कृत्याने अहिंसा साधली असे सावरकर म्हणतात, याचा अर्थ हा असा आहे. हे समजून घेतले पाहिजे.

राष्ट्र रक्षणाचा प्रश्न

स्वराज्यातील राष्ट्रांतर्गत सर्व मतभेद शांततेच्या व मतपेटीच्या मार्गानी मिटवावेत नि शस्त्रांचा वापर हा आटोक्याबाहेरील हिंसाचाराविद्ध करावा, हीच आजच्या आधुनिक लोकशाहीची वाटचाल आहे. संपूर्ण शस्त्रसंन्यासाची गांधीप्रणित लोकशाही प्रत्यक्षात लवकर येण्याची शक्यता नाही. जशी ही शक्यता नाही, तशीच सैन्याशिवाय देशाचे रक्षण होण्याची शक्यता नजिकच्या काळात नाही. देशाचे स्वातंत्र्यरक्षण हे सावरकरांना आद्यकर्तव्य वाटत होते. सैन्य हा स्वातंत्र्यरक्षणाचा प्रमुख पाया आहे, त्यामुळे भारताचे सैन्य प्रबल व मजबूत असले पाहिजे यावर त्यांचा भर होता. अितिहासातून व जागतिक परिस्थितीतून त्यांनी असा

निष्कर्ष काढला की, " अंतर गोष्टी समान असल्यातरी जी राष्ट्रे सैनिकीदृष्ट्या कमकुवत ठरतील ती गुलामगिरीत खितपत पडतील किंवा नामशेष होवून जातील." [१९] त्यासाठी भारताला पुरेशा शस्त्रबळाची आद्य गरज आहे, या गोष्टीवर त्यांनी भर दिला. सावरकरांबद्दल कुणाचे कितीही मतभेद असोत, मात्र एक गोष्ट सर्वांनी मान्य केलीच पाहिजे की, स्वतंत्र भारताच्या संरक्षणाबद्दल त्यांनी जितका विचार केला व मांडला तसा अंतर कुण्याही देशभक्ताने मांडला नाही. अपवाद फक्त डॉ. आंबेडकरांचा आहे. नुसता विचार मांडला नाही तर सावरकरांनी या गोष्टीचा अत्यंत तळमळीने प्रचार केला. गांधीजींच्या अहिंसेच्या मोहजालात सावरकर व आंबेडकर हे दोन पुरुष कधीही न अडकता, शस्त्र नि अहिंसा, सैन्य नि देशरक्षण यांचा वस्तुनिष्ठ विचार करत होते.

सावरकरांनी शस्त्र व सैन्याबद्दलचा एवढा प्रचार केला तो गांधी–नेहरुंच्या या विषयीच्या विचाराच्या पार्श्वभूमीवरच होय. आपण अहिंसेने स्वातंत्र्य मिळविले व ते अहिंसेनेच टिकवू शकू, असा नेहरुंचा पक्का विश्वास होता. हे आता अतिहासात नमूद झाले आहे की, नेहरुंनी भारताच्या सैन्याकडे पुरेसे लक्षच दिले नाही. ती विसरुन राहिलेली गोष्ट नसून मानवता, शांतता, अहिंसा या बद्दलच्या विशिष्ट तत्वावर विसंबून सैन्याकडे हेतुतःच दुर्लक्ष केले. देश स्वतंत्र राहिलाच पाहिजे, या अिच्छेत ते सावरकरांपेक्षा कमी नव्हते, पण त्या स्वतंत्रतेसाठी प्रबल सैन्य हवे असते, या गोष्टीवर त्यांचा विश्वास नव्हता. ही गोष्ट त्यांना हुकूमशाही प्रवृत्तीची व प्रतिगामी स्वरुपाची वाटत होती. प्रबल सैन्य असणे हा साम्राज्यवाद झाला, की जो नेहरुंचा खरा शत्रू होता. हा हिटलर, नाझी, फॅसिस्ट यांचा मार्ग झाला, अशी त्यांची तात्विक भूमिका होती व त्यामुळे सैन्याकडे त्यांनी हेतुतः दुर्लक्ष केले. नेहरुंच्या या धोरणाच्या परिणामाविषयी अधिकारी व्यक्तींनी लिहिलेले अनेक अभ्यासपूर्ण ग्रंथ आज उपलब्ध आहेत. तेव्हा त्या परिणामाची फारशी चर्चा करण्याची आम्हाला गरज वाटत नाही.

गांधी–नेहरुंची भूमिका

ज्या म. गांधींकडून नेहरुंकडे अहिंसेचा हा वारसा आला होता, ते म. गांधीच स्वतंत्र भारताला सैन्याची गरज नाही, या मताचे होते. धनंजय कीरांनी म. गांधीजींच्याच चरित्रात असे म्हटले की, [२०] On July 7, Gandhi expressed his wish at prayer meeting that the Hindus should swear that they do not wish to have army at all or at least refuse even to use it against their muslim brethren whether in the Union or outside it in Pakistan " गांधीजींचे अशा प्रकारचे सैन्याविरोधीचे विचार अनेक ठिकाणी आपल्याला सापडू शकतील. वरील विचार जुलै १९४७ मध्ये म्हणजे पाकिस्तान होणार हे ठरल्यानंतर व स्वातंत्र्य एक दीड

महिन्यावर आले असताना गांधीजींनी व्यक्त केलेले आहेत. गांधीजींचे हे म्हणणे नेहरुंनी पूर्णतः काही मान्य केले नाही. कारण गांधीजींपेक्षा नेहरु अधिक वास्तववादी होते. त्यामुळे त्यांनी सैन्याकडे दुर्लक्ष करण्याचा मार्ग स्वीकारला. काश्मीर प्रश्नाबद्दल पंतप्रधान नेहरुंनी ७ ऑगस्ट १९५२ रोजी लोकसभेत निवेदन केले की, "Some friends seem to imagine to the easiest way to solve the question is to have exhibition of armed might. They say 'let us march our army.' This can never be a solution in this case or any other case..... I consider it my misfortune that we have to spend mony on armament and we have to keep army, nary and an airforce."[२१] भारत सरकारची सैन्याकडे अशा प्रकारे उपेक्षेने पाहण्याची वृत्ती होती. गांधी–नेहरुंच्या सैन्यबळाच्या उपेक्षेच्या संदर्भात सावरकरांचे सैन्याबद्दलचे विचार आपल्याला समजून घेतले पाहिजेत.

या धोरणामुळे सावरकर चिंताग्रस्त झाले होते. या धोरणाने ही मंडळी मिळालेले स्वातंत्र्य गमावून बसतील अशी त्यांना भिती होती. या नेत्याच्या या विचारापासून देशाला कसे वाचवावे, हीच त्यांना काळजी होती. या चिंतनातून व काळजीतून त्यांचे सैन्याबद्दलचे विचार प्रतिक्रियेसह व्यक्त झालेले आहेत, हे समजून घेतले पाहिजे. सैन्यबळापेक्षा मैत्रीबळावरच नेहरुंचा अधिक विश्वास होता. सावरकरांची भूमिका अशी की मैत्रीबळासाठी सुद्धा सैन्यबळाची गरज असते. १९५८ मध्ये लोकसभेत बोलतांना नेहरु म्हणाले, [२२] "देशाच्या संरक्षणाचे अनेक मार्ग आहेत. सैन्यामुळे संरक्षण होते हा सामान्य समज आहे. थोड्याफार प्रमाणात तो खरा आहे. पण त्या बरोबर हेही खरे आहे की, विशिष्ट धोरणामुळेही देशाचे संरक्षण होते. परदेशाशी मैत्री ठेवण्याच्या धोरणामुळे देशाचे संरक्षण अन्य कुठल्याही मार्गापेक्षा अधिक चांगल्या प्रकारे होऊ शकते." सावरकरांचा विरोध मैत्रीबळाला नव्हता, त्या मैत्रीबळावरच विसंबून राहण्याला होता. या दोघांपैकी कोणाची भूमिका अधिक वास्तव होती, हे दररोजच्या जागतिक राजकारणाच्या घडामोडीवरुनही आपल्याला समजून घेता येते. सावरकर शस्त्रवेडे होते का नेहरु मित्रवेडे होते, हे काळानीच सिद्ध केलेले आहे.

अक्षम्य चुकी

शस्त्रबळासंबंधीची या जगातील वास्तवस्थिती काय आहे, हे सांगताना सावरकर म्हणतात, [२३] "आज ही सारी मानवजात राष्ट्रवादाच्या नि शस्त्रवादाच्याच राजकीय चळवळीवर उभी आहे, ही खूणगाठ बांधून ठेवा. जी राष्ट्रे स्वतःच्या शस्त्रबळाच्या आधारावर स्वतंत्र आहेत, तीच काय ती खरीखुरी स्वतंत्र आहेत, आणि अितर दुर्बल राष्ट्रावर आपापले वर्चस्व स्थापण्यासाठी खटपटत आहेत, ही वस्तुस्थिती आहे. अफिमी स्वप्नरंजनात न रंगता जर तुम्हास ह्या

वस्तुस्थितीत आणि हचा आक्रमक सशस्त्र राष्ट्राच्या धकाधकीत जगायचे असेल, जर खरेखरे स्वतंत्र राष्ट्र म्हणून जगायचे असेल तर भोंगळचा नि दुबळचा शांतिपाठाच्या मृगजळाच्या पाठीमागे धावत सुटण्याची तुमची हाडीमासी खिळलेली खोड सोडून देवून अेकसहा आपल्या हचा हिंदुराष्ट्राचे रोखठोक शस्त्रबळ अितर आजच्या कोणत्याही राष्ट्राच्या शस्त्रबळाअितके तरी समर्थ बनविण्याचे कार्य तत्काल हाती घ्या" नेहरुंच्या स्वप्नरंजनवादी शांतीपाठाच्या धोरणामुळेच सावरकरांना सैन्यबळासंबंधाने मोठ्याने जाहीर आकांत करुन बोलावे लागले आहे. स्वातंत्र्य मिळून चार वर्ष झाली तरी आपले सरकार या बाबत कसे स्तब्ध व थंड आहे हे सांगताना सावरकर म्हणतात, [२४] "स्वतंत्र होताच ज्या पक्षाचे हाती आपल्या राज्यकारभाची सूत्रे पडली आहेत, त्यांनी स्वातंत्र्यानंतर चार वर्ष उलटून गेली तरी अशा प्रकारच्या प्रचंड नि अजेय सैन्यबळाची सज्जता करण्याच्या दिशेने पहिले पाऊल सुद्धा अजून टाकले नाही. ही त्याची अक्षम्य चुकी होत आहे. त्यातील काही प्रमुख पुढारी अजूनही मोठ्या अैटीने जागतिक घोषणा करीत आहेत की, आम्हाला ज्या अर्थी कोणावरही आक्रमण करण्याची अिच्छा नाही, त्या अर्थी आमच्यावरही कोणी आक्रमण करील असे आम्हास वाटत नाही. वास्तव आम्ही शस्त्रबळाच्या चढाओढीचे अेतक्यी पाप करणार नाही." मागे दिलेले नेहरुंचे लोकसभेतील भाषण लक्षात घेतले म्हणजे कोणत्या परिस्थितीत सावरकर सैन्यबळाचा प्रचार करत होते, हे आपल्याला समजून येईल. सावरकरांचा आग्रह आपले सैन्यबळ अितर कोणत्याही राष्ट्राच्या सैन्यबळाअितके पाहिजे, असाच होता. शेजारचे राष्ट्र या साठी विचारात घेता येते. ही मर्यादा खात्रीच्या संरक्षणापुरतीच होती, परराष्ट्रावर आक्रमण करुन साम्राज्यवादी होण्याअितकी व होण्यासाठी कधीच नव्हती, हे समजून घेतले पाहिजे.

कोण वेडे ठरले ?

दुर्दैवाने सावरकरांचा अिषारा नेहरु व सावरकरांच्या हयातीतच वस्तुस्थितीत उतरला. सैन्याशिवाय शत्रूराष्ट्राचे प्रश्न सुटत नाहीत हे नेहरुनाही कळून चुकले. हे कळण्यासाठी चीनने १९५० मध्ये फौजा घुसवून तिबेट गिळंकृत केला, ही घटना पुरेशी झाली नाही. नेहरुंनी ती निर्मनुष्यभूमी (No man's land) म्हणून त्याकडे दुर्लक्ष केले व आपला शांतिपाठ कायम ठेवला. चीनने सरहद्दीवर रस्ते बांधले, भारताच्या हद्दीत येण्याची पूर्ण तयारी केली, याबद्दल सावरकरांनी अनेक अिषारे दिले– पण नेहरुंचा विश्वास चीनच्या मैत्रीबळावर अधिक होता. या गोष्टीकडे त्यांनी दुर्लक्ष केले. १९५४ मध्ये त्यानी 'पंचशील' नावाचा प्रसिद्ध करार चीन बरोबर केला. शांततामय सहजीवनाचा व अेकमेकाचे सार्वभौमत्व मान्य करणारा हा करार आहे. तिबेट गिळंकृत केल्यानंतर हा करार केला गेला. चीन आणि भारतामधील तिबेट हे एक किलक Buffer राष्ट्र होते. अिंग्रजानी

संरक्षणाच्या दृष्टीने तिबेट, नेपाळ नि भूतान या सीमाराज्यांची एक साखळी केली होती व त्या सीमाराज्यांना अबाधित आस्तिवाची हमी दिली होती. तोच अधिकार स्वतंत्र भारताला आला होता. या साऱ्या गोष्टी सांगून सावरकर तिबेट गमावला म्हणून नेहरुंवर टीका करत. नेहरु स्वातंत्र्य धोक्यात आणीत आहेत म्हणून भयसूचक किंकाळी फोडत. आम्ही सैन्यावर खर्च करतो हीच दुर्देवाची गोष्ट आहे, ही दुसऱ्या टोकाची नेहरुंची भूमिका असे. शेवटी १९६२ ला चीनने आक्रमण केले. शस्त्रबळाचा विजय झाला व मैत्रीवळ कागदावरच शिल्लक राहिले. आपल्या पंचशीलाचे धिंडवडे निघाल्याचे याची देही याची डोळा नेहरुंना पाहायला मिळाले. जीवनभर उराशी बाळगलेल्या त्या शांतिपाठाचा व अहिंसावादाचा असा चुराडा उडाल्याचे आयुष्याच्या अखेरी त्यांनी पाहिल्यावर त्यांना भयंकर धक्का बसला. सावरकर किंकाळी फोडून जे सतत सांगत होते, ते वास्तव ध्यानात यायला एक भयंकर युद्ध व्हावे लागले ! चीनशी युद्ध म्हटले की आपल्या काळजात अजूनही घस्स करते. पाकिस्तानची दोन युद्धे त्यानंतर आपण पाहिली. अमेरिकेने पाकिस्तानला शस्त्रे देवू नयेत, अशी आपण अमेरिकेला विनंती करतो आहोत. लहान असलेल्या पाकिस्तानला भारतावर आक्रमण करण्याची अिच्छाच होवू नये, असे ना मैत्रीवळ आपण तयार करु शकतो ना समर्थ शस्त्रबळ ! सैन्यावर खर्च नको कारण आपला आर्थिक विकास खुंटतो म्हणून सैन्यबळ मर्यादित ठेवले नि जितका पैसा वाचवला त्यापेक्षा कितीतरी अधिक या युद्धात खर्च केला. कोण वास्तववादी वा कोण स्वप्नवादी हे आता जनतेला पटू लागले आहे. निदान शेजारी राष्ट्राइतके आपलेही शस्त्रबळ पाहिजे, हे आता आपल्याला पटू लागले आहे. प्रबल शस्त्रबलाची तात्विक आवश्यकता आपण आता निःसंकोचपणे मान्य करतो, व अर्थशास्त्राच्या भूमिकेतून तिकडे पाहतो. त्यासाठी पैसा आहे काय याचा आपण विचार करु लागलो आहोत. सावरकर शस्त्रवेडे नव्हते तर अधिक वास्तववादी होते हेच यावरून सिद्ध झाले.

पंचशील करार

'पंचशीला'सारखे करार करायला सावरकरांची हरकत नसते. त्यांची हरकत पंचशीलावर शंभर टक्के विश्वास ठेवून वागायला असते. 'हिंदी-चिनी भाअी-भाअी' अशी घोषणा द्यायलाही त्यांची हरकत नसते, तशी घोषणा अक्षरशः खरी मानण्यात त्यांना धोका वाटतो. जगातील सर्व राष्ट्रे आपापल्या हिताचीच राजनीती कशी आखतात व त्यांचे दाखवायचे नि खायचे दात कसे वेगळे असतात हे सांगताना सावरकर म्हणतात, [२५] "चीन, रशिया, ब्रिटन किंवा अगदी अलिकडेच स्थापन झालेले पाकिस्तान ही सर्व राष्ट्रे मोठी मोठी तत्वे बोलत असतात. परंतु स्वतःचा स्वार्थ साधावा नि आपली राजकीय उद्दिष्टे यशस्वी करावीत, यासाठी योजलेल्या राजनीतीचा एक भाग म्हणून त्यांनी हा तत्वघोष चालवलेला असतो. मानवी

संबंधांच्या विद्यमान परिस्थितीत ही नीति यथायोग्यच आहे." या उदात्ततत्वाच्या नीतीला यथायोग्य म्हणून सावरकर पुढे म्हणतात, "परंतु सर्व देशामध्ये भारत हा एकच एकच असा देश आहे की, फार पूर्वीपासूनच दुसऱ्यापुढे उदात्ततत्वांची प्रवचने झोडण्याची आणि त्या तत्वाचा एकपक्षीय व्यवहार करण्याची त्याला सवय लागून राहिली आहे. ही त्याची सवय अंती देशाला अत्यंत घातक ठरत आली आहे. आता ही जी पंचशील तत्वे उद्घोषित करण्यात आली आहेत, त्याचाही असाच प्रकार होवू नये, ही माझी इच्छा आहे." तेव्हा सावरकरांची नेमकी तक्रार कोणती हे समजून घेतले पाहिजे. पंचशीलासारख्या कराराचा व्यवहार हा दोन्हीही पक्षाकडून व्हावा लागतो, असा त्यांचा आग्रह आहे. उदात्ततत्वाचे करार जरुर करावेत, तशा घोषणाही द्याव्यात, मात्र लगेच एकतर्फी प्रत्यक्ष व्यवहार करु नये, असे त्यांचे म्हणणे आहे.

१९५४ ला चौ एन लाय भारतात आले होते. या भेटीच्या संदर्भात ते येण्याच्या पूर्वी सावरकर म्हणाले होते,[२६] "या भेटीत मुलभूत स्वरुपाची म्हणून जी काही तत्वे घोषीत करण्यात आलेली आहेत, ती केवळ भाषेच्या दृष्टीने पाहिली तर उत्तम आणि यथायोग्यच आहेत. जागतिक शांतता, समृद्धता नि बंधुता याची इच्छा व्यक्त करणाऱ्या घोषणापासून हानी काहीच नाही; परंतु जोपर्यंत करार भंगाला प्रतिबंध घालणाऱ्या प्रभावी उपाययोजना भारतापाशी नाहीत, तोपर्यंत अशा भेटी नि घोषणा या केवळ औपचारिक स्वरुपाच्या असतात. त्याहून त्यांना सादृश काहीच महत्व नाही." राष्ट्राराष्ट्रातील व्यवहार शांततेने चालण्यासाठी आंतरराष्ट्रीय करार आवश्यक असतात, हे सावरकरांना मान्य आहे. मात्र या करारामागे ताकद नसेल तर तो करार यशस्वी होतोच असे नाही, अशी त्यांची भूमिका आहे. 'पंचशील" कराराचे काय झाले हे सांगताना ते म्हणतात,[२६] "उदात्त तत्वाचा उच्चरवाने उद्घोष करीत असतानाच, चीनने तिबेट घशात घातला, आणि जागतिक शांतता, बंधुता नि शांततामय सहजीवन याच तत्वांचा क्रूरपणे बळी घेतला, ही गोष्ट ध्यानात ठेवण्यासारखी आहे." सावरकरांचा विरोध उदात्त तत्वाना कधीच नव्हता; उदात्त तत्वाने जग वागत नाही हीच त्यांची तक्रार होती; उदात्त तत्वामागे ताकद असली तरच ती स्वतः पाळण्याचा व जगालाही शिकविण्याचा आपल्याला अधिकार प्राप्त होतो, असे त्यांचे म्हणणे होते.

डॉ. आंबेडकरांचे 'पंचशीला' संबंधीचे विचार सावरकरांच्या या वरील विचाराशीच जुळणारे आहेत. तिबेटच्या बाबतीत डॉ. आंबेडकर म्हणाले,[२७] "म्हणे, मावने पंचशील स्वीकारले ! आम्ही तिबेटवर म्हणे आक्रमण करणार नाही, असे आश्वासन चिनी नेत्यानी नेहरुंना दिले व भोळेपणाने नेहरुंनी त्यावर विश्वास ठेवला. पंचशील हा बौद्ध धर्माचा एक भाग आहे, मावची बौद्ध धर्मावर एवढी श्रद्धा असती, तर चीनमधील बौद्धधर्मियांना त्याने चांगली वागणूक दिली

असती ! लक्षात ठवा, राजकारणात पंचशीलास स्थान नाही आणि कम्युनिष्ट देशांच्या राजकारणात तर नाहीच नाही !" हीच भूमिका सावरकर मांडतात, हे लक्षात घेतले पाहिजे.

परराष्ट्रनीती

जगामध्ये नैतिक सामर्थ्याची नसून भौतिक सामर्थ्याचीच स्पर्धा चाललेली आहे. जो भौतिक सामर्थ्यात वरचढ त्यालाच जगात श्रेष्ठ म्हणतात, ही वस्तुस्थिती विसरुन जाण्यास सावरकर तयार नाहीत. अमेरिका, रशिया आणि आता ब्रिटन यांना तीन वडी राष्ट्रे का म्हणतात हा प्रश्न उपस्थित करुन सावरकर म्हणतात,[२७] " ही तिन्ही राष्ट्रे अध्यात्मशास्त्रात किंवा लोकसंख्येत किंवा क्षेत्रफळात किंवा बुद्धीमत्तेत जगात श्रेष्ठ आहेत म्हणून ? नव्हे तर ती तिन्ही राष्ट्रे आज केवळ शस्त्रबळात श्रेष्ठ आहेत (म्हणून)!" सावरकर येथे सांगतात तीच वस्तुस्थिती आहे, असे आपणाला मान्य करायचे आहे का नाही, हाच मुख्य प्रश्न आहे. ही वस्तुस्थिती आपल्याला आवडो की न आवडो, हा प्रश्न स्वतंत्र आहे. ही वस्तुस्थिती मान्य करणे हे बुद्धिवादाचेच लक्षण आहे, असे आम्हास वाटते. अशी वस्तुस्थिती असल्यामुळे आपल्या राष्ट्राचे एकंदर हित पाहणे, ही आपली नीती असावी, असे सावरकरांना वाटते. ते म्हणतात, [२८] "नैतिक हेतूने प्रेरित होऊन ती (अितर राष्ट्रे) हिंदुस्थानच्या काही उपयोगी पडतील असे मानण्याअितका दुसरा मूर्खपणा कोणताच नाही. व्यक्ती व्यक्तीच्या व्यवहारात नीतीचा प्रश्न येतो. पण राष्ट्रा–राष्ट्राच्या कारभारात नीतीला मुळीच स्थान नाही, हे मी ठामपणे सांगतो..... ज्याच्याशी मैत्री केली असता, आपला लाभ होण्यासारखा असेल, त्याचेच सख्य जोडण्याकडे हिंदुस्थानने लक्ष द्यावे. 'आत्मनं सतत रक्षेत' हेच आपल्या परराष्ट्रीय धोरणाचे सूत्र. आपल्या स्वातंत्र्य संपादनाचे कामी जो कोणी उपयोगी पडेल, मग तो नाझी असो, फॅसिस्ट असो, की बोल्शेव्हिक असो – तो आपला मित्र. उलट जो आपल्या स्वातंत्र्याच्या आड येतो तो आपला शत्रू" स्वातंत्रपूर्वकालातील हे विचार आहेत, मात्र विचाराचे सूत्र तेच आहे.

नाझी–हिटलर बद्दलच्या सावरकरांच्या या भूमिकेमुळे सावरकरांवर अनेकानी टीका केलेली आहे. स्वातंत्र्यासाठी नाझी– फॅसिस्टाची मदत घ्यायला सावरकरांची हरकत नव्हती. ही राष्ट्रे जर आपल्या स्वातंत्र्याला मदत करणार असतील व ती मदत अंतिमत: स्वातंत्र्याला उपकारक असेल, तर त्यांची राजवट कोणत्या विचाराची आहे, हा मुद्दा गौण आहे अशी सावरकरांची स्पष्ट भूमिका आहे. पं. नेहरु व स्वत:ला लोकशाहीवादी म्हणवून घेणाऱ्याची भूमिका नेमकी याच्या उलटी आहे. या साम्राज्यवादी व फॅसिस्ट देशाची मदत घ्यायचीच नाही, अशी या पुरोगामी म्हणवून घेणाऱ्या मंडळीची भूमिका होती. असा एक काळ होता की, पुरोगामीपणाचा निर्देशांक हा या साम्राज्यवादी राष्ट्राचा धिक्कार करण्याच्या

प्रमाणावर अवलंबून होता. सावरकरांच्या मते हीही एक प्रकारची पोथिनिष्ठाच होती. सावरकरांचा बुद्धिवाद याही पोथिनिष्ठेवर कठोर प्रहार करीत असतो. याच प्रहारामुळे डॉ. फडके सारखे स्वतःला पुरोगामी समजणारे चिडून उठतात.

दुःखाने-दुर्दैवाने

नीतीचा प्रश्न व्यक्तीव्यक्तीच्या व्यवहारात येतो, राष्ट्राराष्ट्राच्या व्यवहारात नीतीला स्थान नाही, असे जे सावरकर म्हणतात, त्याचा अर्थ नीट समजून घेतला पाहिजे. काय आहे याबद्दल ते बोलत आहेत, काय असावे याबद्दल नाही, हे लक्षात घेतले पाहिजे. एक कटु वस्तुस्थिती म्हणून सावरकर हे सांगत आहेत, हे समजून घेतले पाहिजे. ते म्हणतात, [२९] "अरे, न्याय वगैरे कांही नाही या जगात. जोपर्यंत सारे जग अन्यायी आहे, तोपर्यंत अन्यायाला अन्यायानेच उत्तर देणे भाग आहे." सावरकराची अशी ही रोखठोक भूमिका आहे. आपल्या नाटकातील विक्रमदेवाच्या तोंडून सावरकर हाच सिद्धांत मांडताना म्हणतात,[३०] "शेवटी चाळीस वर्षापूर्वी मला वाटलेली भीती खरी ठरली. केवळ दयेने दुष्टता, केवळ कारुण्याने क्रोध, केवळ अहिंसेने हिंसा, केवळ शास्त्राने शस्त्र सदोदित आणि सर्वत्र वशीभूत होत नाहीत, जिंकली जात नाहीत, नष्ट करता येत नाही! हेच कठोर सत्य शेवटी आपल्या डोळ्यादेखत प्रत्ययास आले ना?" चाळीस वर्षापूर्वी विक्रम देवाची भीती अशी होती की, "मनुष्य संहार करणारा मनुष्यजातीचा अत्यंत भयंकर शत्रू मनुष्यच होय. हा मनुष्य जातीवरील कलंक शक्य तितक्या लवकर धुवून निघो आणि शांतीचे साम्राज्य स्थापण्याचा मान आमच्या ह्या शार्दूलसिंह तथागत बुद्धास मिळो! परंतु सज्जहो, मोठ्या दुःखाने पण निर्भिडपणे ही माझी भीति उल्लेखित करुन ठेवतो की, पंचेवीस वर्षच काय पण आजपासून पंचेवीसशे-वर्षांपर्यंतही या जगावर दुर्दैवाने शस्त्रयुगाचेच प्राबल्य दिसून येईल, बळी तोच कान पिळीत राहील." ही कठोर वास्तवता दृष्टिआड करायला सावरकर तयार नाहीत. न्यायाने अन्याय जिंकता येत नाही, तेव्हा अन्यायाला अन्यायानेच तोंड दिले पाहिजे, असे त्यांचे म्हणणे आहे. सावरकर या साऱ्या गोष्टी अत्यंत दुःखाने व दुर्दैवी म्हणून मांडत आहेत. जग जर पाप करणार असेल तर आम्हालाही पाप करावेच लागणार, असे ते खणखणीतपणे बजावतात. जगातील जगण्याच्या या न्यायाला डावलून आपण जगूच शकत नाही, अशी त्यांची निश्चिती आहे. "हे जग प्रामाणिकपणावर, सत्यावर आणि न्यायावर अधिष्ठित आहे, असे म्हणणे चूक आहे. आपल्या प्रामाणिकपणाचाही उपयोग होईल, पण केव्हा? तर दुसऱ्यास प्रामाणिक बनविण्याअितका आपला प्रामाणिकपणा बलवान असेल तेव्हाच." असे सावरकरांचे म्हणणे होते. [३१] "हा प्रामाणिकपणा बलवान करायचा असेल तर त्यामागे भौतिक सामर्थ्य पाहिजे, अशी त्याची भूमिका होती.

"आंतरराष्ट्रीय राजकारणात नीति असल्याचा शोध लावण्यास अवश्य तेवढे

तीव्र सूक्ष्मदर्शक यंत्र अद्यापि निघाले नाही," असे १९३९ साली सावरकरांनी या साठीच म्हटले आहे.[३२] त्यामुळे अमका देश लोकशाहीवादी नि तमका साम्राजवादी अशी ठोकळेबाज वर्गवारी ते करायला तयार नाहीत. पं. नेहरु रशियाला लोकशाहीवादी मानत, पण हे मानणे क्षणभंगुरच ठरले. रशियाचे कौतुक करत फॅसिस्टाना शिव्या देणारी पुरोगामी मंडळी, रशियाने फॅसिस्टाशीच दुसऱ्या महायुद्धात दोस्ती केली नि पोलंडची आपापसात वाटणी करुन घेतली, तेव्हा मात्र तोंडघशी पडली. सावरकर म्हणतात तीच वस्तुस्थिती आहे, हेच शेवटी सिद्ध झाले. याचसाठी राष्ट्रहिताची भूमिका घेवून परराष्ट्राशी व्यवहार केला पाहिजे, असे सावरकरांचे म्हणणे आहे. परराष्ट्रनीतीचे हेच सूत्र असले पाहिजे, असा त्याचा आग्रह आहे.

सैन्य उदात्त तत्त्वासाठीच

हे सूत्र घेवून चीनबरोबर कसे वागले पाहिजे हे सांगताना ते म्हणतात,[३३] "मला असे वाटते की, आपले प्रादेशिक हेतू नि हितसंबंध पुढे रेटावेत एवढ्याच हेतूने जर चीन भारताचा उपयोग करुन घेवू लागला, तर भारताने प्रथमतः स्वतःचे हितसंबंध रक्षण करण्याची दक्षता घेतली पाहिजे. चीनच्या हालहाली भारतीय हितसंबंधाना बाधक ठरणार नाहीत असे दिसले, तरच त्यामध्ये काय ते भारताने चीनशी सहकार्य करावे. जोपर्यंत चीन स्वत:च्याच हिताचाच काय तो विचार करीत आहे, तोपर्यंत भारतानेही आत्महिताचेच धोरण ठेवले पाहिजे आणि स्वहितापुरताच चीनच्या सदीच्छेचा उपयोग करुन घेतला पाहिजे. आपल्यावर त्याचा जितपत विश्वास असेल तितपतच आपणही त्यांच्यावर विश्वास टाकला पाहिजे." परराष्ट्राशी भारताने ठेवायच्या सहकाराचा व मैत्रीचा अर्थ सावरकरांच्या मते असा आहे. या स्वहित-प्राधान्याच्या धोरणानेच जगातील सारी राष्ट्रे वागतात का नाही, हे आपणच एकदा नक्की ठरवले पाहिजे. या धोरणापेक्षा अधिक उदात्त नि उदार असे धोरण जगातील एकाही राष्ट्राने स्वीकारले नाही, हे समजून घेतले पाहिजे. जागतिक कल्याणाची भाषा वापरणाऱ्या नेहरुंनाही व त्यांचाच वारसा जपणाऱ्या आजच्या काँग्रेससरकारलाही याच धोरणावर येवून स्थिर होणे भाग पडलेले आहे. प्रश्न व समस्या सोडविण्याचे शांततेचे सर्वच मार्ग सावरकरांना मनःपूर्वक मान्य आहेत, पण तोच एकमेव नि खात्रीचा मार्ग आहे, यावर बिनधोक विश्वास ठेवायला ते तयार नाहीत, एवढाच यांचा अर्थ आहे. हे सारे मार्ग संपल्यानंतर शेवटी शस्त्रबळाचाच जगण्यासाठी राष्ट्राला आश्रय घ्यावा लागणे अनिवार्य आहे, एवढेच त्यांचे म्हणणे आहे, हे लक्षात घेतले पाहिजे.

उदात्त तत्वासाठीच सावरकरांना सैन्य बळाची गरज होती. उदात्त तत्वामध्ये जिवंत राहण्याची स्वयंभू शक्ती नाही, असा त्यांचा सिद्धात होता. भारताने शस्त्रसंपन्न का झाले पाहिजे, याचा हेतू सांगताना सावरकर म्हणतात,[३४]

"जोपर्यंत आमचे क्लीबवृत्तीचे दुबळे केंद्रसरकार ही उद्दिष्टे साधण्यासाठी एक पाऊलही उचलत नाही, तोपर्यंत मात्र उदात्त तत्त्वांच्या या वायफळ वल्गनांचा कोडीमात्रही उपयोग होणार नाही; तोपर्यंत जागतिक शांतता, शांततामय सहजीवन जागतिक बंधुभाव नि जागतिक समृद्धि याची सारी भाषा आमच्या तोंडी अगदी निरर्थक ठरणार आहे. आणि या तथाकथित सदीच्छा भेटीमधून शुद्ध निरुपयोगी शब्दजंजालच काय ते हाती लागणार आहे. त्यामध्ये आपल्याला हितकर असे काहीही निष्पन्न होणार नाही. उच्चतत्त्वांना प्रबल सामर्थ्याची जोड असली, तरच त्या तत्त्वाचे पालन घडवून आणणे शक्य असते. या सर्व गोष्टी ध्यानात घेवून मला असे वाटते की, केंद्रसरकारने भारताचे शस्त्रसामर्थ्य नि सैनिकबळ अविलंबाने वाढविण्याची वेळ येवून ठेपली आहे." उदात्ततत्त्वांसाठीच त्यांना सामर्थ्याची गरज होती, हा मुद्दा सावरकरांच्या शस्त्रबळाच्या आग्रहावर टीका करणारे विचारात घ्यायला तयार नाहीत. सावरकरांना उदात्ततत्त्वांच्या नावाची आतषबाजी करण्याची हौस नव्हती, ही गोष्ट मात्र खरी आहे. उदात्तमूल्यांसाठी राष्ट्र जिवंत राहणे भाग असते व राष्ट्राला जिवंत ठेवण्यासाठी शस्त्रसामर्थ्याचीच आणखी काही काळ तरी गरज आहे, हीच सावरकरांची शस्त्रसामर्थ्यामागील मुख्य भूमिका आहे. या भूमिकेत शस्त्रवेड नसून बुद्धिवादच आहे, हे समजून घेतले पाहिजे.

वास्तववादी रशिया

याचा अर्थ भारताचे शस्त्रबळ वाढले की सर्व प्रश्न सुटतात, असा नाही. घरातील चीजवस्तू मौल्यवान असतातच, आणि म्हणूनच आपण घराला कुलूप घालतो. कुलूप ही जशी आद्य गरज असते, तशीच सैन्यबळाची आहे. चीजवस्तू महत्त्वाच्या का कुलूप हा प्रश्न जसा अव्यावहारिक, तसाच उदात्तमूल्ये महत्त्वाची का शस्त्रबळ हा प्रश्नही अव्यावहारिक आहे. या दोन्ही एकमेकांना पूरक आहेत हीच भूमिका सावरकर जन्मभर घेत आले आहेत. आपली अिच्छा असो वा नसो, जगात चोर असतात हे लक्षात घ्या व तोपर्यंत घराला चांगले कुलूप घाला, ते घर उघडे ठेवू नका–एवढेच सावरकरांचे सांगणे आहे. भाक्रानांगलचा अतिभव्य जलप्रकल्प पाहिल्यानंतर रशियाचे क्रुश्चोव शांतिदूत नेहरूंना काय म्हणाले होते, याची आठवण आपल्याला झाली पाहिजे. स्वतंत्र राष्ट्राला पुरेसे सैन्यबळ ही आद्य गरज असते, हेच सावरकरांचे सांगणे आहे. हे आद्यकर्तव्य आहे, एकमेव कर्तव्य नव्हे, हे लक्षात घेतले पाहिजे. रशियाचे उदाहरण घेवून सावरकर सांगतात, [३५] "रशिया मध्ये सोव्हिएट राज्यक्रांति विजयी होवून सत्तांतर होताच त्या वास्तववादी राज्यचालकांनी पहिल्या प्रथम जी योजना हाती घेतली ती अद्ययावत् शस्त्रबळ, प्रचंड नि अमोघ लालसेना अुभारण्याची नि सज्ज ठेवण्याचीच होती. मग औद्योगिक कारखान्याच्या, शेतीच्या, शिक्षणाच्या दुय्यम पंचवार्षिक योजनाची गोष्ट" डॉ. फडकेसारखे टीकाकार सावरकरांच्या या 'प्रथम' आणि 'मग'चा विचारच करायला

तयार नाहीत.

सावरकरांचा प्रश्न खरा म्हणजे अगदी साधा आहे. देशभर लाख कारखाने काढले, शाळा उघडल्या, धरणे बांधली, नि संपत्तीचा व ज्ञानाचा धूर निघू लागला, स्वातंत्र्य व समता याचा सुगंधही दरवळू लागला तरी तुमच्याजवळ पुरेसे सैन्य नसेल, तर या सर्वांची नासधूस व धुळधाण करणारे शत्रू या जगात असू शकतात हे आपण गृहीत धरणार की नाही? उलट शस्त्रबळावाचून असुरक्षित संपत्ती, असुरक्षित राष्ट्रे हे शत्रू राष्ट्रांना आकर्षण असते, आमंत्रण असते– की ज्याचा अनुभव भारताने अितिहासात काही कमी घेतलेला नाही. रशियाने ही चूक केली नाही, याचा सावरकरांना अभिमान वाटतो. त्या देशाची वास्तववादी म्हणून ते पाठ थोपटतात. त्या देशाचा या बाबतीतही वस्तुपाठ भारताने गिरविला पाहिजे, असे ते सांगतात. डॉ. फडके यांना नेमका या बाबतीतच रशियाचा अभिमान का वाटू नये, हे समजत नाही. रशियाने एखादी गोष्ट केली की चांगली, तीच गोष्ट करायला सावरकर सांगतात तेव्हा मात्र ती वाईट, असा न्याय आपण लावून सावरकरांचे मूल्यमापन करणार आहोत काय? हिंदुत्ववादी सावरकरांना रशियाचे नाव घ्यायचा काय अधिकार, अशी डॉ. फडके यांची भूमिका दिसते.

भारताने सैन्यबळाबाबत असे काहीही न करता 'सोन्यासारखी सहा वर्षे फुकट घालविली' यांची त्यांना हळहळ वाटते. 'पहिल्यांदा हे करा आणि मग कारखाने उभारा' असा त्यांचा खरा संदेश आहे. 'मग' म्हणजे केव्हा हे सांगताना ते पुढे म्हणतात,[३६] "मग म्हणजे अगदी मग नव्हे. बरोबरीनं केले तरी चालेल." ते पुढे म्हणतात, "सैन्याची शक्ति असेल तर शत्रूला बाहेरच्या बाहेर रोखून या कारखान्यांचा, या रस्त्यांचा, या संपत्तीचा उपभोग तुम्ही घेवू शकाल. नाही तरी हे सर्व तुम्हाला असून नसल्यासारखेच होअील." सावरकरांच्या शस्त्रबळाच्या आग्रहाचा अन्वयार्थ हा असा आहे. स्वरक्षणासाठी जर शस्त्र वापरणे वेडेपणा असेल, तर सावरकरांना त्या अर्थाने शस्त्रवेडे म्हणण्यास कुणाचीही हरकत असणार नाही. पण शस्त्रानेच सारे प्रश्न सुटतात, तोच सर्व प्रश्नावर रामबाण उपाय आहे, यावर निष्ठा या अर्थी त्यांना शस्त्रवेडे म्हणणे, हा मात्र केवळ खोटेपणा नसून निव्वळ खोडसाळपणा आहे, असे आमचे स्पष्ट मत आहे.

निराशावाद?

सावरकर असा कर्तव्य कठोर वास्तववाद मांडू लागले की, डॉ. फडक्यांसारखे टीकाकार "वेळोवेळी व्यक्त झालेल्या सावरकरांच्या या मतामागे मानवी जीवनाकडे पाहण्याचा त्यांचा निराशीवादी दृष्टिकोण आहे" असे म्हणणार![३७] जमतील तितके तरुण घेवून सशस्त्र क्रांती करुन आपणही अिंग्रजाचे बलाढ्य सरकार उलथून पाडू शकतो, अितका दुर्दम्य आशावाद बाळगणाऱ्या सावरकरांना आपण निराशीवादी म्हणणार! विचारी माणसाने आपापल्या परीने प्रयत्न

सतत केल्यास अस्पृश्यता व जातिभेद हिंदू लोकातून नष्ट करता येईल व हिंदू हे एकजीव व प्रबल होतील, अशी महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या माणसाला आपण निराशावादी म्हणणार ! आता आपल्याला सिंधूलाही मुक्त केले पाहिजे म्हणून सिंधुसूक्त गाणाऱ्या सावरकरांना निराशीवादी हे विशेषण आपण लावणार ! निव्वळ वदतो व्याघात ! ! मानवी जीवनाला आदर्श अशा अवस्थेत घेवून जाणे, हे अंतिम ध्येय ठरवून त्या ध्येयाकडे आपल्या शक्तीनुसार एक एक प्रयत्नाचे पाऊल टाकत जाणे, हे सावरकरांचे सांप्रतचे ध्येय होते. हा प्रयत्नवाद आहे. मनुष्याची तशी आदर्श अवस्था आज आलेली नाही हे पाहणे, मान्य करणे याला निराशावाद म्हणत नसतात. नसलेल्या गोष्टी नाही म्हणणे, हा निराशावाद नसतो तर वास्तववाद असतो; बुद्धिवाद असतो. धर्मग्रंथ ईश्वरानीच लिहिले आहेत, असे कुणी म्हटले की, त्या म्हणण्यावर चवताळून उठतो तो बुद्धिवाद; चातुर्वर्ण्य जन्मजात असून ते ईश्वरनिर्मितच आहेत, असे तत्वज्ञान जो मांडतो, त्यावर तुटून पडतो. तो बुद्धिवाद; ते म्हणणे व ते तत्वज्ञान कसे खोटे आहे, भ्रामक आहे, हे युक्तिवादाने पटवून देतो तो बुद्धिवाद; आणि मनुष्यजात उदात्त मूल्यांच्या आदर्श अवस्थेत आज गेलेली नाही, उदात्तमूल्यांचा व तत्वाचा स्वर्ग अद्याप अवतरला नाही, हे मान्य करतो, पटवून सांगतो– तो मात्र बुद्धिवाद नसून निराशावाद ! ! काय अजब तर्कशास्त्र आहे ! जी गोष्ट आज नाहीच, ती आहेच समजून तसा व्यवहार करणे, ही सावरकरांच्या मते निव्वळ पोथिनिष्ठा आहे, अंधश्रद्धा आहे; मग ती धर्मग्रंथीय असो, की मानवीमूल्यीय असो, की मार्क्सवादीय असो, की डॉ. फडके यांची असो! त्यांचा बुद्धिवाद केवळ सनातन्याच्याच अंधश्रद्धा उध्वस्त करत नव्हता, तर तथाकथित पुरोगामी आणि मानवतावादी स्वप्नवादावरही घणाघाती प्रहार करण्यास भीत नव्हता. भीत नव्हता याचा अर्थ असे केल्याने कुणी आपल्याला संकुचित म्हणेल, बंदिस्त मनाचा विचारबंत म्हणेल काय, निराशावादी म्हणेल काय, याची पर्वा तो करत नव्हता. आज वास्तव काय आहे, व लोकांच्या हिताचे काय आहे, हेच सांगणे त्यांना आपला सांप्रतचा धर्म वाटला– तोच त्याचा उपयुक्ततावाद होता, बुद्धिवाद होता !

× × × ×

– २ –

श्रेष्ठ : मूल्य की जगणे

सावरकरांचा हा वास्तववाद जसजसा समजत जातो, तसतसा आपल्यासमोर एक नवा प्रश्न उभा राहतो. मानवीहिताशी नीतिकल्पना निगडीत केल्यामुळे एक महत्वाचा प्रश्न निर्माण होतो. जगणे, जिवंत राहणे हा मनुष्याच्या सर्व हितांचा मुख्य आधार आहे. याचा अर्थ जगण्यासाठी सर्व नीतिमूल्ये असतात,

असा होतो. यातून निघणारा दुसरा अर्थ म्हणजे, कोणत्याही तत्वापेक्षा, मूल्यापेक्षा जगणे, जिवंत राहणे हेच महत्वाचे आहे, असा होतो. तत्व, मूल्ये माणसासाठी आहेत, माणूस त्यांच्यासाठी नाही, ही भूमिका घेवून सावरकर तत्वशून्य व मूल्यहीन अशी मानवी संस्कृती निर्माण करु पाहत होते काय, असा एक पुढचा प्रश्न आपण विचारात घेवू शकतो. डॉ. द. न. गोखले यांनी असाच प्रश्न उपस्थित करुन आक्षेप घेतलेला आहे. त्यांचा आक्षेप असा आहे, [३८] "जेव्हा रानटी व राक्षसी शत्रूशी गाठ पडते आणि केवळ समाज किंवा राष्ट्र जिवंत ठेवण्याचा प्रश्न असतो तेव्हा सावरकर सांगतात त्या प्रत्याचाराला पर्याय दिसत नाही. पण काही संस्कृती काही मूल्ये जिवंत ठेवण्यासाठी जेव्हा समाज किंवा राष्ट्र मरायलाही सिद्ध होते, तेव्हा काय ? रानटी राक्षसी शत्रूवर आपण सवाई अत्याचार करु, आपण कदाचित जिंकू; पण आपण जी मूल्यें जपली असतील, जी संस्कृती जोपासली असेल, तिचे काय ? त्या मूल्यांना, त्या संस्कृतीला आपण आचवणार नाही काय ? समाजाच्या नि राष्ट्राच्या मरणातच त्या मूल्याचे, त्या संस्कृतीचे जीवन नाही काय ? 'समाज नि राष्ट्र टिकले तरच मूल्यांना नि संस्कृतीला काही अर्थ आहे, आधार आहे' असे सावरकरांच्या बाजूने म्हणता येईल. पण ते सर्वांनाच पटेल असे नाही. समाज आणि राष्ट्र काही मूल्यासाठी, उच्च संस्कृतीसाठी झगडताना, त्यांना कलंक न लागता, मेले तरी चालेल, असे काहीना वाटेल नि ते सावरकरांचा प्रत्याचारी मार्ग सोडून देतील." डॉ. गोखले यांच्या या आक्षेपाचा विचार केला पाहिजे.

अितिहास समीक्षा

अत्याचाराला उत्तर म्हणून प्रत्याचार केला पाहिजे, राक्षसाशी तोंड देताना सवाई राक्षस झाले पाहिजे, या सावरकरांनी व्यक्त केलेल्या 'सहा सोनेरी पाने' या अितिहास समीक्षा ग्रंथातील भूमिकेवर हा वरील आक्षेप आधारलेला आहे. सत्य, अहिंसा, परधर्मसहिष्णुता, शरणागताला अभयदान देणे, शस्त्रूवर दया करणे, परस्त्रीदाक्षिण्य इ. सदगुणाचा अतिरेक झाल्यामुळे अितिहासकालात हिंदूची अपरिमित हानी झाली, हे सावरकरांनी दाखवून दिले आहे. हे सद्गुणविकृतीचे विवेचन मराठ्याच्या अितिहासाच्या संदर्भात म्हणजे पाचव्या सोनेरी पानात केलेले आहे. हे सारे विवेचन डॉ. गोखले म्हणतात त्या प्रमाणे प्रखर, दाहक, भीषण आणि उग्र आहे, यात संशयच नाही. यासंबंधात सावरकरांनी व्यक्त केलेले विचार आपण रोजच्या व्यवहारात प्रकट बोलताना व. लिहिताना सुद्धा आधारासाठी म्हणून घेवू धजणार नाही, इतके दाहक व स्फोटक आहेत. अितिहासकाळातील मुसलमान व पोर्तुगीज या त्या वेळेसच्या शत्रूशी हिंदूनी कसे वागायला हवे होते, अशी अितिहासाची समीक्षा करत असताना सावरकरांनी हे विचार मांडलेले आहेत, ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. मराठ्यांनी त्या काळात कसे वागायला हवे होते व काय न केल्यामुळे काय झाले, याचे हे विवेचन आहे. हे विचार म्हणजे आजच्या वर्तमान

काळातही सावरकर असेच वागायला हिंदूना सांगत आहेत व तेच त्याचे तत्वज्ञान आहे, असा होत नाही. डॉ. गोखले यांचा वरील आक्षेप पाहताना मात्र असे वाटू लागते. वर्तमानाचे उपनेत्र लावून सावरकरांच्या या अतिहासकाळातील विचाराकडे पाहणे चूक आहे. वस्तुतः सावरकरांनीच अशी चूक कोणीही करू नये, यासाठी याच ग्रंथात योग्य तो इशारा देवून ठेवलेला आहे. सावरकरांनी बजावले आहे की, "अर्थातच या चिकित्सेतील विधानांचा संबंध या कालखंडातील परिस्थितीलाच काय तो लागू आहे. अशी ऐतिहासिक समालोचने वाचताना वाचकांनी हे नेहमीच ध्यानात ठेवले पाहिजे की, त्या ऐतिहासिक परिस्थितीत देशकालपात्राच्या अनुषंगाने जे कृत्य अवश्य, अिष्ट वा हितावह ठरले किंवा ठरण्यासारखे होते, ते अन्य परिस्थितीतही किंवा अन्य कालखंडातही तसेच अवश्य, अिष्ट अथवा हितावह ठरेलच असे नाही. अितकेच नव्हे, तर क्वचित् ते देशकालपात्रभेदानी अनावश्यक, अनिष्ट नि अहितकारक ठरू शकेल; मग ते राजकारणातील असो, धर्मकारणातील असो किंवा जीवनातील अितर अेखाद्या क्षेत्रातील असो." [३९] हा सावरकरांनी दिलेला अिशारा ध्रुवताऱ्यासारखा समोर ठेवूनच अितिहासचिकित्सा करणारा सहा सोनेरी पाने हा ग्रंथ आपण वाचला पाहिजे, असा सावरकरांचा आग्रह आहे. वाचकांची दिशाभूल होवू नये म्हणून त्यानी ही चेतावणी याच ग्रंथात वेळोवेळी दिलेली आहे. अितिहास कसा वाचावा, हा स्वतंत्र लेखही सावरकरांनी लिहिलेला आहे. त्यातही त्यांनी हीच भूमिका मांडलेली आहे. ते म्हणतात, [४०] "भूतकाळातील कोणत्याही घटनेची चिकित्सा वर्तमानाचे अुपनेत्र लावून करू नये, तर ज्या कालखंडात ती घटना घडली किंवा तशा विभिन्न समाजरचना होत्या, त्या काळाच्या परिस्थितीच्या प्रकाशात त्या निरीक्षाव्यात. त्या चांगल्या होत्या का वाईट की अपरिहार्य हे ठरविण्याचा कसा निकष म्हणजे त्या काळची परिस्थिती; आजची नव्हे! उलटपक्षी आज कार्य काय, अकार्य काय हे मुख्यतः आजच्या परिस्थितीप्रमाणे ठरविले पाहिजे. ही चेतावणी (warning) प्रत्येक हिंदुसंघटक अितिहास लेखकाने आपल्या ग्रंथाच्या समारोपातच संयुक्तिकपणे देत जावी." अशीच चेतावणी त्यांनी सहा सोनेरी पाने या ग्रंथातही दिलेली आहे.

मॅक्समुल्लरचे मत

कोणत्या परिस्थितीमध्ये सावरकर अत्याचाराला प्रत्याचार, राक्षसाशी सवाई-राक्षसीपणा करायला पाहिजे होता म्हणतात, याचे विवेचन करणे येथे शक्य नाही. यासाठी सहा सोनेरी पाने हा ग्रंथच मुळातून वाचला पाहिजे. या इतिहासकालामध्ये राक्षसीपणा झालेला होता, ही गोष्ट तर आपल्याला मान्य केलीच पाहिजे. राक्षसाशीही चर्चा आणि करार करत बसायचे काय या प्रश्नाचे उत्तर राक्षसी-

पणाचा कळस झालेल्या इतिहास काळाशी समरस होवूनच दिले पाहिजे. शत्रूच्या राक्षसीपणाची, अनन्वित अत्याचारांची ऐतिहासिक वर्णने करता करता संतापून सावरकरांनी असे म्हटलेले आहे. एकीकडे राक्षसीपणा व दुसरीकडे त्याला विरोध करणारी हिंदूनी उदारता, क्षमाशीलता ही सद्गुणे असा हा विषम संघर्ष होता. या सद्गुणामुळे शत्रूच्या राक्षसीपणाला खतपाणी मिळाले, असा सावरकरांचा निष्कर्ष आहे. राक्षसीपणाला औदार्य हे उत्तर असले की राक्षसीपणा वाढतो. तेव्हा अशा या विषम प्रवृत्तीच्या संघर्षामध्ये हिंदूनी कसे वागायला हवे होते, हे सावरकर सांगत आहेत, हे समजून घेतले पाहिजे.

हिंदूमध्ये सद्गुणांचा अतिरेक झालेला होता, ही गोष्ट आपण समजून घेणार असू, तर या अतिरेकाला आवर घातला पाहिजे, ही भूमिकाही आपल्याला समजून घेता येते. निःपक्षपाती इतिहासकारांचे असेच मत आहे की, हिंदूमध्ये सद्गुणाचा अतिरेक झालेला होता. Hindu superiority ह्या ग्रंथात हरबिलास सारडा यांनी हिंदूच्या सद्गुणातिरेकाबद्दल टॉड या सुप्रसिद्ध इतिहासकाराचे मत उद्धृत केलेले आहे. सारडा म्हणतात,[४१] "Unlike other nations they do not believe in the maxim 'every thing is fair in love and war.' "To share in a protstrate foe' says Colond Tod, 'is the creed of the Hindu cavalior and he carried all such maxims to excess" हीच गोष्ट विशिष्ट प्रकरणी थोड्याशा संतापाने सावरकर व्यक्त करतात, एवढाच काय तो फरक आहे. मुसलमानांनी हिंदूंवर किती राक्षसी अत्याचार केले याचे कथन प्रा. मॅक्समुल्लर यांनीही आपल्या ग्रंथात केलेले आहे. ते म्हणतात "I can only say that after reading the accounts of terror and horrors of Mohmadan Rule, wonder is that so much of native virtue and any truthfullness should have survived." ते पुढे म्हणतात, "When you read of the atrocitics committed by the Mohmedan conquerors of India after that time (1000 A. D.) to the time when England stepped in and whatever may be said by her envious critics, made at all events, the broad principles of our common humanity respected once more in India, the wonder to my mind is, how any nation could have survived such an 'Infer no' without being turued in to devils themselves"[४२] हे राक्षसी अत्याचार सहन करत असताना हिंदू स्वतःच राक्षस कसे झाले नाहीत, याचेच मॅक्समुल्लरला आश्चर्य वाटत आहे. हीच गोष्ट सावरकर आपल्या भाषेत मांडत असतात. तेव्हा कोणत्या परिस्थितीत सावरकर हे विचार मांडतात, हे समजून घेतले पाहिजे.

मराठ्यांच्या काळी जी नीतिमूल्ये होती त्या मूल्याच्या संदर्भातच सावरकर चर्चा करीत असतात. 'शत्रू समान सांस्कृतिक पातळीवर असेल, समान दर्जाचे नीतिनियम पाळत असेल, तर त्याच्याशी वागताना अशा सद्‌गुणाचे आचरण समर्थनीय ठरेल. पण राक्षसाशी वागताना सवाई राक्षस झाले पाहिजे, नाहीतर त्या राक्षसाचे भक्ष्य बनून नष्ट होण्याची पाळी येते." ही सावरकरांची भूमिका होती. डॉ. गोखले यांनी सावरकरांचे हे मत उद्‌धृत केलेलेच आहे. तेव्हा प्रश्न वर्तमानातील नीतिमूल्यांचा नाही, अतिहासकालीन नीतिमूल्यांचा आहे, राक्षसाशी कसे वागावे याचा आहे, आणि अशा परिस्थितीत सावरकर सांगतात त्याला पर्याय दिसत नाही, हे डॉ. गोखले यांनीच मान्य केलेले आहे.

सांस्कृतिक निर्मिती

मानवी जीवन श्रेष्ठ का जीवनमूल्य श्रेष्ठ हा गोखले यांनी उपस्थित केलेला दुसरा प्रश्न अधिक महत्वाचा आहे. वस्तुतः नीतिशास्त्राचा हा मूलभूत प्रश्न आहे. आम्ही नीतिमूल्ये का पाळावीत, नीतिमूल्याचा आधार कोणता, हाच नीतिशास्त्राचा मूलभूत प्रश्न आहे. मानवी जीवन हा नीतिमूल्याचा आधार आहे, ही सावरकरांची भूमिका आहे. त्यामुळे मूल्यापेक्षा मनुष्यहित सावरकरांनी श्रेष्ठ व महत्वाचे मानले, हा त्यांच्यावरील आक्षेप आहे. यातून डॉ. गोखले जगणे श्रेष्ठ का मूल्य श्रेष्ठ असा प्रश्न उपस्थित करतात. सावरकरांना मूल्यापेक्षा जगणेच श्रेष्ठ वाटत होते, असा आरोप करतात. अर्थात हे जगणे व्यक्तीचे नाही, तर राष्ट्राचे आहे. " व्यक्तीने व्यक्तीसाठी, किंवा समाजासाठी किंवा राष्ट्रासाठी सर्वस्वाचे बलिदान करावे असा सावरकरांचा अभिप्राय होता. त्यांच्या दृष्टीने व्यक्तिजीवनाचे ते एक परमोच्च ध्येय होते," असे डॉ. गोखले यांनीच मान्य केलेले आहे. [३८] तेव्हा खरा प्रश्न एखाद्या उदात्तमूल्यासाठी समाजाने वा राष्ट्राने का मरु नये, असा आहे. राष्ट्र टिकणे महत्वाचे की उदात्तमूल्ये नि संस्कृती टिकणे महत्वाचे असा हा प्रश्न आहे. डॉ. गोखले यांच्या या प्रश्नाचा विचार केला पाहिजे.

राष्ट्र नि उदात्तमूल्ये किंवा उच्चसंस्कृती याचा जो विकल्प वा विरोध डॉ. गोखले यांनी येथे गृहीत धरलेला आहे, तोच मुळात भ्रामक आहे. यापैकी कोणतीही गोष्ट ही निसर्गदत्त किंवा सनातन नसून ती मानवाची निर्मिती आहे. संस्कृती ही मनुष्याची निर्मिती आहे. या संस्कृतीमध्ये उदात्तमूल्याचा जसा समावेश होतो, तसाच राष्ट्र या मूल्याचाही समावेश होतो. राष्ट्र हीही एक सांस्कृतिक कल्पनाच आहे. पूर्वीच्या काळातील गटागटानी राहणाऱ्या मानवसमूहापेक्षा राष्ट्र ही निश्चितपणे उदात्त नि भव्य अशी सांस्कृतिक निर्मिती आहे. राष्ट्र हे स्वतःच साक्षेपतः एक उदात्त असे मूल्य आहे. मानवता हे सर्वोच्च मूल्य मानले तर त्या मूल्यासाठीच निर्माण केलेले राष्ट्र हे एक मूल्य आहे. या उदात्तमूल्याकडे जाण्याची ती एक पायरी आहे. आपण जी संस्कृती निर्माण केलेली आहे, तिच्या रक्षणासाठी

राष्ट्र हे सांस्कृतिक मूल्य म्हणून सर्वांनीच आज मान्य केलेले आहे. एका दृष्टीने आपण निर्माण केलेल्या उच्च संस्कृतीचा राष्ट्र हे एक भाग बनते. दुसऱ्या दृष्टीने त्या संस्कृतीच्या रक्षणासाठी अनिवार्य म्हणून निर्माण केलेली ती एक व्यवस्था ठरते. कोणत्याही दृष्टीने पाहिले तरी, आपण म्हणतो ती उदात्त संस्कृती नि राष्ट्र यांचा विरोध निर्माण होत नाही. असा विरोध होणार नाही, या तारतम्यानेच त्या संस्कृतीचा नि राष्ट्राचा समन्वय घातला गेला पाहिजे, हीच सावरकरांची भूमिका आहे. उदात्त संस्कृतीवर व मानवानी मान्य केलेल्या उदात्तमूल्यांवर सावरकरांची निष्ठा असल्यामुळेच त्या संस्कृतीच्या नि मूल्यांच्या रक्षणासाठीच राष्ट्रवादाची त्यांनी कास धरली, हे आपण समजून घेतले पाहिजे. एखाद्या गोष्टीवरील प्राणांतिक निष्ठा नि त्या गोष्टीचा प्राणांत होणार नाही, याची अहर्निश चिंता यातील हा फरक आपण नीट समजून घेतला पाहिजे. हा फरक जर आपण समजून घेतला नाही, तर उदात्तमूल्ये नि संस्कृती यांच्या जोपासनेचा अर्थ तत्संबंधीच्या श्रुतिमनोहर शब्दांची जोपासना व जपमाळ एवढाच होतो, हे लक्षात घेतले पाहिजे. सावरकरांना अशा उदात्त शब्दांच्या निरर्थक जपमाळेच्या मनस्वी तिटकारा होता. या शब्दातून व्यक्त होणाऱ्या अर्थपूर्ण संस्कृतीची जोपासना हेच त्यांचे ध्येय होते– त्यातच त्यांना खरी निष्ठा होती.

राष्ट्रमरणाचा अर्थ

एखाद्या राष्ट्राने उदात्तमूल्यासाठी किंवा संस्कृतीसाठी मरुन जाण्याची जी कल्पना डॉ. गोखले यांनी मांडली आहे, या कल्पनेचा थोडासा विचार केला पाहिजे. अशी घडण्याची तार्किक शक्यता कोणती हा पहिला प्रश्न आहे. सत्य, अहिंसा सहिष्णुता, मानवता, दया, परोपकार इ. मूल्ये ही व्यक्तिगत स्वरुपाची आहेत. एखादया समाजातील वा राष्ट्रातील एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीशी कशी वागते किंवा वागावे हे या नीतिनियमानी ठरत असते. मनुष्य समाज वा राष्ट्र करुन राहू अिच्छितो, म्हणून नीतिनियमाचा प्रश्न उत्पन्न होतो. उदात्ततत्वे हीही अितर व्यक्तींशी आपला जो संबंध येतो, त्यातूनच निर्माण होतात. या राष्ट्रातील सर्व व्यक्ती एकंदरीत कशा वागतात यावरुन त्या राष्ट्राची नैतिक उंची वा सांस्कृतिक पातळी ठरते. राष्ट्राची मूल्ये वा संस्कृती याचा अर्थ राष्ट्रातील व्यक्तीची मूल्ये वा संस्कृती जसाच होतो.

राष्ट्र मरते पण संस्कृती टिकते, अशा प्रकारचे राष्ट्राचे मरण डॉ. गोखले यांच्या कल्पनेत आहे. संस्कृती टिकते याचा अर्थ राष्ट्रांतर्गत संस्कृती टिकते, असाच होतो. ही संस्कृती नैतिक आहे, तशीच भौतिकही आहे, ही नैतिक संस्कृती टिकविण्यासाठी व्यक्ती जिवत असाव्या लागतात. कारण व्यक्ती वजा केल्यावर राष्ट्राला अशी कोणती नैतिक संस्कृतीच शिल्लक राहत नसते. नाही तर राष्ट्र मरते पण त्यातील व्यक्ती जिवत राहतात, अशी स्थिती निर्माण होते. राष्ट्र मरणे याचा

एक अर्थ, राष्ट्रातील सर्व व्यक्ती मरुन जाणे असा होतो. दुसरा अर्थ, दुसऱ्या राष्ट्रात या राष्ट्राने पूर्णतः विलीन होवून जाणे, असा होतो. तिसरा अर्थ, राष्ट्र ही कल्पनाच सोडून त्या अवस्थेपासून मुक्त होवून राष्ट्र म्हणून आत्मसमर्पण करणे असा होतो. या पैकी कोणताही अर्थ घेतला, तरी डॉ. गोखले म्हणतात, तशी राष्ट्र मरते पण संस्कृती टिकते ही अवस्था निर्माण होत नाही. दुसऱ्या राष्ट्रात विलीन होणे म्हणजे दुसऱ्या राष्ट्राचा गुलाम होणे, या गोष्टीमुळेही अशी स्थिती येणार नाही, कारण अशा वेळी पूर्वीच्या संस्कृतीतून गुलामाच्या संस्कृतीत रुपांतर होत असते. या गुलामीच्या अवस्थेत राष्ट्र जिवत राहिले तरी संस्कृती मरुन जाते. तेव्हा कोणताही अर्थ घेतला तरी हा पेच शिल्लकच राहतो.

या पेचातून सुटण्याचा एकमेव मार्ग म्हणजे राष्ट्राचे रुपांतर मानव राज्यात करणे हा आहे. पण यातील व्यावहारिक अडचण अशी की, जगातील सर्व राष्ट्रांना ही गोष्ट मान्य असली पाहिजे. आपल्या राष्ट्रातील लोकांशिवाय अन्य कुणीही या मानवराज्यात विलीन होणार नाही. राष्ट्राभिमान सोडून व मानव म्हणून राहू म्हणाल, तर आजच्या परिस्थितीत अितर राष्ट्रे या आदर्श मानवराज्याचे लचके तोडून आपल्या राष्ट्राला जोडून घेतील. राष्ट्रही जाईल, संस्कृतीही जाईल नि मानवराज्यही जाईल अशी आजची जागतिक परिस्थिती आहे; की ज्यामुळेच सावरकर राष्ट्रवादाची अपरिहार्यता सांगत आहेत. मानवराज्य नको म्हणून राष्ट्रवाद स्वीकारलेला नाही, तर प्राप्त परिस्थितीत तो अटळ आहे म्हणून, व तोही मानवराज्याकडे जाण्याचा एक अपरिहार्य टप्पा म्हणून सावरकरांनी स्वीकारलेला आहे, हे समजून घेतले पाहिजे.

तात्विक अडचण

तत्वाच्या, मूल्याच्या व संस्कृतीच्या रक्षणासाठी राष्ट्र मेले तरी चालेल यातील ही व्यावहारिक अडचण सोडून आपण या प्रश्नाचा तात्विकदृष्ट्या विचार करु. प्रश्न असा आहे की, अशी कोणती उदात्त मूल्ये आहेत की ज्यासाठी राष्ट्राला मरण्यासाठी उभे टाकावे लागते? राष्ट्र ही एक अमूर्त अशी व्यक्तीच आहे. व्यक्तीप्रमाणेच जगणे, मरणे, अधिकार व कर्तव्य असणे इ. गोष्टी राष्ट्रालाही असतात. व्यक्तीप्रमाणेच राष्ट्रालाही अशी उदात्तमूल्ये असू शकतात, असा याचा अर्थ झाला. राष्ट्रातील एका व्यक्तीची इतर व्यक्तीसंबंधीची व राष्ट्रासंबंधीची जी मूल्ये असतात, त्यापेक्षा राष्ट्राची स्वतःची अशी वेगळी मूल्ये असतात काय? असल्यास ती कोणती आहेत? या प्रश्नाचा काही उदाहरणासह आपण थोडा विचार करु.

सत्य वा अहिंसा हे राष्ट्राचे मूल्य आहे काय? जोपर्यंत ही मूल्ये राष्ट्रातील व्यक्तीच्या संबंधापुरती मर्यादित आहेत, तोपर्यंत या मूल्यासाठी राष्ट्राच्या मरणाचा प्रश्नच निर्माण होत नाही. ही मूल्ये राष्ट्रातील व्यक्तीनी कायद्यानी

दिलेल्या विशिष्ट मर्यादेत पाळावीत, हाच कोणत्याही राष्ट्राचा दंडक असतो. ही मूल्ये त्या मर्यादेत न पाळणाऱ्यांना योग्य ती शिक्षा करण्याची व्यवस्था राष्ट्र करत असते. आता आपल्यासमोरचा प्रश्न, मूल्ये राष्ट्राची आहेत म्हणून दोन राष्ट्रातील संबंधात ही मूल्यें आचरावीत काय, असा आहे. डॉ. गोखले म्हणतात की, ही मूल्ये आचरण्यापायी राष्ट्राने मरण पत्करणे भूषणावह आहे. याचा अर्थ, दुसऱ्या राष्ट्राना ही मूल्ये मान्य असोत वा नसोत, तो ती आचरो व न आचरो, आपल्या राष्ट्राने मात्र ती पाळलीच पाहिजेत असा होतो. आपण असे वागू लागलो की, आपल्या राष्ट्राचे मरण अटळ होवून बसते व म्हणूनच अशा मूल्यांसाठी असे मरण राष्ट्रानी पत्करणे श्रेष्ठतम होय, असे डॉ. गोखले यांना वाटते. सावरकरांना ही भूमिका मान्य नाही. राष्ट्राराष्ट्रात अशी कोणती नीतिमूल्ये असतील तर ती राष्ट्रहितानीच मर्यादित असतात, अशी त्यांची भूमिका आहे. एकतर्फी उदात्तमूल्ये आचरणे व त्यापायी राष्ट्राने मरुन जाणे सावरकरांना भूषणावह वाटत नाही, तर मूर्खपणाचे वाटते. सावरकरांच्या मते सत्य, अहिंसा इ. मूल्ये ही राष्ट्रातील व्यक्तीसाठीची असतात, दोन राष्ट्रासाठीची नसतात.

राष्ट्राची मूल्यें कोणती ?

एखाद्या राष्ट्राने लोकशाही हे मूल्य म्हणून स्वीकारले आहे, असे आपण म्हणतो. हे मूल्य वस्तुतः त्या राष्ट्रातील व्यक्तीव्यक्तीच्या संबंधातील मूल्य आहे. लोकशाही हे दोन किंवा अधिक व्यक्तीच्या परस्परांशी वागण्याच्या विशिष्ट पद्धतीला दिलेले एक नाव आहे. या व्यक्ती कोणत्या असतात ? राष्ट्रातील असतात का राष्ट्राबाहेरील सुद्धा असतात ? राष्ट्राचे एकमेकाशी वागणे, संबंध ठेवणे, व त्यासंबंधीचे नियम व मूल्ये ही व्यक्तिगत पातळीवरील नागरिकांच्या व्यवहारापेक्षा स्वतंत्र असतात, अशी आपली राष्ट्राची कल्पना आहे. याचा अर्थ लोकशाही हे मूल्य राष्ट्रातील लोकांनी स्वतःसाठी तयार केलेले असते; दुसऱ्या राष्ट्रातील नागरिकाशी राष्ट्र म्हणून वागताना तयार केलेले हे मूल्य नव्हे ! लोकशाही या मूल्यात हक्कांबरोबर जबाबदाऱ्याही येतात. त्या जबाबदाऱ्या लोकशाही स्वीकारताना राष्ट्रातील सर्व नागरिकांनी स्वीकारलेल्या असतात. तो एक परस्पराशी केलेला करार असतो. हा करार केवळ नैतिक नसतो, तर त्याला कायद्याचे पाठबळ असते. तो करार भंग करणाऱ्याला शिक्षा करण्याची सोय राज्यसंस्था तयार करुन केली जाते. दोन राष्ट्रातील परस्परसंबंधांना लोकशाही हे मूल्य लागूच होत नाही. हे संबंध परराष्ट्रधोरणानी, आंतरराष्ट्रीय नियमांनी, परस्परांतील विशिष्ट करारांनी ठरविले जातात. लोकशाही हा दोन राष्ट्रातील कधीही करार नसतो. लोकशाही ही केवळ परस्परांच्या सदीच्छेवर असणारी गोष्ट नसते. तेव्हा लोकशाही ही एक राष्ट्रांतर्गत गोष्ट असून दोन राष्ट्रातील संबंध दर्शविणारे ते कोणते मूल्य नव्हे ! या मूल्यासाठी राष्ट्राने मेले पाहिजे, याचा अर्थ राष्ट्रातील

काही व्यक्तींनी यासाठी मेले पाहिजे, असाच घ्यावा लागतो. असा अर्थ घेतला म्हणजे सावरकर सांगतात त्याच धोरणावर येवून आपण स्थिर होतो. राष्ट्र मरते पण लोकशाही मूल्य जिवंत राहते, ही अवस्था संपूर्ण राष्ट्र मरण्याच्या शक्यतेने कधीच येत नसते.

जो गोष्ट लोकशाही या मूल्याची तीच गोष्ट इतर मूल्यांचीही आहे. स्वातंत्र्य हे मूल्य घ्या. स्वातंत्र्य हे राष्ट्रातील व्यक्तींनी एकमेकांना दिलेली एक चांगली गोष्ट आहे. तो एक करारच आहे. दुसऱ्यांनी आपले स्वातंत्र्य मान्य केले तर ते स्वातंत्र्य असते, ते काही आपआपल्या इच्छेवर नसते. ते स्वयंभूही नसते नि नैसर्गिकही नसते. दुसऱ्याला ही गोष्ट मान्य करायला भाग पाडता येते, पण तोपर्यंत तरी आपल्या स्वातंत्र्याला अर्थ नसतो. ही बाब राष्ट्रातील व्यक्तीसंबंधीची झाली. राष्ट्राची स्वतंत्रता नि त्या राष्ट्रातील व्यक्तीची स्वतंत्रता या दोन वेगळ्या बाबी आहेत. वेगवेगळी मूल्ये आहेत. यापैकी कोणत्या मूल्यासाठी राष्ट्राने मेले पाहिजे ? स्वतःच्या नागरिकाला स्वातंत्र्य न देणारे राष्ट्र मेले तरी चालेल या अर्थी बोलायचे असेल तर त्या राष्ट्रात लोकशाही मान्य असणारी राजवट यावी व हुकूमशाही नष्ट व्हावी असा याचा अर्थ होतो. राज्यसंस्थेचे स्वरुप बदलावे एवढाच याचा अर्थ आहे. येथेही राष्ट्राच्या मरणाचा प्रश्न निर्माण होत नाही. राष्ट्राचे स्वातंत्र्य हे मूल्य घेतले, तर दुसऱ्या राष्ट्राचे गुलाम होण्यापासून आपल्या राष्ट्राला वाचवले पाहिजे, याच सावरकरांच्या भूमिकेवर येवून आपण स्थिर होतो.

आपला देश स्वतंत्र झाला तसा दुसऱ्याचाही तिसऱ्या राष्ट्रानी गुलाम केलेला देश स्वतंत्र झाला पाहिजे, या भूमिकेतून, या दुसऱ्या स्वातंत्र्यासाठी आपल्या राष्ट्राने मेले पाहिजे, या शक्यतेचाही विचार केला तरी फरक पडत नाही. पहिला प्रश्न हा की, यासाठी आपल्याजवळ पुरेसे सामर्थ्य पाहिजे. दुसरा प्रश्न हा की, दुसरे राष्ट्र स्वतंत्र होत असताना आपल्या राष्ट्राचे स्वातंत्र्य त्यापायी नष्ट होवू नये याची काळजी घेणे भाग आहे. स्वतःचे स्वातंत्र्य नष्ट झाले तरी हरकत नाही, पण दुसऱ्या राष्ट्राला स्वतंत्र केलेच पाहिजे, हा विचार सावरकरांना मंजूर नाही. अशा प्रसंगी दोघापैकी कोणाचेही स्वातंत्र्य राहत नसते. आणि ते राहायचे असेल तर त्यासाठी पुरेसे शस्त्रसामर्थ्य पाहिजे, या सावरकरांच्या भूमिकेवर आपण येवून स्थिर होतो. आपण बांगला देश स्वतंत्र करु शकलो, तिबेटला स्वतंत्र करु शकत नाही, याचे कारण हेच आहे. हे कारण जोवर आपल्याला पटते तोवर सावरकरांच्या या धोरणावर आपल्याला टीका करता येणार नाही.

याशिवाय कोणतेही इतर मूल्य घेतले तरी याच पद्धतीने विचार केल्यास आपल्याला असे दिसून येईल की, ही सारी मूल्ये राष्ट्रांतर्गत लोकासाठी आहेत. सत्य, अहिंसा, समता, दया, सहिष्णुता, मानवता इ. सारी मूल्ये राष्ट्रातील व्यक्तीसाठीची आहेत. कारण ती परस्परानी मान्य केली आहेत आणि त्या विरोधी

वर्तन करणाऱ्यावर इलाज करणारी व्यवस्था अस्तित्वात आहे. राष्ट्राराष्ट्रातील संबंधात ही मूल्ये वास्तविक अर्थाने नसून औपचारिक अर्थाने आहेत, ती राष्ट्रावर बंधनकारक नाहीत. ती पाळण्यास भाग पाडण्याची कोणतीच व्यवस्था अस्तित्वात नाही. अशा संबंधात राष्ट्रहित हेच सर्वोच्च मूल्य आहे. ही आपली अिच्छा नाही तर कठोर वास्तवता आहे. व्यक्तिगत पातळीवरील ही उदात्त मूल्ये राष्ट्राच्या पातळीवरही एकतर्फीच आचरायची काय, हा खरा प्रश्न आहे. दुसरे राष्ट्र जितक्या प्रमाणात ही मूल्ये पाळीत असेल तितक्या प्रमाणात ती आपणही पाळली पाहिजेत, ही सावरकरांची सापेक्ष भूमिका आहे. दुसऱ्या राष्ट्राने आपल्याशी युद्ध पुकारले तर आपल्याला अहिंसा पाळून, त्या अहिंसेला कलंक न लावता, मरण पत्करता येणार नाही. दुसरे राष्ट्र गुपित सांगत नसेल तर, किंवा आपल्या राष्ट्रात येवून हेरगिरी करीत असेल, तर आपल्यालाही संपूर्ण सत्य सांगण्याचा मोठेपणा करता येत नाही. असल्या सत्यासाठी, अहिंसेसाठी, मानवतेसाठी राष्ट्राने मेले पाहिजे, हे सावरकरांना मान्य नाही. आज आपण आंतरराष्ट्रीय राजकारणाचा जो अनुभव दररोज घेत आहेत, त्यावरुन तर हे त्यांचे म्हणणे किती वास्तव आहे, हे आपल्या लक्षात येईल. शेवटी डॉ. गोखले याचा आरोप 'राष्ट्रवादाचा' आग्रहच चूक आहे, याच मुद्द्यावर येवून स्थिर होतो.

सांस्कृतिक पेच

आपल्यासमोर एक सांस्कृतिक पेचप्रसंग उभा आहे. राष्ट्र हे आधुनिक काळातील श्रेष्ठ असे एक सांस्कृतिक मूल्य आहे. राष्ट्रापेक्षाही श्रेष्ठतर अशा मानवराज्याकडे जाण्याचा एक अनिवार्य टप्पा म्हणून तो आधुनिक जगाने स्वीकारला आहे. सावरकरांची भूमिका हीच आहे. त्यांची भूमिका अशी :[४३] "मानव जातीची सेवा करणे हे मानवाचे ध्येय. याचेच नाव मानवता. हे सर्वोच्च ध्येय आहे पण कळसाला पोहचण्यासाठी शंभर पायऱ्या चढाव्या लागतात. पहिली ओलांडून दुसऱ्या पायरीवर जावे लागते. म्हणून मानवता हे सर्वोच्च ध्येय असले तरी ते गाठण्यासाठी प्रथम राष्ट्रहितापासून प्रारंभ केला पाहिजे." ही भूमिका त्यांनी सातत्याने मांडली आहे. राष्ट्रहित विरुद्ध मानवी मूल्ये असा विकल्प वा संघर्ष आपल्या मनात चालू असतो. मानवीमूल्यांसाठीच राष्ट्रहित ही भूमिका स्वीकारली की, हा विकल्प संपून जातो. मानवी मूल्यांचे संरक्षण व संवर्धन यासाठीच राष्ट्रवाद हे सांस्कृतिक मूल्य आपण मान्य केले आहे, हे लक्षात न घेतल्यामुळे निर्माण झालेला हा सांस्कृतिक पेचप्रसंग आहे. डॉ. गोखले याचा आक्षेप यातूनच निर्माण झालेला दिसतो. 'राष्ट्रहितात नि मनुष्यहितात विसंगती उत्पन्न झाली तर आपण कशाला महत्व देणार' हे सावरकरांनी उलगडून दाखविले नाही, हा त्यांचा अभिप्राय या पेचप्रसंगातून निर्माण झालेला आहे.[४४]

व्यक्तीने समूहाच्या हितासाठी त्याग व बलिदान करावे असे ते सांगत; पण

एका समूहाला त्यापेक्षा मोठ्या समूहाच्या हितासाठी असेच बलिदान करायला का सांगत नाहीत, असा प्रश्न डॉ. गोखले विचारतात. ते म्हणतात, [४५] "समष्टीला मोठ्या समष्टीसाठी तसेच बलिदान करायला सांगत नाहीत; किंवा समूहांना उदात्तध्येयाच्या प्रकाशशिखरावरही चढवित नाहीत. समूहाचा जो जीवनकलह चालू आहे, त्यात टिकणे, वरचढ होणे, हेच समूहाचे महत्तम कर्तव्य होय असा त्यांच्या प्रतिपादनाचा सूर आहे." हा आक्षेपही वरील सांस्कृतिक पेचातून निर्माण झालेला आहे. डॉ. गोखले म्हणतात, "विश्वबंधुत्वासाठी पुढाकार घेवून जाणूनबुजून झटण्याचा नि आवश्यक तर आत्मार्पण करण्याचा मार्ग त्यांना मान्य नाही." असे करण्यासाठी एका विशिष्ट सांस्कृतिक अवस्थेपर्यंत राष्ट्राला गेले पाहिजे, हे डॉ. गोखलेही मान्य करतीलच. सावरकर त्या अवस्थेवरच प्रथमतः भर देतात, एवढेच खरे आहे. विश्वबंधुत्व नावाचे सांस्कृतिक मूल्य जगात अस्तित्वात आहेच, असे समजून हा आक्षेप घेतलेला आहे. विश्वबंधुत्व मानणारा राष्ट्रापेक्षाही एक मोठा समूह जगात अस्तित्वात आहे, असे डॉ. गोखले याचे गृहीत आहे. सावरकर हे गृहीत मानायला तयार नाहीत. त्यांच्यामते ती एक आदर्श ध्येयकल्पना आहे, वस्तुस्थिती नव्हे !

संघर्ष कल्पितच

हे विश्वबंधुत्व निर्माण करण्यासाठी सावरकर का झटत नाहीत, त्यासाठी राष्ट्राला मरायला का सांगत नाहीत, हा पुढचा प्रश्न आहे. हजारो वर्ष गुलामीत राहत आलेल्या आपल्या राष्ट्राने, अद्याप स्वातंत्र्याचीच पहाट झालेली नसताना, विश्वबंधुत्वाची गर्जना करत जगभर ओरडत फिरणे सावरकरांना निरर्थक वाटते. या गोष्टीसाठी राष्ट्राचे स्वातंत्र्य, त्याचे सामर्थ्य टिकले पाहिजे हीच त्यांची भूमिका होती. तेव्हा या दोन सांस्कृतिक मूल्यातील संघर्ष वा विरोध त्यांच्या मते भ्रामक व कल्पित आहे, हे समजून घेतले पाहिजे.

ही भूमिका नीट समजून न घेतल्यामुळे अनेकांनी याच प्रकारचे आक्षेप सावरकरांवर घेतलेले आहेत. डॉ. विद्याधर पुंडलिकांचे म्हणणे असे : [४९] "भारताची लढाऊ परंपरा ध्यानात घेतली आणि त्यातून धर्म, अध्यात्म, नीती, आणि संत-परंपरा यातून निर्माण झालेली सत्य, शांती, अहिंसा, सहिष्णुता यासारखी उच्च-मूल्ये वगळली, तर मग हिंदुपरंपरेचा वेगळा सांस्कृतिक मोठेपणा आणि व्यक्तित्व कशात मानावयाचे, हा प्रश्न उरतो. आधुनिक तर बनायचे, पण राष्ट्रीय व्यक्तित्वाचे जतन तरी करायचे आहे, या आज आपल्याला पडलेल्या सांस्कृतिक पेचाचे मर्म सापडणे अगत्याचे आहे." 'शस्त्र आणि राष्ट्र यांच्यापलिकडे सावरकरांनी दुसरे काही पाहिलेच नाही,' हा डॉ. य. दि. फडके यांचा खोडसाळ आरोप; विश्वबंधुत्वासाठी राष्ट्राला आत्मार्पण करायला सावरकर सांगत नाहीत, हा डॉ. गोखले यांचा अभिप्राय व नीतिमूल्ये वजा करुन उरलेल्या राष्ट्रवादाचा

डॉ. पुंडलिकांनी मांडलेला हिशोब, भावेतला व हेतूतला फरक सोडला, तर मूलतः एकाच स्वरुपाचे आहेत. हे सारे आरोप मूलतः सावरकरांच्या बुद्धिवादावरील आहेत, असे आम्हास वाटते.

सावरकर आपल्या राष्ट्रवादातून नीतिमूल्ये वजा करतात असे डॉ. पुंडलिकांना का वाटते, हे समजून घेतले पाहिजे. सावरकरांचे नैतिक विचार बुद्धीवर आधारलेले आहेत. या विचारासाठी ते धर्माचा, अध्यात्माचा आधार देत नाहीत. कोणत्याही मूल्याला म्हणूनच ते स्वयंभू, त्रिकालाबाधित समजत नाहीत. त्यांची ही भूमिका आपण मागील प्रकरणात पाहिलीच आहे. बुद्धीवर नीतिविचाराची इमारत उभी करु पाहणाऱ्यांना डॉ. पुंडलिकांचे हे आरोप स्वीकारणे भागच असते. आधुनिक तर बनायचे आहे, पण राष्ट्रीयत्वही जतन करायचे आहे, हा डॉ. पुंडलिकांनी उपस्थित केलेला पेचप्रसंग बुद्धिवादामुळे पडणारा पेचप्रसंग आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. खरा बुद्धिवाद या दोन्हीचा सुवर्णमध्य साधण्यात असतो, राष्ट्रीयत्व फेकून देण्यात नसतो. डॉ. गोखले व डॉ. पुंडलीक यांच्या समोरची खरी समस्या बुद्धिवाद तर हवा आहे, पण नैतिक मूल्यांचे अधिष्ठान धर्म, अध्यात्म, परंपरा हे असायला हवे आहे, या द्वंद्वातून निर्माण झालेली आहे, असे आम्हास वाटते.

आध्यात्मिक परिभाषेत आपले विचार मांडणारेही शेवटी सावरकरांच्याच भूमिकेवर व वास्तववादातर येवून स्थिर होतात, हे लक्षात घेतले पाहिजे. सावरकरांची परिभाषा उदातमूल्याने रंगलेली वा आध्यात्मिक तत्वाने भारलेली नसल्यामुळे अनेकांचे गैरसमज झालेले आहेत. आध्यात्मिक पुरुषही शेवटी सावरकरांच्याच निष्कर्षाला येतात, हे आपण समजूनच घेत नाही.

सर्वभूतहिताची व्यापक भूमिका घेणारा टिळकांचा आध्यात्मिक पक्ष घेतला काय नि सावरकरांचा बुद्धिवादी पक्ष घेतला काय, दोघेही एक समान गोष्ट मान्य करतात. मनुष्याची पूर्णावस्था ही सध्याच्या वर्तमान अवस्थेपेक्षा वेगळी आहे, व ती अध्याप यायची आहे, ही गोष्ट दोघांनाही मान्य आहे. यतिधर्म आणि राजधर्म असा भेद टिळक सुद्धा करतात. रागावणाऱ्यावर उलट रागावू नको (मनु : ६-४८) हा नियम मनूने गार्हस्थ किंवा राजधर्मात सांगितलेला नसून यतिधर्मात सांगितलेला आहे, असे टिळक म्हणतात.[४६] व्यवहारधर्मात हा आत्मौपम्याचा आदर्श धर्म सारासार विचार करुन शहाणपणानेच आचरावा लागतो, हे टिळक आणि तेही धर्मशास्त्राचाच आधार घेवून सांगतात. नित्यधर्म हे व्यवहारात तारतम्यानेच आचरावे लागतात हे तेही पटवून देतात. ते म्हणतात, "आपल्याला जे दुःखदायक होईल असे कर्म करुन दुसऱ्यास दुखवू नये, हा आत्मौपम्यदृष्टीचा सामान्य नियम खरा ; पण परक्यांनीही आपणास दुखवू नये याच धर्माच्या पडताळ्याचा जो दुसरा धर्म तो पाळणारे लोक ज्या समाजात नाहीत, त्या समाजात केवळ एकानेच हा धर्म पाळून उपयोग नाही, असा महाभारतात निर्णय दिला आहे. 'समता' हा

शब्दच दोन व्यक्तीशी संबंद्ध म्हणजे सापेक्ष आहे, म्हणूनच आततायी पुरुषास मारिल्याने अहिंसा धर्म जसा बिघडत नाही, तद्वतच दुष्टाचे योग्य शासन केल्यानें साधुपुरुषाच्या आत्मौपम्यबुद्धीस किंवा निर्वैरीपणासही काही कमीपणा येत नाही. उलट दुष्टाच्या अन्यायाचा प्रतिकार करुन अितरास बचावण्याचे श्रेय मात्र त्यांना मिळते. ज्या परमेश्वरापेक्षा कोणाचीही बुद्धी जास्त सम नाही, तो परमेश्वर देखील साधूच्या संरक्षणासाठी व दुष्टांचा नाश करण्यासाठी, जर वेळोवेळी अवतार घेवून लोकसंग्रह करीत असतो, (गी. ४, ७ व ८) तर अितर पुरुषाची कथा काय? 'वसुधैव कुटुंबम' अशी दृष्टी झाल्याने किंवा फलाशा सोडिल्याने पात्रपात्रातेंचा किंवा योग्यायोग्यतेचा भेद नाहीसा झाला पाहिजे, हे म्हणणे भ्रांतिमूलक आहे." उपयुक्ततावादी सावरकर या पेक्षा काहीही वेगळे सांगत नाहीत, हे आपण समजून घेतले पाहिजे. 'शत्रू समान संस्कृतिक पातळीवर असेल, समान दर्जाचे नीतिनियम पाळत असेल तर' त्यांच्याशी त्याच सद्गुणाने व नीतिनियमाने वागले पाहिजे, हे सावरकरांनीच आग्रहाने सांगितले आहे. प्रत्यक्ष व्यवहारात वागताना टिळक व सावरकर कोणताच फरक करत नाहीत हे लक्षात घेतले पाहिजे. 'पात्रापात्र-विवेकशून्य! जरी आचरिला सद्गुण!! तो तोचि ठरे दुर्गुण! सद्धर्म घातक!!' ही सावरकरांची सद्गुणविकृतीच्या पाठीमागची भूमिका आहे. टिळक ज्याला नित्यधर्म म्हणतात, त्यालाच सावरकर येथे सद्धर्म म्हणत आहेत. या सद्धर्माचा पात्रापात्र विचार करुन आचरण करणे हाच मनुष्यधर्म आहे, हे टिळकांनाही मान्यच आहे. या म्हणण्यासाठीही टिळक शास्त्राचे आधार देतात, एवढाच फरक आहे.

सद्गुणासंबंधी शास्त्राधार

सद्गुणाच्या आचाराविषयी शास्त्राधार सांगताना लो. टिळक म्हणतात,[४७] "त्यांचे असे म्हणणे आहे की, कोणताही सद्गुण झाला तरी त्याचा अतिरेक होवू न देण्यास आपण नेहमी जपले पाहिजे ; कारण अशा अतिरेकाने सद्गुणाचा अखेर दुर्गुण बनतो." सावरकर यापेक्षा वेगळे काहीच सांगत नाहीत. मनुष्यहिताला घातक होणार नाही, याचा विवेक पाळूनच त्या मर्यादेत सद्गुणाचे आचरण केले पाहिजे, असेच टिळकांचेही म्हणणे आहे. अध्यात्माची भाषा यतिधर्मातील असून राजधर्मात टिळक उपयुक्ततवादाचाच आधार घेतात, हे समजून घेतले पाहिजे. टिळकांचे म्हणणे असे,[४८] "लोकसंग्रहाची ज्याला पर्वा नाही, ज्याला जगात दुष्टांचे प्राबल्य झाले काय किंवा न झाले काय किंवा स्वतःचा जीव राहिला काय आणि गेला काय, सारखेच. पण पूर्णावस्थेत गेलेले कर्मयोगी सर्वभूतामैक्य ओळखून सर्व भूताशी निर्वैरपणे वागत असले तरी अनासक्तबुद्धीचे पात्रापात्रतेचा सारासार विचार करुन स्वधर्माप्रमाणे प्राप्त झालेले कर्म करण्यास चुकत नाहीत, आणि अशा केलेल्या कार्यामुळे कर्त्याच्या साम्यबुद्धीसही कांही कमीपण येत नाही, असे

कर्मयोगाचे सांगणे आहे." म्हणजे साव कर बुद्धिवादाच्या व उपयुक्ततावादाच्या भाषेत जे सागतात तेच टिळक गीतेच्या परिभाषेत सांगत आहेत. 'पूर्णावस्था', 'सर्वभूतात्मैक्य', 'साम्यबुद्धि', 'कर्मयोग' इत्यादी शब्दाचा वापर न करता साध्या व्यावहारीक भाषेत हेच विचार सावरकर मांडतात, एवढाच फरक आहे. 'रहस्यकार व उपयुक्ततावाद' या लेखात सावरकरांनी हाच भाषेच्या फरकाचा मुद्दा मांडला असून, उपयुक्ततवादाची परिभाषाच कर्माकर्माची निवड करण्यास अधिक सोयीची आहे, हे पटवून दिले आहे.

साधुपुरुषाचे कर्तव्य

सावरकरांनी राष्ट्रहित हे सर्वश्रेष्ठ हित मानले. या राष्ट्रहितासाठी जे जे चांगले व अवश्य ते ते उदात्त तत्व होय, तोच सद्गुण होय, असे मानले. प्राप्त परिस्थितीत पात्रापात्र विचार करताना अखिल मानवजातीचे हित ही भूमिका सांप्रत ध्येय म्हणून स्वीकारली नाही. अध्यात्म मानणारे टिळक यापेक्षा वेगळचा निष्कर्षाला येत नाहीत, हे समजून घेतले पाहिजे. या बाबतीत धर्मशास्त्रावर आधारलेले मत टिळकांनी दिले आहे. ते म्हणतात, [४९] " गीताधर्मातील कर्मयोगाचे हे तत्व स्वीकारल्यावर कुलाभिमान, देशाभिमान इत्यादी कर्मव्यधर्माचीहीं कर्मयोगशास्त्राप्रमाणे योग्य उपपत्ती लावता येते. सर्व मानवजातीचे किंबहुना प्राणिमात्राचे ज्याने हित होअील तोच धर्म हा जरी अखेरचा सिद्धांत आहे तरी परमावधीची ही स्थिती प्राप्त होण्यास कुलाभिमान, धर्माभिमान या चढत्या पायऱ्या असल्यामुळे त्याची आवश्यकता केव्हाही नाहीशी होणार नाही. निर्गुण ब्रह्मप्राप्त्यर्थ ज्या प्रमाणे सगुणोपासना अवश्य, त्याप्रमाणे 'वसुधैव कुटुंबकम्' अशी बुद्धी होण्यास कुलाभिमान, जात्यभिमान, धर्माभिमान, देशाभिमान इ. सरणी अवश्य आहे; आणि समाजातील प्रत्येक पिढी याच जिन्याने वर चढत असल्यामुळे हा जिना नेहमीच कायम राखावा लागतो. त्याचप्रमाणे आपल्या भोवतालचे लोक आणि राष्ट्रे खालच्या पायरीवर असता एखादा पुरुष किंवा राष्ट्र आपण एकाकीच जर सदैव वरच्या पातळीवर राहू म्हणेल तर ते देखील सिद्धीस जाणे शक्य नाही. कारण परस्परव्यवहारात 'जशास तसे' या न्यायाने वरच्या वरच्या मजल्यावरील लोकास खालच्या खालच्या मजल्यावरील लोकांच्या अन्यायाचा प्रतिकार करणे प्रसंगविशेषी जरुर पडते, हे वर सांगितलेच आहे. जगातील सर्व मनुष्याची स्थिती सुधारता सुधारता केव्हातरी सर्वभूतात्मैक्य ओळखण्यापर्यंत त्याची मजल जाअील यात शंका नाही; निदान तशी स्थिती मनुष्यमात्रास प्राप्त करुन देण्याची आशा बाळगणे तरी अयुक्त नव्हे. परंतु आत्मौन्नतीची ही परमावधीची स्थिती जोपर्यंत सर्वास प्राप्त झाली नाही, तोपर्यंत अितर राष्ट्रे किंवा समाज याची स्थिती लक्षात आणून साधुपुरुषानी आपापल्या समाजास तत्तकाली श्रेयस्कर होअील असा देशाभिमान धर्मच त्यांस उपदेशिला पाहिजे असे न्यायतःच सिद्ध होते."

सावरकरांचा राष्ट्राबद्दलचा भूमिकाही याच प्रकारची आहे हे समजून घेतले पाहिजे.

अंदमानातून बाळला पाठविलेल्या एका पत्रात सावरकरांनी म्हटले आहे.[५०] "ज्यात सर्व मनुष्यमात्रांचा समावेश होईल आणि जेथील एकूण एक स्त्रियांना ही पृथ्वी, हा सूर्य, ही भूमि आणि हा प्रकाश, हीच मनुष्यमात्रांची खरी पितृभूमि आणि मातृभूमि आहेत– हयाच्यापासून मिळणाऱ्या लाभासाठी प्रयत्न करण्याचा आणि त्याचा उपभोग घेण्याचा समान अधिकार राहील, असे संपूर्ण जगाचे एक राष्ट्र हे आमचे ध्येय आहे. आणि त्यावर आमचा विश्वास आहे. अितर सर्व विभाग आणि भेद अवश्य असले तरी कृत्रिम आहेत. ज्या प्रमाणे पेशीचे रुपांतर व्यक्ति-पिंडात होते, व्यक्ति कुटुंबात आणि संघात विलिन होतात, संघाची राष्ट्रे बनतात, त्या प्रमाणे सर्व राष्ट्रे ज्याच्यात एकरुप होवून जातील, असे विश्वराष्ट्र प्रस्थापित करणे हे तत्व आम्हास मान्य आहे. तेव्हा सहाजिकच विश्वकुटुंबित्व ही देशाभिमानाची बरची पायरी ठरते." मग आता धर्मशास्त्राचा आधार घेणाऱ्या टिळकांच्या नि बुद्धिवादाचा आधार घेणाऱ्या सावरकरांच्या मानवहिताच्या अंतिम निष्कर्षामध्ये फरक तो कोणता राहतो? 'कुटुंब हे आत्मौपम्य बुद्धीचा पहिला धडा शिकविण्याचे साधन आहे'[५१] येथून सुरु करुन कुल, जात, धर्म, राष्ट्र, विश्व असे करत करत आत्मौपम्याच्या स्थितीपर्यंत टिळक जातात. व्यवहारात आपल्याला अलिकडेच म्हणजे देशाभिमानाजवळच थांबले पाहिजे, हेच ते सांगतात. टिळक म्हणतात तो नित्यधर्म व्यवहारात आचरता येत नाही, हे टिळकांनाही मान्यच आहे. मनुष्याला अनित्य अशा आपद्धर्माचाच आश्रय घेणे भाग आहे, हे त्यांनाही मान्य आहे. मग सावरकर या पेक्षा दुसरे काय सांगतात? टिळक आपले विवेचन धर्मशास्त्राच्या परिभाषेत करतात, तर सावरकर रोखठोक व्यावहारिक भाषेत करतात, हा फरक फार महत्वाचा आहे, असे मानायचे काय?

जगणेच श्रेयस्कर

टिळकांची साक्ष आम्ही यासाठी काढली की, सावरकरांनी स्वीकारलेल्या उपयुक्ततावादाचे ते विरोधक आहेत. जो आरोप सावरकरांवर डॉ. गोखले यांना घेता आला, तो टिळकांवर त्यांना घेता येणार नाही. सावरकरांचा उपयुक्ततावाद आणि टिळकांचा अध्यात्मवाद एकाच श्रीकृष्णापासून निघून वेगवेगळ्या मार्गाने शेवटी राष्ट्रवादावर व व्यवहारवादावर येवून स्थिर होतात, हे लक्षात घेतले पाहिजे. सावरकर ज्याला सद्गुण विकृती म्हणतात त्या गोष्टी स्वतः टिळकांनीच 'कर्म जिज्ञासा' या गीतारहस्यातील प्रकरणांत सांगितल्या आहेत. 'जीवो जीवस्य जीवनम्' हा नित्यव्यवहार आहे असे त्यांनी दाखवून दिले आहे व निष्कर्ष काढला आहे:[५२] "सारांश नीतीच्या सामान्य नियमाने नेहमीच काम भागत नसून, नीतिशास्त्रातील मुख्य म्हणजे अहिंसेच्या नियमानही कर्तव्याकर्तव्याचा तारतम्य सुटत

नाही" क्षमा, शांती या गुणांचा आचार पात्रापात्रविवेकानेच केला पाहिजे, याला धर्मशास्त्राचे पुरावे टिळकांनी दिलेले आहेत. 'नेहमी शांत राहाणाऱ्या मनुष्याची वायकापोरे देखील इतर लोक उघड हरण केल्याशिवाय राहणार नाहीत' असे प्रल्हाद बलीस म्हणाल्याचे महाभारतातील उदाहरण त्यांनी दिले आहे[९] 'ज्याने सर्वांचेच नुकसान होते ते सत्य नव्हे व अहिंसाही नव्हे'[५२] असा शास्त्राधार टिळकांनीच दिला आहे. 'जगेल तर पुढे धर्म, म्हणून धर्मदृष्टचाही मरण्यापेक्षा जगणे श्रेयस्कर'[५३] या विश्वामित्राच्या विधानाचा उल्लेख टिळकांनी केलेला आहे. पण हा सामान्य नियम निरपवाद नसल्याचे सांगून देशासाठी, धर्मासाठी, सर्व लोकांच्या हितासाठी देहत्याग करणे अधिक श्रेयस्कर आहे, हे दधीची ऋषीच्या आत्मत्यागाचे उदाहरण सांगून त्यांनी दाखवून दिले आहे. सावरकरांची भूमिका यापेक्षा वेगळी नाही, हे समजून घेतले पाहिजे.

चिंता संरक्षणाची

सावरकर हे उदात्तमूल्ये जाणणारे व मानणारे होते. त्या मूल्याचे ते पूजक होते. अशा मूल्यावर श्रद्धा असल्यामुळेच आपले संपूर्ण जीवनच त्यांनी राष्ट्राला वाहिले. स्वातंत्र्यार्थ मरण्यासाठीच आपला जन्म झालेला आहे, अशी त्यांची भावना होती. प्रत्यक्षात ते त्याप्रमाणेच जगले. राष्ट्राच्या दुःखापुढे स्वतःच्या दुःखाचा त्यांनी कधीही विचार केला नाही. सावरकराचे म्हणणे होते की,[५४] "शांतता, सत्य, अहिंसा याच्या देवालयात पूजा करण्याचा मक्ता एकट्या गांधीजीसच मिळालेला नाही प्राणपणाने आम्हीही त्याच देवताची पूजा तितक्याच एकनिष्ठतेने करीत आलो आहोत" परंतु वास्तव जगाचे भान अधिक ठेवल्यामुळे त्या सद्गुणांना देशकालपात्राची कसोटी लावून त्यांना मानवविघातक होण्यापासून थांबवणे त्यांना अवश्य वाटले. अशी पूजा निर्विघ्नपणे करता येईल, अशी निसर्गाची रचना नाही, याची त्यांना जाणीव होती. अशी पूजा निर्विघ्नपणे कशी करता येईल याची सोय व व्यवस्था त्या पुजाऱ्याला करणे भाग होते, हे त्यांना पटलेले होते. राष्ट्राचे मंदिर यासाठी अपरिहार्य आहे, हे त्यांनी म्हणूनच ठरविले. या मंदिरापेक्षा मोठे असलेले मानवतेचे मंदिर प्राप्त परिस्थितीत कितीही वंदनीय असले तरी अव्यवहार्य आहे, असे त्यांना वाटले. उदात्तमूल्यांची पूजाही उध्वस्त करणारे राक्षस या जगात आहेत व ते जोवर आहेत तोवर त्या उदात्तमूल्यांसाठीच सामर्थ्याची उपासना केली पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता.

मूल्ये नि मूल्यांना जतन करणारी व्यवस्था यात सावरकर करत असलेला फरक लक्षात न घेतल्यामुळे डॉ. द. न. गोखले म्हणतात,[६६] "प्रेम, दया, न्याय इत्यादी भावना त्यांच्या हृदयात जाग्या होत्या; पण त्या भावनापेक्षा सामूहिक एकरुपता, स्वाभिमान, स्पर्धा या भावना त्यांना अधिक कार्य प्रवृत्त करीत डॉ. गोखले यांची ही मांडणी चुकीची आहे. प्रेम, दया, न्याय

इत्यादी मूल्यांसाठीच सामूहिक एकरुपता, स्वाभिमान व स्पर्धा या भावना अपरिहार्य आहेत, असे सावरकरांना वाटले, अशी ही मांडणी हवी होती. या दुसऱ्या भावना सावरकर अनीच्छेने व अपरिहार्य अनिष्ठ म्हणून स्वीकारतात, हे आपण समजून घेणार नाही काय? या बाबतीत प्रा. कुरुंदकरांची भूमिका आम्हाला अधिक उचित वाटते. प्रा. कुरुंदकर म्हणतात,[६७] "क्षमा आणि शांतता हीच उदात्तमूल्ये आहेत. आदरणीय आणि वंदनीय तीच असायला पाहिजेत. पण राष्ट्राच्या इतिहासात पराभवाच्या जळणाऱ्या स्मृती यांनाही महत्व असते. सुप्त ज्वालामुखीप्रमाणे आतल्या आत खदखदणारा जो वैराचा दीप्त लाव्हा असतो, त्यालाही महत्व असते. पराभवाच्या स्मृती जतन करुन शतकानुशतके जळणारी मने जर नसती तर पराभूत गुलाम राष्ट्रांच्या स्वातंत्र्य लढ्यांना अर्थच आला नसता. मानवी जीवन गुंतागुंतीचे आणि अनेक पातळीवरचे असते. मृत भूतकाळातच जे रमतात त्यांना पुढचा भविष्यकाळ घडविता येत नाही हेही खरे आहे; आणि मृत अितिहासातील जय गाथाचे अभिमान आणि पराभवाची शल्ये ज्या समूहमनात अस्तित्वात नसतात, त्यांना राष्ट्र म्हणून जगताही येत नाही हेही खरे आहे." सावरकरांची भूमिकाही राष्ट्र म्हणून जगण्यासाठी आवश्यक असणाऱ्या या भावना मान्य करण्यापुरतीच आहे, हे समजून घेतले पाहिजे.

देशाभिमानाची मर्यादा

आपल्यात सामर्थ्य असेल, तर अितर राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या राष्ट्राने लढण्यास सावरकरांची कधीच हरकत नव्हती. 'अिंग्रजासुद्धा अखिल मनुष्य मात्राचे कल्याण व्हावे म्हणून, मानुषकाचा परम विकास व्हावा म्हणून, आम्हास स्वतंत्रता हवी होती' [६८] ही सावरकरांची स्वतंत्रराष्ट्राची कल्पना आहे. देशाभिमानाच्या अतिरेक सावरकरांना कधीच मान्य नव्हता. देशाभिमानाची मर्यादा सांगताना सावरकर म्हणतात, " आपले जे न्याय्य अधिकार आहेत, ज्या अधिकारांच्या योगे अधिकात अधिक मनुष्याचे हित साधता येते, त्या राष्ट्रीय अधिकाराच्या रक्षणार्थ आणि विकासार्थ जो झटतो आणि झुंजतो तो देशाभिमान तेवढा सद्गुण होय. पण स्वदेशाच्या राक्षसी हावेला जो बळी पडून अन्य देशाच्या न्याय्य अस्तित्वादर व अधिकारावर अतिक्रमण करतो, दुसऱ्यास उपद्रव देतो, तो देशाभिमान हा आपल्या वैयक्तिक स्वार्थास्तव दुसऱ्याच्या घराकर निखारे ठेवणाऱ्या आततायी आगलावेपणा अितकाच अधर्म्य आणि दंडणीय होतो. राष्ट्र हे केव्हाही माणुषकांच्याच हितार्थ आहे, असले पाहिजे, हे तत्व आम्ही कंठशोष करुन सांगत असावे..... मनुष्यमात्र अेक आहे, आपला बंधु आहे. अितकेच नव्हे तर अिंग्लंडच्या न्याय्य स्वातंत्र्यास जर कोणी दुसरे आततायी राष्ट्र अन्यायी दंडेलीने तुडवू पाहील तर आम्ही अिंग्लंडच्या मुक्ततेस्तवही झटू, झुंजू." [७०] या पेक्षा अधिक उदात्त अशी कोणती भावना राष्ट्रवादाविषयी असू शकते ?

१९३२ मध्ये रचलेल्या त्यांच्या 'अंक भविष्याला ! भव्य भीषणाला' या कवितेत हाच व्यापक विचार मांडलेला आहे. "होअुनिया मुक्त स्वतः ! करील मुक्त ती जगता !! ममतेच्या समतेच्या ! सुजन रक्षणाला !! ७० तेव्हा सावरकरांचे सर्वोच्च ध्येय काय होते हे यावरुन स्पष्टच होते. काय सर्वोच्च, काय आदर्श यापेक्षा ते कसे येईल; जे येईल ते कसे टिकेल; याची चिंता प्रथम करणे त्यांना भाग वाटले. यासाठीच भौतिक सामर्थ्याची उपासना केली पाहिजे, अशी वस्तुनिष्ठ भूमिका त्यांनी घेतलेली आहे, हे समजून घेतले पाहिजे. आम्ही क्रांतिमार्ग का स्वीकारला याबद्दल सावरकरांनी म्हटले आहे. ७५ "निरंतरचे दयाममत्व साधण्यासाठी क्षणभराचा निष्ठुरपणा पत्करणे अवश्य आहे असे वाटू लागले; पण याप्रमाणे दंडाची प्रतिक्रिया दंडानेच करायला आम्ही सिद्ध झालो, तरी तेव्हाही आम्हाला मनापासून कोणत्याही स्वरुपाच्या अत्याचाराचा तिटकारा असे– आताही आहे. कारण परस्वापहरणासाठी योजलेले सामर्थ्य म्हणजेच अत्याचार. व्यक्तिशः किंवा राष्ट्र या नात्याने दुसऱ्याचे अपहरण करण्याची महत्त्वाकांक्षा स्वप्नात देखील मला कधी शिवली नाही" सावरकरांचे हे म्हणणे त्यांच्याबाबतीत अक्षरशः खरे आहे, हे आपण समजून घेतले पाहिजे. अत्याचाराच्या विरोधासाठीच सावरकर उभे होते व त्यासाठीच त्यांना सामर्थ्य हवे होते. ते पुढे म्हणतात, ७६ "अत्याचार या कल्पनेपासून मी अितका दूर असे की, जेव्हा समर्थसंघानी आपल्या दुबळ्या पण सत्पक्षाच्या शेजाऱ्या विरुद्ध त्याचा उपयोग केलेला मला जेथे जथे दिसला आणि जेव्हा जेव्हा दिसला तेथे तेथे आणि तेव्हा तेंव्हा त्याचा मी प्राणपणाने विरोध केला. गतकालातील महत्त्वाकांक्षी व्यक्तींनी– हिंदुस्थानच्या बाहेरच्या नाहीतर भारत वर्षातल्यासुद्धा– अवलंबलेल्या सर्वच अत्याचाराचा मी मनापासून तिटकारा करत आलो आहे." तेव्हा सावरकरांना हवे असणारे शस्त्र नि राष्ट्र हे अत्याचार करण्यासाठी नव्हते, हे लक्षात घेतले पाहिजे. शस्त्र आणि राष्ट्र याच्यापलिकडे सावरकरांना काहीही पाहता आले नाही, असा आरोप करणाऱ्यानी तरी सावरकरांना अधिक खोलात जावून समजून घेणे भाग आहे.

पं. नेहरुंची भूमिका

परिभाषेने नि तोंडाने कितीही उच्चतत्वाचे गुणगान चालू असले तरी प्रत्यक्षात सावरकर म्हणतात त्या धोरणाच्या पलिकडे कुण्याही राष्ट्राला, राष्ट्रनेत्याला जाता आले नाही, हे समजून घेतले पाहिजे. पं. नेहरुंना आपण लोकशाहीवादी, शांतिदूत व मानवतेची या जगात प्रस्थापना झाली पाहिजे, याविषयीचा आग्रह धरणारे होते, असे निर्विवादपणे मानतो. उच्चतत्वाची भाषा बोलत असतानाच पं. नेहरुंनाही व्यवहारात सावरकर म्हणतात त्याच मार्गावर यावे लागले आहे, असा अितिहास आहे. प्रा. कुरुंदकर आणि डॉ. न. गो. राजूरकर यांनी 'पं. नेहरु : एक मागोवा' हा जो ग्रंथ लिहिला आहे, तो नेहरुंच्या प्रत्येक गोष्टीचे समर्थन

करण्यासाठी त्यांच्या अनुयायांनी लिहिलेल्या ग्रंथासारखा आहे. या ग्रंथात लेखक म्हणतात, [५६] "पं. नेहरुंचे आकलन करताना सर्वांत मोठा अडथळा जर कोणता होत असेल तर त्यांचा राष्ट्रवाद समजून घेण्यात आपण अपुरे पडतो, हा आहे. पं. नेहरु हे आरंभापासून शेवटपर्यंत कडवे राष्ट्रवादी होते; आणि त्यांच्या मनात आपल्या देशाचे हितसंबंध यांना सर्वोच्च स्थान होते, हे आपल्याला लवकर लक्षात येत नाही. थोर मानवतावादी आणि आंतरराष्ट्रवादी अशी त्यांशी प्रतिमा आपल्या मनावर दीर्घ काल ठसलेली आहे, त्यामुळे आपण चुकीच्या ठिकाणावर भर देऊन विचार करु लागतो." अशी प्रतिमा का तयार झाली हे सांगताना, [५७] "एकेक प्रश्न उदात्त परिभाषेत गुंडाळून जनतेसमोर ठेवण्याची नेहरुंची पद्धत ही त्यांच्या विषयाच्या गैरसमजाला पुष्कळच हातभार लावणारी ठरली." याचा अर्थ राष्ट्रवादाच्या संदर्भात सावरकर व नेहरु यांच्यात जो फरक दिसतो तो भाषेचा होता, व्यक्त करण्याचा होता; मूलभूत वृत्तीचा नव्हताच! पं. नेहरु उदात्त परिभाषेत बोलत, सावरकर व्यवहार कठोर भाषेत बोलत, एवढेच खरे नाही. पं. नेहरु उदात्त परिभाषेत बोलत म्हणून सावरकर या परिभाषेतील औपचारिकपणा उघडून दाखविण्यासाठी रोखठोक भाषेत बोलत, हेही खरे आहे. देशाचे भवितव्य या उदात्त परिभाषा वापरणाऱ्या नेत्याच्या हाती आहे, ही गोष्ट सावरकरांना धोक्याची वाटत असे. पं. नेहरुंची ही उदात्त परिभाषा फक्त बोलण्यापुरती होती, असे असेल तर त्या बोलण्याबद्दल सावरकरांची कोणतीही तक्रार असण्याचे कारण नव्हते. या दोघांच्या परिभाषेमुळे आपण दोघांनाही समजून घ्यायला चुकलो आहोत, असे आपल्याला म्हणता येईल. राष्ट्रहिताला च नेहरु सर्वोच्च स्थान देत होते, ही गोष्ट सावरकरांचे धोरण योग्य होते हे ठरविणारी आहे. उदात्त तत्वे व मूल्ये वास्तवात आहेतच असा विश्वास ठेवत, आणि मग व्यवहारात ठेचा खात, अनुभव घेत, धडा शिकत नेहरु वास्तववादावर येतात, ही खरी वस्तुस्थिती आहे. सावरकर सुरवातीपासूनच वास्तवावर अढळ राहतात, हा दोघातील मुख्य फरक आहे. पं. नेहरुचा वैचारिक प्रवास आदर्श तत्वाकडून वास्तवाकडे तर सावरकरांचा वास्तवाकडून आदर्शाकडे होता नि राष्ट्रहिताच्या छेदबिंदूवर येवून दोघेही स्थिर होतात, हे समजून घेतले पाहिजे.

उदात्त परिभाषा

नेहरुंचे नैतिक विचारसुद्धा उपयुक्ततेवर कसे अवलंबून होते हे सांगताना लेखक म्हणतात, [५८] "नैतिक प्रश्नाला नेहरुंच्या समोर महत्व होते; पण निर्णायक महत्व ध्येयवादाला होते, व्यावहारिक उपयुक्ततावादाला होते." आणि हा मुद्दा नेहरुंच्या संदर्भात विविध उदाहरणांनी लेखक पटवून देतात. 'अहिंसा' या मूल्याचा विचार नेहरु उपयुक्ततेच्या कसोटीवर करत, ही गोष्ट ते पटवून देतात. 'हिंसात्मक आंदोलनाची व्यावहारिक उपयोगिता आणि शक्यता जर त्यांना पटली असली तर

तशा आंदोलनाला त्यांचा पाठिंबा मिळणे सहज शक्य होते" [५९] असा निष्कर्ष लेखकांनी काढला आहे. " भारतातील बहुसंख्यांक जनतेजवळ शस्त्रे नाहीत, शस्त्रे कशी वापरावीत याचे शिक्षण नाही, अशा अवस्थेत निःशस्त्र जनतेसाठी सशस्त्र लढ्याचा मार्ग आपण विचारातून सोडून दिला पाहिजे. भारतीय जनतेने सशस्त्र उठाव करण्याचा प्रयत्नही जरी केला तरी इंग्रज शासन हा प्रयत्न अतिशय थोड्या वेळात दडपून टाकू शकेल" या नेहरुंच्या विधानाचा ते आधार घेतात. अशी भूमिका असणाऱ्या नेहरुंमध्ये नि सावरकरांच्या अहिंसाविषयक विचारामध्ये फरक कोणता राहतो, हे कुणीतरी समजून दिले पाहिजे. सशस्त्र क्रांती अव्यवहार्य आहे, हा सावरकरांचा वादाचा मुलभूत मुद्दा नव्हता. हा मार्ग निषधार्ह आहे; हा एक मार्ग सुद्धा होवू शकत नाही असे गांधीजींना वाटे. मुलभूत वाद येथे होता. सशस्त्र क्रांतीने मिळालेले स्वातंत्र्यही मला नको असे गांधीजी म्हणतात, ही गोष्ट समजून घेतल्याशिवाय सावरकरांची अहिंसाविषयक भूमिका आपल्याला समजणार नाही. नेहरु आणि सावरकर यांचे अहिंसेबाबत सारखेच मत होते, ही चांगली गोष्ट आहे. नेहरुंबद्दल सावरकरांचा काही तरी गैरसमज झाला असावा, असे आपल्याला म्हणता येईल. हा गैरसमज होण्याला नेहरुंची उदात्त परिभाषाच कारणीभूत होती, असे स्पष्टीकरण आपल्याला देता येईल.

अशुद्ध साधनाशी तडजोड

उदात्तमूल्ये ही मार्गदर्शक असतात, ध्येय म्हणून ठीक असतात; पण व्यवहारात तडजोडी कराव्याच लागतात, असे नेहरुंनाही वाटत होते. हे लेखक म्हणतात,[६०] " त्यांना असे वाटते की, आपण परिपूर्ण मानवाच्या संदर्भात जे अंतिम विचार करतो, ते मार्गदर्शक आहेत. पण माणसे तितकी परिपूर्ण नाहीत; मग काय करायचे ? मन पुरेसे निर्भय व दृढ नसलेल्या, पूर्णपणे स्वार्थरहित न झालेल्या सर्वसामान्य अपूर्ण माणसाने करावे तरी काय ? अशा वेळी हिंसा हे साधन अशुद्ध आहे, असे म्हणून गप्प बसणे म्हणजे अनिष्ट तमाच्या समोर शरणागती देणे आणि स्वतःचा पराभव मान्य करणे. ही घटना मुळात नैतिकदृष्टचा समर्थनीय आहे, असे नेहरुंना वाटत नाही." सावरकर हीच गोष्ट सांगत होते ना ! सापेक्ष अहिंसा हा सद्गुण, आत्यंतिक अहिंसा हा दुर्गुण हे त्यांचे सूत्रच होते. " अन्यायाविरुद्ध कृती करायची तर काही प्रमाणात अशुद्ध साधनाशी तडजोड करणे भाग आहे. या तडजोडीचे काही दुष्परिणामही सहन केले पाहिजेत. या अपूर्ण जीवनात या तडजोडी असणारच, त्याला इलाज नाही." या नेहरुंच्या ' भारताचा शोध ' ग्रंथातील वचनाचा लेखक आधार घेतात व निष्कर्षाप्रत ते म्हणतात,[६०] " नेहरुंनी अशा प्रकारे शुद्ध साधनांचा आग्रह आणि हिंसक आंदोलनाची सशर्त स्वीकृती या बाबी, माणूस अपूर्ण आहे या मुद्द्यावर सुसंगत करुन घेतलेल्या दिसतात. अनेक प्रकारच्या विसंगती सुसंगत करुन घेण्यासाठी अपूर्ण

मानव हा आधार सोयीस्कर मानला पाहिजे." आमचे म्हणणे एवढेच आहे की, ही सोय नेहरुंप्रमाणेच सावरकरांकरिताही उपलब्ध असली पाहिजे. 'तडजोडी' 'विसंगतीतील सुसंगती' अशा 'मखमली' भाषेत नेहरुंप्रमाणे न बोलता, 'हा निसर्गाचा वा जगाचा न्यायच आहे,' अशा रोखठोक भाषेत सावरकर बोलत. एवढ्या भाषेच्या फरकाखातर, ही सोय सावरकरांना नाकारणे अन्यायाचे आहे.

नेहरुंची अहिंसा ही सापेक्ष होती, तर मग त्यांच्यावर सावरकर एवढी टीका का करत होते? याचे उत्तर नेहरुंची उदात्त परिभाषा सावरकरांना समजली नाही हे होते, असे आपण म्हणू शकू. जशी ती सावरकरांना समजली नाही, तशी सामान्यांनाही समजली नाही. आचार्य कृपलानी हे गांधी-नेहरुंच्या इतके जवळचे; पण त्यांनाही ही भाषा समजली नाही. गोव्याविषयी चर्चा चालू असताना लोकसभेत आचार्यांनी नेहरुंना विचारले की, 'भारतीय शासन अहिंसेला वचनबद्ध आहे काय?' याचे स्पष्ट उत्तर द्या. नेहरुंनी 'नाही' असे स्पष्ट उत्तर दिले. ते पुढे म्हणाले, "जगातील कोणतेही शासन अहिंसेला वचनबद्ध असू शकत नाही. ती कल्पनाही करणे चुकीचे आहे. जर शासन अहिंसेला वचनबद्ध असते तर मग फौजा ठेवण्याची गरज नव्हती"[६१] ही माहिती स्वत: लेखकांनीच आपल्या ग्रंथात दिली आहे. कृपलानींना असा साधा व सोपा प्रश्न का विचारावा वाटला व एवढे साधे व सोपे उत्तर लोकसभेतील अमूल्य वेळ खर्च करुन नेहरुंना का द्यावे लागले, हे विचार करण्यासारखे आहे. 'अहिंसा हा आमचा धर्म आहे.' अशी प्रतिमा गांधी-नेहरुंनी तयार केलेली होती, याचा हा परिणाम आहे. सावरकर नेहरुंवर टीका करत याचे कारण हे आहे. नेहरु हे असे आदर्शवादी नसून वास्तववादीच होते, हे पटवून सांगून त्यांची चुकीची प्रतिमा दुरुस्त करण्याचा प्रयत्न त्यांच्या चरित्रकारांना करावा लागत आहे, हे समजून घेतले पाहिजे. गांधीजींपासून सुरवात करुन नेहरु हे अहिंसेच्या बाबतीत सावरकरांच्या वास्तववादाकडे निघालेले आहेत, असा याचा अर्थ आहे. किंबहुना, गांधीजीच आपल्या मूळच्या आत्यंतिक अहिंसेपासून निघून सावरकरांच्या सापेक्ष अहिंसेकडे आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धात आलेले आपल्याला दिसून येतात. सावरकरांच्या शस्त्र व अहिंसाविषयक भूमिकेवर विकृत टीका करणाऱ्यांनी या साऱ्या गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजेत.

मखमली भाषा

प्रश्न केवळ अहिंसेपुरताच नाही. परोपकाराच्या प्रश्नाचाही नेहरु असाच व्यावहारिक विचार करत, असे या लेखकांचे म्हणणे आहे जगात स्वार्थी माणसे आहेत; जग परोपकारी नाही, हे नेहरुंनाही पटलेले होते. "दुर्दैवाने जग अतिमानवानी वसविलेले नाही. या जगात अपूर्ण, दुबळी आणि सदोष माणसे राहतात. त्यांना लोभ असतो, स्वार्थ असतो; त्याच्यातूनच त्यांच्या वर्तनाचे नियंत्रण होते. मानवाच्या प्रेरणा स्वार्थमूलक आहेत. परोपकार बुद्धीने सर्वकाळ वागण्याची प्रेरणा

अपूर्ण माणसाला अशक्य आहे." [६२] या नेहरुंच्या आत्मचरित्रातील वचनाचा ते आधार घेतात. जगाचे हे वास्तव चित्र जर आपण मान्य करणार असू तर सावरकरांना समजून घ्यायला अडचण पडणार नाही. जोपर्यंत जग हे असे आहे, तोपर्यंत एकट्या मला वा माझ्या राष्ट्राला उदात्ततत्त्वाचे प्रत्यक्ष आचरण करता येणार नाही, हेच सावरकरांच्या विचाराचे मध्यवर्ती सूत्र आहे. दुसरे महायुद्ध झाल्यावर जेव्हा मार्क्सवादी रशियानी साम्राज्यवादी जपानशी तह केला व जर्मनीबरोबर करार करुन पोलंडची वाटणी करुन घेतली, तेव्हा नेहरुंनी जगातील राष्ट्रे संधिसाधूपणा करतात असे म्हणायला सुरुवात केली. आदर्शवादाकडून कठोर वास्तववादाकडे हा प्रवास होता 'थोर मुत्सद्द्याला साजेल अशा तत्त्वज्ञानाच्या मखमली भाषेत ते बोलत होते. त्याच्या भाषणातला व्यावहारिक आशय जनतेपर्यंत पोंचूच शकत नव्हता.' असा निष्कर्ष नेहरुंबद्दल या लेखकांनी काढला आहे. सावरकरांनी अशा मखमली भाषेत आपले विचार मांडले नाहीत असा आरोप आपल्याला करता येईल, पण त्यांनी मांडलेला वास्तववाद आदर्शवादी असणाऱ्या नेहरुसारख्यानाही अखेरी स्वीकारावा लागलेला आहे, हे मात्र आपल्याला मान्य करावे लागेल.

सावरकर– नेहरु यांच्यात फरक हा आहे की, सावरकर वास्तववाद वास्तववाद म्हणून स्वीकारतात, नेहरु तो नाअिलाज म्हणून स्वीकारतात. नेहरुंना वास्तववाद 'सुसंगतीतील विसंगती' वाटली, सावरकरांना तो 'जगाचा न्याय' वाटला. नेहरु–गांधींना शस्त्र, सैन्य, युद्ध या गोष्टी 'सदोष अनिवार्यता' [६३] वाटली, सावरकरांना ते 'अपरिहार्य अनिष्ट' वाटले. गांधी–नेहरु आदर्शवादाकडून वास्तववादाकडे येत होते, तसे येणे त्यांना भाग पडत होते; सावरकर आरंभापासूनच वास्तववादावर अढळ होते, वास्तवाकडून आदर्शाकडे ते जावू पाहत होते. या साऱ्या थोर मंडळीचे विचार आपल्याला परस्पराच्या विरोधी भासतात, याचे कारण त्याचा वैचारिक प्रवास हा असा परस्पराच्या विरुद्ध दिशेने होता, हे आहे. अपरिहार्यपणे त्यामुळे त्यांच्या परिभाषेत फरक पडलेला आहे. या भाषेच्या आत या थोर पुरुषाचे असलेले विचार थंडपणे व पूर्वग्रहरहितपणे समजून घेणे आपले कर्तव्य आहे. एकमेकाच्या विरुद्ध दिशेने प्रवास करीत ही सारी मंडळी राष्ट्रवादाच्या छेदबिंदूवर येवून स्थिर होतात, हे आपण समजून घेतले पाहिजे. सावरकरांच्या राष्ट्रवादावर टीका करतांना नेहरुंच्याही राष्ट्रवादावर टीका करायला आपण तयार असले पाहिजे; व नेहरुंच्या आदर्श विचाराचा मागोवा घेताना सावरकरांच्याही तशाच आदर्श विचाराकडेही आपल्याला लक्ष देणे भाग आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. पं. नेहरु हे समाजवादी म्हणून उदात्त विचाराचे व सावरकर हिंदुत्वनिष्ठ म्हणून संकुचित विचाराचे अशी ढोबळ वर्गवारी सावरकरांवर अन्याय करणारी आहे. आध्यात्मिक भाषेत लो. टिळक व मखमली भाषेत पं. नेहरु कितीही उदात्त विचार मांडत असले तरी सावरकर मांडतात त्याच वास्तववादावर येवून तेही स्थिर होतात, हे समजून घेतले पाहिजे. ■■■



विभाग तिसरा

बुद्धिवाद विरोधी बाबी

प्रकरणे

१. अंधश्रद्धेशी तडजोडी

२. अध्यात्म

३. हिंदुत्व

१. अंधश्रद्धेशी तडजोडी

सावरकरांचा परलोकावर विश्वास नाही, देव, स्वर्ग, पुनर्जन्म इ. सर्व पारलौकिक बाबी या सध्यातरी भासमान म्हणजे खोट्याच आहेत, असे त्यांचे मत आहे. ही त्यांची भूमिका यापूर्वीच आपण पाहिलेली आहे. या अशा अस्तित्वात नसणाऱ्या पारलौकिक बाबीकडे उपयुक्ततेच्या दृष्टिकोणातून सावरकर कसे पाहतात, हे आता आपल्याला पाहायचे आहे.

अंधश्रद्धेचा उपयोग

सावरकरांचा पारलौकिक गोष्टीवर विश्वास नसला तरी सामान्य माणसाचा या गोष्टीवर विश्वास आहे, ही वस्तुस्थिती सावरकर मान्य करतात. पारलौकिक सुख असते; ते मिळविण्यासाठी काहीतरी धर्माचार केला पाहिजे; तो आपला धर्म आहे, यावर लोकांचा विश्वास असतो. ती वस्तुस्थिती सावरकरांना मान्य करणे भाग होते. मनुष्याची ही जी खरीखोटी श्रद्धा आहे, ती कमी वा नष्ट कशी करायची हा स्वतंत्र प्रश्न आहे. नष्ट करण्यासाठी का होईना पण ही वस्तुस्थिती मान्य करणे भागच असते. ही जी श्रद्धा आहे ती संपूर्णपणे सर्वच माणसांकरिता नष्ट होणारी नाही, हीही एक वस्तुस्थिती आहे. बुद्धिपलिकडे जावून, पुराव्याच्या पलिकडे जावून काही गोष्टीवर मनुष्य श्रद्धा ठेवत असतो, हा मनुष्याच्या स्वभावाचा एक भाग आहे. अनेक थोर बुद्धिवाद्यांनीही ही गोष्ट मान्य केलेली आहे. ही श्रद्धा किंवा अंधश्रद्धा कमी होत जाओल, पण पूर्णतः नष्ट होणारी नाही, ही वस्तुस्थिती लक्षात घेवूनच बुद्धिवाद्यांना आपली भूमिका ठरविणे भाग आहे. ही श्रद्धा कमी करत असतानाच, याच श्रद्धेचा मनुष्यहिताला कसा उपयोग करून

घेता येईल, याचा सावरकर विचार करतात. यापैकी कोणत्या श्रद्धेचा, किती मर्यादेपर्यंत व कोणत्या पद्धतीने उपयोग करुन घ्यायचा हा तारतम्याचा प्रश्न आहे. एकीकडे हचा गोष्टी खोट्या मानायच्या नि दुसरीकडे या खोट्याचा उपयोग करुन घ्यायचा, अशी जोखीम उपयुक्ततावाद्यांना स्वीकारावी लागते. त्यामुळे याबाबतीतील तारतम्य फार महत्वाचे ठरते. याबाबतीत सावरकरांचा दृष्टिकोण असा आहे की, अेकंदर मनुष्यहिताला जर अशा श्रद्धा हानिकारक नसतील व त्या श्रद्धा खऱ्या का खोट्या याचा निश्चित निर्णय अद्याप लागलेला नसेल, तर अशा श्रद्धेचा प्राप्त परिस्थितीतील कर्तव्य म्हणून, आपद्धर्म म्हणून, मनुष्यहितासाठी उपयोग करुन घेणे अनुचित नाही. सावरकरांनी आपल्या बुद्धिवादाला उपयुक्ततावादाची या बाबतीत अशी मर्यादा घातलेली आहे. या मर्यादेचे स्वरुप काय आहे, हे आपल्याला समजून घ्यायचे आहे.

पारलौकिक सुख ही एक मनाची कल्पना आहे, असे मानले तरी त्या कल्पनेतही मनुष्याला सुख वाटते, आनंद वाटतो व परिणामतः त्याची मनःशांती होते, ही एक वस्तुस्थिती आहे. हे सुख, हा आनंद, ही मनःशांती खरी का भासमान हा प्रश्न वेगळा आहे; पण या भासमानतेतही मन रमते, जीवनातील दुःखे क्षणभर तरी विसरतात, तात्पुरता का होअीना विरंगुळा वाटतो, जीवन सुसह्य वाटते, अैहिक कृत्य करण्याची प्रेरणाही मिळू शकते. ही गोष्ट बुद्धीवाद्यालाही वस्तुस्थिती म्हणून मान्य करणे भाग आहे. पं. नेहरुंनाही हे मान्य करणे भाग पडले आहे. नेहरु म्हणतात,[१] "Whether we believe in God or not, it is impossible not to believe in something whether we call it a creative life-giving force or vital energy inherent in matter which gives it it's capacity for self-movement and change and growth, or by some other name, something that is real, though elusive, as life is real when constrasted with death" लोकांची अशी जी श्रद्धा असते व पूर्णतः जी नष्ट होण्याची शक्यता नसते, यासंबंधी बुद्धिवाद्यांनी सुधारणा करतांना कोणते धोरण ठेवावे, हा सावरकरांसमोरचा प्रश्न होता. या श्रद्धेला मानवी हितासाठी कसे उपयोगाला आणता येईल, या भूमिकेतून सावरकर आपला विचार मांडतात. देवावर स्वतःचा विश्वास नसला तरी, लोकांच्या मनातील देवत्वाबद्दलच्या श्रद्धेचा मनुष्यहितासाठी ते उपयोग करुन घेतात. देव प्रसन्न होणे, पारलौकिक जीवन सुखी होणे, मोक्ष मिळणे अि. गोष्टीसाठी या अैहिक जीवनात मनुष्याने काय केले पाहिजे, याचे मार्गदर्शन करतात. अज्ञात असणाऱ्या व अपरिहार्यपणे आणखी काही काळ तरी अज्ञातच राहणाऱ्या गोष्टींना मनुष्याच्या हिताला जुंपण्याची सावरकरांची ही उपयुक्ततावादी दृष्टी आहे.

असत्य गोष्टी

पारलौकिक सुख मिळविण्यासाठी या ऐहिक जीवनात मनुष्यास काही गोष्टी करणे भाग वाटते. देवपूजा, प्रार्थना, व्रते, वैकल्ये, दान, नवस इ. गोष्टी केल्या पाहिजेत असे लोकांना वाटत असते. पारलौकिक लाभासाठी करावयाच्या या गोष्टीसंबंधी सावरकरांनी निश्चित असे धोरण आखून दिले आहे. 'व्रते आणि वैकल्ये' हा त्यांचा लेख या दृष्टीने अभ्यास करण्यासारखा आहे. ज्या गोष्टी विज्ञानाने संपूर्ण असत्य म्हणून सिद्ध झालेल्या आहेत, त्या गोष्टी असत्यच मानल्या पाहिजेत, असा सावरकरांचा पहिला आग्रह आहे. अशा असत्य गोष्टीची पूजा, प्रार्थना हे अधर्म्य आहे, असे ते म्हणतात. व्रते, उपासना, पूजा, प्रार्थना कशाची करायची नाही, यासंबंधी ते म्हणतात[२] "ज्या ज्या व्रतात किंवा उपासनेत सृष्टीच्या यथातथ्य स्वरूपाची विकृति गृहीत धरलेली असते, ती सर्व व्रते असत्याचीच उपासना होत असल्यामुळे अधर्म्य ठरतात. मनुष्यात सत्याचा प्रसार करण्याचे धर्मकृत्य या व्रतामुळे अडखळते आणि असत्याचा प्रचार करीत राहण्याचे पाप पदरी पडते." हे सूत्र घेवून ग्रहणे, संक्रात, सूर्यचंद्रपूजा या टाकावू आहेत, हे सांगताना सावरकर म्हणतात,[३] "ज्या व्रतातील देवता आणि वर्णने आजच्या विज्ञानाने साफ खोटी पडलेली आहेत; सृष्टिविज्ञानाच्या प्राचीन अज्ञानामुळेच ज्या घटनांना वा निर्जीव वस्तूंना सजीव देव समजत गेले, त्यांना प्रसादविण्या-साठीच जी व्रते प्रचवलेली गेली ती सर्व व्रते टाकावू मानली जावीत. मनुष्याच्या आजच्या वैज्ञानिक सिद्धांताच्या प्रसाराने जनतेस अधिक डोळस करण्याचे सोडून ही व्रते तिला अंधळीच्या अंधळी राहू देतात. बुद्धीचा विकास खुंटवितात. अशी व्रते असत्याची पूजा होत. निव्वळ मिथ्याचार होत. या वर्गाचे उदाहरण हवे असेल तर आकाशस्थ जोतिर्गोलविषयक ग्रहणे, संक्रांत, सूर्यचंद्रपूजा, प्रभृतिप्रीत्यर्थ आचरले जाणारे आमचे धर्मविधि पहा."

ज्याची पूजा, उपासना किंवा प्रार्थना करायची त्या गोष्टी असत्य म्हणून विज्ञानाने सिद्ध झालेल्या नसल्या पाहिजेत, हे सावरकरांचे पहिले सूत्र आहे. जोतिर्गोलाविषयीची मनुष्याची भावना हे एक उदाहरण झाले. कोणतेही ग्रह, तारे या निर्जीव वस्तू असून त्यांच्या संबंधीचे कितीतरी ज्ञान विज्ञानामुळे मनुष्यास आज झाले आहे. हे सर्व सत्यज्ञान जमेस धरुन या निर्जीव वस्तूकडे मनुष्याने पाहिले पाहिजे, असा सावरकरांचा बुद्धिवादी दंडक आहे. या वस्तू पूजा-प्रार्थनेने संतोषत नाहीत, हे वैज्ञानिक सत्य आहे. या वस्तूचे गुणधर्म, त्यांचे परस्परसंबंध, मानवावर त्याचा होणारा परिणाम, हे काहीही अशा पूजा-प्रार्थनेने वा मनुष्याच्या इच्छेने बदलत नसतात. तेव्हा जे घडणेच शक्य नाही; शक्य नाही हे सिद्ध झालेले आहे, त्या गोष्टीसंबंधी मनुष्याने काही एक व्रत करणे अधर्म्य आहे, पाप आहे, मिथ्याचार आहे, असे सावरकरांचे स्पष्ट मत आहे.

असत्य गोष्टीची पूजा होता कामा नये, या सिद्धांताच्या स्पष्टीकरणासाठी

सावरकरांनी काही निवडक उदाहरणे दिलेली आहेत. या पूजेच्या वेडगळ समजुतीवर सावरकर कठोर प्रहार करतात. ग्रहणाची सत्य कारणे ज्ञात नव्हती, तेव्हा त्या विषयी निर्माण झालेल्या अडाणी समजुती आता टाकून द्यायला सांगतात. पूजा–प्रार्थनेने किंवा 'दे दान सुटे गिऱ्हाण' म्हणून ओरडल्याने त्याचा ग्रहणावर परिणाम होत नसतो, हे वैज्ञानिक सत्य दुर्लक्षून त्याच धर्मविधी चालू ठेवणे अधर्म्य आहे, असे त्यांना वाटते. संक्रातीवद्दलच्या मनुष्याच्या समजुतीविषयीची अशीच भूमिका ते घेतात. सावरकर म्हणतात [४] "ज्योतिर्गोलाच्या गतिस्थितीचे परिणाम गणिताच्या उत्तरासारखी सुनिश्चित सृष्टिक्रमाची फलिते होत. ती माझ्या खेडचातल्या कोणा शामभटाला मी जेवायला बोलाविले वा न बोलाविले तरी घटणार कशी ? वाढणार कशी ? चार पंचे वीस हे उत्तर जसे मी चाराला वा पांचाला संतोषवण्यासाठी गंध वाहिले; तीळ वाहिले; गाडगे दान दिली, तरी विसाचे दहा होणे नाही; तीस होणे नाही; तर ठाम वीसचे वीस राहणार आहे; तशीच मकर संक्रमण प्रभृति ज्योतिर्गोलाच्या स्थितीगतीची फले."

शनिमहात्म्यासंबंधी सावरकर म्हणतात, [५] "कसला शनि नि कसले महात्म्य ! अहो, या ब्रह्मांडाच्या विस्तीर्ण म्युनिसिपालिटीने आकाश प्रांगणात, सृष्टिनियमानुसार लावलेले हे सारे कंदिल आहेत. या कंदिलात ठराविक तेजाचे घासतेल घातलेले आहे, तोवर तुम्ही त्यास लाखो शिव्या देत राहिलेत तरी ते जळण्यावाचून राहणार नाहीत ते घासतेल संपले की, तुम्ही कितीही काकुलतीने प्रार्थिले तरी विझल्यावाचून राहणार नाहीत." या संबंधीच्या मनुष्याच्या वेडचा श्रद्धेचे विडंबन करण्यासाठी सावरकर शनिमहात्म्याच्या धर्तीवर कंदिलमहात्म्यही श्लोकात रचून दाखवतात. प्रत्यक्ष कंदिलाला देव मानून त्याची प्रार्थना करणे वेडपट आहे, असे अत्यंत उपहासगर्भपणे सावरकर दाखवून देतात. अशी पूजा–प्रार्थना करायला लावणे काही अंशी लुच्चेगिरीही आहे, हे सांगताना सावरकर म्हणतात [६] "पूर्वी अज्ञानाच्या अंधेरात दोरी साप भासली म्हणून त्यामुळे ती भीति वाटली ती साहजिक म्हणता येईल; पण आज ती साप नसून दोरीच आहे, हे विज्ञानाच्या उजेडात स्पष्ट झाले असताना सुद्धा तो साप आहे म्हणून लोकास थापा मारीत सुटणे, भिवविणे, नि काठचा घेवून तीकर मारीत बसण्याचा वा तिला दूध पाजण्याचा देखावा करणे, हा मात्र काही निव्वळ वेडगळपणा नि काही अंशी लुच्चेगिरी होणारी आहे." तात्पर्य, असत्य गोष्टी असत्यच मानल्या पाहिजेत; असत्याची पूजा करता कामा नये; ते अधर्म्य आहे, पाप आहे, त्यामुळे सत्य शोधण्याची बुद्धी भ्रष्ट होते, आंधळी होते, असे हे पारलौकिकासंबंधीचे पहिले सूत्र सावरकरांनी निःसंदिग्ध अशा भाषेत मांडले आहे. हे निःसंशयपणे बुद्धिवादी आहे.

अज्ञात गोष्टी

ज्या गोष्टी पूर्णतः असत्य म्हणून अद्याप सिद्ध झालेल्या नाहीत, त्याविषयीची

सावरकरांची भूमिका थोडी वेगळी आहे. देव आहे काय, हा प्रश्न अद्याप अनिर्णित आहे. विज्ञानाने देव नाही हे सिद्ध केलेले नाही, असे समजून देव वा पारलौकिक कल्पनेचा विचार सावरकर करतात. ग्रहणे कशी लागतात हे जसे विज्ञानाने पटवून सांगता येते, तसे देव आहे वा नाही हे सांगता येत नाही, ही खऱ्या बुद्धिवाद्यासमोरील एक अडचण असते. आज सिद्ध न झालेल्या गोष्टी अस्तित्वात नाहीतच, अशी भूमिका सावरकर घेत नाहीत, ही लक्षात घेण्यासारखी गोष्ट आहे. आजच्या पुरते ते अज्ञात आहे, असे त्यांचे म्हणणे आहे. सध्याच्या विज्ञानाच्या शोधात देवाच्या अस्तित्वाचा समावेश नाही, एवढाच याचा अर्थ आहे. विज्ञानाच्या शोधाचा तो विषय होवू नये, हे सावरकरांच्या बुद्धिवादाला मान्य नाही. नेहरुंसुद्धा देव नाहीच असे म्हणत नाहीत. बुद्धीपलिकडची ती गोष्ट असून अशा काही गोष्टींवर थोडीशी श्रद्धा असावीच लागते, हे नेहरुंही मान्य करतात.[७] अीशस्वरुप आमच्या सांप्रतच्या ज्ञानेंद्रियास अगम्य आहे, असे आगरकरसुद्धा म्हणतात. देवाच्या अस्तित्वाबद्दल आस्ती वा नास्तिपक्षी काहीही निर्णय सध्याच्या ज्ञानानुसार देता येत नाही, हे सावरकरांचे मत यापूर्वी आपण पाहिलेच आहे.[८] तेव्हा देव ही गोष्ट असत्याच्या वर्गातील नसून अज्ञाताच्या वर्गातील आहे, अशी त्यांची भूमिका आहे.

देव शब्दाचा वापर

त्यांच्या भूमिकेतून परमेश्वर ही एक मनाची कल्पना आहे, केवळ हृदयाची श्रद्धा आहे. जेव्हा केव्हा सावरकरांना वा परमेश्वराविषयी बोलायचे असते तेव्हा 'जर परमेश्वर असेल तर' 'जर परमेश्वराबर श्रद्धा असेल तर' 'जर परमेश्वर मनुष्यावर प्रसन्न होत असेल तर' अशा प्रकारच्या जर-तरच्या भाषेत ते बहुधा बोलत असतात. त्यांचा हा जर-तर जर नीट लक्षात घेतला नाही, तर सावरकरांची देवावर श्रद्धाच आहे असा आपला गैरसमज होण्याची शक्यता असते. परमेश्वराविषयी सावरकर अयस्थपणे विचार करतात. देवाविषयी असलेली लोकांची श्रद्धा त्यांच्याच हिताला कशी उपयुक्त करता येईल, याची ते चिंता करतात. देवाच्या स्वरुपाच्या, त्याच्या अस्तित्वाच्या तत्वचर्चेत त्यांना रस नाही. वा देवाचा मनुष्याच्या हिताहिताशी काय संबंध आहे, हा त्यांच्या चिंतेचा विषय आहे. या देवावरील जितकी श्रद्धा मनुष्याच्या हिताला हानिकारक होते, त्या श्रद्धेला देवभोळेपणा हे नाव देवून त्याबर सावरकर बुद्धिवादाचे घणाघाती प्रहार करतात. देवभोळेपणावर प्रहार करण्याचा हेतू खऱ्या देवाचे स्वरुप व अशा देवावरील श्रद्धा याचे सत्यदर्शन घडविणे हा नसतो. हे प्रहार केवळ भोळेपणावर नसतात, तर तुम्ही-आम्ही मानतो त्या देवावरही असतात. हे प्रहार इतके खोलवर असतात की, या प्रहारातून वाचलेला देव आपल्याला सापडतच नाही. देव या कल्पनेबद्दल सावरकर कुठेही तत्वचर्चा करत नाहीत. देव हा शब्द ते जेव्हा वापरतात तेव्हा त्याचा अर्थ काही वेळा 'योगायोग' असा असतो. काही वेळेला ते 'निसर्गा'लाच देव म्हणतात.[९]

काही वेळेला ते देवाला उदात्त मूल्याचे प्रतिक मानतात. विषयाच्या अनुषंगाने देवाविषयीची ते आपली भूमिका मांडतात. समाजातील ९९ टक्के लोकांची बुद्धिवादाला मान्य नसणाऱ्या देवावर श्रद्धा असते, ही वस्तुस्थिती सावरकर लक्षात घेतात. कितीही प्रयत्न केला तरी ही श्रद्धा पूर्णत: नष्ट करता येण्याची शक्यता नाही, ही गोष्ट त्यांनी लक्षात घेतलेली होती. या श्रद्धेतील हानिकारकपणा नष्ट करत असतानाच, हानिकारक नसणाऱ्या उरलेल्या श्रद्धेचा मनुष्यहिताला कसा उपयोग करुन घेता येईल, या दृष्टिकोणातून ते सारा विचार करतात. त्यांची ही भूमिका काळजीपूर्वक समजून घेतली पाहिजे.

दिव्यत्वाचा बोधक

गाईला देवता मानण्याच्या अनुरोधाने सावरकर म्हणतात,[१०] "पण जसे गाईला आम्ही गायच म्हणतो तसे देवाला देव म्हणतो. प्रभुत्वाचा, पावित्र्याचा, पूज्यनियतेचा परमोच्च आदर्श म्हणजे देव. अशा दिव्यत्वाचा बोधक म्हणून देव शब्द आपण राखून ठेवला आहे." त्यांच्या मते देव हे आदर्श, दिव्य, उदात्त, पवित्र, मंगल अशा संकल्पनेचे एक गुणवाचक नाव आहे. मानवी मनाला जे जे भव्य, दिव्य, उदात्त, पवित्र, मंगल वा सद्गुणी वाटते ते ते सर्व या संकल्पनेत सावरकर अंतर्भूत करतात. म्हणजे सर्व चांगल्या व उदात्त गोष्टींना दिलेले देव हे एक नाव आहे. हीच गोष्ट दुसऱ्या एका लेखात मांडताना सावरकर म्हणतात," "देव कोटी ही मनुष्य कोटीहून उच्चतर अशा वास्तव वा कल्पित भावजातीची असते; मनुष्याहून सद्गुणाचा, सच्छक्तीचा विकास, सद्भावाचा विकास ज्यात अेकंदरित प्रकर्षलेला असतो तो देव वा देवता; परंतु पशु ही मनुष्याहून हीन तर कोटी. अतिमानुष ती देवता, देव; अपमानुष तो पशु, कीट." तर सावरकरांच्या मते देव ही कोणती शक्ती नव्हे, तर उदात्त मूल्यांच्या समुच्चयाला दिलेले ते एक मूल्यवाचक नाव आहे. अशा उदात्त मूल्यांना देव हेच नाव द्यावे, असा त्यांचा आग्रह नाही. ज्यांना कुणाला देव हा शब्द वापरायचा असेल किंवा सावरकर लोकांबरोबर बोलताना वापरत असतील, तर तो शब्द याच अर्थी घेतला जावा, एवढाच सावरकरांचा आग्रह आहे. देवाविषयी तत्वचर्चा करताना सावरकर हे सांगत नसून, गाईच्या निमित्ताने जाता जाता आपली भूमिका मांडत आहेत, हे लक्षात घेतले पाहिजे.

प्रतिकाची निवड

वरील प्रमाणे दिव्यत्वाचा किंवा उदात्ततेचा परमोच्च आदर्श किंवा बोधक या अर्थी देव ही कल्पना मानल्यावर, त्या कल्पनेला मूर्त स्वरुप देण्यासाठी एखाद्या प्रतिकाची योजना मनुष्य करत असतो. देवाचे असे प्रतिक कोणते असावे, याचा विचार देवभक्तासाठी बुद्धिवादी सावरकर करतात. प्राणी, वनस्पती किंवा अितर कोणतीही निर्जीव वस्तू प्रतिकासाठी वापरली जावू शकते. या पैकी कोणते

प्रतिक बुद्धिवादादाला अधिक जवळचे आहे, याचा सावरकर विचार करतात. यावेळेस त्यांचा बुद्धिवाद विरुद्ध उपयुक्ततावाद याचा कोणत्या तारम्याने सावरकर हे प्रतिक निवडताना विचार करतात, हे समजून घेणे महत्वाचे आहे.

प्रतिक निवडण्याच्या कसोटीवद्दल सावरकर म्हणतात, [१२] "मनुष्याहून सर्व गुणात अत्युच्च असलेल्या प्रतिकासच मनुष्याच्या देवाचे प्रतिक मानणे अुचित." त्यांच्यामते मनुष्याचा देव वेगळा, विश्वाचा वेगळा, गाईचा वेगळा व गाढवाचाही वेगळाच असतो. एकदा उदात्तमूल्याच्या समुच्चयास देव म्हटले की, पशू आणि माणूस याचा देव भिन्न असणे भाग असते. प्राणी आणि निर्जीव वस्तू यांचाही देव भिन्न होतो. मनुष्यातही वेगवेगळ्या मनुष्यसमूहाचा वेगवेगळा देव असतो, अशी सावरकरांची भूमिका आहे. म्हणूनच वाटमाऱ्याचाही व ढगाचाही देव असतो, असे ते म्हणतात. [१३] आपापल्या कल्पनेप्रमाणे, विचाराप्रमाणे व आदर्शाप्रमाणे प्रत्येकाने आपापला देव निर्माण केलेला असतो, असा याचा अर्थ आहे. सावरकरही अशीच एक आदर्श कल्पना मांडून त्याला देव नाव देतात. अशा देवाचे प्रतिकही मनुष्यापेक्षा उच्चतर पाहिजे, असा आग्रह धरतात. मनुष्याच्या प्राचीनकाळी त्यावेळेसच्या सृष्टिज्ञानाप्रमाणे देवाची प्रतीके मनुष्यानी ठरविली. जसजसे सृष्टीचे ज्ञान वाढत गेले तसतसे ही देवाची प्रतिकेही बदलत गेलेली आहेत. सावरकर म्हणतात, [१४] "पण लिंगपूजा, पशुपूजा, वृक्षपूजा प्रभृति 'धर्म' ही धर्माची तामस नि अपकृष्ट स्वरुपे आहेत. जेव्हा या धर्माहून उच्चतर नि सत्यतर धर्म मनुष्याच्या रानटी नि प्राथमिक अवस्थेत कळलेलाच नव्हता, तेव्हा त्या सृष्टपदार्थाची पूजा हास्यास्पद वाटत नसे. पण मनुष्याचे सृष्टपदार्थ विज्ञान जसे वाढत गेले, तसे देवाची नि देवताची प्रतीकेही अधिक प्रकृष्ट नि तात्विक बनत गेली. काही झाले तरी मनुष्याने त्याची देवता म्हणून पूजा करावयाची ते सत्व, ते प्रतीक, मनुष्याहून मानवी गुणात तरी सर्वतोपरी श्रेष्ठ असावयास पाहिजे." प्रखर बुद्धिवादी माणसाने देवाचा, त्याच्या प्रतिकाचा एवढा विचार करण्याची गरज काय, एवढा एक सोडला तर, अन्य कोणताही आक्षेप सावरकरांच्या या वरील भूमिकेवर कोणत्याही खऱ्या बुद्धिवाद्याला घेता येणार नाही, असे आम्हास वाटते.

सत्यतर–उच्चतर

'गाय : एक उपयुक्त पशु' ह्या लोकांना बुद्धिवाद शिकविण्यासाठी गोपूजा हे निवडक उदाहरण घेवून लिहिलेल्या लेखात सावरकरांनी वरील विचार मांडले आहेत, हे लक्षात घेतले म्हणजे सावरकरांचा हे विचार मांडण्याचा हेतू आपल्या लक्षात येईल. बुद्धिवादाच्या प्रसारासाठी सावरकर हे विचार मांडत आहेत, हे लगेच आपल्या लक्षात येते. लिंगपूजा, पशुपूजा, वृक्षपूजा अि. ज्या 'धर्माची' तामस व अपकृष्ट रुपे आहेत असे सावरकर वर म्हणतात, तो त्यांना हवा असणारा 'धर्म' कोणता असावा, हे यावरुनच आपल्याला स्पष्टपणे समजून येते. हा बुद्धि-

वादी धर्म आहे हे उघड आहे. हा धर्म 'सत्यतर' आहे, असे तेच म्हणतात. सृष्टीचे सत्यतर ज्ञान होत जाणारा धर्म बुद्धीचा असतो– तो विज्ञानधर्म असतो. त्यांना येथे अभिप्रेत असणारा हा धर्म आहे. मानवी गुणात हा धर्म उच्चतर आहे, असेही ते म्हणतात. याचा अर्थ हा त्यांना अभिप्रेत असणारा धर्म 'मानवधर्म' आहे. उच्चतर मानवधर्माच्या नि सत्यतर विज्ञान धर्माच्या तुलनेत लिंगपूजा, पशुपूजा या तामस आहेत, हीनतर आहेत, असेच सावरकर म्हणत आहेत. सावरकरांची ही भूमिकाही विकृत स्वरुपात मांडण्याचा काही बुद्धिवादी लोक प्रयत्न करतात. डॉ. य. दि. फडके हे एक असे बुद्धिवादी विद्वान आहेत की, सावरकर हे कसे बुद्धिवादी नाहीत, त्यांचा बुद्धिवाद कसा नकली आहे, हे लोकांना सांगण्यात त्यांना विलक्षण आनंद वाटतो. सावरकरांना गोपूजा का नको होती, याचे कारण सांगताना ते म्हणतात,[१५] "असे परखड शब्दात सावरकर म्हणाले खरे; पण त्याचे कारण लिंगपूजा, पशुपूजा, वृक्षपूजा, प्रभृतीधर्म ही धर्माची तामस नि अपकृष्ट स्वरुपे आहेत म्हणून! हिंदुराष्ट्रवाद हा सावरकरांचा धर्म होता." सावरकरांच्या हिंदुराष्ट्रवादामुळे त्यांच्या बुद्धिवादाकडे पाहण्याची आमची दृष्टी कशी पूर्वग्रहदूषित व आंधळी झालेली आहे, याचे हे एक स्पष्ट उदाहरण आहे. गायीबद्दलच्या संबंधित लेखात सावरकर बुद्धिवाद मांडतात– हिंदुराष्ट्रवाद मांडत नाहीत, ही गोष्ट डॉ. फडके लक्षात घ्यायला तयार नाहीत. हिंदुत्वाला विरोध असणाऱ्या कित्येक पुरोगामी मंडळींनी सावरकरांच्या या गायीच्या लेखातील बुद्धिवादाचे निकोप मनानी स्वागत केले. डॉ. फडके यांना हे पसंत नाही. या खूष होणाऱ्या मंडळीचे अज्ञान ते 'बेहद्द खूष' झाले, या उपहासगर्भ शब्दप्रयोगाने डॉ. फडके व्यक्त करतात. समजून-उमजून सावरकरांची एक विकृत प्रतिमा उभी करण्याचा डॉ. फडके यांचा निर्धार असल्यामुळे, त्यांना याबाबतीत समजून सांगण्यात काही अर्थ आहे, असे आम्हास वाटत नाही.

हा मनुष्याचा अपमान

आपल्याहून हीनतर गोष्टीस देवाचे प्रतिक मानणे सावरकरांना मनुष्याचा अपमान वाटतो. सावरकर म्हणतात, [१६] "मनुष्याचा देव हा मनुष्याहून हीनतर असेल, तर त्या देवानेच भक्ताची पूजा करणे उचित ठरेल!" हीच कसोटी लावून गाढवाने देव समजून गाईची पूजा करावी, पण गाईची पूजा करण्याचा गाढवपणा मनुष्यानी करु नये, असे अगदी परखडपणे सावरकर म्हणतात. याच न्यायाने भंग्याच्या मैलागाडीचा बैल हा धार्मिक निरुद्योगी नंदीबैलाचा देव होवू शकतो असे त्यांनी म्हटले आहे.[१७]

अद्वैताच्या तत्वज्ञानाचा किंवा मायावादाचा सावरकरांच्या या भूमिकेवर काहीही परिणाम होत नाही. ब्रह्मसृष्टीत पशु व मनुष्य हे सारखेच असले तरी, पारलौकिक लाभासाठी जी कृती करायची आहे, ती या मायासृष्टीतील आहे,

त्यामुळे प्रतिकाची निवड करताना मायासृष्टीतील गोष्टीचाच विचार केला पाहिजे, असे ते म्हणतात. ब्रम्हसृष्टीमध्ये गाय व गाढव हे सारखेच असल्यामुळे गाईच्या अैवजी गाढवाची पूजा केल्याने ब्रह्मसृष्टीच्या दृष्टीने काहीही परिणाम होत नाही, म्हणून गोपूजेअैवजी गाढवपूजा करणार काय, असा त्यांचा सवाल आहे. यास्तव कोणत्याही पशूला मनुष्याच्या देवाचे प्रतिक मानता येत नाही, असा सावरकरांचा निःसंदिग्ध बुद्धिवादी निष्कर्ष आहे.

मूर्तिपूजा

जी गोष्ट पशूची तीच वनस्पती किंवा निर्जीव वस्तूची आहे. यापैकी कोणतेही मनुष्यापेक्षा उच्चतर कोटीतील नाही, हे अगदी स्पष्ट आहे. दगडाला देवाचे प्रतिक मानण्याची कल्पना याच कसोटीचे त्याज्य ठरते. भोळ्याभाबड्या लोकांना देवाचे प्रतिक तर पाहिजे आहे; आणि मनुष्यापेक्षा देव सोडून कुणीही उच्चतर नसल्यामुळे, विश्वातील कोणतीही वस्तू नैसर्गिक स्वरुपात मनुष्याच्या देवाचे प्रतिक होवू शकणार नाही, अशी सावरकरांसमोरील अडचण आहे. यातून त्यांनी व्यावहारिक तडजोड काढलेली आहे. आपल्या आजी–वडिलांचे किंवा थोर अैतिहासिक पुरुषांचे छायाचित्र, जसे आपण त्यांच्या हयातीनंतरही, त्यांचे मूर्तिमंत प्रतिक म्हणून मानतो, त्यालाही पूजतो, वंदन करतो; त्याप्रमाणेच देवाची कल्पमूर्ती तयार करण्याची कल्पना सावरकरांना मान्य झालेली आहे. देवाचे प्रतिक म्हणून एखादी प्रतिकृती बनविण्याची कल्पना सावरकर तडजोड म्हणून स्वीकारायला तयार आहेत. यालाच आपण व्यवहारात मूर्तिपूजा म्हणतो. या मूर्तिपूजेकडे सावरकर उपयुक्ततेच्या दृष्टीने पाहतात. समाजसुधारणा करण्यासाठी सावरकरांना ही मूर्तिपूजा उपयुक्त वाटलेली आहे. ज्या वस्तूची मूर्ती बनलेली आहे, तो दगड या मूर्तिपूजेत गौण असून, त्या मूर्तीनी ज्याचा आकार घेतला आहे तो देव, त्या प्रतिकात प्रतिबिंबित होत असतो, अशी सावरकरांची भूमिका आहे, सावरकरांची मूर्तिपूजाविषयक भूमिका आपण निर्लेपमनाने समजून घेणे फार महत्वाचे आहे.

बुद्धिवादी सावरकर पतितपावन मंदिरात मूर्तिस्थापना करण्यात पुढाकार घेतात; गणेशोत्सवात गणेशाची मूर्ती बसविणे त्यांना मान्यच होते. मूर्तिपूजेचा निषेध करत नि शिव्या देत असलेले सावरकर आपल्याला दिसणार नाहीत. या मूर्तिपूजेला सांभाळून घेत असलेलेच सावरकर आपल्याला दिसतात. त्यांच्या अस्पृश्यता निवारणाच्या कार्यक्रमात सत्यनारायणाच्या कार्यक्रमाचा समावेश होता. सत्यनारायणाचे खिडंवन करणारे सावरकर सत्यनारायण का करतात, बुद्धिवादी सावरकर गणेशमूर्तीला का मानतात, मूर्तिपूजा न करणारे सावरकर पतितपावन मंदिर का बांधतात– या अशा परस्पर विसंगत वाटणाऱ्या प्रश्नांची उत्तरे एक–एक प्रश्न बाजूला घेवून देत बसणे शक्य नसते. सावरकरांच्या एका विशिष्ट धोरणाचा तो एक परिणाम आहे, या भूमिकेतून ते धोरण वा सूत्र आपण

प्रथमत: समजून घेतले पाहिजे. सावरकरांच्या या विसंगत वागण्यावर त्यांच्या काळापासूनच आक्षेप घेतले गेलेले आहेत. सावरकरांना ढोंगी म्हणण्यासही लोकांनी कमी केलेले नव्हते. गणपतीच्या मूर्तीला बुद्धिवादी सावरकर कसे मानतात या त्यावेळेसच्या एका आक्षेपाला उत्तर देण्यासाठी, त्यांनी 'किर्लोस्कर' मासिकात (१९३५) मूर्तिपूजेवर एक खास लेख लिहिला होता. बाळाराव सावरकरांनी 'स्फुट लेख'[१८] या भागात हा लेख प्रसिद्ध केलेला आहे. सावरकरांच्या बुद्धिवादाचा अभ्यास करण्यासाठी हा लेख मुळातूनच वाचणे भाग आहे, असे आमचे म्हणणे आहे. सावरकरांवरील या संबंधीच्या कित्येक आक्षेपांना या लेखातच उत्तरे मिळतात. आपल्यालाही मूर्तिपूजेकडे पाहण्याची एक नवी दृष्टी येवून जाते. यास्तव या लेखातील मुख्य भाग थोडक्या विस्ताराने आम्ही पुढे देत आहेत.

बौद्धिक मूर्तिपूजा

सावरकर म्हणतात, " जशी एक धार्मिक मूर्तिपूजा आहे, तशीच एक बौद्धिक मूर्तीपूजाही आहे, आणि ती बुद्धिवादाच्या कसोटीस पूर्णपणे उतरते. कोणतेही अमूर्त तत्व, भाव व भावना आकारविणारे चित्रशिल्प वा मूर्तिशिल्प हे काही बुद्धिवादी निषेधित नाहीत... मुसलमानांचे हे (मूर्तिभंजकता) धर्मवेड असेल, तर मूर्तीलाच मूर्खपणा नि चित्राला विचित्रपणा म्हणणारा अज्ञानी बुद्धिवाद हेही एक बुद्धिवेडच नव्हे काय ? शिवाजी महाराजाचा पुतळा उभारुन, त्या विभूतीविषयी आपला आदर त्याला फुले घालून, नमस्कारुन वेळी धूपदीपाही पुजूनही व्यक्तविणे ही हृदयाची एक अत्यंत मंगल नि उदार प्रवृत्ती आहे. ती सर्वस्वी अनिंद्यच नव्हे, तर उत्तेजनार्ह आहे. कारण मनुष्यातील उदात्त मनोभावास ती पोषक नि सद्गुणास उत्तेजक असते. म्हणूनच मनुष्यहित साधक अतएव उपयुक्त असते. "

रशिया बुद्धिवादाचा अर्क

बुद्धिवाद्याने मूर्तिपूजा केव्हा निषेधावी, हे सांगताना विभूतिपूजेशी तुलना करुन सावरकर म्हणतात, "...परंतु जेव्हा त्या विभूतीपूजेतील भावना भाबडेपणाची सीमा गाठू लागते; तो पुतळाच शिवाजी महाराज समजून, सजीव समजून त्यास नवस करु लागते; नैवद्य सूक्ष्मरुपाने तो पुतळाच खातो, फुले हुंगतो, पूजेने प्रसादून धनधान्य देतो, नाहीतर गावात रोगावून रोग आणतो, असे मानू लागली म्हणजे काय ते बुद्धिवादी अशा अर्थाच्या मूर्तिपूजेस बुद्धिघातक, धर्मवेडी, अहितकारक अतएव अनुपयुक्त म्हणून निषेधू लागतो. आजचा बोल्शेव्हिक रशिया तर Rationalism चा बुद्धिवादाचा अर्क; पण रशियन बोल्शेव्हिक लाखालाखानी त्यांच्या राजधानीतील लेनिनच्या प्रचंड समाधी मंदिरात जावून लेनिनच्या मृतदेहाच्या प्रतिकृतीचे, मूर्तीचे दर्शन घेतात; पण तीस मूर्ति मानून ! हा बुद्धिवाद !! परंतु आपल्याकडील कित्येक समाधी व कबरीचे दर्शन घ्यावयाला लोक

जातात, ते त्यातील शवे नवसास पावतात, मुले देतात, उपाहाराचा भोग घेतात, न भोग दिला तर रागावतात, या भावनेने. या प्रकारास मात्र बुद्धिवाद धर्मवेड म्हणतो. पहिली बौद्धिक मूर्तिपूजा ती बुद्धिवादास संमत; दुसरी मूर्तिपूजा मात्र भावडी, धर्मवेडी, बुद्धिशून्य, अतएव तीत तेवढा बुद्धिवादी भाग घेणार नाही." असे असले तरीही बुद्धिवादी त्या समाधीत वा कबरीत जाण्याचे सोडणार नाही, हे सांगताना सावरकर म्हणतात, "अशा समाधि वा कबरीस पाहाण्यासाठी जाण्याचेही तो ऐतिहासिक आवडीने सोडणार नाही. वेडेपीर त्या ठिकाणी नवस करायला जातील, बुद्धिवादी तीत ऐतिहासिक संस्मृत्यर्थ जाईल एवढाच फरक."

एवढेच नव्हे तर सावरकरांचे धोरण असे आहे की, या वेडेपीरांबरोबर हेतुतः जायचे व त्यांचे हे वेड दूर करण्याचा हरएक प्रयत्न करायचा. नाही तर एवढे वेडेपीर एकत्र कुठे सापडणार ? असे करायचे म्हणजे त्या वेडेपीरांच्या भावश्रद्धेला पूर्णपणे निषेधिता येत नसते. त्याचा भाव समजून घेऊन त्यातील हानिकारक वेडेपणा कमी करण्याचा प्रयत्न करावा लागतो. हे करायचे म्हणजे त्या धर्मश्रद्धाळू लोकांशी, ते लोक जिथे एकत्र येतात त्या स्थानांशी, त्यांच्या धार्मिक उत्सवाशी, व अंतिमतः त्यांच्या श्रद्धा व भावनाशी फारकत घेणे खऱ्या सुधारक बुद्धिवाद्याला शक्य नसते. सावरकर अशा प्रकारचे बुद्धिवादी असल्यामुळे साहजिकच प्रथमदर्शनी त्यांच्या वागण्यात आपल्याला विसंगती जाणवू लागते.

बुद्धी मूर्तिपूजकच

बुद्धीही कशी मूर्तिपूजकच आहे, सांगताना सावरकर पुढे म्हणतात, "बुद्धीही मूर्तिपूजकच आहे, पण या अर्थी, या प्रमाणात ! पॅरिसमध्ये बुद्धिवादाची लाट फ्रेंच क्रांतीत जेव्हा बेभान होवून उसळली, तेव्हा नवसास पाहतात म्हणून भजल्या जाणाऱ्या येशूच्या, मेरीच्या, संताच्या मूर्ति चर्च मंदिरातून नास्तिकांनी उखडून टाकल्या; पण बुद्धिवादी, त्या मूर्तिभंजक नास्तिकांनी लगेच केले काय? तर एक-रिझनची–बुद्धीचीच प्रतिमा कल्पून तिला मोठ्या थाटामाटाने पॅरिसभर मिरवून देवी म्हणून पूजिली. मूर्तिभंजक क्रांतीची देवी जी बुद्धि तिची मूर्ति झाली ! पॅरिसमध्ये राष्ट्र ऐक्य चौक (Place Dela Kakard) म्हणून राष्ट्रीय क्षेत्रासमान एक स्थान आहे. त्यात फ्रान्सच्या प्रत्येक प्रांताची एकेक सुरेख स्त्री कल्पून त्यांच्या मूर्तीचे वर्तुळ केले आहे. प्रतिवर्षी मोठ्या महोत्सवाने त्या स्थली लाखो फ्रेंच लोक जमून त्यांना फुले वाहतात आणि त्यांच्या समोर राष्ट्रगीत राजकीय थाटाने गाऊन त्यास समादरितात. हीच बौद्धिक मूर्तिपूजा. अमेरिकेत न्यूयार्कच्या प्रवेशदारीच अेका उत्तुंग स्तंभावर अेक प्रचंड मूर्ति उभारलेली आहे त्या राष्ट्राच्या स्वातंत्र्याची ही राष्ट्रीय मूर्ति आहे, Liberty Stutue आहे." बुद्धिवादी सावरकरांच्या मूर्तिपूजेचा अर्थ हा असा आहे.

याच भव्योदात्त अर्थाने सावरकर गणपतीच्या मूर्तिकडे पाहतात. ते पुढे म्हणतात, "तशीच आपल्या हिंदुराष्ट्राच्या संघटनेची, गणशक्तीची, परंपरागत मूर्ति म्हणजे गणपति !... जसे शिवाजीचे चित्र, लेनिनचा पुतळा, स्वतंत्रतेची मूर्ति वा राष्ट्रीय ध्वज आम्ही मिरवतो तशी हिंदुसंघटनेची कल्पमूर्ति म्हणून गणपतीस मिरविण्यात, उत्सवात प्रतिष्ठापण्यात कोणताही निर्बुद्ध भावडेपणा वा ढोंगी मिथ्याचार नाही. फार काय, अशी बौद्धिक मूर्तिपूजा हीच चित्रकलेची, मूर्तिशिल्पाची आणि कवितेची जननी आहे, धात्री आहे. अमूर्तभावास मूर्तविल्या-वाचून बुद्धीस समजत नाही, हृदयास करमत नाही....."

डोळस बुद्धिवाद

मूर्तिपूजेचा सावरकरांचा हा अर्थ जर आपण समजून घेतला नाही, तर त्यांच्या बुद्धिवाद तर आपल्याला समजून घेता येणार नाहीच, पण राष्ट्रमाता, भारतमाता, राष्ट्रध्वज, इत्यादी राष्ट्रमूल्यांचाही व प्रतिकांचाही आपल्याला खरा-खुरा बोध घेणार नाही. गाय ही गाढवाची देवता व बैलाची माता होवू शकते, या सावरकरांच्या बुद्धिवादाला प्रत्युतर म्हणून त्यावेळेसचे 'प्रमोद'कार म्हणाले, [१९] "आपणाला हा दगड धोंडयानी बनलेला प्रदेश माता–राष्ट्रमाता वाटली, तर धार्मिक लोकांना गाय ही गोमाता वाटली, तर त्या लोकाना बैलोबा म्हणणे हे सभ्यतेला सोडून आहे." या वरुन सावरकरांच्या राष्ट्रमाता नि गोमाता या दोन संकल्पनाकडे वा प्रतिकाकडे पाहण्याच्या भूमिकेतील फरक लोकांच्या लक्षात कसा आला नाही, हे लक्षात येते. प्रमोदकार जे सभ्य भाषेत वर सांगतात तेच असभ्य भाषेत 'भाला'कार सांगतात. 'भाला'काराचे म्हणणे असे :[२०] "'धेन्युर्मय महामाता' ही व्याख्या जर बैलाला शोभण्यासारखी असेल, तर सावरकरांची लाडकी व्याख्या (हिंदू शब्दाची) मातीत आदराने व प्रेमाने लोळणाऱ्या गाढवासच शोभेल." श्रद्धाळू मंडळींचा बुद्धिवादावरील हा प्रातिनिधिक स्वरुपाचा आक्षेप आहे. सावरकर ज्याला बौद्धिक मूर्तिपूजा म्हणतात, त्या मूर्तिपूजेच्या वर्गात येणाऱ्या एखाद्या श्रद्धेला समोर ठेवून, तुमचा बुद्धिवाद कसा लंगडा, दुबळा, अपूर्ण व एकांगी आहे, असे ते प्रतिपादन करत असतात. राष्ट्राला माता मानणे, ध्वजाला वंदन करणे, देवाची करतात तशी राष्ट्राची गीताने प्रार्थना करणे– हे याचे एक ठळक उदाहरण आहे. बुद्धिवादाच्या आणि श्रद्धेच्या सीमारेषा ठरविण्या-चा एक दृष्टिकोण सावरकरांनी मूर्तिपूजेच्या निमित्ताने वर सांगितलेला आहे. सावरकरांचा बुद्धिवाद नुसताच प्रखर नव्हता, तर डोळसही होता, हे समजून घेण्यासाठी आपण निर्लेप मनाने तयार असले पाहिजे.

श्रद्धेलाच हत्यार बनवा

बुद्धिवादी मानतो ती बौद्धिक मूर्तिपूजा कशी असते हे सांगितल्यावर मूर्ति-

पूजेच्या दुसऱ्या उपयुक्ततेच्या अंगाविषयी सावरकर त्याच लेखात पुढे म्हणतात, "जे बुद्धिवादी ते उपयुक्ततावादी असतात, (Utilitarianism in the noblest sense) निदान असले पाहिजेत. आणि यास्तव या मूर्तिपूजेला ते कधीही अव्हेरणार नाहीत... एकंदर समाजहितकारक असेल तर एखाद्या भावडच्या समजुतीकडेही उपयुक्ततावाद्याने कानाडोळा केला पाहिजे. ही भाबडी समजूत स्वतः न मानता इतरांच्याही मनातून ती हळूहळू काढून टाकण्याचा यत्न करीत असतानाच, लोकसंग्रही पुरुषाने जोवर लाखो लोकांस एकत्र आणण्याचे महत्कार्य एका भाविक समजुतीने घडत आहे आणि एकंदरित ती अितकी निरुपद्रवी आहे की, तिच्यायोगे होणारे समाजाचे अहित हे अत्यंत अल्प असून हितच अत्याधिक आहे; तोवर तशा भाबड्या समजुतीकडे कानाडोळा करुन तिचेच हत्यार हाती घेवून ते समाजहित साधले पाहिजे. प्रत्येक विषारी औषध वा शस्त्रक्रिया देहाचे थोडेसे अहित करते, हे माहीत असूनही, एकंदरित बलवान रोग हटविण्याचे अत्याधिक हित साधत असेल, तर कुशल वैद्य जसे ते औषध देतो, ती शस्त्रक्रिया करतोच, तसेच उपयुक्ततावादीही अशाच समजुतीचा अशा प्रमाणात लोकहितासाठी उपयोग करुन घेतो." सावरकरांची भूमिका ही अशा शस्त्रविशारदाची आहे, समाजसुधारकाची आहे, यासाठी अवश्य असणाऱ्या लोकसंग्रही पुरुषाची आहे, हे समजून घेतले पाहिजे. सावरकरांचा बुद्धिवाद लोकहिताचे दायित्व मान्य करणारा आहे. श्रद्धेविरुद्धचे अंतिम युद्ध जिंकण्याचा निर्धार कायम असला तरी, या लोकहितासाठीच काही रणआघाड्यांवर धूर्तपणे माघार घेणाऱ्या गनिमी काव्याची रणनीती या बुद्धिवादाला मान्य आहे. सावरकरांना समजून घेताना त्यांचे हे धोरण लक्षात ठेवणे जरुर आहे.

समाजसुधारणेसाठी

ज्या गणपतिउत्सवा संबंधात हे निरुपण चालू आहे, त्या उत्सवाचा सामाजिक सुधारणेला कसा उपयोग करुन घेता, येईल याची दिशा सावरकर सांगतात. या उत्सवाच्या निमित्ताने व्याख्याने, बौद्धिके, चर्चासत्र हे सारे समाजसुधारणा-पोषक कार्यक्रम आखण्याची सोय होतेच; पण या शिवाय प्रत्यक्ष मूर्तिप्रतिष्ठापनेचे स्वरुप बदलून समाजसुधारणा कशी करता येते, हे सांगताना सावरकर पुढे म्हणतात, "जन्मजात जातीच्या ज्या विभेदक प्रथेने आज हे हिंदुराष्ट्र अेकजीव, एकजात, करण्याच्या कार्यी त्या राष्ट्रीय महोत्सवासारखा असंख्य महाराष्ट्रात तरी दुसरा सापडत नाही... त्याचा कार्यक्रम हिंदु संघटनास अत्यंत हानिकारक अशा आजच्या हव्या पोथिजात जातिभेदाच्या उच्छेदास अवश्य त्या त्या सुधारणा प्रत्यक्षात आचरणात आणणारा असला पाहिजे." हे आपले धोरण सांगून, त्यासाठी गणपतिउत्सवाचे नियम कसे असावेत हे थोडक्यात सांगताना सावरकर म्हणतात, "नियम असे : १) कार्यकारी मंडळ जात्युच्छेदक मताच्याच सभासदांचे असावे.

उत्सव त्याच मताचा; पण प्रवेश मात्र सर्वांना. (२) मूर्ति उचलतांना महार–मराठा–ब्राह्मण–चांभार यांनी उचलावी. (३) मूर्तिपूजा वेदोक्तपणे भंगी व महाराकडून भरसभेत करवून घ्यावी. (४) पूर्वी गणेशचतुर्थीस पंगतीस जसा एक तरी ब्राह्मण हवाच असा दंडक होता, तसा आता काही काळ गणेशोत्सव म्हटला की, पंगतीत एकतरी चांभार, महार, भंगी जेवलाच पाहिजे, हा दंडक असलाच पाहिजे."

सावरकर नुसते नियम करुन थांबणारे बोलके सुधारक नव्हेत, तर ते प्रत्यक्ष आचरणात आणून वस्तुपाठ घालून देणारे प्रत्यक्ष आचारक आहेत. वरील नियम असणारे गणेशोत्सव त्यांनी रत्नागिरीला करुन दाखविले आहेत. कोणत्याही गणेशोत्सवाच्या कार्यक्रमाला जाताना सावरकर स्वतःबरोबर किमान एकतरी तथाकथित अस्पृश्य मनुष्य घेवून जात असत. तेथे सहभोजनाचे आयोजन करण्याचा आग्रह धरीत. मूर्तिपूजा अस्पृश्याच्या हातानेच झाली पाहिजे, अशी अट घालत. या साऱ्या गोष्टी रत्नागिरी हिंदुसभेच्या प्रतिवृत्तात व आता बाळाराव सावरकरांनी लिहिलेल्या रत्नागिरी पर्वात पानोपानी लिहिलेल्या आहेत.

हा शूद्राचा देव

'गणपती' या देवाच्या पाठीमागे एक समाजसुधारणेचा अतिहास आहे. 'लोकायत' हा डॉ. स. रा. गाडगीळ यांच्या ग्रंथात तो दिलेला आहे 'बार्हस्पत्य मत' या नास्तिकमताचा प्रसार करणारे बृहस्पति, हेच हे 'गणपती' आहेत, असे डॉ. गाडगीळांनी म्हटले आहे. ऋग्वेदाच्या दुसऱ्या मंडळात बृहस्पतीला गणपती या नावाने संबोधले आहे. हा गणपती पूर्वी विघ्न होता. गणपती हा शूद्राचा देव आहे. हा शूद्राचा देव असल्यामुळे सर्व स्मृतिकारांनी गणेशनिंदा केलेली आहे. हा वन्य लोकांचा देव असावा, असे डॉ. गाडगीळांचे म्हणणे आहे. गुप्तयुगाच्या काळात या विघ्नकर्त्या गणपतीचे रुपांतर विघ्नहर्त्या देवात केले गेले आहे. असूर, राक्षस व चार्वाक यांच्याशी संबंध असणारा हा देव आहे. असा हा गणपती बुद्धिवादाच्या प्रसाराला व समाजसुधारणेला सावरकरांनी मान्य केलेला आहे, हे समजून घेतले पाहिजे.

प्रा. कुरुंदकरांची भूमिका

सावरकरांच्या या गणेशोत्सवामध्ये धार्मिक वा आध्यात्मिक आशय नावापुरता असून सारा आशय सामाजिक व राष्ट्रीय आहे. या गणेशोत्सवाचे स्वरुप बदलावे, हेतू बदलावा व त्यांचा सामाजिक व राष्ट्रीय कामासाठी उपयोग करुन घ्यावा हीच सावरकरांची भूमिका होती. हीच भूमिका आजही पुरोगामी व बुद्धिवादी विचारवंतांनी मान्य केलेली आहे. एक उदाहरण म्हणून स्वतःला अभिमानाने जडवादी, अधार्मिक, व नास्तिक म्हणून घेणाऱ्या समाजवादी विचाराच्या प्रा.

कुरुंदकरांचे घेवू. धार्मिक उत्सवासंबंधी प्रा. कुरुंदकर म्हणतात, [२१] "धर्माशी निगडित असणारी प्रत्येक गोष्ट टाळायची म्हटले, तर मग सांस्कृतिक जीवन असे काही शिल्लकच उरणार नाही. या उलट माझी अशी भूमिका आहे की, धर्माचा जो काही भाग सार्वजनिक जीवनाशी जोडला गेलेला आहे, त्यांचा धार्मिक आशय कमी करावा आणि राष्ट्रीय आशय वाढवावा. उदाहरण म्हणून गणेश उत्सवच घेता येईल. गणेश उत्सव राष्ट्र सेवा दलाने सर्वत्र साजरे करावेत, असे माझे मत आहे...माझे म्हणणे असे की, या गणेशोत्सवातील धार्मिक आशय शक्य तितका कमी करावा. शक्य असेल तर त्या ठिकाणी अस्पृश्य, अहिंदू, ख्रिश्चन, मुसलमान इ.ना गणपतीच्या स्थापनेसाठी जरुर बोलवावे. गणेश स्थापना करण्यासाठी किमान तो माणूस ब्राह्मण नसावा ही अट आग्रहाने पाळली जावी.... या निमित्ताने ९ दिवस विविध विषयावर व्याख्याने ठेवावीत. धार्मिक कार्यक्रम ठेवायचे असल्यास विविध धर्माचे कार्यक्रम ठेवावेत.... समाजात प्रचलित असणारा हा उत्सव सनातन्यांना मोकळा राहू नये, आणि लोकप्रतिष्ठित असलेली बाब परंपरावाद्यांच्या हाती राहू नये, याविषयी मला जास्त आस्था आहे... धार्मिक बाबी विटाळ म्हणून सोडून द्याव्यात असे मला वाटत नाही. त्या सार्वजनिक जीवनात आग्रहाने चापरुन त्यातला धार्मिक आशय कमी करुन टाकावा असे मला वाटते." आणि अशा कार्यक्रमात आग्रहाने उपस्थित राहून धर्म चिकित्सा करावी असे प्रा. कुरुंदकर म्हणतात. ही भूमिका प्रा. कुरुंदकर १९७१ साली मांडत आहेत की, जी सावरकरांनी १९३५ साली मांडली होती. सावरकरांच्या गणेशोत्सवाबद्दलच्या विचाराची ही सुधारित आवृत्ती आहे, असे आम्हास वाटते. सुधारित या अर्थाने की, या गणेशोत्सवामध्ये मुसलमान, ख्रिश्चन आदींना सहभागी करुन घेण्याबद्दलचा विचार प्रा. कुरुंदकर मांडतात.

गणेशोत्सवाचा हेतू हिंदु-मुसलमानासकट सर्वांची राष्ट्रीय एकात्मता साधणे हा असावा, का हिंदुसंघटन हा असावा, हा मतभेदाचा मुद्दा होवू शकतो. तत्वत: सावरकरांना प्रा. कुरुंदकरांची भूमिका अमान्य असण्याचे काहीच कारण नव्हते. व्यवहारत: मुसलमान येवोत वा ना येवोत, त्यांना आमंत्रण देण्याचा शिष्टाचार प्रा. कुरुंदकर पाळू इच्छितात, आणि तो पाळण्यात सावरकरांना अर्थ वाटत नाही, एवढाच दोघात फरक उरतो. शेवटी सावरकर १९३५ साली फाळणीपूर्व पार्श्वभूमीवर आपले विचार मांडत आहेत, नि प्रा. कुरुंदकर स्वतंत्र भारतात आणि तेही राष्ट्रसेवादलासमोर भाषण देत आहेत, ह्या फरकापेक्षा वरील फरक फार लहान आहे, असे आम्हास वाटते. आपल्या विचारार्थ असलेला मुख्य मुद्दा धार्मिक उत्सवाचा बुद्धिवाद्याने उपयोग करावा का नाही एवढाच मर्यादित आहे, व सावरकरांच्या हिंदुत्वनिष्ठ विचारसरणीचा या ठिकाणी संबंध येवू देवू नये, असे आम्हास वाटते. हिंदुत्वनिष्ठ नसणारे विचारवंतही सावरकरांचीच ही भूमिका कशी स्वीकारतात, हे लक्षात यावे यासाठीच प्रा. कुरुंदकरांच्या भूमिकेचा

उल्लेख आम्ही वर केला आहे.

एक आक्षेप

गणेशोत्सवाबद्दलची सावरकरांची भूमिका आम्ही आतापर्यंत पुरेशी स्पष्ट केलेली आहे. आता सावरकरांच्या या भूमिकेचे विकृतीकरण करुन, ते नकली म्हणजेच 'तथाकथित' बुद्धिवादी होते, हे दाखवून देण्यासाठी कसा दुरुपयोग केला जातो, याचे एक उदाहरण पाहू. डॉ. य. दि. फडके म्हणतात,[२२] "एखादी भावडी समजूत किंवा रुढी धर्मभोळेपणावर आधारलेली असली तरीही तिच्यामुळे राष्ट्रीय हितच अधिक साधत असेल, तर तिच्याकडे उपयुक्ततावाद्याने कानाडोळा करावा आणि लोकसंग्रहाचे एक हत्यार म्हणून बेलाशक तिचा वापर करावा, असे सावरकरांचे मत होते," या संबंधीची सावरकरांची भूमिका त्यांच्याच भाषेत आपण नुकतीच पाहिली आहे. भावडी समजूत स्वीकारण्यापूर्वी ते तिला बुद्धिवादाने किती तपासून घेतात हे आपण पाहिलेच आहे. ती अत्यंत 'निरुपद्रवी' असली पाहिजे, असे त्यांचे मत आहे. निरुपद्रवी याचा पहिला अर्थ, ती बुद्धिहत्या करणारी नसली पाहिजे, असा आहे. बुद्धिहत्या याचा अर्थ विज्ञानाने सिद्ध केलेल्या सत्याचे विकृत स्वरुप त्या समजुतीत गृहीत धरलेले नसले पाहिजे, असा आहे. ती गोष्ट असत्याच्या वर्गातील नसली पाहिजे, ही सावरकरांची पहिली कसोटी आहे. ती गोष्ट अज्ञाताच्या वर्गातील असावी, विज्ञानाने ती अद्याप सिद्ध केलेली नसावी, असे सावरकरांचे म्हणणे आहे. दुसरी गोष्ट, कितीही प्रयत्न करुन लोकांच्या मनांत ती भोळीभावना राहणारच आहे, अशी ती समजूत असली पाहिजे. या कसोटचा लावल्यानंतर देवावरची श्रद्धा एवढीच प्रमुख बाब स्वीकारण्यासाठी शिल्लक उरते, हे समजून घेतले पाहिजे. याच गोष्टीला सावरकर निरुपद्रवी म्हणतात. डॉ. फडके सावरकरांच्या या तारतम्याचा कसलाही उल्लेख करत नाहीत. हानी कमी, लाभ अधिक ही एवढीच कसोटी सावरकर मानत नाहीत, ही गोष्ट डॉ. फडके वाचकांच्या लक्षात येवू देत नाहीत. ही जी बुद्धिवादाच्या चाचणीतून 'ना हरकत प्रमाण पत्र' मिळालेली, 'हानी अत्यल्प पण लाभ अधिक' याही उपयुक्ततेच्या कसोटीस उतरणारी गोष्ट आहे, तिचा उपयोग कुशल वैद्यासारखा आपण केला पाहिजे, असे सावरकर म्हणतात, हीही गोष्ट डॉ. फडके वाचकांच्या लक्षात येवू देत नाहीत. लोकसंग्रह करण्याचा व त्यायोगे समाजसुधारणा करण्याचा जो हेतू सावरकरांच्या या भूमिकेमागे आहे, तोही हेतू डॉ. फडके वाचकांना कळू देत नाहीत. या गोष्टी नाकारणे म्हणजे बुद्धिवेडच होवू शकते, असे सावरकर म्हणतात, अितक्या त्या निरुपद्रवी गोष्टी असतात. या समजुतीचा उपयोग करत असतांनाच तिचा उच्छेद करण्याचे कामही चालूच ठेवले पाहिजे, ही सावरकरांची चेतावणीही डॉ. फडके वाचकांना कळू देत नाहीत. सावरकरांच्या मते अशा समजुतीचा उपयोग विषारी औषधासारखा आहे, त्यामुळे तो वैद्याच्या कुशलतेने विवेकाने करायचा आहे. डॉ.

फडके यांच्या मते असा उपयोग 'बेलाशक' करावा, असे सावरकरांचे मत आहे. सावरकरांचे हे मतच नाही; सावरकरांबद्दल डॉ. फडके यांचे हे मत आहे, हे समजून घेतले पाहिजे. 'अशा प्रमाणात' या गोष्टीचा उपयोग केला पाहिजे, असे त्याच लेखात हाच शब्द दोनदा वापरुन [२३] सावरकरांनी त्या 'प्रमाणाच्या' स्वरुपाचेही विवेचन केलेले आहे, हे डॉ. फडके वाचकांच्या लक्षात येवू देत नाहीत. विषाचाही मानवी-हितास उपयोग करुन घेणाऱ्या वैद्याची भूमिका सावरकर घेतात. येथे 'तारतम्य' नि 'प्रमाण' हेच मुख्य आहे. नेमके तेव न पाहता, डॉक्टराचा सल्ला न घेता बेलाशक विष प्राशन करावे, औषधी दुकानातील बाटेल ते औषध घेवून खावे व रोगमुक्त व्हावे, असा सावरकरांचा अडाणी उपदेश आहे, असे डॉ. फडके बेलाशक ठोकून देत आहेत, हे लक्षात घेतले पाहिजे. सावरकरांचा बुद्धिवाद नकली आहे, याचा शोध लावायचा तर त्यासाठी असले नसलेले सर्व पुरावे गोळा करण्यामागील डॉ. फडके यांच्या समोरची रास्त अडचण आपण नेहमीच समजून घेतली पाहिजे.

सावरकरांची मूर्तिपूजाविषयक वरील भूमिका त्यांच्या सर्वच क्षेत्रातील विचाराचे सार आहे, असे म्हटल्यास चूक ठरु नये. शुद्ध बुद्धिवादापासून उपयुक्तता-वाद्याने समाजहितासाठी किती दूर जावे, याचे तारतम्य सावरकर कसे पाळतात, याचा एक पुरावा म्हणून वरील भूमिकेकडे आपल्याला बोट दाखविता येईल. सावरकर अंधश्रद्धेप्रमाणेच बुद्धिवेडापासूनही मुक्त होते. भाव–भावना, प्रेम, सौंदर्य आदरबुद्धी, कृतज्ञता, दिव्यता, भव्यता इ. सर्व मांगल्यपूर्ण गोष्टी जाणण्याअितका त्यांचा बुद्धिवाद डोळस आहे. या भावना आम्ही जाणणारच नाही, अशी बुद्धि-वेडाची झापड त्यांच्या बुद्धिवादाने घातलेली नाही.

देवाचे प्रतिक कोणते असावे, या बाबत सावरकरांची भूमिका आपण पाहत आहेत. मूर्तिपूजा कोणत्या अर्थी व कोणत्या प्रमाणात मान्य करावी, याबद्दलची त्यांची भूमिका आपण पाहिली. मूर्ती हे देवाचे प्रतिक म्हणून या अर्थाने त्यांना मान्य आहे. याचा अर्थ तडजोड म्हणून स्वीकारायला ते तयार आहेत, एवढाच आहे. देवाचे खरोखर चांगले प्रतिक दगडाची मूर्तीही होवू शकत नाही, असे सावरकरांना वाटते. सावरकरांना मान्य असलेल्या देवाचे उत्कृष्ट प्रतिक हे दुसरेच आहे.

नरसेवा हीच ईशसेवा

देवाला संतोषण्यासाठी, मनःशांतीसाठी किंवा काहीतरी फळ मिळते म्हणून मनुष्य देवाची म्हणजेच देवाच्या प्रतिकाची पूजा करतो. त्यामुळे देव प्रसन्न होतो, आपल्या मनोकामना पूर्ण करतो, ही या मागची आपली भावना असते. देव कोणत्या मार्गाने प्रसन्न होतो, हाच पूजेसंबंधीचा मुख्य प्रश्न आहे. शेवटी हे भक्तालाच ठरवावे लागते. देव कोणत्या मार्गाने, पूजेने वा उपासनेने प्रसन्न होतो, या विषयी सावरकर आपली भूमिका मांडतात. त्यांचे म्हणणे असे की, कोणत्याही प्रतिकाची

पूजा करण्यापेक्षा प्रत्यक्ष मनुष्याचीच सेवा केल्याने देव अधिक प्रमाणात त्या भक्तावर प्रसन्न होत असतो. मनुष्याने देवाची निर्मिती केली, ती मनुष्याचा हितचिंतक या कृतज्ञ भूमिकेतून केलेली आहे. या लाडक्या माणसाच्या कल्याणातच, सुखातच व सेवेतच देवाला खरा आनंद होत असला पाहिजे. या मानवसेवेमुळेच, तो देव अधिक संतोषत असला पाहिजे, अशी सावरकरांची भूमिका आहे

तेव्हा पूजेचा मूळ हेतू साधण्यासाठी मनुष्याचीच मनुष्याने सेवा करावी, हीच सर्वोत्कृष्ट पूजा आहे, असे सावरकर म्हणतात. मनुष्य हाच देवाचे सर्वोच्च प्रतिक आहे, या नराची सेवा हीच खरी ईशसेवा आहे, म्हणून हीच सेवा मनुष्याने केली पाहिजे, असे सावरकर म्हणतात. एकापेक्षा अधिकांची सेवा श्रेष्ठ व देवाला अधिक आवडणारी व परिणामतः आपल्या मनोकामना पूर्ण करणारी आहे, अशी एखाद्या राष्ट्रसंताला शोभावी अशी भूमिका सावरकर आग्रहाने मांडतात. मूर्तिपूजा–देवपूजा म्हटल्याबरोबर देव न मानणारे सावरकर निषेध करत उठत नाहीत. देवपूजा करणाऱ्याचा मूळ हेतू कसा साध्य करता येईल यांचा विविध मार्गाने सावरकर विचार करतात. समाजाची–राष्ट्राची सेवा केली म्हणजे सर्वोत्कृष्ट देवपूजा होते, असा सिद्धांत मांडतात. भोळ्या, निरुपद्रवी समजुतीचा राष्ट्रासाठी उपयोग करुन घेण्याचा हा प्रकार आहे, हे उघड आहे.

सावरकर म्हणतात, [२४] "झाडात, पशूत, सापात, दगडात, मातीतही जर देव आहे – जर ती दगडमातीच ही त्याची प्रतीके होवू शकतात, तर त्या देवाच्या जडशक्तीचाच नव्हे, तर चिच्छक्तीचाही ज्यास शास्त्रेच परमअंश मानतात, तो मनुष्य त्या देवाचे सर्वोच्च प्रतिक मानावयास नको काय? नारायणाचा परमव्यक्त अंश, चिन्मय मूर्ति जर कोणती असेल तर तो नरच होय, असे शास्त्रेच म्हणतात आणि म्हणूनच नराची सेवा अितर कोणत्याही प्रतिकाच्या सेवेहून नारायणास अधिक संतोषविणारी असलीच पाहिजेत. या अितर प्रतिकाच्या सेवेने जे जे अैहिक काम्य फल मिळते किंवा पारलौकिक पुण्य लाभते म्हणून पोथीत सांगितले आहे, ते जर खरे असेल, तर हेही खरे असलेच पाहिजे की, ते ते अैहिक वा पारलौकिक फल मनुष्याच्या सेवेने परोपकार व्रताने अितर कोणत्याही व्रतापेक्षा अधिक निश्चितपणे व्रत करणाऱ्यास मिळालेच पाहिजे."

सावरकरांना चिंता पारलौकिक लाभाची नाही, तर अैहिक लाभाचीच आहे. पारलौकिक लाभावर श्रद्धा ठेवण्याचा मनुष्याचा हक्क ते मान्य करतात. एवढेच खरे आहे. आपल्या कथातूनही सावरकर हाच विचार मांडत असतात. 'चातुर्मास्य' ही कथा या नरसेवेसाठीच लिहिलेली आहे. 'कमला' हे पात्र सावरकरांचे हेच विचार मांडत असते. सावरकरांचे जीवनच या सिद्धांताच्या प्रचारासाठी व आचारासाठी गेलेले आहे. स्वतः आचरून त्यांनी लोकांना ते शिकविले आहे. देश हाच त्यांनी देव मानला. देशसेवा हीच त्याची देवपूजा होती. याच पद्धतीने व याच अर्थाने प्रत्येकाने 'देवपूजा' करावी, असा त्यांचा उपदेश आहे. जीवनातील कोणत्याही

गोष्टीला बुद्धिवादाचा, उपयुक्ततावादाचा किंवा उदात्त भावनेचा आधार देवून ती गोष्ट सावरकर राष्ट्रसेवेकडे अशी घेवून जातात, राष्ट्रसेवेतच त्या गोष्टीला कसे विलीन करुन टाकतात, हे यावरुन लक्षात येते.

शास्त्राचाही आधार

देवाला संतोषविण्यासाठी लक्ष लक्ष पिठाच्या गोळ्या करुन गंगेत सोडण्याचा जो उपासना मार्ग भक्त वापरतो, त्या ऐवजी ते अन्न गरिबांच्या पोटात जाईल अशी व्यवस्था केली, तर त्यामुळे देव अधिकच संतोषतो, असे सावरकर म्हणतात. "अन्नान्नदशा झालेल्या क्षुधित मनुष्याच्या पोटाला अन्न दिले तर तेही भगवंतास संतोषतेच' हा नियम श्रुतिस्मृतीतही पानोपानी लिहिलेला आहे, याची आठवण सावरकर करुन देतात.[२५] 'देशकालपात्रेच हीच व्रतदानविधिविधानाची कसोटी असल्याचे गीतेत म्हणले असल्याच्या व अशा कसोटीस उतरणाऱ्या व्रतास सात्विक व्रते म्हटले असल्याचा धार्मिक पुरावाही सावरकर देतात.[२६] यज्ञामुळे देव पावतो, काम्यफळे मिळतात, या संबंधीही सावरकर याच कोटीक्रमाने यज्ञाऐवजी मनुष्यजातीचे हित करणारा सेवायज्ञ केला, म्हणजेच तो देव अधिक संतोषतो, काम्यफळे अधिक प्रमाणात व त्वरीत देतो, असा ते निष्कर्ष काढतात. ते म्हणतात,[२७] "स्वर्गादि पारलौकिक फल प्राप्तीचे साधन साग्नियज्ञ हेच नसून भक्ति, त्याग, सेवा, दया, ज्ञान, जनहितरतता प्रभृति अनेक साधने वेदांत नि शास्त्रात भरपूर आहेत, यज्ञामुळे जे स्वर्गात गेले म्हणून कीर्तिले आहेत, त्याच्या पेक्षा शतपटीने अधिक साधक नि सिद्ध या यज्ञव्यतिरिक्त साधनांनीही क्षमशील स्वर्गपद पावले, अितकेच नव्हे तर अक्षय्य, मोक्षपदही पावले, असे नामावलीसह याच वेदशास्त्रपुराणांतून नि अर्वाचीन संतकथातून संकीर्तिलेले आढळते."

शास्त्राधाराचे नावही न काढू देणारे सावरकर चांगल्या गोष्टी पटवून सांगण्यासाठी धर्मग्रथांचा आधार घेत आहेत. सावरकर येथे शास्त्राचा आधार का घेतात हे समजून घेतले पाहिजे. धार्मिक लोकांना बुद्धिवाद शिकविण्यासाठी, पटविण्यासाठी युक्तिवाद म्हणून शास्त्राचा दाखला सावरकर येथे देत आहेत. आमचा निर्णय अगोदर झालेलाच आहे, पण तुमचे शास्त्रही याला विरोधी नाही, ही वस्तुस्थिती युक्तिवादासाठी वापरण्यात काहीही गैर नाही, असे आम्हास वाटते. येथे प्रश्न लोकांच्या मनातील श्रद्धेला वेगळी दिशा लावण्याचा आहे. त्यामुळे लोकांना समजेल, पटेल अशा भाषेत त्यांना समजून सांगणे भाग असते. अिथे सावरकर हीच गोष्ट करत आहेत, हे समजून घेतले पाहिजे. मुख्य मुद्दा विचार पटविण्याचा असतो, भाषेचा नसतो, हे लक्षात घेतले पाहिजे. स्वर्ग मिळविण्याचे, देवाला प्रसन्न करण्याचे वरील दोन्ही मार्ग शास्त्रसंमत आहेत, हे ते पटवून देतात. या पैकी कोणता उत्तम आहे, हेही ते सांगतात. राष्ट्रसेवायज्ञ हा यासाठी सर्वश्रेष्ठ आहे असा ते निष्कर्ष काढतात.

मराठी ग्रंथ संग्रहालय पुणे
3202
दा. क्र. 24 E 10

कर्म निवडीची कसोटी

पारलौकिक लाभासाठी या जीवनात कोणते कर्म करायचे असेल, तर त्या कर्माची निवड करण्याची बुद्धिवादी कसोटी सावरकर सांगतात. पहिले गृहीत हे आहे की, पारलौकिक लाभ मिळविण्याचा अेक आणि एकच असा ठरलेला मार्ग नसून, विविध मार्गांपैकी किंवा कर्मांपैकी एकानेही तो पारलौकिक लाभ पदरात पडत असतो. ही गोष्ट सर्व धर्मग्रंथांना मान्य आहे. त्यामुळे पारलौकिक लाभाची कसलीही हानी होऊ न देता, या दोन किंवा अधिक मार्गांपैकी एकाची निवड करण्याचे स्वातंत्र्य प्रत्येक मनुष्याला आहे. आणि हीही गोष्ट धर्मग्रंथांना मान्यच आहे. पारलौकिक लाभ हा ज्या अनेक मार्गांचा समान घटक (Common factor) आहे, त्या अनेक मार्गांपैकी वा कर्मांपैकी एकाची निवड करण्याचा प्रश्न सावरकरांसमोर आहे. या पैकी कोणता मार्ग अधिक उत्तम व आचरणीय आहे, हे सावरकर ठरवितात.

'संन्यास' चांगला की 'ग्रहस्थाश्रम' चांगला यावद्दल 'संन्यस्त खड्ग' नाटकातील भगवान बुद्ध व विक्रम यांची तत्वचर्चा चालू आहे. भगवान बुद्ध हे मान्य करतात की, पारलौकिक हित किंवा निर्वाणप्राप्ती ही संन्यासमार्गाने जशी साधते तशीच गृहस्थाश्रमानेही साधता येते. ते हेही मान्य करतात की, या दोन आश्रमातील मुख्य फरक हा आहे की, संन्यासाश्रमात कामिनी (स्त्री), कृषी आणि कृपाण याचा आत्यंतिक त्याग करावा लागतो, आणि गृहस्थाश्रमात तो करावा लागत नाही. विक्रम बुद्धांना जेव्हा असे पटवून देतो की, गृहस्थाला करायची ही कृत्ये कशी अपरिहार्य आहेत व ती केल्याशिवाय संन्यासालाही जिवंत राहता येत नाही, तेव्हा भगवान बुद्ध म्हणतात की, "अैहिक उन्नती हाच काही मनुष्याचा पुरुषार्थ नाही. पारलौकिक उन्नती हाच खरा पुरुषार्थ आहे."[२८] यावर उत्तर देताना विक्रम म्हणतो, "छे ! छे ! हे आपण प्रथम मान्य केला आहात की, निर्वाण प्राप्तीनंतर किंवा निर्वाणप्राप्त्यर्थ जे धर्माचरण अत्यावश्यक ते गृहस्थाश्रमातही साधता येईल. यास्तव पारलौकिक हित हा उभयपक्षी समान असणारा घटक सोडून उरलेल्या अैहिक लाभालाभाचीच तुलना कर्तव्य आहे."[२९]

विक्रम हा सावरकरांची मते मांडत असतो. पारलौकिक हित हा ज्या सर्व मार्गाचा समान घटक आहे, त्या मार्गातील अैहिक लाभालाभाचाच तौलनिक विचार करुन अैहिक दृष्टीने जे अधिक उपयुक्त, हितकारक असेल, तेच कर्म वा मार्ग पारलौकिक लाभासाठी मनुष्याने निवडला पाहिजे, असा सावरकरांचा हा आग्रह आहे. येथे लक्षात घेण्यासारखी गोष्ट ही आहे की, पारलौकिक सुखासाठी म्हणून उत्तम मार्ग निवडण्याची कसोटी पूर्णपणे अैहिक हिताहित पाहण्याचीच आहे. पारलौकिक लाभासाठी करावयाची गोष्ट अैहिक लाभाच्या तराजूने मोजण्याचा हा बुद्धिवादी प्रकार आहे. संन्यास घेवूनही मोक्ष मिळतो, निर्वाणपद मिळते; गृहस्थाश्रमानेही ते मिळते, तर मग अैहिक लाभाच्या दृष्टीने गृहस्थाश्रम हाच

चांगला मार्ग आहे, असे सावरकरांचे म्हणणे आहे. सावरकर मोक्ष, निर्वाणपद, स्वर्गप्राप्ती, मुक्ती इत्यादी कल्पना निषेधित नाहीत. या गोष्टी मिळविण्याचे वेगळे मार्ग सांगतात. लोकांच्या धार्मिक परिभाषेत आपला बुद्धिवाद समजून देतात. मनुष्याची, समाजाची, राष्ट्राची वा मानव्याची सेवा हाही पारलौकिक लाभांचा शास्त्रसंमत मार्ग असल्यामुळे व याच मार्गाने ऐहिक लाभही होत असल्यामुळे, अितर कोणत्याही मार्गापेक्षा हाच मार्ग सर्वोत्कृष्ट आहे, असे त्यांचे म्हणणे आहे. पारलौकिक लाभाची अिच्छा असणाऱ्या प्रत्येकाने हाच मार्ग अवलंबावा, अशी त्यांची शिकवण आहे. म्हणजे अंतिमतः व परिणामतः पारलौकिक मार्गाची कसोटी मनुष्याचे ऐहिक व प्रत्यक्ष हित पाहणे, हीच सावरकर मानतात. वर वर पाहिले तर आपल्याला ही गोष्ट लवकरच लक्षातच येत नाही.

धर्माचा उपदेश

'संन्यस्त खड्गात' बुद्ध संन्यास घेतात, तर विक्रम एका गुंडाला ठार मारण्याचे हिंसक कृत्य करतो. हिंसा केल्यामुळे विक्रम निर्वाणच्युत झाला आहे, असे बुद्ध म्हणतात. दोघात या संबंधी कडाक्याचा तत्ववाद चालू होतो. वादाचा निर्णय देण्यासाठी 'धर्म' प्रकट होऊन सांगतो, २९ "हे परिव्राट महाकर्म संन्यासिन् बुद्ध, तू निर्वाणपदाचा अधिकारी आहेसच; परंतु हे वीरवर महाकर्म योगीन् विक्रम, तूही त्याच निर्वाणपदाचा अधिकारी आहेस! कारण धर्माचे मुख्य मर्म जे माणुषकाचे अत्यंत हित ते साधण्यासाठी तू सर्वस्व त्याग करुन अभिमुख समरात लोककल्याणार्थ झुंजत लोकहिंसकाचा वध केलास–स्वतःचा प्राणत्यागही करण्यास करचला नाहीस. ... वीरवर विक्रम ज्यात निष्क्रिय संन्यासाचे सर्व ऐहिक आणि पारलौकिक लाभ असूनही, जो अत्याधिक लोकहितसाधक आहे, अशा तू उपदेशिलेल्या आणि आचरिलेल्या शुभकामी शक्तिपूजक कर्मयोगाचा अवलंब करणे, हेच त्या संकटाच्या कचाट्यातून मुक्त होण्याचे साधन आहे. धर्माचे मुख्य स्वरुप आणि उद्दिष्ट, जे मानुषकांचे ऐहिक आणि पारलौकिक धारण, उद्धरण अशा कर्मयोगानेच अधिक प्रमाणात साधत" असते. या विचाराचा प्रेक्षकाच्या मनावर खोलवर परिणाम व्हावा म्हणून, नाटकाचे सार म्हणून ही धर्मवाणी झाल्यानंतर लगेच नाटक संपविण्यात आले आहे.

भगवान बुद्धाच्या दिव्य प्रतिमेला व त्यांच्या भव्योदात्त विचारांना यत्किंचितही धक्का पोहचणार नाही, याची काळजी घेत सावरकर त्यांचे विचार कसे खोडतात, हे वरील विचारावरुन आपल्याला दिसून येते. सावरकरांचा कर्मयोगाचा सिद्धांत धर्म सांगत आहे. हे माझे निश्चित आणि उत्तम मत आहे, असे अगदी ठासून धर्म सांगत आहे. ऐहिक आणि पारलौकिक सुख मिळवून देतो तो धर्म, ही व्याख्या सावरकर नेहमी सांगत असतात. ही व्याख्या आपण मानतो त्याच धर्माची आहे, आपल्याच धर्मशास्त्रातील व ओळखीची आहे, असे लोकांना

वाटत राहते. या व्याख्येतील 'पारलौकिक' शब्द हा सावरकरांच्या भूमिकेतील ऐहिकाचाच पर्यायी शब्द आहे, हे समजून घेतले पाहिजे. शब्द व भाषा पारलौकिक पण अर्थ आणि सार मात्र ऐहिकच, असा हा सावरकरी प्रकार आहे. औषध कडू लागू नये म्हणून वैद्यराज जसे गोड मिश्रणात वा चवहीन वेष्टनात ते औषध रोग्याला देतात, तसाच हा प्रकार आहे. मुख्य व महत्वाचा प्रश्न रोग बरा होणे हा असतो, औषध कशात घालून रोग्याला द्यावे हा नसतो, हे समजून घेतले पाहिजे.

नुसता शब्दांचा पुरावा

याच धोरणातून ते धार्मिक, आध्यात्मिक व पारलौकिक भाषा त्याज्य मानत नाहीत. स्वतंत्रतेला ते देवी म्हणतात. त्याच देवीचे मोक्ष, मुक्ती, परब्रह्म इत्यादी पर्यायी नावे आहेत, असे ते म्हणतात. [३०] असा कोणता शब्द दिसला की तो आपल्या रोजच्या अर्थाने आहे, असे समजून सावरकरांविषयी अनेकांनी गैरसमज करुन घेतलेले आहेत. सावरकरांची देवावर, मोक्षावर, आत्म्यावर, परब्रह्मावर, स्वर्गावर - कशी श्रद्धा आहे, हे अशा शब्दाकडे पाहून सिद्ध करण्याची एक पद्धत आहे. ह. त्र्य. देसाई यांनी लिहिलेल्या 'शतपैलू सावरकर' या ग्रंथातील 'सावरकर नास्तिक की आस्तिक ?' हे प्रकरण या दृष्टीने पाहण्यासारखे आहे. [३१] 'सावरकरांनी लिहिलेल्या पुस्तकातलाच लेखी पुरावा आपण पाहू या' असे सांगून ते पुढे धार्मिकता, आस्तिकता दर्शविणाऱ्या वरील प्रकारच्या शब्दांना सावरकरांच्या साहित्यातून गोळा करुन, आपल्यासमोर मांडतात. ईश्वर, ईश्वरी अंश, रामसेवा - पुण्य - लेश, ईश्वराच्या कृपेनं, देवांने संधी दिली, देवाने शक्ती दिली इत्यादी शब्द प्रयोग ते पुरावा म्हणून समोर मांडतात. या शब्दांचा वापर करण्यासाठी देवावर श्रद्धा असण्याची गरज नसते. ज्यांच्याशी आपण बोलत असतो, त्यांची या देवावर श्रद्धा असणे, हे कारण यासाठी पुरेसे असते. सावरकर या शब्दांचा वापर करतात. त्यांचे कारण हेच होय.

विचार व भावना समजून देण्यासाठी अधिक सोपे होत असेल, तर परमेश्वरविषयक निरुपद्रवी शब्द बोलण्यात योजल्याने काहीच हानी नसते. प्रत्येक वेळेला तुमच्या सोयीसाठी हे शब्द मी वापरत आहे, असे सांगणे अनावश्यक असते. तरीही सावरकर हे शब्द वापरताना अधून मधून असा खुलासा करत असतात. 'स्त्री स्वातंत्र्याचे ध्येय' या विषयावर १९५० मध्ये केलेल्या भाषणात स्त्रियांना उद्देशून सावरकर म्हणाले, [३२] "निसर्गाने, निसर्गालाच तुमच्या सोयीसाठी परमेश्वर म्हणतो, त्या परमेश्वराने प्रजोत्पादनाचे कार्य पुरुषाकडे न देता केवळ स्त्रियांकडे सोपविले आहे." असा खुलासा प्रत्येक वेळेला सावरकरांनी करायला हवा होता. अशी अपेक्षा करणे कठीण आहे. निसर्गालाच सावरकर परमेश्वर म्हणत असतील, तर सावरकरांची निसर्गावर श्रद्धा होती क

म्हणून ते आस्तिक होते, असे म्हणणार आहात काय ? येशूवहिनी या आत्यंतिक धर्मश्रद्धा होत्या. त्या एकनिष्ठ रामभक्त होत्या. कारागृहातून आपल्या वहिनीचे 'सांत्वन' करण्यासाठी सावरकर काव्यमय पत्र लिहितात. अशा पत्रामध्ये सांत्वन करण्यासाठी जडवाद आणि बुद्धिवाद सावरकरांनी मांडावा, अशी आपली अपेक्षा आहे काय ? वहिनीना समजेल अशा भाषेत सावरकर पत्र लिहितात. 'राम सेवा पुण्य लेश' 'ईश्वरी अंश' अित्यादीचा कवितेतील उल्लेख येशूवहिनीच्या समाधानासाठी आहे. सावरकरांची देवावर वशी श्रद्धा आहे, यासाठी या गोष्टीचा पुरावा म्हणून बापर करणे चुकीचे आहे.

कारागृहातून आपल्या सहकारी मित्रांना 'शेवटचा रामराम' करुन लिहिलेल्या 'निरोप' कवितेमध्येही ईश्वराचं नेमून दिलेली आपापली भूमिका बठविण्यासाठी आपली ताटातूट होत आहे' असे सावरकर म्हणतात. आपल्या धर्मभोळचा सहकारी मित्रांना समजून सांगण्यासाठी 'ईश्वर-नियुक्त कार्य' इ. शब्द आलेले आहेत. अशा शब्दातून देशासाठी मरण्याची प्रेरणा मिळत असेल, तर त्या शब्दाचा बिटाळ कशासाठी, अशी सावरकरांची भूमिका आहे. आणि सावरकरांचा 'ईश्वर' म्हणजे तुमचा आमचा ईश्वर नव्हे. देशालाच सावरकर देव म्हणतात, ही काही समजून सांगण्याची गोष्ट राहिलेली नाही.

ते धार्मिक शब्दाचा बापर का करतात, हे त्यांनीच आपल्या आत्मचरित्रात सांगून टाकलेले आहे. उत्तरार्धातच नव्हे, तर सावरकरांच्या आयुष्याच्या पूर्वार्धातही त्यांच्याभोवती जमलेली मंडळी प्राय: देवभोळी व धर्मभोळी होती. नासिकला त्यांच्या मित्रमेळा या संघटनेतील म्हसकर, पागे आदी मित्रमंडळी अशीच देवभोळी व धर्मभोळी होती. त्यांना राष्ट्रप्रेमाचे शिक्षण देण्याचे व त्यांना सोबत घेवून क्रांतिकार्य करण्याचे काम सावरकरांना कराचयाचे होते. सावरकर म्हणतात,[३३] "धर्म, पारलौकिक साधना, आत्मिक उन्नती ही राजकीय दास्याने कशी जखडली जाते आणि धर्मासाठी देखील आज राजकीय स्वातंत्र्य कसे आवश्यक आहे, हे तर मला वारंवार सिद्ध करुन द्यावे लागे. रामदासांच्या 'तीर्थक्षेत्रे भ्रष्टली' प्रभृति वचनावर कितीदा तरी प्रबचने करावी लागत... अभिनव भारताचे तत्कालीन निकटतम ध्येय जे राष्ट्रीय स्वतंत्रता ते व्यक्तीच्या व राष्ट्राच्या अंतिमतम पारमार्थिक ध्येयाला, मुक्तीला विसंवादी नाही; इतकेच नव्हे, तर त्या पहिल्या स्वतंत्रतेचा परिपूर्ण बिकास म्हणजे दुसरी स्वतंत्रता ही मुक्ति असते, हे मला वारंवार विशद करावे लागे. कारण त्यायोगेच पहिल्या राष्ट्रीय चळवळीस पाणी, निदान बंधक समजून केवळ वैयक्तिक मुक्तीचाच अवलंब करु इच्छिणारी आमच्यातील देवलसी मंडळी या राष्ट्रीय, या लोककल्याणकारी राज्यक्रांतीची अभिमानी करुन घेता घेअी. या पुरती रामदासानी शिवाजीस उपदेशिलेला दासबोध हीही आमची एक स्मृतीच असे. ती देवलसी मंडळीनाही देशलसी बनवायास फार उपयोगी पडे." तेव्हा सावरकर ही धार्मिक परिभाषा कुणासाठी व कोणत्या

हेतूने वापरत असत, हे समजून घेतले पाहिजे. नूसत्या शब्दाचे पुरावे येथे उपयोगाचे नाहीत, हे लक्षात घेतले पाहिजे.

नावापुरते पारलौकिक

भाषा पारलौकिकाची पण प्रत्यक्षात कसोटी ऐहिकाची, असा हा सावरकरांचा पारलौकिक लाभाचा सिद्धांत जसा नाटकाचा पाया होतो, तसाच त्यांच्या सर्व विचारांचा, प्रचाराचा व कार्याचा आधारस्तंभ असतो. पारलौकिक गोष्टीचे नाव काढले की, त्यांच्या तळपायाची आग मस्तकाला जात नाही, तर त्यांचा बुद्धिवाद तळपायापासून मस्तकार्यंत पारलौकिकात वेषांतर करुन लोकांच्या हृदयात शिरतो. व्रते करु इच्छिणाऱ्याना म्हणूनच ते वेडचात न काढता, ती व्रते कशी करावीत याची शिकवण देतात. व्रताच्या निवडीचे सूत्र सांगताना ते म्हणतात, [३४] "व्रतवैकल्याचे जे आत्मशुद्धि, काम्य फलप्राप्ती आणि पारलौकिक पुण्यप्रभृति हेतु आहेत, ते सर्व मनुष्यसेवेने, परोपकाराच्या व्रताने मिळणारे असल्यामुळे आपण व्रताची निवड करताना जर अशीच व्रते निवडली की, त्याच्यायोगे मनुष्य जातीचे प्रत्यक्षपणे काहीना काही तरी हित साधेल. आपल्या समाजाची वा राष्ट्राची काही ना काही तरी हेचि देही हेचि डोळा फळ देणारी उपयुक्त सेवा घडू शकेल आणि मनुष्याच्या अज्ञानास आणि धर्मभोळेपणास उत्तेजन न देता त्याचे ज्ञान नि सुख वाढविले जाईल." 'चातुर्मास्य' कथेतील कमलाही हाच सिद्धांत मांडते. ती म्हणते, "धर्म म्हणजे परोपकार. परोपकार : पुण्याय ! तेव्हा या लोकी प्रत्यक्ष असा परोपकार घडेल अस व्रत करणं बरं. तसं एक व्रत मी धरलं तर त्यात नाही का देवाची सेवा घडतं ?"[३५]

तेव्हा अिहलोकी प्रत्यक्ष लाभ आणि परलोकी पुण्य ही कोणत्याही कर्माची, व्रताची किंवा उपासनेची कसोटी असली पाहिजे, असा सावरकरांचा आग्रह आहे. जनहिताच्या उदात्त हेतूसाठी काहीशी तडजोड मान्य करणारा हा बुद्धिवाद आहे. ही तडजोड प्रामुख्याने भाषेचीच आहे, हेही समजून घेतले पाहिजे. हा बुद्धिवाद अशा प्रकारचा आहे की, विरोधकाचे गृहीत मान्य करायचे; त्या गृहिताशी उगीच वाद घालायचा नाही; या गृहितावरुन जो निष्कर्ष निघतो तो मात्र आपल्याच बुद्धिवादाच्या मूळ सिद्धांताप्रत कसा येतो, हे तर्कवादाने पटवून द्यायचे ! सावरकरांचा हा बुद्धिवाद जीवनातल्या सर्वच क्षेत्रात सारख्याच प्रकर्षाने दिसून येतो. शत्रूची शिबीरे वर्ज्य न करता, त्या शिबीरात जावून, त्या शत्रूची दाढी खाजवतच, शत्रूचाच उपयोग करुन घेत, त्याची होईल तेवढी हानी करण्याचे धोरण केवळ सशस्त्र क्रांतीपुरते मर्यादित नव्हते. त्यांच्या सैनिकीकरणाच्या धोरणामागेही हीच भूमिका होती.

सावरकर जातिभेद न मानणारे व जात्युच्छेदक आहेत. या जात्युच्छेदकानी जात्यभिमानावर उभारलेल्या जातिसंघाचे सभासद जरुर झाले पाहिजे, असा

सावरकरांचा आग्रह होता. जातिसंघावर बहिष्कार टाकून नव्हे तर सभासद होवून त्या संघात शिरल्यानेच जातिभेदावर अधिक परिणामकारकपणे मारा करता येतो, अशी त्यांची भूमिका आहे. या संबंधी सावरकर म्हणतात, [३६] "आपल्या जात-भाऑना केवळ मानीव जन्मजात म्हणविणाऱ्या उच्चनीचतेच्या घातक भावनापासून नि जातिभेदातील स्पर्शबंदी, रोटीबंदी प्रभृति दुष्ट रुढीपासून मुक्त करविण्याचा यत्न ज्ञातिसंघातही घुसून करावा. आणि अशा रितीने स्वतंत्र जात्युच्छेदक संघाने बाहेरुन नि ज्ञातिसंघात घुसून आतून असा दुहेरी मारा जातिभेदावर चालवावा, हे अिष्ट." सावरकरांचा बुद्धिवाद हा असा आहे! बुद्धिवादाच्या विरोधी असणाऱ्या गोष्टीवर ते बहिष्कार टाकत नाहीत, असहकारही करत नाहीत. एक तर त्या गोष्टीवर ते घणाघती प्रहार करतील किंवा गोडीगुलाबीने, उक्ति-प्रयुक्तीने त्या गोष्टीत परिवर्तन करण्याचा प्रयत्न करतील. सावरकरांच्या या पारलौकिकासंबंधीच्या विचारामध्ये 'पारलौकिक' हे नावापुरतेच शिल्लक आहे, हे उघड आहे. भाविकांचेही या नावामुळे समाधान नि बुद्धिवादाची प्रतिष्ठापना या दोन्हीही गोष्टी एकदा साध्य करुन घेणारा सावरकरांचा हा उपयुक्ततावाद आहे.

तीन वर्ग

या साऱ्या गोष्टीचा विचार, ज्याची पारलौकिकावर श्रद्धा आहे, आणि जी लवकर नष्ट होण्याची शक्यता नाही, अशा लोकांच्यासंबंधी चालू आहे. ज्यांची अशा लाभावर श्रद्धाच नाही, त्यांच्या बाबतीत हे काहीही लागू होणार नाही. अगदी उघडपणे सांगून सवरुन अैहिक दृष्टचा उपयुक्त तेच आणि तेही अैहिक लाभासाठी करणे, हेच त्याचे कर्तव्य राहील. या बाबतीत सावरकर म्हणतात, [३७] "ज्यांची निष्ठा देव, परलोक, नीति, अनीति हचा विषयी अशी 'धार्मिक' छापाची मुळांतच नाही, सृष्टिनियमाच्या अबाधित कार्यकारणभावास देवाच्या काल्पनिक प्रसन्नतेने वा रोषाने बदलून घेण्याची आशा ही भाबडचा माणसाची सुखस्वप्ने असून, त्यादृष्टीने होणारी व्रतवैकल्ये ही मुळातच लटकी आहेत, असा ज्यांचा ठाम सिद्धांत झालेला आहे, त्यांचा या विषयीशी संबंध पोचत नाही. ते व्रतवैकल्ये यांच्या पलिकडे गेलेले; त्यांना व्रताची निवड करण्याचा विवेक सांगणे मूलतःच असंबद्ध होणार." या संबंधात सावरकर समाजातील व्यक्तीचे तीन वर्ग पाडतात. अत्यंत पोथिनिष्ठ असा धर्मभोळा वर्ग; नितांत विज्ञाननिष्ठ असा प्रत्यक्षवादी वर्ग आणि या दोन्हीच्या मधला वर्ग. व्रते पाळायचा विवेक या मधल्या वर्गातील लोकांसाठी आहे. कारण बाकीचे दोन वर्ग परस्पर विरुद्ध अर्थाने या विवेकाच्या पलिकडे गेलेले आहेत. हा मधला वर्ग धार्मिक असूनही धर्मभोळा नाही, विज्ञान-निष्ठ नसला तरी बुद्धिवादास अगदीच पारखा नाही, असे सावरकर म्हणतात. ते स्वतः नितांत विज्ञाननिष्ठ प्रत्यक्षवादी वर्गातील असल्यामुळे व्रताची निवड कर-ण्याचा त्यांना स्वतःला प्रश्नच नव्हता. या व्रताचे वैयर्थ्य माहीत असूनही अितरांना

ते अशी निवड करायला सांगतात, यातील विरोधाभास आपण नीट समजून घेतला पाहिजे.

सारांशाने, आपल्याला असे म्हणता येईल की, जी व्रते प्रत्यक्ष सिद्ध झालेल्या सत्याच्या विरोधी अनुमाने व परिणाम गृहीत धरतात, ती असत्य म्हणून अजिबात सोडून दिली पाहिजेत. उरलेल्या व्रताला प्रत्यक्ष लाभाची कसोटी लावून तो लाभ होत असेल, तर ती पाळायला हरकत नाही. ऐहिक लाभ अधिक तीच आधी निवडावी. स्वतःपेक्षा इतराचा, समाजाचा, राष्ट्राचा ऐहिक लाभ ज्यानी होत असेल ती सर्वात आधी निवडली पाहिजेत, असे सावरकरांचे धोरण आहे. ते म्हणतात,[७४] "प्रत्येक व्रतास जी कसोटी लावायची ती ही की, ज्या व्रताने या लोकी स्वतःचा, स्वतःच्या राष्ट्राचा वा एकंदर मनुष्यजातीचा काहीतरी प्रत्यक्ष लाभ होतो आहे की नाही ? तसा प्रत्यक्ष लाभ होत असेल, तर त्या व्रतवैकल्यात दडवला जाणारा काल नि धन काहीतरी सत्कार्यी लागले असे समजावे, नाहीतर ही व्रतवैकल्ये अशा रुपाने करुच नयेत." आणि याचे कारण अगदी उघड आहे की, पारलौकिक लाभ हे निव्वळ काल्पनिक व भासमान लाभ असून, जर त्याच्याच जोडीने ऐहिक लाभ मिळणार नसेल तर ती व्रते व्यर्थ आहेत.

तडजोड व्यक्तीशी

पारलौकिक लाभासाठी करावयाच्या कर्मामध्ये जो काही पैसा खर्च होईल, तो अनाथालयास दिल्यास सर्वोत्कृष्ट पुण्य लाभते, असे सावरकर म्हणतात. त्यांच्या चातुर्मास्थ कथेतील कमला, रखमाबाई, सकुताई, सिताबाई इ. सर्व शेवटी असा निर्णय करतात की, पारंपारिक व्रते सोडून देवून कुणी शंभर अनाथ लेकरांकरिता कापड देईल, कुणी अनाथाश्रमात जावून मुलांची सेवा करील, कुणी त्या आश्रमास भाजीपाला पुरवील. सावरकरांचे पारलौकिक विचार हे असे आहेत. दानच द्यायचे तर श्रमदान करा, देशसेवा करा. धनदान असेल तर ते सामाजिक संस्थांना द्या. सावरकरांच्या पारलौकिक धर्माची ही शिकवण आहे, हे समजून घेतले पाहिजे. असे व्रत करावयाचे नसेल तर ती व्रतेच करु नका, असेही त्यांनी बजावून ठेवले आहे.

या सावरकरांच्या भूमिकेमुळे, ही भूमिका नीट समजून न घेतल्यामुळे, त्यांच्याविषयी अनेक गैरसमज निर्माण झाले. सावरकर हे नुसते बुद्धिवादी विचारवंत असते, तर अशा गैरसमजाला वावच राहिला नसता. ते प्रत्यक्ष सुधारणा करणारे कर्मयोगी होते, सुधारक होते, पुढारी होते. सद्यःस्थितीतील अंधश्रद्ध समाज आणि सावरकरांच्या कल्पनेतील बुद्धिवादी समाज, यातील महदंतर एका रात्रीत कमी होणारे नव्हते. ती एक विशिष्ट गतीने, टप्याटप्याने होणारी सुधारणा होती. या संक्रमण काळात लोकांच्या मनात ज्या श्रद्धा-अंधश्रद्धा असतात त्यांच्याशी सुधारकानी काय धोरण ठेवावे, हा नेहमीच वादाचा मुद्दा राहिलेला

आहे. ज्या गोष्टी आपल्याला नष्ट करायच्या आहेत त्या गोष्टीशी, व ज्यांच्या संबंधात हव्या गोष्टी आहेत त्या व्यक्तींशी, समाजाशी सुधारकाने कसे वागावे, कोणते धोरण ठेवावे, हा फार महत्वाचा प्रश्न आहे. अशा वेळी प्रश्न आपण अंधश्रद्धेवर किती कठोर प्रहार करतो, हा नसतो. स्वतः किती प्रखर बुद्धिवादी आहोत हाही नसतो. लोकांशी कसे वागावे, त्यांना बुद्धिवाद कसा पटवून द्यावा, त्यांना विशिष्ट ध्येयाकडे कोणत्या मार्गाने घेवून जावे, त्यांच्याशी कोणत्या भाषेत बोलावे–हाच प्रश्न मुख्य असतो, ही गोष्ट आपण लक्षात ठेवली नाही, तर सावरकरांचा बुद्धिवाद आपल्याला गोंधळात टाकल्याशिवाय राहणार नाही.

प्रा. नरहर कुरुंदकरांचे पुढील विचार आम्हाला अत्यंत मार्गदर्शक वाटतात. ते म्हणतात, [३८] "माझा देवावर विश्वास नाही. माझा धर्मावर विश्वास नाही. पण देव आणि धर्म यावर विश्वास असणारे लाखो लोक माझ्या भोवती आहेत. त्यांच्यावर तुटून पडण्यावरही माझा विश्वास नाही. माझ्याबरोबर खेचून नेण्यासाठी आवश्यक असणारी व्यावहारिक तडजोड करण्यास मी तयार आहे. विचारात मात्र करणार नाही. याचे कारण असे की, विचार हे तुम्हाला कुणीकडे जायचे आहे, याची दिशा दाखविणारे असतात आणि व्यवहार हे तिथपर्यंत तुम्हाला टप्प्याटप्प्याने खेचून नेण्यासाठी असतो." सावरकरांची भूमिका हीच आहे का नाही, हेच येथे आपणाला समजून घ्यायचे आहे. अर्थात् ही अडचण ज्याला समाजाला पुढे खेचून न्यायचे आहे, त्या कार्यकर्त्यासमोरील वा पुढाऱ्यासमोरील आहे; नुसतेच विचार मांडणाऱ्या विचारवंतासमोरील नव्हे !

जुन्या भाषेत नव्या कल्पना

सावरकरांच्या नाटकातील, कथा–कादंबऱ्यातील पात्रें देव हा शब्द सर्रास वापरत असतात. हा देव शब्द ते वापरतात, कारण लोकांना तो समजतो. मात्र या देवाला ते स्वतःला राष्ट्रीय अर्थ देतात. त्यांची मूर्तिपूजेवर श्रद्धा नाही, पण ते बौद्धिक मूर्तिपूजा मानतात. देवश्रद्धेचा, मूर्तिपूजेचा, वेदांतकल्पनेचा, अध्यात्मश्रद्धेचा किंवा अवतार कल्पनेचा आपल्या ऐहिक राष्ट्रीय हितासाठी सावरकर वापर करताना दिसतात. त्यांच्या एका कथेतील रखमाबाई म्हणते, [३९] "हिंदुसंघटना हाही एक देव आहे बरं. गणपति–म्हणजे गणाचा पति, संघटनाचा देव. अग, आम्हास कळत का नाही हे ? पण आही आपली जुनी माणसं. तुमच्या नव्या कल्पना आम्हांला आमच्या जुन्या भाषेतच सांगितल्या म्हणजे लवकर पटतात हो." आपण देव–धर्माची भाषा का वापरतो याचेच स्पष्टीकरण रखमाबीच्या तोंडून सावरकरांनी दिले आहे. या त्यांच्या जुन्या भाषेमुळे आपली दिशाभूल होवू देवू नये, याची काळजी आपण नेहमी घेतली पाहिजे.

सत्यनारायणाचा सावरकरांनी यथेच्छ उपहास केला, विडंबनही केले. त्यांची भाषा पहा:[४०] "ज्या ज्या संकटातून आपणास सोडविले म्हणून देवाचा सत्यनारायण करतो, त्या त्या संकटात आपणास ढकलतो कोण? तोच सत्यनारायण, तोच देव! जो प्रथम आपला गळा कापतो नि नंतर त्यास मलम लावतो, त्याची मलम लावण्यासाठी पूजा करायची, तर प्रथम गळा का कापलास म्हणून त्याची आधी यथेच्छ शोभा करायला नको काय?" सत्यनारायणाची अशी शोभा करणे चालू असतानाच, म्हणजे त्याच काळात, सावरकर सत्यनारायणाचे कार्यक्रम घेत असत, ही अंकणाऱ्याला मोठी गमतीची गोष्ट वाटते. सावरकरांच्या या सत्यनारायणाचे स्वरुप आता आपण समजून घेवू. रत्नागिरीला असताना समाजसुधारणेच्या कार्यक्रमात सत्यनारायणाचा त्यांनी समावेश केलेला होता. अस्पृशाच्या वस्तीत हे सत्यनारायण होत, तेव्हा त्यासाठी ब्राह्मण पुरोहित मिळाला नसला की, सावरकर स्वत: पितांबर नेसून पौरोहित्य करीत. सहभोजनासाठी निमित्त म्हणून हा सत्यनारायण होई. पूर्वास्पृशांच्या हस्ते सत्यनारायणाची पूजा करणे, हा त्यांचा एक कार्यक्रम होता. अशा वेळी मग सावरकर समाजसुधारणेवर भाषण करीत.

अशा वेळेस केलेल्या भाषणात ते काय बोलत याचा एक नमुना पहा[४१]: "सत्यनारायण पोथीत वर्णिलेले सर्व नवस वैयक्तिक आहेत. कोणाला मुलगा नव्हता, कोणाचे जलयान समुद्रात बुडू लागले; नारायण त्याला पावला. आता आपणही त्या पोथीस, एक राष्ट्रीय नवस करुन, राष्ट्रीय कार्यांना देवांना आपल्या प्रयत्नाने पावावयास लावून, नवा अध्याय जोडला पाहिजे. एक व्यक्ति नव्हे, तर ही हिंदू जातची जात निःसंतान होवू पाहत आहे. एक तारू नव्हे, तर ह्या राष्ट्राचे नौसाधनाचे नौसाधन; एक राजाच नव्हे तर उभे राष्ट्र, त्याची सत्ता, संपत्ती धुळीस मिळाली आहे. तिला तारण्याचे नवस आता सत्यनारायणाशी करण्यास शिकले पाहिजे. आणि मग आपल्या यत्नाने हे नवे नवस यशस्वी झाले की, तो यशस्वी अध्याय या पोथीस जोडला पाहिजे." सत्यनारायणाला व तो करणाऱ्यांना नुसत्या शिव्या दिल्याने त्याची पूजा थांबत नसते. या सत्यनारायणाची दिशा व स्वरुप बदलविणे, हेच जुन्या अर्थाच्या सत्यनारायणाला थांबविण्याचा मार्ग असतो, हे समजून घेतले पाहिजे. सांस्कृतिक मूल्याची व जीवनाची उत्क्रांती याच मार्गाने होत असते. सावरकरांचा सत्यनारायण दैवाचा भाग नाही, तर प्रयत्नाचा आहे. तो वैयक्तिक नवसासाठी नाही, तर राष्ट्रीय नवसासाठी आहे. अशा कार्यक्रमाचा कुशलतेने वापर करून लोकांना राष्ट्रीयत्वाचे धडे दिले गेले पाहिजेत, हा विचार या मागे आहे. देवलसी माणसांना देशलसी बनविण्याचा हा प्रयत्न आहे. हा धार्मिक सत्यनारायण नसून राष्ट्रीय सत्यनारायण आहे, बौद्धिक सत्यनारायण आहे.

अशा वेळेस लगेच सावरकर तेथल्या तेथे एखादा असाच नवा नवस करत.

एक नमुना पहा[४१] : " रत्नागिरी नगरीत पूर्वास्पृश्यास अहिंदू येतो तेथपर्यंत तरी येवू देणारे ५० घरधनी निघतील आणि गोमंतक वसईकडे तीन सहस्र लोक तरी तीन चार वर्षांत शुद्ध होतील, तर हे सत्यनारायणा, तुझा एक सत्यनारायण आम्ही रत्नागिरीस करू. एक अगदी लहानसा पण कठीण स्थानिक नवस आणि दुर्वट राष्ट्रीय नवस या देवापाशी सध्या याचित आहे. सत्यनारायण तेवढा तरी लवकर पुरवो. " सावरकरांचा सत्यनारायण व त्यांचे नवस हे असे आहेत. या सत्यनारायणाचा नि मूळच्या भक्तांच्या मनातील सत्यनारायणाचा नावाशिवाय दुसरा कोणताच संबंध नसतो. त्यांचा सत्यनारायण राष्ट्रीय आहे, नवस राष्ट्रीय आहे, पोथी राष्ट्रीय आहे, स्वरूप सार्वजनिक– फक्त नाव आणि कार्यक्रम तेवढा धार्मिक आहे !

सावरकरांनी व्यक्तिशः स्वतःसाठी सत्यनारायण कधीही केला नाही.[४२] अ. ह. गर्दे यांच्या झुणकाभाकर सत्यनारायणाला मात्र सावरकर आवर्जून उपस्थित राहत असत. तेथे सहभोजनात भाग घेत. त्यांचा सत्यनारायण सार्वजनिक उत्सवासारखा असायचा. लोकांच्या हृदयाजवळ समाज सुधारणा नेवून ठेवण्याचा त्यांचा हा एक मार्ग होता. सावरकर म्हणत की, "वाफेचे क्रिया शक्तीत रुपांतर झाले नाही, तर ते वाफ निर्मितीचे श्रम जसे व्यर्थ, तसेच उत्सवात उत्पन्न होणाऱ्या चेतनेचे क्रियेत रुपांतर न करिता नुसते उत्सवच करीत राहणाऱ्या लोकांचे श्रमही विफल होत. असे उत्सव देवाचे असले तरी ते एक व्यसनच होय"[४३] धार्मिक वाटणाऱ्या उत्सवाचा सावरकरांचा हेतू येथे स्पष्ट झालेला आहे. हा उत्सव महत्वाचा नाही; त्यातील देव महत्वाचा नाही; त्यातून मिळणारी प्रेरणा महत्वाची आहे. ती प्रेरणा घेवून समाजाची–राष्ट्राची सेवा करा, असे सावरकरांचे आग्रहाचे सांगणे आहे. रत्नागिरीला वसंत व्याख्यानमालेत ते भाषण करावयला गेले. तेथे बोलले काय तर 'आता मला वसंत व्याख्यानमाला नको, तर वसंत कार्यमाला हवी.' म्हणून आता ती गुंका.[४४] साहित्य संमेलनात जावून आता अशी संमेलने नकोत, मला सनिक पाहिजेत, असा त्यांनी केलेला उपदेश याच भूमिकेतून आहे. आपल्याला पसंत नाही, त्याही ठिकाणी जायचे व तेथे आपले परखड विचार मांडून त्या कार्यक्रमाचे स्वरूप पार बदलून टाकायचे, ही त्यांची पद्धत सर्वच क्षेत्रात आहे. या सर्व गोष्टींचा ओघ राष्ट्रहिताकडे कसा बळवावा, हीच त्यांना मुख्य चिंता आहे.

राष्ट्रीय यज्ञ

यज्ञावर सावरकरांनी मनसोक्त टीका केलेली आहे. बुद्धाप्रमाणे या यज्ञाला गंगेत विसर्जित करणे हाच खरा हिंदुधर्म असे त्यांनी म्हटलेले आहे. हा त्याज्य ठरलेला यज्ञ स्वतः सोवळे नेसून त्याच काळात सावरकर करत असत. या संबंधात १९३२ मधील एका प्रसंगाची बाळाराव सावरकरांनी सांगितलेली माहिती

अशी[४५] : "या सहभोजनाच्या आदल्या दिवशी... अखिल हिंदुयज्ञ झाला. यजमानपदी वीर सावरकर आणि सौ. यमुनाबाई सावरकर यांची योजना झालेली होती. सावरकर सोवळे नेसून बसले होते... दोन तास यज्ञ चालू होता. अनेक लोक यज्ञ पाहून गेले. शेवटी सावरकर म्हणाले, हिंदू बंधूनो, आजवर ब्राह्मणाजवळ वडील भावाच्या नात्याने रक्षणासाठी दिलेले, किंवा काहीच्या मते त्यांनीच लुबाडून घेतलेले हे वेद, ही यज्ञसंस्था आम्ही सर्व हिंदूच्या हाती सोपवित आहोत. आता तुम्ही तिचे रक्षणकर्ते व्हा.... तुम्ही आपसातील वैर विसरुन आपली उन्नती करुन घ्या" वरवर पाहणाऱ्याला ही मोठी गमंत वाटते. अशा त्यांच्या त्यागण्यामुळे आपल्यासमोर एक कोडे पडते. या नव्या यज्ञाचा आपल्या जुन्या यज्ञाशी नावापुरताच संबंध असतो, हे आपल्या लवकर लक्षातच येत नसते.

चार समिधा

१९४२ मध्ये खामगावला संत पाचलेगावकर महाराजांनी महायज्ञ केला. एक लाखाहून अधिक हिंदू पंथ, जात, भेद विसरुन आले होते. तिथे मोठे सहभोजन झाले. त्या यज्ञाला सावरकरांनी भेट दिली होती. त्यांनी तेथे लाखो लोकांसमोर सर्वांच्या साक्षीने यज्ञावर भाषण दिले.[४६] हा राष्ट्रीय यज्ञ आहे, असे सांगून त्या यज्ञात चार समिधा आपल्याला अर्पण करावयाच्या आहेत, असे सांगितले. त्या चार समिधा अशा : पहिली, अेकटे हिंदू स्वराज्य मिळवू शकणार नाहीत या स्वत:वरील अविश्वासाची समिधा. दुसरी, अस्पृश्य या शब्दातील 'अ' या अक्षराची समिधा. तिसरी, शुद्धीविषयीच्या प्रतिकूल भावनेची समिधा. आणि चौथी, पारतंत्र्याची समिधा. या चार समिधांचा होम करण्यासाठी हा यज्ञ आहे, असे सावरकर म्हणाले. या चार समिधा या यज्ञात टाकून तो प्रज्वलित करा, असे त्यांनी आवाहान केले. सावरकरांचा राष्ट्रीय यज्ञ हा असा आहे !

वेद आणि यज्ञसंस्था या वैदिकांच्या श्रेष्ठ व पवित्र गोष्टी होत्या. क्षत्रियांना सुद्धा वेदोक्ताचा अधिकार विसाव्या शतकातले लो. टिळकांसारखे पुरुषही तयार नव्हते. तेव्हा वेद आणि शुद्र यांच्या संबंधाबद्दल सामान्यांना काय वाटत असेल, याची कल्पना करता येते. सर्व हिंदूना वेद मुक्त झाले पाहिजेत, हा सावरकरांचा आग्रह होता. त्यांना तोडावयाच्या होत्या त्या सप्त स्वदेशी शृंखलामध्ये पहिला क्रम वेदोक्तबंदी तोडण्याचा होता. आता प्रश्न हा आहे की, वेदालाच कपाटात बंद करुन ठेवायला सांगणारे सावरकर वेदोक्तबंदी तोडण्याचा पुरस्कार का करतात ?

वेद कपाटात बंद करुन ठेवायचे तर मग वेदोक्तबंदी उठली काय नि न उठली काय सारखेच आहे, असे आपले सरळ गणित असते. सावरकरांचे गणित एवढे सरळ नसते. वेदोक्तबंदी उठविण्याचा हेतू वेदाचे प्रामाण्य स्वीकारण्यासाठी नव्हता. प्रामाण्य या अर्थी त्याचा व्यवहारात उपयोग करण्याचा नव्हता. मुख्य प्रश्न वेदांवरील सर्व वर्णियांचा सारखाच हक्क प्रस्थापित करणे हा होता. सावरकर

चातुर्वर्ण्यच मानत नव्हते, तर मग वर्णियांच्या हक्कांचा विचार का करतात, हा प्रश्न उपस्थित करता येतो. नष्ट करत असतानाच, जो पर्यंत, हे वर्ण शिल्लक आहेत त्या संक्रमणकाळात, त्यातील एखाद्या वर्णाचा अतिराशी समान हक्क दाखविण्याचा प्रश्न बुद्धिवाद्यालाही विचारात घ्यावाच लागतो. वेदाचे विसर्जन करायचे, तर ते सर्वांना सारखा हक्क प्रस्थापित करुन सर्वांच्या हाताने करणेच न्यायोचित होते. सावरकरांच्या समोरचा प्रश्न हा असा न्याय देण्याबद्दलचा होता. प्रामाण्य या अर्थी वेदांचा आता उपयोग नाही, हे सावरकरांचे मत झाले. सर्वांचे असे मत होईपर्यंत त्या वेदाबद्दल कोणती भूमिका ठेवावी, हा सावरकरांसमोरचा प्रश्न होता. म्हणून शूद्रासहित सर्वांना वेद मुक्त करणे सामाजिक न्यायाच्या दृष्टीने सावरकरांना भाग वाटले. आता वेदांचे प्रामाण्य व पावित्र्य संपले, ते आता कालबाह्य झाले असे सांगून ब्राह्मणाच्या हातानेच त्यांची रवानगी ग्रंथालयात करणे, म्हणजे वेदोक्तबंदीवर विज्ञानाने शिक्कामोर्तब करणे होते. सावरकरांना ही पळवाट पसंत नव्हती.

वेदोक्त बंदी

वेदोक्तबंदी उठविण्यामागे सामाजिक न्यायाच्या हेतू बरोबर दुसराही एक हेतू होता. ऐतिहासिक दृष्टीने बाचायचा वेदग्रंथ हा आमचाच आहे; आमच्याच पूर्वजांनी रचलेला आहे; तो आमच्या राष्ट्राचा मूलग्रंथ आहे; तो आमचा राष्ट्रीय परंपरेचा वारसा आहे, ही राष्ट्रीय एकात्मतेला पूरक असलेली भावना सर्वांच्याच मनात निर्माण करणे, हाही हेतू यामागे होता. वेद व्यवहारात मार्गदर्शनासाठी निरुपयोगी होते, पण राष्ट्राचा ऐतिहासिक ठेवा, एकात्मता निर्माण करणारा एक समान घटक या नात्याने ते उपयोगीच होते. सामाजिक गणिते सोडविण्याची सावरकरांची एक विशिष्ट पद्धत आहे. दोन पद्धतीने सारखेच उत्तर येत असेल, तर या पैकी ज्या पद्धतीने अितर फायदे अधिक होतात किंवा अनायसेच अितर काही गणिते सुटतात, ती पद्धत गणित सोडविण्यासाठी सावरकर वापरत असतात. सामाजिक सुधारणा करताना वा लोकांना बुद्धिवाद शिकविताना सावरकर हीच पद्धत वापरतात. ज्यामुळे राष्ट्रीय एकात्मता बळकट होईल, अशा दृष्टीने सामाजिक सुधारणा करण्याच्या दोन मार्गांपैकी एकाची ते निवड करतात. वेद विसर्जन करायचे तर ब्राह्मणाच्याच हाताने न करता सर्वांच्या हाताने करणे, या कसोटीप्रमाणे सावरकरांना भाग वाटले. वेद विसर्जन असो, की यज्ञाला गंगेत टाकायचे असो, ज्यांना या गोष्टींचा आतापर्यंत लाभ मिळाला नाही– मिळू दिला नाही, त्यांच्या हातात या गोष्टी देवूनच, त्या सर्वांच्या हातानेच या गोष्टी गंगार्पण करणे सावरकरांना कर्तव्य वाटते. यासाठीच ते यज्ञ करतात; त्या यज्ञाला चांभार-महार-भंगी सर्वांना बोलवतात; तेथे वेदोक्तबंदी तोडतात. हे वेद आपणा सर्वांचे आहेत, असे सांगतात. नंतर यज्ञाचा नवा अर्थ सांगतात. आत्मयज्ञ हाच खरा

यज्ञ म्हणतात. ह्या यज्ञाचे ते प्रतिक आहे, असे सांगतात. वेदांचे धार्मिकत्व काढून घेतात. त्यांना राष्ट्रीय ग्रंथ बनवतात. वेदमंत्राला राष्ट्रगीत बनवतात. लोकांच्या मनातील जुन्या श्रद्धांना अशी नवी राष्ट्रीय दिशा देतात.

शंकराचार्यांसाठी

वेद-यज्ञ यावद्दल सावरकर अशी आदराची भूमिका घेत असल्यामुळे, त्यांच्या मदतीला डॉ. कुर्तुकोटी शंकराचार्य येतात, संत पाचलेगावकर महाराज येतात, आर्यसमाजाचे विद्यावाचस्पती श्री वालावकर येतात, मसूरकर महाराज येतात, हजारो लाखो लोक जमा होतात. या सर्वांच्या उपस्थितीत धार्मिक भाषेत सावरकर आपला बुद्धिवाद मांडतात. धार्मिक लोकांच्या संपर्काने वा धार्मिक भाषेने बुद्धिवाद विटाळतो, याही अस्पृश्यतेवर सावरकरांचा विश्वास नाही. म्हणून कोल्हापूरचे क्षात्र-जगद्गुरु शंकराचार्य 'वैदिकधर्म' या विषयावर सावरकरांच्या उपस्थितीत भाषण देण्यासाठी रत्नागिरीला येतात. "वीर सावरकरांनी गेल्या पाच वर्षात रत्नागिरी-ला जे स्थित्यंतर घडवून आणले ते पाहून 'वीर पुरुष परिस्थिती निर्माण करतो' हे कार्लाईलचे मत खरे असल्याचे मला पटू लागले आहे." असे त्यांच्या कार्याचे कौतुक करतात.[४७] त्यांच्या उपस्थितीत सावरकर मग लोकांना सांगतात, "अन्य जातींना वैदिक मंत्राचा अधिकार देण्यास ब्राह्मण सिद्ध नव्हते, म्हणून ते अधिकार घेण्यासाठी शाहू महाराजांनी क्षात्रजगद्गुरु हे पीठ स्थापन केले. आता आमच्या यज्ञाने आम्ही अशी घोषणा केली आहे की, वेदासंबंधी किंवा धर्मासंबंधी सर्व अधिकार अखिल हिंदूना प्राप्त होवू शकतील." समाजसुधारणा सावरकर एकटेच करत नसतात. बुद्धिवादी लोकांची वेगळीच एक जात बनवत नसतात. या आपल्या कार्यासाठी ते शंकराचार्यांपासून झाडून साऱ्या संताना, महाराजांना, या कामाला जुंपून देतात. वेद कपाटात बंद करा म्हणून एकीकडे लेख लिहितात नि लगेच प्रत्यक्ष शंकराचार्यांकडून जाहीर सभेत आपली पाठ थोपटून घेतात, हजारो सनातन्यांच्या टाळ्या मिळवितात. या निमित्ताने त्यांच्या अंतःकरणात ते हळूच शिरतात. हे ममत्व वाटावे म्हणून वेदाचा आदर करतात, थोडेसे निरुपद्रवी कौतुकही करतात. वेदाचा–यज्ञाचा 'ऐतिहासिक आदर, पण व्यावहारिक निषेध' हे सूत्र मात्र ते कधीही सोडत नसतात.

१९५३ मध्ये पुणे येथे एका पिठाच्या शंकराचार्यांच्या उपस्थितीत सावर-करांचे भाषण झाले. शंकराचार्यांना देखत वेदांना शिव्या द्यायच्या नसतात, हा विवेक पाळण्याइतके सावरकर सुसंस्कृत होते. शंकराचार्य असल्यामुळे ब्रह्मवृंदानी वेद घोष करुन प्रार्थना केली. आपल्या भाषणात वेदाचे कौतुक करताना सावरकर म्हणाले,[४८] "मी येथे आलो तेव्हा ब्रह्मवृंदानी पवित्र वेदघोष करुन प्रार्थना केली, ती ऐकून मला आनंद वाटला." 'पवित्र' शब्द वापरल्याने बुद्धिवाद विटाळतो, हे सावरकर मानत नसतात. मातृभूमीही त्यांना पवित्रच वाटत होती.

आपल्या पूर्वजांना वेदघोष पवित्रच वाटले होते. तेथे ऐकणाऱ्या हजारो लोकांना ते पवित्रच वाटत होते. पवित्र म्हणजे पूज्यभाव, प्रामाण्य नव्हे. हा ऐतिहासिक अभिमान जागृत झाला की आनंदच वाटणार. सावरकरांनी तोही व्यक्त केला. सावरकर पुढे म्हणाले, "या प्रार्थनेत आपले राष्ट्रगीत सामावलेले आहे." श्रौत्यांच्या अंतःकरणात शिरण्याचा ममत्वाचा मार्ग एकदा तयार झाला की, मग सावरकर त्यांच्या अंतःकरणात राष्ट्रप्रेमाची नि बुद्धिवादाची एक एक गोष्ट घालू लागतात. वेद गीताला ते राष्ट्रगीत म्हणतात. "हा अमृत कलश आपण सर्वांना वाटून देण्याची वेळ आता आली आहे... आपण उदारमनाने ही विद्या राष्ट्राच्या मालकीची विद्या करावी, तिचा आनंद सर्वांना मनमोकळेपणाने घेवू द्यावा." असे ते आवाहन करतात. वेद हा एक राष्ट्रीय ग्रंथ आहे, या भूमिकेतून आपले विचार मांडतात.

वेद हा राष्ट्रीय ग्रंथ असल्यामुळे त्याबद्दलची पूज्य बुद्धी शिल्लक ठेवली पाहिजे असे त्यांना वाटते. मग ते वेदाचे थोडे कौतुक करतात.[४७] "वेदात जे ओज आहे, गंभीर अर्थ आहे, तो जर कळला तर वेदविद्या जिवंत ठेवायची की नाही, हा प्रश्नच येणार नाही. वेदविद्या गेली तर हिंदुत्व गेले. वेदविद्या संसाराच्या सर्व गोष्टीचे मूळ आहे. वटवृक्षाचे बीज लहान असले तरी वृक्ष प्रचंड असतो. त्या प्रमाणे वेदात औद्योगिक, राजकीय, सामाजिक, आर्थिक थोडक्यात म्हणजे संपूर्ण जैवनिक (द होल लाईफ ॲज सच) तत्वज्ञान आहे." सावरकरांच्या साऱ्या आयुष्यात त्यांनी वेदाची महती यापेक्षा अधिक कुठेही गाओलेली दिसणार नाही. वेदाला राष्ट्रीय ग्रंथाच्या पदवीस चढविण्यासाठी त्यांनी ही भूमिका मांडलेली आहे. एका पीठाचे शंकराचार्य तेथे हजर आहेत, याची जाणीव ठेवून अशा प्रसंगी सावरकर हे बोलत आहेत, हे समजून घेतले पाहिजे. शंकराचार्यांना राष्ट्रकार्याला जुंपण्यासाठी सावरकर वेदाचे हे माहात्म्य वर्णन करत आहेत. तुमच्या या वेदासाठीच आता राष्ट्रकार्य करा असे त्यांना सांगायचे आहे. वेदाच्या मार्गाने तुम्ही राष्ट्राकडे या– आम्ही हिंदुत्वाच्या मार्गाने येतो, असे त्यांना सांगायचे आहे. म्हणून वेदविद्या नि हिंदुत्व याचे समीकरण ते येथे मांडतात. 'हिंदुत्व' या ग्रंथात सुद्धा सावरकरांनी वेदविद्येचे नि हिंदुत्वाचे समीकरण करण्याचा विचार कुठेही मांडलेला नाही, तो येथे का मांडला हे समजून घेतले पाहिजे. शंकराचार्य हचा पीठाशी तडजोड करण्याचा हा प्रयत्न आहे. या पीठाची शक्ती त्यांना राष्ट्रकार्याकडे वळवायची आहे. त्यामुळे शंकराचार्यांचे काही निरुपद्रवी मुद्दे सावरकरांनी येथे मान्य केले आहेत, एवढाच याचा अर्थ आहे.

शंकराचार्य कर्तव्यच्युत

वेदमंत्र म्हणजे 'आर्याचे पहिले राष्ट्रीय गीत आहे' या मुख्य मुद्द्यावर मग सावरकर बोलतात. शंकराचार्यांना उद्देशून शेवटी सावरकर म्हणतात, आज

भारतात चार शंकराचार्य आहेत. पण मिशनऱ्यांनी जर दुष्काळात अन्यछत्रे चालविली, तर अेकाही शंकराचार्यांनी तसे का केले नाही ? काही संत मंडळींनी यासंबंधी गौरवपर कार्य केले आहे. शंकराचार्य आणि अितर संत मंडळी यांचे लोकांनी अितके दिवस पोट भरले, आता धर्मरक्षणासाठी पुढे येण्याचे त्यांचे कर्तव्य आहे. अितर संतानी ज्याप्रमाणे प्रत्यक्ष काम करुन उपदेश केला, त्या प्रमाणे तुम्ही करा. आता एका पीठाचे शंकराचार्य येथेच आहेत. त्यांचेविषयी आदर नि पूज्यभाव बाळगूनही त्यांनी कर्तव्य केले नाही, असेच म्हणावे लागते.'' शंकराचार्यांची कान-उघडणी करुन त्यांना प्रत्यक्ष कार्याला लावायचे असेल, तर त्यांच्यासमोर थोडेसे वेदाचे माहात्म्य वर्णन केले तर फारसे बिघडत नाही, हे आपण समजून घेतले पाहिजे. सावरकर वेदविद्येशी करीत असलेल्या तडजोडीचे हे स्वरुप समजून घेतले पाहिजे. वैदिक धर्माची सावरकरांनी शिकवण दिली, याचा पुरावा म्हणून या भाषणाकडे पाहणे मूलतःच चुकीचे ठरते.

सावरकरांच्या या वरुन धार्मिक नि आतून बुद्धिवादी असलेल्या कार्यक्रमाने सनातन्याचे धाबे दणाणत असे. त्या वेळेसची सनातन्यांची प्रतिक्रिया कशी असे याचा वाळाराव सावरकरांनी सांगितलेला एक नमुना पहा :[७५] '' 'आचार्य आणि वर्णाश्रम धर्म'ने त्याच्या भाद्रपद कृष्ण ११ (१०–९–३२)च्या अंकात सावरकरांनी केलेल्या यज्ञाला 'पाटोक्त गोलंकर यज्ञ', बॅ. सावरकर यांना 'त्रैलोक्य विधिज्ञ,' असे म्हणून पुढे लिहिले आहे, बॅ. तात्यारावांनी आपले पितराचे हव्यकव्य कदाचित् अंदमानात अेकदमच करुन ठेवले असेल, पण त्याच्या प्रभावळीतील काही प्रागतिक ब्रह्मबंधु अल्पस्वरुप श्राद्धादि करणारे आहेत. त्यातील जे प्रागतिक बंधु भंगीबुवाचे चरणावर लोटांगण घालणारे असतील आणि यज्ञामध्ये मनोभावे भाग घेणारे असतील, त्यांनी नूतन ऋत्विजांना आमंत्रण देवून महाल्यादि कृत्ये उरकून घेण्याचे 'महापुण्य' पदरी बांधावे. म्हणजे वेदशाळेतील बहिष्कार घालणारे ब्राह्मण सांगण्याचा खटाटोप तरी नको !'' यज्ञाच्या एका कार्यक्रमाने सावरकरांनी किती गोष्टी साधल्या हे या वरुन पाहण्यासारखे आहे. वेदमंत्र सर्वांना मुक्त केले, कार्यक्रमात सहभोजन करुन रोटीबंदी तोडली, यज्ञाच्या ऋत्विजामध्ये शूद्राचा समावेश केला, भंगीगृहस्थाचे किर्तन करुन ब्राह्मणक्षत्रियांना त्याच्या पाया पडायला लावले. या साऱ्या गोष्टींना परत शंकराचार्यांचा आशिर्वाद घेतला आणि पटवून सांगितले काय तर सर्वांनी भेदभाव सोडून द्या व राष्ट्राकरिता आत्मयज्ञ करा !

पतितपावन मंदिर

मूर्तिपूजेत श्रद्धा नसणाऱ्या सावरकरांनी 'पतितपावन मंदिर' का उभारले, हा आपल्या समोरचा असाच एक प्रश्न आहे. निरीश्वरवादी माणूस असे पतितपावन मंदिर उभारण्याचा खटाटोप करील का कधी ? असा प्रश्न ह. त्यं. देसाअी यांनी विचारला आहे.[४९] मूर्तिपूजक नसणारा माणूस असे कशाला करील, असाही

प्रश्न विचारला जातो. पारलौकिक लाभ मिळविण्याच्या हेतूने बांधलेले हे मंदिर आहे, असे समजल्यामुळे भल्याभल्याचे घोटाळे झालेले आहेत. पारलौकिक लाभात श्रद्धा नसणारा हा माणूस मंदिर का उभा करीत आहे, याचा कुणी विचारच केला नाही. सावरकरांनी हे मंदिर उभे करुन फार मोठी सामाजिक क्रांती केली, कारण शूद्रांना मंदिर प्रवेशाचा हक्क त्यांनी मिळवून दिला, असे मूल्यमापन आतापर्यंत केले गेले आहे. सावरकरांप्रमाणेच या मंदिरालाही आम्ही नीट समजून घेतले नाही.

भंडारी जातीचे भागोजी कीर हे सधन शिवभक्त होते. पण त्यांच्या जातीमुळे त्यांना शिवाच्या मूर्तीला शिवण्याचा अधिकार नव्हता. त्यासाठी त्यांनी स्वतःसाठी भागेश्वराचे मंदिर बांधले होते. कीरांनी त्यांची व्यथा सांगितल्यावर सावरकरांनी कीरांना उपदेश केला की,[७६] "ब्राह्मण पुजाऱ्यानी आपण भंडारी म्हणून देवपूजा बांधू दिली नाही, हा खरोखर मोठा अन्याय झाला असे मीही तेव्हाच निःसंकोचपणे म्हणेन की, जेव्हा आपण तसाच अन्याय अितर कोणावर करणे सोडून द्याल." आणि यासाठी आपणही अितरावर असाच अन्याय करणे सोडून द्यावे, असा बुद्धिवाद ते कीरांना शिकवितात. "ब्राह्मण भंडाऱ्यास देवळात घेत नाहीत ! आपण धनवान, स्वतंत्र देवूळ बांधलेल. हे महार निर्धन. त्यांना देव नाही, देवालय नाही, देवदर्शन नाही" [७६] ही गोष्ट ते कीरांना दाखवून देतात. यातून सुटका करण्यासाठी सर्वांकरिता एक मंदिर बांधावे अशी सूचना त्यांनी केली. पतितपावन जन्माची पार्श्वभूमी ही अशी आहे !

समोर असलेल्या परिस्थितीचा व संधीचा आपल्या धोरणासाठी एक साधन म्हणून सावरकर उपयोग करतात. भागोजी कीर असे मंदिर बांधायला तयार होतात. हे मंदिर बुद्धिवादाच्या दृष्टीनेही अधिकात अधिक निर्दोष व उपयुक्त कसे होअील, याचा ते विचार करतात. मंदिर बांधले, सर्वांना खुले झाले, ज्यांना त्या मंदिरात जावे वाटले ते गेले असते– अस्तित्वात असलेल्या जुन्या मंदिराप्रमाणेच हे मंदिर झाले असते. पण आपल्या हातात असलेल्या या मंदिराला अितके सुखासुखी सावरकर राहू देणे शक्यच नव्हते. हे मंदिर कसे असावे, हे सावरकर ठरवितात. व्रत करायचे ठरले असेल, तर ते कसे करावे हे ज्या कसोटीने सावरकर ठरवून देतात, तीच कसोटी या मंदिरालाही ते लावतात. अस्पृश्यांच्या मंदिर प्रवेशाचा मुख्य प्रश्न सोडविण्यासाठी सावरकरांनी हे नवीन मंदिर बांधले, हे बरोबर नाही. भागोजी कीरांना पटवून सांगण्यापुरती ही गोष्ट खरी आहे, परंतु सावरकरांच्या मनातील हेतू या अर्थी ही गोष्ट खरी नाही. अस्पृश्यांनी त्या देवळात जावून मूर्तीच्या पाया पाडून पारलौकिक लाभाचे धनी होण्यापुरता हा प्रश्न कधीच मर्यादित नव्हता. ते एक प्रासंगिक निमित्त होते. वरवर दिसणारा धार्मिक देखावा होता. या देवळाच्या निमित्ताने सावरकरांनी कोणकोणत्या बुद्धिवादी गोष्टी साध्य करुन घेतल्या याची पाहणी उद्‌बोधक ठरणारी आहे.

तुम्ही दुसऱ्यावर अन्याय करत नसाल तरच तुमच्यावर दुसरा कुणी तसाच

अन्याय करत आहे, ही तक्रार करण्याचा नैतिक हक्क आहे, या न्यायतत्वातून या मंदिराची कल्पना जन्मास आलेली आहे. आपण आपल्या खालच्या जातीतील लोकांना आपल्या मंदिरात येवू देत नाही हे पाप आहे; हे पाप करणारे आपण सारे जणच पतित आहेत, या आत्मनिरीक्षणाच्या तत्वातून हे मंदिर जन्मास आलेले आहे. हे मंदिर स्पृश्यांच्या प्रायश्चिताच्या पायावर बांधायचे होते. या पतिताचा राष्ट्रीय अर्थही सावरकरांना अभिप्रेत होता. सर्व हिंदुसमाजच पतित आहे, अशी त्यांची व्यापक भूमिका होती. परक्याच्या दास्यात तो पिचत पडला आहे, म्हणून तो पतित आहे, असे त्यांना वाटे. या समाजाचा उद्धार जो करील तो 'पतितपावन देव' आहे, असे त्यांचे म्हणणे होते. हिंदुसमाजाचा उद्धार करायचा तर विज्ञान-निष्ठेचाच स्वीकार केला पाहिजे, हे तर ते त्याच काळात कंठशोष करुन सांगत होते. या विज्ञानदेवाचेच पतितपावन देव असे त्यांनी लोकांना समजायला सोपे म्हणून नाव ठेवलेले असावे, असे आम्हास वाटते. फ्रेंच क्रांतीतील God of Reason आणि अमेरिकेतील Statue of Liberty या देवाच्या भव्योदात्त कल्पना त्याच काळात ते मांडत होते. या दोन देवाचे एकत्रिकरण करणारा हा मराठी भाषेतला 'पतितपावन देव' आहे, असे आमचे मत आहे.

विष्णू; शिव नव्हे !

कीरांचे जुने भागेश्वराचे मंदिरच सर्वांना खुले करुन हे काम भागवता आले असते. तसे झाले असते तर फक्त पोरलौकिक लाभाच्या परंपरागत मंदिराचा एक प्रश्न सुटला असता. सावरकरांना अशा मंदिराची गरजच नव्हती. भागोजी कीर हे शिवभक्त होते. त्यांना भक्ती शिवाची करायची होती. या शिवाला बौद्धिक अर्थ द्यायला सावरकरांना अडचण वाटू लागली. त्यांनी शिवाच्या ऐवजी विष्णूची मूर्ती बसविण्याची योजना केली. शिवा पेक्षा विष्णू बरा, असे त्यांना यासाठी वाटले. आग्रा येथीच उमाशंकर अग्रवाल यांना लंडन मध्ये एक शिवमंदिर बांधावयाचे होते. तेही शिवभक्त होते. याबाबतीत सावरकरांना त्यांनी सल्ला विचारला होता. सावरकरांनी त्यांना पाठविलेल्या पत्रात म्हटले आहे,[५०] "आपण तेथे मंदिर बांधण्याचा निर्णय घेतलेला आहे, हे चांगले आहे. पण आपण तेथे शिवमंदिर न बांधता विष्णुमंदिर बांधले तर नाही का चालणार ? शिवमंदिरात पिंडी नि लिंग ठेवावे लागते. त्यापेक्षा चक्र नि गदाधारी विष्णूची सुंदर नि भव्य मूर्ती परकीय लोकांना अधिक वंदनीय नि आकर्षक वाटणार नाही का ? शैव किंवा वैष्णव पंथांच्या प्रेमामुळे मी हे लिहीत नाही, तर पार्थिव नि पुराणे शिवलिंग हे परक्या-च्या चेष्टेचा विषय होवू नये." अग्रवालाची श्रद्धा दुखावली जावून त्यांचा गैरसमज होवू नये; म्हणून सावरकर पुढे लिहितात, "अर्थात् त्याची भीति आहे, असे समजू नका. त्या मध्ये विश्वनिर्मितीचे चिरंतन महान नि आद्यतत्व आहे, असे सांगता येईल, पण खुळचट लोकांना ते पटवित बसण्यापेक्षा विष्णूची शौर्यशाली

नि सुंदर मूर्ति बसविणें मला बरे वाटते" बारा वर्षांनंतरचे (१९४०) हे पत्र असले तरी सावरकरांची ही भूमिका या मंदिर स्थापनेच्या वेळसही पक्की होती. शौर्य आणि सौदर्य याचे प्रतिक म्हणून ते विष्णूची निवड करतात. ही गोष्ट त्यांच्या बुद्धिवादी भूमिकेला अनुसरूनच व स्वातंत्र्याच्या ध्येयाला पोषकच होती.

पतितपावनाची कोनशिला बसविण्याच्या कार्यक्रमातच मंदिरातील मूर्तिबद्दल सावरकर म्हणाले,[९] "आता या मंदिरात साधूंचा संरक्षक आणि दुष्टांचा निर्दालक शंख, चक्र, गदाधारी भगवान विष्णूची लक्ष्मीसह स्थापन करण्यात येईल." तेव्हा सावरकरांची ही विष्णूची निवड हेतुपुरस्सर आहे. राष्ट्राचा उद्धार करणाऱ्या पतितपावन देवाचे विष्णू हे त्यांना प्रतिक वाटले. 'नारदमुनीची पृथ्वीस भेट' या कथेत नारद विज्ञानाला 'विष्णूचा नवा अवतार' म्हणतात. तेव्हा सावरकरांची या विष्णूवर 'शक्ती' का आहे, हे समजून घेतले पाहिजे.

नव्या मंदिराच्या कारभारासाठी त्यांनी विश्वस्तामध्ये एक ब्राह्मण, एक क्षत्रिय, एक वैश, एक अस्पृश्य समाजातील आणि एक कीरांचा प्रतिनिधी यांचा समावेश होता. देवालयाचे सावरकरांनी नियम तयार केले. पूर्वास्पृश्यासहीत सर्वांना हे मंदिर पूजेसाठी मुक्त करण्याचा नियम केला गेला. या नियमात कुणालाही बदल करता येणार नाही, असाही नियम करण्यात आला. कारभाराच्या दृष्टीने हे सार्वजनिक मंदिर आदर्श वस्तुपाठच होते.

महार असो की महाराज

या मंदिरातील मूर्तीची प्रतिष्ठापना शूद्र जातीतील कीरांच्या हस्ते वेदोक्त पद्धतीने करून वेदोक्तबंदी तोडून दाखविण्याचा सावरकरांचा निर्धार होता. कीरांना वेदोक्ताचा अधिकार तत्कालीन धर्मशास्त्री देण्यास तयार नव्हते. शास्त्राप्रमाणे कीरांना पुराणोक्त पूजा करण्याचा अधिकार होता. मूर्ती बसवायची तर वेदोक्त मंत्रासहित कीरांच्या हातानेच, हा तर सावरकरांचा निर्धार पक्का होता. त्यासाठी नासिक व काशीहून धर्मपंडीत आमंत्रित करण्यात आले. परंतु त्यांनी अशा वेदोक्त पद्धतीला शास्त्राधार नाही म्हणून नकार दिला. दोन दिवस या प्रश्नावर चर्चा झाली. दोघेही आग्रही होते. सावरकरांचा आग्रह असा की, "जो हिंदु त्याला वेदोक्ताचा अधिकार असलाच पाहिजे, मग तो महार असो की महाराज!" शास्त्री-पंडितांना हे मान्य होईना. सावरकर माघार घेईनात डॉ. कुर्तकोटी शंकराचार्य हे सावरकरांच्या बाजूचे. पण त्यांचेही शास्त्री-पंडित ऐकेनात धर्मभास्कर मसूरकर महाराज, चौंडे महाराज, पाचलेगावकर महाराज आदी सावरकरांच्या बाजूची महाराज मंडळी तेथे हजर होती. वादविवादाला रंग चढला होता. असा वाद होणारच हे सावरकरांना माहीतच होते. या दोन दिवसात रत्नागिरीला हे जे वेदोक्त प्रकरणाचे रामायण घडले ते जर आपण समजून घेणार नसू, तर सावरकरांनी हे मंदिर का उभे केले हे समजणार नाही. टिळक आणि

शाहू महाराज यांच्यातील वेदोक्त प्रकरणाचा वाद तेवढा आपल्याला माहिती आहे. टिळक कसे प्रतिगामी होते हे पटवून देण्यासाठी लेखण्या सरसावणाऱ्यानी सावरकरांच्या या वेदोक्त प्रकरणाकडे साधे लक्षही दिलेले दिसणार नाही.

शेवटी सावरकर सोडून कीरांसहीत सर्वांनी शास्त्री–पंडितापुढे माघार घेतली. महाराज मंडळीनीही सावरकरांची विनंती करायला सुरवात केली. सावरकरांचा बुद्धिवाद हट्टाला पेटला होता. मूर्तिस्थापना गौण बाब होती. शुद्रांच्या हस्ते वेदोक्तपणे मूर्तिस्थापना ही मुख्यापैकी एक बाब होती. शेवटी माघार घेताना कीर म्हणाले, "ब्राह्मण नाही म्हणतात तर वाद कशाला? मी ते सांगतील तशी पुराणोक्त पूजा करतो!"[५३]

नव्या तत्वाचे अधिष्ठान

सावकर कीरांना म्हणाले,[५३] "शेटजी! देवूळ आपले, आपण धनी; तेव्हा समारंभ आपण करालच! पण प्रत्येक हिंदूस वेदोक्ताचा स्वयंमेव अधिकार आहे. मग तो महार असो की महाराज! या तत्वास आपण सोडाल तर आपण मलाही सोडल्यासारखे होअील. जुनी देवळे थोडी नाहीत. नवीन तत्वाचे अधिष्ठान म्हणून हे नवे देवूळ हवे होते." 'नव्या तत्वाचे अधिष्ठान' म्हणून सावरकरांना हे देवूळ हवे होते, हे आपण समजून घेणार नाही लाय? हे नवे तत्व कोणते होते? पारलौकिक लाभाचे तर नक्कीच नव्हते. हे तत्व सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचे होते, सप्त स्वदेशी शृंखला तोडण्याचे होते, बुद्धिवादाचे होते. वरवर धार्मिक भासणाऱ्या या मंदिराच्या मुळाशी सावरकरांचा हा बुद्धिवाद आहे. वेदोक्त श्रद्धा नसणारा माणूस वेदोक्तपूजेचा हट्ट धरुन बसला आहे. शेवटी त्या शास्त्री–पंडितांना सावरकर बजावतात,[५४] "मला जन्माने ब्राह्मण तोच पुरोहित हे तत्व मान्य नाही! पण कीर शेटजीची अिच्छा ब्राह्मण लोक हवेतच म्हणून अडलो. पण आपण जर आता नाकाराल तर आजचा हा मुहूर्त टळून कार्य रद्द होअील, असे जर कुणी अडवू म्हणत असेल तर ते कदापि घडणार नाही! वेळच आली तर हा जो अिथे मराठे, चांभार, ब्राह्मण, भंगी, अखिल हिंदू समाज दाटलेला आहे, त्या शतावधि धर्मबंधूसह आम्ही ही देवमूर्ति अनंत हस्ती उचलून "जयदेवा" असे गर्जून स्थापणार! हाच आमच्या विधि! हिंदुधर्म की जयाचे हजार कंठातून निघणारे जयघोष हाच आमचा वेदघोष नि 'भावे विद्यते देवो' हाच आमचा शास्त्राधार!!" सावरकरांचा बुद्धिवाद नि अंधश्रद्धेशी त्यांनी केलेली तडजोड ही अशी आहे. ही गोष्ट १९३१ सालची आहे, हे लक्षात घेतले म्हणजे सावरकरांचा हा बुद्धिवादी निर्धार पाहून आपले मन आजही थक्क होवून जाते. नुसतीच बुद्धिवादी विचाराची बडबड करणे व जपमाळ ओढणे सोपे असते. आपल्या मुलाची मुंज करायची नाही, हा आपला बुद्धिवादी विचारही प्रत्यक्षात आणणे कठीण असते. मूर्तिपूजा मान्य नसतानाही नव्या घरात प्रवेश करताना वास्तूपूजा वा

सत्यनारायण करण्यासाठी आपल्या पत्नीच्या स्वतंत्र हक्काचा आश्रय प्रखर बुद्धिवादीही घेताना दिसतो. तेव्हा बुद्धिवादाचा प्रसार करण्यासाठी हेतुतः एक कार्यक्रम आखणे, एक रणमैदान तयार करणे, व तो बुद्धिवादी विचार अटीतटीने प्रत्यक्षात आणून दाखविणे किती अवघड राहते, हे आपल्याला आजही जाणता येते. आंधळचा-भोळचा समजुतीचा 'बेलाशक' उपयोग करावा, असा त्यांचा उपदेश होता, ही टीका करणे सोपे असते; अंधश्रद्ध लोकात जावून त्यांना बुद्धिवादी कसे बनवावे, हे ठरविणे फार कठीण असते. 'बुद्धिवादाकडे समाजाला एक एक पाऊल खेचून नेण्याचा सावरकरांचा हा प्रयत्न आपण काळजीपूर्वक समजून घेतला पाहिजे.

हे पतितपावन मंदिर बुद्धिवादी विचाराच्या प्रचाराचे व्यासपीठ म्हणून त्यांनी उपयोगात आणले. हे मंदिर सुधारणेचे एक केंद्र बनले. कित्येक लोकांना या मंदिराने विचारप्रवृत्त केले, कामाला लावले. त्या मंदिरात किती सहभोजने झाली, किती व्याख्याने झाली याची गणतीच नाही. या मंदिरापासून पारलौकिक लाभ किती मिळाला याचा हिशोब करणे चूक ठरते. सावरकरांचे रत्नागिरीतील एक सहकारी नारायण बापट यांचा पतितपावनाबद्दलचा अभिप्राय आम्हांला अधिक महत्वपूर्ण वाटतो. स्वतःला नास्तिक व कम्युनिष्ट म्हणवून घेणारे श्री बापट लिहितात,[५५] "मी शेकडो मंदिरे पाहिलेली आहेत. काशीचीही मंदिरे पाहिलेली आहेत; पण रत्नागिरीच्या 'पतितपावन' मंदिराला या सर्व मंदिरात पूज्यतम मंदिर मानतो. ...ह्याचे कारण हे की, हे मंदिर गुरुवर्य वीर विनायकराव सावरकरांनी सामाजिक प्रगतीचे एक साधन म्हणून निर्माण केले... पतितपावन मंदिराच्या निमित्ताने गुरुवर्य तात्यांनी निरनिराळचा पेशातली, निरनिराळचा वयाची, हिंदू समाजातील निरनिराळचा जातीत जन्मलेली कित्येक माणसे (थोडचा सरकारी सेवकांसुद्धा) 'कार्यासाठी जोडली'. या मंदिरातून समाजक्रांतीचा बिगूल त्यांनी धडाडीने फुंकला नि या बिगुलात राज्यक्रांतीचाही बिगूल, गुप्तपणे आपला सूर सामावून होता, हे माझ्यासारख्या निकटवर्तियांना ठावूक होते... सनातनी हिंदूचा देव आणि गुरुवर्य तात्यांच्या 'पतितपावन' हे एकमेकाहून निराळे आहेत." या मंदिरात इंग्रजांच्या विरुद्ध असंतोष निर्माण करण्याचेही काम चालत असे, ही माहिती फार महत्वाची आहे. तेव्हा आमचे म्हणणे असे की, देवपूजेसाठीचे एक मंदिर या दृष्टीतून या मंदिराकडे पाहणेच चुकीचे आहे. आणि हे एकदा मान्य केले की, या मंदिरासंबंधातील कित्येक आक्षेपाना सहजच उत्तर मिळते.

जुन्या मंदिरप्रवेशाचा प्रश्न

या मंदिरावरील सामाजिक सुधारणेच्या दृष्टीने एक आक्षेप असा घेतला जातो की, जुनी मंदिरे अस्पृश्यांना खुली न करता, नवीन मंदिर बांधल्याने हा प्रश्न कसा सुटू शकतो. प्रा. कुरुंदकरांनी सुद्धा हा आक्षेप घेतलेला आहे.

दलित लेखक व नेते तर हा आक्षेप घेतातच. या आक्षेपाला सविस्तर उत्तर देण्यासाठी बरीच पाने येथे खर्चावी लागणार आहेत. बुद्धिवादाच्या दृष्टीतून आम्ही येथे या मंदिराचा अभ्यास करत आहोत. समाजकारणाच्या दृष्टीतून या मंदिराचा स्वतंत्र अभ्यास करावा लागेल. या मंदिराचा मुख्य व खरा हेतू दिसतो तसा पारलौकिक लाभाचा नाही, हेच आमचे प्रतिपाद्य आहे आमचे हे मत जर स्वीकारणीय असेल, तर अस्पृश्यांना पूजेसाठी नवीन मंदिरे बांधावीत का जुनी उघडी करावीत, हा प्रश्नच गैरलागू होतो. आमचे मत जर स्वीकारणीय नसेल, तर सावरकर नवी मंदिरे यासाठी का बांधतात, हे थोडक्यात समजून घ्यावे लागेल.

जुनी मंदिरे सर्वांना खुली करण्याच्या कार्यक्रमाबरोबरच सावरकर हे नवे मंदिर बांधतात. १९२४ पासून जुनी देवळे सर्वांना मुक्त करण्याचा कार्यक्रम सावरकरांनी हाती घेतलेला होता, या बद्दलची सविस्तर माहिती बाळाराव सावरकरांनी लिहिलेल्या रत्नागिरी पर्वात देण्यात आलेली आहे. रत्नागिरीतील विठ्ठल मंदिरात पूर्वास्पृश्यांनी कसा प्रवेश केला, यासाठी कशा मारामाऱ्या झाल्या, हे इतिहासात नमूद आहे. आज मंडपातून, उद्या पायरीपर्यंत, परवा गाभाऱ्यापर्यंत अशा टप्याटप्याने मंदिरप्रवेशाची चळवळ सावरकर करीतच होते. भागोजी कीरांचे भागेश्वराचे मंदिरही सर्वांना खुले केलेलेच होते. नाशिकच्या काळाराम मंदिराच्या सत्याग्रहाला सावरकरांनी पत्रक काढून पाठिंबा दिला होता. 'मी जर मोकळा असतो तर, या सत्याग्रहात भाग घेवून इतराच्या आधी पहिल्या प्रथम तुरुंगात गेलो असतो.' असे त्यांनी जाहीर केले.[५६] पंढरपूरचे विठ्ठल मंदिर अस्पृश्यांना उघडे करण्यासंबंधीच्या म. रा. हरिजन सेवक संघाचे अध्यक्ष वि. न. बरवे यांनी काढलेल्या पत्रकावर सावरकरांनी स्वाक्षरी केलेली आहे.[५७] श्री बरवे यांना पाठविलेल्या पत्रात सावरकर म्हणतात,[५७] "पंढरपूरचे श्री विठ्ठल मंदिर सर्व हिंदूना उघडे करावे, त्यांत पूर्वास्पृश्यांना पण मज्जाव नसावा, अशी माझी उत्कट इच्छा आहे. सर्वच देवालये पूर्वास्पृश्यांना उघडी झाल्यास मला संतोषच होईल. इतकेच नव्हे, तर गेली दहा वर्षं मी पूर्वास्पृश्याच्या देवालय प्रवेशाविषयी स्वतः सक्रिय चळवळ करीत आलो आहे, हे सर्वांस परिचितच आहे." याच पत्रात स्वतःच्या या धोरणामुळे देशातील ४०० ते ५०० जुनी देवालये पूर्वास्पृश्यास मोकळी करण्यात आल्याचा उल्लेख केला आहे. तेव्हा जुनी मंदिरेही सर्वांना उघडी झालीच पाहिजेत, हीच त्यांची भूमिका होती. यासाठीही त्यांनी यथाशक्ती प्रयत्न केलेले आहेत, हे समजून घेतले पाहिजे.

सवय लावण्यासाठी

जुनी मंदिरे उघडी करण्याअैवजी सावरकर नवीन मंदिरे बांधत नव्हते. ही दोन्हीही कार्ये एकदाच व परस्परपूरक म्हणून चाललेली होती. आपल्या वरील या बद्दलच्या आक्षेपाबद्दल सावरकर म्हणतात,[५८] "अस्पृश्यासाठी स्वतंत्र

आणि त्यांच्या पुरतीच देवळे बांधणे, हा अस्पृश्यता निवारणाचा खरा मार्ग नव्हे. त्या योगे फार तर अस्पृश्यांतील धर्म जागृतीस साहाय्य मिळेल आणि त्यापुरते ते कार्य अभिनंदनीय होओल. परंतु देवळेच काय, पण अस्पृश्यांच्या स्वतंत्र शाळा असणेही अेक प्रकारे हानिकारक आहे, असे रत्नागिरी हिंदुसभेचे स्पष्ट मत असून हयामुळेच जिल्ह्यातील सर्व शाळांमधून स्पृश्यास्पृश्य मुले सरमिसळ बसविली जाण्यासाठी या सभेने गेली दोन वर्षे सतत चळवळ चालविली आहे, यश मिळविले आहे." नवी देवळे बांधणे हा खरा मार्ग नव्हे असे सांगून रत्नागिरीत जुनी मंदिरे उघडी करण्यासाठी र. हिंदुसभेने कसे अव्याहत प्रयत्न केले याची माहिती देवून ते पुढे म्हणतात, "तेव्हा अखिल हिंदूचे नवीन देवालय बांधले म्हणजे जुन्यांच्या प्रश्नच सोडून दिला, असा विचित्र अर्थ काढणांन्यानी आधी या हिंदूसभेची प्रतिवृत्तें वाचावी आणि मग काय भकणे ते भकावे. जुन्या देवळांचा प्रश्न नव्या देवळातील सांधिक पूजेच्या सवयीनें अधिकतर लवकर सुटेल, हे जाणूनच सभा पतितपावनाचे मंदिर बांधत आहे. अितकेच नव्हे, तर कितीही नवी मंदिरे बांधली तरी पंचवटीचा राम, काशीचा विश्वेश्वर, रामेश्वर इत्यादि पुरातन क्षेत्रस्थ देवालयाचे महत्व स्वतंत्र असल्यामुळे त्या विशिष्ट महत्वाच्या जुन्या देवालयात पूर्वास्पृश्यादिक अखिल हिंदूना प्रवेश – पूजाधिकार समानतेने मिळाल्यावाचून अस्पृश्यता समूळ गेली असे म्हणता यायचे नाही, हे रत्नागिरी हिंदुसभेनें कंठरवाने लेखातून नि कृतीतून व्यक्त केलेले आहे." रत्नागिरी हिंदुसभेची म्हणजेच सावरकरांची ही भूमिका काळजीपूर्वक समजून घेतली पाहिजे. प्रश्न जुनी देवळे मुक्त करावीत का नाहीत हा नव्हता, ती कशी करावीत हा होता. नवीन देवळे याच कामासाठी पूरक ठरतील, असे सावरकरांना वाटले. पूर्वास्पृश्याबरोबर एकत्र पूजा करण्याची संवय लावणे सावरकरांना आवश्यक वाटले. समाजसुधारणेचा मार्ग असाच नागमोडी असतो. याच हेतूने व जाणीवपूर्वक त्यांनी हे मंदिर बांधले.

विषय समजून घ्यायचा असेल तर तो समजून घेता येतो. आक्षेप घ्यायचा असेल तर तोही घेता येतो. नवी देवळे बांधली की, जुनी उघडी का करत नाहीत, असा आक्षेप घेता येतो. जुनीही उघडी केलेलीच आहेत, उरलेली उघडी केलीच पाहिजेत– असे दाखवून दिले की, नव्या विज्ञानयुगात देवळांचा आता काय उपयोग आहे, असा आक्षेप घेवून सावरकरांच्या बुद्धिवादावर आक्षेप ठेवता येतो. देवळे आता कालबाह्य झाली म्हणून देवळे नकोतच, अशी भूमिका घेतली की, अस्पृश्यांना देवालय प्रवेशाचा हक्क नाकारण्यासाठी काढलेली ही पळवाट आहे, असाही आक्षेप घेता येतो. तेव्हा आपली भूमिका अशा आक्षेपकाची असू नये, समजून घेणाऱ्याची असावी असे आम्हास वाटते.

मुंज–श्राद्ध

सावरकरांनी स्वतःच्या मुलाची मुंज केली नाही. त्यात त्यांना श्रद्धाच

नव्हती. अशा बाबतीत ते आजच्या कित्येक प्रखर बुद्धिवाद्यांच्याही पुढे होते. परंतु सामाजिक सुधारणेच्या कार्यक्रमात सावरकर मुंज टाकाऊ समजत नाहीत. शुद्धी केलेल्या धाकसच्या दोन्ही मुलांच्या मुंजी करण्यात सावरकरांनी पुढाकार घेतलेला होता. [५९] मुंज न केली तर शुद्धी झालेल्यांना हिंदुसमाजात स्थान मिळणार नाही, आपण परत हिंदू झालो आहोत असे त्यांच्या मनालाही वाटणार नाही, या कारणांसाठी सावरकरांचा अशा सामाजिक मुंजीला पाठिंबा होता. सावरकरांना मुंजीबद्दल काय वाटते, हा प्रश्न येथे गौण होता, व शुद्धिकृताची वैयक्तिक अिच्छा, त्याचा हक्क, त्याचे हित व एकंदर समाज तसेच राष्ट्रहित या साऱ्या भूमिकेतून सावरकर मुंजीशी तडजोड करतात.

सावरकरांनी घरी कधी कुणाचे श्राद्ध केलेले नाही. कोणता धार्मिक विधी केला नाही. त्यांचा मुलगा विश्वास यांनीच हे लिहून ठेवले आहे. [६०] मात्र लोकांनी श्राद्धासाठी भटाला बोलावू नये, तर स्वतःच मराठी भाषेत पूजा मांडून श्राद्ध करावे, असा अबुद्धिवादी सल्ला ते देतात. [६१] "मी आजवर कधीच श्राद्धपक्ष केला नाही. पण मी जी कामे करीत आहे, ती माझे पितर पाहत असतील, तर त्यामुळे त्यांना निश्चितच समाधान होअील, असे माझी मनोदेवता सांगत आहे." असे ते लोकांना सांगतात. आपल्या पितरांना जे पसंत पडेल तेच कार्य आपण करणे हेच खरे श्राद्ध आहे, असे त्यांना वाटते. आता नव्या परिस्थितीत आपले कार्य आपल्या मृत पितरांना कसे पसंत पडणार असा प्रश्न विचाराल, तर समाजाच्या, राष्ट्राच्या, मानव्याच्या हितासाठी आपण झटत आहोत, हे कार्य पितरांना पसंत पडणारच, असे ते म्हणतील. 'अैसे वर्तन पाहिजे केले ! की जे पसंत पडेल संताना! !' [६२] या त्याच्या म्हणण्याचाही अर्थ तोच आहे. मृत झालेले पितर सावरकरांचे कार्य पाहण्याचा प्रश्नच नव्हता. 'पाहतील असतील तर' असे ते म्हणतात. समोरच्या लोकांच्या वेडच्या समाधानासाठी हे ते बोलत आहेत. दुसऱ्याच्या हाताने पूजा व घास न घेता स्वतः भक्तच तोंडाने व हाताने पूजा करत आहे, घास देत आहे, यामुळे देव अधिक संतोषेल असे ते म्हणतात. भटगिरी रद्द करायची तर याच मार्गाने होअील असे त्यांना वाटते. निरुपद्रवी श्राद्धश्रद्धा राहिली तरी उपद्रवी भटगिरी बंद होण्यात सावरकरांना अधिक संतोष होता. सहभोजनात भाग घेणाऱ्यावर बहिष्कार टाकून त्यांचे धार्मिक विधी न करण्याचे ब्राह्मणानी ठरविले होते. यावर उपाय म्हणून सावरकर हा मार्ग सुचवितात. श्राद्धच करू नका, कारण तुमच्या या सहभोजनासारख्या सत्कार्यामुळेच तुमचे पितर अधिक संतोषतील, असा बुद्धिवादी उपदेश सावरकर करत नसतात. ज्यांना श्राद्धांत श्रद्धाच नव्हती, त्यांचा प्रश्नच नव्हता. उरलेल्यांसमोर श्राद्ध का सहभोजन असा पर्याय ठेवणे सहभोजनाच्या दृष्टीने घातक होते. सहभोजनात त्यांना सहभागी करुन घ्यायचे, तर त्यांच्या श्राद्धाची सोय लावणे सावरकरांना भाग होते. प्रश्न श्राद्धाच्या प्रसाराचा नव्हता,

सहभोजनाच्या समस्या दूर करण्याचा होता. अधिकतर सामाजिक हितासाठी निरुपद्रवी अंधश्रद्धेबरोबर केलेली तडजोड ही अशी आहे !

श्रावण मास

श्रावण पोर्णिमेपासून अनंतचतुर्दशीपर्यन्त श्रावण मास पाळायला त्यांची हरकत नसते. पण कशा पद्धतीने तो पाळायचा, हे सावरकर आपल्या पद्धतीने सांगतात. तो स्वदेशी मास म्हणून साजरा करावा, असे ते सांगतात. त्या महिन्यात सर्वांनी स्वदेशी मालच शक्यतो वापरण्याचा निश्चय करावा. स्वदेशीचा प्रचार करावा. घरोघर जावून लोक हे आचरतात की नाही हे पाहावे. जे आचरत नाहीत त्यांच्या अडचणी सोडवाव्यात अशा पद्धतीने हा स्वदेशी मास साजरा करावा, असा त्यांचा उपदेश आहे. [६३] प्रत्येक गोष्टीमध्ये यालोकी ऐहिक व राष्ट्रीय लाभ, व परलोकी पुण्य, असा हा सावरकरांचा प्रकार आहे. एकदा ते 'कृष्ण-शिष्टाओ' या विषयावर भाषण करत होते. लोकांना वाटत होते की सावरकर गोलमेज परिषदेवरच बोलत आहेत. अधून मधून कृष्णाचे नाव कानावर पडले की ऐकणाऱ्या धार्मिकालाही पुण्य लाभत होते नि दुसरीकडे देशाच्या स्थितीबद्दल माहिती मिळाल्याचा ऐहिक लाभही होता. अशी ही सावरकरी पद्धत होती.

अवतार – चमत्कार

सावरकरांच्या या पद्धतीमुळे त्यांच्या नाटकात देव येतात. देव पृथ्वीवर अवतार घेतात, चमत्कार घडतात, भुते प्रकट होवून बोलू लागतात, आकाशवाणी होते बुद्धिवादाला न पटणाऱ्या या बाबी त्यांच्या ललित साहित्यात आलेल्या आहेत. 'चमत्कार' ही गोष्ट सावरकरांना मान्यच नव्हती. 'गोविंदा गवळी' या कथेचे सार सांगताना सावरकर म्हणतात, [६४] "ज्या घटनाचा कार्यकारणभाव स्थापिणारा सृष्टिनियम आपणास आज अवगत नाही, त्यास कोणी 'चमत्कार' म्हणतात, त्यास कोणी नाव देतात 'नवसास पावला' ! 'चमत्कार' किंवा 'नवसास पावला' ही नावे अज्ञानाचे प्रतिशब्द आहेत; ज्ञानाचे नव्हेत! " देवाचा अवतार हा असाच एक चमत्कार असल्यामुळे तोही याच अर्थाने अज्ञानाचा प्रतिशब्द ठरतो. आपल्या वैचारिक निबंधातून 'अवतार' कल्पनेचे त्यांनी यथेच्छ उपहास आणि विडंबन केले आहे. संतांच्या काळात महाराष्ट्रात देव कसे सारखे अवतार घेवून येत होते, या गोष्टी सांगून सावरकर म्हणतात. [६५] "महाराष्ट्र त्या काळी संताची नसून, माणसाची भूमि नसून, देवाची भूमि झालेली होती. महाराष्ट्र हेच त्या काळी देवाचे राहते घर झालेले होते; वैकुंठ नव्हते. " आणि हे शेकडो देव येथे हजर असताना राक्षसाचा जय कसा झाला, चोखोबाला शिक्षा का झाली, याचे उपहासगर्भ वर्णन ते करतात.

असे हे बुद्धिवादी सावरकर आपल्या नाटकात श्रीकृष्ण अवतार घेतात,

भुते प्रकट होतात, आकाशवाणी होते इत्यादी बुद्धिबाह्य घटनाची योजना करतात. 'संगीत अुःशाप' नाटकाच्या तिसऱ्या अंकाच्या शेवटी श्रीकृष्ण प्रकट होऊन चोखा मेळचास दर्शन देतात, त्यांच्याशी बोलतात, त्यांच्या घरी सहभोजन करण्यास येतो म्हणतात– असा एक प्रसंग आहे. अस्पृश्याच्या जीवनाचे अितिकर्तव्यच काय, हा प्रश्न प्रत्यक्ष देवालाच विचारण्यासाठी चोखा सारखा तळमळत होता. त्याची इच्छा पूर्ण करुन, त्याच्या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी श्रीकृष्ण प्रकटतात, अशी ही योजना आहे. देव स्पृश्यास्पृश्यता मानत नसतो, हे सांगण्यासाठी श्रीकृष्ण अवतार घेतात. चोखामेळाला जाफरअली इ. मुसलमान शिक्षा करण्यासाठी, ठार मारण्यासाठी बैलाला बांधावयचा आदेश देतात मात्र ते बैलच जागचे हालत नाहीत. भूमी हदरु लागते. मग आकाशवाणी होते की, स्वत: श्रीकृष्णच आपल्या प्रचंड भुजानी जोखंडाना थोपवून धरत आहेत. त्यानंतर चोखाला जाफरअली चाबकाचे फटके मारु लागतो, तोच श्रीकृष्ण प्रकटतात. मग भूकंप, वीज, कडकडाट होतो. आणि सावरकर आपला ज्यासाठी नाटक लिहिले, तो मूळ विचार श्रीकृष्णाच्या तोंडून सागतात. नाटक संपते.

'संन्यस्त खड्ग' नाटकातही नेमकी अशीच योजना आहे. विक्रम आणि बुद्ध यांच्यात गृहस्थाश्रम व संन्यासाश्रम याच्या श्रेष्ठत्वाबद्दल तत्ववाद चालू आहे. त्यांचा निर्णय देण्यासाठी 'धर्म' प्रकट होतात. सावरकरांच्या बाजूने ते धर्मनिर्णय देतात. या दोन्ही नाटकात, ज्या मुख्य विचारासाठी ही नाटके त्यांनी लिहिली, तो विचार लोकांना सांगण्यासाठी सावरकरांनी सर्वश्रेष्ठ अधिकारी विभूतींना अवतार घ्यायला लावला आहे. निर्वाणपद कशाने मिळते हे सांगण्याचा अधिकार धर्माचा होता. चातुर्वर्ण्य निर्माण करणाऱ्या श्रीकृष्णाकडे अस्पृश्यतेचा निर्णय देण्याचा अधिकार होता. या लोकांना मान्य असणाऱ्या विभूतीच्या तोंडून सावरकर आपला विचार मांडतात. या 'धर्माला' व 'श्रीकृष्णा' लाही आपलीच मते पाठ करुन सांगायला लावतात. शेवटी हे नाटक आहे. या ठिकाणाचा अवतार हा प्रत्यक्ष नसून रुपकात्मक आहे. नाटक पाहणारे प्रेक्षक जर अवतारावर श्रद्धा ठेवणारे असतील, तर त्यांनी हे जाणायला हवे की, जर 'धर्मा'चा किंवा 'श्रीकृष्णा'चा अवतार झाला तर याच कारणासाठी होईल. चांगल्या कारणासाठीच देवाचा अवतार होत असतो, व आम्ही करीत आहो ते काम चांगलेच असल्यामुळे त्याला तुमच्या देवाचाही आशिर्वाद आहेच, हेच सावरकरांना यातून सांगावयाचे आहे.

'नारदाची पृथ्वीस पुन्हा भेट' या लघुनिबंधात इंद्र, नारद, इ. पात्रे योजलेली आहेत. त्यांचे संवाद चालू आहेत. स्वर्ग-नरक इत्यादी शब्द ते वापरत आहेत. नारदमुनी हे सावरकरांचे अस्पृश्यतेसंबंधीचे, अहिंसेसंबंधीचे विचार मांडत असतात. त्यानंतर ते अंतर्धान पावतात. 'संगीत अुःशाप' मध्ये आपला धर्म सोडून दुसरा धर्म स्वीकारल्यास आपल्या सात पिढ्या नरकात पडतात, हा मुद्दा अधिक पटविण्यासाठी धर्म बदलणाऱ्या शंकरची मृत आई, बाप, आजोबा, पंजोबा,

पडपंजोबा इ. भुते होवून बोलू लागतात. ही भुतेही सावरकरांचाच विचार मांडतात.

अशा गोष्टी नाटकात दाखविल्यामुळे देवभोळेपणा व अंधश्रद्धा वाढणार नाहीत का, असा एक प्रश्न उपस्थित करता येतो. सावरकरांना या गोष्टींची जाणीव नाही असे नाही. चांगल्या गोष्टीसाठी देव अवतार घेतो; तो बाईटाचा निर्दालक असतो, यावर लोकांची फार खोलवर श्रद्धा असते. समाजातील व्यक्ती कितीही बुद्धिवादी झाल्या तरी ही श्रद्धा मूलतः नष्ट होणारी नसते. या श्रद्धेचा सावरकर सामाजिक हितासाठी उपयोग करु पाहतात. थोडेसे अहित नि अधिक लाभ ही कसोटी येथे वापरलेली आहे. बिहारमध्ये भूकंप झाला तेव्हा गांधीजी म्हणाले की, त्या भूकंपाचे कारण बिहारामध्ये अस्पृश्यतेचे पाप फार झाले आहे, हे होय. गांधीजींच्या या अंधश्रद्धेवर सावरकरांनी भरपूर टीका केली. त्यांच्या नाटकाचे प्रयोग चालू असतानाच हीही टीका चालू होती. चांगल्या गोष्टीसाठी गांधीजींनी अंधश्रद्धेचा वापर केला होता. असे करताना साधनशुचितेचे नेहमीचे तत्त्वही बाजूला ठेवले होते. चांगल्या गोष्टीसाठी वाईट गोष्टीचा किती व कसा उपयोग करावा हाच नेहमीच वादाचा प्रश्न असतो. शेवटी सावरकर या गोष्टी नाटकात मांडतात. ते ज्या श्रद्धांचा उपयोग करतात, त्या मनुष्याच्या मनातून लवकर नष्ट होणाऱ्या नसतात. सावरकर म्हणूनच देवाला, भुतांना, अवतारांना, चमत्कारांना समाजकार्याला जुंपून देतात. या धार्मिक पारंपारिक भाषेतच नवीन विचार लोकांना लवकर समजतात, असे त्यांना वाटले. अशा प्रसंगाचा वा भाषेचा बुद्धिवाद्यांनी प्रत्यक्ष कार्य करताना वापर करावा का नाही हा मतभेदाचा मुद्दा होऊ शकतो. सावरकरांनीही या प्रश्नावर विचार केलेला दिसतो. संन्यस्त खड्ग नाटकाच्या दुसऱ्या प्रवेशाच्या अखेरी शांकभटाच्या तोंडून सावरकरांनी आपण ही भाषा का वापरतो आहोत याचे स्पष्टीकरण दिलेले आहे. सिद्धार्थ गृहत्याग करताना जेव्हा राजवाड्याबाहेर पडला, त्या रात्रीच्या वेळेस पहारेकरी झोपी गेला होता. बाण नावाचा हा पहारेकरी शांकभटाला ही खरीखुरी गोष्ट सांगून मृत्यु-दंडापासून सुटका होण्यासाठी उपाय विचारतो. तुला जगात जगायचं आहे का मरायचं आहे असा प्रश्न शांकभट बाणाला विचारतो. जर जगायचं असेल तर त्या रात्री काहीतरी अद्‌भुत घडलं असं सांगावं लागणार असा शहाणपणाचा सल्ला देतो. पहाऱ्यावर असताना सर्व दाराची कडया कुलपे व्यवस्थित होती. मी जागा होतो. इतक्यात कुण्या देवदूताने माझ्या डोळ्यावरुन हात फिरविला. मी मूर्च्छित झालो. सकाळी उठून पाहतो तो दारे बंदची बंद. मधले काहीही आठवत नाही. असं अगदी तोंडपाठ करुन उत्तर दे, असा शांकभट बाणाला सल्ला देतो. पण बाणाला हे पटत नाही. शांकभट त्याला म्हणतो, "चूप हे असं म्हणायचं अरे वेड्या, या भाबड्या श्रद्धावान लोकांचा लोकापवाद टाळण्यास दैवी चमत्काराची ढाल उपयोगी पडते. उपवर कुंतीला लग्नाआधी मूल झालं. आला

लोकापवाद ! वास्तविक यात काहीच अपवाद नव्हता, हा नियमच आहे. तेव्हा त्या कानीन पुत्राविषयी जेव्हा लोकापवाद येतोच असे पाहिले, तेव्हा व्यासानी सूर्यमंत्राच्या दैवी चमत्काराची दिली बात झोकून आणि वेडगळ शंकेचे लबाड उत्तराने समाधान झाले. तसेच आजही होअील." सावरकर नाटकात चमत्काराचा व अवताराचा वापर का करतात याचे हे त्यांनीच नाटकातच दिलेले स्पष्टीकरण आहे.

देवाने अस्पृश्यता तयार केली या वेडगळ श्रद्धेचे समाधान करण्यासाठी लबाड अवताराची ते योजना करतात. श्रीविष्णूचा पृथ्वीवर अवतार होतो हे सावरकर कबूल करतात. अवतार झालेला आहे असेही म्हणतात. तो अवतार म्हणजे विज्ञानदेव आहे, असे सांगतात. हे सांगण्यासाठी ते नारदमुनीला बोलवतात. वेडगळ श्रद्धेला ते नवा अर्थ तरी देतात किंवा लबाडाच्या हवाली करतात. ही शंका वेडगळ आहे, उत्तर लबाड आहे, हा चमत्कार खोटा आहे–हेही लगेच सांगून टाकतात. लोकांना बुद्धिवाद शिकविण्याची त्यांची ही पद्धत आहे.

अवतार ही कल्पना ते त्याज्य मानत नाहीत. त्या कल्पनेला स्वतःचा नवा बुद्धिवादी अर्थ देतात. 'अभिनव भारता'चा अवतार देशस्वातंत्र्यासाठी झालेला आहे, असे ते म्हणणार. याच अर्थाने ते शिवाजीलाही अवतारच म्हणणार. हिंदूचा उद्धार झाला पाहिजे, ही त्यांची आकांक्षा होती. तो होअील अशी त्यांना आशा होती. हा जो कोणी करील त्याला ते अवतार म्हणणार. प्रेरणा आणि आशावाद निर्माण करण्यासाठी लोकांचे शब्द स्वतःच्या अर्थाने सावरकर वापरतात. 'हिंदुसंघटन' हा एक देव आहे असे म्हणतात. हा देव पावल्यास हिंदूचा उद्धार होअील, असे ते म्हणतात. या देव प्रयत्नानेच पावतो हे त्यांना माहीत होते. हा देव आपल्याला पावेल या अर्थी या देवाचा अवतार होअील असे म्हणायला ते सोडणार नाहीत. कानपूरच्या हिंदुमहासभेच्या अध्यक्षीय भाषणात ते म्हणाले,[६७] "आतापर्यंतच्या हिंदु अितिहासात आढळले त्याच प्रमाणे याही वेळी एखादा अवतार होवून हिंदूचे पुनरुत्थान करील व अहिंदु सामार्थ्याशी टक्कर देऊन हिंदु परत आपल्या पूर्ववैभवाची प्राप्ती करुन घेतील असा संभव फार आहे. अतिशय कसोटीच्या काळांतच अवतार होत असतात." सावरकरांना सांगायचे आहे की, कसोटीचा काळ आलेला आहे, हिंदुसंघटन शक्तीचा जोर वाढतो आहे, आपला पुनरुद्धार होण्याची वेळ जवळ येवून ठेपली आहे, निराश होवू नका, असेच जोमाने कामाला लागा. हिंदुमहासभा हाच अवतार झालेला आहे, हेच त्यांना सांगायचे आहे. त्यांचे संपूर्ण भाषण वाचल्यावर याच निष्कर्षाला आपल्याला यावे लागते. आपण समजतो तो हा अवतार आहे व सावरकरांची असल्या अंधश्रद्धेवर श्रद्धा बसू लागली होती, अशाप्रकारचा गैरसमज अनेकांनी करुन घेतलेला आहे.

आपल्या ध्येयासाठी, विचाराच्या प्रचारासाठी देवालाही सावरकर कामाला जुंपून देतात. त्यांना अवतार घ्यायला भाग पाडतात. अवतार घेतला की त्याला आपल्या कामाला जुंपून देतात. त्यांचा देव स्वतःहून कधीच पावत नसतो–

सावरकर त्या देवाला प्रयत्नाने पावायला, अवतार घ्यायला भाग पाडतात. सर्कसमधील रिंगमास्तरच्या अिषारावर जसे सर्व वाघसिंहादी प्राणी निमूटपणे कामे करतात, तीच अवस्था सावरकर या देवाची–अवताराची करतात. म्हणून त्यांच्या नाटकातील देव, भूते, धर्म, नारद गुपचूप सावरकर म्हणतात तसे वागतात. बुद्धिबाह्य श्रद्धेतून जन्मपावलेली पात्रे मात्र सावरकरांचे बुद्धिवादी विचार मांडतात. अमके अमके विचार मांडत असाल, तरच तुम्हाला मी अवतार घ्यायला लावण्याची व्यवस्था करतो, अशी सावरकरांची भूमिकाच असते. बुद्धिबाह्य अशा या कल्पनाचा वापर, समाजसुधारणेसाठी, हिंदुसंघटनासाठी, राष्ट्रीय कार्यासाठी वा बुद्धिवाद शिकविण्यासाठी, करण्याबद्दल एखाद्याचा प्रामाणिक मतभेद असू शकतो, व तो सावरकरांचा हा मार्ग पसंत करणार नाही. तथापि, असे असले तरी सावरकरांची ही भूमिका नीटपणे समजून घेण्यात या मतभेदाचा अडथळा कारण होवू नये असे आम्हास वाटते.

पुनर्जन्म

चमत्कार हे अज्ञानाचे पर्यायी नाव आहे, असे त्यांचे मत आहे. विश्वातील ज्या घटनांचा कार्यकारणभाव वा उपपत्ति मनुष्यास ज्ञात असलेल्या नियमानुसार लावता येत नाही, त्या घटनांना सावरकर चमत्कार म्हणतात. 'कार्यकारण भावाचे अज्ञान म्हणजे चमत्कार, अद्भुतता.' अशी त्यांची चमत्काराची व्याख्या आहे." सावरकरांचा बुद्धिवाद अशा चमत्काराला कायमचे खोटे म्हणून मानत नाही. अशा चमत्काराचा विज्ञानाच्या पद्धतीने अभ्यास करावा, शोध लावावा अशी त्यांची भूमिका आहे. निर्जीव वस्तूपासून जीव वा आत्मा बनवता येवू शकतो काय, यावर संशोधन व्हावे असे त्यांना म्हणूनच वाटते.[६९] या त्यांच्या धोरणामध्ये विज्ञाननिष्ठेच्या वा बुद्धिवादाच्या विरोधी काहीही नाही. या धोरणाप्रमाणे सावरकरांचे म्हणणे असे की, पुनर्जन्म ही कल्पना खरी का खोटी याबद्दल निश्चित काहीही सत्य मानू नये. या कल्पनेवर विश्वासही ठेवू नये नि ती पूर्णपणे खोटी म्हणून त्याची हेटाळणीही करु नये.

"निर्विवाद वैज्ञानिक कसोटीने ज्याचा कार्यकारणभाव अजून ठरविता आला नाही, अशा प्रश्नांत पुनर्जन्मवाद हा एक प्रश्न आहे" असे ते म्हणतात.[७०] 'पुनर्जन्मवाद' हा सिद्धांत नसून एक वाद (Hypothesis) आहे, ते असे म्हणतात, Psychical research च्या पद्धतीवर याचा शोध लावता येतो का ते पाहिले पाहिजे, असे त्यांना वाटते. सावरकरांची ही भूमिका स्वतःला निष्कलंक बुद्धिवादी समजणाऱ्या काही विद्वानांना नकली बुद्धिवादाचा पुरावा वाटतो. खरा वाद चमत्काराला खरे मानावे की खोटे हा नाही; त्याला अज्ञान मानावे की खोटे हा आहे. अज्ञानाचा शोध न लावता त्याला खरे मानणे हा धर्मभोळेपणाचा आहे, तर त्याला खोटे मानणे हा बुद्धिभोळेपणाचा आहे, असे त्यांचे सुस्पष्ट मत आहे.

अशा गोष्टींना 'दुराग्रहाने खोटे म्हणणे, त्यास ऐकूनही न घेता हेटाळणे, हे तर वैज्ञानिक पाप आहे ! ' असे सावरकर म्हणतात.[७१] या दोन परस्परविरोधी पण निषेधार्ह प्रवृत्तीची तुलना करताना म्हणतात,[७२] " आपणास ज्याचे कारण सांगता येत नाही अशी कोणतीही नवी घटना (Fact) पाहताच तिला एकदम "दैवी" समजून तिला नारळ फोडणे, फुले वाहणे ती घडू नये वा घडावी म्हणून 'देवास' प्रार्थिणे, हे जसे धर्मवेड आहे, धर्मभोळेपणा आहे. तसेच आम्हा मानवांना आज कळलेले सृष्टीचे नियम तेवढेच समग्र ज्ञान, आता कळायचे काही बाकी नाहीच, अशा दंभाने फुगून त्या आजच्या ज्ञात कार्यकारणभावाच्या कक्षेत जे सामावू शकत नाही ते सारे खोटे असलेच पाहिजे, असे ठाम प्रतिपादणे आणि तसा 'चमत्कार' म्हटला की, तो हेटाळून ऐकून देखील न घेणे, हेही एक 'बुद्धिवेड', एक बुद्धिभोळेपणाच होणार आहे ! " सावरकरांचा बुद्धिवाद हा अशा धर्मवेड व बुद्धिवेड या या दोन्हीही प्रवृत्तीपासून मुक्त होता. या बुद्धिवेडावर सावरकर टीका करु लागले की स्वतःला बुद्धिवादी म्हणविणारे चिडून उठतात.

डॉ. य. दि. फडके त्यांचे हे विचार अशा पद्धतीने मांडतात की, सावरकरांची थोडी बहुत का होईना पण पुनर्जन्मावर श्रद्धा असावी, असे वाचकांना वाटावे. देव हा अज्ञात या अर्थी, देवाचे दरवाजे सतत बंद असतात असे सावरकर म्हणतात. देवाचा काही शोध लागत नाही या अर्थी हे दरवाजे काही उघडता येत नाहीत, असे ते म्हणतात. 'अज्ञेयाचे रुद्धद्वार' या कवितेत त्यांनी ही कल्पना मांडलेली आहे. या वरुन डॉ. फडके असा निष्कर्ष काढतात की,[७२] " हे बंद दरवाजे उघडता येत नाहीत हे माहीत असतानाही बुद्धीच्या, तर्काच्या, ज्ञानाच्या साहाय्याने ते ठोठावीत राहण्याचा प्रयत्न सोडून देण्यास सावरकर तयार नाहीत... शिळा गडगडत खाली येणार हे माहित असतानाही ती डोंगरमाथ्यावर चढविण्याचा निष्फळ प्रयत्न करणाऱ्या सिसीफसप्रमाणे अज्ञेयाचे बंद दरवाजे ठोठावण्याचा निष्फळ प्रयत्न सोडून देण्यास सावरकर तयार नाहीत." जणू काही सावरकर प्रयोगशाळेमध्ये बसून देवावर संशोधन करत होते किंवा हिमालयात जावून देवाचा शोध घेत होते; 'देवा, देवा' म्हणून त्याच्या सारखे मागे लागले होते, असा वाचकाचा समज व्हावा, या पद्धतीची ही मांडणी आहे. अंदमानमध्ये असताना तत्वज्ञानाच्या विविध प्रश्नावर मनाला सुखात ठेवण्यासाठी ते चिंतन करीत. अशा वेळेस व्यक्त केलेले हे विचार आहेत, हे आपण लक्षात घेणार नाही काय ? ज्या 'निष्फळ प्रयत्नाचा' डॉ. फडके उल्लेख करतात, तो प्रयत्न कोणत्या क्षेत्रातला आहे. ?

असा निष्फळ प्रयत्न करणे सावरकरांच्या तात्विक भूमिकेशी सुसंगतच आहे, असे डॉ. फडके म्हणतात. आणि मग लगेच याचा दुसरा पुरावा म्हणून पुनर्जन्माबद्दलची सावरकरांची वरील भूमिका मांडतात. ही भूमिका मांडताना सावरकरांनी या संबंधातच दिलेल्या चेतावणीचा (Caution) ते उल्लेख करत नाहीत.

सावरकरांची चेतावणी अशी : [७३] "तेव्हा केवळ अेक विचारणीय प्रश्न यापलिकडे अशा पूर्वजन्मादिक आठवणीवर निश्चित असा विश्वास ठेवू नये. या आठवणीमुळे प्रत्यक्षसिद्ध व्यवहारात तर लवलेशही व्यत्यय येवू नये. पूर्वजन्मी अमुक गोष्ट होती असे कोणी म्हणते म्हणून नव्हे, तर या जन्मीही ती उपयुक्त वांछनीय वाटेल तरच ती आचरावी, ते बंधन मानावे आणि व्यवहार असा प्रत्यक्षनिष्ठ ठेवून" वागावे. सावरकरांची भूमिका ही अशी आहे. विचारणीय, पण आचरणीय नव्हे, अशी ही भूमिका आहे.

सावरकर अशा प्रकारे बुद्धिबाह्य वाटणाऱ्या गोष्टीशी संबंध ठेवत असतात. केव्हा अशा गोष्टी उपयोगाच्या असतात, केव्हा दुर्लक्षणीय असतात, तर केव्हा विचारणीय असतात. विश्वातील अज्ञात गोष्टी संबंधीची सावरकरांची ही भूमिका आहे. त्यांची ही भूमिका आपण नीट समजून घेतली पाहिजे. त्यांनी योजलेल्या शब्दाच्या आत जावून त्याचा आशय पाहिला पाहिजे. सावरकरांच्या अितर प्रखर बुद्धिवादी विचारांशी त्याची सुसंगती लावण्याचा प्रयत्न केला पाहिजे. नाहीतर त्यांच्याविषयी असलेला गैरसमज दूर होण्याची शक्यता नाही.

■■■

२. अध्यात्म

सावरकरांची अध्यात्माबाबत कोणती भूमिका होती, हे या प्रकरणात आपण समजून घेवू. धर्म या संकल्पनेइतकीच अध्यात्म ही संकल्पनाही संदिग्ध आहे. सावरकर हे आध्यात्मिक पुरुष होते काय, हा प्रश्न महत्वाचा नसतो; 'आध्यात्मिक' म्हणजे निश्चित काय अभिप्रेत आहे हाच प्रश्न मुख्य असतो.

नैतिक अंग

अध्यात्म या संकल्पनेला विविध अंगे आहेत. एका बाजूने अध्यात्म हा नीतिविचाराचा पाया आहे. आध्यात्मिक पुरुष म्हणजे सर्वश्रेष्ठ नीतिमूल्ये मानणारा पुरुष, असे या अर्थाने म्हटले जाते. जगातील सर्व मनुष्याचे कल्याण व्हावे, अशी इच्छा बाळगणारा माणूस आध्यात्मिक माणूस समजला जातो. या दृष्टीने कोणत्याही दोन मनुष्यामध्ये भेद करायला तो तयार नसतो. सर्व माणसांना समान का मानावे, सर्वांच्या हिताची इच्छा का बाळगावी, याचे कारण सर्वांचा आत्मा एकच आहे, असे हा आध्यात्मिक पुरुष मानतो. म्हणून पं. दीनदयाळ उपाध्यायांच्या 'एकात्म मानवदर्शनाचा' पाया अध्यात्म हा आहे. आपण सर्व एकाच परमेश्वराची लेकरे आहोत ही भावना या एकात्मतेचा मुख्य धागा आहे. आपण सारे शेवटी त्या परमेश्वरालाच जावून मिळणार आहोत. मुख्य गोष्ट सर्वात समान असणारा आत्मा व तो नंतर जावून ज्यात विलीन होतो तो परमात्मा एकच असल्यामुळे व्यक्तीव्यक्तीतील भेद ही गौण बाब आहे, असे या अर्थीचे अध्यात्म मानते.

अध्यात्माची ही भूमिका मनुष्य प्राण्यापुरतीच मर्यादित नसते. आत्मा असणाऱ्या सर्व प्राण्यांनासुद्धा ती लावली जाते. सर्व भुतांच्या ठिकाणी एकच

आत्मा आहे, हे सारे एकाच परमतत्वाचे अंश आहेत, ही अतिव्यापक भूमिका चेतली जाते. यालाच 'आत्मवत् सर्वभूतानि' असे म्हटले जाते. मनुष्याने सद्वर्तन का करावे, अितराचर दया व प्रेम का करावे, सर्व भुतालाच आपल्यासम का मानावे, याचा एक अत्यंत आदर्श व भव्योदात्त पाया व कसोटी या अध्यात्म-विचाराने मनुष्याला दिलेली आहे. हा नैतिक विचार अध्यात्माचे एक उज्वल असे अंग आहे.

नीतिमूल्यासंबंधी सावरकरांची भूमिका यापूर्वी अभ्यासताना आपण हे पाहिले आहे की, सावरकर नैतिक विचारासाठी अध्यात्म्याची ही कसोटी मानायला तयार नाहीत. अध्यात्म्याच्या या कसोटीने आपण ज्या निष्कर्षाला येतो, त्याच निष्कर्षाला सावरकर आपल्या बुद्धिवादी व उपयुक्ततावादी कसोटीने येतात. तेव्हा निष्कर्षाला येणे महत्वाचे का त्या निष्कर्षाला येण्याची कसोटी महत्वाची, हा प्रश्न शिल्लक उरतो. ही कसोटी गौण असेल, तर ज्या अर्थी सावरकर मानवता जाणणारे होते, अितराच्या कल्याणासाठी स्वतःचा आत्मत्याग करणारे होते, त्या अर्थी ते आध्यात्मिक पुरुष होते, असे कोणाला वाटत असण्यात त्यात काहीही चूक नसते. ही कसोटी महत्वाची असेल, तर बुद्धिवादी व उपयुक्ततावादी असण्याचा सावर-करांचा हक्क मान्य करुन ते अध्यात्म्य मानणारे नाहीत, असे म्हणण्यात आपण काही तरी अनैतिक पाप करत आहोत, असे मानण्याचे काहीच कारण नाही.

तत्वज्ञानाचे अंग

दुसऱ्या बाजूने अध्यात्म हे एक तत्वज्ञान आहे. जग, जगन्नियंता, जगाचा हेतू याविषयीचा विचार या तत्वज्ञानात येतो. आत्मा, परमात्मा, मोक्ष, मुक्ती या या साऱ्या संकल्पना या तत्वज्ञानात येतात. अध्यात्म हे या दृष्टीने आत्म्याविषयीचे शास्त्र आहे. टिळकांनी गीतारहस्यात या सृष्टिरचनेच्या विविध मताचे तीन वर्ग केलेले आहेत. आधिदैविक, आधिभौतिक व आध्यात्मिक हे ते तीन वर्ग होत. 'ब्रह्मसृष्टीचे' सर्व व्यवहार चालवणारी व मनुष्याचे शरिरात आत्मरुपाने राहून त्याला सकल सृष्टोचे ज्ञान करुन देणारी एकच एक अिंद्रियातीत चिच्छक्ती या जगात असून, त्या शक्तीनेच हे जग चालले आहे, असे जेव्हा मानतात, तेव्हा त्याला आध्यात्मिक विवेचन हे नाव देतात"[२] असे अध्यात्माविषयी टिळकांनी म्हटले आहे. अधिभौतिकांची अशा कोणत्या चिच्छक्तीवर श्रद्धा नसते. 'जड सृष्टी-तील पदार्थ आपल्या अिंदियांना ज्या प्रमाणे गोचर होतात, त्याप्रमाणेच ते आहेत, त्यापलिकडे काही नाही' ही आधिभौतिकाची पद्धत आहे, असे टिळक म्हणतात. याचा अर्थ, अशा कोणत्यातरी चिच्छक्तीवर श्रद्धा ठेवण्याचा हा प्रश्न असून, केवळ नैतिक विचार मानण्याचा नाही, हे उघड आहे. सावरकर यापैकी कोणत्या वर्गात मोडतात, हा आपल्या समोरचा एक प्रश्न आहे.

आध्यात्मिक असण्यासाठी एका चिच्छक्तीवर श्रद्धा असावी लागते. आत्म्याचे

अस्तित्व मान्य असावे लागते. शेवटी हा प्रश्न श्रद्धा ठेवण्याचा आहे. लो. टिळकांच्या मते अध्यात्म हा विषय 'अिंद्रियातीत म्हणजे केवळ स्वसंवेद्य अथवा ज्याचा त्याला कळणारा आहे.'[२] याचा अर्थ हा विषय प्रत्यक्ष, प्रमाण, तर्क आदी मार्गांनी सिद्ध होणारा नाही. सावरकरांच्याच भाषेत सांगायचे, तर हा विषय "आध्यात्मिक भाषेत तर्कातीत म्हणजे अैहिक वा बौद्धिक भाषेत तर्कशून्य" आहे.[३] सातत्याने अैहिकाचाच पाठपुरावा करणाऱ्या, सिद्ध करण्यासाठी वैज्ञानिक पद्धतीचीच कसोटी मानणाऱ्या व अध्यात्माला तर्कशून्य म्हणणाऱ्या सावरकरांना या अध्यात्मात श्रद्धा होती काय, हा आपल्यासमोरचा एक प्रश्न आहे.

विश्वाच्या देवावद्दलचे व हेतूबद्दलचे त्यांचे सुस्पष्ट विचार आपण या पूर्वीच पाहिलेले आहेत. या विषयी अद्याप काहीही निश्चितपणे सिद्ध झालेले नाही, ही त्यांची डोळस भूमिका आहे. या साऱ्या गोष्टी आज अज्ञात आहेत, असे ते म्हणतात, या अर्थी ते अज्ञेयवादी आहेत. या अज्ञातावावत एखादी गोष्ट गृहीत (Hypothesis) धरायला सावरकरांची हरकत नाही. पण "जो वर ती शक्यता वा अशक्यता निर्विवादपणे सिद्धली गेली नाही, तोवर या प्रकरणी पुढे येणारे पुरावे आपण अगदी विश्वासार्हही मानता कामा नयेत, नि हेटाळताही कामा नयेत."[४] अशी त्यांची विज्ञाननिष्ठ भूमिका आहे. या अज्ञाताचा अर्थ आजचे असत्य असाच होतो. म्हणजे सावरकर हे टिळक म्हणतात त्या आधिभौतिक पंथातीलच आहेत, असेच आपल्याला म्हणावे लागेल.

वेदांत पोटात घालून

सावरकरांच्या कविता वाचल्यानंतर अनेकांनी असा निष्कर्ष काढला आहे की, सावरकर हे आध्यात्मिक विचाराचे पुरुष आहेत. 'सावरकर काव्य समालोचन' करणारे वा. गो. मायदेव म्हणतात, "विनायकरावांच्या या कविता वाचल्यावर ते किती निवृत्तीप्रिय, संन्यस्त व आत्मनिष्ठ आहेत, याची कल्पना येईल. किबहुना हीच त्यांची प्रकृति असून त्यांचा जगाला दिसणारा ज्वलंत कर्मयोगीपणा विकृती तर नाही ना असे क्षणभर वाटेल."[५] 'सावरकरांची 'काव्यसृष्टि' या निबंधात प्रा. भ. श्री पंडीत म्हणतात[६] "या प्रतितीगीतात सावरकरांच्या आध्यात्मिक मनोवृत्तीचे, भव्य कल्पना शक्तीचे, विशाल दृष्टीचे आणि खोल अंतःकरणाचे दर्शन होते. या प्रतितीगीतात त्यांची परमेश्वराच्या ठायी असणारी दृढ श्रद्धा व्यक्त झालेली आहे. या श्रद्धेच्या बळावरच ते अनेक दिव्यातून सुखरुप बाहेर पडू शकले." ग. वि. केतकरांनी तर सावरकरांनी 'सर्व वेदांत पोटात ठेवून' कर्मयोग स्वीकारला होता, असे म्हटले आहे.[७] विवेचक असणारी ही मंडळी असे म्हणतात, तर मग सावरकरांना अवतार आणि भगवान म्हणून गौरविणारे रा. स. भर, ह, त्र्यं. देसाई आदी भक्तमंडळी काय म्हणत असतील याची आपल्याला कल्पना करता येते. या सर्व मंडळीचे हे म्हणणे मान्य करायचे, तर वैचारिक

निबंधातील सावरकर काव्यात बदललेले आहेत, असे आपल्याला म्हटले पाहिजे. या दृष्टीने त्यांच्या काही निवडक कवितातील आध्यात्मिक विचाराची पाहणी करणे जरुर आहे.

जन्म अंदमानात

सावरकरांनी अध्यात्मावर सुसूत्रपणे वा चिकित्सकपणे कुठेही लिहिलेले नाही. अध्यात्माबाबतची त्यांची भूमिका त्यांच्या काव्यातून, 'अंदमानाच्या अंधरीतून' या बाळला त्यांनी पाठविलेल्या विविधपत्रांतून व 'माझी जन्मठेप' या अंदमानातील आठवणीतून आपल्याला शोधावी लागते. यावरुन आपल्या लक्षात येईल की त्यांच्या 'अध्यात्मा'चा जन्म अंदमानात झालेला आहे. सावरकरांच्या या साहित्यात अध्यात्मविचार आलेले आहेत, ही गोष्ट खरीच आहे. त्या अध्यात्मविचाराचे स्वरुप काय आहे, हे आपल्याला समजून घ्यायचे आहे.

अंदमानात सावरकरांच्या मनात आध्यात्मिक विचार येतात, हे खरे आहे. हे विचार सावरकरांच्या मनात येण्याचे कारण अंदमान हे आहे ! अंदमान म्हणजे एक साक्षात् नरक होता. आम्ही येथे थडग्यातच वास्तव्य करुन होतो, असे तेच म्हणतात. 'माझी जन्मठेप' वाचल्याशिवाय अंदमानच्या या आक्राळविक्राळ स्वरुपाची, त्यांना भोगाव्या लागलेल्या नरकयातनेची, त्या यातनेपेक्षा मरणेच सुखकारक वाटणाऱ्या त्यांच्या मनाची, त्यातून मुक्त होण्यासाठी आत्महत्त्येच्या त्यांनी केलेल्या प्रयत्नाची व अशा स्थितीतही राष्ट्रासाठीच तळमळणाऱ्या त्यांच्या आत्म्याची आपल्याला पुरती जाणीवच होणार नाही. या जाणिवेविना त्यांचा अध्यात्मविचार कोणत्या अवस्थेत जन्माला येतो, हेही समजणार नाही. अध्यात्माचे ज्ञान लोकांना व्हावे; ती एक चांगली व उदात्त विचारसरणी आहे; त्यासाठी लोकांना अध्यात्माभिमुख केले पाहिजे– यासाठी सावरकर अध्यात्माबद्दल विचार करत नाहीत. त्या विशिष्ट परिस्थितीमध्ये अध्यात्म हे साधन त्यांना उपयुक्त वाटले, सोयीचे वाटले, हे समजून घेण्यासाठी अंदमानच्या नारकीय स्थितीची जाणीव आपण सतत ठेवली पाहिजे.

एक गरज

अंदमानातले ते नरकप्राय दुःख कसे कमी करावे हा त्यांच्या समोरचा प्रश्न होता. दुःख ही मनाची अवस्था आहे. या मनाची समजूत कशी घालावी, हा मुख्य प्रश्न होता. आत्महत्त्या करुन तो प्रश्न त्यांना मिटवायचा नव्हता. आत्महत्त्येकडे ओढ घेत असलेल्या मनाला कसे शांत करावे, हा त्यांच्या समोरचा खरा प्रश्न होता. या मनाची समजूत घालताना सावरकरांच्या बुद्धीची कसोटी लागलेली आहे. या संतप्त झालेल्या, मोकाट सुटलेल्या मनाला शांत करण्यासाठी त्यांची बुद्धी अध्यात्मात संचार करते व मनाला आवर घालते. राष्ट्रकार्य हे

अहलोकीचे त्याचे कर्तव्य होते. तो त्यांनी स्वीकारलेला कर्मयोग होता. अंदमानचे कारागृह हे या कर्मयोगाचाच भाग होता. हा कर्मयोग सुखकारक कसा व्हावा, यासाठी सावरकर अध्यात्माचा वापर करतात. त्यांनी मांडलेले अध्यात्मविचार हे एखाद्या तत्वचिंतकाचे वा ज्ञानयोग्याचे विचार नसून एका कर्मयोग्याचे, कर्मयोग अधिक परिणामकारक व्हावा म्हणून मनाच्या समजुतीसाठीचे सांत्वन विचार आहेत. अध्यात्म हे सत्यदर्शन आहे काय, हा सावरकरांच्या समोरचा प्रश्नच नव्हता. सत्य असो की असत्य, त्यात श्रद्धाच असो की नसो– आजच्या विशिष्ट परिस्थितीत ते उपयोगाचे आहे, हाच प्रश्न मुख्य होता.

ज्या मनाच्या अवस्थेत सावरकर अध्यात्म या वस्तूचा विचार करतात, त्या अवस्थेचे त्यांनीच 'सायंघटा' या कवितेत चित्रण केलेले आहे.

"म्याचि अनिष्ठाची ती जडशिळा स्वये
बांधुनिया निजकंठी टाकिली उडी
याचि तुझ्या निक्कोबारीन सिंधुच्या
रौद्रशांत जलकल्लोळात निर्घृणा
आता जे बुडणे ती निश्चित स्थिती
तरणे तो अपघातचि जरि क्वचित घडे."[१०]

या प्रकारे मरणाच्या दारात राहून सावरकर मनाचे सांत्वन करण्यासाठी अध्यात्माचे चिंतन करतात.

बंदी

पन्नास वर्ष काळ्यापाण्याची शिक्षा झाल्याची वार्ता कळल्यावर १९११ साली सावरकरांनी 'सप्तर्षि' हे काव्य रचले. फाशी द्या, काळेपाणी नको, असे निर्ढावलेले बंदिवान सुद्धा म्हणत असत. अशा या काळ्या काळेपाण्यावर २७ वर्षे वयाच्या सावरकरांना जायचे होते, हे कळाल्यावर त्यांना काय वाटले असेल, याची कल्पनाही आपण करु शकत नाही. त्या विदग्ध मनाला शांत करण्यासाठी त्या कवितेत सावरकर म्हणतात."

"बंदि ? ती आत जशी बाहेरहि या शिवासी जीवाची !
पगडा तुजवरि पांचा वृत्तीचा तोवरी न केव्हाची !! ६२
आनंद गवसणारा मुक्तीचा- तुज तुरुंग मानस हा !
त्याचा बंदी जो तू तो जू दे वाकवूनि मान सहा !! ६३
परि करुनि चित्तवृत्तींचा तू आपल्या निरोध साम्याने !
मन हस्तगत स्ववशी, ठेविशि की खड्ग जसा म्याने" !! ६४

अंदमानची बंदी सुसह्य वाटावी म्हणून या बंदीच्या पलिकडेही 'शिवासी जीवाची' बंदी आहे, ही गोष्ट सावरकर मनाला समजावून सांगत आहेत. 'पांचा वृत्तींचा' जोवर मनुष्याच्या मनावर पगडा आहे, तोवर मनुष्य हा त्या वृत्तीचा

बंदीच असतो, ही गोष्ट त्यांना आठवते. खरा तुरुंग हा मनाच्या मानण्यावरच आहे. त्यामुळे 'चित्तवृत्तीचा निरोध' करुन मनावर नियंत्रण ठेवले पाहिजे, असे त्यांना वाटते. 'सुख दुःखाचे साधन' मनातच असते, ही गोष्ट त्यांना आठवते. त्यांना मग पातंजल-योगसूत्रे आठवतात. आपल्यापेक्षा अधिक दुःखदायक गोष्टी या जगात आहेत, त्या पाहिल्या म्हणजे आपले सापेक्ष दुःख सुसह्य वाटू लागते, हा सामान्य विवेक सावरकर आपल्या मनाला समजावून सांगतात. ते सांगण्याची भाषा अध्यात्माची आहे, योगसूत्राची आहे, एवढाच फरक आहे.

मनाला समजून सांगण्यासाठी अध्यात्माची–योगसूत्राची भाषा सोडून ते व्यवहारातील रोजच्या गोष्टीकडेही वळतात. ते मनाला सांगतात की, राजगृही काही कमी नसते, दररोज पंचपक्वाने शिजतात, हजारो लोक मुजरा करायला असतात– तरीही राजाला सुख मिळत नसते. पाचाच्या ऐवजी सहावे पक्वान का नाही म्हणून राजा दुःखी होतो. कुणी स्त्री मिळाली नाही म्हणून युवराज दुःखी होतो. सोन्याच्या ऐवजी रत्नाचे कळस नाही, म्हणून राजा दुःखी होतो, किंवा मी राजा कधी होईन म्हणून युवराज दुःखी होतो. हे सर्व सदैव दुःखी असतात. त्या पैकी कित्येक राजे वेडे झाले आहेत, कित्येकांनी आत्महत्त्या केलेल्या आहेत. मात्र याच्या नेमके उलट तुकाराम महाराजाचे आहे. ते नेहमीच आनंदी असत. तेव्हा दुःख हे मनावर आहे– ते मानले नाही म्हणजे माणूस सुखी होतो, असे सावरकर स्वतःलाच समजावतात व सुखी राहण्याचा प्रयत्न करतात. ते म्हणतात,[१२ A]

"मन हे चंचल भारी ! दुर्निग्रह भासलेचि साधुजना
जडजीव अनभ्यस्तचि त्यात अम्हि; आवरेचि ते मज ना ॥

अशा ह्या चंचल मनाला आवर घालण्यासाठी सावरकरांना श्रीकृष्णापासून-विवेकानंदापर्यंत, कपिल-पातंजलीपासून तुकाराम महाराजापर्यंत, व गौतम बुद्धा-पासून-येशू ख्रिस्तापर्यंत सर्वांचीच आठवण होते.

तुरुंगात चांगल्या रितीने वागविले जावे यासाठी जितेंद्रनाथानी तुरुंगात उपोषण करुन बलिदान केले, हे कसे चूक आहे हे सांगताना एका लेखात सावरकर म्हणतात, "राजकीय बंदिवानांना कितीही बऱ्यारितीने वागविले तरी काय? स्वतःस बंदिवान म्हणवून घेण्याचे दौर्बल्य तर राहणारच ना? अगदी खुर्चीवर बसून जरी ताजे पत्र वाचीत राहिले तरी अंग्रजाचा बंदिवानच ! बरे, कारागृहा-बाहेर आले तरी काय ?

बंदी नसेल त्यातील कोण बोल
जो लोक दैवे परदास झाला
तो बंदि तद्भूचि तुरुंग शाळा"[१२]

चांगली वागणूक मिळत नाही हे दुःख, आपण तरीही बंदिवानच आहोत या दुःखा-पेक्षा कमी आहे. आपण तुरुंगात बंदीत आहोत हे दुःख आपला सारा देशच तुरुंग आहे या दुःखापेक्षा कमी आहे. अशा प्रकारे या मोठ्या दुःखात हे छोटे दुःख विलीन

करुन टाकावे. या दोन दुःखाचे अद्वैत करावे. मनाला सुखात ठेवावे. असा हा सावरकरांचा प्रयत्न आहे.

कोठडी

अंदमानातील आपली कोठडी साफ करत असताना मनात आलेले विचार सावरकरांनी 'कोठडी' या कवितेत व्यक्त केलेले आहेत. या तुरुंगाच्या दगडाच्या भिंती तोडल्या तरी आपला तुरुंग संपत नाही, पूर्ण स्वतंत्र असे होणेच शक्य नाही, हे सांगताना ते म्हणतात,[१३]

"याहि तटापुढती ! बंदीच्या क्षितिजांच्याही भिंती ! "

या दगडाच्या भिंती फोडल्या तरी क्षितीजाची भरभक्कम भिंत शिल्लक राहतेच, हा विवेक सावरकर आपल्या मनाला समजावून सांगत आहेत.

मनुष्य हा पूर्णपणे मुक्तच होवू शकत नाही, असे त्यांना यासाठी वाटते. थोर आध्यात्मिक, साक्षात्कारी व योगी पुरुष मुक्त झाले असे आपण म्हणतो. सावरकर ते तसे मुक्त कसे झाले नाहीत, हे मनाला समजून सांगतात. माझा आत्मा हा त्या परमात्म्याचा अंश आहे. ही जाणीव झाली की मनुष्याला मुक्ती मिळते, हे अध्यात्माचे मूळ तत्व आहे. अंदमानात सुखात राहण्यासाठी सावरकरांना हे तत्व सोईचे नव्हते. जगात कुणीच मुक्त होवू शकत नाही, शकला नाही– ही भूमिका त्यांना यासाठी घेणे भाग होते. 'कोठडी' या कवितेला जे परिशिष्ट जोडले आहे, त्यात सावरकर म्हणतात, "शंका मनास बिचारी की, ही कोठडी फोडावी की ती उलट लिपित सुटावे ! पण शंकेस बुद्धि उत्तर देई की, कोठडी हे जसे बंदिगृह तसेच देहही एक बंदिगृहच आहे. आपण तो झाडतो, पुसतोच की नाही? दुसरे, 'मुक्तता'च म्हणाल तर तिचा व्याप बंधाच्या विस्ताराप्रमाणे वाढतच जातो. ती मुक्तता ही भौतिक अेकलकोंडी फोडून कशी मिळणार? तिच्यापुढे बंदीगृहाचे दगडीतट आणि मानसिक इच्छा क्षितिजाचे तृष्णेचे तट ! पूर्ण मुक्तता कोठे आहे ?" मुक्ततेचा त्यांना ध्यास लागला होता, यासाठी ते हे लिहित नाहीत. पूर्ण मुक्तता मिळू शकत नाही हे सांगण्यासाठीच लिहित आहेत. ते पुढे म्हणतात, "शंका पुन्हा म्हणे, पण ते 'जीवन्मुक्त' कोण तर मग? त्यांनी चित्तवृत्तीच्या क्षितिजांना ओलांडून पूर्ण मुक्ति मिळविली नाही का? यावर उलट उत्तर येई की, त्यांच्या मरणानंतर आत्म्याचा भाव काय झाला तो फार तर त्यांचा त्यांना ठाऊक; पण जीवमुक्त जिवंत होते तोवर त्या वेदान्तिक कुलालचक्राच्या पूर्वगती पुरते का होअीना, पण बंधनातच असलेले दिसत तरी होते... या जीवनात जीवन्मुक्तही पूर्ण मुक्तसे दिसत नाहीत. श्रीकृष्ण क्रुद्ध होत. पार्थाची जयद्रथवधाची प्रतिज्ञा पुरी कशी करता येईल म्हणून रात्रभर तळमळत असत. बुद्धांचे पोट दुःखे. रामकृष्णांना भुकेनें रणकुंडी केरे. रामकृष्ण त्यांचे शिष्य-युवक दिसले नाहीत, म्हणून शोक करीत. तुकाराम पंढरीचे वाटेवर रडत बसत.

चैतन्याने 'हे प्रिया हे प्रिया' करीत रानोमाळ भटकत समुद्राचा नीलश्यामल रंग पाहून तोच घनश्याम म्हणून त्यांत उडी घेवून देहत्याग केला!"[१४] 'कोठडी' या कवितेवरील हे सावरकरांचे बोलके मुक्तभाष्य आहे.

जीवन्मुक्त कोण ?

जगात आतापर्यन्त जीवन्मुक्त असे कुणीच झाले नाही, ही भूमिका अध्यात्मवाद्यांना मान्य आहे. काय ? श्रीकृष्ण–रामापासून तो तुकाराम–चैतन्यापर्यंत हे सारे जिवंत असेतो आपल्यासारखेच अिंद्रिय सुखाच्या बंधनात होते, असे सावरकर म्हणतात. मेल्यानंतर त्यांच्या आत्म्याचा भाव काय झाला, हे आम्हाला ठाअूक नाही, असे ते म्हणतात. 'फार तर त्यांच्या त्यांना ठाअूक' असावा असा अंदाज ते व्यक्तवितात. जिवंत असेपर्यंत जगात कुणीही मुक्त झाले नाही ; मेल्यानंतर मुक्त झाले किंवा नाही हे आम्हास माहीत नाही; त्यांचे त्यांना तरी हे माहीत होते की नाही, हेही आम्हास माहीत नाही, ही सावरकरांची भूमिका अध्यात्माला मान्य आहे. काय ? श्रीकृष्ण हे शुद्धबुद्धीचे कशावरून असा बुद्धिवादी सवाल करणारे निबंधातील सावरकर आणि श्रीकृष्ण हे जीवन्मुक्त होते, हे कशावरुन अशी शंका म्हणा, प्रश्न म्हणा किंवा सवाल म्हणा, करणारे काव्यातील सावरकर एकच भूमिका मांडतात, हे समजून घेतले पाहिजे.

बेडी

कैद्याला आपल्या हातानी आपल्यालाच घातलेल्या बेड्या स्वच्छ कराव्या लागत. जी तोडावी तिलाच स्वच्छ करावे लागे. याबद्दल 'बेडी' या कवितेत सावरकर म्हणतात,

"फोडुनि तोडुनि जी जाळावी । तीच अशी अुजळावी ॥
आपण आपुलिचा ! रे बेडी ? । हौस तुझी ही बेडी ॥"[१५]

हातातीस लोखंडी बेडी साफ करणे सुसहय व्हावे, म्हणून सावरकर मनुष्याने आपल्या अिच्छेला विवेकाची कशी बेडी घालून घेतलेली आहे, याची मनाला आठवण करुन देतात. या कवितेलाही परिशिष्ट दिलेले आहे. या बेडीवरुन सावरकरांना जगाच्या अिच्छेच्या पायातील मूळ विधिनिषेधाच्या, धर्माधर्माच्या किंवा कर्तव्याकर्तव्याच्या बेडीची आठवण येअी. "ही लोखंडी बेडी त्या मूळ बेडीची केवळ एक आंशिक कडी आहे" असे त्यांना वाटते.[१६] ही धर्माधर्माची बेडी जशी मनुष्याला वारंवार घासावी - पुसावी लागते तशीच ही लोखंडी बेडी का घासू – पुसू नये, असे ते मनाला समजवतात. धर्माधर्माच्या बेडी प्रमाणेच निसर्गनियमाच्या बेडीचीही त्यांना आठवण होते. तुरुंग, कोठडी, बेडी या साऱ्या गोष्टी कर्तव्य म्हणून सहन करण्यासाठी मनाला तयार करण्याचा सावरकरांचा बुद्धी व तर्कावर आधारलेला महाप्रयास चालू आहे, हे उघड आहे.

मम आणि न मम

दुःख विसरण्याची ही जी बौद्धिक कसरत त्यांच्या कवितेत चाललेली आहे, त्याचेच प्रतिबिंब 'माझी जन्मठेप'मध्ये पडलेले आहे. अंदमानच्या बंदिशाळेबद्दल ते आपल्या मनाला समजावतात, [१७] "मग ही बंदिशाळा ही भावना तेवढी सोडून दिली, तर या वाड्यातही राहणे अगदीच दुस्सह नाही. राहण्यापुरताच विचार केला, तर मम आणि न मम यातच सुखदुःखाची बीजे आहेत, असे वेदांतीही म्हणतात, ते काही व्यर्थ नाही. बरे तर शक्यतो तशीच वृत्ति ठेवावयाची. अेवढे फक्कड घर बिनभाड्याने मिळाले असता त्यास बंदिशाळा म्हणून उगीच का भ्या ? काही दिवस येथे गंमतीने का न रहा ?" बंदिशाळा ही बंदिशाळाच नव्हे, ही बुद्धीने वेदांताचा आधार घेवून मनाची काढलेली समजूत आहे. गमंत म्हणून, दुःख विसरण्याचीही एक सोय म्हणून, जे दिसते ते नाहीच असे मानून सुखात राहण्यासाठी वेदांताची सावरकरांना आठवण होते. 'वेदांती म्हणतात, ते काही व्यर्थ नाही' ही भाषा वेदांत्याची नाही, त्रयस्थाची आहे. वेदांताचा व्यवहारात काहीही उपयोग नसला तरी निदान या ठिकाणी तरी तो होतो आहे, असे सावरकरांना म्हणायचे आहे. या वेदांताचा उपयोग सावरकर 'मानसिक खेळणे' म्हणून करतात. अध्यात्म, अद्वैत, वेदांत ही त्यांना अंदमानात या दृष्टीने सोयीची ठरली. यामुळे त्यांच्या मनाला धीर मिळाला. या गोष्टी सत्य का असत्य हा मुद्दा गौण होता. त्या परिस्थितीत त्या उपयुक्त आहेत का, हाच प्रश्न महत्वाचा होता. 'कर्तव्याचा विषाचा प्याला पिण्यासाठी विवेकाचा पुरवठा म्हणून' या साऱ्या गोष्टींचा सावरकरांनी उपयोग करून घ्यायला सोडले नाही, असा याचा अर्थ आहे.[१८]

विवेकरुपी आजीबाअी

अंदमानातून बाळला पाठविलेल्या पत्रामध्येही सावरकरांच्या या विचारांचे स्वच्छ प्रतिबिंब पडलेले आहे. आपल्या मनाची समजूत घालताना वेदांत तत्वज्ञानाचा ते कसा उपयोग करत हे सांगताना आपल्या एका पत्रात सावरकर म्हणतात, [१९] "कधी हे विचार चालतात, कधी ते विचार चालतात... तर केव्हा वेदांत तत्वज्ञानाच्या सहवासात 'जे कांही दिसते त्याला प्रत्यक्ष आस्तित्व नाही निदान आपल्याला ठावूक नाही– ते आपल्याच कल्पनेचे विकार आहेत. असल्या गूढ विचारात भ्रमण करते आणि माझे मन पूर्ण सुखात असते... मधून मधून कधी हट्टी मुलाप्रमाणे त्याचे डोके बिघडले आणि ते हटून रडू लागले की, विवेकरुपी आजीबाअी लागलीच अवतीर्ण होतात आणि हसत हसत सांत्वन करतात." मनाची समजूत घालण्यासाठी सावरकर वेदांताचाच उपयोग करतात, असेही नाही. ते स्वतःच म्हणतात की, केव्हा हे विचार चालत, केव्हा ते चालत, केव्हा वेदांताच्या सहवासात मी असे. पण या मोकाट सुटलेल्या मनाला शांत करण्यासाठी ज्या विवेकरुपी आजीबाअी येतात, त्या

म्हणजे बुध्दीच होत ही बुध्दी सावरकरांच्या मनाला म्हणते,[१२] "तू ज्याला सर्वस्वाची दक्षिणा दिलेली आहे, असा सर्वस्वदाक्षिण्य यज्ञ संपादन केला आहेस. ज्याला अंत नाही ज्याला कालमर्यादा नाही, असे क्लेश तू सोसतो आहेस !... मग आनंदी हो. या पेक्षा तुला अधिक ते काय करता आले असते?" आपण जे कार्य करतो आहोत ते केवळ कल्पनेचा चिकार आहे, असा वेदांतही त्यांना आठवतो. आणि आपण जे हे कार्य करतो. आहोत तेच महत्तम आहे, असे सांगणारा कर्मयोगही आठवतो आहे. ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या हा वेदांतसिध्दांत त्यांची बुध्दी मनाला सहजावून सांगते. तुरुंग हा तुरुंग नव्हे, दुःख हे दुःखच नव्हे, हे सारे मिथ्या आहे असे पटवून सांगते. त्या परिस्थितीत जे जे उपयोगाचे ते तेवढयापुरते स्वीकार्य अशी ही सावरकरांची भूमिका आहे.

या पैकी सावरकरांची प्रकृती कोणती व विकृती कोणती हे ठरवण्यासाठी त्यांच्या सर्व जीवनाचाच विचार करावा लागतो. केवळ काव्यातील कल्पनेवरुन हे ठरविणे धोक्याचे असते. विकृतीचाही सावरकर मनाला शांत ठेवण्यासाठी उपयोग करून घेतात एवढेच खरे आहे, हे समजून घेतले पाहिजे.

वस्तुतः सावरकरांचे हे विचार किंवा त्यांच्या मनात आलेले कल्पनातरंग म्हणजे प्रतिकूल परिस्थितीशी जुळवून घेण्याचा मनाचा सहजधर्म आहे, त्याचा अपरिहार्य परिणाम आहे. बाळला पाठविलेल्या एका पत्रात ते म्हणतात, माझ्या सुदैवाने माझे मन पालटलेल्या परिस्थितीशी लागलीच समरस झाले.... आयुष्याच्या नित्य पालटत्या परिस्थितीशी आपल्याला जुळवून घेण्याचा, तद्रुप बनाव्याचा हा मानवी मनाचा धर्म परमेश्वराने मनुष्यजातीला दिलेली दयामय देणगी आहे". तेव्हा सावरकरांच्या चित्तवृत्तिनिरोधाच्या असो, अध्यात्माच्या असो वेदांताच्या असो, - विचारामागे मनाच्या धर्माची खोल अभ्यास आहे. त्यानुसार नियंत्रण ठेवण्याचा हा प्रयत्न आहे.

वेदांत–एक कल्पना

विश्वाच्या गूढाविषयी ज्या विविध कल्पना आजे विविध धर्माचे तत्वज्ञान म्हणून प्रचलित आहेत, त्यापैकी वेदांत ही कल्पना वा शक्यता सर्वात अधिक तर्कसंगत व कल्पनेच्या दृष्टीने भव्योदात्त आहे, असे सावरकरांचे म्हणणे आहे. सावरकरांना वेदांताचा-अध्यात्माचा असलेला अभिमान बाबदलचा आहे. निबंधातील सावरकरांची ही वैचारिक भूमिका काव्यातही स्थिर असते. काव्यातही जेव्हा जेव्हा या विचाराचा संदर्भ येतो, तेव्हा तो विचार एक कल्पना, एक शक्यता, एक Hypothesis या अर्थीच असते, हे लक्षात घेतले पाहिजे. हिंदुत्व या ग्रंथात सावरकर म्हणतात,[२१] "आम्हाला प्रामाणिकपणे असे वाटते की, हिंदु विचार

परंपरेने अथे आम्ही कोणत्याही धर्मावद्दल बोलत नाही. कारण तो हटवाद होईल अज्ञेयावद्दल नसले तरी अज्ञाताच्या स्वरूपावद्दल किंवा 'तत्' आणि 'त्वम' यातील संबंधावद्दल, मानवी कल्पना शक्यतेतील सर्वच शक्यता मांडलेल्या आहेत." वेदांत ही त्यापैकी एक शक्यता आहे, सत्य नव्हे, ही सावरकरांची भूमिका आहे. ही त्यांची भूमिका काव्यातही कायम आहे. वेदांत ही कल्पना असली तरी तो मानल्यामुळे होणारा आनंद मात्र सत्य असतो. अंदमानात सावरकर हा आनंद घेत होते, असा याचा अर्थ आहे.

या वेदांताचा आनंद घेतानाही ते ऐहिक दृष्टीकोणातून त्याकडे पाहतात. भौतिक तत्वज्ञान आणि वेदांत तत्वज्ञान याचा प्रथम आणि दुय्यम असा ते क्रम लावतात. वेदांत तत्वज्ञानाचा अभ्यास करण्यासाठी, त्यात लक्ष घालण्यासाठी सुद्धा मनुष्याला भौतिकदृष्टचा परिपूर्ण झाले पाहिजे, अशी त्यांची अट आहे. बाळला पाठविलेल्या एका पत्रात ते म्हणतात,[२२] "वेदांत तत्वज्ञानाच्या पुस्तकासंबंधी सांगायचे म्हणजे आपल्या लोकांनी असल्या गोष्टीत लक्ष घालणे या काळी अनुचित आहे. अमेरिकेला वेदांत तत्वज्ञानाची आवश्यकता आहे, इंग्लंडातही तशीच आहे. कारण त्यांनी आपला जीवनक्रम परिणत, ऐश्वर्यसंपन्न आणि पौरुषपूर्ण केला आहे. त्यांचे क्षत्रियत्व संपादून झाले आहे. आणि ज्या अवस्थेत गेले तरच ते तत्वज्ञान समजावयाचे आणि अनुभवयाचे सामर्थ्य येते, त्या ब्राह्मण्याच्या सीमारेषेपर्यंत ते गेले आहोत. हिंदुस्थानचे तसे नाही. आपण सर्व आज शुद्रावस्थेत आहोत, आणि वेद किंवा वेदांत ह्यांना स्पर्श करण्याचा आपल्याला अधिकार नाही." वेदांत विचार हा तत्वज्ञानाच्या क्षेत्रातला आहे व तो व्यवहाराला लागू होत नाही, ही सावरकरांची भूमिका आहे. व्यवहार पूर्ण झाल्याशिवाय या तत्वज्ञानाचा विचार करणे व्यर्थ आहे, असे त्यांना वाटते. भौतिकदृष्टचा संपन्न होणे, ही आद्य गरज आहे व वेदांतविचार समजण्यासाठीची ती पूर्वअट आहे., असे त्यांचे मत आहे.

'आत्मवत् सर्व भुतेषू' या सिद्धांतावद्दल सावरकर म्हणतात,[२३] "आत्मवत् सर्व भुतेषू' हा सिध्दांत आपल्या शास्त्रात आहे ही गोष्ट खरी, पण सृष्टीची उत्पत्ती कशी झाली, सृष्टीच्या मुळाशी काय आहे, याचा विचार करताना काढला गेलेला हा सिध्दांत आहे. पण हा तत्वज्ञानाचा सिध्दांत व्यवहाराला तितका लागू पडत नाही" हीच त्यांची भूमिका वरील पत्रात व्यक्त झालेली आहे. भौतिक विचार हा सत्य आहे. त्यामुळे मिळणारे लाभ प्रत्यक्ष आहेत. वेदांत विचार ही एक शक्यता आहे. त्यापासून मिळणारा लाभ भासमान आहे. त्यामुळे सावरकर भौतिक आधी वेदांत नंतर असा क्रम लावतात. या दोन गोष्टींचा समन्वय घालावा व या गोष्टी बरोबरीनेच विचारात घ्याव्यात, असे ते म्हणत नाही, हे लक्षणीय आहे.

वेदान्त नको

वेदांतावद्दल विवेक सांगताना बुद्धिवादी सावरकर बाळला लिहितात,[२४]

"आपण राष्ट्र या दृष्टीने या कल्पनांना अयोग्य आहोत. दुसरे बाजीराव पंतप्रधान वेदान्ती होते हे प्रसिद्ध आहे; पण कदाचित् म्हणूनच त्यांना स्वतःचे राज्य आणि परक्याचे सेवान्तवेतन ह्याच्यातले अंतर दिसले नाही! आम्ही अितिहास, राजकारण, विज्ञान, अर्थशास्त्र हयांचा अभ्यास केला पाहिजे; या जगात मानाने गृहस्थाश्रम यथासांग पार पाडला पाहिजे; मग वानप्रस्थाश्रम आणि त्या आश्रमातील वेदांताचा उषःकाल येईल. तोपर्यंत हया गोष्टीचा कोणताही उपयोग असो, तो विधवाकडे, म्हाताऱ्याकडे, कामावरून निघालेल्या सेवानिवृत्तांकडे सोपविल्या पाहिजेत. त्यांच्यासाठी भूतकाल आणि त्याची जुनी पुस्तके आणि पुरुष, आत्मा आणि परमेश्वर याची पुराणकोडी आहेत! तरुणांनी–अभिनवांनी भविष्यकाळात का संचार करु नये? म्हणे वेदान्त!– वाराणशीने एकही हुतात्मा जगाला दिला नाही आणि आपल्या पितृदेशासाठी एकही पैही द्यावयाची तिची योग्यता नाही." वेदांताविषयी योग्य आदर राखत, वेदांताविषयी आकर्षण असलेल्या बाळचे मनही दुखवगार नाही अशा पद्धतीने, आपला बुद्धिवादी–भौतिक विचार सावरकर कसा पटवून देतात हे या वरुन आपल्या लक्षात येईल. मांडण्याची ही पद्धत बदलली, तर 'वेदांत ही एक अफूची गोळी आहे, त्यापासून सावध राहा' असेच सावरकर बजावत आहेत, असेच एखाद्याला वाटण्याचा संभव आहे.

वेदांताविषयी विचार करणे म्हणजे रिकामटेकड्या माणसाचे उद्योग आहेत, असे त्यांना वाटते. अंदमानात ते असे रिकामटेकडेच होते व अशा अवस्थेत त्यांचे मन मोकाट सुटे. त्या मनावर नियंत्रण ठेवण्यासाठी, त्या मनाला पटविण्यासाठी' भुलविण्यासाठी या वेदांताचा त्यांना उपयोग झालेला आहे. अैहिकदृष्टचा उपयुक्त असे काहीच करता येणे शक्य नाही किंवा करण्याची गरज उरली नाही, अशा वेळेसच वेदांताचा विचार करावा असे त्यांना वाटत होते.

वेदान्ताचा उपयोग

वेदांताचा सावरकरांनी एक ज्ञान म्हणून सखोल अभ्यास केलेला होता. देशोपनिषदातील एकेका श्लोकावर एक एक महिना रात्र रात्र विचार करत वर्षभर ते अभ्यासल्याचे त्यानी लिहिले आहे. अर्थात् हा अभ्यास अंदमानातलाच आहे! योगवाशिष्ठ या वेदांत ग्रंथांनेही त्यांना गोडी लावली होती. हे ग्रंथ वाचताना जो अनुभव आला, तो सांगताना 'माझी जन्मठेप'मध्ये ते म्हणतात, [२४] "हे वेदांत विषयक ग्रंथ वाचताना एक मात्र अनुभव आम्हास वारंवार यावा की, तात्काल शिरा शिरा आणि तंतु तंतु ढिला, समरस, तल्लीन होऊन पुनः कर्माच्या उठाठेवीत पडण्यास अगदी अिन्कार करीत! कर्मोत्साह पार मावळून जाअी. नैष्कर्षसिद्ध परमा हे शब्द सारखे गुणगुणत स्वदेशसेवा, परोपकार, भूतदया इत्यादि अत्युदार भाषाही क्षणिक आणि पोरखेळ वाटू लागत... वेदांताच्या सुंदर सिद्धांताचे आनंदात कर्माचे वैयर्थ्य दुःखदायी होत नसे... भौतिकशास्त्रानी कर्मवियोग होवून त्रास वाटे.

वेदांताने कर्मयोग करावासाच वाटून तो सुखकर होई. कित्येक वेळा योगवाशिष्ठादिक ग्रंथाचे श्लोक म्हणता म्हणता हातातले दोरखंड हातातच राहून मन अतिकेकर्तव्यपराङ्मुख व्हावे की, तास तास अवयव देहास आहेत की नाहीत याचे भानही उरु नये. पावूल पुढे पडू नये. वाटे सर्व सोडून द्यावे." वेदांतग्रंथातील विचाराच्या सामर्थ्याविषयाचे हे वर्णन आहे. वेदांत विचाराच्या या मोहकतेचे वर्णन केल्यावर शेवटी सावरकर म्हणतात, [२५] "कर्माच्या आणि नैष्कर्म्याच्या परस्परविरुद्ध झुंजी रिकाम्या मनाच्या मोकळ्या मैदानावर अशा सारख्या चालत असत. त्या पाहून कधी कधी स्वतःचे स्वतःला हसू यावे." सावरकरांची वेदांतश्रद्धा ही अशी आहे!

विवेक विरुद्ध विकार

पण या रिकाम्या मनाचे खेळ खेळत मनुष्याला थोडेच नेहमी राहता येते? सावरकर म्हणतात, [२६] "नुसत्या मनाच्या मनोऱ्यावर कोणास थोडेच सदोदित राहता येते. वस्तुस्थितीचा गुरुत्वमध्य खेचून त्यास खाली ओढण्यास थोडाच सोडते!" तेंव्हा सावरकर वस्तुस्थितीचा गुरुत्वमध्य साधणारे बुद्धिवादी पुरुष आहेत. वेदांताच्या मनोऱ्यावर ते म्हणून क्षणैक असले, तरी ते लगेच वस्तुस्थितीच्या भानावर येत. त्यांच्या मनात सतत विवेकाचे आणि विचाराचे द्वंद्व चालत असे. माझ्या जन्मठेपीतील एका परिच्छेदाचे नावच 'विकार नि विवेकाचे द्वंद्व' असे आहे. नैष्कर्म्य आणि कर्म याची परस्परविरुद्ध झुंज हा विकार व विवेकाच्या द्वंद्वाचा भाग होता. या संबंधी सावरकर लिहितात, [२७] "केव्हा केव्हा केव्हा मनात विकाराचे बंड माजे. अगदी अनावर होवून विवेकास सिंहासनावरुन उचलून फेकून देणारे बंड होई. तेव्हा क्षणभर त्यांना शरण गेल्यावाचून ते मोडण्याचा मार्ग दिसू नये. मग ते अराजकपणात आपसात झुंजून अन्योन्यास बळि पडू लागले की, पुन्हा आम्ही आमच्या हाती राजकारभार घेवू लागावे आणि अेकेकास बद्ध करुन विवेकाचे स्थानावर त्याची पुनर्स्थापना करावी. त्यांच्या हाती मन साफडू नये म्हणून जाणून बुजून अगदी यःकश्चित् गोष्टी, चरणाऱ्या त्या कम्पोडरच्या गायी, उडणारे आणि खोबरे पळवून न्यावयास कुट युद्धांचे कावे करणारे कावळे, किंवा 'रास'कडे जाणाऱ्या नावा पाहत त्यात मन घालीत बसावे." मनाला सुखात ठेवण्यासाठी वेदांताप्रमाणेच हचा गायी, हे कावळे, हचा नावा सावरकरांना सारख्याच उपयोगी पडलेल्या आहेत, हे समजून घेतले पाहिजे.

अद्वैताचा उपयोग

अद्वैताचा सावरकरांना कसा उपयोग होत असे, याची दोन बोलकी उदाहरणे पाहू. अंदमानला जाताना बोटीवर सावरकरांना बसण्याची जागा दिली होती, त्या शेजारीच शौचकूप होते. 'घाणीची आणि किळसवाण्या देखाव्याची पराकाष्ठा झाली' असे त्यांनी लिहिले आहे. हा प्रसंग वर्णन करुन ते म्हणतात, [२८] "मन

म्हणाले, हाय ! हाय ! हा अक्षरशः जिवंतपणी तुला नरकवास भोगावा लागत आहे ! विवेक म्हणाला, वेडचा ते खरे, पण तेहि मानण्यावर अवलंबून आहे. ही तुला विशेष सवलत म्हणून मिळाली आहे ना ! मग तिचा विशेष उपयोग का करुन घेत नाहीस ? जात, गोत, वर्ग यांचाच नव्हे तर शील आणि शुद्धता याचाही अहंकार धुळीस मिळवून विश्वाशी समरस होण्यासाठी मोठ मोठे तपस्वी आणि योगीही जे साधन वापरण्यास कचरतात, ते तुझ्याकडून करवून तुझाहि अहंकार चक्काचूर करण्यासाठीच ही संधि देवाने दिली नसेल कशावरुन ? या विशेष सवलतीचा विशेष उपयोग कर." त्यानंतर त्रैलिंगस्वामीनी अद्वैताची टर उडविणाऱ्या न्यायमूर्तीच्या समोरच न्यायालयातच शौच करुन हां हां म्हणता स्वतःच ती कशी खावून टाकली याचे उदाहरण ते देतात. शेण आणि अन्न यातील अद्वैत पटविण्यासाठी केलेले हे कृत्य होते. त्यानंतर रामकृष्ण परमहंसाची अशीच गोष्ट सावरकर सांगतात. आणि आपल्या मनाला समजावतात,[२८] "पण लोकांच्या विष्ठेच्या पिपापासून तू कितीही दूर पळालास तरी तरी तुझ्या विष्ठेचे पीप तुझ्या पाठीवरच वाहून न्यावे लागत आहे, त्याचे काय ?" मनाची अशी पुरी समजूत घालून तें शेवटी म्हणतात,[२९] "आणि अशा विवेकाच्या सेना बंड करुन उठलेल्या अिंद्रियावर सोडीत आणि त्यांच्या त्या परस्पर संग्रामाची झटापट पाहत मलाही मौज वाटू लागली. अन्नाची विष्ठा, विष्ठेचे खत होऊन पुन्हा अन्न ! गंमत वाटू लागली. घाणीचा उपद्रव त्या गमंतीत बाधेनासा झाला." या उदाहरणाचा आधार घेवून सावरकर अद्वैत मानत असत, असे काही जणाचे मत आहे. मौज म्हणून पाहणे म्हणजे मानणे नव्हे, ते असे आम्हास वाटते. एक गंमत म्हणून सावरकर या उदाहरणाकडे पाहतात. त्या घाणीचा उपद्रव वाटू नये एवढ्यापुरताच याचा उपयोग झाला, आणि एवढेच त्यांच्या लेखी या अद्वैताचे महत्व होते.

श्रीकृष्णाचे पत्र

अध्यात्माचा मुख्य पाया आत्म्याच्या अस्तित्वावरील श्रद्धा हा आहे. सावरकरांना आत्मा ही वस्तुस्थिती, आध्यात्मिक मानतात त्या अर्थाने, मान्य होती काय याचा आपण आता विचार करू. मृत्युच्या छायेत असताना मनुष्याला देव, धर्म, आत्मा, मोक्ष, स्वर्ग आदी कल्पना फारच जवळच्या वाटतात. अशा अवस्थेत बुद्धी सोडून माणूस श्रद्धेचा आधार घेवू लागतो. अशा मरणाच्या छायेत असताना अंदमानात सावरकरांनी 'मरणोन्मुख शय्येवर' ही कविता लिहिली आहे. अशा मरणशय्येवर असताना आत्म्याविषयी व मरणोत्तर मिळणाऱ्या मुक्तीविषयी त्यांना काय वाटते, हे पाहणे फार महत्वाचे ठरेल. मेल्यानंतर आपले काय होईल, आपल्याला स्वर्ग मिळेल काय, मोक्ष मिळेल काय, मुक्ती मिळेल काय– असे प्रश्न अशा वेळी बुद्धिवादी सावरकरांनाही पडलेले आहेत. ऐहिक जीवनात आपण

कोणते पुण्यकर्म केले यावरते या गोष्टी अवलंबून असतात, असे आपण मानतो. त्यांच्याही मनात या गोष्टी आलेल्याच आहेत. या दृष्टीने ते आपल्या जीवन-कार्याची तपासणी करतात, आत्मनिरीक्षण करतात.

सावरकरांसमोर मग विविध प्रश्न उभे ठाकतात. मुख्य प्रश्न दोन होते. एक मेल्यानंतर आपले काय काय होवू शकते हा होता. दुसरा, मेल्यानंतर अमके होण्यासाठी या जन्मी काय करायला पाहिजे होते, हा होता. विज्ञाननिष्ठ निबंधातील सावरकर परलोक वगैरे जाणत नसतात. काव्यातील सावरकर निदान मरणोन्मुख शय्येवर असताना तरी जाणतात काय, हे पाहिले पाहिजे. हा प्रदेश आपल्याला अनोळखी आहे, अशी ते कबुली देतात. त्या परलोकातही आपल्याला चांगलेच स्थान मिळेल, चांगलेच सुख मिळेल, या बद्दल त्यांना खात्री वाटते. चांगले सुख मिळविण्यासाठी जे काही या जन्मी करायला हवे ते आम्ही केलेलेच आहे, असे ते म्हणतात. सावरकर म्हणतात, [२९]

"म्हणूनि भय उद्याहि ना. स्मशानभूमिचा
परतटप्रदेश जो आनोळखी तिथे
सुखकर प्रवास करवि जे असे असे
ओळखिचे पत्र अम्हाजवळ त्या स्वर्गे
भगवान श्रीकृष्णांचे-श्रीमतां गृहे"

श्रीकृष्णाच्या ओळखीचे आम्हा जवळ पत्र असल्यामुळे परतट प्रदेशही आम्हाला सुखकरच होईल अशी त्यांना खात्री वाटते. हे श्रीकृष्णाच्या ओळखीचे पत्र म्हणजे कोणते? हे ओळखीचे पत्र म्हणजे–

"कश्चित् कल्याणकृच्च तात दुर्गतिम् नहि गच्छति"

स्वतः सावरकरांनीच या कवितेचे अिंग्रजीत भाषांतर केलेले आहे. त्या भाषांतरात त्यांनी या श्लोकाचा अर्थ असा दिला आहे[३०] : 'None that acted well shall ever fall a prey to wretchedness" 'ज्यांनी सद्वर्तन केले आहे, त्यांना कधीही दुर्गती मिळत नसते' असा या श्रीकृष्णाच्या ओळखीच्या पत्राचा अर्थ आहे. सद्वर्तन म्हणजे काय? 'मानवीय आत्यंतिक आत्महिताच्या' कर्तव्य गोष्टी करणे असे सद्वर्तन होय. 'जसे अन्य तुझ्याशी वागावे म्हणूनि तुला वाटते, तसे तुही वाग अन्याशी' ह्या संतवचनाप्रमाणे वर्तन करणे म्हणजे हे सद्वर्तन होय. हे वर्तन आम्ही केलेले आहे, असा सावरकरांचा आत्मविश्वास आहे. कोणताही स्वार्थ न ठेवता राष्ट्रासाठी सर्वस्व अर्पण करणाऱ्या सावरकरांना असा आत्मविश्वास बाळगण्याचा हक्कच होता. आता आमचे म्हणजे असे की, हे सांगण्यासाठी श्रीकृष्णाच्या ओळखीच्या पत्राची गरज काय?

वस्तुतः असे सद्वर्तन प्रत्येक प्रसंगी करता येत नसते, हे सावरकरांनाही मान्यच आहे. सावरकर म्हणतात की, तसे वर्तन न करणे ही माझी अज्ञता होती, आपद्धर्म होता. हा आपद्धर्मही श्रीकृष्णाला मान्यच होता, असेही परत ते

म्हणतात. जे वर्तन अगोदरच केलेले आहे, जे करताना उपयुक्ततावादाच्या पहिल्या आचार्यांचा—श्रीकृष्णाच्या—मार्ग अनुसरला आहे, त्या वर्तनाचे हे समर्थन चालू आहे. मनुष्याचे हित, तेही पुष्कळ मनुष्याचे पुष्कळ हित ही नेहमीची उपयुक्ततेची कसोटी धरून केलेले प्रत्येक वर्तन हे असे सद्वर्तनच असते. हे असे सद्वर्तन मोक्षाला पात्र असते. आध्यात्मिक भाषेमध्ये हीच गोष्ट सावरकर येथे मांडत आहेत. भगवान श्रीकृष्ण, योगिजन, परमेष्ट इत्यादी जितीही आध्यात्मिक शब्द सावरकर वापरत असले, तरी त्या भाषेतील सर्व विचार भौतिकतेचाच आहे, ऐहिक लाभाचाच आहे. आध्यात्मिक भाषेमध्ये, मृत्यूच्या छायेत असतानासुद्धा सावरकर त्यांनी स्वीकारलेल्या उपयुक्ततावादालाच कसा मोक्ष मिळतो, हेच सांगत असतात, हे समजून घेतले पाहिजे.

जीवनाचे ध्येय नि कर्तव्य देशकालपरिस्थिती लक्षात घेवून सावरकर अगोदर ठरवितात व मग त्या ध्येयाच्या वा कर्तव्याच्या समर्थनासाठी मिळतील ते सोईचे आधार ते घेत असतात. यासाठी भगवान श्रीकृष्णच पाहिजेत असे मुळीच नाही. देव-धर्म-आत्मा-ज्ञानेश्वर जडवादाचाही आधार ते तेवढ्याच लोला-मोलानी घेतात. श्रीकृष्णाच्या आध्यात्मिक ओळखी पाठोपाठ सावरकरांनी निरीश्वरवाद्यांची साक्ष काढलेली आहे. ते म्हणतात,[३१]

"...नहि गच्छति संगती अणी
ते निरीश्वर स्वभाव चाविही मला"

निरीश्वरवाद्यांच्या म्हणण्याचे स्पेन्सर, मिल्ल, हेकेल, सीझ यांच्या सिद्धान्ताप्रमाणे-ही मला दुर्गती मिळणार नाही, असा त्यांचा दावा आहे. तेव्हा त्यांची साक्ष काढणे त्यांना सोईचे वाटले त्यांची साक्ष त्यांनी काढलेली आहे. त्यासाठी श्रीकृष्ण आणि जडवादी असा भेदभाव ते कवितेतही करत नाहीत. या दोघांपैकी कुणाचे जेमके सत्य आहे हे अद्याप ज्ञात नाही ही त्यांची भूमिका मृत्यूच्या छायेत लिहिलेल्या काव्यातही स्पष्ट आहे. श्रीकृष्णांच्या ओळखीच्या पद्याचा आधार घेवून सावरकरांना आध्यात्मिक बगैरे ठरविण्यापूर्वी त्यांची ही संपूर्ण भूमिका आपण लक्षात घेतली पाहिजे.

जडवादी

मेल्यानंतर काय होते याच्या दोन शक्यता ते गृहीत धरतात. पहिली शक्यता ही की, या जन्माच्या कर्माचे फल मरणोत्तर मिळत असते. या कर्मफलाप्रमाणे मनुष्याला स्वर्ग, नरक, बंध वा मुक्ती मिळत असते. ही शक्यता गृहीत धरली तरी, आपल्याला स्वर्गच मिळणार असे सावरकरांना वाटते. त्या स्वर्गातील अतिसुरम्य असे बंगले आम्ही आमच्या निजकर्मांनी, सद्वर्तनांनी आधीच राखून ठेवलेले आहेत, असे ते अभिमानाने सांगतात. या सावरकरांच्या म्हणण्याचा अर्थ ते कर्मफलाचा सिद्धांत मानत होते, असा घेणे पूर्णतः चुकीचे आहे. "भारतीय तत्वज्ञानाचा, कर्म-

फलाचा सिद्धांतही सावरकरांना मान्यच होता." हे ह. व्यं. देसाअी यांचे मत चुकीचे आहे.[३२] हा सिद्धांत मान्य होण्यासाठी अगोदर पूर्वजन्म व पुनर्जन्मावर श्रद्धा असावी लागते. सावरकरांची अशी श्रद्धा होती, असे देसाअी यांना म्हणायचे आहे काय ? सावरकर कर्मफलाचा सिद्धांत मानतात, पण तो सिद्धांत सावरकरांचा असतो; भारतीय तत्वज्ञानाचा नव्हे ! अगोदर बुद्धिपूर्वक विचार करुन कर्म केलेले आहे, या कर्माला चांगलेच फळ मिळणार यासाठी वकिली पद्धतीचे युक्तिवाद सावरकर करत आहेत, हे समजून घेतले पाहिजे. युक्तिवादासाठी परलोक ही गोष्ट सावरकर येथे गृहित धरतात. या गृहितावर आधारित जर–तरची चर्चा करतात.

दुसरी शक्यता ही की, स्वर्ग, नरक, आत्मा, बंध, पुनर्जन्म, मुक्ती इ. असत्य गोष्टी आहेत. हया केवळ मनाच्या कल्पना आहेत. या जन्माचा पूर्वजन्माशी वा पुनर्जन्माशी काहीही संबंध नसतो. कारण या संबंधित गोष्टीच खोटया आहेत. या जन्मानंतरची अवस्था शून्यवत असते. हा अर्थात्च जडवाद्यांचा सिद्धांत आहे. या सिद्धांताचाही सावरकर तेवढयाच तोलामोलानी विचार करतात. या कवितेचे त्यांनीच अिंग्रजी भाषांतर केलेले आहे. या जडवादी सिद्धांताची कसोटी आपल्या जीवनाला ते कशी लावतात. हे त्यांच्या खालील भाषांतरित उताऱ्यावरून स्पष्ट होते. ते म्हणतात,[३३] "On the other hand even if heaven and hell, the souls and bondage and the moral law of action be but a fancied and fevered mirrage of mind alone, if the soul be but a thought and a psycho-chemical product of the material combination of molecules and atoms and disappears on its disolution– so much the better ! Death in that case is either a sound sleep or absolution itself. All these five elements, now mixed, may dissolve and free themselves atom from atom, and combine again as best they please in new formation of affinity ; or live by themselves on other conscious levels of existence; or utterly foret themselves, in an unconscious nothingness. After having sparkled brilliantly a while like a pleasant rainbow in the aerial fields of consciousness if this 'I' of me is swiftly dissolved and disappears into the Universal I that is inlaid in the Nalure - then Oh Death, death thou art not but a deliverance." सावरकरांचे अध्यात्म हे असे आहे ! आत्मा हा एक मानसिक विचार म्हणजे कल्पना आहे. तो अणु–परमाणुपासून म्हणजे जडद्रव्यापासून बनलेला आहे. विशिष्ट वातावरणामध्ये या अणु–परमाणूच्या रासायनिक संयोगातून तो बनलेला आहे. जडघटक

दुसऱ्या विशिष्ट वातावरणात परस्परापासून विमुक्त झाले की आत्मा संपतो. यालाच मृत्यू म्हणतात. जड निसर्गाच्या जड पंचमहाभूतात हे आत्म्याचे जड घटक विलीन होवून गेले की त्यालाच मुक्ती म्हणतात. त्यानंतर सगळे शून्यच असते. सावरकरांची आत्म्याबद्दलची भूमिका ही अशी आहे. अध्यात्मवाद्यांना ही मान्य आहे काय ? निदान एक शक्यता म्हणून तरी त्यांना हे मान्य आहे काय ? सावरकर गीतेत वर्णन केलेल्या आत्म्यावर श्रद्धा ठेवतात, असे जे म्हणतात, त्यांचे म्हणणे कसे एकांगी व चुकीचे आहे, हे सावरकरांच्या वरील स्पष्ट विचारावरूनही आपल्या लक्षात येईल. सावरकरांची ही भूमिका एका जडवाद्याची भूमिका आहे, हे उघड आहे. आध्यात्मिक परिभाषेत मांडली म्हणून काही ती आध्यात्मिक होत नसते !

जडवाद्याची ही भूमिका स्वीकारली की, अद्वैताचा सिद्धांत आपोआपच मान्य करावा लागतो. जड पंचमहाभुताचा हा जड आत्मा एक अंश आहे व सर्वत्र जडच भरलेले असल्यामुळे सर्वत्र अद्वैतच आहे. सावरकर वर शेवटी हीच जड–अद्वैताची शक्यता मांडत आहेत. हे अद्वैत भारतीय तत्वज्ञान मानते ते नव्हे, हे भल्याभल्याच्या लक्षात आलेले नाही. थोर विचारवंत श्री ग. दि. केतकर या संबंधात म्हणतात, [३४] "या प्रमाणे सर्व संभाव्य पर्याय मांडून (सावरकरांनी) शेवटी अद्वैताचा अखेरचा पर्याय मांडला आहे. पण हा अद्वैतवाद जवळ जवळ अज्ञेय-शून्यवादापर्यंत भिडलेला आहे." हा अद्वैताचा अखेरचा पर्याय म्हणजे जड–अद्वैताचा होय, हे ते स्पष्ट मान्य करत नाहीत. सावरकरांच्या विचारातील जडत्व दिसू नये यासाठी अज्ञेय, शून्य, अद्वैत इत्यादी आध्यात्मिक शब्दांचा त्यांनी वापर केलेला दिसतो. मृत्यूच्या भयानक दारात पाऊल टाकताना सावरकर हे विचार व्यक्त करीत आहेत, ही गोष्ट दृष्टिआड होऊ देता कामा नये.

आत्मबळ

सावरकरांची आत्म्याविषयीची भूमिका 'गोमंतक' खंडकाव्यातही आलेली आहे. [३५] या काव्याच्या अखेरीस शंकर आणि लिली या प्रेमिकांचा संवाद आलेला आहे. ही जोडी त्यावेळेस हिंस्रश्वापदे असलेल्या निबीड अरण्यात असते. त्या ठिकाणी अशा श्वापदांना पाहून लिली शंकराला म्हणते,

"अवयव ना एकही या मानवा स्वता !
मूळ जाशि तो बनात पशूंच्या
मध्ये पशुसाच अेक वसंत तैं अरे
देह बेळाने न परंतु आत्मबळाने
शकला तो स्थापू सामर्थ्य आपले"

याला उत्तर देताना सावरकरांचा शंकर म्हणतो,

"लिलि ! परंतु आत्मबळे जो जगू शके
म्हणजे तरि काय लिलि ! बोधि तो वृकां
वेदांसह वेदान्ता वा मृगाजिनी
सिंहांसी शिकवी शमशांति समाधि
वा गृध्रा गीता वा सांख्य सुसरिसी ?"

असे प्रश्न उपस्थित करुन शंकरच्या तोंडून सावरकर सिद्धांत मांडतात,

"आत्मबळे केवि करी स्ववश तयांशी !
आत्मबळे म्हणजेची बुद्धिबळाने
बुद्धिबळाने म्हणजे यंत्रबळाने
आणि यंत्रबळ हेची देहबळ असे"

सावरकरांचे हेही काव्य अंदमानातीलच आहे. "आत्मबल म्दणजे बुद्धिबळ" ही त्यांची भूमिका अंदमानातही कायम आहे. आत्म्याविषयीची सावरकरांची एकूण भूमिका लक्षात घेतली म्हणजे सावरकर हे असले बुद्धिवादी समीकरण का मांडतात याची संगती लावता येते. तत्वज्ञानाच्या वा गूढ चिंतनाच्या क्षेत्रात आत्मबलाचा अर्थ काहीही असला तरी व्यवहारात याचा अर्थ बुद्धिबळ, यंत्रबळ असाच होतो, असे सावरकरांचे म्हणणे आहे. हे त्यांचे म्हणणे चिकित्सकपणे समजून घेतल्याशिवाय त्यांना आध्यात्मिक ठरविण्याची घाई करु नये, असे आम्हास वाटते.

सावरकरांची आत्मबळ नावाची अंदमानच रचलेली एक कविता आहे.[३६] या कवितेच्या परिचयात म्हटले आहे की, 'मार्सेलिसला बोटीवरुन निसटण्याचा प्रयत्न केला, त्याचा सूड म्हणून आपला अमानुष छळ होणार या जाणिवेने अशा छळास पुरुन उरेल अशा धैर्याचा पुरवठा करण्यासाठी कवचयंत्र म्हणून सावरकरांनी ही कविता रचली आहे." या कवितेत सावरकर म्हणतात,

"अनादि मी, अनंत मी, अवध्य मी भला
मारिल रिपु जगति असा कवण जन्मला !! ध्रु०
.....
अग्नि जाळि मजसी ना खड्ग छेदितो
भिअुनि मला भ्याड मृत्यु पळत सूटतो !!"

या वरील दोन कवितेतील विचार एकत्र वाचल्यास, मनाला धीर देण्यासाठी सावरकरांनी जे धैर्य या 'आत्मबळ' कवितेत निर्माण केलेले आहे, ते वस्तुतः बुद्धिबळाचेच धैर्य आहे, असेच म्हणणे भाग आहे. आध्यात्मिक भाषेतील आत्मबलाचा अर्थ भौतिक भाषेत बुद्धिबळ असाच सावरकर घेतात. आत्मबलाचा लक्षार्थ 'अहंकार' किवा 'आत्मविश्वास' असाच येथे घेतला पाहिजे. बुद्धीचा आधार असलेले ते एक मानसिक बळ आहे. असा अर्थ घेतला तर तो त्यांच्या आत्म्याविषयीच्या अितर विचाराशी जुळविता येतो, सुसंगत करून घेता येतो.

आत्मा हा अमर आहे; तो 'नैनंछिन्दन्ति शस्त्राणि' आहे, इत्यादी गीता-

वचनावर व आध्यात्मिक सिद्धांतावर सावरकरांची श्रद्धा होती काय हे पाहण्यासाठी 'माझी जन्मठेप' मधील त्यांचे खालील विचार पाहण्यासारखे आहेत. या गीतावचनावर श्रद्धा असणाऱ्या एका क्रांतिकारकाबद्दल सावरकर म्हणतात,[३७] "क्रांतिकारकास ते गीता शिकवित, तेव्हा देह का काहीच नसून आत्मा अमर आहे, नैनंछिदन्ति शस्त्राणि असा उपदेश देत, आणि त्यामुळे तरुणास मरण मारण्याची तमा उरत नसे. जेव्हा कारागाराच्या दगडी तटाचे प्रत्यक्ष दर्शन झाले आणि बैलांनाही रणकुंडी आणणारी तेलाच्या घाण्यासारखी कठोर कामे करता करता एक दिवस घेरी येवून पडावे लागले. तेव्हा सूड घेण्यासाठीच की काय देहाने आत्म्यास पायाखाली तुडवून त्यांचे मनोधैर्याचाच चक्काचूर करुन टाकला." या अमरत्वाच्या तात्विक सिद्धांताला व्यवहारात काय मोल आहे, हेच सावरकर येथे सांगत आहेत. तत्वज्ञानाच्या क्षेत्रात आत्म्याचा हा सिद्धांत एक शक्यता म्हणून सावरकर विचारात घेतात; व्यवहाराच्या क्षेत्रात अर्थशून्य म्हणून निकालात काढतात, हे काळजीपूर्वक समजून घेतले पाहिजे.

सावरकरांची आत्म्याविषयी भूमिका 'सगीत अुःशाप' मधील चोखा सुद्धा एक शक्यता म्हणून मांडतो. चोखा म्हणतो,[३८] "आणि वायुविषयी म्हणाल तर प्राण हा देखील वायुच आहे." आध्यात्मिक श्रद्धा असणाऱ्या चोखांच्या तोंडी सावरकरांनी हे जडवादी विचार घातलेले आहेत. हा वायू वातावरणातील हवेत मिसळला की, त्याला सावरकर आत्मा परमात्म्यात विलीन झाला असे मानतात. 'पाहिजे! काळचा माणसाला गोरा करणारा संशोधक पाहिजे' या त्यांच्या लेखात त्यांनी अगदी स्पष्ट शब्दात जडातून आत्म्याची उत्पत्ती होण्याची शक्यता वर्तविली आहे.[३९] दोनशे वर्षाच्या आत प्रयोगशाळेमध्ये 'आपण कपडा जसा हवा तसा बेततो तसा मनुष्यही मागणीप्रमाणे घडविता' येवू शकेल असे त्यांनो भाकित करुन ठेवलेले आहे. गीतेत वर्णन केलेल्या आत्म्यावर सावरकरांची श्रद्धा होती काय हे ठरविण्या पूर्वी या त्यांच्या साऱ्या विचारांचा एकत्रित विचार केला पाहिजे, त्यांची सुसंगती लावली पाहिजे.

'अज्ञेयाचे रूद्धद्वार' या कवितेत परमेश्वर हा अज्ञेय आहे व अज्ञेयाच्या घराकडे जाण्याचे विविध मार्ग आहेत, याची माहिती दिली आहे. पुराणमार्ग, भक्तिमार्ग, संन्यासमार्ग, व योगमार्ग हे सारे धार्मिक मार्ग सांगितल्यावर ते शेवटी जडवादाचा मार्गही सांगतात. ते म्हणतात,[४०]

"मी म्हणुनि अणूच्या बोगबोगद्यातुनि रे
हिंडूनि बघे घर अंति तुझे सामोरे"

अणुपरमाणूच्या जडवादी मार्गानेही या अज्ञेयाचा शोध लाघता येवू शकतो, यावर त्यांचा विश्वास आहे.

या विश्वाचे गूढ घेत आपण मागे गेलो तर मूळ गूढ हे बुद्धीस अगम्यच राहते, असे मत कित्येक ठिकाणी त्यांनी व्यक्त केलेले आहे. 'सप्तर्षि' या कवितेत

हाच विचार मांडलेला आहे. विश्वाच्या अितिहासाला पहिले पानच नसते, असे ते याच अर्थाने म्हणतात. लहानपणी मनात आलेल्या पण पूर्णपणे न कळालेल्या या सिद्धांताची आठवण होवून आपल्या आत्मचरित्रात सावरकर म्हणतात,[४१] "त्याचे तार्किक समर्थन मी आता सविस्तर करु शकेन. मानवाचा इतिहास मर्कटापर्यंत पोहचवीन, मर्कटाचा जीवाणूपर्यंत, त्याचा वनस्पतिपर्यंत, त्याचा भूगर्भापर्यंत, त्याचा सूर्यापर्यंत, त्याचा तेजोमेघापर्यंत, त्याचा त्याच्या मागे मागे मागे ! सप्तर्षि कवितेत आताच्या प्रौढ तर्कपरिभाषेत जे मी पुढे सांगितले की खंड अितिहासच शक्य आहे." येथेही जडापासून जीवाची उत्पत्ती झाल्याची गोष्ट सावरकर स्पष्टपणे मान्य करत आहेत. आता त्या जडाची म्हणजे तेजोमेघाचीच निर्मिती कशी झाली, कुणी केली हे मात्र अज्ञात आहे असे ते म्हणतात.

सावरकरांची ही भूमिका अितकी स्पष्ट असतानाही 'आत्मबल' या कवितेत त्यांनी आत्म्याच्या अमरत्वाचा सिद्धांत मांडला आहे, असे अनेकानी म्हटले आहे. "त्या कवितेला अधिष्ठान होते ते अध्यात्मवादाचे, आत्म्याचे अमरत्व सांगणाऱ्या तत्वज्ञानाचे." असे डॉ. प्र. ल. गावंडे म्हणतात.[४२] याच अर्थाने सावरकर जडवादाचा सिद्धांत मांडतात, असे ही म्हणता येवू शकते. तत्वज्ञानाच्या क्षेत्रातील एखादी शक्यता आपल्या काव्यात मांडली, यावरुन त्यावर त्यांची श्रद्धा होती असा अर्थ काढणे मूलतः चुकीचे ठरते.

आत्मौपम्य भाव

अद्वैत व आत्मौपम्याबद्दलची त्यांची भूमिका आत्म्याच्या या भूमिकेवर आधारलेली आहे. 'मी आणि 'तू' यातील अभिन्नपणा आचरण्यात आणण्याचा त्यांनी जो प्रयत्न केला व ते अपयेशी ठरले याचे वर्णन त्यांनी 'मरणोन्मुख शय्येवर' या कवितेस केलेले आहे. गवताच्या भावना सुद्धा आपल्यासारख्याच आहेत, ही आत्मौपम्य दृष्टी ठेवून वागण्याचा प्रयोग करताना काय घडले, हे सांगताना ते म्हणतात,

"जै हिरव्या गवताचा गार गालिचा–
वरुनि दहा पावलीच अंगणामध्ये
कारागारात कधी मी फिरे तधी
आत्मौपम्यात मुरत चित्त थिजोनी
कितीदा तरी चरण अकस्मात चालता
स्तंभित होवूनि रहावेत घटिघटी"

गवताचे अंकुर दुखवतील म्हणून त्यांच्यावर पायच ठेवावा वाटेना, त्या प्रमाणे जेवतानाही–

"हातीचा घास कधी हटुनि रहावा
हातीची, की जितुकी त्यात शिते ती

वीजेंची नव्हत काय ? खात सो आम्ही
फल ते ते भ्रूणघात ? आणि कधि कधी ? "

तेव्हा या आत्मौपम्याला– अद्वैताला सावरकर प्रत्यक्षाची, प्रयोगाची कसोटी लावतात. जगात हे अद्वैत वा एकत्वाचे (Oneship) तत्व पाळणे कसे अशक्य आहे, हा आपला प्रयोगाचा निष्कर्ष सांगताना सावरकर पुढे म्हणतात,

" मज पडले भय की मज वेड लागले !
आत्मौपम्यास जओी वर्तण्यास हे
मन माझे अनुसरिता मज पदोपदी
मरणासम दुःख होय पाहुनी जगी
पूर्ण असंभवचि तया आचरु पुरे
तरिही यत्न म्या केला; अज्ञतेमुळे "

'आत्मौपम्य' हा केवळ विचाराचा विषय आहे, आचाराचा नव्हे, हे लक्षात यायला विज्ञाननिष्ठ सावरकरांना हे असले प्रयोग करावे लागले होते. या सिद्धांताप्रमाणे वागणे म्हणजे एक वेडेपणा आहे, एक अज्ञपणा आहे, असे ते स्वतःच म्हणत आहेत.

अशक्य ! अशक्य ! !

'विरहोच्छवास' या खंड काव्यात स्थितप्रज्ञ समजल्या जाणाऱ्या योगिजनांनाही विरह कसा सहन झाला नाही, याचे त्यांनी चित्रण केले आहे. ते म्हणतात,

" आणि प्रीति तिचे विरह असेची ! 'की, ती
हृदयात हो तुझी प्रीती !
परि हृदयी तू तवचि आत्मरत होशी
तरि छळि विरह का तुजशी ? "[४३]

प्रीती आणि अद्वैत या दोन विरोधी गोष्टी आहेत. प्रीती म्हणजे द्वैत– असे सावरकरांचे म्हणणे आहे. आत्मरतीत विरहाचे दुःख नसेल, पण प्रीतीचेही सुख नाही. प्रीती का अद्वैत असा पर्याय समोर आल्यास मनुष्य प्रीतीच स्वीकारणार हे उघड आहे. कारण जीवन म्हणजे प्रीती. जीवन हवे का अद्वैत अशा पर्यायाचा सावरकर विचारच करु शकत नाहीत. ही कसोटी लावून आजवर असे वागणारे कोण महात्मे, योगिजन, स्थितप्रज्ञ होवून गेले याचीही ते तपासणी करतात. असे वागणे जगात आजपर्यंत कुणालाच शक्य झालेले नाही, अशा निष्कर्षाला ते येतात. यासाठी शिवाजी येले म्हणून दुःखी होणाऱ्या रामदासाची, अभिमन्यूच्या मृत्युमुळे तळमळणाऱ्या श्रीकृष्णाची, सीतेसाठी व्याकुळ होणाऱ्या श्रीरामाची– तसेच मीराबाई, तुकाराम या साऱ्यांची त्यांना आठवत येते. या पैकी असे वागणे कुणालाच शक्य झाले नाही, असे ते म्हणतात.

तीन बाजू

जीवात्म्याच्या ऐक्याच्या कल्पनेचा सावरकर उपहास करतात. अध्यात्माची पहिली बाजू नैतिकतेची, दुसरी तत्वज्ञानाची व तिसरी भौतिक जीवनातील परिणामाची आहे. या तिसऱ्या बाजूवर सावरकर टीकेची झोड उठवितात. तो उपहासाचा, विडंबनाचा विषय बनवितात. नाटकात, काव्यात वा कथेत त्यांना नको असणारी काही विरोधी मताची पात्रे आहेत. ज्यांना सावरकरांना हास्यास्पद बनवायचे असते, त्यांच्या तोंडी ते हास्यास्पद विधाने घालत असतात. 'गोमांतका'तील महात्मा निनावी बाबा हे असे एक पात्र आहे. जी मते गांभीर्याने उपदेश म्हणून मांडायची असतात, ती अशा पात्राच्या तोंडी ते कधीही घालत नाहीत. अंतुनियाच्या भीतीने बेशुद्ध झालेल्या व पुन्हा शुद्धीवर आलेल्या रमाला हे बाबा म्हणतात, [४४] " मुली, मुली, तुला माहित आहे कां ? सर्वांच्या ठिकाणी अेकच आत्मा आहे. प्रेम हाच तो आत्मा. या प्रेमाच्या सामर्थ्याने असे शेकडो अंतुनीय काय, पण प्रत्यक्ष साप ही कसे वश होतात ते पहा." ' पुन्हा एका ठिकाणी हे बाबा म्हणतात, " सर्व भुतांच्या ठिकाणी अेकच आत्मा असतो. प्रेमाने सर्पसुद्धा वश होतो. " अंतुनियालाही हे बाबा हे जीवात्म्याचे तत्वज्ञान शिकवितात.

अव्यवहार्य

' बाळतीण ' या कथेतील बुवा म्हणतो, " सर्वभूति परमेश्वर आहे ! ही आमच्या हिंदुधर्माची शिकवण अंगी बानण्यासाठीच पाहिलीत ना गोपूजा हेच कसे उत्कृष्ट साधन आहे ते ? पशु आणि माणूस याचे आत्मैक्य ! भूतदयेची परिसीमा ! ! " [४५] येथे सावरकरांना वेडेपणाची परिसीमा असेच म्हणायचे आहे. जीवात्म्याचे अैक्य ' हा त्यांनी उपहासाचा विषय बनविला होता. या अध्यात्माचा, वेदांताचा, अद्वैताचा भौतिक परिणाम शून्य आहे, ही सावरकरांची स्पष्ट भूमिका होती.

रत्नागिरीला असताना त्यांचे ' ब्रह्म आणि माया याचा भौतिक परिभाषेतील अर्थ ' या विषयावर व्याख्यान झाल्याचा उल्लेख आहे. [४६] पण या भाषणाचा तपशील उपलब्ध नाही. ' सर्वभूतहितेरतः ' याचा भौतिक अर्थ ते जसा ' बहुभूतहितेरतः' असा करतात , त्याच प्रमाणे 'ब्रह्म आणि माया' याचा भौतिक भाषेतील अर्थ 'अखिल मानवाचे कल्याण नि स्वतःचे कल्याण' असाच घेत असले पाहिजेत.

समबुद्धी नि शुद्धबुद्धी म्हणून महत्पदास पावलेल्या श्रीकृष्णासारख्यांना सावरकर तसे मानायला नम्रपणे नकार देतात. [७५] संन्यासी हा समबुद्धीचा असल्यामुळे त्याला सगळेच सारखे दिसतात, असे भगवान बुद्ध म्हणतात. हा सिद्धांत व्यवहारात कसा लागू होत नाही, हे विनम्रपणे सांगताना. विक्रम म्हणतो, " [४८] समबुद्धी हा संन्यासाचा धर्म ! परंतु संन्यासी भिक्षु चुलटया सोडून अुस खातात, भूस फुंकून तांदूळ खातात, गढूळ डबके सोडून वाहत्या नदीचं पाणी पितात, दुभत्या

गाअीच्या कासेत हात घालतात, सापाच्या बिळात हात घालीत नाहीत." हे अध्यात्माचे तत्वज्ञान चांगले कसे, हे सांगण्याचे तर सोडून द्या, पण व्यवहारात ते कसे अव्यवहार्य आहे, हेच पटवून देत असलेले सावरकर आपल्याला दिसतील.

मेल्यावर कळणार

जरा, व्याधी, वृद्धपण नष्ट होईल या आशेने बुद्ध धर्माची दीक्षा घेवून पस्तावलेल्या भिक्षुणीस सावरकरांचा शाकंभट म्हणतो, [४९] "तुला अेवढे कळेना की, जगातील प्रत्येक धर्म लोकांचे सर्व दुःख दूर करण्याच्या, जन्म, जरा, व्याधी, आणि मरणापासून त्याची सुटका करण्याच्या ज्या आशा दाखवतो, ज्या वचनचिठ्ठ्या लिहून देतो, त्या सर्व पारलौकिक परिभाषेत असतात, हचा लोकांच्या भाषेत नव्हे! ज्या जन्मास हे धर्म टाळणार तो हा जन्म असू तरी कसा शकेल? कारण हा जन्म तर होवून गेला देखील! अर्थात् या सगळचा जन्माच्या आशा, सगळचा धर्माच्या हचा असल्या आशाच्या हुंडचा नेहमी परलोकाच्या पेढीवर वटविण्यासाठी लिहिलेल्या असतात, आणि त्यावरील दिव्य पत्ता उघडचा डोळचानी वाचू लागताच ते दिपून जात असल्यामुळे, मरणाने डोळे मिटल्यावर तो क्वचित वाचता आला तर येणार! या सगळचा धर्माच्या कामधेनु यमराजाच्या गोठचात बांधलेल्या; याच्या कल्पवृक्षाच्या आंबराया स्मशानाच्या पल्याडच्या उद्यानात लावलेल्या आणि या सर्वांचे स्वर्ग हे मेल्यानंतर दिसणारे! ...या सर्व धर्माच्या वचन चिठ्ठ्याची रक्कम या जन्माच्या चलणी नाण्यात रोखठोक मोजून देणारा सावकार यांच्यात कोणी नाही. ज्या उदाहरणाचा पडताळा पाहताच येत नाही, अशा उत्तराप्रमाणे हे धर्म सारखेच खरे किंवा खोटे असणार" अध्यात्माच्या कल्पवृक्षावर सावरकरांची श्रद्धा होती काय, हे याबरुन आपल्याला समजून घेता येईल. व्यवहाराच्या भौतिक भाषेमध्ये बोलणारे व हिताहिताचा विचार भौतिक लाभाच्या नगदी नाण्यामध्ये करणारे सावरकर, ज्याचा पडताळाच घेता येत नाही, अशा अध्यात्मावर, अशा मोक्षावर, अशा मुक्तीवर श्रद्धा ठेवण्याचा संभवच नव्हता, हे आपल्याही लक्षात येईल. "अिहलोकी, मनुष्यास मुक्त करण्याची कोणत्याही धर्माची प्रतिज्ञा ही केवळ थाप आहे." हे आपले मत सावरकर शाकंभटाच्या तोंडून मांडतात. [४८] सावरकरांची हीच मूळ व मुख्य भूमिका आहे. कवितेमध्ये ते आध्यात्मिक भाषेत आपले विचार मांडत असले तरी त्यातही हाच भौतिक आशय सामावलेला असतो. या शब्दानी आपली दिशाभूल न होवू देता त्यांच्या काव्यातील अध्यात्माकडे डोळसपणे पाहण्याचा दृष्टिकोण आपण ठेवला पाहिजे.

तीन ऋणं

जन्मार्जित ऋणांची जी पारंपारिक कल्पना आहे, त्या कसोटीवर आपल्या जीवनाचे ध्येय आणि कर्तव्य सावरकर तपासून घेतात. सावरकर या पितृऋण,

ऋषिऋण व देवऋण या ऋणांच्या कल्पनांचा आदर करतात. या तिन्हीही ऋणांना ते राष्ट्रऋणात विलीन करुन टाकतात. 'मरणोन्मुख शय्येवर' या कवितेत आपल्या कर्तव्याविषयी म्हणतात, [४९]

"तोडजोड करुनि परी फेडली ऋणे
जन्मार्जित जी जी ती; ऋषीऋणाप्रती"

सावरकर येथे ऋषीचे नाव घेतात, देवाचे घेतात, रघुवीराचे घेतात. देशाकरिता लढत लढत मरणे हीच त्यांना या तिघांची आज्ञा वाटते. ते म्हणतात, [४९A]

"चढवुनि तै हल्ला सहसाचि ज्या पली
सुटली रघुवीराची प्रथम रणाज्ञा...
फेडाया पितृऋणासि आजि अहो मी
शास्त्राते अनुसरोनि, दत्तविधाने
निपुत्रिकत्व वारियले, पुत्र अखिल हे
अभिनव भारतची मम ! जेथ जेथ की"

सावरकरांच्या कल्पनेतील ही ऋणे कोणती आहेत हे यावरून लक्षात येईल. देशाकरिता आत्मयज्ञ करणे, हे त्यांना आपल्या जीवनाचे कर्तव्य वाटले व यामुळेच ही तिन्हीही ऋणे फिटतील असे त्यांना वाटते. आत्मयज्ञ करताना निपुत्रिक वारल्याने पितृऋण फेडता येत नाही, याचे त्यांना दुःख वाटत नाही; कारण 'अभिनव भारत' हाच माझा 'दत्तक पुत्र' आहे, अशी त्यांची भावना आहे. आध्यात्मिक परिभाषेतला हा भौतिक आशय नीट लक्षात घेतला पाहिजे. भारत ही माता आहे; 'अभिनव भारत' ही गुप्त क्रांतीसंस्था 'दत्तक पुत्र' आहे; देश हाच देव आहे; देशाकरिता मरणे हेच जगणे आहे; राष्ट्राविना जगत राहणे हाच मृत्यू आहे; राष्ट्रस्वतंत्रता हीच मोक्ष, मुक्ती, परब्रह्म आहे– हा सावरकरांच्या आध्यात्मिक भाषेच्या देहातील भौतिक विचाराचा आत्मा समजून घेतला पाहिजे.

सावरकर ही आध्यात्मिक परिभाषा वा संकल्पना का वापरतात हेही समजून घेतले पाहिजे. ही भाषा व कल्पना आपल्या पूर्वजांची आहे, त्यामुळे सावरकरांना ती आदरणीय व वंदनीय वाटत होती. ज्यांना नव्या कल्पना समजून सांगावयाच्या आहेत, त्यांच्या परिचयाची ही भाषा होती. या भाषेमुळे देवलसी माणसांना देशलसी करणे त्यांना सोपे गेले. कुटुंबातील सारेच्या सारे राष्ट्राकरिता बळी द्यायचे असतील, तर त्यांना प्रेरित करण्यासाठी बुद्धिवादी भाषा उपयोगाची नसते. त्यांचे वडील बंधू बाबाराव हे तर पक्के आध्यात्मिक पुरुष होते. अंदमानात या दोघा भावांची भेट झाली. त्यांनी एकमेकांना काय बोलावे ? विज्ञाननिष्ठेवरच चर्चा करावी ? बाळला पाठविलेल्या एका पत्रात यावद्दल सावरकर लिहितात, [५०]
"एकदा पळे दोन पळे भेटीचा योग आला असता मी बाबांना म्हटले की, शास्त्रात पितृऋण, देवऋण, आणि ऋषिऋण अशी तीन ऋणे सांगितली आहेत... आपण कोणत्याही भारतीय तरूणाने हे विसरता कामा नये की, आपले जीवन

म्हणजे एक तापलेले वालुकामय... असे सहाराचे प्रचंड वाळवंट आहे."... या कोळ झालेल्या वाळवंटातून जाणाऱ्या कर्तव्याच्या मार्गाने आपण जात असताना परमेश्वराच्या कृपादृष्टीने आपल्या मार्गात सध्या आपल्या दैवी आलेल्या स्थलाप्रमाणे रम्य हिरवी चार स्थळे आढळली तर आपण हे विसरता उपयोगी नाही की, हा क्वचित संभवणारा योगायोग आहे; चुकून लाभलेला ईश्वरीप्रसाद आहे आणि म्हणून आपण न थांबता आणि घाईही न करता या जीवनाच्या पुण्यमय यात्रेच्या मार्गाने पुढे चालले पाहिजे.... योग्य असे उदात्त ध्येय संपत्ती मिळविणे हे नाही, तर आत्मयज्ञ करणे हे आहे. पुष्प लतिकांनी उद्यान शृंगारणे हे नाही; कारण 'देवाच्या माळेसाठी ज्याची सर्व फुले शीर्ण झालेली असतात ते उद्यान चिरंतन पुष्पांनी बहरलेले असते."

धार्मिक व आध्यात्मिक माणसांना आत्मयज्ञ करण्यास प्रेरित करण्यासाठी अशीच भाषा वापरावी लागते. अशा भाषेने बुद्धिवाद विटाळतो, यावर सावरकरांचा विश्वास नव्हता. अंतिम मृत्युशय्येवर पडलेल्या बाबांना सावरकरांनी कारागृहातून धाडलेले पत्रही असेच आध्यात्मिक भाषेनी बहरलेले आहे. ही भाषा कुणासाठी आहे, कोणत्या हेतूने आहे व त्या भाषेच्या आत कोणता मुख्य विचार गुंफलेला आहे, यांची छाननी केल्याशिवाय केवळ शब्दाचे पुरावे देवून सावरकरांना आध्यात्मिक ठरविण्याची घाई करु नये, असे आमचे नम्र मत आहे.

शून्यवादापासून जडवाद, जडाद्वैतवाद इत्यादीचा सावरकरांनी सखोल अभ्यास केलेला होता, पण यापैकी कोणताही एक वाद त्यांनी स्वीकारला नाही. या साऱ्या वादातील जे जे उपयुक्त होते ते ते स्वीकारण्याची त्यांची भूमिका होती. त्यांनी डार्विन स्वीकारला हे म्हणणे जेवढे चुकीचे, तेवढेच त्यांनी शंकराचार्य स्वीकारला हे म्हणणेही चुकीचे आहे. या जगातील सर्वात आधुनिक तत्वज्ञान कोणते आहे, याचे ज्ञान करुन घेण्यात त्यांना जिज्ञासा आहे. केवळ एखादे तत्वज्ञान सर्वात आधुनिक, अद्यतन आहे एवढ्याचसाठी त्याचा प्रयोग करण्यासाठी आपल्या राष्ट्राची प्रयोगशाळा बनविण्याची त्यांची तयारी नव्हती. विसाव्या शतकातील जीवशास्त्रज्ञाचे नवे विचार स्वीकारताना, आपल्या देशाचे सध्याचे प्रश्न सोडविण्यास ते उपयोगी आहेत काय, ही कसोटी सावरकर लावणारच! विसाव्या शतकातील वैज्ञानिक उत्साहाने विज्ञानाची महती गाताना दिसत नाहीत, हे पाहिल्यावर लगेच विज्ञानावर झोड उठवायला निघायला सावरकर काही पोथिनिष्ठ बुद्धिवादी नव्हते.

भौतिकजीवन परिपूर्ण न झालेल्या भारताला वेदांताची गरज नाही, हे जसे ते म्हणतात, तसेच विज्ञानविरोधाचा विचार करण्याचे आज तरी कारण नाही, अशीच त्यांची भूमिका राहणार, हे उघड आहे. 'ज्या ज्या गोष्टीचे आपण निरीक्षण करीत असतो, त्या त्या गोष्टीचे गुणधर्म हे निरीक्षणाच्या कृतीमुळे बदलतात' या हायझेनबर्गच्या विज्ञानाच्या सिद्धांताचा सावरकरांनी विचार

केलेला नसावा.[५१] या सिद्धांतामुळे सावरकरांच्या समोर असणारे विविध प्रश्न सोडविण्यास कशी मदत होणार होती, हे डॉ. य. दि. फडके यांनी थोडे तपशीलाने समजून सांगायला हवे. स्वातंत्र्य संपादन, अस्पृश्यता निवारण, जातिभेद निर्मूलन, हिंदु-मुसलमान समस्या इ. प्रश्नावर हे विसाव्या शतकातील नवे नवे सिद्धांत कसे उपयोगाला येणार होते, हे त्यांनी पटवून सांगितले पाहिजे. 'तत्वज्ञा'च्या अशा कसोट्या लावून सावरकरांना डार्विनवादी किंवा अध्यात्मवादी ठरविणारे विरोधक वा अनुयायी दोघेही सारखेच चुकलेले आहेत.

योग

सावरकर हे एक योगी पुरुष होते असे त्यांच्या सर्वच अनुयायांचे आग्रहाचे म्हणणे असते. बाळाराव सावरकर तर त्यांना महायोगी म्हणतात. भगवद्गीतेवरील आपल्या भाष्यात शंकराचार्यांनी 'योग : कर्मसु कौशलम्' अशी योगाची व्याख्या केलेली आहे. या व्याख्येप्रमाणे योग म्हणजे सत्याचा साक्षात्कार करुन घेण्याची युक्ती असा होतो. ही युक्ती चित्तवृत्ती स्थिरावल्यामुळे प्राप्त होऊ शकते. योग-सूत्रात योगाची व्याख्या 'योगश्चित्तवृत्ती निरोधः' अशी केलेली आहे. गीतेतील[५२] व योगसूत्रातील[५३] योगावद्दलची व्याख्या सारखीच आहे. चित्तवृत्तीचा निरोध अशी व्याख्या दोन्हीतही केलेली आहे. या अर्थाने योग आपण घेणार असू तर सावरकरांना योगी म्हणणे हे अगदी योग्य ठरेल. आपल्या मनाचा निग्रह करण्याची युक्ती त्यांना अभ्यासाने साध्य झालेली होती, असे दिसून येते.

मनोनिग्रह कसा करावा यावद्दलचे शास्त्र आपल्याकडे उपलब्ध आहे. त्या योगसूत्रांचा सावरकरांनी सखोल अभ्यास केलेला होता व अंदमानात त्याचा उपयोगही केलेला होता. सावरकरांच्या मुलाची म्हणजे विश्वासची आठवण अशी आहे की,[५४] सावरकर आंघोळ झाल्यावर दहा मिनिटे डोळे मिटून ध्यानस्थ बसत असत. त्यांना योगविद्या चांगली अवगत होती. अंदमानात ती साधना त्यांनी केली होती. त्यांना काही मंत्रही येत असावेत. या गोष्टीला बऱ्याचजणांनी दुजोरा दिलेला आहे. अंदमानातील यावावतचा जो अनुभव त्यांनी काव्य व आत्मचरित्रात नोंदविला आहे, त्याशिवाय त्यांनी स्वतः यावद्दल मात्र कुठेही लिहिलेले नाही. बुद्धिवादाच्या दृष्टीने पाहिले तर अशा अर्थाचे योगशास्त्र हे मानसशास्त्रावर आधारलेले एक प्रत्यक्ष, प्रयोग, अनुभव व पडताळा घेता येणारे शास्त्र आहे.

कुंडलिनी

योगशास्त्र हे विज्ञानासारखे शास्त्र आहे, असे त्यांना वाटत असे. 'योग न गौण्य परी ते शास्त्र' असे त्यांनी 'सप्तर्षि' कवितेत म्हटलेले आहे.[५५] त्यांनी हिंदु-ध्वजावर कुंडलिनी हे योगाचे प्रतिक म्हणून निवडले. मानवी जीवनाची 'अभ्युदय' म्हणजे ऐहिक सुख व 'निःश्रेयस' म्हणजे पारलौकिक किंवा आध्या-

त्मिक सुख अशी दोन मुख्य अंगे आहेत. या हिंदुपद्धतीचा त्यांना अभिमान वाटतो. ऐहिक आणि आध्यात्मिक सुख हे परस्पराला कसे पूरक आहेत, हे ते पटवून देतात. त्यांच्या मते 'अभ्युदय' म्हणजेच ऐहिक सुखही मनुष्याला अत्यावश्यक (Imperative necessary) अशी गोष्ट आहे. हे सुख प्राप्त झाल्यानंतर 'निःश्रेयस' म्हणजे उदात्त असे 'आत्मिक सुख' मिळण्याचा मार्ग मोकळा होतो, असे त्यांनी आपल्या हिंदुध्वजावरील अंग्रजी लेखात म्हटले आहे. निःश्रेयसासाठी अभ्युदयाच्या प्राप्तीची पूर्व अट घालूनच सावरकर थांबत नाहीत, तर अभुदयाच्या उच्चांक म्हणजे निःश्रेयस होय, असे समीकरण मांडतात. Culmination of wordlly Abhuadaya cannot be any other than Nihshreyas itself, असे त्यांनी स्पष्टपणेच म्हटले आहे.[५६] भौतिक सुखाने आत्मिक सुखाचा मार्ग मोकळा होतो व आत्मिक सुखाने भौतिक सुखाला पावित्र्य येते, असा या दोन सुखाचा संबंध त्यांनी लावला आहे.

भौतिक म्हणजेच आत्मिक

त्यांची निःश्रेयसाबद्दलची ही भूमिका नीट समजून घेतली पाहिजे. जे जे थोर पुरुष योगी म्हणून मान्यता पावले, त्यांच्या व सावरकरांच्या भूमिकेतील फरक नीट लक्षात घेतला पाहिजे. माणूस विज्ञानामुळे भौतिक सुखवादी व जडवादी बनत चालला आहे, ही साऱ्या आध्यात्मिक योग्यांची मूलभूत तक्रार आहे. या माणसाला आध्यात्मिक बनविले पाहिजे, असे त्यांना आग्रहाने वाटते. सावरकरांचे म्हणणे असे की, भौतिक सुख ही आद्य व अनिवार्य गरज आहे. माणसाच्या या सुखाची सोय आधी केली पाहिजे. हे सुख मिळाल्याशिवाय आत्मिक सुख उपभोगण्याचे सामर्थ्यच येत नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे भौतिक सुखावर टीका करीत असलेले, आपले लोक जडवादी बनत आहेत यामुळे चिंताग्रस्त झालेले सावरकर आपल्याला कधीही दिसणार नाहीत. भौतिक सुखाचा उच्चांक म्हणजे दुसरे तिसरे काही नसून तेच निःश्रेयस होय, असे ते का म्हणतात हे समजून घेतले पाहिजे. या भूमिकेतूनच भारताला आज वेदांताची– आत्मिकसुखाची गरज नाही, तर ती गरज भौतिकदृष्ट्या संपन्न झालेल्या युरोप–अमेरिकेला आहे, असे त्यांनी अंदमानातून बाळला पाठविलेल्या पत्रात म्हटलेले आहे.[५७] सावरकरांच्या दृष्टीने भौतिक आणि आत्मिक हे दोन सुखाचे प्रकार नसून एकाच सुखाच्या या दोन पायऱ्या आहेत, टप्पे आहेत. अशा या निःश्रेयसाचे प्रतिक म्हणून ते कुंडलिनीची योजना करतात. या प्रतिकाचा सध्याचा अर्थ भौतिक सुख असा आहे, कर्मयोग असा आहे; दूर भवितव्यातला अर्थ भौतिक सुखाचा उच्चांक म्हणजे निःश्रेयस असा आहे. ध्येय म्हणून अशा सुखासाठी कुंडलिनीची सावरकरांनी केलेली योजना बुद्धिवादीच आहे हे उघड आहे.

'कुंडलिनी' ही मानवी शरिरातील एक सुप्त शक्ती आहे, मेरुदंडामध्ये तिचे

स्थान आहे. विशिष्ट प्रयोगाने व शरिराला व मनाला दिलेल्या आकाराने ही शक्ती जागृत होते. सापासारखे वेटोळे असलेले हे एक अद्रिय आहे. हा एक प्रकारे शरीररचनाशास्त्राचा विषय आहे. ही कुलंडिनी जागृत झाली म्हणजे मनुष्याला अपरिमित आनंद होतो. सावरकर त्याला केवलानंद म्हणतात. सावरकरांनी या कुंडलिनीचे सविस्तर वर्णन केलेले आहे. 'राजयोगात' विवेकानंदानीही ते केलेले आहे. एक प्रकारे हे प्रत्यक्ष, प्रयोग व अनुभवावर आधारलेले शास्त्र आहे. ते पूर्णपणे विज्ञाननिष्ठ आहे. धर्मातील कर्मकांडाचे प्रतिक असणारी ही कुंडलिनी ध्वजावर आणणे अंधश्रद्धा नाही काय, या प्रश्नाला उत्तर देताना एकदा सावरकर म्हणाले, [५८] "हे म्हणणे योग्य नाही. योग ही भारताने सर्व जगाला दिलेली देणगी आहे. आपल्या पूर्वजांनी सहस्रावधी वर्षांपूर्वी शरीर (ॲनाटमी) आणि मानसशास्त्र (सायकॉलॉजी) याचा एवढा खोल विचार केला होता की, अगदी परमावधीचे आश्चर्य वाटते. योगसाधनेचा हा विचार हा अगदी विज्ञाननिष्ठ आहे. बंदीशाळेत मी कुंडलिनीचा उबारा अनुभवला आहे."

विज्ञाननिष्ठच

बुद्धिवादाला पटणारेच हे शास्त्र आहे. मात्र हा प्रयोग प्रत्येकाला करता येईलच व यश मिळेलच असे नाही, कारण यासाठीच्या प्रयोगाचे नियम पाळणे अतिशय अवघड आहे. सावरकरांना यात यश मिळाले होते. मात्र त्यांनी याचा गवगवा व प्रचार कधीही केला नाही. कुंडलिनीवरील त्यांच्या लेखातसुद्धा त्यांना हा अनुभव आलेला होता, याचा स्पष्ट उल्लेख नाही. रत्नागिरीच्या कुंडलिनीवरील भाषणात मात्र हा ओझरता उल्लेख आहे.[६३] तरीही या बाबतीत सावरकर मौन पाळतात. त्यांचे एक निकटवर्तीय श्री वामनराव चव्हाण म्हणतात, [५९] "ते स्वतः ध्यानधारणा करत असत. या पलिकडे त्याना यासंबंधीची अनुभूती किती होती, ते सांगता येत नाही. ते गुपित त्यांच्या समवेतच गेले." या अनुभूतीबद्दल सावरकर फारच सावधपणे वागतात. त्यांचे भक्तच त्यांना विचारते झाले की, या योगानुभूतीबद्दल तुम्हाला काय वाटते? सावरकर त्यांना म्हणत की, हा काही चर्चेचा विषय नाही. हा अनुभवाचा विषय आहे. तो ज्याचा त्यालाच कळतो. श्री. पु. गोखले म्हणतात,[६०] "या विषयात (ते) स्वतः होऊन कधी बोलत नसत." चर्चा करण्याचा प्रयत्न केला तेव्हा 'हा विषय बोलण्याचा नाही, तो स्वतःपुरताच असतो.' असे सांगून त्यांनी गोखले यांना गप्प बसविले आहे. या योगाकडे विज्ञानप्रयोग म्हणून पाहण्याची त्यांची दृष्टी, यातील अनुभवाला बोलके न करण्याचा त्यांचा मौनपणा, या गोष्टी त्यांच्या बुद्धिवादाच्याच निदर्शक आहेत.

चमत्कार

या योगाबद्दल सावरकर एवढे सावध असतानाही व व्यावहारिक आणि

राष्ट्रीय जीवनामध्ये कोणताही बदल करण्याची कोणतीही ताकद यामुळे योग्याच्या अंगी येत नाही, असे ते स्पष्ट म्हणत असतानाही,[६१] त्यांचे भक्त मात्र रोजच्या अर्थाने योगी व महायोगी म्हणून त्यांना गौरवू लागले. रा. स. भट लिहितात,[६२] "सावरकरांनी योगाभ्यासाच्या बळावर स्वातंत्र्ययुद्धातील सर्व हालअपेष्टा सहन केल्या, इतकेच नाही तर मार्सेलिसची उडी ही खरोखर योगाभ्यासातील प्राविण्याचाच एक चमत्कार होता एरवी एक फुट रुंदीच्या खिडकीतून सावरकरांना त्यांचे शरीर बाहेर फेकणे शक्य झाले नसते. सावरकरांनी त्या वेळी योगबळाने आपल्या शरिराचे आकुंचन घडवून आणले असले पाहिजे. मात्र त्यांना कित्येकांनी 'हे कसे घडले' या विषयी विचारलेल्या प्रश्नाला ते उत्तर देत नसत." या वेळेस सावरकरांनी योगात पुरेसे प्राविण्य मिळविलेले नसावे. त्यांनी योगाचा परिपूर्ण अभ्यास अंदमानात केला. ही उडी अंदमानपूर्व आहे. म्हणजे योगाची थोडीबहुत माहिती असतानाच आलेले हे योगसामर्थ्य आहे. जर ही उडी योगाचा संपूर्ण अभ्यास केल्यानंतरची असती, तर योगाचा असा अर्धवट उपयोग करुन परत शत्रूच्या हातात जाण्याची आपत्तीच त्यांच्यावर आली नसती. एक दोन दिवस सावरकर या योग सामर्थ्यावर समुद्राच्या पाण्यातच लपून राहिले असते, याबद्दल आम्हाला शंका वाटत नाही.

रा. स. भटांचेच नव्हे, तर बाळाराव सावरकरांचेही असेच म्हणणे आहे. या योगबळावर सावरकर मोठमोठी कार्य पार पाडीत असे बाळाराव म्हणतात. १९३८ मधील सावरकरांच्या एका कार्यासंबंधी ते म्हणतात,[६४] "या २४ तासात त्यांनी अन्नाला स्पर्शही न करता मिरवणुकीचा पाच तासांचा कार्यक्रम नि हा भाषणाचा दोन-दोन तासाचा कार्यक्रम मानसिक नि योगिक शक्तीच्या सामर्थ्यावर पार पाडला." याचा अर्थ योगिक सामर्थ्य हा आध्यात्मिक आनंदाचा भाग नसून भौतिक सामर्थ्यही त्यातून निर्माण होते, असा आहे. राष्ट्राच्या व्यवहारात योगाची कवडीची पत नाही,[६५] असे म्हणणारे सावरकर योगबलावर राष्ट्रकार्य करीत होते, असा याचा अर्थ होतो. योगसामर्थ्याबद्दल सावरकर प्रायः मौन पाळत, याचे कारण आपल्या बोलण्याचा कुणी गैरफायदा घेवू नये याची त्यांना चिंता होती. आपल्या अवती भोवती जमा झालेले भक्त हे आध्यात्मिक प्रवृत्तीचे आहेत, याची सावरकरांना जाणीव होती. आपल्या भक्तांनी विज्ञानाभिमुख बनावे असे त्यांना वाटे. या कामात योगाचा अडथळा होऊ नये, यासाठी त्यांनी बाळगलेल्या सावधगिरीचा फारसा उपयोग झालेला दिसत नाही. सावरकर हे महायोगी व अवतारी पुरुष आहेत असे मानून चमत्कार घडविण्याचे त्यांच्या ठिकाणी सामर्थ्य होते, असे दाखवून दिल्याने सावरकर हे भगवान होत नसतात तर विसंगत ठरतात, हास्यास्पद ठरतात ही गोष्ट भक्तमंडळीच्या लक्षात आलेली दिसत नाही.

आत्मार्पण

सावरकरांनी आत्मार्पण केले असे आपण म्हणतो. विनोबांजीनीही असेच

आत्मार्पण केले आहे. विनोबाजींवरील मृत्युलेखामध्ये महाराष्ट्र टाअिम्सकारांनी लिहिले की,[६९] "व्याधिग्रस्त शरिराचा त्याग करण्याचा निर्णय सावरकरांनी बुद्धीने घेतला." सावरकरांच्या भक्तांना हा अभिप्राय पसंत पडला नाही. डॉ. अरविंद गोडबोले या मताचा प्रतिवाद करताना म्हणतात,[७०] "ते व्याधिग्रस्त नव्हते. आत्मार्पणाचा निर्णय त्यांनी केवळ बुद्धीनेच घेतला असे वाटत नाही. कारण या विषयाचे विवेचन करण्यासाठी त्यांनी लिहिलेल्या 'आत्महत्त्या आणि आत्मार्पण' या लेखात, त्यांनी जी उदाहरणे दिलेली आहेत, ती सर्व अध्यात्मक्षेत्रातील महापुरुषांची आहेत." आपल्या आधारासाठी त्यांनी, आपण आतापर्यन्त मागे पाहिलेल्या, 'माझी जन्मठेप' व काव्यातील सावरकरांच्या विविध आध्यात्मिक विचाराचा उल्लेख केला आहे.

आम्हाला हेच कळत नाही की, सावरकरांनी बुद्धीने आत्मार्पणाचा निर्णय घेतला, ही गोष्ट त्यांच्या भक्तांना का मान्य होअू नये ? आध्यात्मिक पुरूषाचे आधार एका लेखात घेतले म्हणजे बुद्धीचा त्याग करुन वा तिला दुय्यम समजून श्रद्धेचा आधार घेतला असे होत नसते. हे आध्यात्मिक पुरुष जसे वागले तसे प्रत्येक विषयात सावरकर कधी वागले काय ? आपण आध्यात्मिक वा योगी असल्यामुळे असेच थोर पुरुष ज्या मार्गाने आत्मार्पण करते झाले, त्याच मार्गाने आपणही गेले पाहिजे, असा हा निर्णय नव्हता. निर्णय अगोदर घेतलेला आहे. अितरांच्या समाधानासाठी त्या निर्णयाला नंतर आधार देण्याचा प्रयत्न सावरकरांनी केलेला आहे. दुर्दैवाने आपल्याकडे जडवाद्याची मोठी परंपरा नाही. जर एखादा बृहस्पती वा चार्वाक असा आत्मार्पण करता झाला असता, तर त्यांचेही नाव घ्यायला सावरकर चुकले नसते. काव्यात असे जडवाद्याचे उल्लेख अशाच तोलामोलानी अनेकदा आलेले आहेत. बुद्धांचे तरी नाव निश्चितच घेतले असते.

सगळयाच योगीजनांनी वा अध्यात्मपुरुषांनी हाच मार्ग निवडलेला नाही. सकल गुरुंचा गुरुवर योगेश्वर श्रीकृष्णाचे उदाहरण त्यांनी का घेतले नाही ? ते घेणे आपण घेतलेल्या निर्णयाला सोईचे नव्हते म्हणून घेतले नाही. तेव्हा हा निर्णय बुद्धीचाच होता, हे स्पष्ट आहे. आपण काहीतरी विपरित करत आहोत, हे लोकांना व आपल्या हळव्या मनाच्या भक्तांना वाटू नये, यासाठी सावरकरांनी आध्यात्मिक पुरुषांची उदाहरणे हेतुतः दिलेली आहेत, असे आमचे मत आहे. बुद्धिवादी माणूस म्हटला की, तो आत्मत्याग करणारा, उदात्तमूल्ये मानणारा नसणारच, ही विपरित कल्पना आहे. अध्यात्मावर श्रद्धा ठेवणारे ज्या मार्गाने व ज्या उदात्त ध्येयाकडे जातात, त्याच ध्येयाकडे बुद्धिवादी माणूसही जावू शकतो, हे जगाला दाखविण्यासाठी सावरकरांनी आत्मार्पण केले नसेल कशावरुन ? हीच शक्यता अधिक सुंसगत आहे असे आम्हास वाटते.

सावरकर नित्यनियमाने थोडावेळ ध्यानधारणा करत. त्यावेळेस ते कशाचे तरी चिंतन करीत. त्यांच्या एकूण विचाराच्या प्रकाशात पाहिले तर ते ध्यानस्थ

बसून राष्ट्रमातेचेच चिंतन करीत असावेत, असेच म्हणता येईल. 'आमचं कुलदैवतं जी अष्टभुजादेवी, तिचं चिंतन ते अेकाग्रतेने करायचे' असे त्यांचे चिरंजीव विश्वास म्हणतात. [६६] या देवीची शपथ घेवूनच त्यांनी राष्ट्रकार्याला प्रारंभ केला म्हणून या राष्ट्रमातेचे प्रतिक म्हणून तिचे ते चिंतन करत असावेत.

सावरकरांना स्वाभाविक झोप येत नसे. ते डॉक्टरच्या सल्ल्याप्रमाणे ब्रोमाईड सारखे औषध घेत, असे श्री. पु गोखले यांनी म्हटले आहे. [६७] त्यांचे शरीरक्षक आप्पाकासार यांचीही आठवण अशीच आहे. रात्री १२ नंतर ते झोपीची गोळी घेत व त्यांना स्वाभाविक झोप येत नसे, अशी त्यांची आठवण आहे. [६८] योगाला अनुकूल काळ असणाऱ्या वानप्रस्थाश्रमाच्या काळातील या आठवणी आहेत. योग-सामर्थ्य असणाऱ्या पुरूषाला झोपीच्या गोळ्याची गरज का पडावी, याचा उलगडा करता येणे कठीण आहे.

कुंडलिनी जागृत झाली किंवा योग समाधी लागली त्याच क्षणाला केवलानंद मिळतो, अतिंद्रियशक्तीचा अनुभव येतो, असे मानले जाते. ही कुंडलिनी शांत झाली वा समाधी भंग पावून तो पुरुष परत सामान्य माणसाच्या जगात परत आला, तर या सामान्य अवस्थेत त्याच्यावर या योगाचा काय परिणाम राहतो, हा एक प्रश्न आहे. विवेकानंद असोत, अरविंद असोत, की सावरकर असोत त्यांना असा योगानंद निश्चितच मिळाला असणार, याबद्दल शंका घेण्याचे कारण नाही. सावरकरांच्या दृष्टीने या योगाचा सार्वजनिक जीवनात, राष्ट्रीय कार्यात, भौतिक उलाढालीत काय उपयोग आहे, हा प्रश्न मुख्य होता. स्वतःच्या वैयक्तिक सुखाचा नि आनंदाचा विचारच त्यांनी जन्मात कधी केला नाही. ते याबद्दल जे मौन पाळतात त्याचे कारण हे आहे.

बौद्धिक भाषेत

जी गोष्ट आध्यात्मिक परिभाषेत सावरकर त्या लेखात मांडतात, तीच गोष्ट व्यावहारिक व बौद्धिक भाषेत डॉ. साठे यांना सांगतात. ते डॉक्टराना म्हणतात, [७२] "माझी पोटाची आतडी अंदमानापासून अकार्यक्षम झाली असून ती सुजली आहेत. त्यात वयोमानापरत्वे ती क्षीण होणार! शक्तीही क्षीण होणार! अशा स्थितीत ज्याचा दुसऱ्याला उपयोग नाही, अशा माझ्यासारख्याना तुम्ही रामबाण उपाय योजून मुक्त करावयास हवे. एखादे रामबाण टोचणे दिलेत तर फार आभार होतील." थोड्याशा उद्विग्नतेने ते म्हणाले, "कुटुंबनियोजन साधावयाचे तर या पद्धतीने साधावे." तेव्हा आत्मार्पणाचा निर्णय बुद्धीने घेतला होता, हीच गोष्ट सत्य आहे. आणि असे म्हटल्याने त्या उदात्त आत्मार्पणाचे महत्व ऊणावत नसून उंचावते, हे समजून घेतले पाहिजे.

देवदर्शनाची आतुरता

विवेकानंदाना जसे रामकृष्ण भेटले तसेच आपल्यालाही आध्यात्मिक गुरु

भेटला पाहिजे, याची सावरकरांना फार आतुरता लागलेली होती, असे काहीजणांचे म्हणणे आहे. 'सप्तर्षि' काव्यात परमहंसाच्या नुसत्या स्पर्शाने विवेकानंदाला देवदर्शन झाले, विवेक हा विवेकानंद झाला असा उल्लेख आलेला आहे. त्याचप्रमाणे तसा गुरु मला भेटला, तर त्याच्यावरुन मी माझी काया कुरवंडून टाकीन, असे सावरकरांनी म्हटले आहे. [७२] सावरकरांचे हे म्हणणे आस्तिकाचा नसून नास्तिकाचा पुरावा आहे, असे आमचे म्हणणे आहे. 'सावरकरांना जर त्यावेळी असा कोणता आध्यात्मिक गुरु भेटला असता, तर त्यांचाही जीवनग्रंथ पालटला असता." असे वामनराव चव्हाण म्हणतात. [७३] सावरकरांना अनंताचा ध्यास लागला होता असे त्यांना वाटते. परमेश्वर दर्शनाची त्यांना आतुरता लागली होती, असे रा. स. भटांना वाटते. [७४] असा ध्यास वा आतुरता त्यांना खरंच लागली असती, तर अंदमानला न जाता ते मायवातीला गेले असते. निदान अंदमानातून आल्यानंतरही गेले असते. सावरकर हे तत्वचिंतन का करत आहेत, तात्विक कल्पनेच्या शिडचावर शिडचा, मनोऱ्यावर मनोरे का उभे करीत आहेत, हे आपण समजूनच घेत नाही. अंदमानातील नरकप्राय दुःख कसे सहन करावे, यासाठी मनाचे सांत्वन करण्यासाठी हा सारा तत्वबाद ते करत आहेत. असे चिंतन करता करता त्यांचे देहभान हरपत असे. पहारेकरी त्यांना झोपी जाण्याची आज्ञा द्यायला येईपर्यन्त वेळ कसा गेला हे त्यांना कळतही नसे. हे त्यांनीच सांगितलेले आहे. आध्यात्मिक गुरु मिळण्याचा मार्ग श्रद्धा हा असतो. सावरकरांसारख्या बुद्धिवादी माणसाला असा गुरुच असू शकत नसतो, हे आपण समजूनच घेत नसतो. देव आहे म्हटला की असतो; नाही म्हटला की नसतो ! नाही म्हणणाऱ्याला आहे म्हणून पटवून देणे देवालाही शक्य नसते. मला असा कोणता गुरु असू शकणारच नाही, हा त्यांचा बुद्धिवादच वरील सप्तर्षीतील काव्यात व्यक्त झालेला आहे, असे आम्हास वाटते.

सारांशाने, आपल्याला असे म्हणता येईल की, अध्यात्माची नैतिक बाजू नीतिविचारांच्या अधिष्ठानासाठी सावरकर मानायला तयार नाहीत. अध्यात्माच्या तत्वज्ञानात्मक बाजूचा एक कल्पना, एक शक्यता म्हणूनच ते अंदमानात देखील विचार करतात. जे दिसते ते खोटे असते; जे खरे असते ते जाणावे लागते, हे वेदांत तत्वज्ञान अंदमानातील दुःखाला विसरायला त्यांना फार उपयोगी पडले. दुःख हे दुःखच नव्हे ; बंदी ही बंदीच नाही; देह हा देहच नव्हे, असे समजून मनाला सुखात ठेवणारे वेदांतासारखे दुसरे तत्वज्ञानच नाही. त्या विशिष्ट परिस्थितीत त्यांना तेही उपयुक्त वाटले. कल्पनेच्या मनोराज्यातही रमण्यात सुख असते. याही सुखाचा त्यांनी अंदमानात लाभ घेतलेला आहे. अध्यात्माच्या तिसऱ्या बाजूवर, म्हणजे योगाने, अध्यात्माने भौतिक सामर्थ्य येते या समजुतीवर त्यांचा यत्किंचितही विश्वास नाही. या समजुतीवर बुद्धिवादाचे कठोर प्रहार करणारे वैचारिक निबंधातील सावरकर काव्यातही बदलत नसतात. मात्र काव्यमय व

आध्यात्मिक भाषेच्या आत डोकावून त्याचे निरीक्षण करण्याची दृष्टी ठेवली पाहिजे.

आगरकर-नेहरुही

वेदांत, अध्यात्म वा अद्वैत तत्वज्ञान हे जगातील सर्व धार्मिक तत्वज्ञानामध्ये सर्वात अधिक तर्कसंगत आहे, याचा सावरकरांना अभिमान होता. मानवी कल्पनेची व तर्काची ती अत्युच्च भरारी आहे, असे त्यांना अभिमानाने वाटे. असे वाटणे बुद्धिवादाच्या विरोधी नाही, हे लक्षात घेतले पाहिजे. आगरकर व पं. नेहरु हे सुद्धा या तत्वज्ञानाला असेच मानत असत.

बुद्धिवादी आगरकर म्हणतात,[७५] "अनेकत्वानंतर एकत्वाची, स्थूलानंतर सूक्ष्माची, जडानंतर चिद्रुपाची, साकारानंतर निराकाराची, इंद्रियगोचरानंतर अतिंद्रियज्ञानाची, व्यक्तानंतर अव्यक्ताची व गम्यानंतर अगम्याची कल्पना मनुष्याच्या अधिकाधिक विकास पावत जाणाऱ्या बुद्धीस येणे, हेच आत्यंतिक स्वाभाविक आहे." अितक्या स्पष्ट भाषेत सावरकरांनी सुद्धा अद्वैताची बौद्धिक प्रशंसा केलेली आढळणार नाही. योगामुळे प्राप्त होणारा अिंद्रियातीत आनंद मिळविणे, हेच मनुष्याचे, मग तो नास्तिक असो की आस्तिक, वैयक्तिक असे सर्वश्रेष्ठ ध्येय आहे, असे जे सावरकर म्हणतात,[७६] तेच आगरकर येथे सांगत आहेत. याच अर्थाने अद्वैताच्या कल्पनेबद्दल सावरकरांना अभिमान व आकर्षण वाटत असे.

आगरकर सुखाचे तीन प्रकार करतात. पहिले शारीरिक, दुसरे सामाजिक व तिसरे मानसिक सुख. या तिसऱ्या मानसिक वा आत्मिक सुखापुढे बाकीची सारी सुखे त्यांना तुच्छ वाटतात. ते म्हणतात,[७७] "या सुखाची गोडी मनुष्यास सहसा लागत नाही ; पण जर त्यांच्या सुदैवाने त्याला ती एकदा लागली तर त्याच्यासारखा त्रिभुवनात सुखी प्राणी मिळावयाचाच नाही." या आत्मिक सुखाचे विलोभनीय वर्णन करताना आगरकर म्हणतात,[७८] "ज्यात आरंभ व वृद्धि आहे, त्याचा केव्हांतरी ऱ्हास झालाच पाहिजे, हे तत्व ज्याच्या मनात पूर्णपणे खिळले असेल, त्याला आप्ताच्या मरणाचेचसे काय, पण स्वतःच्या मरणाचे सुद्धा भय वाटेनासे होईल. फुटणारे केव्हातरी फुटणार, जळणारे जळणार, मोडणारे मोडणार व मरणारे मरणार. मृत्तिकेचा घट फुटला म्हणून ज्याप्रमाणे शोक करीत बसणे नीट नाही, त्याप्रमाणे पंचभूतापासून निर्माण झालेला देह फिरुन पंचतत्वास मिळाला, म्हणून शोक करण्यात अर्थ नाही." पारंपारिक भाषेत मांडलेला हा बुद्धिवादच आहे. सावरकरांनी आपल्या काव्यात व 'माझी जन्मठेप' मध्ये हीच गोष्ट मांडून आपण आता शोक करणे व्यर्थ आहे, ही वस्तुस्थिती मनाला समजावून सांगितली आहे.

बुद्धिवादी असलेल्या पं. नेहरुंची अद्वैताकडे पाहण्याची भूमिका अशाच

स्वरुपाची होती. ते म्हणतात,[७९] "Metaphysics and philosohy or metaphysical philosophy have a greater appeal to my mind. They require hard thinking and application of logic and reasoning, thogh all of this is necessarily based on some premises which are to be self evident and yet which may or may not yet true." तेव्हा अध्यात्म ही संकल्पना खरी असो वा खोटी, पण ती बुद्धीला आवाहान करणारी आहे. ती समजून घेण्यासाठीही तीक्ष्ण तर्कबुद्धी व सखोल चिंतनशिलतेची गरज आहे, हे नेहरुंसारख्या बुद्धिवाद्यालाही पटलेले होते. अितक्या स्पष्टपणे सावरकरांनी अध्यात्माचे गुणगाण केलेले नसले, तरी त्यांची भूमिका नेहरुंच्या या भूमिकेपेक्षा कुठीही वेगळी नव्हती.

जणू सावरकरांची अध्यात्माबाबतची भूमिका नेहरु आपल्या भाषेत कशी मांडतात पहा. नेहरु म्हणतात, [८०] "But I do not believe in any or other theories and assumption as a matter of religious faith. They are intellectual speculations in an unknown region about which we know next to nothing. They do not affect my life and whether they are proved right or wrong subsequently, they would make little difference to me."

कोणत्याही तत्वज्ञानात सावरकरांप्रमाणेच श्रद्धा नसणारे पं. नेहरु वेदांताबद्दल म्हणतात, [८८] "Intellectually, I can appreciate to some extent the concept of monism and I have been attracted towards the **Adavita** (Non–dualist) philosoply of the Vedanta." हे वेदांत विज्ञानालाही कसे जवळचे आहे, या बद्दल पं. नेहरु म्हणतात, [८९] "It is interesting to compare some of the lastest conclusions of science with the fundamental ideas underlying the Adavita Vedantic Theory. These ideas were that the universe is made of one substance whose form is perpetully changing and further that the sum–total of energies remains always the same. Also that 'the explainations of things are to be found with own nature, and that no external beings or existences are required to explain what is going on in the universe' with its corollary of a self – evolving universe" सावरकरांनी वेदांताच्या बाजूने कुठेही अितके स्पष्ट लिहिले नसले, तरी त्यांची भूमिका याच प्रकारच्या डोळस बुद्धिवादाची होती, हे समजून घेतले पाहिजे. सावरकरांच्या दृष्टीने वेदांतकल्पना या Intellectual Speculations च्या प्रकारच्या व अधिकात अधिक scientific होत्या. या कल्पना आपल्या पूर्वजांनी

मांडलेल्या आहेत, ही अभिमानाची बाजू परत शिल्लकच आहे. या साऱ्या दृष्टीतून सावरकरांच्या साऱ्या अध्यात्मविषयक भूमिकेकडे पाहिले म्हणजे त्यांच्या सर्व विचाराशी याची पूर्णपणे सुसंगती लावता येते.

एवढे समजून घेवूनही सावरकर आध्यात्मिक पुरुष होते, वेदांत पोटात घालून त्यांनी कर्मयोग स्वीकारला, त्यांनी वेदांताची शिकवण दिली, चमत्कार करण्याचे योगसामर्थ्य त्यांच्याजवळ होते, ते अवतार होते, ते भगवान होते– असे कुणाला म्हणायचे असेल, तर तसे मानून सावरकरांची भावपूजा करण्याच्या त्यांच्या श्रद्धेचाही आपण आदरच केला पाहिजे, असे आम्हास वाटते.

■■■

३. हिंदुत्व

सावरकरांचा बुद्धिवाद समजून घेण्यातील सर्वात मोठी अडचण त्यांच्या हिंदुत्वनिष्ठेची आहे. त्यांचा सारखा बुद्धिवादी माणूस हिंदुत्वनिष्ठ कसा राहू राहतो, हा आपल्यासमोरील एक प्रश्न आहे. जेवढी बुद्धिनिष्ठा हिंदुत्वनिष्ठेला परवडेल तेवढीच सावरकरांना मान्य होती, असे टिकाकारांचे म्हणणे असते. हे म्हणणे सावरकरांच्या अनुयायांना एकदम कबुल असते. सावरकर हे नुसते हिंदुत्वनिष्ठ नाहीत, तर ते हिंदुत्वाचे दर्शनकार आहेत, भाष्यकार आहेत, उद्‌गाते आहेत. अनुयायांच्या भाषेत ते हिंदुहृदयसम्राट आहेत. वेदाची भावपूर्ण हकालपट्टी ग्रंथालयात करुन त्या रिकाम्या झालेल्या सिंहासनावर विज्ञानाला विराजमान करणाऱ्या सावरकरांना हिंदुहृदयाच्या सिंहासनावर आम्ही विराजमान करुन ठेवलेले आहे. तेव्हा या दोन गोष्टींची सुसंगती लावायची कशी, हा आपल्यासमोरचा एक प्रश्न आहे. सावरकरांनी मांडलेल्या हिंदुत्वामध्ये, हिंदुराष्ट्रवादामध्ये बुद्धिवादाला मान्य न होणाऱ्या कोणकोणत्या बाबी व किती मर्यादेपर्यंत समाविष्ट झालेल्या आहेत, याचा अभ्यास आपल्याला करायचा आहे. बुद्धिवादाच्या दृष्टिकोणातून या हिंदुत्वाची तपासणी झाली पाहिजे, असे आम्हास वाटते.

—१—

'हिंदू'ची व्याख्या

सावरकरांच्या हिंदुत्वाची अिमारत हिंदू या शब्दावर आधारलेली आहे. 'हिंदू' शब्दाची सावरकरांनी स्वतंत्रपणे व्याख्या केलेली आहे. ती व्याख्या सावरकरांची म्हणूनच प्रसिद्ध आहे. त्यांची ही व्याख्या आपण अगोदर समजून घेवू.

आसिंधुसिंधुभारतभूमी ज्याची पितृभू आणि पुण्यभू आहे, तो हिंदू आहे, अशी ही व्याख्या आहे.

ही व्याख्या करुन हिंदू या शब्दाचे स्वरुप ठरविण्यासाठी व त्यावर आधारित हिंदुत्वाची–हिंदुराष्ट्राची मांडणी करण्यासाठी त्यांनी 'हिंदुत्व' हा ग्रंथच लिहिला आहे. या व्याख्येची आतापर्यंत अनेकदा अनेकांनी चर्चा केलेली आहे. पण बुद्धिवादी भूमिकेतून या व्याख्येची तपासणी अद्याप केलेली नाही, असे आम्हास वाटते. 'पितृभू' आणि 'पुण्यभू' हे सावरकरांचे पारिभाषिक शब्द आहेत. याही शब्दाचे अर्थ व स्पष्टीकरण त्यांनी त्या ग्रंथातच दिलेले आहे. भारतभूमी ही एखाद्याची पितृभू ही जन्माने, वाडवडिलाच्या या देशातील वास्तव्याने ठरते, असे त्यांचे म्हणणे आहे. या भूमीत बऱ्याच काळापासून वास्तव्य करुन राहिले, व पुढेही असेच राहू अिच्छिणारे या अर्थी ही भूमी कोणाकोणाची पितृभू आहे, हे ठरविणे फारसे अवघड नाही. अगदी थोडक्यात सांगावयाचे म्हणजे भारतीय नागरिकत्व मिळविण्यासाठी ज्या अटी नागरिकत्वासंबंधीच्या कायद्यात आहेत, जवळ जवळ याच अटीवर सावरकरांचा हा 'पितृभू' अवलंबून आहे.

पितृभूचा हा अर्थ घेतला म्हणजे सामान्यतः पितृभू ही एखाद्याच्या जन्मानेच ठरत असते. भारतात कायम वास्तव्य करण्याची अिच्छा, हा या पितृभूचा पाया आहे. अपवादवजा जाता ही गोष्ट एखाद्याच्या जन्मानेच ठरलेली आहे. तेव्हा पितृभूही केवळ मानण्यावर अवलंबून नाही; अितिहासाने, वस्तुस्थितीने ती सिद्ध झाली पाहिजे. 'पितृभू' हा शब्द समजायला सोपा असून तो काही वादग्रस्त ठरणारा नव्हे. खरा वाद 'हिंदू' शब्दातील पुण्यभू या शब्दाचा आहे.

पुण्यभूचा अर्थ

एखाद्याचा जो कोणता धर्म असेल तो धर्म ज्या भूमीत जन्म पावला, विकासला ती भूमी त्याची पुण्यभू आहे, असा सावरकरांचा पुण्यभूचा पारिभाषिक अर्थ आहे. हा अर्थ त्यानी 'हिंदुत्वा'त विस्ताराने मांडलेला आहे. प्रत्येकाला कोणता ना कोणता धर्म असतो, असे येथे गृहीत धरलेले आहे. कोणताच धर्म न मानणाऱ्याचा अपवाद सोडून द्यायचा आहे. अशा अधार्मिकाला जगात कोणतीच पुण्यभू नसते. सावरकरांच्या मते ही हिंदू मनुष्याची अंतिम अवस्था आहे. पृथ्वी हीच त्याची मग पुण्यभू होते. अशा अपवादभूत व्यक्ती आपण सोडून देवू. अशा व्यक्ती हिंदू असल्या काय नि नसल्या काय, सावरकरांना चिंता नाही. पुण्यभूच्या या अर्थाने वैदिक, बौद्ध, जैन, शीख इ.ची पुण्यभू भारतभूमी होते, तर मुसलमान, ख्रिश्चन, यहुदी, पारशी आदींची पुण्यभू भारतभूमी होत नाही. या धर्माचा उदय कोणत्या भूमीत झाला ही कसोटी येथे लावलेली आहे.

ही जी पुण्यभूमी आहे तीही, अपवादवजा जाता, जन्मानेच ठरणारी असून मानण्यावर अवलंबून नाही. मनुष्य हा जन्माला आल्यानंतर विचार करून

धर्माची शोधाशोध करत नसतो. विचार करायला सुरु करण्यापूर्वीच तो धार्मिक झालेला असतो. अपवाद सोडता, आपल्या आओवडिलाचाच धर्म त्याचा धर्म बनतो. अपवाद फक्त धर्मांतराचा आहे. तेव्हा अपवाद सोडता, पुण्यभूमी ही बाब एखाद्याच्या मानण्यावर अवलंबून नसते. तेव्हा पितृभू आणि पुण्यभू या दोन्हीही बाबी मनुष्याच्या जन्मानेच सामान्यतः ठरतात व त्या एखाद्याच्या मानण्यावर-अवलंबून नसतात, हे प्रथमतः लक्षात घेतले पाहिजे.

मानण्यावर नाही

भारतभूला जो पितृभू व पुण्यभू मानतो, तो हिंदू होय, ही शब्दरचना म्हणूनच चुकीची ठरते. यातील मानणें हा अपवादभूत आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. नवीन भारतीय नागरिकत्व मिळण्यासाठी ज्या गोष्टी एखाद्या परकीयाला करणे भाग असते, त्याच गोष्टी भारताला पितृभू मानण्यासाठी पूर्वअट म्हणून कराव्या लागतील, केवळ मानण्यावर ही गोष्ट अवलंबून नाही. 'पुण्यभू' मानण्यासाठी धर्मांतर करावे लागेल, नुसत्या मानण्याला अर्थ नसतो. या गोष्टी आपल्या लवकर लक्षातच येत नाहीत. उद्यापासून भारत ही पितृभू असलेला हिंदी मुसलमान या भारतभूला 'पुण्यभू' मानू लागला, तर लगेच परवापासून तो सावरकरांच्या व्याख्येने हिंदू होत नसतो. त्याची पुण्यभूमी अरबस्थानात असते. त्याच्या धर्माची उगमभूमी भारतात नाही, म्हणून भारत ही त्याची पुण्यभू होत नसते. त्यामुळे त्याच्या नुसत्या मानण्याला अर्थ नसतो.

भारतमातेवर जो प्रेम करतो तो हिंदू होय, अशा सोप्या पद्धतीने आपण ही व्याख्या व्यवहारात मांडतो. सावरकरांनी ही गोष्ट मानण्यावरते ठेवली नाही, हे लक्षात न घेतल्यामुळे अशा चुका आपण करतो. एखाद्याच्या अंतःकरणात भारताविषयी प्रेम व निष्ठा आहे का नाही, हे तपासून त्याला हिंदू ठरविण्याची सोय सावरकरांच्या व्याख्येत नाही. ही सोय करुन ठेवणे म्हणजे हिंदू नसणाऱ्या अनेक देशभक्तांना देशद्रोही ठरविण्याची व देशद्रोह करणाऱ्या अनेक हिंदूना देशप्रेमी ठरविण्याची सोय करुन ठेवणें होते, ही साधी गोष्ट सावरकरांना कळत नव्हती असे समजण्यासारखे आहे.

धर्माशी संबंध

या हिंदूच्या व्याख्येवर त्यांचे हिंदुत्व अधिष्ठित आहे. हिंदुपणा (Hinduness) या अर्थी हिंदुत्व हा शब्द सावरकर वापरतात. हिंदू असण्याचा अभिमान असणे, हिंदुपणा म्हणजेच हिंदूचे स्वत्व टिकविणे यालाच ते हिंदुत्व राखणे असे म्हणतात. या हिंदू असण्याचा धर्माशी, धर्मश्रद्धेशी काय संबंध आहे, याची तपासणी करणे, आपल्याला भाग आहे. सावरकरांच्या हिंदुत्वात गृहीत असलेला धर्मभाग हाच बुद्धिवादाच्या दृष्टीने पहिला आक्षेप असतो. तेव्हा सावरकरांच्या हिंदुत्वात

गृहीत असलेल्या धर्मभागाचा अभ्यास आपण प्रथमतः करु.

हिंदू शब्दाची व्याख्या करुन हिंदू आणि अहिंदू अशा दोन वर्गात भारतातील लोकांची सावरकर विभागणी करतात, हे उघड आहे. ही विभागणी करताना धर्माचा किती विचार केलेला आहे, हा पहिला प्रश्न आहे. ही विभागणी केल्यानंतर जे हिंदू ठरतात त्यांचा धर्माशी किती संबंध आहे, हा दुसरा प्रश्न आहे. विवेचनाच्या सोयीसाठी या दुसऱ्या प्रश्नाचा आपण प्रथम विचार करु.

सावरकरांच्या व्याख्येप्रमाणे ठरलेले हिंदू नावाचे लोक आता आपल्यासमोर आहेत. आपल्यासमोरचा प्रश्न आता हिंदुपुरताच मर्यादित आहे. अहिंदू असणारे लोक आता आपल्यासमोर नाहीत वा भारतातच नाहीत असे गृहीत धरुन आपल्याला आता या दुसऱ्या प्रश्नाचा विचार करायचा आहे. आपल्यासमोरचा प्रश्न असा आहे की, हिंदू असण्यासाठी कोणता एखादा धर्म पाळण्याची वा विशिष्ट धर्मश्रद्धा असण्याची गरज आहे काय? असल्यास तो धर्म कोणता या धर्मश्रद्धा कोणती?

कायद्यातील व्याख्या

सावरकरांच्या मते एकंदा हिंदू कोण हे ठरल्यावर, त्याचा धर्म कोणता वा त्याची धर्मश्रद्धा कोणती हा प्रश्न गैरलागू आहे. हिंदू असण्यासाठी कोणत्याही विशिष्ट धर्ममतावर निष्ठा ठेवण्याची गरज नाही, असा त्यांचा स्पष्ट अभिप्राय आहे. सावरकरांचा हिंदू कोणतेही धर्ममत पाळण्यास स्वतंत्र आहे, फक्त अट एवढीच की, हिंदूंच्या व्याख्येच्या बाहेर त्याने पाऊल टाकता कामा नये. भारतीय कायद्याप्रमाणे हिंदूची व्याख्या अशीच आहे. मुसलमान, ख्रिचन, पारशी इ. लोक वगळून उरलेले सर्व भारतीय हे हिंदू, अशी ही कायद्यातील अकरणात्मक (Negative) व्याख्या आहे. या उरलेल्या मंडळीना हिंदू असण्यासाठी कोणतेही विशिष्ट धर्ममत पाळण्याची गरज नाही, असा याचा अर्थ आहे. कायद्यातील ही व्याख्या म्हणजे हिंदू शब्दाची व्याख्याच करता येत नाही, असे सांगणारी व अहिंदूच्या व्याख्येवरुन हिंदू ठरविणारी व्याख्या आहे. हाच निष्कर्ष असलेली पण करणात्मक (Positive) व्याख्या विशिष्ट भाषेत सावरकरांनी केलेली आहे. अभिव्यक्तीने वेगळचा असल्यातरी परिणामाने या दोन्हीही व्याख्या एकच आहेत. या दोन्हीही एक गोष्ट स्पष्टपणे मान्य करतात की, अहिंदू असण्यासाठी विशिष्ट धर्म, धर्ममत लागते; पण हिंदू असण्यासाठी कोणतेही विशिष्ट धर्ममत असण्याची गरज नसते.

ल. सा. वि.

वैदिक, बौद्ध, जैन, शीख आदी सर्वांना हिंदू शब्दाच्या व्याप्तीत सावरकरांनी आणलेले आहे. या सर्व धर्माबद्दल एक समान गोष्ट म्हणजे हे सर्व या भारत-

भूमीतच जन्म पावलेले आहेत, हीच सोय. सावरकरांना एवढी पुरेशी आहे. या सर्व धर्मात समान भाग काही असला तरी परस्परविरोधी भाग काही कमी नाही. वैदिकांचा आत्मा बौद्धांना मान्य नाही. आर्यसमाजाचे वेदप्रामाण्य जैनांना मान्य नाही. जैनाची अहिंसा शिखांना मान्य नाही. वैदिकातही अद्वैती, द्वैती, विशिष्टाद्वैती असे परस्पर विरोधी पंथ आहेतच. तेव्हा या सर्वांना सर्वसमानत्वाने लागू होअील असे लघुत्तम साधारण विभाज्य असलेले धर्मतत्व शोधून काढणे कठीणच होअील. बहुधा या सर्व धर्मांचा ल. सा. वि. या भरतभूमीत ते सर्व धर्म जन्माला आले, एवढाच निघण्याचा संभव आहे. सावरकरांना हीच गोष्ट अभिप्रेत आहे. हीच गोष्ट त्यांनी 'पुण्यभू'च्या पारिभाषिक नावाने स्वीकारली आहे. कोणतीही धर्मश्रद्धा पाळली वा अजिबात पाळली नाही, तरी तो हिंदूच राहतो, असा याचा अर्थ आहे. या भूमिकेतून पाहिले तर सावरकरांची ही व्याख्या वा हिंदुत्व पूर्णपणे धर्ममुक्त वा धर्मनिरपेक्ष आहे.

सावरकर व्याख्या हिंदू शब्दाची करतात, हिंदुत्वाची करतात ; हिंदुधर्माची नव्हे, हे लक्षात घेतले पाहिजे. हिंदू लोक कोण हे ठरले की, तो कोणता धर्म पाळतो का पाळतच नाही, हा प्रश्न त्यांच्या मते गैरलागू आहे. त्यांना अशा कोणत्याही धर्मश्रद्धेची कसलीही चिंता नाही. त्या हिंदूचा जो कोणता धर्म असेल तो तेवढ्यापुरता हिंदूचा धर्म या नात्याने हिंदुधर्म होअील. प्रत्येक हिंदुपंथाचे पंथपरत्वे वेगवेगळे हिंदुधर्म होतील. प्रत्येक व्यक्तीचे सुद्धा व्यक्तीपरत्वे वेगळे हिंदुधर्म होतील. धर्म न मानणारा अधार्मिक हिंदू राहू शकतो. तोच त्याचा हिंदुधर्म होअील. चार्वाकाचा धर्मही त्यांचा हिंदुधर्म होता, सावरकर या व्यक्तीसाठी विज्ञाननिष्ठ धर्म आणि राष्ट्रधर्म हा त्यांचा हिंदुधर्म होता. हिंदुधर्म म्हणजे कोणते विशिष्ट धर्ममत असलेला धर्म, असा अर्थ सावरकर घेतच नाहीत. हिंदू नावाच्या लोकांचे जे अनेकविध धर्म आहेत, त्या सर्व धर्मांच्या समूहाला दिलेले हिंदुधर्म हे एक नाव असू शकते, अशी त्यांची भूमिका आहे. त्यांची हिंदूची व्याख्या कोणत्याही धर्मावर, धर्ममतावर वा धर्मश्रद्धेवर अवलंबून नसून, भारतभूमी हाच या व्याख्येचा खरा आधार आहे, हे काळजीपूर्वक समजून घेतले पाहिजे.

'हिंदुत्व' हा ग्रंथ हिंदुत्वनिष्ठेची गीता व हिंदुराष्ट्राचा पाया मानला जातो. १९२४ साली हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. सावरकरांचे बुद्धिवादी विचार त्यावेळेस पक्के झालेले होते. 'हिंदुत्वा'तील विचार 'बुद्धिवादी' सावरकरांनी मांडलेले आहेत, हे उघड आहे. धर्माविषयीची, धर्मग्रंथाविषयीची आपली बुद्धिवादी मते पक्की झाल्यानंतरच मांडलेला हा हिंदुत्वविचार आहे. एकाच काळात प्रखर बुद्धिवाद नि प्रखर हिंदुत्ववाद याचा प्रचार ते १९२४ ते ३७ या काळात करत होते. हिंदुत्वनिष्ठा हे काही बुद्धिवादापासून झालेले मतपरिवर्तन नव्हे. 'प्रखर बुद्धिवाद' या विभागात आपण त्यांचे जे बुद्धिवादी विचार अभ्यासले, त्या विचारांना 'हिंदुत्वा'त त्यांनी सोडचिठ्ठी दिली होती काय, हे आपल्याला पाहायचे आहे.

विज्ञान हाच धर्म मानणारे, वेदादी धर्म ग्रंथ कपाटात ठेवायला सांगणारे, व कोणत्याही धर्मतत्वज्ञानावर सत्य म्हणून विश्वास न ठेवणारे सावरकर 'हिंदुत्व' ग्रंथात वेगळी भूमिका घेतात काय, हे पाहिले पाहिजे.

हिंदुधर्माबद्दल

हिंदुत्वाची मूलतत्वे सांगणारा 'हिंदुत्व' ग्रंथ हा काळजीपूर्वक अभ्यासल्यावर आपल्याला हे लक्षात येते की, या ग्रंथात हिंदुधर्मावर 'धर्म' म्हणून त्यांची श्रद्धा आहे, हिंदुधर्माची 'धर्म' म्हणून ते प्रशस्ती करतात, असे आपणास कुठेही आढळून येणार नाही. एवढेच नव्हे तर या धर्माचा 'धर्म' म्हणून अभिमान असेल्याचेही कुठे आढळत नाही. 'धर्म' याचा येथे आम्ही धर्मश्रद्धा असा अर्थ घेतलेला आहे. हिंदुत्वाची रुपरेखा सांगत असताना 'हिंदुत्व' हे 'हिंदुधर्म' नव्हे, हा सावरकरांच्या विवेचनाचा मुख्य मुद्दा आहे. या दोन गोष्टी वेगळ्या आहेत, ही गोष्ट नीट ध्यानात घ्या, असेच ते सातत्याने सांगत असतात. या ग्रंथात ही गोष्ट त्यांनी सातत्यानी नि आग्रहानी मांडलेली आहे.

हिंदुत्व या शब्दाचा 'हिंदुधर्म' या सापेक्ष नावाशी घोटाळा झालेला आहे, ही त्यांची मुख्य चिंता आहे.[१] "'हिंदुत्व' याचा अर्थ काही 'हिंदुधर्म' या शब्दार्थाशी पुष्कळ लोक समजतात तसा समान नाही,"[२] असे त्यांना वाटते. "'हिंदुधर्म' या शब्दाची व्याख्या करण्याचा आम्ही मुळीच प्रयत्न करीत नाही,"[३] हे त्यांनी स्पष्टपणे सांगून टाकलेले आहे. 'हिंदू' हा शब्द सिंधू नदीपासून उत्पन्न झाला असा निष्कर्ष त्यांनी काढला आहे. हा आमचा पाळण्यातील नावाचा शब्द आहे व तो परकियांनी आम्हाला दिला, ही गोष्ट पूर्णपणे खोटी आहे, हे ते आग्रहानी पटवून देतात. परकियाचा वास 'हिंदू' या शब्दाचा आलेला त्यांना सहन होत नाही. मात्र, "जर कोणता शब्द परकीय लोकांकडून आला असेल तर तो हा 'हिंदुधर्म' होय,"[४] असे त्यांनी हिंदुधर्म या शब्दाच्या परकीयपणाबद्दल म्हटले आहे. खरं म्हणजे हिंदुधर्मापेक्षा हिंदुत्व हे कसे वेगळे आहे, हे सांगण्यासाठीच 'हिंदुत्व' या ग्रंथाचा प्रपंच झालेला आहे, असे वाटावे अितके ठळकपणे त्यांनी हे भिन्नत्व या ग्रंथात आग्रहानी मांडलेले आहे. हिंदुधर्माबद्दलची हिंदूची परंपरागत दृष्टी पूर्णपणे बदलून टाकून हिंदुसमाजाचे सर्व लक्ष हिंदुत्वावर कसे केंद्रित करता येईल, हाच प्रयत्न प्रामुख्याने या ग्रंथात केलेला दिसून येईल.

खरा परका शब्द

'हिंदुत्व' व 'हिंदुधर्म' या संकल्पनेची फारकत करण्यावरच 'हिंदुत्व' या ग्रंथाची अिमारत उभी आहे. त्यांच्या अभिमानाचा व श्रद्धेचा विषय हिंदुत्व हा आहे, हिंदुधर्म नाही, ही गोष्ट तो ग्रंथ वाचताना लक्षात यायला फारसा वेळ लागत नाही. हिंदुत्वाची कल्पना हिंदुसमाजाच्या मनावर बिंबविण्यासाठी 'हिंदुधर्म' पारंपारिक

संकल्पनेचे काय होईल याची सावरकरांना चिंता वाटलेली दिसत नाही. हिंदुत्वाचा विचार समजून सांगताना, 'हिंदुधर्म' हा शब्द त्यांना एखाद्या समस्येसारखा वाटत असतो. 'हिंदुत्वा'वर प्रबंध लिहिणारे सावरकर, हिंदुधर्माचे स्वरूप तर सोडून द्या, पण साधी व्याख्याही करायला तयार नसतात, ही उल्लेखनीय बाब आहे. रस्त्यातून चालताना लागणारे अडथळे जसे आपण बाजूला करुन पुढे जातो, तसेच हिंदुत्वाचे विवेचन चालू असताना, 'हिंदुधर्म' या संकल्पनेचे अडथळे सहजपणे बाजूला सारुन सावरकर पुढे जातात. 'परक्या' ची 'हिंदू' शब्दावर असलेली टोपी अलगदपणे उचलून 'हिंदुधर्मा'चे डोक्यावर ठेवतात व आपल्या हिंदूला, हिंदुत्वाला मुक्त करतात, स्वतंत्र करतात.

हिंदू कोण हे हिंदुधर्मावरुन ठरत नसते, तर हिंदुधर्म म्हणजे काय हे हिंदुवरुन ठरते, असा क्रम ते लावतात. "हिंदू कोण ? - तर तो, की जो हिंदुधर्माची तत्वे मानतो. तर मग ठीक आहे. आता 'हिंदुधर्म' म्हणजे काय ? तर ज्या तत्वांनी हिंदुलोक बद्ध आहेत, त्या तत्वांचा समुच्चय तो हिंदुधर्म होय ! अशा रीतीने हा प्रश्न सोडविणे म्हणजे एखाद्या चक्रव्यूहांत सापडण्यासारखेच आहे." [६] असे सावरकर का म्हणतात ते समजून घेतले पाहिजे. ही तत्वे नेमकी कोणती आहेत, हे सांगण्याची समस्या त्यांच्यासमोरही आहे. परस्पर विरोधी तत्वांच्या समुच्चयातील कोणती तत्वे ते सांगणार ? आणि परत या साऱ्या तत्वज्ञानाच्या विविध शक्यता असतात, सत्यज्ञान नव्हे. म्हणूनच सावरकर म्हणतात, "या सर्व प्रकारच्या धर्ममतांची ऐकवाक्यता करुन जी कांही निर्णायक सत्यतत्वें निघाली, त्या सत्यतत्वांचे सत्यतत्व (conclusion of conclusions) म्हणजे 'हिंदुधर्म' होय" [७]

वैदिक, बौद्ध, जैन, शीख आदींची धर्ममते म्हणजे conclusions होत व या conclusions चे conclusion म्हणजे हिंदुधर्म होय, असे सावरकर म्हणतात. याचा एक अर्थ असा की, या सर्वांपैकी जो तुम्हाला सत्य वाटतो तो तुमच्यापुरता हिंदुधर्म होय. यापैकी खरे-खोटे ठरविण्याचे तुम्हाला स्वातंत्र्य आहे, असे सावरकरांना सांगायचे आहे. याचा दुसरा अर्थ असा की, या सर्व धर्ममतापैकी विज्ञानाने जे सत्य म्हणून सिद्ध होईल, तेच अंतिम conclusion म्हणजे 'हिंदुधर्म' होय. सावरकरांच्या विज्ञाननिष्ठ भाषेत हाच त्यांचा विज्ञानधर्म आहे. तेव्हा हिंदुत्व ग्रंथात सुद्धा कोणत्या एका विशिष्ट धर्ममतावर ते श्रद्धा ठेवीत नाहीत, त्याची प्रशस्ती करीत नाहीत. विज्ञानधर्माचा स्वीकार करताना ज्या प्रमाणे धर्मग्रंथीय धर्माना ते बाजूला सारतात, त्याचेप्रमाणे हिंदुत्वाचा स्वीकार करताना ते हिंदुधर्माला बाजूला सारतात, हे समजून घेतले पाहिजे.

हिंदुधर्म म्हणजे काय ?

"हिंदुधर्म म्हणजे हिंदूचा जो धर्म तो. आणि ज्या प्रमाणे 'हिंदू' शब्द प्रथम

'सिंधू' पासून निर्माण झाला व त्याचा प्रथम अर्थ सिंधू (नदी) पासून सिंधू (सागरा) पर्यंत पसरलेल्या भूमीवर राहणारे लोक असाच झाला, त्याचप्रमाणे हिंदुधर्म याचा अर्थ, या भूमीमध्ये राहणाऱ्या लोकांचा जो विशिष्ट व स्वतःचा धर्म अथवा जे धर्म ते, असाच घेतला पाहिजे." [८] सावरकरांची हिंदुधर्माची व्याख्या ही अशी आहे. धर्ममताची वा धर्मश्रद्धेची त्यांना कुठेही चिंता असलेली आपल्याला दिसणार नाही, मग ते सावरकर 'हिंदुत्व' ग्रंथातील असोत की विज्ञाननिष्ठ निबंधातील असोत. "'हिंदुधर्म' वास्तविक असा शब्द आहे की, तो हिंदूतील निरनिराळे समाज ज्या समजुती धारण करतात, त्या सर्वांना मिळून लावला पाहिजे," [९] अशी त्यांची भूमिका आहे. हिंदू लोकांचा जो कोणता धर्म असेल, त्याला हिंदुधर्म म्हणणे याचा अर्थ तो कोणते निश्चित व विशिष्ट तत्वज्ञान असलेला धर्म आहे, ही भूमिका सोडून देणे होय, हे उघड आहे. हिंदुधर्माच्या कोणत्याही तत्वाबद्दल काहीही न बोलता, (तेही त्याच संबंधातला विषय चालू असताना) ती गोष्ट हिंदूच्या मनावर सोडून देणारी ही भूमिका आहे. याचा सरळ अर्थ, हिंदू लोकांनी कोणती धर्ममते वा धर्मतत्वे पाळावीत याबद्दल उपदेश करायला ते तयार नाहीत. बुद्धिवादाचा प्रचार करताना या धर्मश्रद्धेवर ते कठोर प्रहार करतात; हिंदुत्वाचा प्रचार करताना या धर्मश्रद्धेकडे ते संपूर्ण दुर्लक्ष करतात; मात्र कोणत्याही वेळी एखाद्या धर्मतत्वाचा वा धर्मश्रद्धेचा प्रसार वा स्वीकार करीत असलेले सावरकर आपल्याला दिसणार नाहीत.

समूहवाचक

सावरकरांच्या व्याख्येप्रमाणे हिंदूमध्ये वैदिक, बौद्ध, जैन, शीख, आर्यसमाजी, देवसमाजी, चार्वाकपंथीय इ. सर्व प्रकारचे लोक येतात. या सर्वांच्या धर्मांना मिळून सावरकर हिंदुधर्म मानतात. हिंदुधर्म हे विविध धर्मांच्या समुच्चयाला दिलेले ते एक समूहवाचक नाव आहे, असे त्यांचे म्हणणे आहे. हिंदूनी असेच समजावे असे त्यांचे म्हणणे आहे. विशिष्ट व निश्चित अशी धर्ममते असणारा हा कोणता एक धर्म नसून अनेक परस्परविरोधी धर्मांना एकत्रित करणारी ही एक पद्धती आहे, असे सावरकर मानतात.

व्यवहारात हिंदुधर्म म्हणजे सनातन वैदिक धर्मच, असेच आपण समजून चालतो. त्यामुळे वैदिक धर्म न मानणारे आपोआपच हिंदुधर्म न मानणारे ठरतात. जे हिंदुधर्म मानत नाहीत, ते हिंदूच नव्हेत हे मग आपोआप सिद्ध होते. याचा परिणाम असा झाला की, वैदिक धर्माला न मानणारे बौद्ध, जैन, शीख आदी लोक हे स्वतःला हिंदू नाही असे मानू लागले. 'हिंदू मानतो तो हिंदुधर्म' या ऐतिहासिक व वस्तुनिष्ठ पद्धतीने विचार न करता, 'हिंदुधर्म मानतो तो हिंदू' या उलटच्या विपरितक्रमाने विचार होवू लागल्यामुळे, वैदिकधर्म न मानणाऱ्या हिंदूंची मने बिघडली व ती हिंदुत्वातून फुटून जाऊ लागली. ही गोष्ट सावरकरांच्या

चिंतेचा विषय होती. ही चिंता 'हिंदुत्व' ग्रंथात पानोपानी दिसून येईल. या सर्व लोकांना हिंदुत्वाच्या एका धाग्याने सावरकरांना बांधायचे होते, हिंदू म्हणून एक करायचे होते. म्हणून 'बहुसंख्यांक लोकांच्या धर्मालाच फक्त 'हिंदुधर्म' हा शब्द लावण्याची चूक झाली"[१०] असे त्यांनी अत्यंत दुःखाने व पश्चातापाने म्हटले आहे. सावरकरांना खरी चिंता वैदिक धर्माची वाटत नाही, हिंदुधर्माचीही वाटत नाही; हिंदू नावाचे जे लोक आहेत त्या लोकांची वाटते. हिंदू शब्दाच्या व्याप्तीत हे सारे लोक कसे येतील याची त्यांना चिंता आहे. यासाठी हिंदू असण्याचा धर्म-श्रद्धेशी असलेला संबंध तोडून तो पितृभू–पुण्यभूशी जोडणे सावरकरांना आवश्यक वाटलेले आहे.

संबंध फक्त भूमीशी

हिंदूनी धर्मतत्वात श्रद्धा ठेवावी, वा कोणते धार्मिक आचरण करावे या बद्दल म्हणूनच सावरकर कुठेही उपदेश करत नाहीत. आदर्श हिंदूची आदर्श धर्मतत्वे कोणती असावीत, हे सुद्धा ते 'हिंदुत्व' ग्रंथामध्येही सांगत नाहीत. उलट ते म्हणतात, [११] "हिंदुत्वाला तुमच्या निरीश्वरवादाशी किंवा नास्तिकवादाशी काही कर्तव्य नाही." हिंदुत्व हे कोणते धर्ममत नव्हे, हा त्यांचा कायमचा मुद्दा आहे. वेदधर्म-ग्रंथावरुन वैदिक, बुद्धांच्या नावावरुन बौद्ध, जिनवरांच्या नावावरुन जैन–तसे हिंदू हे नाव कोणत्या धर्मग्रंथावरुन वा धर्मपुरुषावरुन पडलेले नाही, तर ते भूमीवरुन पडलेले आहे, हा त्यांच्या हिंदुत्वाचा मध्यवर्ती मुद्दा आहे.[१२]

'हिंदुत्व' ग्रंथामध्ये जर एखाद्या विशिष्ट धर्ममतावर ते श्रद्धा दाखवतील किंवा हिंदू राहण्यासाठी अगर हिंदुधर्मासाठी एखादे धर्मतत्व अनिवार्य करतील, तर त्याच्या 'हिंदुत्व' ग्रंथाचा सगळा हेतूच नष्ट झाल्यासारखे होईल. सारा हिंदुत्व विचारच कोसळून पडेल. त्यामुळे ते विशिष्ट धर्ममत न मानणारे हिंदू, आम्ही हिंदू नाहीच असे म्हणू लागतील आणि हिंदुत्वाचा सगळा ग्रंथच आटोपेल. त्यामुळे हिंदू शब्दाची व्याख्या, हिंदुत्वाचा सारा विचार अशा कोणत्या धर्मश्रद्धेपासून मुक्त ठेवण्याचा त्याचा प्रयत्न आहे. त्याच्या समोरची एक अडचण आपण समजून घेतली पाहिजे. अडचण अशी आहे की, हिंदू नावाच्या या साऱ्या लोकांना अेकत्र तर करायचे आहे, पण हे करताना कोणत्याही बुद्धिवाहय धर्म-श्रद्धेचा आधार घ्यायचा नाही. बुद्धिवादाच्या आधारावर व्याख्या करण्याचा सावरकरांचा प्रयत्न आहे. ते म्हणतात, [१३] "पारलौकिक श्रद्धेच्या अदृष्टविषयक तत्ववादाच्या, किंवा कोणत्याही ग्रंथावरील वा व्यक्तीवरील धार्मिक निष्ठेच्या वादग्रस्त पायावर ती (व्याख्या) उभारलेली नसल्यामुळे केवळ पौरुष बुद्धीच्या कोणत्याही कसोटीस ती टिकते, स्पष्टपणे सांगता येते, स्पष्टपणे समजता येते." हिंदूची ही व्याख्या सर्वसंग्राहक व बुद्धिग्राह्य कशी आहे, हेच पटवून देत असलेले सावरकर आपल्याला नेहमी दिसतील.[१४]

सर्व स्वतंत्र धर्म

हिंदूच्या विविध धर्मांपैकी विशिष्ट एका घटकधर्माकडे धर्म म्हणून आपला अधिक ओढा, कल वा अनुकूलता आहे असे सावरकर हिंदुत्वनिष्ठ साहित्यातही कुठेही दाखवत नाहीत. अितर धर्मापेक्षा वैदिक धर्म त्यांना अधिक जवळचा वाटत असला पाहिजे व म्हणून त्या धर्मातील तत्त्वे हिंदूनी पाळली पाहिजेत, असे सावरकरांचे मत असावे, असा आपला एक गोड गैरसमज असतो. या समजाला पुष्टी देणारा पुराचा 'हिंदुत्व' ग्रंथातसुद्धा सापडत नाही. हिंदुधर्मातील प्रत्येक घटकधर्माकडे सावरकर समबुद्धीने पाहतात. वैदिक धर्माची बौद्ध, जैन, शीख आदी धर्मशाखा आहेत, अशी भूमिका ते घेत नाहीत. "अल्पसंख्यांक लोकांच्या धर्मालाही कोणते तरी नाव पाहिजे" अशी त्यांनी बौद्ध-जैनादी अल्पसंख्यांकाच्या धर्मासंबंधी म्हटले आहे.[१५] बौद्धधर्म, शीखधर्म, जैनधर्म इत्यादी शब्दप्रयोग त्यांनी मान्य केले असून, धर्म म्हणून त्यांचे स्वतंत्र अस्तित्वही मान्य केलेले आहे.

ते म्हणतात,[१६] "अर्थात व्यक्तिप्रमाणेच जो जो धर्म वा पंथ हिंदुजातीत नि या हिंदुस्थानात जन्मला, म्हणजे ज्या ज्या धर्माची वा पंथाची ही भारतभूमिका पितृभूमि आणि पुण्यभूमि आहे, तो तो प्रत्येक धर्म नि पंथ हिंदू होय, हिंदुधर्म होय." ते पुढे म्हणतात, "या नाना धर्मामध्ये सत्य कोण वा श्रेष्ठ कोण वा स्वतंत्र कोण प्रभृति कोणत्याही धार्मिक चर्चेचा या व्याख्येशी लबलेश संबंध पोचत नाही." धर्मश्रद्धामुक्तच नव्हे तर धर्मपंथनिरपेक्ष अशी ही त्यांची निःपक्षपाती भूमिका येथेही कायम आहे. हिंदुधर्म कोणाला म्हणावे याबद्दल ते पुढे म्हणतात, "हिंदुधर्म हे नाव कोणत्याही अेखाद्या विशिष्ट धर्माचे वा पंथाचे विशेष नि अनन्य नाव नसून ज्या अनेक धर्माची नि पंथाची ही भारतभूमि हीच पितृभूमि आणि पुण्यभूमि आहे, त्या साऱ्यांना समावेशिणाऱ्या धर्मसंघाचे हिंदुधर्म हे सामुदायिक अभिधान आहे." सावरकरांची वैदिकधर्माबद्दलची व हिंदुधर्माबद्दलची ही भूमिका आपण नीट समजून घेतली पाहिजे. हिंदुधर्म हा गुलाब आहे व अितर धर्म हे त्याच्या पाकळ्या आहेत, ही भूमिका न घेता पुच्छगुच्छाचा त्या गुच्छातील स्वतंत्र फुलांशी जो संबंध तोच हिंदुधर्माचा अितर घटक धर्माशी आहे, ही त्यांची भूमिका आहे, हे समजून घेतले पाहिजे.

हिंदुधर्म शब्दच गाळावा

वैदिक, जैन, बौद्ध आदी स्वतंत्र धर्म मानायचे व त्याशिवाय या सर्वांना मिळून समूहवाचक असे हिंदुधर्म असे नाव द्यायचे, असा दुहेरी नामोल्लेख व्यावहारिक दृष्टीने सोयीची बाब नाही. या अर्थाने हिंदुधर्म हा शब्द वापरला जाईलच याची खात्री नाही. आणि वैदिकधर्मालाच यापुढेही लोक हिंदुधर्म म्हणू लागले तर हिंदुत्वाचा सारा प्रपंच विफल होणार होता. यावर उपाय म्हणून सावरकर म्हणतात,[१७] "याला उपाय म्हणजे एक तर आपण या शब्दाचा उपयोग

हिंदुलोकांच्या सर्वधर्मपंथांना संबोधण्याकरिता करावा अथवा हे जर आपणास करता न आले, तर हा शब्द मुळी अजिबात गाळून टाकावा. बहुसंख्यांक हिंदुलोकांच्या धर्मपंथाला पूर्वीपासून चालत आलेले सार्थ नाव जे सनातन धर्म अथवा श्रुतिस्मृतिपुराणोक्त धर्म किंवा वैदिक धर्म यापैकी कोणतेही नाव लावावे; व बाकीच्या हिंदु लोकांना त्यांच्या त्यांच्या सर्वमान्य व प्रचलित नावाने म्हणजे शीखधर्मी, आर्यधर्मी किंवा जैनधर्मी किंवा बुद्धधर्मी अशा नावानीच संबोधावे." हिंदुधर्म हा शब्दच चुकीचा, संभ्रम निर्माण करणारा, दिशाभूल करणारा असल्यामुळे तो न वापरण्याचा एक पर्याय सावरकर येथे सांगत आहेत. हिंदू असण्याचा नि विशिष्ट धर्ममताचा अन्योन्य संबंध जोडलाच जावू नये, याची सावरकर किती काळजी घेतात, हे यावरुन आपल्या लक्षात येईल.

'हिंदुत्व' ग्रंथामध्येच त्यांनी धर्म या संज्ञेचा अर्थ दिला आहे [११] "'धर्म' म्हणजे सामान्यतः कोणत्यातरी आध्यात्मिक वा धार्मिक पंथाच्या वा मताच्या नियमांचा अथवा सिद्धांताचा संग्रह असा अर्थ घेतला जातो." अशी त्यांनी लौकिक अर्थीच्या धर्माची व्याख्या केलेली आहे. या अर्थाने त्यांची अशा कोणत्या धर्मावर श्रद्धा होती, हे 'हिंदुत्व' या ग्रंथावरुनही दिसून येत नाही. ज्या ठिकाणी या ग्रंथात धर्म नियमांचा किंवा सिद्धांताचा संदर्भ येतो, त्या ठिकाणी सर्वच धर्मपंथांच्या परस्पर विरोधी नियमांचा वा सिद्धांताचा सावरकर समबुद्धीने आदर करताना दिसतात. हिंदूच्या विचार परंपरेत आतापर्यंत जितके सिद्धांत आणि मिमांसा येवून गेलेल्या आहेत, की जगातील विविध धर्मामध्ये ज्या ज्या मिमांसा सापडतील, त्या हिंदूच्या विविध धर्मात सापडल्यावाचून राहणार नाहीत, याचा त्यांना ऐतिहासिक अभिमान वाटतो.

ते म्हणतात, [१२] "आपण कोण आहात? अद्वैती, अेकेश्वरवादी, जगदीश्वरवादी, निरीश्वरवादी ? तुम्ही कुणीही असा. अिथे तुम्हाला प्रत्येकाला जागा आहे. हे आत्म्या, तू कोणत्याही मतावर विश्वास ठेव... ज्या भूमीमध्ये प्रत्यक्ष चार्वाक महाकाळाच्या देवळाच्या पायऱ्यावर उभा राहून निरीश्वरवाद शिकवू शकला, त्या भूमीपेक्षा अितरच कुठे तुला परमेश्वर भक्तीची अधिक स्वतंत्रता अनुभवायला सापडेल !... खरोखरच या भूमीबद्दल हेच सत्य आहे की,... जगात जे जे सापडते ते ते या भूमीमध्ये सापडेल." सावरकरांचा हा अभिमान सर्वच धर्ममताविषयी आहे हे समजून घेतले पाहिजे. या पैकी विशिष्ट धर्ममताविषयी आपली अनुकूलता ते कुठेही दाखवत नाहीत. याच भूमिकेतून या भूमीत जन्म पावलेल्या सर्वच धर्मपुरुषांबद्दल त्यांना सारखाच आदर वाटतो. वेदकालीन ऋषी, गौतम बुद्ध, महावीर, नानक, चक्रधर, रामदासस्वामी या साऱ्या धर्मपुरुषांचा ते सारख्याच आदरानी उल्लेख करतात. विविध धर्मपुरुषांचा व धर्ममतांचा ते उल्लेख करीत असले वा अभिमान वा आदर व्यक्त करीत असले तरी, या पैकी कशातच त्यांना श्रद्धा असल्याचे आपल्याला कुठेही जाणवत नाही, हे काळजीपूर्वक समजून

घेतले पाहिजे.

धर्ममुक्त व्याख्या

सावरकरांची हिंदूची व्याख्या कोणत्याही धर्ममताशी संबंध ठेवणारी नसल्यामुळे ती पूर्णपणे (Free from religious faith) धर्ममुक्त आहे, ही महत्वाची गोष्ट आपण लक्षात घेतली पाहिजे. हिंदूची व्याख्या धर्ममुक्त असू शकते, ही गोष्ट आपल्याला लवकर लक्षात येत नसते. 'हिंदुत्व' ग्रंथातील सावरकर धर्मावर, धर्मश्रद्धेवर तुटून पडत नाहीत. कोणत्याही धर्मश्रद्धेशी आम्हाला, आमच्या हिंदूच्या व्याख्येला काहीही कर्तव्य नाही, अशी सौम्य भूमिका घेतात. धर्मग्रंथाना कपाटात बंद करुन ठेवण्याचा आदेश ते या ग्रंथात देत नाहीत. तुमच्या त्या धर्मग्रंथाशी आम्हाला काही कर्तव्य नाही, अशी भूमिका ते घेतात. तुम्ही कोणताही धर्म वा धर्मश्रद्धा पाळत असला तरी हिंदूच आहात, हे त्यांना मुख्यतः सांगायचे आहे. सावरकरांच्या या भूमिकेत बुद्धिवादाच्या विरोधी काहीही नाही, हे समजून घेतले पाहिजे.

बौद्धावर टीका का ?

सावरकर हिंदूच्या विविध धर्मांकडे 'धर्म' म्हणून समबुद्धीने पाहतात, या म्हणण्यावर येणाऱ्या पैकी एका आक्षेपाचा आपण विचार करु. 'हिंदुत्व' ग्रंथात सावरकर बौद्धावर टीका करतात. अशीच टीका बौद्धावर त्यांनी 'सहासोनेरी पाने'मध्ये केलेली आहे. हिंदूच्या सर्व धर्मांकडे श्रद्धाशून्यपणे व समबुद्धीने पाहणारे सावरकर बौद्धधर्मावर टीका करतात, हा एक महत्वाचा आक्षेप आहे. त्यांचे धर्मविषयक विचार जर काळजीपूर्वक अभ्यासले, तर आपल्या लक्षात येईल की, बौद्धधर्मावर त्यांनी 'धर्म' म्हणून कुठेही टीका केलेली नाही. सावरकर बौद्धधर्मातील उदात्ततत्वांचा आदर करतात, मुक्तकंठाने गौरव करतात. त्या तत्वांना कुठेही कमी लेखीत नाहीत. व्यवहारात वागताना या उदात्ततत्वाने मनुष्याला चालता येत नाही, याबद्दल हे हळहळ व्यक्त करतात. याबद्दल भगवान बुद्धांची ते क्षमा मागतात. गौतमबुद्धाविषयी त्यांनी व्यक्त केलेल्या भावना आपण मागे पाहिल्याच आहेत. [२०] बौद्धधर्म हा उदात्त विचाराचा असल्यामुळेच राष्ट्राच्या व्यवहारात कशा समस्या निर्माण झाल्या, हे सांगताना काही कटू शब्द त्यांच्या लेखणीतून बाहेर पडलेले आहेत, हे लक्षात घेतले पाहिजे.

सावरकरांचे म्हणणे असे की, प्राचीन बौद्ध काळात अहिंसेचा अतिरेक झाला, त्यामुळे राष्ट्राची हानी झालेली आहे. बौद्धधर्माच्या उदात्त तत्वज्ञानात त्या वेळेसच्या परकीय रानटी टोळ्यांनी निर्माण केलेल्या 'अग्नि आणि खड्ग' या भयंकर तत्वज्ञानाला प्रत्युत्तर देण्याचे सामर्थ्य नव्हते. बौद्धांच्या या अहिंसेच्या अतिरेकी तत्वज्ञानाबद्दल त्यांना राग होता. बौद्धधर्माला राजाश्रय मिळाल्यामुळे

हे तत्वज्ञान राजकारणात शिरले व त्यामुळे आपण रानटी शत्रूपुढे हतबल झालो असा त्यांचा निष्कर्ष आहे. अहिंसेच्या नीतिनियमाच्या वा उदात्ततत्वाच्या जोरावर तत्कालीन शत्रूंना पराभूत करण्यास असमर्थ ठरणाऱ्या बौद्धधर्माची पिछेहाट होणे, याची 'राजकीय दृष्टीने आवश्यकता होती' [२१] असा निष्कर्ष त्यांनी अत्यंत दुःखाने काढला आहे. वैदिकधर्माच्या पुनरुज्जीवनाची व बौद्धधर्माच्या ऱ्हासाची सावरकरांनी केलेली चिकित्सा पूर्णतः राजकीय स्वरुपाची आहे. अहिंसेचा हा भुद्दा सोडून दिला तर दुसऱ्या कोणत्याही धार्मिक मुद्द्यावर त्यांनी बौद्धधर्मावर टीका केलेली नाही. वैदिकांचे अमके धर्मतत्व श्रेष्ठ व बौद्धांचे तमके चुकीचे असे ते चुकूनही कुठे म्हणत असल्याचे आपल्याला दिसणार नाहीत. 'सहा सोनेरी पाने' या ग्रंथातही त्यांनी 'धर्म' म्हणून बौद्धधर्मावर कुठेही टीका केलेली नाही. बौद्धधर्म नाहीसा होण्याचे कारण धार्मिक नसून राजकीय होते, असा निष्कर्ष त्यांनी या अितिहास-मिमांसा ग्रंथात काढला आहे. हा निष्कर्ष दोन राष्ट्राच्या संबंधातील जयपराजयाच्या अैतिहासिक मिमांसेचा भाग असून, त्याचा धर्ममताशी संबंध जोडणे चुकीचे आहे, हे समजून घेतले पाहिजे. वैदिक व बौद्ध धर्मातील धर्ममताच्या गुणावगुणाची केलेली ही चिकित्सा नसून, राष्ट्राच्या शत्रूचा निःपात कसा करावा याच्या दोन मार्गातील औचित्याची चिकित्सा आहे, हे समजून घेतले पाहिजे.

सावरकरांचा निष्कर्ष कसा बरोबर आहे, हे अितिहासाचे पुरावे देत सिद्ध करीत बसणे आमचा विषय नाही. ही सारी सावरकरांची चिकित्सा बौद्धिक आहे, अैतिहासिक आहे, धार्मिक नाही – एवढेच दाखवून देणे हाच आमचा हेतू आहे. बुद्धिवाद्याच्या अभ्यासाच्यादृष्टीने एवढीच गोष्ट आपल्याला पुरेशी आहे. फार तर सावरकरांचे अितिहासाचे आकलन व निरीक्षण चुकीचे होते, असे आपण म्हणू शकू. बौद्धराजे सुद्धा सैन्य ठेवीतच असत, लढाया लढत असत, जिंकत असत, हिंसा करतच असत – असेही पटवून देवू शकू. भगवान बुद्धांनी मर्यादित अहिंसाच शिकविली, पण त्यांच्या अनुयायांनी तिचा अतिरेक केला असेही म्हणू शकू. 'संन्यस्त खड्ग' नाटकातील सावरकरांचा भगवान बुद्ध हा असाच मर्यादित अहिंसेची शिकवण देणारा आहे. या नाटकातील बुद्ध म्हणतात, [२२] "आम्ही या पुढे असे अनुशासन देतो की, न्याय्य युद्धात आततायी शत्रूशी लढण्यासाठी शस्त्रधारण करण्यास माझ्या गृहस्थाश्रमीय अनुयायांस माझी अनुज्ञा आहे. एतदर्थ शाक्य राष्ट्राने हया असुधारणीय विद्युद्गर्भाच्या या अत्याचारी आक्रमणाचा प्रतिकार करण्यासाठी शस्त्रधारण अवश्यम करावे, या हिंसेचे पाप त्या सदाचारी प्रतिकाऱ्यांवर नसून अत्याचारी अनुयायांवर आहे."अशा प्रकारे गौतमबुद्धही शस्त्राचारी धर्मयुद्धाला आशिर्वाद देतात. तेव्हा सावरकर गौतमबुद्धांची अहिंसा आत्यंतिक आहे, असे मानत नाहीत. त्यांच्या अनुयायांनी या अहिंसेचा पात्रापात्र विचार करुन अर्थ लावला नाही, हीच त्यांची मुख्य तक्रार आहे. तेव्हा सावरकरांची भूमिका

नीट समजून घेतली पाहिजे. त्यांची टीका बौद्धधर्मावर नाही, कोणत्या धर्ममतावर नाही, फक्त आत्यंतिक अहिंसेवर आहे. त्यांची टीका गौतमबुद्धांची अहिंसा आत्यंतिक आहे अशीही नाही, बौद्धांनी हिंसा केलीच नाही, लढाया लढल्याच नाहीत अशीही नाही; अितिहासकालात बौद्ध अनुयायांनी शस्त्राच्या आवश्यक त्या सामर्थ्याकडे अहिंसेच्या नादामुळे दुर्लक्ष केले, एवढीच त्यांची टीका आहे.

ही टीका रास्त नसली तर तो सावरकरांच्या अितिहासाच्या अभ्यासाचा दोष होवू शकतो, त्यांच्या धर्माभिमानाचा वा धर्मश्रद्धेचा पुरावा ठरत नसतो. अितिहासाची अशी मिमांसा करणारे व निष्कर्ष काढणारे सावरकर हे एकटेच नाहीत. हिंदुत्वनिष्ठ नसणाऱ्या न. वि. गाडगिळांनी 'शिखांच्या अितिहासात' असाच निष्कर्ष काढला आहे. "अहिंसेच्या अतिरेकी तत्वज्ञानाने (बौद्धाची) संरक्षण करण्याची शक्ति कमी झाली" असा त्यांचा अभिप्राय आहे.[२३] मिल्यांडर या ग्रीक सेनापतीने बौद्ध धर्म स्वीकारला. त्यानंतर बौद्ध भिक्कूंनी बुद्धधर्म राष्ट्र ही कल्पना जाणत नाही, असा प्रचार केला. बौद्धधर्म स्वीकारताच त्या परकी राजाला बौद्धांनी आपली निष्ठा अर्पिली. सावरकरांच्या मते ही देशद्रोहासारखी चूक होती. मुसलमानांच्या तलवारीपुढे बौद्धांनी नमते घेतले, त्यामुळे फार मोठ्या प्रमाणावर बौद्धांनी अिस्लामधर्म स्वीकारला, असे सावरकरांचे म्हणणे आहे. हुमायून कबीर देखील या मताला दुजोरा देतात. बिहारात मुसलमानांचे प्रमाण जास्त असण्याचे कारण हे धर्मांतर होय, असे हुमायून कबीर म्हणतात.[२४] बौद्धांनी देशद्रोहाचे वर्तन केलेले आहे असा निष्कर्ष डॉ. डी. बी. जैन यांनीही काढला आहे.[२५] सावरकरांचा राग व टीका बौद्धांच्या या शस्त्रविषयक व राजकीय भागावर होता, हे समजून घेतले पाहिजे.

जगद्व्यापी धर्म

बौद्धधर्माच्या विरुद्ध असे लिहिल्यामुळे वाचकांचा गैरसमज होअील याची भीती सावरकरांनाही होतीच. हा गैरसमज होवू नये म्हणून ते सविस्तर खुलासा करतात,[२६] "सर्व जगद्व्यापी धर्म प्रस्थापित करण्याचा अगदी प्रथमचा, आणि तरीही प्रचंड असा प्रयत्न प्रथम बुद्धधर्माने केला. 'हे भिक्षूनो, जगातील दशदिशाना तुम्ही संचार करा आणि सत्यत्वाचा धर्म सर्वांना उपदेशित करा.' होय; खरोखरच हा धर्म सत्यतत्वांचा होता. त्यामध्ये कोणताही प्रच्छन्न हेतू नव्हता. किंवा कोणत्याही भूमीची अथवा प्राप्तीची अभिलाषा त्यांच्या संचारास कारणीभूत झालेली नव्हती." असा मुक्तकंठाने गौरव करुन कठोर वास्तवाचे वर्णन करताना ते पुढे म्हणतात, "परंतु जरी बौद्धधर्माने एवढे संपादन केले तरी त्याला पाशवी मनोवृत्तीची बीजे किंवा राजकीय आकांक्षा, अथवा वैयक्तिक अभ्युदयाची लालसा, ही काही जगातील सर्व लोकांच्या अंतःकरणातून अितक्या प्रमाणात नष्ट करता आली नाहीत की, ज्यामुळे हिंदुस्थानला बिनधोकपणे

तलवारीच्या अैवजी जपमाळ हाती धरावी." बौद्ध धर्माबद्दल असे कर्तव्य म्हणून कटु शब्द लिहिणे भाग पडले, याबद्दल नम्रपणे भगवान बुद्धांची क्षमायाचना करताना ते पुढे म्हणतात, "हिंदुस्थानमध्ये बुद्धधर्माचा जो ऱ्हास झाला त्याची राजकीय मिमांसा करताना आमच्या लेखणीतून जे थोडेसे कठोर शब्द निघाले, त्यावरुन कोणीही असे लक्षमात्र मानू नये की, आमच्या मनात बौद्धधर्माबद्दल काही मोठासा आदर नाही!" यानंतर बौद्धधर्माचे त्यांनी केलेले कौतुक मुळातूनच वाचण्यासारखे आहे. "बौद्धधर्माची दिक्षा मी घेतली नाही याचे कारण, हा संघ माझ्या योग्यतेचा नाही असे नव्हे, तर मी त्या संघाच्या पवित्र मंदिरात पदार्पण करण्याला पात्र नाही, हे होय." असे अत्यंत नम्रपणे त्यांनी शेवटी म्हटले आहे.[२७]

'सहा सोनेरी पाना' मध्ये 'नमोः बुद्धाय' म्हणून ते भगवान बुद्धांना नमन करतात.[२८] संन्यस्त खड्ग नाटकात गौतम बुद्धांचा प्रतिवाद करणारा विक्रम हा सावरकरांचे मुखपात्र असतानाही बुद्धांच्या भव्य व दिव्य प्रतिमेला, श्रेष्ठत्वाला थोडाही धक्का लागेल असे एकही विधान त्यांनी केलेले नाही. श्रीरामाला प्रभू का म्हणतात, श्रीकृष्णाला भगवान का म्हणतात असा प्रश्न उपस्थित करणाऱ्यांनी सावरकर तथागत बुद्धांना भगवानच म्हणतात, नमो बुद्धाय म्हणतात; अशोकाला 'पुण्यश्लोक'[२९] 'देवप्रिय'[३०] म्हणतात, हेही लक्षात घेतले पाहिजे. सावरकरांनी बौद्धधर्माची केलेली ही मिमांसा अैतिहासिक व राजकीय दृष्टीकोणातून आहे, हे समजून घेतले पाहिजे. बौद्धधर्म हा एक प्रकारचा विश्वधर्म झाला असल्यामुळे हिंदुस्थान हे आपले भौगोलिक केंद्र आहे, याचा बौद्धांना विसर पडत चाललेला होता. यामुळेच 'बुद्धधर्माचे भौगोलिक केंद्रस्थान कुठेच नव्हते.' असे सावरकर म्हणतात.[३१] 'बौद्धधर्माशी तादात्म्य होण्याच्या प्रयत्नामध्ये हिंदुस्थानचा राष्ट्रीय-गुरुत्वमध्य नष्ट झाला होता,' असे सावरकर म्हणतात. याची तीव्र प्रतिक्रिया वैदिक धर्माच्या पुनरुज्जीवनात व बौद्धधर्माच्या भारतातील ऱ्हासात झाली, असा सावरकरांचा निष्कर्ष आहे. तो होणे अैतिहासिकदृष्ट्या अपरिहार्य होते असे त्यांना वाटते. सावरकरांच्या या भूमिकाचा गैरअर्थ काढून धर्म म्हणून त्यांचा ओढा वैदिकधर्माकडे होता असा निष्कर्ष काढणे चूक आहे, एवढेच आम्हास येथे दाखवून द्यायचे आहे.

बुद्धिवादाच्या भूमिकेतून

बौद्धधर्मांनी प्राचीन काळी बुद्धिवादाच्या दृष्टीने फार मोलाचे कार्य केलेले आहे, याचाही सावरकरांनी मुक्तकंठाने गौरव केलेला आहे. मानवतेच्या, उदात्त-तत्वाच्या व बुद्धिवादाच्या दृष्टिकोणातून बौद्धधर्म हा वैदिक धर्मापेक्षा श्रेष्ठतर आहे, असे त्यांचे स्पष्ट मत होते. रत्नागिरीला असताना बुद्धिवादाचा त्यांनी झंझावाती प्रचार चालविला होता. त्यावेळेस बौद्धधर्मातील बुद्धिवादाची माहिती करून देण्यासाठी 'वज्रसूचि' हा लेख लिहिला आहे.[३२] वैदिक व बौद्धधर्म यांच्यात

त्याकाळी जन्मात जातिभेदाच्या प्रथेवर जो तीव्र वादविवाद झाला होता, त्याची तर्कमूलक चर्चा करणारा 'वज्रसूचि' हा एक बौद्धग्रंथ आहे. हा ग्रंथ बौद्धधर्माचे महानप्रचारक अश्वघोष यांनी लिहिलेला आहे सावरकरांनी या ग्रंथाचा मराठी भावार्थ या लेखात दिला आहे.

या लेखाला सावरकरांनी प्रास्ताविक जोडले आहे. या प्रास्ताविकात त्यांनी बौद्धधर्माची बुद्धिवादी धर्म म्हणून मुक्तकंठाने स्तुती केलेली आहे. वैदिक धर्मापेक्षा या बाबतीत निर्विवाद श्रेष्ठत्व दिलेले आहे. "श्रुतिस्मृतीच्या मर्यादांची मंत्ररेखा न जुमानता बुद्धकाळात जेव्हा बुद्धिवाद सर्वस्वी स्वतंत्रपणे अकुंठित संचार करु लागला, तेव्हा तर राष्ट्राच्या आणि मानव्याच्या प्रत्येक क्षेत्रात 'हे असे कां ?' या प्रश्नाच्या अग्निदिव्यामध्ये तत्कालीन यच्चयावत् मतें, रुढि, आचार, विचार साधकबाधक ज्वालात ताबून सुलाखून निघू लागली." अशा सुस्पष्ट भाषेत त्यांनी बुद्धधर्माच्या बुद्धिवादाचा गौरव केलेला आहे. बुद्धधर्माचा उदय हाच त्यांना या भूमितील बुद्धिवादाचा उदय वाटतो. वैदिकावैदिकात जेव्हा तत्वबाद होअी, तेव्हा 'अिति श्रुतिः' या शास्त्राधारावर येवून थांबत असे. बौद्धाबौद्धात जेव्हा तत्वबाद होअी, तेव्हा 'अिति बुद्धानुशासनम्' या मंत्ररेषेपर्यंत येवून थांबत असे. मात्र वैदिकात नि बौद्धात जेव्हा तत्वबाद हे अी तेव्हा मात्र त्यांना या कोणत्याही प्रामाण्याची आडवाही नसे. बुद्धिवादाच्या कसोटीवर या तत्वबादाचा निर्णय लावणे त्यांना भाग पडत असे.

वैदिकाच्या धर्माला बुद्धकाळात बुद्धिवादाच्या परीक्षेत उतीर्ण होणे कसे भाग पडले, हे सांगताना सावरकर लिहितात, "अशा स्थितीत बुद्धकाळात श्रुति, स्मृति, आगम-निगम, रीतिरुढी आचार-विचार या साऱ्यांची छाननी पुरुषबुद्धीच्या अग्निदिव्यात जशी झाली, श्रुतींना देखील पुरुषबुद्धीच्या परीक्षेला बसावे लागूनच काय जे प्रमाणपत्र मिळविता येअील, ते मिळविणे भाग पडले, तसा प्रकार त्यापूर्वी केव्हाही अितक्या मोठ्या प्रमाणावर झाला नव्हता." बौद्धाच्या बुद्धिवादाचा एवढा गौरव स्वतः अश्वघोषांनीही आपल्या 'वज्रसूची' या प्रचारग्रंथात केलेला आहे का नाही हे शोधावे लागेल. बौद्धधर्माचा उदयकाळ हा बुद्धिवादाचे सुवर्ण-युगच होते, असेच सावरकरांना येथे सांगावयाचे आहे. बुद्धधर्माच्या ऱ्हासाची राष्ट्रीय अपरिहार्यता सांगणारे सावरकर, या धर्माच्या उदयाचे बुद्धिबादी स्वागत करतात, हेही समजून घेतले पाहिजे. बौद्धाचे तत्वज्ञान वेदातच आहे, अशी भाषा सावरकरांनी कधीच वापरलेली नाही, हे समजून घेणे फार महत्वाचे आहे. गौतम-बुद्धांना अवतार बनवून त्यांच्या तत्वज्ञानाला वैदिक मंत्रांनी पावन करुन घेणारा हा धार्मिक प्रकार नसून, वेदश्रुतिस्मृतींनाच बौद्धाच्या बुद्धिवादाच्या अग्निकुंडात घालण्याचा व त्यातून जे टिकेल, वाचेल तेच स्वीकारण्याचा हा दिव्यदाहक बुद्धि-वाद आहे, हे समजून घेण्यासाठी आपण आपले मन खुले केले पाहिजे. त्या काळच्या "कुशाग्र बुद्धिवादाचे" दर्शन घडावे या हेतूने 'वज्रसूची'चा भावार्थ त्यांनी वाचकांसमोर मांडलेला आहे. बौद्धधर्माकडे पाहण्याच्या सावरकरांच्या

कुशाग्र बुद्धिवादाचेही येथे आपल्याला जे दर्शन होते ते नजरेसमोर ठेवूनच बौद्ध-धर्मावरील त्यांची टीका समजून घेतली पाहिजे.

'सहा सोनेरी पाना'मध्ये मुसलमानांनी केलेल्या धार्मिक अत्याचारात हिंदूनी ही तसाच प्रत्याचार करायला हवा होता, असे संतापाने चिडून बोलणारे सावरकर त्याच ग्रंथात वैदिक राजांनी बौद्धाचा धर्मछळ केला नाही, हे आवर्जून ठसवून सांगतात. बौद्धधर्मियांशी वैदिकांची वागणूक सहिष्णुतेची होती, हे आग्रहाने सांगतात. शुंग घराण्यातील पुष्यमित्रराजाने बुद्धधर्मियांचा छळ केला नाही, असे सावरकरांचे आग्रही म्हणणे आहे. या सहिष्णुतेबद्दल त्यांना अभिमान व आदर वाटतो.[३३] काश्मिरच्या मिहीरकुल राजानेही असाच बौद्धांचा छळ केल्याचे म्हटले जाते. हा मिहीरकुल राजा मूळचा हूण, पण त्यांने वैदिक धर्म स्वीकारला होता. वैदिक असला तरी या मिहीरकुलला सावरकर 'आमचा' राजा आहे, असे मानायला तयार नाहीत.[३४] हाती सापडलेला हा वैदिक मिहीरकुल बौद्धराजानी शिरच्छेद न करता सोडून दिला, याची सावरकरांना हळहळ वाटते. सावरकरांची ही धर्मातीत भूमिका आपण समजून घेतली पाहिजे.

शब्दाकडे दुर्लक्ष करा

डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतराला सावरकरांनी कडाडून विरोध केला. या संबंधीचे त्यांचे काही लेख आहेत. १९३५ ला डॉ. आंबेडकरांनी धर्मांतर करण्याचा विचार जाहीरपणे बोलून दाखविला होता. या वेळेस डॉ. आंबेडकर बुद्धधर्म स्वीकारणार आहेत, हे मुळीच गृहीत नव्हते. ते मुसलमान वा ख्रिश्चन धर्माचा विचार करत असावेत असे समजून सावरकरांनी १९३५ ला दोन लेख लिहिले आहेत.[३६] प्रत्यक्षात डॉ. आंबेडकरांनी १९५६ साली बौद्धधर्म स्वीकारला. त्यावेळेस सावरकरांनी लिहिलेले दोन लेख उपलब्ध आहेत.[३७] 'आमचे अक्षर म्हणजे विस्तवाची ठिणगी' [३५] या त्यांच्या म्हणण्याचा मूर्तिमंत प्रत्यय दुर्दैवाने या सर्व लेखात आलेला आहे. हे लेख वाचून सावरकरांविषयी अनेक बौद्धबधूंनी कायमचा गैरसमज करुन घेतलेला आम्हाला माहीत आहे. या लेखातील भाषेच्या पलिकडे जावून त्यातील विचाराकडे लक्ष द्यायला आम्ही तयार नाही. आणि हे सारे लेख सोडून देवूनही सावरकरांनी इतरत्र जे बुद्धिवादी व धर्मातीत विचार मांडलेले आहे, तेही समजून घ्यायला आम्ही तयार नाही. सावरकरांनी बौद्धधर्माविरुद्ध गरळ ओकली, असा आरोप करुन सावरकरांविषयी कायमचा गैरसमज त्यांनी करुन घेतलेला आहे. सावरकरांनी थोडी सौम्य भाषा वापरायला हवी होती, असे आम्हासही वाटत असले तरी, केवळ एक दोन शब्दाखातर त्यांचे समग्र विचार गैरसमजून घेणे बुद्धिवादाचे लक्षण नाही, असे आम्हास वाटते. आम्हीही कोणत्याही धर्मात श्रद्धा नसणारे बुद्धिवादीच आहोत; अस्पृश्यताच काय, पण जन्मजात चातुर्वण्याचे उच्चाटन करण्याचा प्रयत्न आम्हीही करतच आहोत– या विषयीचा त्यांना वाटत असलेला आत्मविश्वास व अभिमान; अरे म्हटले की कारे म्हणणारा

त्यांचा कोणतीही भीडमुर्वत न ठेवणारा क्रांतिकारकाचा स्वभाव; हिंदुधर्माबद्दल त्या वेळेस होत असणारी अर्वाच्च शिवीगाळ; हिंदुसंघटन करण्याचे त्यांनी स्वीकारलेले ध्येय व त्यांच्या अक्षरात असणारा अग्नी यांच्या अप्रतिम रासायनिक मिश्रणातून ते लेख भाषेच्यादृष्टीने अतिशय तिखट झालेले आहेत, ही गोष्ट समजून घेवून, या ऐतिहासिक लेखाकडे आपण पाहिले पाहिजे.

सारे अंधश्रद्ध

या चारही लेखांचा मध्यवर्ती मुद्दा हा आहे की, जगातील सारेच धर्म बुद्धिबाह्य, तर्कशून्य व अंधश्रद्धेनी भरलेले आहेत. बुद्धिवादाच्या दृष्टीतून धर्माची निवड करणे अशक्य आहे, असे सावरकरांना वाटते. पहिल्या १९३५ च्या दोन्ही लेखात मुसलमानांचा धर्म वा ख्रिश्चन धर्म डॉ. आंबेडकरांच्या अपेक्षा कशा पुऱ्या करणारा नाही, हे त्यांनी दाखवून दिले आहे. नंतर १९५६ च्या दोन लेखात बौद्धधर्म हाही कसा बुद्धिबाह्य श्रद्धा पाळणारा आहे व याही धर्मात अंधश्रद्धांचा वा भाकडकथांचा कसा बुजबुजाट झालेला आहे, हे त्यांनी दाखवून दिले आहे. सावरकर दोन चांगल्यातील तुलना करीत नसून दोन वाईटातील तुलना करीत आहेत, हे समजून घेतले पाहिजे. बुद्धिवादाच्या मंदिराकडे जाणारा मार्ग हा अशा अंधश्रद्धेनी भरलेल्या एका गुहेतून दुसऱ्या गुहेत गेल्याने सापडत नसतो, असे त्यांना म्हणायचे आहे. असलेल्या धर्मातीलच श्रद्धा कशा कमी करता येतील, याचा विचार समोर असताना, नव्या धर्माच्या नव्या ताज्या दमाच्या श्रद्धा मनावर बिंबवून घेवून बुद्धिवादाचा मार्ग अधिकच दुर्घट करुन टाकणे सावरकरांना मान्य नव्हते.

म्हणूनच आंबेडकरांनी कोणत्याही धर्मात प्रवेश न करता स्वतंत्र 'बुद्धिवादी संघ' स्थापावा, अशी सूचना या लेखात सावरकरांनी केली आहे. बुद्धिवादाच्या कसोटीने डॉ. आंबेडकर धर्म सोडणार असतील तर त्यात सावरकरांना काहीही आक्षेपार्ह वाटत नाही. उलट ते म्हणतात, जगात असा कोणताही धर्म नाही, म्हणून आंबेडकरांनी विज्ञानावर व बुद्धीवर आधारित असलेला बुद्धिवादी संघ स्थापावा व आपल्या अनुयायास एका झटक्यासरशी 'अद्ययावत् अशा वैज्ञानिक बुद्धिस्वातंत्र्याच्या उच्चतम आणि आरोग्यप्रद वातावरणात नेवून सोडावे हेच अिष्ट आहे.' [३८] सावरकरांची ही भूमिका पूर्णपणे बुद्धिवादी आहे.

असे असतानाही वैदिक धर्मातून बौद्धधर्मात गेल्यामुळे, हिंदुत्वात फरक पडत नाही, असे त्यांचे म्हणणे होते. सिमोल्लंघन केले तरी उडी हिंदुत्वाच्या वर्तुळाच्या आतच पडली, असे त्यानी १९५६ च्या धर्मांतराविषयी म्हटले आहे. असे असताही वैदिकापासून बौद्धाकडे धर्मांतर करायला त्याचा विरोध का असावा, हा प्रश्न शिल्लकच उरतो. मुसलमानांचा ते वेगळ्या पद्धतीने विचार करतात, व ती भूमिका आपण नंतर समजून घेणारच आहोत. पण हिंदुत्वाच्या मर्यादेतील दोन धर्मात त्यांनी फरक का करावा, हा प्रश्न आपल्यासमोरचा एक वाजवी प्रश्न आहे.

धर्मनिरपेक्ष सावरकरांचा या धर्मांतराला विरोध का असावा? हिंदूनी सुद्धा अमकी एखादी वैदिक धर्मश्रद्धा पाळावी, यासाठी ते हा विरोध करतात काय?

धर्मांतर विरोध का?

या विरोधाची तीन कारणे आहेत. यापैकी एकही धार्मिक म्हणजे धर्ममताचा विचार करणारे नाही. ज्या कारणासाठी आंबेडकरांना धर्मांतर करायचे होते, ते कारण बौद्धधर्मांतराने सुटणारे नाही, असे सावरकरांचे म्हणणे होते. ते त्यांनी तपशीलाने मांडले आहे. अस्पृश्यता ही स्पृश्य लोकांच्या मनात असते. ती केवळ धर्मांतराने जात नसते, तर मनाला पटल्याने जावू शकते. आजचे अस्पृश्य उद्याचे बौद्ध अस्पृश्य होतात. जे अस्पृश्य शीख धर्मात गेले, त्यांचा 'महजबी शीख' नावाचा नवा वर्ग तयार झाल्याची सावरकर माहिती देतात. धर्मांतरात अस्पृश्यता नष्ट करण्याची स्वतःसिद्ध शक्ती नसते. सावरकर या सामाजिक मनाचा विचार करतात. दुसरी गोष्ट म्हणजे धर्मांतराने परस्परातील कटुता वाढते. वैदिक धर्माला शिव्याशाप देवून धर्मांतर होत असते. पटवून सांगण्याची प्रक्रिया धर्मांतराने अडखळते. प्रेमाच्या नात्यात व्यत्यय येतो. सावरकरांना वैदिक आणि बौद्ध धर्म हे सारखेच वाटून उपयोग नसतो. वैदिक धर्मात श्रद्धा असणाऱ्या व अस्पृश्यतेवर श्रद्धा ठेवणाऱ्या सनातन्याला आपलाच धर्म सत्य व श्रेष्ठ वाटतो. धर्मांतरामुळे धर्मद्वेष वाढण्याचीच शक्यता निर्माण होते. धर्मांतराचा हेतू कितीही उच्च असला तरी व्यवहारात परिणाम सनातन्यापासून धर्मांतरित हे मनाने दूर जाण्यातच होतो. सावरकरांच्या शब्दात सांगायचे तर "हिंदुधर्मबंधुत्वाच्या ओलाव्याने जे 'स्पृश्य' गावकरी पूर्वी त्या महारांचा कैवार घेणार होते, ते सुद्धा तो धर्मबंधुत्वाचा ओलावा नष्ट झाल्यामुळे त्या मूठभर बौद्ध महारांना परकियासारखे पाहू लागतील"[३९] सनातन्यांच्या भूमिकेतून त्यांचे मनोगत सावरकर येथे सांगत आहेत. धर्मांतराने हा धर्मबंधुत्वाचा ओलावा नष्ट होवू शकतो, असे त्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे अस्पृश्यता नष्ट करण्याचा मूळ हेतू विफल होतो. धर्मांतराने नवबौद्धांच्या आर्थिक स्थितीतही फरक पडण्याचा संभव नाही, हेही सावरकर दाखवून देतात.[३९] स्वधर्मबंधूना अस्पृश्य ठेवणे धर्मदृष्ट्याही लज्जास्पद आहे असे त्यांना पटवून सांगण्याचा मार्ग यामुळे बंद होतो. यासाठी अस्पृश्यता निवारण होईल या हेतूने धर्मांतराच्या खडुचात अस्पृश्यांनी पडू नये, अशी सावरकरांची कळकळीची विनंती होती. धर्मांतर हे या हेतूसाठीही केवळ निरुपयोगीच नव्हे, तर हानिकारक आहे, अशी सामाजिक कारणमिमांसा त्यांनी केली आहे. त्यांच्या धर्मांतर विरोधाचे हें पहिले सामाजिक कारण समजून घेतले पाहिजे.

सावरकरांना हिंदुत्वाच्या एका सूत्रात या सर्वांना बांधायचे होते. वैदिक, बौद्ध, जैन, शीख आदी सर्वांची एकी करायची होती हिंदुसंघटन करायचे होते. परस्परातील भेदभाव हे लोक कसे विसरतील, ही त्यांच्या समोरील खरी चिंता

होती. हिंदू शब्दाच्या व्याख्येचा उपद्व्याप यासाठीच होता. या सर्वांना अेकात्म करण्याच्या मार्गात धर्मांतर हे एक संकट होते. 'हिंदुत्वा'च्या भावनात्मक जाणिवेने सर्वांना एकत्र गुंफावे ही त्यांची योजना व प्रयत्न होता. 'आम्ही हिंदू नाहीच' 'हिंदू म्हणून जन्मलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही' अशा गर्जना देत अशी धर्मांतरे होवू लागली, तर सावरकरांच्या हिंदुत्वाला ते मारक होते. धर्मांतराची उडी हिंदुत्वाच्या वर्तुळातच पडली, असे सावरकरांनी म्हणून उपयोग नव्हता. ज्यांनी ती उडी मारली त्यांच्या दृष्टीने ती हिंदुत्वाच्या बाहेरची होती. सावरकरांचे 'हिंदू' नावाचे आवाहान त्यांना अैकू जाण्याचा संभव नव्हता. सावरकरांच्या हिंदुत्वाच्या दृष्टीने ही गोष्ट म्हणूनच वाईट होती. धर्मांतर विरोधाचे हे दुसरे कारण आहे.

तिसरे कारण

बौद्ध धर्मांतरामुळे बौद्धांची संख्या भारतात वाढणार होती. विभक्तपणाला आणखी एक कारण यामुळे तयार होणार होते. "झारखंडादिक अितर फुटीर प्रवृत्तीच्या समूहाशी हात मिळवणी करुन शक्य होताच अेक स्वतंत्र बौद्धस्थान, अेक स्वतंत्र नागराज्य स्थापन" करण्याची मागणी अशा धर्मांतरातून पुढे जन्माला येण्याचा सावरकरांना धोका वाटतो. [४०] अशा धर्मांतराचे आंधळे कौतुक करु नये, असा अिषारा ते देतात. या नव्या बुद्धप्रस्थाची 'राष्ट्रीय दृष्टीने आम्हाला चिकित्सा केलीच पाहिजे' असे त्यांना वाटते. [४१] यासाठी मागील बुद्धकाळच्या अितिहासात काय काय घडले, हे एकदा पाहून घेवून, आपण सतर्क व अखंड सावधान राहिले पाहिजे, असे त्यांना वाटते. ते म्हणतात, "पाकिस्तानची योजना पहिल्याने पुढे आली तेव्हा याच नेहरुंनी तिला Fantastic Nonsense म्हणून हेटाळणी केली नव्हती काय? तशाच भाबडटपणाच्या नि अंधळेपणाच्या चुका पुन्हा होवू नयेत म्हणून, अशा धर्मांतरासारख्या कोणत्याही फुटीर चळवळीविषयी प्रथमपासूनच 'ढिलेपणाच्या संभ्रमे राहोचि नये!' संदेहात्मक संकट असे समजून तिचा विरोधच केला पाहिजे." [४२] सावरकरांच्या धर्मांतर विरोधाचे हे तिसरे कारण होते. भविष्यातील आजचे Fantastic Nonsense सांगण्याची सावरकरांची ही पद्धत फार जुनी आहे. बुद्धिवादी पुरुषानी असे अशुभ न कल्पिता नेहमीच शुभ कल्पावे अशी आपली अिच्छा असते. पण सावरकरांचा बुद्धिवादच वेगळा आहे. वर्तमानातील कठोर वास्तवाची नोंद घेत असतानाच भविष्यातील अखंड सावधानतेचा अिषारा त्यांचा बुद्धिवाद देत असतो.

ते म्हणतात, "पुढे मागे तसे काही घडण्याचा संभव आज जरी निश्चितार्थी दिसत नसला तरी" राष्ट्रीय दृष्टीने "या बौद्धांच्या उठावाविषयी अखंड सावधान राहावे हेच उत्तम. विष पिवून मग त्याची परीक्षा पाहात बसण्यापेक्षा ते मुळातच न प्यालेले बरे."[४१] असा अिषारा त्यांनी शेवटी देवून ठेवला आहे. धर्मांतरापासून

अस्पृश्यांना रोखणे यासाठीही त्यांना आवश्यक वाटले होते. सावरकरांचा हा अिषारा योग्य का अयोग्य, खरा का भ्रामक, दृष्टेपणाचा का वेडेपणाचा– हा प्रश्न येथे आपल्या विचारार्थ नाही. त्यांची भूमिका समजून घेणे एवढेच आपले काम आहे. 'सहा सोनेरी पाने' मध्ये बौद्धावर जी टीका त्यांनी केली आहे, त्याच राष्ट्रीय भूमिकेतून हीही टीका केलेली आहे, हे समजून घेतले पाहिजे. धर्मांतर-विरोधाच्या वरील तीन कारणांपैकी एकही धार्मिक नाही, हे समजून घेतले पाहिजे

हिंदुपुरताच विचार केला, तर हिंदूची व्याख्या पूर्णपणे धर्ममुक्त आहे, असा या साऱ्या विवेचनाचा निष्कर्ष होवू शकतो. बौद्धधर्मावरील व धर्मांतरावरील सावरकरांची टीकाही या निष्कर्षाच्या विरोधी जात नाही. याच प्रश्नाचा आम्ही थोड्या वेगळ्या भूमिकेतून विचार करु इच्छितो. सावरकरांची भाषा हिंदुत्वाची असली तरी त्याचा खरा अर्थ हिंदुधर्मच आहे, व या हिंदुधर्माचा खरा अर्थ वैदिक धर्मच आहे, हा त्यांच्या अनुयायांचा नि विरोधकांचा एक मुद्दा असतो. थोड्या वेगळ्या पद्धतीने आपण याचा विचार करु. भारतातील २० टक्के अहिंदूना सावरकरांनी हिंदुत्वाच्या व्याप्तीत घेतलेलेच नव्हते. उरलेल्या पैकी अवैदिकांची संख्या बौद्धधर्मांतरपूर्व काळात १५ टक्केच्याच आसपास होती. यापैकी बौद्धासंबंधात राष्ट्रीयदृष्टीने सावरकर सावधानतेचा अिषारा देतच आहेत. मग हिंदुत्व म्हणजे हिंदुधर्म नव्हे, हे सांगण्याचा सावरकरांचा खटाटोप कशासाठी व कुणासाठी? सरळ सरळ हिंदुधर्म म्हणजेच वैदिकधर्म व तो म्हणजेच हिंदुत्व असे समीकरण मांडून ते का बोलत नाहीत? उरलेल्या अगदी नगण्य लोकांचा एवढा विचार करण्याचे कारण कोणते? बाकीचे धर्म हे वैदिकांच्याच शाखा आहेत असे मत त्यांना मांडता आले असते. तसे न करता हिंदुत्वाचा प्रपंच त्यांनी का मांडला? याचे स्पष्ट कारण असे आहे की, कोणत्याही धर्मातील कोणत्याही तत्वाचा संबंध राष्ट्रीयतेसाठी त्यांना जोडायचा नव्हता. पूर्णतः धर्मनिरपेक्ष दृष्टिकोणातून ते विचार करतात, म्हणूनच धर्ममुक्त हिंदुत्वाचा विचार ते मांडू शकतात, वैदिक-धर्माच्या पलिकडे जावून विचार करु शकतात.

धर्म म्हणजे विशिष्ट तत्व, सिद्धांत, मते, नियम वा आचार या अर्थी धर्माचा विचार करुन आपण वर चर्चा केलेली आहे. सावरकरही धर्माचा हाच अर्थ गृहीत धरतात. या अर्थाने सावरकरांचा 'हिंदू' शब्द धर्ममुक्त आहे. मात्र, दुसऱ्या एका दृष्टिकोणातून 'हिंदु' या शब्दाला धर्माचा संदर्भ वा संबंध आहे. अहिंदूना सावरकर हिंदुपासून वेगळे करतात, तेव्हा हा धर्माचा संदर्भ वा संबंध येतो. हिंदुपुरताच विचार केला तर, धर्ममुक्त असणारी ही 'हिंदू'ची व्याख्या हिंदू-अहिंदूची विभागणी करताना धर्माचा विचार करते. धर्माचा हा संदर्भ वा विचार कोणता आहे हे आता समजून घेवू.

धर्माचा अितिहास

'पुण्यभू'च्या कसोटीवर अहिंदूना हिंदुपासून सावरकर वेगळे करतात. पुण्यभू-

चा पारिभाषिक अर्थ आपला धर्म ज्या भूमीत जन्माला आला, विकसित झाला, ती भूमी असा आहे. आपल्या धर्माचा अतिहास ज्या भूमीत घडला वा ज्या भूमीशी संबंधित आहे, ती भूमी असा पुण्यभूचा सावरकरांचा अर्थ आहे. 'हिंदू'च्या व्याख्येशी धर्माच्या या अतिहासाचा संबंध आहे. यापेक्षा धर्माचा कोणताही अधिक संबंध या व्याख्येशी नाही. सावरकर जेव्हा जेव्हा हिंदुत्वाविषयी बोलत असतात तेव्हा ते हिंदुधर्माविषयी नसते; आणि जेव्हा ते हिंदुधर्माविषयी बोलत असतात, तेव्हा ते त्या धर्माच्या अतिहासाविषयी असते, हे आपण काळजीपूर्वक समजून घेतले पाहिजे. सावरकरांनी धर्माचा उच्चार केल्यावरोबर, ते एखादे धर्ममत सांगत आहेत, एखाद्या धर्ममतावरील श्रद्धा ते व्यक्तवित आहेत, त्या धर्माची उपयुक्तता सांगत आहेत– असे समजण्याची चूक केल्यामुळे अनेकांनी सावरकरांविषयी गैरसमज करुन घेतलेले आहेत. आपल्याला सावधगिरी बाळगिली पाहिजे ती ही की, सावरकरांनी वापरलेला 'धर्म' हा शब्द धर्माच्या अतिहासाच्या संदर्भात वापरलेला आहे, का धर्ममताच्या संदर्भात वापरलेला आहे, हे काळजीपूर्वक ठरवूनच कोणताही अभिप्राय व्यक्त केला पाहिजे. स्थूलमानाने आपल्याला असे लक्षात येईल की, 'धर्ममता'च्या संबंधात सावरकर जेव्हा धर्म हा शब्द वापरतात, तेव्हा त्या धर्ममतावर एकतर ते बुद्धिवादाने प्रहार करत असतात, किंवा तटस्थ भूमिका घेतात. सामान्यतः विज्ञान-निष्ठ विचारात बुद्धिवादाचे प्रहार असतात आणि हिंदुत्वनिष्ठ विचारात तटस्थता असते. जेव्हा धर्माच्या बाजूने बोलत असतात, तेव्हा तो धर्म म्हणजे कोणते धर्ममत नसते तर केवळ त्या धर्माचा अतिहास वा ऐतिहासिक अभिमान, एवढाच त्याचा अर्थ असतो.

'हिंदुत्व' विचाराशी धर्माचा जो संबंध येतो तो हया धर्माचा अतिहास या अर्थी येतो, हे थोडेसे काळजीपूर्वक त्यांच्या हिंदुत्व विचारांकडे पाहिले की आपल्या लक्षात येते. धर्माचा अतिहास याचा अर्थ, तो धर्म कोणत्या भूमीत जन्म पावला, त्या धर्माचे प्रेषित वा जनक कोणत्या भूमीत जन्म पावले, त्या धर्माला अनुयायी कोणत्या भूमीत मिळाले, कोणत्या भूमीत त्या धर्माचा प्रसार झाला, त्या धर्माचे भौगोलिक केंद्र कोणती भूमी आहे, त्या धर्मावर कोणते संकटे आली, राष्ट्र उभारणीचे त्या धर्माने कोणते कार्य केले आहे काय, सहअस्तित्वातील अन्य धर्मावरोबर तो कसा वागला इत्यादी, अतिहासाशी संबंधित असणाऱ्या गोष्टींचा विचार असा होतो. अशा वेळेस त्या धर्मात धर्म म्हणून काय सांगितले आहे, हाच प्रश्नच गैरलागू होतो. 'हिंदू'च्या व्याख्येचा, हिंदुत्वाचा धर्माशी जो संबंध येतो, तो धर्माचा अतिहास या अर्थीच येतो, ही गोष्ट लक्षात न घेतल्यामुळे सावरकरांची हिंदुत्वनिष्ठा समजून घेताना त्यांच्या विरोधकांसहीत अनुयायांनीही अनेक गैरसमज करुन घेतलेले आहेत.

संबंध या अतिहासाचा

'हिंदू'च्या विविध धर्माचा सर्व अतिहास याच भारतभूमीत घडलेला आहे,

हा सावरकरांचा अभिमानाचा विषय आहे. "कोणता धर्म स्वतंत्र वा शाखा, हा तिचा (हिंदुत्वाचा) विषयच नाही. ती व्याख्या अितकेच काय ते पाहणार की, स्वतंत्र असो, शाखा असो– हा धर्म ह्या आमच्या भारतीय जातीत जन्मल्यामुळे त्याची पितृभूमि नि पुण्यभूमि ही आसिंधुसिंधुपर्यंता भारतभूमीच आहे ना? तेवढेच असले की तिला पुरे!" अशी सावरकरांची सुस्पष्ट भूमिका आहे.[४२] सावरकरांच्या पुण्यभूचा अर्थ एवढाच आहे. धर्माच्या अितिहासात त्यांना काय अभिप्रेत आहे, हे त्याच्या पुढील विचारावरुन स्पष्ट होईल. तें म्हणतात,[४३] "आपले सारे धर्मसंस्थापक, अीशप्रेषित अवतार नि आचार्य, वशिष्ठ, व्यास, बुद्ध, महावीर, शंकर, वसव, दयानंद आपल्या या हिंदुजातीचे समाअीक पूर्वज आहेत, ह्या आपल्या हिंदुराष्ट्राच्या नि भारतभूमीच्या पोटी ते उपजले... आमचा अितिहास वैदिक काळापासून समाअीक आहे. यवन, हूण, शक, बर्बरादि प्राचीन नि या अर्वाचीन म्लेछाच्या आक्रमणाची आम्हावर आलेली संकटे ही समाअीक होती. वैदिकाचा परशत्रू तोच जैनाचा, जैनाचा तोच शिखांचा." हिंदुत्वातील पुण्यभूचे हे वर्णन आहे. धर्माच्या तत्वज्ञानाच्या आत जावून ते धर्माची चर्चा वा कौतुक कधीच करत नाहीत. हा सारा अभिमान समान अितिहासाचा, समान पूर्वजाचा आहे; धर्मतत्वाचा नव्हे! एकत्व भाव निर्माण होण्यासाठी अितिहासावर्दल असा अभिमान सावरकरांना आवश्यक वाटतो.

'हिंदू'च्या व्याख्येत धर्माचा भाग किती हे सांगताना सावरकर म्हणतात,[४४] "तीत कोणाचा धर्म श्रेष्ठ वा कोणाचे धर्ममत कोणाच्या धर्ममतातून उगम पावले हा प्रश्नच उद्भवत नाही. कोणता ग्रंथ श्रेष्ठ, कोणता वर्ण श्रेष्ठ, कोणती जात श्रेष्ठ, कोणता गुरु श्रेष्ठ हा वाद ती घालीत नाही. किंवा गोपूजा, शेंडी वा दाढी, साग्निता वा निराग्निता, प्रेत पुरणे वा जाळणे अशा कोणत्या बदलत जाणाऱ्या आचाराच्या निसटत्या वाळूच्या पायावर तिची उभारणी झाली नाही." हिंदुत्वाचा नि कोणत्याही धर्ममताचा कसा संबंध नसतो, हा त्यांच्या विवेचनाचा मुख्य मुद्दा असतो. भारतातील मुसलमान, ख्रिश्चन, पारशी, यहुदी हे हिंदू का नाहीत, याचे स्पष्टीकरण देताना ते म्हणतात,[४५] "त्यांच्यापैकी अनेकजण जरी या भरतभूमीस आपली पितृभूमि समजत असले तरी, त्यांची पुण्यभू, जेथे जेथे त्याचे धर्मसंस्थापक जन्मले नि धर्म संस्थापते झाले, ती भू ही नव्हे! ती पॅलेस्टाअिन, अरेबिया, अिराण अित्यादि कोणतीतरी अन्यभूमि आहे." याच कसोटीने चीन, जपान मधील बौद्ध हिंदू का नाहीत हे सांगताना ते पुढे म्हणतात, "उलटपक्षी चिनी, जपानी बौद्ध हिंदुजातीय का नव्हेत? तर जरी त्यांची भारतभूमि बुद्धदेवाची जननी म्हणून त्यांच्यातील बौद्धांची पुण्यभूमि असली तरी, ती त्यांची पितृभूमि नव्हे." तेव्हा सावरकरांच्या पुण्यभूचा संबंध धर्ममताशी नसून सामान्यतः धर्माच्या अितिहासाशी व विशेषतः धर्माच्या जन्मभूमीशी आहे, ही महत्वाची पहिली गोष्ट आपण नीट समजून घेतली पाहिजे.

अनर्थ व घोटाळे

या साऱ्या विवेचनावरुन हेच सिद्ध होते की, हिंदुत्वनिष्ठा आणि हिंदुधर्मनिष्ठा या वेगवेगळ्या बाबी आहेत. सावरकर हिंदुत्वनिष्ठ आहेत, हिंदुधर्मनिष्ठ नाहीत. हिंदुधर्माचा त्यांना अभिमान होता, याचा अर्थ हिंदूच्या सर्व धर्माच्या अतिहासाचा त्यांना अभिमान होता. हिंदुधर्मनिष्ठ आणि हिंदुत्वनिष्ठ या शब्दातील साधर्म्य अत्यंत फसवे आहे. सामान्यतः या दोन्हीचा अर्थ लोक एकच धरुन चालतात. 'हिंदुत्व' आणि 'हिंदुधर्म' याची फारकत सामान्य हिंदूना माहीत नाही. सावरकरांच्या अनुयायांना माहीत आहे, पण मान्य नाही. सावरकरांनी सांगितलेल्या अर्थी हिंदुधर्म हा शब्दप्रयोग कुणीही करत नाही किंवा तो वापरण्याचे कुणी सोडूनही दित नाही. सावरकर विशिष्ट शब्द व्याख्या करुन त्याच विशिष्ट अर्थाने वापरत होते, वापरायला सांगत होते– मात्र लोकांनी ते सारे शब्द आपापल्या पारंपारिक अर्थाने स्वीकारले. त्यांच्या अनुयायांनीही याबाबतीत अपवाद केला नाही. परिणामतः हिंदू शब्दाच्या पारंपारिक अर्थामुळे अनर्थ व घोटाळे होतात म्हणन या शब्दाची नवी व्याख्या करण्याचा सावरकरांनी प्रयत्न केला. पण तो आचरणात आलाच नाही. हिंदुराष्ट्राचा, हिंदुत्वाचा घोटाळा कायमच राहिला. उलट याचा परिणाम असा झाला की, हिंदुत्वाबरोबर सावरकर काय म्हणतात याबद्दलही अनर्थ व घोटाळे निर्माण झाले. हिंदुत्वाअितकेच सावरकरांविषयी गैरसमज निर्माण झाले.

व्याख्येचा हेतू

सावरकरांची हिंदुत्वनिष्ठा पूर्णपणे समजून घ्यायची असेल, तर आणखी एका प्रश्नाचा विचार आपल्याला केला पाहिजे. प्रश्न असा आहे की, परंपरेने सुप्रस्थापित झालेला हिंदू शब्दाचा अर्थ बदलून त्या शब्दाची नवी व्याख्या करण्याचा उपद्व्याप सावरकरांनी का केला ? धार्मिक हिंदूला सावरकरांची व्याख्या पसंत पडण्याची शक्यता नसते. 'प्रामाण्य बुद्धिर्वेदेषु साधनानामनेकता ! उपास्यानाम नियम अेतद्धर्मस्य लक्षणम् ! !' ही टिळकांची व्याख्या धार्मिक हिंदूंना पसंत आहे; पण सावरकरांना ही व्याख्या हिंदुत्वाचीही वाटत नाही, हिंदुधर्माचीही वाटत नाही, तर सनातन वैदिक धर्माची होय असे वाटते. कोणत्याच हिंदूंना मान्य न होणारी ही व्याख्या त्यांनी का केली हा एक प्रश्न आहे. अितिहाससं शोधन करत असताना सापडलेली ती व्याख्या आहे काय ? सावरकरांच्या या व्याख्येमागील हेतूचा शोध घेतला पाहिजे.

'हिंदुत्वा'च्या शेवटच्या भागात त्यांचा हा हेतू पुरेसा स्पष्ट झालेला आहे. "विवेचन पूर्वग्रहदूषित होवू नये म्हणून आम्ही आतापर्यंत उपयुक्ततेचा विचार केला नाही" [४६] असे सांगून हिंदुत्वाची ते उपयुक्तता सांगतात. राष्ट्र बलवान करण्यासाठी ही व्याख्या करणे त्यांना राष्ट्रीयदृष्टया आवश्यक वाटलेले आहे.

राष्ट्र स्वतंत्र कसे करावे व स्वतंत्र झाल्यावर प्रबल कसे करावे, हा त्यांचा अहर्निश चिंतेचा विषय होता. त्यांच्या जीवनाचे ते सांप्रतचे ध्येयच होते. राष्ट्र बलवान करावयाचे तर राष्ट्रातील लोकच करणार. या लोकांची तशी अिच्छा व त्या दृष्टीने प्रयत्न असणे, आवश्यक आहे.

त्या वेळेसच्या राजकीय परिस्थितीच्या अभ्यासातून व एकूण अितिहासाच्या निरीक्षणातून त्यांनी असा निष्कर्ष काढला की, भारतातील मुसलमान हे भारत स्वतंत्र व प्रबल करण्यासाठी साहाय्य करण्यास तयार नाहीत. हा निष्कर्ष त्यांनी कोणत्या आधारावर काढला, हे नंतर आपण थोडक्यात पाहणारच आहोत. मुसलमानांच्या मदतीशिवाय या राष्ट्राचा विचार करता येईल काय, असा त्यांच्या समोरचा एक महत्वाचा प्रश्न आहे. मुसलमानांना वगळून ते भारतातील इतर लोकांचा विचार करतात. या उरलेल्यांच्या मदतीने व बळावर हा देश स्वतंत्र करता येवू शकतो, प्रबल करता येवू शकतो, असे त्यांना वाटले. हा सारा विचार त्यांनी अंदमानात केलेला दिसतो.

या उरलेल्या लोकांना एकात्म कसे बनवावे हा त्यांच्यासमोरचा पुढचा प्रश्न आहे. या लोकांना कोणत्या भूमिकेवर एकत्र आणावे, याचा त्यांनी अत्यंत गंभीरपणे विचार केलेला आहे. सर्वजण आपण भारतीय आहोत, ही भूमिका त्यांना यासाठी पुरेशी वाटली नाही. कारण 'भारतीय' नावाच्या आवाहानात येणारे मुसलमानही अिंग्रजाप्रमाणेच इतर लोकांच्या विरोधात जाणार आहेत, हा त्यांचा निष्कर्ष होता. त्यामुळे मुसलमानांना वगळून इतरांना एकत्र कसे आणावे या विचारातून 'हिंदू' शब्दाच्या व्याख्येचा जन्म झाला आहे.

कल्पक योजना

मुसलमानांना धर्माच्या कसोटीवर त्यांना बाजूला सारायचे नव्हते. कारण असे केले तर धर्मावर राष्ट्र उभे करण्याचा धोका निर्माण झाला असता. धर्माच्या पायावर समाज उभे करण्याचे दिवस गेले, ही त्यांची मुलभूत बुद्धिवादी भूमिका होती. राष्ट्र हाही एक मोठा समाजच होता. धर्माच्या पायावर राष्ट्र उभे करणे त्यांच्या बुद्धिवादाला पसंत नव्हते. बुद्धिवाद तर हवा होता नि राष्ट्रही उभे टाकले पाहिजे हीही काळाची गरज होती. त्यांच्यासमोरची ही एक समस्या होती. धर्मभेदातून निर्माण झालेला राष्ट्रीय प्रश्न त्यांना बुद्धिवादाने सोडावयाचा होता. दीर्घ चिंतनानंतर त्यांनी आपल्या कुशाग्र बुद्धीने 'हिंदू'च्या व्याख्येचा पर्याय शोधून काढला. धर्ममताच्या कसोटीवर नव्हे, तर धर्मभूमीच्या कसोटीवर मुसलमानांना अितरापासून वेगळे करता येते, ही योजना त्यांच्या कल्पक बुद्धीला सुचली.

ही कसोटी लावल्यावर ख्रिश्चन, पारशी, ज्यू आदी भारतीय हेही हिंदू ठरणार नव्हते. ख्रिश्चनांबाबतीत सावरकरांचा फारसा आक्षेप नव्हता. निदान

हिंदूची व्याख्या करण्याच्या काळात तर हा आक्षेप त्यांनी कुठेही घेतलेला दिसणार नाही. ख्रिश्चन हिंदूतून वगळले गेल्याबद्दल सावरकरांना फारसे सुखदुःख वाटलेले नाही. ज्यू धर्मीय हिंदूतून वगळले गेले, याबद्दल त्यांचा नाओलाज होता. पारशी हिंदूच्या व्याख्येत येत नाहीत, याबद्दल मात्र सावरकरांनी दुःखाश्रू ढाळलेले आहेत. ज्यांची जन्मभूमी भारत आहे, ते वैदिक, जैन, शीख, आदी ८० टक्के भारतीय 'हिंदू'च्या वर्गात येणार होते, ही गोष्ट काही राष्ट्राच्या दृष्टीने कमी महत्वाची नव्हती.

राष्ट्राचा पाया

"हिंदू हेच या भारतीय राष्ट्राचा पाया, आधारस्तंभ व निर्वाणीचे त्राते (Reserved forces) आहेत." असे ते म्हणतात. [४७] "राष्ट्राची अिमारत उभी करण्यासाठी पाया लागतो आणि राष्ट्राचे खरे जीवन म्हणजे त्या भूमीशी हितसंबंधानी, अितिहासानी व आशा आकांक्षानी निगडित झालेल्या त्यातील बहुसंख्य नागरिकांचे जीवन होय." अशी त्यांची भूमिका आहे. कोणत्याही राष्ट्राच्या बाबतीत हाच नियम असतो, असे ते दाखवून देतात. हे हिंदू लोक नुसताच समाज नसून एक राष्ट्रही आहे, असे ते म्हणतात. मुसलमान हे स्वतःला स्वतंत्र राष्ट्र म्हणू लागले होते. या राष्ट्राला राज्य निर्माण करण्याचा ते प्रयत्न करत होते. भारतात मग राष्ट्र कुणाचे हा सावरकरांसमोरचा मुख्य प्रश्न होता. मुसलमान हे राष्ट्र असेल व त्या राष्ट्रासाठी त्यांना स्वतंत्र भूभाग वा राज्य हवे असेल, तर या भारत देशात मुसलमानाशिवाय अितर कुणाचे राष्ट्र नाही काय, असा प्रश्न त्यांच्यासमोर आहे. ते हिंदू राष्ट्र होय, असे त्यांना वाटते. राष्ट्राच्या साऱ्या कसोट्या या हिंदू राष्ट्राला कशा लागू होतात, हे ते दाखवून देतात. मुसलमानांना विरोध करण्यासाठी तेवढ्या पुरते सर्वांनी एकत्र यावे, या आवाहानापुरता ते विचार करत नाहीत. मुसलमानांना वगळूनही आपण एक राष्ट्र म्हणून उभे राहू शकतो, अशा प्रकारचे हिंदू राष्ट्राचे तत्वज्ञान ते मांडतात.

हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व

हिंदू हे मुळातच एक राष्ट्र आहे, हजारो वर्षापासून ते भारतात अस्तित्वात आहे, असे ते दाखवून देतात. हिंदुराष्ट्र हे काही आम्ही शोधून काढलेले नाही, तर ते एक अैतिहासिक सत्य आहे, हे ते सारखे पटवून देतात. राष्ट्राच्या उभारणीसाठी जे जे अवश्य असते, ते ते हिंदू जवळ आहे, हे ते दाखवून देतात. राष्ट्रीयत्वाची जी मूलतत्वें आहेत, तीच मूलतत्वें हिंदुत्वाची आहेत; हिंदुत्व हे राष्ट्रीयत्व आहे, असा सिद्धांत ते मांडतात. हे समीकरण सिद्ध करण्यासाठी हिंदुत्व ग्रंथाची उभारणी झालेली आहे. ते म्हणतात, [४८] "आतापर्यंत पाहिल्या प्रमाणे हिंदुत्वाची प्रत्यक्षातील मूलतत्वे (Actual essentials) हीच राष्ट्रीयत्वाची आदर्श मूलतत्वे

(Ideal essentials) आहेत. आपण मनात आणू, तर या हिंदुत्वाच्या पायावर जगातील कोणत्याही राष्ट्राच्या स्वप्नातही आला नसेल, असा उज्ज्वल भविष्य-काळ आपण घडवू शकू. मात्र यासाठी आपणास लाभलेल्या संधीचा योग्य तो उपयोग करुन घेतला पाहिजे." मुसलमानांच्या सहकार्याकरिता अडून रडत बसू नका; तुमच्यातही ताकद आहे; ती ताकद हिंदुत्व ही आहे; या हिंदुत्वावरच आतापर्यन्त तुमचे हिंदुराष्ट्र हजारो वर्षापासून उभे आहे; त्याच पायावर पुढेही आपण राष्ट्र म्हणून उभे करु शकू– ही विजिगीषू राष्ट्रीय भावना हिंदून निर्माण करण्यासाठी सावरकर 'हिंदू'ची व्याख्या करतात, हिंदू–अहिंदू असे दोन विभाग करतात, हिंदुत्वाचे, हिंदुराष्ट्रवादाचे तत्वज्ञान मांडतात, ही त्यांची भूमिका आपण समजून घेतली पाहिजे.

तीन लक्षणे

सावरकर राष्ट्रीयत्वाची तीन लक्षणे सांगतात. एक राष्ट्रभूमी हे पहिले लक्षण; एक-जाती हे दुसरे लक्षण; व एक-संस्कृती हे तिसरे लक्षण. त्यांच्या मते जगात जे जे राष्ट्र आहेत त्यांच्या बाबतीतही ही लक्षणे लागू होतात. ही तीनही लक्षणे हिंदूजवळ आहेत. केवळ समान भूमी असल्यामुळे काही राष्ट्रीयत्व निर्माण होत नसते. राष्ट्रीय भावना वा एकत्र राहण्याची अिच्छा निर्माण होण्यासाठी समान भूमीशिवाय अितर एकजातीच्या व एक संस्कृतीच्या भावनांही आवश्यक असतात. ही एक अैतिहासिक व वर्तमानकालीन वस्तुस्थिती आहे. सावरकरांची राष्ट्रीयत्वाबद्दलची ही भूमिका आहे.

हिंदू ही एक जात आहे, असे सावरकरांचे म्हणणे आहे. एकजात, एकवंश व एकरक्त असे शब्द त्यांच्या हिंदुत्व ग्रंथात व इतरत्रही येतात. हे रक्ताचे नाते मनुष्याला जवळ आणण्यात कारणीभूत होते, असे त्यांना वाटे. रक्ताचे नाते हे जगातील वास्तव आहे, होते पटवून देतात. दोन मनुष्याच्या रक्तामध्ये फरक करण्याचा हा प्रश्न नव्हता, तर जगातील कठोर वास्तव समजून घेण्याचा होता. जगातील प्रत्येक जात ही स्वतःपुरताच विचार करीत आहे. हिंदूनीही यांसाठीच स्वतःपुरताच विचार करणे भाग आहे. दुसऱ्या जातीवर अन्याय होणार नाही, अशा रितीनें स्वतःच्या जातीपुरता विचार करणे न्यायच आहे, अशी त्यांची भूमिका आहे. जगातील अितर जाती जोवर जिवंत राहू अिच्छितात, तोवर हिंदूजातीलाही जिवंत राहण्याचा हक्क आहे. हा हक्क तिने बजावला पाहिजे, असे त्यांना वाटे.

जातीचा, रक्ताचा, वंशाचा सावरकर जो विचार करतात, तो संकुचित आहे, असा आपला आरोप असतो. हा आरोप सावरकरांना मान्यच आहे. मानवतेच्या तुलनेत राष्ट्र हे जसे संकुचित, तसेच राष्ट्राच्या तुलनेत जात ही संकुचितच आहे, असे ते म्हणतात. पण जगातील वास्तव म्हणून जसा राष्ट्रापुरताच आपण विचार

करतो, तसाच जातीपुरताही विचार करणे भाग आहे, असे त्यांना वाटते. काय असावे नि काय आहे, याची ते काळजीपूर्वक विभागणी करतात. रक्ताचा विचार करावा लागल्याबद्दल त्यांच्या कविहृदयाला तीव्र यातना होतात. ते म्हणतात,[४९] "अेकंदरित जर पाहिले तर सर्व जगामध्ये मनुष्य म्हटला की, त्याची एकच मानव जात आहे. एकाच मानवी रक्तामुळे ती जिवंत आहे. या शिवायची अन्य भावना असेल ती केवळ तात्पुरती, सोयीपुरती व फक्त सापेक्षत: सत्य आहे. जाती जातीतील कृत्रिम भिती जमिनदोस्त करण्याचा निसर्गाचा सातत्याने प्रयत्न असतो. रक्तारक्ताचे संमिश्रण थांबविणे म्हणजे बाळूच्या पायावर अिमारत बांधणे होय." तेव्हा आपण संकुचित व अनैसर्गिक विचार करतो आहोत, याची सावरकरांना पूर्ण जाणीव आहे. तरीही जगातील प्रत्येक जाती आपापल्या जातीचा व रक्ताचा अभिमान धरुन आहेत, या वास्तवाची त्यांना कठोर जाणीव आहे. जोपर्यंत जगातील प्रत्येक जात स्वत:चा अभिमान धरीत आहे व त्यातून निर्माण होणाऱ्या सामर्थ्याचा जातिसंवर्धनासाठी उपयोग करीत आहे, तोवर हिंदुनाही जातीचा विचार करणे भाग आहे असे त्यांना वाटते.

एक जातीचा अर्थ

सावरकरांची ही जाती विषयीची भूमिका नीट समजून घेतली पाहिजे. "जाति हा शब्द 'जन्' म्हणजे उत्पन्न करणे या धातुपासून निघाला आहे. त्यांचा अर्थ बंधुत्व, ज्याची उत्पत्ती अेकच आहे, ज्याचे रक्त एकच आहे, असा लोकसमूह असा होतो." अशी त्यांनी जातीची व्याख्या केली आहे.[५०] या व्याख्याप्रमाणे सर्व हिंदुमध्ये एकच रक्त खेळत आहे व म्हणून हिंदू ही एक जाती आहे, असे ते पटवून देतात. ब्राह्मणापासून - शूद्रापर्यन्त व बौद्धापासून - जैनापर्यन्त सर्वांच्या अंगात एकच रक्त खेळत आहे, हे अितिहासावरुन ते दाखवून देतात. सावरकर 'जाती' या शब्दाचा अेवढा व्यापक अर्थ घेतात, हे लक्षात घेतले पाहिजे. ब्राह्मण जात, मराठा जात, महार जात इ. जाती या हिंदू जातीमध्ये विलय पावलेल्या आहेत. हिंदू जातीपेक्षा लहान जात–पोटजात मानायला सावरकर तयार नाहीत. चातुर्वर्ण्य निर्मूलनाच्या व जात्युच्छेदाच्या सामाजिक भूमिकेतून जर विचार केला, तर सावरकर कुठपर्यन्त पोहचले होते, हे आपल्या लक्षात येईल. संकुचित जातीच्या रक्ताचे डबके त्यांच्या विचारांनी केव्हाच फोडून टाकले होतेच. ते हिंदू जातीच्या रक्त सागरात जावून विलीन झाले होते. मानवी रक्ताच्या महासागरात ते विलिन का झाले नाही, हा आक्षेप घेताना या गोष्टीचे भान ठेवणे भाग आहे.

हिंदूंनी अहिंदूंशी विवाह करायला सावरकरांची हरकत होती म्हणून त्यांच्यावर टीका करणाऱ्यानी,[५१] सर्व हिंदूहिंदूत विवाह झाले पाहिजे, हिंदूतील बेटीबंदी तोडली पाहिजे. त्यांच्यात एकच रक्त खेळत राहिले पाहिजे, असा सावरकरांचा आग्रह होता, हे नीट समजून घेतले, तरी सावरकरांना न्याय देण्याची

त्यांची अिच्छा आहे, असे म्हणता येईल. मुसलमानांविषयीची सावरकरांची भूमिका मांडताना हिंदु–मुस्लीम विवाहांना ते हरकत घेतात असा आक्षेप घ्यायचा, आणि त्यांचे सामाजिक विचार मांडताना 'विज्ञाननिष्ठा, बुद्धिनिष्ठा, सामाजिक सुधारणांचा पुरस्कार ही सारी वैशिष्ट्ये सावरकरांच्या आचाराविचारात अगदी शाळेत असल्यापासूनच्या दिवसात दिसत होती' असे संशोधन करुन 'सावरकरांची अशी वैचारिक वाढ झालीच नव्हती' असा निष्कर्ष काढायचा, [५२] हे न्यायबुद्धीचे नसून आकसबुद्धीचे लक्षण आहे.

'हिंदुत्व' ग्रंथातही सावरकर म्हणतात, [५३] "जाति, उपजाति, पंथ आणि मतमतांतरे याची आता निरूपयोगी झालेली बंधने ताड्ताड तोडून टाका. सहभोजनें काय घेवून बसलात? परंतु प्रांताप्रांतातील व जाती जातीतील संमिश्र लग्नें जिथे होत नसतील, तिथे घडवून आणा. सध्या शिख व सनातनी, जैन व वैष्णव, लिंगाअीत व लिंगाअीतेतर यांच्यामध्ये होत असलेली लग्ने जर कोणी मोडण्याचा प्रयत्न करील तर ते वैवाहिक बंधन नष्ट करणारा मनुष्य आत्मघातकी ठरेल." अशा प्रकारे ब्राह्मणापासून–भंग्यापर्यंत व अटकेपासून–कटकेपर्यंत हिंदूंच्या रक्ताचा प्रवाह जातीची बंधनें तोडून अखंड वाहत राहिला पाहिजे, असा सावरकरांचा आग्रह होता. असे झ ले तर "सर्व हिंदूलोक हे एव मेकात अखंड मिसळून जातील," व एकात्म व प्रबल राष्ट्र निर्माण होअील, असे त्यांना वाटे.

हिंदु–मुस्लीम रक्त एकच

हिंदूचे रक्त हे अहिंदूच्या रक्तापेक्षा श्रेष्ठ आहे, किंवा हिंदूंचा वंश हा अहिंदूच्या वंशापेक्षा श्रेष्ठ आहे, अशी वंशश्रेष्ठत्वाची भूमिका सावरकर कधीही घेत नाहीत, हे समजून घेतले पाहिजे. आमचा वंश फारच शुद्ध आहे व तो तसाच राहिला पाहिजे, ही त्यांची भूमिकाच नव्हती. सर्व मानवी रक्त एकच आहे, ही त्यांची खरी भूमिका होती. मुसलमानांचे रक्त हे हिंदूपेक्षा वेगळे आहे, असे ते मानत नाहीत. "परक्या देशातून आलेल्या मुसलमानांची सुमारे ५० लाख संख्या वजा करता ७ कोटीपैकी ६॥ कोटी मुसलमान हे हिंदूंचे केलेले मुसलमान आहेत, हिंदूजातीच्या अंगप्रत्यंगाचे हे ६॥ कोटी मासांचे गोळे" आहेत, असे सावरकर स्पष्टपणेच म्हणतात.[५४] भारतातील या सर्वांच्याच अंगातून एकच रक्त वाहत आहे, सर्व एकाच वंशाचे आहेत, हीच त्यांची वास्तव भूमिका आहे. या गोष्टीची लोकांना जाणीव नाही, एवढीच त्यांची तक्रार आहे. प्रत्येक छोटी-मोठी जात आपल्याच रक्ताच्या शुद्धतेची काळजी घेते, मात्र निसर्ग व काळ या काळजीला कसा भीक घालीत नाही, हीच गोष्ट ते सारखी सांगत असतात.

हिंदु-मुसलमानाचा वंश व रक्त एकच आहे, ही गोष्ट अशी मान्य केली म्हणजे या मुद्द्यावर त्यांच्यात विभागणी करता येत नसते. त्यामुळे सावरकरांनी हा मुद्दा त्यांच्यातील भेद दाखविण्यासाठी कसोटी म्हणून वापरला नाही. पितृभू

हे लक्षण ज्या प्रमाणे हिंदु-मुसलमानात समान होते, त्याप्रमाणे एक जाती एक रक्त हेही लक्षण समानच होते. या दोन्हीपैकी कोणत्याही लक्षणाने मुसलमानांना हिंदूपासून वेगळे करता येत नव्हते.

समान संस्कृती

हिंदुत्वाचे तिसरे लक्षण समान संस्कृती हे होते. संस्कृतीमध्ये अनेक गोष्टी येतात. धर्म, भाषा, परंपरा, अितिहास, कला, साहित्य, उत्सव इ. अनेक गोष्टी संस्कृतीत येतात. सावरकरांच्या भाषेत सागावयाचे तर 'संस्कृति म्हणजे मानवी मनाचे प्रकटीकरण होय. संस्कृती म्हणजे या जडसृष्टीवर मानवाने केलेल्या निर्मितीचा आढावा होय "[५५] मुसलमान आणि हिंदू हे हजारो वर्षापासून भारतात राहत आले आहेत. त्यांच्या संस्कृतीत कितीही फरक मानला तरी, हिंदूच्या व्याख्येकरिता त्याचा उपयोग करता येईल, अितका नेमका फरक दाखविता येणे कठीण आहे. सांस्कृतिकदृष्टया हिंदूहिंदूमध्ये अधिक साम्य आहे व त्या मानाने हिंदु-मुसलमानात साम्य कमी व विरोध अधिक आहे, ही कसोटी फारच मोघम होते. या हजारो वर्षाच्या कालावधीत हिंदु-मुसलमानांचा सांस्कृतिकदृष्टया अेकमेकावर परिणाम झालेला आहे, हे उघड आहे. हा परिणाम ग्रामीण भागात आजही फार मोठया प्रमाणावर दिसून येतो. दोघांनी मिळून एकजीव अशी समान संस्कृती निर्माण केलेली नाही, हे म्हणणे वेगळे आहे. आपलेही सांस्कृतिक वेगळेपण राखण्याचा मुसलमानांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केला आहे, ही गोष्ट खरी असली तरी, या प्रयत्नांनाही भीक न घालता कळत न कळत एकमेकांच्या संस्कृतीचे अनेक भाग स्वीकारलेले आहेत, हेही खरे आहे. यासंबंधी छोटे मोठे अनेक पुरावे देता येतील, पण आपला तो विषय नाही. मुख्य प्रश्न हा आहे की, संस्कृतीच्या कसोटीवर हिंदू-अहिंदू अशी विभागणी करता येणे शक्य आहे काय? व्याख्या करण्याइतका नेमका फरक या दोघांच्या संस्कृतीत दाखविता येतो काय?

तीनही लक्षणे समान

सावरकरांचे या प्रश्नाचे उत्तर नकारार्थी आहे. हिंदुसंस्कृतीमध्ये अहिंदूच्या विश्वासाचे प्रमाण सांगताना ते म्हणतात,[५६] "याचा अर्थ असा नाही की, जो अहिंदू आहे, तो या गोष्टीपैकी कोणत्या गोष्टीत हिंदूप्रमाणेच विश्वास ठेवीत नाही. परंतु, हिंदूंशी जितक्या त्यांच्या समान गोष्टी असतात, त्याच्यापेक्षा असमान गोष्टीच जास्त असतात." म्हणजे समान गोष्टीची एक यादी, असमान गोष्टीची दुसरी यादी असे केले तर ही असमानची संख्या समानपेक्षा अधिक भरते, असे सावरकरांना सांगावयाचे आहे. अशा कसोटीवर हिंदूची व्याख्या करता येत नसते. बोहरा व खोजा देशवाशियासंबंधात सावरकर म्हणतात,[५७] "वास्तविक बोहरी व खोजे लोकांची जमात दशावतारांची पूजा करतात व महंमद हा अकरावा अवतार

मानतात इतकाच फरक. यांची संबंध जमात हिंदू कायद्याप्रमाणेच शासित होत आहे. राष्ट्र, जाती व संस्कृती या तीनही लक्षणांच्या दृष्टीने ते हिंदू आहेत." ही तीनही लक्षणे असताना बोहरी वा खोजा लोकांना हिंदू म्हणावे काय, हा सावरकरांसमोरचा प्रश्न आहे.

"जे प्रथम बलात्काराने हिंदूचे मुसलमान अथवा ख्रिश्चन केले गेले, आणि म्हणूनच ज्यांचा हा देश म्हणजे पितृभू झालेला आहे व भाषा, कायदा, रीतिभाती, लौकिक समजुती आणि इतिहास ह्या सर्व संस्कृतीचे काही अंशानी जे भागीदार झालेले आहेत,"[५७] अशा लोकांना हिंदू म्हणायचे काय, हा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. सात कोटीपैकी साडेसहा कोटी मुसलमान या वर्गातील आहेत, हे सावरकर मान्य करतात. हे सारे लोक हिंदूच्या संस्कृतीचे काही अंशी भागीदार आहेत, हे ते पटवून देतात. या संस्कृतीच्या फरकाच्या मुद्यावर चर्चा करता येते, पण हिंदूची व्याख्या करता येत नाही, ही त्यांच्या समोरील अडचण आहे. 'हिंदू'ची व्याख्या करताना भूमी, जाती, व संस्कृती यापैकी एकही कसोटी विघटक तत्व म्हणून मानता येत नाही. सावरकरांना व्याख्या करण्यासंबंधी आलेल्या या अडचणी समजून घेतल्या पाहिजेत.

पुण्यभू एकमेव कसोटी

अंतिमतः सारे विवेचन करुन 'पुण्यभू' ची एकमेव विघटक कसोटी, सावरकरांनी यासाठी सांगितली आहे. कुणाचा धर्म कुठे उगम पावला, हीच कसोटी त्यांनी 'पुण्यभू' या शब्दातून सांगितली आहे. मुसलमान-ख्रिश्चनांची 'पुण्यभू' भारतात नाही, तर दूर अरबस्थानात किंवा पॅलेस्टाअिनमध्ये आहे, म्हणून ते हिंदू नाहीत या निष्कर्षाला सावरकर येतात.[५८] ते निष्कर्ष काढतात की, "आम्ही आतापर्यंत 'हिंदुत्वा'च्या लक्षणांची मिमांसा केली व तिच्यावरुन असे निष्पन्न झाले की, बोहरी लोक व तसेच मुसलमान किंवा ख्रिश्चन लोक यांच्याजवळ 'हिंदुत्वा'ची इतर सर्व लक्षणे आहेत, परंतु एक लक्षण मात्र नाही व ते लक्षण म्हणजे हे की, ते 'हिंदुस्थान'ला 'पुण्यभू' म्हणून मानत नाहीत."[५८] सावरकरांची ही भूमिका नीट समजून घेतली पाहिजे. या मुसलमान-ख्रिश्चनांना ते आवाहान करतात,[५९] "एक जाति, एक रक्त, एक संस्कृति, एक राष्ट्रीयता, वगैरे सर्व गोष्टींच्या समन्वयाने हिंदुत्वाची बहुतेक सर्व लक्षणे ज्यांच्याजवळ आहेत, परंतु, जे केवळ अत्याचाराने व जबरदस्तीने आमच्या पूर्वजांच्या संसारातून हिसडून नेले गेले, अशा सर्व बंधूनो! तुम्ही फक्त अनन्यतेने आपल्या भूमातेवर प्रेम करा व ती 'पितृभू' आहे, अितकेच न मानता ती 'पुण्यभू' हि आहे, असे माना, म्हणजे 'हिंदु संस्कृती'च्या कक्षेत तुमचे अत्यंत प्रेमाने स्वागत होअील." संस्कृतीत गृहीत असलेले 'पुण्यभू' लक्षण या अहिंदू लोकांना लागू होत नाही, एवढीच सावरकरांची तक्रार आहे, व या एकाच मुद्यावर हिंदू-अहिंदूत ते फरक करतात, हे समजून

घेतले पाहिजे.

सावरकरांची ही भूमिका त्यांच्या अनुयायांनी व टिकाकारांनीही नीट समजून घेतली नाही. बुद्धिवादी भूमिकेतून या व्याख्येकडे न पाहता ते धार्मिक भूमिकेतून पाहतात. परिणामत: साऱ्या शब्दाचे अर्थच बदलू लागतात. धर्म, संस्कृती, पुण्यभू – या तीन गोष्टीतील नेमका संबंध समजून घेण्यात घोटाळा होतो. या सर्वात सावरकरांना मुख्य कोणते वाटते, हे ते लक्षात घेत नाहीत. ते त्यांना मुख्य का वाटते हेही लक्षात घेत नाहीत. हिंदूची व्याख्या करण्याचा हेतू काय हेही विचारात घेत नाहीत. सावरकरांच्या बुद्धिवादी विचाराशी या विचाराची सुसंगती कशी लावावी, याचाही ते विचार करत नाहीत. स्वत:ला अभ्यासक म्हणवणाऱ्यानीही या संबंधात घोटाळे केलेले आहेत. उदाहरणच घ्यायचे तर डॉ. सुधाकर भालेरावांचे घेता येईल.

चुकीचा निष्कर्ष

आपल्या ग्रंथात डॉ. भालेराव म्हणतात, [६९] "संस्कृतीचा पुण्यभूशी संबंध जोडताच धार्मिक पैलूंचा अंतर्भाव हिंदुत्वात झाला... धर्म हा संस्कृतीचा भाग असतो. अर्थात धर्म म्हणजे पूर्ण संस्कृती नव्हे. परंतु सावरकरांनी पुण्यभू व संस्कृती हे शब्द समान अर्थाने वापरुन संस्कृतीचा जो एक घटक त्या धर्मालाच संपूर्णत्व प्रदान केले. त्यामुळे ख्रिश्चन, मुसलमान व पारशी आपोआप हिंदुत्वाबाहेर जातात. संस्कृतीची व्याख्या संकुचित झाल्यासारखी वाटते." डॉ. भालेरावांचा झालेला मुख्य घोटाळा आपण समजून घेतला पाहिजे. संस्कृतीचा धर्म हा एक घटक आहे; या धर्माचा पुण्यभूमी हा एक घटक आहे; हा पुण्यभूमी सावरकरांच्या हिंदुत्वाचा, मुसलमानादींना हिंदुत्वाच्या बाहेर ठेवणारा, घटक आहे.

सावरकर या तीन गोष्टीचे समीकरण मांडत नाहीत. संस्कृती आणि धर्म या दोन्हीही बाबींचा समान घटक असणारा पुण्यभू मुसलमानांच्या बाबतीत भारतभू नाही, एवढाच त्यांचा मुद्दा आहे. पुण्यभू आणि संस्कृती हे समान अर्थाने सावरकरांनी वापरले हा शंभर टक्के गैरसमज आहे. भालेरावासारख्या प्रामाणिक अभ्यासकाचा असा घोटाळा होत असेल, तर सावरकरांचे आंधळे अनुयायी आणि डॉ. फडकेसारखे पोथिनिष्ठ विरोधक यांची काय मते असतील याची कल्पना करता येते. मुसलमानादी लोक हिंदूच्याच समान संस्कृतीचे भागीदार आहेत, ही सावरकरांची भूमिका डॉ. भालेरावांनी लक्षात घेतलेली नाही. धर्म किंवा संस्कृती ही काही हवेत तयार होत नसते. त्याच्या जन्माला आणि विकासालाही एखादी भूमी लागते. भूमी हा जो धर्माचा व संस्कृतीचा घटक आहे, तोच सावरकरांना पुण्यभू म्हणून अभिप्रेत आहे. गणितात आपण अनेक संख्यांचा लघुत्तम साधारण विभाज्य (Common factor) काढतो, त्यावरुन हा ल. सा. वि. म्हणजे मूळ संख्याच आहेत, असे मानणे चूक असते. पुण्यभू हा धर्म आणि संस्कृतीचा ल. सा. वि.

आहे हे लक्षात न घेतल्यामुळे डॉ. भालेरावांचे गणित चुकीच्या उत्तराकडे गेलेले आहे.

'पुण्यभू'चीच कसोटी अहिंदूना हिंदुत्वाच्या बाहेर ठेवण्यासाठी सावरकरांनी वापरली हे मान्य करुनही डॉ. भालेराव म्हणतात, [६१] "संस्कृती ही धर्मापेक्षा व्यापक असून व धर्म संस्कृतीचा एक भाग असूनही, हिंदुत्वात समान संस्कृतीपेक्षा समान धर्माला महत्वाचे स्थान सावरकरांनी दिले." हा डॉ. भालेरावांचा गैरसमज आहे. सावरकरांनी समान संस्कृती किंवा समान धर्म यापैकी कशालाही महत्वाचे स्थान दिले नसून, ती संस्कृती वा तो धर्म ज्या भूमीत उदय पावला त्या भूमीलाच एकमेव महत्वाचे स्थान दिलेले आहे. सावरकरांच्या बुद्धिवादाला, अहिंदूंना बाजूला करायला, धर्म आणि संस्कृतीमधील एवढाच पुण्यभूचा समान घटक सापडलेला आहे.

'पुण्यभू'चा आग्रह का?

'पुण्यभूमी' वर सावरकरांचा एवढा जोर का आहे, हे समजून घेवू. 'हिंदुत्व' ग्रंथातच त्यांनी स्पष्टपणे याचे कारण सांगितलेले आहे. ते म्हणतात, "परंतु संस्कृतीशिवाय, 'पुण्यभू' ची बंधने पुष्कळ वेळा मातृभूच्या बंधनापेक्षा अधिक प्रबल अशी ठरली आहेत. उदाहरणार्थ, मुसलमानांकडे पहा. दिल्ली किंवा आग्र्यापेक्षा त्यांचे लक्ष मक्केकडे अधिक जाते... ज्यू लोकांचे पहा. ...त्यांचे हृदयाचे प्रेम हे साहजिकरित्याच त्यांच्या जन्मभूमीमध्ये आणि पुण्यभूमीमध्ये विभागले गेले आहे." सावरकरांच्या समोर हे वास्तव आहे. मुसलमानांचे प्रेम पुण्यभू म्हणून भारताबाहेर आहे व त्यामुळे त्यांना भारतापेक्षा भारताबाहेरील देशाविषयीच अधिक प्रेम व आत्मियता वाटणार, असे त्यांना वाटते. असे वाटणे साहजिकच आहे, असेही ते म्हणतात. आपल्या भारतापेक्षा भारताबाहेरच्या देशावर निष्ठा ठेवणाऱ्या लोकांबरोबर एकराज्य म्हणून कसे राहायचे, हा सावरकरांसमोरचा प्रश्न आहे. भारत राष्ट्र जिवंत ठेवण्याचा प्रश्न आला, तर तो हिंदूंनाच सोडवावा लागेल ही खूणगाठ त्यानी मनाशी बांधली. मुसलमानावर निःसंशय विश्वास टाकायला ते तयार नव्हते. राष्ट्राचा पाया कोणते लोक आहेत, यांचा त्यांनी विचार केला. हिंदू हेच या राष्ट्राचा पाया, आधारस्तंभ, निर्माणीचे त्राते आहेत, असा त्यांनी सिद्धांत मांडला. मुसलमानांना वगळण्यासाठी म्हणून त्यांनी पुण्यभूचा आधार घेतला. मुसलमानांचे प्रेम भारताबाहेर आहे, या गोष्टीचा तो शब्द निदर्शक होता.

मुसलमानांच्या या प्रवृत्तीमुळेच त्यांना हिंदुत्वाचा सखोल विचार कारणे भाग पडले. आपण असा विचार करु की, जर भारतात मुसलमान नसतेच, तर सावरकरांनी अशी व्याख्या केली असती काय? मुसलमानांना विचारात न घेता हिंदुत्वाचा विचार सावरकर मांडूच शकत नाहीत. त्यांचे अनुयायीही मांडू शकत नाहीत.

तत्वज्ञानाचे रंग–रुप

परंतु सावरकरांनी आपली ही भूमिका प्रतिक्रियात्मक न ठेवता, त्याला तत्वज्ञानाचे रंग–रुप देवून मांडली. मुसलमान स्वतःला स्वतंत्र राष्ट्र समजत होते. सावरकरांनी हिंदू हेही एक राष्ट्र आहेत असा सिद्धांत मांडला. हिंदूंचा वेगळा विचार करायचा असे ठरल्यावर त्यांच्या राष्ट्राचा विचार करणे भागच होते. राष्ट्रीयत्वासाठी एकभूमी, एकजाती व एक संस्कृती या गोष्टी लागतात. हिंदूच्या ठिकाणी या तीनही गोष्टी आहेत, असा सिद्धांत सावरकरांनी मांडला. हिंदू हे राष्ट्र कधीच नव्हते, असे मत अनेक संशोधकांनी व्यक्त केलेले होते. राष्ट्र ही कल्पना इंग्रजांनी आम्हाला शिकविली. आम्ही कधीच राष्ट्र नव्हतो. हिंदू हा शब्द परकियानी आपल्याला लावलेला आहे. अशा प्रकारचा मतप्रवाह त्यावेळेस प्रचलित होता. ८० टक्के भारतीयांनाच का होईना, पण हिंदुत्वाची जाणीव ठेवून, त्यांनाही राष्ट्र म्हणून उभे राहता येते, याचा आत्मप्रत्यय त्यांना आणून द्यायचा, ही अवघड कामगिरी त्यांना पार पाडायची होती. या गरजेतून हिंदूची व्याख्या जन्म पावली, हिंदुराष्ट्राची कल्पना उदय पावली.

'लोकांना स्वभावसिद्ध राष्ट्र बनावयास लागणारा महत्वाचा घटक म्हणजे एकात्म एकराष्ट्र बनण्याची त्यांची इच्छा हाच होय' अशी त्यांची राष्ट्रविषयक पायाभूत भूमिका होती.[६२] अशी भावना सामान्यतः कोणत्या लोकात निर्माण होते हे सागताना एक भूमी, एक जाती, एक संस्कृती या तीन लक्षणांचा त्यांनी उल्लेख केला आहे. समान इतिहास, समान परंपरा, समान सुखदुःखे, समान ध्येय, समान उत्सव, समान शत्रू या सारख्या गोष्टी ही इच्छा निर्माण होण्यासाठी कारणीभूत होतात, असे त्यांचे म्हणणे होते. मुसलमान भारतात नसते तरीही या गोष्टीची राष्ट्रीयत्वासाठी आवश्यकता होतीच. राष्ट्रउभारणीचा त्यांनी जेवढा खोलवर विचार केला, तेवढा अितर कोणत्याही भारतीय नेत्याने केलेला दिसत नाही.

अंतःकरणाचा धर्म

सावरकरांची राष्ट्रवादाबद्दलची ही तत्वे, भाषा व आग्रह पाहिला, तर त्यांचा राष्ट्रवाद एकाला धार्मिक वाटतो, दुस-याला वांशिक वाटतो, तर तिस-याला सांस्कृतिक वाटतो. सावरकर एक रक्ताचा, एक जातीचा उल्लेख करतात. त्यामुळे त्यांचा राष्ट्रवाद हा वांशिक आहे, असे काही जणांना वाटते. बाकी गोष्टी समान असल्यास, एक रक्त असलेल्या लोकांमध्ये इतरापेक्षा अधिक प्रेम व ममत्व असते, एवढ्याच मर्यादित अर्थाने सावरकर 'एक रक्ताचा' वा 'एकजातीचा' उल्लेख करतात. "आपण काही फक्त एकराष्ट्रीयच नाही, तर एकजातीय आहोत; जन्मतःच आपले बंधुत्व जडलेले आहे. दुसरा कसलाही प्रश्न नाही, हा फक्त अंतःकरणाचा प्रश्न आहे."[६३] असे त्यांनी स्पष्टपणे म्हटले आहे. वांशिक राष्ट्रवादामध्ये एवढाच अंतःकरणाचा धर्म गृहीत धरलेला नसतो. वांशिक

मराठी ग्रंथ संग्रहालय पुणे

राष्ट्रवाद हा वंशश्रेष्ठत्वाच्या जाणिवेवर उभा असतो. सावरकरांचा राष्ट्रवाद या जाणिवेवर उभा नाही.

हिंदू व मुसलमान हे एकाच रक्ताचे व वंशाचे आहेत, असे मान्य केल्यावर हिंदुत्वनिष्ठ सावरकरांनाही वंशश्रेष्ठत्वाची भूमिका घेतो म्हटले तरी घेता येत नसते. हिंदुमध्ये परस्पराविषयी आत्मियता व प्रेम वाटावे यासाठी ते एक रक्ताचा उल्लेख करतात, हे एक कारण आहे. राष्ट्र उभे करण्यासाठी एकजाती ही कसोटी जगात मानली जाते. हिंदू या कसोटीस उतरत नाहीत म्हणून ते राष्ट्र नाहीत, असा एक आक्षेप घेतला जात असे. या आरोपाला उत्तर म्हणून आम्ही एकजातीच आहोत, असे सावरकर पटवून सांगतात. एक रक्ताच्या व एक जातीच्या उल्लेखाचे हे दुसरे कारण आहे. हिंदू हे एकजातीय आहेत काय या प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणतात, [६४] "याचे उत्तर आम्ही प्रतिप्रश्नातच देवू की, 'अिंग्लीश लोक हे खरोखरच का अेकजाति आहेत ? जगामध्ये अिंग्रज रक्त, फ्रेंच रक्त, जर्मन रक्त किंवा चिनी रक्त अशा तऱ्हेची काही वस्तु आहे काय ?'... जर त्यांना तसे म्हणावयास हरकत नसेल तर हिंदूंना तर नाहीच नाही." याचा अर्थ अेकजातीचा आधार घेवून अिंग्रज, फ्रेंच आदी लोक जर राष्ट्र बनावयास पात्र असतील तर आम्ही का नाही, असा सावरकरांचा सवाल आहे. जगातील राष्ट्रे ज्या राष्ट्रीयत्वाच्या तत्वावर उभे आहेत, ती तत्वे व लक्षणे हिंदूजवळही आहेतच, हा सावरकरांचा मुख्य मुद्दा आहे. राष्ट्रीयत्वाची सर्व तत्वे आमच्याजवळही आहेतच हे सांगण्यासाठी सावरकर रक्त व जातीचा उल्लेख करतात, वंशश्रेष्ठत्वाच्या हेतूनी नव्हे, हे समजून घेतले पाहिजे.

सर्व हिंदू मधून आमच्या पूर्वजाचे एकच रक्त वाहत आहे असे आम्हास वाटते (feel) असे ते म्हणतात. 'आणि हे असे वाटते (feel) म्हणून हे असे असलेच पाहिजे' असेही ते म्हणतात. [६५] अिंग्रजी पुस्तकात feel हा शब्द दोन वेळेस जोर देवून लिहिलेला आहे. पुढे सावरकरांनी लगेच खुलासा केला आहे की, रक्तभेदाची भावना ही 'केवळ तात्पुरती, सोयीपुरती' स्वीकारलेली आहे. आपले पूर्वज एकच आहेत व आपण सारे रक्ताचे भाऊ भाऊच आहोत, एवढेच सावरकरांना यातून सांगायचे आहे, हे लक्षात घेतले पाहिजे.

वांशिक राष्ट्रवाद ?

खरं म्हणजे बंधुप्रेमासाठी रक्ताची आठवण काढणे हा अंतःकरणाचा धर्म असून यात वांशिक राष्ट्रवाद वगैरे काहीच नाही. एक वास्तव म्हणून बुद्धिवादी हा धर्म जाणू शकतो. यात विसंगत काहीच नाही. तथापी भा. कृ. केळकरांनी आपल्या ग्रंथात असे म्हटले आहे की, सावरकरांचा राष्ट्रवाद हा वांशिक आहे. डॉ. द. न. गोखले यांचेही असेच मत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. [६६] वांशिक राष्ट्रवादामध्ये वंशश्रेष्ठत्वाची भावना गृहीत असते. सावरकरांच्या राष्ट्रवादात

ही भावनाच नाही. पूर्वजाचे रक्त माझ्यात, माझ्या सर्व बांधवात खेळत आहे ही भावना व अभिमान वांशिक राष्ट्रवादाचा भाग नाही. त्यामुळे केळकरांचा अभिप्राय चुकीचा आहे.

नेहरूंनाही अभिमान

पूर्वजाच्या रक्ताबद्दलचा अभिमान जसा सावरकरांना वाटतो, अगदी तसाच बुद्धिवादी पं. नेहरुंनी 'भारताचा शोध' मध्ये व्यक्त केला आहे. 'What is my inheritance? To what am I an heir?' असा प्रश्न उपस्थित करुन नेहरु म्हणतात, 'But there is special heritage for people of India– not an exclusive one, for none is exclusive and all common to the race of man– one more especially applicable to us something that is in our flesh and blood and bones that has gone to make us what we are and what we are likely to be" [६७] सावरकरांनी या पेक्षा अधिक ते काय सांगितले आहे? नेहरु म्हणतात, [६८] "India was in my blood and there was much in her that instrictively thrilled me." सावरकर याच गोष्टीची सर्व हिंदूंना जाणीव करुन देतात. ज्याला पंडीत नेहरु भारतीय संस्कृती म्हणतात, त्याला सावरकर हिंदु संस्कृती म्हणतात. ते म्हणतात, "My reaction to India thus was often an emotional one, conditioned and limited in many ways. It took the form of nationalism" [६९] अशा प्रकारे भारतीय संस्कृतीच्या अभिमानातून राष्ट्रवादाचा जन्म झाल्याचे नेहरुही मानतात. राष्ट्रवाद म्हणजे काय हे सांगताना नेहरु पुढे म्हणतात, "It (Nationalism) is still me one of the most poweful urges that move a people and round it cluster sentiments and traditions and a sense of common living and common purpose" यालाच सावरकर हिंदुत्वाचा वारसा म्हणतात.

भारतीय वंशाबद्दल नेहरु म्हणतात, "We are old race or rather a old mixture of many races, and our racial memories go back to the dawn of history." [७०] सावरकर हिंदू हे एकजातीय आहेत, असे म्हणतात ते याच अर्थाने होय. पं नेहरुंचा हा अभिमान वांशिक आहे, असे आपण मानणार काय?

पं. नेहरु रक्त, वंश, परंपरा, संस्कृती व राष्ट्रवाद या गोष्टीबद्दल नव्हे, तर 'हिंदू' शब्दाबद्दलही सावरकरांसारखेच विचार मांडतात. व्हिन्सेंट स्मिथ या सुप्रसिद्ध अितिहासकाराने असे म्हटले आहे की, प्राचीन काळी हिंदुधर्माच्या विलीनीकरणाच्या विलक्षण सामर्थ्यामुळे एकादी परकीय लोकांचे पूर्णपणे हिंदूकरण

(Hindudised) झाले. स्मिथ यांचे हे मत उद्धृत करुन Hinduism आणि Hindudised या शब्दावर नेहरुंनी भाष्य केले आहे. पं. नेहरु म्हणतात, "I do not think it correct to use them in this way unless they are used in the widest sense of Indian culture. They are apt to mislead today when they are associated with a much narrower, and specifically religious concept. The word 'Hindu' does not occur at all in our ancient literature. The first reference to it in an Indian Book is, I am told, in a Trantrik work of the eighth century ac, where 'Hindu' means a people and not the followers of a particular religion... The word is clearly derieved from Sindhu, the old as well as the present Indian name of Indus. The use of word Hindu in connection with a particular religion is of very late occurance." मुळात हिंदू हा शब्द धार्मिक नसून संस्कृतीचा निदर्शक आहे, हे नेहरुंचे मत सावरकरांच्या मताशी जुळणारे आहे. नेहरु म्हणतात त्याच Widest sense मध्ये हिंदू शब्द सावरकर वापरु अिच्छितात. मुख्य फरक हा आहे की, अितिहास लिहिताना नेहरु या गोष्टी मांडतात, तर सावरकर या गोष्टीचा प्रत्यक्षात उपयोग करुन राष्ट्रवादाची भूमिका मांडतात. हिंदू शब्दाला सध्या धार्मिक रुप आलेले आहे म्हणून नेहरु हा शब्द वापरु अिच्छित नाहीत, तर या शब्दाला व्यापक राष्ट्रीय अर्थ देवून सावरकर तो आग्रहाने वापरु अिच्छितात. ज्या गोष्टी अैतिहासिकदृष्टचा नेहरु मान्य करतात, त्याच गोष्टीचा आधार घेवून सावरकर राष्ट्रीयत्वाची मुलतत्वे मांडतात, हे समजून घेतले पाहिजे.

धर्मनिरपेक्ष

सावरकरांची हिंदूची-हिंदुत्वाची व्याख्या स्वरुप व त्यामागील हेतू या विषयीचे हे विवेचन पाहिल्यावर दोन गोष्टी अगदी स्पष्ट होतात. पहिली म्हणजे सावरकर मुसलमानादी मंडळीना हिंदुत्वाबाहेर ठेवू इच्छितात. दुसरी म्हणजे, पण असे ठेवण्यासाठी ते कोणत्याच धर्मतत्वाचा, धर्ममताचा वा धर्मतत्वाचा आधार न घेता, त्यासाठी फक्त भूमीचा आधार घेतात. हिंदू-अहिंदूची विभागणी करताना सावरकरांचा बुद्धिवाद पणाला लागला आहे. त्यांच्या बुद्धिवादासमोर ते एक प्रकारे आव्हानच आहे. सावरकरांच्या या हिंदुविचारावर बुद्धिवादाच्या दृष्टीने आक्षेप घेण्यासारखा मुद्दा एवढाच आहे की, हिंदू-अहिंदूत सावरकर फरक का करतात ? सावरकर हिंदूच्या पक्षाचे आहेत, पण हिंदूच्या कोणत्याही धर्ममताच्या बाजूने नाहीत. या दृष्टीने ते पूर्णपणे धर्मनिरपेक्ष आहेत. ते अहिंदूच्या म्हणजे विशेषत्वाने मुसलमानांच्या विरुद्ध आहेत, पण त्यांच्या कोणत्याही धर्ममतांच्या

विरुद्ध नाहीत. या दृष्टीनेही ते पूर्णपणे धर्मनिरपेक्ष आहेत. हिंदूची धर्ममते नि अहिंदूची धर्ममते असा प्रश्न आला तरी ते कोणत्याही धर्ममताच्या बाजूने नाहीत. कोण कोणता धर्म पाळतो वा धर्मश्रद्धा बाळगतो, हा त्यांच्यामते गौण मुद्दा आहे. अशा धर्माकडे वा धर्ममताकडे ते 'धर्म म्हणून कधीही पाहत नाहीत. या धर्माकडे ते विज्ञाननिष्ठ दृष्टिकोणातून तरी पाहतात किंवा राष्ट्रीय दृष्टिकोणातून तरी पाहतात. सावरकर मुसलमानांचा धार्मिक भूमिकेतून विचार करत नाहीत. मुसलमानांचा विचार राष्ट्रीय दृष्टीकोणातून करतात. मुसलमानांबद्दलची त्यांची जी विरोधाची भूमिका आहे ती आता आपणाला समजून घ्यायची आहे. ती नीट समजून घेतल्याशिवाय त्यांच्या हिंदुत्वाचा पूर्ण उलगडा होणारच नाही.

× × × ×

–२–

मुसलमानांचा विरोध

सावरकर मुसलमानांचे विरोधक होते, ही गोष्ट खरीच आहे. अंदमानात जाण्यापूर्वी ते मुसलमानांवर देशभक्त म्हणून हिंदुप्रमाणेच प्रेम करणारे होते, पण अंदमानानंतर ते त्यांचे विरोधक बनले, असे समजले जाते. हा समज दोन दृष्टीने बरोबर आहे. अंदमानपूर्व सावरकरांच्या मुसलमानांसंबंधीच्या भाषेत नंतर फरक पडलेला आहे. या भाषेच्या बदलाच्या दृष्टीने हे म्हणणे बरोबर आहे. दुसऱ्याही एका दृष्टीने हे म्हणणे बरोबर आहे. पूर्वी हिंदु–मुसलमानाच्या ऐक्यावर त्यांचा विश्वास होता, नंतर हा विश्वास त्यांना राहिला नाही. हिंदु-मुसलमान दोघांचेही सुखदुःखे व राष्ट्रीय ध्येय एकच आहे व यासाठी ते दोघेही झटत आहेत, असे त्यांना पूर्वी वाटे. अंदमानात गेल्यावर त्यांच्या या वाटण्याला धक्का बसलेला आहे. मुसलमानांविषयी राष्ट्रीय दृष्टीने पूर्वी त्यांना असलेला विश्वास नंतर राहिलेला नव्हता, या दृष्टीनेही हा वरील समज बरोबरच आहे.

मात्र, हा समज तीन दृष्टीने चुकीचा आहे. पहिला, ते मुसलमानांचे विरोधक म्हणजे अस्लामधर्माचे विरोधक होते हा समज चुकीचा आहे. दुसरा, ते मुसलमान या व्यक्तीचे वा समाजाचे विरोधक नव्हते, तर त्या व्यक्तीच्या वा समाजाच्या राष्ट्रविरोधी प्रवृत्तीचे विरोधक होते. या दोन्हीही दृष्टीने पाहिले तर सावरकरांच्या भूमिकेत बदल झालेला दिसणार नाही. या दृष्टीने ते पूर्वीही विरोधक नव्हते, नंतरही विरोधक झाले नाहीत.

हिंदु–मुसलमानांचे परस्पराशी राष्ट्रीयदृष्टीने संबंध कोणते आहेत, असावेत; या देशात मुसलमानांचे हिंदूच्या संदर्भात स्थान कोणते आहे, असावे– या तिसऱ्या दृष्टीनेही विचार केल्यास सावरकरांच्या भूमिकेत कधीही फरक पडलेला नाही,

असे आमचे मत आहे. १९०८ चे हिंदु-मुस्लीम ऐक्याची बाजू घेणारे १८५७ च्या स्वातंत्र्यसमरातील सावरकर, या वरील तिन्हीही दृष्टीतून नंतर कधीही आपल्या आयुष्यात बदललेले नाहीत, ही गोष्ट काळजीपूर्वक समजून घेतले पाहिजे. या तीन पैकी पहिल्या दोन महत्वाच्या असल्यातरी विवाद्य नाहीत, म्हणून महत्वाचा व वादग्रस्त असलेला तिसरा दृष्टिकोण आपण समजून घेवू.

बालपणीच हिंदुत्वनिष्ठ

अंदमानात जाण्यापूर्वी सावरकर हिंदुत्वनिष्ठ होते का नव्हते, या मुद्द्यावर त्यांच्या अनुयायांचे नि विरोधकांचे विलक्षण एकमत असते. अनुयायांचे म्हणणे असे असते की, सावरकर भगूरला शाळेत होते तेव्हापासूनच हिंदुत्वनिष्ठ होते. त्यानंतर ते मरेपर्यंत हिंदुत्वनिष्ठच राहिले. अंदमानात गेल्यावर तेथील परिस्थितीमुळे ते हिंदुत्वादी झाले, हे सारे खोटे आहे, असे त्यांचे म्हणणे असते. यादृष्टीने ज. द. जोगळेकरांचा 'तरुण भारत'मधील 'वीर सावरकर हिंदुत्वादी केव्हा झाले?' हा लेख पाहण्यासारखा आहे. [१] अंदमानच्या परिणामाने सावरकर हिंदुत्वनिष्ठ झाले, ही 'उथळ मीमांसा' आहे, असे त्यांना वाटते. 'आपण हिंदू असल्याचा अभिमान सावरकरांमध्ये अगदी बालपणापासून आढळतो,' असे सांगून 'त्यासाठीचे लेखी पुरावे, अंदमानला त्यांची रवानगी होण्यापूर्वी, सावरकरांनी जी साहित्य निर्मिती केली त्यात मिळतात.' असे त्यांनी अशा अनेक पुराव्यानिशी दाखवून दिले आहे.

त्यांच्या आत्मवृत्तातील बालपणीचे उल्लेख, बालवयात लिहिलेले निबंध व कविता, लंडनची बातमीपत्रे, इत्यादीतील 'हिंदू'चा अभिमान असल्याबद्दलचे अनेक उल्लेख त्यांनी पुरावा म्हणून दिलेले आहेत. प्रा. सुधाकर देशपांडे यांनीही अशीच भूमिका आपल्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या ग्रंथात मांडली आहे. [१५] बाळाराव सावरकरांचे म्हणणेही असेच आहे. अंदमानात जाण्यापूर्वी सावरकर हिंदुराष्ट्रवादी नव्हते, या आरोपाला उत्तर देताना बाळाराव म्हणतात, [२] "सावरकरांनी अंदमानात जाण्यापूर्वी लिहिलेले बाजीप्रभू, तानाजी यांचे पोवाडे, शिवाजी महाराजाची आरती, वंदेमातरम् हा लेख, तसेच लंडनमध्ये असताना त्यांनी केलेले शिवाजी महाराज आणि गुरुगोविंदसिंह यांचे उत्सव, १८५७ मध्ये स्वधर्म आणि स्वराज्य हे प्रकरण, मॅझिनीमधील धर्म आणि सत्ता यांचा मेळ, तसेच प्रियकर हिंदुस्थान या कवितेत 'पितृभूमि तू पुण्यभूमि तू' हा केलेला उल्लेख वाचावा, म्हणजे त्यांना आणि दुसऱ्या वाचकांनाही सावरकर अंदमानात जाण्यापूर्वी हिंदुत्वनिष्ठ होते की, नाही, हे उमजेल." सावरकरांनी वरील सर्व साहित्यात व्यक्त केलेल्या हिंदुत्वाचा, हिंदु- अभिमानाचा त्या संदर्भातील अर्थ कोणता आहे, हे प्रत्येक स्थळ घेवून येथे दाखवून देणे शक्य नाही. मात्र या साहित्यातील हिंदू, हिंदुत्व व हिंदुराष्ट्र यांचा अर्थ व आशय नंतर बदललेला आहे. नुसते समान शब्दाचे पुरावे अशा प्रसंगी पुरेसे नसतात, ही गोष्ट आम्ही येथे नम्रपणे निदर्शनास

आणून देवू अिच्छितो.

अर्थ-आशय बदलला

मुसलमानांना वगळून, एवढेच नव्हे तर त्यांच्या विरोधात जावूनही, हिंदुपुरताच विचार अंदमानपूर्वीचे सावरकर करत नाहीत, ही महत्वाची गोष्ट आपण विसरुन जातो आहोत. या काळातील बालपणीचे धार्मिक संस्कार असलेल्या विनायकाला हिंदुलोकांचा, हिंदुजातीचा, हिंदुधर्माचा अभिमान वाटतो. या अभिमानाला मुसलमानांचा संदर्भ नाही; मुसलमानांच्या अितिहासाचा नाही, त्यांच्या प्रवृत्तीचाही नाही, त्यांच्या राजकारणाचाही नाही ! आपण ज्या हिंदुत्वनिष्ठ सावरकरांचा विचार करतो आहोत, तो मुसलमानांच्या विरोधात असणाऱ्या व म्हणून हिंदुत्वनिष्ठ असणाऱ्या सावरकरांचा होय. ज्या अर्थाने न्या. रानडे हिंदुत्वनिष्ठ आहेत, डॉ. राधाकृष्णन हिंदुत्वनिष्ठ आहेत– त्या अर्थाने सावरकरांच्या हिंदुत्वनिष्ठेकडे लोक पाहत नाहीत. मुसलमानांचा राजकीय संदर्भ सोडून सावरकरांच्या हिंदुत्वनिष्ठेचा विचार अनुयायीही करु शकत नाहीत, लोकही करु शकत नाहीत. तेव्हा हा मुख्य संदर्भ सोडून देवून, 'हिंदू' शब्दाचे पुराने दिल्याने मूळ मुद्दा सिद्ध होत नाही.

अनुयायी असे का म्हणतात याची दोन कारणे आहेत. पहिले कारण, सावरकरांचे हिंदुत्व हे प्रतिक्रियावादी नाही, असे त्यांना सांगायचे असते. मुसलमानांच्या प्रतिक्रियेतून हे हिंदुत्व जन्म पावले, ही गोष्ट 'हिंदुत्वा'च्या तत्वज्ञानाला कमीपणा आणणारी आहे, असे त्यांना वाटते. मुसलमानांचा संदर्भ सोडून हिंदुत्वावर ते पाच मिनिटेही बोलू शकत नाहीत वा पाच वाक्येही लिहू शकत नाहीत, पण स्पष्टपणे ते ही गोष्ट कबूल करत नाहीत. दुसरे कारण, सावरकर हे सर्वज्ञानी होते, अवतार होते, भगवान होते– तेव्हा लहानपणीच त्यांना साऱ्या गोष्टीचे ज्ञान झालेले होते, यावर अनुयायांचा असलेला विश्वास हे होय. " 'बाळपणीच सर्वज्ञता तयासी बरी' हे वैशिष्टय सावरकरांच्या चरित्रात प्रकर्षाने आढळते," असे रा. स. भट म्हणतात,[3] त्याचे कारण हेच आहे.

विलक्षण एकमत

अनुयायांची ही गोष्ट डॉ. य. दि. फडके यांना एकदम कबूल असते. लहानपणी सावरकरांना जेवढे कळत होते, त्यापेक्षा मरेपर्यंत त्यांना अधिक काहीही कळाले नाही, असा निष्कर्ष त्यांनी 'सावरकरांची विचारसृष्टी' या लेखात काढला आहे. त्या लेखाचे शेवटचे निष्कर्षविधान असे आहे[4] : " वैचारिकदृष्टचा त्यांनी आपल्या मनाला फार लहात वयात ज्या बेड्या घातल्या, त्या मात्र त्यांना कधीच तोडता आल्या नाहीत. " श्री जागळेकर व श्री बाळाराव यांचे मत हिंदुत्वापुरते मर्यादित दिसते, पण डॉ. फडके यांचे मत श्री रा. स. भटा प्रमाणे

विचाराच्या प्रत्येक क्षेत्राला लागू होण्याअितके व्यापक आहे. सावरकरांची वैचारिक वाढ अशी झालीच होती का नाही, हा त्यांच्या समोरचा मुलभूत प्रश्न आहे. कोणत्याही विचारवंताच्या बाबतीत "आयुष्याच्या वाटचालीत सभोवतालच्या माणसांचे व घटनांचे त्याच्या मनावर कमी अधिक परिणाम होतात. त्याची सुरवातीची मते बदलतात. त्याचा दृष्टिकोण वाचन, चिंतन व अनुभव यामुळे बदलतो,"[५] असे डॉ. फडके याचे सर्वसामान्य निरीक्षण आहे. मात्र या सामान्य नियमाला सावरकराला ते अपवाद करतात. त्यांचे म्हणणे असे[५] "शस्त्रबळाचा विश्वास, राष्ट्रवाद, मुसलमानांविषयी मते, हिंदुत्वाच्या कल्पना, विज्ञाननिष्ठा, बुद्धिनिष्ठा, सामाजिक सुधारणांचा पुरस्कार ही सारी वैशिष्ट्ये सावरकरांच्या आचार–विचारात अगदी शाळेत असल्यापासूनच्या दिवसात दिसत होती." जन्मापासून मरेपर्यंत ज्याच्यावर परिस्थितीचा अजिबात परिणामच होत नाही, असा हा माणूस देवाने जन्माला तरी कसा घातला असावा, असा प्रश्न डॉ. फडके यांना पडलेला दिसतो.

सावरकरांच्या साऱ्या लेखनात जी सुसंगती आढळते, त्याचे कारण सावरकर हे जन्मभर बालबुद्धीचे होते, असे डॉ. फडके यांना वाटते. ते म्हणतात,[६] "विलायतेत गेल्यानंतरच्या काळापासून ते अखेरच्या क्षणापर्यंत सावरकरांनी त्यांना बालपणात गवसलेल्या श्रद्धास्थानांचा आणि मूल्यांचाच बचाव केला. यापैकी कोणत्याही श्रद्धास्थानाविषयीचा अगर मूल्यावरचा त्यांचा विश्वास उडाला नाही. म्हणूनच सावरकरांच्या लेखनात कमालीची सुसंगती दिसते." सावरकरांच्या मृत्यूनंतर दोनच महिन्यानी हा लेख लिहिला असल्यामुळे, श्रद्धांजलीच्या दृष्टीने वाचक तिकडे पाहतील म्हणून, सावरकरांना होअील तितके अनुकूल लिहिण्याचा डॉ. फडके यांनी प्रयत्न केलेला आहे, हे लक्षात घेतले पाहिजे.

हा घ्या पुरावा

मुसलमानांबद्दलची त्यांची बालवयातील मते अंतिम मृत्युशय्येवर पडले होते तेव्हा पर्यंतही सारखीच होती, याचा एक पुरावा संशोधक फडके यांनी दिला आहे. १८९४–९५ ला मुंबई–पुण्यास हिंदु–मुसलमानात दंगा झाला. या दंग्याचा ११ वर्षाच्या विनायकावर काय परिणाम झाला, हे सावरकरांनीच आत्मचरित्रात लिहिले आहे:[७] "मुसलमानांनी दंगे आरंभून हिंदूचा पाडाव केला की, आम्ही संतप्त व्हावे. हिंदू चूप का राहतात ! इतक्यात हिंदूनी प्रतिकार करुन मुसलमानांस चेपवल्याचे वृत्त आले की आमच्या मंडळीचा हर्ष गगनात मावू नये." ही गोष्ट डॉ. फडके आपल्या लेखात बालपणीचा पुरावा म्हणून देतात. हाच मुस्लीमद्वेष व दंगलप्रेम मरेपर्यन्त कसे जिवंत होते हे लगेच ते वाचकांच्या निदर्शनास आणून देताना म्हणतात,[५] "अलिकडे झालेल्या भारत–पाक संघर्षाच्या वेळी भारतीय सेनेच्या लाहोर विभागातील विजयी घोडदौडीची वार्ता ऐकून मृत्युशय्येवर पडलेल्या वीर सावरकरांना अतिशय आनंद झाला होता." वाचक मित्रहो, याला म्हणतात संशोधन ! ११ व्या वर्षीची हिंदु–मुस्लीम दंगलीविषयी प्रतिक्रिया आणि

८३ व्या वर्षीची पाकिस्तानला भारताने युद्धात हरविल्याची प्रतिक्रिया म्हणजे जन्मापासून– मरेपर्यंत मुस्लीमद्वेष आणि शस्त्रबळ हे एकच मूल्य व श्रद्धा जपल्याचा पुरावा आहेत!!

अिस्लामची पुण्यभू भारतच

ते अनुयायी आणि हे विरोधक यांच्या भाषेत व हेतूत कितीही फरक असला तरी, दोघांचाही निष्कर्ष एकच आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. बालवयापासून सावरकर हिंदुत्वनिष्ठ होते, हा दुराग्रह सावरकरांवर अन्याय करणारा आहे, हे अनुयायांच्या लक्षातच येत नाही, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. 'प्रिबकर हिंदुस्थान' मधील 'पुण्यभूमी' चा उल्लेख करताना अहिंदूची पुण्यभूमी भारताबाहेर आहे, हा विचार सावरकरांसमोर नाही. 'त्वत-त्रिदश-कोटि संतानाची' भारत पुण्यभूमी आहे, असे त्यांना वाटते. यातून अहिंदूंना सावरकरांनी वगळलेले नाही. सर्व भारतीयांची पुण्यभूमी भारत आहे, हा विचार त्यांच्यासमोर आहे. अहिंदूचा वेगळा विचार त्यांनी त्यावेळेस केलेलाच नव्हता. 'वंदे मातरम्' या निबंधाबाबतीतही हेच खरे आहे. या लेखात 'भारतीय' 'हिंदी बांधव' असे शब्द आहेत. यात अहिंदूचा समावेश आहे. 'वंदेमातरम्'मधील सावरकरांची भूमिका जर स्वीकारावयाची, तर मुसलमानांची– ख्रिश्चनांची पुण्यभू भारतभूच होते, हे लक्षात घेतले पाहिजे. 'जगताची सर्व धर्म-परंपरा येथून उद्भूत झालेली आहे' हा सावरकरांचा भारतभूबद्दलचा अभिमान आहे. त्यांचे म्हणणे असे : "हिंदुधर्मापासून महात्मा बुद्धाने बुद्ध-धर्म प्रतिपादन केला. त्या बुद्ध-धर्माची एक प्रत उतरुन घेवून जीजसने ख्रिस्तीधर्म तयार केला. त्यात तलवारीचे पाणी ओतून महंमदी धर्म झाला, व त्या महंमदी धर्माचा ओघ नानकांने पुनः मूळ आर्य-धर्माशी आणून भिडविला. धर्म हा जर तुमचा प्राण असेल व जर तुम्ही धर्मच्युत झालेले नसाल, तर हे जगतावरील सर्व समाजांनो, तुम्हाला तुमचा तो प्राण दिल्याबद्दल ह्या आमच्या आर्यभूला वंदन करा!" यातील एकही मत 'हिंदुत्व' ग्रंथात शिल्लक राहिलेले नाही. महमंदी धर्म हा आमचाच आहे; तो हिंदुधर्माचाच भाग आहे; शीखधर्माला आणि हिंदुधर्माला जोडणारा तो एका दुवा आहे, त्याची–ख्रिश्चनधर्माची पुण्यभू भारतच आहे, हा विचार हिंदुत्व ग्रंथातील सावरकरांना मान्य आहे? सावरकर अनुयायांना मान्य आहे काय? वंदेमातरम् मधील ही भूमिका मान्य केली की, सावरकरांची हिंदूची व्याख्याच साफ कोसळून पडते. शब्द तेच असले तरी नंतर आशय कसा बदलत गेला, ही गोष्ट अनुयायी विचारात घ्यायलाच तयार नाहीत, हे समजून घेतले पाहिजे.

दोन बोलक्या घटना

अंदमाननंतर मुसलमानांच्या सहकार्यावरील सावरकरांचा विश्वास उडालेला

होता, व त्या दृष्टीने त्यांची हिंदुत्वाची भूमिका बदललेली आहे. ही बदललेली भूमिका त्यांनी नंतर अगदी सुस्पष्ट भाषेत मांडलेली आहे. पूर्वीच्या साहित्यातील काही उल्लेख सुद्धा त्यांनी नंतरच्या काळात गाळून टाकल्याचे पुरावे आहेत. अंदमानात त्यांनी 'कमला' काव्य रचले. या 'कमले'च्या पोटी कोण कोण जन्माला येईल याची कल्पना या कवितेत सावरकर करतात. अनेक देशवीरांची, धर्मवीरांची नावे त्यांना आठवतात. तिच्या पोटी 'अर्धचंद्र उभारी जो स्फूर्त आरबनी तसा' महंमद पैगंबरही जन्माला येवू शकेल, असे सावरकरांना वाटते. हा उल्लेख 'कमले'च्या १९२४ च्या पहिल्या आवृत्तीत होता, मात्र पुढच्या आवृत्तीत तो सावरकरांनी गाळलेला आहे.[९] ही आवृत्ती १९३४ मध्ये निघाली हे लक्षात घेतल्यावर त्यांच्या दृष्टिकोणात कसा बदल झाला होता, हे समजून येते.

अशीच एक घटना १८५७ च्या स्वातंत्र्यसमरातील आहे. अगोदर प्रसिद्ध झालेल्या या ग्रंथाच्या अिंग्रजी आवृत्तीत असलेला एक महत्वाचा उल्लेख नंतरच्या समग्र सावरकर वाङमयाच्या आठव्या खंडातील मराठी आवृत्तीत गाळलेला आहे. पोवेनचा हिंदू राजा जगन्नाथसिंग यानी विश्वासघाताने मौलानी अहमदशहाला ठार मारले व या मोबदल्यास पन्नास हजाराचे ठेवलेले बक्षीस मिळविले, ही गोष्ट सावरकरांनी या ग्रंथात सांगितली आहे. या हिंदू राजाची कठोर निर्भत्सना व व अहमदशहाचा मुक्त गौरव सावरकरांनी केला आहे. शेवटी निष्कर्ष काढताना सावरकर म्हणतात, "इस्लामच्या सिद्धान्तावरची डोळस निष्ठा ही हिंदभूमीवद्दलच्या गाढ आणि शक्तिशाली प्रेमाशी विसंगत किंवा विरोधी असत नाही, हे या शूर मुसलमानांच्या आयुष्यावरुन दिसते. सच्चा मुसलमान आपल्या मातृभूमीविषयीच्या अभिमानाने तिच्यासाठी प्राण देणे हाच आपला विशेष अधिकार समजेल."[१०] हा अवतरणातील उल्लेख मराठी आवृत्तीत गाळलेला आहे. आठव्या खंडातील मराठी आवृत्ती १९६५ ला प्रसिद्ध झाली, यावरून सावरकरांच्या सांगण्यावरुन ही गोष्ट घडली असणार. या पोवेनच्या राजाची सावरकरांनी चांडाळ, देशद्रोही म्हणून केलेली निर्भत्सना व मौलानाचा देशवीर, रणवीर म्हणून केलेला कौतुकाचा भाग मात्र आजही शिल्लक आहे. सावरकरांच्या भूमिकेत झालेल्या बदलाचा हा स्पष्ट पुरावा आहे.

याचा स्पष्ट अर्थ असा आहे की, संपूर्ण अभ्यास केल्यानंतर मुसलमानांविषयीची त्यांची मते नंतर बदललेली आहेत. धार्मिक श्रद्धा कोणतीही असली तरी मुसलमान हे सुद्धा या देशावर हिंदूअितकेच प्रेम करु शकतात, देशासाठी प्राणत्यागही करु शकतात, यावर त्याचा पूर्वी विश्वास होता. हा विश्वास वरील वगळलेल्या अवतरणातून स्पष्टपणे दिसून येतो. बालवयात गवसलेल्या श्रद्धा मरपर्यंत जपण्याच्या सिद्धांताच्या विरोधी असा हा पुरावा आहे. प्रत्यक्ष व अनुभव याच्या आधारावर सावरकर आपली श्रद्धा, भूमिका व धोरण बदलत, याचाच हा पुरावा आहे.

१९०८ चे सावरकर

डॉ. फडके यांचा हा निष्कर्ष कसा विपर्यस्त, निराधार व चुकीचा आहे, हे साधार पुराव्यानिशी पटवून सांगणाऱ्या एका विद्वान संशोधकाचे मत आम्ही येथे नोंदवू अिच्छितो. हे नवे विद्वान संशोधक म्हणजे स्वत: डॉ. फडके हेच होत ! या लेखनानंतर १८ वर्षांनी आपले हे मत 'शोध सावरकरांचा' या ग्रंथात त्यांनी साधार खोडून काढले आहे. "हिंदु–मुस्लीम अैक्याची शक्यता मान्य करुन राष्ट्रवादी विचारसरणीचा पुरस्कार करणारे १९०७–१९०८ सालचे सावरकर व त्यांचे बंधू बाबाराव अंदमानातून परतल्यावर कडवे हिंदुराष्ट्रवादी बनल्याचे दिसले. त्यांच्या दृष्टिकोणात पडलेला हा फरक अिष्ट की अनिष्ट याबद्दल मतभेद होऊ शकतात, पण असा जाणवण्यासारखा बदल झाला, ही वस्तुस्थिती नाकारणें बरोबर ठरणार नाही." असे सांगून आपण १८ वर्षांपूर्वी कसे चुकीचे मत मांडत होतो, हे त्यांनी दाखवून दिले आहे. [११] १८वर्षांनंतर का होअीना व तेही एकाच मुद्दयाबद्दल का होअीना, पण डॉ. फडकेसारख्या विद्वानानी आपल्या पूर्वायुष्यात गवसलेल्या मतात दुरुस्ती करावी, ही स्वागतार्ह बाब आहे.

"हिंदु–मुस्लीम अैक्याची शक्यता त्यांनी त्या काळात निकोप व मोकळ्या मनाने स्वीकारली होती," [१२] असे डॉ. फडके या ग्रंथात मान्य करतात. १९०८ चे सावरकर आम्हाला हवेत, १९३७ चे नकोत, असे त्यावेळेस म्हटले जाई. १९०८ चे हिंदु–मुस्लीम अैक्याचा पुरस्कार करणारे सावरकर हवेत, १९३७ चे हिंदुत्ववादी सावरकर नकोत, असा याचा अर्थ होता. आता आपल्यासमोरचा प्रश्न असा आहे की, १९०८ च्या आणि १९३७ च्या सावरकरात हिंदु–मुस्लीम प्रश्नासंबंधात नेमक फरक कोणता आहे व तो का पडला आहे, ? हिंदु–मुसलमानांचे परस्पराशी राष्ट्रीय दृष्टीने संबंध कोणते व या देशात मुसलमानांचे स्थान काय, या भुमिकेतून या प्रश्नाचा आता आपण विचार करु. प्रथमत: १९०८ च्या सावरकरांची भूमिका समजून घेवू.

१९०८ च्या सावरकरांची ही भूमिका १८५७ च्या स्वातंत्र्य समरात प्रामुख्याने पाहायला मिळते. याच ग्रंथातील भूमिका त्याच काळात अितरत्र व्यक्त झालेली आहे. १९०८ च्या सावरकरांचे स्वागत करणारेही याच ग्रंथातील त्यांच्या हिंदु–मुस्लीम भूमिकेकडे पाहतात. तेव्हा आपणही याच ग्रंथावरुन ती समजून घेवू.

स्वातंत्र्य समरातील सावरकर

स्वातंत्र्यसमराच्या भाग तीन मधील पहिल्या प्रकरणात ही भूमिका पुरेशी स्पष्ट झालेली आहे. ११ मे १८५७ ला दिल्लीचे स्वातंत्र्य क्रांतिकारकांनी घोषित केले. दिल्लीच्या त्या सिंहासनावर बहादुरशहाला बसविण्यात आले. निजामाला स्वतंत्र भारताचे सम्राटपद द्यावे, असे गांधीजीनी १३ ऑक्टोबर १९४० ला 'हरिजन' मध्ये सुचविताच संतापून उठणारे सावरकर, बहादुरशहाला हिंदु–मुस्लीम समाईक

राज्याचा सम्राट नेमण्याबद्दल काय म्हणतात, हे पाहणे अभ्यासणीय आहे. ज्या मोगलाच्या विरुद्ध शिवाजी लढला व हिंदुपदपादशाहीचे स्वप्ने पाहू लागला, त्या मोगलराज्याचा वारसदार राजा आता नव्याने आमचा सम्राट होणार याबद्दल सावरकरांना काय वाटत असावे ? याबद्दल सावरकर म्हणतात, [१३] "हिंदुस्थानच्या बादशाहीपदावर म्हाताऱ्या बहादुरशहास बसविणे म्हणजे संकुचित अर्थाने जरी परंपरागत तख्तावर त्याला स्थापन करणे असे भासत असले तरी, विशाल अर्थाने व सत्यार्थाने तशा प्रकारचे ते आरोहण नव्हते !" याचा अर्थ राज्य समाईक आणि राजा मुसलमानांचा असा प्रश्न त्याच्यासमोर त्यावेळेसही उभा टाकला होता. या प्रश्नाकडे 'विशाल' आणि 'सत्यार्थाने' ते पाहत आहेत. हा विशाल अर्थ व सत्यार्थ म्हणजे काय ?

ते म्हणतात, [१३] "जुनी मोगली राजसत्ता काही या देशातील लोकांनी आपण होवून निवडली नव्हती; तर हिंदुस्थानावर जेतेपणाच्या भावनेने व आक्रमक वृत्तीने नि स्वाभिमानशून्य देशद्रोही कारवायांमुळे ती मोगली सत्ता बळाने लादली होती. बहादुरशहाला आज काही अशा बळाने बादशाही पदावर आरुढ केले नव्हते." आक्रमण, अत्याचार, बळ व अन्यायाच्या मार्गाने नव्हे, तर सर्वांच्या इच्छेने, विचारविनिमयाने बहादुरशहा राजा झाला, हाच तो तो 'विशाल अर्थ' व'सत्यार्थ' होय! म्हणजे जुना मोगल बादशहा नि हा नवा बादशाहा यात फरक हा की, पहिला आक्रमणाच्या मार्गाने राजा झाला; दुसरा, आम्ही निवडून दिला म्हणून झाला ! मुख्य प्रश्न राजा कुणाचा हा नाही; तो राजा कोणत्या मार्गाने झाला, हा आहे ! !

ऐक्याची द्वाही

सावरकर पुढे म्हणतात, [१४] "म्हणून अगदी खऱ्या अर्थाने बोलावयाचे झाले तर आम्ही असे म्हणतो की, हिंदुस्थानच्या तख्तावर सिंहासनावर बहादुरशहाला जे बसविले गेले ती जुन्या मोगली सत्तेची पुनःस्थापना नव्हती; परंतु दीर्घकालपर्यंत या देशात जे हिंदु-मुसलमान यांच्यामध्ये एक प्रकारे युद्ध चालू होते, ते युद्ध संपल्याच्या घोषणेचे प्रतीक, जुलूम-अत्याचार संपुष्टात आल्याची निशाणी, या देशाच्या मातीतच जन्मलेल्या देशबांधवाना आपला राजा कोण असावा हे निवडण्याचे स्वातंत्र्य या सर्वांचे प्रतीक म्हणून ते राज्यरोहण होते... म्हणून आता हिंदु-मुसलमान जनतेने खऱ्या जाणिवेने मनःपूर्वक आणि निष्ठापूर्वक ता. ११ मे १८५७ या दिवशी आपल्या मातृभूमीच्या बादशाही पदावर बसविलेल्या बहादुरशहाला सर्वानी मानवंदना देण्यास पुढे यावे, अशी द्वाही फिरविण्यात आली." ही द्वाही कशाची होती, हे नीट समजून घेतले पाहिजे. ही द्वाही हिंदु-मुस्लीम प्रदीर्घ युद्ध संपल्याची होती; मुसलमानांनी हिंदूवर आतापर्यंत केलेला जुलुम-अत्याचार संपल्याची होती; मुसलमान या समानतेच्या नात्याने हिंदूबरोबर राहणार

असतील तर मागचे सारे विसरुन जायला हिंदू तयार आहेत, याचीही ती द्वाही होती. १९०८ च्या सावरकरांना एवढेच पाहिजे होते.

हिंदूबरोबर मुसलमानही १८५७ च्या क्रांतियुद्धात खांद्याला खांदा लावून समान शत्रूबरोबर लढत होते, हा सावरकरांच्या अभिमानाचा विषय होता. हा अभिमान आणि त्या हिंदु-मुस्लीम ऐक्याचे कौतुक, ५७ च्या ग्रंथातील पानापानावर दिसून येते. ते दुसरे एके ठिकाणी लिहितात,[१६]... "हिंदु असोत वा मुसलमान असोत ते हातात हात घालून एका देशभूमीच्या दास्यमोचनासाठी तलवार उपसून उठले. खाजगी वैर, धर्मभेद, जातिभेद, मानापमान सर्व स्वदेशाच्या प्रीतीत लीन झाले! ज्याला त्याला आपण कोणत्या तरी एका पवित्र ध्येयासाठी न्याय्य युद्धात उडी घेत आहोत असे अवसान चढू लागले. दहा दिवसाचे आत अयोध्येच्या प्रांतभर वजीर अल्लीशाह याची कारकीर्द लोकशक्तीनी आपण घेवून प्रस्थापित केली." या क्रांतियुद्धात जिकडे-तिकडे मुस्लीम नेतेच वजीर होत आहेत, बादशहा होत आहेत; या सर्वांना सावरकर मानवंदना देत आहेत- असेच चित्र दिसून येते. हिंदूच्या खांद्याला खांदा लावून मुसलमानही लढत आहेत, याबद्दल सावरकरांना होत असलेल्या आनंदाला पारावर राहिलेला दिसत नाही. हिंदु-मुस्लीम वैर आता संपले आहे, असे वाटून ५७ च्या घटनेने त्यांना आनंदाचे भरते आलेले आहे. मागचे सारे विसरुन हिंदु-मुसलमानांनी एकजुटीने स्वातंत्र्यासाठी लढण्याची प्रेरणा ५७ च्या घटनेपासून घ्यावी, अशी सावरकरांची अिच्छा आहे या ग्रंथाच्या पहिल्या फ्रेंच आवृत्तीच्या प्रस्तावनेत फ्रेंच क्रांतिकारक व पत्रकार ईपिटीॲं यांनी म्हटले होते, "हिंदू आणि मुस्लीम यांना या ग्रंथाने ऐक्याचा पाया घालून दिला आहे. गझनीच्या महंमदाने केलेल्या स्वारीनंतरच्या प्रदीर्घ काळात, या काळी प्रथमच हिंदू नि मुसलमान एकत्र आले होते. आणि आपल्या उभय सामान्य शत्रूविरूद्ध एकजुटीने लढले होते."[१७] हिंदु-मुस्लीम ऐक्याचा वस्तुपाठ या ग्रंथाने घालून दिलेला आहे, असेच म्हटले पाहिजे. या अनुवाद ग्रंथावर 'एक भारतीय राष्ट्रवादी' असे लेखकाचे नाव छापलेले होते.

महायुद्धाची आठवण

हिंदु-मुस्लीम ऐक्याची या ग्रंथात अन्युस्यूत असणारी सूत्रे कोणती, हे आपण समजून घेवू. हिंदु-मुसलमानांचा दीर्घ काळ संघर्ष चालत आलेला आहे, ही गोष्ट ५७ च्या ग्रंथातही ते विसरत नसतात. अितिहासातील पूर्वजाच्या युद्धाच्या आठवणी काढल्या म्हणजे वर्तमानकाळातील संबंध बिघडतात यावर त्यांचा त्यावेळसही विश्वास नव्हता. 'हिंदुपदपादशाही' या ग्रंथात शोभाव्या अशा इतिहासातील हिंदु-मुस्लीम महायुद्धाच्या आठवणी याही ग्रंथात सावरकर काढतात. पृष्ठ २३३ ते २३४ वर त्यांनी हिंदुपदपादशाहीचे सारच सांगितले आहे. ते म्हणतात,[१८] "अरबस्थानातील रानटी टोळ्यानी अिस्लामचा स्वीकार करताच त्या आक्रमक

वृत्तीने पूर्वेस व पश्चिमेस आक्रमणें करुन प्रदेश पादक्रांत करीत सुटल्या. त्यांना प्रतिकार असा कोठेच झाला नाही. त्यामुळे देशामागून देश, मानव जातीमागून अनेक मानव जाति जबरदस्तीने मुसलमान करीत अिस्लामी सत्ता दौडत चालली. या अविरोध वावटळीला पहिल्या प्रथमच कोणतीही तडजोड न करता महान पराक्रमाने व निर्भय निश्चयाने कोणी विरोध केला असेल, तर तो भारतानेच होय! " 'भारताने' अैवजी 'हिंदूने' असा बदल करुन हेच विचार 'हिंदुपदपादशाही' मध्ये त्यांनी विस्ताराने मांडलेले दिसून येतील. 'सहा सोनेरी पाना'मध्ये हिंदु–मुस्लीम संघर्षाला सावरकर महायुद्ध म्हणतात. हिंदू हे महायुद्ध कसे लढले हे जसे त्या ग्रंथात ते सांगतात, तसेच ५७ च्या ग्रंथातही निःसंकोचपणे सांगतात.

हिंदू धनी झाले

ते लिहितात,[१९] "हा लढा पाच शतकाहून अधिक वर्ष चाललेला होता. या परकीय आक्रमणांशी स्वतःच्या जन्मसिद्ध अधिकारासाठी हिंदूनी पाच शतकाहून अधिक वर्ष सरंक्षणात्मक युद्ध चालू ठेवलेले होते." पृथ्वीराजाच्या मृत्युपासून औरंगजेबाच्या मृत्युपर्यंत हिंदूनी कशी देदिप्यमान झुंज दिली याची ते आठवण काढून देतात. हिंदुजातीच्या मानरक्षणासाठी हजारो हिंदूनी प्राणत्याग केल्याबद्दल त्यांना अभिमान वाटतो. या महायुद्धात शेवटी हिंदूच कसे विजयी झाले, हे सांगताना ते म्हणतात, "पुण्याहून एक हिंदुवीर भाऊसाहेब समर्थ सैन्यासह आक्रमण करीत बाहेर पडून त्यांनी दिल्लीचे तख्त-सिंहासन-बळकावले आणि हिंदुसंस्कृतीला लागलेला पारतंत्र्याचा कलंक धुवून काढला. जेताच जिंकला गेला आणि हिंदुस्थान गुलामगिरी झुगारुन देवून व पराजय पूसून टाकून पुन्हा स्वतंत्र झाला. हिंदूच्या भूमीचे हिंदुच पुन्हा मालक झाले-धनी झाले!" हा उतारा ५७ च्या ग्रंथातला आहे; हिंदुपदपादशाहीतला नव्हे! मुसलमान बहादुरशहा हा नवा बादशहा का झाला; तो राजा हिंदूनी आपला म्हणून कसा स्वीकारला, याचा खुलासा करण्यासाठी सावरकर हे सारे सांगत आहेत! जुनी मोगलशाही संपून गेली, हे जाहीर करण्यासाठी हे सांगत आहेत! हिंदु-मुस्लीम अैक्याची द्वाही फिरविण्यासाठी हे सांगत आहेत! हिंदुसंस्कृती स्वतंत्र झाली, हिंदू या भूमीचे धनी झाले, याचा खरा अर्थ जाहीर करण्यासाठी हे सांगत आहेत!

हिंदु-मुस्लीम अैक्याची सूत्रे

हिंदु-मुस्लीम अैक्याचा वस्तुपाठ देणाऱ्या व ते अैक्य 'निकोप व मोकळ्या मनाने' स्वीकारणाऱ्या १९०८ च्या सावरकरांची ही सारभूत भूमिका आपण नीट समजून घेतली पाहिजे. या भूमिकेवरुन हिंदु-मुस्लीम अैक्यासंबंधीची त्यांची काही सूत्रे पुढीलप्रमाणे मांडता येतील. हिंदूच या हिंदभूचे मालक आहेत, धनी आहेत, हे पहिले सूत्र होय. याचा अर्थ हिंदू मालक आणि अहिंदू गुलाम असा नाही. अैति-

हासिक दृष्टीने याचा अर्थ, हिंदू या देशाचे मूळ पुरुष आहेत, असा आहे. या मूळ पुरुषाचा अर्थ, मुसलमान या देशात येण्यापूर्वी ते या भूमीचे मालक होते, असा आहे. ऐतिहासिक दृष्टीने यात कुणाला वाद असण्याचे कारण नाही. राजकीय दृष्टीने याचा अर्थ, हिंदू हे आता कुणाचे गुलाम नाहीत, असा आहे; दुसऱ्याच्या राजकीय गुलामगिरीतून ते मुक्त झाले असा आहे. सांस्कृतिक दृष्टीनें याचा अर्थ, हिंदूची संस्कृती अन्याय, अत्याचार, जुलूम, बलत्कार यातून मुक्त झाली, स्वतंत्र झाली असा आहे. हिंदुसंस्कृती स्वतंत्र होणे यांचा अर्थ, अन्याय, अत्याचार यातून मुक्त होऊन स्वत:चा विकास करण्याचे तिला स्वातंत्र्य असणे असा आहे. तेव्हा हिंदू मालक झाले याचा अर्थ, ते, त्यांचा धर्म, त्यांची संस्कृती स्वतंत्र झाली असा आहे; एवढाच आहे !

हिंदू या अर्थाने स्वतंत्र झाले किंवा मालक झाले म्हणजे त्यांचा राजा कोण हा मुद्याच गौण आहे, हे हिंदु-मुस्लीम ऐक्याचे दुसरे सूत्र आहे. हिंदूना हिंदू म्हणून पक्षपाती अन्यायाने वागविणारा राजा असू नये, एवढीच त्यांची अपेक्षा आहे. तो राजा नि:पक्षपाती असावा; कोणत्याच धर्माचा पक्षपाती विचार करणारा नसावा, थोडक्यात म्हणजे तो सेक्युलर असावा, असे त्यांचे म्हणणे आहे. बहादुरशहांचा त्यांनी केलेला स्वीकार याच कारणासाठी होय. अशा या राज्यामध्ये हिंदु-मुस्लीम हे समान हक्काने वागविले जाणारे नागरिक असतात. हिंदू प्रमाणेच त्यांनाही आपला धर्म, संस्कृती याचा विकास करण्याचे स्वातंत्र्य असते. मुसलमान हे ऐतिहासिक अर्थाने या भूमीचे धनी नसले तरी वास्तविक अर्थाने ते हिंदू इतकेच या भूमीचे आजचे समान भागीदार आहेत, वारसदार आहेत. जित किंवा जेतेपणाची भावना यापैकी कुणाच्याही मनात नसून समान सुखदु:ख असलेले भाऊ भाऊ म्हणून ते या देशात राहत आहेत.

हिंदु-मुसलमानांचे शत्रू हे समान आहेत. त्या शत्रू विरुद्ध दोघेही खांद्याला खांदा लावून एक दिलाने लढत आहेत. हिंदु-मुस्लीम ऐक्याचे हे तिसरे सूत्र आहे. ५७ च्या युद्धात इंग्रजाविरुद्ध दोघेही असेच एकदिलाने व एकजुटीने लढा देत होते, हे या सूत्राचे निदर्शक होते.

चौथे सूत्र

हिंदु-मुसलमानांच्या दीर्घ ऐतिहासिक संघर्षाची सावरकर मुक्त चर्चा करतात. हा इतिहास सांगितल्याने ऐक्य बिघडते यावर त्यांचा विश्वास नाही. जुना इतिहास नीट समजून घेवून वर्तमानात त्याचा कोणता बोध घ्यायचा हे ठरविले पाहिजे. जुन्या भांडणावर पांघरुन घातल्याने नव्हे, तर ती भांडणे नीट समजून घेतल्यानेच टिकावू एकी होऊ शकते, हे चौथे सूत्र आहे. इतिहास विसरुन न जाता तो सतत ध्यानात ठेवूनच एकी होवू शकते, यावर सावरकरांचा विश्वास आहे. यासाठीच ते या ग्रंथात त्याची मुक्त चर्चा करतात.

१८५७ ला हिंदु–मुस्लीम एकी होवू शकली याचे कारण त्यांच्यामते दोन्हीही पक्ष समतुल्य होते, हे होय [१९A] अेकीसाठीही सामर्थ्य लागते. दुर्बलाची नि सबलाची अेकी होवू शकत नाही, ही सावरकरांची भूमिका होती. हिंदु–मुस्लीम अैक्याचे हे पाचवे सूत्र होय.

१९०८ च्या सावरकरांची निकोप मनाने स्वीकारलेली हिंदु–मुस्लीम अैक्याची भूमिका ही अशी होती. या भूमिकेचे सर्व पुरोगाम्यानी मुक्तकंठाने कौतुक केलेले आहे. आपल्यासमोरचा आता प्रश्न आहे की, सावरकरांनी ही भूमिका नंतर सोडून दिली होती काय? या वरील सूत्रांच्या संदर्भात १९२४ नंतरच्या हिंदुराष्ट्रवादी सावरकरांची हिंदु–मुस्लीम प्रश्नविषयक भूमिका आता आपण समजून घेवू.

× × × ×

–३–

१९३७ चे सावरकर

१९३७ ला सावरकर पूर्णपणे मुक्त झाले. हिंदूचा पक्ष घेवून बोलू लागले काँग्रेसवर टीका करु लागले. त्यांच्या प्रतिपादनाचा मुख्य भर नेहमीच एका मुद्द्यावर होता. काँग्रेस ही खऱ्या अर्थी राष्ट्रीय नाही; हिंदुमहासभाच खऱ्या अर्थी राष्ट्रीय आहे– हा तो मुद्दा होता. त्याच्या हिंदुत्ववादी राजकारणाचा हा मुद्दा केंद्रबिंदू होता. या विचाराचा प्रचार त्यांनी पुढील आयुष्यात जन्मभर केला आहे. प्रत्येकाला आपलाच पक्ष राष्ट्रीय वाटतो, न्यायाचा वाटतो, या औपचारिक अर्थाने सावरकर असे म्हणत होते की, वास्तविक अर्थाने म्हणत होते, हे आपण समजून घेतले पाहिजे.

१९३७ ला रत्नागिरीहून मुक्त झाल्यावर ते कोणत्या पक्षात जाणार यावद्दल सर्वांना उत्कंठा होती. दरम्यानच्या काळात सर्वत्र त्यांचे सत्कार होत होते. सत्कार करणाऱ्यात समाजवादी– साम्यवादी मंडळीचाही समावेश होता. असाच एक सभारंभ समाजवादी नेते एस. एम. जोशी यांच्या अध्यक्षतेखाली मुंबअी येथे हिंदमाता मंदिरात झाला. सत्काराच्या भाषणात त्यांच्यावर टीका करताना वक्ते म्हणाले की,[२०] "सावरकरांची आजची राजकीय मते आम्हाला मान्य नाहीत. आम्हास १९०८ चे सावरकर मान्य आहेत. ते आम्हास पाहिजेत." येथील 'राजकीय मते' म्हणजे हिंदु–मुसलमानविषयक त्यांची भूमिका होय, हे उघड आहे. सावरकरांनी तेथेच या आक्षेपाला उत्तर दिले: "माझी राजकीय मते अमान्य आहेत असे तुम्ही म्हणता; पण माझी राजकीय मतें आपण समजून घेतली आहेत काय? हिंदुस्थानला संपूर्ण स्वातंत्र्य मिळाले पाहिजे, असे माझे मत आहे. हे मत आपल्याला अमान्य आहे काय?... स्वातंत्र्य मिळविण्यासाठी

मिळतील ती साधने मिळविली पाहिजेत आणि सैनिकी सामर्थ्य वाढविले पाहिजे, हे माझे दुसरे मत. हे तर आपल्याला अमान्य नाही ना ? "

सावरकर पुढे म्हणाले, " माझे तिसरे मत, स्वतंत्र हिंदुस्थानच्या विधिमंडळात जात, धर्म निर्विशेष सर्वांना समानतेने वागविले जावे. त्या विधिमंडळात मी चार हिंदूसाठी पाच मते मागत नाही; पण आज चार मुसलमानांना जी सहा मते दिली जात आहेत, ते मला मान्य नाही." चौथे मत सांगताना सावरकर म्हणाले, " धर्म ही अफूची गोळी वाटत असेल, तर टाकून द्यायला मी केव्हाही सिद्ध आहे. पण हा न्याय फक्त हिंदुधर्माला लावून चालणार नाही. तो सर्व धर्मांना लावा. हे माझे मत तुम्हाला मान्य नाही काय?" विरोधकांना गप्प करण्यासाठी युक्तिवाद म्हणून सावरकर असे म्हणत नव्हते, तर खूप विचारांती निश्चित केलेली आपली मते सूत्ररुपाने मांडत होते. हीच मते त्यांनी पुढील आयुष्यभर अत्यंत तळमळीने व आग्रहाने मांडलेली आहेत. समाजवादी लोकांकडून ते सत्कार स्वीकारत होते व त्यांना आपली भूमिका समजून सांगत होते. त्यांना खात्री होती की, समाजवाद्यांच्या दृष्टीतूनही आपल्या या विचारात कसलाच दोष येत नाही; त्यांची खरी तक्रार समाजवाद्यांनी आपली मते नीट समजूनच घेतली नाहीत, हीच होती. आपल्यापेक्षा हे समाजवादी कोणत्याही अर्थाने अधिक निधर्मी नाहीत, बुद्धिवादी नाहीत, याचा त्यांना आत्मविश्वास असल्यामुळे ते त्यांच्याशी व साम्यवाद्यांशीही कोणत्याही प्रश्नावर केव्हाही चर्चा करायला तयार असत. त्यांच्या भूमिकेतूनही आपले मत कसे योग्य आहे, हे ते पटवून देत.

मग धर्म कोणताच नको

दुसऱ्या एका सत्कारसभेत मानवेंद्ररॉय यांच्या भाषणानंतर सावरकर भाषण करताना म्हणाले,[२९] " समाजसत्तावादी म्हणत असतील कोणताही धर्म ठेवू नका, तर त्यास माझी ना नाही, परंतु अेका धर्मावर अन्यधर्मियांकडून सतत हल्ला होत असता तेथे दुर्लक्ष करावे, हे मला मान्य नाही. हिंदी म्हणून एक व्हा, राष्ट्रीय निशाणाखाली अेक व्हा; पण तेथे आल्यावर सर्वांना समान अधिकार पाहिजेत. एखाद्या समाजाला अधिकार देताना दुसऱ्या समाजाचे अधिकारावर आक्रमण केलेले राष्ट्रीयसभेने चालवून घेवू नये, ही माझी एकीची व्याख्या आहे." १९३७ च्या सावरकरांची एकीची ही व्याख्या १९०८ च्या सावरकरांपेक्षा कोणत्या बाबतीत वेगळी आहे ?

एका धर्माचा दुसऱ्या धर्मावर, एका संस्कृतीचा दुसऱ्या संस्कृतीवर आक्रमण, अत्याचार, जुलूम व अन्याय होऊ नये हीच अेकीची व्याख्या १८५७ च्या ग्रंथात त्यांनी केलेली आहे. समान हक्क, समान अधिकार, न्याय्य स्वातंत्र्य व परस्परावरील अनाक्रमण हीच हिंदु-मुस्लीम अेकीची त्यांची सूत्रे होती. १९०८ ची ही भूमिका १९३७ सालीही त्यांनी सोडलेली नाही व पुढेही जन्मात कधीही सोडली

नाही. १९०८ च्या व १९३७ च्या भूमिकेत एका बाबतीत मात्र महत्वाचा फरक आहे. १९०८ चे सावरकर १९३७ च्या सावरकरांइतके प्रखर बुद्धिवादी नसल्यामुळे, त्या वेळेस सर्व धर्माच्या अस्तित्वाची त्यांना आवश्यकता वाटलेली दिसते. सर्वधर्मसमभाव या अर्थीचा धार्मिक सेक्युलॅरिझम त्यावेळेस त्यांनी मानलेला आहे. १९३७ ला आपापले धर्म सर्वांनी सोडून द्यावेत, हा पर्यायसुद्धा या अेकीसाठी स्वीकारायला ते तयार आहेत. हा अधार्मिक सेक्युलॅरिझम आहे. 'तर्कनिष्ठ आणि प्रत्यक्षगत तत्वज्ञान हीच ज्याची उपनिषदे, आणि विज्ञान हीच ज्याची स्मृति,' असा बुद्धिवादी धर्म सावरकरांच्या कल्पनेतील 'उच्चतम आणि आरोग्यप्रद' अवस्था होती.[२२] त्यामुळे कोणताच धर्म न ठेवण्याचा पर्याय स्वीकारायला ते एका पायावर तयार असतात, हे समजून घेतले पाहिजे.

हिंदू व मुसलमान यांना, त्यांचा धर्म कोणता आहे हे अजिबात न पाहता, धर्मनिरपेक्षपणे वागविण्यात यावे, हाच सावरकरांचा आग्रह होता. हीच गोष्ट पुनरावृत्ती करत तळमळीने त्यांनी जन्मभर मांडलेली आहे. त्यांच्या कल्पनेतील राष्ट्राचे मुसलमान हेही हिंदूइतकेच घटक, नागरिक व समान हक्कांचे भागीदार होते, हे समजून घेण्यासाठी शेकडो पुरावे आपल्याजवळ उपलब्ध आहेत. हिंदुमहासभेच्या सर्व अध्यक्षीय भाषणातून त्यांनी हीच भूमिका मांडलेली दिसेल. त्याशिवाय वेळोवेळी व्यक्त केलेल्या भाषणात याच भूमिकेचा पोटतिडिकीने प्रचार केलेला दिसेल. आम्ही शंभर टक्के राष्ट्रीय आहोत हा सावरकरांचा दावाच होता.

काँग्रेसच्या ध्वजाखाली

रत्नागिरीच्या बंदिवासातून सुटल्यानंतर त्यांचे पहिले राजकीय भाषण रत्नागिरी काँग्रेस कमिटीने आयोजित केलेल्या कार्यक्रमात झाले आहे सावरकरांच्या हस्ते काँग्रेसच्या ध्वजाचे ध्वजारोहण करण्याचा हा कार्यक्रम १५ मे ३७ रोजी झाला. ध्वजारोहण केल्यानंतर आपल्या भाषणात सावरकर म्हणाले,[२३] "हिंदु-ध्वजाला उचलून धरणारे तुम्ही हा ध्वज कसा उभारता या प्रश्नाला उत्तर एकच आहे की, हा राष्ट्राचा ध्वज आहे. या ध्वजाखाली सर्व धर्माच्या लोकांनी समत्वाने उभे राहिले पाहिजे. या ध्वजाखाली उभा राहून जातीय वा धार्मिक भावना ठेवील तो पापी होय. घरात ज्या प्रमाणे आपण अन्य गोष्टी करण्यास स्वतंत्र असतो, त्या प्रमाणे दुसऱ्या वेळी मी हिंदु असण्यास प्रत्यवाय नाही... या ध्वजाखाली आपण सर्वांनी एक होवून राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी झटू या." काँग्रेसच्या ध्वज हा राष्ट्रीय आहे; तो ध्वज हिंदुध्वजापेक्षा मोठा आहे; त्या ध्वजाखालीच सर्व भारतीयांनी अेक होवून स्वातंत्र्यासाठी लढले पाहिजे– ही सावरकरांची भूमिका नीट समजून घेतली पाहिजे. दोन ध्वज, दोन राष्ट्र, सावरकर कसे मानतात, हे नीट समजून न घेतल्यामुळे अनेकांनी त्यांच्या हिंदुराष्ट्राबद्दल घोटाळे करुन ठेवलेले आहेत. हिंदूचा ध्वज फक्त हिंदुपुरताच आहे, हिंदुमहासभा फक्त हिंदुपुरतीच आहे, हिंदुराष्ट्र हे

फक्त हिंदुपुरतेच राष्ट्र आहे– ही त्यांची भूमिका काळजीपूर्वक समजून घेतली पाहिजे. या हिंदूचा भारतीयाशी, हिंदुमहासभेचा राष्ट्रसभेशी, हिंदुध्वजाचा राष्ट्रीयध्वजाशी व हिंदुराष्ट्राचा हिंदीराष्ट्राशी त्यांनी जो संबंध मांडलेला आहे, तो पूर्वग्रह सोडून समजून घेणे आपले कर्तव्य आहे.

जाता जाता डॉ य. दि. फडके यांच्या एका खोडसाळपणाची येथे नोंद करणे अवश्य आहे. वरील ध्वजारोहणाच्या घटनेबद्दल त्यांनी 'शोध साबरकरांचा' या संशोधनग्रंथात लिहिले आहे,[२४] "१५ मे १९३७ रोजी रत्नागिरीस काँग्रेसने आयोजित केलेल्या झेंडाबंदनाच्या समारंभाचे अध्यक्षपद तात्यांनी भुषविले होते, हे वाचताना आज आश्चर्य वाटते." या आश्चर्याचा शोध घेण्याचे काम वाचकांवर सोपवून 'शोध सावरकरांचा' या ग्रंथामध्ये नुसतीच आश्चर्य व्यक्त करणारी विधाने केल्याने कर्तव्यपूर्तीचे त्यांना समाधान मिळत आहे. डॉ. फडके यांना आश्चर्य वाटतील अशी एकच नसून शेकडो स्थळे सावरकरांच्या आयुष्यात सापडतील. आपले बंदिस्त मन खुले करुन ते सावरकरांचा अभ्यास करतील, तर या आश्चर्याचा शोध त्यांनाही लावता येईल. नाहीतर नुसत्या शिव्याच द्यायच्या व शिव्या देणे थांबले की आश्चर्याने तोंडात बोट घालायचे, हे दोनच उद्योग त्यांच्या लेखी शिल्लक उरतील.

वरील विधान करण्यामागे अशी घटना घडलीच नसावी, बाळारावांनी आपल्या रत्नागिरीपर्वात ही दडपून दिली असावी, अशी शंका वाचकांच्या मनात निर्माण करण्याचा त्यांचा हेतू आहे. हे विधान करण्या अगोदर त्याच परिच्छेदात त्यांनी एस. एम. जोशी व अच्युतराव पटवर्धन रत्नागिरीला जावून सावरकरांना भेटले असल्याचा बाळारावांचा उल्लेख चुकीचा आहे, हे पटवून सांगितले आहे. बाळाराव अशा निराधार गोष्टी मांडतात असे वाचकांचे मत झाल्याची त्यांना खात्री वाटल्यानंतर हळूच वरील विधान ते करतात. डॉ. फडके यांच्या संशोधन पद्धतीचे हे खास वैशिष्ट्य आहे. त्या वेळेसच्या अनेक वृत्तपत्रात या भाषणाची नुसती वृत्तेच नव्हेत, तर टीका टिपणीही आढळते, त्यामुळे या घटनेला खोटे तर ठरविता येत नव्हते, अशा वेळेस त्यांनी आपल्या या पद्धतीचा वापर केलेला आहे.

त्याच वर्षीच्या मुंबईच्या सभेतील भाषणात सर्वांनी काँग्रेसच्या राष्ट्रीय निशाणाखाली एकत्र व्हावे, असे आवाहान करुन ते म्हणाले,[२५] "राष्ट्रीय सभेची हिंदुसभा व्हावी अशी माझी अिच्छा नाही. पण ती इतर समाजासाठी अन्याय करणारी संस्था होऊ नये. जाति, धर्म, पंथ भेद न मानता सर्वांना समानतेने वागविणाऱ्या राष्ट्रीय सभेलाच मी पाठिंबा देईन." आपली हिंदुसभा राष्ट्रसभेपेक्षा संकुचित आहे, याची जाणीव सावरकरांनी सातत्याने ठेवलेली आढळून येईल. हिंदूनी जसा स्वतःचा ध्वज निवडला तसाच मुसलमानांनीही आपला वेगळा ध्वज ठेवावा, अशी सावरकरांची भूमिका होती.[२५] हिंदूनी हिंदूचे व मुसलमानांनी मुसलमानांचे संघटन करावे, असा ते उपदेश करत. त्यांचे म्हणणे असे की आपल्या

जातीचे संघटन करीत असताना ते मात्र न्यायतत्वावर आधारलेले पाहिजे. दुसऱ्याचे न्याय हक्क हिरावून घेणारे व दुसऱ्यावर अन्याय करणारे संघटन असू नये, असे ते म्हणतात.

सर्वांनीच संघटना करावी

दि. १५–११–२४ रोजी मुंबई येथे भाषण करताना त्यांनी हिंदू व मुसलमान दोघांनाही स्वतंत्र संघटन करण्याचा उपदेश केला. आपल्यातील दोष काढण्यासाठीही संघटन आवश्यक आहे, असे सांगून ते पुढे म्हणाले, २६ "असे दोष संघटनेविना नष्ट होत नाहीत. याकरिता हिंदूंचे व हिंदूप्रमाणेच मुसलमान, पारशी, ख्रिश्चन, वगैरे समाजाचे पूर्ण संघटन झाले पाहिजे, असे माझे मत आहे. यापैकी उलेमा सभा, खिलाफत सभा ह्या मुस्लीमसंस्था आपापले संघटन करीत आहेत व ते योग्यही आहे... हिंदूप्रमाणेच मुसलमान, पार्शी, ख्रिश्चन यांनीही आपापले संघटन करुन नंतर या समसामर्थ्य धार्मियांनी आपले खरे व अखंड ऐक्य करुन राष्ट्रोन्नति करणे हेच सांप्रत काळात आवश्यक आहे." सर्वांनीच न्याय संघटन करावे व आपल्या या संघटनेची ताकद राष्ट्राकरिता लावावी, ही सावरकरांची भूमिका नीट लक्षात ठेवली पाहिजे. अशा संघटना आजच्या काळात अपरिहार्य असतात, असे त्यांना वाटे. त्यांची ही भूमिका समजून घेतल्यावर हिंदूचा ध्वज वेगळा, मुसलमानांचा वेगळा व दोघांचा मिळून असलेला तिसरा राष्ट्रीय ध्वज वेगळा अशी भूमिका सावरकर का घेतात याचा उलगडा आपल्याला करता येतो.

सावरकर व शौकतअलींची भेट झाली होती. या भेटीतही शौकतअलींना सावरकर असाच सल्ला देतात. ते म्हणाले, २७ "हिंदुसंघटन तुम्हासही संघटन करण्याचा अधिकार आहे, असे मानते. मात्र तुम्ही आघातक हेतू ठेवू नये. आम्हीही ठेवीत नाही." सावरकरांनी ही भूमिका सातत्याने घेतलेली आहे. अितर बुद्धिवाद्यामध्ये आणि सावरकरांमध्ये या मुद्द्यावर फरक पडतो. हिंदूनी आपले हिंदुसंघटन करणे चूक आहे; मुसलमानांनीही आपले संघटन करणे चूक आहे, असे बुद्धिवादी व पुरोगामी मंडळीना वाटते. असे संघटन करण्याच्या प्रवृत्तीतून व प्रयत्नातून जातीयता वाढते, संघर्ष वाढतो, असे त्यांना वाटते. भारतीय या नात्याने सर्वांनी एकत्र यावे असे त्यांना वाटते. सावरकरांची भूमिका वेगळी आहे. तत्वतः त्यांना ही भूमिका मान्यच आहे. अितर जाती व धर्म आपापले संघटन सोडायला तयार असतील तर हिंदुसंघटनही सोडून द्यायला ते तयार आहेत; २८ पण अितर जाती जर संघटन करतील तर न्याय हक्कासाठी आपल्यालाही ते केलेच पाहिजे अशी त्यांची वास्तववादी भूमिका आहे.

राष्ट्रध्वजावर मुसलमान

१९२८ मध्ये राष्ट्राचा ध्वज कसा असावा याची चर्चा सुरु झाली होती.

सावरकरांनी "स्वतंत्र हिंदुस्थानचा राष्ट्रीय ध्वज" हा सविस्तर लेख लिहिला आहे. २९ चरखा हे चिन्ह काढून टाकल्यास काँग्रेसचा ध्वज राष्ट्रीय ध्वज म्हणून स्वीकारायला सावरकर तयार आहेत. राष्ट्रीय ध्येयाच्या दृष्टाने या ध्वजातील तीन रंग योग्यच आहेत, असे ते पटवून देतात. त्यानंतर या रंगाकडे भारतातील विविध राजकीय व धार्मिक पक्षोपक्षाचा दृष्टीने ते पाहतात. ते म्हणतात, "वास्तविक पाहता राष्ट्रीय ध्वजात धर्मपंथाच्या वैयक्तिक आवडी निवडीचा विचार गौण आहे. पण तरीही हिंदुस्थानातील सध्याच्या परिस्थितीत तो अगदी सोडून देणेही शक्य नाही. म्हणून हेही विशेष करुन सांगावेसे वाटते की, त्या रंगातील हिरवा रंग मुसलमानांच्या विशिष्ट ध्वजाचा आहे. त्यांच्यातील धर्मवेडयांनाही त्या ध्वजाविषयी या रंगाचे समावेशाने काही न्याय्य कुरकुर करणे अशक्य होअील. आणि दुसरे दोन रंग त्यांना आवडते नसले तरी वावडेही नाहीत." हिंदुराष्ट्रवादी सावरकरांची ही भूमिका आहे. सावरकरांच्या राष्ट्रात मुसलमान हे हिंदुप्रमाणेच अवश्यमेय घटक आहेत. प्रतिकात्मपणे राष्ट्रध्वजावर त्यांना सावरकर 'विशेष करुन' स्थान देत आहेत. हिंदुराष्ट्रवादी सावरकर हिंदू हे देशाचे मालक आहेत असे म्हणतात, मग या मुसलमानांना राष्ट्रध्वजावर स्थान कसे, यांचा विचार केला पाहिजे सावरकर मुसलमानांना दुय्यम नागरिक समजतात येथपासून तो त्यांना नागरिकत्वाचे हक्क द्यायला ते तयार आहेत, पण राष्ट्रीयत्व द्यायला तयार नाहीत येथपर्यंत– अनेक आरोप करण्यात आले आहेत. या आरोपाच्या संदर्भात या ध्वजाबद्दलच्या त्यांच्या विचाराकडे पाहिले पाहिजे.

सावरकर पुढे म्हणतात, "भगवा झेंडा आपली महाराष्ट्रीय पताका म्हणून राहील. पण राष्ट्रीय ध्वजातही प्रत्येक प्रांताने आणि पंथाने आपलाच रंग हवा म्हटल्यास अनवस्था प्रसंग प्राप्त होईल. आपण भगवा म्हणू तर रजपूत केशरी म्हणणार. पारशी-यहुदी-ख्रिस्ती-सर्वच घोटाळा होईल. म्हणून हे वाद मिटविण्यास जरील तीन रंग पुरे आहेत. त्यात पुष्कळांना आपला विशिष्ट रंग दिसेल आणि शुभ्ररंगात तर अगदी शास्त्रतःच अितर सर्व रंग संमिलित झालेले आहेतच ! तेव्हा केवळ रंगाच्या वादासाठी आता बेरंग करण्यात अर्थ नाही." सावरकर प्रत्येक घटकाचा किती समंजसपणे ब काळजीपूर्वक विचार करतात हे यावरून लक्षात येईल. आपले हिंदूचेच घोडे अितरावर अन्याय करत त्यांनी पुढे दामटल्याचे आपल्याला कधीही दिसणार नाही. हिंदूसकट सर्वच भारतीय हे या राष्ट्राचे अविभाज्य घटक आहेत, हे मान्य केल्याशिवाय त्यांना राष्ट्रध्वजावर स्थान मिळणेच शक्य नसते, हे लक्षात ठेवले पाहिजे.

ध्वजावरील चिन्हासंबंधी त्या लेखात सावरकर म्हणतात की, चरख्याअैवजी सूर्य–चंद्राचे चिन्ह ध्वजावर घ्यायला हरकत नाही. विविध भूमिकेतून या चिन्हाचे औचित्य दाखवून धार्मिक दृष्टीनेही हे चिन्ह कसे योग्य आहे, हे सांगताना ते लिहितात, "ज्यांना धार्मिक दृष्टीने बघावयाचे असेल, त्यापैकी जे मुसलमान

असतील ते त्या ध्वजावर असलेल्या चंद्राच्या चिन्हाने संतुष्ट होतील, कारण त्यांचा धार्मिक ध्वज मूळच्याच हिरव्या रंगावर चंद्रअंकित असलेला आहे." शेवटी चांगल्यात चांगला ध्वज कसा असावा याविषयी निष्कर्षाप्रत ते म्हणतात, "वस्तुत: ध्वजावरील रक्त, हरीत, श्वेत रंगाच्या पृष्ठभूस न बदलता केवळ त्यावर एका बाजूस हिरव्या रंगाचे मध्ये उद्यत् चंद्रकोर आणि दुसऱ्या बाजूस हिरव्या आणि पांढऱ्या रंगाच्या सीमेवर उद्युत् सूर्यबिंब अंकित केले असता... हे आमच्या सर्व समंजस देशबंधूस मान्य होईल, अशी आम्हास निश्चिती आहे" 'कमला' काव्यातून 'अर्धचंद्र अुभारी' चा उल्लेख गाळणारे सावरकर राष्ट्रध्वजावर हिरवा रंग आणि चंद्र यांना मुसलमानांचे प्रतिक म्हणून स्थान देत आहेत, हे समजून घेतले पाहिजे. मुसलमान हे आपल्या भारतराष्ट्राचे घटक आहेत, ही भूमिका सावरकरांनी कधीही सोडलेली नाही, हे काळजीपूर्वक समजून घेतले पाहिजे.

जर कोणतेही चिन्ह सर्वमान्य होत नसेल तर ध्वजावर चिन्हच ठेवू नये हे सांगताना दुसऱ्या एका लेखात ते म्हणतात,[३०] "कोणतेही प्रतिक आपणास परवडत नसेल तर निदान असे तरी करा की, राष्ट्रध्वजावर कोणतेही चिन्ह न काढता केवळ तीन रंग आणि त्यावर "भारत" हा एकच शब्द अंकित करावा, म्हणजे सर्व वाद आपोआपच मिटेल." ध्वजाविषयीचा हा विचार सावरकर १९०८ मध्ये करत नसून १९२८ ते ३१ या काळात करत आहेत, हे लक्षात घेतले पाहिजे. राष्ट्रध्वजावर सावरकर "हिंदुराष्ट्र" असा शब्द अंकित करायला सांगत नाहीत, ही गोष्ट आपण समजून घेणार नाही काय ?

भौगोलिक राष्ट्रीयतेच्या साच्यात

काँग्रेसमध्ये आपण का जाणार नाही याचे कारण सांगताना १९३७ मध्ये सावरकर म्हणाले,[३१] "हिंदुत्वाच्या प्रश्नावर काँग्रेसशी माझा मतभेद आहे. काँग्रेस मुसलमानांची मनधरणी करत आहे, हे मला मान्य नाही. तेथे सर्वांना सारखी वागणूक मिळाली तर मी काँग्रेसमध्ये गेलो असतो. पण मताशी प्रतारणा करून काँग्रेसमध्ये जाणे मला योग्य वाटत नाही." काँग्रेसमध्ये मी जात नांही, कारण ती राष्ट्रीय नाही हा मुद्दा सावरकर सातत्याने का मांडतात, हे समजून घेतले पाहिजे. खऱ्या राष्ट्रीयत्वाची त्यांची व्याख्या अशी होती[३२] : "खरे राष्ट्रीयत्व तेच की जे हिंदू व मुसलमान असा भेदाभेद न करता सर्वांना सारखेच लेखते नि मानते." बिहार प्रातीय हिंदुसमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात १९३९ मध्ये खऱ्या राष्ट्रीयतेबद्दल ते म्हणाले,[३३] "भोगौलिक राष्ट्रीयतेच्या साच्यात भारत वर्षाला ओतणे हे हिंदुमहासभेचे ध्येय आहे. अितकेच नव्हे तर हिंदुमहासभेच्या दृष्टीने खरी राष्ट्रीयता तीच की, जिच्या छायेखाली प्रत्येक व्यक्ति समान असेल, जिच्या 'लोकसभे'त (पार्लमेंटात) तुम्ही कोणत्या धर्माचे आहा, मुसलमान आहा, ख्रिश्चन आहा की यहुदी आहा, हे कोणालाही विचारले जाणार नाही.

आम्ही सर्वांना हिंदुस्थानी संबोधू. सार्वजनिक क्षेत्रात, सरकारी नोकऱ्यातून हिंदुस्थानचा मनुष्य आहे की नाही व त्याची योग्यता आहे की नाही, येवढेच पाहू. याहून खरी राष्ट्रीयता ती दुसरी काय असते ?... आम्ही तर छातीठोकपणे असे सांगू शकतो की, काँग्रेस येवढीच काय पण काँग्रेसपेक्षाही काकणभर अधिक हिंदुमहासभा राष्ट्रीय आहे."

सावरकरांचे पार्लमेन्ट

आमच्या एका मित्राला आम्ही हे सावरकरांचे विचार दाखविले, तेव्हा त्याला हे विचार सावरकरांचे असतील, याच्यावर विश्वास बसेना. त्याचे म्हणणे पडले की, हिंदुराष्ट्रवादी सावरकर सर्वांना समान मानणारे व धर्माचा अजिबात विचार न करता राष्ट्रीयता ठरविणारे असू शकतीलच कसे ? विविध काळातील याच अर्थाचे किमान शंभर वेळा तरी सावरकरांनी व्यक्त केलेले विचार आम्ही एकत्रित काढूनच ठेवलेले आहेत. काँग्रेस खऱ्या अर्थाने राष्ट्रीय नाही; ती हिंदु-मुसलमानांना सारखे वागवत नाही; धर्माचा आधार घेवून ती दोघात फरक करते-हाच सावरकरांचा कायमचा आरोप होता. १९३८ मध्ये अजमेरला भाषण करताना ते म्हणाले,[३४] "आमचे भारतीय पार्लमेन्ट अशा स्वरुपाचे तयार होओील की, त्या पार्लमेंटात पाय ठेवताच हिंदू, मुसलमान, पारशी या भेदाचा मागमूसही राहणार नाही. सारेच्या सारे भारतीय या नावाने संबोधले जातील. काँग्रेसने जर अशी प्रणाली रचली असती, तर मी प्रथम काँग्रेसचा सभासद झालो असतो व नंतर हिंदुमहासभेचा ! परंतु काँग्रेस राष्ट्रीयत्वाचा देखावा मात्र करीत आहे." याच राष्ट्रीयत्वाचा पुरस्कार करणारी त्यांची शेकडो विधाने पुरावे म्हणून देता येणे शक्य आहे. एखादे सतीचे वाण घेतल्यासारखे सावरकर आपल्या संपूर्ण राजकीय आयुष्यभर हाच खऱ्या राष्ट्रीयतेचा व खऱ्या धर्मनिरपेक्षतेचा सिद्धांत मांडत आले आहेत, हे समजून घेतले पाहिजे.

काँग्रेसचे ध्वोरण

सावरकर काँग्रेसला राष्ट्रीय नाही असे का म्हणतात हे समजून घेवू. १९२० पर्यंत म्हणजे लो. टिळकांच्या मृत्युपर्यंत काँग्रेसचा गाडा विशुद्ध राष्ट्रवादाकडेच चालला होता, असे सावरकरांचे म्हणणे आहे. गांधीजीच्या काळापासून काँग्रेस बिघडली असे ते म्हणतात. १९४० मध्ये त्यांनी एक पत्रक काढले. त्यात नंतरच्या काँग्रेसवर हाच आरोप केलेला आहे. ते म्हणतात, [३५] "काँग्रेस ही संस्था शुद्ध राष्ट्रीय विचारावर सर्वसामान्यपणे उभी करण्यात आली होती. काँग्रेसची जर ध्येयच्युती झाली नसती आणि तिने आपल्या मुलभूत तत्वांना घट्ट पकडून ठेवले असते, तर तिच्याबरोबर सहकार्य करायला हिंदुसभेला अडचण आली नसती. दादाभाओी नौरोजी, गोखले, लाला लजपतराय, लोकमान्य टिळक वगैरे तिच्या प्रारंभीच्या

काँग्रेस नेत्याच्या उत्कृष्ट मार्गदर्शनाखाली इंडियन नॅशनल काँग्रेसने आपल्या मार्गातल्या जातीय विकृत प्रवृत्तीचे नि अदूरदृष्टीच्या अराष्ट्रीय लहरीचे खाचखळगे टाळण्याचे शक्यतो प्रयत्न केले. परंतु खिलाफत चळवळीचे भूत काँग्रेसच्या मानेवर बसविण्याची भयंकर चूक करण्यात आली. त्याच समयापासून काँग्रेसची आपल्या राष्ट्रीयत्वाच्या ध्येयापासून च्युती झाली. इतकेच नाही तर हिंदुस्थानातील मुसलमानांचे प्राणके असण्यात तिला अभिमान वाटू लागला." सावरकरांचा काँग्रेसला विरोध का होता, हे नीट समजून घेतले पाहिजे.

१९४३ मध्ये ६१ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त पुण्याला समारंभ होवून त्यांना मानपत्र देण्यात आले. आपण हिंदुत्ववादी का झालो याचा आपल्या भाषणात त्यांनी सविस्तर खुलासा केला.[३६] "अंदमानातून सुटल्यानंतर मी पाहिले, मी स्वतः एक व्यक्ति म्हणून शिल्लक उरलो नव्हतो; मी हिंदुत्वाची किंकाळी म्हणून उरलो होतो." असे सांगून ते पुढे म्हणाले, "लोकमान्य टिळक हयात होते तोपर्यंत विशुद्ध राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेने राष्ट्राचा गाडा चालला होता." टिळकांच्या मृत्युनंतर हा प्रश्न निर्माण झाला, हे सांगताना ते म्हणाले, "लोकमान्यानंतर खिलाफत चळवळ वगैरे भानगडी राजकारणात गर्दी करु लागल्या. मी जरी अंदमानात असलो तरी माझ्या कानावर या गोष्टी येत होत्या." गांधीजीवर टीका करताना ते पुढे म्हणाले, "ज्या शुद्ध लोकशाहीकरिता दादाभाऊ नवरोजी, लाला लजपतराय वगैरे नामवंत काँग्रेस पुढाऱ्यांनी जीवाचे रान केले, त्यांच्या पश्चात काँग्रेसचा गाडा भलत्या भावनेला बळि पडून गांधीजींनी खड्ड्यात घातला. हिंदु-मुसलमान वेगळे हे आवरण काँग्रेसने प्रयत्न निर्माण केले हे पाप जेव्हा मी पाहिले, स्वराज्य-स्वातंत्र्य या भावना जावून नवीनच प्रकार पुढे येवू लागले, स्वातंत्र्याचा खरा अर्थ बाजूला पडून एका जमातीला खूष करण्यासाठी प्रत्यही हिंदू हिताचा होम होवू लागला." हिंदू व मुसलमान हे वेगवेगळे आहेत असे समजणे पाप आहे व ते गांधीजींच्या काँग्रेसने केले आहे, हा सावरकरांचा आरोप आहे. हिंदूनाही मुसलमानांइतकेच हक्क व अधिकार आहेत व ते मिळविण्यासाठी हिंदूचा पक्ष घेणे त्यांना आपले पहिले कर्तव्य वाटले. मुसलमानांना खूष करणे, त्यासाठी पक्षपात करुन हिंदूचे न्याय्य हक्क त्यांना देणे-- या गोष्टी सावरकरांना अराष्ट्रीय वाटल्या.

१९२० पर्यंत

हिंदु-मुसलमान हे या भारताचे अविभाज्य घटक आहेत, दोघांनी मिळून स्वातंत्र्यासाठी १८५७ प्रमाणेच लढा दिला पाहिजे, हीच सावरकरांची कायमची भूमिका होती. 'भौगोलिक राष्ट्रवादाच्या साच्यात भारतवर्षाला ओतणे' हेच त्यांचेही ध्येय होते. याच ध्येयाने प्रेरित झालेल्या काँग्रेसचे त्यांनी कौतुक केले. १९२० पर्यंतच्या काँग्रेसवर त्यांचा आक्षेप नाही. मुसलमानांना बरोबर घेऊन गेले पाहिजे ही काँग्रेसची भूमिका त्यांनाही मान्य होती. पूर्वसूरीच्या काँग्रेस

नेत्यांना यासाठी त्यांनी धन्यवाद दिले आहेत. हीही नेतेमंडळी मुसलमानांना झुकते माप देत होती, याचीही नोंद सावरकरांनी आत्मचरित्रात केली आहे. "हिंदी राष्ट्रसभेच्या पायाभरणीतच मुस्लीम पायाभरणीचा कालध्वम काँग्रेसच्या सुरूवातीच्या पुढाऱ्यांनी अजाणतेपणे आणून ठेवला होता" असा त्यांचा अभिप्राय आहे.[३७] हे पुढारी सुरूवातीपासून मुसलमानांनी काँग्रेसमध्ये यावे म्हणून त्यांची कशी मनधरणी करत, याबद्दल आपल्या आत्मचरित्रात सावरकरांनी बरेच लिहिले आहे. टिळकांनी केलेला लखनौ करार १९२० च्या अगोदरचाच आहे. असे असतानाही सावरकर १९२० पर्यंत काँग्रेसचा गाडा विशुद्ध राष्ट्रवादी होता, असे म्हणतात. हीच भूमिका काँग्रेसने पुढे चालविली असती, तर मी काँग्रेसमध्येच गेलो असतो असे ते म्हणतात. याचा अर्थ १९०८ चे सावरकर आणि काँग्रेसची ही १९२० पर्यंतची भूमिका मान्ये करणारे सावरकर एकच आहेत, असा होतो.

भाव वाढविला

१९२० पर्यंत काँग्रेसचे राजकारण मुस्लिमधार्जिणेच होते, असा त्यांचा आरोप आहे. काँग्रेसचे हे पुढारी मुसलमानांसंबंधी कसे वागत हे सांगताना आत्मचरित्रात ते लिहितात,[३८] "काँग्रेसमधील हिंदी पुढाऱ्यांनी मुसलमानांना मुसलमान म्हणून ओळखण्यास आणि त्यांना आंजरण्या गोंजरण्यास आरंभिले. काँग्रेसमध्ये आपण बहुतेक हिंदूच आहोत, याविषयी त्यांचे मन त्यांना खावू लागले. काँग्रेसचे अनेक हिंदु पुढारी ओशाळल्यासारखे म्हणू लागले, लिहू लागले, "आम्ही प्रथम हिंदी आहेत, मग हिंदु आहोत' आणि राववहादूर रानडे यांच्यासारखे ज्येष्ठ नि श्रेष्ठ देशभक्त तर याच्याही पुढे जावून प्रकट घोषणा करु लागले : 'मी हिंदु नाही नि मुसलमानही नाही. मी केवळ हिंदी आहे!' परंतु जो जो ते स्वतःला हिंदु म्हणवून घ्यावयास लाजू लागले, तो तो मुसलमान पुढारी त्यांच्या संस्थातून प्रकटपणे गर्जू लागले, 'पण आम्ही प्रथम मुसलमान आहोत नि मग हिंदी!'... ज्या संस्थेचे वा सभेचे उद्दिष्ट हिंदी राष्ट्रवादी आहे, मग त्यात कोणी मुसलमान येवो वा न येवो, अशी कणखर वा तर्कशुद्ध व्याख्या करण्याचे सोडून हे काँग्रेसचे प्रामाणिक पण रांजकीय प्रज्ञाशून्य देशभक्त ज्या संस्थेत वा सभेत कोणीतरी मुसलमान आलेला नाही ती 'हिंदी' म्हणावी तरी कोणत्या तोंडाने असे आपणच म्हणू लागले. परिणामतः त्यांचा निश्चय झाला की, कसेही करुन काही मुसलमान तरी काँग्रेसमध्ये आणलेच पाहिजेत." यामुळे मुसलमानांचा भाव अधिक वाढला व त्यांनी काँग्रेसला लुटण्यास सुरवात केली, असे सावरकरांना वाटते.

ध्येय उत्तमच

अशी भूमिका असणारी काँग्रेस १९२० पर्यंत विशुद्ध राष्ट्रवादीच होती, असे सावरकर म्हणतात, हे नीट समजून घेतले पाहिजे. त्यांचे म्हणणे असे की,

एका मर्यादेपर्यंत असे वागणे हिंदीराष्ट्राच्या व हिंदु-मुस्लीम ऐक्याच्या दृष्टीने योग्यच आहे. या पुढाऱ्याचा हेतू असा विशाल व प्रामाणिक होता. असे धोरण चुकीचे आहे, हे त्यांना त्यावेळेस समजले नाही, असे सावरकरांना वाटते. एक प्रयोग म्हणून हे धोरण योग्यच होते व या अर्थी ते विशुद्ध राष्ट्रवादाचे होते, असे त्यांना वाटते. ते लिहितात,[३८] "भारतीय राष्ट्रसभेने आपल्या पुढे जे ध्येय ठेवले होते, ते भौगोलिक राष्ट्रवादाचे Geographical Nationality चे होते. एका देशात जे राहतात ते लोक धर्मजातिनिरपेक्ष एकराष्ट्र असतात किंवा असले पाहिजेत... तीही एका अर्थी अयोग्य नव्हती. तोही प्रयोग करुन पाहण्यासारखा होता. येथपर्यंत या दिशेने एका अर्थी काँग्रेसची वाट चुकली नव्हती." याही गोष्टीचा प्रत्यक्ष, प्रयोग व अनुभव घेतला पाहिजे, असे त्यांना वाटते. पण या प्रयोगातून व अनुभवातून जे निष्कर्ष निघतात, त्याचा काँग्रेसच्या नेत्यांनी कधीही विचार केला नाही, अशी त्याची तक्रार आहे.

ही गोष्ट आता निर्विवादपणे सिद्ध झालेली आहे की, राष्ट्रीय मुसलमानाचे काही तुरळक अपवाद वगळता, सामान्यतः मुसलमान समाज काँग्रेसच्या बरोबर राष्ट्रीय प्रवाहात सामील झालेला नव्हता. काँग्रेस ही हिंदूची संघटना आहे, ही त्यांची कायमची तक्रार होती. यासाठी त्यांनी स्वतःचीच संघटना बांधलेली होती. मुसलमानांना जे हवे ते देण्यासाठी काँग्रेस तयार असतानाही अशा काँग्रेस बरोबर यायलाही ते तयार नव्हते. गांधीजींची नीती यशस्वी होवू शकली नाही, हे आता अतिहासात नमूद झाले आहे. त्यांच्या मनात बहुसंख्य हिंदूच्याबद्दल विश्वास निर्माण करण्यासाठी जे औदार्य दाखविणे अवश्य होते, ते सारे काँग्रेसने दाखविले होते. मुसलमानांच्या संबंधात आपले काहीतरी चुकत आहे, हे काँग्रेसच्या नेत्यांना केव्हाही समजले नाही, हीच सावरकरांची तक्रार होती. मुसलमानांना खूष करण्याच्या पद्धतीने हिंदु–मुस्लीम ऐक्य येणार नाही, असे त्यांना वाटे. मुसलमानांना या ऐक्याची गरज वाटली पाहिजे, असे ते म्हणत. भौगोलिक राष्ट्रवाद हे ध्येय उदात्त व आदर्श होतेच याबद्दल त्यांना शंका वाटत नाही. हा ध्येयवाद मुसलमानांना कधीच मान्य झाला नाही. हा ध्येयवाद प्रत्यक्षात आणण्याचा काँग्रेसचा मार्ग व धोरण पूर्णतः चुकीचे होते, असे त्यांना वाटते भौगोलिक राष्ट्रवाद अमलात आणण्यासाठी काँग्रेसने काय करायला पाहिजे होते, हे ते पटवून सांगतात.

खरी राष्ट्रवादी भूमिका

या बाबतीत काँग्रेसने कसे वागायला हवे होते हे सांगताना आपल्या आत्मचरित्रात ते म्हणतात, [३९] "भारतीय राष्ट्रवादाची प्रतिज्ञा पाळण्यासाठीच काँग्रेसने ठाशीव उत्तर द्यावयास हवे होते की : 'अखंड भारत हा माझा देश. तेच आमचे राष्ट्र. त्यातील सर्व नागरिकांना जाति–धर्म–प्रांत–निर्विशेषपणे हचा भारतीय राष्ट्रसभेत, ह्या 'इंडियन नॅशनल काँग्रेस'मध्ये येण्याचा अधिकार आहे. मग

तो धर्माने हिंदु आहे की मुसलमान की पारशी की ख्रिश्चन अशी विचारणा करणे सुद्धा हच्या आमच्या काँग्रेसच्या मुलभूत प्रतिज्ञेच्याच विरूद्ध आहे. काँग्रेसमध्ये हिंदूच हिंदू आहेत हे जे तुम्ही म्हणता ते सुद्धा आमच्या दृष्टीने 'वदतो व्याघात' आहे. कारण काही ब्रिटिश नागरिक सोडता काँग्रेसमध्ये जे जे हिंदी लोक आहेत, ते ते हिंदी आहेत, इंडियन आहेत– अितकेच आम्ही जाणतो. आणि जे तुम्ही स्वतःला मुसलमान म्हणून घेत आहा, ते तुम्ही उद्या काँग्रेसमध्ये आलात तरी आम्ही तुम्हाला केवळ हिंदी, केवळ इंडियन म्हणून ओळखू– मुसलमान म्हणून नाही ! यच्चयावत् हिंदी देशबांधवांच्या हितासाठी ही हिंदी राष्ट्रसभा जे जे अधिकार मागते ते ते सारख्याच प्रमाणात सारख्याच नियमाखाली सर्व नागरिकांना उपभोगिता येतील. ज्याला त्याला न्याय्य धर्मस्वातंत्र्य देण्यापलीकडे हच्या भारतीय राष्ट्रसभेचा धर्माशी काहीही संबंध नाही. या प्रतिज्ञेवर ज्या हिंदी नागरिकांना काँग्रेसमध्ये यायचे असेल त्याने यावे. अन्यथा येवू नये." सावरकरांची ही भूमिका विशुद्ध राष्ट्रवादाची आहे का नाही, धर्मनिरपेक्षतेची आहे का नाही, याचा खुलासा सावरकरांना जातीय म्हणणाऱ्यापैकी कुणीतरी केला पाहिजे. काँग्रेस अशा प्रकारे धर्मनिरपेक्षपणे वागती तर मी काँग्रेसमधेच गेलो असतो, असे सावरकर म्हणतात, हे आपण समजून घेणार नाही काय ?

हिंदु–मुस्लीम अैक्याची सावरकरांची ही पायाभूत भूमिका होती. १९०८ च्या सावरकरांच्या भूमिकेपेक्षा ही कोणत्याही बाबतीत वेगळी नव्हती, हे समजून घ्यायला कोणीच तयार नव्हते. सावरकरांना काय पाहिजे होते हे लक्षात घ्यायला कोणीच तयार नाही. १९०८ चे सावरकर नंतर बदलले म्हणजे नेमके कोणत्या बाबतीत बदलले, हे समजून घ्यायला, त्याचा शोध घ्यायला आमचे हे टीकाकार तयार नाहीत.

समान वागणूक हवी

काँग्रेस जर अशी धर्मनिरपेक्ष असती तर 'आम्हाला वेगळी संस्था काढण्याची काय गरज होती ?' हा सावरकरांचा साधा व सरळ प्रश्न होता.[४०] 'तेथे सर्वांना सारखी वागणूक मिळत असती, तर मी काँगेसमध्ये गेलो असतो. पण मताशी प्रतारणा करून काँग्रेसमध्ये जाणे मला योग्य वाटत नाही."[४१] हीच गोष्ट आकांत करुन त्यांनी जन्मभर सांगितली आहे. हा मार्ग लोकप्रियतेचा नाही, हे त्यांनाही माहीत होते. हिंदूवर अन्याय होत आहे हे सांगणे संकुचितपणाचे होते, हेही त्यांना माहीत होते. तरीही ते म्हणाले, "पण तरूणपणी ज्या प्रवृत्तीने देशहितासाठी मी त्या सत्काराच्या मोहात न फसता देशहिताचा मार्ग धरला; त्याच कारणासाठी आजही हिंदुहितासाठी, देशहितासाठी काँग्रेसमध्ये जात नाही. माझा सन्मान न झाला तरी त्याची चिंता नाही; दु:ख नाही." तेव्हा सावरकर हिंदूचा पक्ष का घेतात हे आपण पूर्वग्रह सोडून समजून घेतले पाहिजे. हिंदूना हिंदू म्हणून

काहीतरी अधिक हवे व मुसलमानांना मुसलमान म्हणून काहीतरी कमी द्या, यासाठी सावरकरांनी हिंदूचा पक्ष घेतला का, या प्रश्नाच्या अनुरोधाने आपण त्यांची भूमिका समजून घेतली पाहिजे.

"हिंदू व मुसलमान हा भेदच नष्ट झाला पाहिजे अशी माझी अिच्छा आहे. योग्यतेप्रमाणे नोकरी मिळाली पाहिजे, याच तत्वाचा पुरस्कार हिंदुमहासभा हिरीरीने करीत आहे. काँग्रेसच्या तत्वज्ञानात हे बसत नाही" ही गोष्ट १९३८ चे सावरकर सांगत आहेत. [४२] आपला असा एक भ्रम असतो की, काँग्रेस ही हिंदू व मुसलमान यांना समान लेखणारी, धर्माच्या मुद्यावरुन त्यांच्यात भेदभाव न करणारी, विशुद्ध भारतीय राष्ट्रवादी नि पूर्णपणे धर्मनिरपेक्ष संस्था आहे. उलट पक्षी, सावरकर हे धर्मभेद मानणारे, हिंदूपेक्षा मुसलमानांना कमी लेखणारे, धार्मिक राजकारण करणारे जातीय पुढारी आहेत, असे आपण अगोदरच ठरवून टाकलेले असते. वस्तुस्थिती नेमकी याच्या उलटी आहे. सावरकर धर्माच्या राजकारणाच्या विरोधात दंड थोपटून उभे टाकलेले होते, हा अितिहास समजून घ्यायला आपण तयार असले पाहिजे.

धर्मनिरपेक्ष भूमिका

सावरकरांनी ही धर्मनिरपेक्ष भूमिका सर्व स्थळी व सर्व काळी सातत्याने मांडलेली आहे. हिंदुमहासभेच्या महत्वाच्या अध्यक्षीय भाषणातही हीच भूमिका आढळेल. हिंदूचा पक्ष घेणारे सावरकर धर्मनिरपेक्ष भूमिकेचा प्रचार करताना दिसतील, व धर्मनिरपेक्षतेचा दावा करणारी काँग्रेस धार्मिक भूमिकेतून मुसलमानांकडे पाहत असलेली दिसेल. १९३७ च्या अध्यक्षीय भाषणात हिंदी राज्य म्हणजे काय यांचे त्यांनी सुरवातीलाच स्पष्टीकरण केले आहे. "ज्यात आपले सर्व देशबांधव मग ते कोणत्याही धर्माचे वा पंथाचे वा वंशाचे असोत, पूर्ण समानतेने वागविले जातील आणि प्रत्येकजण संबंध हिंदीराष्ट्राच्या संबंधीचे आपापले ऋण नि कर्तव्य बजावित आहे, तोवर कोणाचेही स्वतंत्र नागरिकत्वाचे न्याय्य व समान अधिकार ज्यात छिनले जाणार नाहीत किंवा कोणालाही दुसऱ्या कोणावर अन्याय अतिक्रमण करु दिले जाणार नाही." असे हिंदीराष्ट्र सावरकरांना हवे होते. [४३] हेच त्यांचे हिंदुराष्ट्र होते. असे हिंदीराष्ट्रच हिंदूचेही नियत कार्य आहे, असे त्यांना वाटे. [४३] 'हिंदू हे सर्वांचे संयुक्त हिंदी राष्ट्र बनविण्यास समुत्सुक आहेत आणि आपले कोणतेही राखून ठेविलेले असे स्वतंत्र हक्क वा सत्ता वा अधिकार हिंदुस्थानातील अहिंदू वर्गावर मुळीच लादू अिच्छित नाहीत." असे अध्यक्षीय भाषणातच सावरकर सांगतात. [४४]

समाअीक हिंदी राज्याचे आम्ही सर्वाआधी नागरिक होवू, अशी त्यांची घोषणाच होती. ते म्हणाले, [४४] "पण ते हिंदीराज्य मात्र निर्भेळ हिंदी असू द्या. राज्याने मताधिकार, नोकऱ्या, अधिकाराची स्थाने, कर यांच्या संबंधात धर्माच्या

च्या जातीच्या तत्वावर कसल्याही मत्सरोत्तेजक भेदाभेदांना मुळीच थारा देवू नये. कोणताही मनुष्य हिंदु आहे की मुसलमान आहे की ख्रिस्ती आहे इकडे लक्षच दिले जावू नये. या हिंदीराज्यातील सर्व नागरिक सर्वसामान्य लोकसंख्येतील त्यांची धार्मिक किंवा जातीय शेकडेवारी विचारात घेतली न जाता त्यांच्या त्यांच्या वैयक्तिक गुणावगुणावरून वागविले जाऊ व्यात...कोणतीहि जाति किंवा पंथ, वंश किंवा धर्म विचारात न घेता, 'एक मनुष्य एक मत' असा सर्वसामान्य नियम होवू द्या." असे सांगून अशा राज्यालाच आम्ही पहिल्याने निष्ठा अर्पण करू असे ते अभिमानाने सांगतात. असे राज्यच आमचा राजकीय ध्येयाचा आदर्श आहे, असे ते आग्रहाने सांगतात. पण या गोष्टी काँग्रेसला मान्य नाहीत, म्हणून आम्ही वेगळा मार्ग अवलंबिला आहे, असे त्यांचे म्हणणे आहे. "आमच्या जीविताच्या अंतापर्यंत त्याच्या परिपूर्तीसाठीच झगडण्यांचे आम्ही चालू ठेवणार." असे ते जाहीर करतात. 'हिंदी राज्यासंबंधीची त्याहून अधिक राष्ट्रीय अशी कोणती कल्पना असू शकेल" असा ते प्रश्न करतात. काँग्रेसला ही हिंदीराष्ट्राची कल्पनाच मान्य नाही, असा त्यांचा आरोप आहे

खरा धर्मनिरपेक्ष कोण ?

प्रत्येक हिंदुमहासभेच्या अध्यक्षीय भाषणात, प्रत्येक राजकीय भाषणात, प्रत्येक राजकीय प्रकरणात सावरकर हीच धर्मनिरपेक्ष भूमिका मांडत आलेले आहेत. "आपण हिंदु आहो किंवा हिंदी लोकसंख्येमध्ये इतर अहिंदु वर्गातील देशबांधवापेक्षा केवढी तरी आपली बहुसंख्या आहे, या विशेष कारणाच्या बळावर हिंदी नागरिक या नात्याने प्राप्तव्य असेल त्याहून काहीही अधिक हिंदु मागत नाहीत." हीच गोष्ट जन्मभर ते कंठशोष करून सांगत होते.[४५] अहिंदूनी, विशेषतः मुसलमानांनी आपण मुसलमान आहोत या विशेष गुणाखातर काहीही अधिक मागू नये, एवढीच त्यांची रास्त अपेक्षा होती. १९४१ च्या भागलपूरच्या हिंदुमहासभेच्या अध्यक्षीय भाषणातही सावरकर म्हणाले,[४६] 'हिंदुस्थानातील अहिंदु अल्पसंख्य जमातीना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात जे काही हिंदुमहासभा देवू करते, त्यापेक्षा तसूभरही अधिक स्वतःसाठी मागत नाही." त्यांच्यासमोरचा प्रश्न हिंदूना न्याय्य हक्कांपेक्षा अधिक देण्याचा नव्हता, तर हिंदू म्हणून त्यांना कमी देण्याला विरोध करण्याचा होता; या विरोधासाठी ताकद निर्माण करण्याचा होता. वाद हिंदु-मुस्लीम ऐक्याचा नव्हता, संयुक्त हिंदीराज्याचाही नव्हता, तर या एकीसाठी हिंदूनी आपले न्याय्य हक्क वित्ती मर्यादेपर्यंत सोडून द्यावेत हा होता. ऐक्यासाठी मुसलमानांनी अटी घालाव्यात, एकी मोडू नये म्हणून हिंदूच्या वतीने काँग्रेसने त्या मान्य कराव्यात, या गोष्टी सावरकरांना मान्य नव्हत्या. ही एकी नसून सौदेबाजी होती; हा एकीचा पाया नसून फुटीरपणाला उत्तेजन होते; ही राष्ट्रीयता नसून विपरित अर्थाने जातीयता होती—असा सावरकरांचा आक्षेप होता.

तेव्हा कोण जातीय नि कोण धर्मनिरपेक्ष होते, याची पुनर्तपासणी करायला आपण तयार असले पाहिजे.

'दरडोई एकमत' व 'जात-धर्म-पंथ निरपेक्षपणे सर्वांना समान हक्क' ही सावरकरांच्या राष्ट्रीयत्वाची द्विसूत्री होती. अल्पसंख्यावर अन्याय होवू नये म्हणून लोकसंख्येच्या प्रमाणात त्यांना राखीव प्रतिनिधित्व देण्यास सावरकर तयार होते. या सूत्राचा समावेश करून सावरकरांचे त्रिसूत्री धोरण नीट समजून घेतले पाहिजे. लोकशाहीच्या नावाने कंठशोष करणारे One man one vote हा सिद्धांत मानायला तयार नव्हते; लोकशाहीची ज्यांना पर्वा नव्हती असे आपण म्हणतो, ते मात्र हा सिद्धांत तळमळीने मांडीत होते ! सावरकर सांगत होते[४७] : "आम्हाला केवळ याच प्रकारची एकी पाहिजे होती नि पाहिजे आहे की, जिच्या योगाने ज्यात जाति वा पंथ वा वंश वा धर्म यांचा विचार न करता सर्व नागरिक 'एक माणूस एक मत' ह्या तत्वावर समसमान रितीने वागविले जातील, असे हिंदी राज्य निर्माण होईल." "अल्पसंख्याकांची भाषा, संस्कृति नि धर्म याच्या विशेष संरक्षणाची हमी देण्यासहि आम्ही अनुकूल आहो." हेही सावरकर सांगून टाकतात.

खरा देशाभिमानी कोण ?

सावरकरांनी हीच भूमिका जन्मभर घेतली असल्यामुळे प्रत्येक ठिकाणचे त्यांचे असेच विचार येथे देत बसू तर पानेच्या पाने भरतील. खरा देशाभिमानी कसा असावा हे सांगताना नागपूरच्या अध्यक्षीय भाषणात ते म्हणाले,[४८] "खरा हिंदी देशाभिमानी तोच की जो मुसलमान अल्पसंख्य, हिंदु बहुसंख्य असले काही जाणत नाही. त्याच्या दृष्टीला सारे हिंदीच दिसले पाहिजेत." "खऱ्या हिंदी राष्ट्रीय मतदारसंघाला अराष्ट्रीय अशा जातिनिष्ठतेचा वा धर्मनिष्ठतेचा वासहि लागता कामा नये." अशी त्यांची निर्भेळ धर्मनिरपेक्ष भूमिका होती. राष्ट्रीयत्वाची व्याख्या करताना ते म्हणाले,[४९] "हिंदी राष्ट्राच्या घटकभूत अशा सर्व समाजाकडे समबुद्धीने पाहणारे तेच खरे नि न्याय्य राष्ट्रीयत्व होय" या अर्थाने काँग्रेस ही खऱ्या अर्थी राष्ट्रीय नाही, असा त्यांचा आरोप होता. ही भूमिका मानत असल्यामुळे आम्हीच राष्ट्रीय आहोत असे ते म्हणतात.

राज्यघटना कशी असावी ?

हिंदुस्थानची राज्यघटना कशी असावी याची तात्विक रुपरेषा १९३९ च्या कलकत्ता अधिवेशनात त्यांनी मांडली. ते म्हणाले, [५०] "हिंदुसंघटन पक्षाचे मते हिंदुस्थानची भावी राज्यघटना पुढील प्रमाणे व्यापक तत्वावर आधारण्यात येईल. सर्व नागरिकांना समान अधिकार नि कर्तव्ये राहतील, मग त्याची जात वा धर्म कोणताही असो; मात्र त्यांनी या हिंदुस्थानी राज्याशी पूर्णपणे एकनिष्ठ राहण्याची

किंवा तिचेवर एकमेव निष्ठा ठेवण्याची प्रतिज्ञा केली पाहिजे. भाषण, विचार, धर्म नि संघ इत्यादी संबंधीचे स्वातंत्र्याचे मुलभूत अधिकार सर्व नागरिकांसारखेच उपभोगिता येतील. सार्वजिनक शांतता, सुव्यवस्था नि राष्ट्रीय आवश्यकता याचे प्रीत्यर्थ या अधिकारावर जी बंधने घालता येतील, ती केवळ धार्मिक नि जातीय विचाराचे आधारे नसून सर्वसामान्य राष्ट्रीय कारणासाठीच घालण्यास येतील. प्रादेशिक दृष्टीने देखील या धोरणापेक्षा अधिक राष्ट्रीय अपे धोरण कोणतेच असू शकणार नाही. आणि हे धोरण 'एका मनुष्यास एक मत' या सूत्राने थोडक्यात दर्शविले जाते."

१९०८ व १९३७

आपली ही विशुद्ध राष्ट्रवादी व धर्मनिरपेक्ष भूमिका मांडण्यासाठी सावरकरांनी 'दरडोई – एकमत' या सूत्रमय सिद्धांताचा जन्मभर वापर केला आहे. १९०८ चे सावरकर १९३७ ला सुद्धा या भूमिकेमध्ये कुठेही बदललेले नाहीत, हे समजून घेतले पाहिजे. मुसलमानांना त्यांचा विरोध कोणत्या मुद्यावर होता, तो समजून घेतला पाहिजे. समानहक्कांच्या व समानकर्तव्याच्या बाबतीत १८५७ च्या हिंदु-मुसलमानात सावरकरांना फरक दिसला नाही. एका झेंड्याखाली ते एक होवून अंग्रज या समान शत्रूशी ते लढा देण्यास सज्ज होते. १९३७ ला परिस्थिती बदलली होती. मुसलमानांना पाकिस्तान हवे होते; ते स्वत:ला स्वतंत्र राष्ट्र समजत होते. अंग्रजाविरुद्ध लढण्यासही हिंदूबरोबर येण्यास ते तयार नव्हते. समान हक्कांच्या अटीवर ते हिंदूशी सहकार्य करण्यास तयार नव्हते. त्यांना विशेष हक्क हवे होते. सावरकर म्हणाले, [५१] "मुसलमान आमचे धाकटे भाऊ आहेत असे आम्ही मानतो. आम्ही लहान भावाला आधीच अर्ध्याहून अधिक हिस्सा दिला आहे. परंतु अितक्याने संतुष्ट न होवून आमचे धाकटे बंधू आअीचेच दोन तुकडे करावयास तयार झाले, तेव्हा या धाकटया बंधूचे कान पिळण्याचा प्रसंग आला आहे." १९३७ च्या वेळेस 'पाकिस्तान' हा राजकारणातील ज्वलंत चर्चेचा विषय होता, हे लक्षात घेतले म्हणजे सावरकर कोणत्या परिस्थितीत बोलत होते हे समजून येईल.

मुसलमान आपल्या बरोबर येत नसतील तर हिंदूनी काय करायचे, हा त्यांच्या समोरचा खरा प्रश्न होता. मुसलमान स्वतंत्र राजकीय आकांक्षा बाळगून हिंदूनाही विरोध करणार तर काय करायचे असाही दुसरा प्रश्न होता. सावरकरांनी ही सर्व परिस्थिती जाणून असे जाहीर केले की, वरील सूत्रमय भाषेतील दरडोअी – एकमताच्या अटीवर हिंदूशी मुसलमान सहकार्य करणार असतील तर त्यांना आम्ही बरोबर घेवून जावू; नसेल तर त्यांच्याशिवायही स्वत:चे भवितव्य घडविण्याचा हिंदूना हक्क आहे. 'याल तर तुमच्यासह, न याल तर तुमच्याशिवाय, विरोधाल तर विरोध करुनही' हिंदू आपला राजकीय प्रवास चालूच ठेवतील, असे

त्यांनी जाहीर केले. ते म्हणाले,[५२] "केवळ या आणि याच अटींवर मुसलमान येणार असतील तर त्यांच्यासह, ते येत नसतील तर त्यांच्याशिवाय आणि ते आडवे येतील तर त्यांचा प्रतिकार करुन हिंदुस्थानच्या एकसंघ अशा स्वातंत्र्यासाठी झगडण्याचा निर्धार हिंदूनी केला आहे." १९०८ चे सावरकर १९३७ ला किती प्रमाणात बदलले हे समजून घेतले पाहिजे. हिंदु-मुसलमानांच्या परस्पर हक्कांच्या संबंधात ते बदलले नाहीत, हे लक्षात घेतले पाहिजे. खांदचाला खांदा लावून हिंदू-बरोबर लढणाऱ्या १८५७ च्या मुसलमानांचे ते कौतुक करतात व आता ते आपल्याबरोबर येत नाहीत, म्हणून त्यांच्या शिकायही एकटेच लढण्याचा निर्णय घेतात, एवढाच फरक आहे.

खरे हिंदु-मुस्लीम ऐक्य

सावरकरांची स्पष्ट भूमिका अशी की,[५३] "हिंदूनी हे लक्षात ठेवावे की, मुसलमानांच्या साहाय्यावाचून स्वातंत्र्य मिळणार नाही, हे जेव्हा हिंदू म्हणू लागले त्याच दिवशी त्यांनी हिंदु-मुस्लीम ऐक्य अशक्य करुन टाकले. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी हिंदूना आपली आवश्यकता आहे, असे समजून येताच मुसलमान त्यांच्या मागण्या वाढवू लागले. त्यांची ही पद्धत लक्षात घेऊन आता हिंदूनी त्यांना बजावावे, "'मित्र हो, आम्हाला सर्वांना समानतेने वागविण्याचे आश्वासन देणाऱ्या हिंदी राज्यासाठी आपले साहाय्य हवे आहे त्या राज्यात सर्वांना योग्य ते स्थान नि संरक्षण मिळेल. पण आमचे स्वत्व ज्यात उरणार नाही, असे स्वराज्य आम्हास अभिप्रेत नाही. इंग्रज जावून अिस्लामचे राज्य यावे, केवळ धनी पालटावा यासाठी आम्ही लढत नाही. हिंदुस्थान स्वतंत्र झाला नाही, तर तुम्ही मुसलमानही गुलामच राहाल, हे ओळखून तुम्हालाही स्वतंत्र व्हायचे असेल, तर तुम्ही, तुमच्याहितासाठीच हिंदुमुसलमान ऐक्याची हाक द्या' असे रोखठोक बजावतील तर त्यानंतर जे हिंदु-मुस्लीम ऐक्य होईल तेच खरे ऐक्य!" १९०८ च्या सावरकरांपेक्षा ही भूमिका कोणत्या बाबतीत वेगळी आहे? मुसलमानांना ते राष्ट्राचे घटक मानतात; दोघेही गुलामच आहेत हे ते मान्य करतात. दोघेही स्वतंत्र होवू असे म्हणतात. एकमेकाचे धनी होण्याची शक्यता सावरकरांच्या विचारात कुठेच नाही. मुसलमानांनी आमचे धनी होऊ नये, हीच त्यांची अपेक्षा आहे.

एडवर्ड जावून औरंगजेब

कलकत्त्याच्या अध्यक्षीय भाषणात सावरकर म्हणाले,[५४] "बहुसंख्याकांच्या न्याय्य अधिकारावर नि सत्तेवर एक प्रकारे बोळा फिरविण्याचा अधिकार अल्पसंख्य मुसलमानांना देवून टाकून त्या घटनेला स्वराज्य म्हणजे हे सर्वस्वी विपरित होय. एक धनी जावून दुसरा यावा अशी हिंदूची इच्छा नाही. हिंदुस्थानच्या प्रदेशात जन्माला आला म्हणून एडवर्डचे स्थानी औरंगजेब आणून ठेवावा एवढ्या-

साठी युद्ध करुन प्राण देण्यास हिंदू सिद्ध झालेले नाहीत." तेव्हा सावरकरांच्या समोरचा प्रश्न हिंदूनी कुणाचे धनी होण्याचा नव्हता; मुसलमान आपले धनी होवू नयेत हा होता. १९०८ च्या सावरकरांची भूमिका हीच होती. हिंदूचे न्याय हक्क व स्वत्व अबाधित राहिले पाहिजे हीच हिंदूच्या स्वातंत्र्याची त्यांची १९०८ सालीही व्याख्या होती. यालाच त्यांनी ५७ च्या ग्रंथात हिंदू या भूमीचे मालक झाले, असे गौरविले आहे. हिंदु-मुसलमानांचे परस्पराशी जे हक्क व अधिकारांचे संबंध आहेत, त्या बाबतीत १९०८ च्या व १९३७ च्या सावरकरांत कोणता फरक पडला आहे, याचा खुलासा कुणीतरी केला पाहिजे. १९०८ च्या सावरकरांना हिंदु-मुस्लीम ऐक्य ज्या अटीवर हवे होते, त्याच अटी १९३७ सालीही शिल्लक आहेत. हिंदु-मुसलमान यांच्या हक्कासंबंधाच्या भूमिकेतून १९०८ चे सावरकर १९३७ सालीही बदललेले नाहीत, हे निकोप व मोकळ्या मनाने आपण समजून घेतले पाहिजे. १९०८ ला सावरकरांच्या नजरेसमोर असेलेले १८५७ चे मुसलमान १९३७ ला पूर्णपणे बदललेले आहेत, हेही मोकळ्या मनाने मान्य केले पाहिजे. ज्या प्रमाणात मुसलमान बदलले त्या प्रमाणात सावरकरांचे हिंदु-मुस्लीम ऐक्याचे मार्गही बदललेले आहेत, हेही समजून घेतले पाहिजे.

× × × ×

—४—

तर्क व न्यायापलिकडची

सावरकरांचा हा दरडोई-एकमताचा सिद्धांत समजून घेवून तीवर टीका करणारे एक थोर टीकाकार म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे होत. हा दरडोई एकमताचा, म्हणजे सर्वांना समान हक्क देणारा धर्मनिरपेक्ष सिद्धांत हा 'जुगारातील खेळाप्रमाणे' आहे, असा डॉ. आंबेडकरांचा आक्षेप आहे. मुसलमानांना विधिमंडळात आणि प्रशासकीय नोकऱ्यात कोणतीही सुरक्षित जागा न देण्याचा हा सिद्धांत मांडून आतापर्यन्त मुसलमानांना प्राप्त असलेल्या विशेष हक्कापासून सावरकर वंचित करु पाहत आहेत, असा त्यांनी आक्षेप घेतलेला आहे. [१] 'सावरकरांच्या या योजनेत मुसलमानांना या पुढे कोणत्याच प्रकारच्या सवलती व दक्षेची सोय नाही, ही गोष्ट मुसलमानांवर अन्याय करणारी आहे, असे डॉ आंबेडकरांना वाटते. त्यामुळे 'श्री सावरकरांची मनोवृत्ती तर्क व न्यायापलिकडची आहे' असा त्यांचा अभिप्राय आहे.

मुसलमानांनी मागितलेल्या पाकिस्तानला पर्याय शोधण्यासाठी आपण बसलो आहोत. आतापर्यन्त त्यांना मिळत असलेल्या सोयी-सवलती व विशेषा-

विचार हे पुरेसे नाहीत, हे पाकिस्तानच्या मागणीचे एक कारण मानले गेले. तेव्हा या सध्याच्याच सोयी सवलती नाकारणारा व मुसलमानांना राष्ट्रीय दृष्टया हिंदू-बरोबर आणून ठेवणारा सावरकरांचा प्रस्ताव, या दृष्टीने न्यायाच्या व तर्काच्या पलिकडचा आहे, असे डॉ. आंबेडकरांना म्हणायचे आहे, त्यावेळसचा वादाचा खरा प्रश्न मुसलमानांना हिंदुअितके हक्क असावेत का नाही हा नव्हता, तर हिंदूना मुसलमानांअितके हक्क असावेत का नाही हा होता; हिंदुपेक्षा मुसलमानांना किती हक्क अधिक द्यावेत म्हणजे ते अैक्यास तयार होतील हा होता.

हिंदू बहुसंख्याक व मुसलमान अल्पसंख्याक असल्यामुळे दरडोअी - एकमताची लोकशाही मुसलमानांना मंजूर नव्हती. लोकशाहीतील कारभार बहुमताने चालतात. म्हणूनच अशा तत्वावरील हिंदीराज्यामध्ये समाविष्ट होण्याला मुसलमान साहजिकच तयार नव्हते. अशा राज्यात आपले अस्तित्व लोप पावेल अशी त्यांना भीती वाटत होती, म्हणून त्यांनी स्वतंत्र राज्याची मागणी केली. मुसलमानांच्या मनातील ही भीती नष्ट करण्याचे प्रयत्न काँग्रेस करत होती. यासाठी दरडोअी एकमताचा सिद्धांत काँग्रेस मान्य करु शकत नव्हती. मुसलमानांना हिंदुबद्दल विश्वास वाटावा, यासाठी त्यांना झुकते माप देण्यास काँग्रेस नेहमीच तयार होती. गांधीजींच्या काँग्रेसचे हे धोरण नीट समजून घेतल्याशिवाय सावरकर हिंदूचा पक्ष का घेते झाले, हे आपल्याला समजणारच नाही.

काँग्रेसचे मुस्लीम प्रश्नविषयक धोरण पक्षपाती स्वरुपाचे व हिंदूवर अन्याय करणारे होते, ही टीका केवळ सावरकरच करत नाहीत. हिंदुत्वनिष्ठ नसणाऱ्या अनेक विचारवंतानीही अशीच टीका केलेली आहे. काँग्रेसचे धोरण दोन दृष्टीने चुकीचे होते. एकी ही परस्पराच्या गरजेतून व दोघांचेही न्याय हक्क रक्षण करण्याच्या तत्वातून निर्माण होते, ही गोष्ट काँग्रेसने विचारात घेतली नाही. अनुनय करण्याच्या प्रवृत्तीतून अडवणुकीची प्रवृत्ती निर्माण होते व परिणामतः अैक्य अशक्य होवून बसते. काँग्रेसने ही गोष्ट विचारात घेतली नाही. दुसऱ्या दृष्टीने मुसलमानांची एकूण राजकीय प्रवृत्ती काँग्रेसने विचारात घेतली नसल्यामुळे या प्रश्नाचे गंभीर स्वरूप त्यांना समजलेच नाही. हिंदु-मुसलमान प्रश्नाची मुळे अितिहासात आहेत, धर्मशास्त्रात आहेत या दृष्टीने या प्रश्नाकडे काँग्रेसने कधीही पाहिले नाही. याचा परिणाम असा झाला की, काँग्रेसच्या अनुनयाच्या धोरणामुळे हिंदु–मुस्लीम प्रश्न अधिकच बिकट होवून बसला.

संरक्षणाची हमी

हिंदुमुसलमानासंबंधात अगदी काटेकोर तराजू घेवूनच सावरकर बसले आहेत, असेही नाही. अैक्यासाठी मुसलमानांची प्रामाणिक मागणी असेल तर आपले काही न्याय हक्क सुद्धा सोडून द्यायला सावरकर तयार आहेत. कलकत्त्याच्या अध्यक्षीय भाषणात ते म्हणाले [२] "धर्म नि जात याचा भेदाभेद न करता सर्वांची

हक्क कर्तव्ये सारखी मानली म्हणजे त्यानंतर अल्पसंख्याच्या अधिक काही अधिकाराचा उच्चार करणेही अनवश्यक, इतकेच नव्हे तर, आत्मविरोधी. तरीही व्यावहारिक राजकीय धोरणीपणा म्हणून नि आमच्या अहिंदूदेशबांधवाचे संशयाचे भूतही उठू नये असे हिंदुसंघटकांना वाटते, म्हणून आम्ही हेही स्पष्ट करण्यास सिद्ध आहो की, धर्म, संस्कृति नि भाषा या संबंधाच्या अल्पसंख्याचे न्याय अधिकाराविषयी उल्लेखपूर्वक निश्चिती करण्यात येईल. याला अट मात्र अितकीच की, तत्सदृश बहुसंख्याचे समान अधिकार आहेत, त्यास बाध आणता येणार नाही किंवा त्यावर आक्रमणही करता येणार नाही. प्रत्येक अल्पसंख्य वर्गास आपल्या भाषेचे आपल्या मुलांना शिक्षण देण्यासाठी शाळा काढता येतील आणि धार्मिक आणि सांस्कृतिक संस्था चालविता येतील. त्यांना राज्याकडून आर्थिक अंशही मिळेल." आपली स्वतंत्र भारताची राज्यघटनाही यापेक्षा अधिक अधिकार अल्पसंख्याना देत नाही, हे लक्षात घेतले पाहिजे.

त्याच भाषणात विभक्त मतदारसंघाबद्दल ते म्हणाले, [3] "याच्याही भरीला, जरी 'प्रत्येकी एकमत' या निर्भेळ राष्ट्रीय तत्वानुसार संयुक्त मतदारसंघावर राज्यघटना न आधारता 'जातीय विभागणीचे' तत्व मानले, तरी अल्पसंख्याकांना विभक्त मतदारसंघ नि राखीव प्रतिनिधीसंख्या पाहिजे असेल त्यांना ती मिळेल, मात्र केवळ त्यांच्या संख्येचे प्रमाणात आणि याच अटीवर की, यथाप्रमाण प्रतिनिधित्वाच्या बहुसंख्याच्या अधिकाराला बाध येता कामा नये." सावरकर अहिंदूकरिता राखीव मतदारसंघ मान्य करत आहेत. त्यांचा धर्म, भाषा व संस्कृतीच्या संरक्षणाची हमीही देत आहेत. राष्ट्रसंघानी (League of Nations) मान्य केलेली योग्य व न्याय संरक्षण बंधने अहिंदूना देण्यात ते नेहमीच तयार होते.

डॉ. आंबेडकरांची टीका

पण मुसलमानांचे यामुळे समाधान होत नव्हते. मुसलमान आपल्या मागण्या कशा चढत्या क्रमाने वाढवित होते याचा आढावा डॉ. आंबेडकरांनीच आपल्या 'पाकिस्तान' या ग्रंथात घेतलेला आहे. या संबंधीचे एक स्वतंत्र प्रकरणच त्यांनी लिहिले आहे. मुस्लिमांच्या राजकीय मागण्याची सुरवात १८९२ साली झाली. १८९२ च्या इंडियन कौन्सिल अॅक्टमध्ये प्रथमच त्यांच्याकरिता वेगळचा प्रतिनिधित्वाचा अधिकार देण्यात आला. त्यामुळे त्यांना वेगळचा प्रतिनिधित्वाची किंमत कळाली. नंतर १९०९ सालच्या मॉर्लेमिंटो सुधारणेच्या वेळेस त्यांनी आपल्या मागण्यात वाढ केली. जिल्हापरिषद, नगरपालिका, विद्यापीठे इत्यादीवर मुसलमानांचे प्रतिनिधी घेण्याची मागणी करण्यात आली. लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा अधिक प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार त्यांना हवा होता. १९०९ च्या सुधारित कायद्यात या सर्व मागण्या मान्य करण्यात आल्या. या कायद्यान्वये मुसलमानांना

स्वतंत्र मतदारसंघ देण्यात आले.

१९१६ साली हिंदु–मुसलमान समझोत्याचा लखनौ–करार झाला. १९०९ च्या विभक्त मतदार संघावर शिक्का मोर्तब करण्यात आले. या करारानुसार सर्वश्रेष्ठ कायदेमंमळात $\frac{1}{3}$ सदस्य मुसलमान असले पाहिजेत, असे मान्य करण्यात आले. ते स्वतंत्र मतदार पद्धतीने निवडावेत असेही ठरले. या मागण्याचा स्वीकार १९१९ च्या कायद्यात केला गेला. हिंदूच्या वतीने काँग्रेस या वाटाघाटी करीत होती.

एकतृतीअंश

१९२७ साली घटनेत सुधारणा करण्यासाठी सायमन कमिशन नेमण्यात आले. मुसलमानांच्या विविध संघटनेतर्फे विविध मागण्या मांडण्यात आल्या. मुस्लीम लीगच्या वतीने जिनांनी आपल्या १५ मागण्या मांडल्या. केंद्रीय कायदेमंडळात मुस्लीम प्रतिनिधित्व ३३ टक्के पेक्षा कमी नसावे; स्वतंत्र मतदारसंघ चालू ठेवावेत– या जुन्या मागण्या पुन्हा मांडण्यात आल्या केंद्रीय व प्रांतीय मंत्रिमंडळात कमीत कमी ३३ टक्के मुस्लीम मंत्री असावेत, अशी नवी मागणी करण्यात आली. पंजाब, बंगाल आणि सीमाप्रांत हे मुस्लीम बहुसंख्याचे प्रांत होते. या प्रांतातील मुसलमानांची बहुसंख्या घटू नये अशा पद्धतीने लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व देण्यात यावे, अशी नवीन मागणी जिनांनी केली. या मागणीचा अर्थ, बहुसंख्यांकाच्या जागा लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव कराव्यात असा होतो. कोणताही कायदा $\frac{1}{3}$ सदस्यानी विरोध केल्यास पारित होवू नये अशीही मागणी करण्यात आली. वरील ३३ टक्के राखीव प्रतिनिधित्वाची मागणी नि हा तेवढ्याच प्रमाणाचा व्हेटोचा अधिकार याचा एकत्रित विचार केल्यास कोणताही कायदा मुसलमानांच्या संमतीशिवाय पारित होवू नये अशी ही मागणी आहे. सिंध मुंबईपासून वेगळा करण्याची मागणी करण्यात आली. कमिशनने या मागण्या अवाजवी आहेत म्हणून स्वीकारल्या नाहीत. मात्र ब्रिटीश सरकारनी वेगवेगळ्या स्वरुपात या मागण्या मान्य केल्या. लोकसेवेच्या २५ टक्के जागा त्यांच्या करिता राखीव करण्यात आल्या. सावरकर राजकारणात येण्यापूर्वीच्याच या घटना आहेत.

आता ५० टक्के

१९३८ मध्ये जिनांनी आपल्या मागण्यात पुन्हा वाढ केली. काही मागण्या अशा : मुसलमानांना गोवधाचे स्वातंत्र्य असावे. वंदेमातरम गीताचा त्याग करण्यात यावा. उर्दू भाषेला राष्ट्रभाषेचा दर्जा द्यावा. घटनेद्वारा मुस्लिमांना कायदा व संस्कृतीची हमी. प्रांताची पुनर्रचना केली तरी सध्याच्या मुसलमानांच्या बहुमतावर कोणताच परिणाम होता कामा नये. मुस्लीम लीगला मुसलमानांची अधिकृत प्रतिनिधी म्हणून मान्यता द्यावी. प्रत्येक क्षेत्रात त्यांना ५० टक्के वाटा मिळाला

पाहिजे, अशी नवी मागणी करण्यास आली. या साऱ्या मागण्या हिंदूवर अन्याय करणाऱ्या होत्या, असे डॉ. आंबेडकरांचे सुद्धा म्हणणे आहे. मुसलमानांना ५० टक्के जागा सर्वच क्षेत्रात द्यायच्या म्हणजे उरलेल्या ८० टक्के भारतीयांना ५० टक्केवरच समाधान मानणे भाग होते. त्यात पुन्हा अहिंदू असणारे ख्रिश्चन, पारशी, ज्यू आदींना लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व द्यायचे म्हटल्यावर हिंदू हे अल्पसंख्य होणार, हे उघडच होते. सावरकर दरडोअी–एकमताचा आग्रह का धरत होते, हे यावरुन लक्षात येईल. याच परिस्थितीला सावरकर हिंदूचे हिंदुपण गमावणे, स्वत्व गमावणे, हिंदुत्व गमावणे असे म्हणतात.

या चढत्या क्रमाच्या मागण्यामुळे "मुसलमान हे आपल्या मागणीत कोठे थांबणार आहेत, हेच कळत नाही" असे डॉ. आंबेडकर म्हणतात.[४] ५० टक्केची मागणी करुन हिंदुबहुमताला अल्पमतात घालण्याचा हा प्रयत्न आहे, असा डॉ. आंबेडकरांचा आरोप आहे. फक्त २.८ कोटी मुसलमान उर्दू बोलतात. अशा उर्दूला राष्ट्रभाषा करायचे म्हणजे उरलेल्या चार कोटी मुसलमानावर किंवा ३२.२ कोटी भारतीयावर ती बळाने लादणे होय, असे मत डॉ. आबेडकरांनी व्यक्त केले आहे. मुसलमानांची ही भाषा हिटलरची आहे, अशा परखड शब्दात त्यांनी मुसलमानांच्या या मागण्यावर टीका केलेली आहे.[५]

मुस्लीम प्रवृत्ती

डॉ. आंबेडकरांनी मुसलमानांच्या या राजकीय आक्रमणाच्या तीन लक्षणीय बोष्टीची नोंद केलेली आहे. पहिली, वर सांगितल्याप्रमाणे चढत्याक्रमाने मागण्या करणे. दुसरी गोष्ट, हिंदूच्या दुर्बलतेमुळे त्यांचे शोषण करण्याची भावना मुसलमानात निर्माण होते, ही होय. तिसरी गोष्ट म्हणजे, राजनीतीत मुसलमानांनी सामूहिक आक्रमणाची पद्धती स्वीकारलेली आहे, ही होय. या तिन्हीही गोष्टीबद्दल त्यांनी स्पष्टपणे आपल्या ग्रंथात लिहिले आहे. 'हिंदू एखाद्या गोष्टीवर जर आरोप करत असतील तर मुस्लिम नीती त्यावर दृढतापूर्वक आग्रह करताना आढळते." अशा शब्दात त्यांनी हिंदु-मुस्लिमांच्या गुणवैशिष्ट्याची नोंद केलेली आहे.[६] गोवध स्वातंत्र्य व मशिदीसमोर वाद्ये वाजविण्याची मागणी या गुणाचा एक पुरावा म्हणून त्यांनी दिला आहे. आपली मागणी पूर्ण झाली नाही तर सामूहिक बंड करणे राजनीतीतील मुसलमानांचे एक युद्धकौशल्य आहे, असे डॉ. आंबेडकर म्हणतात.

मुसलमानांची ही आक्रमक भावना का वाढत गेली, याबद्दल डॉ. आंबेडकर म्हणतात,[७] "सवलती देण्याची हिंदूंची नीती होती, त्यामुळे मुसलमानांची आक्रमक भावना वाढली. आणि त्याहीपेक्षा मुसलमानांचा असा समज होता की, हिंदू विरोध करण्यास भीत असतात व त्यांची वृत्ती एका पराजित व्यक्तीप्रमाणे आहे. हा मुसलमानांचा समज फारच भयानक होता. वरील मुस्लिमांना प्रसन्न

करण्याची नीती हिंदूना अशा कचाट्यात फसविणारी आहे की, ज्याप्रमाणे हिटलरला प्रसन्न केल्यामुळेच मित्र राष्ट्रांना फार भयानक स्थितीचा सामना करावा लागलेला होता. हा दुसरा अत्याचारपूर्वक संघर्ष सामाजिक संघर्षापेक्षा काही कमी नव्हता. मुसलमानांना खूष करण्याची नीती वरीलप्रमाणे अत्याचारी संघर्षाला वाढविणारी आहे. याचा केवळ एकमेव उपाय म्हणजे 'सलोखा' करणे हाच आहे. यावर पाकिस्तान हा एक सलोखा असेल, तर त्यावर विचार करणे योग्य आहे. त्यामुळे प्रसन्न करण्याची निरंतर आवश्यकता राहणार नाही. मुसलमानांना राजनीतिक भूक आहे. त्यामुळे ते हिंदूशी अशी वर्तणूक करतात." हिंदुत्वनिष्ठ नसणाऱ्या डॉ. आंबेडकरांनी मुसलमानांसंबंधी व्यक्त केलेले हे विचार सबळ पुराव्यावर आधारलेले आहेत. त्यांना मुसलमानांचे हे हिंदूवरील 'जातीय आक्रमण' आहे, असे वाटते. त्यांच्या ग्रंथातील या प्रकरणाचे नावच 'जातीय आक्रमण' असे आहे.

खरेदी करण्याचा प्रकार

मुसलमानांना खुष करण्याचा हा आरोप काँग्रेसवर आहे, हे उघड आहे. 'मुसलमानांना राजनीतिक तसेच इतर सवलती देवून त्यांना खुश करावे अशी' काँग्रेसची नीती होती, असे आंबेडकर म्हणतात.[९] "प्रसन्न करण्याच्या नीतीचा असा अर्थ होतो की, आक्रमणकर्त्यांनी त्यांच्या नामर्जीमुळे केलेली निर्दोष व्यक्तींची हिंसा, बलत्कार करणे, जाळपोळी आणि लुटमारी विरूद्ध दुर्लक्ष करुन त्यांना खरेदी करणेच होय" असे डॉ. आंबेडकर म्हणतात. सावरकर आणि आंबेडकर यांची हिंदु-मुस्लीम प्रश्नाची कारणमिमांसा सारखीच आहे. मुसलमानांच्या प्रवृत्तीविषयी व मुसलमानांविषयीच्या काँग्रेसच्या धोरणाविषयी त्यांनी सारखीच कारणमिमांसा व टीका केलेली आहे. फरक एवढाच आहे की, हिंदु-मुस्लीम प्रश्नाचे उत्तर पाकिस्तान हे असू शकते असे डॉ. आंबेडकर म्हणतात व सावरकरांना ते मान्य नाही. हिंदुत्वनिष्ठ नसणाऱ्या अनेक विचारवंतानी याच प्रकारे हिंदु-मुस्लिम प्रश्नांची कारणमिमांसा केलेली आहे. हे सारे पाहिल्यावर व हिंदूचा आता कोणीही वाली नाही, हे ओळखून सावरकरांनी आग्रहाने हिंदूचा पक्ष घेतलेला आहे, हे समजून घेणे भाग आहे. येथे प्रश्न धर्माचा नव्हता, धर्मश्रद्धेचा नव्हता, धार्मिक राजकारणाचाही नव्हता, तर हिंदू नावाच्या लोकांचे न्याय्य हक्करक्षण करण्याचा होता, हे समजून घेतले पाहिजे.

काँग्रेसचे मुस्लीम धोरणही आपण समजून घेतले पाहिजे. हिंदु-मुस्लीम ऐक्यशिवाय स्वराज्य नाही, ही गांधीजींची भूमिका होती. मुसलमानांच्या समाधानाशिवाय हिंदु–मुस्लीम ऐक्य शक्य नाही, हा मुसलमानांचा आग्रह होता. परिणामत: भारताचे स्वातंत्र्य त्यांच्या समाधानाशिवाय नाही, अशी स्थिती त्यांनी

निर्माण केली, हा इतिहास आहे. ही परिस्थिती बोलण्यात होती, वागण्यात होती. शेवटी पाकिस्तान देवून मुसलमानांचे समाधान करुनच स्वातंत्र्य मिळवावे लागले, हा अितिहास आहे. हिंदु-मुस्लीम प्रश्न सर्वसंमतीने म्हणजेच मुसलमानांच्या समाधानाप्रमाणे सुटला तरच स्वराज्याचा विचार करता येईल, अशी गांधीजीची उदार भूमिका होती. १९३१ ला गोलमेज परिषदेच्या निमित्ताने गांधीजी म्हणाले, [९] "देशात जर जातीय प्रश्न सर्वसंमतीने मिटणार नसेल, तर मी गोलमेज परिषदेत हजर राहणार नाही असे मी म्हटले होते..... सर्वसंमतीने हा प्रश्न जर मिटत नसेल तर आजच्या गोलमेज परिषदेच्या मार्गाने स्वराज्य घटना मिळविण्याची आशा काँग्रेसने सोडून द्यावी आणि शुद्ध राष्ट्रीय तोडगा मान्य करण्याच्या दृष्टीने सर्व जमातीचे समाधान होअीपर्यन्त वाट पाहावी. दरम्यानच्या काळात काँग्रेसला आपली बाजू अधिक बळकट करता येईल आणि सर्व जाती जमाती असलेल्या जनतेवर आपले लक्ष केंद्रित करुन अितर सर्व जातीजमातीच्या अहंकारी लोकांनासुद्धा हिंदूच्याप्रमाणेच काँग्रेस आपली आहे, असे वाटायला लावता येईल." १८८५ पासून १९३१ पर्यन्त ज्यांना काँग्रेस आपली वाटली नाही, त्यांना ती तशी वाटेपर्यन्त स्वराज्य लांबणीवर टाकण्याचे गांधीजीचे हे धोरण समजून घेतले पाहिजे. जिनांच्या त्या १५ मागण्यानंतरची गांधीजींची ही भूमिका आहे.

तोपर्यंत स्वराज्यच नको

गांधीजींची अशा प्रकारची प्रकट भूमिका मुसलमानांच्या मनात नव्या आशा निर्माण करीत होती, हे गांधीजींच्या कधीही लक्षात आले नाही. मुसलमानांचे समाधान कधीही होणार नाही, हे गांधीजींना कधीही कळाले नाही. "अतिशय कृत्रिम वातावरण निर्माण करुन स्वराज्य सक्तीने आणण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा काँग्रेस अितर जातीत सुद्धा हिंदुअितकीच लोकप्रिय होअीपर्यंत वाट पाहणे हे अधिक चांगले आणि अधिक वेळ वाचविणारे आहे," असे गांधीजी १९३१ सालीही म्हणत होते.[१०] वस्तुस्थितीपासून गांधीजी किती दूर होते, हे यावरुन आपल्या लक्षात येईल. मुसलमानांच्या समाधानाशी त्यांनी हिंदूचे भवितव्य जोडून दिलेले होते, ही गोष्ट सावरकरांना धोक्याची वाटत होती. स्वराज्य मिळावे म्हणून मुसलमानांच्या वाटेल त्या अटी स्वीकारणे त्यांना गुलामीचेच लक्षण वाटत होते.

मुस्लीम लीग दिवसेदिवस अधिक जातीय व अधिक आक्रमक बनत चालली. या जातियतेचे बळ कमी करण्याचा, त्या आक्रमणाला तोंड देण्याचा गांधीजींचा मार्ग त्यांच्यापुढे नमते घेणे, हाच होता. जातीय सलोखा नाही तोवर गोलमेज परिषद नाही, स्वराज्य नाही– या धोरणाचा परिणाम जातीयवादाला खतपाणी देण्यात होअील अशी शंका वर्किंग कमिटीच्या काही सभासदांनी व्यक्त केली. त्यांना उत्तर देताना गांधीजी म्हणाले,[११] "अहिंसेवरील माझ्या नितांत श्रद्धेचा अर्थ, अल्पसंख्य जमाती जेव्हा खरोखरच दुर्बळ बनतील तेव्हा त्यांच्यापुढे नमणे

ही अवश्य होता. जातियवादाचे बळ कमी करण्याचा सर्वोत्कृष्ट मार्ग त्यांच्यापुढे नमणे हाच होता. प्रतिबंधाने त्यांची संशयवृत्ती जागृत होणार होती आणि त्यांच्या विरोधाला जोर येणार होता." कितीही उदात्त हेतूनी असो, पण गांधीजींनी मुस्लीम जातियवादापुढे गुडघे टेकले होते, व याच मार्गाने त्यांचा जातियवाद आपण राष्ट्रवादात रुपांतरित करु, असा त्यांना दुर्दम्य आत्मविश्वास वाटत होता. मुसलमानांनी गांधीजीच्या या धोरणाचा फायदा न उठवला असता तरच नवल होते.

मागतील ते द्या !

अल्पसंख्य मुसलमान जे मागतील ते त्यांना देणे न्याय्यच आहे, ही गांधीजीची भूमिका होती. ती त्यांनी कधीही लपवून ठेवली नाही. गांधीजी म्हणतात, [१२] "माझी व्यक्तिगत भूमिका अशी की, ज्या अर्थी हिंदू बहुसंख्य आहेत आणि शैक्षणिकदृष्ट्या पुढारलेले आहेत, त्या अर्थी मुसलमान बंधूना जे देणे त्यांना शक्य आहे ते आनंदाने त्यांनी दिले पाहिजे. मुसलमान जे जे मागतील ते ते हिंदूनी त्यांना दिले पाहिजे (Hindus should give to Muslims whatever they ask for) आणि यासाठी जो त्याग करावा लागेल तोही केला पाहिजे, असे माझे निश्चयपूर्वक मत आहे. अशा परस्पर सद्भावनातूनच एकी होवू शकेल." गांधीजींचा हिंदु–मुस्लीम ऐक्याचा पाया हा असा आहे. सावरकर या नीतीला मुस्लिमधार्जिणेपणा म्हणतात; आंबेडकर मुसलमानांना खुष करण्याची प्रवृत्ती म्हणतात. सावरकरांचे म्हणणे किती चुकीचे आहे, हे आपण या साऱ्या पार्श्वभूमीवर समजून घेतले पाहिजे. गांधीजींच्या या भूमिकेमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीला सावरकरांची भूमिका हे उत्तर होते.

मुसलमानांनी आपल्या बरोबर यावे म्हणून प्रथम गांधीजीनी खिलापतचा प्रश्न हाती घेतला. या चळवळीत आपण मुसलमानांना पाठिंबा दिला तर हिंदु–मुस्लीम ऐक्य होअील, असा त्यांचा विश्वास होता. "हे कर्तव्य ते (हिंदू) जर न करतील तर आपल्या गुलामीचे पाश ते बळकट करतील आणि मुसलमानांची दोस्ती मिळविण्याची संधी कायमची गमावतील",[१३] अशी गांधीजींची भूमिका होती. गांधीजींची ही भूमिका चुकीची होती हे काळानेच सिद्ध केलेले आहे. हिंदु–मुस्लीम ऐक्यासाठी म्हणून स्वीकारलेला चुकीचा मार्ग त्याच ऐक्यासाठी कसे संकट होवून बसते, याचे खिलापत आंदोलन हे एक उदाहरण आहे.

खिलापतची आफत

हा खिलापत प्रश्न आपल्या राष्ट्राचा नाही, तर तुर्कस्थानातील जो खलिफा होता, त्याच्या सरंक्षणासाठी निर्माण झालेला तो राष्ट्रबाहय प्रश्न होता, अशी त्या वेळसही अनेकांनी भूमिका घेतली. धर्मदंड आणि राजदंड एकाच्याच हाती

असलेल्या तुर्कस्थानातील खिलाफत संस्थेच्या सरंक्षणासाठी ही चळवळ जगभर चालली होती. भारताच्या हिताचा या प्रश्नाशी कुठलाही संबंध नव्हता. गांधीजींचे म्हणणे असे : [१४] " प्रत्येक भल्या मुसलमानाने तुर्कस्थानची ऐहिक सत्ता कायम राहावी म्हणून झटणे आवश्यक होते, तसे जझीरत - उल - अरबवर म्हणजे अरब द्विपकल्पावर मुसलमानाचा निःसंदिग्ध ताबा आहे, हे पाहणे त्यांचे धर्मकर्तव्य आहे... ते इस्लामच्या धर्मस्थानाव . गैर–मुस्लिमांची प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सत्ता सहन करु शकत नव्हते. " मुसलमानांनी भारताच्या बाहेरच्या त्यांच्या पुण्य भूमीचीच चिंता करावी, असा हा उपदेश आहे मुसलमानांचे भक्तिकेंद्र भारतभू कशी होईल ही चिंता सावरकरांना होती. गांधीजी या खिलाफत मधून काय बाहेर पडेल याचा विचार करायला तयार नव्हते. ते म्हणाले, [१४] " खिलाफत हे हिंदुस्थानरुपी समुद्राचे मंथन करणारे फार मोठे घुसळण आहे. त्यातून काय निघणार याच्याशी आम्हाला कर्तव्य नव्हते. " ही त्यांची जाहीर भूमिका होती. दुर्दैवाने व अपरिहार्यपणे या आंदोलनातून ऐक्य तर झाले नाहीच, उलट विपरित अर्थाने मुसलमान एकसंघ झाले व आपली एकसंघ ताकद हिंदूच्या विरोधात चढत्या क्रमाच्या मागण्या मान्य करवून घेण्यासाठी वापरू लागले, हा अतिहास आहे.

खिलाफतचा अर्थ

' खिलाफत ' चा अर्थ काय हे जमियत–उल–उलेमाच्या १९२२ ला झालेल्या अधिवेशनाच्या स्वागताध्यक्षानी अधिकृतपणे सांगितले होते. ते म्हणाले, " तुर्कस्थान, अफगाणिस्तान, इराण इराक, आरेबिया इत्यादी सर्व मुसलमान राष्ट्रांनी आपली निष्ठा खलिफास वाहिली पाहिजे. सर्व राष्ट्रांचे परराष्ट्रीय धोरण ठरविण्याचा अधिकार खलिफा स्वतःकडे ठेवील व अंतर्गत कारभाराचे हक्क ज्या त्या राष्ट्राकडे परत देईल. असे केल्याने युद्धाच्या वेळी या सर्व राष्ट्राची सैन्ये इस्लामचे रक्षण करण्यासाठी एकवटता येतील. " [१५] याच भूमिकेतून मुसलमान खिलाफत चळवळीकडे पाहत होते. भारताचे परराष्ट्रधोरण भारताबाहेरील खलिफा ठरविणार व युद्धामध्ये कोणाशी लढायचे याचा आदेश सैन्याला हा खलिफा देणार, ही बाब गांधीजींना कधीही चिंतनीय वाटली नाही.

ही मुस्लीम नीती पॅनइस्लामिझमची आहे. गांधीजींना यात काहीही आक्षेपार्ह वाटत नाही. ते म्हणाले, [१६] " हिंदूनी 'पॅनइस्लामिझ'ला घाबरून जाबू नये. त्या विचारसरणीत भारताच्या किंवा हिंदूच्या विरुद्ध काही नाही– असण्याचे कारण नाही. मुसलमानांनी प्रत्येक मुस्लीम राष्ट्राचे अभिष्टचिंतन अवश्य करावे आणि एखादे मुस्लीमराष्ट्र हकनाक संकटात सापडले तर त्याला मदतही अवश्य करावी" गांधीजींच्या या भूमिकाचा अर्थ मुसलमानांनी देशबाह्यनिष्ठा ठेवायला हरकत नाही असा होतो. या संबंधी निर्मलकुमार बोसांचा अभिप्राय असा : [१७] " मुसलमानांच्या देशबाह्यनिष्ठेबद्दल सहानुभूती व्यक्त करण्यात गांधींनी बरील मान्यतेचे

(एक अलग राजकीय जमात म्हणून मानण्याचे) तर्कशुद्ध टोक गाठले होते." या दृष्टीनेच सावरकर खिलापत चळवळीला ही खिलापत नसून आफत आहे, असे म्हणत असत.

मुजुमदारांचा अभिप्राय

इतिहासकार आर. जी. मुजुमदार यांनी गांधीजीच्या या धोरणाची केलेली मिमांसा फारच बोलकी आहे. मुजूमदार म्हणतात,[१८] "या खिलापत चळवळीतून प्रेरणा घेऊन निघालेली पॅन इस्लामिक कल्पना भारतीय राष्ट्रीयत्वाच्या मूलाधारावरच आघात करणारी होती, हे जाणून घेण्यास गांधीजी अपयेशी ठरले." ते पुढे म्हणतात, "जर कोटयावधी हिंदी मुसलमान तुर्क आणि इतर मुस्लीम राष्ट्रांच्या भवितव्याची चिंता करत असतील, तर भारतराष्ट्राचे एक घटक म्हणून त्यांना मानता येणे कठीण आहे. खिलापत प्रश्न हा भारतीय मुस्लिमांकरिता ज्वलंत प्रश्न आहे, हे मान्य केल्यामुळे गांधीजीनी एका दृष्टीने यालाही मान्यता दिलेली आहे की, 'मुसलमान हे स्वतंत्र राष्ट्र आहेत; ते भारतात राहतात, पण भारताचे नाहीत.'" सावरकरांनी कोणत्या परिस्थितीत हिंदूचा पक्ष घेतला हे समजून घेण्यासाठी गांधीजीची ही भूमिका लक्षात घेणे जरुर आहे. 'पुण्यभू' शब्दाचा संदर्भ सावरकर याच कारणासाठी घेतात हे समजून घेतले पाहिजे.

करार अमान्य

हिंदु-मुस्लीम ऐक्याच्या कोणत्या अटी राहाव्यात हे गांधीजींना मान्य नव्हते. सहकार्यासाठी किंवा एकीसाठी दुसऱ्याकडून अपेक्षा करायची नसते, हे सांगताना गांधीजी म्हणतात,[१९] "हिंदू बहुसंख्य असल्यामुळे त्यांनी सौदा करायचा नाही, असे ठरवावे. आणि सच्च्या दिलाच्या कोणाही मुसलमान पुढाऱ्याच्या हाती जे काय करायचे ते करण्याचे सोपवून द्यावे. हीच रीत इतर जमाती साठीही वागण्याच्या बाबतीत वापरावी. हाच एक सरळ, न्याय्य, सन्मान्य... बहुसंख्याकांनी अगोदर त्याचा आरंभ करुन अशा रितीने आपल्या प्रामाणिक हेतूसंबंधी अल्पसंख्यांक लोकामध्ये विश्वास उत्पन्न करणे योग्य होय." याच धोरणानुसार ते मुसलमानांबरोबर वागत होते. बंधू व मित्राबरोबर करार करणे योग्य नव्हे असे ते म्हणत. त्यांची भूमिका अशी :[२०] "मित्रत्वाची परीक्षा कोणत्याही अटीशिवाय संकटकालीन मदतीवरुन जाणली जाते. सहयोगाकरिता विचार करण्याची आवश्यकता भासणे हा व्यापारिक करार होतो, मैत्री नव्हे! अटी असलेला सहयोग हा भेसळ सिमेंट प्रमाणे असतो. त्यावर इमारत बांधणे अशक्य असते." गांधीजी मुसलमानांना बंधू मानतात, मित्र मानतात– त्यामुळे त्यांच्याशी करार करणे त्यांना पसंत नाही. ते जे मागतील ते देणे हिंदूचे परमकर्तव्य आहे, असे ते मानतात. जसे मानतात तसेच वागतात.

एकतर्फी प्रयोग

मुसलमानांचा प्रतिसहकार होत नसला तरी आपले कर्तव्य चालूच ठेवावे हे सांगताना ते म्हणतात[२१] "माझे आणखी असे मत आहे की, जरी दोन्हीपैकी एका पक्षाने आपले कर्तव्य केले नाही तरी दुसऱ्या पक्षाने आपले कर्तव्य करावे." एकीतला आपला वाटा कसा उचलायचा हे मुसलमानांच्या मनावर सोडून देण्यास ते सांगतात. ते आपला वाटा उचलणार नाहीत याबद्दल संशय घेणे, अयोग्य आहे, असे म्हणतात. हिंदूनी आपले कर्तव्य निमूटपणे पाळावे असा त्यांचा उपदेश आहे. यासाठीच खिलाफतच्या प्रसंगी गोवध करू नका अशी अट ते घालू देत नाहीत. मुसलमानांनी खिलाफत प्रश्नाच्या बाबतीत हिंदूचा पाठींबा मिळविण्यासाठी किंमत म्हणून गोहत्त्या थांबवू असे म्हणणे (त्यांना) शोभणारे नाही' असे गांधीजी म्हणत.[२२] १९२८ च्या मद्रास काँग्रेसच्या वेळेस विषय नियामक समितीने काँग्रेस पुढे पुढील ठराव मंजूर करुन विचारार्थ ठेवला होता. मुसलमानांना गोवध करण्याचा पूर्ण हक्क असून ते त्यांना वाटेल तिथे लोकांना दिसणार नाही अशा रितीने गोवध करु शकतात, असा हा ठराव होता. ही माहिती राजेंद्रप्रसादांनी आपल्या आत्मचरित्रात दिली आहे.[३२] हिंदु-मुस्लीम एकीचे हे सारे प्रयोग असे एकतर्फीच चाललेले होते.

१९३७ मध्ये काँग्रेसने वंदेमातरम् गीतात कपात करून पहिले दोन कडवे म्हणावीत असा ठराव केला. गांधीजीनी याहीपुढे जावून जाहीर केले की, हिंदु-मुसलमान संयुक्त मेळावा असेल तेव्हा जर कुणी आक्षेप घेतला, तर कापाकापी केलेले हे वंदे मातरम गीतही म्हटले जावू नये.[२४] मुसलमानांची उर्दू विषयीची भावना लक्षात घेवून काँग्रेसच्या घटनेमध्ये जिथे भाषेचा निर्देश केला आहे, तिथे 'हिंदी' किंवा 'उर्दू' असा कोणताही शब्द न वापरता 'हिंदुस्थानी' हा शब्द वापरण्यात आलेला आहे.

हा शब्द गांधीजीच्या सांगण्यावरून आला आहे, असे डॉ. राजेंद्रप्रसाद म्हणतात.[२५] यासाठी हिंदी आणि उर्दू ही एकाच भाषेची दोन नावे आहेत किंवा रुपे आहेत, त्या दोन वेगळ्या भाषा नाहीत, अशी मुसलमानांना अनुकूल भूमिका घेतली होती. भारताच्या राष्ट्रभाषेला हिंदी म्हणावे, हिंदुस्थानी म्हणावे किंवा उर्दू म्हणावे– ही एकच भाषा असल्यामुळे काही फरक पडत नाही, असे राजेंद्रप्रसादांनी म्हटले आहे.[२६] प्रत्येक ठिकाणी मुसलमानांचे मन कसे दुखवणार नाही, याचीच चिंता व काळजी घेतलेली आहे. हिंदू नावाच्या लोकांना मन असते याचा विचारच कुणी केला नाही. असा कुणी प्रश्न विचारला, तर गांधीजी म्हणतात,[२७]"पण हिंदू मन म्हणजे काय? मीच. हिंदू मन जाणण्यासाठी हिंदूच्या मध्ये राहण्याची मला गरज नाही, माझ्या रक्ताचा बिंदू न बिंदू हिंदू आहे."अशी भूमिका असणाऱ्या गांधीजीच्या हातात हिंदूचे भवितव्य एकवटले होते, यासाठीच सावरकरांनी हिंदुत्वाची किंकाळी फोडलेली आहे, हे समजून घेतले

पाहिजे, असे आमचे म्हणणे आहे.

अफगाणिस्तानचा अमीर

कमालपाशाने तुर्कस्थानात खिलापत ही संस्थाच रद्द करुन टाकली नि चळवळीचा पायाच नष्ट झाला. वैफल्यग्रस्त झालेले मुसलमान पुढारी म्हणू लागले की, अफगाणिस्तानच्या अमिराला भारतावर आक्रमण करण्याचे व अिंग्रजाना हाकलून द्यायचे आमंत्रण द्यावे. मुसलमानांच्या मनात अिस्लामचे या मार्गाने भारतात राज्य स्थापावे असे होते. गांधीजींनीही या योजनेला पाठिंबा दिलेला होता, हे अितिहासात नमूद आहे, 'पाकिस्तान' या ग्रंथात या संबंधी डॉ. आंबेडकर लिहितात, [२८] "भारतावरील आक्रमणाची युक्ती महान धोकादायक होती, असे म्हणण्याची काही आवश्यकता नाही. आणि प्रत्येक शहाणा भारतीय अशा पागलपणाच्या युक्तीपासून दूरच राहील. महात्मा गांधीनी या योजनेत कोणता भाग घेतला हे जाणणे शक्य नाही. परंतु निश्चित् ते या योजनेशी असंबंधित नव्हते. या उलट दिशाभूल करणारा उत्साह आणि हिंदु–मुस्लीम एकतेच्या कल्पनेला स्वराज्य प्राप्तीचे साधन समजून त्यांनी वरील योजनेचे समर्थन केले..... त्यांनी अशी घोषणा केली की– 'मी एक प्रकारे निश्चितपणे अफगाणिस्थानच्या अमिराला मदत करीन, जर ते ब्रिटिश सरकार विरुद्ध युद्ध करण्यास तयार होअील. अर्थात् मी आपल्या देशबंधूना उघडपणे आवाहन करीन की, ज्या सरकारने जनतेचा विश्वास गमावला आहे, अशा सरकारला मदत करणे घोर अपराध आहे."

आंबेडकरांची टीका

हे सांगून डॉ. आंबेडकर म्हणतात, [२९] "हिंदु–मुस्लीम अैक्य व्हावे म्हणून कोणताही शहाणा मनुष्य येथपर्यंत जावू शकतो काय ? परंतु महात्मा गांधी हिंदु–मुस्लीम अैक्याकरिता अितके व्यस्त झाले होते की, या वेडेपणात ते काय करीत आहेत याचा विचार करायला ते जराही थांबायला तयार नव्हते." गांधीजींची ही सारी हिंदु–मुस्लीम अैक्याची भूमिका न्याय्य होती काय, राष्ट्रीय होती काय– याचा आपण सर्वांनी गंभीरपणे विचार केला पाहिजे. त्यांच्या मनातील हेतूचा अत्यादर करुनही आपल्याला हे मान्य करणे भाग आहे, की गांधीजींचा हा मार्गच पूर्णपणे चुकीचा होता. तो केवळ हिंदूवर अन्याय करण्यापुरताच चुकीचा नव्हता, तर हिंदु–मुस्लीम अैक्याच्या दृष्टीनेही चुकीचा होता. गांधीजीच्या या धोरणाचा सावरकरांना कडवे हिंदुत्ववादी बनविण्यामध्ये फार मोठा वाटा आहे.

अैक्याची किंमत

अितकी काळजी घेवूनही व किंमत देवूनही मुसलमानांना काँग्रेस बरोबर आणण्यात गांधीजींना दारुण अपयश आले. हिंदु–मुस्लीम अैक्यासंबंधीच्या एका प्रश्नाला उत्तर देताना १९४६ मध्ये गांधीजी म्हणाले, [३०] "I must own

defeat on that Point." तरीही गांधीजी हिंदूना उपदेश करताना म्हणाले,[३०] "(the unity) would be a present possibility if Hindus in their lakhs offered themselves to be cut to pieces without retaliation or anger in their hearts" (भावार्थ : हे ऐक्य अद्यापही शक्य आहे, मात्र त्यासाठी मनामध्ये राग वा सूडाची कोणतीही भावना न धरता लाखोंच्या संख्येनी हिंदूनी स्वत:हून बळी जायला तयार असले पाहिजे.) हिंदु-मुस्लीम ऐक्यासाठी असल्या शूराच्या अहिंसेची किंमत मोजायला सावरकर तयार नव्हते. डॉ. आंबेडकरांनी म्हटल्या प्रमाणे हिंदूच्या आत्मबलिदानातून गांधीजींना हिंदु-मुस्लीम ऐक्य घडवून आणायचे होते. हा आत्मबलिदानाचा मार्ग ज्यांना अन्यायकारक वाटला त्यांना आपण अराष्ट्रीय व जातीय म्हणणार आहोत काय, याचाही आपण विचार केला पाहिजे.

खिलाफत चळवळीपासून तो पाकिस्तान मान्य करीपर्यंत गांधीजींचे हे मुस्लीम पक्षपाती व हिंदूना बिनतक्रार आत्मबलिदान करायला लावणारे उदार धोरण प्रत्येक प्रसंगी अबाधित राहिलेले आहे. 'मी बहुतेक मुसलमानांपेक्षा अधिक सच्चा मुसलमान आहे, असे अनेक धार्मिक मुसलमानांनी माझ्याकडे बोलून दाखविले आहे' याचा गांधीजींना अभिमान वाटे.[३१] ते हिंदूना उपदेश करीत, "हिंदूनी मुसलमानांना सांगून टाकावे की, 'तुम्ही अधिकारपदाचा लुटीचा हवा तेवढा वाटा घ्या. आम्ही तुमची सेवाचाकरी करण्यात संतोष मानू.'"[३१] गांधीजी म्हणत असत,[३१] "हिंदू म्हणून मला हे ठाऊक असायला हवे की, लवादाने मुसलमानांना प्रत्येक प्रांतात बहुसंख्य अधिकारपदे देवून टाकली तरी त्यात माझे काडीमात्र नुकसान नाही."[३१] गांधीजीचे नेहमी म्हणणे असे की,[३१] "व्यक्तिश: माझे पुरते सांगायचे तर मुसलमानांना ज्याचा विरोध आहे, अशी कोणतीही गोष्ट मला नको."

गांधीजी हे सारे आध्यात्मिक भाषेत वा क्षेत्रात बोलत नव्हते, तर व्यावहारिक भाषेत व राजकीय क्षेत्रात व तोही जीवन मरणाचा कसोटीचा क्षण निर्माण झाला असताना बोलत होते. ते गंभीरपणे बोलत होते, बोलल्याप्रमाणे वागत होते, काँग्रेसला वागायला भाग पाडत होते. काडीचाही प्रतिसाद कधीही मुसलमानांकडून मिळाला नसतानाही २८ वर्षे ते आपल्या या लाडक्या सिद्धांतापासून क्षणभरही विचलित झाले नाहीत. हे धोरण कुणालाही चिंतनीय वाटावे असेच होते. अशा स्वरुपाची एकी म्हणजे आपले स्वत्व विकून केलेला सौदा होय, अशी सावरकरांची तक्रार होती. हिंदूचा पक्ष घेणे म्हणूनच त्यांना न्यायाचे वाटले.

मुस्लीम राज्याला पाठिंबा

मुसलमानांचे राज्य हेही स्वराज्यच आहे, यावरच गांधीजींची प्रामाणिक श्रद्धा होती. ब्रिटीशानी मुस्लीम लीगकडे सत्ता सुपूर्द करुन निघून जावे, असा

पर्याय तै गंभीरपणे सुचवित. १९४२ मध्ये जिनाला पाठविलेल्या एका पत्रामध्ये गांधीजी म्हणतात, [३२] "ब्रिटीश सरकारने सर्व भारतीयांच्या वतीने मुस्लीम लीग कडे सत्ता हस्तांतरीत केली तर त्याला आमचा विरोध असणार नाही. मुस्लीम लीगने सर्व भारतीयांच्या वतीने बनविलेल्या सरकारला काँग्रेस अडथळा तर करणार नाहीच, उलट त्या सरकारात ती सहभागीही होअील. आम्ही हे अत्यंत विचारपूर्वक व प्रामाणिकपणे (in all seriousness and sincerity) सांगत आहोत." नेहरुंना ही योजना पसंत पडली नाही. डॉ. लोहियांनी 'फाळणीचे गुन्हेगार' या पुस्तकात याबद्दल नेहरु–पटेलांना दोष दिला आहे. ही उदात्त योजना त्यांना झेपणेच शक्य नव्हते, असे त्यांचे म्हणणे आहे. सावरकरांच्या मते एडवर्ड जावून औरंगजेब येण्याचा हा प्रकार आहे.

मुसलमानांची अिच्छा नसेल तर त्यांच्या अिच्छेविरुद्ध दंडशक्तीच्या जोरावर एकत्र ठेवण्याची काँग्रेसची अिच्छा नव्हती. १९४० मध्ये एका प्रश्नाला उत्तर देताना गांधीजी म्हणाले,[३३] "भारतीय मुस्लिमांच्या प्रबल अिच्छेला दंडशक्तीच्या जोरावर काँग्रेस विरोध करणार नाही. फाळणी रोखण्यासाठी ब्रिटीशाची मदत आम्ही कदापी घेणार नाही. मुसलमान हे स्वत: एकटे किंवा ब्रिटीशाच्या मदतीने विरोधशून्य भारतावर आपली अिच्छा लादण्यास मुक्त आहेत." याचा स्पष्ट अर्थ, पाकिस्तान होणे वा न होणे ही केवळ मुसलमानांच्या अिच्छेची गोष्ट आहे; ते म्हणतच असतील तर ते दिल्याशिवाय भाग नाही, असा आहे. ही भूमिका काँग्रेसने सातत्याने घेतलेली आहे.

हेही स्वराज्यच !

पाकिस्तान होवू देण्यापेक्षा मुस्लीम लीगच्याच हातात भारत द्यावा, असे गांधीजींचे मत होते. ते म्हणतात, [३३] "काँग्रेसला माझे मत पटवून देण्यात जर मला यश आले, तर मुसलमानांना बळ वापरण्याची पाळीच येणार नाही. मी त्यांना माझ्यावर खुशाल राज्य करु देअीन. कारण त्यांचे राज्य भारतीय राज्यच असणार आहे." ही गोष्ट काँग्रेसला कशी पटवून द्यावी याची गांधीजींना चिंता होती. दूरदृष्टी व विशाल अंत:करण नसणाऱ्या अितर काँग्रेस नेत्यांना गांधीजींची ही योजना धोकादायक वाटत होती. 'I would any day prefer Muslim Rule to British Rule'[३४] ही त्यांची घोषणा त्यांच्या अनुयायांना पसंत पडत नव्हती. सावरकरांचे म्हणणे असे की, हिंदूच्या दृष्टीने ब्रिटीश राज्य नि मुस्लीम राज्य हे सारखेच आहेत.

मुस्लीम राज्याचा पर्याय काँग्रेसमध्ये मंजूर होत नाही हे लक्षात आल्यावर ते राज्य आणण्याच्या अितर शक्यतेचाही गांधीजी विचार करु लागले. पाकिस्तान आता रोखता येणे शक्य नाही, हे गांधीजींना कळून चूकले होते. ते रोखण्याचा एकमेव पर्याय त्यांच्यासमोर मुस्लीम राज्याचा होता. १९४० नंतर ते याचदृष्टीने

बोलत असलेले दिसतील. दंडशक्तीच्या व हिंसेच्या मार्गाने प्रश्न सोडविणे पसंत नसले, तरी या मार्गाने जाण्याला ते त्यांना अनुज्ञा देतात. बळाने पाकिस्तान रोखणे त्यांना मान्य नाही; पण बळाने ते लादणे त्यांना मान्य आहे. पाकिस्तान हे एक असत्य आहे असे गांधीजी म्हणत, पण तो मागण्याचा मुसलमानांचा हक्क ते मान्य करीत. फाळणी होवू नये असे त्यांना मनातून वाटे, पण ते रोखणे फक्त मुसलमानांच्या हातात आहे असे ते म्हणत. हे रोखण्यासाठी मुस्लीम राज्याचा पर्याय ते गंभीरपणे मांडतात. हे राज्य हिंदू देत नसतील, तर शेजारच्या मुस्लीम राष्ट्राची व सरहद्दीवरील टोळ्यांची सैनिकी मदत घेवूनही मुस्लिमांनी असे राज्य स्थापन करायला हरकत नाही, असे ते गंभीरपणे म्हणत.

निजामाचे राज्य

१९४० मध्ये हैद्राबादसंबंधीच्या एका लेखात गांधीजी म्हणाले की, जर भारताला सैनिकबळाबर स्वातंत्र्य मिळाले तर भारतातील सर्वात मोठी शक्ती असलेल्या निजामाकडेच ती सत्ता जावू उकेल.[३५] संशस्त्रक्रांतीने मिळालेल्या स्वातंत्र्याचा लाभ निजामाला द्यायला गांधीजी तयार आहेत, गांधीजी पुढे म्हणतात,[३६] "देशावर ब्रिटीशाचे किंवा कोणाही परक्याचे सुव्यवस्थित असलेले राज्य चालवण्यापेक्षा मला येथे अराजकता माजलेली अधिक परवडेल. समजा, या देशातील संस्थानिकांनी निजामची मांडलिकी पत्करून किंवा निजामाला समसीमेवरील मुसलमानी टोळ्यांनी पाठिबा देवून जर हिंदुस्थानात निजामचे राज्य स्थापन होत असेल, तर तसल्या अराजकतेचे मी स्वागत करीन." हे स्वागत करण्याचे कारण 'हे शंभर टक्के स्वराज्य होय, होमरूलच होय' असे त्यांचे मत होते. सरसीमेवरील टोळ्यांच्या मदतीने जर बंड करून भारताची गादी निजामाला मिळाली तर गांधीजींना ते स्वराज्यच वाटते, हे समजून घेतले पाहिजे. मुसलमानांच्या हितासाठी केलेली हिंसा गांधीजींना कधीही निषेधार्ह वाटलेली नाही. हिंदु-मुस्लीम प्रश्न सोडविण्यासाठी गांधीजी कोणत्या थराला जात होते, हे समजून घेतले पाहिजे. गांधीजींच्या या धोरणामुळे भारतात मुस्लिम-राज्याचा केव्हाही धोका आहे, हेच सावरकर सातत्याने सांगत होते.

सावरकरांसमोरचे चित्र

सावरकर जेव्हा राजकरणात आले तेव्हा त्यांच्यासमोर ही अशी परिस्थिती होती. पाकिस्तान तरी होणार किंवा मुस्लीम राज्य तरी येणार याची ते सातत्याने भीती व्यक्त करीत होते. त्यांच्या समोरचा प्रश्न मुसलमानांना हिंदूपेक्षा काही हक्क द्यावेत हा नव्हता, तर या देशात हिंदूनी दुय्यम प्रतीचे नागरिक राहू नये हा होता. देशाचे स्वराज्य म्हणजे कुणाचे स्वराज्य असे प्रश्न ते उपस्थित करु लागले. हिंदु-मुसलमान सर्वांचेच स्वराज्य हवे असे ते म्हणू लागले. गांधीजींच्या

कल्पनेत मुसलमानांचे स्वराज्य हेच सर्वांचे स्वराज्य होते. याचमुळे अफगाणिस्तानच्या अमिराच्या भारतावरील आक्रमणाची कल्पना वा मुस्लीम लीगच्या हातात सर्व सत्ता देण्याचा पर्याय त्यांना कधीही आक्षेपार्ह वाटत नाही– उलट तोही स्वराज्याचा मार्ग आहे असे त्यांना वाटलेले आहे. त्यांच्या राजकारणाची सारी वाटचाल याच धोरणाने चालू होती.

आता प्रश्न आहे की, या धोरणाला प्राणपणाने विरोध करणे हे जातीय होते काय ? अराष्ट्रीय होते काय ? गांधीजींची ही भूमिका मान्य असणे यालाच धर्मनिरपेक्ष व राष्ट्रीय म्हणायचे काय ? ब्रिटीश राज्यापेक्षा मुस्लीम राज्य चांगले आहे हे पसंत नसण्याचा हक्क बुद्धिवाद्याला नाही काय ? ब्रिटीश राज्यापेक्षा मुस्लीम राज्य चांगले असे गांधीजी म्हणत नि या मुस्लीम राज्यापेक्षा हिंदुराज्य अधिक चांगले असे सावरकर म्हणत. हिंदीराज्य हवे का नको हा वाद नव्हताच ! हिंदी राज्याच्या नावाखाली मुस्लीम राज्य आणायचे का नाही, हा खरा वाद होता. हिंदूंच्या हक्काचे प्रश्न सावरकर अशा परिस्थितीत उपस्थित करतात. हा देश कोणाचा आहे, असा सवाल टाकतात. तो सवाल टाकण्यामागे मुसलमानांचा हा देश नाही असे त्यांना म्हणायचे नसते, तर हिंदूना या देशात काही किंमत आहे की नाही, हे त्यांना विचारायचे असते.

खरा प्रश्न

त्यांच्या समोरचा खरा प्रश्न हिंदीराज्य का हिंदुराज्य असा नव्हता, तर हिंदीराज्य का मुस्लीम राज्य असा होता. आणि मुसलमान हे दंड थोपटून हिंदूच्याही, म्हणजे समान न्यायावर आधारलेल्या हिंदीराज्याच्याही, विरोधात उभे टाकले होते– यामुळे हिंदीराज्याचा प्रत्यक्षातील अर्थ हिंदुराज्य असाच होता. त्यामुळेच सावरकर म्हणतात,[३६] "जो पर्यंत मुसलमान साहाय्य करीत नाहीत, तोपर्यंत 'राष्ट्र' याचा अर्थ 'हिंदुराष्ट्र' असाच समजा." गांधीजींची ही भूमिका सावरकरांच्या हिंदुराष्ट्रवादाचे एक प्रमुख कारण आहे, हे समजून घेतले पाहिजे. समान न्यायाची भूमिका काँग्रेस घेत असती, तर मी काँग्रेसमध्येच गेलो असतो असे ते जे म्हणतात त्याचा अर्थ हाच आहे. अशा या परिस्थितीत हिंदूचे राष्ट्रीय हक्क सुरक्षित ठेवणे आपले कर्तव्य आहे, असे ठरवूनच त्यांनी गांधीजींना व मुसलमानांना उत्तर देण्यासाठी हिंदुराष्ट्रवादाचा पुरस्कार केलेला आहे, हे समजून घेतले पाहिजे. बुद्धीला अन्याय दिसला तर त्याच्या विरोधात उभे टाकणे बुद्धिवाद्याचे कर्तव्य आहे हेही समजून घेतले पाहिजे. समाजीक हिंदीराज्याचा गाडा समान हक्काची सीमा ओलांडून ब्रिटीश राज्यातून मुस्लीम राज्याकडे मुसलमान ओढून नेत होते; गांधीजी त्याला हिरवा कंदिल दाखवित होते, ही गोष्ट सावरकरांना धोकादायक वाटली. या गोष्टीला विरोध करणे बुद्धिवादाशी सुसंगतच होते, असेच कुणालाही म्हणावे लागेल.

गांधीजींचा व काँग्रेसचा हा मुस्लिमधार्जिणेपणा हिंदुत्वनिष्ठ मंडळीचा एक महत्वाचा मुद्दा असतो. सावरकरांच्या हिंदुत्वनिष्ठेचे ५० टक्के कारण तर गांधीजींची ही भूमिकाच होती. गांधीजीची ही मुस्लीम पक्षपाती भूमिका अितकी स्पष्ट असतानाही ती तशी नव्हतीच, असेही काही विचारवंत पटवून देण्याचा प्रयत्न करतात. गांधीजींचीच भूमिका योग्य व न्याय्य होती हे मान्य केले की, सावरकरांच्या हिंदुत्वाचे अर्धे कारण संपून जाते. गांधीजींची बाजू योग्य होती हे पटवून देणाऱ्या प्रा. नरहर कुरुंदकरांच्या युक्तिवादाचा आपण येथे थोडक्यात विचार करु.

प्रा. कुरुंदकरांची भूमिका

'शिवरात्र' या 'महाराष्ट्रराज्य पारितोषक पात्र' ग्रंथातील 'श्री गोलवलकर गुरुजी आणि महात्मा गांधी' या लेखात त्यांनी यासंबंधीची आपली भूमिका मांडलेली आहे. त्यांचे म्हणणे असे[३७] : मुस्लीम प्रश्न हा लो. टिळक व ना. गोखले या नेत्यांनी करून ठेवलेल्या महान चुकांचा गांधींकडे आलेला न निस्तरता येणारा वारसा आहे. टिळकांनी १९१६ साली लखनौ–करार केला व विभक्तमतदार संघाला मान्यता दिली. सर्व मुस्लीम राजकारण या विभक्त मतदारसंघाच्या भोवती गुरफटलेले राजकारण आहे. या मागणीमुळे मुस्लीम लीग बळकट झाली. म्हणूनच ती देशविभाजनाची मागणी करु शकली, तडीला नेवू शकली. पाकिस्तानचे कारण हा १९१६ चा टिळकांचा लखनौ-करार आहे. या करारापेक्षा मुसलमानांना अधिक देणारा कोणताही करार गांधीजींनी केला नाही. त्यामुळे गांधीजींना दोषी धरता येत नाही, असे कुरुंदकरांचे म्हणणे आहे.

प्रा. कुरुंदकरांची ही भूमिका म्हणजे म. गांधींना जर तुम्ही मुस्लिमधार्जिणे म्हणत असाल, तर लो. टिळकांनाही तसेच म्हटले पाहिजे, अशी जरा–तरच्या स्वरूपाची आहे. टिळक हे हिंदुत्वनिष्ठ किंवा हिंदुत्वनिष्ठांचे श्रद्धास्थान असल्यामुळे कुरुंदकरांनी टिळकांना पकडले आहे. टिळकांनी हा करार करून चूकच केली असेच अनेकानी म्हटले आहे. अरविंद बाबूंनी याबद्दल टिळकांना दोष दिला आहे. कुरुंदकरांनी टिळकांपासून–गांधींपर्यंत सर्वांनाच चढत्या क्रमाने दोष द्यायला हवा होता. हिंदु–मुस्लीम एकीसाठी एक प्रयोग म्हणून हा करार टिळकांनी मान्य केला, असे स्पष्टीकरण आपण देवू शकू. या करारातील विभक्त मतदारसंघ १९०९ च्या मार्ले–मिंटो सुधारणांनी अगोदरच दिलेला होता. लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा अधिक प्रतिनिधित्व कायदेमंडळात मुसलमानांना अगोदरच मिळालेले होते. अगोदरच मान्य केलेल्या गोष्टींना काँग्रेसच्या वतीने टिळकांनी लखनो–करारात औपचारिक पण नैतिक मान्यता दिलेली आहे. एकीसाठी मुसलमानांना झुकते माप देण्यास हिंदू तयार आहेत याचे ते निदर्शक होते. १९२० पर्यंतच्या या मुस्लीम पक्षपाती राजकारणावर सावरकरांनीही गंभीरपणे आक्षेप घेतलेला नाही. १९२०

पर्यंत काँग्रेसचा गाडा विशुद्ध राष्ट्रवादी होता, असे ते म्हणतात. याचा अर्थ, एकीसाठी थोडेसे झुकते माप द्यायला, काही प्रयोग करायला सावरकरांचीही हरकत नव्हती.

प्रा. कुरुंदकरांनी आपले हे मत नंतर दुरुस्त केलेले आहे. 'अंजली' च्या प्रस्तावनेत प्रा. कुरुंदकरांनी म्हटले आहे,[३८] "लखनौ–करार आणि विभक्त मतदारसंघाला मान्यता हा मुस्लिम समाजाला आत्मसात करण्याचा तो एक मोठा प्रयत्न होता. हा प्रयत्न टिळकांनी करून पाहिला." हा करार फक्त दहा वर्षांकरिता होता. त्यानंतर प्रत्यक्ष अनुभव घेवून दुरुस्त करण्याची संधी होती. करार करण्यात चूक झाली, म्हणून तो कधीही दुरुस्त करू नये असे कसे म्हणता येईल? ही जबाबदारी गांधीजींच्याच काँग्रेसवर होती. आपल्या धोरणाचा काँग्रेसने नंतर कधीही पुनर्विचार केला नाही, ही खरी तक्रार आहे. तेव्हा टिळकांच्या चुकीमुळे गांधीजींना दोषमुक्त करता येत नाही.

लखनौच्या पुढे करार नाही

गांधीजी मुस्लिमधार्जिणे नव्हते असे प्रा. कुरुंदकरांचे म्हणणे आहे. 'लखनौ कराराच्या पुढे जाईल असा कोणताही करार ज्या गांधींनी केला नाही, ते मात्र मुस्लिमधार्जिणे म्हणून ओळखले जातात' यांचे त्यांना दुःख होते. करारामध्ये एखाद–दुसऱ्या गोष्टी कमी जास्त देणे–घेणे, हे काही धार्जिणेपणाचे गमक नसते. परिस्थितीनुसार असे करावेच लागते. परस्पराचे हित नि ताकद यावर करार ठरत नसतो. गांधीजींच्या मुस्लीम धोरणात 'करार' ही गोष्ट बसतच नव्हती, ही गोष्ट प्रा. कुरुंदकर सोयीस्करपणे विसरलेले आहेत. मैत्री किंवा ऐक्य हा करार नसतो, हे गांधीजींचे सूत्र आपण मागे पाहिलेच आहे. करार हा त्यांना भेसळ सिमेंटासारखा वाटतो. मुसलमानांनी आपल्याला हवा तेवढा लुटीचा मोठा द्यावा व हिंदूनी तो द्यावा असे त्याचे उदार धोरण होते. मुसलमानांचे समाधान होईपर्यंत त्यांना देत राहणे हा मैत्रीचा अर्थ त्यांना मान्य होता. डॉ. आंबेडकरांच्या भाषेत सांगायचे तर[३९] 'गांधींनी मुसलमानांना एक अलिखित कोरा चेक दिला होता'. जेथे कोरे चेक असतात, तेथे करार नसतो.

मुस्लिमधार्जिणेपणा परिस्थितीप्रमाणे कमी अधिक देण्या–घेण्याचा करार करण्यात नसतो; आपले घर उघड्यावर ठेवून दुसऱ्याला वाटेल तितके घेवून जा, असे सांगण्यात असतो. गांधीजींच्या मते करार व्यापाऱ्यात होत असतो, दोन मित्रात वा भावाभावात होत नसतो. लहान भावाला त्याचे समाधान होईपर्यंत देत राहणे ही गांधीजींची बंधुनीती करारात बसणारी नव्हती. लहान भावाला घराचा मालक बनवून त्यांच्या हाताखाली मोठ्यांनी राहावे, असा त्यांचा उपदेश होता. मुस्लीम लीगच्या हातात सर्व सत्ता देण्याची त्यांची योजना कोणत्या करारातून जन्म पावलेली आहे? अफगाणिस्तानच्या अमिराला आमंत्रण देण्याची

किंवा निजामाला दिल्लीपती करण्याची कल्पना कोणत्या करारानुसार होती? गांधीजीही करार करत असले तरी मुसलमानांना अधिक देण्याचा करार करण्याची त्यांची पद्धत वेगळी होती, हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

नुसते बोलणे उदार

प्रा. कुरुंदकरांना या साऱ्या गोष्टी माहीत आहेत. म्हणून प्रा. कुरुंदकर म्हणतात, [४०] "गांधींनी भाषेच्या बाबतीत नेहमीच औदार्याची परिसीमा गाठली. शक्य त्या प्रकारांनी गांधीजी नेहमीच मुसलमानांना अनुकूल बोलत राहिले. गांधीजींची शेकडो वचने याला साक्ष म्हणून उद्धृत करता येतील." याचा अर्थ गांधीजी काय बोलतात ते दाखवू नका; फक्त त्यांनी लखनौ करारापेक्षा मुसलमानांना अधिक देणारा कोणता करार केला, ते दाखवा, असे प्रा. कुरुंदकरांना म्हणायचे आहे, 'सगळे घर तुमचेच आहे, अशा उदार भाषेत गांधी–नेहरु बोलत, पण देत–घेत मात्र काहीच नसत' असे प्रा. कुरुंदकर म्हणतात, [४१] मुस्लिमधार्जिणेपणाला उत्तर म्हणून कुरुंदकर हे हिंदुपुढे आज सांगत आहेत, हे गांधीजींचे सद्भाग्य आहे. गांधीजी मुसलमानांना कोरे चेक देत होते हे खरे आहे, पण बँकेच्या खात्यात पैसेच ठेवत नसत, अशा पद्धतीचे प्रा. कुरुंदकरांचे हे स्पष्टीकरण आहे. फुकटचीच उदार भाषा; देणे–घेणे काही नाही, या पद्धतीने गांधीजी मुसलमानांबरोबर २८ वर्ष वागत होते, त्यांना बनवित होते, हा गांधीजीवरील गंभीर आरोप होतो, हे कुरुंदकरांसारख्या चाणाक्ष माणसाच्याही लक्षात आलेले दिसत नाही. मूल्यमापन करण्याची ही पद्धत पूर्णतः अकुरुंदकरीय आहे. अितर विषयात अत्यंत चिकित्सकपणे व तर्कशुद्धपणे विचार मांडणारे कुरुंदकर गांधी–नेहरुंचा विषय आला की, निष्ठेतून व श्रद्धेतून विचार मांडू लागतात, त्याचा हा परिणाम आहे.

प्रा. कुरुंदकरांच्या या विचाराशी सहमती दाखवूनही त्यांचे सहविचारी सहलेखक डॉ. ना. गो. राजूरकर म्हणतात, [४२] "आता प्रश्न राहतो तो एवढाच की, मुसलमानधार्जिणेपणा या शब्दप्रयोगाला आणखी एखादा अर्थ असू शकतो काय व या अर्थाने गांधी–नेहरु विशेष करुन गांधी मुस्लिमधार्जिणे होते काय? या प्रश्नाचे उत्तर पूर्णतः नकारात्मक देणे कठीण आहे. गांधींनी भाषेच्या बाबतीत औदार्याची परिसीमा गाठली, असे कुरुंदकर स्वतःच म्हणतात. ही औदार्याची परिसीमा गाठणारी भाषा बरीच समस्या निर्माण करु शकते. ज्याच्या संदर्भात आपण ती भाषा वापरतो त्या समूहाच्या अपेक्षा आपण न कळत वाढवून ठेवतो व आता आपण आपल्या मागण्या आणखी वाढविल्या पाहिजेत, अशी प्रेरणा त्यांच्यात निर्माण करतो. पुढे त्यांच्या अपेक्षा पूर्ण न झाल्यास त्यांचा क्षोभ वाढतो अथवा वैफल्याची भावना वाढते. गांधीजींनी वेळोवेळी जे लिहिले त्याचे स्वरुप हिंदुत्वनिष्ठांना मुस्लिमधार्जिणे वाटले असल्यास त्यांना त्याबद्दल फारसा दोष

देता येणार नाही."

गांधीजींना 'मुस्लिमधार्जिणे' हे विशेषण लावायचे का नाही, हा मुद्दा गौण आहे. मुख्य प्रश्न गांधीजी आपल्या धोरणाने म्हणा, वागण्याने म्हणा किंवा भाषेने म्हणा, हिंदु–मुस्लीम प्रश्न अवघड करुन ठेवीत होते की नाही, हा आहे. मुसलमानांना आपल्या मागण्या मांडायला, त्यामागे ताकद उभी करायला व अंतिमतः त्या पदारात पाडून घ्यायला वातावरण निर्माण करीत होते का नाही, हा मुख्य प्रश्न आहे. येथे आपल्यासमोरच्या प्रश्न सावरकरांनी हिंदूचा पक्ष घ्यावा अशी परिस्थिती गांधीजींनी तयार करुन ठेवली होती की नाही, एवढाच आहे.

कुरुंदकरांचे समर्थन

गांधीजीचे हे धोरणच अितके स्पष्ट होते की, ते तसे नव्हते हे सिद्ध करण्याचा प्रत्येक प्रयत्न हा हास्यास्पद ठरु शकतो. अफगाणिस्तानच्या अमिराबद्दल व हैद्राबादच्या निजामाबद्दलच्या गांधीजीच्या भूमिकेचे स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न प्रा. कुरुंदकरांनी केला आहे. ते म्हणतात, [४३] "गांधीजी म्हणाले, 'अफगाणिस्तानच्या अमिरांने भारतावर स्वारी केली व भारत जिंकून घेवून अिंग्रजांना हाकलून दिले तर मी स्वागतच करीन!" हिंदू मंडळी चिडली. अफगाणिस्तानचा अमीर हाच अिंग्रजाच्या हातातील बाहुले होता, इतके जाणण्याची शुद्ध त्यावेळी कुणालाच नव्हती. गांधीजी म्हणाले, "निजाम जर दिल्लीपती झाला तर मला चालेल!' हिंदू लोक चिडले. निजामाला स्वतःच्या राज्यात मंत्री नेमता येत नव्हता, हे कुणीच ध्यानात घेतले नाही! चार प्रांत मुस्लीम बहुसंख्येचे, मागच्या पिढ्यानी विभक्त मतदारसंघ तोडून दिलेला, डोक्यावर परकीय राज्यसत्ता, या वातावरणात कोणत्याही देशाचा नेता, एखादा गट फुटून निघू नये म्हणून जसे बोलतो, तसे गांधीजी बोलले. मात्र त्यांनी कोणता करार केला नाही."

अशा पद्धतीने जर आपण स्पष्टीकरण देवू लागलो तर जगात दोषी काहीच सापडणार नाही. मुसलमान फुटू नयेत म्हणून गांधीजी कोणत्या थराला जात होते व मुसलमानांच्या अपेक्षा कशा वाढवून ठेवीत होते, हेच यावरुन सिद्ध होत नाही काय? अमिराची नि निजामाची ताकद काय होती, हा प्रश्न गौण होता. शून्यातून राज्य निर्माण करणाऱ्या पैगंबराचा आदर्श डोळ्यापुढे ठेवणाऱ्या मुसलमानांना अमिराची वा निजामाची नावेच पुरेशी होती. अिस्लामचे राज्य निर्माण करण्याच्या त्यांच्या मनोराज्याला गांधीजी आपल्या या बोलण्याने खतपाणी घालीत नव्हते काय? आणखी थोडा धीर धरा, विजय आपलाच आहे, असे मुसलमानांना वाटल्यास तो दोष कुणाचा? अशा बोलण्याने मन अेकीला अनुकूल होत नसते, तर ते अिस्लामराज्याकडेच अधिक झेपावते, मुसलमानांच्या धर्मवेडाला ते उत्तेजित करते, ही गोष्ट कुरुंदकरांच्या लक्षात येवू नये हे नवल आहे. अशा धोरणानीच गांधीजींनी हिंदु–मुस्लीम अैक्य अशक्य करून टाकले असे सावरकर म्हणत असत.

गांधीजींचे धोरण

गांधीजींच्या मुस्लिमविषयक धोरणाचे तीन घटक प्रा. कुरुंदकरांनी सांगितले आहेत. ते म्हणतात[४३] "गांधीजींचे मुस्लिमविषयक धोरण हे की, मागे झाले ते झाले, पुढे नवा करार नाही. आणि संधी मिळताच जे मागे झाले ते मिटवून टाकावयाचे. इ. स. १९२८ मध्ये गांधीजींनी विभक्त मतदार संघ सोडण्याचा प्रयत्न केला. गोलमेज परिषदेत गांधीजींनी हाच प्रयत्न केला. गांधींच्या अनुयायांनी स्वातंत्र्य मिळताच विभक्त मतदार संघ रद्द केले. नवा करार नाही, हे पहिले धोरण. संधी मिळताच जुने घातक करार रद्द करावेत, हे दुसरे धोरण. देणे–घेणे काहीच नसल्यामुळे बोलावे उदार, हे तिसरे धोरण. ह्यातील नेमके कोणते धोरण मान्य नाही हे एकदा स्पष्ट झाले पाहिजे. सत्याशी संबंध नसणाऱ्या मंडळींनी प्रथम गांधींना मुस्लिमधार्जिणे ठरविले आणि नंतर गांधींचे हे धोरण मान्य नाही, अशी फुशारकी सांगितली." हे मूल्यमापन मान्य करायचे तर सावरकरांपेक्षा गांधीजी मुसलमानांकरिता चाऔट होते, असेच म्हटले पाहिजे. सावरकरांची भाषा गांधीजी इतकी उदार नव्हती, एवढाच फरक त्यांच्यात उरतो. मुसलमानांच्या दृष्टीने गोडगोड बोलणाऱ्या पण काहीच न देणाऱ्या गांधीजीपेक्षा, रोखठोक बोलणारे पण न्याय्य असलेला वाटा देणारे सावरकर हे चांगले ठरतात.

सावरकरांचे धोरण

सावरकरांचे मुस्लिमविषयक धोरण तरी कोणते होते? हिंदु व मुसलमान हे या राष्ट्राचे अविभाज्य घटक आहेत, हे पहिले धोरण. दरडोई एकमत; सर्वांना समान हक्क; लोकसंख्येच्या प्रमाणांत मुस्लिमांना राखीव प्रतिनिधित्व; त्यांचा धर्म, संस्कृती, भाषा आदींच्या संरक्षणाची व विकासाची हमी, हे दुसरे धोरण. ही दोन धोरणे मान्य असतील तर मुसलमानांबरोबर समाजीक हिंदीराज्य; मान्य नसतील तर त्यांना सोडून स्वबळावर त्याच हिंदीराज्याचा विचार; विरोध करणार असतील तर मग त्यांनाही विरोध करुन स्वतःच्या स्वतंत्र राष्ट्राचा विचार– हे तिसरे धोरण. यातील नेमके कोणते धोरण मान्य नाही, हे एकदा सावरकरांना जातीय म्हणणाऱ्यांनी व सत्याशी संबंध ठेवणाऱ्यानी स्पष्ट केले पाहिजे.

प्रा. कुरुंदकरांना असे म्हणायचे आहे की, सावरकर म्हणतात त्याच समान हक्काच्या व न्याय्याच्या तत्वावर गांधीजींना हिंदु-मुस्लीम ऐक्य करायचे होते. मग दोघात फरक कोणता राहतो? सावरकरांचे तिसरे धोरण गांधीजींना मान्य नव्हते, एवढाच फरक राहतो. पहिली दोन धोरणे अयशस्वी झाल्यानंतर तिसऱ्या धोरणाचा प्रश्न निर्माण होतो, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. याचा सरळ अर्थ, मुसलमान जर आपल्याबरोबर यायला तयार नसतील; तयार नाहीत हे पुरेसे अनुभवले असेल; पुढे तयार होतील याची आशा बाटण्याची कोणतीही चिन्हे

नसतील; स्वतंत्र राष्ट्राचा सिद्धांत मांडून ते निर्माण करण्याचा ते प्रयत्न करीत असतील; आणि त्यांच्या या वागण्याच्या प्रवृत्तीला अतिहासात व धर्मशास्त्रात पुरेसा आधार असेल, तर हिंदूनी त्यांच्या पाठीमागे एकी करा करुन धावत जाणे राष्ट्रीय आणि धर्मनिरपेक्ष आहे, असा होतो. हिंदूनाही काहीतरी भवितव्य आहेच. त्यांचे हे भवितव्य मुसलमानांच्या या दुराग्रहाशी बांधून देण्यास तयार नसणे जातीय आहे काय, याचा आपण गंभीरपणे विचार केला पाहिजे.

सावरकरांनी हिंदूना ते हिंदू आहेत म्हणून मुसलमानांपेक्षा एक कण तरी कोणता हक्क वा अधिकार अधिक मागितला होता काय, हे जोपर्यंत कुणी दाखवून देवू शकणार नाही, तो पर्यंत सावरकरांना जातीय म्हणताच येणार नाही. जसा गांधीजींनी मुसलमानांना अधिक देणारा करार केला नाही, तसा सावरकरांनीही हिंदूना अधिक व मुसलमानांना कमी देण्याची कोणतीही योजना वा कल्पना कधीही मांडली नाही, हे मोकळ्या मनाने मान्य करण्यास आपण तयार आहोत काय? निदान भाषेच्या दृष्टीने तरी गांधीजींवर मुस्लिमधार्जिणेपणाचा आरोप करता येतो, पण भाषेच्या दृष्टीनेही सावरकरांवर हिंदुधार्जिणेपणाचा आरोप करता येणार नाही, इतकी त्यांची भूमिका भाषेच्या दृष्टीनेही निःसंदिग्ध आहे.

सिमला योजना

गांधीजींनी मुसलमानांना लखनौ कराराच्या पुढे जाणारा कोणताही करार केला नाही व असलेला विभक्त मतदारसंघ मोडण्याचा प्रयत्न केला, या दोन्हीही गोष्टी अर्धसत्य आहेत. विभक्त मतदार संघापेक्षा मूलत: अधिक देणारी योजना म्हणजे देशाची फाळणी किंवा संपूर्ण देशच मुसलमानांच्या ताब्यात देणे, हीच असते. मात्र या मुद्द्यावर कुरुंदकर गप्प बसतात. ५० टक्के प्रतिनिधित्व देणारी 'सिमला योजना' विभक्त मतदारसंघापेक्षा पुढे जाणारी होती, हे ते मान्य करतात, पण लगेच पुढे म्हणतात,[४४] "पण पुरावा खरा मानायचा तर गांधीजींनी आपले वजन 'सिमला योजना' फेटाळून लावण्यासाठी खर्च केले, ती टिकविण्यासाठी खर्च केले नाही." अगोदर आपण 'सिमला योजना' विचारात घेवू.

लॉर्ड वेव्हेल यांनी १९४५ मध्ये सिमला येथे काँग्रेस व मु. लीगची परिषद बोलावली. पण तीत कोणत्याही ठरावावर एकमत न होता, ती मोडली. ती मोडण्याचे मुख्य कारण मुसलमानांचे सर्व प्रतिनिधी हे मु. लीगचेच असावेत, हा लीगचा हट्ट काँग्रेसला मान्य नव्हता, हे आहे. केंद्रिय सरकारच्या कार्यकारी मंडळात कोणकोणाला द्यावे यावरही एकमत होत नव्हते. त्या योजनेतील कोणत्या कराराच्या कलमावर वाद होऊन किंवा नेमके बोलायचे तर त्या योजनेतील ५० टक्केच्या कलमावर वाद होऊन ती परिषद मोडली, असे घडलेले नाही. एवढेच नाही, तर समान प्रतिनिधित्वाच्या मुद्द्यावर सर्वांचे एकमत नोंदवून घेण्यात आले. मुस्लीम लीगला महामंत्रिपद द्यावे व सर्व मंत्रिमंडळ लीगवाल्यांनी बनवावे याही गोष्टीला

गांधीजी तयार होते, पण मुस्लीम लीग आपला हट्ट सोडायला तयार नव्हती गांधीजींनी सिमला योजना फेटाळण्यासाठी आपले वजन खर्च केले, पण कोणत्या मुद्यावर, हे प्रा. कुरुंदकर सांगत नाहीत.

भुलाभाअी मार्फत

'सिमला योजने'त हिंदूच्या बरोबरीने मुसलमानांना प्रतिनिधित्व मिळणार होते. गांधीजींनी या मुद्यावरून या योजनेला विरोध केला का, हा खरा प्रश्न आहे. केलेला नाही हे त्याचे उत्तर आहे. पुरावाच खरा मानायचा, तर समान प्रतिनिधित्वाची ही योजना गांधीजींनीच वेव्हेल यांना भुलाभाअी देशाअी यांच्या मार्फत पाठविलेली होती, असे दिसून येईल. १९४५ मध्ये देसाअी व लियाकत अली याच्यात एक करार होवून त्याप्रमाणे हिंदू व मुसलमानांना समान प्रतिनिधित्व मान्य करण्यात आले. या कराराला देसाअींनी गांधीजींनी संमती घेतली. त्यानंतर ही योजना वेव्हेलकडे देसाअींनी सादर केली. या योजनेवर विचार करण्यासाठी मार्च १९४५ मध्ये वेव्हेल लंडनला गेले. मध्यंतरी ही गुप्त योजना उघड झाली. काँग्रेस वर्किंग कमिटीने अहमदनगर येथे या योजनेवर संताप व्यक्त केला. डॉ. पी. सी. घोष यांनी गांधीजींना हा वर्किंग कमिटीचा विरोधाचा ठराव दाखविला. गांधीजींनी भुलभाअीकडे असा निरोप पाठविला की, त्यांनी सादर केलेल्या त्या योजनेला त्यांचा पाठिंबा नाही. नेहरु–पटेल आदींनी या प्रकाराबद्दल देसाअींना जबाबदार धरले.

भुलाभाअींनी स्पष्टपणे सांगितले की, मी गांधीजींच्या आज्ञेप्रमाणे वागलो होतो व मला विनाकारण दोषी धरण्यात येत आहे. भुलाभाअी गांधीजींना भेटले. गांधीजींनी त्यांना निराळाच सल्ला दिला. त्यावर भुलाभाअी रागाने म्हणाले, [४५] "तुम्ही आपल्या हेतूसाठी एखाद्या माणसाला साधन म्हणून वापरता आणि तो हेतू साध्य होताच त्या माणसाला वाऱ्यावर (bury) सोडून देता. तुमच्याकडून न्यायाची कुणाही अपेक्षा करू नये." गांधीजींची करार करण्याची पद्धत अशी होती.

१४ जून १९४५ ला वेव्हेल योजना जाहीर झाली. १५ जून रोजी गांधीजी म्हणाले,[४६] "I am not ashmed of the part I have played in advising Shri Bhulabhai Desai, when he consulted me about his proposal" (भुलाभाअी देसाअींनी आपल्या योजनेसंबंधी मला जेव्हा विचारले, तेव्हा त्यांना सल्ला देण्यात मी जो भाग घेतला आहे, त्याबद्दल मला संकोच वाटत नाही.) या घटनेवर धनंजय कीरांनी आपल्या गांधी–चरित्रामध्ये असा अभिप्राय व्यक्त केला आहे की, [४६] "नैतिक आदर्श ठेवणारे गांधीजी ही योजना आपणच सांगितली आहे, हे गोष्ट उघड करत नाहीत." सिमला योजनेतील समान प्रतिनिधित्वाची योजना गांधीजींनी सुचविलेली आहे, ती मांडण्यासाठी भुलाभाअींचा वापर केलेला आहे, हे लक्षात घेतले म्हणजे ती योजना फेटाळण्यासाठी

त्यांनी वजन खर्च केले या म्हणण्याला काही अर्थच उरत नाही. ही लपवालपवी झाली, पुरावा नव्हे! १०० टक्के प्रतिनिधित्व मुसलमानांना देवून ब्रिटीशाने निघून जावे असे गांधीजी प्रकटपणे सांगत असल्यामुळे, या ५० टक्क्यावद्दल आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

राजाजी मार्फत

पाकिस्तानची योजना सुद्धा राजाजी मार्फत गांधीजींनीच मांडलेली होती, हेही आता उघड झालेले आहे. या योजनेत पूर्व व पश्चिम विभागातील मुस्लीम बहुसंख्या असलेल्या प्रांतामध्ये पौढ मतदानाच्या पायावर सार्वमत घ्यावे व त्यानुसार फाळणीविषयी निर्णय घ्यावा, अशी तरतूद करण्यात आली होती. सार्वमत पाकिस्तानच्या बाजूने जाणार व फाळणी होणार, हे या योजनेचा परिणाम म्हणून अपरिहार्य होते. ही योजना १९४२ मध्ये तयार झालेली आहे. मद्रास काँग्रेसने २५–४–४२ ला ही योजना संमत करून अ. भा. काँग्रेसकडे पाठविली. तिथे या योजनेला तीव्र विरोध झाला. १२० विरुद्ध १५ मतानी ती फेटाळण्यात आली. गांधीजी राजाजीची ही योजना चुकीची आहे, असे जाहीर बोलू लागले. राजाजीवर प्रखर टीका होवू लागली.

करार करण्याची पद्धत

१६ जुलै १९४४ रोजी राजाजींनी एक पत्रक काढले,[४७] "पाकिस्तान योजनेला कार्याला मी प्रारंभ केला त्याला दोन वर्ष होऊन गेली. वास्तविक माझ्या या योजनेला गांधींनी परिपूर्ण पाठिंबा दिला होता. आणि १९४० सालात मुस्लीम लीगने आपल्या ठरावानुसार जी जी म्हणून मागणी केलेली होती ती ती या योजनेने परिपूर्णतः लीगच्या पदरात टाकली होती." या योजनेला गांधीजीचीच मान्यता होती असे जाहीर करून राजाजीने या संबंधात गांधीजींच्या मान्यतेने जिनांशी झालेला पत्रव्यवहार प्रसिद्ध केला.[४८] सावरकर म्हणाले की, पाकिस्तान योजनेसंबंधी खरे दोषी हे गांधीजीच असून राजाजी हे केवळ त्यांच्या हातातील बाहुले आहेत.[४९] गांधीजींनी लखनौ–कराराच्या पुढे जाणारा कोणताच करार केला नाही, हे समजून घेताना हा सारा अतिहास पाहावाच लागतो. पहिली गोष्ट, मुसलमानांशी करार करणे गांधीजीना पसंत नव्हते, त्यामुळे ते करार करत नसत. दुसरी गोष्ट ते जेव्हा करार करत तेव्हा त्यासाठी कुण्यातरी आपल्या अनुयायाला पुढे करीत. त्यामुळे गांधीजींनी लखनौच्या पुढे जाणारा कोणता करार केला ते आधी दाखवा, असा जोरदार वकिली प्रश्न कुरुंदकर विचारत आहेत.

विभक्त मतदारसंघ

विभक्त मतदारसंघ व्हावेत, फाळणी होवू नये, ही गांधीजींची अिच्छा होतीच, यात संशयच नाही. वाद या सदिच्छेचा नाही. ती अंमलात आणण्यासाठी

केलेल्या उपाययोजनाचा व प्रयत्नाचा आहे. विभक्त मतदारसंघ रद्द करण्यासाठी गांधीजींचा प्रयत्न त्यांची सदीच्छा व्यक्त व्हावी इतकाच होता. मुसलमानांची मने दुखणार नाहीत, या मर्यादेतच तो होता. आपली शक्ती त्यांनी या कामासाठी कधीही पणाला लावली नाही अस्पृश्यांचे स्वतंत्र मतदारसंघ पुण्याला प्राणांतिक उपोषण करून, डॉ आंबेडकरांना आपल्यापुढे गुडघे टेकायला लावून त्यांनी रद्द करवून घेतले. मुसलमानांच्या स्वतंत्र मतदारसंघाबद्दल असे उपोषण करण्याची त्यांची तयारी नव्हती. उपोषण सुरू होण्यापूर्वी एक दिवस म्हणजे १९–९–३२ रोजी डॉ. आंबेडकरांनी यांची आठवण गांधीजींना करून दिली होती. ते म्हणाले, [४९] "ते जर अस्पृश्यांचे खरे हितचिंतक असते तर मुसलमानांच्या सर्व मागण्या मान्य करण्यास ते तयार झाले नसते." या संबंधात गांधीजी म्हणाले,[५०] "You must understand I can tolerate the Musalman and Sikh only as a necessary evils."

मुसलमानांबद्दल अपरिहार्य अनिष्ठ म्हणून का होईना पण गांधीजींनी कमालीचे पक्षपाती धोरण स्वीकारलेले होते, ही वस्तुस्थिती मान्य करणे भाग आहे. हिंदूतील अस्पृश्यांच्या स्वतंत्र मतदारसंघाला गांधीजी प्राणपणाला लावून विरोध करतात, कारण अस्पृश्य हे हिंदूपासून फुटून जावू नयेत ही त्यांची अिच्छा आहे. याच कारणासाठी मुसलमानांच्या तशाच मतदारसंघाला मात्र संरक्षण देतात. हा उघड पक्षपात असतानाही गांधीजी पक्षपाती नाहीत हे दाखविण्यासाठी याचाही कुरुंदकरांनी उल्लेख करावा, हे आश्चर्य आहे.

पाकिस्तान कोणी दिले ?

जून १९४७ मध्ये फाळणीला उघड पाठिंबा देवून काँग्रेस कार्यकारणीत गांधीजींनी तसा ठराव मंजूर करुन घेतला. १४-६-४७ रोजी केलेल्या आपल्या ४० मिनिटाच्या भाषणात त्यांनी फाळणी स्वीकारणे कसे आवश्यक आहे, हे पटवून सांगितले. फाळणीचा ठराव मुकाटचाने संमत करा, नाही तर काँग्रेसचे जुने नि जाणते नेते बाजूला सारुन नवे नेते त्यांच्या जागी उभे करा, अशी गांधीजींनी महासमितीला धमकी दिली. आपल्या नेत्याच्या पाठीमागे उभे राहणे आपले कर्तव्य आहे, असे त्यांनी सांगितले.[५१] आपली ताकद पणाला लावून त्यांना पाकिस्तानचा ठराव काँग्रेसकडून पास करवून घेतला. आधी माझ्या देहाचे तुकडे करा, मग फाळणी हे नुसतेच उदार बोलणे होते. पाकिस्तान देवून टाकायला हिंदूना भाग पाडण्याला नैतिक सामर्थ्य उभे करण्यासाठी असे बोलणे त्यांना भाग होते. हा सारा अितिहास समोर असताना कुरुंदकर म्हणतात की, गांधीजी लखनौ–कराराच्या पुढे कुठे गेले आहेत ते दाखवा ! गांधीजींचा मुस्लिमपक्षपातीपणा, मुस्लिमधार्जिणेपणा अपरिहार्य ठरविता येवू शकतो, त्याचे समर्थनही करता येवू शकते– पण वस्तुस्थिती म्हणून तो नाकारणे पूर्णतः चुकीचे ठरते, हे समजून

ध्यायला आपण तयार असले पाहिजे.

सावरकरांचा बुद्धिवाद समजून घेताना, त्यांनी हिंदूचा पक्ष घेवून काँग्रेस व मुसलमानांच्या विरोधी का उभे ठाकावे, हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आपल्यासमोर उभा ठाकतो. गांधीजींच्या काँग्रेसचे मुस्लीमधोरण हे हिंदूवर अन्याय करणारे आहे, अशी सावरकरांची निश्चिती झालेली होती. हिंदूना कोणीच वाली नाही, असे त्यांना वाटले. कोणत्या परिस्थितीत ते हिंदूचा पक्ष घेतात हे समजून घेण्यासाठी गांधीजींची व त्यांच्या काँग्रेसची भूमिका आम्ही येथे थोडक्यात मांडली आहे. आमचा हेतू गांधीजींवर टीका करण्याचा नाही, तर सावरकरांना समजून घेण्याचा आहे. गांधीजींची ही भूमिका नीट समजून घेतली नाही, तर सावरकरांचे हिंदुत्वही समजणार नाही, ही एक वास्तविक अडचण आहे. सावरकरांचे हिंदुत्व गांधीजींच्या या धोरणाची तीव्र प्रतिक्रिया असल्यामुळेच आम्ही आतापर्यंत गांधीजींच्या या धोरणाचा परामर्श घेतलेला आहे.

× × × ×

—५—

मुसलमानांचा सखोल अभ्यास

अंदमानात गेल्यानंतर सावरकरांनी मुसलमानांच्या धार्मिक व राजकीय प्रवृत्तीचा सखोल अभ्यास केला. या अभ्यासातून व वर्तमानातील अनुभवातून मुसलमानांबद्दल त्यांनी काही विशिष्ट निष्कर्ष काढले. मुसलमानांची एकूण प्रवृत्ती हिंदूबरोबर समान हक्कांच्या तत्वावर एकराष्ट्र म्हणून राहण्याची नाही, असा त्यांनी निष्कर्ष काढला. मुसलमान स्वतःला जेते समजतात. हिंदूवर राज्य करण्याचा आपला हक्क आहे, असे समजतात. जगातील सर्व मुस्लिमांचे एकराष्ट्र व्हावे अशी आकांक्षा ते बाळगतात. भारतापेक्षा भारताबाहेरील त्यांच्या पुण्यभूवर ते अधिक निष्ठा ठेवतात. ते स्वतःला एक राष्ट्र समजतात. आपल्या सामर्थ्याच्या जोरावर ते निर्माण करुन दाखविण्याची महत्वाकांक्षा बाळगतात. काही सवलती वा मागण्या मान्य केल्याने त्यांचे समाधान होणारे नाही. हा प्रश्न वर वर वाटतो तितका सोपा व सरळ नाही. हिंदु–मुस्लीम प्रश्नांची मुळे खोल अतिहासात व मुसलमानांच्या धर्मशास्त्रात आहेत. या अतिहासाचा व धर्मशास्त्राचा नीट अभ्यास केल्याशिवाय हिंदु–मुस्लीम प्रश्नाचे गुंतागुंतीचे व विकट स्वरूप समजणारच नाही, असे सावरकरांचे म्हणणे आहे.

मुसलमान हिंदीभाषेला विरोध करत, वंदेमातरम्‌ला विरोध करत, हिंदुस्थान नावाला विरोध करीत. या गोष्टीचा उल्लेख करून कर्णावतीच्या (१९३७) च्या भाषणात सावरकर म्हणाले[१] "मुसलमानांच्या या असंतोषाच्या मुळाशी असलेला

खरा प्रश्न इकडचा एखादा शब्द किंवा तिकडचे एखादे गीत अशा प्रकारचा नाही, हे आमच्या ऐक्यबुबुक्षितांना पटणार तरी केव्हा ? हिंदुस्थानच्या ऐक्यवृत्तीत नि वीरवृतीत जर त्यायोगे आमच्याकडून खरी भर पडू शकली, तर आम्ही बारा गीते नि शंभर शब्दांचा आपण होऊन त्याग केला असता. पण हा दिसतो तितका साधासुधा प्रश्न नाही. हे आम्ही ओळखतो." हिंदु-मुस्लीम प्रश्नाचे वास्तविक स्वरुप काँग्रेसला समजलेच नाही व त्यामुळे त्यांना खुष करण्याच्या पद्धतीने ऐक्य होईल, ही काँग्रेसची धारणा भ्रामक व चुकीची होती, असे सावरकरांना वाटते. मुसलमान काँग्रेसबरोबर का येत नाहीत, अलग का राहू अिच्छितात, याचा शोध काँग्रेसने कधीही घेतला नव्हता काँग्रेसला मूळ प्रश्नच समजला नाही, ही पहिली चूक होती. चुकीच्या प्रश्नाचे चुकीचे उत्तर शोधणे ही दुसरी चूक होती.

काँग्रेसची खरी चूक

सावरकर आपल्या आत्मचरित्रात लिहितात, [२] "या या म्हणून काँग्रेसचे पुढारी विनवणी करत असताही त्या अखिल भारतीय राष्ट्रसभेमध्ये मुसलमान का आले नाहीत ? इतकेच नव्हे. तर अगदी तिच्या जन्मापासून मुसलमान जातिधर्म-निरपेक्षपणे एका राष्ट्रात विलीन होणाऱ्या काँग्रेसच्या मूळ सिद्धांताचाच अितका तिटकारा का करत गेले आणि तत्काल काँग्रेसविरुद्ध आपली स्वतंत्र मुस्लीम संघटना का उभारते झाले ? भाबडे बिचारे काँग्रेससीय हिंदू देशभक्त ! मुसलमानांची मूळची धर्म प्रवृत्ती नि तदाधिष्ठित अैतिहासिक परंपरा याचा त्या अिंग्रजी शिक्षित काँग्रेसीय पुढाऱ्यापैकी बहुतेकांना ओनामासुद्धा माहीत नव्हता." मुसलमानांच्या या प्रवृत्तीबद्दल सावरकर पुढे म्हणतात, "हिंदु-मुसलमानादिकांचे समाअीक 'हिंदी', 'इंडियन' राष्ट्र असे जे त्यांचे काँग्रेसीय ध्येय त्यांना प्रामाणिकपणे निर्भेळ देशभक्तीचे वाटे, तेच मुळी मुस्लिमांच्या धर्मनिष्ठेचा नि अैतिहासिक परंपरेचा उपमर्द करणारे होते. मुसलमानांच्या धर्मशासनाप्रमाणे हिंदु-मुसलमानांचे 'समाईक' राज्य हे वाक्यच मुळात होते अधर्म्य, पापी. जे निर्भेळ मुस्लीम राज्य तेच काय ते धर्म्य, त्यांच्या 'शरियत'ला (शास्त्राला) धरून... मुसलमानांच्या धर्मशास्त्राप्रमाणे जीत निर्भेळ मुस्लीम राज्य नाही ती भूमी त्यांचा देशच होवू शकत नाही... स्वतः कोणताही मुस्लिमशास्त्रज्ञ मुसलमान हे नाकारणार नाही. आणि तसे त्यांच्यातील कोणी नाकारले तरी मुस्लिमांचे धर्म-शास्त्र नि अितिहास तर कुठे गेला नाही ना ? हवे त्याने त्याच्याशी ही विधाने पडताळून पाहावी" सावरकर या प्रश्नाच्या इतके खोलवर जावून विचार करत होते. मुसलमानांच्या या दृष्टीने भारत ही त्यांची शत्रूभूमी होती. समाईक हिंदी राज्य त्यांच्या धर्मशास्त्राप्रमाणे शत्रूराज्य होते. प्रत्येक मुसलमानांचे पवित्र कर्तव्य शत्रूभूमीचे रुपांतर अिस्लाम भूमीत करणे हे असते. मुसलमानांचे भारता-तील राजकारण याच दिशेने चाललेले होते.

'मुसलमान इतके जातिनिष्ठ का आहेत?' हा प्रश्न काँग्रेसनी समजूनच घेतला नाही, ही सावरकरांची तक्रार होती 'काँग्रेसनिष्ठ हिंदू पहिल्यापासून ह्या प्रश्नाचा अभ्यास करण्याला धजतच नाहीत' असा त्यांचा आक्षेप आहे.[3] 'मुसलमानांचा अतिहास, त्यांचे तत्वज्ञान नि त्यांची राजकीय मनःप्रवृत्ती या विषयी सामान्यतः पूर्णपणे' काँग्रेसवाले अज्ञानी होते, असे ते म्हणतात.[3] मुसलमानांची मनोवृत्ती प्रादेशिक राष्ट्रवादाच्या विरोधी असून ती फक्त अस्लामवादच जाणते असा सावरकरांचा निष्कर्ष आहे.

मुस्लीम मनोवृत्ती

१९३८ च्या नागपूरच्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी मुसलमानी मनोवृत्तीच्या चार बाबी स्पष्ट करून सांगितल्या १) अतिरेकी धर्मनिष्ठा आणि राज्याबद्दलची देवभोळी कल्पना यांना सोडण्याअितकी हिंदी मुसलमानांची अद्याप वाढ झालेली नाही, ही पहिली गोष्ट आहे. २) धार्मिक तत्वज्ञान आणि कुराननिष्ठ राजकारण याच्या योगाने मानवी जगाचे दोन भाग पडतात एक मुसलमानांची भूमी आणि दुसरी शत्रूची भूमी. भारत त्यांच्या दृष्टीने शत्रूभूमी होय. सावरकर म्हणतात की, केवळ कुराणात काय लिहिले यावरुन नव्हे तर प्रत्यक्षात ते कसे वागतात यावरुन आम्ही हे सांगत आहो. ३) मुसलमानेतरात हिंदू हेच मुसलमानांना सर्वात धिक्कारार्ह आहेत. कारण ख्रिस्ती आणि ज्यू हे कसेही असले, तरी कुराणाशी अंशतः समान असलेले धर्मग्रंथ मानणारे आहेत. मात्र हिंदू पूर्णतः काफीर आहेत. हे काफीर जो पर्यंत मुसलमान होत नाहीत किंवा मुसलमानांचे भारतात राज्य येत नाही तो पर्यंत भारत ही त्यांची शत्रूभूमीच असते. ४) मुसलमान भारतात जेते म्हणून आले व ही भावना ते विसरण्यास तयार नाहीत. हा देश इंग्रजापासून आपल्याला मिळाला पाहिजे व भारतात मुस्लीम राज्य स्थापन झाले पाहिजे असे त्यांना वाटत असते. या चार भूमिका लक्षात घेतल्या म्हणजे मुसलमान काँग्रेसबरोबर का जात नव्हते याचा शोध घेता येतो. या भूमिका मुसलमान पुढाऱ्यांनी वेळोवेळी प्रकटपणे सांगितलेल्या होत्या, लपून कधीही ठेवलेल्या नव्हत्या. हिंदु-मुस्लीम प्रश्नाचा विचार करताना मुस्लिमांच्या या प्रवृत्ती विचारात घेतल्या पाहिजेत, असा सावरकरांचा आग्रह आहे.

आंबेडकरांची चिकित्सा

मुसलमानांच्या या प्रवृत्तीवर हिंदुत्वनिष्ठ नसणाऱ्या अनेक विचारवंतांनी अशीच टीका केलेली आहे. डॉ. आंबेडकरांचे एक ठळक उदाहरण देता येईल. आपल्या 'पाकिस्तान' या ग्रंथात त्यांनी सावरकरांप्रमाणेच हिंदु–मुस्लीम प्रश्नाची चिकित्सा केलेली आहे. सावरकर काढतात तेच निष्कर्ष काढणारे ७३ पृष्ठाचे 'राजकीय भवितव्याची वैफल्यता' हे सविस्तर प्रकरणच त्यांनी लिहिलेले

आहे. डॉ. आंबेडकरांनी दिलेल्या सर्वच पुराव्याची चर्चा येथे करता येणार नाही. तरीपण त्यांचे काही निष्कर्ष आम्ही नोंदवू अिच्छितो.

मुसलमानांना भारत हा आपला देश आहे, हे कसे वाटत नाही, हे डॉ. आंबेडकर अनेक पुरावे देवून विशद करतात. कवी रविंद्रनाथ टागोरांचाही अभिप्राय त्यांनी नोंदविला आहे. ते म्हणतात,[४] "कवी रविंद्रनाथ टागोर यांच्या मताप्रमाणे हिंदु–मुस्लीम अैक्य एकदम अशक्य आहे. कारण मुस्लीम आपले देशप्रेम एका विशिष्ट देशावर स्थिर ठेवू शकत नाहीत... त्यांना महमद अली सारख्या मुस्लीम व्यक्तीने म्हटले की, कोणत्याही परिस्थितीत मुसलमान, तो मग कोणत्याही देशात राहणारा असो, तो आपल्या धर्मबंधूच्याच विरोधात उभा टाकू शकत नाही, असे त्यांनी स्पष्ट उत्तर दिले." हे महमद अली काँग्रेसचे अध्यक्ष, एक राष्ट्रीय मुसलमान, खिलाफत चळवळीचे अध्वर्यु व गांधीजीचे उजवे हात होते, हे लक्षात घेतले म्हणजे ते किती प्रामाणिकपणे मुसलमानाचे मत बोलबून दाखवत आहेत, हे आपल्या लक्षात येईल.

डॉ. आंबेडकर म्हणतात,[५] "या सिद्धांतापैकी एक उल्लेखनीय अिस्लाम सिद्धांत आहे. त्यानुसार ज्या देशात मुस्लीम शासनाधिकारात नाही, जेथे कोठे मुसलमानी कायदा आणि त्या देशाचा कायदा यात फरक असेल, तर पहिल्याने दुसऱ्यावर अधिकार मिळवावा. आणि एका मुसलमानाने मुस्लीम कायद्याचे पालन करणे किंवा देशातील कायद्याची अवहेलना करणे योग्य आहे."

धर्मशास्त्राच्या दार–उल–अिस्लाम (अिस्लामभूमी) व दार–उल–हरब (शत्रूभूमी) या सिद्धांताची डॉ. आंबेडकर चर्चा करतात. या सिद्धांताच्या प्रभावाने मुसलमान वागतात, असे ते म्हणतात. या सिद्धांताच्या प्रभावामुळे 'भारत हा मुसलमानांकरिता राहण्यायोग्य स्थान आहे की नाही, हा प्रश्न मुसलमानांच्या संदर्भात उत्पन्न झाला' असे डॉ. आंबेडकर म्हणतात.[६] यातून स्वतंत्र राष्ट्राची कल्पना जन्म पावली आहे

दार–उल–अिस्लामचा प्रयत्न

या दार–उल–हरब पासून सुटका करुन घेण्याच्या शास्त्रीय मार्गाची डॉ. आंबेडकर चर्चा करतात ते म्हणतात,[६] "दार–उल–हरब पासून सुटका प्राप्त करण्याचा हिजरत हाच एक उपाय आहे, असे देखील सांगून टाकले पाहिजे. मुसलमानी मज्जिद नियमात अजून जिहाद ही मूळ आज्ञा आहे. त्यामुळे संपूर्ण जग तिच्या समोर आपले डोके नमवित नाही, तेव्हा पर्यंत अिस्लामी शासनाचा विस्तार करण्याचा भार एका मुसलमानाच्या खांद्यावर येवून पडतो." या दृष्टीने "१९१९ चे अफगाणिस्थानच्या भारतावरील आक्रमणाचे उदाहरण" या दार–उल–अिस्लामच्या प्रयत्नाचे आहे, डॉ. आंबेडकर म्हणतात.[७] 'या आक्रमणाच्या परिणामाने भारताचा उद्धार झाला असता की, भारताला गुडगे टेकावे लागले

होते, याबद्दल काही सांगता येत नाही' असे ते म्हणतात.[७] ते पुढे म्हणतात, "ते केवळ जिहादची घोषणाच करू शकतात असे नव्हे, तर ते 'जिहाद' यशस्वी करण्याकरिता कोणत्याही विदेशी मुसलमान शक्तीला आवाहनही करु शकतात किंवा एखादी विदेशी मुस्लीम शक्ती जर जिहादची घोषणा करण्याचा विचार करीत असल्यास, मदतीचा हा प्रयत्न यशस्वी करण्याकरिता त्या शक्तीला मदतही करू शकतात." यासाठी त्यांनी अनेक पुरावे दिले आहेत.

दार-उल-हर्ब

मुसलमानांच्या विरुद्ध गैरमुसलमानांचे बाजूने भांडण्यास मुसलमानाला अिस्लाम परवानगी देत नाही, हाच एकछत्री इस्लामवादाचा आधार आहे, असे डॉ. आंबेडकरांना वाटते. डॉ. आंबेडकर म्हणतात,[८] "केवळ याच भावनेतून सत्य स्पष्ट होते की, भारतीय मुसलमानांनी भारताच्या प्रगतीत इतका कमी भाग का घेतला? या उलट मुसलमानी देशाच्या ध्येयपूर्तीकरिता त्यांनी कोणतीही कमी ठेवलेली नाही." काँग्रेसच्या मागे जावून स्वातंत्र्य लढ्यात भाग न घेता खिलाफत चळवळीत मुसलमान का भाग घेत हे यावरुन आपल्या लक्षात येते. दरडोअी एकमताचा सावरकरांचा सिद्धांत मान्य केला म्हणजे भारतात लोकशाही तत्वाप्रमाणे हिंदू बहुसंख्याचे राज्य येणार. ते इस्लामी राज्य असणार नाही. अशा राज्यात धर्माज्ञेप्रमाणे मुसलमान राहू शकत नाहीत. डॉ. आंबेडकर म्हणतात,[९] "हिंदुद्वारे नियंत्रित व शासित सरकारच्या सत्तेचे मुसलमान कोठपर्यंत पालन करतात? याचे उत्तर शोधण्याच्या कार्यात फार चौकशी करण्याची आवश्यकता नाही. मुसलमानांच्या दृष्टीने हिंदू हे काफीर आहेत. जो देश काफिराद्वारे शासित असतो, त्याला दार-उल-हर्ब म्हणतात. अशी स्थिती असतानाही मुसलमान हिंदु-सरकारचा आज्ञाभंग करतील, हे प्रमाणित करण्याकरिता कोणताही पुरावा देण्याची आवश्यकता नाही... पुरावे इतके अधिक आहेत की, कोणता स्वीकारावा आणि कोणता सोडावा?" आणि मग डॉ. आंबेडकर अनेक पुरावे सादर करतात.

इंग्रजानी आमच्यापासून देश घेतला व तो परत आम्हालाच मिळाला पाहिजे, ही मुसलमानांची भूमिका आहे. डॉ. आंबेडकरांनी पुराव्यानिशी हे स्पष्ट करून सांगितले आहे. मुसलमानांकरिता स्वातंत्र हे लक्ष नाही. हे मुस्लीम राज्य स्थापन करण्याचे केवळ साधन आहे"[१०] असा ते निःसंदिग्ध अभिप्राय देतात.

मृगजलाप्रमाणे

१९०९ च्या विभक्त मतदार संघापासून १९४० च्या पाकिस्तानच्या मागणीपर्यंतचा हिंदु–मुस्लीम अैक्याचा प्रयत्नाचा अितिहास त्यांनी दिला आहे. निष्कर्ष काढताना ते लिहितात,[११] "तीस वर्षाच्या अितिहास असे दर्शवितो की,

हिंदु-मुस्लीम ऐकता झाली नाही. या उलट दोन्ही जातीत एकत्वाचा फार मोठा अभाव आहे. त्याच्या करिता वास्तविक सतत प्रयत्न केले गेले. आणि आता एका जातीने दुसऱ्या जातीप्रती आत्मसमर्पण करण्याशिवाय दुसरा कोणता प्रयत्न शिल्लक उरला नाही .... हिंदु-मुस्लीम ऐक्याचा प्रयत्न हा एक मृगजळाप्रमाणे आहे." सावरकर राजकारणात आले तेव्हाची ही परिस्थिती होती. हिंदूच्या आत्मबलिदानातून एकी होण्याचा एकच मार्ग तेव्हा शिल्लक उरला होता. सावरकरांचे म्हणणे हेच होते. सर्वांना मुसलमान होणे हा एक मार्ग होता. हाही पर्याय गंभीरपणे मांडण्यात आलाच होता. संपूर्ण भारतालाच दार-उल-इस्लामचा दर्जा देणे हा दुसरा मार्ग होता. या मार्गाचा गांधीजींही विचार करत असत. सावरकरांच्या मते हा हिंदूच्या जीवनमरणाचा प्रश्न होता. हिंदूचे स्वत्व जतन करण्याचा होता. त्यांची ही भीती निराधार नव्हती, हे डॉ. आंबेडकरच पटवून देत आहेत.

मुसलमानांच्या या प्रवृत्तीमुळे डॉ. आंबेडकरांचा हिंदु-मुस्लीम ऐक्य होअील यावर विश्वास राहिलेला नाही. हया दोन जमाती एकराष्ट्र म्हणून जगतील यावरही त्यांचा विश्वास नाही. यासाठी ते पाकिस्तानचा पर्याय विचारार्थ पुढे ठेवीत आहेत. ते म्हणतात, [१२] " हिंदु-मुसलमान एक आहेत, किंवा जर आज नसल्यास भवितव्यात एक होतील, या हिंदु-मुस्लीम समझोत्याच्या समाधानाचा प्रयत्न तसाच असफल राहील... या उलट आता या असा काळ आला आहे की, जेथे आम्हाला युद्धापलिकडची बहुतेक तथ्ये स्वीकार करावी लागतील; ती स्वीकृती मग कितीही दुःखकारक असो."

सांस्कृतिक हाडवैर

हिंदु-मुस्लीम ऐकता का होवू शकत नाही याची निष्कर्षरुपाने कारणे सांगताना. डॉ. आंबेडकर म्हणतात [१३] " हे मूळ ऐतिहासिक, धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक हाडवैर असलेल्या कारणापासून बनलेले आहे. राजकीय हाडवैर ही केवळ त्याची सावली आहे." " दोघांच्या मध्ये विरोध सैद्धांतिक स्वरूपात चालत आलेला दिसतो. त्यास शतकानुशतके मिटवू शकत नाही." [१४] " त्यांची सामाजिक एकरूपता देखील होवू शकत नाही " [१५] सर्वच बाबतीत हिंदु व मुसलमान हे कसे वेगळे आहेत हे तपशीलाने डॉ. आंबेडकरांनी दाखवून दिलेले आहे. इस्लामसंबंधी ते म्हणतात, [१५] " इस्लामी भातृत्व हे विश्वव्यापी भातृत्व नाही. ते मुसलमानांचे मुसलमानविषयक भातृत्व आहे. त्यांच्यात एक बंधुत्व आहे. परंतु त्याचा लाभ त्यांच्या संघापर्यन्तच मर्यादित आहे. जो त्या संघाबरोबर आहे, त्याच्या करिता त्यांच्या घृणा ब शत्रुत्वाशिवाय काहीच नाहीच... इस्लाम एका सत्य मुसलमानाला कधीही भारताला आपली मातृभूमी आणि हिंदूना आपला सगा-सोयरा म्हणून मान्यता देवू शकत नाही. त्यामुळे कदाचित् मौलाना महमद अली एक महान भारतीय आणि सच्चे मुसलमान होते म्हणून त्यांनी स्वतःला भारतापेक्षा

जेरुसलेमच्या भूमीत पुरणे पसंत केले" सावरकर मुसलमानांविषयी जे बोलतात तेच आम्ही डॉ. आंबेडकरांच्या शब्दात येथे सांगत आहोत.

'भारताचे मुसलमान स्वातंत्र्य स्थिर ठेवण्यात आपली कसलीही जबाबदारी समजत नाहीत' अशा निष्कर्षाला डॉ. आंबेडकर आलेले आहेत.[१५] स्वतंत्र भारतातील समाजीक हिंदीसैन्यामध्ये जे मुसलमान सैन्य असेल, ते सैन्य मुस्लीम-शत्रूराष्ट्राविरुद्ध लढणार नाही, याची दाट शंका डॉ. आंबेडकर उपस्थित करतात. देशाच्या संरक्षणाला हे फार घोकादायक आहे असे त्यांना वाटते.[१६] या सर्व कारणांवरून फाळणीचा पर्याय स्वीकारून हिंदू व मुसलमानांनी स्वतंत्र व्हावे असे डॉ. आंबेडकरांना वाटते. "अर्थात् भारताचे विभाजन करणे श्रेष्ठ आहे, ज्यामुळे मुस्लीम भारताची सुरक्षा मुसलमानांच्या सोबत असल्यामुळे मजबूत व्हावी आणि गैरमुसलमानी भारताची सुरक्षा गैरमुसलमानांच्या हातात राहावी" असे त्यांनी स्पष्टपणे म्हटले आहे.[१७]

वस्तुस्थितीचे भान

हिंदुत्वनिष्ठेचा ज्यांच्यावर कुणीही आरोप करू धजणार नाही, अशा डॉ. आंबेडकरांची ही मुस्लीमप्रवृत्तीची चिकित्सा आपण नीट समजून घेतली पाहिजे. या पेक्षा अधिक कठोर शब्दात सावरकरही या प्रश्नाची चिकित्सा करत नाहीत, हेही समजून घेतले पाहिजे. 'अंदमानातून आल्यानंतरच्या काळात सावरकरांचा मुस्लीम विरोध इतक्या टोकाला गेला की, त्यांना वस्तुस्थितीचेही भान राहीनासे झाले'[१८] असा आरोप करणारे डॉ. फडके, डॉ. आंबेडकरांवरही हाच आरोप करायला तयार आहेत काय? "सावरकर अंदमानातून परतल्यानंतर मुसलमानांकडे संशयी दृष्टीने पाहू लागले आणि मुसलमानांनी हिंदुस्थानला स्वदेश किंवा स्वराष्ट्र कधीच मानलेले नाही, असे बजावू लागले."[१९] या डॉ. फडके यांच्या आक्षेपाला डॉ. आंबेडकरांनीच साधार उत्तर दिलेले आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, वस्तुस्थितीचे भान जेवढे सावरकरांनी ठेवलेले आहे, तेवढे डॉ. आंबेडकरांसारखे काही अपवाद वगळता, कोणत्याही भारतीय नेत्याने ठेवलेले नाही. हिंदु-मुस्लीम प्रश्नाचे सावरकर-आंबेडकरांना झालेले आकलन चुकीचे होते नि गांधी-नेहरूंचे बरोबर होते, वस्तुस्थितीस धरून होते, असे जर आपण मानणार असू, तर मग या प्रश्नाचे उत्तर का चुकले, हे अैक्य का झाले नाही, पाकिस्तान का दिले, याचा अन्वयार्थ आपण कसा लावणार आहोत?

कुरूंदकरांची चिकित्सा

गांधीजींच्या मुस्लीम धोरणाचे समर्थन करणारे व हिंदुत्ववाद्यांनी राष्ट्रद्रोह केला असा आरोप करणारे समाजवादी विचाराचे प्रा. कुरूंदकर हिंदु-मुस्लीम प्रश्नाची चिकित्सा सावरकर-आंबेडकरांप्रमाणेच करतात. 'जागर' या त्यांच्या

पुस्तकातील 'राजकीय शोध व बोध' या लेखात ही चिकित्सा प्रामुख्याने आलेली आहे. मुस्लीम प्रवृत्तीचा शोध घेण्यासाठी त्यांनी १३ व्या शतकापासूनच्या इतिहासाचा मागोवा घेतला आहे. मुसलमानांच्या धर्मशास्त्राची चिकित्सा केलेली आहे. भारताला दार-उल-इस्लाम करण्याचा प्रयत्न १३ व्या शतकातील अल्तमशच्या काळापासून मुस्लीम राज्यकर्त्यांनी कसा केला याचा सारा अितिहास त्यांनी दिला आहे. अहमदशहा अब्दालीने आक्रमण करुन मराठ्यांना समाप्त करावे व भारताला दार–उल–इस्लाम बनवावे, यासाठी वहाबी चळवळ प्रयत्न करीत होती. या चळवळीचा नेता शहावली उल्लाला हा होता. मूर्तिपूजकांना समाप्त करणे आवश्यक आहे, असे मानणारा हा नेता होता. भारतातील राष्ट्रवादी मुसलमान या नेत्याला निःसंकोचपणे आपली प्रेरणा म्हणून मान्य करतात. हा सारा अितिहास प्रा. कुरुंदकर सांगतात.

१८५७ नंतर या वहाबीनी तीन टप्प्यावर आपली चळवळ आखली. पहिला टप्पा, इंग्रजांच्या ताब्यातून भारत मुक्त करणे. दुसरा, तो मुसलमानांच्या ताब्यात आणणे, व तिसरा, मुक्त हिंदुस्थानात मुस्लीम बहुसंख्या निर्माण करुन इस्लामच्या धर्मशास्त्राप्रमाणे राज्य निर्माण करणे हे ध्येय साध्य करण्यासाठी वहाबीच्या नंतर अनेक संघटना तयार झाल्या. जमीउत-उल-उलेमा ही अशीच एक संघटना असून त्यांच्या नेत्यांना राष्ट्रीय मुसलमान म्हणतात. हा सारा अितिहास कुरुंदकर सांगतात. अहरार व अन्सार म्हणून ओळखला जाणारा उलेमाचा गट १९३० ला फुटून बाहेर निघाला. १९४३ साली या जमियत-उल-उलेमा मधून मौलाना मौदुदी गट बाहेर पडला. या सर्व गटातील लोकांची विचारसरणी म्हणजे शहावली उल्लाचीच विचारसरणी होती मुसलमानात सर्वाधिक वजन असलेली जमाते अिस्लामी ही संघटना आहे. इस्लामच्या तत्वावर आधारित राज्यसत्ता निर्माण करणे, हा या संघटनेचा हेतू आहे. या मुस्लीम राजकीय प्रवृत्तीचा उगम व दिशा याचे अत्यंत परखड असे विवेचन कुरुंदकर करतात.

सांस्कृतिक राष्ट्रवाद

भारताला दार-उल-इस्लाम करण्याच्या मुसलमानांच्या या राजकीय प्रवृत्तीला कुरुंदकर सांस्कृतिक राष्ट्रवाद म्हणतात. मुस्लीम लीगच्या फाळणीच्या मागणीला ते विभक्ततावादी राजकारण म्हणतात. 'पुन्हा अेका मुस्लीम राजकारण' [२०] या लेखात ते म्हणतात, "मुस्लीम सांस्कृतिक राष्ट्रवाद कालानुक्रमाने मुस्लीम विभक्ततावादी राजकारणाहून जुना आहे. काँग्रेसने वेळोवेळी स्वातंत्र्यपूर्ण काळात मुसलमानांच्या सांस्कृतिक राष्ट्रवादाशी हातमिळवणी करुन मुस्लीम लीगच्या पाडाव करण्याचा विफल प्रयत्न केला आहे..... ज्या प्रमाणे हिंदूचा सांस्कृतिक राष्ट्रवाद हिंदूचा अितिहास, धर्म आणि परंपरा यावर उभा आहे, त्या प्रमाणे मुस्लीम सांस्कृतिक राष्ट्रवादाचे हे रूप आहे. तो अपरिहार्यपणे

मुस्लीम धर्म, जगभरचा मुसलमानांचा इतिहास, आणि मुस्लीम परंपरा यांच्यावर उभा आहे... मुसलमानांच्या सांकृतिक राष्ट्रवादाचे नेते नेहमीच... धर्म पंडित राहत आले. हे... ब्रिटीश राजवटीचे कडवे शत्रू होते. त्यांनी महमद गझनी, घोरी, कुतुबुद्दिन ऐबक, औरंगजेब हयांचा गौरव केला. अकबराला विरोध केला. हया धर्म पंडितांना इंग्रजाच्या अमलाखालून भारत स्वतंत्र व्हावयाला हवा होता. पण स्वतंत्र भारत हा स्वतःच्या धर्मासाठी आदर्श राजवट निर्माण करण्यासाठी हवा होता. मुस्लीम धर्मपंडितांचे नैतिक वजन मुस्लीम जनतेवर नेहमीच फार मोठे राहिले." मुस्लीम लीगपेक्षा ही सांस्कृतिक राष्ट्रवादी मुस्लीम मंडळी कुरुंदकरांना अधिक धोकादायक वाटते. या मंडळाना पाकिस्तान नको होते, अंग्रज जायला हवे होते व भारतात अिस्लाम राज्य स्थापन करायचे होते, असे कुरुंदकर म्हणतात.

मुस्लीम लीग

विभक्ततावादी राजकारण करणाऱ्या मुस्लीम लीगसंबंधी याच लेखात कुरुंदकर म्हणतात, "हिंदूंचे नि मुसलमानांचे हितसंबंध नुसते निराळे नाहीत तर परस्परविरोधी आहेत, असे लीगचे म्हणणे होते..... मुसलमान हे स्वतंत्र राष्ट्र असल्यामुळे त्यांना वेगळी भूमी तोडून देण्यात यावी, अशी लीगची मागणी होती.... भारत हे एकराष्ट्र आहे, असे त्यांना कधी वाटलेच नाही. या भारतीय राष्ट्रवादावर त्यांची श्रद्धाही नाही." काही तुरळक अपवाद वगळले, तर सर्व मुसलमान वरील पैकी कोणत्यातरी संघटनेच्या प्रभावाखाली होते. तुरळक अपवाद असणाऱ्याचे मुस्लीम समाजातही वजन नव्हते नि काँग्रेस दरबारीही त्यांना किंमत नव्हती. याचा अर्थ बहुसंख्य मुसलमानांच्या राजकारणाची प्रेरणा व ध्येय एकतर भारताला दार-उल-इस्लाम करणे हे होते किंवा स्वतंत्र पाकिस्तान करण हे होते. ही गोष्ट नीट समजून घेणे हेच वस्तुस्थितीचे मान ठेवणे होय, असे आम्हास वाटते.

प्रा. कुरुंदकर म्हणतात, [२८] "मुसलमानांच्या मुस्लीम जनतेत प्रभावी असणाऱ्या सगळ्याच संघटना भारतीय राष्ट्रवादापासून स्वतःला वेगळे समजणाऱ्या संघटना आहेत." मुसलमानांची अशी प्रवृत्ती असल्यामुळे मुस्लीम समाजात काँग्रेसला वजन नव्हते, ही गोष्ट त्यांनी स्पष्टपणे मान्य केली आहे. [२९] हिंदु-मुस्लीम प्रश्न हा अंग्रजानी निर्माण केलेला नसून, त्याची पाळेमुळे खोलवर अितिहासात व धर्मशास्त्रात आहेत, अशी कुरुंदकरांची भूमिका आहे.

एक कबुली जबाब

हिंदु-मुस्लीम प्रश्नाचे स्वरुप समजून घेण्यात काँग्रेसची चूक झाली, असे कुरुंदकरांचे म्हणणे आहे. 'अच्युत पटवर्धनांच्या सहवासात एक दिवस' हा त्यांचा 'शिवरात्र' मधील लेख या दृष्टीने अभ्यासण्यासारखा आहे. अच्युतराव पटवर्धन

हे सुप्रसिद्ध गांधीवादी. त्यांचे Communal Triangle 'जातीय त्रिकोण' हे स्वातंत्र्यपूर्व काळातील या प्रश्नावरील अधिकृत समजलेले पुस्तक आहे. या पुस्तकातील विवेचनाच्या संदर्भात चर्चा करतांना प्रा. कुरुंदकरांनी त्यांना प्रश्न विचारला, "खरोखर, हिंदु-मुस्लीम संघर्ष इंग्रजानी निर्माण केला आणि इंग्रज गेला की संपेल असे त्याकाळी तुम्हास वाटत होते काय ? की राजकारणाच्या दृष्टीने ही साईस्कर भूमिका म्हणून त्या काळी तुम्ही स्वीकारली होती. ? तुम्हाला अिंग्रज येण्यापूर्वीच्या भारत अितिहासातील हिंदु-मुस्लीम संघर्ष दिसत नव्हता काय ? "

अच्युतराव म्हणाले, "एक गोष्ट तुम्ही स्पष्टपणे समजून घ्या. हिंदु–मुस्लीम समस्येचे स्वरुप ओळखण्यात आमची चूक झालेली आहे ही चूक आज आपल्याला स्पष्टपणे दिसत आहे..." ते पुढे म्हणाले, "आमची मुख्य चूक मानवी मनाचा परंपरावाद आणि त्याचे तितकेच बळकट स्वरुप ओळखण्यात झालेली आहे समान नागरिकत्वाची, समान विकासाची व उदार शांततेची हमी दिल्यावर त्यांना काय म्हणून फुटावेसे वाटेल, असे आम्हास वाटे. मुस्लीम संस्थाने संपल्यावर, विभक्त मतदारसंघ गेल्यानंतर व यु. पी.तील मुस्लीम जमिनदारी संपल्यावर इंग्रज नसलेल्या स्वतंत्र भारतात मुस्लीम जातीयवाद टिकेल तरी कसा ? थोडी उदार वागणूक ठेवून मुसलमानांच्या मनातील भीती दूर केली तर हा मुस्लीम समाज राष्ट्रवादात आपोआप विलीन होवून जाईल, असे नेहरुंना वाटे... परिणामी भांडणे लावणारी तिसरी सत्ता गेली म्हणजे हा प्रश्न आपोआपच मावळेल असे आम्हाला वाटे. ही आमची प्रामाणिक भूमिका होती. आमच्या भूमिका कितीही प्रामाणिक असोत, अितिहासाने त्या खोट्या ठरविल्या–म्हणून सगळा विचारच नव्याने केला पाहिजे." [२२] कट्टर गांधीवाद्याचा हा स्पष्ट कबुलीजबाब फार महत्वाचा आहे. हिंदु-मुस्लीम प्रश्न वाटतो तितका सोपा नाही, हे सावरकरांचे म्हणणेच बरोबर होते, असे अितिहास घडून गेल्यानंतर गांधीवादी आता सांगू लागले आहेत. वस्तुस्थितीचे अचूक भान कोण ठेवीत होते, याची पुनर्तपासणी करायला आपण मोकळ्या मनाने तयार असले पाहिजे.

प्रश्न राष्ट्रीय अहंकाराचा

मुसलमानांचा प्रश्न हा केवळ अल्पसंख्याकांचा प्रश्न नसून स्वतंत्र राष्ट्राच्या अहंकाराचा प्रश्न आहे, असा कुरुंदकरांचा निष्कर्ष आहे. ते म्हणतात, [२३] "मुस्लिम प्रश्न गौणत्वाने अल्पसंख्याकांचा प्रश्न आहे, प्राधान्याने त्या प्रश्नाचे स्वरुप निराळे आहे. केवळ संख्या मोजूनच प्रश्न समजत नाहीत. ऱ्होडेशिया सारख्या देशात केवळ संख्येच्या दृष्टीने पाहिले, तर युरोपियन गोरे लोक अल्पसंख्याचे आहेत; पण म्हणून ऱ्होडेशियातील गोऱ्याचे राजकारण हे अल्पसंख्याचे राजकारण आहे, असे म्हणणे हास्यापद ठरेल. संख्येने अल्प असलेल्या जेत्याच्या वरिष्ठ अहंतेचे ते

राजकारण आहे. आपण जेते असल्याची, एकमेव वरिष्ठ संस्कृतीचे पाईक असल्याची प्रखर जाणीव भारतीय मुसलमानांच्या मध्ये आहे. हा दहा–अकरा टक्के समाज दरमहा अधून मधून रक्तपाताच्या धमक्या देतच असतो, त्याचे कारण हे आहे." प्रा. कुरुंदकर पुढे म्हणतात, [२४] "सर्वश्रेष्ठ धर्माचे पाईक असल्याचा हा अभिमान पृथक राष्ट्रवादाचा पाया आहे व जेते असल्याचा अतिहास हा श्रेष्ठ संस्कृतीचे पाईक असल्याचा पुरावा आहे." हिंदुत्वनिष्ठ नसणाऱ्या कुरुंदकरांची ही मुस्लीम प्रश्नाची चिकित्सा सावरकरांपेक्षा कोणत्या बाबती वेगळी आहे, हे कुणीतरी स्पष्ट करून सांगितले पाहिजे.

धार्मिक राष्ट्रवाद

'धर्म आणि मन'[२५] या लेखात कुरुंदकर मुसलमानांच्या या प्रवृत्तीची अशीच कठोर चिकित्सा करतात. मुस्लीम समाजात धर्म आणि राजकारण अशी विभागणी नाही, ही गोष्ट ते प्रामुख्याने पटवून देतात. 'परंपरेने मुसलमान स्वतःला सर्वश्रेष्ठ धर्माचे अनुयायी व विजेते मानतात. आजही ते भारतावर इस्लामिक धर्मराज्य निर्माण, करणे आपला हक्क व ध्येय मानतात' हेही कुरुंदकर पटवून देतात. 'मुसलमानांच्यामध्ये बाराशे वर्षे फक्त धर्माच्या जयघोषाची व समर्थनाची परंपरा आहे. ती आधुनिक काळात धार्मिक राजकारणाचे रूप घेते' हा मुसलमानांचा धर्मकर्मठपणा त्यांनी स्पष्टपणे नोंदविला आहे. 'मुस्लीम मनाच्या साऱ्या विचारपद्धती धर्मप्रधान असल्यामुळे त्यांचा राष्ट्रवादही धार्मिक राष्ट्रवाद आहे.' ही गोष्ट कुरुंदकर गंभीरपणे लक्षात घेतात. 'राष्ट्रवाद धार्मिक असल्यामुळे सर्व जगातील मुसलमान हे परस्पराचे बंधू आहेत, असे ते मानतात' याही गोष्टीची त्यांनी नोंद केलेली आहे

धर्मस्वातंत्र्याचा अर्थ

'मुस्लीम समाजाला धर्म स्वातंत्र्याशिवाय दुसरे काही नको आहे' या वस्तुस्थितीची नोंद करुन भारतात आपल्याला धर्मस्वातंत्र्य नाही, ही मुसलमानांची तक्रार कशी खरी आहे, ते कुरुंदकर पटवून सागतात. मुसलमानांना त्यांच्या धर्माप्रमाणे मिळणाऱ्या व अभिप्रेत असणाऱ्या धर्मस्वातंत्र्यांचा अर्थ सांगताना कुरुंदकर म्हणतात, "ईश्वराच्या आज्ञेत एक आज्ञा अशी आहे की, बिगर मुसलमानांशी केलेले करार पाळण्याची मुसलमानांना गरज नाही. त्यामुळे धर्मतःच मुसलमानांना इतरांशी खोटे बोलण्यास व करार करुन तो तोडण्यास मुभा आहे. इस्लामेतरांना लुटण्याची, त्यांना गुलाम करण्याची परवानगी आहे. इतके तर धर्मग्रंथात ईश्वराची आज्ञा म्हणूनच आले आहे. ह्याला अनुसरून मुसलमान धर्मस्वातंत्र्याची कल्पना स्पष्ट करतात. धर्मस्वातंत्र्य म्हणजे मुसलमान करण्याचा हक्क (तबलीग); इतरांचे धर्म खोटे व भ्रष्ट असल्यामुळे त्यांच्या

खंडनाचा हक्क; सत्यधर्माचे कुणी खंडन करू लागला तर त्याविरुद्ध लढण्याचा हक्क; इस्लाम हा विजेता व पसरणारा धर्म असल्यामुळे त्यात प्रदेशनिष्ठा बसत नाही हे सांगण्याचा हक्क; बिगर मुस्लीम राजवटीशी प्रामाणिक राहण्यास धर्मशास्त्राचा विरोधच आहे, त्यामुळे अशा निष्ठेतून मोकळीक; इस्लामी प्रजा व राष्ट्रे ह्याच्याविषयी प्रेम बाळगण्याचा, त्यांचे कल्याण करण्याचा हक्क. धर्म स्वातंत्र्यात हे सारे येते. असे धर्मस्वातंत्र्य मुसलमानांना भारतात नाही म्हणून भारतात धर्मस्वातंत्र्य नाही, असे मुसलमान मानतात." कुरुंदकरांचे हे म्हणणे वस्तुनिष्ठ आहे का ते मुस्लीमद्वेषावर आधारलेले आहे, हे समजून घेणे आपल्या प्रत्येकाचे काम आहे.

राष्ट्रद्रोहाचा वास

हिंदी मुसलमान भारतीय राष्ट्रवाद मानत नाहीत. ते मानण्यास त्यांच्या धर्मशास्त्राची अनुज्ञा नाही. धर्मशास्त्राची आज्ञा मोडून वागण्याची त्यांच्यात परंपरा नाही. धर्माची चिकित्सा करण्याचा पहिला प्रयत्नच मुसलमानांमध्ये हमीद दलवाईपासून सुरू होतो, असे कुरुंदकरच म्हणतात.[२७] अशा परिस्थितीत मुसलमान स्वाभाविकपणेच भारताबाहेरच्या मुस्लीम देशावर निष्ठा ठेवतात. असे करण्याला आपण राष्ट्रद्रोहीपणा म्हणतो. या संबंधी कुरुंदकर लिहितात,[२८] "भारतीय मुसलमानांचे राजकीय नेतृत्व पाकिस्तान प्रेमातून विचार करणारे आहे. सामान्य मुसलमान फक्त धार्मिक आहे. इस्लामचे केंद्र मक्का–मदिना भारताबाहेर. अरब जग भारताबाहेर. इस्लामी देश पाकिस्तान भारताबाहेर. असे हे चित्र आहे. म्हणूनच मुसलमान धर्मानुरोधे विचार करू लागला की, त्या विचाराला राष्ट्रद्रोहाचा वास येवू लागतो. राजकीय नेते स्पष्ट देशहानिकारक भूमिकेपर्यंत समाज नेतात. हिंदू समाजाला भारताबाहेर प्रेम करायला जागाच नाही. त्यामुळे धार्मिक हिंदूलासुद्धा राष्ट्रद्रोही होणे फार कठीण जाते."

निष्कर्ष एकच, उपाय वेगळे

प्रा. कुरुंदकर मुस्लीम प्रश्नाची चर्चा करत शेवटी 'पुण्यभू' वर आलेले आहेत. मुसलमानांची पुण्यभू भारताबाहेर असणे ही बाब राजकीयदृष्ट्या फार महत्वाची आहे. या पुण्यभूवर त्यांची असलेली प्रबलनिष्ठा भारतीय राष्ट्रवादाशी त्यांनी समरस होण्यातील सर्वांत मोठी अडचण आहे. मुसलमानांना हिंदूपासून अलग ठेवण्यामागील ती एक प्रभावी प्रेरणा आहे. हिंदुत्वनिष्ठ नसणाऱ्या आंबेडकर–कुरुंदकर आदींनी या गोष्टीची गंभीरपणे नोंद घेतली आहे. सावरकरांनीही नेमक्या याच गोष्टीची नोंद घेतली आहे. हिंदी राष्ट्रवाद हा मुसलमानांच्या मूळ प्रवृत्तीच्या विरोधी आहे, ही गोष्ट या तिघानीही स्पष्टपणे मान्य केलेली आहे. या तिघाचे हिंदु–मुस्लीम प्रश्नाच्या रोगाचे निदान एकच आहे, हे आपण

समजून घेतले पाहिजे. या रोगावरील उपाय योजना करण्यात या तिघांनी तीन मार्गांचा अवलंब केला. या मार्गांशी आपले मतभेद असले तरी मुस्लीम प्रश्नाची या तिघाची चिकित्सा व निष्कर्ष एकरूप आहेत, हे पूर्वग्रह सोडून समजून घेतले पाहिजे. सावरकर हिंदुत्वनिष्ठ असल्यामुळे त्यांना हा प्रश्न समजून घेण्यात वस्तुस्थितीचे भान राहिले नाही, हा आरोप करण्यापूर्वी सावरकरांच्या निष्कर्षालाच हिंदुत्वनिष्ठ नसणारे अनेक विचारवंतही कसे येतात, हे समजून घेतले पाहिजे. यासाठीच आम्ही आंबेडकरांची व कुरुंदकरांची भूमिका वर मांडलेली आहे.

हिंदु मुस्लीम प्रश्नांची सर्वांगीण चर्चा हा आपला विषय व हेतू नसून, या प्रश्नाचे सावरकरांचे आकलन नि निष्कर्ष वास्तव होते का भ्रामक होते, हा मुख्य मुद्दा येथे आपल्याला समजून घ्यायचा आहे. हिंदू बरोबर एकी करण्याची मुसलमानांना इच्छा नव्हती, गरज नव्हती– ही गोष्ट खरी आहे का नाही ? मुसलमान स्वतःला जेते समजत होते व तो अहंकार बाळगून भारताला इस्लामभूमी बनविण्याची आकांक्षा बाळगून होते का नाही ? आपल्या धर्मशास्त्रावर आधारलेला राष्ट्रवादच म्हणजे इस्लाम राष्ट्रवाद ते मानत होते, हे खरे आहे का नाही? ते स्वतःला स्वतंत्र राष्ट्र समजत हे खरे की नाही ? भारतापेक्षा भारताबाहेरचा मुस्लीम देश त्यांना जवळचा वाटत होता हे खरे का नाही ? हे जर खरे असेल, तर सावरकरांनी ते जाणले, ही गोष्ट त्यांच्या बुद्धिवादाशी सुसंगत होती, असेच आपल्याला म्हणणे भाग आहे. जर ही गोष्ट खरी नसेल, तर त्यांना व त्यांच्या बरोबर आंबेडकर, कुरुंदकर, डॉ घुर्ये, राहुल सांकृत्यायन, हमीद दलवाई, प्रभृती अनेक विचारवंताना दोष द्यायला आपण तयार असले पाहिजे. सावरकर हिंदुत्वनिष्ठ आहेत म्हणून त्यांचे वेगळ्या मोजपट्टीने मूल्यमापन न करण्याचे वस्तुस्थितीचे भान आपण बाळगले पाहिजे.

× × × ×

–६–

दोन राष्ट्रांचा सिद्धांत

१९३७ ला कर्णावतीच्या अध्यक्षीय भाषणात सावरकरांनी भारतात हिंदू आणि मुसलमान अशी दोन राष्ट्रे विद्यमान आहेत, असा सिद्धांत मांडला. सावरकरांच्या या द्विराष्ट्रवादाच्या सिद्धांतावर अनेकांनी टीका केलेली आहे. "हिंदुस्थान हे एकता पावलेले व विसंवादरहित राष्ट्र आहे असे आज तरी मानता येत नाही, तर उलट हिंदुस्थानात हिंदु आणि मुसलमान अशी मुख्यत: दोन राष्ट्रे विद्यमान आहेत" असे सावरकर म्हणाले. या सावरकरांच्या द्विराष्ट्रवादावर आंबेडकरांनी व कुरुंदकरांनीही टीका केलेली आहे. द्विराष्ट्राचा सिद्धांत मान्य करणे म्हणजे

मुसलमान हे स्वतंत्र राष्ट्र आहेत, हे मान्य करणे होय व हे मान्य केले म्हणजे पाकिस्तानची मागणी मान्य करणे होय. हा सिद्धांत मान्य करणारे सावरकर काय म्हणतात हे समजून घेण्यात अनेकांनी चुका केलेल्या आहेत, हे लक्षात घेतले पाहिजे.

त्यांनी द्विराष्ट्रवाद मानला याचा अर्थ मुसलमान हे स्वतःला स्वतंत्र राष्ट्र समजतात ही वस्तुस्थिती मान्य केली एवढाच आहे. वस्तुस्थिती (Fact) मान्य करणे आणि हक्क (Right) मान्य करणे यात फरक आहे. वस्तुस्थिती पुरतेच बोलायचे तर स्वतः आंबेडकरांनी व कुरुंदकरांनीही निःसंदिग्ध शब्दात मुसलमान हे स्वतःला राष्ट्र मानतात ही गोष्ट मान्य केलेली आहे. हे आपण मागे पाहिले आहे. हिंदु-मुस्लीम प्रश्न किती बिकट आहे हे सांगताना सावरकरांनी ही वस्तुस्थिती सांगितली आहे. "दोन विभिन्न संस्कृति नि वंश नि राष्ट्रे यांच्यातला हा लढा आहे."[२] असे ते म्हणतात. "कित्येक बालिश राजकारणी हिंदुस्थान हे पूर्वीच विसंवादरहित बनून गेलेले राष्ट्र आहे किंवा तशी अच्छा करताच ते तसे होणार आहे असे मानण्यात भयंकर चूक करीत आहेत. हे अमचे सद्हेतुप्रेरित पण अविचारी मित्र आपली स्वप्ने सत्यच समजून चालत असतात"[३] अशा प्रकारे वस्तुस्थिती मांडण्याचा व मुसलमानांच्या मनात काय आहे हे समजून देण्याचा सावरकरांचा प्रयत्न आहे. ते त्याच भाषणात पुढे म्हणाले, [४] "जातीय म्हणून म्हटले जाणारे प्रश्न हा हिंदु व मुसलमान यांच्यातील सांस्कृतिक, धार्मिक व राष्ट्रीय विरोधाचा शतकानुशतके चालत आलेला केवळ वारसा आहे. योग्य काळ येताच तुम्ही ते प्रश्न सोडवू शकाल, पण त्यांचे अस्तित्व मुळात नाकारुन ते दडपून टाकू शकणार नाही." तेव्हा मुख्य प्रश्न वस्तुस्थिती समजून घेण्याचा होता, हे लक्षात घेतले पाहिजे.

डॉ. भालेरावांची चूक

सावरकरांनी द्विराष्ट्राचा हा सिद्धांत चुकीने मांडला होता व ही चूक त्यांनी नंतर कबूल केली, असे डॉ. सुधाकर भालेराव म्हणतात. [५] भालेरावांचे हे म्हणणे चुकीचे आहे. राष्ट्र अैवजी संप्रदाय असा शब्द त्यांना वापरायचा होता, असे भालेराव म्हणतात. १९४३ मध्ये नागपूरच्या पत्रकार परिषदेत सावरकरांनी वरील दोन राष्ट्राच्या भूमिकेचे स्पष्टीकरण केलेले आहे, हे भालेरावांनी लक्षात घेतलेले दिसत नाही. सावरकरांचे स्पष्टीकरण असे :[६] "मुसलमान राष्ट्र आहेत हे अैतिहासिक सत्य आहे. त्या सिद्धांताची अैतिहासिक व वांशिक पार्श्वभूमि मी स्पष्ट करून सांगितली. इस्लाम हे आपल्या जन्मापासून धर्मनिष्ठ कुराणप्रणित राष्ट्र आहे. या राष्ट्राला भौगोलिक मर्यादा नव्हतीच. मुसलमान जेथे जेथे गेले तेथे तेथे राष्ट्र म्हणून गेले. हिंदुस्थानात ते आले तेही राष्ट्र म्हणून." मुसलमानांच्या भूमिकेतून विचार करुन सावरकर ही वस्तुस्थिती सांगत आहेत. १९३७ साली ते

चुकून बोलले असे समजण्याचे काहीच कारण नाही. सावरकर वर जे सांगतात तेच आंबेडकर व कुरुंदकरही सांगतात, हेही लक्षात घेतले पाहिजे.

पुरातन सिद्धांत

दोन राष्ट्राचे स्पष्टीकरण करताना ते पुढे म्हणाले, " मुसलमान कोठेही गेले तरी ते परके म्हणून राहतील किंवा राज्य तरी करतील. कुराणाप्रमाणे जे मुसलमान नाहीत, ते सगळे काफीर, इस्लामचे शत्रू. आजही मशिदीत प्रार्थनेनंतर काफिराच्या राज्यात राहण्याचे पाप केल्याबद्दल ते प्रायश्चित घेतात. मुसलमानांच्या तत्वाप्रमाणे सर्व पृथ्वी दोनच राष्ट्रात विभागली जाते. दार-उल-इस्लाम आणि जेथे इस्लामची सत्ता नाही तो दार-उल-हरब. या त्यांच्या धार्मिक आदेशाप्रमाणे त्यांनी हिंदुस्थानावर स्वारी केली, ती स्वतंत्र राष्ट्र म्हणून केली. त्यांनी हिंदु-राष्ट्राला जिंकले ते शत्रूराष्ट्र म्हणूनच–एकराष्ट्र म्हणून नव्हे ! हा अतिहास नाकारताच येत नाही " सावरकर या अर्थी मुसलमान ते स्वतंत्र राष्ट्र आहेत असे म्हणतात, हे समजून घेतले पाहिजे.

सावरकर पुढे म्हणाले, " मध्यंतरी हिंदूतील सुशिक्षित वर्गाने निदान हिंदुस्थानातील तरी हिंदु–मुसलमान हे एकच राष्ट्र आहेत, कारण ते एकाच देशात राहतात, अशी भौगोलिक राष्ट्रवादाची तळी उचलून धरण्याचा आटोकाट प्रयत्न मुख्यतः काँग्रेसद्वारे केला. तो सद्हेतुच होता. पण मुसलमानांनी त्यांच्या वर दिलेल्या धर्मनिष्ठ किंवा पोथिनिष्ठ राष्ट्रवादाचीच कास धरून मुसलमान हे हिंदु-राष्ट्रापासून निराळे आहेत ही भावना कधीही सोडली नाही व हा हक्क सांगण्यास कचरले नाहीत. मुस्लीम लीगने अनुकूल संधी पाहून आणि काँग्रेसच्या शरणागतीच्या सतत धोरणाचा लाभ घेवून ' मुसलमानी राष्ट्र ' हे निराळे राष्ट्र आहे, हा तोच पुरातन सिद्धांत पुन्हा ठामपणे पुढे मांडला इतकेच काय ते. ही वस्तुस्थिती आहे." दोन राष्ट्र मान्य करण्याचा हेतू ही वस्तुस्थिती दाखवून देणे एवढाच होता.

वस्तुस्थितीस मान्यता

सावरकर पुढे म्हणाले, " परंतु मुसलमान आणि हिंदू अशी दोन राष्ट्रे हिंदुस्थानात आहेत, ही वस्तुस्थिती सांगणे म्हणजे काही मुसलमानांचा देश तोडून देण्याचा पाकिस्तानी दुराग्रह मान्य करणे नव्हे, ही मुख्य गोष्ट लोकांच्या अजून ध्यानात आलेली नाही... मुसलमान स्वतःला राष्ट्र म्हणून समजोत वा न समजोत, हिंदुस्थानपुरते तरी हिंदूच्या मानाने ते अत्यंत अल्पसंख्यांक आहेत. आणि त्यांना हिंदुस्थानात राहावयाचे असेल, तर राजकीयदृष्टया एक अल्पसंख्य जमात म्हणून राहिले पाहिजे... लोकसत्तेच्या तत्वाप्रमाणे हिंदुस्थान हे राजकीयदृष्टया हिंदूचेच समजले गेले पाहिजे." तेव्हा सावरकरांची भूमिका अशी की, मुसलमानांच्या स्वतंत्र राष्ट्राची कल्पना, आकांक्षा व मागणी आपण धीटपणे वस्तुस्थिती म्हणून

समजून घेतली पाहिजे. "ती वस्तुस्थिती नुसती नाकारण्याच्या भावडट नि भेकट धोरणाने नव्हे, तर ती वस्तुस्थिती समजून घेवून, त्या वस्तुस्थितीला तोंड" दिले पाहिजे, अशी त्यांची रोखठोक भूमिका आहे.[६]

हिंदुराष्ट्र हे उत्तर

मुसलमानांच्या या स्वतंत्र राष्ट्राला सावरकर कसे तोंड देवू पाहतात हे आपण समजून घेऊ. या मुस्लीम राष्ट्राला सावरकरांजवळ हिंदुराष्ट्र हे उत्तर आहे, एवढेच आपल्याला माहीत असते. पण हे हिंदुराष्ट्र म्हणजे नेमके काय आहे, हे मात्र आपण कधी नीट समजून घेत नाही. हिंदुधर्मावर, हिंदुतत्वज्ञानावर किंवा हिंदुसंस्कृतीवर आधारलेले ते राष्ट्र आहे, असे आपल्यापैकी बऱ्याच जणांना समज असतो. त्यांच्या हिंदुराष्ट्रात हिंदू हे प्रथम नागरिक व मुसलमान हे दुय्यम नागरिक आहेत, असा समज असणारेही काहीजण आहेत. या हिंदुराष्ट्रात सर्वांना समान नागरिकत्व असले तरी राष्ट्रीयत्व फक्त हिंदूनाच असून अहिंदूना सावरकर राष्ट्रीयत्व द्यायला तयार नाहीत, असे म्हणणारेही काही विद्वान आहेत. सावरकर हिंदुराष्ट्र मानतात, मात्र हिंदीराष्ट्र नाकारत नाहीत, या वस्तुस्थितीमुळे त्यांचे हिंदुराष्ट्र समजून घेताना आपण अधिकच गोंधळात पडतो.

सावरकर हिंदुराष्ट्राचा सिद्धांत विविध पातळीवरुन मांडतात. राष्ट्र कशाने बनते याचा ते विचार करतात. यासाठी ते अतिहास पाहतात. जगातील सर्व राष्ट्राची पाहणी करतात. केवळ एक देश या एकाच घटकावर त्या देशातील सर्व लोकांचे राष्ट्र होत नाही, अशी वस्तुस्थिती ते मांडतात. 'लोकांना स्वभावसिद्ध राष्ट्र बनावयास लागणारा सर्वात महत्वाचा घटक म्हणजे एकात्म एकराष्ट्र बनविण्याची त्यांची इच्छा हाच होय'[७] अशी राष्ट्रीयत्वाची व्याख्या ते करतात. ही एकात्मता कशामुळे येते याबद्दल ते सामान्य सिद्धांत मांडतात. एकवंश, एकधर्म, एकसंस्कृती या गोष्टी या एकात्मतेला पूरक असतात, हे ते पटवून देतात. केवळ एक भूमी या नात्याने ही एकात्मता येणे हे अत्यंत आदर्श व उदात्त राष्ट्रीयत्व आहे, असेही ते स्पष्टपणे मान्य करतात. पण अशा अवस्थेला जगातील एकही राष्ट्र गेलेले नाही, असे त्यांना वाटते. निदान भारताच्या परिस्थितीत तरी एक भूमी हा राष्ट्रीयत्वाचा एकमेव पाया होऊ शकत नाही, असे ते पटवून देतात. ऐतिहासिक, वांशिक, जातीय, धार्मिक वा सांस्कृतिक बंधन या भूमीच्या बंधनापेक्षा अधिक तीव्र असते, ही वस्तुस्थिती लक्षात घ्यायला ते आग्रहाने सांगतात. भारतामध्ये तर ही वस्तुस्थिती दुर्लक्ष करून अजिबात चालणार नाही, असे त्यांचे म्हणणे आहे.

विरोध कोणत्या अर्थी ?

राष्ट्र बनण्यासाठी जे घटक आवश्यक आहेत, ते सारे हिंदू लोकांमध्ये

आहेत, हे सावरकर पटवून देतात. हिंदू हे स्वतःसिद्ध व स्वयंभेव राष्ट्र आहेत, हा त्यांचा एक महत्वाचा सिद्धांत आहे. हे राष्ट्र पुरातन काळापासून या देशात अस्तित्वात आहे व आजही ते जिवत आहे, हे ते आग्रहाने पटवून देतात. एक वस्तुस्थिती (Fact) दाखवून देणे, या अर्थी व हेतूने हिंदुराष्ट्राचा हा सिद्धांत ते मांडतात, हे समजून घेतले पाहिजे. ऐतिहासिक व वर्तमानकालीन वस्तुस्थिती म्हणून सावरकरांचे हे म्हणणे किंवा सिद्धांत खोटा आहे, असे कुणालाही म्हणता येणार नाही. वस्तुस्थिती म्हणून सावरकर ही गोष्ट दाखवून देतात, हा वादाचा मुद्दा नाही. आग्रहाने ही वस्तुस्थिती दाखवून देण्याचे कारण काय, हा खरा वादाचा मुद्दा आहे. हिंदुराष्ट्रावर आपण जेव्हा आक्षेप घेतो तेव्हा कोणत्या भूमिकेतून तो घेतो ? वस्तुस्थिती म्हणून हिंदुराष्ट्र आपल्याला मान्य नाही, का ही वस्तुस्थिती मांडणे, हिंदु मुस्लीम प्रश्न सोडविण्यासाठी एक उत्तर म्हणून ती वापरणे आपल्याला मान्य नाही, हे एकदा आपणच नीट ठरविले पाहिजे. खरा आक्षेप हिंदुराष्ट्राचा वापर हिंदु-मुस्लीम प्रश्न सोडविण्यासाठी करण्याला असतो; वस्तुस्थिती म्हणून ऐतिहासिक, तात्विक वा Academic अर्थी ही कल्पना मान्य करण्याला नसतो, हे लक्षात घेतले पाहिजे.

याच मुद्द्याचा दुसऱ्या पद्धतीनेही विचार करता येतो. समजा, भारतात फक्त हिंदू लोकच असते, अहिंदू औषधालाही नसते, तर हिंदू हे स्वयंभेव राष्ट्रच आहेत या सिद्धांताला आपण कोणत्याही अर्थाने विरोध केला असता काय ? याचे उत्तर नाही असे आहे ! या परिस्थितीत आपण हिंदुराष्ट्र नाही असे म्हणणे म्हणजे भारतातील लोक राष्ट्र म्हणून उभे टाकायला लायक नाहीत, हे मान्य करणे असते. हिंदुराष्ट्र हा शब्द वापरुन आपण काहीतरी चूक करीत आहोत हे अशा स्थितीत कुणाच्या लक्षातही आले नसते. सावरकरांचे म्हणणे असे की, ही जी वस्तुस्थिती आहे ती भारतात अहिंदू आहेत या कारणामुळे कशी बदलणार ? तेव्हा तात्विक या अर्थी, भारतात हिंदुराष्ट्र आहे हे आपल्याला मान्यच करावे लागते. व्यावहारिक अर्थी, या हिंदुराष्ट्राचा अभिमान न धरता हिंदीराष्ट्राचा अभिमान धरावा, असे आपल्याला म्हणायचे असते. म्हणजे आपल्या आक्षेपाचा मुख्य मुद्दा सावरकर हिंदुराष्ट्राचा अभिमान का धरतात, त्याचा प्रचार का करतात, भारतीय राष्ट्रवादामध्ये समस्या का निर्माण करुन ठेवतात हाच असतो, हे समजून घेतले पाहिजे.

बहुसंख्याकांचे राष्ट्र

या हिंदुराष्ट्राचा दुसऱ्या एका पातळीवरुन वा भूमिकेतून सावरकर विचार करतात. भारतात हिंदू हे बहुसंख्य आहेत, ही वस्तुस्थिती आहे. भारतात हिंदुराष्ट्र आहे, हे तात्विक अर्थी सुद्धा मान्य करायला आपले बुद्धिवादी मन कदाचित् कुरकुर करील, पण भारतात हिंदू बहुसंख्य आहेत, हे काहीही कुरकुर न करता आपण

मान्य करतो हिंदू बहुसंख्य असण्याचे काही अपरिहार्य परिणाम होतात. लोकशाही राजवटीत बहुसंख्य लोकांचेच सरकार अधिकारावर येत असते. त्या सरकारात हिंदूच बहुसंख्य असल्यामुळे एका दृष्टीने ते हिंदू सरकारच असते. या राज्यकर्त्या मंडळींनी हिंदुपणाची भावना ठेवू नये एवढीच आपली रास्त अपेक्षा असते. काँग्रेस ही संस्था हिंदूची आहे, असे त्या काळातील मुसलमान याच अर्थाने म्हणत. आम्ही हिंदू नाहीत असे काँग्रेसचे नेते जे उत्तर देत, तेही वरील रास्त अपेक्षेपोटीच होत. लोकशाहीतील सरकार भारतात हिंदूचेच येणार व ते हिंदुसरकार असणार हाच आक्षेप याच अर्थाने मुसलमान घेत आले आहेत.

प्रश्न हिंदू बहुमताचे सरकार बनण्यापुरताच नसतो. हे सरकार ज्या प्रश्नांचा विचार करते त्यात अपरिहार्यपणे बहुसंख्येने हिंदूचेच प्रश्न असतात. निवडणुकीत अल्पसंख्यांच्या मताला महत्व असले तरी रोजचे प्रश्न सोडविताना बहुसंख्याच्याच प्रश्नांना महत्व असते, अल्पसंख्यांकाना संरक्षण देणे, त्यांच्यावर अन्याय होणार नाही याची काळजी करणे, बहुमताखाली अल्पमत दडपून जावू नये याची चिंता करणे, एवढेच लोकशाहीतील सरकार त्यांच्यासाठी करत असते. या अर्थानेही विचार केला तरी हिंदूच्याच हिताशी व प्रश्नांशी बहुसंख्येने निगडीत असलेले सरकारच बहुसंख्य हिंदूच्या भारतात अधिकारावर येत असते.

विचारप्रणालीचा प्रभाव

एवढेच नव्हे, तर बहुसंख्य असलेल्या हिंदूची जी विचार प्रणाली आहे, तिचाच प्रभाव या सरकारवर व एकंदर राष्ट्रीय जीवनावर पडत असतो. हुकूमशाहीतील सरकारच बळाने ही गोष्ट रोखू शकते. बहुसंख्य हिंदूच्या राज्यातील सरकार हिंदूच्या पद्धतीनेच सर्व प्रश्नांचा विचार करणे स्वाभाविक असते. विचार करण्याच्या ज्या परंपरेत सरकारातील बहुसंख्य मंत्री वाढले; ज्या आचार–विचारांनी त्यांचा पिंड तयार झाला, त्याच पद्धतीने ते राष्ट्राच्या विविध प्रश्नांचा विचार करणे स्वाभाविक असते. आपण कसे वागत आहोत हे या हिंदू सरकारला कळत नसते, मात्र अहिंदूला हे जाणवल्याशिवाय राहत नसते. प्रा. कुरुंदकर हा मुद्दा मांडताना म्हणतात,[९] "भारतीय संविधानाने सर्व नागरिकांना धर्मस्वातंत्र्य दिलेलेही आहे. मुसलमानांची मुख्य तक्रार ही आहे की, भारतीय संविधानाने मुसलमानांना धर्मस्वातंत्र्य दिलेले नाही. प्रत्येकाला आपापल्या धर्मावर श्रद्धा ठेवण्याचा अधिकार आहे, हे भारतीय संविधान मान्य करते. पण 'धर्मावर श्रद्धा' ही कल्पना भारतीय शासनाने हिंदू पद्धतीने मान्य केली आहे. मुसलमानांना त्यांच्या धर्माच्या प्रथा परंपराच्याप्रमाणे 'धर्मावर श्रद्धा' ठेवण्याचा अधिकार हवा आहे. तो मिळत नाही म्हणून भारत सरकारला ते हिंदू सरकार म्हणते. मुसलमानांची मुख्य तक्रार राज्यकर्ते बहुसंख्य हिंदू आहेत ही नसून राज्यकर्ते हिंदू पद्धतीने प्रत्येक प्रश्नाचा विचार करतात, ही आहे. हिंदूना या आरोपाचा अर्थच

समजत नाही. मग आमचे सेक्युलर राज्यकर्ते हिंदू पद्धतीने जोरजोरानी हा आरोप नाकारतात." तेव्हा हिंदूच्या एकूण विचार, आचार व जीवनपद्धतीचा प्रभाव स्वाभाविकपणे भारतात सर्वच क्षेत्रात राहणार हे उघड आहे. या अर्थानेही भारतात हिंदूचेच राज्य आहे असे म्हणता येवू शकते.

बहुसंख्याकत्व हेच राष्ट्रीयत्व

याच अर्थाने 'बहुसंख्याकत्व हेच राष्ट्रीयत्व' असा सावरकर सिद्धांत मांडतात. १९४८ मध्ये किर्लोस्कर मासिकाच्या प्रश्नावलीला उत्तर पाठविताना त्यांनी स्पष्टपणे म्हटले आहे की,[१०] "घटनात्मक दृष्टीने भारतीय संघराज्य हे 'हिंदुराज्य'च आहे. कारण कोणतेही राष्ट्र हे त्यातील राष्ट्रीय बहुसंख्याकांच्या नावानेच ओळखले जाते. 'बहुख्याकत्व हेच राष्ट्रीयत्व' बहुसंख्याकांच्या हातात सत्ता असावी हीच लोकशाही आहे." सावरकरांचे हिंदुत्व म्हणजेच हे बहुसंख्याकत्व आहे. 'पाकिस्तान' या विषयावर भाषण करताना १९४३ मध्ये ते म्हणाले,[११] "हिंदुस्थानात हिंदू बहुसंख्यांक आहेत. तेव्हा लोकशाहीप्रमाणे येथे जे राज्य येईल ते हिंदूंचेच येणार ही कल्पना मुसलमानांना मान्य नाही. म्हणून त्यांचा संपूर्ण भारताच्या लोकशाहीस विरोध आहे." हिंदू हे बहुसंख्य या नात्याने जे राज्य येईल ते हिंदुराज्य अशी ही सावरकरांची भूमिका आहे. या अर्थाने सावरकर भारताला हिंदुराष्ट्रच म्हणतात.

हिंदुराष्ट्राचा अर्थ

सारांशाने, लोकशाहीमध्ये दरडोई एकमत या तत्वानुसार जे हक्क बहुसंख्यांक हिंदूना मिळतील, त्या हक्कांपुरताच सावरकर मुख्यतः विचार करतात. या हक्कांनाच ते हिंदुत्व म्हणतात हे हिंदुत्व हेच त्यांना राष्ट्रीयत्व वाटते. हे राष्ट्रीयत्व म्हणजेच बहुसंख्यांकत्व टिकले पाहिजे, एवढीच त्यांची अपेक्षा आहे, चिंता आहे, आग्रह आहे. असे हक्क हिंदूना मिळणाऱ्या राष्ट्राला ते हिंदुराष्ट्र म्हणतात. बहुसंख्याकांच्या नावावरून राष्ट्राला नाव पडते हा नियमच आहे, म्हणून भारताला या अर्थाने ते हिंदुस्थान म्हणतात. इंग्रजांचा इग्लंड, फ्रेंचांचा फ्रान्स, जर्मनांचा जर्मनी तसाच हिंदूचा हिंदुस्थान असा व्यापक अर्थ ते घेतात. नाव देण्याची हीच पद्धत जगभर आहे असे ते सांगतात.[१२] "हिंदुत्वावर आधारलेले राष्ट्र म्हणजे धार्मिकतेवर आधारलेले राष्ट्र नाही."[१३] ही गोष्ट ते आग्रहाने सांगतात. बहुसंख्याकांच्या लोकशाही तत्वाप्रमाणे येणारे स्वाभाविक व न्याय हक्कांवर आधारलेले राष्ट्र म्हणजेच हिंदुत्वावर आधारलेले राष्ट्र, असे ते समीकरण मांडतात. हेच त्यांचे हिंदुराष्ट्र आहे !

खरा आक्षेप कोणता ?

लोकशाहीच्या भूमिकेतून सावरकर मानीत असलेल्या हया हिंदुराष्ट्रावर

आपण कोणता आक्षेप ठेवणार आहोत, हे नीट ठरविले पाहिजे. दरडोओी एकमताचे तत्व लोकशाहीत आक्षेपार्ह मानता येत नाही. स्वतंत्र भारताच्या घटनेने हेच तत्व मान्य केलेले आहे सावरकरांनी घटनासमितीच्या अध्यक्षाला १९४९ मध्ये तार पाठवून खरी खरी राष्ट्रीय घटना बनविण्याबद्दल अभिनंदन केलेले आहे. आपल्या तारेत ते म्हणाले,[१३] "आमच्या भारतीय राष्ट्राचे खरेखुरे राष्ट्रीय स्वरुप सिद्ध करुन दाखविल्याबद्दल मी तुमचे अभिनंदन करतो." धार्मिक व वांशिक आधारावरील भेदभाव नष्ट केल्याबद्दलचे हे अभिनंदन आहे. म्हणजे आक्षेप दरडोओी एकमताबद्दल नाही; अल्पसंख्याना लोकसंख्येचा प्रमाणात राखीव प्रतिनिधित्व देण्याबद्दल नाही; त्यांचा धर्म, भाषा, संस्कृती इ. ना न्याय्य संरक्षण व विकासाची हमी देण्याबद्दलही नाही. बहुसंख्यांकांच्या आचार-विचारांचे राष्ट्रजीवनावर पडणाऱ्या स्वाभाविक प्रभावाबद्दलही आक्षेप असू शकत नाही. मग या अर्थीच्या हिंदुराष्ट्रावर आपण आक्षेप कोणता ठेवणार ?

पूर्वग्रह सोडून व शांत बुद्धीने जर विचार केला, तर आपल्याला हे लक्षात येईल की, सावरकरांच्या या वरील प्रतिपादनाला आपला आक्षेप त्यांनी हिंदुत्व आणि हिंदुराष्ट्र हे शब्द का वापरावेत, याच गोष्टीला आहे. सावरकर येथे जे मांडतात, तेच भारतीयत्व, हिंदीराष्ट्र व भारतीय संस्कृती असे सेक्युलर शब्द वापरुन, हिंदुत्वनिष्ठ नसणाऱ्या अनेकांनी मांडलेले आहे. पं. नेहरु यांचे एक ठळक उदाहरण आहे. मोहों-जो-दारोच्या काळापासून चालत आलेल्या भारतीय संस्कृतीचा वारसा आपण जपला पाहिजे, अभिमान व आदरबुद्धी बाळगली पाहिजे, असे नेहरुंनाही वाटत असे[१४] "राष्ट्रीयत्व, राष्ट्रप्रेम म्हणजे त्या राष्ट्रातील लोकांनी भूतकालात जी काही मोठमोठी कामे पार पाडली असतील, त्यांच्या आचार विचारात ज्या काही विशिष्ट परंपरा ते पाळीत आलेले असतील, त्या सर्वांची त्या लोकांना असलेली आठवण, त्या सर्वांची मिळून सामूहिक स्मृती."[१५] अशी नेहरू राष्ट्रीयत्वाची व्याख्या करतात. सावरकरांच्या हिंदुत्वात या शिवाय अन्य काय आहे ?

भारतीय संस्कृती वा विचारसरणी कोणती आहे हे सांगताना नेहरु म्हणतात,[१६] "अभयवृत्तीने सत्याचा शोध करीत राहावे, सर्व मानव जात एक आहे अशी 'वसुधैव कुटुंबकम्' वृत्ती ठेवावी, माणसातच नव्हे तर सर्वाभूती देवी अंश आहे ही जाणीव ठेवावी... उत्तरोत्तर मानवाला अधिक स्वातंत्र्य मिळत जावे व त्याची उन्नती अधिकाधिक होत जावी, अशा तत्वांच्या आधारानेच भारतीय विचारसरणी चालत आलेली आहे." ही विचारसरणी हिंदूचीच आहे, हे उघड आहे. नेहरू याच संस्कृतीत मुसलमानांचाही समावेश करतात, व भारतीय संस्कृती असे नांव देतात. यालाच सावरकर हिंदुसंस्कृती असे म्हणतात, एवढाच फरक आहे. बहुसंख्यांकाच्या नावावरुनच त्या देशाला, त्या देशातील लोकांच्या संस्कृतीला, विचारसरणीला, इतिहासाला संबोधले पाहिजे, असे सावरकरांना

वाटते. यासाठी ते 'हिंदू' हा शब्द वापरतात. नेहरुंची तक्रार ही आहे की, हिंदू हा शब्द मुळात कितीही राष्ट्रीय असला तरी नंतर त्याला धार्मिक आशय चिटकलेला आहे, त्यामुळे तो शब्द भारतीय या अर्थी वापरणे चूक आहे. [१६]

सावकर हिंदुराष्ट्राचा सिद्धांत अशा प्रकारे ऐतिहासिक दृष्टीने आणि लोकशाही तत्वाच्या दृष्टीने असा दोन प्रकारे मांडतात. या दोन्हीही अर्थाच्या त्यांच्या हिंदुराष्ट्रावर बुद्धिवादाच्या भूमिकेतून कोणता आक्षेप ठेवता येतो याचा विचार केला पाहिजे. एक वस्तुस्थिती म्हणून हिंदुराष्ट्र अस्तित्वात आहे, हे मान्य करणे खऱ्या बुद्धिवाद्यालाही भाग आहे. हचा राष्ट्राला हिंदुराष्ट्र म्हणावे का भारतीय राष्ट्र म्हणावे याबद्दल तो आक्षेप घेवू शकतो. लोकशाही तत्वाच्या दृष्टीने असलेल्या हिंदुराष्ट्रालाही त्याला मान्यता द्यावी लागते. हिंदूच्या ऐवजी भारतीय हा शब्द तो वापरेल एवढाच कायतो फरक राहील. शेवटी मुख्य आक्षेप सावरकर हिंदूदर्शक शब्दच का वापरतात, हिंदूचा वेगळा विचार का करतात याच मुद्द्यावर येवून स्थिर होतो.

तीन राष्ट्रांचा संबंध

सावरकरांच्या या हिंदुराष्ट्राचा, काँग्रेसच्या हिंदीराष्ट्राचा व मुस्लीम लीगच्या मुसलमान राष्ट्राचा एकमेकाशी असलेला संबंध नीट समजून घेतला पाहिजे. एका राज्यामध्ये (State) किंवा एकाच शासनाच्या (Government) अधिपत्याखाली एका पेक्षा अधिक राष्ट्रे राहू शकतात, अशी त्यांची भूमिका आहे. शेवटी राष्ट्र म्हणजे तरी काय ? काही विशिष्ट गुणवैशिष्ट्यामुळे स्वत:ला वेगळे समजण्याची एक समूहवृत्ती असेच या राष्ट्राचे स्वरुप असते. धर्माच्या, वंशाच्या, भाषेच्या, संस्कृतीच्या व अशाच अन्य कोणत्या आधारावर ही अलगतेची समूहवृत्ती जपण्याचा मानवसमूहाचा स्वभाव असतो. सर्वच बाबींनी एकजीव असा समाज एका राज्याखाली येणे अपवादभूत असते. भारतासारख्या देशात तर ती गोष्ट अशक्यच असते. अलगता राखणाऱ्या या विविध गटांना, समूहांना किंवा राष्ट्रांना समान न्यायाच्या व हक्कांच्या विशिष्ट तत्वावर एकत्र ठेवण्याचे काम राज्याला करावे लागते. स्वत:ची अलगता सोडून अितराशी पूर्णपणे समरस व एकरूप होण्याचा प्रयत्न प्रत्येक समूहानी करायचा असतो. हा प्रयत्न करत असतानाच, अितरावर अन्याय होणार नाही अशा मर्यादेत आपले अलगत्व राखण्याचा, प्रत्येक समूहाचा हक्क राज्य मान्य करत करते. आपण सर्वजण एकाच देशाचे नागरिक आहोत या एकमेव भावनेत परस्पराशी एकरुप होण्याची अवस्था ही राष्ट्रीय एकात्मतेची आदर्श व अंतिम अवस्था असते.

आदर्श हिंदी राष्ट्र

हिंदी वा भारतीय राष्ट्रवाद अंतिम व आदर्श अवस्था आहे, असे सावरकर

मानतात. हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन आदी सर्वांनी आपले कोणतेही अलग वैशिष्ट्ये न मानता 'भारतीय' या भावनेत एकरुप व विलीन व्हावे, ही सावरकरांची तीव्र अिच्छा आहे. काँग्रेसचीही अिच्छा अशीच आहे. या अवस्थेला ते भारतीय राष्ट्रवाद म्हणतात. ध्येय म्हणून सावरकरांना हा भारतीय राष्ट्रवाद मान्य आहे. मात्र ही अवस्था भारतात आज आलेली नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. भारत हे अशा प्रकारचे विसंवादरहित असे एकात्मराष्ट्र झालेले आहे, असे आज तरी मानता येत नाही, असे ते म्हणतात याचा अर्थ हाच आहे. भारतात दोन राष्ट्रे आहेत हे मानणे किंवा भारत आज एकात्म असे एकराष्ट्र झालेले नाही हे मानणे, एकच आहे हे समजून घेतले पाहिजे.

एक राज्य, अनेक राष्ट्रे

हिंदू आणि मुसलमान ही दोन राष्ट्रे आहेत, तर त्यांचे एकराष्ट्र कसे होणार या प्रश्नाला उत्तर देताना १९४३ मध्ये सावरकर म्हणाले,[१७] "राष्ट्र आणि राज्य वा शासन संस्था (State) यांच्या अर्थाची आपण गल्लत करता कामा नये. राज्य गेले तरी राष्ट्र कायमच राहते. मुसलमान आमच्यावर राज्य करीत होते, त्यावेळी सरकार त्यांचे होते. पण राष्ट्र म्हणून हिंदूचे अस्तित्व कायम होतेच. इतके असले तरी हिंदु–मुसलमानांची एक शासन संस्था होण्यास मुळीच अडचण नाही. आपल्याकडे पूर्वी महाराष्ट्र, सौराष्ट्र, देवराष्ट्र अशी राष्ट्रे होती. ही राष्ट्रे आज कोठे आहेत ? एकमेकात मिसळून गेली. शक, हूण हेही हिंदुस्थानात राष्ट्र म्हणून आले. पण आज त्यांच्या अस्तित्वाची काय साक्ष आहे ? आम्ही त्यांना पचवून टाकले. तेव्हा मुसलमानांच्या मनात असेल तर अल्पसंख्य जमात म्हणून त्यांना हिंदूवरोबर स्नेहभावाने एकत्र राहता येईल. पूर्वी जर्मनीत प्रशिया, व बव्हेरिया इ. राष्ट्रे होती. पण या राष्ट्राचे मिळून आज एक जर्मन राष्ट्र झाले आहे. जर्मनीत कोणाही माणसाने स्वत:ला प्रशियन, बव्हेरियन असे म्हणवून न घेता जर्मन म्हणूनच घेतले पाहिजे, असा निर्बंध आहे." एका राज्यातील अनेक राष्ट्रांचा सिद्धांत सावरकर मानतात हे अगदी निःसंदिग्ध आहे. ही त्यांची भूमिका समजून न घेतल्यामुळे अनेकांनी सावरकरांच्या हिंदुराष्ट्राबद्दल मनमानी निष्कर्ष काढलेले आहेत.

हिंदुराष्ट्र, मुसलमान राष्ट्र ही स्वतंत्र अशी घटक राष्ट्रे असून त्या दोघांचे मिळून भारतीय राष्ट्र बनावे हे सावरकरांचे ध्येय आहे. या भारतीय राष्ट्रात कोणीही स्वत:ला मुसलमान वा हिंदू म्हणवून न घेता भारतीय वा हिंदी म्हणवून घ्यावे, हेच सावरकरांचे ध्येय आहे. या दोघांचे मिळून एक राज्य वा शासनसंस्था असावी व ती पूर्णपणे धर्मनिरपेक्ष असावी, असा त्यांचा आग्रह आहे. ही सारी भूमिका त्यांनी आग्रहाने, पुनरावर्त करत व तळमळीने आपल्या राजकीय आयुष्यात सातत्याने मांडलेली आहे, हे समजून घेतले पाहिजे. मुसलमानांचे राष्ट्र हे

हिंदुराष्ट्राच्या प्रभावाखाली असलेले गुलाम राष्ट्र नसून, लोकशाहीच्या प्रस्थापित सर्वमान्य तत्वांनी परस्पराशी संबंधित असलेले, पण एकाच भारतीय राज्याच्या अधिपत्याखाली नांदणारे सहचारी बंधुराष्ट्र आहे, हेही समजून घेतले पाहिजे.

एक घोटाळा

डॉ. सुधाकर भालेरावांनी असा आक्षेप घेतलेला आहे की,[१८] "सावरकरांना बहुराष्ट्रीयत्व मंजूर नव्हते; त्यांना अखंड भारतच हवा होता मुसलमानांना ते काही हक्क देण्यास तयार होते, पण राष्ट्रीयत्व नव्हे. अल्पसंख्य जमात म्हणून त्यांनी भारतात राहण्यास सावरकरांची हरकत नव्हती... त्यांना फक्त हिंदुराष्ट्र अभिप्रेत होते, हे स्पष्ट होते." भालेरावांचा हिंदुराष्ट्र समजून घेण्यात झालेला घोटाळा अगदी स्पष्ट आहे. मुसलमानांना नागरिकत्वाचे न्याय व समान हक्क देण्यासाठी सावरकर तेहतीच तयार होते[१९] हे भालेराव मान्य करतात, मात्र मुसलमानांना राष्ट्रीयत्व द्यायला ते तयार नव्हते असे सांगतात. भालेरावांच्या हे लक्षात आले नाही की, नागरिकत्व ही देशाच्या घटनेने वा संसदेच्या कायद्याने द्यावयाची बाब आहे; राष्ट्रीयत्व ही अशी कुणी कुणाला द्यावयाची वा प्रदान करावयाची बाब नाही. राष्ट्रीयत्व ही एक वस्तुस्थिती असते व ती मान्य करायची की नाही एवढेच आपल्या हातात असते. सावरकर हिंदूना राष्ट्रीयत्व देतात, मुसलमानांना नाकारतात– ही आपली भावडट समजूत असते. राष्ट्रीयत्व हे लोकांच्या, समूहाच्या मनात असते; ते कायदा करून देता येत नसते. औरंगजेब होता तेव्हाही हिंदुराष्ट्र जिवंत होते असे सावरकर म्हणतात. ते राष्ट्र काही औरंजेबाने दिलेले नव्हते. सावरकर राजकारणात येण्याच्या पूर्वीच मुसलमानांच्या स्वतंत्र राष्ट्राचा चंद्रप्रकाश पारतंत्र्याच्या काळोखात लखलखणे दिसत होता. सावरकर मुसलमानांना राष्ट्रीयत्व देणारे वा नाकारणारे कुणीच नव्हते. जे आहे ते तसे मानणे व स्पष्टपणे सांगणे व आपल्या बुद्धिवादाशी प्रामाणिक राहणे एवढेच त्यांच्या हातात होते.

दुसऱ्या दृष्टीने बरोबर

मुसलमानांना सावरकर राष्ट्रीयत्व द्यायला तयार नाहीत असे भालेरावांना का वाटते, याचे एक कारण आहे. ऐतिहासिक व वास्तव दृष्टीने मुसलमान हेही एक राष्ट्रच आहेत, हे सावरकर मान्य करतात. हे राष्ट्र मुसलमान स्वतःला तसे मानतात म्हणून असते; सावरकर त्यांना ते देतात म्हणून नव्हे, हे लक्षात घेतले पाहिजे. लोकशाही तत्वाच्या दृष्टीने मुसलमान हे अल्पसंख्य आहेत. 'बहुसंख्याकत्व हेच राष्ट्रीयत्व' या लोकशाही तत्वाच्या दृष्टीने मुसलमान हे राष्ट्रीयत्वाचा दावा करु शकत नाहीत, अशी सावरकरांची भूमिका आहे. मुसलमानांनी भारतात अल्पसंख्य म्हणून राहावे असे सावरकर याच भूमिकेतून म्हणतात. या त्यांच्या

भूमिकेचा अर्थ, आपण समजून घेतलेला आहे काय? कोणत्या संदर्भात व पार्श्वभूमीवर सावरकर हे म्हणत आहेत, हे आपण लक्षात घेणार नाही काय? अल्पसंख्य असूनही बहुसंख्यांकाचे हक्क आपल्याला असावेत ही मुसलमानांची मागणी होती. बहुसंख्याकांच्या बरोबरचे हक्क त्यांना द्यायला तर काँग्रेसच तयार झालेली होती. बहुसंख्यांकानी अल्पसंख्य बनावे व अल्पसंख्याकांनी आपल्या मनाप्रमाणे बहुसंख्याकांना वागण्याला भाग पाडावे, हे सावरकरांना मान्य नव्हते.

मुसलमानांनी अल्पसंख्य जाती म्हणून राहावे याचा अर्थ बहुसंख्याकांचे हक्क त्यांना मिळणार नाहीत, असा आहे; हिंदू बहुसंख्य आहेत यास्तव त्यांना शिक्षा होवू नये, असा आहे; बहुसंख्याकांनी अल्पसंख्याच्या ताटाखालचे मांजर होवू नये असा आहे! मुसलमानांना सावरकर राष्ट्रीयत्व द्यायला तयार नाहीत या भालेरावांच्या म्हणण्याचा खरा अर्थ, अल्पसंख्य असणाऱ्या मुसलमानांना बहुसंख्याकांचे अधिकार द्यायला सावरकर तयार नाहीत, असा आहे. सावरकर हिंदुस्थान हा हिंदूचा आहे असे मानतात, याचा अर्थ तो मुसलमानांचा नाही असा कधीच नव्हता. त्याचा खरा अर्थ, कोणताही देश हा राजकीय दृष्टीने त्यातील बहुसंख्य लोकांचाच असतो, असा आहे; बहुसंख्यांकांना बहुसंख्य राहण्याचा अधिकार आहे, असा आहे; अल्पसंख्य असणाऱ्या मुसलमानांना भारताला दार-उल-इस्लाम करण्याचा अधिकार नाही, असा आहे! सावरकर याच गोष्टी कंठशोष करुन जन्मभर सांगत आले आहेत, हे आपण पाहणार नाही काय?

देशासमोरचा खरा प्रश्न

सावरकर मुसलमानांच्या मुस्लीम राष्ट्राला हिंदुराष्ट्र हा पर्याय मांडतात. हिंदू हे एकसंघ नाहीत, म्हणून मुसलमान हिंदूना मुस्लीम राज्याच्या धमक्या देतात. त्यासाठी हिंदूनी संघटन केले पाहिजे; स्वत आपणही एकराष्ट्र आहोत, याची जाणीव ठेवली पाहिजे, असे सावरकरांचे म्हणणे होते. मुसलमानांशी खरी-खरी एकी करायची तर हिंदूनीही समर्थ झाले पाहिजे. ते समर्थ होतील तर त्यांच्या एकीची मुसलमानांना गरज वाटेल. ते मुस्लीम राष्ट्राचा आग्रह धरणार असतील, तर आपण हिंदुराष्ट्राचा आग्रह धरला पाहिजे. ते समान न्यायाच्या तत्वावर एकीसाठी तयार असतील, तर समाईक हिंदीराष्ट्राचा पुरस्कार केला पाहिजे, अशी त्यांची भूमिका होती. हिंदूनी हिंदू म्हणून एक झाल्याशिवाय व आपली ताकद दाखविल्याशिवाय मुसलमान हे समान न्याय्याच्या तत्वाला मान्यता देणार नाहीत, असे सावरकरांचे मत होते. ब्रिटीशाप्रमाणेच मुसलमान हेही हिंदूच्या दृष्टीने एक समस्याच होवून बसणार आहे. ब्रिटीश आज ना उद्या जातील, पण मुसलमान हे देशबंधू व राष्ट्रबंधू असल्यामुळे भारतातच कायम राहणार आहेत, म्हणून या प्रश्नाचा विचार त्यांनी गंभीरपणे केलेला आहे.

मुसलमानांना वगळून अितरांना एक करण्याची त्यांची कल्पना होती.

उरलेल्या अधिकाधिक लोकांना एकत्र आणता येईल असा हिंदू शब्द त्यांनी तयार केला. होईल तितका तो धर्म मुक्त ठेवला. मुसलमानांच्या धर्मवेडाला हिंदुत्व हेच उत्तर आहे, असा त्यांनी निर्णय घेतला. त्याचे म्हणणेच असे होते की, देशासमोरचा खरा प्रश्न हिंदीराज्य का हिंदुराज्य असा नव्हता, तर मुस्लीम राज्य का हिंदुराज्य असा होता. "ते म्हणत [२०] "The choice therefore is not between Indian Raj or Hindu Raj but between Muslim Raj or Hindu Raj or between Akhand Hindusthan or Akhand Pakistan." तेव्हा सावरकर हिंदुराष्ट्राचा पर्याय कोणत्या परिस्थितीत, कोणत्या हेतूने, व कशाच्या विरोधात पुढे मांडत होते, हे नीट समजून घेतले पाहिजे. आपली मुख्य चूक ही असते की, सावरकर हिंदुराष्ट्राची कल्पना हिंदीराष्ट्राच्या विरोधात मांडत आहेत, असे समजून आपण विचार करु लागतो. आणि मग त्यांच्यासारखा बुद्धिवादी माणूस असे का करतो, हे आपल्याला कोडे पडते. या कोडयांचे उत्तर मग आपण आपल्या मनाला येईल त्या प्रमाणे काढू लागतो.

राष्ट्रे दोन, आशय एकच

मुस्लीम राष्ट्राला हिंदुराष्ट्राचा पर्याय म्हणून पुढे ठेवणे व प्रत्यक्षात सर्वसमावेशक हिंदीराष्ट्राचा पुरस्कार करणे ही सावरकरांची वास्तविक भूमिका आहे. मुसलमान मुस्लीम राष्ट्राची जाणीव ठेवून आहेत व त्या जाणिवेला इतिहासाचा व धर्मशास्त्राचा फार मोठा आधार आहे, त्यामुळे हिंदूनीही आपल्या राष्ट्राची जाणीव ठेवून त्यांच्याशी समान हक्काच्या तत्वावर हिंदीराष्ट्र उभे करण्यासाठी सहकार्य केले पाहिजे, अशी सावरकरांची एकूण भूमिका आहे. यामुळेच त्यांच्या साऱ्या विचारात हिंदुराष्ट्रावरोबर हिंदीराष्ट्राचाही पुरस्कार दिसतो. हिंदुराष्ट्राचा पुरस्कार करतानाही, हिंदीराष्ट्रामध्ये हिंदु-मुसलमानांना ज्या हक्कांच्या गोष्टी मिळणार आहेत, त्याच गोष्टी त्याच आग्रहाने ते मान्य करतात. या दोन राष्ट्राच्या आशयात फरक नाही; स्वरुपात फरक नाही; राज्यघटनेत फरक नाही. फरक असेल तो फक्त अभिव्यक्तीत आहे मुसलमानांच्या विरोधात त्यांना बोलायचे असले की, ते हिंदुराष्ट्राचे नाव काढतात. त्यांना बरोबर घेऊन जाण्याचा विषय निघाला की, ते हिंदीराष्ट्राची भाषा बोलतात. सावरकरांचा हा हिंदुराष्ट्राचा पर्याय आपल्याला पसंत पडो वा न पडो, पण या हिंदुराष्ट्राचा हेतू व स्वरुप निश्चित काय आहे हे समजून घेणे आपले कर्तव्य आहे. हे समजून घेतले नाही तर सावरकरांसारखा बुद्धिवादी माणूस हिंदुराष्ट्राचा पुरस्कार का करतो, याचे उत्तरच आपल्याला सापडणार नाही.

× × × ×

संकुचित भावना – अपरिहार्य

सावरकर हिंदुलोक, हिंदुत्व, हिंदुसंघटन व हिंदुराष्ट्राच्या बाजूने उभे टाकलेले आहेत. या साऱ्या गोष्टी भारतीय कल्पनेपेक्षा संकुचित आहेत, हे ते स्पष्टपणे मानतात. असे असतानाही प्राप्त परिस्थितीत हिंदूनी आपल्यापुरताच विचार करण्याचीही भावना ठेवली पाहिजे, असे त्यांना आग्रहाने वाटते. हिंदू हा भारतीय विचाराचा असतोच असे ते म्हणतात. पण भारतीयत्वाचा अभिमान धरतानाही हिंदुत्वाचा अभिमान धरला पाहिजे, असा त्यांचा आग्रह आहे. त्यांच्या या आग्रहाचे मुख्य कारण मुसलमान स्वतः पुरताच विचार करतात, हे आहे. अितर जाती स्वतःपुरताच विचार करून स्वतःचे संघटन करत असतील व त्याच्या जोरावर स्वतंत्र राष्ट्राचीही मागणी करत असतील, तर हिंदूना अशा परिस्थितीत आपल्यापुरताच विचार करणे, हिंदुसंघटन करणे भाग आहे, अशी त्यांची भूमिका आहे.

'हिंदुत्व' ग्रंथामध्येच सावरकरांनी ही आपली भूमिका स्पष्टपणे मांडून ठेवली आहे. या ग्रंथाच्या शेवटी ते म्हणतात, [१] "हिंदुस्थानात अितर जाती जोपर्यंत 'हिंदुस्थान आधी' असे म्हणत नाहीत, किंवा जगातील अितर लोक 'मनुष्य जाति आधी' असे तत्वज्ञान आचरत नाहीत. परंतु जोपर्यंत चढावाची व संरक्षणाची तयारी करण्याकरिता, केवळ जातीच्या अथवा संकुचित दृष्टीने संघटना आणि एकजूट करण्याचा विश्वप्रयत्न करत आहेत, तोपर्यंत तरी हिंदूनो! तुम्ही शक्य तर तुमच्या जातीच्या सामाजिक जीवनाला, ज्ञानतंतूच्या जाळ्याप्रमाणे एकजीव करणारी सर्व बंधने दृढीभूत करा." येथे ते सर्वसामान्यपणे बोलत असले तरी मुसलमानांच्या धर्मवेडातून निर्माण झालेल्या संघटन सामर्थ्याला समोर ठेवून बोलत आहेत, हे लक्षात घेतले पाहिजे.

तुम्ही सोडा – आम्ही सोडतो

मुसलमानांच्या सर्वच क्षेत्रातील संघटित आक्रमणाला विशेषतः मुस्लीम राष्ट्राला विरोध करायचा तर हिंदूनी हिंदुसंघटन केलेच पाहिजे असे त्यांना वाटते. रत्नागिरीला असताना शौकतअलीची व त्यांची भेट झाली होती. त्याही वेळेस सावरकरांनी त्यांना सांगितले की, मुसलमान जर आपले संघटन सोडणार असतील तर आम्हीही हिंदुसंघटन सोडायला तयार आहोत.[२] हा केवळ युक्तिवाद नव्हता, तर सावरकरांची निश्चित भूमिका होती. डॉ. आंबेडकरांच्या 'समता संघाला' पाठविलेल्या पत्रात सावरकर लिहितात, [३] "अितकेच नव्हे, तर मुसलमानत्व, ख्रिश्चनत्व अित्यादी 'त्वे' अितर सोडत असतील तर, माझे हिंदुपणही मानुषकेन विलय पावेल" हिंदू लोकांनी आपले अस्तित्व टिकवावे, तो त्यांचा हक्क आहे, असे त्यांना वाटे. हे टिकवायचे असेल, तर हिंदुपणाचा अभिमान धरून एकसंघ झाल्याशिवाय तरणोपाय नाही, असे त्यांचे म्हणणे होते. हिंदुजातीचे अस्तित्वच मुसलमा-

नांच्या धर्मवेडाचा सामर्थ्यामुळे धोक्यात आलेले आहे, ही भीती सावरकरांच्या हिंदुत्व विचाराच्या मुळाशी आहे, हे समजून घेतले पाहिजे.

तुम्ही करा - आम्हीही करतो

मुसलमानांना संघटन करु नका असा व्यर्थ उपदेश सावरकर कधीही करत नाहीत. संघटन त्यांनीही करावे, आम्हीही करतो; मात्र असे संघटन करताना कोणताही आघातक हेतू ठेवू नये असे ते सांगत. तुम्हीही आघातक हेतू न ठेवता आपल्या समाजाचे संघटना करा,[१४] असा ते मुसलमानांना सल्ला देत. कोणतेही संघटन निषेधार्ह वा अराष्ट्रीय असण्याचे कारण त्या संघटनेचा हेतू हा असतो असे ते मानत. कर्णावतीच्या अध्यक्षीय भाषणात ते म्हणाले, [१५] "जो पर्यन्त ती चळवळ विशिष्ट राष्ट्राच्या वा लोकांच्या वा जातीच्या न्याय्य व मुलभूत अधिकारांचे, दुसऱ्या लोकांच्या नि दुसऱ्या मानवी संघाच्या बलात्कारी नि उद्दाम अतिक्रमणापासून रक्षण करण्यासाठी झटत असते आणि दुसऱ्याच्या समान नि न्याय अधिकाराला नि स्वातंत्र्याला ढळ लावीत नाही, तोपर्यन्त ते राष्ट्र किंवा ती जाती हा तादृश्य एक लहान संघ आहे, एवढयाच निव्वळ कारणाकरिता ती निषेधिता वा तुच्छ लेखता येत नाही.' हिंदुसंघटन हे हिंदुपुरते आहे, एवढयाच खातर ते निषेधार्ह वा अराष्ट्रीय होत नाही, तर ते हिंदुसंघटनाच्या हेतुमुळे होते असे सावरकर येथे सांगत आहेत. हिंदुसंघटन समान हक्कांचा व न्यायाचाच हेतू ठेवते म्हणून ते निषेधार्ह नाही असे ते सारखे सांगत असतात.

न्याय्य राष्ट्रीयत्व

एखादे संघटन किंवा राष्ट्र निषेधार्ह केव्हा होते हे सांगताना ते पुढे म्हणाले, "जेव्हा एखादे राष्ट्र वा जाती दुसऱ्या बंधुराष्ट्राचे वा बंधुजातीचे अधिकार तुडविते आणि मानवजातीचे अधिक मोठाले गट नि संघ बनविण्याच्या मार्गात मुद्दाम आगळिकपणे बाध आणते, तेव्हा त्याचा राष्ट्रवाद किंवा जातिवाद मानवतेच्या दृष्टीने धिक्कारार्ह ठरतो." जातिवाद किंवा राष्ट्रवाद समर्थनीय ठरण्याची सावरकरांची ही कसोटी होती. ही कसोटी चुकीची आहे काय, हा पहिला प्रश्न आहे. ही कसोटी बरोबर असेल, तर ही कसोटी लावून पाहिल्यास सावरकरांचे हिंदुसंघटन वा हिंदुराष्ट्र असमर्थनीय वा निषेधार्ह ठरते काय हा दुसरा प्रश्न आहे. ही कसोटी लावून मुसलमानांच्या प्रवृत्ती, त्यांचे संघटन, त्यांची मुस्लीम राष्ट्राची मागणी, समर्थनीय ठरते काय, हा तिसरा प्रश्न आहे. ही कसोटीच चूक असेल, तर मुसलमानांच्या या प्रवृत्तीला, त्यांच्या स्वतंत्र राष्ट्राला विरोध कसा करावा, हा चौथा प्रश्न आहे. नुसता नैतिक उपदेश करून हा प्रश्न मिटणारा नसून त्यासाठी न्याय तत्वावर आधारलेले संघटित सामर्थ्यच उभे केले पाहिजे, या निष्कर्षाला सावरकर आलेले होते हे आपण समजून घेतले पाहिजे.

यांच साठी सावरकर नेहमी सांगत की, आमचे हिंदुराष्ट्र हे मुसलमानांच्या न्याय हक्कांवर आक्रमण करणारे नाही; हे राष्ट्र हिंदीराष्ट्राच्या सुद्धा विरोधी नाही. मुसलमानांच्या अन्याय आक्रमणापासून स्वतःचे न्याय हक्क रक्षण करणे एवढेच हिंदुसंघटनाचे वा हिंदुराष्ट्राचे ध्येय आहे, अशी त्यांची भूमिका आहे. " जातीनिष्ठा जर केवळ स्वसरंक्षक असेल, तर समबुद्धीच्या राष्ट्रीयत्वाअितकीच तीही न्याय्यच होय " असे त्यांना वाटे. [६] ते म्हणतात, [६] " हिंदुराष्ट्रीय परस्वाचे अपहरण करण्याचे मनातही आणीत नाहीत, यास्तव त्यांना कोणी हिंदु जातिनिष्ठ म्हटले तरी त्यांची जातिनिष्ठता समर्थनीय असून खरे हिंदी राष्ट्रवादी कोणी असतील, तर तेच होत. हिंदी राष्ट्राच्या सर्व घटकभूत असा सर्व समाजाकडे समबुद्धीने पाहणारे तेच खरे नि न्याय राष्ट्रीयत्व होय." हिंदुराष्ट्र हे अशा अर्थाचेच राष्ट्रीयत्व मानते, हा त्यांचा दावा होता. हा त्यांचा दावा खरा का खोटा, हे आपण समजून घेतले पाहिजे.

सावरकरांचे म्हणणे असे होते की, [६] " यास्तव हिंदूनी स्वतःच्या न्याय्य नि योग्य अधिकाराचे स्वतःच्याच भूमीत संरक्षण करावे ही जर जातिनिष्ठता असेल, तर आम्ही हिंदू पहिल्या पदवीचे जातिनिष्ठ असून तसे एकनिष्ठ हिंदुजातीय म्हणून म्हणवून घेण्यात आम्ही भूषणच मानू; कारण आमच्या मते अशी जातिनिष्ठता म्हणजेच खरी आणि अत्यंत न्याय्य अशी राष्ट्रीयता होय." हिंदूचे जे न्याय्य हक्क आहेत त्याच्या संरक्षणापलिकडे सावरकर कधीही काहीही मागत नाहीत. या हक्क संरक्षणालाच ते हिंदुराष्ट्रीयत्व म्हणतात. "हिंदुराष्ट्र हे संयुक्त हिंदीराष्ट्राच्या शक्यतेचा मार्ग बंद करण्याचा विचार स्वतःच्या हिताकडे पाहूनच कधी मनात आणीत नाही" [७] असे ते नेहमी सांगत. " मात्र ते संयुक्त हिंदीराष्ट्र न्याय्यतेच्या आणि समानतेच्या पायावरच उभारले गेले असले पाहिजे." असा त्यांचा आग्रह होता. भारतीय राष्ट्रीयत्वाच्या नि धर्मनिरपेक्षतेच्या दृष्टीनेही विचार केला तरी असा आग्रह धरण्यात सावरकरांचे काय चुकले हे कुणीही विरोधक प्रामाणिकपणे सांगत नाही. असा नुसता आग्रह धरून उपयोग नसतो, तर या न्याय आग्रहाच्या मागेही ताकद उभी करावी लागते, असे ठरवून त्यांनी हिंदूची ताकद उभी करण्याचा प्रयत्न केला. हिंदूची ताकद उभी करणे, एवढाच भाग आक्षेपार्ह असतो, का ती ताकद कशासाठी उभी करायची होती हा मुद्दा आक्षेपार्ह असतो, हे अगोदर आपण ठरविले पाहिजे.

अपराधी राष्ट्रीयत्व

जातीच्या वा धर्माच्या आधारावर कुणीही संघटन करू नये, यांला सावरकर एका पायावर तयार होते. १९३८ मध्ये ते म्हणाले, [८] " जो पर्यन्त अितर जाती स्वतःची स्वतःच संघटना करीत आहेत, तो पर्यन्त आम्ही हिंदूनीही आपली संघटना केली पाहिजे. म्हणून आम्ही हिंदुत्वाचा अभिमान धरतो. राष्ट्रीयता ही परिस्थितीप्रमाणे पुण्यकर होते, तीच गोष्ट जातीयतेची. " ही परिस्थिती

कोणती ? अितर जाती आपापला अभिमान धरुन आहेत, हीच ती परिस्थिती होय. " अितर सर्वजण त्यांच्या धर्मांचा अभिमान निःहित जपत असताना केवळ हिंदूनी हिंदुत्व सोडावे हीच राष्ट्राभिमानाची व्याख्या असेल, तर असले राष्ट्रीयत्व मानणे मी एक अपराध समजतो" [९] असे ते समजत असल्यामुळे हिंदुत्वाचा अभिमान धरणे त्यांना भाग वाटते, हे समजून घेतले पाहिजे. खरी राष्ट्रीयता भारतात कुठेही अस्तित्वात नव्हती, म्हणून त्याच राष्ट्रीयतेसाठी आम्हाला जातीय हिंदुत्वाचा पर्याय स्वीकारणे भाग पडले, ही त्यांची भूमिका आहे.

हिंदुत्वाचे कुलूप

१९५३ मध्ये एका भाषणात ते म्हणाले,[१०] "सर्वांनी मानव तेवढा एक मानणे हे ध्येय उत्तम आहे. मला ते प्रियही आहे. कोणीही दाराला कुलूप लावू नये, हा नियमही आदर्श आहे. पण जगात चोर आहेत हे जाणून ज्या प्रमाणे आपण 'कुलूप घालू नये' हा आदर्श नियम बाजूला ठेवून आपापल्या घराला कुलूप घालतो, त्या प्रमाणे जगात अितर धार्मिक आणि राष्ट्रीय लोक आपल्या धर्माचा नि राष्ट्राचा विस्तार करीत आहेत, तोवर मी सुद्धा हिंदु म्हणून जगले पाहिजे आणि राष्ट्राला हिंदुत्वाचे कुलूप घालणे आवश्यक आहे." त्यांचे हिंदुत्व हे अशाप्रकारे हिंदुलोकांच्या न्याय्य हक्कांचे संरक्षककवच आहे. संयुक्त हिंदीराष्ट्रामध्ये हिंदूचे हे न्याय्य हक्क सुरक्षित राखण्यासाठी त्यांनी हेतुतःच हिंदुराष्ट्राचे संरक्षककवच आपल्या भोवती घातलेले आहे, हे आपण समजून घेतले पाहिजे.

१९३९ मध्ये बिहार प्रांतीय हिंदुसंमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात ते म्हणाले, " जो पर्यंत मुसलमान साहाय्य करीत नाहीत, तोपर्यंत 'राष्ट्र' याचा अर्थ 'हिंदुराष्ट्र' असाच समजा. " सावरकर आपल्या भूमिकेपासून कधीही दूर गेल्याचे आपल्याला दिसणार नाहीत. याच भाषणात ते म्हणाले, " मुसलमान आमचे धाकटे भाऊ आहेत, असे आम्ही मानतो. आम्ही लहान भावाला आधीच अर्ध्याहून अधिक हिस्सा दिला आहे. परंतु इतक्याने संतुष्ट न होऊन आमचे धाकटे बंधू आईचेच दोन तुकडे करावयास तयार झाले, तेव्हा या धाकट्या बंधूचे कान पिळण्याचा प्रसंग आला आहे. " सावरकरांचे हिंदुत्व, हिंदुराष्ट्र हे असा कान पिळण्याचा प्रकार आहे. आईचे तुकडे करु देणार नाही, कारण ती तुमच्या एकट्याचीच नाही. तुकडे करण्याचा निर्धारच केला असाल, तर मग ही आई आमच्या एकट्याचीच आहे असे समजून तिचे प्राणपणाने संरक्षण करु, अशी सावरकरांची भूमिका आहे. यामुळेच ' मुसलमानांची जशी मुस्लीम लीग तशी हिंदूंचीही एक संस्था असणे अवश्य झाले '[११] असे ते म्हणतात.

एका पायावर तयार

राष्ट्रनिष्ठेपेक्षा जातिनिष्ठा एक पाऊल अलिकडची आहे, हे त्यांना मान्यच

होते. पण विशिष्ट परिस्थितीत जातिनिष्ठेचाही अभिमान धरणे अपरिहार्य अनिष्ट होते, असे त्यांना वाटे. १९३८ मध्ये कराची येथे भाषण करताना ते म्हणाले,[१३] "हिंदुस्थानची परिस्थिती अशी विचित्र आहे की, येथील समाजकारण जातिनिष्ठेवरच चालणे शक्य आहे... अितर समाज 'एक राष्ट्र' या दृष्टीने बांधण्यास तयार असतील, तर हिंदुमहासभा तसे करण्यास एका पायावर तयार आहे. पण अितर समाजाची तशी तयारी मुळीच नाही. मुस्लीम लीग सर्वत्या मतदार संघासाठी आक्रोश करीत आहे, आणि म्हणून आपल्याला स्वतःच्या समाजाचा विचार स्वतंत्रपणे करणे प्राप्त झाले आहे." सावरकरांचे याच आशयाचे कितीतरी विचार आम्ही येथे उद्धृत करू शकतो. त्यांच्या हिंदुत्वाचा, हिंदुराष्ट्राचा ही भूमिका पाया असल्यामुळे प्रत्येक ठिकाणी ती येणारच. न्याय्य हवा असला तरी तो सामर्थ्याशिवाय मिळत नाही, ही त्यांची मुलभूत भूमिका या हिंदुत्व विचारापाठीमागे आहे.

ही त्यांची भूमिका असल्यामुळेच सर्वांनी आपापले धर्म सोडावेत, आम्ही हिंदूही आमचा धर्म सोडायला तयार आहेत, असे ते सांगत असत.[१४] कोणताही धर्म ठेवू नका, त्याला माझी ना नाही, अशी हिंदुत्वनिष्ठ सावरकरांची धर्मनिरपेक्ष भूमिका होती. सावरकर यामुळेच हिंदुत्व मानत असतानाच धर्मनिरपेक्षतेचा पुरस्कार असतात. हिंदुराष्ट्र मानत असतानाच हिंदीराष्ट्राचा पुरस्कार करतात. हिंदूचा वेगळा ध्वज राहिला पाहिजे, असे मानत असतानाच वेगळ्या भारतीय ध्वजाचा पुरस्कार करतात. हिंदूची वेगळी संघटना राहिली पाहिजे, याची आवश्यकता सांगत असतानाच काँग्रेसने काँग्रेसच राहिले पाहिजे, असा आग्रह धरतात. सावरकर असे विसंगत का वागतात हे आपल्या लवकर लक्षातच येत नसते. यातील ज्या उदात्त नि आदर्श गोष्टी आहेत, त्या केवळ तशा उदात्त आहेत एवढ्याखातर प्रत्यक्षात येणार नाहीत, तर त्याच्या विरोधी ज्या शक्ती अस्तित्वात आहेत त्या समजून-जाणून घेवून त्याला तोंड दिल्यानेच त्या प्रत्यक्षात येणार आहेत अशी त्यांची वास्तववादी भूमिका होती त्यामुळेच ते हिंदीराष्ट्राचा व धर्मनिरपेक्षतेचा पुरस्कार करणारी काँग्रेस राहिलीच पाहिजे असे सांगत. १९३७ ला एका भाषणात ते म्हणाले,[१५] "मु.लीग आहे तोपर्यंत हिंदूची संघटना राहणारच. काँग्रेस ही राष्ट्रीय सभाच राहावी, अशी माझी अिच्छा आहे. तिला हिंदुसभा करायचे नाही." सावरकरांची ही भूमिका आपण नीट समजून घेतली पाहिजे. ती अशी समजून घेवून ती बुद्धिवादाच्या किती विरोधी आहे, हे ठरविले पाहिजे.

दोघांच्या दोन हातात

बॅ. जिना आव्हान देत होते की,[१६] "सुटेडन जर्मनीच्या मागण्या नाकबूल केल्यामुळे झेकोस्लोव्हाकियाची जशी शकले उडाली तशीच हिंदुस्थानची उडाल्याशिवाय राहणार नाहीत. मुसलमान सामर्थ्यहीन नाहीत. नऊ कोटी मुसलमान

स्वतःच्या सामर्थ्याने आपले संरक्षण करु शकतात. पुढे व्हा! सर्व हिंदुस्थानभर आपली संघटना करा. बुद्धिवादाने व समोपचाराने आपल्या मागण्या मान्य केल्या नाहीत, तर आपण आपल्या सामर्थ्याने व अधिकाराने आपले उद्दिष्ट साध्य करु." जिना अशा प्रकारे एका हातात हा बुद्धिवाद व दुसऱ्या हातात तलवार घेऊन उभे होते. या जिनाला तोंड कसे द्यायचे हा खरा प्रश्न होता. समान हक्कांचा व दरडोई एकमताचा धर्मनिरपेक्ष बुद्धिवाद एका हातात व तो मानणार नसाल, तर ते मान्य करायला भाग पाडणारे हिंदूचे सामर्थ्य दुसऱ्या हातात घेवून सावरकर उभे होते. सावरकर किती चुकले? बुद्धिवादापासून ते किती दूर गेले?

हिंदु-मुस्लीम प्रश्न समजून घेण्यात सावरकर चुकले नव्हते; त्या प्रश्नावरील उपाय सांगण्यात चुकले होते, एवढाच आपला आक्षेप आहे ना? मग तुमचा हा आक्षेप प्रामाणिक आहे. अशा अवघड प्रश्नावर वादातीत असा तोडगाच असू शकत नाही, हेही आपण मान्य केले पाहिजे. काँग्रेसला हा प्रश्नच समजला नाही, हे आपण आधी मान्य केले पाहिजे. तिला प्रश्नच न समजल्यामुळे तिच्याकडून बरोबर उत्तराची अपेक्षाच करता येत नव्हती. ज्यांना हा प्रश्न समजला, पण जे हिंदुत्वनिष्ठ नव्हते, त्यांनी हा प्रश्न सोडविण्याचा कोणता मार्ग सांगितला, हे आपण समजून घेवून, त्याच्या तुलनेत सावरकरांच्या या मार्गाचे मूल्यमापन करायला आपण तयार आहोत काय?

आंबेडकरांचा पर्याय

पहिले उदाहरण आपण डॉ. आंबेडकरांचेच घेवू. सावरकरांच्या द्विराष्ट्रवादावर ते टीका करीत असले तरी हिंदू व मुसलमान ही दोन स्वतंत्र राष्ट्रे आहेत, हे त्यांनीही मान्य केलेच आहे. इतःपर हिंदू आणि मुस्लीम असे दोन राष्ट्र समजले पाहिजेत, असे ते म्हणतात.[१७] राष्ट्रनिर्मितीसाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टी मुसलमानात आहेत, हे ते मान्य करतात[१८] हे दोघे मिळून एकराष्ट्र निर्माण करू शकतात याची त्यांना शंका आहे.[१९] ही दोन राष्ट्रे परस्परविरोधी व युद्धमान राष्ट्रे आहेत व त्यांना एका देशाच्या व संविधानाच्या दावणीला बांधणे योग्य नाही, असे त्यांचे मत आहे. ही दोन राष्ट्रे नुसती वेगळीच नाहीत तर त्याच्यात तिरस्कार व घृणा आहे, असे ते म्हणतात.[२१] ते लिहितात,[२१] "...ते एकसाथ राहत नाहीत, हिंदू आणि मुसलमान हे आपल्याला स्वतंत्र वस्त्यात वास करतात... जेव्हा शांती असते तेव्हा हिंदू आणि मुस्लीम क्षेत्र अशा दोन विरुद्ध वस्त्या असतात. ज्या वेळी संघर्षाची घोषणा केली जाते, तेव्हा वरील वस्त्या सशस्त्र शिबीरे होतात." ही दोन युद्धमान राष्ट्रे आहेत असे आंबेडकरांना म्हणायचे असते.

डॉ. आंबेडकर यावर दोन उपाय सुचवितात. पहिला उपाय पाकिस्तान

देवून टाकून दोघांनीही सुखी होण्याचा आहे. सावरकरांना हे मान्य नाही. आंबेडकरांची सावरकरांवरील टीका या कारणासाठी आहे. देश तोडून द्यायचा प्रश्न आला की, सावरकर हा देश आमचा आहे, तो तोडून मिळणार नाही, अशी भूमिका घेतात. 'हिंदुस्थान हिंदुओंका' असे ते म्हणत ते याच अर्थाने व अशाच वेळेस. हिंदू एकदा मुसलमानांनी हिंदुस्थान आपला मानला की सावरकर त्यांच्याबरोबर समान नात्याने चर्चा करायला तयार होतात. या राजकीय युद्धघोषणेचा अर्थ हिंदुस्थान मुसलमानांचा नाही असा नसून, एकट्या मुसलमानांचाच नाही असा आहे, हे लक्षात घेतले पाहिजे पाकिस्तानची मागणी मान्य न करणे बुद्धिवादाच्या विरोधी होत नाही, असे आम्हास वाटते.

'पाकिस्तान' देवूनही हा प्रश्न मिटणारा नव्हता. लोकसंख्येची अदलाबदल करण्याची डॉ. आंबेडकरांची सूचना डॉ. राजेंद्रप्रसादांनी आपल्या 'द्विखंड भारत' मध्ये म्हटल्याप्रमाणे अव्यवहार्य होती. उरलेल्या भारतातही मुसलमानांचा प्रश्न पाकिस्तान देवूनही शिल्लकच उरणार होता. सावरकरांनी कधीही या लोकसंख्येच्या अदलाबदलीची मागणी केलेली नाही. एका देशातच सहराष्ट्रीय म्हणून दोघांनी राहिले पाहिजे, असे त्यांना वाटे. यासाठी लोकशाही सिद्धांत ते मांडत. मात्र या समानतेच्या तत्वावर गुण्यागोविंदाने मुसलमान हिंदुबरोबर वागायला तयार होणार नाहीत, म्हणून हिंदूनी स्वतःचीही संघटना ठेवावी, हिंदुत्वाचा अभिमान ठेवावा, एकराष्ट्र निर्माण करण्यासाठीच पण हिंदूनी सामर्थ्य उभे करावे, अशी सावरकरांची योजना होती, सावरकरांच्या या योजनेमध्ये बुद्धिवादाविरोधी काय आहे, हे कुणीतरी दाखवून दिले पाहिजे.

दुसरा पर्याय

डॉ. आंबेडकरांचा दुसरा पर्याय एकराज्य व दोन राष्ट्रांचा आहे, की जो सावरकरांना मान्यच आहे. हिंदू व मुस्लीम अशी दोन राष्ट्रे एका राज्याखाली (State) राहायला त्यांना काहीच हरकत वाटत नाही. या दोन राष्ट्रांचे परस्पराशी काय संबंध असावेत याची सविस्तर चर्चा डॉ. आंबेडकरांनी केलेली आहे. सावरकरांची या संबधीची भूमिका कशी वास्तव व न्याय आहे, हेच जणू डॉ. आंबेडकर पुराव्यानिशी पटवून देतात.

कॅनडा, द. आफ्रिका व स्वित्झरलॅन्ड या तीन देशांची त्यांनी उदाहरणे घेतलेली आहेत. 'लहान लहान राष्ट्रीयत्वांना बहुसंख्यांक जातीच्या राज्यांतर्गत राहण्यास काही भीती नाही, हे यावरुन सिद्ध होते,[२२] असा निष्कर्ष त्यांनी काढला आहे. अशा राज्यात लोकशाही असेल तर एक गोष्ट अपरिहार्यपणे घडते. या लोकशाहीवादी "वरील सर्वच देशात मोठी राष्ट्रे लहान राष्ट्रावर आपली प्रभुत्व संपन्नता स्थापित करु शकतात" [२३] असे त्यांनी त्या देशातील आकडेवारीवरुन दाखवून दिले आहे. जे बहुसंख्य असतात त्यावेच लोकशाहीत राज्य असते, हा

सिद्धांत ते पटवून देतात. डॉ. आंबेडकर लिहितात,[२३] "वास्तविकत: कायदा आणि संख्येच्या आकाराच्या दृष्टीने कॅनडात फ्रेंच हे ब्रिटीश राज्यांतर्गत राहत आहेत, असे म्हणणे शक्य आहे. दक्षिण आफ्रिकेत इंग्रज डच राज्यांतर्गत राहात आहेत आणि स्वित्झरलँडमध्ये इटालियन्स आणि फ्रेंच हे जर्मन राज्यांतर्गत राहात आहेत." बहुसंख्यांकांच्या राज्यामध्ये अल्पसंख्य राष्ट्रीयत्व कसे नांदत आहेत याची ही उदाहरणे आहेत. सावरकर हिंदुस्थानला हिंदूचे राज्य याच अर्थाने म्हणतात.

मात्र भारतात असे का होवू नये असा प्रश्न आंबेडकर करतात. ते पुढे लिहितात,[२३] "ब्रिटीश राज्यांतर्गत राहू इच्छित नाही म्हणून कॅनडातील फ्रान्स निवाशांनी आरडाओरड केली आहे काय? दक्षिण आफ्रिकेत इंग्रजांनी निरर्थक बडबड केली आहे काय?... मुसलमान हिंदुराज्यांतर्गत राहत नाही म्हणून का ओरडतात?" हाच प्रश्न जन्मभर सावरकर करत आले आहेत. आंबेडकर पुढे म्हणतात, "कॅनडा येथे फ्रेंचाना, दक्षिण आफ्रिकेत इंग्रजाना आणि स्वित्झरलेंन्डमध्ये फ्रेंच आणि इटालियन्सच्या हिताचे संरक्षण त्यांना दिलेले आहे, त्याहीपेक्षा भारतात मुसलमानांच्या हिताकरिता दिलेले संरक्षण अधिक विस्तारपूर्वक आणि श्रेष्ठ नाही काय?" आणि मग आंबेडकर मुसलमानांना कसे अधिक हक्क दिलेले आहेत याचे पुरावे देतात. खरा प्रश्न न्यायहक्करक्षणाचा नव्हता तर कुराणाधिष्ठित स्वतंत्र राज्य निर्मिण्याचा होता, हे येथे आपल्याला समजून घ्यायचे आहे.

अल्पसंख्याकांची जबाबदारी

देश म्हटला की, बहुसंख्य-अल्पसंख्य अशा जाति–जमाती असणारच. बहुसंख्याकांच्या जातीय राज्याची भीती अल्पसंख्यांना असते. असे जातीय राज्य आपल्यावर लादले जावू नये यासाठी अल्पसंख्याकांनी आधी पुढाकार घेतला पाहिजे, असे डॉ आंबेडकर म्हणतात. जातीय बळापासून परावृत्त होण्याची जबाबदारी या जातीयवादाचा बळी होणाऱ्या अल्पसंख्यावर असते, ही गोष्ट ते पटवून सांगतात. वरील सर्व देशात अल्पसंख्याकांनी ही आपली जबाबदारी पार पाडलेली आहे, हे ते दाखवून देतात. या देशातील अल्पसंख्यांक हे बहुसंख्यांकांचे जातीय राज्य थांबविण्यास कसे सफल झाले, याचे उत्तर देताना डॉ. आंबेडकर म्हणतात,[२४] "त्याची पद्धती जातीय पक्षावर प्रतिबंध लावण्यात आहे. कोणतीही जात कॅनडात, दक्षिण आफ्रिकेत आणि स्वित्झरलेंन्डमध्ये वेगळा जातीय पक्ष सुरु करण्याचा कधीच विचार करत नाही. अल्पसंख्यांक राष्ट्र जातीय पक्षाच्या निर्मितीविरुद्ध अग्रेसर असते. कारण, जर त्यानी कोणताही जातीयपक्ष निर्माण केला, तर बहुसंख्यांक जाती देखील जातीयपक्ष निर्माण करतील, हे त्यांना माहीत असते, हीच लक्षात ठेवण्यासारखी महत्वाची गोष्ट आहे. आत्मरक्षणाची ही एक दुष्ट आणि दुराचारपूर्ण पद्धती आहे. त्यामुळे अल्पसंख्यांक राष्ट्रांना कोणत्या

प्रकारे ते (बहुसंख्यांक) आपल्यावर कसे जाळे ताणतील याची त्यांना पूर्ण जाणीव असते. आणि म्हणूनच त्यांनी जातीय राजकीय पक्षाच्या निर्मितीला विरोध केला."

आत्मरक्षणाची ही प्रवृत्ती कितीही दुष्ट नि दुराचारपूर्ण असो, पण तीनैसर्गिक आहे का नाही हा प्रश्न आहे. सावरकरांनी याच आत्मरक्षणाच्या पद्धतीचा अवलंब केला. ते किती चुकले ? भारतातील अल्पसंख्याकांची प्रवृत्ती नेमकी वरील देशापेक्षा उलटी आहे, हे तर मान्यच केले पाहिजे. मुसलमानांनी जातीय विचार करण्याचे सोडून द्यावे, आम्हीही सोडून देतो हे तर सावरकरांचे म्हणणेच होते. भारतात जातीय बळ निर्माण करण्यात मुसलमान अग्रेसर होते; त्या बळाला सांभाळून घेण्यात काँग्रेस अग्रेसर होती; हे बळ बळच नव्हे, एक आर्थिक विषमतेचा प्रश्न आहे, असे मानण्यात समाजवादी–मार्क्सवादी मंडळी आघाडीवर होती. या जातीय बळाला विरोध कसा करणार हे कुणी सांगतच नव्हते. जातीय तत्वावरील राजकारण आपल्याला परवडणार नाही, कारण आपण अल्पसंख्य आहोत, ही जाणीव अल्पसंख्याकांना होणे भाग होते. ही जाणीव मुसलमानांना स्वत:हून होवू शकत नव्हती, काँग्रेसचे नैतिकबळही ही जाणीव करुन देवून शकले नाही. ही जाणीव करुन देण्यासाठी सावरकर हिंदूना हिंदुत्वाची जाणीव ठेवायला सांगत होते. सावरकर किती चुकले ?

कुरुंदकरांचा पर्याय

हिंदुत्ववाद्यांना राष्ट्रद्रोही म्हणणारे प्रा. कुरुंदकर या बाबतीत कोणता पर्याय सुचवितात ? दोघांनाही समजून सांगून हा प्रश्न मिटविता येईल अितके ते आशावादी आहेत. या ऐक्यासाठी ते मुसलमानांना जे बजावून सांगत आहेत, त्यापेक्षा सावरकरांनी अधिक बजावलेले नाही, हे एकदा आपण समजून घेतले पाहिजे. हिंदू शब्दाचा वापर न करता, सावरकरांचीच भूमिका कुरुंदकर मुसलमानांना कशा परखड व खणखणीत शब्दात समजून सांगतात, हे पाहून घ्यायला आपण तयार असले पाहिजे.

प्रा. कुरुंदकर म्हणतात, [२५] "मुस्लीम विचारवंताची अशी समजूत आहे, की मुसलमानांच्या दृढ, बळकट संघटना करून ते संविधानाची दिशा बदलू शकतील. मुसलमानांचा दृढ व बळकट संघटना करण्याचा उद्योग फक्त हिंदुसमाजातील उदारमतवाद कमकुवत करतो, व त्याचे परिमाण मुसलमानांना भोगावे लागतात. ही परिस्थिती बदलावी अशी माझी अिच्छा आहे. मुसलमानांनी माझ्या बरोबर या देशाचे नागरिक म्हणून नांदावे अशी माझी भावना आहे. त्यांना मी दुय्यम नागरिक मानणार नाही असे समजणाऱ्या प्रत्येक प्रयत्नाचा मी कडवा विरोध करीन. पण मला स्वत:ला दुय्यम नागरिक करण्याचा प्रयत्न यशस्वी होवू देण्यासाठी मीच मदत करीन, हा भ्रमात कुणी राहू नये. परस्पराच्या विषयी

परस्पराच्या मनात विश्वास जागा करण्याची जबाबदारी एकतर्फी नसते, दुतर्फी असते. भारतीय संविधानाच्या चौकटीत समान नागरिकत्व उपभोगित आपण ऐकात्मता निर्माण करू. या तत्वावर आणि आशयावर तुमचे–माझे एकमत झाले तर मग बहुसंख्य जातीचा प्रतिनिधि म्हणून औदार्याची पहिली नैतिक जबाबदारी माझी आहे... संविधानात आधुनिक भारताचे जे स्वप्न दडलेले आहे, ते वेगाने साकार करावे, यावर तुमचे–माझे एकमत होणार आहे काय हाच खरा प्रश्न आहे" हिंदु–मुस्लीम प्रश्न सोडविण्यासाठी पाकिस्तानचा उपाय योजल्यानंतरच्या स्वतंत्र भारतातील मुसलमानांविषयी कुरुंदकर हे बोलत आहेत. भारतीय संविधानाचे नव्हे तर कुराणाच्या आज्ञेचे सार्वभौमत्व मुसलमान मानतात, या वास्तवाकडे बोट दाखवून कुरुंदकर हे बोलत आहेत.

समान नागरिकत्व

स्वतंत्र भारतातील कुरुंदकरांना हिंदू हे स्वतःला दुय्यम नागरिक समजणार नाहीत, असे मुसलमानांना बजावावे लागत आहे, यावरून फाळणीपूर्व काळात सावरकरांनी केलेली हीच तक्रार किती वास्तव होती हे लक्षात येईल. पाकिस्तान दिल्यानंतरही उरलेल्या मुसलमानांना तुम्ही हिंदुबरोबर समान नागरिकत्वाला तयार व्हा, त्यातच तुमचे हित आहे अशी समजूत काढावी लागत आहे, हीच गोष्ट सावरकरांचे या प्रश्नाविषयीचे आकलन किती वास्तव व दूरदर्शीपणाचे होते याचा पुरावा आहे. परस्पराच्या जबाबदाराची, पहिल्या नैतिक औदार्याची भाषा किती दिवस, वर्ष, शतके–करत राहायची, याला कुरुंदकर मर्यादा घालत नाहीत. या प्रश्नाची सुरवात १३व्या शतकातील अल्तमशापासून होते, असे तेच मानतात हमीद दलवाई हे या दृष्टीने विचार करणारे पहिले मुसलमान आहेत, असेही ते मानतात. तरीही कालमर्यादा घालत नाहीत.

मुसलमानांना कुरुंदकर विचारतात, [२६] "मुसलमानांना समान नागरिकत्व नको आहे काय? स्वतंत्र देशात अल्पसंख्येला समान नागरिकत्व नसले तर कनिष्ठ नागरिकत्व मिळत असते. हे दुय्यम दर्जाचे नागरिकत्व मुसलमानांना हवे आहे का? त्यांना हिंदुस्थानात वरिष्ठ नागरिकत्व मिळेल असे वाटते?" मुसलमानांना तुमचे हे तळमळीचे सांगणेही पटणारच नसेल तर पुढे काय करायचे, हा खरा प्रश्न आहे. त्यांच्यापुढे नमून त्यांच्या मागण्या पुऱ्या करत जाणे? किती दिवस? कुठपर्यंत? एका दिवशी तरी स्वतःचा अभिमान धरून हिंदू म्हणून विरोधी उभा टाकावेच लागेल ना? मग सावरकरांनी दुसरे काय केले?

प्रा. कुरुंदकर म्हणतात, [२७] "बहुसंख्यांक मुसलमान, किंबहुना जवळ जवळ सर्वच जण, स्वतःला राष्ट्र मानीत. या वरिष्ठाच्या अहंकारावर काँग्रेसचा उदारमतवाद हा तोडगा नव्हता, म्हणून फाळणी झाली." मग तोडगा कोणता होता?

प्रा. कुरुंदकर प्रश्नाची कठोर चिकित्सा करतात, कठोर उपाय सुचवत नाहीत. पर्याय म्हणून फिरुन फिरुन शेवटी ते गांधीजींच्या उदारमतवादाकडेच येतात. नुसत्या नैतिक सामर्थ्यावर हा प्रश्न सुटणारा नाही, हे त्यांना कळाले असूनही कोणत्याही भौतिक सामर्थ्याचा ते उल्लेख करत नाहीत. हे भौतिक सामर्थ्य म्हणजे हिंदूचेच सामर्थ्य होते, हे उघड आहे. हा सावरकरांचा मार्ग होता. या मार्गाने जातीय वैमनस्य वाढते म्हणून कुरुंदकरांना हा मार्ग पसंत नव्हता.

आदर्श समता

प्रा. कुरुंदकर म्हणतात,[२७] "समान नागरिकत्व ही कल्पनाच मुसलमानांना आवडत नव्हती. १८८९ पासून ही समान वाटपाची कल्पना पुनःपुन्हा सांगितली जाते... ७० टक्के हिंदूना ४० टक्के जागा, २२ टक्के मुसलमानांना ४० टक्के जागा, इतर सर्व मिळून ८ टक्के, अल्पसंख्यांकांना १० टक्के जागा, यावर फार तर उदारमतवादी मुसलमान तयार होता. कर्मठांना सर्वच भारत इस्लामसाठी हवा होता. सुशिक्षित मुस्लीम लीगला मुसलमानांना वेगळा तुकडा हवा होता. हिंदू हे एक राष्ट्र, मुसलमान हे दुसरे राष्ट्र; दोघात सत्तेत समान वाटा, म्हणजे दोघांनाही सत्तेत ५०–५० टक्के भाग ही खरी आदर्श समता आहे, असे मुसलमानांना वाटते." हीच चिकित्सा सावरकर जन्मभर करत होते, मग त्यांना जातीय का म्हणावे? दरडोअी-एकमताचा पुरस्कार सावरकर का करत याचे कारण कुरुंदकरांनीच वर सांगितलेले आहे. संत-महात्म्याप्रमाणे शतकानुशतके हाच उपदेश करत बसणे, हाच मुसलमानांना यासाठी तयार करण्याचा तोडगा होता काय?

मुसलमान नसण्याचा हक्क

प्रा. कुरुंदकर पुढे म्हणतात,[२७] "समान नागरिकत्व म्हणजे एका गटाला पृथक मान्यता देवून सत्तेत समान वाटा नव्हे, ही गोष्ट उदारमतवादी मुसलमानांना अजून पटायची राहिलेली आहे. मग उरलेल्याचा प्रश्नच काय? म्हणून माझ्या-सभोरचा आजचा मध्यवर्ती प्रश्न मूलतः वरिष्ठत्वाच्या अहंकाराचा भ्रम समाप्त करण्याचा आहे. मुसलमान नसण्याचा माझा हक्क प्रस्थापित करण्याचा आहे. हा हक्क प्रस्थापित करण्यात जर सेक्युलॅरिझमला अपयश आले, तर मुसलमानांचा मुसलमान असण्याचा हक्क नाकारला जाणे, एवढाच एकच पर्याय शिल्लक राहतो." हा वरिष्ठत्वाचा अहंकार कुराणातून, इतिहासातून, व संघटित सामर्थ्या-तून आलेला आहे, हे लक्षात घेता, सेक्युलॅरिझमच्या नैतिक उपदेशाने तो समाप्त होण्याची शक्यता नाही, हेही मोकळचा मनाने आपण मान्य केले पाहिजे. सेक्यु-लॅरिझम हे एक आदर्श धोरण आहे. या धोरणात धर्मबेडाची नांगी ठेचण्याचे स्वयंभू सामर्थ्य नाही. धर्मवेड्यांना सेक्युलॅरिझमची भाषाच समजत नाही. ही

समजली असती तर गांधी–नेहरूंना यां कामांत अपयश येण्याचे काहींच कारण नव्हते. हे अपयश आले नसेल, तर ही चर्चा कुरुंदकरांना करण्याचे काहीच कारण नव्हते.

कुरुंदकरांचा मध्यवर्ती प्रश्न मुसलमान नसण्याचा हक्क हिंदूनी प्रस्थापित करण्याचा आहे. सावरकरांच्या समोरचाच प्रश्न कुरुंदकर येथे आपल्या सेक्युलर भाषेत मांडत आहेत. सावरकर ज्याला 'हिंदू असण्याचा हक्क' म्हणतात, त्यालाच कुरुंदकर 'मुसलमान नसण्याचा हक्क' म्हणत आहेत. दोघांसमोरचा प्रश्न तोच आहे, चिंता तीच आहे; फक्त भाषेत फरक आहे. हा मुसलमान नसण्याचा हक्क प्रस्थापित करण्यासाठी काय केले पाहिजे ? बुद्धिवादी कुरुंदकरांच्या मते मुसलमान नसल्याची आपण जाणीव ठेवली पाहिजे, जातीयवादी सावरकरांच्या मते हिंदू असल्याची आपण जाणीव ठेवली पाहिजे. समजा, एवढे करुनही मुसलमान ऐकायला तयार नाहीत, तर मग काय करायचे ?

सावरकरांच्याही पुढे

कुरुंदकरांच्या मते अशा वेळेस मुसलमानांचा मुसलमान असण्याचा हक्क नाकारणे, एवढा एकच पर्याय उरतो. सावरकरांचा मार्ग यापेक्षा सौम्य आहे. हिंदूनी आपल्या हिंदुत्वाची, हिंदुराष्ट्राची जाणीव ठेवावी व धर्मनिरपेक्षवृत्ती व दरडोई एकमताच्या लोकशाही तत्वाप्रमाणे सहराष्ट्रीय देशबंधू म्हणून त्यांच्याशी वागावे, हा सावरकरांचा पर्याय आहे.

आता पुढचा प्रश्न आहे की, कुरुंदकर हा पर्याय कोणाच्या जीवावर व सामर्थ्यावर अमलात आणू अिच्छितात? बहुधा कुरुंदकरांच्या मते गैरमुस्लिमांच्या ! या गैरमुस्लिमांच्या हातात आता सेक्युलॅरिझमचे शस्त्र नाही, कारण ते पराभूत झालेले आहे. अशा अवस्थेत या गैरमुसलमानांनी कोणती भावना बाळगावी ? मुसलमानांचा मुसलमान म्हणून राहण्याचा हक्क नाकारण्यासाठी हे सारे गैर-मुसलमान एकत्र उभे आहेत, असे हे चित्र आहे. सेक्युलर कुंचल्याने रंगविलेले सावरकरांच्या हिंदुत्वालाही मागे टाकणारे हे चित्र आहे, हे काळजीपूर्वक आपण समजून घेतले पाहिजे.

आंबेडकर–कुरुंदकरांचे हे विचार येथे मांडण्याचा आमचा हेतू मुसलमान बंधूविषयी काही प्रतिकूल मांडावे हा नसून सावरकर ज्या निष्कर्षाला येतात त्याच निष्कर्षाला ही मंडळी कशी येतात, हे दाखवून देणे होय. आमचा साधा प्रश्न असा आहे की, असे असतानाही या मंडळीना जर बुद्धिवादी राहता येते तर सावरकरांना का राहता येवू नये ? डोक्यावर सेक्युलॅरिझमची टोपी चढवून सावरकरांची भूमिका मांडणे, आणि हातात हिंदुत्वाचा ध्वज घेवून सेक्युलॅरिझमचा प्रचार करणे, यातील हा फरक फारसा महत्वाचा नाही, असे आम्हास वाटते.

× × × ×

हिंदुराष्ट्राचा धर्माशी संबंध

आम्ही येथे सावरकरांच्या हिंदुत्वाची व हिंदुराष्ट्राची चर्चा करीत आहोत; त्यांचे अनुयायी किंवा अितर हिंदुत्वनिष्ठ यांच्या यासंबंधीच्या विचाराची नव्हे, हे मात्र लक्षात ठेवले पाहिजे. सावरकर आणि अितर ही मंडळी यांचे हिंदुत्व नि हिंदुराष्ट्र वेगवेगळे आहे, हे समजून घेतले पाहिजे. सावरकरांचा कठोर बुद्धिवाद त्यांच्या अनुयायांना जसा मान्य झाला नाही, तसाच त्यांचा धर्मनिरपेक्ष हिंदुत्ववादही त्यांच्या अनुयायांना मान्य झाला नाही. मात्र ही दुसरी गोष्ट आपल्या लगेच लक्षात येत नाही. हे लक्षात न येण्याचे कारण हिंदुत्वाचा नि हिंदुराष्ट्राचा धर्माशी 'धर्म' म्हणून काहीही संबंध नाही, हे समजून घ्यायला आपले मनच तयार होत नाही, हे आहे.

सावरकरांची 'हिंदू'ची व्याख्या धर्मश्रद्धेपासून कशी मुक्त आहे, हे आपण मागे पाहिले. ती धर्ममुक्त ठेवण्यासाठी त्यांच्या बुद्धिवादाची कशी कसोटी लागली आहे, हेही आपण पाहिले. त्यांचे जे हिंदुराष्ट्र आहे, त्याचा धर्माशी कोणता संबंध आहे, हेही समजून घेतले पाहिजे.

हिंदुराष्ट्र ही एक भावनिक संकल्पना आहे. ही भावनिक अेकात्मता साधण्यासाठी धर्माचा जो सहभाग असतो, तेवढाच या हिंदुराष्ट्राशी धर्माचा सबंध आहे. धर्म म्हणजे कोणती एखादी विशिष्ट धर्मश्रद्धा असा याचा अर्थच नाही. सावरकर हिंदुराष्ट्रासाठी धर्माची जाणीव ठेवतात याचा अर्थ या भावनिक एकात्मतेमध्ये धर्माचा वाटा आहे, या वास्तवाची जाणीव ठेवतात, एवढाच आहे. या पलिकडे ते धर्माच्या तत्वज्ञानात, त्यांच्या धर्मग्रंथात, धर्ममतात कुठेही शिरत नाहीत. या गोष्टी ते विचारातही घेत नाहीत.

हिंदुराष्ट्राचा एक भावनिक संकल्पना एवढाच अर्थ आपण व्यवहारात घेत नाही. हिंदुराष्ट्राचा हिंदुराज्य असाही अर्थ घेतला जातो. या ठिकाणी याचा अर्थ शासनव्यवस्था असा आहे. बहुसंख्याकांच्या शासनाला त्यांच्याच नावावरुन ओळण्याच्या आपल्या पद्धतीतून हिंदुराज्य हे नाव आलेले आहे. याही ठिकाणी हिंदुराज्याचा धर्माशी संबंध नाही. या राज्यात हिंदू नावाचे लोक बहुसंख्येने राहतात, एवढीच वस्तुस्थिती दाखिविण्याकरिता 'हिंदुराज्य' हा शब्द आलेला आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. याच अर्थाने सावरकर हिंदुराष्ट्र हे हिंदुराज्यच आहे म्हणत असत.

घटनेतील हिंदुराज्य

हे जे हिंदुराज्य आहे, ते निर्भेळ हिंदूचे राज्य नाही. या राज्यात हिंदू बहुसंख्य असले तरी इतर जाती धर्मांचे सर्वच लोक आहेत. हे हिंदी किंवा भारतीय राज्यच आहे. या राज्याला हिंदुराज्य किंवा हिंदुस्थानच म्हणावे असा काही सावरकरांचा आग्रह नाही. या नावामुळे अल्पसंख्याकांना वाईट वाटते, या नावाचा त्यांना विरोध

आहे, म्हणून हे नावच नको, याला मात्र सावरकरांचा कडवा विरोध आहे. त्यांच्या मते हा वास्तवाला विरोध आहे. १९४९ ला घटनासमितीच्या अध्यक्षाना तार करुन सावरकरांनी विनंती केली की की,' "भारत हे आपल्या राष्ट्राचे नाव, हिंदी आपली राष्ट्रभाषा नि नागरी ही आपली राष्ट्रलिपी, असे ठरवून घटनासमितीने यांना मान्यता द्यावी, अशी माझी कळकळीची विनंती आहे." हिंदुराष्ट्रवादी सावरकर हिंदुराज्याला हिंदुस्थान नाव द्यायला सांगत नाहीत, तर 'भारत' हे नाव देण्याची कळकळीची विनंती करत आहेत, याचा अन्वयार्थ भल्याभल्यांना लावता आलेला नाही. त्यांचे हिंदुराज्य म्हणजे हिंदुधर्मावर आधारलेले राज्य आहे, असा भ्रम अनेकांनी करुन घेतलेला आहे.

राज्याचा धर्माशी अनेक अर्थानी संबंध येतो. सावरकरांच्या कल्पनेतील राज्याचा तो संबंध कोणत्या अर्थी येतो, हे पाहिले पाहिजे. सध्याची आपली जी घटना आहे, तिचे त्यांनी मुक्तकंठानी स्वागत केले आहे. धर्म, वंश याच्या आधारावरील भेदभाव रद्द केल्याबद्दल त्यांनी तार करून सरकारचे अभिनंदन केले. "आमच्या भारतीय राज्याचे खरेखुरे राष्ट्रीय स्वरुप सिद्ध करून दिल्याबद्दल मी तुमचे अभिनंदन करतो. राज्य शासनामध्ये हे कलम तत्वशः नि शब्दशः अमलात आणले जाईल अशी मला आशा आहे."[२] असे ते तारेत म्हणतात. हेच आमचे हिंदुराज्य आहे, असे त्यांनी प्रकटपणे जाहीर केले.[३] आता याचा अर्थ सावरकरांच्या कल्पनेतील हिंदुराज्य सध्या आपल्या धर्मनिरपेक्ष घटनेने अस्तित्वात आलेलेच आहे, असा होतो. दरडोअी एकमताचा सिद्धांत मांडून ज्या राज्याची सावरकर संकल्पना करत होते, तेच राज्य भारतीय घटनेतून अवतरलेले आहे, हे आपण लक्षातच घेत नाही.

अद्ययावत् बुद्धिप्रामाण्यावर

१९५० ला कलकत्ता येथे त्यांनी केलेल्या भाषणाचे त्यांनी नंतर एक निवेदन छापले. त्यात ते म्हणतात,[४] "माझे कलकत्ता येथील भाषण तेथील प्रमुख वृत्तपत्रानी प्रमुखपणे छापलेले आहे. त्या भाषणातील प्रमुख विधेयके अशी : अ) भारत हा स्वतंत्र झाला आहे. हे स्वातंत्र्य टिकवायचे असल्यामुळे जनतेने निर्बंध आपल्या हाती न घेता लोकशाही मार्गाने जो पक्ष निवडून येईल त्याला पाठिंबा दिला पाहिजे. (आ) १९३७ ते १९४३ या कालखंडातील हिंदुमहासभेच्या अध्यक्षपदावरुन मी जी भाषणे केलेली आहेत, त्यात स्पष्टच सांगितले आहे की, राज्याची घटना ही मनुस्मृती, बायबल अथवा कुराणावर आधारलेली नसावी, तरी ती अद्ययावत् बुद्धिप्रामाण्य मानणारी असावी. नवीन घटनेत सर्वांना समान अधिकार असल्यामुळे आपल्या राज्याला जे निष्ठावंत असतील अशा हिंदू, मुसलमान, ख्रिश्चनांशी बंधुभावाने वागावे...." याच धर्मनिरपेक्ष, जातिनिरपेक्ष हिंदीराज्याची कल्पना त्यांनी आयुष्यभर मांडलेली आहे. नुसतेच धर्मनिरपेक्षतेवर नव्हे, तर

'अद्ययावत् बुद्धिप्रामाण्यावर' त्यांचे राज्य, राज्याची घटना व धोरण आधारित आहे, ही गोष्ट नीट लक्षात घेवून त्यांच्या हिंदुराष्ट्राचा अभ्यास आपण केला पाहिजे.

स्वहिताची जाणीव

या धर्मनिरपेक्ष, हिंदी म्हणा की हिंदू म्हणा, राज्यामध्ये सावरकरांचे हिंदुराष्ट्र भावनिक संकल्पना म्हणून जिवंत आहे ही भावनिक संकल्पना हिंदीराज्याच्या ध्येयधोरणाशी विरोधी नाही. त्या ध्येयधोरणाशी ती एकरुपच आहे. धर्मनिरपेक्ष धोरण शासनाने तत्वतः व शब्दशः अमलात आणण्यासाठी शासनावर दबाव तंत्र म्हणून ही भावना जिवंत ठेवणे सावरकरांना भाग वाटते. स्वतंत्र भारतात त्यांना हिंदुमहासभेची गरज वाटते, त्याचे कारण हे होय. हिंदुशासनाची एकूण प्रवृत्ती अल्पसंख्याकांचे अनुनय करणारी, व हिंदूचे न्याय हक्क काढून त्यांना देणारी असल्यामुळे, हिंदूचे हित पाहणारी एखादी संस्था आवश्यक असल्याचे त्यांचे मत आहे. या संस्थेमध्ये अहिंदूना प्रवेश असू नये असे त्यांना वाटते. श्यामाप्रसाद मुखर्जींना याविषयी १९४७ साली पाठविलेल्या पत्रात ते म्हणतात, [५] "Hindu must have an organization of their own where they can think plan, consolidate and act as Hindus without check, from any Non-Hindu who enters by right. ... So long as there are purely Muslims, Christians and Parsees bodies in India, so long at least, the Hindus must have an exclusive orgnization of their own"

सावरकरांची ही भूमिका फार पूर्वीपासूनची आहे. १९४२ ला ते मुंबई येथे म्हणाले, [६] "जर मुसलमानांच्या अवास्तव मागण्याचे आवेशाने समर्थन करणारी मुस्लीम लीग या देशामध्ये आहे, ख्रिश्चनांचे न्याय हक्क रक्षिणारी ख्रिश्चन फेडरेशन ही संस्था या राष्ट्रात आहे, तर मग राष्ट्राचे स्थायी घटक जे हिंदुसमाज त्यातील कोट्यावधि हिंदूचे न्यायरक्षण करण्याकरिता हिंदुमहासभा या देशात असलीच पाहिजे." सर्वांनी आपापले न्याय हक्क रक्षणाऱ्या संघटना ठेवाव्यात ही भूमिका त्यांनी सातत्याने घेतलेली आपल्या लक्षात येईल. आमच्या बुद्धिवादी टिकाकारांना ही भूमिका मान्य नसते. जातीय संघटना असूच नयेत असे त्यांचे म्हणणे असते. हे म्हणणे तत्वतः सावरकरांना मान्यच असते; पण जोपर्यंत इतर याचे पालन करत नाहीत तोवर हिंदुजातीनेच एकटयाने मानवतावादी बनणे न्याय होणार नाही, असे त्यांना वाटते.

यासाठी हिंदीराज्यामध्येही हिंदुलोकांनी स्वतःचे न्याय हक्क रक्षणाची दृष्टी व त्यासाठी एखादी संघटना ठेवली पाहिजे, असे ते म्हणतात. बुद्धिवादाच्या दृष्टीने यात आक्षेपार्ह काय आहे? याचा हेतू न्याय हक्क रक्षणाचा आहे व काल-

मर्यादा अंतर जाती जोवर स्वतःचाच विचार करतात तोवर आहे. अशा जातीय निर्णयाला सावरकर येतात याची दोन कारणे आहेत. एक, मुस्लिमांची मागण्या पदरात पाडून घेण्याची धर्मवेडी पद्धत; आणि दोन, हिंदुलोकांची सद्गुण विकृती. या साऱ्या पार्श्वभूमीवर सावरकरांची ही भूमिका वास्तव आहे का अवास्तव का निषेधार्ह या अर्थी जातीय आहे, हे प्रत्येकाने ठरविले पाहिजे.

सावरकरांची धर्मनिरपेक्षता

'अद्ययावत् बुद्धिप्रामाण्यावरच' राज्याची उभारणी करू पाहणाऱ्या सावरकरांना धर्मनिरपेक्ष राज्य–Secular state मान्य होते का नाही, हा अनेकांनी वादाचा विषय करून ठेवला आहे. त्यांच्या हिंदुराष्ट्राचा अर्थ नीट समजून न घेतल्यामुळे त्यांच्या धर्मनिरपेक्षतेचे वास्तविक मूल्यमापन करण्यात अनेकांचे घोटाळे झालेले आहेत. डॉ. सुधाकर भालेरावांचा या बाबतीत झालेला घोटाळा प्रातिनिधिक आणि उल्लेखनीय ठरेल. 'सावरकर धर्माधिष्ठित राज्याचे पुरस्कर्ते नव्हते' असा त्यांचा निःसंदिग्ध अभिप्राय आहे.[७] 'घटनेत धर्माला स्थान नसावे हे त्यांचे मत होते' हीही गोष्ट ते मान्य करतात.[८] आणि ते लगेच म्हणतात की, 'पण त्याच वेळी पाश्चिमात्य अर्थाने धर्मनिरपेक्ष राज्याचे ते संकल्पक नव्हते, हेही उघड आहे.' त्यांना उत्तर न मिळालेला प्रश्न असा आहे की, "निराकरण होत नाही, केवळ एकाच मुद्याचे की सावरकर हे भावात्मक इहवादी (Positive secularist) होते का?"[८]

डॉ. भालेराव सेक्युलॅरिझमच्या कल्पनेचे तीन वर्ग करतात. राज्यातील सर्व धर्माशी समभावाने वागण्याचे राज्याचे धोरण म्हणजे भावात्मक (Positive) इहवादी होय. राज्यातील कोणत्याही धर्माशी राज्याचे काहीही कर्तव्य नसणे, हा अभावात्मक (Negative) इहवाद होय. हा अभावात्मक इहवाद वा निधर्मीवाद पाश्चात्यांचा आहे. हा निधर्मीवाद सावरकरांना मान्य नाही, हे ते स्पष्टपणे सांगतात. ते निधर्मीवादी नाहीत यात त्यांना शंका वाटत नाही, पण ते सर्वधर्मसमवादी आहेत काय याबद्दल त्यांना दाट शंका आहे. त्यामुळे 'त्यांचा निधर्मीवाद वेगळाच होता' असे ते म्हणतात.[९] राज्यशास्त्राच्या पारंपारिक चौकटीत हा निधर्मीवाद बसविण्यात त्यांना अडचण आलेली दिसते. त्यामुळे सावरकरांना ते या तिसऱ्या वर्गात टाकतात.

निराळाच निधर्मीवाद

या निराळ्याच निधर्मीवादाचे स्वरूप कोणते आहे? या राज्याची घटना व कायदे कोणत्याच धर्मावर आधारित नाहींत. नागरिकत्वासहित देशातील सर्वच हक्क सर्व नागरिकांना सारखेच उपभोगता येणारे आहेत. हे सर्व हक्क जातिधर्मनिरपेक्षपणे सर्वांनाच सारखे मिळणारे आहेत. आता पाश्चात्यांच्या, धर्माशी

आम्हाला कर्तव्य नाही, या निधर्मीवादापेक्षा, ही भूमिका वेगळी कुठे आहे ? धर्माच्या आधारावर नागरिकात कुठेही भेदभाव नाही, हा मुख्य मुद्दा या दोन्हीही सेक्युलॅरिझममध्ये समान आहे. राज्यात कोणताही धर्म राहू नये ही धर्मनिर्मूलनाची भूमिका यापैकी कोणताही सेक्युलॅरिझम घेत नाही. नागरिकांना धर्मस्वातंत्र्य देणे, पण हे स्वातंत्र्य राष्ट्रहिताच्या विरोधी असणार नाही याची काळजी घेणे, हे धोरण सावरकरांचा हा इहवाद स्वीकारतो. धर्मस्वातंत्र्य आणि राष्ट्रहित याचा विरोध आला तर राष्ट्रहिताला प्राधान्य हाच पाश्चात्यांच्या नि सावरकरांच्या इहवादाचा समान नि मध्यवर्ती मुद्दा आहे.

हिंदुत्वाच्या प्रभावाचा अर्थ

आता प्रश्न उरतो, सावरकरांचा इहवाद पाश्चात्यांच्या निधर्मीवादापेक्षा निराळा कोणत्या घटकावर आहे ? डॉ. भालेराव म्हणतात, " नागरिकत्व व राष्ट्रीयत्व यात ते भेद करीत होते. अहिंदूना भारतीय नागरिकत्वाचे समान हक्क देण्यास त्यांचा आक्षेप नव्हता, पण अहिंदूना ते राष्ट्रीयत्व देण्यास तयार नव्हते. राज्यात हिंदुत्वाचा प्रभाव असावा, त्याच वेळी सर्व धर्माना स्वातंत्र्य असावे असे त्यांचे मत होते. तेव्हा त्यांचा निधर्मीवाद वेगळाच होता." सावरकरांचा ' हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व ' हा सिद्धांत समजून घेण्यास डॉ. भालेरावांनी केलेली चूक सावरकरांच्या सेक्युलॅरिझमला निराळा पंथ मानायला कारण झालेली आहे. राष्ट्रीयत्वाबद्दलचा हा त्यांचा मुद्दा कसा चुकीचा आहे, हे आपण यापूर्वी पाहिलेच आहे. बहुसंख्य असलेल्या हिंदू लोकांचे न्याय हक्क अल्पसंख्य असलेल्या लोकांकडून अन्याय रितीने हिरावले जावू नयेत, या अर्थी ते हिंदुत्वाचा भारताला प्रभाव राहिला पाहिजे असे म्हणतात, हे डॉ. भालेराव लक्षात घेत नाहीत. ते मुसलमानांना राष्ट्रीयत्व द्यायला तयार नाहीत, याचा अर्थ त्यांना ते या देशात बहुसंख्य मानायला तयार नाहीत. हा एवढाच आहे, हेही डॉ. भालेराव लक्षात घेत नाहीत. या हिंदुत्वाचा संबंध या इहवादाशी नसून लोकशाही तत्त्वाशी आहे; धर्माशी नसून एकूण सर्वच न्यायहक्कांशी आहे, हेही ते लक्षात घेत नाहीत. दरडोई एकमताचा व जातिधर्म निरपेक्षतेचा पुरस्कार करणारी राज्यघटना वा कायदे केल्यानंतरही स्वतंत्रपणे अस्तित्वात राहणारा हा प्रश्न नसून, अशा राज्यघटनेतच विलीन होणारा हा प्रश्न आहे. आणि त्यानंतरही शिल्लक राहिलाच तर राज्यघटनेतील तरतुदी तत्वतः व शब्दशः व्यवहारात अमलात कशा येतील याची खबरदारी घेण्यापुरताच राहील. सावरकरांच्या हिंदुत्वाचे हे स्वरुप लक्षात न घेतल्यामुळे भालेरावांना त्यांचा हा इहवाद काहीतरी वेगळाच भासू लागलेला आहे.

धर्मात हस्तक्षेप

राज्याची घटना ही ' अद्ययावत् बुद्धिप्रामाण्य ' मानणारी असावी व तत्वतः

व शब्दशः शासनाने ती अमलात आणावी, अशी सावरकरांची बुद्धिवादी भूमिका आहे. 'धर्माचा पुरस्कार किंवा त्यात हस्तक्षेप न करणारे राज्य म्हणजे धर्मनिरपेक्ष राज्य होय' हे डी. ई स्मिथचे मत डॉ. भालेराव उद्धृत करतात. कोणत्याही धर्माचा पुरस्कार न करण्याचा यातील भाग सावरकरांचा बुद्धिवाद मान्य करतो, पण कोणत्याही धर्मात हस्तक्षेप न करण्याचा भाग त्यांना मान्य नाही. हे मान्य करणे म्हणजे धर्माचे सार्वभौमत्व मान्य करणे होय. धर्माच्या ज्या भागाशी राष्ट्रजीवनाचा संबंध येत नाही, अशा निरूपद्रवी व निष्फळ वैयक्तिक गोष्टीपुरते हे तत्व ठीक आहे. पण धर्माचा राष्ट्रजीवनाशी संबंधित जो भाग आहे, तो धर्मभाग राष्ट्रहिताशी विरोधी येत असेल तर अशा धर्मामध्ये तेवढ्या भागापुरता हस्तक्षेप केल्याशिवाय राज्याला राहताच येत नसते, धर्मात राज्य हस्तक्षेप करणार नाही हे दोन अर्थानेच योग्य असू शकते. एक, एखाद्या विशिष्ट धर्मामध्ये केवळ त्या धर्माच्या आकस बुद्धीमुळे हस्तक्षेप केला जावू नये. दोन, धर्माचा जो भाग कोणत्याही अर्थाने समाजहिताच्या, राष्ट्रहिताच्या विरोधी नाही, त्या भागात विनाकारण हस्तक्षेप करु नये. या दोन्ही गोष्टी सर्व धर्मांना समानतेने लागू कराव्यात या अर्थी सावरकर सर्वधर्मसमभावीच होते.

धर्मस्वातंत्र्याची मर्यादा

१९५३ मध्ये सावरकर धर्मस्वातंत्र्याबद्दल म्हणाले,९ "धर्मस्वातंत्र्य म्हणजे तत्वज्ञान सांगायचे स्वातंत्र्य; संघटितपणे प्रचार करण्याचे स्वातंत्र्य नव्हे, असा स्पष्ट खुलासा (भारतीय घटनेत) होणे आवश्यक आहे. देशाच्या एकीला व नेकीला विरोधी असे धर्मस्वातंत्र्य असूच शकत नाही." तेव्हा राष्ट्रहिताला विरोधी नसणाऱ्या धर्माचरणाकडे सावरकर दुर्लक्ष करायला तयार आहेत, एवढाच याचा अर्थ आहे. सावरकर सर्वधर्मसमभावी आहेत याचा अर्थ ते सर्वच धर्मांना हा दुर्लक्ष करण्याचा सारखाच न्याय लावतात असा आहे. धर्मस्वातंत्र्य म्हणजे राष्ट्राचे अहित करण्याचे स्वातंत्र्य कुण्याच धर्माला द्यायला ते तयार नाहीत.

सावरकरांची ही 'अव्ययावत् बुद्धिप्रामाण्य' मानणारी भूमिका त्यांच्या अनुयायांना मान्य नसते. धर्माच्या नावावर अल्पसंख्याक जाती संघटना उभ्या करुन राष्ट्रीय संकट आणीत आहेत, यास्तव हिंदूनी स्वतःचा हिंदू असण्याचा अभिमान जागृत ठेवावा, एवढेच सावरकर जन्मभर सांगत होते. या पलिकडे ते हिंदूच्या कोणत्याही धर्माच्या आत शिरलेले आपल्याला दिसणार नाहीत. धर्माचे तत्वज्ञान कोणते आहे, हा मुद्दाच राष्ट्राच्यादृष्टीने गैरलागू आहे, हीच भूमिका घेवून ते बोलत असतात. राष्ट्रीय जीवन संपन्न व परिपूर्ण होण्यासाठी धर्माची कशी आवश्यकता आहे, ही गोष्ट कधीही पटवून देत असलेले ते दिसणार नाहीत. सारे धर्म नष्ट होणार असतील तर हिंदुधर्म नष्ट झाला तरी त्यांना चिंता वाटत नाही. कोणत्याही धर्माची धर्म म्हणून, उदात्त तत्वज्ञान म्हणून, राष्ट्रधारण

करणारे एक साधन म्हणून, त्यांना कधीही गरज वाटलेली नाही. त्यांची ही बुद्धिप्रामाण्यवादी भूमिका त्यांच्या अनुयायांना कधीही पसंत पडली नाही.

भावात्मक इहवाद

निधर्मीवादाने समाजात पोकळी निर्माण होते, हा हिंदुत्वनिष्ठांचा एक महत्वाचा मुद्दा असतो. विवेकानंद, डॉ. राधाकृष्णन किंवा पं. दीनदयाळ उपाध्याय यांची जी हिंदुत्वविषयक भूमिका आहे, ती बहुधा सर्वच हिंदुत्वनिष्ठांना मान्य असते हे हिंदुत्व हिंदुधर्माशी समानार्थी हिंदुत्व आहे, हे समजून घेतले पाहिजे. हिंदुधर्माचे जे चिरंतन तत्वज्ञान आहे, आमचे जे उदात्त असे अध्यात्म आहे, त्यांच्या पायावर यांचे हिंदुत्व आधारलेले आहे. हीही एक प्रकारची धर्मनिरपेक्षता आहे, असे त्यांना वाटते. 'धर्मनिरपेक्षता म्हणजे आध्यात्मिक मूल्यांना व ते मिळविण्याच्या सर्व मार्गांना दिलेली मान्यता होय' [१०] असे डॉ. राधाकृष्णनचे मत होते. या धर्मनिरपेक्ष मतालाच डॉ. भालेराव भावात्मक इहवाद असे म्हणतात. [११] अशा अर्थाचा इहवाद सावरकरांना मान्य होता की नाही असा त्यांना प्रश्न पडला आहे.

सावरकरांचे नैतिक विचार पूर्णपणे बुद्धीवर आधारलेले होते. धर्माचा वा अध्यात्माचा यासाठी त्यांनी कधीही पुरस्कार केलेला नाही. चुकूनही या भूमिकेला त्यांनी कधी पाठिंबा दिल्याचे आपल्याला दिसणार नाही. या अर्थीचा इहवाद, म्हणजे अध्यात्मावर राजकारण वा राजकीयसंस्था उभा करण्याची भूमिका, त्यांना मान्य नव्हती, हे उघड आहे. त्यांच्या कल्पनेतले राज्यशासन हे अद्ययावत् बुद्धिप्रामाण्यवादीच आहे, नुसते धर्मनिरपेक्ष नव्हे!

अनुयायांना नापसंत

सावरकर हिंदुत्व नि हिंदुराष्ट्र धर्म या कल्पनेपासून कितीही मुक्त करण्याचा प्रयत्न करत असले तरी त्यांचे अनुयायी हिंदुत्वालाच हिंदुधर्म मानीत आले आहेत. हिंदुधर्मावर आधारित हिंदुराष्ट्राचाच पाठपुरावा करीत आलेले आहेत. अनुयायांच्या या भूमिकेवर सावरकरांचे हिंदुराष्ट्र समजून घेणे धोक्याचे व सावरकरांवर अन्याय करणारे आहे. त्यांच्या अनुयायांचे यासंबंधीचे असे विचार येथे मांडून त्यांच्यावर टीका करण्याची आमची अजिबात इच्छा नाही. तरीपण काही उदाहरणांवरुन हा फरक दाखवून देणे सावरकरांना समजून घेण्याच्या दृष्टीने उपकारक ठरेल असे आम्हास वाटते. आमच्यासमोर अशी कित्येक उदाहरणे आहेत, तथापि प्रातिनिधिक म्हणून एकच महत्वाचे उदाहरण आम्ही घेऊ इच्छितो.

प्रातिनिधिक उदाहरण

हिंदुमहासभेची मंडळी सावरकरांच्या विचारांचा वारसा सांगतात. ही

मंडळींनी ज्यांना १९६४ ते ७१ पर्यंत अ. भा. हिंदुमहासभेचे अध्यक्ष म्हणून निवडले ते श्री नित्यनारायण बॅनर्जी यांचे विचार अल्पण थोडक्यात पाहू. त्यांची अ. भा. हिंदुमहासभेची अध्यक्षीय भाषणे अभ्यास करण्यासारखी आहेत. ही भाषणे आपल्याला एखाद्या धार्मिक प्रवचनासारखी वाटतील. धर्माला विरोध करणारा साम्यवाद हा त्यांचा क्रमांक एकचा शत्रू झालेला दिसेल. आपल्या जीवनाची आध्यात्मिक व नैतिक पातळी कशी वाढेल हा या भाषणांचा मध्यवर्ती विषय आहे. हिंदुजीवन पद्धती हीच जगात सर्वश्रेष्ठ आहे, असे त्यांचे म्हणणे आहे. या जीवनपद्धतीत चार आश्रमापासून चारवर्णापर्यन्तच्या सर्वच हिंदुपद्धतीचा ते गौरवपूर्ण उल्लेख करतात. यालाच ते हिंदुत्व म्हणतात.

गीता–मनुस्मृती

१९६८ च्या बडोदा येथील अध्यक्षीय भाषणात बॅनर्जी म्हणाले,[११] "मैं आप लोगों को अनुरोध करता हूँ कि आप अपनी दैनिक दिनचर्या में गीता के नियमित अध्ययन को भी स्थान दे और मेरा विश्वास है की, आपको अपने जीवन मे पर्याप्त शांति का सोपान प्राप्त हो सकेगा ! गीता आपको अपने जीवन की, दैनंदिन समस्याओं पर विजय पानेका शक्ति प्रदान करेगी ! ... " चांगला हिंदू बनण्यासाठी काय केले पाहिजे यासाठी ते लगेच मनुस्मृतीतील वचने उद्धृत करतात. हिंदुत्व आणि हिंदुधर्म ही एकच गोष्ट आहे, असे त्यांना वाटते. ते पुढे म्हणतात,[१२] "हिंदुमहासभा का यह भी मत है की, हिंदुत्व को राजधर्म के रुप मे मान्यता दिये जाने मात्र से ही भारत मे अपेक्षित मनोवैज्ञानिक और राजनैतिक परिवर्तन आ सकता है !" हिंदुधर्माला राजधर्म करण्याचा विचार ते अध्यक्षीय भाषणात बोलून दाखवित आहेत. आपल्या भाषणात ते हिंदुधर्मातील ब्रह्मवादाची व पुनर्जन्माची तत्वे कशी विज्ञाननिष्ठ आहेत, हे पटवून देतात. याच हिंदुधर्मावर त्यांना हिंदुराष्ट्र उभे करावयाचे आहे.

सावरकरांचा पराभव

अ भा. हिंदुमहासभेच्या १९७१ च्या हैद्राबाद येथील अध्यक्षीय भाषणातही त्यांनी असेच विचार मांडलेले आपल्याला दिसतील. 'हिंदुराज्य का हवे ?' असा प्रश्न करुन हिंदुधर्म व हिंदुसंस्कृती सर्व श्रेष्ठ होय, त्यासाठी हिंदुराज्य हवे, असे ते उत्तर देतात. ते म्हणतात,[१३] "हिंदुओंकी परंपराएँ, उनका सामाजिक एवं नैतिक विधि–विधान, चार आश्रमों एवं चार वर्णों की व्यवस्था, हिंदू सदाचार तथा अन्य विविध बातें जो एक आदर्श समाज रुपमे क्रमशः विकास को प्राप्त होती गयी" वैदिक धर्माचा अभिमान त्यांच्या भाषणातून ओसंडत आहे. भौतिकवादावर कठोर टीका चालू आहे. अध्यात्मवादाचा पुरस्कार हा तर भाषणाचा मध्यवर्ती मुद्दा आहे. "पाश्चात्य सभ्यता मूलतः भौतिकवादी है ! जबकि हिंदुसभ्यता मूलतः

अध्यात्मवादी है !" [१३] असा त्यांचा अभिमान आहे. ते म्हणतात, [१४] "पाश्चात्य भौतिकवाद ने हमको अपने वास्तविक जीवनोद्देश अथवा जीवन पद्धति से विमुख कर दिया है ! हमको अपने राष्ट्रीय चरित्र से वंचित कर दिया है !" सरळसरळ ही सावरकरांवर टीका आहे. याच कार्याकरिता सावरकर आदी नेते जगले व मेले असे सुरवातीला सांगून नंतर त्यांच्या विचारावर ही तुफान टीका चालू आहे. ते पुढे म्हणतात, "हिंदुमहासभा नरपशुओंका समाज अथवा राज्य निर्माण नही चाहता ! हम पूर्णतया विकसित हिंदू आचार से संपन्न राष्ट्रकी कामना करते हैं !... इसिलिए हम हिंदुराज्य (राष्ट्र) की मांग करते है !" भौतिकवादाला ते अंधकार, बेइमानी अशा शिव्या देतात. सावरकरांच्या अनुयायांनी त्यांच्या बुद्धिवादी विचाराचा केलेला हा एक दारूण पराभव आहे.

आपल्या राजकीय भाषणात ते म्हणतात, [१५] "वैदिक हिंदुधर्म सत्य सनातन है! इसके मूलभूत सत्योंको मनुष्य मात्र के प्रति लागू किया जा सकता है !" हिंदू पद्धतीमध्ये लोकतांत्रिक राज्याची कल्पना आहे. यात राजा मात्र स्वेच्छाचारी नसतो. "क्योंकि वह दंड (विधि), धर्म और समाज से शासित होता था" असे ते म्हणतात. [१६] याचा अर्थ त्यांच्या हिंदुराज्याचा राजा हा धर्माकडून शासित केला जाईल, असा आहे !

चातुर्वर्ण्यावर आधारित

एवढेच नव्हे, तर बॅनर्जीचे हिंदुराज्य हे वर्णाश्रमाचा पुरस्कार करणारे आहे. ते म्हणतात [१६] "हिंदु सामाजिक सिद्धांत समाज को चार प्रमुख वर्गो अथवा वर्णो मे विभाजित करके प्रत्येक वर्ग को विशेष कर्तव्य सौंप देता है ! प्रत्येक वर्ण को अपने कर्तव्यों का धार्मिक उत्साह और प्रेरणा से पालन करना होता है !" आणि मग चातुर्वर्ण्य हा कसा आदर्श आहे हे ते पटवून देतात. हिंदु-समाजवाद काय आहे हे सांगताना बॅनर्जींनी मनुस्मृतीचा आधार घेतलेला आहे. चातुर्वर्ण्य त्या हिंदुसमाजवादाचा एक भाग झाला. त्या वेळेस ब्राह्मण सर्वाधिक निर्धन होते. तरीही चोरीच्या गुन्ह्याबद्दल शुद्रांना एक रुपया, तर ब्राह्मणांना चढत्या क्रमाने १६ रु. दंड होता. ही गोष्ट सांगून या व्यवस्थेचे त्यांनी कौतुक केले आहे. हाच हिंदुसमाजवाद आहे, असे ते म्हणतात. [१७] त्यांच्या हिंदुराज्यामध्ये असेच सर्वांना वेगवेगळे नियम राहणार असे त्यांना सांगायचे आहे. वैदिक धर्मातला हा जो हिंदुसमाजवाद आहे तो सर्वात आदर्श असून, तो सर्व राजकीय पक्षांनी स्वीकारावा असे त्यांचे सर्व पक्षांना 'अपील' आहे. [१७]

हिंदुत्वाचा सिद्धांत नि नियम कुठे सापडतात हे सांगताना बॅनर्जी रामायण, महाभारत, विविध स्मृती पासून सर्व वैदिक ग्रंथांचा उल्लेख करतात. भौतिक-वादावर आधारलेला पाश्चात्य समाजवाद दूर सारुन अध्यात्मावर व या वैदिक विचारावर आधारलेला हिंदुसमाजवाद भारतात आणला पाहिजे, असे ते आग्रहाने

सांगतात, असे करणे हेच सावरकरांच्या विचाराप्रमाणे हिंदुकरण होय, असेही ते सांगून टाकतात. सावरकर आणि त्यांचे अनुयायी हे कसे परस्परविरोधी टोकाचे विचार मानत होते, हे यावरुन स्पष्टपणे दिसून येईल.

नावापुरता संबंध

कोणत्याही धर्मतत्वाचा वा अध्यात्माचा सावरकरांनी आपल्या जन्मात कधी चुकूनही पुरस्कार केला नाही. विज्ञानाच्या कसोटीला उतरणार नाही अशी कोणतीही गोष्ट त्यांनी कधी मानली नाही. हिंदुकरणाचा त्यांचा अर्थ राजकारणात प्रत्येक गोष्ट करताना हिंदूचे न्याय्य हित रक्षण होते का नाही, हा दृष्टिकोण ठेवणे एवढाच आहे. त्याचा धर्मतत्वाशी, अध्यात्माशी काहीही संबंध नाही. त्यांच्या अनुयायांच्या या हिंदुत्वाचा, हिंदुराज्याचा सावरकरांच्या हिंदुत्वाशी वा हिंदुराष्ट्राशी काहीही संबंध नाही. बॅनर्जीची भूमिका सावरकरांच्या अनुयायांची प्रातिनिधिक भूमिका आहे ७–८ वर्ष अ. भा. हिंदुमहासभेचा अध्यक्ष असलेला हा नेता आहे. बॅनर्जीची भूमिका चुकीची असो की बरोबर त्यांच्याशी आम्हाला कर्तव्य नाही. पटेल ते विचार मानायला सावरकरांच्या अनुयायांनाही हक्क आहेच. आमचे म्हणणे एवढेच की, या अनुयायांच्या भूमिकेवरून सावरकरांचे हिंदुराष्ट्र समजून घेण्याची चूक आपण करता कामा नये.

हिंदुत्ववाद किंवा हिंदुराष्ट्र म्हटले की लोकांच्या समोर बॅनर्जीचे हिंदुराष्ट्र उभे राहते. सावरकरांच्या हिंदुराष्ट्राचा या हिंदुराष्ट्राशी नावापुरताच संबंध आहे, हे आपण समजूनच घेत नाही. धर्मावर–धर्मग्रंथावर समाज उभे करण्याचे दिवस गेले, हे कंठरवाने ओरडून सांगणारा हा बुद्धिवादी माणूस हिंदुराष्ट्राचा पुरस्कार का करतो व त्यांच्या हिंदुराष्ट्राचे स्वरूप काय, हे निर्लेप मनाने व स्वतंत्रपणे आपण समजूनच घेत नाही. हे जर समजून घेतले तर त्यांच्या हिंदुत्वात व हिंदुराष्ट्रात बुद्धिवादाच्या विरोधी काहीही नाही, याच निर्णयाला आपल्याला यावे लागेल.

× × × ×

–९–

आक्षेपार्ह काय ?

सावरकरांच्या हिंदुराष्ट्रावर बुद्धिवादाच्या दृष्टीतून आक्षेप घेताना आपल्याला पुढील दोन पैकी किमान एक तरी गोष्ट सिद्ध केली पाहिजे. पहिली गोष्ट ही की, या हिंदुराष्ट्राची राज्यघटना, कायदेकानू व शासनाचे धोरण हिंदुधर्मावर आधारलेले आहे, हे सिद्ध करावे लागेल. दुसरी गोष्ट ही की, धर्माच्या आधारावर भारतीय व्यक्तींच्या अधिकार व हक्कांमध्ये या हिंदुराष्ट्रात भेदभाव

केला जाणार आहे, हे सिद्ध करावे लागेल. या दोन्हीही गोष्टी कुणालाही सिद्ध करता येणाऱ्या नाहीत; कुणीही अद्याप सिद्ध करुन दिलेल्या नाहीत. अतर हिंदु-राष्ट्रवादी ज्या हिंदुराष्ट्राची अपेक्षा करतात तेच सावरकरांचे हिंदुराष्ट्र आहे, असे गृहीत धरुन विरोधकांनी सावरकरांवर टीका केलेली दिसेल. सावरकरांवर या दृष्टीने करता येणारा प्रामाणिक व सत्यास धरुन होणारा आरोप असा असू शकतो की, त्यांनी 'भारतीय' या सेक्युलर नावाचा वापर न धरता 'हिंदूदर्शक' शब्दांचा आग्रह का धरला ? सारा आशय भारतीयत्वाचा, पण तो मांडण्याची भाषा हिंदुत्वाची व आवाहान फक्त हिंदू लोकांना, अशी ही पद्धत त्यांनी का वापरावी ? आरोप त्यांच्या भाषेवर करावा, पण त्या भाषेच्या आत असलेला आशय मात्र समजून घेण्यास आपण आपले मन मोकळे केले पाहिजे, असे आम्हास वाटते.

प्रत्यक्ष आचरण

धर्मनिरपेक्ष समान हक्काची भूमिका सावरकर कोणत्या राज्यशास्त्रावरील तत्वचिंतनात्मक ग्रंथात मांडत नव्हते, तर प्रत्यक्ष राजकारण करताना पोटतिडकीने सांगत होते. ते जसे हे सांगत होते, तसेच प्रसंग आला तर प्रत्यक्ष आचरून दाखवत होते. मुसलमानांशी सावरकर प्रत्यक्षात कसे वागत होते, याबाबतचे काही पुरावे पाहणे उद्‌बोधक ठरेल.

१९३९ मध्ये लखनौ मधील शिया मुसलमानांनी गोवधबंदी व मशिदीवरून वाद्य वाजविण्यास संमती या हिंदूच्या मागण्या आपण होऊन मान्य केल्या. सावरकरांनी पत्र पाठवून शिया जमातीच्या खऱ्या राष्ट्रीयवृत्तीबद्दल अभिनंदन केले व आभार मानले. ते आपल्या पत्रात पुढे म्हणतात,[१] " ही त्यांची वृत्ती खरोखरच उत्साहजनकच ! उलटपक्षी हिंदुसभा अत्यंत द्वेषातीतपणे आपल्या शिया सहकारी देशभक्तांच्या धार्मिक भावनांना मान देईल. ही त्यांची उदारप्रवृत्तीया महासभेला स्वागतार्ह असून सार्वजनिक मार्गावरुन वाद्ये वाजविणे हा नागरिक स्वातंत्र्यातील अंतर्भूत अधिकार असला तरी केवळ अहिंदूना खिजविण्यासाटी मशिदीपुढे उभे राहून मुद्दाम वाद्यघोष हिंदुसमाज करणार नाही, अशा प्रकारचा ती प्रयत्न करील. या शियापंथियांनी अनुसरलेल्या राष्ट्रीयवृत्तीशी सहकार्य देण्यास हिंदुसभा संपूर्णतः तयार आहे; नव्हे अशा राष्ट्रीय नि न्यायप्रिय बंधूशी सख्यत्व करण्याची तिची तीव्र अिच्छा आहे. अशा रितीने समान एकीची भूमिका स्वीकारण्यास जेव्हा बाकीचे हिंद्वेतर तयार होतील, त्याचवेळी या हिंदुराष्ट्रात हिंदू–अहिंदूची राष्ट्रीय एकी निर्माण होईल " हिंदु–मुस्लीम एकी सावरकरांनाही हवीच होती; अडचण फक्त मुसलमानांना या एकीची गरज नव्हती, ही होती. सहकारी देशभक्त म्हणून शियांना ते गौरवित आहेत, हे लक्षात घेतले पाहिजे.

एकराष्ट्र म्हणूनच

या शियांनी हिंदुसभेचे सदस्य होण्याची अिच्छा प्रकट केली होती, त्याबद्दल सावरकर आपल्या पत्रात लिहितात,[१] "यापेक्षाही आभाराई गोष्ट म्हणजे लखनौतील काही शियापंथियानी हिंदुसभेचे प्रत्यक्ष सभासद होवून तद्वारा आपला बंधुभाव प्रकटविण्याची मनीषा दाखविली आहे. तथापि हिंदुमहासभेच्या घटनेप्रमाणे त्यात फक्त ज्याची पितृभू व धर्मभू हिंदुस्थान आहे, अशानाच म्हणजे हिंदूनाच प्रवेश मिळू शकतो.... तरी यातून उत्तम मार्ग म्हणजे शियापंथियांनी व हिंदुमहासभेने आपापली स्वतंत्र संघटना, सोयीच्या दृष्टीने निर्माण करुन त्यांनी शक्य त्या मतैक्याच्या ठिकाणी एकत्र येवून कार्य करावे. एक राष्ट्रीयत्व व वास्तव्याचा एक देश या भूमिकेवरून असे करणे हितावहच आहे." सावरकर न्यायप्रिय मुसलमानांशी कसे वागत होते याचा हा एक पुरावा आहे. तुमचे आमचे राष्ट्रीयत्व एकच आहे, ही गोष्ट ते स्पष्टपणे मान्य करत आहेत. सावरकर मुसलमानांना राष्ट्रीयत्व द्यायला तयार नव्हते, हा शोध डॉ. भालेरावांनी कुठून लावला कुणास ठावूक! तुम्हीही तुमची अशीच संघटना उभारा व एकराष्ट्र म्हणून आमच्या हिंदुसभेबरोबर कार्य करा, हा त्यांचा उपदेश त्यांच्या बुद्धिवादी निःपक्षपातीपणाचा पुरावाच आहे. प्रतिस्पर्ध्यानेही आपल्या एवढेच समर्थ बनावे, हीही समता सावरकरांचा बुद्धिवाद मानत होता, हे लक्षात घेतले पाहिजे.

निजामाशी संबंध

१९३८–३९ मध्ये हिंदुमहासभेनी हिंदूच्या न्याय्य मागण्यासाठी निजामाविरूद्ध आंदोलन उभारले. बहुसंख्य हिंदूच्या बाजूने मुसलमान राजा असलेल्या शासनाविरूद्ध हे आंदोलन होते. सावरकरांच्या मागण्याच एवढ्या न्याय्य व राष्ट्रीय होत्या की, निजामाचे पंतप्रधान सर अकबर अली यांनी पत्र पाठवून सावरकरांना कळविले की, "आपण आपल्या पत्रात हिंदुमहासभेचा उद्देश निजाम सरकार, त्यांचे संस्थान किंवा अेखादी जात याविरुद्ध नाही, असे लिहिले आहे. त्यातील तत्वाची मी तारीफ करतो. तसेच सरकारी नोकरीत जातिपंथाचा विचार न करता लायकीचा कसा लावावा हे आपले धोरणही मला योग्य वाटते." सावरकरांच्या धर्मनिरपेक्ष धोरणाची मुस्लीम राजाकडून मिळालेली ही पावतीच आहे. आपल्या पत्रात सावरकर म्हणाले होते की,[२] "आमच्या चळवळीचा उद्देश मुसलमान जमात किंवा निजाम यांना भयंकर धोका द्यावा, असा नाही. तर मागणी एवढीच आहे की, आपल्या राज्यात हिंदु नि मुसलमान असा कोणताही भेदभाव न दाखविता दोघांनाही समान व्यावहारिक स्वातंत्र्य असावे." सावरकर मुसलमानांबरोबर कोणते संबंध ठेवू पाहत होते, याचा हा प्रत्यक्ष पुरावा आहे.

काँग्रेसला तीन अटी

१९४२ च्या काँग्रेसच्या स्वातंत्र्यलढ्याला सावरकरांनी पाठिंबा दिला नाही,

म्हणून टीका केली जाते. हे आंदोलन 'छोडो भारत नसून तोडो भारत' आहे, असा सावरकरांचा आरोप होता. या लढ्याला सहकार्य करण्यासाठी सावरकरांनी तीन अटी पुढे ठेवल्या. (१) 'ब्रिटीशानी हिंदुस्थान सोडावा पण त्यांचे सैन्य मात्र येथे ठेवावे' या काँग्रेसच्या मागणीचा अर्थ काँग्रेसने स्पष्ट करावा. (२) ब्रिटीश व काँग्रेस यांच्यात जर तडजोड झाली तर हिंदुस्थानच्या अखंडत्वाला बाध येणार नाही. असे वचन काँग्रेसने द्यावे. (३) हिंदुस्थानच्या राज्यघटनेत मुसलमानांना मुसलमान म्हणून अधिक अधिकार देण्यात येवू नयेत. या तीन अटी जर मान्य झाल्या तर मागील सारे विसरुन हिंदुसभा काँग्रेसबरोबर लढ्यात उतरेल, असे सावरकरांनी जाहीर केले[३] या अटी काँग्रेसला मान्य झाल्या नाहीत. या अटीत काय जातीय व अराष्ट्रीय आहे ? यानंतर दोनच दिवसानी न. वि. गाडगीळ म्हणाले की,[४] " १५० वर्ष जे आपल्यावर राज्य करीत आहेत त्यांना काही अटी न घालता त्यांच्याशी तुम्ही बिनशर्त सहकार्य करता आणि आम्ही स्वातंत्र्याची चळवळ करायला निघालो असता आम्हाला अटी घालता, याचा अर्थ मला समजत नाही." क्रिप्स योजनेच्या पार्श्वभूमीवर हे आंदोलन होत होते. काँग्रेसचा या बाबतीतील ठराव तयार होता काँग्रेसने सावरकरांच्या अटी मान्य करायला काय हरकत होती, हे मात्र कुणीही स्पष्ट करुन सांगत नाही. जणू सावरकरांना हिंदुराज्य हवे होते, म्हणून त्यांनी या लढ्याला पाठिंबा दिला नाही, असा विपरित आरोप करण्यात विरोधकांनी धन्यता मानली.

व्हाइसरॉयशी चर्चा

१९३९ साली सावरकरांची व्हाइसरॉय लिनलिथगो यांच्याशी दिल्लीत भेट झाली. भेटीत चर्चा काय झाली याची उलटसुलट मते व्यक्त होवू लागली. बैठकीचा वृत्तांत गुप्त ठेवावा असा संकेत होता. तथापि या बैठकीत व्हाइसरॉयकडे सावरकरांनी ज्या मागण्या केल्या त्या त्यांनी जाहीर केल्या. त्यातील मुसलमान-विषयक मागण्या अशा होत्या :[५] " (४) अशा प्रकारची घटना ताबडतोब सुरु व्हावी. यासाठी जात, धर्म, वर्ग वा पक्ष लक्षात न घेता अेका मनुष्यास अेक मत या लोकशाही तत्वाच्या पद्धतीवर प्रतिनिधि नियुक्त करावेत, पण ही पद्धत सोईची न वाटल्यास, दुसरा उपाय म्हणजे मुसलमान नि हिंदू यांचे मतदारसघ निराळे असावेत आणि लोकसंख्येच्या प्रमाणात त्यांना प्रतिनिधित्व मिळावे... हिंदूना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व मिळालेच पाहिजे. ते कमी सहन करणार नाहीत, आणि ते अधिक मागत नाहीत. विशिष्ट कालपर्यंत अस्पृश्य समाजाला मात्र अधिक प्रतिनिधित्व किंवा असेच काही विशेष संरक्षण मिळावे. (५) अल्पसंख्य आणि बहुसंख्य समाजातील सर्व नागरिक दुसऱ्याच्या अधिकाराच्या आड येणार नाहीत व सार्वजनिक नीति नि शांततेला पोषक असे भाषा, संस्कृति नि धर्म याचे पूर्णपणे स्वातंत्र्य असल्याची निश्चिती देण्यात यावी."

सावरकर अिंग्रजाबरोबर अशा या धर्मनिरपेक्ष व विशुद्ध राष्ट्राच्याचे वाटाघाटी पडद्याआड करीत होते. जे जाहीर भाषणात तेच पडद्याआड ! हेच सावरकरांचे हिंदुराष्ट्र आहे ! !

निवडणुकीत प्रचार

१९४५ ला निवडणुकीत हिंदुमहासभेच्या उमेदवारांचा ते प्रचार करत होते. प्रचारात ते काँग्रेसचा जाहिरनामा कसा अराष्ट्रीय आहे व आमचाच कसा धर्मनिरपेक्ष व राष्ट्रीय आहे हे ते याच भूमिकेतून लोकांना पटवून देत. याच कारणासाठी आम्हाला मत द्या म्हणून ते आवाहान करीत. श्री ढमढेरे यांच्या प्रचारासाठी काढलेल्या एका पत्रकात सावरकर म्हणतात,[६] "The whole programme of the Hindu Mahasabha is so genuinely **Indian National**, so democratic based on principle of 'One man one vote' whether it be a Hindu, or a Parsee or a Muslim or a Jew and equal treatment to all before the law as citizen of one centralised Indian state." सावरकर हे असे Indian National असलेले Indian state उभा करण्याच्या प्रयत्नात होते, हे आपण समजून घेणार नाही काय ? ते पुढे म्हणतात, "First of all it recognises no majority and no minority It visualises all as Indian citizens of an Indian state bearing egual status. But if that high ideal proves too impracticable, then the only compromise that the Hindu impracticable Mahasabha will accept is the principle of population proportion." सावरकरांच्या हिंदुराष्ट्राचा हा प्रचार आहे, हे समजून घेतले पाहिजे.

सावरकर पुढे म्हणतात, "On these and such other perfectly democratic, just and national principles does the approved constitution of the Hindu Mahasabha take it's stand" अशी घटना कार्यवाहीत आणण्यासाठीच आमच्या उमेदवाराला मत देण्याचे सावरकर मतदारांना आवाहान करतात. आपल्या उमेदवाराबद्दल ते सांगतात, "..... he asks not an inch more for the Hindus though they are in an overwhelming majority in the land, than what he is willing to concede to any minority in India." यापेक्षा अधिक ती कोणती राष्ट्रीय, धर्मनिरपेक्ष व न्यायाची भूमिका असू शकते, हे सावरकरांना जातीय म्हणून टीका करणाऱ्यांनी स्पष्ट केले पाहिजे. किंवा सावरकर यापेक्षा वेगळी भूमिका कुठे घेतात काय हे तरी त्यांनी दाखवून दिले पाहिजे.

नगरपालिका पहिली पायरी

१९४३ मध्ये कानपूर नगरपालिकेने सावरकरांना मानपत्र दिले. त्या मानपत्राला उत्तर देताना सावरकर म्हणाले, [७] "नगरपालिका ही विधानसभा नि लोकसभा कशा चालवाव्यात याचे शिक्षण देणारी पहिली पायरी आहे. नगरपालिकेत आपण जात, पात, धर्म भेद न मानता आणि स्वार्थी हेतू न ठेवता खरे निस्पृह लोकसेवक म्हणून काम केले पाहिजे." नागपूर नगरपालिकेच्या मानपत्र समारंभाचे वेळेसही सावरकरांनी असेच विचार व्यक्त केले आहेत. ते म्हणाले, [८] " पुष्कळ ठिकाणी नगरपालिकेतून त्यांच्या घटनेतून विभक्त मतदारसंघ पद्धती न ठेवता सयुक्त मतदारसंघ पद्धती ठेवलेली आहे. आणि अशा तऱ्हेच्या नगरपालिका या राष्ट्रीय शिक्षणाच्या शाळा होत. हिंदु, मुसलमान ख्रिश्चन अि. भेद नगरपालिकेच्या ठिकाणी येण्याचे कारण नाही." सावरकर नेहमीच अशी विशुद्ध राष्ट्रीयत्वाची शिकवण देत असलेलेच आपल्याला दिसतील. राष्ट्रीय पातळीवरही ते कोणताच भेदभाव ठेवू नये असे मानत. पण मुसलमानांना वास्तवस्थितीचे भान नसल्यामुळे त्यांच्यासाठी सावरकर राष्ट्रीय पातळीवर कठोर भाषा वापरत, हे समजून घेतले पाहिजे. 'शेख महमदी बेत सोडून... वस्तुस्थिती काय आहे ' हे मुसलमानांनी नीट ओळखावे, असा सल्ला ते देत. [९] ' आपण अल्पसंख्याक आहोत' ही वस्तुस्थिती ' त्यांनी विसरु नये ' याची ते त्यांना जाणीव करुन देत. ही जाणीव करुन देण्याची त्यांची भाषा आपल्याला पसंत नसली तरी, त्या भाषेच्या आत धर्मनिरपेक्ष असे भारतीय राष्ट्रत्व सामावलेले आहे, हे समजून घ्यायला काय हरकत आहे.

सावरकरांना प्रत्यक्ष राज्य कारभार करण्याची संधी मिळालीच नाही. त्यामुळे ते सर्वांशी कसे समभावाने वागत होते, याचे या क्षेत्रातील पुरावे उपलब्ध नाहीत. शेख महमदी बेत आखणाऱ्या मुस्लीम प्रवृत्तीशी व तिला कुरवाळणाऱ्या काँग्रेस नीतीशी लढाई करण्यातच त्यांचा सारा काळ गेलेला आहे. त्यांच्या राजकीय जीवनात त्यांना युद्ध घोषणाच देत राहणे अपरिहार्य झाले होते. समान हक्काच्या तत्वावर प्रत्यक्ष कारभार करण्याची संधी त्यांना कधीच मिळाली नाही. जर ती मिळती तर धर्मनिरपेक्षतेचा एक आदर्श वस्तुपाठ त्यांनी घालून दिला असता, असे आमचे मत आहे. आमच्या या मताला दुजोरा देणारा एक पुरावा आम्ही देवू अिच्छितो.

लीग बरोबर मंत्रिमंडळ

१९४३ मध्ये सिंध, बंगाल व सीमाप्रांतात मुस्लीम लीगबरोबर सयुक्त मंत्रिमंडळ बनविण्याचा प्रश्न निर्माण झाला होता. लीगबरोबर मंत्रिमंडळ बनविण्यास काँग्रेस तयार नव्हती. १९४० मध्येच लीगने पाकिस्तान मागणीचा अधिकृत ठराव केलेला होता. लीग आणि हिंदुसभा यांच्यातील हाडवैर प्रसिद्ध

होते. गमतीची गोष्ट ही की, हिंदुसभा लीगबरोबर वरील प्रांतात मंत्रिमंडळ बनविण्यास तयार होती. यासंबंधी सावरकरांनी १० जून ४३ रोजी एक पत्रक काढले. त्या पत्रकात ते म्हणतात,[१०] "संयुक्त मंत्रिमंडळानी राष्ट्राभिमान राखून व न्याय्यबुद्धीने जर कामे केली, तर त्या योगाने एकोप्याने काम करण्याचे उत्कृष्ट शिक्षण मिळेल; अलगपणा नष्ट करण्याचे उत्कृष्ट शिक्षण मिळेल; अलगपणा नष्ट होईल; धर्म व जातीचे भेद राहिले तरी राष्ट्रीय एकात्मता साधण्याचे ते एक साधन होअील." हिंदु-मुसलमानांचे एकराष्ट्र बनविण्याचा एक प्रयोग म्हणून सावरकर या संयुक्त मंत्रिमंडळाकडे पाहत आहेत, हे लक्षात घेतले पाहिजे. सावरकरांना चिंता कशाची आहे, हे नीट लक्षात घ्या. त्यांना चिंता हिंदु–मुसलमानांचे समान न्यायावर आधारलेले एकात्म भारतीय राज्य कसे उभे करावे त्याचीच आहे!

असे संयुक्त मंत्रिमंडळ यशस्वी करण्यासाठी ते काही मार्गदर्शक तत्वे सांगतात. पहिले तत्व हे की, त्या संयुक्त मित्रमंडळाला पाकिस्तानच्या किंवा स्वयंनिर्णयाच्या बाजूने निर्णय घेण्याला हिंदुमंत्र्याने जाहीर विरोध केला पाहिजे. दुसरे तत्व हे की, केवळ मुसलमान हा मुख्यमंत्री आहे एवढ्याखातर त्या मंत्रिमंडळाला मुस्लीम मंत्रिमंडळ म्हणणे चूक आहे. तिसरे तत्व हे की, जेथे हिंदू बहुसंख्या आहे अशा प्रांतात मुसलमानांना किंवा मुस्लीम लीगला मंत्रिमंडळात येण्यासाठी आमंत्रित केले जावे. लोकसंख्येच्या प्रमाणात त्यांचे मत्री घेतले जावेत; पण हिंदू हाच मुख्यमंत्री असावा. लीगबरोबर मंत्रिमंडळ बनवावे का नाही हा मुद्दा आज आपण सोडून देवू. हिंदु-मुस्लीम संबंधाकडे सावरकर कोणत्या भूमिकेतून पाहतात, हा प्रश्न आम्हाला येथे मुख्य वाटतो. मुसलमान हेही या भारताचे हिंदुइतकेच सर्वच दृष्टीने समान हक्कदार आहेत, हीच भूमिका सावरकर प्रत्यक्ष वागतानाही कशी घेतात, हे समजून घेण्यासाठी ही घटना आम्ही समोर ठेवली आहे.

हिंदीराज्याचा छोटा प्रयोग

सिंध प्रांतात हिंदुसभेने लीगबरोबर संयुक्त मंत्रिमंडळ बनविले. या धोरणावर प्रखर टीका झाली. १० जुलै ४३ ला त्यांनी आपल्या धोरणाचे स्पष्टीकरण करणारे दुसरे पत्रक काढले.[११] त्या पत्रकात ते म्हणतात,[११] "याचा पहिला लाभ असा झाला की, माझ्या हिंदु–मुस्लीम ऐक्याच्या 'याल तर तुमच्यासह' या पहिल्या तत्वाप्रमाणे वागण्यास मी तयार आहे, हे सिद्ध झाले. या तत्वानुसार कोणत्याही सहकार्याच्या किंवा संयुक्त मंत्रिमंडळाच्या प्रामाणिक योजनेचे स्वागत करण्यास मी तयार आहे. या तत्वानुसार हिंदु–अहिंदू अशा सर्व हिंदी लोकांच्या हातात हात घालून प्रत्यक्ष राजकारणातही काम करण्यास मी तयार आहे, पण हिंदूचे न्याय हक्क काढून देशभक्त बनावेत यासाठी मुस्लिमांना लाच म्हणून

देण्याची माझी तयारी नाही. संयुक्त मंत्रीमंडळे अशा देशभक्तीने प्रेरित झालेली असतील आणि प्रत्येक नागरिकाला समानतेने वागविण्याच्या तत्वानुसार चालविण्यात येत असतील तर त्यामुळे एकराष्ट्र म्हणून तत्परतेने एकात्म होण्याचे लोकांना शिक्षण मिळू शकेल." हे माझे धोरण काँग्रेसच्या तथाकथित धोरणापेक्षाही अधिक राष्ट्रीय आहे, असे सावरकर अभिमानाने म्हणतात.

संयुक्त मंत्रिमंडळाचा या प्रयोगाप्रमाणेच हिंदीराज्याचा हा मोठा प्रयोग यशस्वी व्हावा हीच सावरकरांना तात्विक व व्यावहारिक चिंता होती. हिंदुहित हे मुस्लीम हितात विलीन करायला ते तयार नाहीत, एवढाच रास्त आरोप आपल्याला त्यांच्यावर ठेवता येईल. मुसलमानांच्या कोणत्याही न्याय हक्काला नाकारण्याचा वा ते हिरावून घेण्याचा साधा विचार सुद्धा त्यांच्या मनाला कधीही शिवला नाही, हे समजून घेतले पाहिजे.

अितर अहिंदू विषयी

सावरकरांची तक्रार फक्त मुसलमानांबद्दल होती. ख्रिस्ती, पारशी, ज्यू आदी अहिंदूबद्दल त्यांची तक्रार नव्हती. या बाकी अहिंदूचा प्रश्न अल्पसंख्याचा प्रश्न आहे; पण मुसलमानांचा प्रश्न अल्पसंख्याचा प्रश्न नाही, अशी त्यांची भूमिका होती. कर्णावतीच्या अध्यक्षीय भाषणात ते म्हणाले, [१२] "हिंदुस्थानातील अितर अल्पसंख्याकांच्या संबंधात हिंदीराष्ट्राच्या दृढीकरणाला फारशी अडचण येवू शकत नाही." पारशी, ख्रिस्ती व ज्यू हे धर्मपिसाट वा माथेफिरु नसून देशभक्त व राजकीय कर्तव्यबुद्धी जाणणारे आहेत, असे ते त्यांना शिफारसपत्र पत्र देतात. "आमचे हे सर्व अल्पसंख्यांक देशबांधव हिंदीराज्यामध्ये प्रामाणिक नि देशाभिमानी नागरिक म्हणून वागतील या विषयी निश्चिती आहे" असे ते म्हणतात.[१२] अशाच प्रकारची मते त्यांनी नागपूरच्या अध्यक्षीय भाषणातही मांडलेली आहेत.[१३]

यहुदी लोकांनी मॉंटेग्यू चेम्सफोर्ड सुधारणेच्या वेळी त्यांना स्वतंत्र प्रतिनिधित्वाबद्दल विचारण्यात आले तेव्हा त्यांनी असे प्रतिनिधित्व नको असे उत्तर दिले. हिंदुसमाजावर आमचा विश्वास आहे व हजारो वर्षापासून आम्ही त्यांच्याबरोबर राहतो आहोत, तरीपण आमच्या हितसंबंधाला काहीही धक्का बसला नाही, असे स्पष्टीकरण यहुदींच्या वतीने देण्यात आले. 'हिंदुवरील जातीय संकट' या लेखामध्ये सावरकरांनी या गोष्टीचा अभिमानाने उल्लेख केला आहे.[१४] ख्रिस्ती धर्मियांच्या अत्याचारामुळे व छळामुळे आपल्या देशाबाहेर पडून या लोकांनी हिंदुस्थानचा आश्रय घेतला. मुसलमानांच्या पाशवी अत्याचाराच्या तावडीतून पर्शियातून निसटून आलेले पारशी यांनी हिंदुस्थानचा आश्रय घेतला. हिंदुलोकांनी यांना कधीही त्रास दिला नाही, हे सूर्यप्रकाशाअितके स्पष्ट आहे, असे सावरकर अभिमानाने म्हणतात.[१४] हे लोक हिंदूबद्दल विश्वास बाळगतात याचा सावरकरांना सार्थ अभिमान वाटतो. त्यांची तक्रार फक्त मुसलमानांबद्दलच आहे.

ख्रिश्चनांच्या सभेत सावरकरांना भाषणासाठी बोलावले जात असे. १९४१ मध्ये मुंबअी येथील एका ख्रिस्ती सभेत भाषण करतांना सावरकर म्हणाले, [१५] "ख्रिश्चनांनी स्वतःला अल्पसंख्य समजून अितर अल्पसंख्याकाशी अेकजूट करू नये. त्यांनी बहुजन समाजाशी समरस व्हावे." १९४० मध्ये सावरकर त्रावणकोर येथे मुदरेला गेले. त्रावणकोरच्या ख्रिस्ती लोकांची संख्या त्यावेळेस ४० टक्के होती. तेथील ख्रिश्चनांनी सावरकरांचा सत्कार केला. त्रावणकोरचे दिवाण हिंदुत्वनिष्ठ होते. त्यांच्याबद्दल ख्रिश्चनांनी सावरकरांजवळ भीती व्यक्त केली. तेव्हा सावरकर त्यांना म्हणाले, [१६] "तुम्ही काय बोलता ? तुम्ही काय जेते म्हणून बाहेरुन येथे आलात ? नाही. तुम्ही सिरीयन ख्रिश्चन. तेथील लोकांनी तुमच्या पूर्वजांना मारण्यास लुटण्यास प्रारंभ झाला तेव्हा ते येथे आले. शरणार्थी म्हणून आले. येथील महाराजांनी उदारपणे त्यांना आश्रय दिला. प्रार्थनेसाठी चर्च बांधून दिले. ग्रामपंचायतीत स्थान दिले. तसे ताम्रपट दिले. अितके वर्ष त्यांनी तुम्हाला असा आसरा दिला, ते काय आता तुम्हाला विनाकारण हाकलतील ?" येथे सुद्धा त्यांच्या बोलण्याचा सारा संदर्भ मुसलमानांच्या प्रवृत्तीचाच आहे, हे उघड दिसते.

१९३८ मध्ये मुंबअीला दामोदर ठाकरसी हॉलमध्ये सत्कार प्रसंगी सावरकर अगदी स्पष्टपणे म्हणाले [१७] "हा अल्पसंख्याकांचा प्रश्न आहे असे म्हणण्यात येते, परंतु ही चूक आहे. प्रश्न फक्त मुसलमानांचा आहे. पारशी, ख्रिश्चन जाति आमच्या बरोबरच आहेत." गैरसमज होवू नये म्हणून सावरकर सातत्याने या गोष्टीचा खुलासा करीत आले आहेत. पारशी लोकांबद्दल तर त्यांनी किती वेळेस चांगले उद्‌गार काढले असतील याची गणतीच नाही.

ख्रिस्ती लोक धर्मांतरे करीत व त्यासाठी ते भल्याबुऱ्या मार्गांचा अवलंब करीत. सावरकरांचा मात्र या गोष्टीला कडवा विरोध राहिला. तेवढ्यापुरती त्यांनी ख्रिस्ती लोकावर टीका केलेली असेल. 'विचारपूर्वक होणाऱ्या धर्मांतराचा प्रश्न स्वतंत्र आहे' ही गोष्ट त्यांनी नागपूरच्या अध्यक्षीय भाषणातच स्पष्ट केलेली आहे. शांत बुद्धिवादाने धर्मांतराचा व त्याच मार्गाने शुद्धीचा मार्ग त्यांना मान्य आहे. फार मोठ्या प्रमाणावर धर्मांतर झाल्यास त्या भागातील अहिंदू स्वतंत्र राष्ट्र मागतील अशी त्यांना भीती होती. ख्रिश्चनांबाबतीत ही भीती त्यांनी स्वातंत्र्योत्तर काळात व्यक्त केलेली आहे. 'धर्मांतर हेच राष्ट्रांतर' हा सिद्धांत त्यांनी यासाठी मांडला. या धर्मांतराकडे सावधगिरीने पाहण्याचा ते अिषारा देतात. तथापि त्यांचा सारा राग व विरोध मुसलमानांविषयीच आहे. अितर अहिंदूसंबंधी ते म्हणून फारशी तक्रार करत नाहीत. त्यांचे हिंदुराष्ट्र हे यांच्या विरोधासाठी निर्माण झालेले नाही, हे लक्षात घेतले पाहिजे.

× × × ×

आगरकरांचा बुद्धिवाद

आगरकर हे बुद्धिवादाचे जनक मानले जातात. त्यांचा बुद्धिवाद विशुद्ध नि निर्भेळ आहे, असे आपण मानतो. त्यांची हिंदुधर्म, हिंदुजाती व हिंदुराष्ट्रासंबंधी कोणती भूमिका होती, याचा अभ्यास बुद्धिवादाच्या दृष्टीनेही उद्‌बोधक ठरणारा आहे, असे आम्हास वाटते. हा अभ्यास केल्यानंतर वरील विषयासंबंधी आगरकरांची भूमिका सावरकरांपेक्षा मूलतः वेगळी नव्हती, अशा निष्कर्षाला आपल्याला यावे लागेल. या दृष्टीने आगरकरांची याविषयीची भूमिका आपण थोडक्यात समजून घेवू.

सावरकर ज्याला हिंदुजाती म्हणतात त्यालाच आगरकर आर्यवंश म्हणतात. या आर्यजातीचा, आर्यवंशाचा व आर्यलोकांचा आगरकरांना अभिमान वाटतो. त्यांचा हा अभिमान सावरकरांपेक्षा कमी नाही. ही जात वा वंश टिकला पाहिजे, वर्धिष्णू झाला पाहिजे, बलवान झाला पाहिजे असे आगरकरांनाही वाटते. आर्य लोकांचेही एक राष्ट्र आहे; ते राष्ट्र अतिप्राचीन आहे; अनेक संकटाला तोंड देत ते अद्यापही जिवंत आहे, याचा आगरकरांना अभिमान वाटतो. ही जात, हे राष्ट्र टिकले पाहिजे, बलवान झाले पाहिजे, याची आगरकरांना सावरकरांएवढीच चिंता वाटत असते.

सुधारकाचा हेतू

'सुधारक काढण्याचा हेतु' या लेखात आगरकरांची हिंदुहिताची दृष्टी स्पष्टपणे लक्षात येते. आगरकर म्हणतात,[१] "वैदिक काळापासून आज तारखेपर्यंत आम्हांस जितकी शतके मोजता येणार, तितकी बहुशः दुसऱ्या कोणत्याही देशास मोजता येणार नाहीत." हा जातीच्या व राष्ट्राच्या प्राचीनत्वाचा अभिमान आहे. जगातील बाकी जुनी राष्ट्रे नामशेष झाली, पण काळाच्या जबडयातून हिंदुस्थात व चीन हे दोनच देश वाचले, याचाही त्यांना अभिमान आहे. आर्यवंशाची जी शाखा भारतात आली, तिच्यापासून जे झाड येथे लावले, तेच आजमितीपर्यंत अस्तित्वात आहे, असे म्हणावयास हरकत नाही.' असे आर्यवंशाच्या प्राचीनत्वाविषयी ते अभिमानाने बोलतात. हे आर्यवंशाचे झाड परकियांच्या आक्रमणातही कसे टिकून राहिले याचे वर्णन करतात ते म्हणतात[२] "ग्रीक, रोमन, सिरीयन, तार्तर, मोंगल, अफगाण वगैरे लोकांच्या ज्या वावटळी त्यावर आल्या, त्यामुळे त्याला बराच त्रास झाला. कधी त्यांच्या काही फांद्या मोडून पडल्या; कधी ते मुळातून उपटून पडत आहे की काय असे वाटले; पण कर्मधर्मसंयोगाने युरोपातील ग्रीक व रोमन शाखावर नि इकडील इराणी शाखेवर जो प्रसंग गुदरला तो या भारतीय आर्यशाखेवर गुदरला नाही." सावरकरांच्या 'हिंदुत्व'

ग्रंथात शोभावा असा हा विचार आहे. हे झाड तें तोडून टाकायला सांगत नाहींत, तर आधुनिक विचाराचे खतपाणी देवून ते पुन्हा कसे वाढेल, बहरेल, फुलेल, फळेल याची त्यांना चिंता आहे. हजारो वर्षे खोलवर मुळचा असलेले व भयानक आपत्तीला तोंड देत आलेले हे झाड पुढेही टिकेलच याचा त्यांना विश्वास आहे. या झाडाची सर्वतोपरी सेवा करणे हाच त्यांचा 'सुधारक काढण्याचा हेतु' आहे.

आगरकर पुढे म्हणतात,[२] "याला असेच उभे ठेवण्यास व त्यापासून नवीन शाखाचा उद्भव होवून त्यास फिरून नवीनावस्था आणण्यास एकच उपाय आहे. तो कोणता म्हणाल, तर त्याची खूप खच्ची करून त्यास अर्वाचीन कल्पनांचे भरपूर पाणी द्यावयाचे ! असे केले तरच त्यांचे पूर्वस्वरूप पूर्ण न नष्ट होता, त्यापासून नूतन शाखावृत वृक्ष अस्तित्वात येईल; पण तसे न केले तर त्यावर प्रस्तुतकाली चोहोकडून जे तीव्र आघात होत आहेत, त्याखाली ते अगदी जेर होवून अखेरीस जमिनीवर उन्मलून पडेल." बुद्धिवाद कशासाठी पाहिजे याचा हेतू आगरकर येथे सांगत आहेत. या आर्यजातीला आधुनिक, वर्धिष्णू व बलशाली बनविण्यासाठीच आगरकरांनाही बुद्धिवाद हवा आहे, हे यावरून स्पष्ट होते.

आर्यत्व न सोडता

हिंदू हे पुरातन जातीच नव्हे तर प्राचीन असे राष्ट्रही आहे, हे आगरकर अभिमानाने सांगतात. "तेव्हापासून अिंग्रजी राज्य होअीपर्यंत ते कसे तरी राष्ट्रत्व सांभाळून राहिले"[१] असे ते म्हणतात. याचा अर्थ, हिंदू हे राष्ट्र आहेत असाच होतो. जे राष्ट्रत्व हिंदुलोक सांभाळून होते ते आर्यत्वच होय, असे त्यांना वाटते. आधुनिक होताना नि सुधारणा करतानासुद्धा हे आर्यत्व हिंदुलोकांनी सोडता कामा नये, अशी त्यांची चेतावणी आहे. ते म्हणतात, [२] "मूळ प्रकृति म्हणजे भारतीय आर्यत्व न सोडता या पाश्चिमात्य नवीन शिक्षणाचा... आम्ही योग्य रितीने अंगिकार करत गेलो, तरच आमचा निभाव लागणार आहे." आगरकरांचे हे आर्यत्व म्हणजे सावरकरांचे हिंदुत्व होय, हे स्पष्ट आहे.

'आम्ही सारे हिंदु एकाच जातीच्या हाडामासाचे' आहोत असे आगरकरांनाही वाटते.[३] हातपाय न हलविल्यास 'उत्तरोत्तर आपली स्थिति अत्यंत शोचनीय होवून अखेरीस पर्शियन, ग्रीक व रोमन लोकांप्रमाणे भारतीयास नामशेष व्हावे लागेल, हे सर्वांनी ध्यानात ठेवले पाहिजे' [४] असा अिषारा त्यांनी दिलेला आहे. हे भारतीय लोक म्हणजे सावरकरांच्या व्याख्येतील हिंदूच होत, हे उघड आहे. हिंदूनी हिंदू म्हणून म्हणजे हिंदुजाती म्हणून, हिंदुराष्ट्र म्हणून जिवंत राहावे, अशी आगरकरांची अिच्छा होती, हे समजून घेतले पाहिजे.

धर्मांतराला विरोध

हिंदुधर्मावर आगरकरांनी कितीही कठोर टीका केलेली असो, हिंदुधर्म

सोडून अितर धर्माचा स्वीकार करणे त्यांच्या बुद्धिवादाला मान्य नव्हते. धर्मांतर केल्याने पारलौकिक सुखाचा मार्ग बदलतो व अनेकांपैकी कोणत्याही एका मार्गाचा स्वीकार करण्याचे प्रत्येकाला स्वातंत्र्य आहे, यादृष्टीने कोणत्याही बुद्धिवाद्याचा धर्मांतराला आक्षेप नसतो. पण धर्मान्तर झाल्याने एवढेच घडत नसते. वैयक्तिक पारलौकिक भागाची आपरकर व सावरकर या दोघानाही चिंता नाही, पण धर्माचा दुसरा बुद्धिगम्य असा एक भाग असतो की, ज्याचा संबंध समाजाशी व राष्ट्राशी असतो. आगरकर–सावरकरांची धर्मात श्रद्धा नव्हती असे आम्ही म्हणतो, तेव्हा धर्माच्या श्रद्धेवर आधारलेल्या भागावर त्यांचा विश्वास नव्हता असे आम्हाला म्हणायचे असते. मात्र धर्म ही बाब त्यांनी विचाराला घेतली होती असे आम्ही म्हणतो, तेव्हा धर्माचा हा समाजनिष्ठ व राजनिष्ठ बुद्धिगम्य भाग त्यांनी गंभीरपणे एक वास्तव म्हणून मान्य केला होता, असे आम्हाला म्हणायचे असते.

स्वधर्मे निधनं श्रेयः

गांधीजी व सावरकर यांची रत्नागिरीला १९२६ मध्ये भेट झालेली होती. यावेळेस दोघात धर्मांविषयी याच वरील मुद्दयावर चर्चा झालेली आहे. शुद्धी करून घ्यावी की नाही, हा दोघातील मतभेदाचा मुद्दा आहे. धर्मात श्रद्धा असणारे गांधीजी शुद्धीला विरोध करतात; धर्मात श्रद्धा नसणारे सावरकर शुद्धीचा पुरस्कार करतात, हे मोठे गमतीचे चित्र आपल्यासमोर आहे. "हिंदुधर्म मला प्रिय आहे म्हणून मी हिंदु राहावे म्हणजे झाले. मी दुसऱ्यास जावून 'तू हिंदु हो' म्हणून सांगत सुटणे मला कसलेच वाटते." ही गांधीजींची भूमिका होती. [५] सावरकरांचे म्हणणे घडले की, जर एखाद्याला आपलाच धर्म सत्य आहे असे वाटत असेल तर "त्यास ते सत्य प्रचार करण्याचा, अर्थात्‌च न्याय मार्गाने आणि केवळ शांत बुद्धिवादाने प्रसृत करण्याचा अधिकार असलाच पाहिजे." [६] सावरकर यापुढे जावून म्हणतात, "वाटेल त्याने वाटेल तो साधनमार्ग स्वीकारावा. 'न्याय मार्गाने' व 'शांत बुद्धिवादाने' होणाऱ्या धर्मांतराला सावरकरांचा विरोध नाही. याच मार्गाने शुद्धीही करून घेण्याचा हक्क असला पाहिजे अशी भूमिका ते मांडतात. 'स्वधर्मे निधनं श्रेयः' या तत्वाचा गांधीजी पुरस्कार करतात. या तत्वाचा खरा अर्थ 'वाटेल त्याने वाटेल तो' धर्म स्वीकाराचा असा सावरकर काढतात.

धर्माचा बुद्धिगम्य भाग

सावरकर गांधीजींना म्हणतात, "माझी धर्ममते मी केवळ बुद्धिगम्य सिद्धांतावर अुभारली असून, ती अितकी भावनानिरपेक्ष आहेत की तीं अैकून आपणही चमकून उठाल." माझी धर्ममते पूर्णपणे बुद्धिवादावरच आधारलेली आहेत, हेच सावरकरांना येथे सांगायचे आहे. माझी धर्मात कसलीही श्रद्धा नाही

हेही त्यांना येथे सुचवायचे आहे. आपल्या या चर्चेत ते म्हणून 'ज्याला कुणाला आपलाच धर्म सत्य वाटतो त्याला हा प्रचाराचा अधिकार असला पाहिजे' अशी त्रयस्थाची भाषा वापरतात. "हिंदुधर्माचे तत्वज्ञान बुद्धिगम्यच आहे... (सर्व) संस्कृतीमध्ये आणि बुद्धिगम्य तत्वज्ञानामध्ये हिंदुसंस्कृति आणि तत्वज्ञान हेच श्रेष्ठ आहे, अशी जर कोणाची अव्यभिचारी निष्ठा असली तर ते सत्य प्रचार करण्याचा" त्याला अधिकार असला पाहिजे, असे ते म्हणतात. सावरकरांचे हे विधान काळजीपूर्वक न वाचल्यामुळे काही जणानी [८] या विधानावरून असा निष्कर्ष काढला आहे की, सावरकरांना हिंदुधर्म हा बुद्धिगम्यच आहे असे वाटत होते. सावरकर येथे त्रयस्थाची भूमिका घेवून जर–तरच्या भाषेत बोलत आहेत, हे लक्षात घेतले पाहिजे. नाहीतर बुद्धिवादी माणूस हिंदुधर्माला बुद्धिगम्य कसा मानतो, असा प्रश्न आपल्यासमोर निर्माण होईल.

तेव्हा गांधीजींना धर्माची धर्म म्हणून चिंता वाटते, आपल्या धर्मात आपण राहिले म्हणजे ही चिंता दूर होते, असे त्यांना वाटते. सावरकरांना चिंता धर्माची वाटत नाही. धर्माच्या बुद्धिगम्य भागाचा समाजावर व राष्ट्रावर जो परिणाम होत असतो, त्याची त्यांना चिंता वाटते. आगरकरांनाही याच भागाची चिंता वाटते. यासाठीच हिंदुधर्मांतर करण्यास बुद्धिवादी आगरकर कडवा विरोध करतात.

आगरकरांचा देशाभिमान

'गुलामाचे राष्ट्र' हा त्यांचा लेख यादृष्टीने अभ्यासण्यासारखा आहे. या लेखात ते म्हणतात,[९] "हिंदुधर्मात बरीच व्यंगे आहेत म्हणून यहुदी, महंमदी, ख्रिस्ती किंवा अशाच प्रकारच्या दुसऱ्या एखाद्या धर्माचा अंगिकार करणाऱ्या मनुष्यास विचारी ही संज्ञा सहसा देता येणार नाही." अशा लोकांना आगरकर दुर्धारिक म्हणतात. ते पुढे म्हणतात, "ज्या देशात आपले शेकडो पूर्वज जन्मास आले, वाढले व मरण पावले; ज्या देशातील हजारो पिढ्यानी अनेक गोष्टीत मोठ्या कष्टाने केलेल्या सुधारणाचे फळ आपणास आयतेच प्राप्त झाले–अशा देशातील धर्माचा, रीतिरिवाजांचा व लोकांचा सर्वथैव त्याग करणाऱ्या मनुष्यास खऱ्या सुधारकाची पदवी कधीही शोभणार नाही. स्वभूमीत, स्वलोकात, स्वधर्मात आणि स्वाचारात राहून... सुधारणा करणे यात खरी देशप्रीती, खरी बंधुता, खरा देशाभिमान, खरा शहाणपणा व खरा पुरुषार्थ आहे." सावरकर 'मी हिंदुत्व राखू अिच्छितो' असे जे म्हणतात, त्यामध्ये आणि आगरकरांच्या या वरील विचारामध्ये कोणता फरक आहे, हे सावरकरांच्या हिंदुत्वावर टीका करणाऱ्यांनी दाखवून दिले पाहिजे. धर्मांतर केलेला मनुष्य हिंदुसंस्कृतीला आचवतो, असेच आगरकर येथे म्हणत आहेत, हे समजून घेतले पाहिजे. जे धर्मांतर करतात त्यांच्या 'कपाळी लिहिलेली गुलामगिरी कधीही सुटायची नाही, असे आगरकर ठणकावून सांगतात. भरतखंडात 'अशा प्रकारचे नवीन गुलाम उत्पन्न करण्यापेक्षा

ते आहे त्याप्रकारेच गुलामाचे राष्ट्र राहिले तरी हरकत नाही' असे अगदी सुस्पष्टपणे आगरकरांनी म्हटले आहे. या लेखाचे नाव यासाठीच त्यांनी 'गुलामाचे राष्ट्र' असे दिले आहे.

धर्माच्या बुद्धिगम्य भागाचा आगरकर येथे विचार करत आहेत. धर्माचा जो बुद्धिगम्य भाग मी मानतो, असे सावरकर गांधीजींना म्हणतात, तोच भाग कोणता आहे हेच आगरकर येथे सांगत आहेत. धर्माच्या सामाजिक व राष्ट्रीय संबंधाचा जो भाग आहे, त्याचा हा विचार आहे. याच भूमिकेतून जुलमी तर राहू द्याच, पण स्वेच्छेच्या धर्मांतरासही आगरकरांचा विरोध आहे. 'रमाबाओ ख्रिस्ती झाल्या हे ऐकून आम्हास फार वाईट वाटले' असे आगरकर म्हणतात.[९] 'ख्रिस्तीधर्म सर्वथैव त्याज्य आहे असे कदापि (आम्ही) म्हणणार नाही'[१०] अशी भूमिका असतानाच बुद्धिवादाने ख्रिस्ती होण्यास बुद्धिवादी आगरकरांनी विरोध का करावा ?

रमाबाओंच्या शारदासदनाचा प्रथमतः 'इर्षेने पक्ष' घेणारे आगरकर, त्या सदनात ख्रिस्ती धर्माचा प्रसार होवू लागल्यावर विरोधी बनले. 'शारदासदनात असणाऱ्या मुलींना स्वधर्मत्याग करण्याची बुद्धि न होवू देण्यास्तव रमाबाई' खबरदारी घेत नाहीत, ही गोष्ट आगरकराना चिंतनीय वाटलेली आहे.[११] हिंदूतून धर्मांतर होवू नये याची आगरकर किती काळजी घेतात हे समजून घेतले पाहिजे.

तिघातील फरक

शारदासदनातील "मुलीपैकी कोणी ख्रिस्ती धर्माविषयी अधिक ज्ञान मिळण्याची इच्छा दर्शविल्यास ती जागच्या जागी दाबून टाकण्यास पंडिताबाई तयार नाहीत." अशी आगरकरांची तक्रार आहे.[१३] धर्मनिष्ठ गांधीजी, जातियवादी सावरकर व बुद्धिवादी आगरकर यांच्या या संबंधीच्या विचारातील फरक पाहण्यासारखा आहे. गांधीजीचे म्हणणे असे[१२] "धर्मग्रंथाचा अभ्यास करुन आणि बौद्धिक युक्तिवाद करुन जर ३० कोटी हिंदू मुसलमान झाले तर मला त्याचे काही वाटणार नाही." त्यांचा विरोध फक्त अन्याय मार्गाने धर्मांतर करण्याला आहे. यातील व्यक्तिस्वातंत्र्य व धर्मांतराच्या बुद्धिवादी मार्ग सावरकरांना मान्य आहे; पण सर्वच्या सर्व हिंदू अहिंदू बनताहेत ही कल्पनाच त्यांना सहन होत नाही. मार्ग कोणताही असो, हिंदूचे अहिंदूत धर्मांतर होता कामा नये, अशी आगरकरांची भूमिका आहे. बुद्धिवादाच्या मार्गाने हिंदूचे अहिंदूत धर्मांतर झालेले गांधीजींना मान्य आहे; मात्र त्याच मार्गाने अहिंदूची हिंदूत शुद्धी करणे त्यांना मान्य नाही.[१४] सावरकरांना बुद्धिवादाच्या मार्गाने झालेले धर्मांतर वा शुद्धी दोन्हीही मान्य आहेत. आगरकरांच्या काळात शुद्धीचा प्रश्न निर्माणच झाला नसल्यामुळे याविषयीची त्यांची मते उपलब्ध नाहीत. जर असती तर ती

गांधीजींना अनुकूल असती का सावरकरांना अनुकूल असती, हे कुणालाही ठरविला येईल.

एक पाऊल पुढे

पारलौकिकाच्या दृष्टीने सारे धर्म सारखे असले तरी सामाजिक व राष्ट्रीय दृष्टीने ते सारखे नाहीत, ही आगरकरांची भूमिका आहे. "आमची धर्माविषयीची मते कशीही असली तरी हिंदु स्त्रियांनी किंवा पुरूषांनी कोणत्याही ऐहिक अथवा पारलौकिक लाभासाठी ख्रिस्ती व्हावे ही गोष्ट आम्हास बिलकुल संमत नाही" असे आगरकरांनी स्पष्टपणे म्हटले आहे.[१५] 'स्वधर्मे निधनं श्रेय: पर धर्मो भयावह:' या गीतावचनाचा उल्लेख करून कुणीही हिंदुधर्म सोडू नये असे आगरकर म्हणतात.[१६] या गीता श्लोकाचा सावरकरांनी 'वाटेल त्याने वाटेल तो साधन मार्ग' स्वीकारावा, असा गांधीजींशी बोलताना अर्थ काढला आहे. हा अर्थ नुसता व्यापकच नव्हे तर मूळ गीतेतील अर्थाच्या नेमका उलटा आहे. गीतेतील अर्थ आपला वैदिक धर्म सोडू नये, असा आहे. सावरकरांचा अर्थ प्रत्येकाला मनाला पटल्यास बुद्धिवादाने आपला धर्म सोडण्याचा हक्क आहे, असा आहे. याचा अर्थ आगरकर धर्मांतर विरोधाच्या बाबतीत सावरकरांपेक्षा एक पाऊल पुढे आहेत.

रमाबाईच्या शारदासदनाच्या धर्तीवर 'हिंदु शारदासदन' स्थापन कण्यारची सूचना आगरकरांनी केलेली आहे. 'पुण्यास हिंदु शारदासदन स्थापन झालेले लोकांस दिसले पाहिजे' असे त्यांनी आग्रहाने व तळमळीने म्हटले आहे.[१७] बुद्धिवादी आगरकरांना धर्माधर्मात भेद करण्याचा असा उपद्व्याप करण्याचे काय कारण होते ?

संख्याबळाची चिंता

हिंदूचे संख्याबळ हा राष्ट्राचा फार मोठा जमेचा भाग आहे, व तो कमी होता कामा नये, याबद्दल आगरकर सावरकरांसारखेच विचार मांडतात, हे आपण समजून घेणार नाही काय ? हिंदू अस्पृश्यता पाळतात याचा काय काय परिणाम होतो हे सांगताना आगरकर म्हणतात,[१८] "आमच्या या अतिकर्मठपणाने आमचा अतिशूद्रवर्ग तर आम्ही गमावल्यासारखाच आहे. त्यापैकी बहुतेक लोकांनी यापूर्वीच आम्हास रामराम ठोकला आहे.... तेव्हा ते तर आम्हास परकी बनलेच; परंतु शुद्रवर्गाचीही आम्ही तीच वाट लावणार की काय हाच तो प्रश्न आहे." हिंदुधर्मांतर केलेले भारतीय हे 'परके' होतात, असे आगरकर म्हणतात, हे समजून घेतले पाहिजे. हिंदुधर्म टिकला पाहिजे, हिंदुजाती टिकली पाहिजे, हिंदूचे संख्याबळ टिकले पाहिजे, हिंदूचे सामर्थ्य वाढले पाहिजे,हीच आगरकरांचीही आग्रही तळमळ होती.

परकीय–स्वकीय

अस्पृश्य हे हिंदूना (म्हणजेच आगरकरांच्या भाषेत आम्हाला) मुसलमान व ख्रिश्चनांपेक्षा जवळचे आहेत व जवळचेच राहिले पाहिजेत, ही आपली भूमिका सावरकरांप्रमाणेच आगरकर कधीही लपवून ठेवीत नाहीत. त्या परकियांपेक्षा हे स्वकीय अस्पृश्य अधिक जवळचे असे त्यांना मनातून व प्रकटपणेही वाटते. यासंबंधी ते म्हणतात,[१९] "एका दृष्टीने मुसलमान लोक हिंदूतील कोणत्याही अति नीच वर्णापेक्षा विशेष अस्पृश्य आहेत, असे मानणे भाग आहे. कारण कोणताही हिंदु गोवध करुन त्या मांसावर उपजिविका करीत नाही... त्यांच्याशी आम्ही हरएक प्रकारचा बाह्य व्यवहार करतो... असे असून काही हिंदुजाति आम्हास इतक्या अस्पृश्य वाटाव्या हे नवल नाही काय?" हिंदूची आगरकरांना वाटणारी ही चिंता सावरकरांपेक्षा कोणत्या बाबतीत कमी आहे?

आगरकर पुढे म्हणतात,[२०] "न वदेत् यावनीं भाषां प्राणैःकंठगतैरपि" एवढा ज्या महंमदीयांविषयी आम्हास तिरस्कार होता, त्या गोहत्त्या करणाऱ्या म्लेंच्छांचे व तत्समान युरोपियनांचे, राज्यधिकारामुळे आम्हास काहीच वाटेनासे होवून, ज्यांना वैदिक धर्म शिरसावंद्य, ज्यांचा धर्म व आचार हिंदु, जे अनादी कालापासून हिंदुस्थानचे रहिवासी,... अशा हिंदूचा आम्ही तिरस्कार करतो; त्यांना स्पर्श करण्यास भितो, व त्याहून अनेक कारणांमुळे अस्पर्श्य अशा परकीयास दृढालिंगन देतो, हा केवढा प्रमाद होय!" हे विचार आगरकरांचे आहेत, सावरकरांचे नाहीत, हे लक्षात घेतले पाहिजे. समाजसुधारणेसाठी आगरकर अशा प्रकारे हिंदुत्वाचाच आधार घेतात, जसा सावरकर घेत असत. आगरकर मुसलमानांना परकीय मानतात, तरीही बुद्धिवादी राहू शकतात. सावरकरांनी सुद्धा परकीय हा शब्द स्पष्टपणे कुठे वापरलेला आपल्याला दिसणार नाही. अटीतटीची आव्हाने देतानाच कधी वापरला असेल तर असेल; पण शांतपणे विचार मांडताना त्यांनी तो शब्द वापरलेला दिसणार नाही. हिंदु-अहिंदूमध्ये फरक करण्याच्या दृष्टीनेही आगरकर सावरकरांच्या एक पाऊल पुढे होते, असेच म्हटले पाहिजे.

हिंदूच्या स्वातंत्र्याचा विचार

हिंदूनी आपले वैशिष्ट्य टिकवून सामर्थ्यवान बनावे, असे आगरकरांना वाटते. खरा राष्ट्राभिमान त्यांच्यात उत्पन्न व्हावा, अशी त्यांची तीव्र आकांक्षा होती. अिंग्रज आणि मुसलमान या दोघांनाही विरुद्ध बाजूला घेवून ते हिंदूच्या राष्ट्राभिमानाबद्दल मुक्तपणे चर्चा करतात. या दोघांचे 'आम्ही' गुलाम झालो याचे त्यांना तीव्र दुःख वाटते. "पाऊणशे वर्षांपूर्वी आम्ही राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या शिखरावर होतो, ते स्थान आम्ही मुसलमानांपासून मोठ्या कष्टाने काबीज करुन घेतले होते. आमच्या अंगात राज्यकौशल्य असते तर ते स्थान आम्ही जावू दिले नसते." असे त्यांनी एका लेखाच्या सुरवातीस म्हटले आहे.[२१] आम्हास खऱ्या

देशाभिमानाची कल्पना असती, तर आम्ही मुसलमानास देखील येथे पादशाही स्थापू दिली नसती, असे त्यांना वाटते. 'मुसलमानांच्या पाठीमागून आम्हास इंग्रज न जिंकते, तर त्याचे काका दुसरे कुणीतरी जिंकलेच असते' असे त्यांना वाटते. उद्या इंग्रज गेला तरी 'आम्ही स्वतंत्र' होणार नाही, तर रूस आमच्या छातीवर पाय द्यायला सोडणार नाही, असे त्यांना वाटते. आगरकर येथे फक्त हिंदुपुरतेच बोलत आहेत, हे उघड आहे. बुद्धिवादी आगरकरांनी हिंदुपुरताच विचार का करावा, हा आपल्यासमोरचा एक प्रश्न आहे. आगरकरांच्या काळात मुसलमान 'आम्हावर' राज्य करण्याची शक्यताच नव्हती. जर ती असती तर सावरकरांच्याच भाषेत आगरकरांनी त्यांच्या विरूद्धही स्पष्टपणे लिहिले असते, हे वरील विचारावरुनच स्पष्ट होते.

'परक्या लोकांच्या झुंडीच्या झुंडी आपल्या देशात येवू दिल्या आणि एका जुलमाचे जू निघाले नाही तोच दुसऱ्याच्या जुलमाचे जू आपल्या मानेवर घेतले' असे अत्यंत दुःखाने हिंदुलोकांच्या चुकीबद्दल ते म्हणतात.[२२] या गोष्टीचे कारण 'जेथे शौर्य तेथे अक्कल नाही व जेथे अक्कल तेथे शौर्य नाही अशी आमची' अवस्था झाली होती असे त्यांना वाटते. या अक्कलेचा नि शौर्याचा संयोग झाला तेव्हा मराठा राज्य निर्माण झाले, अस ते अभिमानाने सांगतात. 'हिंदुपदपादशाही' ग्रंथात शोभावे असे हे विचार आगरकरही निःसंकोचपणे व मुक्तपणे मांडत असतात. असे बोलल्याने हिंदु–मुस्लीम एकी बिघडेल याची चिंता आगरकरांना वाटलेली दिसत नाही. आम्ही आमचे स्वराज्य कसे गमविले हे सांगताना आगरकर म्हणतात,[२३] "पण मुसलमानांहून वरिष्ठ शत्रूशी झगडणाचा प्रसंग आल्याबरोबर तेही आपले कष्टार्जित स्वातंत्र्य गमावून बसले... मुसलमानांनी आम्हास पादाक्रांत केले त्याच वेळेस असे सिद्ध झाले की, भरतखंडात राहणाऱ्या आर्यलोकात स्वातंत्र्य रक्षणाचे सामर्थ्य राहिले नाही." आगरकर कुणाच्या स्वातंत्र्याचा विचार करतात, हे नीट लक्षात घेतले पाहिजे. आगरकर म्हणतात, [२३] "स्वातंत्र्य हे सर्वास प्रिय आहे. आमची राजकीय सुधारणा म्हणजे आमच्या नष्ट झालेल्या स्वातंत्र्याच्या पुनः प्राप्तीविषयी प्रयत्न करणे होय." हिंदूचे स्वातंत्र्य मुसलमानांनी व काँग्रेसनी मिळून धोक्यात आणले आहे, हाच सावरकरांचा आरोप होता. या स्वातंत्र्याचा विचार आगरकर करतात तेव्हा ते बुद्धिवादाच्या विरोधी नसते, तर मग तोच विचार सावरकरांनी केला तर ते बुद्धिवादाच्या विरोधी कसे होते, हा प्रश्न आम्ही उपस्थित करु अिच्छितो.

मुसलमानांशीही लढू

आगरकरांच्या काळात हिंदु–मुस्लीम प्रश्न सावरकरांच्या काळाच्या अितका गंभीर बनलेला नव्हता. तो १९०८ च्या अगोदरचा काळ आहे. असे असले तरी मुसलमानांविषयीची त्यांनी अत्यंत परखड शब्दात आपली भूमिका मांडलेली आहे.

मुसलमान हे राष्ट्रसभेविषयी विघ्नसंतोषीपणा करतात असे मत त्यांनी व्यक्त केलेच आहे.[२४] "हिंदूचा द्वेष करुन तुमचा कसा निभाव लागेल ? तुम्ही उभयतांनी सख्ख्या भावाप्रमाणे वागले पाहिजे" असे ते त्यांना समजावतात.[२५] हिंदूच्या वतीने मुसलमानांना आगरकर बजावतात,[२६] "जेव्हा आम्ही हिंदुलोक ब्रिटीश पलटणीची पर्वा न करता ब्रिटीश लोकांच्या हातून राज्य हिसकावून घेण्यास यशस्वी होवू, तेव्हा त्या बरोबर त्यांना शेकू देण्याऱ्या मुसलमान लोकांचाही समाचार आम्हास सहज घेता येणार आहे." आगरकरांचे हे विचार स्पष्टपणेच सावरकरांच्या 'याल तर तुमच्यासह, न याल तर...' या धोरणासारखेच आहेत. धर्मवेडाला उत्तर देण्यासाठी थोडासा धर्माभिमान ठेवावाचा लागतो, असे बुद्धिवादी आगरकरांचे म्हणणे आहे. ते म्हणतात,[२७] "आणि जो पर्यंत दुसऱ्याची डोकी धर्मवेडानी भणभणून गेलेली आहेत, तोपर्यंत त्यांच्याशी संबंध पडणाऱ्या लोकातही धर्माभिमानाचे थोडेसे वारे असले पाहिजे. नाही तर त्यांच्या हातून स्वधर्माचे रक्षण व्हावयाचे नाही." आमचे म्हणणे एवढेच आहे की, आगरकरांचे हे सारे विचार त्यांच्या बुद्धिवादाशी विसंगत नसतील तर हेच विचार मांडणाऱ्या सावरकरांना आपण तोच न्याय का लावू नये ?

सावरकरांच्या गुरूस्थानी

आगरकर हे कसे हिंदुत्ववादीच आहेत, हे सांगण्यासाठी आम्ही ही चर्चा करीत नाही. हिंदुजातीचा, हिंदुधर्माचा वा हिंदुराष्ट्राचा अभिमान बुद्धिवादी धरु शकतो; मुसलमानांच्या धर्मवेडाला उत्तर देण्यासाठी हिंदूनीही उचित धर्माभिमान राखिला पाहिजे, असा उपदेश करू शकतो; धर्मात श्रद्धा नसली तरी धर्माचा आणि राष्ट्राचा संबंध आहे, या वास्तवाची तो जाणीव ठेवू शकतो; हिंदूवर अन्याय होत असेल तर तो हिंदूच्या बाजूने उभा राहू शकतो– हे नीट लक्षात यावे, यासाठी आम्ही आगरकरांच्या विचाराचा येथे उल्लेख केलेला आहे. याही प्रश्नासंबंधी आगरकर हे सावरकरांच्या गुरुस्थानी आहेत, साच निष्कर्षाला आपल्याला यावे लागेल.

सावरकरांना धर्मात श्रद्धा नसली तरी किंवा धर्मावर त्यांना राज्य उभे करायचे नसले तरी, त्यांनी धर्माचा राजकारणासाठी वापर केला असा एक त्यांच्यावर आरोप केला जातो. धर्मात श्रद्धा ठेवणाऱ्यापेक्षा धर्माचा वापर करणारे अधिक वाईट व धोकादायक असतात, या दृष्टीतून हा आरोप केलेला आहे. जिनांनाही धर्मात श्रद्धा नव्हती, पण त्यांनी धर्माचा वापर करून एक भयानक जातीय प्रश्न निर्माण करुन ठेवला. या दृष्टीने जीना व सावरकर दोघेही सारखेच जातियवादी आहेत, असा हा आरोप आहे. आमचा पक्ष व प्रश्न न्यायाचाच आहे; कुणावरही आम्हाला अन्याय करायचा नाही, असे म्हणतच हे जातियवादी धर्माचा वापर करत असतात, असा आक्षेप घेतला जातो.

धर्माचा वापर ?

या आरोपाला आधार देणारा कोणताही पुरावा सावरकरांच्या विचारात आढळत नाही. धर्माचे आवाहान करुन हिंदूना एक करता येत नाही, हे आपल्यालाही माहीत आहे; आणि ते सावरकरांनाही माहीत होते. धर्माचे आवाहान म्हणूनच त्यांनी कधीही केलेले नाही. 'हिंदू'ची व्याख्या करण्याचा व ती धर्ममुक्त ठेवण्याचा त्यांचा प्रयत्न यासाठीच होता. त्यांना आवाहान राष्ट्रीयभावनेचे करायचे होते. प्रादेशिक राष्ट्रीयभावनेचे आवाहान निरुपयोगी होते, कारण ते वास्तव नव्हते. हिंदूकरिता ही प्रादेशिक राष्ट्रीय भावना व सांस्कृतिक राष्ट्रीय भावना एकरुपच होती. भारतात नुसते निर्भेळ हिंदूच असते तर या दोन भावनेतील भेदाचा प्रश्नच निर्माण झाला नसता. मुसलमानांनी भेदाचा हा प्रश्न प्रथम निर्माण केला. स्वतंत्र मुस्लीम राज्य निर्माण करण्यासाठी त्यांनी लढा पुकारला. यातून राष्ट्रीयत्वाच्या भावनेचा प्रश्न निर्माण झाला. या प्रश्नाचा सावरकरांनी गंभीरपणे विचार केला. असा विचार करणे बुद्धिवादाच्या विरोधी आहे काय, हा पहिला प्रश्न आहे. राष्ट्रीयत्वाची सावरकरांनी काही मूलतत्वे मांडली. त्यांची ती मूलतत्वे अवास्तव आहेत काय, बुद्धिवादाच्या विरोधी आहेत काय, हा दुसरा प्रश्न आहे. मुसलमान स्वत:ला एक राष्ट्र म्हणून मानत असतील, तर हिंदू हे राष्ट्र नाहीत काय, असा प्रश्न उपस्थित करणे, बुद्धिवादाच्या विरोधी आहे काय, हा तिसरा प्रश्न आहे.

या प्रश्नाची उत्तरे आपण जर सावरकरांच्या बाजूने देणार असू, तर यात धर्माच्या वापराचा प्रश्नच निर्माण झालेला नव्हता, हेच मत आपल्याला द्यावे लागेल. सावरकरांचा हा मार्ग पसंत नसला तरी त्यांच्या या मार्गात बुद्धिवादाच्या विरोधी काहीही नव्हते; धर्माचा वापर करण्याचा यात प्रश्न नव्हता; मुसलमानांना किंवा कोणत्याही अहिंदूना हिंदूपेक्षा दुय्यम समजण्याचा वा त्यांच्यावर कोणताही अन्याय करण्याचा भाग नव्हता, हे मात्र समजून घ्यायला आपले मन आपण खुले केले पाहिजे, असे आम्हास वाटते.

■■■

समारोप

सावरकरांच्या संपूर्ण विचारांचे दर्शन घडविणे हा आमच्या ग्रंथाचा हेतू नाही. त्याच्या विविध विचारात असलेले बुद्धिवादाचे मध्यवर्ती सूत्र शोधणे व त्या दृष्टीने त्यांच्या विविध विचारांची चिकित्सा करणे हा आमचा मुख्य हेतू आहे. त्यांचे विविध विचार बुद्धिवादाशी किती सुसंगत वा विसंगत आहेत, याची चर्चा आम्ही या ग्रंथात केलेली आहे.

धर्माविषयीची भूमिका हा बुद्धिवादाचा सर्वांत महत्त्वाचा भाग असतो. 'प्रखर बुद्धिवाद' या विभागात सावरकरांची धर्माविषयीची भूमिका आपण पाहिली. धर्माच्या विविध अर्थासह आपण ती समजून घेतली. धर्मग्रंथीय अशा कोणत्याही धर्मात त्यांना श्रद्धा नव्हती. कोणत्याही धर्माचा तत्त्वज्ञानात्मक भाग त्यांना सत्य वाटत नव्हता. त्यांना ते एक गृहीत, एक कल्पित आहे असे वाटते. विज्ञानाने हा भाग सिद्ध केला तर त्याचा समावेश ते विज्ञानधर्मात करतात. त्यांची ही भूमिका प्रखर बुद्धिवादीच आहे.

याच अर्थाने धर्मातील पारलौकिक भागातही त्यांना श्रद्धा नाही. कारण त्या साऱ्या गोष्टी आजच्याकरिता खोट्या आहेत असे त्यांना वाटते. या कल्पित व पारलौकिक सुखासाठी या जन्मी मनुष्याने काहीही प्रयत्न करणे निष्फळ आहे, असे त्यांना वाटते. तथापि लोकांची अशा सिद्ध न होणाऱ्या गोष्टीवर श्रद्धा असतेच या गोष्टीची ते नोंद घेतात. या श्रद्धेला सहसहा न धिक्कारता त्या श्रद्धेचे ते वर्गीकरण करतात. असत्य म्हणून सिद्ध झालेल्या गोष्टीला सत्य मानणे, त्यांना बुद्धिहत्या करणारे व म्हणून निषेधार्ह वाटते. जे अद्याप अज्ञात आहे, त्यावरील श्रद्धेचे हानिकारक व निरुपद्रवी असे ते दोन भाग करतात. हानिकारक भागावर

ते बुद्धिवादाचे प्रहार करतात. निरूपद्रवी श्रद्धेला सामाजिक व मानसिक दृष्टीकोणातून ते सांभाळून घेतात. सामाजिक सुधारणेसाठी विशिष्ट पथ्ये पाळून त्याचा उपयोग करुन घेतात. जसा वैद्य विषाचा कुशलतेने थोडेसे अहित होत असताही बलवान रोग हटविण्यासाठी उपयोग करुन घेतो, तसाच या निरूपद्रवी श्रद्धेचा उपयोग त्याच दृष्टीने व तीच पथ्ये पाळून सुधारकानी सामाजिक सुधारणेसाठी करावा, अशी सावरकरांची भूमिका आहे. ही पथ्ये व विवेक लक्षात घेवून सावरकरांची ही भूमिका समजून घेतली पाहिजे.

सावरकर हे नुसते बुद्धिवादी विचारवंत नाहीत, तर प्रत्यक्ष समाजसुधारक आहेत. सुधारणा करताना लोकशाहीत जी अपरिहार्य तडजोड करावी लागते तेवढीच सावरकर करतात. ती करतानाही आपला बुद्धिवादाचा धागा घट्ट पकडून ठेवतात. भाषा व कार्यक्रम धार्मिक वा पारलौकिक; पण आशय व हेतू मात्र ऐहिक लाभाचा, अशा प्रकारची ही तडजोड आहे. सावरकर निःश्रेयस शब्दाचा त्याग करत नाहीत. शब्द हाच घेवून त्यात आशय मात्र बुद्धिवादाचा भरतात. हिंदुध्वजावर त्यांनी निःश्रेयसाचे प्रतिक म्हणून कुंडलिनी आणली; पण आशयाने मात्र ती पूर्णतः बुद्धिवादी होती. कुंडलिनी ही प्रत्यक्ष, व अनुभवावर आधारलेली विज्ञाननिष्ठ गोष्ट होती. यामुळे भक्तांचेही समाधान झाले, नि सावरकरांचा हेतूही साध्य झाला.

हिंदुध्वजावर त्यांनी आणलेले ॐ हे प्रतिक असेच आहे. ओंम म्हणजे वेद, ओंम म्हणजे प्रणव, ओंम म्हणजे ब्रह्म आदी पारंपारिक श्रध्दता बाजूला सारुन ओंमचा ते बुद्धिवादी अर्थ सांगतात. त्यांच्या मते ॐ हा चित्रलिपीचा प्रकार आहे. उच्चार करतांना ओठ, जीभ व तोंड याचा जसा आकार होईल, त्याच आकाराचे चित्र काढण्याच्या चित्रलिपीच्या प्रयोगाचे ॐ हे आद्य अक्षर आहे, असे ते म्हणतात. ॐ चा उच्चार करतांना तोंडाचा आकार ॐ सारखा होतो. हे ॐ सावरकरांना अक्षराचे बीज वाटते. तो अक्षरलिपीचा, चित्रलिपीचा उगम वाटतो. तो ज्ञानाचा, विद्येचा प्रतिक म्हणून ध्वजावर आलेला आहे. भक्तांचेही समाधान आणि बुद्धिवादाचाही प्रचार या दोन्हीही गोष्टी सावरकर साध्य करतात.

विज्ञाननिष्ठ असा कोणता संदर्भ असल्याशिवाय कोणत्याही गोष्टी सावरकर स्वीकारत नाहीत. स्वस्तिक हिंदूचे परंपरागत प्रतिक, पण सावरकरांना त्यात विज्ञाननिष्ठ आशय भरता येईना. त्यांनी ते प्रतिक ध्वजावर घेतले नाही. "स्वस्तिक जुने आहे, पण ते शास्त्रीय—नैसर्गिक घटनेचे नैसर्गिक चिन्ह नाही. तो एक मनुष्यकृत संकेत आहे. पण कुंडलिनी निसर्गदत्त आणि शास्त्रशुद्ध (Perfectly Scitenfic) संकेत आहे." असे ते म्हणतात.[१] तथापि त्यांच्या भक्तांना सावरकरांचा हा बुद्धिवाद पसंत नव्हता. ध्वजावर स्वस्तिक नको, ही गोष्ट अनुयायांना मान्य झाली नाही. हिंदुमहासभेने सावरकरांचा हा हिंदुध्वज त्यात स्वस्तिकाची भर टाकून स्वीकाराला. बुद्धिवादाची दृष्ट लागू नये म्हणून सावरकरांनाही तो

स्वीकरल्यावाचून अिलाज नव्हता. कारण शेवटी ते पुढारी होते.

धर्मग्रंथावर समाज उभे करण्याचे दिवस गेले, ही त्यांची निःसंदिग्ध व तीव्र प्रचारी आग्रहाची भूमिका होती. प्रत्यक्ष, प्रयोग व अनुभवावर आधारलेल्या विज्ञानधर्माचाच समाजाने पुरस्कार केला पाहिजे असा त्यांचा आग्रह आहे. जे जे आपल्याला हितकारक ते ते आपण स्वीकारावे व अहितकारक ते त्यागावे, मग ते कुठलेही असो, अशी त्यांची भूमिका होती. ही भूमिका लौकिक अर्थाने अधार्मिकाची भूमिका आहे.

धर्माचा जो नीतिभाग आहे तोही सावरकरांना मान्य नाही. त्यांचा नीतिविचार बुद्धीवर आधारलेला आहे. यालाच ते उपयुक्ततावाद म्हणतात. उदात्तमूल्याची पोथीनिष्ठाही त्यांचा बुद्धिवाद मानायला तयार नाही. उदात्तमूल्यानांही ते मनुष्यहिताची कसोटी लावतात, हे त्यांच्या बुद्धिवादाचे खास वैशिष्टच आहे.

अध्यात्म शब्दाचे त्यांना वावडे नाही. पण त्यांना अध्यात्मात श्रद्धा नाही. आत्म्यावर त्यांची श्रद्धा नाही. रासायनिक प्रक्रियेपासून बनलेली ती एक जडवस्तूच असू शकेल, असाही तर्क ते करतात. प्रयोगशाळेत मनुष्याला आत्मा वा जीव बनविता येवू शकेल असे त्यांना वाटते. अध्यात्माच्या तत्वज्ञानात्मक अंगाला ते मानायला तयार नाहीत. अध्यात्माअैवजी उपयुक्ततेची कसोटीच त्यांना चांगली व कमी गोधळात टाकणारी आहे, असे वाटते. अध्यात्माचा व्यावहारिक परिणाम त्यांना शून्य वाटतो. राष्ट्राच्या व्यवहारात अध्यात्माला कवडीची पत नाही, असे ते म्हणतात. असे असले तरी जीवनातील दुःख विसरण्याचे एक साधन, एक युक्ती म्हणून त्यांनी अध्यात्माचा व वेदांताचा अंदमानात उपयोग केलेला आहे. त्यांचा प्रखर बुद्धिवाद या आध्यात्मिक विषयातही तसाच प्रकर्षाने आढळतो.

कोणत्याही धर्मात त्यांना कसलीही श्रद्धा नसली तरी लोकांची श्रद्धा असते, ही वस्तुस्थिती ते मान्य करतात. धर्मात श्रद्धा ठेवण्याचा हक्कही ते मान्य करतात. धर्माच्या अहितकारक भागावर टीका करण्याचा हक्क मात्र हे राखून ठेवतात. जगातील सर्वच धर्म नष्ट झाले तरी त्यांना चिंता वाटत नाही. कारण शेवटी मनुष्याचे हित करणारा बुद्धीवर आधारलेला धर्म राहणारच याची त्यांना खात्री आहे. धर्माच्या नि देवाच्या नावाने जितका मानवसंहार झाला तितका कशानेही झाला नाही, याचे त्यांना दुःख वाटते. माझाच धर्म खरा, तोच ओश्वरोक्त, बाकीचे खोटे ही भावना खुळचट व हानिकारक आहे, असे ते पटवून देतात. जगातील सारेच धर्म मनुष्यकृत व म्हणूनच सारखेच खरे किंवा खोटे असणार, असे त्यांना वाटते. यासाठी आपला धर्म पाळत असताना इतर धर्माविषयी समबुद्धीची आदर भावना ठेवावी, असे त्यांचे आग्रहाचे सांगणे आहे.

जगातील साऱ्या धर्मग्रंथातील सारे ज्ञान अखिल मानवजातीची समाअीक संपत्ती आहे, असे ते मानतात. या पैकी कोणत्याही धर्मग्रंथातील जे आपल्याला हितकारक असेल ते आपण स्वीकारले पाहिजे, असा त्यांचा धर्मातीत

उपदेश आहे. आपल्या धर्मातील वाईट ते त्यागावे; दुसऱ्याच्या धर्मातील हितकारक ते घ्यावे, ही त्यांची बुद्धिवादी भूमिका आहे. या दृष्टीने जगातील साऱ्याच धर्मांचा, त्यांच्या धर्मप्रेषितांचा, त्यांच्या धर्मग्रंथांचा ते सारखाच आदर करतात. माझा वैदिक धर्म श्रेष्ठ व तुझा अिस्लामधर्म कनिष्ठ अशी भूमिका ते कधीही घेत नाहीत. सारेच धर्म त्या त्या परिस्थितीत चांगले होते, आज मात्र त्यांना विज्ञानाच्या कसोटीस उतरले पाहिजे, असे त्यांना वाटते.

मुसलमानांनीही हिंदुप्रमाणेच विज्ञाननिष्ठ बनले पाहिजे अशी त्यांची तळमळ आहे. याबद्दल त्यांनी मुसलमानांना देशबंधू म्हणून जो उपदेश केलेला आहे. तितका उपदेश भारतातील कोणत्याही हिंदू नेत्याने आजवर केलेला नाही. आगरकरसुद्धा त्याला अपवाद नाहीत. मुसलमानांवर टीका करणारे सावरकर आपल्याला माहीत असतात. त्यांनी आधुनिक बनावे म्हणून चिंता बाळगणारे व त्यासंबंधी उपदेश करणारे सावरकर आपल्याला माहीतच नसतात. हिंदुराष्ट्राचा विचार करणारे सावरकर मुसलमानांना समाप्त कसे करावे याचाच विचार करत असतील; त्यांच्या उन्नतीचा व सुधारणेचा विचार कशाला करतील, असा आपला ठोक समज असतो.

'धर्म' म्हणून सारे धर्म सारखेच असले तरी समाजाच्या व राष्ट्राच्या दृष्टीने सारे धर्म सारखे नसतात, ही गोष्ट वस्तुस्थिती म्हणून ते लक्षात घेतात. धर्माच्या नावावर संघटना, समूहाच्या विभागण्या वा राष्ट्राच्या वाटण्या होत असतात, या वास्तवाची त्यांना जाणीव होती. विशेषतः मुसलमान लोक आपल्या धर्मावर राष्ट्र उभे करतात, याची त्यांनी गंभीर दखल घेतलेली आहे. दुसऱ्याच्या धर्माला हीन समजणे, आपल्या राष्ट्राला जेते समजणे, दार-उल-इस्लामाचे ध्येय अमलात आणण्यासाठी संघटित प्रयत्न करणे, ही त्यांची वैशिष्ट्ये होती. या धर्मवेडाचा संघटित ताकदीला उत्तर कसे द्यायचे, हा त्यांच्यासमोरचा प्रश्न होता. आपणही धर्माभिमानशून्य व पूर्णपणे बुद्धिवादी होवून या धर्मवेडाला उत्तर देता येणार नाही, असे त्यांना वाटते. यासाठी हिंदूनीही धर्माभिमानाची थोडीशी जाणीव ठेवली पाहिजे, ही आगरकरांची भूमिका त्यांना मान्य होती. हा धर्माभिमान म्हणजे धर्माचा वापर करण्याचा प्रकार नव्हता. संरक्षणासाठी अत्यावश्यक असणाऱ्या जाणिवेचा तो एक भाग होता, हे समजून घेतले पाहिजे.

हा धर्माभिमान म्हणजे कोणत्या धर्ममतांचा अभिमान नव्हे, तर धर्माच्या एकूण अितिहासाचा अभिमान आहे, हेही लक्षात घेतले पाहिजे. आमचा धर्म आपला प्रिय आहे; तो आमच्या पूर्वजांचा धर्म आहे; या भूमीत वाढलेला हा धर्म आहे; तो राखण्याचा आम्हाला हक्क आहे, या गोष्टीचा हा अभिमान आहे. धर्माचा उल्लेख करताना सावरकर कुठेही हिंदूच्या विशिष्ट धर्मश्रद्धेला आवाहान करताना आपल्याला दिसणार नाहीत. दुसऱ्या धर्मातील उत्तम ते घ्यावे, या त्याच्या भूमिकेला बाध येईल असे कधीही ते बोललेले दिसणार नाहीत. आपलाच धर्म

श्रेष्ठ हेही ते कुठे सूचित करीत असलेले दिसणार नाहीत. याचसाठी ते हिंदुधर्माच्या ऐवजी हिंदुत्व शब्दाचा वापर करतात. त्या हिंदुत्वाला आपला विशिष्ट अर्थ देतात. धर्मश्रद्धेपासून हिंदुत्व होऔल तेवढे मुक्त ठेवण्याचा ते प्रयत्न करतात. आपला धर्म या भूमीत जन्मास आलेला आहे. त्यामुळे आपले जीवन-मरणाचे नाते सर्वस्वी या भूमिशीच आहे, एवढीच एकच पुण्यभूची भावना लोकात हिंदुत्वाच्या आवाहानाने त्यांना निर्माण करायची आहे. त्यांच्या हिंदुत्वाचा धर्माशी असलेला संबंध एवढाच आहे. बुद्धिवादाशी केलेली तडजोड एवढीच आहे.

मुसलमान आपापला अभिमान बाळगतात; त्यातून संघटित ताकद उभी करतात; हिंदूशी संघर्ष करायला उभे टाकतात, तर मग हिंदूनीही हिंदू म्हणून संघटित व्हावे, असे त्यांना वाटते. मुसलमान धर्मवेडे तर आपणही धर्मवेडे व्हावे, असा हा प्रकार नाही, तर हिंदूनी न्याय्य हक्कांसाठी आपली संघटना करावी की नाही, हा मुलभूत प्रश्न येथे उपस्थित झालेला आहे. प्राप्त परिस्थितीत प्रत्येक जातीने न्याय्य हक्कांसाठी आपापल्या संघटना उभाराव्यात, ही सावरकरांची भूमिका होती. कोणीही संघटना करु नये हे सर्वोत्तम. पण हे जोपर्यंत साध्य होत नाही, तोपर्यंत हिंदूनीही आपली संघटना न्याय्य हक्कांसाठीच केली पाहिजे, असे त्यांना वाटते. यासाठी हिंदुत्वाचा अभिमान धरला पाहिजे, असे ते म्हणतात. ही त्यांची भूमिका बुद्धिवादाच्या विरोधी आहे काय, हे आता प्रत्यकानी ठरवावे.

मुसलमानांशिवाय अन्य अहिंदूवद्दल त्यांची तक्रार नाही. मुसलमान स्वतःला एक राष्ट्र समजतात. ह्या राष्ट्राला त्यांच्या धर्मशास्त्रात व अितिहासात आधार आहे, ही गोष्ट सावरकर लक्षात घेतात. हिंदूनीही स्वतःला राष्ट्र समजले पाहिजे, असे त्यांना वाटते. यासाठी ते हिंदुराष्ट्राची कल्पना मांडतात.

त्यांच्या हिंदुराष्ट्राचा नि हिंदुधर्माचा अर्थाअर्थी काहीही संबंध नाही. हिंदु-लोकांचे न्याय्य हक्क सुरक्षित ठेवणारे राष्ट्र असा ते हिंदुराष्ट्राचा व्यापक अर्थ घेतात. हिंदुराष्ट्र हा शब्द ते दोन अर्थाने वापरतात. राष्ट्र ही एक भावनिक संकल्पना असते, हा पहिला अर्थ आहे. हिंदुराष्ट्र-मुस्लीमराष्ट्र या एका अर्थाने भावनिक संकल्पना आहेत. मुसलमान ही भावना बाळगतात याअर्थी सावरकर मुसलमान हे एक राष्ट्र आहेत, असे मानतात. मुसलमान अशी भावना बाळगत असतील तर आपणही ती बाळगली पाहिजे, असे त्यांना वाटते. हिंदुराष्ट्र हे पुरातन आहे; ते आम्ही शोधून काढलेले नाही; पावसाळ्यातील छत्रीप्रमाणे ते उठलेले नाही असे ते म्हणतात. राष्ट्र या भावनेचा उगम खोलवर अितिहासात आहे, ही वस्तुस्थिती दाखवून देण्यासाठी ते असे म्हणतात. आमची ही राष्ट्रीय भावना मुस्लीम भावनाची प्रतिक्रिया नाही, हे ते याच भूमिकेतून पटवून देतात. आमचे हिंदुराष्ट्र तेवढेच काय ते सत्य आहे, मुसलमानाचे राष्ट्र मात्र खोटे आहे, असला पक्षपातीपणा त्यांचा बुद्धिवाद मानत नाही.

आपापल्या संकुचित राष्ट्राच्या या भावना खऱ्या असल्या, तरी प्रत्येकाने आपल्या या भावनेचा त्याग करुन प्रादेशिक राष्ट्रवादाच्या आदर्श भावनेत स्वतःला विलीन करुन घेतले पाहिजे, असे त्यांना वाटते. भारतीय राष्ट्रीयत्व एक आदर्श भावना आहे असे ते याच अर्थाने म्हणतात. मात्र मुसलमान आपली स्वतंत्र राष्ट्रीयत्वाची भावना जोवर सोडत नाहीत तोवर हिंदूनीही आपल्या हिंदुराष्ट्रीयत्वाची भावना बाळगणे भाग आहे, असा त्यांचा आग्रह आहे. अितर बुद्धिवाद्यांपेक्षा सावरकर या ठिकाणी वेगळे पडतात. मुसलमानांची ती चूक आहे. ती आपण हिंदूनी करता कामा नये, असे अितर बुद्धिवाद्यांना वाटते. सावरकरांना ते मान्य नाही. ज्या दिवशी मुसलमान त्यांच्या स्वतंत्र अिस्लाम राष्ट्राची भावना सोडतील, त्या दिवशी हिंदूनीही आपल्या हिंदुराष्ट्राची भावना सोडून द्यावी, असा सावरकरांचा उपदेश आहे. मुसलमानांच्या धर्मवेडाला कायूत ठेवण्यासाठी हाच एकच मार्ग आहे, असे सावरकरांना वाटते.

एक शासनाखाली ही दोन राष्ट्रे राहू शकतात, असे ते म्हणतात. दरडोअी-एकमत, धर्मनिरपेक्षपणे सर्वांना समान हक्क व अल्पसंख्याकांच्या धर्म व संस्कृतीच्या संरक्षणाची हमी या तत्वावर या दोन राष्ट्रांना एका राज्यात राहता येईल असे त्यांना वाटते. ही तत्वे जर दोघांनाही पसंत पडली तर हळू हळू त्यांच्यात एकराष्ट्रीयत्वाची भावना निर्माण होत जाईल, याची त्यांना खात्री आहे. मात्र हिंदूनी हिंदीराष्ट्रवादच मानावा व मुसलमानांनी मुस्लीम राष्ट्रवाद मानावा, या मार्गाने त्या दोघात एक राष्ट्रीयत्वाची भावना कधीही निर्माण होणार नाही, असे त्यांना वाटते.

हिंदुराष्ट्राचा दुसरा अर्थ बहुसंख्यांक लोकांचे राष्ट्र असा आहे. या अर्थाने बहुसंख्याकत्व हेच राष्ट्रीयत्व असा लोकशाही सिद्धांत ते मांडतात. हिंदू हे बहुसंख्य असल्यामुळे हिंदुत्व हेच बहुसंख्याकत्व होय असेही ते म्हणतात. याच अर्थाने हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व हा सिद्धांत ते मांडतात. या सिद्धांताला नीट समजून न घेऊन भल्याभल्यानी घोटाळे व गैरसमज करुन घेतलेले आहेत. या सिद्धांताचा अर्थ अहिंदूना राष्ट्रीयत्व नसते असा नसतो. अहिंदू हे अल्पसंख्य आहेत, एवढीच वस्तुस्थिती दाखवून देणे या सिद्धांताचे काम आहे. बहुसंख्याकांना अल्पसंख्य बनविणे राष्ट्रीयत्वाच्या विरोधी आहे, हे प्रकर्षाने दाखवून देण्यासाठी हा सिद्धांत माडण्यात आला आहे. या हिंदुत्वाचा हिंदुधर्माशी अर्थाअर्थी कोणताही संबंध नाही.

हिंदुराष्ट्राचे वरील दोन्हीही अर्थ कोणत्याही बुद्धिवाद्याला मानणे भाग आहे. हिंदू लोकांचेही एक राष्ट्र आहे, हे त्याला मानावेच लागेल. लोकशाहीमध्ये बहुसंख्याकांचाच राष्ट्रीय जीवनावर परिणाम होत असतो, हेही त्याला मानावेच लागेल. पहिली गोष्ट वस्तुस्थिती म्हणून त्याला मानावी लागेल, दुसरी गोष्ट, लोकशाहीचा अपरिहार्य परिणाम म्हणून मान्य करणे भाग आहे. सेक्युलॅरिझमची टोपी घालून बोलणारे आमचे बुद्धिवादी, सावरकर म्हणतात तीच गोष्ट हिंदू

ऐवजी भारतीय हा शब्द वापरुन मांडत असतात, असे आमचे म्हणणे आहे.

सावरकरांच्या हिंदीराज्यामध्ये दोन राष्ट्रे आहेत. या दोन राष्ट्राचे दोन वेगळे ध्वज आहेत. या दोन्ही ध्वजांनी हिंदीराष्ट्राच्या राष्ट्रध्वजाला नमन करायचे आहे. या हिंदीराज्याचे नाव भारत असे आहे; हिंदुस्थान नाही. सावरकरांच्या हिंदुत्वात वा हिंदुराष्ट्रात अहिंदू येत नाहीत; मात्र हिंदीराष्ट्राचे अहिंदू हे हिंदू अितकेच समान हक्काचे भागीदार आहेत. समान हक्क म्हणजे ५० टक्केचा समान वाटा नसून लोकशाही तत्वाप्रमाणे येणारे समान हक्क असा आहे. या राज्याची राष्ट्रभाषा हिंदी आहे; संस्कृत नाही. या हिंदीराज्याची घटना अद्ययावत् बुद्धिप्रामाण्यावर आधारित आहे; श्रुतिस्मृतीवर आधारित नाही. या राज्याचे पंचांग हे बुद्धिप्रामाण्यावर आधारलेले राष्ट्रीय पंचांग असणार आहे; हिंदू पंचांग नव्हे.[२] या राष्ट्रीय पंचागाचे महिने चैत्र-वैशाख असे धार्मिक असणार नाहीत; तर एक, दोन असे अंकाने मोजता येणारे गणिती पद्धतीचे असणार. विक्रम संवत हा राष्ट्रीय पंचागाचा आधार असणार नाही; तर ५००१ वर्ष हा आरंभ समजून हे नवे पंचांग अमलात येणार आहे. या पंचागाला शंकराचार्यांची अनुज्ञा लागणार नाही, तर राष्ट्र संसदेची मान्यता व राष्ट्रपतीची सही लागणार आहे. वैयक्तिक जीवनात स्वत:चे धर्मपंचांग पाळण्याचा हक्क सावरकरांचे हिंदीराष्ट्र मंजूर करते, एवढाच त्या राज्याचा धर्माशी संबंध आहे. या राष्ट्रीय पंचांगाचा हिंदुपंचागाशी जो संबंध, तोच त्यांच्या हिंदीराष्ट्राचा हिंदुराष्ट्राशी आहे, हे समजून घेतले पाहिजे.

अलगत्वाच्या भावना सोडून देवून एकात्म एकराष्ट्र कसे घडवावे हीच सावरकरांना चिंता होती. हे अगलत्व कायम राखून धर्माधर्माची भांडणे लावावी व त्यांचा लाभ घेवून आपण राष्ट्रध्यक्ष बनावे, असा आरोप सावरकरांचा शत्रूही त्यांच्यावर करु धजणार नाही. हिंदूला हिंदुत्वाचे आवाहन करणे याचा अर्थ, राजकारणात पराभूत होण्याची सोय करुन ठेवणे होय, एवढी साधी गोष्ट सावरकरांना कळत नव्हती, असे मानणे धाडसाचे ठरेल. धर्म आणि राजकारणाची मनातून व रक्तातून फारकत करुन घेतलेल्या हिंदूना धर्माचे आवाहान करुन, राजकारणात कुणालाही विजयी होता येणार नाही, हे सावरकरांना कळत नव्हते, असे मानणेच चुकीचे आहे. याचसाठी सावरकर हिंदुत्वाचे आवाहान करत होते, हिंदुधर्माचे नव्हे ! बहुसंख्य असलेल्या हिंदूना त्यांच्या बहुसंख्याकत्वाची जाणीव करुन देत होते. असे करणे बुद्धिवादाच्या कितपत विरोधी होते, हे आता प्रत्येकाने आपल्या मनाशी विचार करुन ठरविले पाहिजे.

एकात्म एकराष्ट्र निर्माण व्हावे ही गांधी–नेहरुंचीही तीव्र इच्छा होती. पण त्यांना हे जे अलगत्व आहे, ते भ्रामक आहे असे वाटे. आम्ही एकजीव आहोतच; फक्त इंग्रजासारखी भांडणे लावणारी परकी सत्ता व जिना-सावरकरांसारखे या भांडणाचा फायदा घेणारे उपद्रवी स्वकीय लोक, यांच्यामुळे हा

एकजीवपणा आपल्याला जाणवत नाही, असे त्यांना वाटे. अिंग्रजाना या देशातून व या उपद्रवी लोकांना राजकारणातून हाकलून लावले की एकजीव एकराष्ट्राचे सत्यदर्शन आपल्याला घडू शकेल, असे त्यांना वाटे. आर्थिक विषमता व शोषण यातून मुस्लीम प्रश्न जन्मला आहे, असे नेहरूंच्या मार्क्सवादी दृष्ट्रीला वाटे. त्यामुळे समाजवाद हा या रोगावरील रामबाण उपाय आहे, असे ते मानत. गांधी-नेहरूच्या या मार्गाला आपण बुद्धिवादी म्हणणार आहोत काय याचाही विचार आपण केला पाहिजे. वस्तुस्थिती पासून दूर जावून भ्रमात राहणे म्हणजे बुद्धिवादी होणे नव्हे, असे आम्हास वाटते.

समान हक्काच्या न्याय्यतत्वावर एकत्र राहण्याची मुसलमानांची प्रवृत्ती नसल्यामुळे त्यांना तसे वागण्यास भाग पाडण्यासाठी हिंदूनी हिंदू म्हणून विचार करायला शिकले पाहिजे, अशी सावरकरांची भूमिका आहे. नैतिक आवाहानाला प्रतिसाद देण्याची मुसलमानात पद्धत नसल्यामुळे या धर्मनिरपेक्ष राज्यनिर्मितीसाठीच थोडेसे भौतिक सामर्थ्य हिंदूनी निर्माण केले पाहिजे, एवढेच सावरकरांचे म्हणणे आहे. असे म्हणणे बुद्धिवादाच्या विरोधी आहे असे आपले मत असेल, तर मग यासाठी बुद्धिवादी मार्ग कोणता हे मात्र आपल्याला स्पष्ट करावे लागेल. सारे बुद्धिवादी मार्ग अयशस्वी का झाले याचेही स्पष्टीकरण द्यावे लागेल.

भारत सरकारने हिंदुराष्ट्राचा पुरस्कार केला नाही याबद्दल त्यांच्या अनुयायांना हळहळ वाटते. भारतात हिंदुराष्ट्राची स्थापना झाली पाहिजे, असे त्यांना वाटते. असे करायचे म्हणजे काय करायचे, हे त्यांनी नीट स्पष्ट केले पाहिजे. मनुस्मृती–अध्यात्मावर आधारलेले व वर्णव्यवस्थेचा पुरस्कार करणारे बॅनर्जीना अपेक्षित असणारे हिंदुराष्ट्र त्यांना भारतात स्थापायचे आहे काय, हे त्यांनी एकदा उघडपणे,व मोकळेपणे सांगितले पाहिजे. असे असेल तर प्रत्येक हिंदू अशा राज्याचा मनापासून धिक्कार करील व त्या विरूद्ध प्राणपणाने लढेल. मुसलमानांना परके समजणाऱ्या, त्यांना दुय्यम नागरिकत्व देणाऱ्या, वा राज्याच्या आधारावर त्या सर्वांची शुद्धी करणाऱ्या कोणत्याही हिंदुराज्याला सावरकरांचा खराखुरा अनुयायी विरोधच करील. सध्या भारतात असलेले भारतीय राज्य हे हिंदुराज्य नाही असे त्यांना म्हणायचे आहे काय ?

सावरकरांच्या भूमिकेप्रमाणे सध्याचे राज्य हे हिंदुराज्यच आहे. या राज्यामध्ये भारतीय घटनेतील धर्मनिरपेक्ष असलेले धोरण कसे शब्दशः अमलात येईल याची खबरदारी घेणे, एवढेच हिंदुराज्याचा आग्रह धरणाऱ्याचे कर्तव्य राहील. निधर्मीवादाने पोकळी निर्माण होते, असा आरोप करून नाही, तर त्याच तत्वाचे शब्दशः निःपक्षपातीपणे शासनाला आचरण करायला लावून सावरकरांच्या कल्पनेतील हिंदुराज्याची स्थापना करता येईल. मुसलमानांच्या संघटित शक्तीमुळे व त्यांची एकगठ्ठा मते मिळविण्याच्या राजकीय लोभामुळे हिंदू राज्यकर्ते हिंदूवरच अन्याय करणार नाहीत ना, याची काळजी घेणे, अशा अन्यायाच्या विरूद्ध सामर्थ्य

उभे करणे व धर्मनिरपेक्ष हिंदीराज्याचा पुरस्कार करणे हेच हिंदुराज्याचा आग्रह धरणाऱ्या हिंदुसंघटनेचे स्वतंत्र भारतातील कार्य राहील, असे आम्हाला सावरकरांच्या भूमिकेतून वाटते.

सावरकर हिंदुत्व–हिंदुराष्ट्र याचा आग्रह धरतात, पण त्यांच्या या कल्पनेत धर्माला फारसे स्थानच नाही. या कल्पनेत धर्मनिरपेक्षता नि बुद्धिवाद याचाच सारा आशय सावरकरांनी ओतलेला आहे, ही गोष्ट अनेक हिंदुराष्ट्रवाद्यांच्या लक्षात आल्यावाचून राहिली नाही. सावरकरांचे अनुयायी आपल्या स्वतःच्या कल्पना या हिंदुराष्ट्रात घालून व त्यावर सावरकरवादाचा शिक्का मारुन लोकांसमोर मांडत असतात. आम्ही सावरकरांचे अनुयायी नाही असे अभिमानाने सांगणारे हिंदुराष्ट्रवादी काही कमी नाहीत. सावरकरांच्या 'हिंदू' च्या व्याख्येत धर्माला स्थान नाही, म्हणून अनेकांना ही व्याख्या मान्य नसते. सरसंघचालक मा. बाळासाहेब देवरसांचे म्हणणे असे की[3] 'मी स्वतः हिंदू शब्दाची व्याख्या करायला तयार नाही, कारण व्याख्या करणे फार कठीण आहे.' त्यांच्या समोरची अडचण अगदी खरी आहे. धर्मनिष्ठ व्याख्या केली तर हिंदुसंघटन करता येत नाही; धर्मयुक्त व्याख्या केली तर हिंदुसंघटनेला कारणच उरत नाही, ही खरी अडचण आहे. त्यामुळेच ते टिळकांचीही व्याख्या स्वीकारु शकत नाहीत नि सावरकरांचीही स्वीकारु शकत नाहीत.

सावरकरांचे हिंदुराष्ट्रही याच कारणासाठी हिंदुत्वनिष्ठांना पसंत नसते. ह्या हिंदुराष्ट्राचा हिंदुध्वजही पसंत नसतो. याबाबतची एक घटना फार बोलकी आहे. श्री गोलवलकर गुरूजींनी १९७५ मध्ये रांची येथे आपल्या स्वयंसेवकासमोर ही घटना सांगितली आहे.[4] सावरकरांचा हा हिंदुध्वज संघाच्या शाखेमध्ये लावण्यात यावा, यासाठी डॉ. हेडगेवारांची मान्यता घ्यावी म्हणून त्यांच्याकडे बाबाराव सावरकर गेले होते. संघ उभा करण्यात त्यांचा वाटा लक्षात घेता असा प्रयत्न करण्याचा त्यांना अधिकारच होता. डॉक्टरनी त्यांना विचारले, 'बाबाराव हे हिंदुराष्ट्र केव्हा तयार झाले?' बाबाराव म्हणाले, 'हे राष्ट्र तर अतिप्राचीन आहे.' डॉक्टरनी विचारले, 'ध्वज कोणता होता?' बाबाराव उत्तरले, 'हाच! जो आपण दररोज शाखेवर लावतो तो." तेव्हा डॉक्टर म्हणाले, 'मग हा नवा ध्वज हिंदुराष्ट्रध्वज म्हणून लावण्याची आवश्यकता का?'

ही घटना अत्यंत बोलकी आहे. "ज्यात व्यक्तिवादी अभिनिवेशाला स्थान राहणार नाही, अशा या राष्ट्रजीवनाचे स्वरुप लक्षात घेणे आवश्यक आहे ही गोष्ट समजण्यासाठी म्हणून मी एक उदाहरण देतो" अशी सुखात करून श्रीगुरुजी ही घटना सांगतात, हे लक्षात घेतले पाहिजे. टीकेचा रोख स्पष्टपणे सावरकरांनी स्वतःच्या मनाने हिंदुराष्ट्रात नि हिंदुध्वजात जे जे आणून ठेवले, आहे त्या व्यक्तिवादावर आहे. 'जेथे राष्ट्राच्या चिरंतन स्वरूपाचा विचार होतो, तेथे असा नवीन ध्वज लावणे योग्य नाही' ही त्यांची भावना आहे. श्रीगुरूजीचे म्हणणे

अगदी बरोबर आहे. श्रीगुरुजी म्हणतात ते सावरकरांना कळत नव्हते असे समजण्याचे कारण नाही. त्यांच्या कल्पनेतील हिंदुराष्ट्रच वेगळे आहे, हे आपल्याला मान्य करणे भागच आहे. हिंदुराष्ट्र व हिंदुध्वज हा जुनाच शब्द घेऊन सावरकर त्यात आपला बुद्धिवादी व आधुनिक आशय ओतू पाहत आहेत व हा व्यक्तिवादी अभिनिवेश आहे, असेच श्रीगुरूजींना म्हणायचे आहे, असे आम्हास वाटते. जोपर्यंत मुसलमानांचे मुस्लीम राष्ट्र हिंदीराष्ट्राच्या छातीवर पाय देवून उभे आहे, तोपर्यंत-च सावरकरांचे हिंदुराष्ट्र किंकाळ्या फोडत राहणार आहे. त्यानंतर त्यांचे हिंदु-राष्ट्र हिंदीराष्ट्रात विलय पावून जाणारे आहे. ही गोष्ट श्रीगुरूजींना माहीत असल्यामुळे ते सावरकरांच्या हिंदुराष्ट्राला चिरंतन म्हणून मानायला तयार नाहीत.

आजच्या परिस्थितीत एखादी गोष्ट मनुष्याच्या वा राष्ट्राच्या हिताची आहे का नाही, याचा बुद्धीने विचार करुन त्या गोष्टीचा स्वीकार वा अस्वीकार करणे, हा दृष्टिकोण बुद्धिवादाचा आत्मा आहे. सावरकरांच्या साऱ्या विचाराचा आत्मा हाच बुद्धिवाद आहे, हेच आपण या ग्रंथात पाहिले. दुसऱ्या एका गोष्टीने पाहिले तर हा बुद्धिवादी दृष्टिकोणच स्वत:च एक आक्षेपाचा मुद्दा होवून बसतो.

या बुद्धिवादाचा एक परिणाम असा होतो की, सदासर्वकाळाकरिता एखादे मूल्य चांगले म्हणून बुद्धिवादी मांडत नाही. तो फक्त मूल्य ठरविण्याची दिशा दाखवितो, कसोटी मांडतो, काही प्रसंगी वापरून दाखवतो; पण चांगल्या मूल्याची एक ठाशीव चौकट तयार करून तो समाजाच्या हवाली करत नाही. समाजाने ही कसोटी वापरून त्या त्या परिस्थितीप्रमाणे आपली मूल्ये ठरवावीत असे त्याला वाटते. त्यामुळे एखाद्या मूल्यावर चांगले म्हणून तो स्थिर राहू शकत नाही. हे मूल्य अन्य परिस्थितीत बदलण्याची शक्यता तो गृहीत धरतो. परिणामत: ठामपूर्वक काही मूल्ये बुद्धिवादी मांडीत आहे, असे आपल्याला दिसत नसते. सावरकरांबाबतीतही असेच घडले आहे.

खरं सांगायचं म्हणजे मनुष्याला निर्भेळ बुद्धिवाद नकोच असतो. आपल्या दृष्टीने बुद्धिवाद स्वीकारणे ही एक अवघड जोखीम असते. लो. टिळक याच गोष्टीला 'भुताच्या हाती कोलीत' देणे म्हणतात. आपली अपेक्षा अशी असते की, नेता हा प्रखर बुद्धिवादी असावा. या नेत्याने बुद्धिवादी पद्धतीने मूल्ये ठरवावीत. ती त्यांनी ठरविलेली मूल्ये आपण श्रद्धेने पाळावीत. एवढाच बुद्धिवाद आपल्याला मंजूर असतो. बुद्धिवादी पद्धतीने लोकांना वागण्याचे स्वातंत्र्य देणारा बुद्धिवाद लोकांना नकोच असतो. त्यामुळे सावरकरांचा बुद्धिवाद आपले समाधान करू शकत नाही. मी म्हणतो तेच बुद्धिवादी विचाराचे फळ आहे, आता ते तुम्ही फक्त स्वीकारण्याचे काम करा, असा तोंडाने बुद्धिवाद नि आतून श्रद्धावाद असा प्रकार त्यांच्या बुद्धिवादाला मान्य नाही. त्यामुळे राष्ट्रहिताचे ते स्वीकारावे, हानिकारक ते त्यागावे अशी मोघम व ढोबळ कसोटी अपूर्ण आहे, असे आपल्याला वाटत

असते.

आदर्श समाज कसा असावा वा आदर्श राष्ट्र कसे असावे, याबद्दल सावरकरांच्या निश्चित कल्पना आहेत. त्यांच्या कल्पनेतील हा समाज वा राष्ट्र पुरोगाम्यातले पुरोगामी व आधुनिकातले आधुनिक आहे, याबद्दल शंका घेण्याचे कारण नाही. अशा आदर्श अवस्थेची गंभीरपणाने सावरकर कुठेही सुव्यवस्थितपणे मांडणी करत नाहीत, ही गोष्ट मात्र आपल्याला खटकत असते. सावरकरांच्या विचाराची चौकट पुरोगामी नवरचनेच्या आड येणारी नाही, पण त्याचा आराखडा सांगणीरीही नाही, या आपण आक्षेप घेतो,[५] त्याचे कारण हेच आहे. आधुनिक व पुरोगामी राष्ट्ररचनेची दिशा दाखविण्याचेच मुख्य काम त्यांनी केलेले आहे. त्या नवरचित राष्ट्राचा दगड नि दगड कसा असावा याबद्दल शास्त्रशुद्ध विचार ते मांडताना दिसत नाहीत. हे मांडण्यासाठी त्यांना फुरसतच मिळाली नाही, हे एक कारण होवू शकते. पण ते एकमव कारण नाही. त्यांच्या बुद्धिवादाला अशी मांडणी करणे पसंत नव्हते, हेही ते न मांडण्याचे एक कारण होते, असे आमचे मत आहे.

भारतीय राष्ट्राच्या सर्वांगीण पुनर्रचनेचा सिद्धांत व तपशील मांडणे हे एका व्यक्तीचे व पक्षाचे काम नाही अशी त्यांची भूमिका आहे. मलाच किंवा माझ्या पक्षालाच राष्ट्राच्या उभारणीच्या सर्व अंगोपांगाचे ज्ञान झालेले आहे व त्याच विचाराने या राष्ट्राची उभारणी व उद्धार होईल, अशी भूमिका सावरकर कधीही घेत नाहीत. प्रत्येक पक्षाने राष्ट्राच्या विविध अंगाचा विविध दृष्टिकोणातून विचार करावा व त्यापैकी उत्तमोत्तम एकत्र करुन राष्ट्र उभारणी करावी, असे त्यांना वाटते. एकट्याच्या विचाराच्या स्वयंपूर्णतेपेक्षा सर्वांच्या विचाराची सर्वसमावेशकता अधिक महत्वाची आहे, असे त्यांना वाटते. याचा परिणाम असा झाला की, दुसरा पक्ष राष्ट्राच्या ज्या अंगाचा गंभीरपूर्वक विचार करत नाही वा चुकीच्या पद्धतीने विचार करतो, त्या अंगाचा आपण अधिक गंभीरपणे व अग्रक्रमाने विचार करावा, असे त्यांना वाटू लागले. दुसऱ्या पक्षाचा जो भाग आपल्याला पटतो, त्याला आपण पाठिंबा द्यावा, असे त्यांचे धोरण होते. आपल्याजवळ जी ताकद आहे त्या दृष्टीने अशी श्रमविभागणी करणे भाग आहे, असे त्यांना वाटले.

त्यामुळे राष्ट्राच्या सर्व अंगाचा सारख्याच आग्रहाने विचार करत असलेले सावरकर आपल्याला दिसणार नाहीत. सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय, सांस्कृतिक आदी अंगाच्या सर्वांगीण पुनर्बांधणीचा विचार गोखले-रानडे यांच्या काळापासून मांडण्यात येत होता. सावरकरांना त्यांच्या विचाराबद्दल आदर होता. या नेत्याच्या विचारातून जो महत्वाचा भाग दुर्लक्षित केला गेला वा चुकीने मांडला गेला, तोच अग्रक्रमाने राष्ट्राला सांगण्याचे काम सावरकरानी केलेले आहे. काही प्रश्नांबाबतीत आदर्शवादाकडे झुकलेला राष्ट्रगाडा वास्तवाच्या

गुरुत्वमध्याकडे खेंचून आणण्याचे महत्वाचे काम त्यांनी केलेले आहे. सावरकरांनी जे विचार मांडले, त्याची अितर भारतीय नेत्याच्या विचारात भर घालून राष्ट्राच्या सर्वांगीण पुनर्रचनेचा विचार आपल्याला केला पाहिजे. राष्ट्रउभारणीचा सर्वांगीण विचार साकरकरांनी किती केला या आधारे त्यांचे मूल्यमापन न करता, त्यांनी जे विचार राष्ट्राला दिले त्याची दखल न घेता राष्ट्राची सर्वांगीण उभारणीच करता येणार नाही, या भूमिकेतून त्यांचे मूल्यमापन केले पाहिजे, असे आम्हास वाटते.

सावरकरांचे नाव न घेता त्यांचीच भूमिका आपल्या राष्ट्राला स्वीकारणे भाग पडत आहे, हेही समजून घेतले पाहिजे. नाव गांधीजींचे नि विचार सावरकरांचे अशा मार्गाने आपल्या देशाची वाटचाल चालू आहे. गांधीजींच्या नावाचा आपण नुसताच जयघोष करतो, कारण साऱ्या देशाचे ते एक श्रद्धास्थान आहे. ज्यांच्याकडे प्रचंड संघटनशक्ती होती, असे ते महात्मे होते. ज्यांच्याकडे प्रचंड अनुयायांची रीघ लागली, त्यांच्याकडे बुद्धिवाद नव्हता; आधुनिक विचार नव्हता. नि ज्यांच्याकडे बुद्धिवाद होता, आधुनिक विचार होता त्यांचेकडे अनुयायीच नव्हते, ही भारतीय राजकारणाची शोकांतिका आहे. हेही आता पुरोगामी लोक हळूहळू मान्य करू लागले आहेत, हेही लक्षात घेतले पाहिजे.

सावरकरांचा कठोर बुद्धिवाद समजून घेणे हाच आमच्या ग्रंथाचा हेतू आहे. आमच्या गुरुचेच म्हणणे आहे की, " "सावरकर समजून घ्यावयाचे तर हा कठोर बुद्धिवाद समजून घेतला पाहिजे, नसता सावरकर नुसताच वंदनीय होतो हे कुणी विसरू नये." आमच्या गुरुचा हा उपदेश आम्ही या ग्रंथात बरोबर पाळला का नाही, हे आता वाचकांनीच ठरवावे, ही शेवटची नम्र विनंती करून ह्या ग्रंथाला आम्ही पूर्णविराम देतो.

■■■



संदर्भ ग्रंथसूची

१. समग्र सावरकर वाङमय खंड १
२. समग्र सावरकर वाङमय खंड २
३. समग्र सावरकर वाङमय खंड ३
४. समग्र सावरकर वाङमय खंड ४
५. हिंदुराष्ट्रदर्शन
६. स. सा. वा. खंड ६
७. स. सा. वा. खंड ७
८. स. सा. वा. खंड ८
९. प्रस्तुत ग्रंथ
१०. सावरकर आत्मचरित्र पूर्वपीठिका
११. अंदमानच्या अंधेरीतून
१३. माझी जन्मठेप
१४. हिंदुत्व (भाषांतर - डॉ. सावरकर)
१५. सहा सोनेरी पाने (वीर सावरकर प्रकाशन)
१६. भाषणे सामाजिक (वीर सावरकर प्रकाशन)
१७. भाषणे राजकीय (वीर सावरकर प्रकाशन)
१८. प्राचीन अर्वाचीन महिला (वीर सावरकर प्रकाशन)
१९. भाषणे विविध (वीर सावरकर प्रकाशन)
२०. स्फुट लेख (वीर सावरकर प्रकाशन)
२१. गोमांतक (भाषांतर) (वीर सावरकर प्रकाशन)
२२. Historic Statements (संपादन : बाळाराव सावरकर)
२३. आगरकर निबंध संग्रह भाग–१
२४. The Budha and The Dhamma – Dr. Ambedkar
२५. बाळाराव सावरकरकृत सावरकर चरित्र (रत्नागिरी पर्व)
२६. बाळाराव सावरकरकृत सावरकर चरित्र (हिंदुमहासभापर्व भाग–१)
२७. बाळाराव सावरकरकृत सावरकर चरित्र (अखंड हिंदुस्थान लढा पर्व)
२८. बाळाराव सावरकरकृत सावरकर (सांगता पर्व)
२९. रत्नागिरी हिंदुसभा प्रतिवृत्त भाग २
३०. अशी गर्जली वीरवाणी – श्री. पु. गोखले
३१. स्वा. सावरकर विचार दर्शन – डॉ. अरविंद गोडबोले
३२. स्वातंत्र्यवीर सावरकर – धनंजय कीर
३३. सावरकर विविध दर्शन (व्हीनस प्रकाशन)
३४. विनायक दामोदर सावरकर : एक चिकित्सक अभ्यास - डॉ. प्र.ल. गावंडे
३५. गरुड झेप (विजय प्रकाशन, नागपूर)
३६. स्वातंत्र्यवीर सावरकर विचारमंथन – डॉ. सुधाकर आलेराव
३७. भगवान सावरकर – रा. स. भट
३८. शतपैलू सावरकर – ह. व्यं. देसाई
३९. हिंदुत्वदर्शन – संपादन : डॉ. द. न. गोखले
४०. तत्त्वज्ञ सावरकर – संपादन : य. दि. फडके
४१. शोध सावरकरांचा - य. दि. फडके
४२. सावरकरांचे आठवावे विचार अर्थात् सावरकरवाद - सुधाकर देशपांडे
४३. पुण्यस्मरण : मृत्युंजय सावरकर बनारसी सिंह
४४. अ. भा. हिंदुमहासभा अध्यक्षीय भाषण, हैद्राबाद १९७१
४५ अ. भा. हिंदुमहासभा अध्यक्षीय भाषण बडोदा, १९६८

४७. स्मृतिपुष्पे – ना. स. बापट
४८. सावरकर काव्यसंमालोचन
– वा. गो. मायदेव
४९. गीतारहस्य (आवृत्ती १० वी)
– लो. टिळक
५०. The Discovery of India
(Edition 1956) P. Nehru
५१. भारताचा शोध – पं. नेहरू
भाषांतर : साने गुरुजी व करंदीकर
५२. Jawaharlal Nehru : an
autobiography
५३. आगरकर लेख संग्रह : संपादन
ग. प्र. प्रधान
५४. आगरकरांशी ओळख : पुं.पा. गोखले
५५. गोपाळ गणेश आगरकर
– मा. दा. आळतेकर
५६. गांधीजींचे बृहद् आत्मचरित्र
(खंड–१), रचयिता - शंकरराव देव
५७. म. गांधी वाङ्मय खंड २०
प्रकाशन गांधी स्मारक समिती
५८. डॉ. भीमराव रामजी आंबेडकर
(खंड-४) चांगदेव भ. खैरमाडे
५९. डॉ. बाबासाहेब आंबेडकर :
– धनजंय कीर
६०. डॉ. भीमराव रामजी आंबेडकर :
(खंड-५) चांगदेव भ. खैरमाडे
६१. पाकिस्तान अथवा भारताची
फाळणी : डॉ. बाबासाहेब आंबेडकर
(भाषांतर : तुलशी पगारे)
६२. अस्पृश्य मूळचे कोण ?
डॉ. आंबेडकर (अनु. मा फ. गांजरे
६३. स्वामी विवेकानंद ग्रंथावली खंड २
– रामकृष्ण मठ, नागपूर
६४. स्वामी विवेकानंद ग्रंथावली खंड ३
– रामकृष्ण मठ, नागपूर
६५. व्यक्ति आणि विचार - य. दि. फडके
६६. हिंदुधर्मसमीक्षा –
तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी
६७. धर्मशास्त्राचा अितिहास (पुर्वार्ध)
पां. वा. काणे (म.रा. सा.सं.मंडळ)
प्रकाशन)
६८. भारतीय धर्म व तत्वज्ञान
श्री भा वर्णेकर
६९. Study of Sociology
Herbert Spencer
७०. वाटा : तुझ्या माझ्या
– नरहर कुरुंदकर
७१. कै. नरहर कुरुंदकर स्मृति विशेषांक
(पिपल्स कॉलेज नांदेड तर्फे)
७२. अन्वय - नरहर कुरुंदकर
७३. पं. नेहरु : एक मागोवा
नरहर कुरुंदकर व न गो.राजूरकर
७४. वारसा - नरहर कुरुंदकर
७५ शिवरात्र – नरहर कुरुंदकर
७६. गोदातटीचे कैलास लेणे - स्मृतीग्रंथ
मराठी साहित्य परिषद आं. प्र.
७७. Struggle for India
– R. C. Mujumdar
७८. नवमानवतावाद – मानवेंद्ररॉय
७९. Women and Social Injustice – M. K. Gandhi
८०. मराठी सत्तेचा उत्कर्ष – न्या. रानडे
८१. Jawaharlal Neharu's
Speeches
८२. Hindu Superiority
– Harbilas Sarda
८३. शिखांचा अितिहास
– न वि. गाडगीळ
८४. गांधी : कार्य व विचारप्रणाली
– निर्मलकुमार बोस
(अनु. भा. रा. बापट)
८५. यात्रा – नरहर कुरुंदकर
८६. आत्मवृत्त – धोंडो केशव कर्वे
८७. Mahatma Gendhi
Political Saint and
Unarmed Prophet
– Dhanjay Keer
८८. मनुस्मृती : काही विचार
– नरहर कुरुंदकर
८९. दलिताचे राजकारण - दादूमिया
९०. आत्मकथा - राजेंद्रप्रसाद
अनु. नरेश कवडी

× × × ×

संदर्भ सूची

टीप : अन्य उल्लेख नसल्यास, पहिला अंक हा त्या त्या प्रकरणातील संदर्भांक; दुसरा अंक हा संदर्भ ग्रंथाचा क्रमांक व तिसरा अंक हा संदर्भग्रंथातील पृष्ठांक समजावा. मुद्रण चुकीमुळे दोनदा आलेल्या त्याच संदर्भांकापुढे या ग्रंथातील संबंधित पृष्ठांक कंसासमध्ये दिला आहे.

विभाग पहिला

प्रकरण १.

१–३, ३०७
२–३, ३१०
३–३, ४४२
४ व ५–३, ३१२
६–३, ३८२
७ व ८–३, ३१२
९ व १०–३, ३१३
११ व १२–३, ३१४
१३–३, २९०
१४ व १५–२, २९५
१६ व १७–३, २९६
३८–३, २९७

१३–३, ६८७
१४–५९, १११
१५ व १६–२५, ३०५
१७–३, २७५
१८–३, ४१९
१९–३, ४१३
२०–३, ४१९
२१–३, २२९
२२–२, ३६४
२३–६५, १५९
२४ ब २५–६५, १५६
२६–३, ३८४

१८–२, ५४८
१९–२, ५५०
२०–६६, २२२
२१–२, ६४२
२२–२, ६७८
२३–२, ५९७
२४–३, ७५७
२५–स्वराज्य
दि. २४/५/८६
२६–माणूस
दि. २६/२/७२
२७–सोबत
दि. १७/४/८३
२८–सोबत
दि. २६/९/८२
२९–३४/प्रस्तावना
३०–३४/५८७
३१–३२/२२७
३२–३/५४३
३३–२४,
३४–लोकसत्ता,
दि.२५/५/६९
३५–२, ४१
३६(७२)–३,५४२
३६(७६)–६७,३९
३७–११,४३
३८–लोकसत्ता
दि. २५–५–६९
३९–६, ५२१
४०–२, ५५३

प्रकरण २.

१–३, ३५६
२–३, ३५८
३–२, ३५६
३ A–६, ५१४
४–६६, २२२
५–३, ३५५
६ व ७–३, ३५६
८–३, ३६३
९–३, ३६४
१०–८८,
११, महाराष्ट्र टाअिम्स
दि. १२/५/७५
१२, महाराष्ट्र टाअिम्स
दि. २७/५/७५

प्रकरण ३.

१ व २–३, ४०२
३–३, ६५३
४–३, ५७१
५–३, ६५३
६–३, १६५
७–३, १६८
८–३, १७३
९ व १०–३, १७४
११–३, २३८
१२–३, २६६
१३–३, ३२३
१४–३, ३३२
१५–३, ३७५
१६–३, ५७२
१७–२, ५४२

४१–२, ५५६
४२–६६, १३
४३–६५, १५९
प्रकरण ४.
(१)–६८,६६
(२) गीता ३/१४
(३)–३, ३२४
(४)–३, ३२९
(५)–३, ३६०
(६)–३, ३७३
(७)–३, ३३७
८(८०)–३, ३७५
८(८१)–३, ३५१
९–३, २२९
१०–३, १६५
११–३, १६४
१२–३, १८६
१३–३, ३४९
१४ व १५–३, २३२
१६–३, ६५१
१७–३, ३५१
१८–३, १७२
१९–२५, ३४५
२०–५५, १२३
२१–३०, १३५
२२–६५, १५७
२३–३, ३६२
२४–३, २६४
२५–३, २६५
२६–३, ७११
२७–माणूस
दि. २६/२/७२
२८–गोरक्षण पत्र
जानेवारी ३१
२९–गोरक्षण पत्र
दि. २/५/३५
३०–गोरक्षण पत्र
दि. १७/५/३५
३१(८९)–६५/१५७
३१(९२)–प्रमोद
दि. १८/८/३६
३२–विद्याविलास
दि. ९/९/३७
३३–प्रमोद
दि. १/१२/३५
३४ व ३५–२५, २४३
३६–३२/४९७
४१–१९/९०
४२–४१/६७
४३–९, २८३
(४४–२५, ३८५
पृ. ३४५ व ३८५
पानावरील माहिती
परस्पर विसंगत आहे)

विभाग दुसरा :

प्रकरण १.

१–६९, ३०३
२–६९, ३०७
३–६९, ३०८
४–५१, ६१२
५–५१, ६१३
६–५१, ६१४
७–५१, ६१७
८–५३, ३३
९–५३, ८
१०–५३, ९
१२–६६, ९–१०
१३–६६, ७३
१४–८५, ३९
१५–८५, ४६
१६–७०, ५९
१७–७१, ४६

प्रकरण २.

२–६५, १६२
३–४०, प्रस्ता. १९
४–३, ५४२
५ व ६–३, ५४३
७–२, ४३०–३२
१०–६२, १४
११–६२, १५
१२–३, ५४७
१३–३, ४२३
१४–३, ३७६
१५–३, ३६३
१६ व १७–३, ३७२
१८–३, ३७०
१९–३, ३६२
२०–३, ३६३
२१–३, ३४५
२२–३, ३४६
२३–३, ३६६
२४–३, ५४६
२५(१२४)–३, ४३०
२५(१२७)–३, २९९
२६–९, २४
२७(१२५)–३, ३७७
२७(१२७)–३, २९९
२८–३, ७८६
३१–९, ९९–१०६
३२–७०/६०

प्रकरण ३

१–१, २४८
२–११, ९९
※(१३०)१९,९; ३२,२८२
※※(१३०) ५,३४; ५, ५७
३–१४/४१
४–३, ३५४
५–२, ३५७
६–२६, ९६
७ श्रद्धानंद दि. ३०/८/२७
८–३, २७६
९–३, ३१५
१०–४, २९४
११–३, ३४०
१२–१३, ५००
१३–४, ४८१
१४–४, ४८५

१५–२, ४९४
१८–१३, १३०
१९–,३ २३७
२०–९, ११५
२१–३, २३६
२२–३, २३५
२३–३०, १३१
२४(१४०)–२, ४९५
२४(१४५)–३०, १३२
२४(१४६)–६५, १६५
२६–२६, २९
२७–३०, १३०
२८(१४०)२, ४९६
२८(१५०)–३, ६४४
२९ व ३०–हिंदू
२८/१२/५३
३२–३/३९९
११(१५२)–२, ५७७ व ५८१
३(१५२)–२६/१८
३५–२६,६
३६–२६,९२
३८–४७,२७
३९–४७,७१
४०–४७,२६
※ (१५४)–४,४८३
४२–३२,२९४ व ६०४
४४–७३,७२
४५–९, १५१
४६ व ८७–४० प्रस्ता.
५० (१५६) –३, २०६
५०(१६०)–७८,१५ते१७
५१–७८, २५
५२–७८, २७
५३–माणूस २६/२/७२
५४–१, २५०
५५–२७, २१२
५६–५३, १७६
५७–२७, २११
५८ व ५९–७, ४२
६०–२, ५०५
६१–२, ५१४
६२–३, २०६
६३–१८, २६
६४–१८, ३२
६५–१८, ७१
६६–३, २०७
६७–३, २१३
६८–३, २१२
६९–३, २१०
७०–३, २०६
७१ व ७२–४७, ४९
७३–४०, प्रस्ता. १८
७४–४०, प्रस्ता. १९
७५ हिंदु २८-१२-५३
७६–१६, ४३
७७–१६, ४६
७८–१६, ४७
७९–८६, ४७५
८०–८६, ४७७
८१–८६, ४८९
८२–नवभारत जाने. ४८
८३–८६, ४९९
८४–५३, १८२
८५–७९, ५
८६–१८, ९३
८७–१८, ९७
८८–१८, ९९
८९–१८, १०३
९०–७, ४५४
९१–७, ४५९
९२–७, ५३१
९३–७, ५८०
९४–७, ५८१
९५–७, ६३५
९६–७, ६८५
९७–७, ७१२
९८–७, ७१३
९९–२, २३८
१००–२१, ११७
१०१–४०, प्रस्ता.१८
१०२–१८, ८१
१०३–१६, ४१
१०४–७२, ११
१०५–७२, ११
१०६–६५, १६२
१०७–१६, ४९
१०८–१, २२१
१०९–३, ७२८ ते ३३
११०–३, ७३३

प्रकरण – ४

१–१, २०६
२–३, ६०
३–३, ३४५
४–३, २८३
५–४, ४९६
६–अ, ५/२५ व १२/४
७–३१/२६३
८–४९, ८५
९–४९, १०८
१०–४९, १०९
१२–४९, १७९
१३–२०, २१९
१४–२०, २२१
१६–३, २९९
१७–२, ५४९
१८–३, ३०३
१९–३, ३०४
२०–३, ३०५
२१–८०, १३०
२२–३, ७८७
२३–३, ७९१
२४–३, ३०६
२५(२०५)–२, ३८९
२५(२११)–८, ३
२६–४, ७२०
२७–सोबत १७/४/८३
२८–४, ७२१
२९ व ३०–३, ६१
३१ व ३२–३, ६५
३३–३, १३१
३४(२१५)–३, १३१

३४(२१७)–८७, १५२
(२१६)–४०/प्र. ११
३५–४९/२३९
३६–४, ७९३
३७–१, २४७
३८–४९, ३३९
३९–६९, १८०
४०–६९, १८१
४१–४, ७२१
४२–३०, ११९
४३–३०, १२०
४४–४, ७२८
४५–४, ७३२
४६–४, ५००
४७–३, ६४
४८–३ ६५
४९–६४, ९६
५०–६४, ९७
५१(२०२)–६४, ९८
५१(२२३)–४, ७३६
५२–Harijan
२९/४/३१
५३(२११)–६५, १५९
५३(२१८)–५७, ४९
५४–५७, १२२
५५–४, ७३७
५६–६९, १८८
५७–२१, १३३

प्रकरण ५

१–६५/१६०
२(२३०)–६५, १६२
२(२३४)–८, ४८३
३–१३, ४४५
४–८, ४८४
५–८, ४९६
६–८, ४३२
७ व ९–८, ४८५
१०–८, ४८६
११–२६/१५
१२–मराठा २७-५-३८
१३–माणूस ·६·२-७२
(२४१) –४, ३६७
१४–८/४८७
१५–१६, ४२
१६–६५, १६२
१७–८, ८१५
१८–३०, १२२
१९(२४७)–३०, १२२
१९(२४९)–३, ६३
२०–८७, ७६७
२१–८१, १०४
२२–लोकसत्ता
२–५–७०
२३–८, ४८८
२४–८, ४८९
२५–३२, ५२०
२६–३२, ५१९
(२५३)–८९, ४०
२७–८, ४९०
२८–४, ७२१
२९–८, ५१३
३०–७, ५९३
३१–४, ३७३
३२–२६, २५४
३३–३२, ५२०
३४–३२, ५२१
३५८, ४८९
३६–८, ५१९
३७–६५, १६०
३८–३९(प्रस्ता.)
३९–१५, २०८
४०–२, ४३५
४१–८२, ५२
४२–८२, ४५
४३–१६, ४२
४४–३९ (प्रस्ता.)
४५–३९ (प्रस्ता.)
४६–४९, ३५५
४७–४९, ६६
४८–४९, ३६०
४९–४९, ३६१
५०–११, ९८
५१–४९, ३५३
५२–४९, २९
५३–४९, ३६
५४–३, १९६
५५–११, १००
५६–७३, २
५७–७३, ८३
५८–७३, १७
५९ व ६०–७३, १८
६१–७३, १९
६२–७३, २६
६३–७३, २७
६४–२६, ३६
६५–२६, ३६
६६–३९ (प्रस्ता.)
६७–७४, ९२
६८- १, २४९
६९–१, २४८
७०(२७६)७, १७२
७१ माणूस
७०(२४५)-१. २४८
७१·माणूस
२६/२/७२

विभाग तिसरा

प्रकरण १.

१०–५०, ५२६
२–४, २९६
३–२, ७०३
४–२, ७०७
५–२, ७०९
६–४, २९८
७–५०, ५२६
९–९, २४
१०–३, १८७
१२–३, १८५
१३–२, ५१८

१४–३, १६३
१५–६५, १५७
१६–३, १६३
१७–१६, ४३
१८–२०, १८४
१९–प्रमोद, १८-८-३६
२०–भाला, २-३-३१
२१–७०,७६
२२–४० प्रस्ता./१२
२३–२०, १९१
२४–२, ७०२
२५–३, ३३८
२६–४, ३००
२७–३, ३३८
२८–७, ५६७
२९–७, ६४०
३०–७, ४६
३१–३८, १६०
३२–१६, ४३
३३–१, २४९
३४–२, ७०२
३५–२, ५८३
३६–३, ६२७
३७–२, ७०३
३८–७१, ४६
३९–२, ५८५
४०–३, २८७
४१–२५, १२८
४२–२५, १६९
४३–२५, १७९
४४–२५, २७३
४५–२५, २७८
४६–२७, ७०
४७(३१४)–२५, २७९
४७(३१५)–१६, ७५
४८–१६, ७५
४९–१६, १६३
५०–२६, ३७१
५१–२५, १९६
५३–२९, ५९
५४–२९, ६०
५५–४७, २
५६–३२, २०१
५७ पत्र दि. २९-१०-४०
५८–३, ४९१
५९–२५, १६९
६०–माणूस दि. अ. ७४
६१–२५, ३००
६२–७, ८०
६३–२५, ३३१
६४–२, ५२२
६५–३, ३०१
६६–७, ५५०
६७–५, २८४
६९–५, ६४२
७०–२०, २४०
७१–२०, २४९
७२–४०, प्रस्ता. ८
७३–२०, २४४
७४–४, २९८
७५–२५, २८०
७६-लोकसत्ता २५.५.७५

प्रकरण – २

१–४९, ५६
२–४९, १७८
३–३, ७८३
४–२०, २४१
५–४८, १७
६–३३, ८५
७–३३, ११०
१०–७, ११५
१२–२, ४९७
१२A–७, ९६
१३–७, १३८
१४–७, १८५
१५–७, १३७
१६–७, १८५
१७–१३, ७७
१८–१३, १२३
१९–११, ४५
२०–११, १३७
२१–१४, ७३
२२–११, ४३
२३–१९, ८७
२४–१३, २४४
२५–१३, २४५
२६–१३, ३९९
२७–१३, ४०३
२८–१३, ५०
२९(३४५)–१३, ५०
२९(३४६)७, १५९
३०–७, ४१६
३१–७, १५९
३२–३८, २२५
३३–४, ४१६
३४–३३, १०४
३५–७, ३९१
३६–७, ८६
३७–१३, ८८
३८–७, ४९९
३९–२, ६४२
४०–७, १५३
४१–१, ११४
४२–३४, ३६७
४३–७, २४०
४४–२१, २१
४५–२, ६१७
४६–२५, १२३
४८(३५४)–७, ५९८
४८(३५५)–७, ६१०
४९(३५५)–७, ६१०
४९(३५६)–७, १५४
४९A–७, १५४
५०–११, ७४
५१–४०, प्रस्ता.१०
५२–गीता ६/१५
५३–योग सूत्र १/१२
५४–माणूस दि. अ. ७४
५५–७, ९५
५६–६, ५२१
५७–११, ४३

५८–३७, १८
५९–लोकसत्ता
दि. २२/२/६९
६०–३०, १९
६१–३, ७८६
६२–३७, १७
६३–२५, १८५
६४–२६, ७८
६५–३, ३८७
६६ माणूस दि. अ ७४
६७–३०, १२
६८–४३, ५३
६९–महाराष्ट्र टाअिम्स
दि. १६/१०/८२
७०–म. टा.
दि. २१/११/८२
७२ (६३६) लोकप्रभा
दि. २७/५/८४
७२(३६४)–७, ९६
७३–लोकसत्ता
दि. २२/२/७६
७४–३७, १७
७५(३५४)–२०, २२१
७५(३६५)–५३, ४९
७६–५३, ५२३
७७–५३, ३७४
७८–५३, ३७६
७९–५०, १३
६०–५०, १४
६१–५०, १८

प्रकरण ३ –१–

१–१४, ११
२ व ३–१४, १२
४–६, १७
६–१४, ९७
७–१४, १०२
८–६, १७
९–१४, ९९
१०–१४, १०१
११–१४, १२४
१२–१४, ९८
१३–३, ७११
१५–१४, १००
१६–३, ७१३
१७–१४, १०१
१८–१५, १२
१९–१४, १०८
२०–९, १३१
२१–१४, २९
२२–७, ५९७
२३–८३, १५
२४–३६, ४०
२५–३६, ४३
२६–१४, २९
२७–१४, ४१
२८ व २९–१५, ४९
३०–६, १३
३१–१४, ३३
३२–३, ५३२
३३–१५, ६७
३४–१५, ९५
३५–१५, ३३५
३६–३, ५७१ व ५७८
३७–३, ६८० व ६८४
३८–३, ५७२
३९–३, ८०९
४०–३, ८१०
४१–३, ८११
४२–३, ७१६
४३–३, ७१९
४४–३, ७२४
४५–३, ७२६
४६–६, ८४
४७–६, ९०
४८–६, ८८
४९–६, ५८
५०–६, ५५
५१–४०/प्रस्ता. १८
५२-६५, १६३
५३–१४, १३४
५४–२०, ३
५५–६, ५९
५६–१४, ९४
५७-(३९७)१४, ९५
५७(३९८)१४, १०७
५८–१४, १०७
५९–१४, १०९
६०–१४, १०९
६१–३६, ६४
६२–५, ६७
६३–१४, ८३
६४–१४, ६९
६५–६, ५८
६६ सोबत १२/६/८३
६७–५०, २२
६८–५०, ३७
६९–५०, ३९
७०–५०, ४२
७१–५०, ६२

–२– व –३–

१ तरूण भारत पुणे, ८/३/८७
२–४०, ८८
३–३७, ११
४–६५, १६७
५–६५, १६३
६–६५, १६५
७–१, १२०
८–४, १९
९–३४, २८३
१०–४१, ८८
११–४१, १७१
१२–४१, ६५
१३–८, २३३
१४–८, २३४
१५–४२, ४५
१६–८, २११
१७–३२, ७८
१८–८, २३३
१९–८, २३४
१९A–३६, ४२
२०–२६, ४१
२१–२६, २९
२२–३, ५७२

—५—
१–५, ४४
२–१०, ९५
३–५, ६८
४–६१, २१२
५–६१, २२७
६–६१, २३०
७–६१, २३१
८–६१, २३३
९–६१, २३६
१०–६१, २७४
११–६१, २४८
१२–६१, २४०
१३ व १४–६१, २६५
१५–६१, २६६
१७–६१, २९७
१८–४० प्र. १४
१९–४० प्र. १३
२०–सोबत दिवाळी ७३
२१–७५, ११६
२२–७५, ११०
२३–७५, ११३
२४–७५, ११८
२५–७५, १०७ ते १२३
२६–७५, १२०
२७–७५, ११४
२८–७५, ११६
—६—
२–५, २४
३ व ४–५, ३०
५–३६, ७४
६–केसरी २७/८/४३
७–५, ६७
९–७५, ११८
१०–३२, २४०
११–२७, १४२
१२–५, ११५
१३(४७७)–३२, ४४२
१३(४७६)–२८, ८८
१४–५१, ६२३
१५–५१, ६१९
१०–५६, ५६७
११–५६, ५६८
१२–८७, १५०
१३–५६, ३७२
१४-५६. ३७३
१५-८४. १५८
१६–८४, २०४
१७–८४, १५२
१८–७७, ३१९
१९–५६, ४५७
२०–५९, ३०४
२१–५६, ४४८
२२–५६, ३३१
२४–८७, ६०८
२५–९०, ४९३
२६–९०, ४९६
२७–५६, ४६९
२८ व २९–६१, १०६
३०–८७, ७५१
३१–३२, ३२४
३२(४४६)–८७, ७०९
३२(४४३)-९०, ३०८
३३–८७, ६८१
३४–Harijan ४/५/४०
३५–८७, ६८९
३६–४, ३४१
३७–७५, ७
३८–७६, ८७
३९–६१, ११३
४० व ४१–७५, ९
४२–७६, ९४
४३–७५, ९
४४–७५, ८
४५ व ४६–८७, ७३३
४७–३२, ३६७
४८–८७, ७२३
४९(४५६)-८७, ७२४
४९(४५७)–६०, ३७
५०–५८, ९७
५१–३२, ४०४
२३–२५, ३९४
२४–४१, १६१
२५–५, ११६
२६–स्वदेश, मुंबई १६/११/४४
२७–३, ७६४
२८–३, ७६१
२९–२०, १९७
३०–३, ७३३
३१–२६, ५०
३२–२६, १९७
३३–४, ३३५
३४–४, ३४६
३५–लोकसत्ता २३/५/८२
३६–प्रभात ३०/५/४३
३७–१०, १०१
३८- १०, ९७/९८
३९–१०, ९७
४०–प्रभात ३०/५/४३
४१–२६, ५०
४२–४, ३४६
४३–५, २
४४–५, २१
४५-५, २२
४६–५, २३३
४७–५, २७
४८–५, ८५
४९–५, ७६
५०–५, १२९
५१–४, ३४०
५२–४, ५१६
५३–१७, ५
५४–५, ११४
—४—
१–६१, ९४
२–५, १३१
३–५, १३२
४ व ५–६१, २००
६–६१, २०३
७ व ८–६१, २०४
९–५६, ५६६

१६–५०, ६४
१७–काळ २७/८/४३
१८–३६, ७६
१९–३६, ७५
२०–२२, २१७
–७–
१–१४, १३०
२–३, ७५९
३–३, ६४४
६–५, ७६
७–५, ७७
८–नवाकाळ १२/८/३८
९–२७, ९१
१०–हिंदू २८/१२/५३
११–४, ३४१
१२–४, ३४८
१३–४, ३५०
१४(४८६)–३, ७६१
१४(४८७)–२६, १८
१५(४८४)–५, १५
१५(४८७)–४, ३५७
१६ केसरी १४/१०/३८
१७–६१, २७५
१८–६१, २८५
१९–६१, २०
२१–६१, २७८
२२–६१, २८७
२३–६१, २८८
२४–६१, २८९
२५–७५, १४१
२६–७५, १२५
२७(४९२)–७५, ११६
२७(४९३)–७५, ११८
–८–
२–३२, ४४३
३–३२, ४४१
४–२८, ८८
५–२२, २०७
६–केसरी २०/२/४२
७–३६, ११५
८–३६, ११६
९–१६, ८०
१०–३६, ११३
११–४५, १४
१२–४५, २७
१३–४४, ५
१४–४४, ८
१५–४४, १०
१६–४५, १४
१७–४५, १५
–९–
१–केसरी १/८/३९
२–२६, १७७
३–२७, ९७
४–काळ १/८/४२
५–२६, २७७
६–२२, १८६
७–२७, १८१
८–२७, २२६
९–२७, १७८
१०–२२, ८६
११–२२, ९९
१२–५, २९
१३–५, ७९
१४–२०, १०–११
१५–२७, १५०
१६–२७, २३३
१७–नवाकाळ १२/८/३८
–१०–
१–(५१४)५३, १३१
१–(५१३)५३, १३०
२–(५१३)५३, १३१
२–(५१४)५३, १३२
३–५३, ३४३
४–५३, ३४६
५–३, ७५५
६–३, ७५६
९–५५, २६७
१०–५५, २७९
११–५५, २७६
१२–५६, ४७५
१४–३, ७५५
१५ व १६-सुधारक २१-८-९३
१७– „ ११-९-९३
१८– „ १३-२-९२
१९ व २०–२३, ८०
२१–५३, १३६
२२–५, ४४६
२३–५३, १३८
२४–५५, ४२८
२५–५४, २२५ ते २३०
समारोप –
१–२०, २०७
२–२०, २२३
३–भाषण सामाजिक समता व हिंदू संघटन पुणे ८/५/७४
४–विवेक, ८/६/७५
५–सोबत, १२/६/८३
६०–७२, ३१

REFBK-0025667